अमरावती शहराचा इतिहास

खंड क्रमांक – ३
(सचित्र)

संपादक : वा.ब. खापर्डे



शके १९२३ युगाब्द ५११०३ इसवी सन २००१

प्रकाशक : अमरावती महानगर पालिका, अमरावती.

- अमरावतीचा शहराचा इतिहास (प्रथमावृत्ती)
  खंड ३ रा
  (इ.स. १९३३ ते १९४७, १५ ऑगस्ट)
  अमरावतीची डायरी, पुरवणी आणि परिशिष्टे

- संकलन - संशोधन-संपादन व लेखन
  कै. भि.दे. कारंजकर

- पुर्नसंपादन व संक्षेपीकरण :
  श्री. वासुदेव बळवंत खापर्डे, अमरावती.

- संपादक :
  श्री.वासुदेव बळवंत खापर्डे

- प्रकाशक :
  महानगर पालिका अमरावती

- हक्क :
  सर्वाधिकार महानगर पालिका अमरावती यांच्या स्वाधीन

- प्रकाशन काल : २००१

- मुद्रक :
  शरद नांदूरकर
  सुबोध मुद्रण, राजापेठ, अमरावती. फोन : ६७९६०९

- कॉम्प्युटर टाईपसेटींग :
  उदय तारे
  श्रीवत्स कॉम्प्युटर्स अँन्ड पब्लीशर्स,
  ३३६, टांक बाजार, अमरावती.फोन : (नि) ५६२३९७



।। श्री गणेश ।।

।। वक्रतुंड महाकाय सूर्यकोटि समप्रभ । निर्विघ्नं कुरु मे देव सर्व कार्येषु सर्वदा ।।



।। श्री अंबादेवी ।।

उदुम्बरे वसेन्नित्यं भवानी सर्व देवता । ततः सा प्रत्यंह पूज्या गन्ध पुष्पाक्षतादिभिः ।।



।। श्री एकवीरा देवी (मोठी अंबा) ।।

अमरावती शहराचा इतिहास

खंड ३ रा

परिशिष्टे व पुरवणी

अनुक्रमणिका

प्रकरण क्र.	प्रकरणाचे नाव	पृष्ठ क्र.
*	मा. महापौर मनोगत	
*	मा. आयुक्त मनोगत	
*	प्रास्ताविक - प.सि.काणे	
*	अर्पण पत्रिका.	
१)	निवेदन व ऋणनिर्देश	४
२)	श्री कारंजकरांचे निवेदन	६
३)	संपादक श्री.वा.ब.खापर्डे यांचे निवेदन	१८
४)	प्रा.राम शेवाळकर यांचा आशीर्वाद.	२७
५)	गतकाळाचा आढावा.	२९
६)	अमरावती नगर पालिकेचा शतसांवत्सारिक इतिहास. महानगर पालिकेची स्थापना. आमच्या अमरावतीची मानसिकता	५९
७)	इ.१९३३ ते इ. १९४७ पर्यंतच्या स्थानिक घडामोडींची टिपणे	८६

परिशिष्टे

प्रकरण क्र.	प्रकरणाचे नाव	पृष्ठ क्र.
१)	अमरावतीतील आध्यात्मिक संतपुरुष.	४४९
२)	अमरावतीतील धार्मिक संस्था. मंदिरे, मठ, आध्यात्मिक संस्था	४९७

प्रकरण क्र.	प्रकरणाचे नाव	पृष्ठ क्र.
३)	अमरावतीतील कीर्तीमान व्यक्ती.	५६१
	महिलांची कर्तबगारी व योगदान.	७०७
४)	डॉ.आंबेडकरांचे अमरावतीतील ऐतिहासिक भाषण.	७३९
५)	विधायकांचा संक्षेपात परिचय.	७४०
६)	साहित्य सोनियाच्या खाणी.	७४७
	विदर्भ साहित्य संघ. साहित्यिकांची दिंडी.	
७)	सूरसंगम	७९०
	रंगभूमी	८०८
८)	अमरावतीतील काही शिक्षण संस्था.	८१६
९)	काही सेवा प्रवण संस्थां	८४०
१०)	राजकीय पक्ष , इतर संस्था.	८६९
११)	श्री.हनुमान व्या.प्र. मंडळ, रा.स्व.संघ,	९१८
	राष्ट्र सेवा समिती, क्रीडा क्षेत्र.	
१२)	वृत्तपत्र सृष्टीचा आढावा.	९४२
१३)	पुरस्कार गौरव	९५४
१४)	महिलांचे मनोगत	९७१
१५)	विविध	९९०
१६)	आर्थिक व व्यावसायिक संस्था	१००२
१७)	आर्थिक जगत	१०२५
१८)	स्वातंत्र्यसंग्राम सैनिकांची यादी	१०३२
१९)	दृष्टीक्षेपात अमरावती	१०३९
२०)	सत्रन्यायालय शताब्दि महोत्सव	१११४
२१)	निसर्गराणी : कोलखास	१११७
२२)	अवर्गीकृत प्रकरणे	११२८
२३)	लेखक व संपादकाची निवदने	११४१
२४)	आभार व ऋणनिर्देश	११४५



पुण्यश्लोक श्री शिवाजी महाराज

अमरावती शहराचा इतिहास



अमरावती महानगरपालिका,
स्थापना - १५ ऑगस्ट १९८३



मनोगत.....

'अमरावती', विदर्भातील ऐतिहासिक शहर. या शहराच्या जडणघडणीत अनेकांचा सिंहाचा वाटा आहे. या शहराचे ऐतिहासिक वैभव जपण्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करावयास पाहिजे तसेच ज्यांचे हातून हे शहर घडविण्याचे कार्य घडले त्यांचे कायम स्मरण राहावे. उद्याच्या पीढीसाठी या शहराचा इतिहास मिळावा यासाठी कै. भिमराव कारंजकरांनी संकलित केलेल्या माहितीच्या आधारे अमरावती शहराचा इतिहास खंड १ व २ यापूर्वीच प्रसिद्ध झाले. मी प्रथम म.न.पा. सदस्य म्हणून निवडून आल्यानंतर प्रथम महापौर डॉ. देविसिंग शेखावत यांनी हे खंड मला भेट म्हणून दिले त्याचे आजही स्मरण आहे. मी स्थाई समितीचा सदस्य असताना ह्या तिसऱ्या खंडाचे छपाईचा ठराव मांडून मंजूर करुन घेतला होता. आज या तिसऱ्या खंडाचे संकलन श्री. वासुदेवराव खापर्डे, यांचे अथक प्रयत्नाने व श्री. श्रीधरभाऊ वाघोळकर व श्री. मधुकरराव शेरेकर यांचे सहकार्याने आज पूर्ण करुन आपल्या हाती देतांना मला अतिशय आनंद होत आहे. माझ्या महापौर पदाच्या कालावधीत या तिसऱ्या खंडाचे प्रकाशन होणे , मला माझ्या कार्यकाळात मिळालेला सन्मान समजतो. हे पवित्र कार्य माझ्या कार्यकाळात पूर्ण करण्यास मा. उपमहापौर श्री. दिगंबर डहाके ,पक्षनेता, मा.श्री. वसंतराव साऊरकर, आयुक्त श्री. धनराजजी खामतकर , श्री. भानुदास भुजाडे व स्थायी समिती सभापती , म.न.पा. तील सदस्य यांचे सहकार्य लाभले. त्या सर्वांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करतो व हा अमरावती शहराचा इतिहास , खंड ३ रा संशोधकांना, विद्यार्थ्यांना त्यांच्या कार्यात खऱ्या अर्थाने मार्गदर्शक व एक ऐतिहासिक अनमोल ठेवा म्हणून उपयोगी राहील अशी अपेक्षा आहे.

विलास इंगोले
महापौर,
अमरावती महानगर पालिका



मनोगत.....

सप्रेम नमस्कार,

'अमरावती शहराचा इतिहास' लिहून काढण्याची स्फूर्ती एका भाग्यवान क्षणी श्री. भि.दे.कारंजकर यांना झाली. त्यांनी माहिती संकलित करुन अमरावती शहराचा नऊशे वर्षाचा इतिहास तयार केला. अमरावती नगरपालिकेने तो इतिहास खंड १ व खंड २ या स्वरुपात प्रकाशित केला.

असाच एक भाग्यशाली क्षण श्री. वासुदेवराव खापर्डे यांच्या जीवनात आला व त्यांनी यापुढील कालखंडाचा इतिहास तयार करुन दिला. त्याला 'अमरावती शहराचा इतिहास (खंड ३)' हे नाव देऊन अमरावती महानगरपालिका आज तो प्रकाशित करीत आहे ही फार आनंदाची गोष्ट आहे.

इतिहासास मानवी जीवनाच्या उत्क्रान्तीत अनन्य साधारण महत्व आहे. इतिहास वाचनातूनच यशाची नवीन क्षितिजे पादाक्रांत करण्यास मदत मिळते. इतिहास वाचनातून आपली जन्मभू व कर्मभू यांची गौरवशाली माहिती मिळते. मायभूमीचा व देशाचा अभिमान विकसित होतो. नवीन कार्याला दिशा , प्रेरणा व चालना मिळते. प्रस्तुत इतिहास वाचनातून अमरावतीच्या नवीन पिढीस आपल्या पूर्वजांच्या वैभवशाली इतिहासाची जाणीव होऊन त्यांचेकडून सुद्धा दैदीप्यमान कार्य घडावे अशी दूर्दम्य महत्वाकांक्षा निर्माण होईल. प्रस्तुत पुस्तकात अंतर्भुत व्यक्ती अमरावतीतील असल्या तरी त्यांचे कर्तृत्व देशव्यापी होते. श्री. वासुदेवराव खापर्डे यांनी त्यांच्या ओजस्वी लेखणीतून अमरावतीकरांचा इतिहास नवीन पिढीसमोर ठेवण्याचा केलेला प्रयत्न कौतुकास्पद आहे. ग्रंथात अनेक परिशिष्टे जोडून या ग्रंथाची शोभा वाढविण्याचा प्रयत्न प्रशंसनीय आहे.

प्रस्तुत ग्रंथनिर्मितीसाठी श्री. वासुदेव ब. खापर्डे त्याचप्रमाणे अनेक संस्था, वृत्तपत्रे, मासिके व व्यक्ती यांनी सहाय्य केले आहे. त्या सर्वांचा मी आभारी आहे.

धनराज खामतकर
आयुक्त
महानगर पालिका, अमरावती



प्रास्ताविक

प. सि. काणे, अमरावती.

इ.स. १९९४ मध्ये श्री. वासुदेवराव ब. खापर्डे यांनी टिपणांचे एक मोठे थोरले बाड वाचावयास दिले. त्यात अमरावतीच्या इतिहासाच्या तिसऱ्या खंडाची रुपरेषा होती. श्री. वसंतराव साऊरकर यांनी दि. १६/१/१९९६ रोजी ठराव मांडला व हा खंड ३ रा प्रकाशित करण्याची जबाबदारी महानगर परिषदेने घेण्याची सूचना मांडली. ती सूचना सर्वानुमते मान्य झाली. त्याप्रमाणे श्री. खापर्डे तयारीस लागले व आता हा खंड प्रकाशित होऊन वाचकांसमोर येत आहे.

अभ्यासकांनाहि हा इतिहास महत्वाचा वाटेल अशी आशा आहे. अनेक गोष्टींवर रिसर्च पेपर्स लिहिले जातील इतकी महत्वाची माहिती आपल्याला या इतिहासच्या खंड १, २ व ३ मधून मिळते. असा हा ग्रंथ तयार होत असतांना माझाहि अल्पसा हातभार त्यात प्रारंभीच लागला यात मला आनंद होत आहे.

अमरावती ही माझी जन्मभूमि नसली तरी कर्मभूमी मात्र निश्चितच आहे ह्याबद्दलहि मला अभिमान वाटतो. कारण पाच पिढ्या सतत समाजसेवा करुन नावलौकिक कमावला अशा तुरळक घराण्यांपैकी आमचे एक घराणे आहे.

या प्रसंगी अमरावतीत होऊन गेलेल्या काही महत्वाच्या घटनांची आठवण डोळ्यापुढे झरझर तरळत आहे. अमरावतीला इ. १८९७ साली भरलेल्या काँग्रेस अधिवेशनाने भारतीय राजकारणाला नवी दिशा दिली. काँग्रेसमध्ये जहाल-मवाळ भेद उदयास आले.

अमरावतीने काँग्रेसला तीन अध्यक्ष दिले आहेत. 'भारताचा मार्कट्वेन' ही पदवी अमरावतीतीलच एका व्यक्तीस मिळाली. 'विदर्भाचे टागोर' ही पदवी अमरावतीतील एका महाकवीस मिळाली.

न्यायालयाने फाशी दिलेल्या एका व्यक्तीला फाशीच्या फंदातून सुखरुप सोडवून आणण्याची कामगिरी अमरावतीच्या एका वकीलाने केली. लोकमान्य टिळकांचे वकीलपत्र घेऊन इंग्लंडपर्यंत न्यायदेवतेचे दरवाजे ठोठावण्याचे महत्कार्य अमरावतीच्या वकीलांनी पार पाडले. भारताची पहिली स्वराज्य घटना इ. १९२६ साली अमरावतीत लिहिली गेली. मुस्लीम संस्थेचे अध्यक्षपद तहहयात काळपर्यंत मिळाल्याचे उदाहरण फक्त अमरावतीत घडले. भारतातील पहिल्या नाट्यसंमेलनाचे अध्यक्षपद अमरावतीतील व्यक्तिला मिळाले. पहिले न्हावी संमेलन , पहिले धोबी संमेलन अमरावतीत झाले होते. अखिल भारतातील दुसरे यंत्रसामुग्रीचे प्रदर्शन अमरावतीत झाले होते.

अमरावतीच्या साधु-संतांनी राष्ट्रीय स्वरुपाचे कार्य केले. क्रांतिकार्यात भाग घेतला. सामाजिक सुधारणा घडवल्या. शैक्षणिक कार्य केले. भारतातील पहिला हरताळ अमरावतीत झाला. पहिला बहिष्कार अमरावतीत पडला.

हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ ही जागतिक कीर्तीची संस्था अमरावतीचीच. तसेच तपोवन ही डॉ. शिवाजीराव पटवर्धनांची संस्था अतिविख्यात आहे. वंदे मातरम् वरील महर्षी अरविंदांचे भाषण अमरावतीत झाले होते. विदर्भ साहित्य संघ अमरावतीत स्थापन झाला होता.

अशी ही वैशिष्ट्यपूर्ण अमरावती नगरी. ऐतिहासिक महत्वाची दुमदार नगरी. आपल्या नगरीचा इतिहास लिहावा असे दिल्ली, मुंबई, कलकत्ता, मद्रास , बनारस या शहरांना वाटले. आता भारतात सहावा क्रमांक अमरावतीचा आहे. ह्या कार्यात मूळचे लेखक श्री. बापूसाहेब कारंजकर यांना श्री. खापर्डे यांनी फार मोलाचे सहकार्य दिले. म्हणून तिसरा खंड पूर्ण करण्याची जबाबदारी त्यांच्यावर आली हे उघडच आहे. ती त्यांनी फार यशस्वी रीतीने पार पाडली आहे. या बद्दल त्यांचे मी हार्दिक अभिनंदन करतो. अमरावतीतील कर्तबगार महिलांविषयी त्यांनी फार कष्ट करुन माहिती मिळवली आहे.

या ग्रंथ निर्मितीबद्दल श्री. खापर्डे अभिनंदनास पात्र आहेत.

अर्पण पत्रिका

त्याग आणि सतत संघर्षाचे प्रतिक

समाजवादाचे प्रवक्ते व स्वातंत्र्य

संग्राम सैनिक आदरणीय

कै. श्री.एस. एम्. जोशी (अण्णा)

यांस हा ग्रंथ आदरपूर्वक अर्पण

करीत आहे.

महाराष्ट्र दिन
१ मे, १९८९
शके १९११

भि.दे. कारंजकर,
ग्रंथकर्ता.

निवेदन व ऋणनिर्देश

''जिज्ञासा मानवाची एक स्वाभाविक प्रवृत्ति आहे. ज्या शहरात माझा जन्म झाला, ज्या भूमीच्या मातीत मी खेळलो आणि ज्या नगरीच्या कडेखांद्यावर मी वाढलो, जेथील सामाजिक आणि राजकीय जीवनाचे बरे वाईट प्रवाह मी पाहिले आणि अनुभवले, त्या नगरात वास्तव्य करणारा समाज व त्या समाजाच्या विविध क्षेत्रातील घडामोडींची, घटनांची माहिती मिळवावी अशी जिज्ञासा माझे मनांत फार पूर्वी पासूनच होती आणि संधी मिळताच मी या जिज्ञासेपोटीच ही गतकालातील सर्व घडामोडींची, घटनांची आणि व्यक्तींची माहिती मिळविण्याचा कसोशीने व जिद्दीने प्रयत्न केला. त्या प्रयत्नांचे फल म्हणजेच हा ''अमरावती शहराचा इतिहास'' होय.

हा इतिहासाचा कालखंड अकराव्या शतकापासून असून तो भारताचे स्वातंत्र्य दिनी म्हणजे १५ ऑगस्ट १९४७ पाबेतोचा आहे. या कालखंडातील या नगरीचे ग्रामातून मोठ्या शहरात रुपांतर झालेले आहे. पण ही प्रक्रिया घडतांना या नगरीला अनेक यातना सहन कराव्या लागल्या असे दिसून येते. हा घटनाक्रम व घडामोडींचा आलेख कोणत्या पध्दतीने लिपीबध्द करावा याचा मी बराच विचार केला आणि शक्यतो मूळ कागदपत्रेच उधृत करणे उचित असे ठरवून त्याप्रमाणे तो याव्दारे लिपीबध्द केला आहे. हेतू हा की, कालांतराने मूळ दस्तऐवज, आठवणी किंवा आख्यायिका नष्ट झाल्या किंवा विस्मृतीत गेल्या तर त्याचा धागा या निमित्ताने तरी कायम रहावा.

या तिसऱ्या भागात १९३३ ते १९४७, १५ ऑगस्ट एवढा कालखंड आला आहे. त्यात महत्वाच्या घटना म्हणजे १९४१ चा जातीय दंगा, १९४२ ची चळवळ, १९४६ चे रेल्वेचे आंदोलनही दिले आहे.

मला ३-४ वर्षापूर्वी पॅरॅलेसीसचा झटका आला होता व त्यामुळे शरीराच्या डाव्या अंगाला अशक्तता आली होती. हात व पाय बरोबर काम करीत नव्हते. उजव्या हातातील शक्ती नाहीशी झाली होती म्हणून लिहिता येत नव्हते. बोलणेही जमत नव्हते. अशा अवस्थेत हा इतिहास पूर्ण करायचा म्हणजे कठीण काम होते. तो

कसा तरी पूर्ण केला. या सर्व इतिहासाला आधार अमरावतीत प्रसिध्द होणारे व्दि साप्ताहिक 'उदय' या वृत्तपत्रातील आलेल्या बातम्या, उदयमधून आलेला मजकूर, लेख वगैरचाच आहे. बाकीचा काही वृत्तपत्रांचा व काही ग्रंथांचा आधार घेतला आहे.

इतिहासाचा हा भाग लिहिण्यासाठी ज्यांनी मला मदत दिली, सहकार्य दिले त्यांचा मी अत्यंत ऋणी आहे. अमरावती विद्यापीठाने टायपिंग मशीनवर टायपिस्ट सहा महिने दिला होता. याबद्दल विद्यापीठाचे कुलगुरु श्री.के.जी. देशमुख साहेब यांचा मी अत्यंत ऋणी आहे.

याशिवाय विद्यापीठाचे श्री.जगताप साहेब व त्यांचे सहकारी यांचा मी आभारी आहे. याशिवाय अमरावती महानगरपालिकेचे प्रशासक श्री.काळमेघ, श्री.नायडू साहेब, श्री.पेंडसे साहेब, श्री.तलरेजा साहेब यांनी टायपिस्ट आणि टापिंग मशीन मला वापरायला दिली त्यामुळे हा सर्व इतिहास टाईप होऊ शकला. या शिवाय असाच इतिहास पूर्ण करण्याच्या दृष्टीने मुलाखतीचा उपयोग झाला त्या सर्वाचा मी आभारी आहे. सर्वात महत्वाचे म्हणजे अमरावतीचे आमदार डॉ. श्री.शेखावत साहेब यांनी जी मदत केली त्यांचा मी आभारी आहेत. याशिवाय श्री.पटेरिया, श्री.वासुदेवराव खापर्डे, श्री.बोथराजी, श्री.वैजनाथजी, श्री.गवई साहेब, श्री.रामदयालजी गुप्ता, श्री.बापुराव टाले या सर्वाचा मी आभारी आहे. यांच्या सहकार्यामुळे हा इतिहास पूर्ण होऊ शकला. याशिवाय ज्यांनी मदत केली पण त्यांचे नांव आठवत नाही त्यांचाही मी आभारी आहे.

अमरावती.

दि. : ३०.६.१९८८.

भि.दे. कारंजकर,

ग्रंथकर्ता.



कै. भि. दे. कारंजकर,
लेखक, अमरावती शहराचा इतिहास खंड १ व २

२) अमरावती शहराचा इतिहास : पहिल्या खंडात आलेले निवेदन.

लेखकाचे निवेदन

केल्याने होत आहे रे

आधी केलेचे पाहिजे - रामदास

'' अमरावती शहराचा इतिहास '' यासारखा एकदा संशोधनपर ग्रंथ लिहिण्याचा प्रसंग माझ्यावर कधी काळी येईल याची मला कल्पना ही नव्हती. गेली २५-३० वर्षे संघर्षमय जीवन व्यतित केल्यामुळे आपल्या हातून असा एकदा ग्रंथ लिहून होईल ही कल्पना पुसटपणे देखिल मनात येणे शक्यच नव्हते. मात्र विविध प्रकारची जुनी नवी माहिती, कात्रणे, लेख (त्यात अमरावतीची जुनी माहिती) इत्यादींचा संग्रह करण्याचा व वाचनाचा माझा छंद जुनाच आहे. शिवाय इ.सन १९५० ते १९६० या काळात साप्ताहिक ''संघर्ष'', साप्ताहिक ''ज्वाला'', साप्ताहिक ''जागृत-वऱ्हाड'' आदी साप्ताहिके व द्विसाप्ताहिके चालविण्याची जबाबदारी कारणपरत्वे मी सांभाळली असल्याने वृत्तपत्रास आवश्यक अशा विविध प्रकारच्या माहितीचा संग्रह करण्याचा व कात्रणे जमविण्याचा माझा छंद वाढीस लागला.

या सर्व माहितीचा उपयोग वेळी प्रसंगी मी केला तरी, ग्रंथ लिहिण्याचे दृष्टीने त्यांतील माहितीचा उपयोग होईल, याची मला कल्पना नव्हती. परंतु गेल्या ५-६ वर्षापूर्वी १९७२ चे सुमारास डोळ्यांनी एकाएकीकमी दिसायला लागले आणि हळूहळू, चालण्याफिरण्याचे दृष्टीने कठीण होऊ लागले. दोन्ही डोळ्यात मोतीबिंदू झाल्याचे डॉक्टरांनी सांगितले होतेच. स्वच्छ दिसत नसल्याचे बाहेरील कामे बंद पडली आणि जवळ जवळ घरी बसण्याचा प्रसंग आला. सतत कार्यमग्न असलेल्या व्यक्तीवर असा प्रसंग म्हणजे मोठीच आपत्ती. शेवटी रिकामा वेळ घालविण्यासाठी जुनी कात्रणे, टिपणे , नोंदीच्या वह्या, इत्यादी जमेल तसे चाळण्याचा कार्यक्रम सुरु झाला. त्यातूनच मला अमरावती शहराचा इतिहास

लिहिण्याची कल्पना सुचली. इ.सन १९७३ मध्ये अमरावती नगरपालिकेचा शताब्दी महोत्सव करण्याचे ठरले व त्या निमित्ताने अमरावती नगरपालिकेचा १०० वर्षाचा इतिहास लिहून प्रसिध्द करावा असे ठरविण्यात आले होते. त्यासाठी नगरपालिकेतील जुने रेकार्ड चाळून त्याची टिपणे घेण्यात आली होती. त्या टिप्पणीचा उपयोगही अमरावतीचे इतिहासाला होईल हे जाणून त्यांच्या प्रतिलिपी मी घेतल्या (पुढे हा शताब्दी महोत्सव लांबणीवर पडला.) मी ठरल्याप्रमाणे अमरावती शहरासंबंधी जेवढी म्हणून जुनी माहिती व टिपणे मिळवता आली ती मिळवून व एकत्र करुन ठेवली आणि आणखी माहिती व त्यासाठी पुस्तक, ग्रंथ इत्यादी चाळणे चालू ठेवले. १९७४ मध्ये एका डोळ्याचा मोती बिंदू पूर्ण झाल्याने त्या डोळ्याने दिसेनासे झाले व दुसऱ्या डोळ्याची दृष्टी बरीच मंद झाली. तेव्हा डोळ्याचे ऑपरेशन करण्याचा डॉक्टरांनी सल्ला दिला. परंतु तोंडावर म्यु. निवडणुकी होत्या त्यामुळे निवडणुकी आटोपल्यानंतर फेब्रुवारी १९७५ मध्ये एका डोळ्याचे ऑपरेशन केले. पुरेशा विश्रांती नंतर चष्मा लावला त्यामुळे वाचता येऊ लागले. पण चष्मा लावल्यानंतर डोके दुखणे सुरु झाले आणि दुसरीकडे प्रकृतीवरही परिणाम झाला. जास्त वेळ घरात विश्रांती घेणे भाग पडले, पण त्याचा उपयोग संकल्पित अमरावतीचा इतिहास लिहिण्यासाठी करण्याचे ठरले होते. त्याप्रमाणे त्यावरच मी सर्व लक्ष केंद्रित केले. थोड्या अवधीत या ग्रंथ लेखनाचे दृष्टीने जो अनुभव आला त्यावरुन हे कार्य किमान ८ : १० वर्ष चालेल असा मी कयास केला होता. वेळ घालवण्यासाठी हा छंद बरा होता.

पुढे १९७५ मध्ये नगरपालिकेचा शताब्दी महोत्सव करण्याचे ठरविण्यात आले आणि या शताब्दी निमित्ताने अमरावती शहराचा इतिहास प्रसिध्द करणे जास्त समयोचित ठरेल असे वाटले वरुन नगराध्यक्ष श्री.हरिभाऊ कलोती आणि मुख्याधिकारी श्री.बाळासाहेब मुळे यांनी मला हा इतिहास लवकर पूर्ण करा असा आग्रह केला. त्याप्रमाणे मी या कार्यावर अधिक लक्ष केंद्रित केले. कच्चा आराखडा तयार केला पण वर म्हटल्याप्रमाणे हे काम दीर्घ मुदतीचे असल्याने अगदी

शिकस्त करुनही गेल्या सुमारे सव्वातीन वर्षात या इतिहासाचे दोन भाग तेवढे पूर्ण होऊ शकले.

इतिहास म्हटला म्हणजे तो सत्यच असला पाहिजे. काल्पनिक किंवा केवळ ऐकीव अशी माहिती इतिहासाला चालत नाही. त्यामुळे संशोधन करुन, प्रत्येक घटनेला आधार देणे हे काम फार किचकट, दीर्घ काळाचे आहे. प्रत्यक्ष हा ग्रंथ वाचताना वाचकांस त्याची कल्पना येईलच.

या कामासाठी अमरावतीच्या व इतर ठिकाणच्या वाचनालयातील दुर्मिळ ग्रंथ, ऐतिहासिक दस्तावेज वगैरे आणि संशोधन मंडळातील ग्रंथ कागदपत्रे, पुणे, हैद्राबाद व दिल्लीच्या सरकारी अभिलेखागारातील जुनी कागदपत्रे इत्यादींचा फार उपयोग झाला आहे. अमरावती नगर पालिकेतील जुनी कागदपत्रे,फाईल्स, व प्रोसिंडीग बुके, सर्व्हे सेटलमेंट रेकार्डस् वगैरे अनेक कागदपत्रांचे संशोधन करुन त्याचा उपयोग करावा लागला आहे.

खालील संस्थांच्या वाचनालयातील संदर्भ ग्रंथाचा मी उपयोग केला आहे.

१) एशियाटिक सोसायटीची सेंट्रल लायब्ररी, मुंबई.
२) भारत इतिहास संशोधक मंडळ, पुणे.
३) केसरी - मराठा संस्थेचे ग्रंथालय, पुणे.
४) महाराष्ट्र राज्य अभिलेखागार, पुणे.
५) आंध्र राज्य अभिलेखागार, हैद्राबाद.
६) राष्ट्रीय अभिलेखागार, दिल्ली.
७) विदर्भ संशोधन मंडळ, नागपूर.
८) राजाराम वाचनालय, नागपूर.
९) नागपूर विद्यापीठ ग्रंथालय, नागपूर.
१०) श्री.समर्थ हायस्कूल, भारतीय महाविद्यालय, केसरबाई लाहोटी

महाविद्यालय, शाहू हिंदी पुस्तकालय, अंबादेवी संस्थान ग्रंथालय आदी अमरावतीच्या संस्थांची ग्रंथालये.

याशिवाय अमरावतीच्या इतिहासाची महत्वाची साधने म्हणजे कै. दादासाहेब खापर्डे यांची डायरी, चरित्र व खापर्डे रेकार्ड, कै. सर मोरोपंताचे चरित्र आणि इ.सन. १९२० पासूनचे "उदय" पत्राचे फाईल्स, अमरावती नगर पालिकेची इ.सन १८७० पासूनची प्रोसिडींग बुके व इतर कागदपत्रे, इ.सन १९२८ पासूनचे सर्व्हे-सेटलमेंट रेकार्डस, अमरावती कॉटन मार्केट कमेटीचे जुने रेकार्ड यांचाही उपयोग केला आहे.

तसेच अमरावतीचे पत्रकार व जुने कार्यकर्ते श्री.रघुपतराव देशमुख, दे.भ.श्री.त्रिबंक गुरुजी, श्री.गिरगांवकर, श्री.सुदाम देशमूख, सौ.सीताबाई ब्रम्ह, श्री.रा.ब. खरे ॲडव्होकेट, श्री.गव्हाणे, श्री.वासुदेवराव खापर्डे, पंचशील विद्यालयाचे श्री.निंभोरकर, श्री.शिवचंद्रस्वामी माणूरकर, श्री.अण्णासाहेब देशमूख पाटील तारखेडा, या सर्वांनी या कार्यासाठी त्यांचे कडील पुस्तके व इतर माहिती उपलब्ध करुन देऊन या कार्यास हातभार लावला आहे.

शिवाय सेन्सेस रिपोर्टस, पोस्ट ऑफीस गाईडस्, गॅझेटीयर्स, जुनी मासिके, वृत्तपत्रे, स्मरणिका, सनदा इत्यादींचा या कामी उपयोग झालेला आहे.

कै.श्री.टिकेकर मास्तर, श्री.लढके गुरुजी, श्री.कुलकर्णी मास्तर, प्रा.मा.ल.व्यवहारे, श्री.उमदीकर, वैद्य.श्री.हिर्लेकर इत्यादी व्यक्तींच्या आठवणींचा यांत प्रसंगोपात उपयोगही केलेला आहे.

साबणपुऱ्यातील जुन्या मसजिदला इ.सन १६५८ साली औरंगजेब बादशहाने दिलेल्या सनदेचा अस्सल इंग्रजी तर्जुमा माझे मित्र श्री.अब्दुल सत्तार, माजी उपाध्यक्ष अमरावती नगर पालिका, यांनी पुरविला. तर भाजी बाजारातील श्री.दिंगबर जैन आदिनाथ मंदीराच्या पंच मंडळीनी विशेषत: श्री.भिसेकर गुरुजी यांनी, तेथील जुन्या मूर्तीची व त्या वरील कोरीव लेखाची माहिती दिली.

श्री.अंबादेवी संस्थानची जुनी प्रोसिंडिग बुके, संस्थानचे सेक्रेटरी श्री.भास्करराव ढोके यांनी पाहण्यासाठी उपलब्ध करुन दिलीत. सर्व्हे सेटलमेंटचे रेकार्डचे बाबतीत श्री.लक्ष्मणराव हेडावू यांचे अमोल सहकार्य मिळाले आणि खापर्डे घराण्यातील एक उत्साही व नेहमी सहकार्यासाठी तयार राहणारे तरुण श्री.वासुदेवराव खापर्डे यांचे या ग्रंथासाठी जे सहकार्य मिळाले ते खरोखरच फार मोलाचे असे आहे. सर्वांचा मी अत्यंत आभारी आहे.

या ग्रंथाला आवश्यक अशी काही चित्रे माझे संग्रही होती पण तेवढ्याने काम भागण्यासारखे नव्हते. म्हणून आणखी चित्रे, विशेषत: दुर्मिळ चित्रे-मिळविण्याचा माझा सतत प्रयत्न चालू होता. श्री.वासुदेवराव खापर्डे यांनी काही महत्वाची दुर्मिळ चित्रे मला दिलीत. तसेच हैद्राबादहून काही चित्रे आणली. पुण्याच्या केसरी - मराठा ट्रस्ट या संस्थेकडून, तसेच पुण्याच्याच भरत नाट्य संशोधन मंडळाकडून आणि ''उदय'' च्या फाईल्स मधून दुर्मिळ चित्रे मिळालीत. श्री.दे.भ. रतनलालजी काळे यांचेकडून, देवी संस्थानकडून, श्री.अण्णासाहेब देशमूख (तारखेडा) यांचेकडून, तसेच सौ. सीताबाई ब्रम्ह, श्री.किशोर देशपांडे, श्री.मोतीदासजी उदासी, श्री.नरेंद्र जयकृष्ण मुळे, बार रुम असोसिएशन, श्री.भीमरावजी देशपांडे वकील, हनुमान व्या.प्र.मंडळ आणि अरबिंदो सोसायटी अमरावती आणि इतर अनेक ठिकाणाहून या बाबतीत चांगले सहकार्य मिळाले. त्या सर्वांचा मी आभारी आहे.

या सर्व साधनांचा संकलित यथामती उपयोग करुन हा अमरावती शहराचा इतिहास पुन: पुन्हा लेखन करुन व त्यावर वारंवार संस्करणे करुन आजच्या स्वरुपात तयार झाला आहे. या ग्रंथात अजूनही बऱ्याच उणीवा आहेत याची मला जाणीव आहे. ह्या उणीवा दूर करण्याचे काम बरेच श्रमाचे, खर्चाचे अन् काहीसे किचकटही आहे. एवढेच नव्हे तर ते दीर्घ मुदतीचेही आहे. निरपवाद इतिहास तयार करण्यासाठी दीर्घ परिश्रमाबरोबरच अनेकांचे सहकार्यही हवे आहे. असा प्रयत्न नव्या दमाच्या उत्साही तरुणांनी करावयास हवा. त्यांना या ग्रांथापासून

स्फूर्ती मिळाली तरी मी केलेल्या परिश्रमाचे सार्थक झाले असे मी समजेन. एवढे प्रचंड कार्य एकट्याचे मात्र नाही.

हा ग्रंथ शक्य तितक्या लवकर तयार करुन प्रसिध्द करण्याची तात्कालिक प्रेरणा मात्र अमरावती नगरपालिकेच्या शतसांवत्सरिक महोत्सवाच्या निमित्ताने मला मिळाली. हा उत्सव इ.सन १९७३ मध्येच व्हावयाचा, पण तो पुढे ढकलला गेला. या उत्सवप्रसंगी अमरावती शहराचा व नगर पालिकेचा इतिहास लिहून प्रसिध्द करावा अशी एक औचित्यपूर्ण कल्पना पुढे आली.

जिज्ञासेपोटी ग्रंथ लिहिण्याच्या माझ्या मूळच्या इच्छेला अमरावती नगरपालिकेचे विद्यमान अध्यक्ष श्री.हरिभाऊ कलोती आणि मुख्याधिकारी श्री.बाळासाहेब मुळे यांनी प्रोत्साहन दिले. नगरपालिकेच्या शताब्दी समारोह प्रसंगी केवळ नगरपालिकेचा गेल्या शंभर वर्षाचा इतिहास प्रसिध्द न करता संपूर्ण अमरावती शहराचा सर्वांगीण इतिहास प्रसिध्द करणे हे अधिक औचित्यपूर्ण ठरेल, एवढेच नव्हे तर तसे केल्यास नागरिकांना आपल्या या जन्मभूमी अन् कर्मभूमीची अज्ञात माहिती उपलब्ध होईल व ते मोठे समाजकार्य घडेल असे त्या दोघांचे प्रांजळ मत पडले. त्यासाठी त्यांनी मला आग्रहही केला. मूळची जिज्ञासा व हा प्रेमळ आग्रह यामुळे माझा उत्साह दुणावला व सातत्याने सुमारे सव्वातीन वर्षे अविश्रांत परिश्रम करुन मी हा इतिहास यथामती लिहून काढला. या कामात मला डॉ.प्रा. मदन भट आणि प्रा. मा. ल. व्यवहारे यांचे मोलाचे साहाय्य मिळाले आहे ही बाब विशेष उल्लेखनीय असून, त्याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे.

इ.सन. १९२० साली अमरावती येथे सुरु झालेल्या "उदय" वृत्त पत्राची सालवार फाईल्स म्हणजे अमरावतीचा इ.सन. १९२० नंतरचा बोलका इतिहास व या फाईल्समुळे या इतिहासाचा दुसरा व तिसरा भाग लिहिण्यासाठी फार मोलाची मदत झाली आहे. त्याच काळात १९२३ मध्ये डॉ. वऱ्हाडपांडे यांच्या संपादकत्वाखाली आणि वीर वामनराव जोशी यांचे नेतृत्वाखाली अमरावतीत सुरु झालेले "स्वतंत्र हिंदुस्थान" या साप्ताहिकांचे व तत्कालीन इतर काही साप्ताहिकाचे

अंक प्रयत्न करुनही उपलब्ध होऊ शकले नाहीत.

अमरावती नगरपालिकेचे सर्व सदस्य व कित्येक कर्मचारी यांचेही या कामी बरेच सहकार्य लाभले आहे. त्याबद्दल ते धन्यवादास पात्र आहेत.

पुण्याच्या भारत इतिहास संशोधक मंडळाचे कार्याध्यक्ष, इतिहासाचार्य प्रा. श्री.ग.ह. खरे यांनी या ग्रंथातील ऐतिहासिक कालखंडाचे प्रकरण २, वाचून जिव्हाळ्याने योग्य ते मार्गदर्शन केले आहे. तद्तच नागपूरच्या विदर्भ संशोधन मंडळाचे डॉ. देवपुजारी (नागपुर विद्यापीठाच्या इतिहास विभागाचे माजी प्रमुख) यांनी या ग्रंथाची टंकलिखित प्रत वाचून महत्वाच्या सूचना दिल्या आहेत.

प्रसिध्द इतिहास तज्ञ श्री.सेतु माधवराव पगडी, मुंबई, डॉ.अ.ना. देशपांडे, नागपूर व डॉ. श.गो.तुळपुळे, पुणे, हे अमरावतीला व्याख्यान दौऱ्यावर आले असता त्यांनीही या ग्रंथाची टंकलिखित प्रत वाचून आपला अनुकूल अभिप्राय देऊन प्रोत्साहित केले आहे. याबद्दल मी त्यांचा सदैव कृतज्ञच राहीन. अमरावतीचे वयोवृध्द नागरिक कविभूषण प्रो. अण्णासाहेब खापर्डे यांचा या ग्रंथाला आशीर्वादही लाभला आहे.

या ग्रंथात अनेक ग्रंथातील संदर्भ आणि अवतरणे उदघृत केली आहेत. त्या सर्व ग्रंथकरांच्या ऋणातच राहणे मी पसंत करतो. तसेच यवतमाळचे श्री.महाजन वकील यांनीही बरीच महत्वाची माहिती पुरविली आहे. अमरावतीचे कै.श्री.राजाभाऊ देशपांडे यांनीही सुरुवातीचे हस्तलिखित वाचून उपयुक्त सूचना केल्या आहेत व प्रोत्साहन दिले आहे. या सर्वाचा आभारपूर्वक उल्लेख केल्यावाचून राहवत नाही.

एखाद्या देशाचा किंवा प्रांताचा इतिहास लिहिण्यासाठी साधने उपलब्ध होऊ शकतात. पण ज्या गावांना पौराणिक आणि ऐतिहासिक महत्व नाही अशा आधुनिक युगात प्रसिध्दीस आलेल्या अमरावतीसारख्या नगरीचा पूर्वे इतिहास लिहिणे खूप अवघड असते आजचे अमरावती नगर पूर्वी प्रसिध्द नव्हते.

इसवी सनाच्या सतराव्या शतकात तर त्याला परगण्याचाही दर्जा नव्हता हे गाव लहान होते.

अमरावतीस जागतिक प्रसिध्दी मिळाली, ती कापसाच्या व्यापारामुळे हा व्यवसाय अमरावतीस इ.सन. १८१३ चे सुमारास सुरु झाला आणि इ.सन. १८६६-६७ मध्ये येथे कॉटन यार्ड अस्तित्वात आले. इ.स. १८९७ मध्ये अमरावती येथे झालेल्या काँग्रेस अधिवेशनामुळे आणि इ.सन. १९२० नंतर सुरु झालेल्या स्वातंत्र्य आंदोलनाचे वऱ्हाडातील प्रमुख केंद्र म्हणून अमरावतीस विशेष प्रसिध्दी मिळाली पण या सर्व घटना अगदी अलीकडच्या आहेत. त्या दृष्टीने इ.सन. १८०० पूर्वीचा जुन्यातला जुना इतिहास संशोधून व ती माहिती क्रमवार संकलित करुन या ग्रंथात देण्याचा प्रयत्न केला आहे.

आपल्या देशाचा, महाराष्ट्राचा किंवा वऱ्हाड प्रांताचा संशोधित इतिहास विव्दान लेखकांनी लिहून प्रसिध्द केलेला आहे. परंतु एखाद्या शहराचा संशोधित इतिहास लिहिण्याची परंपरा आपलेकडे नाही. याला अपवाद दिल्ली, बनारस व मुंबईसारख्या शहरांचे संशोधित इतिहास काही विव्दान लेखकांनी लिहून प्रसिध्द केलेत पण असे प्रयत्न तुरळक गावां पुरतेच आढळतात. त्यामुळेच ह्या अमरावतीच्या इतिहासाचे टंकलिखित जेव्हा श्री.सेतू माधवराव पगडी यांनी पाहिले तेव्हा त्यांनी त्याची प्रशंसा केली आणि हा पायंडा चांगला आहे असे प्रोत्साहनपर शब्द काढलेत. त्यावरुनच हा प्रयत्न किती आवश्यक होता ते लक्षात येईल.

या ग्रंथातील माहितीची सुरुवात अकराव्या शतकापासून होते व ही माहिती भारताच्या पहिल्या स्वातंत्र्य दिनाचा, म्हणजे १५ ऑगस्ट १९४७ चा वृत्तान्त देऊन संपते. यापैकी पहिल्या भागात अकराव्या शतकापासून तो इ.सन. १९१९ अखेर पावेतोची, दुसऱ्या भागात १९२० ते १९३२ व तिसऱ्या भागात १९३३ ते १५ ऑगस्ट १९४७ पावेतोची माहिती आलेली आहे. दुसऱ्या व तिसऱ्या भागातील माहितीची मांडणी थोड्या निराळ्या पध्दतीने केलेली आहे. ती वाचत

असताना त्या त्या वर्षात अमरावतीस घडलेल्या राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक इत्यादि घडामोडींचा आणि त्या त्या काळातील व्यक्ती, नेते आणि बोलभाषा यांचा परिचय होतो. एवढेच नव्हे तर तत्कालीन अमरावतीच्या लोक जीवनाची स्पंदने ऐकावयास मिळतात. प्रत्येक सार्वजनिक कार्यक्रमावर देशभक्तीची, देश सेवेची अशी छाया पडलेली होती हे पदोपदी जाणवते आणि स्वातंत्र्यपूर्व काळात व स्वातंत्र्योत्तर काळातील लोकभावना व प्रवृत्तीतील फरक जाणवू लागतो.

आजचे अमरावती हे शहर मूळचे उदुंबरावती या नावाने एक चिमुकले ग्राम. हे ग्राम इसवी सनाच्या अकराव्या, तेराव्या सतराव्या अन् अठराव्या शतकात अस्तित्वात असल्याचे पुरावे उपलब्ध आहेत. अठराव्या शतकाच्या पहिल्या दशकात हे ग्राम ओसाड बनले, पण पुढे त्याच शतकाच्या तिसऱ्या दशकात ते प्रयत्नपूर्वक पुन्हा बसविले गेले. अठराव्या शतकाच्या उत्तरार्धापासून तर या शहराची चांगलीच भरभराट झालेली आहे.

एकोणविसाव्या शतकाच्या पूर्वार्धात या शहरावर निजामाची सत्ता होती. उत्तरार्धात इंग्रजी राजवट सुरु झाल्यावर या शहराला राजकीय महत्व प्राप्त झाले आणि कापूस व्यवसाय, शिक्षण, सामाजिक व राजकीय चळवळी यांची सुरुवात झाली. सर्व वऱ्हाडच्या शासकीय नियंत्रणाचे केंद्र अमरावती येथे आले.

अमरावतीचे पुनर्वसन व विकास अठराव्या शतकाच्या मध्यात राणोजी उर्फ सवाई संताजी भोसले (अमरावतीकर भोसले) यांनी केल्यामुळे तोच या शहराचा पहिला नेता ठरतो. अठराव्या शतकात या शहराचे नेतृत्व व्यापारी व सावकार यांचेकडे असावे असा संकेत मिळतो. एकोणविसाव्या शतकाचे उत्तरार्धात आणि विसाव्या शतकाच्या सुरवातीस या शहराचे नेतृत्व श्री.दादासाहेब खापर्डे, सर मोरोपंत जोशी, रा.ब. मुधोळकर इत्यादि उच्च मध्यम वर्गातील इंग्रजी विद्या विभूषित वकील मंडळींनी केले आहे तर, इ.सन. १९२० पासून पुढे वीर वामनराव जोशी, डॉ.पटवर्धन, सौ.पटवर्धन, श्री.नानासाहेब गोखले,

श्री.बाबासाहेब खापर्डे, श्री.वामनगांवकर इत्यादि त्यागनिष्ठांकडे हे नेतृत्व आलेले आहे असे दिसून येते.

संपूर्ण भारतात आणि वऱ्हाड प्रांतात ज्या घडामोडी निरनिराळ्या काळात घडल्या त्याचे प्रतिध्वनी या शहरात अपरिहार्यपणे निनादले. त्याची माहिती देतांना, देशात वा वऱ्हाडात घडलेल्या काही घटनांचा संक्षिप्त उल्लेख स्वाभाविकपणेच या ग्रंथात आलेला दिसेल. ज्या व्यक्तींचा आणि घटनांचा उल्लेख आलेला आहे अशा व्यक्तींची अन् घटनांची आवश्यक ती माहिती तळटिपेत दिलेली आढळेल. या शिवाय आवश्यक त्या माहितीची परिशिष्टेही ग्रंथास जोडली आहेत.

या ग्रंथात समाविष्ट केलेल्या हकीकतीचे सामान्यत: पुढील टप्पे पाडता येतात.

१) प्राचीन व पौराणिक काळ-रुक्मिणी हरणाची आख्यायिका.
२) अकरावे शतक ते सतरावे शतकातील अमरावती.
३) अमरावतीकर भोसले घराणे व त्यांची कारकीर्द.
४) निजामाचे काळातील अमरावती.
५) अव्वल इंग्रजी अमदानीतील अमरावती.
६) विसाव्या शतकातील अमरावती.

या टप्प्यानुसार या ग्रंथात प्रकरणांची योजना केली आहे. वास्तविक केवळ हौस म्हणून ऐतिहासिक पुस्तके वाचण्यापलिकडे ''इतिहास'' या विषयाशी माझा संबंध नाही. परंतु अमरावती शहराचा इतिहास लिहिण्याच्या दृष्टीने कोणीही इतिहासज्ञ अजून पुढे न आल्यामुळे केवळ जिज्ञासेपोटीच हा तुटका-फुटका प्रयत्न मी केला आहे. तो कितपत यशस्वी झाला हे तज्ञ वाचकांनीच ठरवावे.

त्याच प्रमाणे अमरावतीच्या इतिहासाला पूरक अशी अज्ञात माहिती व कागदपत्रे जर कोणाजवळ असतील तर ते मला अवश्य कळवावे म्हणजे त्याचा उपयोग ग्रंथाची पूरक माहिती म्हणून दुसऱ्या आवृत्तीच्या प्रकाशनाचे वेळी

करता येईल. वाचकांनी या ग्रंथासंबंधीचा आपला अभिप्राय कळविला तर त्याचाही उपयोग ग्रंथाच्या पुर्नमुद्रणाचे वेळी मार्गदर्शक होईल.

या ग्रंथाचे स्वरुप काहीसे गॅझेटीयर सारखे झालेले आहे पण त्या दृष्टीने यांत दिलेली माहिती अपुरी आहे याची मला जाणीव आहे.

कोणतीही जुनी माहिती सहजासहजी मिळत नाही व मिळाली तरी तिच्या खरेपणाविषयी जरुर ती खात्री करुन घ्यावी लागते. यात वेळ बराच जातो. त्यामुळेही काही उणीवा राहिल्या आहेत.

वास्तविक अशा तांत्रिक स्वरुपाचे ग्रंथाला पाच-सात वर्षाचा अवधी देखिल अपुरा ठरावा. शिवाय हे एका व्यक्तीचे काम नव्हे, केवळ तीन-सव्वातीन वर्षात एकट्याने हा प्रपंच केला त्यामुळे उणीवा आणि काही दोष राहणे अस्वाभाविक नाही. अर्थात उणीवा व दोष राहू नयेत यासाठी जरुर ती खबरदारी घेतलेली आहे.

''इतिहास'' हा शब्द इति, ह आणि आस या संस्कृत शब्दांचा बनलेला आहे. या शब्दाचा अर्थ ''भूतकाळात असे झाले किंवा घडले'' असा स्थूलमानाने होतो. म्हणजे गतकालाची हकीकत किंवा पूर्वजांच्या लहान थोर कृत्यांचे वर्णन आपल्या पूर्वजांचा, आपण राहतो त्या देशाचा, प्रांताचा किंवा गावाचा पूर्वेतिहास जाणून घेण्याची स्वाभाविक इच्छा प्रत्येकाला असते. शिवाय वर्तमानकाळात घडणाऱ्या गोष्टी ह्या एकाएकी घडत नाहीत तर त्याला मागील अनेक वर्षाची किंवा शतकांची परंपरा असते. अशा ह्या मागील परंपरेची माहिती या इतिहासाव्दारे मिळते. म्हणूनच इतिहासाला त्या दृष्टीने अनन्य साधारण महत्व आहे. अर्थात हा अमरावती शहराचाच इतिहास नसून येथे राहणाऱ्या हजारो लोकांच्या, वर्ग आणि जातींच्या, सामाजिक, धार्मिक राजकीय व सांस्कृतिक घडामोडींचाही इतिहास आहे. म्हणून तो वाचताना थोडी चिकित्सक दृष्टी बाळगणे जरुरी आहे.

या ग्रंथात दिलेली माहिती कोणत्या ना कोणत्या कागदपत्रांचे आधारेच दिलेली असल्याने ती पूर्णपणे सत्य हकीकत आहे. अगदी तुरळक घटना ऐकीव किंवा आठवणी यांचे आधारे दिलेल्या आहेत. अर्थातच हा अमरावतीचा सत्य इतिहास आहे. या ग्रंथात विषयाशी संबंधित नसलेली काही माहिती आल्याचे दिसून येईल. उदाहरणार्थ ''वऱ्हाड आणि निजाम'' यातील संबंधाबद्दल ठिकठिकाणी उल्लेख आलेला आहे. परंतु वस्तुत: या प्रश्नावर म्हणजे वऱ्हाड परत निजामाकडे जाऊ नये म्हणून पुढे मोठे आंदोलन उभे झाले ती माहिती तिसऱ्या भागात येणार आहे. पण त्याची पार्श्वभूमी कळावी म्हणून हे उल्लेख जरुर तेथे वेळोवेळी केलेले आहेत.

शेवटी, ज्या ज्या लोकांचे आणि संस्थाचे सहकार्य या कामी साह्य मिळाले त्या सर्वांचा नामोल्लेख करणे अशक्य असल्याने, त्या सर्वाविषयी कृतज्ञता व्यक्त करुन हे निवेदन पुरे करतो.

मकर संक्रांत

दि. १४ जानेवारी १९७८

भि.दे.कारंजकर

लेखक



श्री वासुदेव बळवंत खापर्डे,
संपादक-संकलक, अमरावती शहराचा इतिहास खंड-३

:: श्री ::

३) अमरावतीचा इतिहास खंड - ३

(इ. १९३० ते इ. १९४७)

प्रस्तावना व रसग्रहण :-

(वासुदेव बळवंत खापर्डे, अमरावती)

ग्रामदेवता श्री.जगदंबेला आदरपूर्वक प्रणाम करुन व ह्या ग्रंथ प्रकाशनाच्या कार्यात सुयश प्राप्त व्हावे अशी प्रार्थना करुन दोन शब्द लिहितो.

अमरावतीचा इतिहास (खंड १ व २) ह्या भागांना माझे वडील कै.बळवंत गणेश उपाख्य अण्णासाहेब खापर्डे यांनी आशीर्वादपर लिहून दिले होते. तो त्यांचा अधिकारही होता. ज्ञान, वय, अनुभव, तपश्चर्या, देशसेवा, व्यासंग, अशा अनेक बाबतीत त्यांचा दांडगा अधिकार होता. अतुलनीय होता. त्यामुळे श्री.बापूसाहेब कारंजकरांनी त्यांच्या ग्रंथाच्या पहिल्या खंडाला त्यांचा आशीर्वाद घेतला हे उचितच होते. पण माझ्या सारख्या सर्वच बाबतीत लहान असलेल्या व्यक्तीकडून आशीर्वाद तर नव्हे पण प्रास्ताविक लिहून मागावे ह्यात त्यांच्या मनाचा मोठेपणाच दिसून येतो. पण हा एक विलक्षण योगायोग जुळून येण्यास एक कारण म्हणजे मी सुरुवातीपासूनच ह्या ग्रंथलेखन प्रकरणी अभिरुची व आवड व्यक्त करीत आलो. श्री.बापूसाहेबांनी ज्या ज्या व्यक्तीच्या मुलाखती, भेटी घ्यायला सांगितले, त्यांना मी भेटलो. फोटो मिळविले. अनेक संस्थांची माहिती गोळा केली. ह्या खंडाच्या शेवटी जी नामावली दिली आहे, तीही तयार केली. टंकलिखित प्रतीमध्ये शुध्दलेखनाच्या दुरुस्त्या करुन दिल्या. याचा अर्थ असाहि होतो की, ह्या सर्व बाबतीत जे प्रमाद घडले त्यांचीही जबाबदारी माझ्यावरच पडते. श्री.बापूसाहेबांच्यावर नव्हे. त्यांनी डोळे खराब झाले असूनही, आणि प्रकृति वारंवार बिघडत असूनही हा तिसरा खंड अत्यंत चिकाटीने, परिश्रमपूर्वक, जीवाच्या पलीकडे कष्ट करुन उत्साह व पैसा खर्च करुन प्रचंड माहितीचे भांडारच

आपल्यासमोर आणून ओतले आहे. मला ज्या गोष्टी संक्षेपाने सांगता येण्याजोग्या वाटल्या त्यांची यादी दिली आहेच. काही परिच्छेद पूर्ण गाळले तरी चालेल हि एक यादी दिली आहे. कारण माहिती गोळा करताना ह्या गोष्टीकडे दुर्लक्ष होण्याची शक्यता असते. पण अंतिम निर्णय घेण्याचा सर्वस्वी अधिकार श्री.बापूसाहेबांचाच आहे. आणि माझे म्हणणे स्वीकारले नाही, तर मला राग येण्याचे किंवा वाईट वाटावे असे काहीच कारण नाही. कारण मुख्य ग्रंथकर्ते तेच आहेत. शिवाय त्यांनी उत्कृष्ट संपादकत्वही केलेले आहे. मी सर्व कार्य केवळ सेवाभावनेने केले.

ऐतिहासिक प्रस्तावना खंडाच्या तिसऱ्या पुस्तकात श्री.वि.का.राजवाडे यांनी एक फार मनोज्ञ वाक्य लिहिले आहे की, "कोणत्याही संस्कृत राष्ट्राच्या चरित्राचा सांगोपांग विचार करावयाचा म्हणजे तो अनेक अंगांनी केला पाहिजे. धर्म, नीती, विद्या, समाज, व्यापार, कृषि, कलाकौशल्य, कायदेकानून, राजकारण व तत्सिध्यर्थ केलेल्या अंत:स्थ व बहि:स्थ खटपटी, इतक्या सर्वाच्या प्रगतीचा किंवा विगतीचा कालक्रमाने यथास्थित, बांधेसुद, पध्दतवार व सप्रमाण विचार केला जाऊन तो पुन: आत्मिक व भौतिकरीत्या झाला म्हणजे राष्ट्राचे चरित्र समग्र कळले असे होते.

स्वत: उत्कृष्ट लेखक व विशेषत: इतिहासज्ञ म्हणून कीर्ती व मान्यता पावलेली नसताना केवळ जिज्ञासा, कुतूहल, उत्सुकता यापोटी श्री.बापूसाहेबांनी हे एक विस्तृत बखर-प्रकरण अवतीर्ण केले आहे, त्याकडे कै.राजवाड्यांच्या वरील वाक्यात आलेल्या मुद्यांच्या आधारे पहावे अशी नम्र विनंती करावीशी वाटते. हेच एक वाक्य दृष्टिसमोर ठेवून श्री.बापूसाहेबांनी वरील वाक्यावर हूकूम ग्रंथरचना केली असावी असे वाटू लागते. मात्र "राष्ट्र" ऐवजी "शहर" वाचले म्हणजे झाले. बाकी सारे मुद्दे बरोबर आहेत.

ह्या तीन खंडात मिळून अकराव्या शतकापासून विसाव्या शतकाच्या मध्यापर्यंतच्या कालखंडातील राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, अर्थिक, वाणिज्य विषयक, प्रशासन विषयक, शैक्षणिक ह्या व अन्य अनेक

महत्वाच्या विषयाचा सांगोपांग विस्तृत अहवाल तयार अवस्थेत सापडेल. खापर्डे, असनारे, जोशी, देशपांडे, देशमूख, पाटील वगैरे मराठी कुटुंबातील आणि तसेच गुजराथी, मारवाडी, मुस्लिम, जैन, बौध्द, वगैरे हरप्रकारे वरकरणी भिन्न दिसणाऱ्या जातीजमाती, पंथ, संप्रदाय, धर्म यातील अनेकविध व्यक्तींनी केलेल्या विविध कार्याची फार विस्तृतपणे माहिती मिळते. ह्या कालखंडाच्या एका प्रांगणात अस्पृश्योध्दाराची चळवळ एका प्रांगणात सत्याग्रह, एका प्रांगणात महिलांच्या विकासाचा विचार, तर कुठे राजकीय पक्षोपक्षांची धावपळ, कुठे सुभाषबाबूंच्या समर्थकांची तर कुठे गांधीजीच्या, तर कुठे टिळकांच्या समर्थकांची ललकारी ऐकू येईल. कुठे साम्यवादी तर कुठे समाजवादी, कुठे हिंदुत्ववादी तर कुठे इस्लामी चळवळ चमकून जाते. कुठे मैफिलीतील तानपुऱ्यांचा नुपुरांचा झणकार ऐकू येईल तर कुठे तमाशांचा, लावणीचा फड अन कुठे राष्ट्रसंत तुकोडोजींच्या, गाडगेबांबाच्या जनजागृतीची डफ-खंजिरी खणखणतांना दिसेल. नाट्य प्रयोगांसाठी तोरणगर्दी करणारे नाट्यरसिक दिसतील. शेतकरी बंधूंची अधिवेशन, परिषदा, संमेलने एका प्रांगणात आढळतील. तर कुठे धार्मिक मेळावे भरलेले दिसतील.

अमरावती नगरी आहेच अशी मोहक ! रुपरंग काही फारसे साजरे नाही. साधेव, दागदागिन्यांचा भारी सोस नाही. कपडालत्त्यांचा भारी सोस नाही. पण सराफा बाजार अन् कापड बाजार तुडुंब गर्दीने भरलेले दिसतील. पण तरीहि चेहऱ्यावर कुठे करारीपणा तर कुठे भरारी. कुठे पहाडी धून दिसेल, दूर वर पोहऱ्याच्या डोंगरात निसर्ग देवता छेडत असलेली रागीणी तर छत्री, ''वडाळी तलावांच्या जलदेवता मेघमल्हार रागिण्या छेडतांना दिसतील. मालटेकडीवर पुण्यश्लोक शिवछत्रपति शिवराय ह्या सात्विक नगरीला तेजाचा, स्वाभिमानाचा संदेश देत घोड्यावर मांड ठोकून भवानी तरवारीचे तळपते तेज दाखवतात. बस्स्. ऐवढेच निसर्गवैभव.

कुठे कुस्त्यांची दंगल तर कुठे सुऱ्यांची दंगल. कुठे होळीचा धूमधडाका तर मधूनमधून कुठे कुठे रक्तरागाची लाल पखरण. कुठे श्री.अंबादेवी,

एकवीरा देवीच्या, प्रभू रामचंद्रांच्या, भगवान श्रीकृष्णाच्या भव्य शोभायात्रा, तर कुठे वैराग्यमूर्ती श्री.बसवेश्वर, श्री.वर्धमान महावीर भगवान बुध्द, यांच्या जन्मोत्सवाचे विराट मेळावे, कुठे संदलची दंगल, कुठे ईस्टरचा उत्सव, कोणत्याही पक्षचा आला गेला पुढारी दहावीस हजाराच्या सभेत निर्भयपणे आपले विचार ठणकावून सांगताना दिसतो. येथील जनता श्री.गाडगे महाराज, बाबाजी महाराज, गुलाबराव महाराज, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, अच्युत महाराज, दासगणू महाराज, गजानन महाराज, शंकर महाराज, नारायणगुरु महाराज, यांची वाणी गुणगुणत असते. दाजी पटवर्धन स्वत:च्या नैतिक सामर्थ्यावर जातीय दंगली मध्ये घुसून दंगल शमवताना दिसतील, तर तेथून हात मोकळे होतात व होतात तर तपोवनात कृष्ठरोग्यांच्या सेवेला वाहून घेताना दिसतील.

अण्णासाहेब देशमुख, पी.के.देशमुख, बाबासाहेब खापर्डे, नानासाहेब गवई, नानासाहेब बामणगांवकर, बापूसाहेब कारंजकर, डॉ. भोजराज, वीर वामनराव दादा जोशी, अबुल हसन वगैरे किती तरी पुढारी ह्या कालखंडात अग्रभागी झळकतांना आपल्याला आढळतात. त्यांच्या कर्तृत्वाची नोंद येथे तपशीलवार आहे. महिलांच्या कर्तृत्वाची हि साक्षेपी नोंद आढळेल. हिंदुत्ववादी संघटना, हिंदुत्वनिष्ठ लोक व व्यक्ती यांनी कार्य केले नाही असे नाही. त्यांच्याहिकडून अलौकिक कृत्ये घडलेली आहेत. पण श्रेष्ठ व बहुमोल अशा भव्य उपक्रमांची त्यांनी नोंद करुन ठेवली नाही. परिणामी श्री.बापू कारंजकरांना ऐकीव मुलाखतीवर भिस्त ठेवावी लागली त्यांना जर तपशीलवार संदर्भ सापडले नाहीत, तर ते त्यांची नोंद ह्या ग्रंथात कसे करु शकतील ? मात्र एक अगदी खरे की, जेवढे हाती आले तेवढे सगळे श्री.बापूसाहेब कारंजकरांनी भरभरुन आपल्यापुढे ओतले. पंक्तिप्रपंच नाही, उगाच फाजील लाड नाहीत. स्वच्छ व सरळपणे समोर मांडले.

एक सूक्ष्म गोष्ट लक्षात आणून द्यावीशी वाटते, ती अशी ज्ञानोपासना, ईशोपासना, समाजोपासना, धर्मोपासना, राष्ट्रोपासना, देशोपासना, दीन, दु:खी दलितांची उपासना व सेवा, स्त्रियांबद्दल आदर व सहकार्य हे सर्व

हिंदूधर्मीयांनी अवश्य केले. निष्ठेने केले. हे सर्व हृदयगत सहजभाव म्हणून केले. सर्व दृढ संस्कार आमच्या हरेककृतीतून व्यक्त होतातच. कधी मधी मानवतेच्या सेवेच्या भाषेत तर कधी बंधुत्वाच्या अभिनिवेशात केले. त्याची कुठे नोंद होवो न होवो. राष्ट्रधर्माला प्रसिध्दीची झालर आवडत नाही. इतिहासतज्ञतेची पदवी पदरात पाडुन घेणाऱ्या धूर्त व दांभिक चिंतनकारांना अमरावतीचा इतिहास '' समर्पक व सुयोग्य उत्तर होय. वास्तविक चिंतन वगैरे काही नसून, समाजात दिव्देषभावना फैलावण्याचे जहरी माध्यम म्हणून इतिहासविषयाचा आधार घेणारे कर्मदरिद्री महाभाग आज समाजात प्रतिष्ठितपणे वावरत आहेत, हेच ह्या राष्ट्राचे सर्वात मोठे दुर्देव आहे. कोणत्याहि ग्रंथात किंवा कोणाच्याहि जीवन चरित्रात जे उत्कृष्ट, उदात्त, महन्मधुर, मंगल, शुभ सात्विक, सोज्ज्वल व पवित्र असेल तेवढे स्वीकारावे, ह्या विपरीत असेल ते त्यागावे. इतका साधा, सरळ सुसंस्कृत दृष्टिकोण स्वीकारला तर सामाजिक कलह व संघर्ष तर दूर होतीलच. पण राष्ट्रीय ऐक्य, देशभक्ति, मानवता, विश्वबंधुता, यांचा विकास घडेल. वेद, उपनिषदे, गीता, रामायण, महाभारत, पुराणे, कुराण, बायबल, इलियड, शेक्सपियर, कालिदास टागोर, टिळक गांधी, सावरकर, मॅझिनी, मुसोलिनी, जे.कृष्णमूर्ती, अरविंद घोष, मदर, स्वामीविवेकानंद, प्राचीन ऋषिमुनी, विनोबाजी, हेडगेवार, गोळवलकर गुरुजी, कोणी का असेना, त्यांच्याजवळ जे उदात्त आहे ते स्वीकारणीय मानायला हवे. हे आम्हाला इतिहास ग्रंथ शिकवितात. ''आ नो भद्रा क्रंतो यंतु विश्वत: !''

श्री.बापूसाहेब कारंजकरांचा ग्रंथ ह्या दृष्टीने फारच अभ्यसनीय व माननीय आहे कारण त्यांनी कुठेही बुध्दि मलित होऊ दिली नाही. सरळ, स्वच्छ, स्पष्ट दृष्टिकोण ठेवला आहे.

दुसराही एक प्रश्न उपस्थित होतो, तो असा - इतिहास ग्रंथातून काही प्रेरणा, बोध मार्गदर्शन मिळते काय ? हाहि एक मननीय प्रश्न आहे.

साधार, समप्रमाण साद्यंत, मूलग्राही असा इतिहास एकदा माहित झाला म्हणजे आपण खरोखरीच त्यापासून आपल्या कार्यासाठी उचित प्रेरणा व

मार्गदर्शन घेऊ शकतो. आपण आपला स्वत:चा मार्ग आखू शकतो.

हे मी स्वानुभवाने सांगतो आहे. माझ्या पूर्वजांनी केलेले कार्य सतत डोळ्यासमोर असते. कै. दादासाहेबांनी अलौकिक राष्ट्रकार्य केले. लोकोत्तर स्वार्थत्याग केला. प्रसंगी त्यांना मानसन्मान प्राप्त झाले. प्रसंगी मानहानी वगैरे पत्करावी लागली. कधीकधी पदरचा पैसा, मालमत्ता पणास लावावी लागली. ते सर्व त्यांनी सोसले. लोकेषणा, वित्तेषणा सत्तेषणा यांची पर्वा केली नाही. केवळ नि:स्वार्थ व शुध्द देशभक्तीच्या भावनेने देशकार्य केले. पितृतुल्य काका कै. बाबासाहेब खापर्डे यांनीहि तो वारसा पुढे चालवला. मानसन्मानाची पर्वा न करता कार्य करीत राहिले. आजची हिंदुस्थानी जनता त्यांना व्यवहारशून्य म्हणत असेल, पण देशसेवेचे व्रत घेतलेली जी तुरळक घराणी भारतात आहेत त्यात आमच्या खापर्डे घराण्याचा उल्लेख होतो. ही गोष्ट मला अभिमानास्पद वाटणार नाही काय ? इतर ही घराण्यातील वारसदारांनी कसल्यातरी आशेने नव्हे तर विशुध्द देशभक्तीच्या भूमिकेतून पुढे यावे ही गोष्ट मी मनापासून लिहितो आहे.

तिसरा एक प्रश्न मनात येऊन गेला. तो असा - हा ग्रंथ लिहिताना श्री.बापूसाहेब कारंजकर यांची भूमिका काय होती व आहे ? ह्याविषयी त्यांचे निवेदन वाचल्यावर स्पष्ट खुलासा होईल. पण आपल्याला काय वाटते हे सांगणे अस्थानी होणार नाही. श्री.कारंजकर यांनी घटनांचा मागोवा घेताना फक्त तपशील सादर केले आहेत. मूल्यमापन, समीक्षण, विवेचन किंवा विश्लेषण या भानगडीत ते अपवादात्मकच पडले आहेत. घटनांचा सुसंगतवार, क्रमवार, प्रसंगवार, अभ्यास करायला ह्या ग्रंथाचा उपयोग व्हावा एवढाच त्यांचा माफक हेतू असेल तर ते पूर्णपणे यशस्वी ठरले आहेत. आता आता अमरावती विद्यापीठ स्थापन झाल्यानंतर इतिहास शाखेतील, राज्य शाखेतील बरेच विद्यार्थी श्री.कारंजकर, यांच्याकडे, डॉ.मदन भट यांच्याकडे किंवा माझ्याकडे मार्गदर्शन, संदर्भ, मुद्दे, माहिती, इ. गोळा करण्यासाठी आले. त्यांना यथाशक्य मदत आम्ही करु शकलो. पण आणखी काही गोष्टीचे संशोधन ह्या ग्रंथाच्या आधारे होणे शक्य आहे.

संशोधनासाठी वानगीदाखल बोलायचे तर कै.दादासाहेब खापर्डे, कै.बाबासाहेब खापर्डे, कै.वीर वामनराव दादा जोशी, कै.बॅ. रामराव देशमुख, कै. नानासाहेब गवई, कै.ना.रा. वामनगावकर, कै.शिवाजीराव पटवर्धन, कै.सर मोरोपंत जोशी, कै.तांबे, कै.डॉ.पंजाबराव देशमुख, कै.डॉ.भोजराज, कै. मुधोळकर, कै.दादा शेवडे, श्री.पी.के.देशमुख व अन्य ज्यांचा उल्लेख येथे झाला नाही, अशा अनेक व्यक्ति, यांच्या कार्यामागील, प्रेरणा, ध्येय व तत्वज्ञान, त्यांच्या कार्याचे मूल्यमापन निरपेक्ष दृष्टीने होऊ शकेल. नवोदित संशोधकांना हे एक आव्हान ठरावे. स्त्रीवर्गाचे अत्यंत मोलाचे भरीव कार्य उचित माहिती अभावी अंधारात खितपत पडले आहे त्यांचे सप्रमाण साधार असे मूल्यमापन करता येईल. अमरावतीतील वृत्तपत्र सृष्टीविषयी संशोधन होणे आवश्यक आहे. हल्ली अभ्यास न करता धडाधड विधाने करण्याची फार वाईट खोड लागत चालली आहे. ती बंद होणे आवश्यक आहे. ह्या ग्रंथाच्या अध्ययनातून इतकी गोष्ट जरी आपण शिकलो तरी खूप झाले.

ह्या ग्रंथाची मला जाणवलेली वैशिष्ट्ये सांगण्याचा यत्न करतो. पहिले वैशिष्ट्ये असे की, एका शहराचा इतिहास असा जगात फारच क्वचित लिहिला गेला आहे. लंडन, मुंबई, वाराणशी, दिल्ली, बदलापूर अशी क्वचित नावे डोळ्यापुढे येतात. त्यामानाने अमरावतीचा काय पाड ? परंतु श्री.बापूसाहेब कारंजकरांनी शहराचा इतिहास लिहिताना त्याला भौगोलिक मर्यादा ठेवली नाही, हे फार चांगले झाले. शेजारच्या चिमूर, आष्टी, वलगांव, परतवाडा, अचलपूर, दर्यापूर, वगैरे ठिकाणच्या अत्यंत रोचक व हर्षवर्धक गोष्टींना आपण मुकलो नाही हे आपले भाग्यच अन्यथा ही मोलाची कामगिरी आपल्या कानावर कशी आली असती ? काही व्यक्तींच्या अथवा घराण्यांच्या इतिहासात गुतूंन न पडता श्री.कारंजकरांनी एका शहराचा इतिहास लिहून काढला हे जसे खास वैशिष्टय, तसेच सुविख्यात व्यक्तींच्या रांगेत अप्रसिध्द आजवर अज्ञात असलेल्या, अंधारात खितपत पडलेल्या किंवा अप्रसिध्दीच्या अंधारात पडलेल्या व्यक्तींचाही उल्लेख नोंदवून घेण्यास श्री.कारंजकर विसरलेले नाहीत. गट, कंपू, वशिला, वगैरे येथे

आढळणार नाही, कमलदलवत, स्वच्छ निरिच्छ, दृष्टिकोन ठेवून इतिहास लेखन करणे हे केवळ योगी व अनासक्त कर्मयोग्याचे कार्य होय. येथे सुविख्यात व्यक्तीसोबत सामान्यांनाही गौरवाने आणून बसवले आहे. सामन्य लोकांनीही काही कार्य घडविले आहे. त्यांच्याव्दारा घडलेले कार्यहि तेवढेच तोलामोलाचे आहे. महत्वपूर्ण आहे, हे श्री.कारंजकरांनी बरोबर जाणले. महान कार्य करुन दूर होणाऱ्या सामान्य कार्यकर्त्यांना निर्गुण मोठेपणाचे ध्यान रहात नाही. पण लोकसमूहाचा आदर राखण्याचे व्रतच घेतलेल्या बापूसाहेब कारंजकरांसारख्या व्यक्तीनेपूज्यबुध्दीने अज्ञाताचे मोठेपण ह्या इतिहासात सगुण व साकार केले आहे. एखाद्या मोठ्या मैफलीत, मोठमोठे राग छेडणाऱ्या आणि तानांची बरसात करणाऱ्या गवयाने एखाद्या उचित ठिकाणी लहानशी सुरावट छेडून राग खुलवावा, त्याचे सौदर्य अधिक खुलवावे, तसा प्रकार येथे दिसतो. एखाद्याचे नशीब फुटके म्हणूनि प्रेतास श्रृंगारिते'' असे वरकरणी वाटत असतांना हेहि लक्षात घ्यावे की ते फूल तर आहे ना ?

दुसरे वैशिष्टय म्हणजे आवश्यक तेथे दिलेल्या तळटीपा. यामुळे त्या व्यक्तींचा जीवनपट चटकन डोळ्यासमोर उभा राहतो.

एक वैशिष्टय हे जाणवले की श्री.बापूसाहेब कारंजकरांनी लेख टिपणे लिहून त्यांचा अंतर्भाव ह्या ग्रंथात केला आहे. आणिखी एक वैशिष्टय म्हणजे घटना, प्रसंग यांचे श्री.कारंजकरांनी मुल्यमापन करताना प्रचारकी थाट केला नाही. वस्तुस्थिति वाचकांसमोर ठेवणे एवढीच भूमिका त्यांनी घेतलेली दिसते. हे योग्यच घडले. प्रकरणांची माहिती दिल्यावर श्री.बापूसाहेबांनी पुन्हा स्वतंत्र परिशिष्टे देऊन त्याविषयी टिपणी केली आहे. यामुळे त्याविषयी अनुकूल प्रतिकूल मते बाळगणाऱ्यांना कुठेहि खटकत नाही.

हे सारे चाळून काढताना मला मुक्तेश्वर कवीची वारंवार आठवण येत असे. संपूर्ण तपशील बिनचूक शब्दबध्द करणे हे कवि मुक्तेश्वर पंडिताचे महत्वाचे वैशिष्टय होय. कुठेही संधि मिळाली की ते आधी तपशीलात शिरतात.

भूत, वस्ती, कुस्ती, वृक्ष, द्यूत, खेळ, डावपेच, कोणताही विषय आला की ते त्या विषयाचे इत्थंभूत वर्णन देतात. पण कुठेही कंटाळवाणे होत नाही. आकर्षण कायम रहाते. ही कला श्री.बापूसाहेब कारंजकरांनी आत्मसात केलेली असून तिचा समुचित उपयोग पदोपदी केला आहे.

ह्या ग्रंथात अमुक अमुक आलेच नाही असे कुरकुरणाऱ्या महाभागांना मी नम्रपणे एवढेच सुचवीन की, अनेक वर्षापूर्वीच श्री.बापूसाहेबांचा हा ग्रंथलेखनाचा संकल्प लोकांना ज्ञात झाला होता. तेव्हा पुढे होऊन त्यांना सहकार्य का दिले नाही ? त्यांच्याहि काही मर्यादा आहे, हे ध्यानी घेऊन अमूक अमूक नाही म्हणून तक्रार न करता, वाचकांनी, तज्ञांनी ह्या ग्रंथाचा स्वीकार करावा एवढेच पुरस्कारितो.

दिनांक : १.९.१९८८.

वा.ब.खापर्डे

विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष प्राचार्य श्री.राम शेवाळकर यांचा अभिप्राय

श्री.बापूसाहेब कारंजकर ह्यांनी लिहिलेला अमरावती शहराचा वृहत इतिहास नुसता एखाद्याने चाळून जरी पाहिला तरी तो या एकाकी वाग्यज्ञाने थक्क झाल्याखेरीज राहणार नाही. श्री.कारंजकर हे सामाजिक कार्यकर्ते - नगरपालिकेच्या एका उत्सवाच्या निमित्ताने अमरावती विषयक जुने संदर्भ चाळण्याच्या सहज चाळ्यातून त्यांच्यातील सुप्त इतिहासकार जागृत झाला. मग त्यांना ह्याचा हव्यासच जडला. ठिकठिकाणी फिरुन असंख्य ग्रंथ हाताळून त्यांनी अमरावती विषयक सर्व संदर्भ जुळवून ऐकत्र केले. त्यांची क्रमवार व विषयवार मांडणी केली. त्यातून हा त्रिखंडात्मक बृहत इतिहास ग्रंथ तयार झाला. अकराव्या शतकापासून तो स्वातंत्र्य प्राप्तीपर्यंतचा जवळजवळ एक सहस्त्र वर्षाचा कालखंड ह्या ग्रंथात बोलका झाला आहे. सांस्कृतिक, पौराणिक, राजकीय, सामाजिक सर्व अंगानी या शहराची त्यांनी वाङ्मयीन मूर्ती घडविलेली आहे. तत्कालीन ताम्रपट, शिलालेख, दमरे, नोंदी व वर्तमानपत्रे ह्यांच्या सहाय्याने एवढा तपशील या ग्रंथात समाविष्ट झाला आहे. की, हा स्थावर इतिहासपुरुष विविध विषयांवर अखंड वार्तालाप करीत आहे, असा भास व्हावा.

श्री.बापुसाहेबांनी अुत्तरवयात अेवढे परिश्रम घेतले, इतका व्यायाम व्यासंग केला, नि अंगीकृत कार्याबाबत इतकी काटेकोर दक्षता बाळगली की, आयुष्यभर अेवढाले ध्यास घेतलेल्या ज्ञानोपासकानेही त्यांचा हेवा करावा. अमरावती हे शहर खरोखरच भाग्यवान, त्यांचे व त्यांच्या पंचक्रोशीचे हजार वर्षाचे दीर्घायुष्य या ग्रंथामुळे चिरंजीव झाले.

विदर्भ हा आदि महाराष्ट्र, आर्याची पहिली वसाहत या प्रदेशात झाली. त्यात कुंडिनपुर ही विदर्भाची राजधानी, अेका गावाच्या अनुषंगाने समस्त

परिसराची वाटचाल या निमित्ताने शब्दांकित झाली. विदर्भाचे सर्वांगीण वैभव भाषेच्या मखरात नित्यासाठी तळपत राहिले.

श्री.बापूसाहेबांनी अथक परिश्रम करुन सर्व तपशील अेकत्र केला आहे. विदर्भाच्या इतिहासकालीन घडामोडींचे विवेचन करुन अिच्छीणाऱ्या अभ्यासककासाठी अेक समृध्द साधन ग्रंथ या ग्रंथाच्या निमित्ताने अुपलब्ध झाला आहे. इतिहासकाराने सर्व सामुग्री अेकत्र करुन दिलेली आहे. इतिहास मीमांसकांनी त्याच्या आधाराने आता पुढे प्रस्थान ठेवायला हरकत नाही. या ज्ञानकोषातून आता नव्या अभ्यासकांचे पीक येवो व त्यांची व्यासंगपूत फलिते वैदर्भीय विचारविश्वात महत्वाची भेट टाकण्यास समर्थ ठरोत, हीच या निमित्ताने सदिच्छा.

उत्तरकाळात जिज्ञासेची, अभ्यासाची नि परिश्रमांची पालवी फुटलेल्या बापूसाहेबांच्या चिरतरूण ध्यासाचे अभिनंदन !

अमरावती.
प्रजासत्ताकदिन, १९८९. राम शेवाळकर

५) आढावा

१) दडपशाहीच्या काळातील अमरावती.

२) वऱ्हाड सार्वजनिक सभेची स्थापना.

३) नागपूर मध्यप्रांत वऱ्हाड सांसदीय इतिहास.

४) वऱ्हाड प्रांतिक कॉंग्रेसचा स्वतंत्र वऱ्हाड ठराव.

कृतज्ञता - श्री.ए.श्री.पटवर्धन नागपूर

श्री. दि. भा. घुमरे नागपूर

अमरावती १९०८ ते १९१४

दडपशाहीचे काळातील अमरावती :- इ.स. १९०७ साली सुरत कॉंग्रेसमध्ये जहाल आणि मवाळ असे दोन गट स्पष्ट झाले. जहाल गटाचे नेते लोकमान्य तर मवाळ गटाचे ना. गोखले हे होते.

वऱ्हाड प्रांताची जनता लोकमान्य टिळकांची समर्थक होती. याचे मुख्य कारण म्हणजे श्री.दादासाहेब खापर्डे हे लोकमान्यांचे एकनिष्ठ सहकारी होते व त्यांचा प्रभाव वऱ्हाडात सर्वत्र होता हे होय. अर्थात अमरावती शहर हे राजकीयदृष्टया प्रामुख्याने लोकमान्य टिळकांच्या बाजूचे होते. त्यामुळे अमरावतीत राष्ट्रीयवृत्ती जागृत झाली व अनेक तरुण पुढे येऊ लागले होते.

परंतु इंग्रजांना ही गोष्ट नको होती. त्यामुळे १९०८ मध्ये अमरावतीचे सुप्रसिध्द देशभक्त स्वामी शिवानंद यांना, त्यांनी केलेल्या कांही कविता बद्दल राजद्रोहाचे कलमाखाली सात वर्षाची कठोर शिक्षा ठोठावण्यात आली होती. त्याचप्रमाणे अमरावतीतून प्रसिध्द होणाऱ्या ''तरुण हिंदु'' पत्राबद्दल स्वामी

आनंदानंद यांना जामीन द्यावा लागला होता व या पत्राचे संपादक व मालक श्री.बामणगांवकर यांना दंड भरावा लागला होता. श्री.वामणगांवकरांच्या छापखान्याची व वीर वामनराव जोशी यांच्या घराची झडती घेण्यात आली होती युध्द फंड बंद पडला. स्वदेशीच्या सभा नष्ट केल्या गेल्या व राजापूर कंपनीच्या प्रकरणात श्री.संभाजी विनायक गोखले वकील, श्री.गुलाबराव बक्षी, शेठ नंदलाल व श्री.जयराम पाटील यांना शिक्षा झाल्या होत्या. अमरावतीची राष्ट्रीय शाळा बंद पाडण्यात आली. सर्व देशभक्तांवर पोलीसची सतत करडी नजर ठेवली जात असे. दादासाहेब खापर्डे यांना जि.लोकल बोर्ड व नगरपालिकेच्या अध्यक्षपदाचे राजीनामे द्यावे लागले.

या दडपशाहीचे सरकारी धोरणामुळे १९०८ ते १९१४ या काळात अनेकांना अमरावतीत (आणि वऱ्हाडातही) राजकीय वनवासात जावे लागले होते

१९०८ सालीच लो. टिळकांना सहा वर्षाची शिक्षा होऊन त्यांना ब्रम्हदेशातील मंडाले तुरुंगात नेऊन ठेवले होते. १९१४ साली लोकमान्यांची तेथून सुटका झाली होती.

सूरत कॉग्रेसचे थोडे अगोदर १९०६ साली श्री.दादासाहेब खापर्डे आणि रा. ब. मुधोळकर यांचे दोन वेगळे गट अमरावतीत (आणि वऱ्हाडातहि) झालेले होते. तो पावेतो ही सर्व मंडळी एकोप्याने राष्ट्रीय सभेचे कार्य वऱ्हाडात करीत असत. १९०६-०७ च्या घटनांमुळे शहरातील (वऱ्हाडातील) राष्ट्रीय वृत्तीचे लोक आणि कार्यकर्ते या दोन गटात विभागल्या गेले होते.

१९०७-०८ मध्ये सरकारी दडपशाहीचा वरवंटा फिरु लागल्यामुळे अमरावतीतील (आणि वऱ्हाडातील) खापर्डे पक्षाचे राष्ट्रीय वृत्तीचे लोक आणि कार्यकर्ते एक प्रकारे निष्क्रिय बनले होते. तर या काळातच रा.व. मुधोळकर हे वऱ्हाड प्रांतिक कॉग्रेसचे अध्यक्ष होते. (१९०८ ते १९१६ या काळात मुधोळकर हेच वऱ्हाड प्रा.कॉ. चे अध्यक्ष होते.) याच सुमारास (१९०९) मोर्ले-मिंटो

सुधारणांचा अंमल सुरु झाला. तेव्हा रा.व. मुधोळकर हे इंपिरियल कौन्सिल वर व सर मोरोपंत जोशी वगैरे मंडळी वऱ्हाडमधून गव्हर्नरांच्या कौन्सिल मध्येहि कार्य करीत होते.

रा.व.मुधोळकर हे राष्ट्रीय उद्योगधंद्याच्या वाढीसाठी सतत प्रयत्नशील असत. त्यासाठी त्यांनी बरीच झीज सोसली आहे. उद्योगधंदे हा त्यांच्या जिव्हाळ्याचा विषय होता. त्याकरीता त्यांनी कॉंग्रेसमध्ये चळवळ केली होती व कॉंग्रेसच्या या शाखेचे ते सर चिटणीस होते.

अमरावतीचे "बेरार व्हिक्टोरिया टेक्निकल कॉलेज" व कांही तेल गिरण्या हे त्यांच्याच तपश्चर्येचे फळ होय.

या काळात (१९०८-१९१४) राष्ट्रीय पक्षातील जहाल मतवादी लोक (टिळकवादी) हे सरकारी दडपशाही मुळे दबलेले होते. लोकमान्य टिळक मंडाले तुरुंगात होते व दादासाहेब खापर्डे हे लो.टिळकांच्या सुटकेसाठी अपील करण्यासाठी इंग्लंडला गेलेले होते. त्यामुळे १९०८ ते १९१४ या काळात अमरावतीत (आणि वऱ्हाडातहि) राजकीय हालचाल फार मंदावली होती.

सन १९०८ से लेकर सन १९१६ तक बरार में कॉंग्रेस की हलचल नाममात्रं कीही रही। श्री.मुधोळकर आदि कुछ व्यक्ती कॉंग्रेस के कार्यो में हिस्सा लेते थे और श्री.मुधोळकर जीको गौरव भी प्राप्त हुआ। किन्तु जनसाधारणमें कॉंग्रेसके कार्य के प्रती कोई विशेष उत्साह नही दिखा। (क्या आप जानते है क. ब्रि बियाणी पृ. ३६)

वऱ्हाड सार्वजनिक सभेची स्थापना :- सन १८५७ चे बंड इंग्रजांनी अत्यंत कठोरपणे मोडून काढल्यानंतर या देशातील राजकीय हालचाली बंद पडल्या होत्या. मात्र त्यासुमारास महाराष्ट्रात सामाजिक सुधारणांना सुरुवात झाली होती. या सामाजिक सुधारणांवर पाश्चात्य संस्कृतीची छाप असे. मुलींच्या शिक्षणापासून या सामाजिक सुधारणेची सुरुवात झाली होती. परंतु देशाचा मोठाप्रश्न



'घंटीघड्याळ' जोग चौक, अमरावती.

शेतकऱ्यांचा त्यांच्या हक्कासाठी व प्रजेला राजकीय हक्क मिळावेत म्हणून झगडले पाहिजे असे अनेक तत्कालीन विचारवंतांना वाटत असे. परंतु नुसते तसे वाटून काय उपयोग ? त्यासाठी संघटित प्रयत्नांची गरज होती. त्यामुळे हा विचार कोणत्या ना कोणत्या स्वरुपात अंमलात येण्यासाठी १८७० साल उजाडावे लागले. या सुमारात मुंबईला '' बॉम्बे असोसिएशन'' व कलकत्त्याला ''ब्रिटीश-इंडियन असोसिएशन'' ह्या संस्था स्थापन झाल्या होत्या व त्याच सुमारास पुण्याच्या पर्वती संस्थानातील अंदाधुंदी दूर करण्याचे निमित्त पुढे करुन, ''सार्वजनिक काका'' या नावाने पुढे प्रसिध्दीला आलेले, पुण्याचे श्री.गणेश वासुदेव जोशी यांच्या पुढाकाराने ''पुणे सार्वजनिक सभा'' या महत्वाच्या संस्थेचा जन्म दि. २ एप्रील १८७० रोजी झाला. या संस्थेने नंतर अनेक लोकोपयोगी कार्य केले व त्यामुळेच मुंबई पुण्याप्रमाणे वऱ्हाड प्रांतातहि अशी सार्वजनिक संस्था असावी असा विचार वऱ्हाडातील तत्कालीन विचारवंतांना ग्रासू लागला होता. पण हे सत्कृत्य घडायला आणखी कांही वर्ष जावी लागली. दरम्यान १८८५ साली ''इंडियन नॅशनल कॉंग्रेसची स्थापना होऊन कार्याला सुरुवात झाली होती.

या प्रमाणे सामाजिक सुधारणे मागोमाग राजकीय हालचालीला संथ गतीने का होईन-सुरुवात झालेली पाहून वऱ्हाडातील तत्कालीन धुरीणांना ''आपणहि काही केले पाहिजे'' अशी उत्कंठा निर्माण झाली व त्याचा परिणाम म्हणूनच दि. २७ डिसेंबर १८८६ रोजी संपूर्ण वऱ्हाडातील ठळक ठळक अशा धुरीणांची सभा अमरावती येथे बोलावण्यात आली होती.

या ऐतिहासिक सभेसाठी वऱ्हाडच्या कानाकोपऱ्यातून, गांवा-गांवातून व नगरानगरातून तेथील वजनदार असे नागरिक त्या दिवशी अमरावतीत जमले होते. साऱ्या वऱ्हाडी जनतेच्या दबलेल्या व पिचलेल्या मनांतील आशा आकांक्षा फलदूप होण्याचा क्षण जवळ आल्याच्या भावनेने भारलेल्या ह्या लोकधुरीणांनी गतकाळाचा आढावा घेतला व भूतकाळाचाहि गंभीरपणे विचार करुन ''वऱ्हाड सार्वजनिक सभे'' च्या स्थापनेचा निर्णय घेतला. व या संस्थेचे

पहिले अध्यक्ष म्हणून आकोल्याचे श्री.देवराव विनायक दिगंबर वकील व चिटणीस पदावर अमरावतीचे रा.ब. रंगनाथ नरसिंह मुधोळकर आणि दादासाहेब करंदीकर यांची निवड झाली होती.

या प्रमाणे वऱ्हाडात इंग्रजी आमदानीला सुरुवात झाल्यापासून, वऱ्हाडी जनतेच्या हितासाठी कार्य करणारी जी पहिली सार्वजनिक व प्रातिनिधिक स्वरुपाची संस्था जन्माला आली ती म्हणजे "वऱ्हाड सार्वजनिक सभा" ही होय व या संस्थेचे जन्मस्थळ अमरावती हे होय. "वऱ्हाडातील राजकीय व सामाजिक प्रगती " साठी या संस्थेचा जन्म झाला होता.

<u>कॉंग्रेस अधिवेशनाला अमरावतीचे प्रतिनिधी</u> :- इंडियन नॅशनल कॉंग्रेसच्या मुंबई येथे भरलेल्या पहिल्या व कलकत्ता येथे भरलेल्या दुसऱ्या अधिवेशनाला अमरावतीतून "(किंवा वऱ्हाडप्रांतातून) कोणी प्रतिनिधी हजर नव्हता. परंतु मद्रास येथे १८८७ साली कॉंग्रेसचे तिसरे अधिवेशन भरले होते त्यासाठी वऱ्हाड सार्वजनिक सभे " तर्फे एकूण सात प्रतिनिधी पाठविले होते. त्यांत अमरावतीचे रा.ब.र.न. मुधोळकर सर मोरोपंत विश्वनाथ जोशी, श्री.बळवंतराव व्यंकोजी खोत , श्री.देवराव विनायक, बॅरिस्टर कांगा, श्री. अनंत गोविंद, श्री.दोरावजी कावसजी, हे होते. कॉंग्रेस अधिवेशनात भाग घेण्याची वऱ्हाडची ही पहिलीच वेळ होती. या वेळेपासून वऱ्हाडचा (आणि अमरावतीचाहि) कॉंग्रेसशी संबंध जोडला गेला होता. सन १८८७ नंतर लगेच कॉंग्रेसचे संस्थापक श्री.ह्यूम साहेब यांचा वऱ्हाडात दौरा झाला व त्याच वर्षी वऱ्हाड प्रातिक कॉ. कमिटीची स्थापना झाली एकुण ६ जिल्हे त्याकाळी वऱ्हाडचे होते. त्यानुसार जिल्हा कॉंग्रेस कमिट्या निर्माण करण्यात आल्या होत्या. तेव्हा पासून वऱ्हाडात कॉंग्रेस आहे.

<u>अलाहाबाद कॉंग्रेसमध्ये रा.ब. मुधोळकराचे गाजलेले भाषण</u> :-

इ.स. १८८८ साली अलाहाबाद येथे कॉंग्रेसचे चौथे अधिवेशन भरले होते. या अधिवेशनाला मध्यप्रांत व वऱ्हाड मिळून एकूण ७३ प्रतिनिधी हजर

होते असा उल्लेख मिळतो.

आपल्या वक्तृत्वाने हे प्रतिनिधी चौथ्या राष्ट्रीय सभेत चमकले होते. (त्यानंतर श्री.देवराव विनायक, दादासाहेब खापर्डे व सर मोरोपंत जोशी वगैरे राष्ट्रीय सभेच्या व्यासपीठावर आले होते आणि लो.टिळक व ना.गोखले हे राष्ट्रीय सभेच्या पाचव्या अधिवेशनापासून व्यासपीठावर आले होते.)

कॉंग्रेसच्या विलायतेला जाणाऱ्या प्रतिनिधी मंडळात अमरावतीचे रा.ब.मुधोळकर व श्री.जोशी :-

इ.स. १८८९ साली कॉंग्रेसचे पाचवे अधिवेशन मि. ब्रॅडलॉ ह्यांच्या अध्यक्षतेखाली भरले होते तेव्हा "एकतंत्री सरकार लोकप्रतिनिधींना जबाबदार धरण्याची " योजना पुढे आली होती व त्यासाठी इंग्लंडला लोकमत जागृत करण्यासाठी कॉंग्रेसतर्फे शिष्टमंडळ पाठविण्याचे ठरले होते. त्यात अधिकृत प्रतिनिधी म्हणून रा.ब. मुधोळकर व त्यांचे सहाय्यासाठी श्री.मोरोपंत विश्वनाथ जोशी हे दोघे अमरावतीचे नेते होते. हे दोघेहि १८९० साली स्वखर्चाने इंग्लंडला या कार्यासाठी जाऊन आले होते. त्या प्रतिनिधी मंडळात गेलेले इतर कॉंग्रेस प्रतिनिधी असे जॉर्ज , ह्यूम, अदाम, नॉर्टन, हॉवर्ड, फेरोजशहा, सुरेद्रनाथ बॅनर्जी आनंद मोहन बोस, शरफुद्दीन व डब्ल्यू. सी. बॅनर्जी) श्री.मोरोपंत जोशी हे त्यावेळी केवळ २९ वर्षाचे तरुण वकील होते. त्यामुळे अमरावतीकरांनी त्यांचे यासाठी कौतुक केले होते.

श्री.आर.एन.मुधोळकर :- त्या काळच्या अत्यंत कष्टाळू कॉंग्रेस भक्तात मुधोळकरांची बरोबरी कोणीच करु शकणार नाही. चौथ्या अधिवेशनात (इलाहाबाद १८८८) पोलीस खात्याच्या सुधारणेसंबंधी आलेल्या ठरावाला श्री.मुधोळकर यांनी दुजोरा दिला) "पोलीस खरोखरी लोकप्रिय झाला पाहिजे पण त्याचा तिरस्कारच केला जातो" असे त्यांनी दाखवून दिले. या नंतर २४ वर्षांनी म्हणजे १९१२ साली बांकीपूर कॉंग्रेसच्या अध्यक्षस्थानी त्यांची योजना करण्यात

आली. एवढ्या दीर्घ काळात निरनिराळ्या राजकीय विषयांचा त्यांनी अभ्यास केला. शेतकऱ्यांची कर्ज मुक्तता, दारिद्र्य, आर्थिक सुधारणा व औद्योगिक शिक्षण या विषयात त्यांचा हातखंडा होता. श्री.सी.वाय. चिंतामणि हे श्री.मुधोळकराचे सहकारी होते. (कॉग्रेसचा इतिहास पट्टाभिसितारा मैय्या) (मराठी अनुवाद १९३५) पृ. ११८.

मध्यप्रांत - वऱ्हाड :-

३) नागपूर प्रांताचा सांसदीय इतिहास :-

(वक्ता :- ए.श्री.पटवर्धन लेखक :- दि.मा. घुमरे)

पहिली विधानसभा :- १९११ मध्ये इंग्रजांनी वंग भंगाची सरकारी योजना रद्द केल्यानंतर त्यावर्षी कलकत्ता येथे कॉग्रेस अधिवेशन श्री.बिशन नारायण धर यांच्या अध्यक्ष्यतेखाली उत्साहाने साजरे झाले. या अधिवेशना पूर्वीच मध्यप्रदेश वऱ्हाड मधील सदस्य डॉ. हरिसिंग गौर आणि राव बहादूर पंडीत यांनी आपल्या प्रांतासाठी विधानसभेची मागणी केली. त्या मागणीनुसार, संमत झालेल्या ठरावावर हुकूम देऊन ता. ८ नोव्हे. १९१३ रोजी मध्यप्रांत वऱ्हाडसाठी विधान सभेची घोषणा तत्कालीन सरकारने केली. व नंतरच्याच वर्षी या प्रांताचे तत्कालीन चीफ कमिश्नर सी बेंजामीन रॉबर्टसन यांच्या अध्यक्षतेखाली विधान सभेची स्थापना झाली. तत्पूर्वी ता.१३ डिसें. १९१२ रोजी व्हाईसरॉय लॉर्ड हार्डिग्ज हे स्वत: नागपूरला आले आणि त्यांनी तेथे कौन्सील हॉलच्या इमारतीचा शिलान्यास केला. सर्वप्रथम या विधानसभेत ११ सरकारी, ७ बिनसरकारी आणि पदसिध्द ८ अशा एकूण २६ सदस्यांची नियुक्ती करण्यात आली. सदस्यांच्या या पहिल्या नियुक्तीचा तपशील असा :-

१) जबलपूर व नेमाड कमिश्नरांच्या म्युनिसीपल कमिट्यातर्फे श्री. शिवप्रसाद वकील, जबलपूर. (२) नागपूर छत्तीसगड कमिश्नरीतील म्युनिसिपल कमिट्यांतर्फे श्री.नथमल, रायपूर. (३) नागपूर व जबलपूर शहर म्युनिसिपल कमिट्यां तर्फे बॅ.

मोरोपंत दिक्षीत, नागपूर. (४) नागपुर व छत्तीसगड जिल्हा कौन्सील तर्फे नारायणराव केळकर. (५) जबलपूर व नेमाडच्या जमिनदारांतर्फे श्री विष्णूपंत शुक्ल, सिहोरा, (६) जबलपूर व नेमाड जिल्हा कौन्सील तर्फे श्री. मथुरा प्रसाद वकील, छिंदवाडा, (७) नागपूर व छत्तिसगढच्या जमीनदारांतर्फे राजेबहादुर रघुजीराव भोसले, (८) वऱ्हाडच्या म्युनिसिपल कमिट्यांतर्फे श्री. आर. एन. मुधोळकर, अमरावती (९) वऱ्हाडच्या जिल्हा कौन्सीलतर्फे रावबहादुर दामले, (१०) वऱ्हाडच्या जमीनदारांतर्फे सर मोरोपंत जोशी, अमरावती.

सरकारव्दारा पुढील सदस्यांची नियुक्ती झाली होती. १) राजाबहादुर जवाहरसिंग (सारंगढ), २) नबाब सलामुल्लाखाँ, बुलढाणा ३) सर बिपीन कृष्ण बोस (नागपूर) याशिवाय दहा सरकारी अधिकारी आणि एक विशेष सभासद सचिव.

दुसरी निवडणूक :

विधान सभेच्या याच पहिल्या अधिवेशनात व्हाईसरॉय कौन्सीलसाठी प्रतिनिधींची निवड झाली व तीत श्री. एम.बि. दादाभाय, रावबहादुर आर. एन. मुधोळकर आणि रावबहादुर वासुदेवराव पंडीत निवडून आले.

विधान सभेची पहिली बैठक नागपूरच्या सचिवालयात कमिश्नरांच्या अध्यक्षतेखाली झाली. तेव्हा २६ सदस्य आणि अवघे १० प्रेक्षकच उपस्थित होते. या विधान सभेचा पहिला कार्यकाळ ता. २८ जुलै १९१७ रोजी संपला. नवीन निर्वाचन याच महिन्यात झाले होते. व त्यात सर्वश्री :- मोरेश्वर राजाराम दिक्षीत (नागपुर) व सौ. एम. ठक्कर (रायपूर) ई. राघवेंद्रराव (बिलासपूर) रायसाहेब नथमल (रायपूर), नारायणराव केळकर (बालाघाट) डी.लक्ष्मीनारायण (कामठी), मनोहरपंत गोळवलकर (जबलपूर), पी.सी. दत्त (जबलपूर), रायबहादुर मिश्र (खांडवा), रायसाहेब मथुराप्रसाद (छिंदवाडा), प्यारेलाल मिश्र (छिंदवाडा), गोविंदलाल पुरोहित (जबलपूर), रायसाहेब गौरीशंकर, (सिवनी), ब्योहर रघुवीरसिंह

(जबलपूर), हिरालाल वर्मा (छिंदवाडा), श्रीपाद बळवंत तांबे (अमरावती), शा.वि. महाजनी (अमरावती), आणि यशवंत गोविंद देशपांडे (अमरावती) हे सदस्य निवडून आले. या विधान सभेतील पहिल्या तीन वर्षातील कार्य विशेष संतोषजनक नव्हते. श्री.विष्णुदत्त शुक्ल, श्री.र.नं. मुधोळकर, सर मोरांपंत जोशी, श्री.मोरेश्वर दिक्षित, श्री.नारायणराव केळकर प्रभूती सरकारी अधिकाऱ्यांच्या आवाजाचे व सामर्थ्यांचे पारडे नेहमीच जड असावयाचे आणि म्हणूनच या कार्यकाळाला नोकरशाहीचे युग असे म्हणत असत. जनता नोकरशाहीच्या कार्याने साहजिकच संतुष्ट होवू शकत नव्हती.

व्दिदल शासनाचा प्रारंभ :

इंग्रजी शासना विरुध्दचा लोकक्षोभ वाढतच होता. त्या क्षोभाला "सेफ्टी व्हाल्व्ह" म्हणून ब्रिटीश राज्यकर्ते व मुत्सद्दी अनेक योजना पेरीत होते. अशाच प्रकारची एक योजना ता. २० ऑगष्ट १९१७ रोजी "मॉटेग्यु" चेम्सफर्ड, योजना" म्हणून समोर आली व या योजनेतून एक नवे पर्व सुरु झाले. ही योजना प्रकाशित झाल्यानंतर रौलेक्ट कमिशनची नियुक्ती करण्यात येवून १९१९ मध्ये "रौलक्ट ॲक्ट तयार झाला. हा कायदा भारतीय स्वातंत्र्य आदोलनाला एक जबरदस्त धक्का देणारा होता. एकीकडे मॉंटेग्यू, चेम्सफर्ड योजनेतून जनतेला अधिक सवलती देवून चुचकारण्याचा प्रयत्न सुरु होता. तर दुसऱ्या बाजूने "रौलेक्ट ॲक्ट सारखे कायदे करुन जनतेची स्वातंत्र्याकांक्षा दाबून टाकण्याची दडपशाही सुरु झाली. या कायद्याविरुध्द आंदोलन झाले. सर्वागीण विचार करण्याकरिता १८ एप्रील रोजी खांडवा येथे मध्यप्रांत राजकीय परिषद श्री. दादासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली झाली व परिषदेतही या कायद्या विरुध्द एक ठराव संमत करण्यात आला. महात्मा गांधीनीही ६ एप्रील रोजी या कायदयाविरुध्द सत्याग्रह केला व १३ एप्रिल रोजी जालीयनवाला बाग इंग्रजांच्या दडपशाहीने रक्तरंजित झाला. या भीषण घटनेमुळे लोकक्षोभ सारखा वाढत गेला. पं.विष्णुदत्त शुक्ल यांनी या कायद्याविरुध्द असंतोष व्यक्त करण्यासाठी केंद्रीय विधी मंडळातून आपल्या

सदस्यत्वाचा राजीनामा दिला. गांधीजींनी असहकार आंदोलनाचे रणशिंग फुंकले आणि इंग्रजाविरुध्द असंतोषाचा डोंब उफाळला. एकीकडे इंग्रजांची दडपक्षाही वाढत होती व त्याबरोबरच असंतुष्ट नीतीही सुरु होती. या नीतीनुसार माँटेग्यु चेम्सफर्ड योजनेच्या अंतर्गत २४ डिसेंबर १९१९ रोजी मध्यप्रदेशाची शासनसूत्रे चीफ कमिश्नरकडून काढून घेण्यात आली व या प्रांतासाठी गव्हर्नर नियुक्त करुन मध्यप्रदेशात व्दिदल शासन (डायर्की) सुरु करण्यात आले.

पहिले मंत्रीमंडळ गडगडले :-

''डायर्कीच्या योजनेनुसार विधान सभेची सदस्य संख्या २७ पासून ७० पर्यत वाढविण्यात आली आणि सभेचे अध्यक्षस्थान सरकारी व्यक्तिकडे न राहता बिनसरकारी सदस्यांकडे आले. पण याही योजनेमुळे जनतेचे समाधान होणे शक्य नव्हते. कॉग्रेसचे गया येथील अधिवेशन समाप्त होताच ता. ३१ डिसेंबर १९२२ रोजी निरनिराळ्या प्रांताच्या प्रतिनिधींनी कॉग्रेसमध्ये राहूनच एक निराळी ''स्वराज्य पार्टी'' नावाची संस्था स्थापन केली. या पार्टीचे अध्यक्ष देश बंधू चित्तरंजनदास होते व पं.मोतीलाल नेहरु, विठ्ठलभाई चौधरी आणि कालिकुज्जता हे तीन चिटणीस होते. निरनिराळ्या प्रांतातील कौन्सीलमध्ये प्रवेश करावयाचा व त्यानंतर त्यांचा भंग करायचा हा या पार्टीचा उद्देश होता. त्यानुसार महाकोशलमध्ये सेठ गोविंददास, रा.ब.ई. राघवेंद्रराव व पं. रविशंकर शुक्ल आणि मराठी मध्यप्रांत मध्ये (वऱ्हाड) बॅ. अभ्यंकर व डॉ.मुंजे यांच्याकडे पक्षाची संघटना करण्याचे कार्य सोपविले. या योजनेनुसार हिंदी व मराठी मध्यप्रांतातून प्रतिनिधी निवडून आले. या पक्षाचे कौन्सीलमध्ये बहुमत झाल्यामुळे तत्कालीन गव्हर्नर सर फँक स्लाय यांनी डॉ. मुंजे यांना मंत्रीमंडळ बनविण्याचा आदेश दिला. परंतु पदग्रहण करणे हा या पक्षाचा उद्देश नसल्यामुळे त्यांनी स्पष्ट नकार दिला व अल्प संख्याकांचे मंत्रिमंडळ तयार झाले. त्यानंतर काही दिवसांनी देशबंधू चित्तरंजनदास व पं. मोतीलाल नेहरु नागपूरला आले. त्यावेळी त्यांनी स्वराज्य पक्षाला समयानुकूल सल्ला दिला. आणि या सल्ल्यावरुन स्वराज्य पक्षाचे मंत्री मंडळाविरुध्द आणलेला अविश्वासाचा ठराव

बहुमताने संमत होवून अध्यक्षांनी ठराव स्वीकृत झाला असे जाहीर केले. यानंतर मंत्रिमंडळविरहित शासन सुरु झाले.

हिंदी भाषिक रुष्ट झाले :-

१९२५ मध्ये स्वराज्य पक्षाच्या कार्याचा विचार करण्यासाठी एक उपसमिती तयार करण्यात आली. तीत सर्वश्री देशबंधू चित्तरंजनदास, पं. जवाहरलाल नेहरु, मा. श्री.अणे, बॅ. अभ्यंकर, तांबे, घनश्यामसिंग गुप्त, डॉ.मुंजे व डॉ. ना.भा. खरे यांचा समावेश होता. या समितीने तयार केलेल्या आपल्या अहवालात मंत्रिमंडळ तयार करण्यास सहकार्य दिले जावू नये अशी घोषणा केली. यातूनच पुढे स्वराज्य पक्षात दोन गट पडले. महाराष्ट्रातून श्री.न.चि.केळकर, डॉ. जयकर आणि मराठी मध्यप्रदेशातून श्री.अणे व डॉ. मुंजे हे अधिकार ग्रहणाचे समर्थन करणाऱ्यांमध्ये होते. या नंतर प्रांतिक व्यवस्थापिका सभेच्या अध्यक्षांचे निवडणुक प्रकरण समोर आले. त्यात श्री.श्रीपाद बळवंत तांबे अध्यक्ष पदी निवडून आले. यापदावर पं. रविशंकर शुक्ल निवडून यावेत असे काही लोकांना वाटत होते. तर स्वराज्य पक्षांतर्गत पदग्रहणाचे समर्थक ते होते. त्याना प्रा. तांबे हवे होते. त्यावेळी हिंदी मध्यप्रांत, नागपूर आणि विदर्भ असे तीन प्रांत भाषिक तत्वानुसार कॉंग्रेस संघटना २१ प्रांतांत विभागण्याच्या महात्मा गांधीच्या ठरावानुसार तयार झाले होते. या तीन प्रांतांचे नेतृत्व डॉ.मुंजे यांच्याकडे होते. व्यवस्थापिका समितीच्या अध्यक्षीय निवडणुकीचे वेळी पं. शुक्ल हे रायपूरला जिल्हा कॉन्सीलच्या निवडणुकीसाठी गेले होते. त्यामुळे ठरलेल्या दिवशी झालेल्या निवडणुकीत श्री.तांबे निवडून आल्यामुळे साहजिक, हिंदी लोक रुष्ट झाले आणि याच घटनेतून पुढे फूट निर्माण झाली. त्यानंतर मधल्या काळात अनेक घटना घडल्या. पण अखेर कॉंग्रेसने अधिकार ग्रहण कार्यक्रम स्वीकारला.

पहिले कॉंग्रेस मंत्रीमंडळ :-

या कार्यक्रमानुसार १९३५ मध्ये केंद्रीय विधी मंडळाच्या निवडणुका

झाल्या. महाकोशल, विदर्भ आणि नागपूर येथेही कॉंग्रेस उमेदवार बहुमताने निवडून आले. व १९३६ मध्ये प्रांतीय विधी मंडळाच्या निवडणुकी झाल्या. मध्यप्रदेशात पदग्रहाणाच्या प्रश्नावर एकमत नव्हते. त्यामुळे लखनऊ कॉंग्रेसमध्ये पदग्रहाणाचा ठराव जेव्हा मंजूर झाला, तेव्हा नेते पदाच्या प्रश्नावर बरीच भवती न भवती झाली आणि अखेर डॉ. ना. भा. खरे हे निवडले गेले.

ता.१४ जुलै १९३७ रोजी प्रथम मंत्रिमंडळ तयार झाले. त्या डॉ. खरे हे प्रधानमंत्री व इतर मंत्र्यात पं. रविशंकर शुक्ल, पं. व्दारकाप्रसाद मिश्र, बॅ. रामराव देशमुख, श्री.पुरुषोत्तम बळवंत गोळे, श्री.दुर्गाशंकर मेहता व बॅ. मंहमद शरीफ हे होते.

परंतु पुढे या मंत्रिमंडळात मतभेद वाढत गेले. हिंदी मराठी वाद विकास पावू लागला. त्यासर्व अप्रिय घटनांचा कोळसा उगाळण्याचे हे स्थान नव्हे. शेवटी १९३८ मध्ये कॉंग्रेस पार्लमेंटरी बोर्डाने या प्रकरणी हस्तक्षेप केला. डॉ. खरे यांनी राजीनामा दिला व पं. रविशंकर शुक्ल हे नवे नेते निवडले गेले.

१९३९ ते १९४६

पं.शुक्ल यांच्या नेतृत्वाखाली या मंत्रिमंडळाने १ वर्षे शासन चालविले परंतु १९३९ मध्ये इंग्रजांना दुसऱ्या महायुध्दात सहकार्य न देण्याच्या प्रश्नावर इतर प्रांताप्रमाणेच मध्यप्रदेश मंत्रिमंडळानेही राजीनामा दिला व प्रांतीय स्वायत्ततेच्या अंतर्गत असलेली ही योजना संपुष्टात आली. त्या नंतर १९४२ "चले जाव आंदोलन" छेडले गेले. इंग्रजांनी ते दडपून टाकण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यातील त्यांचे यश फसवे ठरले. लॉर्ड वॅव्हेल यांनी सर्व प्रांताच्या मुख्यमंत्र्यांची एक परिषद सिमला येथे बोलाविली. पण ती यशस्वी होऊ शकली नाही. नंतर युध्दात मित्र राष्ट्रांचा विजय झाला व ब्रिटनमध्ये मजूर पक्ष निवडून आला. त्यानंतर इंग्रजांच्या धोरणात बदल घडून येऊन क्रेदीय व प्रांतीय विधी मंडळाच्या पुन्हा निवडणुकी झाल्या. त्यात कॉंग्रेसला भरघोस यश मिळाले व १९४६ मध्ये पं. शुक्ल यांच्या नेतृत्वाखाली मंत्रिमंडळ पुन्हा स्थापन झाले.

स्वातंत्र्यांचा आरंभ काळ :-

स्वातंत्र्य संपादनानंतर मध्यप्रदेश विधान सभेत आमूलाग्र परिवर्तन झाले. मुख्यमंत्री शुक्ल यांच्या मंत्रीमंडळाने कल्याणकारी राज्य निर्माण करणे व शासन यंत्रणा अधिकाधिक लोकाभिमुख करणे, या ब्दिविध दृष्टीकोनाने झपाट्याने पावले अचलण्यास सुरवात केली आणि इतर प्रांताच्या मानाने मध्यप्रदेशाने अनेक क्षेत्रात आघाडी मारली.

भारताच्या विक्रेंद्रीकरणाच्या या योजनांचा भारत सरकार आज विचार करीत आहे. ते विक्रेंदीकरण पूर्वीच्या मध्यप्रदेशात स्थानिक स्वराज्य संस्था विषयक कायद्यातून फार पूर्वी करण्यात आले होते. जनपदांची निर्मिती करण्यात आली होती आणि तालुका हा राज्यकारभाराचा मुख्य घटक मानला होता. तत्कालीन गृहमंत्री पं. व्दारकाप्रसाद मिश्र यांचे ते जिवंत भव्य शिल्प होते. परंतु या जनपद योजनेतून पुढे अनेक स्थानिक कटकटी उद्‌भवल्या प्रागतिक दृष्टीकोन आणि काम करण्याची घडाडी जरी मध्यप्रदेशाच्या मंत्री मंडळात होती, तरी कोणत्याही योंजनांची सर्वस्वी निकोप अंमलबजावणी होत नसे. हा त्या शासनातील एक दोष होता. जनपदांच्या स्थापनेमुळे आणखी एक गोष्ट घडून आली. ती ही की, ग्रामीण क्षेत्रातील जनतेत राजकीयदृष्ट्या राजकीय हक्काबरोबरच राष्ट्रीय जबाबदाऱ्यांची जाणीव त्या प्रमाणात न वाढल्यामुळे सत्तेचा हपाप आणि स्पर्धा सुरु झाली.

अस्पृश्यता निवारणासंबंधी पूर्वीच्या मध्यप्रदेशात कळकळीने विचार केला गेला. १९४८ मध्ये जातीभेद नष्ट करण्यासाठी विधानसभेत बरीच उद्‌बोधक चर्चा झाली. पुढे अस्पृश्यता निवारणाचा कायदाही संमत झाला. अस्पृश्यता पाळणे हा गुन्हा ठरला. परंतु एवढ्यावरच अस्पृश्यता व अस्पृश्य बांधव यांच्या संबंधीचे उत्तरदायित्व संपत नव्हते. म्हणून अस्पृश्यांना शिक्षण, राजकारण इत्यादी क्षेत्रात जादा सवलती दिल्या जाऊ लागल्या. अस्पृश्यांप्रमाणेच आदीवासींच्या उन्नतीचेही प्रयत्न शुक्ल मंत्रिमंडळाने कळकळीने केले.

पहिला अविश्वासाचा ठराव :-

मालगुजारी आणि जमीनदारी नष्ट करण्यातही हे राज्य मागे राहिले नव्हते. किंबुहना ते सर्व प्रांतांच्या मानाने अग्रेसरच ठरले होते. पडित जमीनी मशागतीखाली आणून जास्तीत जास्त उत्पादन करण्यासाठीही प्रयत्न केले गेले. मात्र कपाशीचे आगर असलेल्या वऱ्हाडात हव्या त्या प्रमाणात अधिक उत्पादनाचे आणि औद्योगीकरणाचे प्रयत्न त्यावेळी केले गेले नाहीत, या भागात जास्तीत जास्त सूत व कापड गिरण्या निर्माण करण्याचे काम मध्यप्रदेश सरकारला करता आले असते, आणि असे जर झाले असते तर विदर्भाचा शेतकरी अधिक प्रगत व सधन झाला असता. पण सूत गिरण्यांचे परवाने दिले असताही, सूतगिरण्या या भागात त्यावेळी निघू शकल्या नाहीत पुढे हाच मुद्दा मजूर पुढारी श्री.रामभाऊ रुईकर यांनी मंत्री मंडळाविरुध्द आणलेल्या अविश्वासाच्या ठरावात मांडला होता. मध्यप्रदेश विधान सभेत आलेला हा पहिला अविश्वासाचा ठराव होता.

शिक्षणाच्या क्षेत्रात जुन्या मध्यप्रदेशाने बरीच आघाडी मारली होती समाज कल्याणाचा वेगळा विभाग काढून अनेक सामाजिक व सांस्कृतिक चळवळींना जसे प्रोत्साहन देण्यात आले, तसेच ग्रामपंचायतींचा कारभारही याच खात्याकडे सोपवून खेडोपाडीही उन्नती करण्याचे प्रयत्न केले.

राज्यभाषेविषयी आणि राज्यव्यवहार कोषाविषयी जुन्या मध्यप्रदेशाने केलेले कार्य निश्चितच प्रशसंनीय आहे. डॉ. रघुवीर यांच्या प्रशासकीय शब्दकोषातील काही शब्दांची लोक अजूनही खिल्ली करतांना दिसत असले तरी मध्यप्रदेशाचा हा प्रयत्न संपूर्ण देशाला स्पृहणीय वाटला. राज्यभाषेसंबंधी हिंदी व मराठी या दोनही भांषांना राज्य भाषा म्हणून समान दर्जा मिळाला होता. मात्र हिंदी प्रतच अधिकृत मानण्याचे ठरले. अशी प्रगतीची वाटचाल सुरु असतांना कुठेतरी काहीतरी खटकत होते. मंत्री मंडळात हिंदी लोक बहुसंख्येने होते व पैशाचा बराचसा ओघ छत्तिसगढ महाकोशलकडे वाढू लागला. विदर्भाची कळत न कळत उपेक्षा होवू लागली. व मराठी माणसाला हळू हळू हे राज्य निरवालस हिंदी

लोकांचे व भांडवलदारांचे वाटू लागले.

अशा प्रकारची ही तत्कालीन मध्यप्रदेश राज्याची संमिश्र स्वरुपाची वाटचाल अखेरपर्यंत कायम होती. निरनिराळ्या कारणांनी मंत्रिमंडळावर अविश्वास व्यक्त होऊ लागला. श्री.रा.स.रुईकर यांनी सर्वप्रथम अविश्वासाचा ठरावा आणला. नागपूरात आज दिसते त्या विधानसभागृहाच्या वास्तूत आलेला हा पहिला अविश्वासाचा ठराव होता. हा ठराव १४ विरुध्द ८३ मतांनी फेटाळला गेला. नंतर ता.२५ फेब्रुवारी १९५३ रोजी ठाकुर प्यारेलालसिंग आणि ता. १५ सप्टेंबर १९५३ रोजी श्री.तामस्कर आणि श्री.ब्रिजलाल वर्मा यांनी अविश्वासाचे ठराव आणले. श्री.रुईकर यांनी ज्यावेळी अविश्वासाचा ठराव मांडला त्यावेळी विरोधी पक्षातही मराठी आमदारांचा जोर होता पण पुढे विरोधी पक्षातही मराठी माणसांचे सामर्थ्य उणे पडले. विधानसभेतही महाकोशलचाच विरोधी गट अधिक प्रभावी होऊ लागला आणि हळू हळू मंत्रिमंडळात राज्यकारभारात आणि समाज जीवनातही मराठी माणसांचा पदोपदी तेजोभंग होऊ लागला.

कॉंग्रेस पक्षातील बदल :-

एकीकडे तत्कालीन मध्यप्रदेश राज्य अशा प्रादेशिक दृष्टीकोनाने आपल्या प्रदेशाचा सर्वांगीण विकास करीत असतानाच, राज्यातील कॉंग्रेस पक्षात क्रमाक्रमाने महत्वाचे बदल घडत गेले. स्वातंत्र्यापूर्वीच्या मध्यप्रदेशाच्या कौन्सीलात काय किंवा राजकीय पक्षात काय बहुजन समाजाचे प्रतिनिधीत्व फारसे नव्हते. इतकेच नव्हे तर त्यावेळी बहुजन समाजात स्वातंत्र्याची उर्मी निर्माण झाली असली तरी सत्तेचा हव्यास पाठीला लागलेला नव्हता. स्वातंत्र्यानंतर ही क्रांती घडून आली. या दृष्टीने विचार करावयाचा म्हणजे काही महत्वाच्या घटनांचा निर्देश करुन त्या घटनांचा राजकीय आणि पर्यायाने सामाजिक जीवनावर कसकसा परिणाम होत गेला यांचे सिंहावलोकन करणे मोठे उद्‌बोधक ठरेल. एप्रील १९४८ च्या सुमारास मुंबईत अखिल भारतीय कॉंग्रेसच्या घटनेवर फेरविचार करुन दुरुस्त्याही करावयाच्या होत्या. वास्तविक महात्मा गांधींच्या भाषावार तत्वावर

कॉंग्रेस कमेट्यांची निर्मिती करण्याचा ठराव संमत झाल्यामुळे बऱ्याच प्रांतातून भाषिक आधारावर कॉंग्रेस कमेट्यांची स्थापना झाली होती. मध्यप्रदेश व महाराष्ट्र म्हणजे पूर्वीचा मुंबई प्रांत यात मात्र ही व्यवस्था ठरावावर हुकूम झाली नाही. मध्यप्रदेशात महाकौशल, नागपूर कॉंग्रेस संघटनेच्या दृष्टीने सर्वाधिकारी होते. पुढे पं. रविशंकर शुक्ल हे विधान सभेत कॉंग्रेस पक्षाचे नेते निवडले गेलेल आणि सहाजिकच त्यांचे या तिन्ही कमेट्यांवर निरंकुश नियंत्रण सुरु झाले. आणि "मिनिस्टेरीयल ग्रूप" व "ऑर्गनायझेशनल ग्रूप" असे दोन भेद प्रत्येक कॉंग्रेस समितीत सत्तेच्या स्पर्धेपोटी निर्माण होऊ लागले. एप्रील १९४८ मध्ये झालेल्या कॉंग्रेस महासमितीच्या बैठकीत विदर्भ आणि नागपूर प्रांतिक कॉंग्रेसची एक कॉंग्रेस कमेटी असावी अशी मागणी विदर्भ कॉंग्रेसाध्यक्ष श्री.ब्रिजलाल बियाणी यांनी केली होती. त्यावेळी नागपूर कॉंग्रेसचे अध्यक्षपद श्री.पूनमचंद रांका यांचे कडे होते. अर्थात श्री.बियाणीजींची ही मागणी पुढे आकाराला येऊ शकली नाही. त्या काळी जवळ जवळ एक तपाहून अधिक काळ श्री.ब्रिजलाल बियाणी यांनी विदर्भ प्रदेशाध्यक्ष म्हणून वैभव भोगले, म्हणून त्यांच्या या अप्रतिहत कार्यकाळात विदर्भातील भांडवलदारांचा सर्व गोतावळा त्यांनी आपल्या भोवती जमविला होता आणि आता नागपूर व विदर्भ यांची कॉंग्रेस कमेटी एक करुन तिचेही अध्यक्षपद स्वत:कडे घेऊन महाविदर्भाचे आपले मनोरथ पूर्ण करण्याच्या दृष्टीने त्यांनी चतुरपणे हे पाऊल उचलले होते. पण त्यात त्यांना यश येऊ शकले नाही.

कन्नमवार विरुध्द राकाजी :-

याच सुमारास नागपूर प्रदेश कॉंग्रेसच्या अध्यक्षीय निवडणुकीचे नगारे वाजू लागले होते आणि त्यावेळी नागपूर प्रांतिक कॉंग्रेसचे कार्यवाह असलेले श्री.कन्नमवार हे श्री.रांका यांना विरोध करण्यास उभे राहिले. श्री.कन्नमवार यांना श्री.बियाणी यांचा पाठिंबा होता व नागपूर कॉंग्रेसमध्येही श्री.बियाणी यांचे पुरस्कर्ते असे बरेच भांडवलदार सदस्य होते. तसे पाहू जाता नागपूरात मराठी-भाषी लोकांची बहुसंख्या असूनही अमरावती गटाचेच राजकारणार अधिक प्राबल्य होऊ

लागले होते. नागपूर प्रांताध्यक्षची निवडणूक अटीतटीची होणार अशी अपेक्षा होती व तशी स्पष्ट लक्षणेही दिसत होती. ऐन निवडणुकीच्या पूर्वी श्री.कन्नमवार यांचा तळ रांका कॉलनी या शहरापासून दूर असलेल्या गरीबांच्या वस्तीत होता. ही घटना कन्नमवारांनी आजवर वठविलेल्या अनेक भूमिका लक्षात घेऊन, आज घडीला उद्‌बोधक वाटेल. श्री.कन्नमवार यांची प्रांताध्यक्षपदी अविरोध निवड झाली. आणि त्या क्षणा पासून नागपूरच्या आणि नागपूर प्रांताच्या राजकारणात आमूलाग्र आणि महत्वाचा बदल घडून आला. श्री.कन्नमवार हे प्रांताध्यक्ष म्हणून निवडून यावेत ही घटना त्यावेळी सामान्य जनतेला आणि मराठी माणसाला मोठी कलाटणी देणारी वाटली ही गोष्ट नाकारता येणार नाही. श्री.कन्नमवार यांच्या निवडणुकीमुळे राजकारणात जो मोठा बदल घडून आला, तो बहुजन समाजात.

वऱ्हाड कॉंग्रेसची निवडणूक

तिकडे वऱ्हाड कॉंग्रेसच्या प्रांताध्यक्ष पदाचीही निवडणूक चुरशीची होणार असा रंग दिसू लागला होता. श्री.बियायणी यांच्या गटाविरुध्द श्री.पु.का. देशमुख यांचा गट हे दोघे संयुक्त मोर्चा करुन सिध्द झाले. परंतु श्री.बियाणी यांचीच सरशी झाली. श्री.बियाणी यांची पुन्हा निवड झाल्यामुळे बहुजन समाज खवळून उठला आणि वातावरण इतके तप्त झाले की, ता. २६ मे १९४८ रोजी श्री.बियाणी यांना आपला अध्यक्ष पदाचा मुकाट्याने राजीनामा द्यावा लागला. राजीमाना देतांना श्री.बियाणी यांनी जे वक्तव्य प्रसिध्द केले होते. ते अत्यंत महत्वाचे आहे. श्री.बियाणी यांनी या वक्तव्यात म्हटले होते की, माझा जय हा निर्भेळ नव्हता आणि म्हणून प्रांताच्या देशाच्या हिताच्या दृष्टीने मी आपल्या पदाचा राजीनामा देत आहे.

अर्थात श्री.ब्रिजलाल बियाणी यांनी निवडून आल्यानंतर आपल्या अध्यक्ष पदाचा जो राजीनामा दिला तो सुखासुखी व समजुतदारपणे दिला. असे म्हणता येणार नाही. कारण या प्रकरणात तत्कालीन गृहमंत्री पं. व्दारकाप्रसाद मिश्र यांचा बराच संबंध होता. श्री.बियाणी यांचा विशिष्ट गट सामर्थ्यशाली होणे हे

सत्तासपर्धेच्या दृष्टीने पं. मिश्र यांना पचणारे आणि मानवणारे नव्हते. श्री.कन्नमवार यांना निवडून आणण्यात श्री.बियाणी यांच्या बरोबरच पं. मिश्र यांनी बरीच कारस्थाने लढविली होती. परंतु तेच पंडीत मिश्रा श्री.बियाणी यांचा पाडाव करण्यातही पुढे सरसावले. त्यांची ही राजकीय मुत्सेद्देगिरी महाकोशल्याच्या दृष्टीने अत्यंत उपकारक ठरली.

पुढे आलेल्या निवडणुकीत डॉ.गोपाळराव खेडकर हे वीर वामनराव जोशी यांच्या कणखरपणामुळे वऱ्हाड प्रांताचे अध्यक्ष निवडून आले. आणि श्री.ब्रिजलाल बियाणी यांची १४ वर्षाची अप्रतिहत कारकीर्द कायमची समाप्त झाली. डॉ. खेडकरांचा विजय हा डॉ.पंजाबराव देशमुखांचा विजय होता आणि डॉ.पंजाबराव देशमुखांचा हा विजय वऱ्हाडच्या बहुजन समाजासाठी वऱ्हाडच्या राजकारणात त्यांचे तिचे निश्चित स्थान निर्माण करण्यास कारणीभूत ठरला.

अकोला करार व नागपूर करार :-

जुलै १९४८ मध्ये डॉ. खेडकर वऱ्हाड म.प्र. कॉंग्रेसचे अध्यक्ष निवडून आले आणि पुढच्याच महिन्यात म्हणजे ता. ७ ऑगष्ट १९४८ रोजी बॅ. रामराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली महाविदर्भ सभेने एक परिषद घडवून तीत असा स्पष्ट ठराव केला की, "महाविदर्भ हा संयुक्त महाराष्ट्राचा उपप्रांत असेल. दोन विधान सभागृहे राहतील. असे दोन वेगवेगळे प्रांत व संपूर्ण महाराष्ट्राचा एक राज्यपाल रहावा." अशी योजना सुचविण्यात आली होती, तरी हळू हळू वऱ्हाडातील जनता संयुक्त महाराष्ट्र हा एकच प्रांत असावा या मताची होऊ लागली आणि म्हणून ऐतिहासिक महत्वाचा "नागपूर करार" घडून आला. विदर्भातील ही जागृती अर्थातच मध्यप्रदेशाच्या मंत्रिमंडळाला मानवणारी नव्हती. मध्यप्रदेशाच्या राजकारणातील महत्वपूर्ण व्यक्ती पं. मिश्रा हे या योजनेला सुरुंग लावण्याचा प्रयत्न करीत होते. वर संयुक्त महाराष्ट्रासंबंधी अनुकूल विचार व्यक्त करुन आतून ते बुध्दिभेद करण्याच्या प्रयत्नास लागले. यासाठी नागपूर प्रांतिक कॉंग्रेस कमेटीचा ही बराच फायदा होत होता. हे अलिकडील इतिहासावरुन स्पष्ट

होईल. परंतु वऱ्हाडातील जनता मात्र संयुक्त महाराष्ट्र निर्मितीच्या प्रश्नावर सुरुवातीपासूनच एकनिष्ठ आणि प्रामाणिक राहिली. नागपूर प्रांतातही नागपूर व चांदा गटाचे वेगळे आणि वर्धा आणि भंडारा गटाचे वेगळे राजकारण शिजू लागले. वर्धागट हा सत्ताधारी गटाचा पुरस्कर्ता किंबहुना स्वत:ला गांधीजींचा वारसदार समजणारा गट होता. त्याची राजकारणाची पावले वेगळीच पडत पण हळूहळू कन्नमवार गटाचे प्राबल्य वाढून इतर गट निष्प्रभ झाले. कन्नमवारांच्या गटातून बियाणींच्या विदर्भवादी गटाचे पोषण होऊ लागले. पुढे तिसऱ्या मंत्रीमंडळात श्री.बियाणी व श्री.कन्नमवार हे दोघेही मंत्री झाल्यावरहि स्वतंत्र विदर्भाची मागणी अधिक पुष्ट झाली. श्री.कन्नमवार व श्री.बियाणी यांच्या प्राबल्याने हळूहळू पांढरपेशा सुशिक्षित वर्ग कॉंग्रेसमधून बाहेर फेकला गेला.

राज्य पुनर्रचना

नंतर राज्य पुनर्रचना मंडळाचा अहवाल प्रसिध्द झाला. पुनर्रचना मंडळाने विदर्भ देऊ केला होता. परंतु कॉंग्रेस सरकारने "राष्ट्रीय प्रयोग" म्हणून व्दिभाषिक मुंबई राज्य निर्माण केले आणि ता. ११ ऑक्टोबर १९५६ रोजी मध्यप्रदेश (जुन्या) विधान सभेचे कायमचे विसर्जन करण्यात आले.

निरोप संमारंभ

ज्या दिवशी जुन्या मध्यप्रदेशाची विधानसभा विसर्जित झाली तो दिवस अजूनही आठवतो. विधानसभागृहात त्यादिवशी जो कोणी हजर होता त्याच्या स्मरणाआड हा निरोपाचा प्रसंग होणार नाही. आपसात मतभेद होते. सापत्नभाव होते. तरीही इतक्या वर्षाच्या सहवासाने निर्माण झालेले हे स्नेहाचे नाते तोडून वेगळी घरे करावयाची होती. प्रत्येकाचे अंत:करण भारावून गेले होते. बहुतेक सर्व सदस्यांनी हृद्यस्पर्धी भाषणे केली. या अत्यंत भारावलेल्या वातावरणातही विदर्भवादी आणि संयुक्त महाराष्ट्र वादी सदस्यांनी आपले मनोगत उघडे करुन दाखविले, त्यात श्री.कन्नमवार आणि श्री.मदन गोपाल अग्रवाल यांच्या

भाषणातील काही भाग परिस्थितीच्या संदर्भात आजही उद्‌बोधक वाटेल.

श्री.कन्नमवार म्हणाले होते, ''विदर्भाचा प्रश्न सुटल्या सारखा झाला होता, परंतु मिळाले व्दिभाषिक ! मुलीचे लग्न झाले, मुलगी मोठ्या घरी पडली, एवढेच समाधान.''

श्री.मदन गोपाल अग्रवाल म्हणाले ''आज आम्ही बिदाई घेत आहोत तेथे आम्हाला आईच्या प्रेमाचा अनुभव आला आता सासूचे प्रेम अनुभवण्यास आम्ही जात आहोत.'' ना.श्री.पु.का.देशमुखांचे भाषणहि उत्कृष्ट झाले.

अखेरीस सभाध्यक्ष, पं. कुंजीलाल दुबे यांनी गहीवरुन समारोपाचे भाषण केले आणि राज्यपालांचा विधान सभा विसर्जित झाल्याचा संदेश वाचून दाखविला.

ता. १४ ऑगस्ट १९१४ रोजी सुरु झालेले हे सदन ४२ वर्षानंतर विसर्जित झाले होते.

राजधानी गेली :-

नागपूरच्या राजधानीचे महत्व या दिवशी ४ वाजून २५ मिनिटांनी सायंकाळी संपले. आता नवा मध्यप्रदेश निर्माण झाला होता. जुन्या प्रदेशाची राजधानी असलेल्या नागपूर नगरीची उचलबांगडी व्दिभाषिक महाराष्ट्र राज्यात झाली होती. एका व्दिभाषिकातून नागपूर नगरी आता दुसऱ्या व्दिभाषिकात गेली होती.

जुन्या मध्यप्रदेशात निर्माण झालेल्या विधानसभागृहाच्या वास्तूचे एक पर्व येथे संपले. नंतर विदर्भात संयुक्त महाराष्ट्र आंदोलन मोठ्या प्रमाणावर झाले. व ते यशस्वी ठरले.

संयुक्त महाराष्ट्र :-

नंतर १ मे १९६० रोजी व्दिभाषिक मुंबई राज्य मोडून मुंबईसह संयुक्त महाराष्ट्र झाल्याची ग्वाही दुमदुमली. नव्या राज्यास ''महाराष्ट्र'' असे नाव देण्यात आले. मुंबई राजधानी व नागपूर उपराजधानी झाली.

नव्या महाराष्ट्र राज्याच्या विधान सभेचे सत्र मुंबईत सुरु झाले.

विधान सभेच्या या अधिवेशनात ता. १७ ऑगस्ट १९६० रोजी, तत्कालीन मुख्यमंत्री (आणि भारताचे माजी गृहमंत्री) कै.श्री.यशवंतराव चव्हाण यांनी पुढील प्रस्ताव मांडला ''महाराष्ट्र विधान सभेचे निदान एक अधिवेशन नागपूर येथे व्हावे.''

नागपूर कराराची अंमलबजावणी :-

भूतपूर्व मध्यप्रदेशाची राजधानी म्हणून नागपूरचा विदर्भातील लोकांशी दीर्घकाळ संबंध पाहता आणि या शहराचे महत्व कायम टिकविण्याच्या दृष्टीने या दोन गोष्टी करण्यात याव्या असेही मूळ प्रस्तावात म्हटले होते.

अशाच प्रकारचा मूळ ठराव विधान परिषदेतही संमत करण्यात आला. हा प्रस्ताव मांडतांना तत्कालीन मुख्यमंत्री श्री.यशवंतराव चव्हाण म्हणाले होते की, स्वतंत्र विदर्भाची चळवळ सुरु होण्यापूर्वी १९५३ मध्ये निर्माण झालेल्या नागपूर करारातील तरतुदीची अंमलबजावणी करण्यासाठी हा ठराव आहे. काही लोकांच्या म्हणण्याप्रमाणे केवळ ''समाधान'' करण्यासाठी नाही.

या सरकारी ठरावावर समितीचे श्री.ए.बी.वर्धन आणि जनसंघाचे श्री.रामभाऊ म्हाळगी यांनी दोन दुरुस्त्या सुचविल्या होत्या.

प्रत्येक वर्षी महाराष्ट्र सरकारने कमीत कमी तीन महिने नागपुरात राहावे असे श्री.वर्धन यांनी सुचविले, तर श्री.रामभाऊ म्हाळी यांनी सुचविले होते की, खाते प्रमुखांच्या कोणत्याही पाच कचेऱ्या नागपूरला स्थायी स्वरुपात हलविण्यात याव्या.

मुख्यमंत्र्याच्या उत्तरानंतर मूळ प्रस्ताव एक मताने संमत झाला. हा प्रस्ताव संमत झाला आणि नागपूर येथील विधान सभागृहाच्या वास्तूत पुन्हा चैतन्य सळसळू लागले.

उपराजधानी गजबजली :-

या नंतर ता १० नोव्हे. १९६० रोजी नागपूरच्या उपराजधानीत ऐतिहासिक वास्तूत विधान सभेचा शुभारंभ झाल. एका व्दिभाषिकातून दुसऱ्या व्दिभाषिकात आणि नंतर संयुक्त महाराष्ट्रात समाविष्ट झालेल्या नागपूर प्रांताच्या सांसदीय इतिहासाचा हा एक अध्याय येथे पूर्ण झाला.

ए.श्री.पटवर्धन

दै.त.भा. २ जाने. १९६९.

वरुन साभार (संपादक)

टीप :- १) नागपूर प्रांताला वऱ्हाड जोडल्यानंतर म्हणजे १९०४ साली या प्रांताला ''मध्यप्रांत वऱ्हाड असे नाव मिळाले होते. या प्रांताला संसदीय इतिहासातील वर दिलेला पहिला भाग.

२) ऑगस्ट १९८८ मध्ये मुख्यमंत्री श्री.शरद पवार यांनी नागपूरला उपराजधानीचा दर्जा देण्याचे जाहीर केले आहे.

३) महाराष्ट्र शासनाने नागपूर शहराच्या महापौरास पूर्ण प्रशासकीय अधिकार प्रदार करण्याचे ठरविले आहे. यावेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री.मनोहर जोशी हे होते.

वऱ्हाड :-

इ.स. १८०३ साली भोसले इंग्रजी युध्दाची परिमती देवगावचे तहात होऊन वऱ्हाडवर इंग्रजांचा कब्जा झाला होता व १८५३साली इंग्रजांनी एका तहान्वये हा वऱ्हाड प्रांत निजामास देऊन टाकला. परंतु पुढे इ.स. १८५३ साली इंग्रजांचे निजामावर बरेच कर्ज झाले होते. त्यावेळी इंग्रज व निजाम यांचेतील तहाने वऱ्हाड हा इंग्रजांकडे वहिवाटीसाठी देण्यात आला होता तेव्हा पासून वऱ्हाडचे स्थितीस हळूहळू सुधारणा होऊन या प्रांताचे उत्पन्नातही वाढ झाली होती.

पुढे इ.स. १९०४ साली वऱ्हाड प्रांत हा मध्य प्रांतात राज्य

कारभाराचे सोईसाठी म्हणून जोडण्यात आला. त्यावेळी वऱ्हाडचे १७७०० चौ.मैल व उत्पन्न सालीना ७८ लक्ष रुपये होते व लोकसंख्या अंदाजे २८ लक्ष होती. जिल्हे चार होते.

त्यावेळी मध्यप्रांताचे एकूण अठरा जिल्हे होते व एकूण लोकसंख्या ९६ लक्ष होती व सालीना उत्पन्न मात्र ८५ लक्ष रुपयांचे होते.

शिवाय वऱ्हाडची मालकी निजामाची व वहिवाट फक्त इंग्रजांची होती. निजाम राज्यातील मोगलाईचा अनुभव वऱ्हाडातील जनतेस (१८०४ ते १८५३) होता त्यामुळे वऱ्हाडातील जनता निजाम राज्यात जायला मुळीच तयार नव्हती व वऱ्हाडातील जनतेचे त्यासाठीच सर्व पक्षीय वऱ्हाड परिषदेची स्थापना केली होती. या परिषदेमार्फत १९३१ च्या जॉ.पार्लमेंटरी कमेटीसमोरही वऱ्हाडची केस मांडण्यात आली होती. या सर्वपक्षीय परिषदेची मुख्य मागणी वऱ्हाड स्वायत्त प्रांत केला जावा व तो निजामाचे अधिपत्याखाली जाऊ नये अशी होती.

इंग्रजांनी वऱ्हाडचा राज्य कारभार सांभाळल्यापासून हळू हळू या प्रांताचे उत्पन्न वाढविले व ते सालीना अडीच कोटी रुपये एवढे झाले होते.

वऱ्हाडची जनता आपल्या रक्ताचे पाणी करुन सरकारी तिजोरीत अडीच कोटी रुपये दर साल भरत असे. त्यातील उरलेले ६० लाख मध्यप्रांतासाठी खर्च होत व २५ लाख मालकी हक्काबद्दल निजामात दिले जात. अशा तऱ्हेने ८५ लाखाचे हे दोन मोठे वाटेकरी म्हणजे वऱ्हाडच्या शेतकऱ्यांच्या अंगाला लागलेल्या व त्यांचे रक्त शोषण करणाऱ्या दोन मोठ्या जळवा होत्या. त्यामुळे वऱ्हाडातील एक लक्ष लोकांची बेकारी ह्या ८५ लक्ष रुपये जाणाऱ्या दोघांमुळे होत असे. हा पैसा वऱ्हाडासाठीच खर्च झाला असता तर वऱ्हाडात ज्या प्रमाणात बेकारी होती तशी ती दिसली नसती.

इ.स. १९०४ ते १९१३ - १४ सालापर्यन्त या प्रांतात कायदे मंडळ नव्हते. हा प्रांत चीफ कमिश्नरचे अधिपत्याखाली होता. त्यामुळे वऱ्हाडच्या जनतेची इच्छा

व्यक्त करण्याला वाव नव्हता. मोर्ले साहेबांचे कारकीर्दीत कै.रा.ब.रंगनाथ नरसिंह मुधोळकर यांनी वऱ्हाडवर होत असलेला अन्याय दूर व्हावा म्हणून बरेच परिश्रम घेतले व वऱ्हाडच्या उत्पन्नापैकी ४०-४० लाख रुपये सरकार अन्य रीतीने खर्च करते हे दाखवून दिले होते. तेव्हापासून या प्रश्नाला चालना मिळाली होती.

माँटफर्ड सुधारणा व वऱ्हाड : त्यावेळचे भारत मंत्री मॉटेग्यु साहेब ज्यावेळी चौकशी करिता आले होते त्यावेळी पुन्हा वऱ्हाडात खळवळ उडाली. रा.व.ब्रम्ह व रा.ब. मुधोळकर, व श्रीमंत दादासाहेब खापर्डे यांनी वऱ्हाड प्रांत मध्यप्रांतातून वेगळा करावा अशी त्यांचकडे मागणी केली होती व यासाठी शिष्टमंडळही पाठविण्यात आले होते. या सर्व चळवळीचा परिणाम इष्ट असा होऊन मॉटफर्ड रिपोर्टात असे नमूद करण्यात आले की, पुढे मागे शक्य तितक्या लवकर वऱ्हाड-ओरिसा व सिन्ध यांच्या विभक्तीकरणाचा विचार करावा लागेल.

वऱ्हाड सर्व पक्षीय परिषदेचे तिसरे अधिवेशन दि. ३१ मार्च १९३४ रोजी भरविण्यात आले होते. या परिषदेतील एका ठरावाने "भावी काळात वऱ्हाडची राजकीय, आर्थिक व सांस्कृतिक सतत उन्नती व्हावी म्हणून, वऱ्हाडला प्रांतिक स्वायत्तता कोणत्या स्वरुपाची असावी, होऊ घातलेल्या सर्व हिंदुस्थानच्या मध्यवर्ती संयुक्त कायदेमंडळात वऱ्हाडला स्वतंत्र प्रतिनिधी कसे पाठविता येतील व वऱ्हाडचे पैश्यावर आणि कायद्यांवर वऱ्हाडच्या लोकांची छाप कशी राहील या संबंधीची योजना आखण्यासाठी व तिला मूर्त स्वरुपा देवून तिचा मसूदा तयार करण्याकरतां, लोकनायक बापूजी अणे वीर वामनराव जोशी, श्री.एस.बी.तांबे (नागपूर), श्री.रा.अ.कानिटकर(बुलढाणा), बॅ.रामराव देशमुख, रा.ब.के.व्ही.ब्रम्ह बॅरि. बागवे, डॉ.पंजाबराव देशमुख, श्री.ओगले(अमरावती) व श्री.पी.वाय. देशपांडे यांची एक समिती नेमली होती.

(उदय दि. ३ एप्रिल १९३४) वरुन

४. वऱ्हाड प्रांतिक कॉंग्रेसचा ''स्वतंत्र-वऱ्हाड'' चा ठराव :-

(मॉर्डन रिव्हयु - जुलै १९२४)

निजामाने वऱ्हाडवर हक्क मागितला त्या विषयी मॉडर्न रिव्हयु कलकत्ताच्या जुलै १९२४ च्या अंकात खालील स्फुट आलेले आहे.

विदर्भ प्रांतिक कॉंग्रेस कमेटीच्या सर्व साधारण सभेत एक ठराव असा मंजूर झाला की, निजाम व्हाईसरॉय व इंडिया ऑफीस यांचेत वऱ्हाडच्या भवितव्या विषयी जो पत्र व्यवहार सुरु आहे, त्याचे निरीक्षण, करण्यासाठी एक समिती नेमण्यांत यावी.

या प्रदीर्घ चिघळत असलेल्या प्रश्नामध्ये वैदर्भीय जनतेच्या स्वातंत्र्याची भावना व हितरक्षण हाच प्राधान्येकरुन दृष्टीकोन असावयास पाहिजे. हाऊस ऑफ कॉमन्स मध्ये दि. १८.२.१९२४ रोजी भारताचे अंडर सेक्रेटरी यांनी अशीच भावना व्यक्त केली होती. त्यांचे मत असे की, ज्याअर्थी निजामाने व्हाईसरायकडे पत्र पाठविले आहे, वैदर्भीय जनतेकडे नव्हे. व या उभयतांनी ह्या प्रश्नासंबधी आपल्या भावना व्यक्त करण्याकरीता वैदर्भीय जनतेला पाचरण केलेले नाही. त्याअर्थी तूर्त ह्या पत्रावर भाष्य करण्याची मुळीच आवश्यकता नाही. परंतु ह्या वैचारिक देवाण घेवाणीवर निगराणी ठेवण्याची आवश्यकता ठरावात प्रतिपादन करण्यात आलेली आहे. ते अतिशय तातडीचे व नाजूक प्रकरण असल्यामुळे ब्रिटीश सरकारने एक इंपिरिअल कमिशन नेमावे व ह्या प्रश्नाची सखोल व विस्तृत चौकशी करावी. तसेच वैदर्भीय जनतेच्या न्याय्य, रास्त व वास्तव अशा आंकाक्षा जाणून घ्याव्या. कोणत्याही पक्षांनी केवळ आपसपसातील पत्र व्यवहाराने ही समस्या निकाली काढावी इतकी ती किरकोळ नाही व वैदर्भीय जनता गाठोड्या प्रमाणे इकडून तिकडे हस्तांतरीत व्हावी इतकी क्षुद्र नाही. आपणास कोणत्या पध्दतीचे प्रशासन हवे. हे ठरविणय्याचा त्यांनाच अधिकार असावा, हे स्वयं निर्णयाचे तत्व आहे.

''------ वऱ्हाडचे संबंध सर्व मध्यप्रांताशी नसून फक्त मराठी

मध्यप्रांताशीच आहेत व ते हिंदूस्थानातील इतर प्रांताशी असलेल्या संबंधापेक्षा निराळे नाहीत. वऱ्हाड व मध्यप्रांत यांचे राजकीय एकीकरण नव्हते, आणि असूही नये. या दोन प्रांतात मूलभूत फरक असा आहे की, मध्यप्रांत प्रथमपासूनच ब्रिटीशांचा मुलूख आहे पण वऱ्हाड वहिवाटीने ब्रिटीशांचा व मालकीने निजामाचा आहे .... मध्यप्रांताचा जमाखर्च वऱ्हाडच्या उत्पन्नातून होतो .... १९०२ म्हणजे १९३३ नव्हे. एवढ्या काळात, वऱ्हाडात, पुष्कळ सुधारणा झाली आहे व उत्पन्न सालीना ३७ लक्षपासून तो २ कोटी ६४ लक्षापर्यन्त वाढले आहे .... वऱ्हाड स्वतंत्र घटक करण्यासंबंधी योग्य तजविज ही सरकारने न केली तर ब्रिटीश सरकारने भावी राज्यघटनेत वऱ्हाडला योग्य सरंक्षण देण्याची व्यवस्था करावी (बॅ.रामराव देशमुख यांचे पत्रातून)

(उदय दि. ३१ जाने १९३३)

<u>मध्यप्रांत वऱ्हाड कायदे मंडळात वऱ्हाड संबंधीचे ठरावावर श्री.बाबासाहेब खापर्डे यांच्या भाषणाचा सारांश.</u>

''---- या कायदे मंडळाचे वऱ्हाडातील पहिले अध्यक्ष कै.रा.ब. मुधोळकर यांनी १९२० साली सरकारला पाठविलेल्या पत्रकात ह्या पूर्वीच्या इतिहासाचा आणि वऱ्हाड व मध्यप्रांत यांचा संबंध कसा दुष्परिणामी झाला या संबंधीचा उहापोह केलेला होता व त्यांच्या त्या चळवळीचा परिणाम म्हणजेच सध्याची सीम योजना (सीम फॉरम्युला) होय. भावी राज्यघटनेत वऱ्हाडचे स्थान काय राहणार हाच प्रश्न आज आपले समोर आहे.

(उदय दि. ७.२.३३.)

वऱ्हाडचे ठरावावर श्री.रा.अ.कानीटकर यांचे मध्यप्रांत कायदे मंडळातील भाषणातून -----

''प्रस्तुतच्या ठरावासारखे किंवा या अर्थाचे ठराव या कायदे मंडळात यापूर्वी अनेकदा झालेले आहेत. ....

१९२१ इ. साला पासून या कायदे मंडळाचे कामकाजाचे अहवाल चाळले तर असे दिसून येईल की, वऱ्हाडात हा प्रश्न येथे पुष्कळदा आलेला आहे.

----- वऱ्हाड हा ब्रिटीश मुलूखही नाही आणि हिंदी संस्थानही नव्हे. १९०२ च्या कराराने या प्रांताचा कारभार चालविण्याचे व त्यासंबंधी कायदे बनविण्याचा अधिकार निजामाने ब्रिटीश सरकारकडे दिलेला आहे. अर्थात ब्रिटीश सरकारच्या वतीने व्हॉईसरॉयच वऱ्हाडचा कारभार पाहतात. पण तो व्हाईसरॉय यानात्याने नव्हे तर ब्रिटीश सरकारचे प्रतिनिधी म्हणून वऱ्हाड संबंधी कायदे करण्याचे अधिकार त्या "प्रतिनिधी" कडे आहेत ते मध्यप्रांत कायदे मंडळाकडे नाहीत किंवा त्यातील वऱ्हाडच्या प्रतिनिधीकडे नाहीत."

वऱ्हाड सर्वपक्षीय कमिटी :-पहिली गोलमेज कॉन्फरन्स होताच संयुक्त राज्य घटनांचा गाजावाजा झाला. त्यावेळी वऱ्हाडला त्यांत स्थान कोणते ? असा प्रश्न सर्व विचारवंत वऱ्हाडकरांच्या मनांत उत्पन्न झाला होता. पण या प्रश्नास त्यावेळी जाहीरपणे तोंड फुटले नव्हते.

बॅरि.रामराव देशमुख यांनी व्हाईसरॉयला पहिले पत्र लिहून या प्रश्नास तोंड फोडले. पुढे हा प्रश्न खामगाव प्रांतिक परिषदेपुढे आला आणि या परिषदेने वऱ्हाड प्रांतिक कॉंग्रेस कमेटीच्या अध्यक्षास सर्व पक्षीय परिषद बोलावण्याचा अधिकार देऊन तिच्या मार्फत हा प्रश्न सोडविण्यास सांगितले. त्याप्रमाणे १९३१ मध्ये सर्व पक्षीय परिषद झाली व तिच्या मार्फत लोकनायक अणे यांच्या अध्यक्षतेखाली एक "वऱ्हाड सर्व पक्षीयकमिटी" स्थापन झाली, आणि वऱ्हाडचे प्रश्नास चालना मिळू लागली.

दुसऱ्या गोलमेज कॉन्फरन्स मध्ये, राष्ट्रीय सभेचे प्रतिनिधी म. गांधीच वऱ्हाडचा प्रश्न पुढे करावयास तयार झाले होते. त्यावेळी माजी गव्हर्नर श्री.तांबे हे दुसऱ्या गोलमेज परिषदेला हजर असल्यामुळे त्यांनी तेथे ह्या प्रश्नास तोंड फोडून ठेवले होते. त्यावेळी सर्वपक्षीय कमिटीचे सेक्रेटरी श्री.कानिटकरही इंग्लंडला याच कार्याकरिता गेले होते. तिसऱ्या गोलमेज कॉन्फरन्स मध्ये

श्री.तात्यासाहेब केळकरांनी पुन्हा या प्रश्नास चालता दिली आणि खुद्द वऱ्हाडच्या जनतेनेही हिंदू अगर मुसलमान, ब्राम्हण अगर ब्राम्हणेतर, राष्ट्रीय अगर प्रागतिक, कॉंग्रेसवाला अगर बिन कॉंग्रेसवाला असा भेद न मानता वऱ्हाडच्या प्रश्नास पाठींबा दिला होता. मध्यंप्रांत वऱ्हाड कायदेमंडळात सुध्दा वऱ्हाड विभक्तीकरणास पाठींबा मिळाला होता.

पुढे जॉईन्ट पार्लमेंटरी कमिटीचा प्रश्न उत्पन्न झाला. त्यावेळी वऱ्हाड सर्वपक्षीय कमिटीने आपला प्रतिनिधी सदर कमिटीपुढे साक्षी देण्यासाठी बोलवावा अशी मागणी केली व त्यासाठी बॅरि. रामराव देशमुख यांना आपला प्रतिनिधी मुक्रर केले होते. त्याच वेळी हिंदूमहासभेच्या कार्यकारी मंडळाने आपल्या तर्फे जे साक्षीदार घेतले होते त्यांत बॅरि. रामराव ह्यांचे नांव होते. परंतु साक्षीदारांना पासपोर्ट देण्याची जेव्हा वेळ आली तेव्हा ''वऱ्हाड सर्वपक्षीय कमिटीचा प्रतिनिधी त्यांत असावा'' असे सरकारतर्फे सांगण्यात आले होते. त्यामुळे हिंदू महासभेच्या शिष्ट मंडळातून, वऱ्हाडतर्फे म्हणून बॅरि. रामराव देशमुख इंग्लंडात गेले होते. बॅरि. रामरावांनी वऱ्हाडचा प्रश्न जो एकदा हाती घेतला तो अखेरपर्यन्त त्यांनी पोहोचविला. कारण हा प्रश्न त्यांच्या स्वत:चा घरगुती प्रश्न नव्हता तर वऱ्हाडच्या जनतेच्या जिव्हाळाचा हा प्रश्न होता. इंग्लंडला गेल्यावर तेथील इंडिया ऑफीसने वऱ्हाडचा प्रश्न ऐकून घेण्यासाठी एक कमिटी नेमली व त्या कमिटी पुढे बॅरी. रामराव देशमुख ह्यांनी वऱ्हाडची बाजू सर्व तऱ्हेने साधार समजावून सांगितली.

वऱ्हाड सर्वपक्षीय कमिटी नेण्याची जी गरज निर्माण झाली होती त्याचे मुख्य कारण म्हणजे. इंग्रज सरकारने गोलमेज परिषदा भरवून त्या व्दारे भारतातील विविध विचारांच्या, जातींच्या व पक्षांच्या प्रतिनिधींची मते समजून घेवून हिंदूस्थानला कांही नवीन राजकीय सुधारण द्यायचा विचार चालविला होता.

(पुढे १९३५ चा सुधारणा कायदा - इंडिया ॲक्ट १९३५ या नांवाने हा सुधारणा कायदा होवून तो अंमलात आला होता) अशा वेळी, मागील ८० वर्षाचा, विशेषत: १९०४ नंतर मध्यप्रदेशाला वऱ्हाड, जोडल्या नंतरचा जो अनुभव वऱ्हाडच्या जनतेस

आला होता तो पाहता, वऱ्हाड हा स्वायत्त प्रांत व्हावा वऱ्हाडच्या जनप्रतिनिधींना कायदे करण्याचा अधिकार असावा आणि वऱ्हाडचे उत्पन्न वऱ्हाडच्या विकासासाठी खर्च व्हावे असे वऱ्हाडी जनतेस वाटू लागले होते. त्याच वेळी वर नमूद केलेली परिस्थिती निर्माण झाल्याने संभाव्य इंडिया ॲक्ट मध्ये वऱ्हाडचे नेमके स्थान कोणते राहावे हे ठरवून घेण्याचे दृष्टीने व शक्य झाल्यास वऱ्हाड हा स्वायत्त व्हावा म्हणून खटपट करण्यासाठी ही सर्वपक्षीय कमेटी स्थापन झाली होती.

पुरवणी व परिशिष्ट

परिशिष्ट २

१) अमरावती पालिकेचा शतसांवत्सरिक इतिहास.

२) सुरुवातीची परिस्थिती.

३) अमरावती महानगरपालिकेचे उद्घाटन.

४) अमरावती शहराची मानसिकता.

६) अमरावती नगरपालिकेचा शतसांवत्सरिक इतिहास :-

प्रास्ताविक :- इ.स. १७२४ पासून तर १८५३ पर्यंत वऱ्हाडवर हैद्राबादच्या निजामाचा अंमल होता. निझाम सरकारचे अधिकारी या ठिकाणी राहत होते. जेथे हल्ली प्राथमिक शाळा नं. १ भरते आहे. ती शाळा राजा बिसनचंदजी हवेली म्हणून प्रसिध्द आहे. १८५३ मध्ये निझामाच्या पदरी असलेल्या तैनाती फौजेचा खर्च वाढत जाऊन त्याची फेड न झाल्यामुळे वऱ्हाड इंग्रजांना वहीवाटी करीता देण्यांत आला. वऱ्हाडचे चार जिल्हे ''हैद्राबाद असाइन्ड डिस्ट्रीक्ट'' म्हणूनच ओळखले जात होते. इंग्रजांनी वऱ्हाड परत निझामला येथे कमीश्नरी स्थापन झाली जे थे इंग्रजांच्या युनियन जॅक सोबत निझामाचाही ध्वज फडकविला जात असे. निझामाच्या युवराजाला ''प्रिन्स ऑफ बेरार'' ही पदवी देण्यात आली व निझाम सरकारच्या सन्मानार्थ दरवर्षी १ जानेवारीला ११ तोफांची सलामी दिली जात असे.

याप्रमाणे वऱ्हाडवर इंग्रजी अंमल सुरु झाला १८५७ च्या युध्दांत या विभागात फारसे काहीहि घडले नाही इंग्रजांनी आतापर्यंत ठग पेंढारी, भिल्ल-नाईक अशा उपद्रवी टोळयांचा संपूर्ण नायनाट केला होता व निश्चित स्वरुपाचा शेतसारा ठरवून दिल्यामुळे शेतकऱ्यांची लूट पण काही प्रमाणात कमी झाली होती म्हणून जनतेने इंग्रजी राजवटीचे स्वागतच केले. १८५७ च्या स्वातंत्र्ययुध्दाचा एक परिणाम म्हणजे भारतातील ईस्ट इंडिया कंपनीचा कारभार जाऊन त्या ऐवजी ब्रिटीश पार्लमेंटचे प्रत्यक्ष राज्य सुरु झाले. इ.स. १८५८ च्या राणीचा जाहीर नामा या दृष्टीने फार महत्वाचा आहे. भारताचे राजकीय व आर्थिक शोषण करुन चालणार नाही तर या देशांत प्रशासकीय सुधारणा कराव्या लागतील याची जाणीव इंग्रज सरकारला झाली. लॉर्ड रिपनच्या कारकीर्दीत स्थानिक स्वराज्यांची कल्पना मान्य झाली व मुंबई कलकत्ता अशा शहरात नगरसंस्था कार्य करु लागल्या. देशात इतरत्र नगरपालिका स्थापन झाल्या. पंजाब म्युनिसिपल कायद्याचा अंमल वऱ्हाडवरही लागू करण्यात आला.

अमरावती नगरपालिकेची स्थापना :-

पंजाब म्युनिसिपल कायद्यानुसार हैद्राबाद रेसीडेन्टने एक नोटीफीकेशन काढून (अंडर ॲक्ट १५ ऑफ १८६७) उमरावती येथे नगरपालिकेची स्थापना इ.स. १८६९ साली करण्यांत आली. १८६९ चे प्रोसीडींग आजही नगरपालिकेच्या दफ्तरी दाखल आहे. त्यावेळी नगरपालिकेचे एकूण २४ सभासद होते. त्यापैकी १८ निवडलेले व ६ सरकार नियुक्त असे. इ.स. १८७० मध्ये वेस्टर्न बेरारचा कमिश्नर अे. लॉयल यांनी वऱ्हाडचे पहिले गॅझेटीयर लिहीले, जे ''गॅझेटीयर ऑफ हैद्राबाद असाइन्ड डिस्ट्रीक्ट'' या नावाने प्रसिध्द आहे. त्यात उमरावती शहरांचे खालील प्रमाणे वर्णन दिले आहे.

या शहरांचे दोन भाग होते. त्यापैकी एक कसबा व दुसरे पेठ या नावांने ओळखल्या जात होते. उमरावती शहर हे स्वतंत्र शहर नसून चार खेडे मिळून बनलेले आहे.

१) मौजे राजापेठ २) मौजे महाजनपूर ३) मौजे तारखेडा

४) मौजे गंभीरपूर या खेड्यांचा समावेश होऊन उमरावती शहर बनलेले आहे.

सन १८६८-६९ मध्ये जेव्हा अमरावती नगरपालिका स्थापन झाली तेव्हा उमरावती शहरांची लोकसंख्या खालील प्रमाणे होती.

लोकसंख्या १९६८-६९

	पुरुष	स्त्री	जातवार लोकसंख्या	
मोठे	९३४९	७८८२	हिंदू -	१७,२६५
लहान	३३१३	२८६६	मुस्लीम-	४,४१०
एकुण	१२६६२	१०७४८	युरोपियन -	३१
एकुण	२३,४१०		इतर -	१,७०४
			एकूण -	२३,४१०

१) इ.स. १८६८ मध्ये उमरावती येथे घरांची एकूण संख्या ६३१७ होती.

२) उमरावतीकर भोसल्यांची गढी त्यावेळी होती याचाहि उल्लेख १८७० च्या गॅझेटियर मध्ये आहे.

याच काळात अमरावती येथे प्रमुख इमारती बांधण्यात आल्या. १८५९ मध्ये रेल्वे स्टेशन १८६६ मध्ये डिस्ट्रीक्ट जेल आणि १८६० मध्ये कमीश्नर कचेरी (हल्लीचे कलेक्टरेट)

वस्ती :- शहराची जुनी वस्ती परकोटाचे आंत होती. व सर्व व्यापार व व्यवहार परकोटाचे आतच होता. हळूहळू परकोटाच्या बाहेर वस्ती वाढू लागली. व शहराचा विस्तार होत गेला. भाजीबाजार येथे भाजीपाला व दहीसाथ येथे दूध, लोणी यांचा बाजार भरत होता. कापड बाजार जुना बाजार सराफा, भुसारी गेट पासून भुसारी व किराणा मालाचे व्यापारी व बोहऱ्यांची दुकाने प्रामुख्याने होती. चहा फराळाची दुकाने त्यावेळी मोजकीच होती. दहीसाथ, काळे विहिर ते अंबागेट हा भाग कलावंतीणी व वारांगना याकरिता प्रसिध्द होता. उमरावती येथे सावकारांचा फार मोठा वर्ग होता. विदर्भात त्याकाळी भरभराटीला आलेले उमरावती हे एकमात्र शहर होते. नगरपालिका सुरु झाल्यापासून नंतर नगर सुधारणेवर भर दिल्या जाऊ लागला व अशा रीतीने शहराचा विकास घडत गेला.

निवडणुका :- उमरावती शहराची नगरपालिका स्थापन झाली त्यावेळी शहराची विभागणी एकूण तीन वार्डात करण्यात आली. प्रत्येक वार्डातून ६ सभासद असे एकूण १८ सभासद निवडावयाचे होते. निश्चित सारा किंवा उत्पन्न असलेल्या नागरिकांना मतदानाचा अधिकार असे. त्यामुळे मतदारांची संख्या फारच कमी होती. मतदानाची जाणीव नसल्यामुळे मतदार निवडणूकीच्या दिवशी फार कमी प्रमाणांत येत होते. बहुधा त्यांना त्यांच्या घरुन आणावे लागे. निवडून आलेल्या सभासदातून दरवर्षी दोन सभासद निवृत्त होत आणि निवडले जात असत.

वार्ड रचना :- वार्डाच्या दृष्टीने एकूण ३ वार्ड होते.

१) नॉर्थ वॉर्ड - भाजीबाजार, सराफा,

२) साऊथ वॉर्ड - अंबागेट, बुधवारा व जुनी कोतवाली.

३) ईस्ट वॉर्ड - परकोटाच्या बाहेरील भाग.

निवडून आलेले सभासद एका उपाध्यक्षांची निवड करीत असत. जिल्ह्याचा डेप्युटी कमिशनर हाच नगरपालिकेचे पदसिध्द अध्यक्ष असे. नगरपरिषदेचा वार्षिक अंदाज पत्रक कलेक्टर मंजूर करीत असे आणि त्याला सोईचे वाटेल त्याप्रमाणे बदल करण्याचा अधिकार कायद्यानुसार दिलेला होता.

नगर परिषदेचे कार्यालय :- जुने दफ्तर हाताळता असे दिसून येते की, नगरपरिषदेचे सर्वप्रथम कार्यालय सक्करसाथ, धनराज औळ, येथे गनेडीवाल यांच्या इमारतीत होते. याच ठिकाणी एक बँक होती. ती जागा हल्लीही जुनी बँक म्हणून ओळखली जात आहे. त्या इमारतीत नंतर ''बँक ऑफ बॉम्बे'' नांवाची बँक सुरु झाली. (बँक ऑफ बॉम्बेचे नंतर इंम्पीरीयल बँक मध्ये रुपांतर झाले व पुढे या बॅकेचे राष्ट्रीय करण होऊन ती स्टेट बँक ऑफ इंडिया या नावाने कारभार करु लागली.) नगरपालिकेचा नोकर वर्ग जेमतेम २५ ते ३० च्या आसपास होता. नगरपालिकेचा सेक्रेटरी व जॉइन्ट सेक्रेटरी हे ऑनरी होते व निवडून आलेल्या सभासदांतून त्यांची निवड केली जात असे. ही प्रथा १९१८ पर्यत चालू होती. सन १९१८ मध्ये श्री.बी.डी. साने यांची पगारी सेक्रेटरी म्हणून नेकणूक करण्यात आली. नगर पालिकेचे कार्यालय नंतर वकील लाईन येथे हलविण्यात आले. त्याठिकाणी कैक वर्षपर्यत हे कार्यालय राहून नंतर पुढे हल्लीच्या जागी स्थानांतर झाले.

नगर प्रशासनात नंतर सुधारणा होऊ लागल्या आणि प्रशासनाची विभागणी करण्यांत आली. ठराव नं. १६ ता. ६.७. १८८९ च्या नुसार सब कमेट्या स्थापन करण्यात आल्या.

१) फायनान्स व अकाऊन्ट सब कमेटी.

२) सॅनिटेशन व सुपरविजन सब कमेटी.

३) पब्लीक वर्क्स सब कमेटी.

४) एज्युकेशन, डिस्पेन्सरी, व्हॅक्सीनेशन व मार्केट सब कमेटी.

म्यु. सभासदांतून सब कमेटीचे सभासद निवडले जात दिनांक ५.१.१८७१ रोजी भरलेल्या नगरपालिकेच्या जनरल मिटींग मध्ये हजेरीनुसार खालील प्रमाणे सभासद उपस्थित होते.

१.	कर्नल जे बुशबॉय	अध्यक्ष न.पा.
२	कॅप्टन फ्युरर	उपाध्यक्ष
३	मि.ए.डब्ल्यू बेंटळे	सदस्य
४	आर. डब्ल्यू वूडहाऊस	-"-
५	जे डांगुल	-"-
६	नागोराम जयकृष्ण	-"-
७	अब्दुल बारी	-"-
८	नाना चिमोटे	-"-
९	मन्नुलाल	-"-
१०	ताराचंद	-"-
११	सुरतराम	-"-
१२	रामधन	-"-
१३	ए. ब्रुड	-"-
१४	डॉ. हार्वर्ड	-"-



नगरपालिका, अमरावती.

१५	जमनादास	-"-
१६	मि. मुरट	-"-
१७	मुक्ता प्रसाद	-"-
१८	गणेशदास ठाकुरदास	-"-
१९	शिवलाल मोतीलाल	-"-
२०	बदरोदन	-"-
२१	जे. मरीयन	-"-
२२	इनायत हुसेन	-"-
२३	कॅ. सी.टी.लेन	-"-
२४	नयनदयाल	-"-

या शिवाय नगरपालिकेची मॅनेजींग कमेटी असे व तीत वरील २४ सदस्यांमधून लोक निवडले जात. सन १८८६ मध्ये वऱ्हाड साठी बेंरार म्यु. ॲक्ट करुन तो लागू करण्यांत आला. त्यानुसार मतदारांची नोंद होऊन निवडणुका घेण्यांत आल्या. वार्डातून निवडून आलेल्या सभासदांची नोंद ठरावरुपाने नगरपालिकेच्या प्रोसिंडींग बुकात केली जात असे. त्याचा एक दाखला असा.

ठराव नं. ६ ता. ५.३.१८८९ प्रमाणे - निवडून आलेले सभासद

१)	नार्थवॉर्ड (भाजीबाजार)	(१)	मी.बाळकृष्ण बळवंत सुळे
		(२)	मोरो विश्वनाथ जोशी.
		(३)	केवलचंद गंभीरचंद मोहता.
		(४)	अंताजी गोविंद केतकर
		(५)	रघुनाथ बाळकृष्ण तळवलकर
		(६)	श्री.किसन गुलाबचंद राठी.

२)	साऊथ वॉर्ड (जुनी कोतवाली)	(१)	विष्णू हरी जोशी
		(२)	एकनाथ लक्ष्मण ओक
		(३)	कोंडू बालाजी
		(४)	बाळकृष्ण जयराम पेंडके
		(५)	रंगनाथ एन. मुधोळकर
		(६)	प्रल्हाद एन. जोग
३)	ईस्ट वॉर्ड - (भुसारीगेट बाहेरचा भाग)	(१)	बळवंत व्यंकाजी खोत
		(२)	यशवंत गोविंद केतकर
		(३)	डॉ.रामचंद्र एन. मुधोळकर
		(४)	जनार्दन नारायण
		(५)	नारायण गोविंद केतकर
		(६)	डेसा.

सन १८८९ साली ठराव नं. ५ दि. ७.८.१८८९ प्रमाणे सर्वश्री विष्णुहरी, डेसींगाचारी, विल, शिळी, तखतमल बच्छराज यांना नगरपालिकेतर्फे कॉटन मार्केट कमेटीवर सभासद म्हणून नेमण्यात आले.

कॉटन मार्केट व धान्य मार्केट कमेटीच्या जागा नगरपालिकेच्या मालकीच्या आहेत असा ठराव दि. १३.१२.१८९१ ठराव नं.९ प्रमाणे करण्यात आला. यावरुन शहराचा धान्य व कापूस बाजार नगरपालिकेचे अंतर्गत चालत असे असे दिसते.

सन १९०६ मध्ये वऱ्हाडप्रांत हा मध्यप्रदेशाला जोडण्यात आला मध्यप्रांत नंतर सी.पी.ॲन्ड बेरार या नांवाने ओळखल्या जाऊ लागला. सी.पी.म्युनिसिपल ॲक्ट वऱ्हाडला १९०६ ला लागू करण्यात आला. या संबंधी

अमरावती नगरपालिकेचा ठराव क्रं. १ ता.२२.११.१९०५ अन्वये हा कायदा वऱ्हाडला लागू करण्यास संमती देण्यात आली.

या कायद्याचे कलम ३४ (सी) प्रमाणे नगर परिषदेचे जे सभासद डॉक्टर किंवा वकील असतील त्यांना उपाध्यक्ष, सेक्रेटरी म्हणून नेमू नये असे होते.

सन १९११ मध्ये नोटीफीकेशन नं. ८९९ दि. १८.९.१९११ अन्वये नगरपालिकांचा अध्यक्ष हा बीन सरकारी निवडण्याचा अधिकार देण्यात आला. त्यानुसार अमरावती नगरपालिकेचे पहिले बीन सरकारी अध्यक्ष म्हणून रावबहादूर आर.एन.मुधोळकर यांची निवड ठराव क्र. ३ दि. २.१०.१९११ अन्वये करण्यात आली. त्याच वर्षी नगरपालिका सभासदांची संख्या १८ ऐवजी २६ करण्यात यावी अशी शिफारस शासनाला करण्यात आली.

१९ व्या शतकात नगरपालिकेला रोगराई वर जास्त लक्ष द्यावे लागत असे सरकारी दवाखाने अपुरे होते. कॉलरा, प्लेग, देवी, हिवताप, असे रोग दरवर्षी मोठ्या प्रमाणात होत असत व हजारो लोकांचा मृत्यू या रोगांमुळे होत असे. १८९६ चा प्लेग फार भयंकर होता. १९०४ मध्ये पुन: तशाच मोठ्या प्रमाणात प्लेगची लागण आली. या ठिकाणी क्वारंटाईन उघडण्यात आले होते. ''बिल्ली पालो चुहे मारो'' असे गाणे म्हणणारी मुले नगरपालिकेने नेमली होती. ही मुले रोज सडकेवर फिरुन प्रचार करीत.

श्री.आनंदराव दिनकर हे खिश्चन सॅनिटरी इन्सपेक्टर होते. आपल्या कामात दक्ष आणि जबाबदार म्हणून ते जनतेत देखील लोकप्रिय होते. रोज सकाळी घोड्यावर बसून ते साफ-सफाईची पाहणी करावयास जात. ते सन १८८५ ते १९१८ पर्यंत म्युनिसिपल नोकरीत होते.

या काळांत शहरात एकूण ५ कोंडवाडे बांधण्यात आले व त्याचे उत्पन्न सालीना १३०० रुपये होते. नगरपालिकेची सराय होती. त्याचा मेन्टेनन्स खर्च सालाना ३०० रु. नगरपालिका करीत होती. व्हिक्टोरिया टेक्नीकल इन्स्टीट्यूट ही

धंदे शिक्षणाची शाळा हल्लीच्या नगरपरिषदेच्या आवारात चालू झाली होती. रावबहादूर मुधोळकरांनी धंदे शिक्षणावर जोर दिला होता. त्यांच्याच प्रयत्नांनी ही शाळा सुरु झाली. नंतर ही शाळा मोर्शी रोडवर प्रशस्त जागेत नेण्यात आली. अमरावती नगरपालिकेचे उत्पन्न १९०६ मध्ये रु. ५८७२४ व सन १९०९ मध्ये ६४,७१६ होते.

जोग चौक हा त्यावेळी नगरपालिकेचा बगीचा होता. व तेथील घंटी घड्याळ (टॉवर) हा सुमारे १८८५ च्या दरम्यान नगरपालिकेच्या खर्चाने परंतु पी.डब्ल्यु.डी.च्या देखरेखी खाली बांधण्यांत आला व त्यावर मोठी घड्याळे बसविण्यात आली. हा बगीचा व टॉवर हे शहराचे प्रमुख आकर्षण व करमणुकीचे ठिकाण होते. त्यानंतर जोग चॅरीटेबल ट्रस्टचे दवाखान्यासाठी नगरपालिकेने जोग चौकातील अंदाजे १/४ जागा दिली. याचवेळी एका ठरावा नुसार नगरपालिकेने या चौकाला जोग चौक '' हे नांव दिले. जोग चौकातील काही भाग नगरपालिकेने ब्रह्मविद्यामंदिरास दिला. तेथे थिऑसॉफिकल लॉज या संस्थेचे ब्रह्मविद्यामंदीर बांधण्यात आले. होमरुल चळवळीच्या प्रसिध्द नेत्या डॉ. ॲनीबेझंट बाई यांनी बह्मविद्यामंदीराचे उद्घाटन केले. पुढे या इमारतीत आवश्यक फेरबदल करुन आजचा जोशी हॉल तयार करण्यात आला.

या जोग चौकात एका भागात काशीबाई कन्या शाळा स्थापन करण्यात आली. बेरार एज्युकेशन नावांची शिक्षण संस्था दादासाहेब खापर्डे, रायबहादूर मुधोळकर, सर मोरोपंत जोशी यांच्या प्रयत्नांची स्थापन झाली. या संस्थे मार्फत पुढे अनेक शिक्षण संस्था जोग चौकात निघाल्या.

दे.भ. जयराम भवानराव पाटील यांच्या प्रयत्नाने काशीबाई बिल्डींग शेजारी महाराष्ट्र व्यायाम शाळा सुरु करण्यात आली. एके काळी प्रशस्त असा जोग चौक आज बहुद्या चारही बाजूने भव्य इमारतींनी घेरलेला असून ऐसपैस जागा दिवसें दिवस कमी होत आहे. सुभाषचंद बोस, जयप्रकाश नारायण, स्वा.सावरकर, संयुक्त महाराष्ट्राची सभा १९४२ सालची पु.का. देशमुखांची सभा, या ठिकाणी

गाजल्या आहेत.

नगरपालिकेचे आद्य कर्णधार :-

नगरपालिकेच्या कारभार स्थानिक नागरिकांनी जनहिता करिता चालवावयाचा असतो. ब्रिटीश अमदानीत सुरवातीचा काळ कडक इंग्रज नियंत्रणाखाली गेला. परंतु वंगभंगाच्या चळवळीनंतर देशात नवीनच वातावरण निर्माण झाले होते. कॉंग्रेस पक्षाने (होमरुल) स्वराज्याची मागणी केली होती. १९०८ मध्ये मार्ले मिंटो सुधारणा अंमलात आली. स्थानिक स्वराज्य संस्थेतून सरकारी नियंत्रण बहुतांशी ढिले करण्यात आले. मतदारांच्या कसोटीत सुधारणा होऊन मतदारांची संख्या वाढली. उमरावती नगरपालिकेला या देशातील ख्यातनाम स्वातंत्र्यप्रेमी पुढाऱ्यांच्या सेवे चा लाभ मिळालेला आहे. त्यामध्ये खालील पुढाऱ्यांची गणना प्रामुख्याने करावी लागेल.

१) दादासाहेब खापर्डे :- वकीलीचा मुख्य व्यवसाय परंतु सर्व कल मात्र जनसेवेकरिता होता. नगरपालिकेचे अनेक वर्षे पर्यत सभासद तसेच उपाध्यक्ष होते. शिक्षण, बाजार सुधारणा, स्वास्थ्य या क्षेत्रांत अत्यंत बारकाईने व जातीने लक्ष पुरवून दादासाहेबांनी या नगरीची सेवा केली. त्यांची निर्भीड वृत्ती व १८९१ नंतर टिळक भक्त म्हणून त्यांची प्रसिध्दी व कार्य सरकारला आवडले नाही.

दादासाहेब हे निर्भीड वृत्तीचे होते. मि. बुल्क या इंग्रज कलेक्टरला सेवा निवृत्तीनंतर नगरपालिके तर्फे मानपत्र देण्याचा ठराव नगरपालिकेत आला असताना दादासाहेबांनी त्याला विरोध केला होता. मि.बुल्क यांनी लो.टिळक व होमरुल चळवळी विषयी अनुदार उद्‌गार काढल्यामुळे दादासाहेबांचे त्यांचे विषयी अनुकूल मत नव्हते. १८९९ साली दुष्काळ पडला असतांना दादासाहेबांनी नगरपालिके मार्फत, स्वस्त धान्य नगरपालिके मार्फत वितरण केले. १९०६ साली दादासाहेबांचे नगरपालिकेचे सभासदत्व सरकारने रद्‌द केले. तरी देखील नगरपालिकेने दादासाहेबांच्या कार्याचा गौरव करणारा ठराव पास केला होता. कै.दादासाहेबांचा

नगरपालिकेतील पुतळा त्यांच्या सेवेची आठवण करुन देणारे चिरस्थायी प्रतिक आहे.

२) रावबहादूर मुधोळकर :- दादासाहेबांच्या खालोखाल मुधोळकरांचे नांव येते. इ.स. १८९० साली रा.मुधोळकर नगरपालिकेत सभासद निवडून आले. त्यानंतर ते उपाध्यक्ष झाले. इ.स. १९११ साली नगरपालिकेचे ते पहिले गैरसरकारी नगराध्यक्ष होत. धंदे शिक्षण, नगरस्वास्थ, यावर मुधोळकरांनी जोर दिला. इ.स. १९११ साली तात्यासाहेब मुधोळकर हे अखिल भारतीय राष्ट्रीय महासभेचे अध्यक्ष झाले. हा बहुमान आजपर्यंत इतर कोणालाही (उमरावती कराला) मिळाला नाही. दादासाहेब खापर्डे आणि मुधोळकर यांच्या प्रयत्नांनी उमरावती येथे अखिल भारतीय कॉंग्रेसचे अधिवेशन भरले होते.

३) प्रल्हाद नारायण जोग :- दादासाहेब खापर्डे यांचे प्रमुख सहकारी राष्ट्रीय चळवळीचे प्रमुख कार्यकर्ते व नगरपालिकेचे सभासद होते. शिक्षणावर त्यांनी विशेष जोर दिला. प्लेग व कॉलराची साथ असतांना जोगांनी धडाडीचे कार्य केले. या बद्दल दादासाहेब खापर्डे यांनी आपल्या रोजनिशीत त्यांचा अनेकदा उल्लेख केला आहे. १८९३ साली ते नगरपालिकेचे उपाध्यक्ष होते. त्यांनी करुन ठेवलेल्या ट्रस्टव्दारे जोग दवाखाना स्थापन झाला आहे. त्यांचाच सन्मानार्थ नगरपरिषदेने जोग चौक हे नांव दिले.

४) सर मोरोपंत जोशी :- सरकारी सेवेत असून देखील सर मोरोपंत जोशी यांनी नगरपलिकेकडे विशेष लक्ष पुरविले होते. मुलींच्या शिक्षणावर त्यांनी सर्वप्रथम जोर दिला व त्यावर स्वत:च खर्च देखील केला. राष्ट्रीय चळवळीपासून ते अलिप्त राहिले. परंतु सामाजिक चळवळीत मात्र त्यांनी धडाडीने पुढाकार घेतला. नगर पालिकेला त्यांचे मार्गदर्शन लाभलेले होते. नगरपालिकेचे उपाध्यक्ष म्हणून त्यांची कामगिरी विसरता येणार नाही.

५) संभाजी विनायक गोखले :- राष्ट्रीय संग्रामात धडाडीने उडी घेणारे

नानासाहेब गोखले हे १९०६ साली नगरपालिकेचे सभासद म्हणून निवडून आले. १९०९ साली त्यांचे सभासदत्व सरकारने रद्द केले होते. त्यानंतर ते राष्ट्रीय चळवळीचे सक्रीय कार्यकर्ते झाले. १९२१ साली त्यांची नगरपालिकेच्या अध्यक्षपदी निवड झाली.

६) वीर वामनराव जोशी :- ''दादा'' या नांवाने उमरावतीकरांना विरस्मरणीय झालेले स्वातंत्र्य चळवळीचे अग्रणी वीर वामनराव जोशी हे उमरावतीचे भूषण होते. साहित्यिक व नाटककार म्हणून त्यांची कीर्ती संपूर्ण महाराष्ट्रात होती. इ.स. १९४४ ते १९५३ पर्यत ते नगरपालिकेचे लोकनियुक्त अध्यक्ष होते. कारावासात असतानाहि लोकांनी त्यांना १९४४ साली बहुमताने निवडून दिले होते. त्यांच्या सेवेचे प्रतिक म्हणून वीर वामनराव जोशी मार्केट बांधण्यात आले व नगरपालिकेने तेथे दादांचा पुतळा बसविला.

७) अण्णासाहेब कलोती :- लोकमान्यांचे कट्टर अनुवायी होते. त्यांनी साधी राहणी व खादी व्रताची प्रतिज्ञा घेतली होती. १९२० ते १९४२ पर्यत कॉग्रेसचे सभासद होते. १९३२ साली त्यांनी गढवाल दिनाच्या मिरवणुकीचे नेतृत्व केले. या करीता एका वर्षाची सश्रम कारावासाची शिक्षा आणि ४००० रु. दंड अशी शिक्षा त्यांना झाली होती. ते १९२५ ते १९२८ व १९३५ ते १९३८ या काळात नगर पालिकेचे अध्यक्ष होते.

१९२९ च्या लाहोर कॉग्रेसने संपूर्ण स्वातंत्र्य प्राप्तीचा ठराव करुन राष्ट्रीय चळवळीला वेगळीच कलाटणी दिली होती. १९३० च्या कराची कॉग्रेसने असहकार आंदोलनाचे रणशिंग फुंक्ले व त्यानंतर देशभर असहकार आंदोलन सुरु झाले. राष्ट्रीय कार्यकर्त्याचे सर्व लक्ष चळवळीकडे होते. कार्यकर्त्यानी नगरपालिकेकडे दुर्लक्ष केले आणि बहुधा त्या काळांत राष्ट्रीय कार्यकर्त्याना नगरपालिकेत प्रवेश मिळू नये या करीता सरकार देखील खबरदारी घेत असे. १९३० ते ४० या काळांत राष्ट्रीय चळवळीपासून अलिप्त असे कार्यकर्ते नगरपरिषदेत आले. अशामध्ये अण्णासाहेब कलोती शे. मीनामल रावसाहेब टांक, या नावांचा उल्लेख करावा लागेल. सरकार

दरबारी वजन कायम राखून सरकारची नाराजी टळून या नगरसेवकांनी नगरपालिका चालविली.

१९४०-४४ या दरम्यान नगरपालिका बरखास्त करुन त्या ठिकाणी ऑफीसर इन-चार्ज बसविण्यांत आला होता. १९४२ चा ''चलेजाव'' लढा चालू असतांना स्वाभाविकपणे नगरपालिका राष्ट्रीय कार्यकर्त्यापासून अलिप्त राहावी या करिता ही खबरदारी घेतली होती.

सन १९४४ साली नगरपरिषदेच्या निवडणूका झाल्या प्रत्यक्ष मतदानाने अध्यक्ष निवडण्याची या कायद्यात तरतूद होती. त्यानुसार वीर वामनराव जोशी हे तुरुंगात असतांना देखील जनतेने त्यांना अध्यक्ष म्हणून बहुमताने निवडून दिले. वीर वामनराव जोशी सतत ११ वर्षेपर्यत नगरपालिकेचे अध्यक्ष होते. स्वातंत्र्योत्तर काळात जनविकासाच्या योजना आखल्या गेल्या आणि त्यानुसार नगरपालिका कारभार देखील जनताभिमुख होत गेला. उत्पन्नाची साधने वाढविण्याच्या दृष्टीने ऑक्ट्रॉय कर बसविण्यात शासनाने परवानगी दिली. प्राथमिक शिक्षण आवश्यक केल्यामुळे शाळांची संख्या वाढली. शाळा व शिक्षकांवर होणाऱ्या खर्चाची तूट कमी करण्याच्या दृष्टीने शासनाने शिक्षण खर्चावर अनुदान मंजूर केले. उमरावती शहराचा पाण्याचा तुटवडा दूर करण्याकरिता शासनाच्या मदतीने रेवसा योजना मंजूर झाली. वडाळी, छत्री तलाव हे जुने तलाव खोल करुन तेथून होणारा पाणीपुरवठा वाढविण्यात आला. हल्ली जलप्रदानाचा मोठा प्रकल्प आसेगांव योजना पूर्ण झाली असून जल शुध्दीकरणाचे उपकरण (मालटेकडीजवळ) बसविले आहे. ही नगर परिषदेची फार मोठी उपलब्धी मानावी लागेल.

१९५३ साली निवडणुकीत श्री.उमरलाल केडिया हे नगराध्यक्ष म्हणून निवडून आले. पुढे १९६२ पासून अध्यक्षांची प्रत्यक्ष निवडणूक बंद होऊन अप्रत्यक्षपणे निवड होऊ लागली. हाजी अबूलहसन ६२-६४ श्री.केडिया ६४-६७ आणि १९६७ पासून डॉ.ओकाररावजी वाठोडकर हे नगराध्यक्ष होते.

आपल्या गौरवशाली कारकीर्दीने लोकप्रिय ठरलेले अमरावती नगरपालिकेचे भूतपूर्व अध्यक्ष



रावबहादुर रंगराव मुधोळकर
पहिले देशी अध्यक्ष - १९११ ते १३



श्री. वाय. जी. देशपांडे
१९१९



श्री. देवराव रंभाजी देशमुख
१९२४



श्री. अण्णासाहेब कलोती
१९२५ ते २८ व १९३५ ते ३८

आपल्या गौरवशाली कारकीर्दीने लोकप्रिय ठरलेले अमरावती नगरपालिकेचे भूतपूर्व अध्यक्ष



श्री. दादासाहेब केतकर
१९२८ ते ३०



श्री. मीनामल अग्रवाल
१९३१



श्री. छक्कीलालजी खरैया
१९३८-३९



वीर वामनराव जोशी
१९४५-५३

आपल्या गौरवशाली कारकीर्दीने
लोकप्रिय ठरलेले
अमरावती नगरपालिकेचे भूतपूर्व अध्यक्ष



श्री. उमरलाल केडिया
१९५३-५९ व १९६३-६७



श्री. हाजी अबुल हसन
१९५९-६२



श्री. घासीराम गुप्ता
१९६२-६३



श्री. ओंकारराव वाठोडकर
१९६७-७४

आपल्या गौरवशाली कारकीर्दीने
लोकप्रिय ठरलेले
अमरावती नगरपालिकेचे भूतपूर्व अध्यक्ष



श्री. हरिभाऊ कलोती

नगरपालिकेचे शेवटचे अध्यक्ष - १९७४ ते ८०

स्वातंत्र्योत्तर काळात शहराची वाढ फार झपाट्याने होत असून आज अमरावती शहराची लोकसंख्या ८ लक्ष १६ हजाराचे आसपास आहे. शहराला लागून असलेल्या प्रमुख खेड्यांचा अंतर्भाग नगरपालिकेच्या कक्षेत झालेला आहे. तसेच बडनेरा नगरपालिका तेथील कापडगिरणी बंद पडल्यापासून उत्पन्नाच्या अभावी कार्यक्षम राहिलेली नाही. या सर्वांचा अंतर्भाव करुन अमरावती शहराला महानगरपालिका दर्जा द्यावा ही सूचना शासनाच्या विचाराधीन होती तसेच झाल्यामुळे महाराष्ट्रातील प्रथम नगरपालिका म्हणून उमरावती नगर पालिकेचा मान असून कार्यक्षमतेच्या दृष्टीने देखील नगरपालिका आपले विशेष स्थान राखत आहे. बडकस वेतनश्रेणी अंमलात आणणारी ही सर्वप्रथम नगरपालिका होय. हिन्दी, गुजराती, उर्दू या अल्प संख्येच्या शाळेत प्रशिक्षित शिक्षकांची संख्या फारच कमी होती. परंतु नगरपरिषदेने बहुतांश शिक्षकांना विद्यावेतन देऊन प्रशिक्षणाला जावयास भाग पाडले आणि अशा रीतीने शिक्षणाचा दर्जा सुधारण्यात मदत केली. प्राथमिक ४ थ्या कक्षेची सामान्य परिक्षा योजना ही देखील या नगरीतील एक स्तुत्य उपक्रम आहे. उमरावती शहर हे शिक्षणाचे आगर म्हणून प्रसिध्दच आहे. शिक्षणाचा दर्जा वाढविण्या करिता येथील शिक्षण संस्था देखील प्रयत्नशील आहेत. अमरावती नगरपालिकेचा यांत फार मोठा वाटा आहे.

शिक्षण, आरोग्य, दिवाबत्ती, बाजार या सर्व बाबींचा उल्लेख वेगवेगळ्या लेखांत केला आहे. उमरावती न. पालिकेला स्थापन होवून १२८ वर्ष पूर्ण झाली आहेत. (इ.१९९७)

सुरुवातीची परिस्थिती

उमरावती टाऊन म्युनिसिपल कमेटी :-

इ.स. १८६९ च्या ६ डिसेंबरचे, हैद्राबाद रेसिडेन्सी ऑर्डर नोटिफिकेशन नं. १०८ अन्वये अमरावती येथे उमरावती टाऊन म्युनिसिपल कमेटीची स्थापना करण्यात आली.

त्यावेळी वऱ्हाडात कोणताही म्यु. कायदा नव्हता म्हणुन हैद्राबाद रेसिडेन्सीने इ.स. १८६४ चा १५ वा कायदा (पंजाब म्यु. ॲक्ट) आवश्यक त्या फेरफारासह या वऱ्हाड प्रातांला लागु करुन त्या कायद्या खाली उमरावती, अचलपूर व आकोला येथे टाऊन म्यु. कमेट्या स्थापन केल्या.

त्या कायद्याने उमरावतीला टाऊन म्यु. कमेटी स्थापन झाली. त्या कायद्यांतील तरतुदीनुसार उमरावती टाऊन म्यु. कमेटीचा पहिला पदसिध्द अध्यक्ष हा जिल्ह्याचा डेप्युटी कमिश्नर झाला. व त्याने कायद्यातील तरतुदी नुसारच शहरातील प्रमुख व प्रतिष्ठित अशा नागरिकांना या नगरपालिकेचे सदस्य नेमले. तसेच काही सरकारी अधिकारी देखील सदस्य म्हणून नियुक्त केलेत. याप्रमाणे अमरावती टाऊन म्यु. कमेटीची पहिली कार्यकारणी अस्तित्वात येऊन, उमरावतीला नगर पालिका सुरु झाली (१८७० इसवी)

या सर्व नियुक्त सभासदांतून निवडणूक होऊन दोन उपाध्यक्ष एक वर्षासाठी व एक ऑनररी सेक्रेटरी निवडण्यात आला.

इ.स. १८७० च्या म्यु. प्रोसिडींग बुकाप्रमाणे :-

१.	मेजर जे.टी. बूशबॉय	अध्यक्ष
२.	कॅप्टन ए. फ्यूरर	उपाध्यक्ष
३.	मि. डोंगल	सदस्य
४.	मि. नागोराव जयकृष्ण	सदस्य
५.	मि. अब्दुल बारी	सदस्य
६.	मि. ताराचंद	सदस्य
७.	मि. सुरतराम	सदस्य
८.	मि. नाना चिमोटे	सदस्य
९.	मि. मन्नूलाल	सदस्य

१०.	मि. रामधन	सदस्य
११.	मि. बेंथले	सदस्य
१२.	मि. आर. डब्ल्यू वुडहाऊस	सदस्य
१३.	मि. ब्रॅट	सदस्य
१४.	मि. हॉवर्ड	सदस्य

ही उमरावती टाऊन म्यु. कमेटीची पहिली कार्यकारिणी होय.

यातूनच पांच सभासदांची एक कार्यकारीणीही निवडली जात असे. वरील पध्दतीने जिल्ह्याचा डेप्युटी कमिश्नर हा म्यु. चा पदसिध्द अध्यक्ष व त्याने नियुक्त केलेले लोक हे म्यु. सदस्य राहात व ही पध्दत इ.सन. १८८८ पावेतो चालू होती.

दरम्यान लॉर्ड रिपन, हा उदार मतवादी पक्षाचा प्रवक्ता हिंदुस्थानचा गव्हर्नर जनरल व व्हाईसरॉय म्हणून नियुक्त झाला होता. व त्यानेच स्थानिक स्वराज्य संस्थेसाठी निवडणुकीच्या तत्वांचा व्यापक प्रसार केला आणि स्वराज्याच्या प्रगतीचा पुढील टप्पा गाठून विधिमंडळात देखिल या तत्वाचा अवलंब करण्यास उपयुक्त अशी पार्श्वभूमि तयार केली.

लॉर्ड रिपनच्या संकल्पानुसार दि. १ एप्रील १८८२ पासून नगरपालिकेची पोलीस व्यवस्थेचे खर्चातून सुटका करण्यात आली. (त्यापूर्वी नगरपालिका पोलीस खर्चासाठी कर लावीत असत.) त्याप्रमाणे नगरपालिकांतून गैरसरकारी सभासदांचे बहुमत असावे. निवडणुकीची पध्दत शक्य तेथे अंमलात आणावी व ती यशस्वी करण्याचे दृष्टीने सरकारी अधिकाऱ्यांनी भरपूर प्रयत्न करावेत. संस्थेचे नियंत्रण आंतून करण्याऐवजी बाहेरुन करावे. नगरपालिकेचे अध्यक्षपद तर गैरसरकारी अध्यक्ष निवडला जावा. याप्रमाणे कायद्यांत तरतूद करावी असे धोरण लॉर्ड रिपन यांनी आखून दिले होते. याच काळांत स्थानिक स्वराज्याची चळवळ वऱ्हाडप्रांतातून सुरु झाली होती. त्यासाठी आकोला व

उमरावती येथे सभा भरुन म्युनिसिपालीटीत लोकनियुक्त सदस्य निवडण्याचे आणि तिचा कारभार चालविण्याचा हक्क गांवकऱ्यास देण्यात यावा, अशा मागणीचे अर्ज गव्हर्नर जनरल व रेसिडेन्ट हैद्राबाद यांचेकडे करण्यांत आले होते.

लॉर्ड रिपन यांच्या हुकूमाचा आणि वऱ्हाड प्रांतातून जे अर्ज (वर प्रमाणे) केलेत त्याचा परिणाम होऊन ऑगस्ट १८८३ साली म्यु. कायद्या संबंधी विचार करण्याकरीता असिस्टंट रेसिडेंट, हैद्राबाद यांनी वऱ्हाडातील तीन मुख्य इंग्रज अधिकारी आणि दोन नागरिकांना हैद्राबादला बोलावून व चर्चा आणि विचार विनिमय होऊन, लोकनियुक्त सदस्य निवडण्याचे व तशा तरतुदी असलेल्या म्यु. कायद्याचा एक मसुदाही त्याच वेळी तयार करण्यात आला पण हा कायदा मंजुर होऊन वऱ्हाडप्रांताला लागू होण्यासाठी १८८७ साल उजाडावे लागले. १८८७ साली "वऱ्हाड म्यु. ॲक्ट १८८६ अस्तित्वात येऊन त्यातील तरतूदी नुसार दि. १ एप्रील १८८९ रोजी उमरावती टाऊन म्यु. कमेटीची पहिली निवडणूक घेण्यांत आली.

या निवडणुकीसाठी दि. १४ जानेवारी १८८८ रोजी ठराव नं. २ प्रमाणे शहराचे विभाजन एकूण तीन भागात (वार्डात) करण्यात आले होते. ते असे --

ईस्ट वार्ड :- नगर पालिका कार्यालय, कॉटन मार्केट व भुसारी गेटचे बाहेरचा भाग.

नॉर्थ वार्ड (त्यावेळेचे) :- भाजीबाजार, बोहरीपुरा, ऑनररी मॅजिस्ट्रेटचे कोर्ट

साऊथ वार्ड :- टाऊन पोलीस स्टेशन, बॅक ऑफीस, बुधवारा.

त्याचप्रमाणे दि. ५ मार्च १८८९ रोजी ठराव नं. २ प्रमाणे नगरपालिकेच्या निवडणूकी पुढील ठिकाणी दि. १ एप्रील १८८९ रोजी सकाळी १० ते दुपारी ४ वाजेपर्यत घेण्यात याव्यात. असे ठरविले होते.

१. म्युनिसिपल ऑफीस - (त्यावेळी म्यु. ऑफीस वकील लार्डनमध्ये होते.)

२. हायस्कूल - (वलगांव रोडवरील सरकारी हायस्कुलची इमारत).

३. बिसनचंदजी हवेली - (म्यु.प्रा.मराठी मुलांची शाळा नं. १)

---

१. वऱ्हाड शाळा पत्रक : नोव्हे १८८२ (पान ११९)

२. वऱ्हाड शाळा पत्रक : ऑगस्ट १८८३ (पा.५४)

या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज स्वीकारण्यासाठी मि. ईलियट असि. कमिश्नर, अमरावती यांची नियुक्ती करण्यात आली होती.

त्यावेळी मतदानाचे हक्क असलेल्या मतदारांची विभागावर संख्या येणे प्रमाणे होती.

ईस्ट वार्ड : ४६४ नॉर्थ वार्ड : ४६०, साऊथ वार्ड : ९८२.

दिनांक १ एप्रिल १८८९ रोजी मतदान झाले. प्रत्येक वार्डातून सहा सदस्य निवडून यायचे होते. त्याप्रमाणे या पहिल्याच प्रत्यक्ष मतदानाने निवडून आलेल्या सदस्यांची नांवे अशी --

१. नॉर्थ वार्ड :- १. श्री.बाळकृष्ण बळवंत सुळे
२. श्री.मोरो विश्वनाथ जोशी वकील.
३. श्री.केवलचंद गंभीरचंद
४. श्री.अंताजी गोविंद केसकर
५. श्री.रघुनाथ बाळकृष्ण तळवलकर
६. श्री.श्रीकिसनदास गुलाबचंद राठी

२. साऊथ वार्ड :- १. श्री.विष्णू हरि जोशी
२. श्री.एकनाथ लक्ष्मण ओक वकील.

		३.	श्री.कोंडो बालाजी
		४.	श्री.बाळकृष्ण जयराम पेंडके
		५.	श्री.रंगनाथ एन. मुधोळकर, वकील.
		६.	श्री.प्रल्हाद एन. जोग वकील.
३.	ईस्ट वार्ड :-	१.	श्री.बळवंत व्यंकोजी खोत
		२.	श्री.यशवंत गोविंद केसकर, संपादक
		३.	श्री.डॉ.रामचंद्र एन. मुधोळकर
		४.	श्री.जनार्दन नारायण
		५.	श्री.नारायण गोविंद केसकर

या निवडणूकीची मतमोजणी दि. ६ एप्रील १८८९ रोजी झाली होती. याच वेळी, निवडून आलेल्या सदस्यांच्या नांवाने नंतर गट पाडून, पुढील वर्षी कोणते सदस्य निवृत्त होतील. हे ठरविण्यांत आले होते. त्याप्रमाणे ---

नॉर्थ वार्ड	:-	श्री.आर.बी.तळवलकर
		श्री.किसनदास राठी
साऊथ वार्ड	:-	श्री.विष्णू हरि जोशी
		श्री.प्रल्हाद एन. जोग
ईस्ट वॉर्ड	:-	श्री.बी.व्ही. खोत
		श्री.डेसा.

याप्रमाणे उमरावती टाऊन म्युनिसिपल कमेटीची पहिली निवडणूक प्रत्यक्ष लोकांच्या मतदानाने झाली. त्यानंतर दरवर्षी दोन सदस्य निवृत्त होत असत व त्या जागा प्रत्यक्ष मतदानाने (निवडणूक घेऊन) भरल्या जात असत. असा क्रम सुरु झाला.

निवडून आलेल्या लोकांतूनच एका वर्षासाठी दोन उपाध्यक्ष व एक

मानव सचिव निवडल्या जात असे. जिल्ह्याचा डेप्युटी कमिश्नर हा मात्र पदसिध्द अध्यक्ष राहत असे.

मतदानाची पात्रता :- वय २१ किंवा त्याहून जास्त आणि तो उमरावतीचा रहिवाशी असावा व म्यु. कर किंवा शेतसारा भरणारा असावा.

पुढील वर्षी म्हणजे सन १८९० साली खाली म्यु. सदस्य निवृत्त झालेत.

नॉर्थ वार्ड :- १. श्री.आर. बी. तळवलकर
२. श्री.श्रीकिसनदास राठी.
३. श्री.पांडूरंग सखाराम

साऊथ वार्ड :- १. श्री.गोपाळ रामचंद्र नागपूरकर
२. श्री.गोपाळ गोविंद मांडकीकर

ईस्ट वार्ड :- १. श्री.बळवंतराव खोत
२. श्री.सी. कृपास्वामी

साऊथ वार्डाचे प्रतिनिधी श्री.एकनाथ लक्ष्मण ओक यांच्या मृत्युमुळे एक जागा रिकामी झाली होती. त्यासाठी दि. २७.११.१८९० रोजी मतदान होऊन श्रीकिसनदास गुलाबचंद हे बहूमताने निवडून आले होते.

सन १८९१ मध्ये निवृत्त सदस्यांच्या जागा भरण्यासाठी मतदान होऊन त्यांत खालील उमेदवार बहुमताने निवडून आले होते.

नॉर्थ वार्ड :- १. श्री.वा.ना.जोग
२. श्री.व्ही.आर. काळे

साऊथ वार्ड :- १. श्री.बाळकृष्ण पेंडके
२. श्री.कोंडो बालाजी

ईस्ट वार्ड :- १. श्री.जी.एस.खापर्डे
२. श्री.रा.ब. तळवलकर

टीप :- श्री.जी.एस. खापर्डे (दादासाहेब खापर्डे) यांनी उमेदवारी अर्ज भरला होता. पण नंतर तो मागे घेत असल्याबद्दल दुसरा अर्ज सादर केला होता. पण दरम्यान मतदान पार पडले व ते निवडून आले होते. म्हणून अर्ज मागे घेण्यात त्यांना परवानगी दिली होती. (२८ मार्च १८९१)

सन १८९२ साली रिटायर्ड झालेल्या म्यु. सदस्यांच्या जागा भरण्यासाठी २१ फेब्रुवारी १८९२ रोजी मतमोजणी होऊन पुढील उमेदवार निवडून आले होते.

ईस्ट वार्ड :- १. श्री.अंताजी गोविंद केसकर
२. श्री.यशवंत गोविंद केसकर

नार्थ वार्ड :- १. श्री.विश्वनाथ रंगनाथ जोशी
२. श्री.यशवंत गोविंद केसकर

साऊथ वार्ड :- १. श्री.महादेव गंगाधर दामले
२. श्री.सदाशिव नारायण.

कॅज्युअल व्हेकन्सी भरण्यासाठी --

१. पांडुरंग सखाराम अग्निहोत्री

२. बळवंत रामचंद्र लांडगे

टीप :- यशवंत गोविंद केसकर हे दोन वार्डातून निवडून आले होते. त्यांनी नॉर्थ वार्डचा राजीनामा दिला. त्या जागी श्री.पद्मनाथ रेवाजी दामले हे निवडून आले होते.

(१. म्यु. प्रोसिडींग बुक आणि इतर संबंधित कागदपत्रावरुन)



शहीद स्मारक स्तंभ



शहीद स्मारक ज्योती

शहीदांचे स्मरण




हुतात्मा स्मारक, अमरावती
तालुका अमरावती, जिल्हा अमरावती
हुतात्म्यांचे नाव
जन्म
मृत्यु
गांव
तालुका
१. हुतात्मा लक्ष्मणराव सिताराम पाचघरे १९१० १९३० यावली अमरावती
२. हुतात्मा कृष्णाबाई किसन उंगारी १९०३ १९४२ गणेशपूर मोर्शी
यांनी भारताच्या स्वातंत्र्याकरिता प्राणाहुती देऊन हौतात्म्य पत्करले.
त्यांच्या आणि अज्ञात हुतात्म्यांच्याही स्मृतीस शतशः प्रणाम.

विदर्भातील
शहीद क्रांतीकारक

शहीदांचे स्मरण



शहीद **महादेव जागोजी वाघमारे**



शहीद **भाऊगीर गोस्वामी**
(चांदूर रेल्वे)



शहीद **पांडुरंग यशवंत दिंडेकर**
(नानोरी)



शहीद **ज्ञानेश्वर देशपांडे**
(अमरावती)

विदर्भातील
शहीद क्रांतीकारक

शहीदांचे स्मरण



शहीद वीर वामनराव जोशी



शहीद तुळशीराम सूर्यभान तडस
(यावली)



शहीद यशवंतरावजी तात्याजी गुल्हाने
(वरूड)



शहीद विनायक दौलतराव यावले

विदर्भातील
शहीद क्रांतीकारक

शहीदांचे स्मरण



शहीद भगवतराव जोशी,
(अमरावती)



शहीद केशवराव ताथोडे,
(बेलोरा)



शहीद शेषराव नथ्थुजी मुधोळकर,
(बेनोडा)



शहीद वामनराव बळीरामजी वानखेडे (पाटील),
(उत्तमगांव)

अमरावती महानगरपालिका

उद्घाटन दि. १५.८.१९८३

अमरावती नगरपालिकेचे रुपांतर महानगर पालिकेत झाले अमरावती महानगरपालिका अस्तित्वात आली. तो दिवस म्हणजे दि.१५.८.१९८३.

या प्रसंगी ना. यशवंतराव शेरेकर, श्रीमती प्रतिभा पाटील, ना. सुरेद्र भुयार, ना. गणेशराव दुधगावकर, हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. त्यावेळी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री ना. वसंतदादा पाटील होते. ते कार्यक्रमाला उपस्थित नव्हते. परंतु उपमुख्यमंत्री ना. रामराव आदिक उपस्थित होते. श्री.एस. हबीबउल्लाह हे अमरावती विभागीय आयुक्त होते. त्याचप्रमाणे ते नगर प्रशासन विभागाचे प्रादेशिक संचालक होते. श्री.मधुकरराव लव्हाळे हे अमरावती जिल्हाधिकारी होते. श्री.धनवंतराव काळमेघ हे अमरावती नगरपालिकेचे मुख्याधिकारी होते. व श्री.विश्वासराव देशमुख नगर परिषद प्रशासक होते. हा कार्यक्रम सांय. ६.३० वा.नेहरु मैदान येथे पार पडला.

ह्या प्रसंगी कुटूंबनियोजन विभाग, जकात विभाग, बांधकाम विभाग, प्रकाश विभाग, कर वसुली विभाग, जलप्रदाय विभाग, शिक्षण विभाग, नियोजन व विकास विभाग या विभागांनी आतापर्यत केलेली कामगिरी व भविष्यकालीन योजना यांचा अहवाल श्री.धनवंतराव काळमेघ यांनी वाचला. या कार्यक्रमप्रसंगी श्री.रामराव आदिक यांच्या हस्ते महानगरपालिके अंतर्गत आरोग्य वर्धिनी योजनेचे उद्घाटन झाले. उद्यान विभागाने आतापर्यत २९ उद्याने निर्माण केल्याचे सांगण्यात आले.

ह्यानंतर प्रभागांच्या निवडणुका होऊन निवडून आलेल्या नगर सेवकांमधून महापौर व उपमाहापौर स्थायी समितीचे सभापती निवडून येतात. तदनुसार प्रथम श्री.देवीसिंह शेखावत हे महापौर बनले. नंतर श्री गोविंदाजी अग्रवाल , सुधाकर सव्वालाखे महापौर बनले. १९९४ च्या निवडणुकीत अंबापेठ

प्रभागातून निवडून आलेल्या सौ.विद्याताई देशपांडे ह्या अमरावतीच्या पहिल्या महिला महापौर म्हणून निवडून आल्या. त्यांनी जी वैशिष्ट्ये प्रस्थापित केली, ती म्हणजे भारतीय जनता पक्षाची संपूर्ण भारतातील पहिली महापौर. ब्राम्हण कुटुंबीय असूनही अमरावतीची जनता किरकोळ जातिभेदाला थारा देत नाही, हे त्या नियुक्तीने सिध्द झाले नंतर पाठोपाठ दुसऱ्यांदा भाजपची एक महिला महापौर बनली. तिचे नांव सौ.किरणताई महल्ले. भाजपने तिसरा महापौर दिला तो म्हणजे श्री.प्रवीण काशीकर. विद्याताई देशपांडे यांच्या कारकीर्दीत अमरावतीच्या आधुनिकीकरणाला सुरुवात झाली. खापर्डे चौक (राजकमल चौक) चे सौंदर्यीकरण ह्या योजनेखाली खापर्डे चौक ते रेल्वे पूल पर्यत रस्ता दुतर्फा रुंद करुन त्यावर सिमेंट कॉक्रीट टाकण्यात आले आहे. जागजागी नलिका कूप सुरु करण्यात आल्या आहेत. संपूर्ण शहरभर रस्त्याच्या बाजूने नाल्या खोदण्याचे कार्य सुरु झाले आहे. व नुकतेच भारत सरकारने अमरावतीच्या विकासाकरिता साडे सात कोटी रुपये अनुदान दिले आहे. त्याप्रित्यर्थ अभिनंदनपर लेख प्रकाशित झाले होते.

अमरावती शहराची मानसिकता :-

हे एक अमरावती शहराच्या इतिहासावर आधारित ठोकळ मानाने केलेले विश्लेषण आहे. हा मानसशास्त्रीय प्रबंध नाही.

विदर्भ वासीयासंबंधी एका प्राचीन कवीने म्हटले आहे की, हे लोक शांत, प्रामाणिक, साध्या राहणीचे कष्टाळू व गरीब आहेंत. महाकवी राजशेखर यांनी विदर्भाला सरस्वतीची देणगी लाभलेला प्रदेश म्हटले आहे. ''विदर्भ विषय: सारस्वती जन्मभू:'' कवि भूषण ब.ग. (अण्णासाहेब) खापर्डे यांनी विदर्भगीत'' मध्ये विदर्भाची अस्मिता कशात आहे हे लिहितांना म्हटले आहे.

दावी सदाचि ओजा। नितसज्ज राष्ट्र काजा।
देशात सर्व राजा। तो हा विदर्भ माझा ''
जनवृत्ति तैशि भूमी। सरला क्रजूचित सारी।
जनवृत्ति गोड भारी। अति प्रेमशालि थोर।

औदार्य मुक्त सरला। साधा स्वभाव फार।
माधुर्य हे असे की। पाहूनि चित्ती वाटे।
काळीज हेचि आहे। ह्या दिव्य भारताचे ॥

श्री.पु.भा. भावे यांनी विदर्भात अनेकवार दौरे केले. त्यांचे विदर्भाच्या लोकासंबंधीचे मनोगत त्यांच्याच शब्दात (तरुण भारत (नागपूर) दि. ७.८.१९९४).

ही माणसे सुखवस्तू होती. पण सुखवस्तू असली तरी सुखासीन नव्हती. त्यांच्या रक्तातच त्याग, पराक्रम, देशप्रेम व धर्मप्रेम ह्यांचा आवेश होता. ह्या क्रांतीशूर आवेशाचे प्रत्यंतर नागपूरच्या टिळक भक्तांनी सूरतच्या कॉंग्रेस अधिवेशनाच्या वेळी आणून दिले. मध्यमवर्गाच्या बोलघेवड्या कचखाऊपणाचा लवलेशही त्यांच्या ठिकाणी नव्हता. जिद्द आणि निष्ठा हे नागपूर वऱ्हाडच्या माणसात आढळणारे दोन अनमोल गूण आहेत. एखाद्याला आपला म्हटल्यावर नागपूर वऱ्हाडची माणसे त्याला कधीही अंतर द्यायची नाहीत. वऱ्हाडच्या माणसांचा स्नेह व त्यांची निष्ठा ही फार जातिवंत व जिवंत भावना आहे. ती तुमच्या सुख-दु:खाशी एकरुप होऊन जाते. तिला स्वार्थ व वेगळेपणा ठाऊक नाही . . . . . तोंडाने अर्वाच्य बोलणारी ही माणसे मनाने फार निर्मळ असतात. ओठात एक व पोटात एक हा त्यांचा स्वभाव नव्हे. जिभेची नसली तरी हाडाची ही माणसे फार सरळ . . . . नागपूर वऱ्हाडची माणसे सरळ आणि फटकळ आहेत. तो फटकळ आहे म्हणूनच सरळ आहे . . . . . हा माणूस एकांतात न्यायाधिश असतो. आणि परक्या समोर मित्र अथवा साह्यकर्ता असतो. . . आज नाटक कांदबऱ्यातून लिहिल्या तरी लोकांना खोट्या वाटतील अशा त्यांच्या अलोट त्यागाच्या व प्रेमाच्या कहाण्या आहेत . . . एकंदरीत नाग विदर्भाच्या माणसात भावनेचा सच्चेपणा अधिक आहे. नागपूरच्या श्रीमंत बाबूराव देशमुखांचा किंवा श्रीमंत दादासाहेब खापर्ड्याचा पैसा हा समाजाला खुपत नव्हता. कारण साऱ्यांना वाटे की हा पैसा आपलाच आहे. हा पैसा परोपकारी आहे. नम्र आहे. कुणा अडल्या पडल्या जीवाच्या केव्हाही कामी येणारा हा पैसा आहे.

.... आम्ही आजकाल पक्ष जाती निरपेक्ष शुध्द मानवतेच्या गोष्टी फारच बोलतो. पण ह्यांची अस्सल उदार व मानवतेची उदाहरणे मात्र मी नागपूर वऱ्हाडकडे पाहिली. तेथे मी कडव्या राजकीय विरोधकांना सारा विरोध विसरुन एकमेकांवर प्रेम करतांना पाहिले. मन उंचावणारे अनेक प्रसंग मी तेथे पाहिले. तेथे मी मनाचा मोठेपणा व प्रेमळपणा पाहिला, माणसांना ध्येयावर आणि पराक्रमावर लुब्ध होताना पाहिले, निर्व्याज निरपेक्ष मैत्री पाहिली, शब्द कठोर पण मन कोमल, प्रचंड प्रहार आणि अपरंपार क्षमा , ओबडधोबड बाह्यांग पण निर्मळ स्वच्छ अंतरंग, असे कितीतरी विरोधाभास मी वऱ्हाड नागपूरात पाहिले ..... ह्या परंपरेत असे कितीतरी सद्‌गुण आहेत ही जे राष्ट्रीय सद्‌गुण म्हणुन आज निकडीने जोपासण्यासारखे आहेत.''

बॅ.रामराव देशमुख एकदा आपल्या भाषणात म्हणाले, ''वऱ्हाडचा माणूस साध्या राहणीचा अन् साध्या वृत्तीचा आहे. अगदी इथल्या काळ्याभोर पण कसदार मातीसारखा.''

कै.मधुकर केचे यांनी लिहिले आहे, ''येथे गगनचुंबी इमारती नाहीत, पण गगनाने चुंबन घ्यावे, अशी माणसं इथे झालीत .... पुढे कॉर्पोरेशन येणार आहेत म्हणतात. पण तरीही या गावाला धांदल, गडबड आणि अगडबंबपणा येईल से वाटत नाही. कारण शांतता, विव्दत्ता, खेळाडूपणा आणि कलाकारी याचे वरदान या गावाला लाभले आहे.''

ही वैदर्भीय जनतेची ठेवण अमरावतीच्या जनतेहून वेगळी नाही. आणि अमरावतीच्या जनतेची ठेवण वैदर्भीय स्वभावाहून वेगळी नाही. वर वर परस्पर भिन्न वाटणाऱ्या गोष्टी मधील मुलभूत आत्मिक ऐक्य वैदर्भीयांच्या चटकन ध्यानात येते. त्यामुळे व्यावहारिक पातळीवरील आचारात वरवर भिन्नता दिसत असली तरी आत्मिक आणि मानसिक पातळीवर सारेजण आतून एकोप्याने कार्य करताना दिसतात. गांधीजीच्या हत्येमुळे देशभर विशेषत: महाराष्ट्रात दंगली उसळल्या. देशात हिंदू महासभा जोर पकडू लागली होती. ती हिंदू महासभा पक्षच नव्हे, तर

हिंदूत्वाचा विचार एकदम मागे पडला. परिणामी हिंदूच्या अस्मितेवर मर गळ आली. अमरावतीत ह्या दंगलीची अत्यंत अल्प अशी झलक दिसून आली. खापर्डे वाड्यावर हमेशा भगवाध्वज फडकत असे. त्यामुळे लोकांना हिंदूत्वाबद्दल अभिमान वाटत असे. पण त्या दिवशी जनमानस प्रक्षुब्ध झाले. शेकडो लोक जळाऊ तेल सोबत घेऊन खापर्डे वाड्या भोवती जमले होते. एक ध्वज काढून टाकण्यासाठी अख्खा खापर्डे वाडा आतील माणसांसह जाळून खाक करण्यासाठी अहमहमिका लागली होती. पण बाबासाहेबांचे अनेक निष्ठावंत अनुयायी धावून आले. त्यांनी सर्व जमाव आपल्या अंगावर घेतला. त्यात एक चांदूरकर नावाची शूर वीर महिला होती. हातात भाला घेऊन रणरागिणी प्रमाणे उभी होती. समोर येईल त्याला ठार करीन अशी गर्जना करीत होती. तेवढ्यात पोलीस आले. गोळीबाराच्या भीतीने व धाकाने लोक पांगले, ''फक्त भगवा ध्वज काढा, आम्ही निघुन जातो,'' असे म्हणाले. लोकाग्रहास्तव ध्वज उतरविण्यात आला. असा अपवाद वगळता अमरावती शांत राहिली.

पंतप्रधान इंदिरा गांधीच्या हत्येमुळे देशभर दंगली उसळलल्या लोकांनी शिखांची कत्तल केली. अमरावतीत शिख समुदाय फारच अल्प संख्येत आहे. पण येथे शिखांना कोणताहि त्रास झाला नाही.

पंतप्रधान राजीव गांधीची तामीळनाडूत हत्या झाली. देशभर दंगली उसळल्या. तामिळी लोकांना देशभर छळण्यात आले. पण अमरावतीत तामिळी लोकांना मुळीच छळण्यात आले नाही. डॉ.आंबेडकरांनी रिडल्स ऑफ हिंदुइसम पुस्तक लिहिले. त्यात हिंदू देवदेवतांची विटंबना करण्यात आली ह्या भावनेने अमरावतीत त्या पुस्तकाविरुध्द आंदोलन सुरु झाले. पाहता पाहता महाराष्ट्रात आंदोलन पसरले. परंतु अमरावतीत कोठेही दंगली उसळल्या नाहीत. उलट सॅटर्निक व्हर्सेस काव्य, व लज्जा कादंबरी प्रकाशित झाले तेव्हा एका विशिष्ट समाजाने देशभर दंगली माजवल्या. अनेक निरपराधी लोकांचे बळी घेण्यात आले

अमरावती मूळचीच शांत व सहिष्णू वृत्तीची, डॉ.आंबेडकरांच्या पुस्तकातील मजकुराला विरोध म्हणून माजी मंत्री सुरेंद्र भुयार यांनी सर्वधर्म समभाव पदयात्रा काढली. सेवादल चालविणारे नानासाहेब बामणगावकर रा.स्व.संघाचे जिल्हा संघचालक होते. फॉरवर्ड ब्लॉक वाले पद्मश्री दाजीसाहेब पटवर्धन हिंदु महासाभा किंवा संघाच्या उत्सवांना येऊन बसत. दादासाहेब खापर्डे यंग मोहोमेडन्स असो. चे आजीव अध्यक्ष अब्दुल कादरखां थि.ऑ. सोसायटीचे सदस्य, रा.सु. (व दादासाहेब) गवई च्या वाढदिवशी प्रचंड सत्कार झाला. सभेत विश्वहिंदू परिषदेच्या वतीने सुंदर हार घालण्यात आला. प.पू. गोळवलकर गुरुजींच्या वर्धापनदिनी अमरावतीत भव्य सत्कार झाला, तेव्हा अमरावती नगरपालिकेची (न.पा. कॉंग्रेसच्या ताब्यात होती.) सर्व यंत्रणा सभेची तयारी करण्यासाठी राबत होती. म्हणण्याचा आशय असा की, हे सारे भेद वरवरचे, आतून अमरावतीची माणसे एक अशी ही लोभसवाणी अमरावती. अशा ह्या लोभस अमरावतीचा हा इतिहास शहराचा नव्हे, माणसांचा इतिहास, अमरावतीतील माणसांचा इतिहास म्हणजेच अमरावतीतील संस्थांचा इतिहास म्हणजेच अमरावती शहराचा इतिहास, अमरावतीच्या मानसिकतेचा इतिहास.

७) इ.स. १९३३ ते १९४७ पर्यंतच्या घटनांची टिपणे

अमरावतीचा इतिहास - खंड - ३रा

:अनुक्रमणिका :

क्रमांक घटनांची नांवे

१) शुध्दिवीर पं. हिरालालजी यांनी केलेले शुध्दीकरण.

२) वऱ्हाड सर्वपक्षीय समिती.

३) शेठ बिसनलाल यांचा मृत्यू.

४) गांधी दिन

५) संस्कृत मंडळाचा वार्षिकोत्सव

६) श्री जाधव यांची कीर्तने.

७) स्पृश्य व हिंदू हरिजन एकत्र सम्मेलन

८) स्त्रियांचे हळदीकुंकू.

९) दे.भ.रुईकरांना पाठिंबा

१०) ह.व्या.प्र.वाषिकोत्सव

११) गुरु वायूर दिन.

१२) जाहीर सभा.

१३) ब्रह्मविद्या मंदिरात भाषण.

१४) सुटका.

१५) समर्थ नाटक मंडळाचा गौरव

१६) गांधी दिन.

१७) अल्प खर्चात विवाह.

१८) मीरत खटला व निकाल.

१९) स्वातंत्र्य दिनोत्सव

२०) काँग्रेस दलाचे सर्वाधिकारी.

२१) नामदेवबुवा पुण्यतिथी.

२२) राष्ट्रीय सप्ताह.

२३) कॅम्प नगर पालिका.

२४) गणेश वाचनालय.

२५) नवीन कर आकारणी प्रीत्यर्थ निषेध सभा.

२६) बसवेश्वर जयंती

२७) मसळाराध्य जयंति

२८) हरिजन दिन.

२९) भगवानदीन यांची सुटका

३०) गांधी दिन.

३१) जाहीर प्रार्थना सभा.

३२) स्वातंत्र्यदिन.

३३) गांधीजींचे अभिनंदन

३४) कायदेभंग चळवळ तहकूब.

३५) गांधी सप्ताह.

३६) भाई रुईकरांचा सत्कार.

३७) असनारे वाचनालय.

३८) संघटनेतील मतभेद मिटले.

३९) सेनापती बापटांसाठी प्रार्थना सभा.

४०) महात्माजींचे उपोषण सुटले.

४१) शारीरिक शिक्षण वर्ग.

४२) ना.चौबळ मंत्री झाले.

४३) तेरवी कार्यक्रमाविरोधी चळवळ.

४४) गांधीजींसाठी प्रार्थना व मिरवणूक.

४५) नानासाहेब गवई यांचा सत्कार.

४६) गिरणी कामगार सहाय्यक मंडळ.

४७) गणेशोत्सव.

४८) अतिवृष्टि.

४९) लोकनायक दिन.

५०) मुस्लिम कवी सम्मेलन.

५१) कापसाबद्दल शेतकऱ्यांची चिंता.

५२) डॉ.बेझंट यांच्या निधनाबद्दल दुखवटा.

५३) सुबोध सत्यनारायण कथा.

५४) चीनला जाणारे प्रवासी.

५५) महात्मा गांधीचे चरण अमरावतीत.अभूतपूर्व स्वागत.

विविध कार्यक्रम.

शिवनाथ बाबुंचे अन्नदान.

बालकांना गांधीजींचा उपदेश

स्त्रियांना सभेत गांधीजी.

ह.व्या.प्र.मंडळात गांधीजी.

गांधीजींची विराट सभा.

५६) अ गांधीजींना मानपत्र.

५७) हरिजन सेवक संघ

५८) गंगाधर राव देशपांडे यांची बैठक.

५९) लोकनायक दिन.

६०) हरिजन सेवा संघ.

६१) डॉ.आंबेडकर जयंती समाह.

६२) श्री कागलकरांचा सत्कार.

६३) डॉ.पंजाबरावांचा राजीनामा.

६४) वीर वामनराव दादांचा राजीनामा.

६५) काँग्रेस विधायक पक्ष.

६६) हुतात्मा श्रध्दानंद दिन.

६७) प्रा.हर्षे यांचे भाषण.

६८) वऱ्हाड दलित परिषद.

६९) हुतात्मा श्रध्दानंद पुण्यतिथी.

७०) भारतीय रंगभूमी व्याख्यानमाला.

७१) पं.कानडे शास्त्री यांचे व्याख्यान.

७२) श्री.बा.वि.मराठे यांचे सुयश.

७३) रँग्लर परांजपे यांचा सत्कार.

७४) देशभक्त डॉ.शिवाजीराव पटवर्धन यांचा सत्कार.

७५) लोकनायकांचे अभिनंदन.

७६) कमलादेवी चट्टोपाध्याय यांचे अभिनंदन.

७७) ना.बाबासाहेब खापर्डे मंत्री झाले.

७८) ना.नायडू अमरावतीत.

७९) महात्माजींवरील हल्ल्याचा निषेध.

८०) विदर्भ महिला परिषदेचा अहवाल.

अमरावतीची दैनंदिनी

इसवी सन १९३३

१) ''शुध्दिवीर पंडित हिरालालजी यांनी चिकाटीने श्रम करुन पुन्हा एक हजार ख्रिश्चन झालेल्यांना शुध्द करुन हिंदू धर्मात घेतले आहे. बत्तीस वर्षापर्यंत ज्यांनी ख्रिश्चन धर्मात आपले आयुष्य काढले असेही लोक ह्या शुध्दीकृतात आहेत. प्रोटेस्टंट, कॅथॉलिक,मुसलमान वगैरे पुष्कळ प्रकारचे आबालवृध्द हया शुध्दीकृतात आहेत. पन्नास शंभर असे दर खेड्यातून लोक शुध्द करुन घेण्यात आल्यामुळे ,खेड्या मागून खेडे नि:ख्रिश्चन झाले व ख्रिश्चन मिशन-यांच्या शाळा लयाला गेल्या. पांच हजार शुध्दीची योजना पूर्ण होईतो अमरावती जिल्ह्यात हे कार्य असेच जोमाने चालू राहील'' असे त्यांनी म्हटले व आर्थिक मदतीचे आवाहन करण्यात आले.(जाने.३३)

२) <u>वऱ्हाड सर्व पक्षीय कमिटी</u> : दि.१ जानेवारी १९३३ रोजी दुपारी २ वा. वऱ्हाड सर्व पक्षीय कमिटीची बैठक आमदार दादासाहेब खापर्डे यांच्या अमरावती येथील वाडयातील दिवाणखाण्यात माजी गृहमंत्री श्री तात्यासाहेब तांबे ह्यांच्या अध्यक्षतेखाली भरली.

या बैठकीला रा.ब.ब्रम्ह, श्री शंकरराव जोग, वकील एम.एल.ए. वीर वामनराव जोशी, श्री.सं.वि.गोखले,बॅरि.रामराव देशमुख रावसाहेब उत्तमराव इटकीकर, श्री.राजूरकर,अकोल्याचे श्री.आठल्ये, वकील, बुलढाण्याचे श्री.कानिटकर इत्यादी प्रमुख सभासद होते. (लोकनायक अणे हे कलकत्त्यात परिषदेचे कामानिमित्त गेल्यामुळे ते हजर नव्हते.)

भारतमंत्री सर सॅम्युअल होअर यांच्या वऱ्हाड विषयीच्या भाषणावर या बैठकीत चर्चा होऊन खालील आशयाचे ठराव मंजूर झाले होते.

१) हैद्राबाद प्रतिनिधींतर्फे खान्याचे वेळी, भारतमंत्री सर सॅम्युअल होअर यांनी, वऱ्हाड विषयी काढलेले उद्‌गार ही कमेटी गैरसमजूतकारक मानते.२) वऱ्हाडातील प्रजेच्या हितसंबंधाचे संरक्षण व ह्या बाबतीत ब्रिटीशांनी वेळोवेळी दिलेला भरवसा ह्या दृष्टीने वऱ्हाड संबंधी सर्वबाबतीत, वऱ्हाडी जनतेचा विचार घेतला जावा, असा त्या जनतेला हक्क आहे. ३) म्हणून, हिंदुस्थानात लौकरच वऱ्हाड संबंधी सुरु होणार असलेली वाटाघाट, वऱ्हाडाचे म्हणणे समजून घेतल्या शिवाय व वऱ्हाडी जनतेची संमती मिळविल्या शिवाय, पुढे चालविल्यास किंवा संपविण्यात न यावी. ४)वऱ्हाडची राज्य व्यवस्था गेल्या ८० वर्षापासून ब्रिटीश हिंदुस्थानातील व कोणत्याही प्रांतांप्रमाणेच ज्या अर्थी चालत आहे त्या अर्थी, हिंदुस्थानच्या भावी संयुक्त राज्य व्यवस्थेत वऱ्हाडाला प्रवेश मिळण्याचे बाबतीत व त्या व्यवस्थेत वऱ्हाड स्वतंत्र घटक राहण्याचे बाबतीत, कारभाराच्या सर्व प्रकारच्या बाबतीत वऱ्हाडावरील शर्ती ब्रिटीश हिंदुस्थानातील कोणत्याही प्रांतापेक्षा उघड वा अनुघड अशा कोणत्याही प्रकारे भिन्न नसाव्यात. ५)हे ठराव गव्हर्नर जनरल-इन-कौंसिलकडे पाठविण्याचे अधिकार कमिटीचे चिटणीसांस देण्यात येत आहेत.

वऱ्हाड सर्व पक्षीय कमिटी संबंधी तिची स्थापना व कार्य याची संक्षिप्त माहिती वेगळी दिली आहे.

३) शेठ बिसनदयाल यांचे निधन :- अमरावतीचे सुप्रसिध्द सावकार सराफ व व्यापारी श्रीमान शेठ बिसनदयालजी भिवापूरकर हे दि. ३ जानेवरी रोजी, वयाच्या छप्पनाव्या वर्षी दम्याचे विकाराने स्वर्गवासी झाले.

अमरावती फार जुन्या घराण्यापैकी हे घराणे असून आपल्या परंपरागत दातृत्वाने व धर्मनिष्ठेने लौकीकवान गणल्या जाते. घराण्याचा हा पूर्वापार लौकीक सांभाळून शेठ बिसनदयालजी काळास अनुसरुन वागत असत. अमरावती शहरात राष्ट्रीय वृत्ती बंगालच्या फाळणी पासून विशेष प्रमाणात जागृत झाली होती. त्यावेळी राष्ट्रीय चळवळीचे चहाते व पहिले व्यापारी देशभक्त म्हणून जर कोणाला म्हणता येईल तर ते शेठ बिसनदयालजी यांनाच म्हणता येईल. कारण वीर वामनराव जोशी यांचे वरील इ.स.१९०८ मधील कलम १०८ चे खटल्यात त्यांना जामीन मिळणे कठीण होते तेंव्हा, शेठ बिसनदयालजी हे जामीन घेण्यास पुढे सरसावले.

दे.भ.बामणगांवकरांनी आपल्या ''हिंदू'' पत्राकरिता छापखाना काढला होता, तेंव्हा त्यांना आरंभी भांडवलाची मदत करणारे शेठ बिसनदयालजी हे होते. त्यांच्या ह्या देशाभिमाना बद्दल क्लिवलँडशाहीत त्यांना बराच त्रास झाला होता. परंतु ''मी माझ्या रीतसर देशाभिमाना पासून ढळणार नाही'' असा सरळ जवाब त्यांनी क्लिवलँड साहेबांना दिला होता. श्री. दादासाहेब खापर्डे यांचेवर त्यांची विशेष भक्ती होती व ती त्यांनी अखेर पर्यन्त श्रध्दापूर्वक कायम ठेवली.

शेठ बिसनदयालजीचे निधनामुळे अमरावती शहर एका उदार, धर्मनिष्ठ व देशाभिमानी नागरिकास मुकले.

४) गांधी दिन : दि. ४ जानेवारी रोजी, जिल्हा कॉ.कमेटीतर्फे सायंकाळी गांधी चौकात दे.भ.वीर वामनाराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली गांधी-दिना'' निमित्त जाहीर सभा आयोजित करण्यात आली.

या सभेत दे.भ.बामणगावकर आणि श्री मथुरादासजी यांची भाषणे व अध्यक्षांचे भाषण झाले.

५) संस्कृत मंडळाचा वार्षिकोत्सव :- दि. ७ व ८ जानेवारी रोजी. उमरावतीच्या किंग एडवर्ड कॉलेज मधील संस्कृत मंडळाचा व्दितीय वार्षिकोत्सव श्री महादेवशास्त्री मुलमुले यांच्या अध्यक्षतेखाली थाटाने साजरा झाला होता.

या समारंभाला शहरातील प्रतिष्ठित व संस्कृत भाषा प्रेमी नागरिकही हजर होते.

संस्कृतमध्ये अन्त्याक्षरींचा सामना, वादविवाद वगैरे मनोरंजक कार्यक्रमही यशस्वीपणे पार पडले.

६) कीर्तन :- दि. ८,९ व ११ जानेवारी रोजी सायंकाळी ''ब्रम्हविद्यामंदिरात श्रीमंत बाळासाहेब पंतप्रतिनिधी, संस्थान औध यांच्या कीर्तन संस्थेत शिक्षण घेतलेले कर्तनकार श्री रघुनाथ गोविंद जाधव यांची सुश्राव्य किर्तने झाली होती.

७) स्पृश्य हिंदु व हरिजन संमेलन :दि. १४ जानेवारी संक्रातीचे दिवशी सायंकाळी ब्रम्हविद्या मंदिरात, अमरावती जिल्हा हरिजन सेवक संघातर्फे ''स्पृश्य हिंदु व हरिजन संमेलन'' आयोजित करण्यात आले होते. संमेलनाला सुमारे सात-आठशे मंडळी व प्रमुख नागरिक हजर होते.

संमेलनात हरिजन बंधूनी तीळगूळ वाटला व उच्च वर्गीयांनी तो प्रेमाने ग्रहण केला. त्यानंतर समयोचित भाषणे झाली होती.

'' अशा तऱ्हेची संमेलने जिल्हयातील प्रत्येकी गावी भरविण्यात यावीत, आणि अशा प्रकारे सर्व हिंदू समाज एक आहे. त्यांत भेदभाव उरला नाही असे संमेलनात समाज घोषीत करावे. महात्मा गांधीचे इच्छेप्रमाणे हरिजन व स्पृश्य असे दोन्ही समाज मिळून एक अभेद्य हिंदू समाज निर्माण झाला आहे. असे जाहीरपणे प्रकट करुन हरिजनांचा विरोध घालविण्याची व हिंदूतील ऐक्य प्रस्थापित करण्याची संधी कार्यकर्त्यानी गमावू नये'' अशा आशयाचे पत्रक जिल्हा हरिजन सेवा संघाचे श्री वि.द.ब्रम्ह , दि.गो.अनगळ, डॉ.वऱ्हाडेपांडे, सौ.प्रभावतीबाई ब्रम्ह व सौ.ताराबाई रणदिवे यांनी दि.१० जानेवारी रोजी काढले.

८) स्त्रियांचे हळदीकुंकू : दि. १५ जानेवारी रोजी ब्रम्हविद्या मंदिरात संक्रांती निमित्त "हरिजन सेवा संघ महिला समाज" चे विद्यमाने हरिजन स्त्रिया व स्पृश्य स्त्रिया यांचा एकत्र हळदीकुंकवाचा समारंभ साजरा झाला होता. सुमारे २०० हरिजन स्त्रिया व सुमारे सात-आठशे स्पृश्य स्त्रिया मिळून हजार भगिनींनी या समारंभात भाग घेतला.

तीळगुळ व हळदीकुंकु झाल्यानंतर सौ.ताराबाई रणदिवे ,सौ.घाटे, सौ.लक्ष्मीबाई नाईक, सौ.सावित्रीबाई भट यांची समयोचित भाषणे झाली.

सौ.मनुताई खापर्डे, शांताबाई गोखले , व सौ.जोशी यांनी हा समारंभ घडवून आणण्यासाठी परिश्रम घेतले होते.

९) दे.भ.रुईकरांना पाठिंबा :- दि.२० जानेवारी रोजी गणेशनाटक गृहात नामदार श्री शंकरराव जोग यांच्या अध्यक्षतेखाली नागरिकांची जाहीर सभा भरुन तीत श्री पु.य.देशपांडे, डॉ.भोजराज, श्री बामणगांवकर आणि सौ.पार्वतीबाई पटवर्धन यांची दे.भ.रुईकर (नागपूर) यांना पाठिंबा देणारी भाषणे झाली होती. या सभेत "दे.भ.रुईकरांचे बाबतीत सरकारने समेट मंडळ नेमावे" अशी मागणी करण्यात आली होती.

१०) वार्षिकोत्सव :- श्री हनुमान व्या.प्र.मंडळाचा १८ वा वार्षिकोत्सव दि.२१ जानेवारी रोजी शनिवारी सायंकाळी मंडळाचे पटांगणावर जबलपूरचे रायसाहेब प्रभातचंद्र बोस सी आय ई (माजी दिवाण) यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहाने साजरा झाला.

सन्माननीय पाहुणे डॉ.कोकर्डेकरांसह समारंभाचे जागी ठीक साडेपाच वाजता आलेत तेव्हा स्काउटतर्फे त्यांना "गार्ड ऑफ ऑनर" व नगर संरक्षक दलाच्या प्लॅटून तर्फे लष्करी सलामी देण्यात आली होती. समारंभाला अनेक सरकारी अधिकारी,प्रो.केसरी, शहरातील प्रतिष्ठित नागरिक व प्रेक्षक मिळवून सुमारे चार-पाच हजारांचा जनसमुदाय उपस्थित होता.

अध्यक्षांच्या भाषणानंतर आणखी खेळ होऊन हा समारंभ संपला यावेळी मंडळाचे अध्यक्ष डॉ.शिवाजीराव पटवर्धन हे तुरुंगात असल्यामुळे त्यांची अनुपस्थिती सर्वांनाच खटकली होती.

११) गुरुवायूर दिन :- दि.८ जानेवारी रोजी सायंकाळी जोग चौकात गुरुवायूर दिना निमित्त दे.भा.वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेत डॉ.सुब्रायन श्री.फुले व श्री रंगा अय्यर यांच्या मंदिर प्रवेश विषयक बिलास व्हाईसरॉयनी संमती द्यावयास अनमान व उशीर करु नये" अशा आशयाचे एका ठरावावर डॉ.वऱ्हाडपांडे, श्री.कुऱ्हाडे, व डॉ.सबनीस इत्यादींची भाषणे व शेवटी अध्यक्षीय भाषण होऊन हा ठराव मंजूर करण्यात आला.

१२) जाहीर सभा :-अखिल भारतीय काँग्रेसचे सर्वाधिकारी बाबू राजेन्द्रप्रसाद यांना दि.७ जानेवारी रोजी पाटणा येथे अटक झाली होती. त्या निमित्त दि.९ जानेवारी रोजी सायंकाळी, जिल्हा काँग्रेस कमेटीतर्फे गांधी चौकात वीर वामनराव जोशी हयांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा होऊन बाबू राजेन्द्रप्रसाद यांचे अभिनंदन करण्यात आले.

१३) जाहीर व्याख्यान :-दि.१० जानेवारी रोजी वेदान्त व्याख्यानमाले तर्फे सायंकाळी ५ वा. ब्रम्हविद्या मंदिरात श्री चिपळूणकर बी.ए.एल.एल.बी. सबजज्ज यांचे जाहीर व्याख्यान झाले होते. विषय वेदान्ताचा होता.

१४) सुटका :- दि.२१ जानेवारी रोजी संपलेल्या आठवड्यात अमरावती तुरुंगातून , आकोटचे दे.भ.जगन्नाथ शास्त्री, वाशिमचे दे.भ.शुक्ल शास्त्री, खामगावचे दे.भ.नानाजी कुलकर्णी व अमरावतीचे दे.भ.फडके या राजबंद्यांची मुक्तता झाली होती. दि.२६ जानेवारी रोजी या राजबंद्यांपैकी दे.भ.जगन्नाथ शास्त्री, दे.भ.शुक्ल शास्त्री व दे.भ.फडके यांचे अमरावती येथे जाहीर सभा भरुन अभिनंदन करण्यात आले होते.

१५) समर्थ नाटक मंडळींचा गौरव :- श्रेष्ठ व गुणी नटांचा संग्रह असलेल्या या समर्थ

नाटक मंडळींचा येथील चाहत्यांनी गौरव करण्याचे ठरवून, दि.४ फेब्रुवारी रोजी रात्री, ''खडाष्टक'' नाटकाचे वेळी, शुध्द स्वदेशी कापडाचा रंगीत पडदा, रा.ब.खरे यांच्या हस्ते मंडळीला नजर केला होता.नाटक मंडळी तर्फेही रा.ब.खरे, वीर वामनराव दादा वगैरे हितचिंतकांना पुष्पहार अर्पण करुन आभार मानले होते.

१६) गांधी दिन :- अमरावती जिल्हा काँ.कमेटी तर्फे दि.४ फेब्रुवारी रोजी सायंकाळी गांधी चौकात दे.भ.वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली गांधी दिनाची जाहीर सभा भरुन ,तीत दे.भ.बामणगावकर यांचे व्याख्यान झाले होते.

१७) अल्प खर्चात विवाह :- दि.२२ जानेवारी रोजी अमरावती येथे दिधीचे मालगुजार श्री दत्तोपंत होनाडे यांच्या कन्येचा विवाह उदखेडचे श्री गुलाबराव डहाके यांचेशी झाला होता. या विवाहात वधू-वरांनी खादीचे पोशाख घातले होते. मुला-मुलींनी मंगलाष्टके म्हटली व शपथविधी झाला. वधू-वरांनी एकमेकांना हार घातले व टाळयांचे आणि बॅण्डचे गजरात लग्न लागले. या लग्नाचे वैशिष्ट्य म्हणजे केवळ दोनशे रुपयात लग्न सोहळा पार पाडला होता.

१८) मीरत खटल्याचे निकालाचा निषेध :-दि.२४ जानेवारी रोजी गणेश थिएटरात दे.भ.वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरुन ''मीरत कटाचे खटल्यातील आरोपींना जबरदस्त शिक्षा ठोठावून कामगारांच्या संघटनांवर घाला घातल्याबद्दल ''सरकारचा तीव्र निषेध व मिरत खटल्यातील आरोपींनी केलेल्या स्वार्थत्यागाबद्दल त्यांचे अभिनंदन करणारा ठराव मंजूर करण्यात आला.

मीरत कटाचा खटला :- खटल्यातील आरोपी :- केदारनाथ सहगल, सौजनसिंग गोशी, ब्यु इविन्सन,शोकत उस्मानी, बेंजामिन ब्रेडले, अयोध्याप्रसाद फिलीप स्पूद,डॉ.अधिकारी,राधारमण मिश्र,गोप्रेन्द्र चकवर्ती, किशोरीलाल घोष, लक्ष्मणराव कदम,धुंडीराज गडी, गौरीशंकर शिवनाथ बॅनर्जी,के.नी.जोगळेकर, पी.सी.जोशी,मुजफ्फर अहमद, मोतीराम देसाई, धरणी गोस्वामी, आर.एम.निंबकर, एस.एस.मिरजकर, एस.ए.डांगे, एम.व्ही.धाटे, गोपाल

बसक,मीर अबदूल मजीद, शादखा ढोरमसजी डबवाला, रामलाल हद्दा,अर्जून आळवे, गोविंद कासले, विश्वनाथ मुखर्जी चौधरी धरमवीर सिंग, अमरी हैदरखान खालाशी.

१. खटला एकूण ४ वर्षे ४ महिने २८ दिवस चालला होता.

२. भारतातील ब्रिटीश राजसत्ता उलटून पाडण्याचा कट केल्याचा आरोप १२१-अ कलमांखाली मिरत कोर्टात चालला होता.

१९) स्वातंत्र्य दिनोत्सव :-अमरावती जिल्हा काँ.कमेटी तर्फे दि.२६ जानेवारी रोजी सायंकाळी गांधी चौकात दे.भ.वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली स्वातंत्र्य दिनाची जाहीर सभा भरुन तीत अमरावती जिल्हा काँग्रेसचे सर्वाधिकारी दे.भ.रामेश्वरजी अवस्थी यांनी ''लाहोर काँग्रेसने मान्य केलेला हिंदवी स्वराज्याचा जाहीरनामा'' वाचून दाखविला होता. नंतर विविध वक्त्यांची समयोजित अशी भाषणे व अध्यक्षांचे भाषण होवून स्वातंत्र्य-दिन साजरा करण्यात आला होता. या दिवशी कित्येक व्यापाऱ्यांनी आणि नागरिकांनी विरांगणे लावून ''स्वातंत्र्य-दीपावली'' साजरी केली होती.

'' पहा व बोला'' दि.२८ जानेवारी रोजी म्यु.मराठी शाळा नं.६ मध्ये नगराध्यक्ष सेठ मिनामलजी यांच्या अध्यक्षतेखाली ''पहा व बोला'' वर्गाचा अनावरण समारंभ झाला होता. समारंभाला बरीच प्रतिष्ठित मंडळी हजर होती.

२०) नवे सर्वाधिकारी - अमरावती जिल्हा काँग्रेसचे सर्वाधिकारी देश भ. रामेश्वरजी अवस्थी यांना अटक झाल्यामुळे त्यांच्या जागी जिल्हा काँग्रेसचे दहावे सर्वाधिकारी म्हणून दे.भ.बाबाराव साऊरकर यांची नेमणूक एप्रील १९३३ मध्ये करण्यात आली होती.

२१) कै.नामदेवबुवांची पुण्यतिथी : अमरावतीत पहिल्या गायन शाळेचे संस्थापक आणि विख्यात गायक कै.नामदेवबुवा जोशी यांची पुण्यतिथी त्यांच्या शिष्यवृंदांनी दि. ६ एप्रिल रोजी अनेक कार्यक्रमात साजरी केली होती. प्रतिमापूजन ब्राम्हण-

भोजन गायन व पानसुपारी असा कार्यक्रम होता. प्रा.नत्थुबुवा, प्रो.वामनबुवा, प्रो.व्यंकटराव देशमुख, श्री बळीराम बुवा बिटे इत्यादी नामदेव बुवांचे शिष्यांनी व श्रीमती सोनुबाई आणि श्रीमती गुलाबबाई यांच्या शिष्यणींनी या कार्यक्रमात मदत केली होती.

२२) राष्ट्रीय सप्ताह :- खादी विक्री दि.६ ते १३ एप्रिल हा राष्ट्रीय सप्ताह अमरावतीत पाळण्यात आला होता व त्या निमित्त काँग्रेस कार्यकर्त्यांसह सौ.पार्वतीबाई पटवर्धन यांनी शहरात खादी विक्रीची मोहिम सुरु केली होती. दि.२१ एप्रिल रोजी ब्रम्हविद्या मंदिरात नामदार दादासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली श्री मराठे यांचे विद्वत्ताप्रचुर असे व्याख्यान झाले होते त्यांनी संस्थेच्या कार्याची माहिती आपल्या व्याख्यानातून दिली होती त्यानंतर ना.शंकरराव जोग एम.एस.ए.यांचे व शेवटी दादासाहेबांचे भाषण झाले.

२३) कॅम्प नगरपालिका :- दि.१० एप्रिल १९३३ रोजी कॅम्प नगरपालिकेची सभा रा.ब.खरे यांच्या अध्यक्षतेखाली होवून बॅरी.ई.एम.जोशी हे अध्यक्ष व बॅरि.बागवे आणि मि.हाजी हे दोन उपाध्यक्ष बिनविरोध निवडून आले होते. अध्यक्षपदी अप्रत्यक्ष निवडणूक या प्रांताला लागू झाल्यापासून कॅम्प नगरपालिकेच्या अध्यक्षपदाच्या जेवढ्या निवडणूका झाल्या त्यात प्रथमच हीच एक अविरोध निवडणूक झाली होती.

२४) गणेश वाचनालय :- अमरावती शहरातील बुधवार पेठेत टिळक चौकासारख्या मध्यवर्ती ठिकाणी गणेश वाचनालय इ.स.१९२० चे पूर्वी पासूनच सुरु होते. बुटीचे इमारतीत दुसऱ्या मजल्यावर वाचनालय म्यु.अनुदान आणि लोकाश्रय यावर चालविले जात असे. परंतु १९३० नंतर या वाचनालयाची म्यु.ग्रँट बंद केली गेली असल्यामुळे वाचनालयाची परिस्थिती अत्यंत खालावली होती. १९३३ साली या वाचनालयाला म्यु.ग्रँट मिळावी अश्या आशयाने अर्जावर नगरपालिकेत चर्चा झाली तेव्हा एका सदस्याने या वाचनालयाजवळ कुंभार वाड्यात एक नवीन वाचनालय सुरु झाले असून सवतासुभा निर्माण झाला आहे अशा आशयाचा युक्तिवाद केला

होता. हे गणेश वाचनालय अनेक राष्ट्रीय चळवळींचे केन्द्र होते होमरुलचे कार्यालय येथे होते. पण पुढे हे वाचनालय बंद पडले आणि नंतर कित्येक वर्षांनी हे वाचनालय श्री निळकंठ व्यायाम शाळेने चालविण्यासाठी घेवून निळकंठेश्वर मंदिराजवळ नेण्यात आले. आता १९७३ पासून निळकंठ मंडळाचे पटांगणावर असलेल्या इमारतीत दुसऱ्या मजल्यावर बरे चालू आहे.

२५) निषेध सभा :- सोडा वॉटरच्या दुकानंवर नगरपालिकेने कर बसविल्याचे निषेधार्थ दि.२२ एप्रिल रोजी जोग चौकात दे.भ.पी.वाय.देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा झाली. या कराबद्दल नगरपालिकेचा निषेध करण्यात आला होता.

२६) श्री बसवेश्वर जयंती :- दि.२७ एप्रिल रोजी रात्री येथील बसवेश्वर चौकात श्री.संगाप्पा मुवलंबे यांच्या अध्यक्षतेखाली श्री बसवेश्वर जयंती साजरी करण्यात आली होती. या प्रसंगी श्री.विश्वनाथ आप्पा आवळे, श्री.कापुसकरी, श्री. करवीरआप्पा हेगू,श्री.वि.सु.चौधरी, श्री.गुलाबराव बक्षी व श्री.नानासाहेब बामणगांवकर ह्यांची बसव चरित्रांवर भाषणे झाली.

२७) मरुळाराध्य जयंती :- वीरशैव धर्माचे एक आचार्य श्री मरुळराध्य यांची जयंती दि.२९ एप्रिल रोजी लातिन मठात दे.भ.बामणगावकर यांच्या अध्यक्षतेखाली साजरी करण्यात आली. याप्रसंगी सर्वश्री कापूसकरी,हेगू व श्री चौधरी यांची भाषणे झाली.

२८) अमरावतीचा द्वितीय हरिजन दिन :- अमरावती जिल्हा हरीजन सेवा संघातर्फे महात्मा गांधीचे आदेशानुसार अमरावती येथे दि.३० एप्रिल रोजी द्वितीय हरिजन दिन पाळण्यात आला. त्या निमित्त प्रात:काळी मांगपूरा (माताखिडकी) व मसानगंज येथील भंगी मोहल्ला येथे दे.भ.गुलाबराव बक्षी,डॉ.वऱ्हाडपांडे व श्रीमती गीताबाई टप्पे,पाटीपूरा व डोहोर पूऱ्यात दे.भ.कुऱ्हाडे व दे.भ. प्यारेलालजी सेवक आणि डॉ.पडोळे श्री.शेषरावजी ठाकरे, श्री.महल्ले वकील, श्रीमती द्वारकाबाई भावे व सौ.सुंदराबाई वर्मा इत्यादी कार्यकर्ते हमालपूरा विभागात गेले व त्या ठिकाणी

हरिजनांची घरे झाडणे त्यांच्या मुलांना न्हाऊ घालणे वगैरे कामे करण्यात आली.संध्याकाळी दे.भ.पं.प्यारेलालजी सेवक यांच्या अध्यक्षतेखाली जोग चौकात सभा भरुन डॉ.वऱ्हाडपांडे व दे.भ.गुलाबराव बक्षी ह्यांची भाषणे झाली. व खालील आशयाचा ठराव मंजूर करण्यात आला.

मंदिर प्रवेश कायद्यास पूर्ण संमती द्यावी. शहर व कॅम्प नगरपालिकांनी हरिजनांच्या मोहोल्यातील पाणी पुरवठा, शौचकूप, दिवाबत्ती, इत्यादी कामासंबधी अडचणी दूर कराव्या, संपन्न व गरजवंत हिंदूनी इत:पर खाजगी घरगुती कामाकरिता उष्टे व टाकावू अन्न वाढू नये म्हणून विनंती.

त्यानंतर त्याच दिवशी रात्री दुसरी सभा हमालपुऱ्यात श्री गोविंदराव महल्ले वकील यांच्या अध्यक्षतेखाली झाली व श्री. कुऱ्हाडे , डॉ.पडोळे, श्री.परशराम , श्री.भटकर, श्री.केशवराव ठाकरे इ. ची भाषणे होणून मंदिर प्रवेश कायद्यास संमती देणारा व श्री.ओगले ह्यांना ऑनररी मॅजिस्ट्रेट नेमल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करणारा ठराव मंजूर करण्यात आला. त्याचप्रमाणे त्याच दिवशी सकाळी जिल्हा कॉ.कमेटी तर्फे भाजी बाजारात ध्वज वंदनाचा कार्यक्रम पार पडला.

तत्पूर्वी दि.२६ एप्रिल रोजी शहरात सदर सार्वजनिक हळदीकुंकू चा समारंभ झाला होता व त्यात स्पृश्या,स्पृश्य व उच्चनीच हा भेदभाव बाजूला ठेवून सुमारे ५०० हिंदू स्त्रियांनी आनंदाने भाग घेतला होता.

२९) सुटका :- नागपुरचे दे.भ.महात्मा भगवानदीन अमरावती देश.त्रिंबकराव जोशी व हिंगणघाटचे दे.भ.देशपांडे यांची दि.३ मे रोजी अमरावती तुरुंगातून सुटका झाली. तत्पूर्वी भातकुलीचे दे.भ.भीमरावजी काजळे यांचीही अमरावती तुरुंगातून एप्रिलचे शेवटचे आठवडयात सुटका झाली होती.

३०) गांधी दिनाची जाहीर सभा :- दि. ४ मे रोजी जिल्हा कॉं.कमेटी तर्फे गांधी दिना निमित्त देश.डॉ.भोजराज यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरली या सभेत दे.भ.हरिहरराव देशपांडे यांचे भाषण झाले. या सभेतच बंधमुक्त राजबंदी,

दे.भ.आचार्य त्र्यंबक गुरुजी दे.भ. माधवराव देषकर व दे.भ.गोविंदराव सावंत ह्या देशभक्तांचे अभिनंदनही करण्यात आले.

३१) जाहीर प्रार्थना सभा :- दि.८ मे रोजी जोग चौकात नागरिकांची प्रचंड जाहीर सभा भरुन महात्मा गांधी एकवीस दिवसांच्या प्राणघातक उपवासाच्या दिव्यातून सुखरुप पार पडावेत व त्यांना दीर्घायुआरोग्य लाभावे यासाठी जगन्नियंत्याजवळ प्रार्थना करण्यात आली. हरिजन चळवळीत वाढत्या संख्येने सामील होणाऱ्या कार्यकर्त्यांना मदत करण्यासाठी व त्यांच्या कार्यात अधिक शुध्द,अधिक सत्य स्वरुपाची सेवा वृत्तीची भावना निर्माण करण्याकरिता महात्मा गांधींनी ८ मे १९३३ पासून आत्मशुध्दीकरिता २१ दिवसांच्या उपवासाला प्रारंभ केला होता. सरकारने त्याच दिवशी सायंकाळी गांधीजींना जेलमधून मुक्त केले.

३२) स्वातंत्र्य दिन :- १८५७ च्या स्वातंत्र्य युध्दाचा स्मृतिदिन दि. १० मे रोजी उमरावतीत साजरा करण्यात आला होता. त्या निमित्त विदर्भ युवक संघातर्फे दे.भ. वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली जोग चौकात जाहीर सभेचे आयोजन केले होते. या स्मृतिदिना च्या सभेत दे.भ.पी.वाय.देशपांडे दे.भ.हरिहरराव देशपांडे व आचार्य त्र्यंबक गुरुजी यांची माहितीपूर्ण भाषणे झाली होती.

३३) महात्माजींचे अभिनंदन :- दि. ११ मे रोजी जिल्हा हरिजन सेवा संघात संघातर्फे जोग चौकात देश.वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरुन महात्माजींच्या सुटकेबद्दल त्यांचे अभिनंदन करणारा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला होता. ठरावावर डॉ.व-हाडपांडे दे.भ.बामणगावकर आणि दे.भ.हरिहरराव देशपांडे यांची भाषणे झाली. दि.८ मे १९३३ रोजी उपवास सुरु केल्यानंतर गांधीजींना सरकारने जेलमधून मुक्त केले. त्यावेळी गांधीजींनी एक पत्र टाकून चळवळ एक महिना किंवा सहा आठवडे तहकूब ठेवण्याची सूचना त्यात केली होती. त्याप्रमाणे त्या वेळेचे काँग्रेसचे हंगामी अध्यक्ष श्री.बापूजी अणे यांनी कायदे भंगाची चळवळ सहा आठवडे तहकूब ठेवण्यात आल्याची घोषणा केली होती.

३४) वऱ्हाडात कायदेभंग तहकूब - वऱ्हाड प्रांतिक काँग्रेसचे सर्वाधिकारी दे.भ.वीर वामनराव जोशी यांनी वऱ्हाडातील चारहि जिल्हा काँग्रेस कमेट्यांना आदेश पाठवून काँग्रेस सर्वाधिकाऱ्यांचे आदेशानूसार कायदेभंग तहकूब करण्याबद्दल कळविले होते. (१५ मे ३३)

३५) गांधी सप्ताह :- महात्मा गांधीच्या प्रायोपदेशनाबद्दल गेल्या आठवडाभर हरिजन सेवा संघातर्फे शहराच्या निरनिराळ्या मोहोल्ल्यात जाहिर सभा भरुन म.गांधी सप्ताह साजरा करण्यात आला होता.(१६ ते २३ मे)

३६) रुईकरांचा जाहीर सत्कार :- अखिल भारतीय मजूर पक्षाचे पुढारी दे.भ.रामभाऊ रुईकर(नागपूर) हे तुरुंगातून बंध मुक्त झाल्यानंतर प्रथमच दि.२० मे रोजी अमरावतीत आले होते त्यावेळी विदर्भ युवक संघा तर्फे दे.भ.पी.वाय.देशपांडे वकील ह्यांच्या अध्यक्षतेखाली त्याच दिवशी रात्री जोग चौकात यांचा जाहीर सत्कार करण्यात आला.

याच सत्कार सभेत दे.भ.रुईकरांचे कामगार चळवळीवर अत्यंत स्फूर्तीदायक असे भाषणही झाले.

३१) असनारे वाचनालय :- अमरावतीचे कुंभारवाड्यातील श्री दत्त मंदिर जवळ शेजारी कै.भाऊसाहेब असनारे वकील यांच्या नांवाने असनारे वाचनालय दि.२३ मे पासून सुरु करण्यात आले होते. या वाचनालयासाठी तेथे एक इमारत वर्गणी करुन बांधली होती. व(ती अद्यापही आहे.) या वाचनालयात नियतकालिके वाचण्याची सोय होती. श्री हुशंगाबदकर हे या संस्थेचे चिटणीस होते, हल्ली हे वाचनालय बंद आहे व इमारत भाडयाने दिलेली आहे. वाग्विकास मंडळातर्फे या वाचनालयात दर शनिवारी दुपारी वाद विवाद होत असत.

३८) शुध्दी संघटनेतील मतभेद मिटले :- अमरावती जिल्हा हिंदूसभेचे वतीने जिल्हयातील परधर्मात गेलेल्या मूळ हिंदूना परत हिंदूधर्मात घेण्याचे दृष्टीने या शुध्दी संघटनेचे कार्य चालत असे.

त्याच प्रमाणे धर्म भास्कर मसूरकर महाराज यांचे शिष्य देखील या जिल्हयात शुध्दी कार्य करित असत. परंतु काही गैरसमजूतीमुळे या दोहोत वाद उत्पन्न झाला होता व त्यामुळे मुख्य कार्याला खिळ बसू लागली होती ही गोष्ट योग्य नसल्याने या दोन्ही शुध्दी करणाऱ्या संघटनेतील मतभेद मिटावेत आणि मुख्य कार्य सुरळीत सुरु राहावे म्हणून अमरावती जिल्हा हिंदू महासभेचे अध्यक्ष श्री.पन्नालालजी सिंघई दे.भ.नानासाहेब बामणगावकर यांनी तडजोड घडवून आणली व या दोन्ही संघटनेने या पुढे सामोपचाराने कार्य करावे अशा आशयाचे पत्रक दि.२३ मे १९३३ रोजी काढले.

३९) जाहीर सभा :- सेनापती बापट यांची प्रकृती प्रायोपवेशामुळे चिंताग्रस्त झाल्यामुळे त्यांना व महात्माजींना दीर्घायुरारोग्य लाभावे यास्तव दि.२६ मे १९३३ रोजी दे.भ.डॉ.भोजराज यांच्या अध्यक्षतेखाली विदर्भ युवक संघातर्फे उमरावतीत जाहीर सभा होऊन तीत आचार्य त्र्यंबक गुरुजी, श्री.गुलाबराव बक्षी आणि श्री.प्यारेलालजी सेवक यांची भाषणे झाली.

४०) महात्माजींचे उपोषण सुटले - आनंद व्यक्त करण्यासाठी जाहीर सभा :- महात्मा गांधी आपल्या प्राणांतिक उपोषणाचे दिव्यातून पार पडल्याबद्दल आनंद व्यक्त करण्यासाठी दि.२९ मे १९३३ रोजी रात्री जोग चौकात हरिजन संघातर्फे दे.भ.वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा घेण्यात आली होती. या सभेत दे.भ.पं.प्यारेलालजी सेवक यांची गांधीजींचे अभिनंदन करणारी भाषणेही झाली होती. डॉ.बऱ्हाडपांडे ह्यांनी शेवटी ईशप्रार्थना वाचून दाखविली दुसरे दिवशी दि.३० रोजी महात्माजी आपल्या उपवासातून निर्विघ्नपणे पार पडल्याबद्दल गावात अनेक ठिकाणी नागरिकांना पानसुपारी देवून आनंद व्यक्त केला होता. दि.२२ जून रोजी उमरावतीचे दे.भ.वीर वामनराव दादा आणि दे.भ.नानासाहेब बामणगावकर हे दोघेही पुण्यात गेले व पर्णकुटीवर जाऊन महात्मा गांधींना भेटून आले.

४१) श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचा शारीरिक शिक्षणाचा वर्ग :-

श्री हनुमान व्या.प्र.मंडळाने मे महिन्यात शारीरिक शिक्षणाचा वर्ग चालविला होता.नागपूर ,जबलपूर,रायपूर,ग्वाल्हेर,बडोदा,पुणे,मुंबई,बनारसकलकत्ता, रावळपिंडी इत्यादी लांब लांबच्या एकूण पंचवीस संस्थानी या शिक्षण वर्गासाठी आपले उमेदवार पाठविले होते. या वर्गात एकूण २१० सैनिकांना शिक्षण देण्यात आले होते. या शिवाय पार्वतीबाई पटवर्धन यांचे नेतृत्वाखाली मंडळाने यावर्षी प्रथमच स्त्रियांकरिता ही एक व्यायाम वर्ग सुरु करुन नवा उपक्रम हाती घेतला होता.

४२) श्री चौबळ वकील मंत्री झाले :- मध्यप्रांत वऱ्हाडचे मंत्रीदय ना.पंजाबराव देशमुख व श्री जयस्वाल यांनी राजीनामे दिल्यानंतर उमरावतीचे श्री विठ्ठल बंधूजी चौबळ वकील आणि बॅरि.आरिफ यांची मंत्री म्हणून नियुक्ती झाली होती. या मंत्रीमंडळास "आरिफ-चौबळ" मंत्रीमंडळ म्हणत असत. (ऑगष्ट १९३३).

४३) मृत्यु-भोजावर पिकेटींग :- समाजातील अनिष्ट रुढी विरुध्द उमरावतीत लोकमत जागृत करण्याचे प्रयत्न झाले आहेत. एखाद्या व्यक्तीचे मृत्युनंतर गोड जेवण (मृत्युभोज) देण्याची जी रुढी समाजात प्रचलित आहे ती योग्य नसल्याने या रुढी विरुध्द जनमत जागृत करण्याचा प्रयत्न उमरावतीच्या "मृत्यु-भोज" प्रतिबंधक मंडळाने" केला होता. दि.१८ ऑगष्ट रोजी श्री.मोतीलालजी अग्रवाल यांच्या येथे त्यांच्या स्वर्गीय वडिलांच्या मृत्यु-भोजाचे वेळी या मृत्युभोज प्रतिबंधक मंडळाच्या कार्यकर्त्यानी पिकेटींग केले होते. व त्यात बरेच यश मिळाले असा दावा मंडळाने केला होता.

४४) गांधीजीसाठी ईशप्रार्थना :- महात्माजींनी सुरु केलेल्या उपोषणानिमित्त दि.२१ ऑगष्ट रोजी जोग चौकात डॉ.शहाणे यांच्या अध्यक्षतेखाली नागरिकांनी जाहीर सभा भरुन "ह्या उपवासाचे दिव्यातून महात्माजी सुखरुप बाहेर पडोत" यासाठी भाषणे होऊन ईश्वर प्रार्थना करण्यांत आली.

मिरवणूक :- महात्मा गांधीच्या उपोषणाच्या आठव्या दिवशी दि.२३ ऑगष्ट रोजी

सायंकाळी महात्माजींच्या तसबिराची मिरवणूक उमरावतीला काढण्यात आली होती. ही मिरवणूक शहराच्या मुख्य मार्गाने फिरत आल्यानंतर जाहीर सभा भरुन तीत ''महात्माजींना दीर्घायुरारोग्य लाभो'' अशी प्रार्थना करण्यात आली होती. त्याचप्रमाणे दि.२५ ऑगष्ट रोजी,अंबागेट युवक मंडळ गणेशोत्सवा तर्फे गणेश नाटक गृहात दे.भ.वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरुन तीत महात्माजींचे त्यांच्या सुटकेबद्दल अभिनंदन करण्यात आले होते. दे.भ.हरिहरराव देशपांडे व डॉ.पटवर्धन यांची ह्या सभेत भाषणे झाली होती.

४५) श्री नानासाहेब गवई : उमरावतीचे अस्पृश्य नेते व बहिष्कृत भारत संघाचे जनरल सेक्रेटरी श्री गणेश आकाजी उर्फ नानासाहेब गवई (मध्यप्रांत वऱ्हाड कायदे मंडळाचे सदस्य) हे डॉ.मुंजे यांचे नेतृत्वाखाली हिंदु महासभेच्या प्रतिनिधी मंडळासोबत जॉईंट पार्लमेंटरी कमेटी समोर साक्ष देण्याकरिता लंडनला गेले होते ते परत आले व त्यांचा सत्कार दि.२७ ऑगष्ट रोजी त्यांच्या अनुयायी आणि इष्ट मित्रांनी गणेश नाटकगृहात बॅरि.ई.एम.जोशी यांच्या अध्यक्षतेखाली घडवून आणला होता. या प्रसंगी त्यांना मानपत्र देऊन त्यांच्या यशस्वी कामगिरीबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले होते.

४६) बडनेरा गिरणी कामगार सहाय्यक मंडळ :- बडनेराच्या मील मधील संपावर असलेल्या कामगारांना आर्थिक मदत देण्याचे हेतूने डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली उमरावतीला ''बडनेरा गिरणी कामगार सहाय्यक मंडळ'' स्थापन करण्यात आले होते. या मंडळाचे चिटणीस श्री.भट वकील,आणि सदस्य वीर वामनराव जोशी,सौ.पार्वतीबाई पटवर्धन, डॉ.भोजराज,डॉ.सोमण, श्री अग्रवाल वकील आणि श्री बामणगांवकर हे होते.

४७) उमरावतीचा गणेशोत्सव १९३३ :- दरवर्षी प्रमाणे निरनिराळ्या प्रचलित विषयांवर विद्वान व अधिकारी, वक्त्यांची व्याख्याने या वर्षाचे गणेशोत्सवात विशेषकरुन झाली होती. मुधोळकर पेठ युवक मंडळातर्फे आकोल्याचे दे.भ.सदाशिवराव केळकर यांचे ''नवी घटना'' या विषयावरील व्याख्यान सुश्राव्य

व माहितीपूर्ण झाले होते. शिवाय गावातील विविध गणेशोत्सव मंडळातर्फे दे.भ.वीर वामनराव दादा,डॉ.शिवाजीराव पटवर्धन,डॉ.भोजराज,डॉ.सोमण,श्री बाबासाहेब खापर्डे,दे.भ.पु.य.देशपांडे,दे.भ.हरिहरराव देशपांडे,वैद्यभूषण हिर्लेकर शास्त्री, सौ.पार्वतीबाई पटवर्धन आणि सौ.ताराबाई मोडक यांची निरनिराळ्या विषयावरील व्याख्याने झाली होती. मुधोळकर पेठेतील बाळगोपालांचा मेळा,कु.मधुताई जोशी, यांच्या नेतृत्वाखालील मुलींच्या मेळाव्याचे कार्यक्रमही झाले होते. डॉ. म्हैसाळकर श्री वझे आणि श्री मुंडे यांच्या गायनाचे व श्री खरे यांच्या नकलांचे कार्यक्रमही ठिकठिकाणी झाले होते.

४८) अतिवृष्टी : ३० तासात अकरा इंच पाऊस :-दि.५ सप्टेंबरचे रात्री व दि.६ सप्टेंबरचे दिवसभर उमरावती शहरात (आणि सर्व वऱ्हाडातहि) अतिशय जोराची पर्जन्य वृष्टी होऊन अनेक घरांची पडापड झाली होती.उमरावतीला सतत ३० तास पावसाच्या सरीवर सरी कोसळत होत्या. या अवधीत ११ इंच पाऊस आला होता. या सतत पर्जन्य वृष्टीमुळे वऱ्हाडातील सर्व नद्यांना पूर आले होते. पीकांची भयंकर हानी झाली होती. ग्रामीण विभागातही घरांची फार पडझड होऊन काही जीवही गेले होते. वलगांवला पेढी नदीचे पाणी गावात शिरुन दीडशे घरे पडली होती.

४९) लोकनायक दिन :- लोकनायक बापूजी अणे यांच्या "अटक दिना" निमित्त दि.१३ सप्टेंबर रोजी रात्री जोग चौकात दे.भ.वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरुन, विधायक कार्यक्रमासंबंधी दे.भ.बामणगांवकर, श्री रामभाऊ देशपांडे, वकील दे.भ.डॉ.भोजराज व दे.भ.डॉ.पटवर्धन यांची भाषणे झाली होती.

५०) मुस्लिम कवि संमेलन :- उमरावतीच्या मुस्लिम युवक संघटनेतर्फे दि.९ सप्टेंबर रोजी रात्री म्यु.ए.व्ही.स्कूलचे हॉलमध्ये "वऱ्हाड-मुस्लिम यांचे कवि संमेलन" खान साहेब मौलवी सय्यद मुजफ्फर हुसेन, एम.एस.सी. यांचे अध्यक्षतेखाली भरले होते. शहरातील व वऱ्हाडाच्या विविध ठिकाणाहून आलेल्या कवींनी या संमेलनात आपली हजेरी लावली होती.

५१) उम्रा कापसाबद्दल शेतकऱ्यांची सभा :- दि. २० सप्टेंबर ३३ रोजी उमरावती येथे रा.ब.ब्रम्ह यांचे बंगल्यावर शेतकरी प्रतिनिधीची सभा होऊन ''हिंदी कापसावर जपानने बहिष्कार घातल्यामुळे ''उम्रा'' कापूस पिकविणाऱ्या वऱ्हाड प्रांताचे अत्यंत नुकसान होणार आहे. तेव्हा आणखी वीस वर्षे जर जपान ''उम्रा'' कापूस नेहमी इतका घ्यावयास तयार असेल तर जपानवरील कर कमी करावा व जपानी येनची किंमत रुपयांत ठरवून टाकावी. अशी विनंती करणारा ठराव व्हॉईसरायचे प्रायव्हेट सेक्रेटरी ना.भोर ना.नाईक व मध्यप्रांत वऱ्हाड सरकार यांचेकडे पाठविण्याचे ठरले होते.

५२) डॉ.ॲनी बेझंट यांचे निधनाबद्दल दुखवटा :- प्रख्यात डॉ.ॲनी बेझंट बाई यांच्या दु:खद निधना बद्दल दि.२३ सप्टेंबर रोजी उमरावती राष्ट्रीय मंडळातर्फे डॉ. पातुरकर यांच्या अध्यक्षतेखाली दि.२४ रोजी थिऑसॉफिकल लॉजतर्फे श्री बाबासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली आणि दि.२६ सप्टेंबर रोजी सौ. मालतीबाई मंगळमूर्ती यांच्या अध्यक्षतेखाली खास स्त्रियांची या प्रमाणे जाहीर सभा ब्रम्हाच्या मंदिरात भरल्या होत्या.

डॉ.ॲनी बेझंटबाई यांचे संबंधीचे माहिती परिचय :- या ग्रंथाच्या पहिल्या भागातील पृष्ठ २५२ वरील तळ टिपेत दिलेली आहे ती पहावी.

५३) सुबोध सत्यानारायण कथा :- उमरावतीच्या सुबोध ग्रंथ मालेचे दहावे पुष्प म्हणून ''सुबोध श्री सत्यनारायण कथा'' या वर्षी प्रकाशित करण्यात आली होती. श्री.काशिराव बापू देशमूख हे या सुबोध ग्रंथ मालेचे संपादक होते. या सत्यनारायण कथे'' चे वैशिष्ट्ये असे की,त्यांत भगवद गीतेतील उद्बोधक वचनांच्या आधारे नीति तत्वांची व ईश्वराच्या खऱ्या तत्वांची सर्वांना समजेल अशा सोप्या भाषेत मांडणी केली असून, अंधश्रध्दा, भूतचेष्टा, शकून-अपशकून इत्यादि भोळ्या समजुतीवर मधून मधून भरपूर टीका केली आहे व अशा गोष्टींवर भरवसा न

ठेवण्याचा उपदेश केलेला आहे. जुन्या सत्यनारायण कथेतील अंधविश्वास, चमत्कार वगैरे ऐवजी ही ''सुबोध सत्यनारायण कथा'' तत्कालीन परिस्थितीत एक पुढचे पाऊल होते.

५४) चीनला पायी जाणारे प्रवासी उमरावतीत : भारतातून,ब्रम्हदेश मार्गे चीनला पायी जाणारे श्री जी.बी.सामंत (मराठा) व श्री जे.एम.वाटा (राजपुत) हे दोघ मुंबईचे प्रवासी दि.१४ नोव्हेंबर रोजी उमरावतीत आले होते. ते मुंबईहून ८ नोव्हेबरला पायी निघाले होते. येथून नागपूरला पायीच जाणार व तेथे श्रीमंत बुटी यांना भेटून नागपूरहून एक सायकल व एक बैलगाडी घेऊन पुढे ब्रम्हदेश मार्गे चीन देशात जाऊ आणि परत ही याच मार्गाने येऊ'' असे त्यांचे म्हणणे होते दररोज १५ ते २० मैलांचा प्रवास करुन मुक्काम करतो असे ते म्हणत असत.

महात्माजींचा हरिजन दौरा :

५५) उमरावतीत महात्मा गांधींचे अपूर्व स्वागत : दि.१६ नोव्हेंबर १९३३ रोजी गांधी हे उमरावतीत होते त्या निमीत्त उमरावती नगरी त्यांच्या स्वागतासाठी नववधू सारखी नटून थटून सज्ज झाली होती. ठिकठिकाणी कमानी उभारण्यात आल्या होत्या.राष्ट्रीय ध्वज, तोरणे आणि पताका सर्वत्र लावण्यात आल्या होत्या. मुधोळकर पेठ युवक मंडळाने बडनेरा रोड राष्ट्रीय पताका व तोरणांनी सजविला होता आणि केळीच्या खांबांची कमान उभारली होती. अंबादेवी जवळचा मार्ग अंबागेट युवक मंडळाने तोरणे पताका लावून सजविला होता. गांधीजीना मिरवणूक आवडत नसल्यामुळे त्यांचे स्वागत वडाळी येथे करावे असे ठरे होते. त्याचप्रमाणे वडाळी तलावासमोर सुंदर बैठक तयार केली होती. व तेथून थेट पोहरा रोड पावेतो ध्वजा पताकांनी रस्ता शृंगारला होता. सर्वत्र नवचैतन्य संचरले होते. महात्माजींचे आगमन सकाळी १०॥ वा. पोहरा मार्ग उमरावतीला होणार होते. त्या पूर्वीच तेथे व्यवस्थेकरिता रा.ब.ब्रम्ह, वीर वामनराव दादा, बॅरि.रामराव देशमूख श्री नानासाहेब बामणगांवकर, डॉ.सोमण, डॉ.वऱ्हाडपांडे इत्यादि मंडळी हजर झाली होती. त्याचप्रमाणे श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या नगर संरक्षक दलाचे सैनिकही

श्री. अण्णासाहेब असनारे यांच्या नेतृत्वाखाली तेथे व्यवस्थेसाठी हजर होते. तसेच १९३० साली उमरावती येथील वडाळीचे ज्या ठिकाणी जंगल सत्याग्रह झाला ते ठिकाण नजरेस पडावे म्हणून येथे एक उंच राष्ट्रीय निशाण उभारुन ठेवण्यात आले होते. महात्माजींसाठी डॉ.भोजराज,श्री पी.वाय.देशपांडे वकील वगैरे मंडळी चांदूर (रेल्वे) ला गेली होती त्यांची मोटार पुढे आली तेव्हा गांधीजी येत आहेत असा इशारा मिळाला.या ठिकाणी कॅम्प म्युनिस्पिल कमेटीचे अध्यक्ष बॅरि.ई.एम.जोशी आणि उपाध्यक्ष बॅरि. बागवे हेहि हजर होतेच. शिवाय डॉ. पातुरकर, श्री सहस्त्रबुध्दे, श्री मराठे वगैरे तरुण मंडळीही व्यवस्थेसाठी होती. महिला वर्गासाठी खास जागा राखून ठेवली होती. सौ.ताराबाई मोडक, सौ.पार्वतीबाई पटवर्धन, सौ.बागवे, सौ.शारंगपाणी व सौ.देशमुख इत्यादी महिला उपस्थित होत्या. याशिवाय जिल्ह्यातील मोर्शी तहसीलचे प्रमुख राष्ट्रीय पुढारी श्री मोहरीर,श्री फरकाडे,श्री.कुळकर्णी, भाई शेषराव घाटगे, हेही स्वागतासाठी मुद्दाम आले होते.या प्रमाणे दीड-दोन हजाराचा जनसमुदाय गांधीजीचे स्वागतासाठी वडाळी येथे हजर होता.

महात्माजींची मोटार बरोबर १० ॥ वाजता आली सर्वांनी त्यांचा जयजयकार केला. नंतर तेथील बैठकीवर आसनस्थ झाले. त्यावेळी प्रथम हरिजन सेवा संघातर्फे रा.ब.नानासाहेब ब्रम्ह यांनी स्वागत करुन गांधीजींना सुताचा हार अर्पण केला वडाळी नागरिकां तर्फे श्री सुखाप्पा बाबू यांनी गांधीजींना एकावन्न रुपयांची थैली अर्पण केली. स्वागत समिती तर्फे वीर वामनराव जोशी, राष्ट्रीय मंडळातर्फे डॉ.सोमण, कॅम्प नगरपालिकेतर्फे बॅरि.इ.एम.जोशी,वडाळी गावांतर्फे श्री सुखाप्पा जगन्नाथ महिलांतर्फे सौ.पटवर्धन,गुजराथी मंडळातर्फे श्री दौलतभाई जादा, मारवाडी समाजातर्फे श्री जगन्नाथजी मालपाणी, आर्य समाजतर्फे डॉ.व-हाडपांडे "उदय" कचेरी तर्फे श्री बामणगांवकर,जैन समाजतर्फे श्री रतनलालजी काळे, मोर्शी तालुक्यातील राष्ट्रीय पक्षातर्फे मोहरीर यांनी गांधीजींना पुष्पहार अर्पण केले.

याप्रमाणे उमरावती नगराच्या सीमेवर गांधीजीचे स्वागत होताच गांधीजी

लगेच तेथून मोटारने सरळ बडनेरा रोड वरील श्री शिवनाथ बाबू यांच्या बगीच्यात गेले. तेथेच गांधीजींची उतरण्याची व्यवस्था केलेली होती.गांधीजीं सोबत श्री.ठक्कर बाप्पा, श्री ब्रिजलालजी बियाणी, श्रीमती दुर्गाताई जोशी आदी मंडळी होती. त्यांचीही तेथेच उतरण्याची व्यवस्था होती.

श्री शिवनाथ बाबूचे अन्नदान : महात्माजींचे आगमना प्रीत्यर्थ, उमरावतीचे दानशूर सेठ विश्वनाथ बाबू यांनी पांच हजार हरिजन व गोर गरीब लोकांना आपल्या बडनेरा रोड वरील बंगल्यात सुग्रास अन्नदान केले होते. हा अन्नदानाचा कार्यक्रम सकाळी ८ वाजेपासून दुपारी ३ वाजे पावतो चालू होता.

पालकांना गांधीजींचा उपदेश : दुपारी तीन वाजता, श्रीकृष्ण सिनेमा (हल्लीचे चित्रा टॉकीज) चे मागील श्री मालाणी सेठ यांचे (जबलपुरवाले) गोदामात प्रार्थमिक शाळेतील बाल बालिकांकरिता महात्माजींचे उपदेशपर भाषण झाले. व गांधीजींचा या मुक्कमातील हा पहिला कार्यक्रम होता. या कार्यक्रमासाठी ज्या रस्त्याने गांधीजी जाणार होते त्या रस्त्यावर ठिकठिकाणी लोकांची इतकी गर्दी झाली की ही गर्दी स्वंयसेवकांना आवरणे कठीण झाले होते.

बालकांनो, खरे हरिजन व्हा।

जबलपूर गोदामचे आतील आवरात एका वृक्षाखाली गांधीजी करिता उच्चासन तयार केले होते. पांच हजारावर हिंदु मुसलमान बालबालिकांचा समुदाय तेथे उपस्थित होता. शिक्षक त्यांची व्यवस्था ठेवीत होते.ठरलेल्या वेळी गांधीजी आले तेव्हा सर्वांनी उभे राहून त्यांना उच्चासन दिले. स्मित वंदनाने गांधीजींनी सर्वांना वंदन केले आणि गांधीजींनी लगेच हिंदी मध्ये आपल्या भाषणाला सुरुवात केली व या हिंदी भाषणाचा मराठी अनुवाद डॉ.पटवर्धन हे करीत होते. या सभेला लाऊड स्पीकरची व्यवस्था नव्हती. परंतु या सभेत डॉ.पटवर्धन हेच गांधीजीचे लाऊड स्पीकर बनले होते. असे म्हणायला हरकत नाही. महात्माजींचनी फक्त पांच मिनिटे भाषण करुन ''बाल बालिकांनो, तुम्ही सर्व हरिजनांवर प्रेम करीत आहात असे मला

वाटते. तुमच्यात व हरिजनांच्या मुलांत कोणत्याच प्रकारचा भेदभाव असता कामा नये.त्यांच्या बरोबर राहा. खेळा,तेही आपले खरे बंधु बहिणी आहेत तसे केल्याने परमात्मा तुमचे कल्याण करील. आपण सर्व हरिजनांचे खरे सेवक सेविका व्हाल अशी मला पूर्ण खात्री आहे. ईश्वर तुम्हा सर्वांना दीर्घायु करो'' असे सांगितले होते. नंतर गांधीजीना हार अर्पण करण्यात आला व चांदीच्या छोट्या कंरडकातून मानपत्र अर्पण करण्यात आले.

स्त्रियांची सभा : अलोट गर्दी.

तेथून गांधीजी गणेश नाटक गृहात स्त्रियांच्या आयोजित केलेल्या सभेला उपस्थित राहण्यासाठी गेले. गणेश नाटक गृहात महात्माजींना स्त्रियांसाठी दुपारी ३॥ ते ४ पर्यन्त कार्यक्रम ठरला होता. संपूर्ण थिएटर महिलांनी चिक्कार भरले होते. सुमारे पांच हजार स्त्रिया हजर असाव्यात. सौ.पार्वतीबाई पटवर्धन व इतर कार्यकर्त्या भगिनींनी सभेची व्यवस्था उत्तम ठेवली होती. थिएटरचे बाहेर रस्त्यावर गांधीजींच्या दर्शनासाठी एवढा प्रचंड जनसमुदाय जमला होता की गांधीजीची मोटार थिएटर दरवाजा पर्यन्त नेणे शक्यच नव्हते. म्हणून थिएटरच्या मागील दरवाजातून त्यांना आंत नेण्याचा प्रयत्न झाला तर तिकडेही लोकांची गर्दी होतीच. त्यामुळे शेवटी ही गर्दी कमी व्हावी म्हणून व्यवस्थापक मंडळीने युक्ती काढली व गांधीजींची गाडी तशीच शहरातील हरिजन वस्त्यांना भेट देण्यासाठी नेण्यात आली. या अवधीत बेलपुरा,हमालपूरा व माताखिडकी येथील हरिजन मोहोल्ल्यात माहात्माजींनी भेट दिली. हरिजनांशी व त्यांच्या बायका मुलांशी गांधीजी बोलले. तेथील महिलांनी गांधीजींना पंचारती ओवाळली व हार घालून गांधीजीचे हार्दिक स्वागत केले. बेलपुऱ्यात गांधीजीचे थोडेसे भाषण झाले मुलांच्या सभेत मिळालेले हार गांधीजींनी मुलांना वाटले. बेलपुऱ्यात हरिजन वस्तीत भेट द्यावयाची हे नियोजित कार्यक्रमात ठरले होतेच. परंतु आपल्याही वस्तीत महात्माजींनी भेट द्यावी ही माताखिडकी व हमालपुऱ्यातील हरिजनांची भारी इच्छा हा सुयोग, गणेश थिएटर जवळील प्रचंड गर्दीमुळे जुळून आला होता.

गांधीजीचे स्त्रियांचे सभेत भाषण

या प्रमाणे हरिजन वस्त्यांना भेट दिल्या नंतर एकाएकी थिएटर च्या मागील दरवाज्यासमोर महात्माजींची गाडी नेण्यात आली.तेथील व्यासपीठावर येताच गांधीजींना सर्वांनी ''गार्ड ऑफ ऑनर'' ची सलामी दिली. व्यासपीठावर येताच गांधीजीनी सर्वांना वंदन केले. गांधीजी स्थानापन्न होताच स्वागताध्यक्षा सौ.ताराबाई मोडक यांनी अमरावती नगरवासी स्त्रियांतर्फे गांधीजींना सुताचा हार घालून त्यांचे स्वागत केले तेव्हा उपस्थित महिलांनी टाळ्यांचा प्रचंड कडकडाट करुन स्वागतास प्रतिसाद दिला. नंतर गांधीजींनी हिंदी भाषण दिले. गांधीजी आपल्या भाषणात म्हणाले ''भगिनींनो। आपण अस्पृश्यतेला, शिवाशिवीला थारा देऊ नका. शिवाशिवी केव्हाही धर्म होऊ शकत नाही. आपण सर्वांनी येथे मला प्रेमाने बोलाविले आहे. आपणास दागिन्यांची जरुरी नाही. मी आपणा जवळ दागिन्यांची अपेक्षा करतो. दागिने न दिले तर पैसे द्या. काही द्याच मला अजून पुष्कळ कामे करावयाची असल्यामुळे जास्त वेळ येथे देता येत नाही.तेव्हा आता आपण आपले दागिने मजजवळ द्यावेत.''

त्यानंतर स्वयंसेविकांनी दागिन्यांची व द्रव्याची मागणी केली. काही भगिनींनी स्वयंस्फूर्तीने आपल्या अंगठ्या व दागिने काढून दिले.सौ.चिपळूणकर यांनी आपल्या सोन्याच्या पाटल्या हरिजन कार्यासाठी दिल्या.

नंतर थोडक्यात आभार प्रदर्शन झाले व गांधीजी तेथून मोटारने सरळ अंबापेठेतील हरिजनांचे सभेसाठी रवाना झाले. अंबापेठेतील मैदानावर महात्माजींकरिता उच्चासन तयार करण्यात आले होते. हरिजन स्त्री पुरुष मोठ्या संख्येने या सभेला उपस्थित होते व गांधीजींची उत्सुकतेने वाट बघतच होते. महात्माजी येताच सर्वांनी उठून त्यांचे स्वागत केले. गांधीजी सोबत श्री ब्रिजलालजी बियाणी होते.

सुरुवातीला हरिजन मुला-मुलींनी स्वागत गीत म्हटले नंतर स्वागताध्यक्ष व या प्रांताचे हरिजन नेते श्री नानासाहेब गवई एम.एल.सी. यांचे स्वागतापर भाषण

झाले नंतर हरिजन लोकांतर्फे गांधीजींना मानपत्र व हार अर्पण करण्यात आला. श्री गायकवाड यांनी मानपत्र वाचून दाखविले. नंतर महात्माजींचे भाषण झाले व त्यांचा हिंदी भाषणाचा मराठी अनुवाद श्री नानासाहेब गवई यांनी केला. आभार प्रदर्शनानंतर गांधीजी तेथून सरळ आपल्या निवास स्थानी विश्रींतीसाठी गेले. गांधीजींची गाडी सायंकाळी ६ चे सुमारास हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे पटांगणावर दाखल झाली. धनसा बिल्डींग जवळ मात्र लोकांची तुफान गर्दी झाली होती. गांधीजींनी हनुमान व्यायाम प्रसारक मंडळास भेट दिली त्या प्रसंगी मंडळाच्या नगर संरक्षक दलातील हरिजन पलटणीच्या कवायती व दोन लहान हरिजन विद्यार्थ्यांनी जंबीयांची कुस्ती करुन दाखविली होती. त्या प्रसंगी तेथे मोठा जनसमुदाय उपस्थित होता. नंतर गांधीजीनी लहानसे भाषणही केले 'हरिजन मागासलेले नाहीत त्यांना शिक्षण दिले तरते आपणा प्रमाणे कोणतेही कार्य करु शकतात. त्यांच्या' शिक्षणाचा प्रचार करा व त्यांना आपणात घ्या' असा त्यांचे भाषणाचा सारांश होता. श्वेतांबद्दलही गांधीजींनी आनंद व्यक्त केला.

नेहरु मैदाना वरील विराट सभा :

नेहरु मैदानावरील सायंकाळी जाहीर सभेला शहरातील व आजूबाजूचे खेडयातील स्त्री-पुरुषांचा सुमारे वीस हजारांचा जनसमुदाय गांधीजीचे भाषणासाठी उपस्थित होता. गांधीजीसाठी ए.व्ही. स्कूलसमोर केलेल्या व्यासपीठावर उच्चासन केले होते. राष्ट्रीय ध्वज पताकांनी सारे नेहरु मैदान सुशोभित करण्यात आले होते. आणि सर्वत्र विजेची रोषणाई केली होती.

व्यासपीठाचे मागे श्रीकृष्णाची मूर्ती व त्या सभोवार विजेची उत्कृष्ट अशी रोषणाई केली होती. एकंदर व्यासपीठ चित्ताकर्षक होते. तसेच व्यासपीठा समोरील जागेत निमंत्रित स्वागत मंडळाचे सदस्य, स्त्रिया, म्युनिसिपल सभासद व इतर हजारो लोकांसाठी निरनिराळया जागा राखून ठेवण्यात आलेल्या होत्या. व्यवस्थेसाठी हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या नगर संरक्षक दलाचे सैनिक होते. बरोबर ६॥ वा. श्री.ठक्करबाप्पा, डॉ.पटवर्धन आणि इतर मंडळींसह गांधीजी

म्यु.ए.व्हि.स्कूलच्या हॉल मधील मागच्या दाराने व्यासपीठावर आले. स्थानापन्न होताच त्यांनी समोरील जनसमुदायास अभिवादन केले. त्या वेळी '' महात्मा गांधी की जय '' असा प्रचंड जयजयकार जनसमुदायापासून उठला होता. नंतर अस्पृश्य मुलींनी स्वागत गीत व त्यानंतर श्री कुऱ्हाडे यांनी ''वंदे मातरम'' हे राष्ट्र गीत सुस्वर आवाजात म्हटले. त्यानंतर गांधी स्वागत समितीचे अध्यक्ष वीर वामनराव दादा यांनी , उमरावतीच्या नागरिकांचे वतीने गांधीजींचे स्वागतपर हिंदीतून भाषण करुन गांधीजींना हार अर्पण केला.

५६.अ. उमरावती नगरपालिकेचे गांधीजींना मानपत्र :

महात्माजींना मानपत्र देण्याचा ठराव अमरावती नगरपालिकेने सर्वानुमते मंजूर केला होता. त्याप्रमाणे नेहरु मैदानचे जाहीर सभेतच उमरावती नगरपालिकेतर्फे महात्माजींना मानपत्र अर्पण करण्यात आले. हे मानपत्र नगरपालिकेचे एक सभासद श्री शामराव देशपांडे यांनी वाचून दाखविले व चांदीच्या करंडकातून ते मानपत्र नगराध्यक्ष श्री सेठ मिनामल मनभरदास यांनी गांधीजीना नम्रतापूर्वक अर्पण केले. नगरपालिकेचे मानपत्रानंतर ज्या संस्थातर्फे गांधीजींना हार अर्पण करायचे होते, अशा संस्थांची याद दे.भ.प्यारेलालजी सेवक यांनी वाचून दाखविली. त्यात उमरावती हरिजन सेवक संघ, युवक संघ, शिवाजी व्यायाम शाळा, इत्यादी बऱ्याच संस्थांची नांवे होती. ते मानपत्र पुढील प्रमाणे :-

CIVIC ADDRESS

AMRAVATI TOWN MUNICIPAL COMMITTEE

TO

MAHATMA M.K.GANDHI

Mahatmaji,

We, the members of the Town Municipal Committee, Amravati offer you our hearty welcome. We, however, feel

that the time that you could spare to pay a visit to our Municipality is too short to enable us to give you a fitting receiption. The instruction that you issued regarding presentation of Address are in your own interest and defy all aspiration that seek a vent. Those instructions help you in hurrying up your All India Tour with a maximum of out-turn within a minimum of time. They, however, render difficult, the task our constituency excepts usto do-our fitting receiption.

Of your politics we are to observe recticence. You do not want us to speak. To your work at the Round Table conference, we are not make a reference. You are out only on Harijan compaign. Over the spirit of organisation and economic emancipation to which India as a whole, is getting initlated, we are not to utter a word. You have reserved to yourself the care of those excellences that beget there qualities in a Nation. You want us to speak of Harijan and Harijans alons, We confess, we have hardly any record of repute. We have no tale to tell you.

Erstwhile, a section of the Depressed classes here, made a demand for entry in the pioneer temples at Amraoti. It was more or less an issue between two sections of citizens. The corporation of city-fathers was at a respectible distance from the controversy. Your memorable fast after the "Communal Award " give an impetus to

that problem. It was sacked after the Poonapact. Even then, the Municipality was indifferent to it. In might, hower, be said that independent of these occassional agitations in the Town, our municipality opened schools for boy & girls or depressed classes in the year 1931. About 475 students-boys and girls take up their education in these schools. The total number of teachers in schools under our control, from these classes is 5 of whom one is a lady. Outside Municipality, efforts are made towards the education of these communities by enthusiatic individuals, Housing problem of these people is the immediate call on the Municipal Fund but to our regret, it might be said that we are passing through critical position. Our funds stand deplated, and hence the problem has been and is neglected. The desire of the majority of city fathers to keep open public wells and punlic water stands for Harijans found its expression in a formal resolution of our Municipality. These communities have by now, formed into special organisations. Thruogh them, they are remainding, the corporation to extend civic emenities to them. Their demands will be attended to with promptitude and sympathy in adjustments with our purse. Of the total population of 47000 in the town about five thousands are Harijans, engaged in different pursuits of life. Barring a few that till their soil and others that carry their profession, most of them

live on labour. About 400 souls from these labourers are in civic employments.

Uptill, now owing to smooth relations, Harijan problems, never demanded any keen attention on either side. these is a section as is bound to be-which does not and cannot be in tune with the time. The progress of the cause of Harijans will have to be made, with satisfaction or circumvention of that section. Your phenomenal tour and the advice you would give, in the course of it, will compass the "never ready" light in proper direction and direct the progressive and conservatives, on to the correct path. With tourch light you might ship. both these groups will be made to combine and meet rather than bifurcate and depart. This unity, we hope, might be placed within our easy reach with the tour for purification you have undertaken, in spite of your frail health and advanced age.

So far as the purpose of your present tour is concerned, we feel you are acting-as we in our humble way do-and have assumed the role of an It inerant Municiplality. Your field is wider than ours. We work in town and look to its sanitation. You have selected the whole Hindu community as your area of operation and are out to purufy them. Our suburbs fight for independent body-politics and show a separatist tendency. You are at redarating the suburbs of the Hindu Community and health insanitary and with him

preservation of sanitations is uphill task. You also feel convinced that sanitation of the Hindu Community can be achieved only with Hepculean Labour. We have no doubt that you are not without it. It is now for the Towns and suburb of the Hindu community to respond with honesty and seal to your call withich resounds woth sterilling sincerity.

With apoligies for your poor record and with our highest regards to you.

We remain,
AMRAOTI. Mahatmaji,
Yours obediently,
President and Members
of the Town Municipal Committee,
Amraoti.

(By the Courtesey of Shri J.J.Purwar Advocate, Amravati).

त्यानंतर गांधीजींना त्यांचे हरिजन कार्यासाठी विविध संस्थातर्फे थैल्या अर्पण करण्यात आल्या होत्या.

या जाहीर सभेसाठी उमरावतीला प्रथम कारंजाहून लाऊड स्पीकर आणण्यात आला होता. लाऊड स्पीकर वरुन ज्या सभेत भाषण झाले अशी उमरावतीची ही पहिलीच सभा होती. वरील कार्यक्रम आटोपल्या नंतर महात्मा गांधी यांचे सुमारे पाऊण तास भाषण झाले. लाऊड स्पीकरमुळे ते सर्वांना ऐकू गेल्यामुळे गडबड, वगैरे झाली नाही. महात्माजी आपल्या भाषणात म्हणाले. बंधू-

भगिनीनो नगरपालिकेने मला जे मानपत्र दिले त्याबद्दल मी आभार मानतो. त्याच प्रमाणे ज्या बंधूनी हरिजन सेवेसाठी थैल्या दिल्या त्यांचाही मी आभारी आहे. माझ्या मते हरिजन कार्य हे धर्म कार्य आहे. मी पुष्कळदा लिहिले की, हया धर्म कार्यात आपण त्याग आणि तपश्चर्येने शुध्दी पावू शकतो. जो पर्यन्त आपण आत्मशुध्दी करीत नाही तो पर्यन्त आपण हरिजन कार्य करु शकत नाही. आजपर्यन्त आपण हरिजनांवर कुरघोडी बंद केली आहे त्यांना यापूढे सुख द्यायचे असेल तर ही कुरघोडी बंद करून न्यायाने वागविले पाहिजे. एकाद्या जातीला अस्पृश्य मानावे अशी कोणत्याही धर्माची शिकवण नाही. मी आपणांस हे सांगू इच्छितो की, हरिजन बंधूना जर आपण अस्पृश्य बनविले तर आमचे कार्यच चालावयाचे नाही असे नगरपालिकेने दिलेल्या मानपत्रात आहे. हया बाबतीत उमरावती नगरपालिकेकडेच विशेष दोष आहे असे नाही तर प्रत्येक ठिकाणीच हरिजनांच्या वस्तीसंबंधी हाच प्रकार दिसून येतो. हरिजन बंधूना आपण चांगल्या प्रकारे वागविले तर त्यामुळे साऱ्या समाजाला मोठा अर्थलाभ होऊ शकतो. पाश्चिमात्य लोक शास्त्राध्ययन करुनही शेवटी ह्याच निष्कर्षावर आले आहेत की, समाजात त्यांची व्यवस्था ठेवली नाही तर अर्थहानी होते. पन्नास वर्षाच्या अनुभवावरुन माझी समजूत होऊन चुकली की, धर्माला अर्थ अनुकूल असतो. आपण अस्पृश्यता काढून टाकून मनातून तर दुर करालच. पण ज्याचेजवळ द्रव्य, थोडा वेळ, अथवा शक्ति असेल ती त्याने शुध्द हेतूने निस्वार्थ बुध्दीने हया कार्यासाठी समर्पण करावी. शुध्द हृदयाने जितके कांही हरिजन कार्यासाठी द्याल ते सर्व लाभकारकच आहे. मी आपणांस धन्यवाद देतो.''

गांधीजींचे भाषणानंतर गांधीजींना येथील मुक्कामात मिळालेल्या मौल्यवान वस्तूंचा त्याचसभेत जाहीर लिलाव करण्यात आला होता. मुलांनी दिलेली एक छोटीशी चांदीची डबी, स्त्रियांच्या सभेत त्यांना मिळालेल्या आंगठ्या, नगरपालिकेने सभेत दिलेले मानपत्र ह्यांचा लिलाव करण्यात आला. चांदीची डबी पंचावन्न रुपयात येथील किराणा मालाचे व्यापारी श्री.मन्नालाल धन्नालाल यांनी घेतली तर मोनोग्रामची सोन्याची अंगठी कुरुमचे श्री.खुशाल भगवंत देशपांडे यांनी ५० रु.यास

घेतली.दुसऱ्या एका अंगठीचा ३१रु.स लिलाव लागला.नगरपालिकेने दिलेले मानपत्र ५१ रु.स नगरपालिकेचे सभासद श्री शामराव देशपांडे यांनी घेतले होते. उमरावतीच्या व्हॉल्कट कॉटन कंपनीचे एंजट मि.बस्टर्न ह्या युरोपियन गृहस्थानी या लिलांवात भाग घेतला होता. चांदीची डबी, व मानपत्र घेण्याची त्यांची भारी इच्छा होती. शेवटी सर्वाचा लिलाव झाल्यानंतर त्याला आपल्या नोट बुकावर गांधीजीचे हस्ताक्षर (स्वाक्षरी) घेऊन समाधान मानावे लागले होते. शेवटी हरिजन सेवा संघाचे अध्यक्ष रा.ब्र.ब्रम्ह यांनी आभार मानल्यानंतर महात्माजींचे जयजयकारात सभेचे काम संपले व गांधीजी आपल्या निवास स्थानाकडे गेले.

दि.१७ नोव्हेंबर रोजी सकाळी ४.३० वा.प्रार्थनेच्या वेळी ही शहरातील सुमारे ५०० लोक महात्माजींच्या निवास स्थानी गेले व त्यांनी प्रार्थनेत भाग घेतला होता. त्याच दिवशी महात्माजी व त्यांच्या सोबतची मंडळी कारंज्यास रवाना झाली.त्यांत मिराबेन, ठक्करबाप्पा, डॉ.पटवर्धन, ब्रिजलाल बियाणी व श्रीमती दुर्गाताई जोशी इत्यादी मंडळी होती.

वऱ्हाड मध्यप्रांत अस्पृश्य परिषद :- वऱ्हाड मध्यप्रांतातील आंबेडकर वादी अस्पृश्य समाजाची उमरावती येथील सुदाम थिएटर (चिंचफैल)येथे दि.१२ व १३ नोव्हेंबर रोजी नाशीकचे श्री.केशव नारायण देव यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. तीत अनेक वक्त्यांची भाषणे आणि काही ठराव मंजूर झाले होते.

वरील परिषदेचे पहिल्याच दिवशी म्हणजे १२ नोव्हेंबरला रात्री जोग चौकात राजा पक्षीय अस्पृश्यांची जाहीर सभा होऊन वरील परिषदेला विरोध करणारी भाषणे झाली होती. श्री. गायकवाड, पिटीशन रायटर, श्री राजा, अस्पृश्यांचे नेते , हे या सभेचे संयोजक व वक्ते होते.

५८) दे.भ.गंगाधरराव देशपांडे :- वर्धाहून मुंबईस जात असतांना दि.१३ नोव्हेंबर रोजी उमरावतीस आले होते. व वीर वामनराव जोशी यांचे बंगल्यावर त्यांनी स्थानिक पुढाऱ्यांशी विचार विनिमय केला.

५९) लोकनायक दिन :- दि.१३ नोव्हेंबर रोजी रात्री जोग चौकात लोकनायक दिना निमित्त वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरली.

६०) हरिजन सेवा संघाचे मे महिन्यातील कार्य :-

अमरावती जिल्हा हरिजन सेवा संघाने मे १९३३ मध्ये जे कार्य केले त्याचा अहवाल जून महिन्यात संस्थेने प्रकाशित केला.

त्यानूसार -

१) दि.८,११,१५,१६,१७ व १८ तारखांना संघातर्फे शहरातील वेगवेगळया मोहल्यामध्ये जाहीर सभा घेऊन महात्मा गांधीचे प्राणांतिक उपोषणाबद्दल माहिती देण्यात आली व हरिजनोध्दरा संबंधी जनजागृती करण्यात आली.

दि.२९ मे रोजी जोग चौकात वीर वामनराव जोशी यांचे अध्यक्षतेखाली सभा घेऊन म.गांधी प्राणांतिक उपोषणातून सहीसलामत बाहेर पडल्याबद्दल आनंद, त्यांचे अभिनंदन, त्यांच्या दीर्घायुरारोग्याबद्दल प्रार्थना करण्यात आली होती.

२) जिल्हयात प्रचाराचे दृष्टीने दि.२८ रोजी साऊर येथे डॉ.भोजराज यांच्या अध्यक्षतेखाली डॉ.वऱ्हाडपांडे यांचे '' अस्पृश्यता'' व स्पृश्य व हरिजन यांचे कर्तव्य'' या विषयावर भाषणे देण्यात आली होती.

३) तेथेच , २७ ख्रिश्चन महारांवर वैदिक मंत्रानी,होम करुन त्यांना पुन: शुध्द करुन घेण्यात आले होते. डॉ.वऱ्हाडपांडे यांनी या प्रसंगी पौरोहित्य केले होते.

४) परतवाडा,दर्यापूर,मोर्शी व चांदूर रेल्वे येथेही सभा भरविण्यात आल्या होत्या. सर्वश्री गोविंदराव महल्ले वकील, डॉ.पडोळे, जयकृष्णकांत कुऱ्हाडे, श्री.ठाकरे व श्री गुलाबराव बक्षी इत्यादींनी रहाटगांव,काटसुरा,बोरगांव,वरुड आदी ठिकाणी व्याख्याने दिली होती.

५) श्री.बेंद्रे ,श्री.गडकरी व श्री.प्रधान इत्यादींनी हमालपुऱ्यात जाऊन वर्तमानपत्रे वाचून दाखविली होती. ही वर्तमानपत्रे ही मोहनलाल यांनी मोफत पुरविली होती.

६) सौ.ताराबाई मोडक बी.ए.ह्यांनी हरिजन मोहल्यात जाऊन दररोज ३ तास तेथील महिलांना लिहिणे,वाचणे शिकविण्यास सुरुवात केली होती. सुमारे २५ महिला या वर्गाला हजर असत.पुस्तके त्यांना मोफत देण्यात आली होती. श्रीमती उमाबाई गोखले, सखुबाई गोडबोले , दुर्गाबाई जोग इ. ताराबाईंना मदत करीत होत्या.

७) आर्य समाजाचे अध्यक्ष , श्री.मोतीलाल बंसगोपाल यांनी मॅट्रीकचे वर्गातील एका हरिजन विद्यार्थ्याला पुस्तकाकरिता रु.१०/- व नंतर दर महा रु ४/- याप्रमाणे शिष्यवृत्ती देण्याचे जाहीर केले होते.

६१) डॉ.आंबेडकर जयंती सप्ताह :- हरिजनांचे पुढारी बाबासाहेब आंबेडकर हेच होत याची जाणीव सर्वांना देण्याकरिता व इतर ठिकाणीही असे सप्ताह साजरे व्हावेत याची प्रेरणा देण्याचे उद्देशाने हा सप्ताह साजरा करण्यात आला होता.

दि.९ जून १९३३ रोजी फ्रेजरपुरा येथे श्री जी.आर.भट वकील यांच्या अध्यक्षतेखाली दि.१० जून रोजी चपराशीपुरा येथे डॉ.वऱ्हाडपांडे यांच्या अध्यक्षतेखाली , दि.११ जून रोजी हमालपूरा येथे श्री प्यारेलालजी सेवक यांचे अध्यक्षतेखाली ,दि.१३ जून रोजी नंदीपुरा येथे श्री व्ही.डी.ब्रम्ह वकील यांचे अध्यक्षतेखाली,दि.१४ जून रोजी बेलपुरा येथे श्री पी.वाय.देशपांडे वकील यांच्या अध्यक्षतेखाली सभा घेण्यात आल्या होत्या व दि.१६ जून रोजी सप्ताहाचा समारोप श्री महल्ले वकील यांच्या अध्यक्षतेखाली सुदामा थिएटर,(चिंचफेल) येथे करण्यात आला होता. सभेनंतर पानसुपारी झाली. सर्व सभेतील प्रमुख वक्ते सर्वश्री पी.एन.भटकर, ल.कृ.ओगले, ऑनररी मॅजिस्ट्रेट, जी.एल.गाडगे, एन.एन.मेश्राम, पी.बी.सुखदेव हे होते.

या सप्ताहाची सुरुवात दि.८ जून रोजी वलगांव येथे "परगणा परिषद" श्री चौबळ वकील, अमरावती यांच्या अध्यक्षतेखाली भरवून झाली होती.

६२) श्री कागलकर यांचा सत्कार :- उमरावतीच्या श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे स्कॉउट आर्गनायझर व उत्साही कार्यकर्ते श्री.मु.ना.कागलकर आणि येथील बॉय स्कॉउट असोसिएशनचे चिटणिस श्री.जी.वाय.काळे हे बुडापेस्ट

(युरोप) येथे भरणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्कॉउट जांबोरीला हजर राहण्यासाठी व लंडन येथील गिलवेल पार्क येथील स्कॉउट उच्च शिक्षण घेण्यासाठी जाणार असल्याने त्यांचे अभिनंदनार्थ दि.२ जुलै १९३३ रोजी हनुमान व्या.प्र.मंडळातर्फे , गणेश थिएटरमध्ये सर मोरोपंत जोशी यांच्या अध्यक्षतेखाली सभा झाली.

६३) डॉ.पंजाबराव यांचा मंत्रीपदाचा राजीनामा :-

मध्यप्रांत वऱ्हाडचे शिक्षणमंत्री ना.डॉ.भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांनी आपल्या मंत्रीपदाचा राजीनामा दि.३१ जुलै १९३३ रोजी सादर केला.

शिक्षणमंत्री ना.पंजाबराव देशमुख आणि आबकारी मंत्री ना. गजाधरप्रसाद जायस्वाल या दोन्ही मंत्र्याविरुध्द एकूण दहा अविश्वास ठराव आले होते व ते सर्व ठराव दि. ३१ जुलै ला कायदेमंडाळीत चर्चेला येणार होते. तत्पूर्वीच वरील मंत्रीद्वयांनी आपापल्या पदाचे राजीनामे सादर केल्यामुळे या ठरावांवर चर्चा होऊ शकली नव्हती. यानंतर अमरावतीचे श्री विठ्ठल बंधूजी चौबळ वकील यांची मंत्री म्हणून नियुक्ति झाली. (ऑगष्ट १९३३)

६४) दे.भ.वीर वामनराव यांचा राजीनामा :

वऱ्हाड प्रांतिक काँग्रेस कमेटीचे सर्वाधिकारी दे.भ.वामनराव जोशी यांनी दि.३१ जुलै रोजी आपल्या सर्वाधिकारी '' पदाचा राजीनामा ऑल इंडिया काँग्रेस कमेटीचे अध्यक्ष लोकनायक बापुजी अणे यांचेकडे पाठविला होता.

६५) काँग्रेस विधायक पक्ष : दे.भ.वीर वामनराव जोशी यांनी दि.६ ऑगष्ट रोजी एक पत्रक प्रसिध्द करुन वऱ्हाडातील काँग्रेस भक्तांस काँग्रेस विधायक पक्ष'' काढण्याचे त्यांचे इराद्याची सूचना केली होती. या पत्रकात त्यांनी म्हटले होते. ''काँग्रेसचे सध्याचे अध्यक्ष लोकनायक बापूजी अणे यांनी गेल्या २२ जुलै १९३३ रोजी एक जाहीर पत्रक प्रसिध्द करुन , काँग्रेसच्या भावी धोरणा संबंधाने केलेला खुलासा सर्वाच्या अवलोकनात आलेलाच आहे. त्यामध्ये त्यांनी सांप्रत देशात चालू असलेली कायदेभंगाची चळवळ बिनशर्त बंद करण्यास काँग्रेस तयार नसून

सध्याच्या परिस्थितीत अनुसरुन तिने तूर्त सामुदायिक कायदेभंगाचे वैयक्तिक व ऐच्छिक कायदेभंगात रुपांतर केले असल्याचे आणि आता पर्यन्तच्या कामाच्या सर्व गुप्त पध्दती रद्द केल्या असून सर्व लहान थोर काँग्रेस संस्था तात्पुरत्या बंद करण्यात आल्याचे जाहीर केले आहे.

तेव्हा,काँग्रेस अध्यक्षांनी कलम ६ मध्ये सोपविलेली जबाबदारी लक्षात घेऊन सत्याग्रहापासून अलग झालेल्या वऱ्हाडातील काँग्रेस भक्तांची ''काँग्रेसविधायक पक्ष'' या नावाने एक प्रबळ संघटना निर्माण करुन तिच्या करवी काँग्रेसच्या शिथिल झालेल्या विधायक कार्यात फिरुन चालना द्यावी व काँग्रेस आणि लोक यांच्या मधील विस्कळीत झालेला संबंध अधिकाअधिक द्रृढ करावा असे मी ठरविले आहे.''

६६) हुतात्मा श्रध्दानंद स्मृतिदिन :हुतात्मा स्वामी श्रध्दानंद यांच्या स्मृतिदिना निमित्त दि.२३ दिसेंबर रोजी आर्य समाज मंदिरात सायंकाळी सिंघई पन्नालालजी यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा होउन तीत सर्वश्री प्यारेलालजी सेवक, डॉ.वऱ्हाडपांडे व जयकृष्णकांत कुऱ्हाडे यांची स्वामी श्रध्दानंद यांचे जीवनावर भाषणे झालीत. शेवटी अध्यक्षांनी समारोपाचे भाषण केले.

६७) महाराष्ट्रीय नट संस्थातर्फे प्रो.हर्षे यांचे व्याख्यान :

दि. २४ दिसेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता '' महाराष्ट्र नट संघा तर्फे गणेश चित्रपट थिएटर मध्ये ''नट आणि नाटक मंडळी'' या विषयावर प्रो.रा.ग.हर्षे वाङ्मय विशारद यांचे सुश्राव्य जाहीर व्याख्यान नामदार खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली झाले.

दे.भ.वीर वामनराव जोशी , दे.भ.नानासाहेब बामणगांवकर, डॉ.म्हैसाळकर व स्वामी शिवानंद व भोळे ब्रदर्स वगैरे मंडळी श्रोतृसमुदायात प्रामुख्याने दिसत होती. सुरुवातीला नटवर्य दाते यांनी नट संघाबद्दल थोडक्यात माहिती देवून , नटांची आर्थिक, बौध्दिक व मानसिक स्थिती सुधारण्याकरिता हा संघ स्थापण करण्यात आला असे सांगितले. त्यानंतर अध्यक्षांनी प्रो.हर्षे यांना व्याख्यान सुरु

करण्याची विनंती केली. प्रो.हर्षे यांनी आपल्या व्याख्यानाच्या शेवटी नट संघाच्या कार्याबद्दल यश चिंतून व्याख्यान संपविले. आणि नंतर अध्यक्ष ना.दादासाहेब खापर्डे यांचे समारोपाचे भाषण झाले.दादासाहेबांनी आपले भाषणांत त्यांनी त्यांच्या लहाणपणी पाहिलेल्या रंगभूमीची स्थिती, त्याचप्रमाणे पाश्चात्य रंगभूमी ,नट ,अभिनय वगैरे बद्दल प्रत्यक्ष पाहिलेली माहिती सांगून ते म्हणाले पाश्चात्यापेक्षा आपली रंगभूमी श्रेष्ठ आहे. परंतू आपल्या पूर्वीच्या नटात जी कला दिसत होती ती मात्र आताच्या नटात दिसून येत नाही.नटांनी कलेसाठी मेहनत घेणे जरुर आहे. नाटके कशी करावी हे जसे नटांनी शिकले पाहिजे तसेच नाटक पहावे कसे हेही प्रेक्षकांनी शिकणे जरुर आहे. अध्यक्षांनी शेवटी आपल्या भाषणात नट संघाबद्दल प्रसंगोद्गार काढून संघाला आशिर्वाद दिला.संघाचे चिटणीस श्री चिंतामणराव पेंडसे यांनी आभार प्रदर्शन केले. नटवर्य दाते यांनी अध्यक्षांना व वक्त्यांना पुष्पहार अर्पण केल्यावर हा समारंभ संपला.

६८) अमरावती येथे भरलेली वऱ्हाड दलित व पुढारी परिषद.

अ.भा.डिप्रेस्ड क्लास फेडरेशनच्या प्रांतिक शाखेची स्थापना -

दि.२५ दिसेंबर १९३२ रोजी अमरावती येथे चिंचफै लातील सुदामा थिएटर मध्ये वऱ्हाड दलित व पुढारी परिषदेचे ''अधिवेशन श्री.एस.एन.हरदास यांच्या अध्यक्षतेखाली भरले होते. अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष श्री बकारामजी वागळे आणि सेक्रेटरी श्री लक्ष्मणराव मेश्राम हे होते. या अधिवेशातील एका ठरावाव्दारे अखिल भारतीय डिप्रेस्ड क्लास फेडरेशची वऱ्हाड प्रांतीय शाखा स्थापण करण्यांत येउन ,अकोल्याचे श्री स.अ.खंडारे हे अध्यक्ष , के.ज. खंडारे ,श्री.व्ही.डी.मकेसर ,श्री.एम.जे.गवई व श्री.के.एन.खंडारे हे उपाध्यक्ष श्री.ल.कृ.ओगले हे जनरल सेक्रेटरी आणि इतर १४ कार्यकारणीचे सदस्य याप्रमाणे प्रांतिक कार्यकारिणीही निवडण्यात आली होती व उपाध्यक्षांना जिल्हा शाखा स्थापन करण्याचा अधिकार देण्यात आला होता. या शिवाय या अधिवेशानातील इतर ठरावा द्वारे १.राजनिष्ठा

प्रदर्शन, २.अखिल भारतीय दलित वर्गाचे पुढारी डॉ.आंबेडकरच आहेत यास मान्यता ३. पुणे कराराला पाठिंबा, देण्यात आला होता.

६९) हुतात्मा श्रध्दानंद स्मृति दिन : दि.२३ दिसेंबर १९३२ रोजी आर्यसमाज मंदिरात ''हुतात्मा श्रध्दानंद स्मृतिदिना'' निमित्त सायंकाळी श्री पन्नालालजी सिंघई यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा होऊन, तीत श्री. प्यारेलालजी सेवक,डॉ.व-हाडपांडे, श्री.कु-हाडे आणि अध्यक्षांची विचार परिपूर्ण अशी भाषणे झाली होती.

७०) भारतीय रंगभूमी व्याख्यानमाला :- पुण्याच्या ''रत्नाकर'' मासिकांचे संपादक प्रो.रा.ग.हर्षे यांची भारतीय रंगभूमि '' हया विषयावरील व्याख्याने न्यू हायस्कूल विद्यार्थी संघातर्फे , गणेश थिएटरात आयोजित केली होती. अध्यक्षस्थानी दे.भ.वीर वामनराव जोशी हे होते.

सुरुवातीला न्यू हायस्कूलचे हेडमास्तर श्री खांडेकर यांनी व्याख्यात्यांची ओळख श्रोतृवर्गास करुन दिली व नंतर वीर वामनराव यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात ''ब्रम्हदेवाने निर्माण केलेली ही सृष्टी हेच एक जगतातील उत्कृष्ट द्रृष्यकाव्य असून या विशाल जगद्रंगभूमीचे पूजन करण्याकरिता मानवाने आपली रंगभूमी निर्माण केली. अर्थात परमेश्वराची पूजा करण्याची रंगभूमि ही श्रेष्ठ जागा आहे'' असे प्रतिपादन केले होते.

ह्यानंतर प्रो.हर्षे यांनी आपले व्याख्यानास सुरुवात केली होती.प्रो.हर्षे यांची व्याख्याने एकुण सहा दिवस झाली होती. त्यापैकी ४ थ्या व ५ व्या दिवशी वीर वामनराव हे परगांवी गेल्यामुळे क्रमश: प्रो.सोमलवार व नाटककार श्री. भोळे वकील यांनी अध्यक्षस्थान स्वीकारले होते. या व्याख्यानमालेचा समारोप वीर वामनराव जोशी यांनी केला होता.

७१) पं. कानडेशास्त्री यांचे व्याख्यान :-

पं. दिनकर शास्त्री कानडे यांचे दि.६ जुलै १९३३ रोजी सायंकाळी गणेश नाटक गृहात दे.भ. वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली ''हिटलर व नाझीझम'' या प्रचलित

महत्वाच्या विषयांवर व्याख्यान झाले. या व्याख्यानाला श्रोत्यांची चिक्कार गर्दी झाली होती.

७२) श्री बा.वि.मराठे :- अखिल भारतवर्षीय आयुर्वेद विद्यापिठाच्या परिक्षेला उमरावती केंद्रातून बसलेल्या विद्याथ्यांपैकी ,विदर्भ आयुर्वेद विद्यालय अमरावती या संस्थेचे विद्यार्थी श्री बा.वि. मराठे हे '' विशारद'' परिक्षेत संबंध हिदुस्थानातील विद्यार्थ्यात पहिल्या चार क्रमांकात आले होते.

७३) रॅग्लर परांजपे :- रॅग्लर रघुनाथ पुरुषोत्तम परांजपे हे दि.४ जुलै १९३३ रोजी उमरावतीत आले असता. येथील क्लबमध्ये त्यांचे सन्मानार्थ पानसुपारीचे आयोजन करण्यात आले होते.

७४) दे.भ.डॉ.शिवाजीराव पटवर्धन यांचा भव्य सत्कार :-

उमरावतीचे सुप्रसिध्द नागरिक, वऱ्हाडच्या युवक संघाचे जनक आणि वऱ्हाड प्रांतिक काँग्रेसचे एक प्रमुख नेते.दे.भ.डॉ.शिवाजीराव पटवर्धन हे दि.१७ जुलै रोजी शिवनी तुरुंगातून सुटल्याची बातमी उमरावतीस पोचल्याबरोबर गांवात आनंदी आनंद झाला होता. दि.१८ जुलैला सायंकाळी ते मोटारने उमरावतीस येऊन पोहोचले तेव्हा त्यांचे भेटीसाठी शहरातील शेकडो लहान थोरांनी त्यांच्या घरी गर्दी केली व त्यांना हार अर्पण करुन आपल्या लाडक्या नेत्याचे जनतेने हार्दिक अभिनंदन केले. दि.१९ जुलैला सायंकाळी गणेश थिएटरमध्ये वीर वामनराव दादा यांच्या अध्यक्षतेखाली डॉक्टर साहेबांचा भव्य जाहीर सत्कार करण्यात आला. सबंध थिएटर माणसांनी चिक्कार भरले होते. डॉक्टर साहेबांचा व्यासपीठावर प्रवेश होतांच टाळ्यांचा प्रचंड कडकडाट झाला. प्रथम डॉ.भोजराज यांनी डॉ.पटवर्धन यांच्या अपूर्व देशभक्ती व स्वार्थत्यागाचा गौरवपूर्ण उल्लेख करुन उमरावती जिल्हा काँग्रेस कमेटीतर्फे पहिला हार अर्पण केला. नंतर श्रीमान सेठ पन्नालालजी सिंघई यांनी डॉक्टर साहेबासंबंधी गौरवोद्‌गार काढले. ''श्रीरामप्रभु वनवासात गेल्यामुळे अयोध्यानगरीतील आत्मा जसा नाहीसा झाला होता तशीच स्थिती

डॉक्टरसाहेबांच्या तुरुंगवासामुळे उमरावती नगरीची झाली होती.आता उमरावतीत आनंदा बरोबर चैतन्यही येईल'' असे उद्‌गार काढून त्यांनी डॉक्टर साहेबांना पुष्पहार अर्पण केला. त्यानंतर श्री.बाबासाहेब खापर्डे यांनी छोटेसे भाषण करुन हार अर्पण केला. नंतर तरुण वर्गाचे नेते दे.भ.पु.य.देशपांडे यांचे भाषण झाले. त्यानंतर वीर वामनराव दादा यांनी प्रांतिकचा सर्वाधिकारी या नात्याने १९३० साली युध्दमंडळात मी जे सभासद नेमले होते त्यात डॉ.पटवर्धन यांना सेनापती नेमले होते.'' असे म्हणून डॉक्टरांचा सन्मान केला व नंतर हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ ,विदर्भ आयुर्वेद विद्यालय, बाहुबली व्यायाम शाळा ,हिंदी सभा,मारवाडी समाज व्यापारी मंडळी इत्यादी विविध संस्थानी पुष्पहार घालून त्यांचा सन्मान केला होता. नंतर दे.भ.प्यारेलाल सेवक यांचे लहानसे भाषण झाले व शेवटी डॉ.पटवर्धन यांचे सत्काराला उत्तर देणारे समयोचित भाषण झाले. आणि डॉक्टर साहेबांच्या जयजयकारांत हा सत्कार समारंभ समाप्त झाला.

त्यानंतर दि.३१ जुलै रोजी रात्री जुगल किशोर व्यायाम शाळेत श्रीमान फत्तेचंदजी यांच्या अध्यक्षतेखाली दे.भ.डॉ.पटवर्धन यांना पानसुपारी करुन त्यांचा गौरव करण्यात आला होता. नंतर श्री शिवाजी व्यायाम शाळेतही डॉ.पटवर्धन यांचा सत्कार करण्यांत आला.

७५) <u>लोकनायकांचे अभिनंदन</u> :-वैयक्तिक सत्याग्रह करुन अटक करवून घेतल्याबद्‌दल लोकनायक बापूजी अणे यांचे अभिनंदनार्थ दि.१७ ऑगष्ट रोजी रात्री जोग चौकात वऱ्हाडचे सर्वाधिकारी दे.भ.केशवराव लेले वकील यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरुन तीत दे.भ.बामणगांवकर ,डॉ.सबनीस आणि दे.भ.वीर वामनराव जोशी यांची भाषणे झाली. काँग्रेसचे सर्वाधिकारी लोकनायक बापुजी अणे यांनी अकोला येथे जंगल सत्याग्रह करण्याची घोषणा केली होती व त्यानुसार तेरा सत्याग्रहीसह ते जंगल सत्याग्रहात लोणीचे जंगलात दि.१३ ऑगष्ट १९३३ रोजी जाण्यास निघाले तेव्हा त्यांचेसह सर्व सत्याग्रहांना पोलिसांनी आकोला शहर पोलीस स्टेशन नजीक अटक केली होती. व त्यांचेवर फर्स्ट क्लास मॅजिस्ट्रेटचे

कोर्टात खटला चालून दि.१५ ऑगष्ट रोजी श्री अणे यांना सहा महिने साधी कैद व २५० रु.दंड व दंड न भरल्यास ३ महिने कैद अशी शिक्षा देण्यात आली होती. त्यांच्या सोबतचे तेरा सत्याग्रही पैकी दोन महिला सत्याग्रही सौ.काशीबाई काळे व सौ.गीताबाई सराफ यांना सोडून देण्यात आले होते व उरलेल्या ११ सत्याग्रहींना प्रत्येकी ६ महिने सक्त मजूरीची शिक्षा देण्यात आली होती. अटक होण्यापूर्वी लोकनायक बापूजी अणे यांनी परांजपे दे.भ.शार्दुलसिंग यांना सर्वाधिकारी म्हणून घोषित केले होते.

७६) सौ.कमलादेवी चटोपाध्याय :- काँग्रेस मधील समाजवादी कार्यकर्त्या व प्रसिध्द वक्त्या सौ.कमलादेवी चटोपाध्याय हया दि. १५ ऑक्टोंबर रोजी वर्धेहून अमरावतीला आल्या त्याच दिवशी सायंकाळी त्यांचे बडनेरा येथे गिरणी कामगारांच्या सभेत भाषण झाले व नंतर, उमरावती राष्ट्रीय मंडळातर्फे उमरावती येथील जाग चौकात रात्री ८ वा.आयोजित केलेल्या जाहीर सभेतही त्यांचे ''सद्य:स्थिती''या विषयांवर मराठी व इंग्रजीतून सुश्राव्य भाषण झाले.सभेचे अध्यक्षस्थानी डॉ.भोजराज हे होते. तसेच दि.१६ रोजी सकाळी थिऑसॉफिकल लॉजतर्फे त्यांचे श्री बाबासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली ''पुनरज्जीवन'' या विषयावर व्याख्यान झाले. नंतर दुपारी त्या येथून खामगांवला रवाना झाल्या होत्या. तत्पूर्वी त्यांनी स्थानिक कार्यकर्त्यांशी राजकीय चर्चा केली.

७७) उमरावतीचे श्री.बाबासाहेब खापर्डे मंत्री झाले :-

मध्यप्रांत वऱ्हाड कायदे मंडळात दि.९ मार्च रोजी ना.शरीफ,चौबळ या मंत्र्याविरुध्द अविश्वास व्यक्त झाल्यानंतर उमरावतीचे श्री.बाबासाहेब खापर्डे आणि वर्धेचे रा.ब.नायडू यांचे मंत्री मंडळ दि.१२ मार्च रोजी अस्तित्वात आले. श्री बाबासाहेब खापर्डे यांचे कडे शिक्षण, आरोग्य , शेतकी व सहकार ही खाती सोपविण्यात आली होती. श्री.बाबासाहेब खापर्डे शिक्षण मंत्री म्हणून दि.२० मार्च रोजी प्रथमच जेव्हा उमरावतीस आले तेव्हा त्यांचा विविध संस्थातर्फे सत्कार करण्यात आला होता व त्यांना ठिकठिकाणी पानसुपाऱ्या झाल्या होत्या. कित्येक चाहत्यांनी पेढे वाटूनही

आपला आनंद व्यक्त केला.

७८) स्थानिक स्वराज्य खात्याचे मंत्री उमरावतीत :

मध्यप्रांत वऱ्हाडच्या स्थानिक स्वराज्य खात्याचे मंत्री ना.रावबहादूर के.एस.नायडू हे मंत्री पदावर आरुढ झाल्यानंतर प्रथमच दि.२६ मार्च रोजी उमरावतीस आले होते. दि.२८ मार्च पावेतो त्यांचा येथे मुक्काम होता. या काळांत येथील अस्पृश्य वर्गातर्फे त्यांचा बेलपुऱ्यात सत्कार करण्यांत आला होता. तसेच ब्राम्हणेत्तर कक्षाच्या कार्यकारी मंडळाची सभाही त्यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. या दौऱ्यात त्यांनी उमरावतीचे पाणी पुरवठयाचे संदर्भात लालखडी बोऊरिंगची पाहाणी केली.

७९) महात्माजी वरील बाँब हल्ल्यांचा निषेध :- दि.२५ जून रोजी पुणे नगरपालिकेचे सभागृहात जात असता महात्मा गांधी यांचेवर बाँब फेकून त्यांचे जीवाला अपाय करण्याचा जो अत्यंत निंद्य प्रयत्न करण्यात आला होता, त्याचे निषेधार्थ उमरावतीच्या गवई लायब्ररी मध्ये दि.३० जून रोजी प्रमुख हरिजन मंडळींनी सभा सायंकाळी श्री.पी.के.भटकर लोकल बोर्ड मेंबर , यांच्या अध्यक्षतेखाली भरुन निषेध करण्यात आला व या संकटातून गांधीजी वाचले म्हणून त्यांचे अभिनंदन व त्यांना दीर्घायुरारोग्य लाभो अशी सदिच्छा व्यक्त करणारा ठराव मंजूर करण्यात आला होता.

८०) विदर्भ महिला परिषदेचा त्रैवार्षिक अहवाल :

अखिल भारतीय महिला परिषदेची उमरावती शाखा सप्टेंबर १९३१ मध्ये स्थापन झाली होती. तिला आता तीन वर्ष पूर्ण होत आहेत. आतापर्यंत एकूण १३ सभा झाल्या. उमरावती शहरातील लहान मोठया सर्व स्टर्न स्त्री समाजाचे एकीकरण व्हावे व स्त्रियांचा संघ जास्त बळकट व्हावा या हेतूने कार्यकारी मंडळाने परिषदेने काढलेल्या संस्थाकरिता व परिषदेला संलग्न करुन घ्यावयाच्या संस्थाकरिता अशी दोन नियम पत्रके काढून पुढील स्त्री समाजाकडे पाठविली.

१. वनिता समाज २. महिला समाज ३.भारत समाज ४. मुधोळकर पेठ क्लब ५.

लेडी यशोदाबाई जोशी क्लब ६. महिला स्नेह संवर्धन मंडळ ७. हरिजन स्त्री शिक्षण संघ ८. साक्षरता प्रसारक संस्था. पैकी वनिता समाज हरिजन स्त्री शिक्षण संघ व महिला स्नेहसंवर्धन मंडळ यांनी परिषदेचे नियम पत्रक भरुन आपल्या संस्था परिषदेत जोडल्या आहेत. भारत समाजाने नुसता वार्षिक रिपोर्ट पाठविण्याचे कबुल केले आहे. परिषदेने स्थापिलेल्या साक्षरता प्रसारक संस्थेनेही आपला रिपोर्ट व नियम पत्रक भरुन पाठविले आहे. ह्या संस्था उत्तम तऱ्हेने कार्य करीत आहेत.

या सर्व संस्था परिषदेच्या सभासदांनीच चालविलेल्या आहेत. या शिवाय आमच्यापैकी काही स्त्रियांची नेमणूक उमरावतीत खालील प्रमुख संस्थांच्या कमेटीमध्ये झालेली असल्यामुळे तेथेही आम्हास आमचे मत प्रतिपादन करता येते.ह्या संस्था म्हणजे -

१. मुलींचे हायस्कूल २.डफरिन हॉस्पीटल ३.इर्विन हॉस्पिटल ४. मोटे सुतिकागृह ५. सेंटर्स ६. डिस्ट्रीक्ट कौंसिल ७. जेल कमेटी ८. उमरावती लोकल बोर्ड ह्या होत.

परिषदेने गेल्या वर्षात कांही महत्वाची कामे केली. पहिले म्हणजे ''प्रचार कार्य'' होय. सौ.लक्ष्मीबाई नाईक यांनी मे महिन्याचे सुटीत खेडोपाडी जाऊन तेथील स्त्रियांना शिक्षण ,स्वच्छता, मतदानाचे हक्क, संतति नियमन इत्यादी विषयांची माहिती व्याख्यानद्वारा दिली. परिषदेत यंदा एकूण चार व्याख्याने झालीत.

इ.स.१९३४

१) या वर्षीच्या पदव्या.·

२) सौ.रुक्माबाई यांचा सत्कार.

३) ठाकूर वर्माचे व्याख्यान.

४) आधुनिक तंत्रज्ञानावरील नाटक 'गोकुळाचा चोर'.

५) संगीत 'श्रीमुखात'.

६) रा.बाबासाहेब देशपांडे यांची ऐतिहासिक व्याख्यानमाला.

७) वनिता समाजाचा वार्षिकोत्सव .

८) महिलांचे सांस्कृतिक योगदान.

९) लोकनायक दिन.

१०) रा.स्व.संघाचा मकर संक्रमण उत्सव

११) धरणीकंप

१२) हरिजन वस्तीत हळदीकुंकु

१३)छत्रसाल हिंदी वाचनालयाचे उद्घाटन

१४) नरुभाऊ परांजपे स्मारक मंडळ

१५) स्वातंत्र्य दिन

१६) बिहार दिनाची सभा

१७) शुध्दिकरण

१८) काँग्रेस पक्षाचे पुनरुज्जीवन

१९) श्री. कृ.कोल्हटकरांच्या निधनाबद्दल शोकसभा

२०) सत्यशोधक विवाह

इसवी सन १९३४ ची दैनंदिनी

१) नूतन वर्षाच्या पदव्या : सरकारने नुतन वर्षानिमित्त उमरावतीच्या उर्दू हायस्कूलच्या मुख्याध्यापक ख्वाजा लतिफ यांना ''खानसाहेब'',डॉ.एस.व्ही.भागवत व श्री.आर.डी.सरंजामे वकील यांना ''रावसाहेब''ह्या पदव्या दिल्या आहेत.

२) प्रो.सौ.रुक्माबाई यांचा सत्कार : प्रो.सौ.रुक्माबाई यांचा सर्कसचा मुक्काम उमरावतीस असतांना दि.६ जानेवारी रोजी,महिला सभेतर्फे सौ.स्नेहलता बाई देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली प्रो.रुक्माबाई यांचा सत्कार करण्यात आला होता. प्रो.सौ.रुक्माबाई यांची अचाट शक्तीची कामे व जंगली जनावरांना आदेशानुसार काम करावयास लावण्याची त्यांची हातोटी पाहून लोक थक्क होत असत. प्रो.रुक्माबाई या एका स्त्रीच्या मालकीची ही सर्कस होती. या स्त्रीच्या कतृत्वाचा उमरावतीच्या स्त्री वर्गाला रास्त अभिमान वाटल्यामूळेच हे कतृत्व पाहून त्यास प्रोत्साहन मिळावे म्हणून महिला समाजाने हा सत्कार समारंभ सर्कसच्या पहिल्या खेळाचे शेवटी घडवून आणला होता. याप्रसंगी अध्यक्षांच्या हस्ते प्रो.रुक्माबाईंना सुवर्ण पदक देऊन त्यांचा गौरव करण्यात आला होता.

३) ठाकूर वर्मा यांची व्याख्याने : जानेवारीच्या पहिल्या आठवड्यातच लाहोरचे सुप्रसिध्द आर्य समाज पुढारी ठाकूर कहानचंद्रजी वर्मा यांची ब्रम्हविद्या मंदिरात ''हिंदू संगठन'' ''ख्रिस्त जन्मलाच नव्हता'' आणि ''एकोणविसाव्या शतकातील अद्वितिय थोर पुरुष'' या विषयावर सुश्राव्य अशी व्याख्याने झाली होती.

४)'' गोकुळचा चोर '' : आनंद संगीत नाटक मंडळीने उमरावतीचे मुक्कामात प्रथमच आधुनिक तंत्र ज्ञानाचे साह्याने बसविलेले '' गोकुळचा चोर '' हे धार्मिक कृष्ण लिलेवर आधारलेले नाटक दि.१० जानेवारी रोजी रंगभूमीवर आणले होते. कृष्णाच्या बाललीला हा विषय , अद्भूत व भरजरी देखाव्याची भरपूर भर पडल्यामुळे दैवी चमत्कार प्रत्यक्ष रंगभूमीवर दिसत असे. साईड म्युझिक ब्लॉक आर्ट देखावे

सिनेमाची जोड, मायक्रोफोन ,ग्रामोफोन इत्यादी आधुनिक साधनांची साथ या नाटकात असल्यामूळे ''गोकुळचा चोर '' या नाटकावर प्रेक्षकांच्या उड्या पडत होत्या दररोज या नाटकास प्रचंड गर्दी होत असे. हे नाटक रंगभूमीवरील नाट्य क्षेत्रात क्रांती करणारे व नाट्य कंपन्यांना आपले नाटक लोकप्रिय करुन पैसा कसा मिळवावा याचे मार्गदर्शन करणारे आहे असा प्रेक्षकांचा अभिप्राय होता. नाट्यक्षेत्रातील परिवर्तनाचे पहिले दर्शन उमरावतीकरांना ह्या नाटकामुळे झाले होते.

५) संगीत ''श्रीमुखात : उमरावतीच्या किंग एडवर्ड कॉलेज मधील काही विद्यार्थ्यांनी स्थापण केलेल्या '' नूतन नाट्य मंडळ'' या संस्थेतर्फे विदर्भ आयुर्वेद विद्यालयाचे मदतीकरिता दि.११ जानेवारी रोजी गणेश नाट्य गृहात श्री.बाबासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली संगीत ''श्रीमुखात'' हा नाट्य प्रयोग करुन दाखविण्यात आला होता.त्यातील सर्व कलावंत स्थानिक हौशी होते. या प्रयोगासाठी आनंद संगीत नाटक मंडळीच्या सिनसिनेरीचा उपयोग केला होता.

६) ऐतिहासिक व्याख्यानमाला : उमरावतीच्या ज्ञान प्रसारक मंडळातर्फे दि.५,७,१० व १२ जानेवारी रोजी ना.दादासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली ब्रम्हविद्या मंदिरात पुण्याचे सुप्रसिध्द इतिहास संशोधन रा.सा.बाबासाहेब देशपांडे यांची ऐतिहासिक व्याख्याने आयोजित केली होती. या व्याख्यानास दररोज स्त्री पुरुष श्रोत्यांची भरगच्च उपस्थिती राहत असे. पहिल्या व्याख्यानाचा विषय '' भारतीय संस्कृतीचा जगावर परिणाम '' हा होता व त्यानंतरची व्याख्याने '' शिवछत्रपतींचा दक्षिण दिग्विजय '' '' राजारामकालीन महाराष्ट्राची स्थिती'' व '' शिवाजींची आग्र्याहून सुटका'' या ऐतिहासिक विषयावर झाली होती.

७) वनिता समाजाचा वार्षिकोत्सव : वनिता समाजाचा वार्षिकोत्सव नगर पालिकेचे सभागृहात येथील डेप्युटी कमिश्नरांच्या पत्नी मिसेस मेक्लिघन यांच्या अध्यक्षतेखाली थाटाने साजरा करण्यात आला होता. या वार्षिकोत्सव समारंभाला स्त्री वर्गाची चिक्कार गर्दी झाली होती. शेवटी अध्यक्ष मिसेस मेक्लिघन यांचे अध्यक्षीय भाषण झाले. त्यांनी संस्थेच्या कार्याबद्दल प्रशंसोद्गार काढले होते.

आभार प्रदर्शना नंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

८) विदर्भ महिला परिषदेचे संस्कृती दान :विदर्भ महिला परिषदेच्या स्थानिक शाखेतर्फे संक्रांती निमित्त गोळा केलेल्या वर्गणीचा उपयोग आठ वर्षा खालील संस्थाना गरजेच्या वस्तूची भेट देण्यासाठी करण्यात आला होता. इरविन हॉस्पिटल - चादरी २६, मांजर पाट सांडेनउवार ब्लँकेट्स २, हंबर्डे हॉस्पिटल - चादरी ८, मांजरपाट साडेनउवार व ब्लँकेट्स नग - २, जोग दवाखाना इझी चेअर्स (आराम खुर्च्या) नग - २ , कॅम्प सेंटर - कापड २९वार , साबनपेटी -१ बार्ली डबा - १,मसानगंज सेंटर - कापड साडे एकविसवार , टावेल्स -१२ , साबनपेटी -१ , व बार्ली डबा - १.

संयुक्त अस्पृश्य वसतिगृह - कापड २४ वार , कपडयांसाठी हरिजन विद्यार्थी (हस्ते सौ.लक्ष्मीबाई नाईक) कापड दोन ठाण .

९) लोकनायक दिन : दि.१३ जानेवारी रोजी वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली जोग चौकात " लोकनायक दिना " निमित्त जाहिर सभा होऊन तीत , डॉ.भोजराज , श्री. राजाभाऊ देशपांडे, व श्री.पी.वाय. देशपांडे , श्री. हरिहरराव देशपांडे व डॉ.पटवर्धन यांची व अध्यक्षांचे भाषण झाले. या सभेतच नागपूरचे देशभक्त श्री.पूनमचंद जी राका हे नागपूर तुरुंगात आजारी असून त्यांची भेट त्यांच्या पत्नीस घेण्यासाठी सरकारने परवानगी नाकारल्या बद्दल सरकारचा निषेधही करण्यात आला.

१०) राष्ट्रीय स्वंयसेवक संघ : संघाच्या उमरावती शाखेचा मकर संक्रमणोत्सव दि.१४ जानेवारी रोजी सायंकाळी देशभक्त नानासाहेब गोखले वकील यांच्या अध्यक्षतेखाली न्यू हायस्कूलच्या काळाव बिल्डींगचे नवीन सभागृहात साजरा करण्यात आला.

सुरुवातीला संघाच्या कार्यकर्त्यांनी संघाची विचारसरणी व कार्यपध्दती स्पष्टपणे विशद करुन सांगितली. नंतर अध्यक्षांचे माननीय व विचार प्रवर्तक भाषण झाले.

शेवटी तिळगुळ देण्यात येऊन समारंभ संपला होता. या समारंभासाठी निमंत्रित केलेल्या नागरीकांत वीर वामनराव जोशी , डॉ.पटवर्धन , डॉ.भोजराज , श्री.भट वकील , श्री. वा.आवठे वकील ,श्री.नारायणराव भट, डॉ.व्ही.जोशी , श्री.अप्पाजी मुळे,श्री.पाठक वैद्य इत्यादी सद्गृहस्थ व इतर अनेक लोक उपस्थित होते. न्यु हायस्कूलची शिक्षक मंडळीही उपस्थित होती. आर्य समाजाचे कार्यकर्ते डॉ.वऱ्हाडपांडे श्री.जगन्नाथजी तिवारी , पं.प्यारेलाल सेवक इत्यादी लोकही हजर होते. संघचालक श्री.नानासाहेब बामणगांवकर ह्यांना अनपेक्षित निकडीचे कामासाठी बाहेरगांवी जावे लागल्याने ते उपस्थित नव्हते.

११) धरणीकंप : दि. १५ जानेवारी रोजी दुपारी सव्वादोनचे सुमारास उमरावती शहराला धरणीकंपाचा सौम्य असा धक्का बसला होता. हा धरणीकंप कित्येकांना जाणवला तर , कित्येकांच्या तो लक्षातही आला नव्हता.

१२) हरिजन वस्तीत हळदीकुंकू : दि.१५ जानेवारी रोजी दुपारी खोलापुरी गेटचे आतील हरिजन मोहल्ल्यात श्रीमती मालतीबाई बागवे यांच्या अध्यक्षतेखाली हळदीकुंकू झाले. त्यात अस्पृश्य महिलांनी प्रामुख्याने भाग घेतला होता. नागपूरच्या सौ.जनाबाई चौधरी आणि अमरावतीच्या इतर प्रमुख महिलांची याप्रसंगी '' अस्पृश्यता निवारण'' या विषयांवर भाषणे होऊन मंदीर प्रवेशास पाठिंबा देण्यात आला होता.

१३) छत्रसाल हिंदी वाचनालयाचे उद्घाटन : अमरावतीच्य हिंदी हितैषी उत्साही मंडळाने सुरु केलेल्या ''श्री छत्रसाल हिंदी वाचनालयाचे '' उद्घाटन दि.२० जानेवारी रोजी आठवडी बाजारातील बालाजी मंदीराच्या जागेत ना.दादासाहेब खापर्डे यांच्या हस्ते झाले.

१४) नरुभाऊ परांजपे स्मारक मंडळाची स्थापना : नरुभाऊ परांजपे यांच्या चाहत्यांनी सभा दि.२४ जानेवारी १९३४ रोजी न्यु हायस्कूल मध्ये भरुन कै.नरुभाउ परांजपे स्मारक मंडळ स्थापन करण्यात आले होते.श्री.रा.गोखले ,श्री.इनामदार

,श्री.राजवाडे ,श्री.जवादीवार आणि इतर काही सद्गृहस्थ आणि विद्यार्थी ह्यांनी निधि जमविण्याचा निर्णय या सभेत घेतला. कै.परांजपे यांचे स्मारक उभारण्यासाठी निधि जमविण्याचा निर्णय या सभेत घेण्यात आला होता. दि.२५ जानेवारी ३४ रोजी गजानन समाजातर्फे गणेश थिएटर मध्ये परांजपे स्मारक मंडळाचे मदतीकरिता ''बेबी'' ह्या नाटिकेचे दोन प्रयोग केले होते. अशा उत्पन्नातून एक '' परांजपे शिल्प'' निर्माण करावे व दरवर्षी टुर्नामेंट भरुन कै.नरुभाऊची स्मृती कायम ठेवावी हा या मंडळाचा उद्देश होता.

१५) स्वातंत्र्यदिन :स्वातंत्र्यदिना निमित्त दि.२६ जानेवारी रोजी सकाळी जोग चौकात ध्वज वंदनाचा कार्यक्रम व सायंकाळी वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली जाहिर सभा झाली होती. सभेत डॉ.भोजराज ,दे.भ.हरिहरराव देशपांडे , डॉ.शिवाजीराव पटवर्धन यांची भाषणे झाली होती.

१६) बिहार दिनाची जाहिर सभा : दि.२८ जानेवारी ३४ रोजी सायंकाळी गणेश नाट्यगृहात दे.भ.नानासाहेब गोखले यांच्या अध्यक्षतेखाली सर्वपक्षीय नागरिकांची जाहीर सभा भरुन ''बिहार दिन'' साजरा करण्यात आला होता. '' आजचा दिवस जास्त बोलण्याचा नसून, बिहार मधील आपद्ग्रस्तांना मदत करण्याचा आहे.'' अशी अध्यक्षांनी आपल्या भाषणाची सुरुवात केली होती.अध्यक्षांचे प्रास्ताविक भाषणानंतर दे.भ.हरिहरराव देशपांडे व सौ.पार्वतीबाई पटवर्धन यांनी हृदयस्पर्शी भाषणे करुन '' भूकंपामुळे निराश्रित झालेल्या संकटग्रस्त लोकांना मदत करण्यासाठी सर्वांनी पुढे यावे '' असे आहावन केले. नंतर श्री. बाबासाहेब खापर्डे , नागपूरचे दे.भ.छगनलालजी भरुका व उमरावतीचे श्री.मोतीलाल बंसगोपाल ह्यांची ही भाषणे झाली. त्यानंतर डॉ.पटवर्धन यांनी ''भुकंप सहाय्यक समिती'' चा ठराव मांडला व तो सर्वानुमते मंजूर होऊन , श्री.सेठ छक्कीलालजी खरैया यांचे अध्यक्षतेखाल एकसमिती निवडण्यात आली होती.या समितीचे उपाध्यक्ष वीर वामनराव दादा आणि डॉ.पटवर्धन व श्री.लक्ष्मीनारायण मालानी हे दोघे चिटणीस होते. यासभेतच भूकंप निधिला आतापर्यंत मिळालेल्या देणग्यांची यादी डॉ.भोजराज

यांनी वाचून दाखविली त्याचप्रमाणे श्री.व्ही.डी.ब्रम्ह यांनीही बाररुम व न्यायधिशांकडून मिळालेल्या देणग्यांची माहिती सांगितली.

१७) शुध्दिकरण : अमरावती आर्य समाजातर्फे दि.३० जानेवारी रोजी अंजनसिंघी (ता.चांदूर) येथील अजीजखाँ वल्हदीन महंमद खाँ जातीवंत मुसलमान यास , त्याचे विनतीवरुन शुध्द करुन घेतले होते शुध्दिकार्य डॉ.वऱ्हाडपांडे यांनी केले होते. यासमारंभाला डॉ.सबनीस ,श्री.गुलाबराव ठाकरे ,पं.रामेश्वरजी , श्री.जगन्नाथ प्रसाद तिवारी , श्री.जयकृष्णपंत कुऱ्हाडे इत्यादि बरीच मंडळी होती. शुध्दिकृताचे नाव अजाबराव आर्य असे ठेवण्यात आले होते.

१८) काँग्रेस पक्षाचे पुनरुज्जीवन :

प्रांतिकचे अध्यक्षवीर वामनराव जोशी यांचे पत्रक :

पाटणा येथील ऑल इंडिया काँग्रेस कमेटीच्या गेल्या बैठकित ठरलेल्या निर्णयास अनुसरुन , काँग्रेसच्या संगठनेस व कार्यास आता सर्वत्र प्रारंभ झालेला असून , सरकारने काँग्रेस संस्थेवरील बंदी उठविल्यामूळे शक्य तितक्या लवकर जोमाने व उत्साहाने पूर्ण करण्याचा मार्ग आता सर्व बाजूंनी खुला झालेला आहे. त्याचप्रमाणे पाटणा येथे भरलेल्या ऑ.इं.काँ.क.ने पूर्वानुभव लक्षात घेउन कौंसिल बहिष्कारास कायमची रजा दिल्यामूळे काँग्रेस मधील मुख्य व महत्वाचा मतभेद नाहीसा होउन काँग्रेस धोरण सर्व संग्राहक स्वरुपाचे बनले आहे व कार्यक्रमात सर्व व्यापकत्व प्राप्त झाले आहे. तेव्हा यापुढे काँग्रेस मधील सर्व पक्षो पक्षांनी परस्परांसंबधीचे पूर्वीचे सर्व गैरसमज सोडून देउन एकजुटीने काँग्रेसच्या कामाचा विस्तार करण्यास कोणत्याही प्रकारचा प्रत्यय उरलेला नाही. ही बदललेली परिस्थीती लक्षात घेउन लोकनायक बापूजी अणे यांच्या सूचनेवरुन मी गेल्या ता.१० रोजी अमरावती येथे वऱ्हाडातील सर्व काँग्रेस पक्षोपक्षाच्या प्रमुख कार्यकर्त्यांची एक औपचारिक सभा बोलविली होती. सदर सभेत लोकनायकांनी परिस्थितील या इष्ट बदलाचे महत्व आपल्या अधिकारवाणीने सर्वास उत्तम प्रकारे समजावून दिले व यापूढे काँग्रेस सर्व

कार्यक्रम आपणा सर्वांचाच आहे , त्यात आपपरभाव मांडण्याचे आता काहीच प्रयोजन राहिले नाही. हे पूर्णपणे ध्यानात ठेवून आपण सर्वांनी एकभावाने हे कार्य शक्य तितक्या लवकर सिध्दीस नेऊन आपल्या जिवंतपणाचीच नव्हे तर , समर्थपणाची ही खात्री स्वपक्षास व परपक्षास पटवून द्यावी अशी कळकळीची विनंती आहे. यापुढे देशात ''काँग्रेस पक्ष'' हा एकच पक्ष काँग्रेसच्या छत्राखाली प्रामुख्याने वावरतांना दिसला पाहिजे ही एकच महत्वाकांक्षा सर्वाच्या अंतकरणात सदैव जागृत राहिली पाहिजे.

आपला सर्वांचा नम्र सेवक.

अमरावती - वऱ्हाड वामन गोपाळ जोशी
सोमवार . ११ जून १९३४ इ.स. अध्यक्ष
वऱ्हाड प्रांतीक काँग्रेस कमेटी

१९) श्रीपाद कृष्ण कोल्हटकरांचे निधनाबद्दल दुख:वट्याची सभा : कै .श्रीपाद कृष्ण उर्फ तात्यासाहेब कोल्हटकरांचे निधनाबद्दल दुख: व्यक्त करण्यासाठी दि.१३ जून १९३४ रोजी ब्रम्हविद्या मंदिरात देशभक्त वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली दुख:वट्याची सभा भरली होती. या सभेला शहरातील बरेच साहित्य सेवक हजर होते. श्री.बामणगांवकर ह्यांनी दुख:वट्याचा ठराव मांडला व कै.तात्यासाहेब कोल्हटकर यांच्या गुणगौरवपर भाषण केले. ह्या ठरावास कवी भूषण प्र.ब.ग.खापर्डे , सरचिटणीस विदर्भ साहित्य संघ यांनी पाठिंबा दिला अध्यक्षांनी समयोचित भाषण करुन ठराव सभेपुढे मांडला व सर्वांनी उभे राहून तो पास केला.

२०) सत्यशोधक पध्दतिचे लग्न : उमरावतीचे प्रख्यात श्री. जयराम पाटील यांच्या मुलीचा विवाह दि.१८ जून रोजी बंसी बागेत सत्यशोधक पध्दतीने करण्यात आला. या विवाहाला ना. दादासाहेब खापर्डे यांच्यासह शहरातील अनेक प्रमुख लोक उपस्थित होते.

२१) शिक्षण मंत्र्यांना पानसुपारी : दि.२५ जून रोजी सायंकाळी उमरावती नगर

पालिकेचे सभागृहात मध्यप्रांत वऱ्हाडाचे शिक्षण मंत्री ना.बाबासाहेब खापर्डे ह्यांना पानसुपारी देण्यात आली.

२२) पैगंबर जयंती : दि.२५ जून रोजी सकाळी गणेश नाटक गृहात लाहोरचे वकील खान महंमद बशीर अहमद खान यांच्या अध्यक्षतेखाली इस्लाम धर्माचे संस्थापक महंमद पैगंबर यांचा जयंती उत्सव साजरा करण्यात आला होता. याप्रसंगी खान बहादुर मुजफ्फर हुसैन , मी. संजाना , डॉ.पटवर्धन , रावसाहेब सरंजामे , वीर वामनराव जोशी इत्यादि नेत्यांची पैगंबराच्या जीवनावर भाषणे झाली होती. या समारंभाला मुसलमान आणि हिंदू मोठ्या संखेने हजर होते.

२३) काँग्रेस साम्यवादी पक्षासंबंधी चर्चा : दि.७ जूलै रोजी रात्री श्री. पी.वाय देशपांडे यांच्या घरी एक औपचारिक बैठक आयोजित करण्यात आली होती . या बैठकीला दे.भ.वीर वामनराव जोशी , डॉ.भोजराज वैद्य, मुळे , दे.भ.हरिहरराव देशपांडे , श्री.अब्दुल वहाब, मौलाना आझाद इत्यादी उमरावतीचे लहानथोर कार्यकर्ते व अकोल्याचे श्री.सदाशीवराव केळकर , भाई पेंडसे श्री. पुराणीक आणि मेहकरचे डॉ.कुळकर्णी इत्यादी मंडळी उपस्थित होते. काँग्रेस साम्यवादी पक्षाची रुपरेषा व धोरण यासंबंधी दे.भ.जयप्रकाश नारायण यांनी माहिती या बैठकीत दिली व नंतर चर्चा होऊन वऱ्हाडमध्ये काँग्रेस साम्यवादी पक्ष स्थापण व्हावा या संबंधी जयप्रकाशजींनी कार्यकर्त्यांशी बोलणे केले होते.

२३अ) वऱ्हाड काँग्रेस साम्यवादी पक्षाची स्थापणा : दे.भ.जयप्रकाश नारायण हे उमरावतीस भेट देऊन गेल्यानंतर उमरावती येथेच "वऱ्हाड काँग्रेस साम्यवादी पक्षाचे" स्थापना होउन या पक्षाचे ऑर्गनायझींग सेक्रेटरी म्हणून दे.भ.पु.य.देशपांडे वकील यांची नियुक्ती करण्यात आली होती. त्या नात्याने श्री.पु.य.देशपांडे यांनी दि.३१ जुलै रोजी एक पत्रक प्रसिध्द करुन या पक्षाची ध्येय , धोरणे वगैरे जाहीर केली व वऱ्हाडातील तरुणांनी या पक्षाचे सभासद होण्यासाठी आवाहन केले. या पक्षाचे सुरुवातीचे सभासद म्हणून सवश्री आचार्य त्र्यंबक गुरुजी, श्री.दि.ह.सहस्त्रबुध्दे ,श्री.अब्दुल वहाब,सौ.विमलाबाई देशपांडे , डॉ.पातूरकर ,

श्री.बाळकृष्ण विष्णू मराठे ,डॉ.गोपाळराव देशमुख (चां.बाजार) , डॉ.काशीकर (वाशीम),डॉ.कुळकर्णी (मेहकर),कॉ.सजन (बडनेरा) कामगारांतर्फे श्री.चुनीलाल (चांदूर ता.शेतकऱ्यांतर्फे) व श्री.पु.य.देशपांडे ऑर्गनायझिंग सेक्रेटरी वऱ्हाड करिता हे होते.

काँग्रेस सोशालिस्ट पक्ष : भारतात काँग्रेस सोशालिस्ट पक्षाचा जन्म मे १९३४ मध्ये झाला व दि.१७ मे १९३४ रोजी या पक्षाची माहिती अखिल भारतीय परिषद पाटणा येथे आचार्य नरेंद्र देव यांचे अध्यक्षतेखाली झाली होती. याबैठकीनंतरच या पक्षाच्या प्रांतवार शाखा स्थापण झाल्या होत्या.काँग्रेस सोशालिस्ट पक्षाच्या स्थापनेचे सुतोवाच श्री.जयप्रकाश नारायण हे १९३२-३३ चे काळात नाशिक तुरुंगात असतांनाच त्यांनी केले होते. त्यांचेच दृष्य फळ म्हणून वर प्रमाणे हा पक्ष जन्माला आला या पक्षाचे कार्य काँग्रेसमध्ये राहूनच चालत असे.

२४) कम्युनिस्ट पक्षावर बंदी : हिंदुस्थान सरकारने हिंदुस्थानातील कम्युनिस्ट पक्ष बेकायदा ठरवून तसे फर्मान दि.२२ जुलै रोजी काढले होते. सरकारच्या या हुकुमाचा अमरावती जिल्हा काँग्रेस कमेटीच्या दि.२८ जुलै रोजी भरलेल्या सर्व साधारण सभेतील एका ठरावाने तीव्र निषेध करण्यात आला.

हिंदुस्थान सरकारने हिंदी कम्युनिस्ट पक्षाला दि.२२ जुलै ३४ रोजी एका हुकुमाने बेकायदेशीर म्हणून जाहीर केले होते. पुढे १९४२ साली जुलै मध्ये ही बंदी उठविण्यात आली होती.

२५) असेंबलीसाठी वऱ्हाडचे काँग्रेस उमेदवार :- वऱ्हाड प्रांतिक काँग्रेस कमेटीच्या कार्यकारी मंडळाची सभा रविवारी ७ जुलै रोजी दुपारी ३ वा. उमरावती येथै डॉ.पटवर्धन यांच्या घरी दे.भ.वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. या सभेला दे.भ.ब्रिजलालजी बियाणी,श्री.दादासाहेब गोळे,श्रीमती दुर्गाताई जोशी, खामगांवचे डॉ.पारसनिस, उमरावतीचे डॉ.पटवर्धन, डॉ.भोजराज वैद्य मुळे, दे.भ.हरिहरराव देशपांडे, इत्यादी सभासद उपस्थित होते.

या सभेत, अखिल भारतीय काँग्रेस पार्लमेंटरी बोडार्चे वऱ्हाडतर्फे सल्लागार म्हणून वीर वामनराव जोशी, दे.भ.ब्रिजलाल बियाणी व डॉ. पारसनिस यांची निवड करण्यात आली.

२६) मोटे सूतिकागृह :- अमरावती येथील अंबापेठेत सुमारे सहा महिन्यापूर्वी सुरु झालेल्या ''रामकृष्ण गोविंद मोटे'' सुतिकागृहाचा उद्घाटन समारंभ दि.२७ सप्टेंबर रोजी सकाळी सौ.रमाबाई तांबे एम.एल.सी.यांच्या हस्ते थाटाने साजरा झाला होता. समारंभाला शहरातील निमंत्रित स्त्री पुरुष हजर होते. समारंभासाठी सूतिकागृहाच्या अंगणात मंडप टाकण्यात आला होता.

रावसाहेब मोटे :- यांनी हे सूतिकागृह सुरु करुन ते चालविण्यासाठी ३४५०० रु ट्रस्टीजवळ ठेवले होते व त्यांचे व्याज या सूतिकागृहाला मिळण्याची व्यवस्था केली होती. या शिवाय हत्यारे व इतर आवश्यक सामान घेण्यासाठी २१५० रु.ची देणगी दिली होती.

दानशूर रावसाहेब मोटे :- उमरावतीचे श्रीमंत दानशूर म्हणून कीर्ती मिळविलेले गृहस्थ मूळचे राहणारे शेगांवचे अमरावतीस येउन स्थायिक झाले होते. इ.स.१९१२ ते १९२३ या काळात त्यांनी अनेक लोकहिताची कामे स्वखर्चाने केली आहेत. शेगांव येथे ४० हजार रुपये खर्चून स्त्रियांसाठी दवाखाना सुरु केला होता. तसेच शेगांवलाच त्यांनी ३५ हजार रुपये खर्चून वडीलांचे नांवाने एक महादेवाचे देऊळही बांधले आहे. उमरावतीचे येथे आपल्या वडील बंधूचे स्मरणार्थ त्यांनी १० हजार रुपये खर्च करुन शेगांव रस्त्यांवरील (म्हणजे हल्ली विलासनगर लगत) स्मशानात त्यांनी धर्मशाळा विहीर व स्मशानात प्रेते दहनाची दोन छते बांधून दिली आहेत. याशिवाय उमरावतीचे न्यू हायस्कूल,

---

डफरिन हॉस्पिटल,शेगांवची मशीद, कारंजाचा ब्रम्हचर्याश्रय, नाशिक येथील अनेक संस्था यांना देणग्या दिल्या आहेत. उमरावतीच्या किंग एडवर्ड मेमोरियल कॉलेज

मध्ये (हल्लीचे विदर्भ महाविद्यालय) इंटर सायन्सच्या परिक्षेत पहिल्या येणाऱ्या विद्यार्थ्याला शिष्यवृत्ती देण्यासाठी ४ हजार रुपये त्यांनी युनिव्हर्सीटीचे स्वाधीन केले. अशा अनेक कार्यात रावसाहेब मोटे यांनी केवळ ११ वर्षाचे काळात सुमारे दीड लक्ष रुपये धर्मार्थ खर्च केले होते.

उमरावतीचे श्रीकृष्णपेठ ही रावसाहेब मोटे यांनी पाडलेल्या लेआउटवर आहे.

याप्रमाणे अमरावती शहराचे त्या काळात एक उदार व दानशूर गृहस्थ म्हणून त्यांचे नाव सतत कायम आहे.

इ.स. १९३५

अनुक्रमणिका

१. उदयची कचेरी अकोला येथे
२. बंदी बंधमुक्त
३. थि. ऑ. लॉजमध्ये भाषण
४. बॅ. अभ्यंकर यांच्या निधनाबद्दल दुखवटा
५. विदर्भ आयुर्वेद महासंमेलन - न्यू हायस्कूल संमेलन
६. पारध्यांचे शिष्टमंडळ
७. प्रा. पोतदार यांची व्याख्याने
८. वाङ्मय मंडळाचा वार्षिकोत्सव
९. शेती व शेतकरी या विषयावर भाषण
१०. म. गांधी व रा.स्व. संघ
११. महिला मंडळ वार्षिकोत्सव
१२. परांजपे वाचनालय
१३. मुधोळकर पेठ महिला मंडळाचा वार्षिकोत्सव
१४. रा.ब. राठीची पदवी काढून घेतली
१५. सोपानदेव चौधरीचे काव्यगायन
१६. कै. गडकरी स्मृतिदिन

१७. नव्या सुधारणांचा निषेध

१८. जातीय निवाड्यांचा निषेध

१९. ह.व्या.प्र. मंडळाचा वार्षिकोत्सव

२०. यज्ञातील पशूहत्येसंबंधी विचार

२१. अमरावती न.पा. चे स्वयंवर

२२. सारंगी स्वस्तिक मंडळाचा वार्षिकोत्सव

२३. म्यु. ए.व्ही. स्कूलचा बक्षीस वितरण समारोह

२४. लूना पार्क

२५. बालकुमारांचा मेळावा

२६. कै. गोखले यांच्या तैलचित्राचे अनावरण

२७. नमस्काराचे सामने

२८. महिला क्लब

२९. राजबंदी दिन

३०. बँकेची निवडणूक

३१. राष्ट्रीय सप्ताह

३२. गायनाचा जलसा

३३. संत नामदेव पुण्यतिथी

३४. अवस्थींचे म्यु. सभासदत्व

३५. अ.न.पा. ज्युबिली फंड

३६. शिवजयंती

३७. नवा हौद

३८. हिंदू शिक्षण संस्थेचे अधिवेशन

३९. मौलाना बक्ष गायनशाळेचा वार्षिकोत्सव

४०. ज्युबिली उत्सव

४१. स्वातंत्र्यदिन

४२. व्केटा दिन

४३. भिडे गुरूजी वाढदिवस

४४. डॉ. म्हैसाळकर यांचा अपघाती मृत्यू

४५. गोहरजान यांचे गायन

४६. आबिसिनिया दिन

४७. शाहीर मुवाटे याचा कार्यक्रम

४८. पं. हृदयनाथ कंझरू यांची भेट

४९. कॉ. कार्यालय अकोल्यास गेले

५०. वृत्तपत्र स्वातंत्र्यावर गदा

५१. बसनलाल व हलगल्ली यांचा निषेध

इसवी सन १९३५

काँग्रेस सुवर्ण जयंती वर्ष
इंडिया ॲक्ट १९३५ साली लागू झाला

१. उदयची अकोला कचेरी :- उमरावतीच्या 'उदय' ची अकोला शहर व जिल्ह्याकरिता तेथील लोकसेवक छापखान्यात १ जानेवारी १९३५ पासून कचेरी सुरू करण्यात आली. या कचेरीतून जाहिराती घेणे , वर्गणीदार नोंदवणे व फुटकळ अंकाच्या विक्रीची व्यवस्था होती.

२. बंधमुक्त सहाय्यक संस्था :- अखिल भारतीय बंधमुक्त बंदी सहाय्यक संस्थेचे ऑरगनायझींग सेक्रेटरी पंडीत बर्कतराम कालीया यांनी या आठवड्यात उमरावतीस भेट देऊन येथील निमंत्रित नागरिकांच्या सभेत अशा संस्थेची उपयुक्तता या विषयावर भाषण दिले.

३. सोशालिझम व वेदान्त :- उमरावतीच्या थिऑसॉफिकल सोसायटी तर्फे दि. ४ जानेवारी रोजी ब्रह्मविद्या मंदिरात नागपूरच्या रामकृष्ण आश्रमाचे स्वामी भास्क रेश्वरानंद यांचे 'सोशालिझम व वेदान्त' या विषयावर जाहीर व्याख्यान आयोजित केले होते.

४. नरकेसरी बॅ. अभ्यंकर यांच्या दुखवट्याची सभा :-

नागपूरचे नरकेसरी बॅरी. मोरोपंत अभ्यंकर यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरली होती. निधनाबद्दल दि. ४ जानेवारी रोजी सायंकाळी ब्रम्हविद्या मंदिरात जिल्हा काँग्रेस कमेटीच्या वतीने वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरली होती.

बॅरी. अभ्यंकर यांच्या अकाली निधनाबद्दल या सभेत दुखवट्याचा ठराव

मंजूर करण्यात आला. या ठरावावर डॉ. भोजराज, स्वामी भास्करेश्वरांनद (नागपूर) सौ. पार्वतीबाई पटवर्धन, श्री. शंकरराव जोग वकील व श्री. ओगले आदि प्रमुख वक्त्यांची भाषणे झाली होती.

नरकेसरी बॅरी. अभ्यंकर वयाच्या केवळ ४९ व्या वर्षी निधन पावले. मधुमेहासारख्या दुर्धर रोगाने पोखरलेले शरीर, त्यातच हृदय विकाराचा रोग जडलेला. इ. १९३० व १९३२ मध्ये स्वातंत्र्य आंदोलनात त्यांना दोन वर्ष कारावास भोगावा लागला होता.

निवडणूकीच्या धामधुमीत पायाला जोडा चावल्याचे निमित्त झाले. त्यातच खरे विरूद्ध केसरी या खटल्यात त्यांना सहा सहा तास कोर्टात उभे राहण्याचे श्रम करावे लागले होते. या सर्वांचा परिणाम शेवटी त्यांचे शरीरावर होऊन त्यातच त्यांचा अंत झाला.

बॅरि. अभ्यंकर यांच्या राष्ट्रचर्चेला स्वराज्य संघाच्या चळवळीपासून प्रारंभ झाला होता. डॉ. बोळेकरांचा खटला चालवून ते एक नामांकित बॅरिस्टर म्हणून कीर्ती पावले होते. नागपूर काँग्रेस नंतर मुंबई येथे भरलेल्या ऑल इंडीया काँग्रेस कमेटीच्या सभेत असहकाराचा बहिष्काराचा पोकळपणा स्पष्ट करण्याचा जेव्हा प्रसंग आला तेव्हा ते त्यांनी गाजवलेले वक्तृत्व पाहून 'लढवय्या मराठा' म्हणून महात्माजींनी यंग इंडियातून त्यांची पाठ थोपटली होती.

१९२१ अखेर अकोला येथे भरलेल्या अखिल महाराष्ट्राच्या परिषदेत असहकारितेच्या शुष्क बहिष्कारावर तिलांजली देणारा व कायदे मंडळातील अडवणुकीचा मार्ग प्रतिपादन करणारा ठराव पुढे आणण्याचा पहिला मान त्यांनाच मिळाला होता.

पुढे जेव्हा दास-नेहरुंना स्वराज्य पक्ष स्थापन करण्याचा प्रसंग आला तेव्हा त्यांत डॉ. मुंजे, बॅरि. अभ्यंकर व लोकनायक अणे हे , मध्यप्रांत वऱ्हाडातील धर्म , भीम व अर्जुन असे पुढे सरसावलेले दिसत होते. स्वराज्य पक्ष राज्यतंत्र कसे बंद

पाडू शकतो याचा प्रयोग सर्व हिन्दुस्थानात फक्त या प्रांतातच यशस्वी झाला होता.

५. विदर्भ आयुर्वेद विद्यालय आणि न्यू हायस्कूलचे समारंभ

दि. ५ जानेवारी रोजी प्रांताचे शिक्षण मंत्री ना. बाबासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली विदर्भ आयुर्वेद विद्यालयातील प्रशस्ती पत्रदान समारंभ सायंकाळी ६ वाजता साजरा झाला.

या समारंभाला ना. दादासाहेब खापर्डे , वीर वामनराव जोशी , डॉ. पटवर्धन, डॉ. भोजराज आणि शहरातील इतर प्रतिष्ठीत नागरिक, डॉक्टर्स व वैद्य मंडळी हजर होती.

हा समारंभ म्यु.ए.व्हि. स्कूलचे हॉलमध्ये साजरा करण्यात आला व त्यासाठी या शाळेचा हॉल उत्तम प्रकारे सुशोभित केला गेला होता.

न्यू एज्युकेशन सोसायटीच्या दशवार्षिकोत्सवाला रविवारी दुपारी साडे चार वाजता ना. बाबासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली सुरूवात झाली.

या समारंभाला काशीबाई बिल्डींग समोरील चौक सुशोभित करण्यात आला होता. समारंभाला ना. दादासाहेब खापर्डे , वीर वामनराव जोशी, डॉ. भट, रा.ब. ब्रम्ह, ॲड. दादासाहेब शेवडे, शहरातील प्रतिष्ठित स्त्री पुरूष नागरिक व सरकारी अधिकारी हजर होते.

शाळेतील विद्यार्थी, विद्यार्थीनी व माजी विद्यार्थी यांनी चौकातील सर्व जागा व गॅलऱ्या भरल्या होत्या. व तसेच श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचा लष्कारी बँड वाजत होता.

मुख्य पाहुणे आल्यानंतर प्रथम नमन गीत व स्वागत गीत झाले नंतर रा.ब. ब्रह्म आणि श्री. न. ल. इनामदार यांची स्वागतपर भाषणे झाली व आभार प्रदर्शनानंतर समारंभ संपला.

६. वऱ्हाडातील पारध्यांचे शिष्टमंडळ :

वऱ्हाडातील सर्व भागातील पारधी जमातीच्या चारशे प्रतिनिधीचे

शिष्टमंडळ उमरावतीला शनिवार दि. ५ जानेवारी रोजी गृह मंत्री ना. राघवेंद्रराव यांना भेटण्यासाठी आले होते. परंतु ना. राव काही कारणाने उमरावतीस येऊ न शकल्याने या शिष्ट मंडळाने ना. बाबासाहेब खापर्डे यांची भेट घेऊन आपल्या तक्रारी त्यांना सांगितल्या. ना. खापर्डे यांनीही शिष्ट मंडळाच्या तक्रारी ऐकून घेऊन त्या योग्य मार्गाने दूर करण्याचे या शिष्ट मंडळास आश्वासन दिले.

७. प्रो. दत्तो वामन पोतदार

उमरावती नगर वाचनालयाच्या मदतीसाठी सुप्रसिद्ध इतिहास संशोधक व पुण्याच्या भारत इतिहास संशोधक मंडळाचे प्रमुख प्रो. दत्तो वामन पोतदार यांची 'मराठेशाहीच्या विनाशाची कारणे ' या ऐतिहासिक विषयावर एकूण पाच व्याख्यान दि. ८ ते १२ जानेवारी पावेतो ना. दादासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली बेरार को - ऑफ इन्स्टिट्यूटचे सभागृहात दिली. ही व्याख्याने तिकीटे लावून आयोजित केली होती. या व्याख्यानांना लोकांची गर्दी राहत असे.

या ऐतिहासिक व्याख्यानमालेने येथील श्रोत्यांना इतिहासाकडे पाहण्याची एक नवी दृष्टी दिली. नगर वाचनालयातर्फे प्रो. पोतदार यांचा सत्कार ही करण्यात आला.

या शिवाय प्रो. पोतदार यांची किंग एडवर्ड कॉलेज , न्यू हायस्कूल , मराठा हायस्कूल, गर्लस् हायस्कूल येथेही व्याख्याने झाली.

दि. १३ जानेवारी रोजी सायंकाळी गणेश नाटकगृहात, वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली 'जुनी राहणी व नवी राहणी' या विषयावर नगर वाचनालयातर्फे त्यांचे व्याख्यान झाले.

८. मराठी वाङ्मय मंडळाचा वार्षिकोत्सव :

उमरावतीच्या किंग एडवर्ड कॉलेज मधील मराठी वाङ्मय मंडळाचा द्वितीय वार्षिकोत्सव दि. ३ जानेवारी रोजी रविवारी सकाळी नाशिकचे ह.भ.प. पांगारकर , बी.ए. यांच्या अध्यक्षतेखाली कॉलेजच्या सभागृहात साजरा करण्यात आला. या

समारंभाला प्रो. दत्तो वामन पोतदार , प्रसिद्ध कवी सोपानदेव, श्री. देवदत्त नारायण टिळक ही ख्यातनाम पाहुणे मंडळी व इतर अनेक वाङ्मय सेवक उपस्थित होते.

अध्यक्षांनी आपल्या भाषणात संत वाङ्मयाचे मार्मिक विवेचन या प्रसंगी केले. रात्री श्री. सोपानदेव चौधरी यांच्या सुश्राव्य काव्य गायनाचा कार्यक्रम झाला.

शेती आणि शेतकरी : यंदा कपाशीचा हंगाम :

वऱ्हाडातील चारही जिल्ह्यातून सारखी ओरड आहे अशा परिस्थितीत सारा वसूलीच्या सरकारी जुलूमामुळे शेतकरी तर हवालदील झाले आहेत. सरकारी अहवालानुसार १९२८ सालच्या मानाने यंदा ४ आणे देखिल पीक नाही. ही गोष्ट त्यावरून स्पष्ट होण्यासारखी आहे. ता. १ सप्टे. १९३४ पासून २९ डिसेंबर १९३४ पर्यंत वऱ्हाडातील सर्व कापूस बाजारात एकंदर १,३२,८५८ कापूस गाड्या आल्या. १९३२ साली ह्याच मुदतीत २.३४ लाख कापूस गाड्या आल्या होत्या व १९२८-२९ साली तर ४ लाख ५० हजार नऊशे सत्तेचाळीस कापूसगाड्या वऱ्हाडातील कापूस बाजारात आल्या होत्या.

१०. म. गांधी व राष्ट्रीय स्वयंसेवक संघ :

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या वर्धा येथील शिबीरास म. गांधी भेट देऊन त्यास आशीर्वाद दिला ही गोष्टही संघाच्या इतिहासात नमूद करण्यासारखी आहे. फंड गोळा केल्यावाचून ह्या संघाचा पसरलेला पसारा त्यांची वाढ व कार्य पाहून महात्मा गांधीना आनंद वाटला. म. गांधी हे स्वत: अनेक संघटनांचे चालक होते. पण त्यांची कोणतीही संघटना हिशेब करिता स्वस्त पडली नाही. नागपूरचे डॉ. हेडगेवार ह्यांनी उभारलेल्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची संघटना महात्माजींनी पाहून त्यांनी ह्या करिताच डॉ. हेडगेवार ह्यांना प्रत्यक्ष बोलावून धन्यवाद दिले. ह्या शिबीरासाठी अमरावतीहून सुमारे पन्नास स्वयंसेवक गेले होते.

११. महिला हरिजनोद्धारक मंडळ

दि. १४ जानेवारी मकर संक्रांतीचे दिवशी, महिला हरिजनोद्धारक

मंडळातर्फे सौ. विमलाबाई देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली हरिजन भगिनीकरिता महाजनपुरा प्राथमिक शाळेचे पटांगणात हळदी-कुंकू व तीळगुळ समारंभ साजरा करण्यात आला होता.

त्याच दिवशी दुपारी ब्रह्मविद्या मंदिरातही स्त्रियांची जाहीर सभा भरून संक्रान्ती निमित्त तीळगुळ व हळदीकुंकू समारंभ साजरा करण्यात आला. या प्रसंगी काही भगिनीची भाषणेही झाली.

१२. परांजपे वाचनालय :

रेल्वे स्टेशन समोरील परांजपे वाचनालयास दि. १७ जानेवारी रोजी प्रा. दत्तो वामन पोतदार , ह.भ.प. पांगारकर, श्री. देवदत्त र. नारायण , टिळक , आणि कवी सोपानदेव चौधरी यांनी भेट दिली.

१३. मुधोळकर पेठ महिला क्लब :

दि. १७ जानेवारी रोजी दुपारी ह.भ.प. पांगारकर यांचे ''तुकारामबुवाची शिष्या बहिणाबाई'' या विषयावर महिलाक्लब तर्फे प्रवचन आयोजित करण्यात आले होते.

१४. पदवी काढून घेतली -

अमरावतीचे ऑनररी मॅजिस्ट्रेट श्री. नारायणदास सुंदरदास राठी यांची 'रायसाहेब' ही पदवी सरकारने त्यांच्या गैरवर्तुवणूकीवरुन काढून घेतली व तसे जानेवारी अखेरच्या गॅझेटमधून जाहीर करण्यात आले.

१५. कवी सोपानदेव चौधरी यांचे काव्यगायन

उमरावती नगर वाचनालयातर्फे दि. २६ जानेवारी रोजी रात्री संस्थेचे सभागृहात कवी सोपानदेव चौधरी यांचे काव्यगायन, नागपूरचे प्रो. ना.क.बेहरे यांच्या अध्यक्षतेखाली झाले.

१६. गडकरी दिन :

न्यू हायस्कूल विद्यार्थी संघांच्या वतीने दि. २४ जानेवारी रोजी सायंकाळी ब्रह्मविद्या मंदिरात गडकरी स्मृती दिनाचा कार्यक्रम वैद्यभूषण हिर्लेकर शास्त्री यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला होता. या समारंभाला बहुतेक सर्व साहित्य सेवक आणि विद्यार्थी वर्ग उपस्थित होता. या प्रसंगी श्री. मधूकर त्रिबंक राजे , प्रो. कुळकर्णी वगैरेंची भाषणे झाली.

१७. नव्या सुधारणांचा निषेध

दि जॉईंट पार्लमेंटरी रिपोर्टाच्या निषेध दिना निमित्त दि. ४ फेब्रुवारी रोजी जिल्हा काँग्रेस कमेटी तर्फे वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली जोग चौकात जाहीर सभा भरून जॉईंट पा.क. च्या रिपोर्टाचा निषेध करणारा ठराव मंजूर करण्यात आला होता. या सभेत भा. बामणगावकर , दे. भ. हरिहरराव देशपांडे, व आचार्य त्र्यंबक गुरुजी यांची भाषणे झाली.

हा निषेध दिन पाळण्याचे आवाहन ऑ. इं. काँग्रेसचे अध्यक्ष दे.भ. बाबू राजेंद्र प्रसाद यांनी एका पत्रकाद्वारे केले होते.

१८. जातीय निर्णय निषेध दिन :

काँग्रेस राष्ट्रीय पक्षाचे अध्यक्ष पं. मदन मोहन मालवीय यांच्या आदेशानुसार रविवार दि. १० फेब्रुवारी रोजी रात्री लोकशाही स्वराज्य पक्ष व हिन्दुमहासभा या संस्थातर्फे 'जातीय निर्णय निषेध दिना'निमित्त दे.भ. बामणगांवकर यांच्या अध्यक्षतेखाली जोग चौकात जाहीर सभा झाली होती. सभेत जातीय निर्णयाचा तीव्र निषेध करणारा ठराव मंजूर करण्यात आला. या ठरावावर डॉ. भोजराज, डॉ. पटवर्धन , दे. भ. हरिहरराव देशपांडे व छिंदवाड्याचे काँग्रेस कार्यकर्ते श्री. नरसिंगदासजी यांची भाषणे झाली.

१९. श्री. हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचा वार्षिकोत्सव

श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचा विसावा वार्षिकोत्सव रविवार दि. १४ फेब्रुवारी रोजी सायंकाळी मंडळाचे पटांगणावर मुंबईचे डॉ. म्हसकर यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला.

या प्रसंगी मंडळाच्या विद्यार्थ्यांचे निवडक मर्दानी खेळ व कवायती झाल्या. विशेषत: श्री भरतराव देशपांडे यांच्या वजन उचलण्याच्या शक्तीची कामे व श्री यशवंतराव भट यांच्या बंदूकीच्या अचूक नेमबाजीचे काम उत्कृष्ट झाले.

डॉ. म्हसकर यांच्या अध्यक्षीय भाषणानंतर आभार प्रदर्शन होऊन हा कार्यक्रम संपला.

२०. यज्ञ पशूंच्या हिंसा अहिंसेचा विचार :

दि. १६ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७ वाजता ब्रह्मविद्या मंदिरात दे. भ. वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरून तींत यज्ञात पशूंच्या बलिदानासंबंधीची हिंसा - अहिंसा या बाबतीत विचार व्यक्त करणारी भाषणे झाली.

शेवटी मूळ ठरावावर या सभेत मते घेऊ नयेत, असे ठरले. या जाहीर सभेसाठी ब्रह्मविद्या मंदिरात श्रोत्यांची चिकार गर्दी झाली होती. त्याकाळी असे वादविवाद हे श्रोत्यांच्या ज्ञानात भर घालणार असल्याने अशा सभांना श्रोत्यांची फार गर्दी होत असे व त्यामुळे वादविवादास मोठा रंग चढत असे.

२१. उमरावतीच्या नगर पालिकेचे स्वयंवर

उमरावतीच्या म्युनिसिपल कमेटीची त्रैवार्षिक निवडणूक दि. १८ फेब्रुवारी रोजी होऊन दि. १९ व २० रोजी मत मोजणी झाली होती. शहराच्या एकूण ९ वार्डातून १८ उमेदवार (प्रत्येक वार्डातून दोन याप्रमाणे) निवडून द्यायचे होते. निवडणूकीत कोणत्याही राजकीय पक्षाने अधिकृतपणे भाग घेतलेला नव्हता.

शेवटच्या लढतीत एकूण ३९ उमेदवार मैदानात होते. वार्ड नं. ३ मधून श्री. अण्णासाहेब कलोती व जगन्नाथजी मालपाणी हे बिनाविरोध निवडून आले होते. त्यामुळे आठ वार्डातच निवडणूक झाली.

उमेदवाराच्या पेट्यांचा रंग (चिन्ह) लाल, पांढरा, हिरवा, काळा, पिवळा, निळा असा होता शिवाय कांही उमेदवारांना हत्ती, वाघ, मोटार अशी चित्रांची चिन्हही दिलेली हाती. या आठ वार्डातून एकूण सुमारे पाच हजार मतदान झाले होते.

नं.	वार्डातील मतदारांची संख्या	मतदान झाले
१	८३५	६४७
२.	७२२	५०६
३.	अविरोध निवडणूक झाली	
४.	६८२	४९४
५.	९०२	६४७
६.	८२३	५६२
७.	७५०	५८९
८.	७१९	५५४
९.	७८७	६२०

एकूण आठ विभागाच्या ६२२० मतदारांपैकी ४६१८ मतदारांनी भाग घेतला होता. विशेषत: मुस्लीम वार्डात ९५ टक्के मतदान झाले होते.

या निवडणूकीत खालील उमेदवार निवडून आले.

वार्ड क्र.	नांव
१.	श्री मुल्ला दिलावरखान नुरखान
	श्री. वासुदेवराव विठ्ठल चिमोटे
२.	श्री. हरी अनंत असनारे
	श्री. मोतीरामजी जानबा बिजवे
३.	श्री. दत्तात्रय रामराव कलोती वकील
	श्री. जगन्नाथ रामधन मालपाणी
४.	श्री. जुगलकीशोर डोगरसीदास
	श्री. आशक हुसेन अमीर हुसेन
५.	श्री. महंमद रफी शे. अमीर
	श्री. इस्माईलखान रसूलखान सुफी
६.	श्री. गोपाल नानजी टांक
	श्री. भगवानदास खुशाली गुप्ता
७.	श्री. पंढरीनाथ दामोदर मुळे
	श्री. खानसाहेब अ. रहिमखान महंमदखान
८.	श्री. दत्तात्रय केशव देव
	श्री. धोंडू लक्ष्मण लिमये
९.	श्री. मारन्ना लढन्ना
	श्री. तुकाराम कृष्णाजी वाट

२२. सारंगी स्वस्तिक मंडळ -

दि. २४ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७ वाजता जोग दवाखान्यात दे.भ. वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली शहारातील डॉक्टर्स व वैद्य यांच्या सभेत यवतमाळचे डॉ. टेंबे यांचे सारंगी स्वस्तिक मंडळाच्या उपयुक्ततेसंबंधी भाषण आले होते आणि या सभेतच सारंगी स्वस्तिक मंडळाच्या स्थापनेचा ठराव मांडण्यात

आला व त्यावर डॉ. पटवर्धन वैद्य , हरिहरराव देशपांडे, डॉ. कुळकर्णी, डॉ. भट वगैरेंची भाषणे होऊन तो पास करण्यात आला होता.

२३. बक्षीस समारंभ :

म्यु. ए. व्हि. स्कूलच्या विद्यार्थ्यांचे निरनिराळ्या खेळांचे सामने दि. २९ जानेवारी पासून सुरू होऊन ते सुमारे तीन आठवडे चालू होते.

या सामन्यांचा बक्षीस समारंभ दि. २३ फेब्रुवारी रोजी , श्री. हदायत अली वकील , चेअरमन , शिक्षण समिती , अमरावती नगरपालिका यांच्या हस्ते करण्यात आला.

२४. ल्युना पार्क :

उमरावतीच्या नेकोलट पार्कवर (हल्लीचे नेहरू मैदान) ल्युना पार्क या नावाने एक सिल्वर टाऊन उघडण्यात आले होते व त्यात विविध प्रकारचे जुगाराचे खेळ चालत असत.

या प्रमाणे खुले आम चालणाऱ्या या जुगाराविरूद्ध उमरावतीचे तरूण कार्यकर्ते दे.भ. दि.ह. सहस्त्रबुद्धे यांनी पोलीस विभागाकडे तक्रार करून आणि वृत्तपत्रातून त्याबद्दल लोकमत जागृत केले होते.

शेवटी या तक्रारीकडे पोलिस अधिकाऱ्यांना लक्ष द्यावेच लागले व ह्या 'ल्युना पार्क ' वर फेब्रुवारी १९३५ अखेर पोलिसांनी बंदी घातली.

२५. बालकुमारांचा मेळावा :

दि. २ मार्च रोजी सायंकाळी म्यु. प्राथमिक शाळेतील बालकुमारांचा मेळावा बॅरि. ई. एम. जोशी यांच्या अध्यक्षतेखाली भरविण्यात आला होता. त्यावेळी बालकुमारांचे खेळ झाले व विजयी मुलांना अध्यक्षांच्या हस्ते बक्षीसे देण्यात आली होती. बक्षीसांचा खर्च श्री. वाट, श्री. टांक , श्री मारन्ना व श्री देव ह्या म्यु. सभासदांनी केला होता.

२६. कै. गोपाळ कृष्ण गोखले यांच्या तैलचित्राचे अनावरण :

दि. ७ मार्च रोजी श्री. हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या इमारतीत कै. गोपाळ कृष्ण गोखले यांच्या तैलचित्राचे अनावरणाचा समारंभ साजरा करण्यात आला होता.

नामदार श्रीनिवास शास्त्री यांच्या हस्ते ना. गोखले यांच्या तैलचित्राचे अनावरण करण्यात आले.

नामदार श्रीनिवास शास्त्री हे मोरोपंत जोशी व सर्व्हन्टस ऑफ इंडिया सोसायटीचे ज्युनिअर मेंबर श्री. गुप्ते यांचेसह आले अन्य कार्यशाळा दाखविल्यानंतर समारंभास सुरूवात झाली तेव्हा संस्थेचे अध्यक्ष श्री द्रविड व चिटणीस श्री. असनारे वकील यांनी पाहूण्याचे स्वागत केले. मंडळातर्फे ना. शास्त्रींना मानपत्र देण्यात आले.

ना. शास्त्री यांचे हस्ते तैलचित्राचे अनावरण होऊन उत्तरादाखल भाषणानंतर आभार प्रदर्शन होऊन कार्यक्रम संपला.

ना. गोपाळ कृष्ण गोखले : (१८६३ - १६१५) हे भारताचे तत्कालीन सुप्रसिद्ध राजकारणी पुढारी, इंग्रजी भाषेतील जग प्रसिद्ध वक्ते व सर्व्हन्टस् ऑफ इंडिया या संस्थेचे संस्थापक होते.

२७. नमस्काराचे सामने -

दि. १० मार्च रोजी ब्रह्मविद्या मंदिरात सकाळी ७ वाजता मसूराश्रमाच्या स्थानिक शाखेतर्फे नमस्काराचे सामने भरविण्यात आले होते. त्यांत मुलामुलींनी भाग घेतला होता. या सामन्यांचा बक्षिस समारंभ दि. ११ मार्च रोजी सायंकाळी ५ वाजता दे.भ. पटवर्धन यांच्या अध्यक्षतेखाली झाला होता. या प्रसंगी हजार मुलांच्या सांघिक नमस्कारांचा कार्यक्रम झाला होता.

२८. मुधोळकर पेठ महिला क्लब -

दि. २ एप्रिल रोजी मुधोळकरपेठ महिला क्लब या संस्थेचा द्वितीय वार्षिकोत्सव संपन्न झाला. ए.व्हि. स्कूलच्या मुख्याध्यापिका सौ. सुशीलाबाई कुळकर्णी , बी.ए. बी.टी. यांच्या अध्यक्षतेखाली तो साजरा करण्यात आला होता. समारंभाला दीड दोनशे महिला उपस्थित होत्या.

अहवाल वाचनानंतर भाषण आणि सौ. शांताबाई भट यांची आभार प्रदर्शन केले. नंतर हळदीकुंकू व पान सुपारी होऊन हा कार्यक्रम संपला.

२९. राजबंदी दिन :

अखिल भारतीय काँग्रेस सोशालीस्ट पक्षाचे चिटणिस श्री. जयप्रकाश नारायण यांनी एका पत्रकाद्वारे दि. ७ एप्रिल रोजी देशभर राजबंदी दिन पाळावा असे आवाहन केले होते. त्यानुसार उमरावती येथे दि. ७ एप्रिल रोजी रविवारी सायंकाळी जोग चौकात अ.भा. राजबंदी दिनानिमित्त वीर वामनराव जोशी यांचे अध्यक्षतेखाली व अ. जिल्हा काँग्रेस कमेटीतर्फे जाहीर सभा भरविण्यात आली.

सभेत श्री. बामणगांवकर आणि श्री. प्यारेलालजी सेवक यांची भाषणे झाली. वक्त्यांनी आपल्या भाषणात बंगाल मधील अनेक तरूणांनी गुप्तपणे विनाचौकशी तुरूंगात अटकेत ठेवण्यात आले आहे, याबद्दल सरकारचा निषेध केला व सरकारचे दडपशाहीचे कायदे रद्द केले जावेत, राजबंद्यांना एकतर मुक्त करावे किंवा त्यांची कोर्टात उघड चौकशी करावी अशी मागणी केली.

बंगालच्या राजबंद्यांना सहानभूती दर्शविणारा ठरावही सभेत मंजूर करण्यात आला होता.

त्या दिवशी सकाळी राष्ट्रीय ध्वज वंदन आणि प्रभात फेरी हा कार्यक्रम झाला होता.

३०. उमरावती सेंट्रल को. ऑ. बँकेची निवडणूक :

दि. १४ एप्रिल रोजी उमरावती सेंट्रल को. ऑ. बँकेची निवडणूक वऱ्हाड सहकारी संघाचे सभागृहात होऊन डॉ. भाऊसाहेब पंजाबराव देशमुख निवडून आले. या सभेसाठी बँकेचे वैयक्तिक भागधारक व संस्थेचे प्रतिनिधी आणि प्रेक्षक यांची सभागृहात तुफान गर्दी झाली होती. शेतकरी संघ व ब्राह्मणेतर पक्षाची यादी (पॅनल) प्रचंड बहुमताने मंजूर झाली होती व डॉ. पंजाबराव देशमुख यांचा जयघोष होत होता.

३१. राष्ट्रीय सप्ताह -

जालीयनवाला बाग हत्याकांडाच्या स्मृती निमित्त पाळल्या जाणाऱ्या राष्ट्रीय सप्ताहाचे शेवटच्या दिवशी दि. १३ एप्रिल रोजी रात्री जोग चौकात जिल्हा काँग्रेस कमेटीतर्फे जाहीर सभेचे आयोजन केले होते. सभेचे अध्यक्षस्थानी डॉ. पातुरकर हे होते. या सभेत दे.भ. प्यारेलालजी सेवक, श्री. बाळ मराठे, श्री. राजाभाऊ बारलिंगे , व श्री. तिवाटणे यांची समयोचित भाषणे झाली.

३२. गायनाचा जलसा

दि. १३ एप्रिल रोजी रात्री गणेश नाट्यगृहात बादशाहाच्या रौप्य महोत्सवी निधीच्या मदतीसाठी नागपूरचे श्री. सावळाराम व श्री नेरकर वकील यांच्या गायनवादनाचा जलसा झाला. या जलशाचा खर्च वजा जाता उरलेले उत्पन्न ज्युबिली फंडाला देण्यात आले.

(बादशाहच्या रौप्य महोत्सवाकरिता उमरावतीच्या ज्युबिली फंडाला मार्च १९३४ अखेर पावेता रु. ३३१७ , आणि ७ पैसे , ६ इतक्या रकमा मिळाल्या होत्या.)

३३. कै. नामदेव बुवा पुण्यतिथि -

दि. १३ एप्रिल रोजी रात्री कै. नामदेवबुवा यांचे पुण्यतिथि निमित्त त्यांच्या शिष्य परिवारातर्फे कार्यक्रम आयोजित केला होता.

त्याच दिवशी रात्री वसंत विलास भुवनतर्फे निमंत्रित मंडळीसाठी श्री. सावळाराम यांचे वादनाचा आणि गायनाचा कार्यक्रम ठेवण्यात आला होता. या वेळी वंसत विलासचे मालक श्री. चिखलकर यांनी श्री सावळाराम यांना चांदीच्या पत्र्याचा पाट भेट दिला होता.

श्री. सावळाराम यांची बासरी वादन आणि गायनाबद्दल तर श्री नेरकर यांची पेटी वादनाबद्दल ख्याती होती.

३४. पं. रामेश्वर अवस्थी यांचे म्यु. सभासदत्व रद्द -

दे.भ. पंडित रामेश्वरजी अवस्थी, म्यु. सभासद यांनी नगरपालिकेचा कर वेळेचे आत न भरल्यामुळे सरकारने त्यांचे म्यु. सभासदत्व दि. २७ फेब्रुवारी , १९३७ पासून रद्द केले. व तसे गॅझेट मध्ये प्रसिद्ध करण्यात आले होते.

३५. बादशाही ज्युबिली फंडास नगरपालिकेचा १ रुपया -

उमरावती नगर पालिका दि. १९ एप्रिल रोजी नगराध्यक्ष श्री. मिनामलजी यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या सभेत ज्युबिली फंडास म्यु. फंडातून ११०१ रुपया वर्गणी दिली जावी अशा अर्थाचा ठराव अध्यक्षांनी मांडला होता त्यावर श्री हिरूरकर वकील यांनी हरकत घेताना ''ज्युबिली निमित्ताने करावयाची शहराची रोषणाई नगरपालिकेने नाकारली आहे , नगरपालिकेने प्रॉव्हीडंड फंड भरला नाही. शिवाय नोकरांचे पगार थकलेले आहेत. अशा अवस्थेत असा ठराव मंजूर करणे योग्य नव्हे' असा मुद्दा मांडला होता परंतु अध्यक्षांनी तो नियमबाह्य ठरविला. तेव्हा श्री कलोती वकील यांनी मूळ ठरावास उपसूचना मांडून ११०१ ऐवजी फक्त एक रूपया द्यावा असे म्हटले व त्यावर मतदान होऊन उपसूचना बहुमताने मंजूर करण्यात आली होती.

या प्रमाणे बादशाहाच्या ज्युबिली फंडाला अमरावती नगर पालिकेची फक्त एक रूपया वर्गणी दिली गेली.

३६. श्री शिवजयंती उत्सवाची जंगी मिरवणूक व सभा -

छत्रपती शिवाजी महाराज यांचे जयन्ती उत्सवाची जंगी मिरवणूक व सभा शनिवार शुद्ध द्वितीयेस श्री शिवरायाच्या प्रतिमेसह सायंकाळी जोग चौकातून काढण्यात आली होती. या मिरवणूकीसोबत हिंदू - शिक्षण मिलिटरी बँड व हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचा लष्करी बँड होता. आणि मिरवणूकीत हजारो लोक होते.

ती मिरवणूक शहरातील प्रमुख मार्गाने फिरत परत जोग चौकात आल्यानंतर तेथे जाहीर सभा झाली. सभेत शिवरायाच्या चरित्रावर दे.भ. डॉ. पटवर्धन , दे. भ. हरिहरराव देशपांडे आणि दे.भ. पन्नालालजी सिंघई यांची भाषणे झाली होती. व्याख्यानानंतर नाशिकचे शाहीर श्री. मुळे यांचे पोवाडे झाले. अमरावतीचे कवीभूषण अण्णासाहेब खापर्डे यांनीही स्वत: रचलेला अफजलखानाचा वध हा पोवाडा खड्या आवाजात म्हटला होता.

३७. ज्युबिली निमित्त टाके =

पहिल्या वर्ग ऑनररी मॅजिस्ट्रेट श्री. नारायण रामचंद्र डोळे यांनी , कँप अमरावती येथील दिवाणी कोर्टाची कंपौड लगत जनावरांना पाणी पिण्यासाठी एक टाके (हौद) स्वखर्चाने ज्युबिली निमित्त बांधून दिले होते.

कँप विभागात तांग्याचे घोड्यांना पाणी पिण्यासाठी काहीच व्यवस्था नव्हती. या टाक्यामुळे ती सोय झाली. त्याकाळी उमरावतीला ४०० टांगे होते व त्यांना मुख्य धंदा शहर ते कचेरी या मार्गावर होत असे. त्यामुळे कँप विभागाच्या कचेरीजवळ घोड्यांना पाणी पिण्याची सोय होणे जरुर होते.

३८. हिन्दू शिक्षण संस्थेचे अधिवेशन

दि. १ मे रोजी गणेश नाटक गृहात , खामगांवचे ऑनररी मॅजिस्ट्रेट श्री. आर. आर. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली हिन्दू शिक्षण संस्थेचे वार्षिक अधिवेशन भरले होते. या अधिवेशनाला प्रांताच्या भागातून प्रतिस्पर्धी आले होते.

३९. मौलबक्ष प्रासादिक गायन शाळा

कै. नामदेवबुवा यांची मौलाबक्ष प्रासादिक गायन शाळा दुसरे दिवशीच बंद पडली होती. ती दिनांक ५ मे रोजी त्यांचे शिष्य वर्गाने पुन्हा सुरू केली . या गायनशाळेचा उद्घाटन समारंभ दे.भ. नानासाहेब बामणगांवकर संपादक 'उदय' यांच्या हस्ते करण्यात आला.

उद्घाटनाचे दिवशी रात्री दिलरबा व तंबोऱ्याच्या साथीत श्री. अ.क.कदम आणि श्री. रतनलालजी यांचे गायन झाले होते.

४०. उमरावती रौप्य ज्युबिली महोत्सव -

बादशहा पंचम जॉर्ज यांच्या रौप्य ज्युबिली महोत्सव निमित्त उमरावती शहरात ज्युबिली कमेटीतर्फे दि. ५, ६, ७ व ८ मे या दिवशी विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

रौप्य ज्युबिली महोत्सवानिमित्त नेकोलेट पार्कवर विजेची रोषणाई करण्यात आली होती. तसेच नेकोलेट पार्क आणि मालटेकडी येथे दारूकाम (आतषबाजी) दाखविण्यात आले होते.

(बादशहाचे रौप्य ज्युबिली फंडाची रक्कम एकूण सत्तर लक्ष रूपये भारतात आली होती.)

४१. १० मे स्वातंत्र्यदिन

सन १८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धाचे स्मृतीनिमित्त दि. १० मे रोजी सायंकाळी साम्यवादी पक्षातर्फे दे.भ. वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली जोग चौकात जाहीर सभेचे आयोजन करण्यात आले होते.

सभेत १८५७ ते स्वातंत्र्य युद्धाचे स्मृती निमित्त सेनानी तात्या टोपे, नानासाहेब पेशवे, आणि झाशीची राणी लक्ष्मीबाई यांचे भव्य फोटो लावण्यात आले होते.

सभेत आचार्य त्र्यंबक गुरूजी , श्री. माधवराव देशपांडे आणि दे.भ. बामणगांवकर यांची भाषणे व शेवटी अध्यक्षांचे समारोपाचे भाषण झाले.

या युद्धाला मदत करण्यासाठी वऱ्हाडातील देशमुख देशपांडे यांचे एक घोडदळ उत्तर भारतात जायला निघाले होते. अशी माहिती आचार्य त्र्यंबक गुरूजी यांनी आपल्या भाषणात सांगितली होती.

४२. क्वेटा दिनाची जाहीर सभा

राष्ट्रपती बाबू राजेंद्रप्रसाद यांच्या आदेशानुसार दि. ३० जून रोजी सायंकाळी जिल्हा काँग्रेस कमेटीतर्फे ब्रह्मविद्या मंदिरात डॉ. भोजराज यांच्या अध्यक्षतेखाली 'क्वेटा दिनाची' जाहीर सभा झाली होती. सभेत पटवर्धन व डॉ. सोमण यांची भाषणे आणि अध्यक्षाचे भाषण झाले होते.

दि. ३१ मे १९३५ रोजी क्वेट्टा (वायव्य सरहद्द प्रांत - बलुचिस्थान) येथे भयंकर भूकंप होऊन त्यांत सुमारे ४० हजार लोक मृत्यू पावले . व हजारो लोक निराश्रित झाले होते. क्वेट्टाचे आसपासची रेल्वे , तारा, लष्करी छावण्या नामशेष झाल्या होत्या.

४३. गुरूवर्य भिडे यांचा वाढदिवस

गुरू रा.रा. दामोदर बळवंत भिडे उर्फ भटजी , सातारा यांना २२ जुलै , १९३५ रोजी साठावे वर्ष लागले आहे. बृहन्महाराष्ट्र व महाराष्ट्र या भागात शारिरीक क्षेत्रातील त्यांची गेल्या चाळीस वर्षातील त्यांची कामगीरी लक्षात येते. तरूणांच्या अंगी वसत असलेल्या बिजरूपी शक्तीचा विकास करून त्यात राष्ट्रीय कार्य प्रवृत्त केले पाहीजे , हे जाणून त्यात आपले ४० वर्षाचे आयुष्य खर्ची घालण्याचे श्रेय गुरू भटजी यासच आहे. तरूणांच्या अंगी शारीरिक शिक्षणाची आवड उत्पन्न करून त्यांना वळण लावण्याचे कार्य महाराष्ट्र व बृहन्महाराष्ट्र या भागात आणि विशेषत: अकोला, अमरावती , पुणे , सातारा, पंढरपूर येथे गेल्या धामधूमीच्या काळात मुग्ध व त्यागी वृत्तीने त्यांनी केलेले आहे. महाराष्ट्र धर्माचे आधुनिक गुरू कै. अण्णासाहेब

पटवर्धन यांच्या निकट सानिध्यात राहून राष्ट्रकार्याची ज्योत त्यांनी संपादन केली. व त्याच गुरूजींच्या अनुग्रहाने त्यांच्या हातून स्पृहणीय कार्य झाले होते. १८८५ ते १८९८ या काळात पुण्याच्या धामधूमीच्या कार्यात त्यांनी प्रामुख्याने भाग घेतला होता. शारीरिक शिक्षण क्षेत्रातील वऱ्हाडच्या आजच्या सर्व चळवळीचे व प्रगतीचे उगमस्थान गुरू भटजीच होत. त्यांच्या उज्वल राष्ट्रभक्तीयुक्त शिक्षणाने प्रेरीत झालेल्या तरुणांनी विविध राष्ट्रकार्यात आज वऱ्हाडचे नाव अग्रेसरत्वास पोचविले आहे. अमरावती व अकोला या केंद्रातून अव्याहत लोकजागृती केली. बहुजन समाज व सरकार यांची उदासीन वृत्ती असतांना " शाळेतील तालीम मास्तर " हा गौण समजला जाणारा पेशा पत्करून तरूण लोकांमध्ये जागृती केली यातच त्यांची कार्यकुशलता दिसून येते. ते कोठेही नोकरीस असले तरी वेळोवेळी आपल्या कार्यातील स्नेह्यांच्या व शिष्यांच्या गाठी घेऊन त्यास मार्गदर्शक सल्ला देऊन त्यांनी आपले कार्य सतत चालू ठेवले आहे. या काळात त्यांनी अत्यंत अल्प पगारावर काम केले. निर्लोभी, निर्व्यसनी व उदात्त अशी त्यागी वृत्ती स्वीकारून त्यांनी आपले चरित्र, कार्यकर्त्यांस व शिष्य सांप्रदयास मार्गदर्शक केले. नेपाळ प्रकरणी ते सुमरुपाने सूत्रधार होते.

हा समारंभ ता. ३१ जुलै १९३५ रोजी पार पडला.

४४. डॉ. म्हैसाळकर यांचा अपघाती मृत्यू

अमरावतीचे सुप्रसिद्ध नागरिक डॉ. भगवानराव उर्फ बापूसाहेब म्हैसाळकर (एम.बी.बी.एस.) हे २८ ऑगस्ट, १९३५ रोजी रात्री अचलपूरहून मोटारने अंजनगांव सूर्जी येथे जात असतांना पथ्रोट नजीकच्या एका नाल्यात पुरात त्यांची मोटार सापडून त्यांत डॉ. म्हैसाळकर व त्यांचा ड्रायव्हर रामजीवन हे दोघेही पुरात वाहून गेले व नंतर काही अंतरावर त्यांची प्रेते व मोटार सापडली.

ही बातमी अमरावतीला कळताच शहरात हळहळ व्यक्त करण्यात आली. डॉ. म्हैसाळकर हे सार्वजनिक कार्यकर्ताही होते व त्यांचा शहरातील अनेक

संस्थांशीही संपर्क होता. त्यांच्या निधनाबद्दल दुखवटा व्यक्त करण्यासाठी शहरातील म्यु. शाळा व इतर काही शाळा बंद ठेवण्यात आल्या.

कै. डॉ. म्हैसाळकरांना श्रद्धाजली वाहण्यासाठी दि. २९ ऑगस्ट रोजी जोग चौकातीन काशीबाई इमारती समोरचे पटांगणात डॉ. टी. डब्ल्यू. जोशी यांच्या अध्यक्षते खाली नागरिकांची जाहीर सभा भरून तींत श्री. हरिहरराव देशपांडे , म्यु. हेल्थ ऑफिसर डॉ. कुळकर्णी, सौ. पार्वतीबाई पटवर्धन , श्री. असनारे , श्री. ओगले यांची भाषणे व अध्यक्षाचे भाषण होऊन डॉ. म्हैसाळकरांना श्रद्धांजली वाहण्यात आली होती. नंतर शनिवारी दुपारी ब्रह्मविद्या मंदिरात महिलांचा सभा भरुन तेथेही कै. डॉ. म्हैसाळकरांना श्रद्धाजली वाहण्यात आली होती.

४५. गोहर बाईचा जलसा -

कोलंबिया रेकॉर्ड कंपनीच्या प्रसिद्ध नायिका मिस गोहर कर्नाटकी यांच्या गायनाचा जलसा दि. ३० ऑगस्ट रोजी रात्री झाला. कार्यक्रमाला चिक्कार गर्दी होती. त्यानंतर दि. ३ सप्टेंबर रोजी रात्री इंद्रभुवन थिएटर मध्ये त्यांचा आणखी एक कार्यक्रम झाला होता.

४६. अबिसिनिया दिन -

वऱ्हाड प्रांतिक काँग्रेस सोशालिस्ट पक्षातर्फे दि. १ सप्टेंबर रोजी रात्री ब्रह्मविद्या मंदिरात डॉ. शिवाजीराव पटवर्धन यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरून 'अबिसिनिया दिन' साजरा करण्यात आला होता.

इटाली व अबिसिनिया लढ्याचे स्वरूप सुस्पष्ट करणारी सर्वश्री सहस्त्रबुद्धे , घाडगे, आचार्य त्र्यंबक जोशी व श्री. बाळासाहेब मराठे यांची या सभेत भाषणे झाली.

४७. शाहीर मुवाटे -

सुप्रसिद्ध शाहीर मुवाटे यांच्या पोवाड्याचा कार्यक्रम दि. १ सप्टेंबर रोजी

रात्री गणेश थिएटर मध्ये , परांजपे वाचनालय मदतीकरिता झाला होता.

४८. पं. हृदयनाथ कुंझरू -

हे दि. १ सप्टेंबर रविवार रोजी अमरावतीस आले होते. भांबोरा येथील हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचे कार्यक्रमाला उपस्थित राहून तसेच शहरातील काही संस्थांना भेटी देऊन ते मंगळवार ३ सप्टेंबरला नागपूरात रवाना झाले.

४९. वऱ्हाड प्रांतिक कॉंग्रेस कार्यालय अकोल्याला गेले -

श्री. ब्रिजलाल बियाणी हे वऱ्हाड प्रांतिक कॉंग्रेसचे अध्यक्ष निवडून आल्यानंतर १४ जानेवारी , १९३५ रोजी त्यांनी उमरावतीला १८८७ पासून असलेले वऱ्हाड प्रांतिक कॉंग्रेसचे कार्यालय अकोल्याला नेले.

५०. वृत्तपत्रीय स्वांतत्र्यावर घाला -

वृत्तपत्रांच्या स्वातंत्र्यावर घाला घालणारा फर्मानांचा कायदा (क्रिमिनल लॉ अमेंडमेंट ॲक्ट बील) आपल्या अधिकारात मंजूर करण्याचे व्हॉईसरायने ठरविले आहे. ह्या निषेधार्थ शुक्रवारी दि. २७ सप्टेंबर रोजी हिन्दुस्थानातील ब्रह्मदेशातील सर्व ठिकाणी हरताळ पाळावा असा ठराव हिन्दी वृत्तपत्राच्या संघाने ता. २१ रोजी भरलेल्या सभेत मंजूर केला आहे. त्याला अनुसरून उमरावतीच्या वृत्तपत्रांचा अंक बंद राहिला.

५१. निषेधाची जाहीर सभा

स्वराज्य संस्थापक पूण्यस्मरण श्री शिवाजी महाराज यांच्या पूर्वजांच्या संबंधाने अश्लील विधाने करणारे कर्नाटकी पंडीत श्री. बसनलाल, एम.ए आणि श्री. हलगल्ली, बी.ए. यांचा निषेध करण्याकरिता श्री. काशिराव बापूसाहेब देशमुख , संपादक , सुबोध ग्रंथमाला यांच्या अध्यक्षतेखाली ता. २१.९.३५ रोजी सायंकाळी ६ वाजता उमरावती येथील जोग चौकात नागरिकांची जाहीर सभा भरली. ब्राह्मण, ब्राह्मणेतर, लिंगायत , जैन, आर्य, शीख इत्यादी पंथाचे सुमारे पाचशे स्त्री - पुरूष

सभेला हजर झाले. श्री. सहस्त्रबुद्धे , डॉ. पटवर्धन, डॉ. भोजराज , शेठ पन्नालाल सिंघई, जैन प्यारेलाल सेवक, वाठ वकील , बाबासाहेब देशमुख वकील, श्री. महिवतराव कुरकुरे आणि श्री. गणेशराव पाटील आसरेकर इ. सुप्रसिद्ध वक्त्यांनी श्री. छत्रपतींच्या व मराठ्यांच्या पूर्वजांची उज्वल ऐतिहासिक परंपरा सांगून अत्यंत वीरश्रीयुक्त भाषण केल्यावर खालील ठराव पास करण्यात आले.

१. मुंबई इलाख्यातील अशी वाईट पुस्तके डोळे झाकून मंजूर केल्याबद्दल ग्रंथ परिक्षक सरकारी कमेटीच्या अधिकाऱ्यांचा व वरिल दोन्हीही लेखकांचा तीव्र निषेध २. जातीजातीत द्वेष पसरवणारी ही पुस्तके जप्त करून शाळाखात्यातून बंद करण्याबद्दल सरकारास विनंती . ३. वरिल दोन्ही लेखकांवर मुकदमे करण्याबद्दल सरकारास विनंती याप्रमाणे ठराव होऊन येथील सुप्रसिद्ध कविरत्न कृष्णमुर्ती यांनी 'शिवमहात्म्य' ही सुंदर कविता मनमोहक आलापात म्हणून दाखविल्यानंतर शिवछत्रपतींच्या प्रचंड जयजयकारात सभा विसर्जित झाली.

इ. स. १९३६

१) श्री हनुमान व्यायाम शाळेचा गुजरात दौरा

२) डॉ. ग. श्री. खैर यांचे व्याख्यान.

३) कै. नरूभाऊ परांजपे स्मृतिदिन.

४) वनिता समाजाचे पंजीकरण.

५) प्रा. मा. दा. आळतेकरांचे व्याख्यान.

६) नगर वाचनालय निवडणूक.

७) संस्कृत मंडळाचा वार्षिकोत्सव

८) सायकलवरून जगप्रवास.

९) जोगेशचंद्र चतर्जी वरील अन्याया विरूध्द निषेधसभा.

१०) ह. व्या. प्र. मंडळ खेळाडूंचा युरोपचा दौरा
नगर पालिकेच्या वतीने सत्कार.

इसवी सन १९३६

१) हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचा गुजराथेतील दौरा.

गायकवाड महाराजांचे सहाय्यार्थ अभिवचन :

अमरावती येथील हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ ही व्यायाम संस्था आता सर्व हिंदुस्थानांत मशहूर होऊन राहिली आहे. आणि यानंतर ती आंतरराष्ट्रीय स्वरूप धारण करू पाहत आहे कारण चालू सालक्ष जर्मनीतील बर्लिन येथे जे जागतिक खेळांचे आंतरराष्ट्रीय संमेलन भरावयाचे आहे त्यात भाग घेण्यासाठी प्रस्तुत संस्थेस निमंत्रण आहे वर्लिन सारख्या ठिकाणी जाऊन हिंदी खेळांचे प्रदर्शन करून त्यांची खासीयत जागतिक व्यायाम शाळांना पटवून देणे ही काही सहज साध्य गोष्ट नव्हे; परंतु या संस्थेने ती कुवत आपल्या ठिकाणी आणली आहे.

बर्लीन येथील व्यायाम विद्यापीठाच्या प्रतीचा त्याचप्रमाणे हिंदुस्थानात हिंदी शारीरिक शिक्षण शास्त्राच्या श्रेष्ठत्वाचा मान बडोद्यात आहे. तेथे जाऊन आपली श्रेष्ठता, बडोदेकरांच्या प्रत्ययास आणून द्यावी असे ठरवून हा गुजराथेतील प्रदीर्घ दौरा केला ही अत्यंत आनंद व अभिमानाची गोष्ट आहे. मंडळाचा हा दौरा अपेक्षे बाहेर यशस्वी झाला आणि म्हणून आम्ही त्याला 'दिग्विजय' ही संज्ञा देतो.

मुंबईसारख्या हिंदुस्थानच्या महत्वाच्या शहरी लोकप्रियता संपादून आणि बडोद्यासारख्या व्यायाम विद्येच्या माहेरघरी अभूतपूर्व विजय मिळवून खेळाडू ता. २ रोजी नागपूर एक्सप्रेसने अमरावतीस परत आले.

२) डॉ. ग. श्री. खैर यांचे व्याख्यान : परदेशातील प्रवास संपवून नुकतेच स्वदेशी परत आलेले, पुणे अनाथ विद्यार्थी गृहाचे आजन्म सेवक श्री. ग. श्री. खैर (एम. ए., पी. एच. डी.) यांचे अमरावती शहर वाचनालयातर्फे, बुधवार ता. ६ रोजी सायंकाळी ६ वाजता को-ऑपरेटीव्ह हॉलमध्ये 'पाश्चात्य जग व हिंदुस्थान' या विषयावर व्याख्यान झाले.

३) कै. नरूभाई परांजपे स्मृतिदिन : येथील ब्रम्हविद्यामंदीरात गेल्या शुक्रवारी ना. दादासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला. त्याचप्रमाणे भारत समाज बालिका विभाग खापर्डे बगीच्या शाखेतील मुलींना श्रीमती अक्काताई आलूरकर यांच्या अध्यक्षतेखाली ता. ३ रोजी ४ वाजता साजरा केला.

४) वनिता समाज : ही संस्था नुकतीच पंजीबध्द करण्यात आली असून संस्थेच्या नियमानुसार नूतन वर्षारंभापासून नवीन सेक्रेटरी व खजिनदार नेमण्यात आलेले आहेत त्याबद्दलची सभा ता. ५.१.१९३६ रोजी वनिता समाज कार्यालयात भरविण्यात आली. सेवानिवृत्त सेक्रेटरी मिसेस मिलबाबा, विमलाबाई देशमुख व मिसेस पद्मावती मोटे ह्यांनी गेल्या वर्षी आपली कामगिरी उत्तम तऱ्हेने केल्याबद्दल संस्थेतर्फे त्यांचे जाहीर आभार मानण्यात आले. मिसेस लक्ष्मीबाई मोटे यांनी मिसेस देशमुख यांच्या गैरहजेरीत सेक्रेटरीने काम फारच नेटाने व उत्साहाने केले ह्याबद्दल नागपूरला नुकत्याच प्रदर्शनात त्यांना प्रशस्तीपत्र मिळाले. ह्याबद्दल संस्थेतर्फे त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

५) प्रो. आळतेकरांचे व्याख्यान : उमरावती येथील किंग एडवर्ड कॉलेजातील मराठी वाङ्मय विभागातर्फे मुंबईचे सुप्रसिध्द साहित्यिक प्रो. आळतेकर यांचे सोमवार ता. ६ रोजी दुपारी ४ वाजता येथील मराठीचे अध्यापक श्री. वि. भि. कोलते यांचे अध्यक्षतेखाली कॉलेजचे लेक्चर हॉलमध्ये ''काव्य'' या विषयावर व्याख्यान झाले.

६) शहर वाचनालय : पूर्वी जाहीर झाल्याप्रमाणे वाचनालयाच्या निवडणूकी गेल्या रविवारी सकाळी होऊन पूर्वीचेच अध्यक्ष रा. ब. डॉ. काकासाहेब भट , उपाध्यक्ष दे. संभाजीराव गोखले व चिटणीस श्री. दि. ह. सहस्त्रबुध्दे, व श्री चुटके, ओझरकर वकील हे अविरोध निवडून आले. व्यवस्थापक मंडळावर पुढील दहा सभासदांना निवडण्यात आले. डॉ. पटवर्धन, डॉ. बापट, डॉ. पातूरकर, श्री. रा. ह. सहस्त्रबुध्दे, श्री. वा.सी. बापट, श्री. नी. ल. लिमये वकील आणि श्री. शंकरराव बोधनकर श्री. देवस्थळे मास्तर सौ. शांताबाई भट, व श्री. शालीग्राम.

७) संस्कृत मंडळाचा वार्षिकोत्सव : येथील किंग एडवर्ड कॉलेजमधील संस्कृत मंडळाचा पाचवा वार्षिकोत्सव गेल्या रविवारी सकाळी नागपूरचे विद्याभूषण कृष्णशास्त्री घुळे यांचे अध्यक्षतेखाली यशस्वी रीतीने पार पडला. रात्री कॉलेजमधील विद्यार्थ्यांनी ''शाकुंतल'' नाटकाचा चवथा व पाचवा अंक संस्कृतमध्ये करून दाखविला. नाट्यप्रयोग एकंदरीत बरा वठला. श्री. ह. नी. मामदान नावाच्या मुसलमान विद्यार्थ्याने ह्या नाट्यप्रयोगात शकुंतलेचे काम केले ही कौतुकाची गोष्ट होय. त्याप्रमाणे मुलींच्या नाट्यप्रयोगात कु. लीला यांचे अनुसयेचे काम वाखाण्याजोगे झाले.

८) सायकलवर जगप्रवास : सायकल वरून जगाचा प्रवास करण्याला निघालेल्या श्री. एम. एम. सोनाळकर व श्री. जी. जी. गंभीरे ह्यांचा मुक्काम रानडे लॉज मध्ये होता. त्यांनी आतापर्यंत बडोदा, इंदूर, नाशीक, पुणे, मुंबई, मद्रास, सिकंदराबाद, चांदा, वर्धा, नागपूर वगैरे ४२०० मैलाचा प्रवास करून ते वऱ्हाडात प्रवास करीत होते. वऱ्हाडातील प्रवासानंतर ते दिल्ली, आग्रा काश्मीरकडे गेले. व नंतर परदेशांच्या प्रवासाला प्रारंभ केला.

९) जाहीर सभा : काकोरी कटात शिक्षा पावलेले श्री. जोगेशचंद्र चतर्जी यांना लखनौ तुरूंगात ठेवण्यात आले. सरकारने त्यांच्या मागण्या अमान्य केल्याबद्दल त्यांनी गेल्या ६० दिवसापासून अन्नत्याग आरंभ केला. या निमित्त वीर वामनराव जोशी यांचे अध्यक्षतेखाली जोग चौकात निषेधपर सभा झाली.

१०) अमरावतीच्या श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या खेळाडूंचा दौरा ऑलिम्पीक सामने व हिंदुस्थान :

बर्लिन ऑलिम्पीक व जागतिक व्यायाम परिषद बर्लिनच्या वतीने अमरावतीच्या श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाला दि. १५.११.३७ ला ऑलिम्पीकचे निमंत्रण मिळाल्या वरून मंडळाने आपल्या खेळाडूंची निवड केली. त्याप्रमाणे श्री श्री. कृ. काणे, अध्यक्ष २) श्री हरि अनंत असनारे, संघटक व शिक्षक ३) श्री. खानिवाले, सचिव डॉ. कल्याणपुरा, मुंबई, सहाय्यक सचिव, श्री हरिसिंग

ठाकूर सुरत, श्री रा. मो. अग्रवाल एलिचपूर श्री. भ. रा. देशपांडे अमरावती, श्री नगीनदास मेहता, मुंबई, श्री डी. एस. सहजे, जळगांव, श्री जी. शहा, नडीयाद, श्री डी. एम. लाड, मुंबई, श्री ज. म. खडके बोपी, पनवेल, श्री पी. एच. राजोदा, व्हिलेपार्ले, श्री एच. देशमुख, यावल, ल. सी. कर्मष्कर, अमरावती श्री जी. एम. जमखिडीकर, अमरावती, श्री कमलनयन बजाज (वर्धा) श्री एम. ने. मर्डेकर, मुंबई, श्री डब्ल्यु. जी. नांदुरकर, अमरावती. एम. जी. चिखलीकर, अमरावती एस. बी. खेर, मुंबई, एस. बी. माजगांवकर, एस. डी. काळे, यवतमाळ, एम. सी. वानखडे, अमरावती, श्री व्ही. कमान मागूनजाऊन बर्लिनला मिळाले. डॉ. पटवर्धन हे या (पथकाचे) अध्यक्ष होते. त्यांना पासपोर्ट मिळाला नाही व डॉ. कोकर्डेकर यांना नागपूर (विद्यापीठाने) रजा देण्यास इन्कार केला. यामुळे दोघेजण जाऊ शकले नाही. व्हेनिस (इटाली च्या मार्गाने हे पथक २२ जुलै १९३६ ला बर्लिनला पोहोचले आणि १७ ऑगस्ट १९३६ ला त्यांचा मुक्काम बर्लिनला होता. त्यानंतर हॉलंड, फ्रान्स या मार्गाने परत उमरावतीला आले. फ्रान्स मार्गाने कोलंबो, मद्रास व मुंबईला आले. २७ डिसेंबर १९३६ ला मुंबईला पोहोचले. या प्रमाणे युरोप दौऱ्याला २॥ महिने लागले.

मंडळाच्या पथकाने जागतिक व्यायाम परिषदेच्या समोर ता. २० जुलै, ११ ऑगस्ट व १७ ऑगस्ट याप्रमाणे ३ दिवस हिंदुस्थानी राष्ट्रीय व्यायाम खेळाचे प्रदर्शन केले.

ता. ३० ऑगस्टला ह्या पथकाचे अध्यक्ष डॉ. काणे यांचे श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ पुरस्कृत ''हिंदी व्यायाम पध्दती'' या विषयावर व्याख्याने झाली.

खेळाडूंच्या या पथकाचा परदेश दौऱ्यावर जातांना अमरावती व मुंबई येथे भव्य सत्कार झाला व निरोप देण्यात आला. त्यावेळी श्री. दादासाहेब खापर्डे यांनी आशीर्वाद दिला होता. परत आल्यानंतर अमरावती नगरपालिकेत सत्कार झाला.

इसवी सन १९३७

१) श्री. ब्रिजलाल बियाणींचा विजय

२) वनिता समाजाचा वार्षिकोत्सव.

३) ब्रिजलाल बियाणींना अटक

४) अम. जि. काँ. कमिटी निवडणूक.

५) सराफा संघटनेची स्थापना.

६) बादशहांच दफनविधी प्रीत्यर्थ सुटी.

७) उपासनी महाराज अमरावतीत.

८) स्वातंत्र्यदिन.

९) भगिनींचा मकर संक्रमण उत्सव.

१०) राष्ट्रीय काँग्रेस कार्यकारिणीची निवडणूक
वीर वामनराव दादा अविरोध निवडून आले.

११) विदर्भ आयु. महा. चे संमलेन.

१२) वॉर्डाची निवडणूक.

१३) काँग्रेस कचेरीची झडती.

१४) भारत समाजाचा वृत्तांत

१५) स्वातंत्र्यदिनांचे दोन ठराव.

१६) ब्रिजलाल बियाणी यांचे सभासदत्व रद्द.

१७) तरूण साहित्य संघाची स्थापना.

१८) अमरावती खेडे विभागातून विधान मंडळासाठी निवडणूक.

१९) साम्य वाद्यांचा विरोध.

२०) ना. खापर्डे नागपूर विद्यापीठावर.

२१) जि. काँ. ची. सभा.

२२) भाई रुईकर यांचे स्वागत.

इसवी सन १९३७

निवडणुकांची धामधूम : काँग्रेसचा प्रचंड विजय

१) निवडणूक घोषणा :

वऱ्हाडातील कॉन्सील ऑफ स्टेटचे काँग्रेस पक्षीय सभासद दे. भ. ब्रिजलाल बियाणी हे कौन्सील ऑफ स्टेटच्या निवडणूकीत विजयी झाले असे मध्यप्रांत सरकारच्या गेल्या गॅझेटमध्ये प्रसिध्द झाले आहे.

मध्यप्रांत : वऱ्हाड लेजिस्लेटिव्ह असेंबलीच्या होणाऱ्या निवडणूकी करता सर्वसाधारण खेडे विभाग मुलसमान शहर विभाग व जमीनदार मतदार संघ ह्या जागा करीता वऱ्हाडात उमेदवार पत्रिका सादर करण्यात आल्या उमरावती येथे पुढील उमेदवारांनी उमेदवार पत्रिका भरल्या.

वऱ्हाड जमिनदार मतदार संघ :

१) बॅ. रामराम देशमुख (काँग्रेसचे उमेदवार)

२) श्री. लालजी विठोबा पाटील (शेतकरी संघ)

सर्वसाधारण खेडे विभाग : उमरावती तालुका : १) श्री नारायण जानराव देशमुख २) श्री. के. टी. देशमूख ३) श्री. बोके

४) श्री. रोंघे ५) श्री. चोरे ६) श्री. पी. के. देशमूख वकील (अमरावती.)

मुसलमान मतदार संघ पूर्व वऱ्हाड शहर विभाग

१) महंमद नाझरखान मालेखान (एलिचपूर)

२) खा. सा. सय्यद मुजफ्फर हुसेन व

३) महंमद शरफुद्दीन.

२) मा. खापर्डे याच्या भगिनीवर्गाला उपदेश

अमरावती येथील वनिता समाजाच्या ४४ व्या वार्षिकोत्सवाचे अध्यक्ष ह्या नात्याने मध्यप्रांतांचे शिक्षणमंत्री बाबासाहेब खापर्डे ह्यांनी रविवार ता. १० जानेवारी रोजी सकाळी जे मननीय भाषण केले ते पुढे दिले आहे.

ना. खापर्डे म्हणाले ...

लेडी यशोदा बाई जोशी ह्यांनी माझे लहानपण पाहिले ही गोष्ट खरी आहे. माझ्या मनात त्यांच्या विषयी मातृवत् आदर आहे. वऱ्हाडात विशेषतः स्त्री शिक्षणाचा प्रारंभ सर मोरोपंत व लेडी जोशी ह्यांनीच केला व पुष्कळ सहन करूनही त्यांनी हे कार्य धडाडीने चालविले. वऱ्हाडातील स्त्री शिक्षणाच्या प्रसाराचे श्रेय जोशी यांचे आहे हे मी अभिमानाने सांगू शकतो.

उमरावती येथील वनिता समाज चा वार्षिकोत्सव सकाळी ९ वाजता येथील वऱ्हाड सहकारी संस्थेच्या विशाल दिवाण खाण्यात शिक्षणमंत्री ना. बाबासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली यशस्वी रीत्या साजरा झाला.

शहरातील निमंत्रीत प्रतिष्ठित स्त्री पुरुष समारंभाला हजर होते. स्वागतपर पदाने कार्यक्रमाला सुरूवात झाली. अध्यक्ष रीसतसर स्थानापन्न झाल्यानंतर गतवर्षीचा अहवाल सेक्रेटरी सौ. मायादेवी जोशी ह्यांनी वाचून दाखविला.

अध्यक्ष ना. बाबासाहेब खापर्डे ह्यांनी संस्थेच्या अडचणी बद्दल सहानुभूती दाखवून उमरावती करांनी संस्थेला मदत केली पाहिजे असे सांगितले. ह्या प्रसंगी भगिनी वर्गाला उपदेशपर असे मननीय व विदवत्ताप्रचुर भाषण ना. बाबासाहेबांनी केले.

अध्यक्षांच्या भाषणानंतर अध्यक्ष व निमंत्रित स्त्री पुरुषांनी वनिता समाजातील कला कौशल्यांच्या प्रदर्शनाला भेट दिली ह्याच समारंभात अध्यक्षांच्या हस्ते विद्यार्थीनींना निरनिराळ्या विषयातील प्राविण्याबद्दल बक्षीसे देण्यात आली. वनिता समाजातील मुलींनी शारीरिक शिक्षण विषयक कवायती करून दाखविल्या व सौ. सरलाबाई चौबळ ह्यांनी सर्वांचे आभार मानल्यानंतर समारंभ संपला.

३) श्री. ब्रिजलाल बियाणी यांना अटक, वऱ्हाडातील दडपशाही :

कौन्सिल ऑफ स्टेट चे सभासद व वऱ्हाड प्रांतिक काँग्रेस कमिटी व पार्लमेन्टरी बोर्डाचे अध्यक्ष श्री. ब्रिजलाल बियाणी ह्यांच्यावर दि. ११ रोजी इ. पी. कोड. १२५ (अ) राजद्रोह अन्वये समन्स बजावण्यात येवून सिटी मॅजिस्ट्रेट समोर हजर राहण्याचे फर्माविण्यात आले. त्याप्रमाणे ते कोर्टात हजर झाले ता. ९.११.३६ इ. रोजी खामगाव येथे केलेल्या भाषणाबद्दल श्री. बियाणींवर राजद्रोहाचा आरोप ठेवण्यात आला. अकोला सोडून जावू नये, व भाषण करू नये असे निर्बंध घालून त्यांना जामिनावर मोकळे सोडण्यात आले.

जाहीर व्याख्यान : दे. भ. ब्रिजलाल बियाणी यांना अटक करून निवडणूकीस खो देण्याच्या सरकारी धोरणाविरूध्द व कौन्सिल निवडणूकीच्या प्रचारार्थ दे. भ. वीर वामनराव जोशी यांचे जोग चौकात काँग्रेस कमिटीतर्फे जाहीर व्याख्यान झाले.

४) अमरावती जिल्हा काँग्रेस कमिटी : अमरावती जिल्हा क. च्या नवीन निवडणुकीत सन १९३६ करीता खालील गृहस्थांची निवडणूक करण्यात आली. तीत उमरावती नगर तर्फे दे. भ. बाळासाहेब मराठे, रंगनाथराव गिरगांवकर, सौ. पार्वतीबाई पटवर्धन, उमरावती तालुक्यातर्फे गणेशराव देशमुख, गोविंदराव देव, सदाशिवराव पांडे, यांना निवडण्यात आले. एलीचपूर तालुका नानासाहेब नगरनाईक, लक्ष्मणराव नाथे, बापूसाहेब देशमुख, मोर्शी तालुका जग्गूसा तांबी, बाळकृष्ण अंबादास मोहरील, शेषराव घाडगे, दर्यापूर तालुका श्री. चिकाटे, लालसिंग बालकिसनसिंग मिरझा अजिजल्लाखान, चांदूरतालुका त्र्यंबक रामकृष्ण म्हसदकर रघुनाथराव वालकर, बळवंत विठ्ठल देशपांडे वरील १८ सभासदांनी सहा सदस्य निवडल्या नंतर २४ सभासदांची जिल्हा काँग्रेस कमेटी तयार झाली.

५. सराफ असोसिएशनची स्थापना

अमरावती येथे शुक्रवारी ता. १७.१.१९३६ रोजी रात्री ८ वाजता अमरावती सराफ मंडळाची प्रो. सोमेश्वर राजाराम लेंघे यांचे अध्यक्षतेखाली श्री.

छक्कीलालजीच्या हॉलमध्ये सभा झाली. सभेमध्ये उमरावती सराफ असोसिएशन स्थापन करण्यात आले. त्यात आजीव सभासदांची नेमणूक करण्यात आली. अध्यक्ष नारायणांसह खुशालसिंह, उपाध्यक्ष, देविदास रामजी महाजन, सेक्रेटरी, सोमेश्वर कोल्हे, सह. सेक्रेटरी , गोविंददास लक्ष्मणदास खजिनदार , श्री चिमोटे, हिशेब तपासनीस श्री जयकुमार मोहनलाल हे असून कार्यकारी मंडळात १. व्यकटीदास मथूरादास २. भिकमचंद डागा ३. लक्ष्मणदास भाऊजी४ देवीदास पोतदार ५. सोमेश्वर बाजीराव यांना निवडण्यात आले.

६. बादशाहच्या अंत्यविधीची सुटी

ख्रिस्तवासी झालेले पंचम जॉर्ज बादशाह यांच्या प्रेताचा दफन समारंभ झाला. शाळा कॉलेज व कोर्ट यांना सुटी जाहीर झाली.

७. उपासनी बुवा

श्री उपासनी बुवा गेल्या तीन दिवसांपासून आले त्यांचे वास्तव्य ना. दादासाहेब खापर्डे यांचे कडे होते.

८. उमरावतीचा स्वातंत्र्यदिन

ता. २६ रोजी झेंडावंदन व प्रभातफेरी होऊन हा दिवस उत्साहाने साजरा झाला. रात्री ७ वाजता वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली नागरिकांची जाहीर सभा झाली. डॉ. भोजराज यांनी पूर्ण स्वराज्य हे काँग्रेसचे ध्येय आहे हे सांगितले.

९. मकर संक्रातीचा उत्सव

अमरावती स्टार क्लबच्या विद्यमाने फ्रेजरपूरा कँप भागात ता. १४.१.३६ दुपारी ४ वाजता हरिजन भगिनींचा हळदीकूंकू समारंभ सौ. पार्वतीबाई पटवर्धन यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला. प्रारंभी स्वागतपर गाणे झाल्यानंतर कु. चंद्रभागाबाई गेडाम आणि सौ. द्रौपदीबाई मेश्राम यांची भाषणे झाली.

१०. काँग्रेस निवडणूकी

राष्ट्रीय सभेच्या प्रतिनिधिच्या निवडणूकीकरिता उमरावती शहर विभागातर्फे वीर वामनराव जोशी व देशभक्त रतनलाल काळे हे दोघे उमेदवार उभे होते परंतु वीर वामनराव हे वऱ्हाडातील सत्याग्रह व युद्ध मंडळातील पहिले व अखेरचे अध्यक्ष म्हणून सत्याग्रहावरील निष्ठा व्यक्त करण्याकरिता रतनलाला काळे यांनी आपली उमेदवारी ता. १ रोजी स्वखुषीने परत घेतली व वीर वामनराव दादा अविरोध निवडून आले.

११. विदर्भ आयुर्वेद विद्यालय

विदर्भ आयुर्वेद विद्यालय, उमरावती या संस्थेतील विद्यार्थ्यांचे वार्षिक संमेलन ता. २१, २२ व २३ डिसेंबर १९३५ ला मोठ्या उत्साहाने पार पडले. यंदा स्नेहसंमेलनाकरिता अहमदनगरचे वैद्य पंचानन गंगाधर शास्त्री गुणे यांस अध्यक्ष म्हणून नेमले होते.

१२. निवडणूकीचा सामना

जमिनदार, कामगार, व्यापारी , ॲग्लो इंडियन व युरोपीयन मतदार संघ सोडून दिल्यास वार्डाच्या सर्व मतदार संघात एकंदर १६/७५/६४५ मतदार नोंदण्यात आले होते. प्रांताच्या एकंदर लोकसंखेशी या मतदाराचे शेकडा प्रमाण ११ पडले. ह्या मतदारांनी ११२ प्रतिनिधी निवडून द्यावयाचे असून त्यासाठी २७५ उमेदवार निवडणूक लढविणार होते.

मध्यप्रांत वऱ्हाडात निवडणूकीच्या आखाड्यात मुख्यत: चार पक्ष उतरले. सर्वात संघटीत असा काँग्रेस चा पक्ष आहे. याशिवाय हिन्दू सभा, राष्ट्रीय काँग्रेस पक्ष , ब्राह्मणेतर पक्ष व मुसलमान असे पक्ष आहेत.

१३. काँग्रेस कचेरीची झडती

भुसारी गेट बाहेरील श्री. रामभाऊ देशपांडे वकील यांच्या माडीवर

असलेल्या अमरावती जिल्हा काँग्रेस कमेटीच्या कचेरीची गेल्या रविवारी दुपारी येथील पोलिस खात्याने झडती घेतली.

१४. भारत समाज

या संस्थेच्या बालिका विभागाने मुलींना शारिरीक शिक्षण देण्याचे कार्य उत्तम तऱ्हेने केले. गेल्या रविवारी सायंकाळी समाजाच्या बालीका विभागाच्या तृतीय वार्षिकोत्सव श्री. अण्णासाहेब असनारे ह्यांच्या अध्यक्षतेखाली साजरा झाला. ह्या प्रसंगी मुलींनी केलेल्या कवायती व खेळ कौतुक करण्याजोगे होते. श्री. बाबूराव पैठणकर, ह्यांनी संस्थेच्या कार्याची जाणीव करून देताना संस्थेच्या अडचणीही उपस्थित नागरिकांसमोर मांडल्या व अध्यक्ष श्री असनारे ह्यांनी संस्था आपल्या शाळाद्वारे इतरत्र भारत समाजाचे नाव भारतात उज्वल करेल अशी आशा प्रदर्शित केली.

१५. अमरावतीचा स्वातंत्र्यदिन

अमरावती नगर काँग्रेस कमेटीच्या वतीने मंगळवार ता. २६ जानेवारी रोजी सायंकाळी ६.३० वाजता जोग चौकात स्वातंत्र्यदिनानिमित्त श्री. पन्नालालजी सिंघई यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरून पुढील दोन ठराव एकमताने मंजूर करण्यात आले.

ठराव क्र. १ - काँग्रेसच्या लाहोर अधिवेशनापासून हिन्दी राष्ट्र ज्या स्वातंत्र्य प्रतिज्ञेची घोषणा दरवर्षी करीत आहे , ह्या प्रतिज्ञेला अटकाव करण्याच्या सरकारच्या धोरणाचा अमरावती शहरवासियांची ही सभा तीव्र निषेध करते.

ठराव क्र २ - प्रत्येक राष्ट्राला स्वतंत्र असण्याचा हक्क आहे व तो लोकांपासून कोणीही हिसकावून घेवू शकत नाही असा आमचा विश्वास म्हणून आम्ही अशी जाहीर प्रतिज्ञा करतो की हिन्दुस्थान देश स्वतंत्र करण्याचा आम्ही प्रयत्न करू व आमचे ध्येय प्राप्त होईपर्यंत एकसारखे झगडत राहू.

पहिला ठराव दे.भ. नानासाहेब यांनी मांडला व काँग्रेस उमेदवाराच्या पेटीतच मतदारांनी आपली मते टाकावीत व सरकारी बंदीला उत्तर द्यावे असे त्यांनी आपल्या भाषणात सांगितले. पार्वतीबाई पटवर्धन यांनीही आपल्या भाषणात दुर्गाताई ह्यांनाच अमरावतीतील बंधू-भगिनींची मते देऊन सरकारी धोरणाचा निषेध अशा प्रकारे करावा असे सुचविले. सभेत पूर्ण वऱ्हाड शहर विभागाचे काँग्रेस उमेदवार श्री. नानासाहेब गोखले यांचेही भाषण झाले. दुसरा ठराव श्री. माधवराव देशपांडे यांनी मांडला व त्याला श्री. बाळासाहेब मराठे ह्यांनी परिणामकारक भाषण करून पाठिंबा दिला. काँग्रेस उमेदवारांनाच या निवडणूकीत मते द्यावी हे त्यांनी आपल्या वक्तृत्वशैलीने पटवून दिले. आचार्य त्र्यंबकराव गुरूजी यांनी ठरावाला पाठींबा देऊन सर्वांनी काँग्रेसच्या निवडणूकीत मदत करावी व ज्यांनी निवडणूकीच्या दिवशी स्वयंसेवकाचे काम करावयाचे असेल ह्यांनी काँग्रेसला कळवावे असे सांगितले. राष्ट्रीय सभेच्या जयजयकारात दोन्हीही ठराव मंजूर झाले व कु. मथुताई जोशी ह्यांनी स्वातंत्र्यगीत म्हटल्यावर सभा बरखास्त झाली. सभेला लोकसमुदाय बराच जमला होता.

१६. काँग्रेस सभासदत्व रद्द केले

सरदार वल्लभभाई पटेल यांच्या आदेशानुसार नामदार ब्रिजलाल बियाणी यांनी, काँग्रेसच्या अधिकृत उमेदवाराविरूद्ध निवडणूकीत उभे राहून काँग्रेसच्या शिस्तीचे उल्लंघन केल्याबद्दल डॉ. पंजाबराव देशमुख, श्री. चौबळ, श्री. पाटील यांचे सभासदत्व रद्द केले. शेतकरी संघ काँग्रेसच्या समोर रहावा म्हणून डॉ. पंजाबराव व श्री. चौबळ यांनी गेल्या वर्षी मुदतीच्या अगदी शेवटच्या दिवशी तिसऱ्या प्रहरी चार वाजता गडबडीने चार चार आणे देऊन काँग्रेसचे कार्य केले होते असे समजते ह्यापूर्वी त्यांना काँग्रेसची आठवणही नव्हती.

१७. तरुण साहित्यिक संघ :

प्रो. भ.रा. देशपांडे व श्री. प.वि. जोशी , श्री. द.रा. सराफ यांच्या प्रयत्नाने

श्री. जा.दा. राऊळकर ह्यांच्या अध्यक्षतेखाली येथे तरूण साहित्यिक संघ स्थापन झाला असून या संघातर्फे शनिवार ता. ३० जानेवारी रोजी वऱ्हाडात सरकारी संस्थेच्या दिवाणखान्यात मथुराबाई द्रविड यांच्या अध्यक्षतेखाली किर्लोस्कर मासिकाचे सांप्रतचे धोरण अर्थात विरूद्ध वहिनीसाहेब वाद या विषयावर उद्‌बोधक जाहीर चर्चा झाली. या चर्चेत श्री. बा.स. गडकरी, प्रो. कोलते, श्रीमती सरलाबाई प्रधान , सौ. ब्रह्म, वै.भू. हिर्लेकर शास्त्री, श्री. अ.तु. वाळके, श्री. द.रा.सराफ श्री. श्रीमाळी ह्यांनी भाग घेतला होता.

१८. उमरावती जिल्हयातील निवडणूकी : मतनोंदणीचे केंद्रावर निकाल

मध्यप्रांत वऱ्हाड लेजिस्लेटिव्ह असेब्लीच्या जागांकरिता उमरावती जिल्हयातील सर्वसाधारण खेडे विभागातून ज्या निवडणूकी झाल्या त्यांच्या मतनोंदणीचे निकाल गेल्या आठवड्यात जाहीर झाले असून ते केंद्रवार पुढे दिलेले आहेत.

क्र	मतदान केंद्र	गणेशराव	पंजाबराव	वाटाणे
१	उमरावती	१०५	९४	७६
२	आष्टी	४५५	२७८	९१
३	खोलापूर	३४४	१९०	५
४.	बडनेरा	२९३	१६५	१५
५.	थुगांव	२८४	३२०	१५९
६.	शिराळा	२०९	१४५	१४७
७.	लोणी	२०८	३४०	६७
८.	माहुली	१०७	२२४	४६
		२६०४	२६००	६०६

पूर्व वऱ्हाड मुसलमान शहर विभाग

खानसाहेब सय्यद मुझफ्फर हुसैन १३२२ मि. महंमद नाझरजान (स्वतंत्र)

११७०, मि. महंमद शरफुद्दिन (शरिफ पक्ष) १०७० या तीन उमेदवारात खा. सा. मुझफर हुसैन निवडून आले.

उमरावती मुसलमान खेडे विभाग मि. हिदायतअली (मुस. पार्ल. बोर्ड) ४८४, मो. रियासत अली (शरीफ पक्ष) ८००

कोर्टातून निघालेली मिरवणूक =

दे.भ. गणेशराव देशमुख यांची यानंतर कोर्टापासून मिरवणूक काढण्यात आली. मिरावणूकीसमोर बँड वाजत होता. काँग्रेसचा जंगी ध्वज फडफडत होता. शहरातील सर्व रस्त्यावरून मिरवणूक काढण्यात आल्यानंतर काँग्रेस कमेटीसमोर सभा विसर्जन पावली.

दे.भ. गोखले निवडून आले

पूर्व वऱ्हाड शहर विभागातर्फे काँग्रेसचे उमेदवार दे.भ. संभाजी राव उर्फ नाना साहेब गोखले हे निवडून आल्याचा निकालही याच दिवशी वऱ्हाडचे कमिशनर साहेबांचे कचेरीत जाहीर झाला. दे.भ. गोखले यांना ५८४७ मते मिळाली व त्यांचे प्रतिस्पर्धी श्री. चौबळ ह्यांना १४१ मते पडली. श्री. गोखले हे प्रचंड बहुमताने निवडून आल्याचे जाहीर झाल्यामुळे उमरावतीकरांच्या आनंदात भर पडली.

अभिनंदनाची प्रचंड सभा

दे.भ. गणेशराव देशमुख , दे.भ. संभाजीराव गोखले व मोर्शी खेडे विभागातून अविरोध निवडून आलेले दे.भ. तात्यासाहेब जतकर ह्या तीन विजयी काँग्रेस उमेदवारांचे जाहीर अभिनंदन करण्याकरिता येथील जोग चौकात शुक्रवारी रात्री ८.३० वाजता अमरावती जिल्हा काँग्रेस अध्यक्ष दे.भ. डॉ. भोजराज यांच्या अध्यक्षतेखाली प्रचंड जाहीर सभा भरली होती. १९३० च्या सत्याग्रह आंदोलनानंतर एवढी प्रचंड जाहीर सभा उमरावतीत गेल्या शुक्रवारीच झाली होती. भगिनी वर्गही

सभेत मोठ्या प्रमाणावर हजर होता. प्रारंभी अध्यक्ष डॉ. भोजराज यांनी प्रास्ताविक भाषण करून निवडणूकीच्या धामधूमीत विरोधकांच्या प्रचारामूळे जे गैरसमज उत्पन्न होण्याचा संभव होता ते दूर करण्याऱ्या बाबींचे अधिकार वाणीने स्पष्टीकरण केले. आ. केदार , पं. दिवाकरशास्त्री कानडे, श्री. कोल्हे इ. कडून वरील विजयी उमेदवारांना ज्या अभिनंदनाच्या तारा आल्या होत्या त्या ह्यानंतर श्री बाळासाहेब मराठे यांनी वाचून दाखविल्या. यानंतर निरनिराळ्या संस्थांतर्फे तिन्ही विजयी उमेदवारांना पुष्पहार घालण्यात येऊन त्यांचे अभिनंदन करण्यात आले.

बॅ. रामराव देशमुख निवडून आल्याचे जाहीर करण्यात आले : वऱ्हाडी व्यापारी मतदार संघ

शेठ गोपालदास मोहता (वणीश्रम स्वराज्य संघ) ..... ६२ श्री. सुमनचंद तापडीया (काँग्रेस) ..... ५७ शेठ गोपालदासजी मोहता हे ५ मते जास्त पडून निवडून आले.

या मतदार संघातील १२७ मतदारांपैकी १२० मतदारांची मते नोंदविली. त्यापैकी एक मत रद्द ठरले. बाकीच्या ११९ मतांची जिल्हावार विभागणी पुढीलप्रमाणे

	गोपालदास	सुगनचंद
अमरावती जिल्हा	२०	१०
अकोला जिल्हा	२१	२५
बुलढाणा जिल्हा	७	८
यवतमाळ जिल्हा	१४	१४

अमरावती जिल्हयातील २० मतांपैकी उमरावती मतदान केंद्रावर गोपालजींना १५ व सुगनचंद तापडीया यांना ८ मते मिळाली व एलीचपूर मतदान केंद्रावर गोपालजींना ५ व सुगनचंदजींना २ मते मिळाली.

बुधवार ता. २४ रोजी पुढील निकाल जाहीर झाले.

उमरावती - अकोला स्त्री मतदार संघ

श्रीमती दुर्गाताई जोशी (काँग्रेस) ६४२३

सौ. विमलाबाई देशमुख (शेतकरी संघ) २०९१

या दोन उमेदवारास श्रीमती दुर्गाताई जोशी यांना सौ. विमलाबाई देशमुख यांच्या पेक्षा ४३३२ मते जादा पडून ह्या विजयी झाल्या.

१९. साम्यवाद्यांचा विरोध :

उमरावती जिल्हा साम्यवादी पक्षाने ता. २६ रोजी भरलेल्या आपल्या सभेत "काँग्रेसने दिवाणगीऱ्या स्वीकारणे राज्यघटना मोडण्याच्या तत्त्वाविरूद्ध आहे "

अशा आशयाचा ठराव मंजूर करुन दिवाणगीऱ्यांना विरोध दर्शविला.

२०. ना. खापर्डे निवडून आले

मध्यप्रांत वऱ्हाड प्रांतिक लेजिस्लेटिव्ह असेंब्लीच्या नागपूर विद्यापीठ मतदार संघाच्या निवडणूकीचा निकाल ता.२७ रोजी नागपूर येथे लागून शिक्षणमंत्री ना. बाबासाहेब खापर्डे हे निवडून आल्याचे जाहीर करण्यात आले. उमेदवारांना पुढीलप्रमाणे मते मिळाली.

१. ना. खापर्डे शिक्षणमंत्री (राष्ट्रीय) १५५

२. डॉ. हरिसिंग गौर (उपकुलगुरु , नागपूर विद्यापीठ) स्वतंत्र ८५

३. डॉ. मंगलमूर्ती (स्वतंत्र) ६५

४. डॉ. बारलिंगे (काँग्रेस) ३५

५ बॅ. पंडीत (स्वतंत्र) ३

शेवटच्या दोन उमेदवारांच्य अमानती जप्त करण्यात आल्या आहेत.

ना. खापर्डे यांचे अभिनंदन

विद्यार्थी मतदार संघ दुरूस्त झाला व त्यांत ३५० च्या वर मतदार संख्या झाली ह्यात सरकारी नौकरी असलेले मतदार पूर्वीच्या मानाने पुष्कळच कमी झालेले आहेत. ह्या मतदार संघात ना. खापर्डे हे डॉ. गौर सारख्या विद्यापीठाच्या व्हाईस चान्सेलरला चित करून निवडून आले. ह्याबद्दल आम्ही त्यांचे मन:पूर्वक अभिनंदन करतो. ना. खापर्डे उभे नसते तर डॉ. गौरच निवडून आले असते. हे मिळालेल्या मतांवरून उघड होते. काँग्रेस उमेदवार बारलिंगे व डॉ. पंडीत ह्यांची तर अमानत रक्कम जप्त झाली.

२१. उमरावती जिल्हा काँग्रेस कमेटीची सभा -

उमरावती येथे गेल्या रविवारी नगर काँग्रेस कमेटीच्या कचेरीत दे.भ. रामभाऊ देशपांडे यांच्या घरी जिल्हा काँग्रेस कमिटीची नवीन वर्षाची पहिली सभा दे. भ. डॉ. भोजराज यांच्या अध्यक्षतेखाली दुपारी दोन वाजता भरली होती. जिल्ह्यातील सहा काँग्रेस कमेट्यांकडून प्रत्येकी पाच असे तीस सभासद सभेस निमंत्रित होते. दर्यापूर, एलीचपूर, चांदूर, मोर्शी , उमरावती इत्यादी तालुक्यातील मंडळी हजर होती व गावातील दे.भ. बामणगांवकर , रामभाऊ देशपांडे, डॉ. पटवर्धन इत्यादी पुढारी मंडळी हजर होती. नियमाप्रमाणे पुढील दहा सभासद समाविष्ट करण्यात आले. रा. बर्वे वकील (परतवाडा), डॉ. मोटे (अंजनगाव), खंडेराव देशमुख (राजूरा), डॉ. पटवर्धन, डॉ. भोजराज, राधावल्लभ लड्ढा, व फतेचंदजी सिंघई, डॉ. पातुरकर, बाळासाहेब मराठे व भाई माधवराव देशपांडे असे एकूण ४० सभासदांची नवीन सालाकरिता जिल्हा काँग्रेस कमेटी बनविण्यात येऊन सर्वानुमते भोजराज अध्यक्ष, डॉ. पातुरकर , सौ. सरलाबाई मुंडले (मोर्शी) व राजवैद्य वकील (चांदूर) यांना उपाध्यक्ष व भाई माधवराव देशपांडे, बाळासाहेब मराठे, फत्तेचंदजी सिंघई व बारलिंगे यांना चिटणिस निवडण्यात आले.

दिवाणगिऱ्या स्वीकारण्याच्या विषयावर महत्वाच्या ठरावावर चर्चा सुरू

झाली. ही चर्चा रात्री आठ वाजेपावेतो चार तास सुरू होती. दे.भ. हिरालाल जयस्वाल (चांदूर) , बाबूराव तालुकदार , रा. वैद्य वकील, बामणगावकर, रतनलाल काळे, यांच्या दिवाणगीऱ्या स्वीकारण्यास अनुकूल व माधवराव देशपांडे, बाळासाहेब मराठे, त्र्यंबकराव जोशी यांची प्रतिकूल भाषणे झाल्यावर अध्यक्षांनी चर्चेचा समोरोप केल्यावर खालील ठराव बहुमताने पास करण्यात आला.

फूट टाळण्याच्या दृष्टीने कार्यक्रम ठरवून जे बहुमत असेल तिथे दिवाणगीऱ्या स्वीकारण्यात याव्या व दिवाणांनी पगारातून स्वत:च्या खर्चाकरिता फक्त ३०० रुपये ठेवून बाकीची रक्कम काँग्रेस कमिटी ग्रामोद्योगाचा प्रसार करण्यास द्यावी.

२२. भाई रूईकर यांचे स्वागत

अलीपूर तुरूंगातून नुकतेच बंधमुक्त झालेले नागपूरचे कामगार नेते भाई रूईकर पुढारी ता. ६ रोजी अकोल्याहून उमरावतीला, नागपूरला जातांना आले. ह्यांचे स्वागत करण्याकरिता येथील जोग चौकात सभा झाली . एम.एल.ए. श्री. शंकरराव जोग यांच्या अध्यक्षतेखाली दिवाणगीरी का स्वीकारू नये या विषयावर भाषण झाले. उमरावतीतील वऱ्हाड काँग्रेस साम्यवादी पक्षातर्फे व जिल्हा काँग्रेस केमिटी वगैरे तर्फे पुष्पहार अर्पण करण्यात आले.

इसवी सन. १९३८

१. स्वातत्र्यदिन

२. बंगाल राजबंदी दिन

३. दादासाहेब खापर्डे यांचे निधन

४. जयराम पाटील यांच निधन

५. श्री. शंकराचार्य यांचे आगमन

६. चीनच्या सद्यस्थीतीवर चर्चा

इसवी सन १९३८

अमरावतीचा स्वातंत्र्यदिन :

ता. २६ रोजी प्रभातफेरी निघुन व सकाळी ध्वजवंदन होऊन रात्री ८ वाजता जोग चौकात नागरिकांची जाहीर सभा झाली. अध्यक्ष स्थानी मे. अब्दुल वहाब होते. श्री. बारलिंगे यांनी काँग्रेस वर्किंग कमिटीच्या आज्ञेनुसार स्वातंत्र्याचा जाहीरनामा वाचून दाखविला. तर श्री बामणगावकर यांनी काँग्रेस जाहीरनाम्यास अनुसरुन लोकशाही स्वराज्य पक्षातर्फे निघालेल्या स्वातंत्र्यदिनाचा जाहीरनामा कलमवार स्पष्ट होईल, अशा तऱ्हेचे भाषण केले व त्या जाहीरनाम्याच्या प्रति वाटण्यात आल्या. नंतर डॉ. भोजराज , डॉ. सबनीस वगैरेची भाषणे झाली. हरिजनबंधु भटकर यांचेही भाषण झाले. भाई देशपांडे व भाई काळे यांनी मुक्ततेचा ठराव आणला व तोही पास झाला. नंतर 'वंदे मातरम्' गीत होऊन सभा मोठ्या उत्साहात संपली.

२. स्वर्गीय दादासाहेबांना अमरावती करांची श्रद्धांजली

स्वर्गीय दादासाहेब खापर्डे यांच्या निधनाबद्दल अमरावतीच्या नागरिकांच्या वतीने शनिवारी सायंकाळी येथील जोग चौकात सर मोरोपंत जोशी यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या दुखवट्याच्या जाहीर सभेत दुखवट्याचा ठराव सर्वांनी उभे राहून एकमताने मंजूर केला.

दादासाहेबांचे पुण्यदर्शन

सभेला सायंकाळी ७ वाजताच्या सुमारास सुरूवात झाली. येथील तरूण शिल्पकार श्री. रघुनाथराव बास्टे ह्यांनी काही दिवसापूर्वी दादासाहेबांना समोर बसवून तयार केलेला अर्धपुतळा सभास्थानी ठेवण्यात आला होता. त्याचप्रमाणे येथील तरूण चित्रकार श्री. सबनीस यांनी 'अरूण उदय' संस्थेच्या टिळकाश्रमाला भेट दिलेले दादासाहेबांचे भव्य छायाचित्र पुष्पहारांनी सजवून सभास्थानी ठेवण्यात आले. सभा सुरू होण्यापूर्वी व सभा संपल्यानंतरही बरेचसे आबालवृद्ध व स्त्री-

पुरुष दादासाहेबांच्या पुतळ्याचे व तसबीरीचे दर्शन घेतांना दिसून येत होते.

सभेला सुरुवात

सभेला बराच मोठा स्त्री-पुरुष समुदाय उपस्थित होता. अध्यक्षांच्या शेजारील बाकावर अकोल्याचे पुढारी श्री मामासाहेब जोगळेकर व येथील तरूण ब्रिटीश जिल्हाधिकारी श्री. फरूक्कार , त्याचप्रमाणे श्री. अण्णासाहेब देशपांडे प्रभृति स्थानिक पुढारी हजर होते.

'उदय' चे संपादक श्री. नारायणराव बामणगावकर ह्यांनी प्रास्ताविक भाषण करून तर मोरोपंत जोशी यांनी आजच्या सभेचे अध्यक्षस्थान स्वीकारावे अशी सूचना आणली, तिला डॉ. सबनीस ह्यांनी पाठींबा दिल्यानंतर अध्यक्ष स्थानापन्न झाले. अध्यक्षांच्या हस्ते यानंतर दादासाहेबांच्या अर्धपुतळ्यास पुष्पहार चढविण्यात आला. यानंतर अध्यक्षांच्या परवानगीने श्री बामणगांवकर ह्यांनी सभेपुढे मांडण्यात यावयाचा दुखवट्याचा ठराव वाचून दाखविला. हा ठराव येथील प्रसिद्ध नागरिक श्री. वाय.जी. उर्फ अण्णासाहेब देशपांडे ह्यांनी सभेपुढे मांडला. त्याला येथील इंग्रज जिल्हाधिकारी श्री. फरूक्कार व श्री मामसाहेब जोगळेकर , दे.भ. संभाजीराव गोखले , एम.एल.ए. , दे.भ. गणेशराव देशमुख एम.एल.ए. व सौ. पार्वतीबाई पटवर्धन ह्यांनी पाठींबा दिल्यावर तो एकमताने मंजूर झाला. दुखवट्याचा ठराव मांडताना श्री. वाय.जी. उर्फ अण्णासाहेब देशपांडे ह्यांनी छोटेसे भाषण केले.

यानंतर अमरावती जिल्हचाचे इंग्रज जिल्हाधिकारी श्री फरूक्कार ह्यांनी या ठरावाला पाठिंबा देणारे भाषण दिले. जाहीर सभेत सामान्य वक्त्याप्रमाणे इंग्रज जिल्हाधिकारी भाषण करीत आहे हे दृष्य अगदी अपूर्व असे होते. श्री फरूक्कार आपल्या इंग्रजी भाषणात म्हणाले, '' मी या ठरावाला दोन नात्याने पाठिंबा देत आहे. पहिला अधिकारी या नात्याने तर दुसरा स्वत: तर्फे

अधिकारी या नात्याने ठरावाला दुजोरा देतांना, ते म्हणाले, '' मी या

जिल्हयाच्या अधिकाऱ्यांचा प्रतिनिधी आहे. वऱ्हाड कमिशनर साहेब हे नागपूरला असल्यामुळे त्यांना आज हजर राहता आले नाही. आपणाला श्री. खापर्डे यांच्या निधनाने अतिशय दु:ख होत आहे असे कळवायला कमिश्नर साहेबांनी मला सांगितले आहे. कमिश्नर तर्फे व्यक्त करण्यात येत असलेले हे दु:ख प्रदर्शन निव्वळ कमिश्नरपुरतेच नसून त्यात प्रत्येक कारकून व चपराशी हेही सहभागी आहेत, हे मी आपणाला सांगू इच्छितो.

स्वत:च्या वतीने या नंतर ठरावाला पाठिंबा देतांना श्री फरुक्कार म्हणाले ,'' दादासाहेबांच्या विषयी माझ्यापेक्षा जास्त माहिती असलेले बरेचसे सद्गृहस्थ या ठीकाणी असतील. त्यांच्या निधनाने आपले फारच मोठे नुकसान झालेले आहे. त्यांची सहानुभूती , विचारशक्ती , इत्यादिकांचा माझ्या मनावर पगडा बसला होता. मलाच जर त्यांच्या निधनाने इतके दु:ख होत आहे तर इतरांना किती होत असेल. वऱ्हाड आज पित्याला मुकला.

<u>वुई हॅव लॉस्ट अ फादर ऑफ बेरार :</u>

१८५४ मध्ये जन्म झाल्यामुळे दादासाहेबांनी हिन्दी राष्ट्राची प्रगती डोळयांनी पाहिली आहे. त्यांची राजकीय मते बऱ्याच जणांना सहमत नव्हती, हे जरी खरे असले तरी पक्ष, ध्येय, धर्म इ. भेद बाजूला ठेवून आज सकाळच्या त्यांच्या स्मशान यात्रेत सगळयांनी भाग घेतला. यावरून ही व्यक्ती कीती थोर होती , याची कल्पना येईल. हीच गोष्ट माझ्या मनावर खूप बिंबली. मी परराष्ट्रीय असलो तरीही दादासाहेबांच्या मृत्यूने झालेले नुकसान जाणवत आहे. मग ते येथे असलेल्या इतरांना किती जाणवत असेल. त्यांच्या निधनामुळे आपणाला न भरून येणारी उणीव कायमची भासेल. बरेचशे हिन्दू लोक येथे जमलेले आहेत. हिन्दू लोक पुर्नजन्मावर विश्वास ठेवतात. त्यांना मला एवढेच सांगावयाचे आहे की, दादासाहेब पुर्नजन्म घेणार नाहीत. ते येथेच राहणार त्यांनी आपल्या हयातीत हिन्दुस्थानासाठी खूपच मोठे कार्य करून ठेवले आहे.

वऱ्हाड प्रांतिक हिंदू महासभेचे चिटणीस व अकोल्याचे प्रसिद्ध कार्यकर्ते श्री मामासाहेब जोगळेकर ह्यांनी ठरावाला पाठिंबा दिला.

येथील काँग्रेस मुस्लीम काँट्रॅक्टर्स कमिटीचे चिटणीस व मुसलमान समाजातील काँग्रेस कार्यकर्ते दे.भ. अब्दुल वहाब म्हणाले, ''हिन्दी राष्ट्राचा सह्यागार गेला''. ठरावाला पाठींबा देणारे भाषण करतांना दे.भ. नानासाहेब गोखले, एम.एल.ए. (काँग्रेस) यांचे अंत:करण दु:खाने इतके भरुन आले होते की, सभेत ते जास्त वेळ बोलूच शकले नाहीत.

वऱ्हाडचे नवाब दादासाहेब खापर्डे यांचे निधन

लोकमान्य टिळकांचे कट्टर अनुयायी, एक बाणेदार वकील, थोर सार्वजनिक कार्यकर्ते , विद्वत्ता आणि विनोद यांचा सहजरम्य अविष्कार करणारे पट्टीचे वक्ते आणि श्रीमंत राहणीमुळे वऱ्हाडचे नवाब म्हणून गाजत असणारे श्री गणेश श्रीकृष्ण तथा दादासाहेब खापर्डे यांचे ८४ व्या वर्षी वृद्धापकालीन आजारामुळे दिनांक १ जुलै , १९३८ रोजी रात्री १०.३८ मिनिटांनी निधन झाले. रोजच्या रोज संपूर्ण तपशीलवार रोजनिशी लिहिण्याची त्यांची अखंडीत ४६ वर्षांची सवय होती. ३१ जून , १९३८ या दिवसाचा दैनंदिनी मधील त्यांच्या हस्ताक्षरातील नोंदी शेवटच्याच ठरल्या.

त्यांचा जन्म मध्यमवर्गीय ब्राह्मण कुटुंबात झाला. प्राथमिक व दुय्यम शिक्षण नागपूर आणि अमरावती येथे झाले. गणित विषयाशी त्यांचे शाळेत कधी जमले नाही. उलट संस्कृत भाषा ते मराठी इतक्याच सहजतेने वापरीत असत. आर्य समाजाचे संस्थापक महर्षी दयानंद हे वऱ्हाडच्या दौऱ्यात असताना दादासाहेबांनी त्यांच्याशी संस्कृत मध्येच वादविवाद केला होता. १८८९ मध्ये त्यांनी सरकारी नोकरी सोडून वकीली सुरू केली आणि त्यात अमाप यश संपादन केले. तसाच पैसाही खोऱ्याने ओढला. सौम्य व प्रसन्न चेहरा, मोहक वाणी, ओघवते मराठी वक्तृत्व आणि गाढ विद्वत्ता यामुळे त्यांची पटकन छाप पडत असे.

श्रीमंत राहणी, डोक्याला भला मोठा जराकाठी रूमाल आणि हातात ऐषआरामी हुक्का यामुळे वऱ्हाडचे नवाब म्हणूनच सर्वसामान्य जनता त्यांना ओळखत असत.

इ.स. १८९७ मध्ये त्यांनी टिळकांच्या राजकारणाचा उघडपणे स्वीकार केला. टिळकांच्या आयुष्यभर एकनिष्ठेने त्यांची साथ केली आणि टिळकांच्या मृत्यूनंतरही ते टिळक पंथीच राहीले. १९०७ च्या सूरतेच्या काँग्रेसच्या अधिवेशनाच्या वेळी टिळकांच्या आधीच दादासाहेबांनी गुजरातीमधून प्रभावी भाषण सुरू करून सारा स्थानिक प्रेक्षक समूह पूर्णपणे कह्यात आणला होता. १९०८ साली टिळकांच्या शिक्षेवर अपील करण्याची त्यांनी बरीच खटपट केली. १९१५ साली होमरूल लीगचे सभासद म्हणून त्यांनी मोठेच काम केले. १९१९ मध्ये काँग्रेसतर्फे इंग्लंडला गेलेल्या शिष्टमंडळाचे ते सभासद होते. इंग्लंडमध्येही त्यांची चुरचुरीत व्यक्तव्ये फारच मानली आणि तेथील जनता त्यांना ''हिन्दी मार्कट्वेन'' या नावाने ओळखू लागली. 'वऱ्हाडच्या वैभवाचे शिल्पकार'' म्हणून जी काही दोनचार नावे घेता येतात त्यात प्रामुख्याने दादासाहेबांचेच नाव घ्यावे लागते.

दादासाहेब सुखात गेले

प्रांतिक असेब्लीतील अमरावती तालुक्याचे काँग्रेस आमदार दे.भ. गणेशराव देशमुख यांचे यानंतर भाषण झाले.

वऱ्हाडच्या भाग्यवंताचा स्वर्गवास

सरकारी नोकर असले तरी वरिष्ठांचा वरिष्ठ होणे ही स्वाभिमानी वृत्ती त्यांच्यात विलक्षण जागृत होती. सातवे एडवर्ट प्रिन्स ऑफ वेल्स म्हणून हिन्दुस्थानात आले असता त्यांची स्पेशल ट्रेन बडनेरला थांबणार होती. दादासाहेब त्यावेळी तेथे एस.डी.ओ. होते अर्थात तेथिल सुरक्षिततेची जबाबदारी त्यांच्यावर होती. तो तर त्यांनी प्रयत्न केलाच पण बडनेरला त्यावेळी एक युरोपीयन स्टेशनमास्तर होते त्यांच्या मुलीचा व दादासाहेबांचा परिचय होता. युवराजांची

गाडी थांबताच त्या मुलीशी युवराजांचा पहिला 'शेकहँड' रीतीरिवाजाप्रमाणे होताच. तिने प्रथम दादासाहेबांचा परिचय करून दिला व दादासाहेबांनी प्रथम राजपुत्राशी हस्तांदोलन केले. नंतर इकडे बडे युरोपीयन अधिकारी भेटले. युवराजांची गाडी निघून गेली पण एक 'काळा आदमी' आणि तोही आपल्या हाताखालचा नोकर ब्रिटीश साम्राज्याचा युवराजास भेटतो म्हणजे काय ? यामुळे गोऱ्या अधिकारात खळबळ माजली.

पैसा जसा भरपूर मिळत होता तसाच तो खर्चही होत होता. साधू संत , शास्त्री, पुराणिक, कीर्तनकार व कुलवान या सर्वांना दादासाहेबांकडून भरपूर आश्रय मिळत असे. कित्येकदा तर आवडते घोडे सुद्धा मागणाऱ्यास त्यांनी देऊन टाकले. मागायला आलेला परत जाऊ नये हे त्यांच्या दातृत्वाचे गमक होते. गोरगरिबांना अन्न देणे , शिक्षणास मदत करणे यामुळे इतका पैसा खर्च होत असे की त्यापायी खर्च होऊन कर्ज होत असे. तरी पैसा चालत येईल या भावनेनी येणाऱ्या पैसाकडे त्यांचे रक्षक म्हणून ते कधीही पाहत नसत तर त्याला फेकणे हाच त्यांचा सहज स्वभाव असे.

वकीलीला लागल्यापासून तो १९०२ पर्यंत अमरावतीत ज्युडीशियल कमिशनरचे कोर्ट असेपर्यंत दादासाहेबांचे दातृत्व व त्यांचे कायदे कोर्टातील ज्ञान ह्यांचा झालेला लोकहृष्ट्या सदुपयोग हा त्यांच्या चरित्रकामातील तिसरा अत्यंत महत्वाचा टप्पा आहे.

अमरावती येथे क्वॉरेन्टाईनचा जुलुम होत होता. लोक भयभीत व त्रस्त झाले होते. महाशिवरात्रीचा दिवस असूनही सर्व हिन्दू मुसलमानांनी दादासाहेबांची आज्ञा होताच हरताळ पाळला. हरताळाची कल्पना अस्तित्वात येण्यापूर्वीचा हा पहिला हरताळ होय. तो इतका प्रचंड होता की, दिडकीचे शेंगदाणे ही ठोक बाजारात कोणाला मिळत नसत. सर्व नागरिक शहर म्युनिसिपालटी जवळ जमले. लोकांतील हा तीव्र असंतोष बघून जिल्हाधिकाऱ्यास पाचारण केले. तो अफाट लोकसागर पाहून जिल्हाधिकाऱ्यानी दादासाहेब करतील ते प्रमाण असे लिहिले

व दादासाहेबांनी क्वॉरेन्टाईन उठवून लोक संकटमुक्त केले. लोकांना पाठीशी घालून सत्ताधिशावर अशी मात करावी ही नैसर्गिक स्फूर्ती सरकारी नोकरीत असताना युवराजांशी प्रथम हस्तांदोलन करतांना त्यांच्यात सुप्तवस्थेत होती. पण तीच पुढे स्वतंत्र झाल्यावर वाढू लागली याचे हे प्रत्यंतर आहे.

सकाळी उठताच पक्षकाराचे कागदपत्र पाहण्यात ते दंग होऊन जात. ११ ते २ किंवा ४ पर्यंत कोर्ट, त्यांनतर हुक्का ओढीत जिल्हा कौन्सिलचे वा म्युनिसिपालटीचे कामकाज, त्यानंतर मौलवी येवो, यति येवो, आचार्य येवो वा शास्त्री किंवा दुसरा कोणी पंडीत येवो त्यांचाशी धर्मावर शास्त्रावर काव्यावर वेदांन्तावर व राजकारणावर चर्चा करण्यात गुंतलेले ते आढळायचे. एवढेच नव्हे तर नाट्य व नाटककार , गाणे कीर्तन यातही ते गुंतलेले आढळायचे, वाड्यात ब्राह्मण भोजने सुरूच आहेत, भाट येऊन ललकारतच आहे. बडे अधिकारीही भेटीस येतच आहेत, तरूण व गोरगरिब दर्शनाला येतच आहेत आणि दाराबाहेर पडले असता पैसा मागणाऱ्यांच्या हातावर पैसा वाटीत मार्गक्रमण करीतच आहेत असे दादासाहेबांचे चित्र त्यांच्या भर तारूण्यात सदासर्वदा आढळत असे. म्हणून सामान्य जनता त्यांना वऱ्हाडचा राजा व नवाब या नावाने संबाधित असे व तेच नाव त्यांचे सर्वत्र मशहूर झाले. टिळक व दादासाहेब ह्या दोघांच्या स्वभावात फरक असतांनाही टिळक व दादासाहेब ह्यांच्या मनातील स्नेह हे एक आश्चर्य आहे. टिळक बुद्धिवादी होते तर दादासाहेब दैववादी होते. या जोडीमुळे बुद्धी व दैव एकत्र झाली व तसा त्यावेळी अखिल महाराष्ट्र बनला आणि मुंबई इलाक्यचा व मध्यप्रांत वऱ्हाडाचा सांधा जुळल्या गेला. मुंजे आणि गंगाधरराव यांचा उदयाचा हाच काळ होय. पुढे लागलीच १९०८ मध्ये टिळकांना सहा वर्षाची शिक्षा होते. टिळक ती निर्भयपणे ऐकतात व झोपतात व ती ऐकून दादासाहेबांच्या डोळ्यातून अश्रु खंडत नव्हते. दादासाहेबांना गडबडीने चालतांना व प्रसंगी धावतांना पाहिले हे सांगणे जसे कठीण तद्वतच रडतांना पाहिले हे सांगणेही कठीण पण टिळकांकरिता मात्र ते रडले आहेत. आपल्या कायदे ज्ञानाचा व बुद्धिमत्तेचा उपयोग करून आपण

टिळकांना सोडवून आणू ह्याकरिता ते लागलीच इंग्लंडला गेले. राजद्रोहाची शिक्षा झालेल्या माणसाकरिता झटणारा मनुष्य त्यावेळी परिचितांना सुद्धा अपरिचित वाटायचा. दादासाहेब इंग्लंडला गेले पण घरी काही आहे काय यांचा त्यांनी विचार केला नाही. इकडे जेवढे परिचित होते तेवढे सगळे दादासाहेबांच्या कुटुंब वासियांपासून दूर जाऊ लागले. पुढे दादासाहेब इंग्लंडवरून परत आले त्यावेळी त्यांच्या मातोश्री निवर्तल्या होत्या. दादासाहेबाचे - सरकारचे स्नेहसंबंध सुटले होते. दादासाहेबांवर १२४ अ चा खटला करावा म्हणून हिन्दुस्थान सरकारपर्यंत खलबते चालविली होती. पुष्कळ सरकारी अधिकारी दादासाहेबांविषयी आदर व पूज्यभाव बाळगून होते पण उघड भेटावयास धजत नसत आणि भेटल्यावाचून तर कित्येकांना राहवे ना. आप्पासाहेब देशमुख हे त्यावेळेस दादासाहेबांना भेटावयास गेले कारण दर्यापूरकर देशमुख व दादासाहेबांचे वडील यांचा घरोबा होता. शिवाय आप्पासाहेबांनी जोग चौकाची सरकारी जागा मिळावायास दादासाहेबांना आतून सहाय्य केले होते. अशा अनेक संबंधांमुळे दादासाहेबांना भेटल्यावाचून रहाणे त्यांना कसेसेच वाटले व ते दादासाहेबांना भेटले पण भेटताच दादासाहेब म्हणतात की, '' आप्पा भलतेच धाडस करू नकोस परत जा. नाहीतर नौकरीस मुकशील'' पण '' नौकरी गेलीच तर मला खावयास मिळणार नाही असे नाही'' म्हणून आप्पासाहेब सुख दु:खाच्या गोष्टी बोलून गेले. हा प्रसंग अमरावतीला प्लेग असतांना कै. असनारे ह्याच्या झोपडीवरील आहे. तात्पर्य काय की, अशा प्रकारे दादासाहेबांचा व सरकारचा संबंध येथे तुटला.

आणि दादासाहेबांना राजद्रोही म्हणून अमरावती शहर म्युनिसिपालटीच्या अध्यक्षपदावरून काढण्याचा प्रांताधिकाऱ्याचा म्हणजे चिफ कमिशनरचा हूकूम जारी झाला. ह्याच सुमारास हिन्दुस्थान सरकारच्या सी.आय.डी. चे मुख्य अधिकारी क्रिसलँड साहेब दादासाहेबांच्या भेटीस आले. दोघेही खूप बोलेले. पण कोणीच कोणापासून काहीच काढून घेऊ शकला नाही. यावरून दादासाहेबांचे संभाषण चातुर्य मुत्सद्याला साजेसे ठरले. हा काळ जर दादासाहेबांच्या चरित्रात

नसता तर मध्यप्रांताचे पहिले गृहमंत्री कदाचित तेच झाले असते. परंतु टिळक सुटून येई पर्यंत टिळकांच्या राष्ट्रीय पक्षावरून दादासाहेबांनाही वनवास काढावा लागला. पुढे टिळक सुटले आणि बेळगावच्या मुंबई इलाक्याच्या प्रांतिक परिषदेत दादासाहेबांच्या नेतृत्वाखाली त्यांनी राष्ट्रीय सभेत घुसण्याचा निश्चय जाहीर केला व स्वराज्याचा होमरूलच्या चळवळीस प्रारंभ केला त्यावेळी दादासाहेबांनी इम्पिरियल कायदे कौन्सिलमध्ये जावे असा टिळकांनी त्यांना सल्ला दिला व तेथे निवडून आले व जवळजवळ १८ वर्षपर्यंत वरिष्ठ कायदेमंडळात ते राहिले. टिळकांच्या मृत्यूनंतर टिळकांच्या मुलांनी मृत्यूपत्रावर ज्या सह्या केल्या त्या दादासाहेब खापर्डे यांच्या वजनामुळे केल्या. केळकर विद्वांस ह्या ट्रस्टींना 'केसरी मराठा' संस्थेला चिरस्थायी स्वरूपात आणण्यास त्यामुळे स्वास्थ्य लाभले. अखिल महाराष्ट्राला ललामभूत असलेल्या संस्थेचे भाग्यदान महाराष्ट्राला दादासाहेबांमुळे आले आणि हे सर्व स्वत:करिता न ठेवता, काही न घेता केले आहे. मी स्वर्गीय दादासाहेबांना श्रद्धांजली अर्पण करतो.

ज्ञानोदधि आटला -

अमरावती नगर काँग्रेस कमेटीच्या अध्यक्ष सौ. पार्वतीबाई पटवर्धन ह्यांचे ह्या सभेत ठरावाला पाठिंबा देणारे भाषण महत्वाचे झाले. ''वऱ्हाडचा ज्ञानोदधि आटला'' या शब्दात त्यांना श्रद्धांजली वाहिली. ,

सर मोरोपंत जोशी यांचा समारोप-

अध्यक्ष सर मारोपंत जोशी आपल्या समारोपाच्या भाषणात म्हणाले ''पूर्वीच्या चौकटीच्या तीन चतुर्थांश भाग नाहीसा झाला''

यानंतर सर्वांनी उभे राहून ठराव एक मताने मंजून केला. श्री. बामणगावकर यांनी आभार प्रदर्शित केल्यानंतर सभेचे काम रात्री ८.३० वाजताच्या दरम्यात संपले व दादासाहेबाच्या आठवणी काढीत लोक घरोघर परतले.

दादासाहेबांच्या अस्थींचा सन्मान ठिकठिकाणी दुखवट्याच्या सभा

कै. दादासाहेबांची उत्तरक्रिया करण्याकरिता त्यांच्या अस्थी घेऊन श्री. बाबासाहेब खापर्डे हे तारीख ५ रोजी मेलने नाशिकला रवाना झाले. रस्त्यात बडनेरा, आकोला इ. रेल्वे स्टेशनवर त्यांच्या अस्थींचा सन्मान करण्यात आला. नाशिक स्टेशनवर डॉ. मुंजे , कायंदे , बेले, दातार शास्त्री इत्यादी मंडळी आली होती. स्टेशनावरून दादासाहेबांच्या अस्थींची सुशोभित मोटारीतून प्रचंड मिरवणूक निघाली होती. मिरवणूकीसमोर दोन व्यायाम शाळेंचे लष्करी बँड , लेझीमची मुले व प्रचंड जनसमुदाय हजर होता. रस्त्यावर सारखे हार पडत असत. लकडी पुलावर ता. ६ रोजी जाहीर सभा भरून नाशिकच्या नागरिकांनी अस्थींना तिलांजली दिली.

दादासाहेबांचे अज्ञात चरित्र

इंग्लंडला युद्धात पडण्याचा प्रसंग येतो की काय असा त्या दिवशींची वर्तमानपत्रे वाचून एकाने प्रश्न उत्पन्न केला ''इंग्लंड हे मोठे डिप्लोमॅट राष्ट्र परंतु लवकरच हे युद्धाच्या संकटात सापडणार आणि हिन्दुस्थानला स्वराज्याचा लाभ होणार असे मला अजून वाटते. हे स्वराज्य मी पाहणार नसलो तरी तुम्ही पाहणार आहात.'' असे ते अखेरचे बोल बोलले. (इंग्लंडस् डिफीकल्टी इज इंडियाज ऑपरच्युनिटी) ह्या तत्वावर दादासाहेबांचा भारी विश्वास.

ह्या नंतर कौटुंबिक सुखदु:खाच्या गोष्टी निघाल्या तेव्हा त्यांच्या चरित्रातील सर्वांनाच अज्ञात असलेला एक भाग त्यांनी वर्णन करून सांगितला. कै. दादासाहेबांना गोपाळनाथ म्हणून एक वडील भाऊ होते. गोपाळरावांचे लग्न दादासाहेबांच्या लग्नापूर्वीच झाले होते पण मुलगा झाला नाही म्हणून गोपाळरावांना वाईट वाटे शेवटी गोपाळरावांनी दादासाहेबांना म्हटले की, ''गणू तुझा पहिला मुलगा मला देशील का रे ?'' दादासाहेबांनी होय म्हटले. पुढे मुंबई कॉलेजमध्ये शिकत असतांना दादासाहेबांना पहिला मुलगा झाला तो गोपाळरावांना दिला असे

दादासाहेबांनी कळविले पण दुर्दैव असे की दिड दोन महिन्याच्या आतच ते मूल वारले. पुढे दादासाहेबाचे वडील बुलढाणा येथे राहत असतांना हे दोघे बंधू एकत्र आले. गोपाळराव उत्तम शिकारी होते. गोपाळरावांच्या खांद्यावर बंदूक व दादासाहेबांच्या हातात ग्रंथ अशा थाटात हे दोघे बंधू बुलढाण्याच्या जंगलात फिरावयास जात. एकेदिवशी ह्याप्रमाणे सहल करावयास हे दोघे बंधू गेले असता पुन्हा गोपाळरावांनी गोष्ट काढली की, ''गणू, ह्यानंतरचाही मुलगा तू मला दिला पाहिजे''. दादासाहेबांच्या तोंडातून ''होय'' असे उत्तर बाहेर पडले. पूढे फिरता फिरता दादासाहेबांना तहान लागली. भांडे जवळ नव्हते पण ओढा जवळ होता. त्या ओढ्यावर हे दोघे बंधू गेले. ओढ्याच्या पलिकडच्या तीरावर स्वच्छ व खोल पाणी आहे. तेथे जा आणि ओणवा होऊन पाणी पी असे गोपाळरावांनी दादासाहेबांना सांगितले आणि बंदूक सावरून शिकारी करिता इकडे तिकडे पाहू लागले. दादासाहेब पलिकडच्या तीरावर धोतर सावरून, दोन्ही हात पाठीवर घेऊन पाण्याला तोंड लावून गमतीने एखादा दुसरा घोट गिळताच तोच त्यांच्या डोक्यावरून व पाठीवरून सूं सूं करित धडकन आवाज होऊन बंदूकीतून गोळी सुटली.

एकाएकी हा आवाज ऐकताच पाणी पित असलेले दादासाहेब घाबरले व समोर पाहू लागले त्यावेळी गोपाळराव डोळे वटारून बंदूकीची गोळी सोडण्याच्या अवस्थेत होते. बंधूचे हे भयानक चित्र समोर दिसल्यावर दादासाहेब मागे वळून पाहतात तो एक भूजंग फणी काढीत तडफडत असलेला त्यांना दिसला. हा भूजंग दादासाहेबांना मागून झडप घालणार तोच गोपाळरावांनी गोळी घालून त्यास ठार मारले. तो दिवस जर टळला नसता तर आजचा दिवस मी पाहिला नसता. पूढे लवकरच गोपाळराव पाण्यात बुडून वारले आणि दादासाहेबांना झालेला मुलगा गोपाळरावांच्या पदरात टाकण्याचा प्रसंग त्यांना आला नाही.

हा चरित्र भाग अज्ञात होता. बाबासाहेब हेच दादासाहेबांचे पहिले चिरंजीव. अशीच तोपावेतो समजूत होती. बाबासाहेब हे पहिले नव्हते ही गोष्ट

बाबासाहेबांना सुद्धा नवीनच आणि भूजंगापासून वडील बंधूनी वाचविण्याचे स्मरण इतके दिवसांनी व ते अंत:काळी होणे, म्हणजे सर्व ऋणातून मुक्त होण्याची तयारी करणेच होय.

म्हणूनच हा अज्ञात भाग आम्ही आज प्रसिद्ध करून ठेवला. दादासाहेबांची अमरावतीत टोलेजंग स्मशानयात्रा निघाली. दादासाहेबाच्या देहावरून पैसे फेकावेत म्हणून त्यांच्या परिवारातील एक व्यक्ती रूपयाचा खुर्दा शोधत होती. या व्यक्तीने दुकानदारास रूपयाचा खुर्दा आहे काय ? म्हणून विचारले होते. दुकानदाराने दादासाहेबाचे प्रेत मिरवीत तेथे येताच ओंजळभर खुर्दा काढला व रूपया घेतला नाही.

पुढे ही यात्रा स्मशानात गेली. दादासाहेबांचा देह चितेवर ठेवला व अग्नि लागला. इतक्यात एक हात बाहेर आला. त्यांची अवस्था दुसऱ्याच्या हातावर दान सोडीत आहे अशी होती.

तो दातृत्वाचा हात पाहिला आणि तेथे हजर असलेले काही बैरागी व फकीर ढळाढळा रडू लागले. बैरागी म्हणाला,''बारा वर्षापूर्वी मी हरिद्वारला गेलो होतो. पैसा जवळ नाही म्हटले तेव्हा याच पुण्य पुरूषाने मला पन्नास रूपये काढून दिले हरिद्वार घडविले. गया दाता थोर , रहे चपाती चोर'' असे शेवटी या बैराग्याने उद्गार काढले.

कै. दादासाहेबांना वृत्तपत्रांची श्रद्धांजली

''बीसवी सदी के आरंभ मे ब्रिटीश नौकरशाही द्वारा भयाकुल बनाये गये वायूमंडलमे बनाये गये राष्ट्रपिता के जिन पुढारीयोंने अपना 'सुखमय' जीवन संकट मे डाला था उनमे स्वर्गीय पं. विष्णूदत्तजी शुक्ल , स्व. पं. माधवरावजी सप्रे आदी के साथ दादासाहेब खापर्डे का नाम भी मध्यप्रांतिक राजनैतिक इतिहास मे आदरपूर्वक लिया जाएगा। सहसौजन्य और विनोदपूर्ण स्वभाव ने दादासाहेब खापर्डे को 'बेरार के अनभिषिक्त के नवाब' बना दिया।

स्वराज्य , खांडवा , ता. ५

''श्री खापर्डे यांच्या मृत्यूमुळे वऱ्हाडच्या राजकीय क्षेत्रातील मोठ्यातला मोठा आदरणीय सुप्रसिद्ध पुढारी नाहीसा झाला आहे. आपल्या ताफ्यात श्री खापर्डे हे खुप चळवळे व लोकमान्य टिळकांचे सेनापती होते.

हितवाद

'' महात्माजींच्या असहाकारीतेच्या कल्पनेस दादासाहेबांनी कसून विरोध केला. याकाळी त्यांनी लोकप्रियतेची तमा ठेवली नाही. हे त्यांच्या स्वतंत्र वृत्तीचे द्योतक आहे. ''

मौज, ता. ६

'' श्री खापर्डे हे महाराष्ट्राचे देशभक्त व पुढारी होते या निर्भय पुढाऱ्याची उणीव उभ्या हिन्दुस्थानला भासेल''

अमृतझार पत्रिका

कै. दादासाहेबांचे अमरावतीत स्मारक हे अमरावती म्युनिसीपालीटीचे व जिल्हा बोर्डाचे कर्तव्य :

१८८९ पासून अमरावती जिल्हा बोर्डाचे पहिले हिन्दी गृहस्थ म्हणून अध्यक्ष होण्याचा मान दादासाहेबांना मिळाला आहे. १८९७ व ९८ साली बिनसरकार अध्यक्ष असणे योग्य नव्हे असे सरकारला वाटले आणि जिल्हाधिकारी हे अध्यक्ष असावेत अशी प्रथा अस्तित्वात आली तेव्हा कोठे दादासाहेब जिल्हा बोर्डाचे बिनसरकारी उपाध्यक्ष म्हणून राहिले. अमरावती शहर म्युनिसीपालीटीचेही १८९५ पासून ते १९०७ पर्यंत ते उपाध्यक्ष होते. अर्थात कायद्याप्रमाणे ह्यावेळी अध्यक्षांचा अधिकार जिल्हाधिकाऱ्यास रहात असे परंतु १८८९ ते १९०७ पर्यंत म्हणजे सतत १८ वर्षे पर्यंत, दादासाहेब करतील. तेच प्रमाण असा अमरावती जिल्हा बोर्डाचा थाट होता. आणि अमरावती म्युनिसीपालीटीत १२ वर्षे उपाध्यक्षपद उपभोगले.

दादासाहेब गेले पण आहेत :

दादासाहेब उत्तम कायदेपंडीत तर होतेच पण कायदा लिहून काढणे हे कार्य कठीण , पहिला वऱ्हाड जामीन महसूल कायदा , पहिला जिल्हा बोर्ड व म्युनिसीपल कायदा हा त्यांच्या एकटाकीच्या लेखणीतून उतरला आहे आणि सरकारी नोकरीत असतांना पहिल्या आमदनीत हे दक्ष कार्य त्यांच्या लेखणीने केले आहे. कायदा लिहिणे , कारभार विषयक ज्ञानातील सर्वात मोठे विधायक कार्य असते. ते त्यांच्या लेखणीने सहज साध्य होते. हा गुण अलीकडच्या मंत्र्यांनाही अवश्य लागतो. नुसती व्याख्यानाची बाजू अशा प्रसंगी लंगडी पडते.

अरविंदबाबू अमरावतीत आले तेव्हा दादासाहेबांकडेच ते उतरले. कै. दास आले तेव्हा दादासाहेबांचा सल्ला घेऊनच बहिष्कारत्रयी विरूद्ध बंडाचे पहिले निशाण अमरावतीत त्यांनी पहिले उभारले. लाला लजपतराय यांनाच अध्यक्ष करा. सहकारी अवकृपेला पात्र झालेला पुरूष राष्ट्रीय सभेच्या अध्यक्षपदावर चढतो हे तरूणांना पाहू द्या. म्हणून काँग्रेसला १९०६ मध्ये सल्ला देणारे दादासाहेब खापर्डे होते.

लजपतराय हे दादासाहेबांविषयी आदर व स्नेह बाळगून असत. लजपतराय जेव्हा अमरावतीत आले तेव्हा ते दादासाहेब यांचेकडेच उतरले होते. कै. मोतीलाल नेहरू दिल्ली असेंब्लीतील स्वराज्य पक्षाचे नेते असतांना केळकर, अणे, मुंजे यांच्या समवेत दादासाहेबांकडे जात येत असत. १९०८ मध्ये इंग्लंडमध्ये असतांना म. गांधी , बॅ. सावरकर या दोघांचा दादासाहेबांशी परिचय झाला. म. गांधी त्यावेळी ब्रिटीश साम्राज्यवाद्यांचे स्नेही गणले गेले होते. अशा विषम परिस्थितीत परिचय झाल्यावर त्यांत जिव्हाळ्याचा आपलेपणा उत्पन्न होणे शक्यच नव्हते. म. गांधीच्या तत्वज्ञानाशी समरस होणारा दादासाहेबांचा स्वभावच नव्हता कारण दादासाहेब एकदा वाद घालू लागले म्हणजे अत्यंत कर्कश असत आणि म. गांधी जवळ तर श्रद्धेलाच अधिक प्राधान्य त्यामुळे या उभयंतात जी विभागणी झाली ती झालीच. तरीही म. गांधी दादासाहेबांविषयी आदर बाळगणारे आहेत. अशी समजूत ते

अमरावतीत २ वेळा जेव्हा आले तेव्हा प्रत्येकास आली.

तात्याराव सावरकर बंधमुक्त झाल्यावर अमरावतीत आले असता दादासाहेबांच्या भेटीस जाऊन त्यांनी दादासाहेबांच्या चरणावर जेव्हा मस्तक ठेवले तेव्हा दादासाहेबांच्या स्वातंत्र्योन्मुख अत:स्फूर्तीला आनंदाश्रु लोटले. पानिपतांत नाहीसा झालेला भाऊ आढळला असता तर पेशव्यांना जसा आनंद झाला असता तसा आनंद दादासाहेबांना सावरकर भेटल्याचा झाला.

मध्यप्रांतापासून तो थेट कर्नाटकपर्यंतचे सर्व टिळक सांप्रदायिक दादासाहेबांना वडीलांसारखे पूज्य मानीत. आणि त्यांची वागणूकही अनुयायांशी वडिलांसारखी असे. डॉ. मुंजे, श्री. तांबे, लोकनायक अणे, परांजपे, शामराव देशपांडे, वीर वामनराव , संभाजीराव गोखले, कै. असनारे, कै. दूराणी, श्री. मामसाहेब जोगळेकर, गोपाळराव चितळे वगैरे असंख्य अशा १९२० पूर्वीच्या कार्यकर्त्यांच्या मुखातून 'दादासाहेब हेच आमचे वडील व पूज्य पुरूष' असेच वाक्य आजही त्यांच्या मुखातून निघेल.

नगरपालिकेची दुखवट्याची सभा :

अमरावतीच्या नगर पंचायतीच्या गेल्या शनिवारी भरलेल्या सभेत श्री. दादासाहेब खापर्डे यांच्या निधनाबद्दल दुखवट्याचा ठराव श्री. मोतीरावजी बिजवे यांनी मांडला व श्री. चिमोटे यांनी पाठींबा दिल्यावर तो मंजूर झाला.

अत्यदर्शन : दि. २ जूलै , १९३८

सकाळी रावबहादुर कै. वा. ब्रम्ह व बाबासाहेब पाळेकर माझ्याकडे आले ते म्हणाले , '' दादासाहेब जसे तुमचे , तसेच आमचे धार्मिक विधी काय असतील ते तुम्ही करा बाकीचे आमच्यावर सोपवा. आम्ही पाहून घेऊ'' त्यांनी दादासाहेबांचा ताबा घेतला, दादासाहेबांना डोक्याला त्यांचा नेहमीचा केशरी पटका ते बांधीत असत तसा फुगवून बांधला. त्यांची आवडती शाल त्यांच्या अंगावर पांघरवली. त्यांच्या नित्याच्या खुर्चीवर त्यांना बसविले व व्हरांड्यात त्यांना नेऊन ठेवले.

शेकडो हजारो माणसांची, पुरूष स्त्रियांची त्यांच्या दर्शनाकरिता गर्दी झाली. सर्वांनी त्यांचे शेवटचे दर्शन घेतले. महार मंडळी फार मोठ्या संख्येने आली. सौ. मनुताईला (माझे कुटुंब) निरोप पाठविला की, आम्हाला दर्शन घ्यायचे आहे काही हरकत आहे काय ? त्यावर हीने निरोप पाठविला , ''दादासाहेब जितके आमचे तितकेच तुमचेही होते, खुशाल आनंदाने दर्शन घ्यावे.'' त्याप्रमाणे इतर जनतेत मिसळून महार मंडळी दर्शनाला आली. सर्वांनी रांगा बांधल्या. कोणी पायाला हात लावून, कोणी पायावर डोके ठेवून, कुणी दूरून हात जोडून, जसे ज्याला रूचेल त्याप्रमाणे सर्वांनी दर्शन घेतले. महार आले म्हणून जुन्या विचारांच्या लोकांत थोडी खळबळ माजली. पण तिला स्वरूप येऊ शकले नाही.

महायात्रा की उत्सवयात्रा

जुन्या मंडळीचा आग्रह की, दादासाहेबांना पूर्व प्रघाताप्रमाणे खांद्यावर वाहून न्यावे, इतरांचे म्हणणे पडले की, खांद्यावरून न्यायचेच पण खुर्चीवर बसले आहेत तसेच न्यायचे. शेवटी तडजोड अशी झाली की, औंदुबराच्या झाडाखाली त्यांचे पाय धुवायचे. कपडे काढायचे नाहीत व खुर्चीवर ते बसते केलेले होते तसेच न्यायचे. त्याप्रमाणे या महायात्रेला प्रारंभ ८.३० वाजता झाला. दादासाहेबांचे सर्व प्रेमी जमले होते. गावातील झाडून सर्व शिष्ट व सावकार व्यापारी आले होते. सर्व वकील मंडळी होते. सर मोरोपंत आले होते. आम्ही घराबाहेर पडलो तेव्हा हजार बाराशे मंडळी असावी. दादासाहेबांच्या पूढे भजनाची दिंडी होती. मिरवणूकीच्या अगदी समोर हनुमान व्यायाम शाळेचा सुस्वर बँड होता. महायात्रेच्या ऐवजी या यात्रेला उत्सव यात्रेचे स्वरूप आले होते. मोहल्ला मोहल्यातून तेथल्या रहिवाश्यांचा आग्रही की, त्यांच्या मोहल्यातून दादासाहेब गेले पाहिजे. त्याप्रमाणे जवळजवळ गावातील सर्व प्रमुख भागातून जावे लागले. ठिकठिकाणी पुष्पहार घातले गेले, आरत्या झाल्या, चौरस्त्यावर जयघोष झाले. यात्रेत काही मुसलमानही होते. त्यांनी फुले वाहिली. मोहल्या मोहल्यातून लोक समागमे साथी झाले. आम्ही स्मशानात पोहचलो. समागमे दहा बारा हजार लोकांचा जमाव होता.

चिता रचण्याच्या कामी सर्व जातीचे हिन्दू - मुसलमान व्यापारी होते. पारशी गृहस्थाने एक चंदनाचे लाकूड त्या चितेत टाकले, आवश्यकतेपेक्षा चौपट - पाचपट सामान आणले गेले. कोणी म्हणाले 'इतके सामान कशाला.' व जवळच्या कोणीसा म्हणाला दादासाहेबांचे असेच !

अग्निसंस्कार होत असतांना दादासाहेबांचा उजवा हात बाहेर पडला व आपण वस्तू देतांना जसा करतो तसा झाला. कित्येक म्हणाले दादासाहेबांनी जन्मभर दिले आताही दानाकरिता वरच आहे'' अब्दुल कादर वकील डोळयात पाणी आणून म्हणाले,''हैद्राबादच्या चंदूलालच्या वेळी असेच झाले होते.''

चितेच्या त्या ज्वाळा वर आकाशाकडे उफाळून जावून त्यांची शिखरे विलग होऊन इतस्त:त: विरणाऱ्या ज्वाळांचा धडधड ध्वनि अद्याप मला ऐकू येतो.

(दादासाहेब खापर्डे चरित्रातील उतारा , ले. बाबासाहेब खापर्डे)

शोचनीय निधन : जयराम पाटलांचा परलोक वास :-

दादासाहेब खापर्डे यांचे शरीर संरक्षक म्हणून १९०७ च्या सूरत काँग्रेसपासून जे ओळखले जावू लागले , जुन्या शिवाजी हायस्कूलमध्ये जे कसरत शिकवणारे होते, ते तेथील जयराम भगवानजी उर्फ आप्पासाहेब पाटील गेल्या दोन महिन्यात अंथरूण धरूनच होते. दादासाहेबांवर त्यांची आत्यंतिक श्रद्धा होती. दादासाहेबांचे निधनांचे वेळी ते अत्यवस्थ होते. शेवटी गेल्या शुक्रवारी वयाच्या ५३ व्या वर्षी त्यांनी इहलोकाची यात्रा संपवली हे कळविण्यात अतिशय वाईट वाटते.

श्री शंकराचार्याचे आगमन -

संकेश्वर मठाचे श्रीमद् जगदगुरू श्री शंकराचार्य येथे आले. श्री. दत्तोपंत नाटेकर यांच्या बंगल्यावर त्यांचे स्वागत झाले. तेथून श्री. लक्ष्मीनारायण मंदिरात त्यांचा मुक्काम होता. श्री चा मुक्काम येथे असेपर्यंत श्री लक्ष्मीनारायण मंदिरात दररोज विविध कार्यक्रम झाले.

चीनची सद्यस्थिती -

शुक्रवार ता. ८ रोजी संध्याकाळी ८ वाजता ''चीनची स्थिती'' या विषयावर जोग चौकामध्ये निरनिराळ्या वक्त्यांची भाषणे झाली. यावेळी राष्ट्रपति सुभाषचंद्र बोस यांनी चीनला अंब्युलन्सची जी तुकडी पाठविण्याचे ठरविले आहे त्याकरिता फंड जमविला. सौ. पार्वतीबाई पटवर्धन अध्यक्ष, न.कॉ.क. यांनी हा निधी त्यांच्याकडे पाठविला.

इ.स. १९३९

१ अंकुर

२ शहर विभाग काँग्रेस निवडणूक.

३ राष्ट्रवीर विजयी झाले.

४ वऱ्हाड प्रा. कॉ. कमेटीचे नवे सभासद.

५. युवक समितीचे स्नेहसंमेलन

६ कायदे मंडळाच्या बैठ कीची मागणी.

७. गायनाचार्य जगन्नाथबुवा पंढरपूरकर यांचा जलसा

६ निझामशाही विरूध्द जाहीर सभा.

हैद्राबाद सत्याग्रहासाठी अमरावतीची तुकडी.

७ अमरावतीचा स्वातंत्र्यदिन.

८ सरकारी नोकरीत मुसलमानांचे प्रमाण.

९ एल.एन. हरदास यांचे निधन.

१० सुभाषचंद्र बोस यांचा विजय.

११ नगर काँग्रेस कमेटीचे सभासद.

१२ विदर्भ प्रदेश काँग्रेसचे अधिवेशन.

१३ वऱ्हाड किसान परिषद.

१४ नव्या पक्षाची स्थापना.

१५ श्रीकृष्ण ट्रॅकीजचा वाढदिवस.

इसवी सन् १९३९

१) <u>अंकुर प्रकाशन</u> :-

संस्थेचे ३ रे पत्रक काल रोजी प्रकाशित झाले असून त्यात वृध्द महाराष्ट्रीया करीता ग्रंथांची विशेष सवलत प्रसिध्द करण्यात आली आहे. हिरवळ कथा संग्रह नाट्य संम्मेलनाच्या नागपूर येथील अधिवेशनाचे वेळी ता. १५ जानेवारी रोजी प्रसिध्द झाला.

२) <u>शहर विभाग काँग्रेस निवडणूक :-</u>

जाहीर आभार :- अमरावती जिल्हा शहर विभागातर्फे अमरावती जिल्हा शहर विभागामधून विदर्भ प्रांतिक काँग्रेस कमटीमध्ये दोन प्रतिनीधी निवडून देण्यासाठी ता. ३०.१२.३८ रोजी झालेल्या निवडणुकी मध्ये अमरावती, एलीचपुर, बडनेरा, अंजनगांव सुर्जी आणि वरूड ह्या पांच गावी मतदान करण्यात आले. आरंभी जरी वीरे वामनराव जोशी, देवीदास महाजन, श्री कोचर, डॉ. भोजराज आणि अकर्ते वकील इ. नऊ जणे उमेदवार म्हणून उभे असले तरी नंतर डॉ. भोजराज, श्री. अकर्ते वकील, कोयर, व्यास आणि पुरोहित ह्या पाच जणांनी आपली उमेदवारी परत घेतली त्या पैकी शंवटच्या दोघांनी निवडणुकी च्या आदले दिवशीपर्यंत म्हणजे ता. २७-१२-३८ पर्यंत आपली उमेदवारी परत घेतली नव्हती. राहिलेल्या चौघा उमेदवारामध्ये मतदानाचा चुरशीवा संपन्न होऊन डॉ. पटवर्धन व डॉ. सोमण हे प्रचंड बहु मताने निवडून आले त्या बद्दल त्यांनी आभार मानले.

वीर पडले, राष्ट्रवीर विजयी झाले बियाणी गट पडला.

काँग्रेस शुध्दी झाली अशी वाक्ये म्हटली गेली.

उमरावती जिल्हा शहर विभागातर्फे ता. ३० राजी काँग्रेस प्रतिनिधीची निवडणूक मोठ्या चुरशीची झाली. व डॉ. पटवर्धनांचा पराजय व्हावा म्हणून बियाणींनी आपल्या गॅझेट मधून डॉ. पटवर्धन विरूध्द अदवातदवा भाषेत लेख लिहिले श्री. अलर्ते ह्यांना डॉ. पटवर्धना वर सोडले डॉ. खेडकरांना फिरविले ना.

भारूकांचा मुक्काम ता. ३० रोजी एलीचपुरात झाला व आकोल्यापासून तो उमरावती पर्यंत बियाणी गटाच्या मोटारी पटवर्धांविरूद्ध फिरू लागल्या. काँग्रेस सभासद पाचे हजारावर होते.

उमरावती शहर बडनेरा,एलीचपूर,अंजनगांव व वरूउ मिळून डॉ. पटवर्धन ह्यांना २०८४ महाजन ह्यांस १५८४ अशी मते पडून पहिले दोघे निवडून आल्याचे ता. ३१ रोजी शहरात जाहीर झाले.

वीर वामनराव यांनी झोटींगशाही माजवून खऱ्या काँग्रेस भक्तांवर काही कारण नसतांना शिस्तभंगाचे हत्यार उचलण्याचा जो उपक्रम केला व बियाणी गटास आंधळेपणाने पाठींबा दिला त्यामुळे काँग्रेस भक्तांत भयंकर असंतोष पसरला होता. त्या असंतोषाचे हे प्रायश्चित आहे.

<u>वऱ्हाड प्रा. काँग्रेस कमेटीचे नवे सभासद :-</u>

अमरावती जिल्हा :- १) शिवाजीराव पटवर्धन २) डॉ. व.ब. सोमण ३) श्री गंगाबिसन सिंक्ची ४) श्री जग्गुलालजी तांबी ५) श्री देवीदासपंत पाध्ये ६) श्री भगवानसिंग ठाकुर ७) श्री खंडेरराव पांडुरंग देशमुख ८) डॉ. मुधोळकर

३) <u>युवक समितीचे स्नेहसंमेलन</u> :- युवक समितीचे स्नेहसंमेलन शनिवार ता. ३१ डिसेंबर व रविवार ता. १ जानेवारी रोजी विविध कार्यक्रम होऊन पार पडले. रविवारी सांयकाळी सुदर्शन नाटक गृहात संमेलनाचे अध्यक्ष डॉ. खरे यांना नमुना बालीका समाजाच्या मुलींनी गार्ड ऑफ ऑनर दिला. तरुणांनी खेडोपाडी जाऊन शेतीचे जे हर्रास सध्या होत आहेत ते थांबावेत, तसे केल्याने स्वराज्य जवळ येईल. असा संदेश डॉ. खरे यांनी दिला संमेलनाच्या चिटणीस कु. शैलजा जोगळेकर व युवक समितीचे अध्यक्ष श्री. के.गो. जोध यांची या प्रसंगी भाषणे झाली.

४) <u>गायनाचार्य पंडीत जगन्नाथबुवा पंढरपूरकर</u> :- चालू आठवड्यात उमरावतीचे गोड आकर्षण म्हणजे गायनाचे पंडीत जगन्नाथबुवा पंढरपूरकर व वादनाचार्य पंडीत दत्तोपंत मंगळवेढेकर यांचा गायन वादनाचा ता. २१ रोजी झालेला सुश्राव्य जलसा

हे होय. जवळ जवळ सर्व हिंदुस्थानात ह्याचे नांव माहीत नाही असा रसिक विरळा. गायन वादन कलेत जी काही थोडीफार अलौकिक मंडळी हिंदुस्थातान आहेत त्यामध्ये हे पंडीतव्दय आहेत.

५) <u>शेतकरी व आमचे मंत्री</u> :- विशेषत: मध्यप्रांत व-हाडच्या मराठी भागातच ओला दुष्काळ पडला त्रिपुरा काँग्रेसचे कामा निमित्त पुढे नव्या काँग्रेस मंत्री मंडळाने कायदे मंडळाची बैठक मार्चपर्यंत लांबणीवर टाकली त्यामुळे शेतकरी वर्गात अधिकचे असंतोष पसरला म्हणून अनेक आमदारांनी कायदे मंडळाच्या बैठकीची मागणी केली.

६) <u>जोग चौकातील प्रचंड सभा</u> :- जोग चौकातील कोशीबाई इमारत समोर बाबासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली नागरिकांची जाहीर सभा झाली.

सत्याग्रह निजामाविरूध्द नाही :- आमदार खापर्डे यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात हा लढा निजामाविरूध्द नाही. प्रातिनिधीक राज्यपध्दती मागण्याकरीता आहे. हे स्पष्ट केले त्यांनंतर श्री नारायणराव बामणगांवकर ह्यांचे भाषण झाले.

येथील श्री वि.ब. चौबळ वकील श्री. अण्णासाहेब देशपांडे, प्रसिध्द काँग्रेस पुढारी डॉ. पटवर्धन, श्री. जयकृष्णवंत कुऱ्हाडे, श्री. ल. कृ. ओगले यांनी दणदणीत भाषण केले. अध्यक्ष श्री. बाबासाहेब खापर्डे यांनी निजाम संस्थानात प्रजेवर अन्याय कसा होतो याची काही उदाहरणे सांगितली सभा समारोप करतांना नगर हिंदु महासभेचे चिटणीस डॉ. मशानकर यांनी आभार मानाल्यावर सभेचे काम संपले.

हैद्राबाद सत्याग्रहासाठी उमरावतीची तुकडी :-

हैद्राबाद सत्याग्रहासाठी जाणारी हिंदुत्वनिष्ठ सत्याग्रहींची तुकडी वैद्य खाडीवाले यांचे नेतृत्वाखाली उमरावती शहरात आली. या तुकडीने शहरात प्रभातफेरी काढून सत्याग्रहासाठी मदत गोळा केली. व प्रचार केला. मंगळवारी सायंकाळी ब्रम्हविद्या मंदिरात नगर हिंदू महासभा तर्फे जाहीर सभा झाली. डॉ. मशानकर यांच्या अध्यक्षतेखाली वैद्य खाडीवाले यांचे व्याख्यान झाले. व त्याच

दिवशी मंगळवारी दुपारच्या गाडीने उमरावतीला हैद्राबाद सत्याग्रहासाठी हिंदुत्वनिष्ठ सत्याग्रहींची एक तुकडी रवाना झाल्याचे वैद्य खाडीवाले यांनी जाहीर केले. या तुकडीत पुढील तरूण सत्याग्रही गे ले आहेत.

रघुनाथ जयकृष्ण , अमरावती , केशव रामचंद्र चौधरी, अमरावती, बापुराव गोपाळराव तिरवे, अमरावती या तुकडीत श्री सितारा फुलारी हे अकोल्याहून सामील झाले. श्री मनोहर रामचंद्र दाते , अमरावती हे वैद्य खाडीवाले यांचे तुकडीत दाखल झाले आहेत.

७) २६ जानेवारी १९३९ चार हजार शेतकऱ्यांच्या प्रचंड जमाव उमरावती अपूर्व स्वातंत्र्य दिन, विद्यार्थी वर्गाचा दांडगा उत्साह :- उमरावती शहरांत यंदाचा स्वातंत्र दिन अपूर्व रीतीने साजरा करण्यात आला. विदर्भ किसान सभेने जिल्ह्यातील किसान मजुरांचा यशस्वी मोर्चा जिल्हाधिकाऱ्यांच्या कचेरीमध्ये नेण्याचे ठरविले होते त्यावेळी त्यासाठी खेड्यापाड्यातून अंदाजे दोन हजार शेतकरी उमरावतीत आले होते. त्यात काही स्त्रियाही होत्या. कोटाबाहेरील निरनिराळ्या रस्त्यातुन शेतकरी व मजूरांची ही मिरवणूक फिरत दुपारी जिल्हाधिकाऱ्यांच्या कचेरीवर गेली. शाळेतील विद्यार्थ्यांनी हरताळ घालून मिरवणूकीत भाग घेतला. जिल्हा कचेरी जवळ मिरवणूकीतील लोकांची संख्या अंदाजे २ हजार शेतकरी व २ हजार विद्यार्थी आणि नागरिक मिळून ४ हजार असावी.

उमरावती जिल्हयात सारा तहकुबी :- मिरवणूक जिल्हाधिकाऱ्यांचे कचेरीते आल्यावर सर्वजण शांततेने व शिस्तीने आवारात बसले जिल्हाधिकारी रजेवर असल्यामुळे इ.ए.सी. श्री पेढारकर या किसान कार्यकर्त्याने भाई घाटणे, श्री देवे, श्री मोतीरामजी गोरडे योनी शेतकऱ्यांची परिस्थिती त्यांना समजावून दिली. वरिष्ठाकडे तुमचे म्हणणे कळवू असे आश्वासन देऊन उमरावती जिल्ह्यातील २७० गावांना २ लाख ३७ हजार रुपये तहकुबीची देण्याचे ठरविले आहे. असे श्री पेढांरकरांनी सांगितले.

या मोर्चाला यश चिंतणारी तार अ.भा. किसान सभेचे अध्यक्ष स्वामी सहजानंद यांच्याकडून आली. त्यांनंतर नागरिक विद्यार्थी संघाने ता. २६ जानेवारीला स्वातंत्र्य दिन पाळण्याची आज्ञा केल्यावरून येथील शाळा मधील शेकडो विद्यार्थ्यानी शाळा ओसाड पाडून किसान मोर्चात व स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमात उत्साहाने भाग घेतला बुधवारी सायंकाळी ब्रम्हविद्या मंदीरात अखिल भारतीय विद्यार्थी संघाच्या वऱ्हाड सत्याग्रहात शाखेचे सर चिटणीस श्री श.ब. बोधनकर यांच्या अध्यक्षतेखाली विद्यार्थ्याची जाहीर सभा भरवून स्वातंत्र्य दिनानिमित्त सुटी घेण्याचे विद्यार्थ्यांनी ठरविले होते सभेत भाई माधवराव देशपांडे व परांजपे यांची भाषणे झाली.

८) सरकारी नौकरीत मुसलमानाचे प्रमाण :- प्रांतिक सरकारचे पत्रक :

मध्यप्रांत व वऱ्हाड सरकारच्या प्रसिध्दी खात्यातर्फे ता. २१ जानेवारी रोजी पुढील पत्रक प्रसिध्द झाले आहे.

प्रांतीक सरकारच्या ताब्यातील सरकारी नोकरीमध्ये मुसलमानांना वाजवी प्रमाणात नोकऱ्या मिळाल्या नाहीत व त्यांना नोकरीतून काढून टाकण्याते येत आहे अशा प्रकारची विधाने मुसलमानी वर्तमानपत्रात व मुसलमानांच्या सभेत केली जातात असे सरकारच्या नजरेत आले आहे. ही विधाने सर्वस्वी चुकीची आहेत हे पुढील आकड्यावरून दिसून येईल.

वस्तुस्थिती अशी आहे की प्रांतातील सर्व लोकसंख्येच्या मानाने मुसलमानांची संख्या शेकडा ४.४ टक्के असून त्यांच्या संख्येच्या मानाने सरकारी नोकरीतील त्यांचे प्रमाण फारच अधिक आहे. सन १९३६-३७ मध्ये सरकारी नोकरीतील मुसलमानाचे शेकडा प्रमाण २३.५ होते. सन १९३७-३८ या साली हे प्रमाण २३.३६ वाढले नोकरांच्या वर्गीकरणाच्या दृष्टीने ह्या आकड्यांचे आणखी पृथ्थकरण केले तर ते मनोरंजक होईल.

ता. १ एप्रिल १९३७ रोजी प्रॉव्हिजनल सर्व्हीसच्या जगातील शेकडा ८.८

जागा मुसलमानाकडे होत्या व ता. १ ऑक्टोबर १९३८ रोजी हे शेकडा प्रमाण ९.३४ होते ता. १ ऑक्टोबर १९३८ प्रोव्हीन्शीअल पोलीस सर्व्हीसमध्ये मुसलमानचे शेकडा प्रमाण ३५ प्रमाणे वाढले होते. पोलीस खात्यातील कॉस्टेबल व हेड कॉस्टेबल खारीज करून खालच्या दर्जाच्या एक्झीक्युटीव्ह सर्व्हीसमध्ये मुसलमानाचे शेकडा प्रमाण ता. १ एप्रिल १९३७ रोजी १९.८८ होते व ता. १ एप्रिल १९३८ रोजी ते १९.४ होते व्हेटर्नरी खात्यामधील खालच्या दर्जाच्या एक्झीक्युटीव्ह सर्व्हीसमध्ये शेकडा ३५ टक्के जागा पोलीस आणि जंगल खात्यातील १९३६ रोजी कॉन्स्टेबल व हेड कॉन्स्टेबल यांच्या जागापैकी शेकडा २९.३७ टक्के जागा मुसलमानाकडे होत्या.

९) **दुखवट्याची सभा** :- येथे हमालपुऱ्यात ता. २७.९.३९ रोजी रात्री ८ वाजता श्री आनंदराव लडके यांचे अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरून ह्या सभेत वऱ्हाड मध्यप्रांतातील अस्पृश्य समाजाचे एकमेव पुढारी व स्वतंत्र मजूर कार्यकर्ते श्री एल.एन. हरदास एम.एल. ए. यांच्या अकाली निधनामुळे दु:ख व्यक्त करण्यात आले त्यांचे कामगिरीवर श्री एस.जी. नाईक, श्री एल. के ओगले श्री पी.एस. भटकर, श्री च्वहाण व श्री खापर्डे यांची व्याख्याने होऊन दुखवट्याचा ठराव सर्वानुमते मंजुर झाला.

१०) **सुभाष बोस यांचा प्रचंड विजय, त्रिपुरा काँग्रेसच्या अध्यक्षस्थानी निवड:**

त्रिपुरी काँग्रेसच्या अध्यक्षपदासाठी सुभाषचंद्र बोस डॉ. पट्टामी सीतारामय्या यांच्यात ता. २९ रोजी चुरशीची निवडणूक झाली.

एकंदर २१ प्रांतापैकी १९ प्रांताचे निकाल हाती आले. त्यावरून सुभाषबाबुंनी १४९७ डॉ. पट्टाजी सिताराममय्या यांना १२९६ मते पडल्याचे कळून येईल. म्हणजे या १९ प्रांतात सुभाषबाबूंना पट्आनी सीताराय्या यांच्यापेक्षा २०१ मते जास्त मिळाली महाकोशल व सदरहू या प्रांताचे आकडे हाती आले नव्हते. २०३ मते अधिक पडून सुभाषबाबू अध्यक्ष निवडून आल्याची ताजी बातमी आली आहे. विदर्भातून सुभाषबाबूंना कमी मते पडली. महाराष्ट्रतही असेच कमी मतदान झाले.

	प्रांत	सुभाष	पट्टामी
१.	पंजाब	१८२	८६
२.	वऱ्हाड	११	२१
३.	गुजराथ	५	१००
४.	संयुक्त प्रांत	२६९	१८५
५.	आंध्र	२८	१८१
६.	बंगाल	४०४	७९
७.	केरळ	८०	१८
८.	तामिळनाडू	११०	१०२
९.	ब्रम्हदेश	८	६
१०.	ओरीसा	४४	९९
११.	अजमेरा	२०	६
१२.	नागपूर	१२	१७
१३.	मुंबई	१२	१४
१४.	आसाम	३४	३२
१५.	कर्नाटक	१०८	४१
१६.	सिंध	१३	२१
१७.	बिहार	७०	१९७
१८.	महाराष्ट्र	७७	८६
१९.	दिल्ली	१०	५
		---	---
		१४९७	१२९६
		---	---

११) नगर काँग्रेस कमेटीचे सभासद :-

पंचविस सभासद करणाऱ्या सभासदापैकी १० प्रतिनिधींची निवडणूक ता. २९.१.३८ रोजी अविरोध आली. १० जागाकरीता ११ उमेदवार अर्ज आले होते. त्यापैकी त्रिंबकराव जोशी यांनी आपली उमेदवारी परत घेतल्यामुळे खालील दहा प्रतिनीधी अविरोध निवडून आले.

१) दे.भ. राधावल्लभ लड्ढा

२) दे.भ. वल्लभदास राठी

३) मोतीसा पासोबा काळे

४) दे.भ. मांगीलाल नथमल नांगलिया

५) दे.भ. राजेश्वर देविदीन अवस्थी

६) दे.भ. सौ. पार्वतीबाई पटवर्धन

७) दे.भ. विठोबा सीताराम शेंडे

८) दे.भ. अब्दुल वहाब

९) दे.भ. रामचंद्र अण्णाजी देशपांडे

असे डॉ. गणेश गोविंद भोजराज हे कळवितात.

विदर्भ प्रांतिक काँग्रेस परिषदेचे तिसरे अधिवेशन :-

शेंदुरजनाघाट :- (ता. मोर्शी) येथे ता. ५ व ६ फेब्रुवारी १९३८ रोजी कर्नाटक केसरी गंगाधर देशपांडे यांचे अध्यक्षतेखाली भरले होते.

या प्रसंगी स्वागताध्य श्री वीर वामनरावदादा जोशी यांचे पुढील प्रमाणे भाषण झाले:

३५ वर्षापूर्वी जेव्हा स्वातंत्र्य हा शब्द जाहीरपणे तर राहावे पण एकांतातही मुखावाटे नुसते उच्चारणे सुध्दा कठीणच नव्हे तर जवळजवळ अशक्य होते तेव्हा

त्या अंधकारमय भीषण भयसूर काळी एक अस्सल व नित्सीम स्वातंत्र्यवीराने या गावाच्या दोन व दुर्बल क्षेत्रात मोठ्या हिमतीने स्वातंत्र्यवृक्षाचे शुध्द बीज रोवले व आजन्म तेज़स्वी आत्मत्यागाचे पुण्यजीवन घालून त्यास अंकुर दिले व १९०३ साली अमरावती येथील स्वातंत्र्यधर्माच्या गुप्त सिंहासमोर एका हातात गीता व दुसऱ्या हातात खड्ग धारण करून परमेश्वराच्या साक्षीने स्वदेशास स्वातंत्र प्राप्त करून देण्यासाठी सर्वस्वाचे बलिदान करण्याची घनघोर प्रतिज्ञा मोर्शी तालुक्यातील ज्या स्वातंत्र्यवीराने प्रथम केली व या एकनिष्ठेने पाळली ते कन्हैयालाल तांबी हे एक उज्ज्वल दर्जाचे कर्तबगार सेनानी होते. वऱ्हाड प्रांतिक काँग्रेस परिषदेच्या ३ ऱ्या अधिवेशनाकरीता मोर्शी तालुक्यातील शेंदुरजनागावी अत्यंत अपूर्व असा थाटमाट करण्यात आला होता. परिषदेकरीता वऱ्हाडातील अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा या चारही जिल्ह्यातील प्रतिनीधी काँग्रेस कार्यकर्ते व पुढारी मंडळी उपस्थित झाली होती. परिषदेला प्रारंभ रविवार ता. ५ रोजी दुपारी शेंदुरजना येथे खास काँग्रेस अधिवेशनाकरीता उभारण्यात आलेल्या प्रचंड व अत्यंत बहारीने आणि कौशल्याने रचलेल्या काँग्रेस नगरात व्हावयाचा होता. शेंदुरजना येथील वऱ्हाड प्रांतिक परिषदेकरीता उभारलेला मंडप फैजपुरचीच आठवण करून देत होता. वऱ्हाड प्रांतिक काँग्रेस परिषदेच्या अधिवेशनाला प्रारंभ होण्यापुर्वी दुपारी ५ वाजण्याच्या सुमारास येथील प्रताप चौकात मध्यप्रांत सरकारचे मुख्य काँग्रस मंत्री डॉ. ना. खरे ह्यांच्या हस्ते राष्ट्रीय ध्वजारोहण समारंभ व्हावयाचा असल्यामुळे तेथे लोकांची व प्रेक्षकांची अलोट गर्दी झाली होती. मध्यप्रांत सरकारचे मुख्य प्रधान डॉ. ना. खरे सुमारे सव्वाचारच्या सुमाराला नागपूरहुन शेंदुरजनाला आले आणि काही वेळ विश्रांती घेतल्या नंतर ते प्रताप चौकात घेऊन दाखल झाले. त्यावेळी अमरावतीच्या श्री हनुमान व्यायाम मंडळाच्या बॅंडच्या निनादात सर्वानी त्याचे हार्दिक स्वागत केले. राष्टीय ध्वजारोहणाच्या स्थळी डॉ. ना.खरे यांच्या बरोबर वऱ्हाड प्रांतिक काँग्रेस परिषदेचे नियोजित अध्यक्ष कर्नाटकवीर दे.भ. गंगाधरराव देशपांडे बंगालचे सुप्रसिध्द पुढारी बाबू सुभाषचंद्र बोस, वऱ्हाड प्रांतिक काँग्रेस

कमेटीचे अध्यक्ष ना. ब्रिजलाल बियाणी, या शिवाय वऱ्हाड मध्यप्रांत असेंब्ली सभासद श्रीमती दुर्गाताई जोशी, श्री लक्ष्मणराव नाथे, गणेशराव देशमुख, श्री सुगमचंदजी लुणावत प्रभृति असेंब्लीतील काँग्रेस सभासद व इतर प्रांतिक पुढारी उपस्थित होते. सुमारे सव्वापाच वाजताच्या सुमाराला डॉ. ना. खरे काँग्रेस ध्वजारोहणाच्या स्थळी घेऊन दाखल झाले. प्रारंभी वंदे मातरम गीत म्हणण्यात आल्यानंतर मध्यप्रांत सरकारचे मुख्य दिवाण ना. डॉ. खरे यांनी राष्ट्रीय ध्वजाचे टाळ्यांच्या निनादात आरोहण केले.

१३) **किसान परिषद** :- दुसऱ्या दिवशी सकाळी त्याच जागी किसान परिषद बिहारमधील पुढारी स्वामी सहजानंद ह्यांच्या अध्यक्षतेखाली भरली.

वऱ्हाड किसान परिषद :- किसान कामधेनु संरक्षण करा -

स्वामी सहजानंद यांचे भाषण :-

वऱ्हाड काँग्रेस प्रांतिक परिषदेचे अधिवेशन शेंदूरजना येथे भरले असता त्याच सुमाराला रविवार ता. ६ रोजी विदर्भ प्रातिक किसान परिषदेचे अधिवेशनाला शेतकऱ्यांचा ७-८ हजारावर प्रचंड समुदाय जमला हामता. परिषदेला ८ ॥ वाजता आरंभ झाला. परिषदेला काँग्रेस पुढारी मुंबईचे डॉ.एस.एम. जोशी व काम्रेड बुखारी या शिवाय वऱ्हाडातील काँग्रेस परिषदेला आलेले प्रतिनीधी ना. बॅ. रामराव देशमुख दे.भ. गंगाधरराव देशपांडे, वीर वामनराव जोशी, पंडीत कानडे शास्त्री, दुर्गाताई जोशी ब्रिजलाल बियाणरी प्रभृति मंडळी उपस्थित होती. प्रारंभी डॉ. माधवराव देशपांडे यांचे भाषण झाल्यानंतर किसान परिषदेचे स्वागताध्यक्ष श्री दारोकार यांनी स्वागतपर भाषण केले. श्री दारोकर यांनी आपल्या भाषणात वऱ्हाडातील शेतकऱ्यांच्या दैन्यावस्थेचे हृदयद्रावक चित्र चितारले. नंतर अध्यक्ष व पाहुणे यांना हार अर्पण करण्यात आल्यानंतर स्वामी सहजानंद भाषणाला उभे राहिले.

१४) **नव्या पक्षाची स्थापना** :- येथे ता. १३ रोजी बॅ. पंजाबराव देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली वऱ्हाडातील निरनिराळ्या पक्षाच्या पुढाऱ्यांची सभा होऊन

प्रांतातील ब्राम्हणेतर पक्ष व शेतकरी संघ व वऱ्हाड राष्ट्रीय पक्ष यांनी मिळून नवा शेतकरी कामगार पक्ष नावाचा एक स्वतंत्र पक्ष स्थापण्याचे ठरले.

१५) **श्रीकृष्ण टॉकीजचे वाढदिवस** :- या टॉकीजचा ११ वा वाढदिवस गेल्या रविवारी सायंकाळी गणेश नाटकगृहात मुंबईच्या मोशन पिक्चर्स संस्थेचे उत्पादक श्री. कृ.स. हिर्लेकर यांच्या अध्यक्षतेखाली साजरा झाला.श्री नानासाहेब जोग, माजी. एम.एल.ए. यांनी अध्यक्षांची सुचना आणली. तिला वैद्यभूषण हिर्लेकर यांनी अनुमोदन दिले व अध्यक्ष रीतसर स्थानापन्न झाले.

त्यानंतर ''शिक्षण विषयक बोलपटांची आवश्यकता'' या विषयावर अध्यक्षांचे भाषण झाले वैद्य, हरिहरराव देशपांडे यांनी सिनेमाच्या मालकातर्फे सर्वाचे आभार मानल्यानंतर शिक्षण विषयक व कॉमेडी टॉकी दाखविण्यात येऊन हा कार्यक्रम संपला

इ.स. १९४०

१) आचार्य अत्रे यांचे भाषण.
२) जगदेवराव पाटील खुनाची चौकशी.
३) अ.न.पा. सरकार जमा.
४) श्री.सनी यांचे शुध्दीकरण.
५) पाकिस्थान योजनेचा धि:कार.
६) म. पैगंबर जयंति.
७) टांगा बैलगाडी युनियन.
८) डॉ.हेडगेवार यांच्या निधनाबद्दल दुखवटा.
९) मौ.आझाद यांचे स्वागत.
१०) सुभाषदिनाची सभा.
११) सौ.सुचेता कृपलानी यांचे भाषण.
१२) सर मोरोपंतांचा ८० वा वर्धापनदिन.
१३) दे.भ. अण्णासाहेब भोपटकरांचे भाषण.
१४) लोकनायक बापूजी अणे यांचा सत्कार.
१५) विदर्भ प्रांतिक हिंदू सभेचे अधिवेशन
१६) जिल्हा कॉ. कार्यकर्ता परिषद.
१७) विदर्भ महिला परिषदेचे अधिवेशन.
१८) अमरावतीचा पहिला वैयक्तिक सत्याग्रह.
१९) कै. बापूसाहेब दांडेकर
२०) आर.टी.ओ. चे ऑफीस सुरु.
२१) विदर्भ युवक परिषद.
२२) म्यु.ए.व्ही. स्कूल बंद करण्याचा निर्णय.
२३) स्वस्तिक नाट्य मंडळाचा वार्षिकोत्सव.
२४) वऱ्हाड मध्य. युवक परिषद अधिवेशन.
२५) भगवा झेंडा प्रकरण.

१) **उमरावतीत आचार्य अत्रे :-**

महाराष्ट्राचे सुविख्यात साहित्यिक व नाटककार आचार्य प्रल्हाद केशव अत्रे हे मे १९४० मध्ये उमरावतीस आले होते. बाल मोहन संगीत नाटक मंडळी ही आचार्य अत्रे लिखित ''घराबाहेर'' या नाटकाचा सुमुहुर्ताचा पहिला प्रयोग अमरावतीला इंद्रभुवन थिएटरमध्ये करणार होती. त्या निमित्त ते उमरावतीस आले होते. त्यावेळी बाल मोहन नाटक मंडळीचा उमरावतीस मुक्काम होता. या संधीचा फायदा घेऊन नगर वाचनालयाने आचार्य अत्रे यांचे ''विनोदाची नवी दृष्टी'' या विषयावर दि. ३ मे १९४० रोजी प्रभात थिएटरमध्ये व्याख्यान घडवून आणले. वीर वामनराव दादा यांचे अध्यक्षतेखाली आचार्य अत्रे यांचे हस्ते ७ मे रोजी येथील श्री.बुनगे यांनी सुरु केलेल्या आदर्श टॉकीजचे उद्घाटन झाले.

२) **चांदूर चे श्री.जगदेवराव पाटलाचे खुनाची उमरावतीत चौकशी सुरु :-**

चांदूर बिस्वा (जि.बुलढाणा) येथील कॉंग्रेस कार्यकर्ते श्री.जगदेवराव पाटील यांचा बिस्ट्याला खून झाला होता व त्यात बरेच मुसलमान पकडण्यात आले होते. सेशन कोर्टात त्यापैकी बऱ्याच आरोपींना शिक्षा झाल्या होत्या व त्यावर हायकोर्टाकडे अपील होऊन सर्व आरोपी निर्दोष सुटले होते. हा खून झाला त्यावेळी मध्यप्रांत वऱ्हाडवर कॉंग्रेसचे मंत्री मंडळ होते व श्री.रविशंकर शुक्ला हे मुख्यमंत्री होते.

वरील सर्व कारणांमुळे त्याकाळी या खुनाने प्रचंड खळबळ उडवून दिली होती. परंतु हायकोर्टाच्या निकालानंतर काहींना हर्ष तर पुष्कळांना दु:ख झाले होते. अशा स्थितीतच सरकारने मुंबई हायकोर्टाचे न्यायाधीश मि. मॅकमिलन यांना नेमून दि. २७ जून पासून या प्रकरणाची चौकशी उमरावतीचे हे कमिश्नर कचेरीत सुरु केली होती.

या चौकशीचे रिपोर्टात ज्या सरकारी अधिकाऱ्यावर ठपका ठेवण्यांत आला होता त्यांत पूर्वी उमरावतीत सीटी इन्स्पेक्टर म्हणून बराच काळ राहिलेले व नंतर

उच्च पदावर चढलेले ख्यातनाम असे श्री.परमेश्वर दयाल हे पोलीस अधिकारी होते. या ठपक्यानंतर त्यांना सरकारने शो कॉज नोटीस दिली तेव्हा त्या धक्क्याने आजारी पडून ते स्वर्गवासी झाले. श्री.जगदेवराव पाटील हे कॉग्रेसचे त्या भागातील नेते व एम.एल.ए. होते. परंतु त्यांचा असा अमानुष रीतीने खून झाल्याने त्याचे प्रतिध्वनी प्रांताचे कायदा मंडळातच नव्हे तर मध्यवर्ती कायदे मंडळातही उठले होते. सुमारे १२३ मुसलमान या प्रकरणी आरोपी केले होते. त्यामुळे मुस्लीम लीगनेही या प्रकरणी रुची दाखविली होती.

३) <u>वीर जगदेवराव पाटील</u> :-

मुक्काम चांदूर बिस्वा, जि.बुलढाणा. (ज.१९०० मृ.२७ मार्च १९३९) : बुलढाणा जिल्ह्यातील चांदूर बिस्वा या गावचे श्री.जगदेवराव पाटील हे भारतीय स्वातंत्र्य चळवळीत दीर्घ काळ भाग घेतलेले कारावास भोगलेले कॉग्रेसचे एक नेते होते. दि. २७ मार्च १९३९ रोजी चांदूर बिस्वा रेल्वे स्टेशनवरुन गावात जाताना मुसलमांनानी त्यांचेवर हल्ला करुन अत्यंत क्रुरपणे त्यांचा खून केला. या खुनाचे प्रतिध्वनी सर्व विदर्भ व महाराष्ट्रभर उमटले होते. मध्यप्रांत वऱ्हाडच्या कायदे मंडळातही त्यांना श्रध्दांजली अर्पण केली होती. जगदेवराव यांच्या कार्यामुळे व व्यक्तिमत्वामुळे त्यांच्या शवयात्रेला मध्यप्रांत वऱ्हाडचे मुख्यमंत्री श्री.रविशंकरजी शुक्ला, गृहमंत्री श्री.व्दारकाप्रसादजी, बियाणी आदी वरीष्ठ नेते देखिल उपस्थित होते. पुढे त्यांची हत्या करणाऱ्यांना शिक्षा झाल्या होत्या पण हायकोर्ट अपीलात ते निर्दोष ठरले होते.

हुतात्मा जगदेवराव पाटील यांचे स्मारक चांदूर बिस्वा येथे करण्यात यावे असा निर्णय महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री.अंतुले यांचे काळात घेण्यात आला होता. परंतु त्या विरुध्द मुस्लीम लिगने शिष्ट मंडळ नेऊन हा निर्णय सरकारला बदलायला भाग पाडले. नंतर श्री.वसंतदादा पाठील हे मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांनी स्मारक बांधण्याचा निर्णय घेतला होता.

वीर जगदेवराव पाटील यांचे पूर्वज पश्चिम महाराष्ट्रातून वऱ्हाडात येऊन स्थायिक झाले होते. त्यांचे पूर्वज छत्रपती शिवाजी महाराज यांचे सेनापती श्री.हंबीरराव मोहीते यांनी उभारलेल्या भाल्याचे पथकात होते. महाराजांनी या पथकाला भालेराव हे संकेत नाम दिल्यामुळे या पथकातील सैनिक हे पुढे स्वत:ला ''भालेराव'' हे उपनाम लावू लागले. त्यामुळे पुढे जगदेवराव यांचे घराण्यातही ''भालेराव''हे उपनाम लावू लागले. त्यामुळे पुढे जगदेवराव यांचे घराण्यातही ''भालेराव'' हेच उपनाम चालू होते व आहे. शिंखांचे सैन्यातील प्रसिध्द सरकार अंबुजी इंगळे व हरिखंडो हे ही या घराण्याचे पूर्वज होत.

वीर जगदेवराव यांचे शिक्षण जास्त झाले नव्हते. शाळेतील व्हिक्टोरीया राणी व पंचम जार्ज बादशहा यांचे फोटो फोडून टाकल्यामुळे त्यांना शाळेतून काढून टाकण्यात आले होते. नंतर विद्याध्ययनाचे इच्छेने ते काशीला गेले होते. त्यांनी याच काळात दाढी-मिशा वाढविल्या. त्या आमरण होत्या. देशाला स्वातंत्र्य मिळे पर्यन्त मी केस काढणार नाही'' कदाचित अशी प्रतिज्ञा त्यांनी घेतली असावी. पुढे त्यांनी भूमिगत क्रांतिकारकांना आपल्या वाड्यातील भुयारात आश्रय दिला होता.

त्या काळी इंदूर येथे झालेल्या क्रांतिकारकांच्या बैठकीला वीर जगदेवराव हे हजर होते व स्वत:च्या रक्ताने त्यांनी प्रतिज्ञापत्रावर सही केली होती. त्यामुळे ते पुढे सत्यशोधक चळवळीपासून दूर राहिले होते.

वीर जगदेवराव पाटील यांचे सर्व जीवनच मोठे गतिशील आहे. त्यांनी वृत्तपत्रही सुरु केले होते. राष्ट्रीय आंदोलनासाठी त्यांनी ''चैतन्य मेळा'' काढून जनजागृती केली होती. या मेळाव्यात पोवाडे-नाटके असत. जगदेवराव यांनी लिहिलेले ''आधुनिक भारत'' हे नाटक तत्कालीन इंग्रज सरकारने जप्त केले होते.

श्री.जगदेवराव हे साहित्यिकही होते. त्यांच्या अनेक रचना आहेत. शाहीरी कवीही होतेच. सिंहगडचा पोवाडा, शेतकऱ्यांचा पोवाडा, वाईचा पोवाडा, वीर वामनराव दादांचाही पोवाडा त्यांनी रचला होता. या पोवाड्याचे धृपद होते, ''हा

वीर, खरा रणधीर, हाती खंजीर असह्योगाचा, हा वीर निघाला ''वामन वैदर्भियाचा मोफत दवाखाना, चालणीत असत. अनाथ विद्यार्थीगृह ही चालवीत. त्यांनी अनेक शेतकरी परिषदा भरविल्या होत्या.

श्री.जगदेवराव हे त्या गावांचे सर्वेसर्वाच होते. ''ग्राम पंचायत'' या शब्दाला पूर्ण अर्थ त्यांनी आपल्या कर्तृत्वाने आणून दिला होता. गांवात १९२७ पासूनच त्यांनी श्री.शिवजयंत्युत्सव सुरु केला होता. आषाढी कार्तिकेला गावात दिंड्या निघत असत. ते तालुका कॉंग्रेसचे व लोकल बोर्डाचे अध्यक्ष होते.

गावात मशीदी समोरील रस्त्याने दिंड्या-मिरवणुकी नेत. त्यामुळे वेळोवेळी संघर्ष घडत असे. त्यांनी त्या भागातील मुस्लीम लीगचे प्रचारासही सतत तोंड दिले होते.

श्री.जगदेवराव हे, नागपूरच्या १९२३ च्या झेंडा सत्याग्रहापासूनच कॉंग्रेस चळवळीशी संम्बध्द होते. १९३० च्या जंगल सत्याग्रहात त्यांनी सहा महिने कारावास भोगला आहे.

१९३७ च्या प्रांतिक कायदे मंडळाच्या निवडणुकीत प्रतिसहकार पक्षातर्फे निवडणुकीला उभे होते. त्यांचा केवळ २५० मतांनी पराभव झाला होता.

१९३५ साली ''इंडिया ॲक्ट'' अस्तित्वात आला आणि विदर्भात मुस्लीम लीग सक्रिय झाली. त्यामुळे ठिकठिकाणी जातीय दंगलीना उत्तेजन मिळू लागले होते. श्री.जगदेवराव हे भानानगर सत्याग्रहाशीही संबंधित होते. त्या काळात हैद्राबाद-दिन ही पाळला होता. त्याची प्रतिक्रिया या ना त्या प्रकारे होऊन त्यातूनच त्यांची हत्या घडली होती.

वीर जगदेवराव पाटलांच्या हत्येचा हा कट आगावूच शिजला होता असे दिसते. कारण तीन चारशे गुंड चांदूर-बिस्वा येथे एकत्र जमले होते. या गुंडांना कोठून तरी पैशाचा पुरवठा होत होता असेही दिसत होते. श्री.पाटील त्या दिवशी मलकापूरचा बाजार हर्रास करुन, सांयकाळी ५ च्या पॅसेंजर गाडीने गावाला आले

होते. अनिष्ट प्रकार घडणार हे मलकापूरला कळनूही ते एकटे आले. स्टेशनवर उतरुन गावात येताना प्रथम मस्जीद मुस्लीम मोहल्ला नंतर गाव. त्यामुळे त्यांना त्यांचा अमानुष खून करणे सहज शक्य झाले होते.

जगदेवराव पाटलांजवळ थोडी शेती होती, त्याचे उत्पन्नावर उपजिविका वाले आणि सार्वजनिक कार्यात ते भाग घेत असत ते श्रीमंत आहेत, अशीही काही लोकांची धारणा होती. पण वस्तुस्थिती उलट होती. खरा धडाडीचा शूर माणूस, बेडर, दरिद्री अवस्थेतही कार्यक्षमतेने ते कार्य करीत असत. त्यांच्या हत्येत भाग घेतलेल्यांचे खटल्यासाठी हैद्राबादहून पैशाचा पुरवठा होत असे, असे म्हणतात.

वीर जगदेवराव पाटील हे कीर्तनही करीत असत. संत वाङ्मयाचा त्यांचा अभ्यास दांडगा होता. गीता तर त्यांना मुखपाठ होती. खाजगीत त्यांनी इंग्रजीचाही अभ्यास केला होता. त्यांचे वक्तृत्व प्रचंड होते. तसेच त्यांचे व्यक्तिमत्वही इतरांवर छाप पाडणारे असेच होते. आपल्या वक्तृत्वाने, सेवेने त्यांनी जन मानसात आपले स्थान निर्माण केले होते. पण त्यांना पाण्यात पहाणारेही काही होतेच. त्यांच्या हत्येनंतर "ऐसे कॉंग्रेसी की हत्या मानवतापर कलंक है" असे उद्‌गार महात्मा गांधीजींनीच काढले होते.

वीर जगदेवराव पाटील यांच्या खुनाची चौकशी नागपूरच्या युरोपीयन सेशन जज्जा पुढे होऊन फेब्रुवारी १९४० मध्ये त्याचा निर्णय लागला होता. त्यांत शिक्षा झालेल्या आरोपींनी नंतर या निकालावर हायकोर्टाकडे अपील केले होते. या अपीलचा निकाल लागून सर्व आरोपी निर्दोष सुटले होते.

पुढे दि. २७ जून १९४० पासून, या खुनाचे चौकशीत ज्या पोलीस अधिकाऱ्यांनी कुचराई किंवा चूक केली त्या संबंधीची चौकशी राज्य शासनाने मुंबई हायकोर्टाच्या एका जज्जामार्फत अमरावती येथे करविली होती.

(प्रा. भाऊ भालेराव यांचेकडून मिळविलेल्या माहितीचे आधारे साभार.)

४) <u>उमरावती नगरपालिका सरकार जमा झाली.</u>

इ.सन. १९३९ मध्ये उमरावती नगरपालिकेची निवडणूक होऊन कॉंग्रेस पक्ष सत्तारुढ झाला होता व त्या पक्षाचे श्री.छक्कीलालजी खरैय्या हे नगराध्यक्ष निवडल्या गेले होते. वीर वामनराव दादा हे ''झोन डिक्टेटर'' होते.

या कॉंग्रेस पक्षाचे म्यु. कारभाराला वर्ष होते न होते तोच सरकारने, चौकशी केली आणि दि. १४ जून १९४० रोजी ही नगरपालिका बर्खास्त करण्यात येऊन श्री.बेन्द्रे, इ.ए.सी. हे सरकारी अधिकारी प्रभारी नेमून सरकारने नगरपालिकेचा कारभार आपल्या हाती घेतला. (कॉंग्रेस मंत्री मंडळाने १९३९ साली मंत्रिमंडळाचा राजिनामा दिला होता.) नगरपालिका बरखास्त करण्यापूर्वी सरकारने या नगरपालिकेस शो कॉज नोटीस दिली होती. व त्या नोटीसीचे नगरपालिकेने उत्तरहि पाठविले होते. परंतु नुकत्याच सादर केलेल्या खुलाशाच्या चौकशी करिता सयुक्तिक ठरत असलेली शिस्तीची कारवाई यावेळी केलीच पाहिजे असे सरकारचे ठाम मत झाले आहे. सरकारचे असे मत आहे की, उमरावती शहर नगर पंचायत ही चालू ठेवण्याला अपात्र असून, तिच्यावर कायद्यान्वये सोपविलेली कर्तव्ये बजावण्यात तिने सारखी कुचराई केली आहे. म्हणून मध्यप्रांत वऱ्हाडचे गव्हर्नर असा आदेश देतात. की नगर पंचायत कायदा क्र. ४७(१) प्रमाणे ही नगरपरिषद बरखास्त करण्यात यावी व शक्य तित्या लवकर नव्या निवडणुकी घेण्यात याव्यात असा सरकारी निर्णय होता.

याप्रमाणे उमरावती नगरपालिका सरकार जमा झाली ती दि. १७ मार्च १९४४ पावेतो म्हणजे सुमारे पावणे चार वर्षे सरकारचे ताब्यातच होती.

टीप:- श्री.अण्णासाहेब कलोती हे नगरपालिकेचे अध्यक्ष असतांनाच, मध्यप्रांत सरकारच्या स्थानिक स्वराज्य खात्याचे पत्र दि.१६.९.३८ प्रमाणे ''नगरपालिकेचा कारभार अव्यवस्थित आहे तो एक महिन्याचे आंत सुधारावा. असे फर्माविले होते. याची नोंद नगरपालिका ठराव क्रं. १६ दि.१८.१०.३८ प्रमाणे घेण्यात आली होती.

५) मि.सनी यांनी हिंदू धर्म स्वीकारला.

विदर्भातील ख्यातनाम व सर्वांचे एकवेळी आवडते क्रिकेट पटू श्री.रंगराव आनंदराव दिनकर (पूर्वाश्र मीचे मि.सनी) यांना, नगर हिंदू सभेतर्फे दि. १.१०.१९४० रोजी वैदिक पध्दतीने हिंदू धर्मात घेण्यात आले होते. मि. सनी हे ख्रिश्चन होते. या समारंभाला बराच मोठा जनसमुदाय हजर होता.

५) नगर हिंदू सभेतर्फे पाकिस्तान योजनेचा धि:कार :-

नगर हिंदू सभेतर्फे दि. १९ एप्रिल रोजी रात्री जोग चौकात, त्यागवीर भट वकील यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा झाली या सभेत खालील ठराव मंजूर करण्यात आला, ''लाहौर येथील मुस्लीम लीग परिषदेत, भारतभूचे मुस्लीम हिंदूस्थान व हिंदू हिंदुस्थान असे दोन तुकडे करण्यासंबंधी पास करण्यात आलेल्या ठरावाची ही सभा तीव्र निषेध व धिक्कार करुन असे जाहीर करते की, ह्या योजनेचा प्रतिकार केला जाईल.''

या ठरावावर डॉ.देशमुख, श्री.नानासाहेब गवई, एम.एल.ए. व अण्णासाहेब देशपांडे यांची जोरदार भाषणे होऊन ठराव टाळ्यांचे गजरात सर्वानुमते मंजूर झाला.

६) मंहमंद पैगंबर जयंती :-

इस्लाम धर्म संस्थापक महंमद पैगंबर यांचा जन्म दिनोत्सव दि. २१ एप्रिल रोजी सकाळी प्रभात टॉकीजमध्ये मोठ्या समारंभाने साजरा करण्यात आला होता.

त्या निमित्त भरलेल्या सभेत सालाबाद प्रमाणे मुसलमान बंधु सोबतच हिंदू, पारशी इत्यादी धर्मानुयायी प्रतिष्ठित नागरिक उपस्थित असल्यामुळे जातीय ऐक्याचे दृष्टीने ही सभा विशेष महत्वाची भासली होती.

या सभेत बऱ्याच हिंदु-मुसलमान पुढाऱ्यांची महंमद पैगबरांचे उदात्त शिकवणुकीवर व्याख्याने झाली होती. आकोल्यावरुन श्री.चिपळूणकर वकील हे

या उत्सवात व्याख्यान देण्यासाठी मुद्दाम आले होते. त्यांचे सुश्राव्य व्याख्यान सभेत झाले होते.

७) **अमरावतीतील टांगा बैलगाडी युनियन :-**

अमरावतीतील टांगा-बैलगाडी युनियन (रजिस्टर्ड) ह्या संस्थेची वार्षिक आमसभा दि. ९ मार्च ४० रोजी ब्रह्म विद्या मंदिरात माजी मंत्री दे.भ.नानासाहेब गोखले यांच्या अध्यक्षतेखाली होऊन तीत नव वर्षासाठी खालील पदाधिकारी व कार्यकारिणी निवडण्यात आली होती.

अध्यक्ष :- रावसाहेब एस.डी. रणदिवे, उपाध्यक्ष - श्री.मिरा मोहियोद्दीन व श्री.रा.वि.पंत, सचिव श्री.हैदरखा, ह्यातखां व श्री.बाबुराव मुळे, सदस्य सर्वश्री राघोबा, सूरजबली रामदीन जटाप्पा विठ्ठल, कानडे, समशेरखा वगैरे.

८) **डॉ.हेडगेवार यांचे मृत्युबद्दल दुखवट्याची सभा :-**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक डॉ.हेडगेवार यांचे मृत्युबद्दल दुखवटा व्यक्त करण्यासाठी उमरावतीत दि. २५ जून १९४० रोजी नगर वाचनालयाचे हॉलमध्ये जाहीर सभा झाली. श्री.बाबासाहेब खापर्डे हे अध्यक्षस्थानी होते. श्री.नानासाहेब बामणगांवकर, डॉ.सोमण रा. भट, माजी एम.एल.ए. श्री.ओगले, श्री.बुऱ्हाडे यांची भाषणे झाली होती. डॉ.हेडगेवार (ज.१८९० मृ. १९४०) राष्ट्रीय स्वयंसेवक संघ या सुप्रसिध्द संघटनेचे जनक व संवर्धक.

नागपूरच्या एका गरीब भिक्षुक ब्राम्हण घराण्यांत त्यांचा जन्म झाला. नागपूर, यवतमाळ, पुणे येथे त्यांचे राष्ट्रीय शाळेत शिक्षण झाले व कलकत्ता येथील नॅशनल मेडीकल कॉलेजमधून त्यांनी एल.एम.ॲन्ड एस.सी. परिक्षा पास केली. पण डॉक्टरीचा व्यवसाय कधीच केला नाही. १९२०-२१ चे असहकाराच्या चळवळीत भाग घेतला. तरी १९२५ साली राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या स्थापनेने त्यांच्या खऱ्या सार्वजनिक जीवनाची सुरुवात झाली. रा.स्व. संघाचे ते सरसंघचालक होते. संघाची व्याप्ती प्रथम महाराष्ट्रात व नंतर सर्व हिंदुस्थानात

पसरली हे सर्वश्रुत आहेच.

९) उमरावतीच्या सत्याग्रह समिती तर्फे राष्ट्राध्यक्ष-मौलाना आझाद यांचे स्वागत:-

कॉग्रेसचे तत्कालीन अध्यक्ष मौलाना अबुल कलाम आझाद हे वर्ध्याहून पुण्याकडे रेल्वेतून जाण्यास निघाले असता, दि. २४ जुलै १९४० रोजी, उमरावतीच्या नगर कॉग्रेस सत्याग्रह समितीतर्फे त्यांचा बडनेरा स्थानकावर पुष्पहार घालून सत्कार करण्यात आला. त्यांचे सोबत बाबू राजेंद्रप्रसाद आणि डॉ.प्रफुलचंद घोष हेही त्याच गाडीत होते. त्यांनाही पुष्पहार घालण्यात आले.

१०) सुभाष दिनाची सभा :-

पुरोगामी गटातर्फे दि. १६ ऑगष्ट १९४० रोजी नगर वाचनालयाचे दिवाणखान्यात सुभाष दिनाची सभा दे.भ.अब्दुल वहाब यांच्या अध्यक्षतेखाली होऊन तीत सुभाषबाबूवर कॉग्रेसने टाकलेली बंदी उठवावी, अशी मागणी करण्यात आली. सद्य:स्थितीवर डॉ.पटवर्धन, डॉ.भोजराज व नानासाहेब बामणगांवकर यांची भाषणे झाली.

११) सौ.सुचेता कृपलाणी व कु. मृदुला साराभाई :-

कॉग्रेस मधील महिला शाखेच्या संघटक सौ.सुचेता कृपलाणी व कु. मृदुलाबेन साराभाई ह्या सौ.प्रमिलाताई ओक यांचेसह दि. ७ ऑक्टोबर १९४० रोजी उमरावतीत आल्या होत्या. त्यांची येथे निरनिराळ्या संभातून भाषणे झाली.

श्रीमती सुचेता कृपलानी (ज.१९०८ मृ.) आचार्य कृपलाणी यांच्या धर्मपत्नी दिल्ली विश्वविद्यालयाच्या एम.ए. कॉग्रेस वर्कींग कमेटीच्या सदस्या घटना समितीच्या सदस्या. १९५१ मध्ये कॉग्रेसचा राजीनामा दिला व प्रजासमाजवादी पक्षात सामील झाल्या होत्या. १९५२ ते १९५७ या काळात त्या लोकसभेच्या सभासद होत्या. १९५८-६० परत कॉग्रेस मध्ये आल्या व कॉग्रेसचे जनरल सेक्रेटरी

पद भूषविले. १९६३-६७ त्या उत्तर प्रदेश राज्याच्या मंत्री व मुख्यमंत्री होत्या. १९६७ नंतर पुन्हा लोकसभेवर त्यांची निवड झाली.

१२) सर मोरोपंत जोशी यांचा ८० वा वाढदिवस समारंभ :-

उमरावतीचे सन्माननीय नागरीक, माजी गृहमंत्री व प्रख्यात वकील सर मोरो विश्नाथ उर्फ अण्णासाहेब जोशी यांचा ८० वा वाढदिवस समारंभ दि. १२ ऑक्टोबर १९४० रोजी कॉटन मार्केट तर्फे भव्य प्रमाणात साजरा करण्यात आला.

त्या निमित्त कॉटन मार्केटचे आवारात खास सुशोभित मंडप उभारण्यात येऊन विजेची रोषणाई करण्यात आली. सायंकाळी झालेल्या ह्या समारंभाला अनेक ठिकाणाहून आलेली पाहुणे मंडळी, सरकारी अधिकारी, प्रतिष्ठित नागरिक व व्यापारी वर्ग मोठ्या संख्येने हजर होता.

श्री.बाबासाहेब खापर्डे यांनी व इतर अनेक वक्त्यांनी अण्णासाहेबांचे कार्याबद्दल व गुणगौरवात्मक भाषणे केली व नंतर कॉटन मार्केट कमेटीतर्फे त्यांचा सत्कार करण्यांत येऊन मानपत्र अर्पण करण्यात आले.

या मानपत्राचे वाचन इंग्रजीतून डॉ.पंजाबराव देशमुख, सदस्य कॉ.मा.कमेटी यांनी व मराठीतून दे.भ. रघुनाथमलजी कोचर, सदस्य कॉ.मा. कमेटी यांनी केले होते. सत्कार समारंभानंतर उपस्थितांना कॉ.मा. कमेटीतर्फे तेथील आरास केलेल्या बगीच्यात अल्पोपहार देण्यात आला.

या समारंभासाठी वऱ्हाडचे कमिश्नर साहेब हे मुद्दाम चिखलदऱ्याहून उमरावतीस आले.

सर मोरोपंत जोशी हे इ.स. १९१० ते १९१३ या काळात कॉटन मार्केट कमेटीचे चेअरमन होते.

दुसरे दिवशी दि. १३ ऑक्टोबर रोजी सायंकाळी ५ वाजता तेथील बेरार व्हिक्टोरिया टेक्नीकल इन्स्टीट्युट'' चे भव्य दिवाणखान्यात सर मोरोपंत जोशी

सत्कार समिती'' च्या वतीने त्यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. त्या प्रसंगी पुण्याचे रॅग्लर डॉ.रघुनाथराव परांजपे हे अध्यक्ष होते.

समारंभासाठी सर अण्णासाहेब यांची नातेवाईक बडी मंडळी, तसे त्यांचे ठिकठिकाणचे चाहते मित्र आणि शहरांतील प्रतिष्ठित स्त्री पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्याच प्रमाणे न्यायाधीश व वकील मंडळी हजर होती. सुमारे २०० संस्थातर्फे अण्णासाहेबांना हार अर्पण करण्यात आले. सर्व देशातून शुभचिंतनपर संदेश आले होते. श्री.शरफुद्दीन वकील यांनी प्रसंगोचित काव्य म्हणून बहार उडवून दिली. विविध वक्त्यांची अण्णासाहेबांचे गुण-गौरवपर भाषणे झालीत. शेवटी अध्यक्षाचे भाषण झाले. याप्रसंगी सत्कार समितीतर्फे श्री.अण्णासाहेब यांना २६,५०१ या सत्कारनिधी अर्पण करण्यात आला व ''हिंदू संस्कृतीच्या उत्थापनाची व पतनाची कारणे'' यांचे संशोधन करणाऱ्यास पारितोषिक देण्यासाठी हा निधी वापरला जाईल असे अण्णासाहेबांनी जाहीर केले होते. दोन तास दरबारी थाटात चाललेल्या समारंभानंतर सर्व पाहुण्यांना मेजवानी देण्यात आली.

१३) <u>दे.भ. अण्णाराव भोपटकरांचे भाषण</u> :-

अ.भा. हिंदू महासभेचे उपाध्यक्ष व महाराष्ट्र प्रांतिक हिंदू सभेचे अध्यक्ष दे.भ. अण्णाराव भोपटकर यांचे दि. १३ ऑक्टोबर १९४० रोजी रात्री उमरावतीत गांधी चौकात प्रचंड जनसमुदायासमोर भाषण झाले. सभेचे अध्यक्षस्थानी तपस्वी बाबासाहेब परांजपे हे होते. हा कार्यक्रम अंबागेट तरुण मंडळातर्फे आयोजित केला होता.

श्री.अण्णाराव भोपटकरांनी उमरावतीतील अनेक संस्थाना भेटी दिल्या व त्यांचा येथे ६० व्या वाढदिवसानिमित्त सत्कारही करण्यात आला होता.

१४) <u>लोकनायक बापुजी अणे यांचा भव्य सत्कार</u> :-

वऱ्हाडचे ''लोकनायक बापुजी अणे यांच्या ६१ व्या वाढदिवसा निमित्त अमरावती जिल्हा अणे सत्कार समितीतर्फे दि. २० ऑक्टोबर १९४० रोजी त्यांचा

भव्य सत्कार कॉटन मार्केटचे आवारात मोठ्या थाटाचे करण्यात आला.

या वाढदिवस समारंभाचे अध्यक्षस्थान मुंबईचे प्रसिध्द पुढारी वीर के.एफ. नरिमन यांनी स्वीकारले होते. या प्रसंगी सुमारे १५ हजार स्त्री पुरुषांचा समुदाय उपस्थित होता व त्यांत सर्व जाती-धर्माच्या आणि विविध पक्षाच्या लोकांनी भाग घेतला होता.

दे.भ.श्री.लक्ष्मण बळवंत उर्फ अण्णासाहेब भोपटकर हे पुण्याचे वकील होते, त्यांनी "भाला", लोकसंग्रह, लोकमान्य, इत्यादि पत्रांचे यशस्वी संपादन केले. पुण्याच्या लॉ कॉलेज चे ते प्रथम व्हाईस प्रिन्सिपॉल, महाराष्ट्र हिंदू सभा महाराष्ट्रीय व्यायाम मंडळ केसरी-मराठा संस्था इत्यादि संस्थांशी अध्यक्ष किंवा विश्वस्त वगैरे नात्याचे त्यांचा संबंध होता.

मुळशी पेटा व मिठाच्या कॉग्रेसच्या आणि भागानगर च्या हिंदू सभेच्या सत्याग्रहात त्यांनी भाग घेतला होता. अ.भा. हिंदू सभेचे हंगामी अध्यक्षही होते. व्यायामास फार महत्व देत आणि त्यांचा प्रचार करीत.

कॉटन मार्केट कमेटीचे आवारात या वाढदिवस समारंभासाठी खास व्यासपीठ उभारण्यात येऊन सर्व परिसर आवार-लता-पल्लवांनी शृंगारण्यात आला होता व वीजेची सुंदर रोषणाई करण्यात आली होती.

या समारंभासाठी विदर्भाच्या बहुतेक भागातून लोक आले होते. शिवाय, बंगालचे प्रसिध्द हिंदू पूढारी सर मन्मयनाथ मुकर्जी, सर मोरोपंत जोशी, धर्मवीर डॉ. मुंजे, तपस्वी बाबासाहेब परांजपे, संत तुकडोजी महाराज, वीर वामनराव जोशी, खामगावचे श्री.पन्नालाल व्यास, नागपूरचे बॅरि. गोविंदराव देशमुख व दाजीशास्त्री चांदेकर, श्री.आगाशे, डॉ.सोमण, डॉ. भोजराज, डॉ.पटवर्धन, सिंघई पन्नालालजी, कॉटन मार्केटचे अध्यक्ष सेठ रामनाथजी बियाणी, श्री.हरिहरराव देशपांडे, दे.भ.नानासाहेब बामणगावकर, प्रभृती मंडळी व्यासपीठावर स्थानापन्न झाली होती.

अणे माधव श्रीहरी :- (ज.१८८०) एक थोर पुढारी व राजकारणी पुरुष लोकमान्य टिळकांचे हे अनुयायी असून त्यांच्या होमरुल लीगचे उपाध्यक्ष होते. १९२१ पासुन म. गांधीच्या नेतृत्वाखाली कॉग्रेसने जी मोठी स्वराज्य विषयक चळवळ केली तीत बापूजी अणे कर्तव्य बुध्दीने अग्रेसर असत. कायदे मंडळात ही ते निवडून आले होते. सत्याग्रहाच्या मोहिमात भाग घेतल्याबद्दल त्यांना तुरुंगवास घडलेला आहे. ब्रिटीश सरकारने बेकायदेशीर ठरविलेल्या कलकत्ता कॉग्रेसचे ते अध्यक्ष होते (१९३३) मध्यवर्ती कार्यकारी मंडळात सरकारने त्यांना घेतले, पण म. गांधीजींच्या प्राणांतिक उपोषणाच्या प्रसंगी सरकारचा निषेध म्हणून यांनी राजीनामा दिला. नंतर हिंदूस्थान सरकारतर्फे हे सिलोनमध्ये वकील होते. नंतर स्वतंत्र भारत सरकार संस्कृतीचा व संस्कृत साहित्याचा फार अभिमान असून यांचे आवरण धार्मिक व पोषाख पूर्ण महाराष्ट्रीय असतो. यांच्या उच्च दर्जाचा अखिल महाराष्ट्राला अभिमान वाटतो.

श्री.बापूजी अणे यांना अनेक संस्थातर्फे पुष्पहार अर्पण करण्यात आलेत, नंतर मानपत्र देण्यात आले. संस्कृत मधून मानपत्र श्री.हिर्लेकरशास्त्री यांनी तर मराठीतून श्री.नानासाहेब बामणगावकर यांनी वाचून दाखविले होते. डॉ.भोजराज यांनी आलेले संदेश वाचून दाखविले. त्यानंतर लोकनायक अणे यांच्या कार्याबद्दल गुणगौरवपर भाषणे झालीत. श्री.बाबासाहेब खापर्डे यांनी प्रथम स्वागताध्यक्ष या नात्याने भाषण केले, संत तुकडोजी महाराज यांनी आशीर्वादात्मक भाषण केले. नंतर अनेकांनी भाषणे करुन लोकनायक बापूजी अणे यांची प्रशंसा केली. या प्रसंगी लोकनायक बापूजी अणे यांना सत्कार समितीतर्फे ४२०० रु. चा सत्कार निधीही अर्पण करण्यात आला. डॉ.पटवर्धन यांनी आभार प्रदर्शन केले हा सोहळा फार भव्य असा झाला होता.

१५) विदर्भ प्रांतिक हिंदू सभेचे अधिवेशन :- दि. १९ व २० ऑक्टोबर १९४० रोजी उमरावतीतील जोग चौकात विदर्भ प्रांतिक हिंदू सभेचे अधिवेशन बंगालचे प्रसिध्द नेते सर मन्मथनाथ मुखर्जी यांचे अध्यक्षतेखाली भरले होते.

श्री.बाबासाहेब खापर्डे हे स्वागताध्यक्ष होते.

अधिवेशनापूर्वी अध्यक्ष तर मन्मथनाथ मुखर्जी यांची गावातून भव्य मिरवणूक काढण्यात आली होती. या अधिवेशनासाठी धर्मवीर डॉ.मुंजे हे उमरावतीस आले होते.

१६) **जिल्ह्यातील कॉग्रेस कार्यकर्ता संमेलन व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सभासदांची परिषद :-**

दि. १४ ऑक्टोबर १९४० रोजी दुपारी १२ वाजता उमरावती जिल्ह्यातील कॉग्रेस कार्यकर्त्याचे संमेलन, मुंबई प्रांताचे माजी मुख्यमंत्री दे.भ. बाळासाहेब खेर यांच्या अध्यक्षतेखाली भरले होते. आणि दुपारी ३ वाजता जिल्ह्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सभासदांची परिषदहि त्यांचेच अध्यक्षतेखाली भरली होती. परिषदेचे उद्घाटन वीर वामनराव दादा यांनी केले होते.

दोन्ही कार्यक्रम जिल्हा कौन्सीलच्या कॅप वरील सभागृहात झाले त्या निमित्त जिल्हा कौन्सीलचा परिसर व सभागृह सुशोभित करण्यात आले होते. रात्री जोग चौकात दे.भ. ब्रिजलालजी बियाणी यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा होऊन, दे.भ. बाळासाहेब खेर यांचे भाषण झाले होते.

दे.भ. बाळ गंगाधर खेर :- (ज.१८८८) सुप्रसिध्द कॉग्रेस कार्यकर्ते व मुंबई इलाख्याचे माजी मुख्यमंत्री यांची एक सॉलिसीटर फर्म होती. कायदे भंगाचे चळवळीत १९३० व १९३२ मध्ये कारावासात भोगला. १९३७ साली कॉग्रेस मंत्री मंडळे आली तेव्हा यांनी मुंबई इलाख्याचे मुख्यमंत्री नेमण्यात आले. आणि हे पद यशस्वीपणे चालवून यांनी राष्ट्रसभेचा लौकिक वाढविला होता. १९४२ चे आंदोलनातही ह्यांना दोन वर्षे कारावास भोगावा लागला. 'अजातशत्रू ' म्हणून त्यांची ख्याती होती.

१७) <u>विदर्भ महिला परिषदेचे दहावे अधिवेशन</u> :-

विदर्भ महिला परिषदेचे १० वे अधिवेशन दिनांक ९ व १० नोव्हेंबर १९४० रोजी उमरावतीच्या राजकमल थिएटरमध्ये सौ.कालींदीबाई घाटे यांच्या अध्यक्षतेखाली थाटाने व उत्साहाने पार पडले. सुमारे ५०० महिला अधिवेशनाला हजर होत्या. राजकमलचे प्रवेशव्दार अधिवेशनासाठी शृंगारण्यात आले होते.

या अधिवेशनात वऱ्हाडची पहिली बी.ए.एल.एल.बी. महिला म्हणून सौ.विमलाताई देशमुख यांचा सत्कार करण्यात आला होता.

अधिवेशनात दोन दिवस झालेल्या चर्चेनंतर युध्दाचा निषेध करणारा ठराव, घटस्फोटाचे बील डॉ.देशमुख पुन्हा आणणार म्हणून आनंद व्यक्त करणारा व एक पत्नित्वाचे बील पुन्हा आणले जावे अशी मागणी करणारा ठराव तसेच संतती नियमनाची सशास्त्र माहिती देणारी केंद्रे उघडावीत अशी मागणी करणारा ठराव मंजूर करण्यात आले.

१८) उमरावतीचा पहिला वैयक्तिक सत्याग्रह :-

दिनांक २१ नोव्हेंबर १९४० पासून वैयक्तिक सत्याग्रहाची घोषणा महात्मा गांधींनी केली होती. त्यानुसार उमरावती शहरांत पहिला वैयक्तिक सत्याग्रह दे.भ. संभाजी विनायक उर्फ नानासाहेब गोखले वकील यांनी २१ नोव्हेंबर रोजी केला. या संभाव्य वैयक्तिक सत्याग्रहासाठी उमरावती नगर कॉंग्रेस व जिल्हा कॉंग्रेस कमेट्यांनी जून महिन्यापासूनच तयारी सुरु केली होती आणि शहरात व जिल्ह्यात प्रचार सभांचा धुम धुडाका केला होता.

या वैयक्तिक सत्याग्रहासाठी गांधीजी कडून परवानगी घेण्यात आली होती व तशी जाहीर घोषणा आगाऊ वृत्तपत्रातून करण्यात येऊन शिवाय या सत्याग्रहाच्या नियमाप्रमाणे तसे पोलीस खात्याला आगाऊ कळविण्यात आले होते.

सत्याग्रहाचे दिवशी प्रतापचौकापासून तो भुसारी गेट (जवाहर गेट) पावेतोच परिसर ध्वज पताकांनी सजविला होता. सकाळी साडे आठ वाजता सत्याग्रह होणार असल्याने, सकाळीच लोकांची तोबा गर्दी या भागात आली होती.

प्रथम झालेल्या वैयक्तिक सत्याग्रहात श्री.नानासाहेब गोखले पहिले सत्याग्रही होते. त्यामुळे त्यांनी ति.दादांना विचारले की, भाषण करण्यापूर्वीच मला पकडतील तेव्हा सत्याग्रहाचे भाषण तर येणारच नाही. मग काय करायचे. तेव्हा दांदानी ताबडतोब दोन तीन श्लोक तयार केले. ते श्लोकाच्या चालीवर (सदा सर्वदा...) होते. त्यामुळे पोलीसांच्या लक्षात आले नाही. शिवाय नानासाहेब गोखले यांच्याजवळ त्या श्लोकाच्या छापील प्रति लोकांमध्ये वाटण्याकरता दिल्या होत्या. त्या त्यांनी वाटल्या.

श्लोक

नसे युध्द हे भारताच्या हिताचे । नसे लेशहि भारताच्या सुखाचे ॥
जलो वा मरो आंग्लसाम्राज्यशाही । आम्हाला तृथा लाभली आपदा ही ॥ १ ॥
जगी जन्म हे . . . युध्दा भयाण । अहिंसा खरा तोडगा रामबाण ॥
नका न्याय देऊ तुम्ही रंगरुट । १ . . . . . ॥ २ ॥

(श्री.विद्याधर गोखले यांनी सांगितलेली ही आठवण आहे.)

ठीक साडे आठ वाजता दे.भ. नानासाहेबांनी युध्दविरोधी भाषणांत प्रताप चौकात सुरुवात केली, तोच डिस्ट्रीक्ट मॅजीस्ट्रेट सी.बंबावाले यांनी त्यांना अटक केली आणि त्याच दिवशी दुपारी फर्स्ट क्लॉस मॅजिस्ट्रेटचे कोर्टात खटला होऊन नानासाहेबांना एक वर्ष सक्त मजुरीची शिक्षा सुनावण्यात आली.

सत्याग्रही नानासाहेबांचे अभिनंदन करण्यासाठी, त्याच दिवशी रात्री जोग चौकात प्रचंड जाहीर सभा झाली. तीत वीर वामनराव दादांचे स्फूर्तिदायक व हृदयद्रावक असे भाषण झाले. संपूर्ण वऱ्हाडात हा पहिला वैयक्तिक सत्याग्रहाचा मान उमरावतीला व श्री.नानासाहेब गोखले यांना मिळाला होता. वैयक्तिक सत्याग्रह मोहीमेचा श्रीगणेशा याप्रमाणे उमरावतीत करण्यात आला होता.

त्यानंतर दे.भ.रघुनाथजी कोचर हे दि. २४ नोव्हेंबरला वैयक्तिक सत्याग्रह करणार होते पण त्यांना तत्पूर्वीच भारत संरक्षण कायद्याखाली अटक करण्यात

आली. नंतर दे.भ.मोहनभाई व श्री.मन्नालाल जैन यांनी उमरावतीत वैयक्तिक सत्याग्रह केला होता.

या वैयक्तिक सत्याग्रहांत उमरावती शहर मागे राहिले नाही. ज्यांना परवानगी मिळाली त्यांनी सत्याग्रह करुन अटक करवून घेतली. काहींना सरकारने सत्याग्रहापूर्वीच अटक केली होती.

या वैयक्तिक सत्याग्रहांत दे.भ. संभाजी विनायक उर्फ नानासाहेब गोखले, दे.भ. रघुनाथमलजी कोचर, दे.भ. मोहनभाई, श्री.मन्नालाल जैन, दे.भ. देविदासपंत महाजन, दे.भ. राजेंद्र मालपाणी, दे.भ.छक्कीलालजी गुप्ता, दे.भ.रामदयालजी गुप्ता, दे.भ. उत्तमराव मोहिते, दे.भ.हिरासिंगजी चव्हाण, दे.भ.राजेंद्र मालपानी, दे.भ.महादेवराव कुबडे, दे.भ.मोतीसा काळे, दे.भ. बाळासाहेब भंडारी, दे.भ.रतनलालजी वर्मा, दे.भ.शंकर पांढरे, दे.भ. सखाराम घाटोड, दे.भ. राघावल्लभजी लड्ढा, दे.भ.किसनलालजी शर्मा (पुरीवाले) व दे.भ. मोतीलालजी सरवैय्या, इत्यादी लहान थोर कार्यकर्त्यांनी भाग घेवून कारावास पत्करला होता.

या शिवाय सत्याग्रह सुरु होण्यापूर्वीच दे.भ.पी.के.देशमुख यांना अटक होवून दंड व शिक्षा झाली होती. आणि मोर्शीचे दौऱ्यावर असतानाच वीर वामनराव दादांनाहि अटक झाली होती. त्याचप्रमाणे प्रचार कार्यात गुंतले असतानाच श्री.रामकृष्ण लाहूडकर व श्री.रघुनाथप्रसादजी खंडेलवाल यांना अटक झाली होती.

या सत्याग्रहात एकूण ५२ सत्याग्रहींना तुरुंगवास झाला. त्यापैकी ३० सत्याग्रही उमरावतीचे होते.

कित्येक सत्याग्रहींना अटक झाली नाही. तेव्हा त्यांनी दिल्लीच्या मार्गाने कूच केले व अटक होई पर्यन्त ते भाषण स्वातंत्र्य व युध्द विरोधी प्रचार करीत असत.

अमरावती जिल्ह्यातील वैयक्तिक सत्याग्रहाचा आढावा :-

ऑगस्ट १९४१ च्या शेवटच्या आठवड्यात जिल्हा कॉग्रेस सत्याग्रह

समिती तर्फे २१ नोव्हेंबर १९४० ते १८ ऑगस्ट १९४१ पावेतोचा वैयक्तिक सत्याग्रहाचा आढावा प्रसिध्द झाला होता. त्यानुसार.

सत्याग्रह सुरु होण्यापुर्वी श्री.पी.के.देशमुख व श्री.पंजाबराव सदात्पुरे यांना दंड व शिक्षा झाली होती.

सत्याग्रह केला त्याचा आकडा एकूण ८४

भारत संरक्षण कायद्याखाली अटक झालेले ८

फक्त दंड झाला असे २४, सत्याग्रह करुन खटला न झालेले १५, कोर्ट उठेपर्यत शिक्षा झालेले १, शिक्षा व दंड झालेले १७, एकदा सत्याग्रह करुन घरी बसलेले ३८,

तुरुगंवास तीन महिने किंवा जास्त असे	५२
दोनदा सत्याग्रह केलेले सत्याग्रही	१८
तीनदा सत्याग्रह केलेले सत्याग्रही	४
चारदा सत्याग्रह केलेले सत्याग्रही	२
एकूण सत्याग्रह केलेले एम.एल.ए... .	४

(यांत श्री.एस.व्ही. गोखलेंचा समावेश आहे.

एकूण ५२ सत्याग्रहींना तुरुंगवास झाला. पैकी दोन सत्याग्रहींना दोन वर्ष सक्त मजुरीची शिक्षा झाली सतरा सत्याग्रहींना सहा महिने सक्त मजूरीची शिक्षा, एका सत्याग्रहीस आठ महिने सक्त मजुरीची शिक्षा, सहा सत्याग्रहींना चार महिने सक्त मजुरीची, एकास तीन महिने सक्त मजुरी, ५२ पैकी चार सत्याग्रहींना ''अ'' वर्ग, तेरा सत्याग्रहीस ''ब'' वर्ग, व पस्तीस सत्याग्रहांस ''क'' वर्ग मिळाला होता.

५२ पैकी ३० सत्याग्रही अमरावती नगरचे, पाच उमरावती तालुका, बारा मोशी तालुका, तीन अचलपूर तालुका आणि चांदूर व दर्यापूर तालुक्याचे प्रत्येकी

एकेक उमरावती जिल्ह्यात एकूण अकरा सत्याग्रहींना दंड झाला होता. दंडाची रक्कम ५७२० रु असून, बहुतेक दंड वसूल झाला होता.

जबरदस्त शिक्षा श्री.शंकर पांढरे व श्री.सखाराम घाटोळ यांना प्रत्येकी दोन वर्ष सक्त मजूरीची झाली होती.

मोठ्या प्रमाणात दंड श्री.गंगाबिसनजी सिकची यांना ७५० रुपये दंड झालेला असून चार महिने सक्त मजुरीची शिक्षा झाली होती.

श्री.आर.एस.कोचर व श्री.उत्तमराव मोहिते, सहा महिन्याच्या कारावासातून सुटून येऊन त्यांनी ताबडतोब दुसऱ्यांना सत्याग्रह केला होता १. (दि.३ डिसेंबर १९४१ रोजी गांधीजी आणि व्हाईसरॉय यांच्यात तडजोड झाल्यानंतर हा सत्याग्रह थांबविण्यात आला होता.) (वैयक्तिक सत्याग्रहीची यादी पुढे दिली आहे.)

एका इंग्रह महिलेचा वैयक्तिक सत्याग्रह :- मिसेस फोडाबेडी या नावाच्या इंग्रज महिलेस महात्माजींनी वैयक्तिक सत्याग्रहासाठी परवानगी दिली होती. त्यांनी लाहोर येथे हा सत्याग्रह केला होता. हिंदुस्थानात सत्याग्रह करणाऱ्या त्या प्रथम इंग्रज महिला होत.

अमरावतीतील दि. २०.१०.४० ते ३.१२.४१ या काळातील

वैयक्तिक सत्याग्रहींची यादी

क्र.	नांव	अटक झाल्याची तारीख	शेरा
१.	दे.भ.पुरुषोत्तम काशीराव उर्फ अण्णासाहेब देशमूख	२०.१०.४०	अटक, शिक्षा दंड
२.	दे.भ.वीर वामनराव दादा		स्थानबध्द

दि.१९ मे १९४१ रोजी दादा मोर्शीचे दौऱ्यावर असताना अटक झाली होती.

क्र.	नांव	अटक झाल्याची तारीख	शेरा
३.	दे.भ.संभाजी विनायक उर्फ	२१.११.४०	
	नानासाहेब गोखले वकील	२६.११.४०	केस
४.	दे.भ.रघुनाथमल सबसुखमल	२४.११.४०	
	कोचर	२९.११.४०	केस
	सत्याग्रहापुर्वी अटक		
५.	दे.भ.मोहनभाई नारायणदास	१६.१२.४०	
	गुजराथी		
६.	दे.भ.मन्नालाल तुलसीराम जैन	२३.१२.४०	
७.	दे.भ.देविदासपंत पासोबा महाजन	१६.४.४१	
८.	दे.भ.राजेंद्र जगन्नाथजी मालपानी	४.८.४१	
९.	दे.भ.छक्कीलाल रामलाल गुप्ता	१७.२.४१	
१०.	दे.भ.रामदयाल अयोध्याप्रसाद गुप्ता	१७.२.४१	
		२४.६.४१	
११.	दे.भ.उत्तमराव पांडुरंग मोहिते	१.०९.४१	
१२.	दे.भ.ठा.हिरासिंग लटपटसिंग चव्हाण	६.१.४१	
१३.	दे.भ.जयकृष्णपंत राघोजी कुऱ्हाडे	२२.१.४१	
१४.	दे.भ.शिवराज कस्तुरचंद सेवक	२५.१.४१	
		१.२.४१	
		११.३.४१	
१५.	दे.भ.महादेवराव नामदेवराव कुबडे	१०.२.४१	
१६.	दे.भ.मोतीसा पासोबा काळे	५.२.४१	
१७.	दे.भ.गंगाबिसन मानेकलाल सिकची	२७.१.४१	
		१८.४.४१	

क्र.	नांव	अटक झाल्याची तारीख	शेरा
१८.	दे.भ.बलदेवप्रसाद कालुराम गुप्ता	१०.५.४१	
१९.	दे.भ.रामेश्वर देवीदीन अवस्थी	९.६.४१	
२०.	दे.भ.मांगीलाल नथमल नांगलीया	३०.६.४१	
२१.	दे.भ.शंकरलाल जमनलाल दुबे	२४.६.४१	
२२.	दे.भ.बालकिसन मूलचंद भंडारी	२३.४.४१	
२३.	दे.भ.रतनलाल जानकीलाल वर्मा	३.९.४१	
२४.	दे.भ.शंकर बिसनसा पांढरे	२८.६.४१	
२५.	दे.भ.राधावल्लभ मोहनलाल लड्ढा	२२.३.४१	
२६.	दे.भ.किसनलाल नारायण शर्मा पुरीवाले	२३.५.४१	
२७.	दे.भ.मोतीलाल बंसीलाल सरवैय्या	२९.५.४१	
२८.	दे.भ.रतनलाल नथमल गांधी	४.६.४१	
२९.	दे.भ.विश्वनाथ बाळाप्पा लिंगायत	७.७.४१	
३०.	दे.भ.अमृतराव शामराव खंगाळे	७.७.४१	
३१.	दे.भ.वासुदेव इंद्रळ कुणबी खरपे	४.७.४१	
३२.	दे.भ.रामचंद्ररामभाऊ बाळाजी	२५.७.४१	
३३.	दे.भ.रामभाऊ उर्फ नेमीचंद	२६.७.४१	
३४.	दे.भ.रतनलाल बापूजी काळे	१३.१.४१	
३५.	दे.भ.रामकृष्ण वासुदेव लाहुडकर	१२.७.४१	
३६.	दे.भ.रघुनाथप्रसाद गोविंद नारायण खंडेलवाल	१.९.४१	
३७.	दे.भ.गणेशराव रामचंद्र देशमुख	१०.१२.४०.	

१. (क्रिमीनल रेकार्ड ऑफ कलेक्टोरेट, अमरावती. श्री.कोचर, ॲडव्होकेट, यांनी दिलेले टिपण.)

१९) म्यु.ए.व्ही.स्कुलचे पहिले मुख्याध्यापक श्री.बापूसाहेब दांडेकर यांचे निधन.

अमरावतीच्या म्युनिसिपल ए.व्ही. स्कूलचे पहिले मुख्याध्यापक गुरुवर्य श्री.बापूसाहेब दांडेकर यांचे दिनांक २४ फेब्रुवारी १९४० रोजी देहावसान झाले.

गुरुवर्य दांडेकर हे अत्यंत मार्मिक व राष्ट्रीय वृत्तीचे गृहस्थ होते. महर्षी अण्णासाहेब पटवर्धन यांच्या निकट सानिध्यात त्यांची काही वर्ष गेली होती. आंळदीचे स्वामी नृसिंह सरस्वती यांच्या मठात उत्सवाला जाण्याचा श्री.दांडेकर यांचा परिपाठ होता.

कै.दादासाहेब खापर्डे यांच्या प्रेरणेने व मार्गदर्शनाखाली अमरावती येथे १९०५-०७ या काळात शिवाजी हायस्कूल म्हणून जी राष्ट्रीय शाळा सुरु झाली होती. त्या शाळेत वीर वामनराव दादा जोशी यांचे सोबतच श्री.बापुसाहेब दांडेकर यांनीही शिक्षकाचे काम केले होते. शिक्षणा बरोबरच मुलांच्या अंत:करणात स्वदेश प्रेम व हिंदू धर्माभिमान कसा वाढेल याकडे ते विशेष लक्ष देत असत. त्यांचा स्वभाव अतिशय निर्भीड होता.

दादासाहेब दांडेकर :- महादेव अनंत उर्फ दादा दांडेकर, मूळ गाव कोकणातील दाभोळजवळील गुडघे गाव. घरची अत्यंत गरीबी, दादा ४ महिन्याचे असताना आईवडील देशावर यावयास निघतात. अरण्यात मुलाला ठेऊन आत्महत्या करावयास जातात. महाराज येतात, मुलास आईवडिलाकडे नेऊन त्याचा सांभाळ करावयास सांगतात. आर्शीवाद देतात हा आमचा मुलगा, आम्हास मौजीनंतर परत करा'' असे सांगतात, मौजीनंतर ४ महिन्याने महाराज येऊन मुलास (दादास) घेऊन जातात. पुढील १२ वर्षे महाराजांबरोबर दादांचे अनेक गावी परिभ्रमण, महाराजांच्या आज्ञेने गृहस्थाश्रमाचा स्वीकार, नंतर वऱ्हाडात निरनिराळ्या गावी शिक्षण खात्यात मास्तर म्हणून नोकरी. परतवाड्यात बराच काळ वास्तव्य. अण्णासाहेब पटवर्धन व यांचा गुरुबंधू म्हणून घनिष्ठ संबंध.

महाराजांनी दादांना पुढील वस्तू दिल्या १. स्वत:ची एक लंगोटी २. चांदीची सीलची त्यांच्या सहीची मुदी. ३. त्यांचे हाताने लिहिलेला मंत्र व रु. ५ चांदीचे दोन कडे, आजही या वस्तू दादांच्या अमरावती येथे नातवाकडे असून त्या पूजेत ठेवल्या आहेत. दादांचा आळंदी येथे मृत्यू आला.

२०) बेरार रीजन'' ची आर.टी.ओ. अमरावतीत :-

१९३९ च्या मोटर वाहन कायद्यान्वये अमरावती, आकोला, यवतमाळ, बुलढाणा, खंडवा, बैतुल, हुशंगाबाद (नरसिंगपूर सब डिव्हीजन वगळून) व वर्धा या जिल्ह्यांसाठी'' रिजनल ट्रान्सपोर्ट ॲथोरिटी'' (आर.टी.ओ) ''बेरार रीजन'' म्हणून स्थापन करण्यात आली होती. या बरोबर रीजन ची मुख्य कचेरी मार्च १९४० मध्ये अमरावती येथे सुरु करण्यात आली होती.

२१) विदर्भ युवक परिषद :-

विदर्भ युवक समितीचे विद्यमाने, विदर्भ युवक संम्मेलन व परिषद दिनांक ३,४ व ५ फ्रेबुवारी १९४० रोजी अमरावतीच्या प्रभात बोलपट गृह आणि ब्रम्ह विद्या मंदीर येथे मुंबईचे वीर नरीमन यांच्या अध्यक्षतेखाली भरविण्यात आली होती.

ता.४ रोजी सकाळी ९ वाजता प्रभात बोलपट गृहात वीर नरीमन यांच्या अध्यक्षतेखाली परिषदेला सुरुवात झाली होती. स्वागत गीता नंतर परिषदेचे तरुण उत्साही चिटणीस श्री.पी.जी.देशमुख यांनी युवक समितीच्या कार्याचा संक्षिप्त इतिहास अहवालाच्या रुपाने सादर केला. त्यानंतर युवक समितीचे कार्याध्यक्ष श्री.के.जी.जोध वकील यांचे भाषण झाले. युवक समितीच्या स्थापने पासूनची माहिती त्यांनी आपल्या भाषणातून सांगीतली. नंतर अध्यक्ष वीर के एफ नरीमन यांचे अध्यक्षीय भाषण झाले होते.

नरीमन खुर्शिद एफ :- (जन्म १८८५) मुंबई हायकोर्टाचे नांमाकित कायदे पंडीत धाडसी वादविवाद पटू व सार्वजनिक कार्यकर्ते, मुंबई कार्पोरेशन मुंबई लेजिस्लेटिव्ह असेम्बली व कॉग्रेस अशा मोक्याच्या जागी त्यांनी केलेल्या धडाडीच्या कार्यामुळे

मुंबई प्रांतातील प्रसिध्द व्यक्तींत ते मोडतात. १९३० च्या कायदे भंगाचे चळवळीत ते होते. १९३७ मध्ये अधिकारावरुन त्यांना काढण्यात आले. बैतुल येथे कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून रहायचे असल्याने ते आपले भाषण आटोपून निघून गेले होते. आणि परिषदेचे खुले अधिवेशन दुपारी १ वा. श्री.के.जी.जोध यांच्या अध्यक्षतेखाली भरलेले होते.

या परिषदेत ज्ञात-अज्ञात हुतात्म्यांना प्रथम ठरावाने श्रध्दांजली अर्पण करुन खालील ठराव मंजूर केले होते.

वऱ्हाडच्या स्वंयनिर्णयाचा ठराव श्री.के.डी.देशपांडे यांनी मांडला होता. स्वयंनिर्णयाचे हक्का नुसार वऱ्हाड प्रांत हा निजामा पासून अलग रहावा. या प्रांताला ब्रिटीश हिंदुस्थानच्या प्रजाजनाप्रमाणे हक्क असावे, अशा आशयाच वऱ्हाडातील जनतेच्या मागणीला या ठरावाने पाठिंबा व्यक्त केला होता.

दुसऱ्या ठरावाने स्वातंत्र्य दिनाचे कार्यक्रमात अल्पसंख्यांक जातीच्या तरुणांनी भाग घेतल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करण्यात आले होते.

त्यानंतरचे ठरावान्वये, पंजाब व बंगाल सरकारांनी नागरिक स्वातंत्र्यांची जी मुस्कटदाबी चालविली आहे त्याचा निषेध आम्ही लोकशाही साठी झगडतो असे म्हणणाऱ्या इंग्लंड ने हिंदुस्थानला संपूर्ण स्वातंत्र्य बहाल करावे. ही मागणी पूर्ण न झाल्यास कॉंग्रेसने जर लढा पुकारला तर विदर्भ युवक त्यात सहभागी होतील, वंदेमातरम् सत्याग्रहात भाग घेणाऱ्या हैद्राबादच्या विद्यार्थ्याचे अभिनंदन आणि त्यांना विद्यालयात घेतल्याबद्दल नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरुंचे अभिनंदन, विद्यालयांतून लष्करी शिक्षण देण्याचे श्री.केदार यांचे योजनेस पाठिंबा इत्यादी ठराव मंजूर होऊन विदर्भ युवकाचे हे अधिवेशन अत्यंत उत्साहात यशस्वीरीत्या समाप्त झाले.

२२) अमरावतीचे म्यु.ए.व्ही.स्कूल बंद करण्याचे नगरपालिकेचे निर्णयावर नागरिकांची प्रचंड सभा :- अमरावती नगर पालिकेने दिनांक १ एप्रिल १९४०

पासून म्यु.ए.व्ही. स्कूल बंद करण्याचा निर्णय घेतला होता व त्यामुळे नागरिक पालक वर्गात त्याची अत्यंत तीव्र प्रतिक्रिया होऊन प्रचंड असंतोष निर्माण झाला होता. हा असंतोष व्यक्त करण्यासाठी शहरातील सर्व विचारांच्या विविध पक्षांच्या व विविध वर्गातील एकूण ४७ लोकांच्या सह्यांनिशी दिनांक २७ जानेवारी १९४० रोजी, नेहरु मैदानावर ए.व्ही.स्कूल समोर जाहीर सभा आंमत्रित केली होती. सभेला सात-आठशे नागरिक पालक उपस्थित होते.

या सभेचे अध्यक्ष म्हणून ''उदय'' हे संपादक श्री.नानासाहेब बामणगांवकर त्यांची निवड होऊन त्यांचे प्रास्ताविक भाषण झाले. त्यानंतर रावसाहेब डॉ.भागवत यांनी म्यु.ए.व्ही. स्कूल सुरु राहवे , बंद होऊ नये ''असा ठराव सभेसमोर मांडला.'' खोटे बजेट, काटकसरीच्या व खोट्या उत्पन्नाच्या वल्गना, कर वसुलीचा थंड मामला, यामुळे ए.व्ही. स्कूलवर गदा येत आहे. असे त्यांनी ठराव मांडताना विवेचन केले होते.

या ठरावात श्री.ओगले यांनी अनुमोदन देताना ''हरिजनांना ह्या ए.व्ही.स्कूल चा फायदा मिळत असे. असे सांगितले व त्यानंतर श्री.बाळासाहेब मराठे यांचे अत्यंत कळकळीचे असे भाषण झाले'' म्यु.ए.व्ही.स्कूल कसे व कां सुरु राहील ह्या संबंधी सद्याचे जे म्यु. सदस्य हजर आहेत ते स्पष्टीकरण करतील असे सांगितले.

नंतर अध्यक्षाचे विनंतीवरुन उपस्थित म्यु. सदस्य श्री.रघुनाथमलजी कोचर यांनी स्पष्टीकरण केले की, ''काटकसरी करीता ही गोष्ट करावी लागली तरीही म्यु.ए.व्ही. स्कूल बंद होणार नाही. मिळणाऱ्या सरकारी अनुदानासह आणि हरिजन विद्यार्थ्यांची फी ची योजना करुन हे ए.व्ही.स्कूल म्युनिसिपालिटी पूर्णपणे मान्यता देवूनच चालू ठेवील, अशी योजना आखण्यात आल्याचे सांगितले व नंतर अध्यक्षांनी ठराव मतास टाकला. तो सर्वानुमते टाळ्यांच्या गजरात पास झाला.

दुसरा ठराव ए.व्ही.स्कूल बंद झाल्यास कायम शिक्षकांची जबाबदारी म्यु.

ने सांभाळली पाहिजे. व त्याची तरतुद केली पाहिजे. श्री.वाय.एन.खरे वकील यांनी हा ठराव मांडला त्यास भाई देशपांडे यांनी पाठिंबा दिला.

तिसरा ठराव अध्यक्षांनीच मांडला, त्यात ''म्यु. ने स्कूल बंद केले तर, त्यात त्याऐवजी मोरोपंताच्या अध्यक्षतेखाली स्थापन झालेल्या कमेटीने ए.व्ही.स्कूलची व्यवस्था हातात घ्यावी अशी विनंती केली होती.

शेवटी श्री.लक्ष्मणराव देशपांडे व श्री.खारपाटे यांनी भाषणे केली आणि नागरिकांची ही सभा अत्यंत उत्साहात संपली.

पुढे २१ मार्च १९४० रोजी भरलेल्या नगर पालिकेचे सभेत म्यु. स्कूल काही अटीवर ''बेरार मॉडर्न एज्युकेशन सोसायटीस व उर्दू ए.व्ही.स्कूल मुसलमानांच्या एकाद्या संस्थेकडे सर्वाधिकार देऊन सोपविण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच या संस्थांना रु. ३४००/- ग्रँट देण्याची तरतूद ४०-४१ च्या अंदाजपत्रकात करण्याचे ठरविण्यात आले.

२३) **स्वास्तिक नाट्य मंडळ** :- अमरावती शहरांतील काही हौशी कलावंतांनी या संस्थेची स्थापना १९४० साली कै.रावसाहेब ठाकूर मोझरीकर व श्री.किशोर दिघेकर यांच्या नेतृत्वाखाली केली होती. १९४० व त्यापूर्वीचे काळांत नाट्यकलेचे वेड असलेले आणि त्या कलेची आराधना करु इच्छिणारे तरुण या शहरांत होते. अशा तरुणांनीच ही संस्था संघटित केली आणि लगेच औधंकर कृत ''बेबंदशाही'' हे ऐतिहासिक नाटक बसवायला घेतले होते. या नाटकाच्या तालमी चार महिने करुन दि. २० एप्रिल १९४१ रोजी हे ऐतिहासिक नाटक या मंडळाने रंगभूमीवर आणले.

या नाटकाचा पहिला प्रयोग अमरावतीच्या इंद्रभुवन थिएटर मध्ये करण्यात आला नवीन पोशाख आणि भव्य नैत्रदीपक सजावट पाहून एक अप्रतिम व व्यावसायिक नाटक कंपनीच्या तोला मोलाचा हा प्रयोग अमरावतीत नाट्य हौशी तरुणांनी सादर केला, असे उद्‌गार त्याकाळी अनेक रसिकांनी काढले होते. तसेच

या नाटकातील मुख्य भूमिकेत काम करणारे श्री.किशोर दिघेकर ह्यांनी जातीवंत नट म्हणून सर्वदूर ख्याती प्राप्त केली व आजही ते त्याच प्रसिध्दी झोतात आहेत. शिवाय पत्रकारितेचे क्षेत्रातही त्यांनी पदार्पण केलेले आहे. राज्य शासनाने ''दलित मित्र म्हणून त्यांचा गौरव केला आहे.

मंडळातर्फे सादर केलेल्या वरील पहिल्या नाट्य प्रयोगास खालील कलावंतानी भाग घेतला होता.

किशोर दिघेकर (संभाजी) , बापुराव राऊत (गणोजी शिर्के), जन.जैस्वाल (कलुजा कब्बी),उत्तमराव दिघेकर (सूर्याजी पिसाळ), रावसाहेब ठाकूर (खंडो बल्लाळ), महादेव पटवर्धन (येसूबाई), विनायकराव मोघे (औरंगजेब), रामभाऊ देवळे (ताराबाई), जयंतीलाल पारेख (तुळशी), आदी छत्तीस कलावंत होते.

''बेबंदशाही'' या नाटकाकरीता झालेला दोन ते अडीच हजार रुपये खर्च एकट्या रावसाहेब ठाकूर यांनीच केला होता. नाटकाचे दिग्दर्शन माटेबुवा याच्या नाट्यकला प्रवर्तक संगीत मंडळीतील प्रसिध्द नट श्री.विनायकराव मोघे यांनी केले होते. हे स्वस्तिक नाट्य मंडळ आजही कायम असून श्री.किशोर उर्फ नानासाहेब दिघेकर हेच या मंडळाची धुरा वाहात आहेत.

२४) वऱ्हाड मध्यप्रांत युवक परिषद :-

वऱ्हाड मध्य प्रांत युवक परिषदेचे तिसरे अधिवेशन रविवार दि. ८ डिसेंबर १९४० रोजी दुपारी प्रभात बोलपट गृहात भाई मानवेन्द्रनाथ रॉय यांच्या अध्यक्षतेखाली भरले होते. परिषदेचे उद्घाटन मध्यप्रांत वऱ्हाडचे माजी मुख्यमंत्री डॉ.ना.भा.खरे यांनी केले तर श्री.के.जी.जोध वकील ह्यांनी स्वागतपर भाषण केले होते.

या कार्यक्रमला भाई मानवेन्द्रनाथ रॉय यांच्या पत्नी सौ.एलन रॉय व मुंबई चे भाई कुळकर्णी हे उपस्थित होते.

या उद्घाटन कार्यक्रमाला प्रचंड गर्दी झाली होती. शेवटी

अध्यक्षपदावरुन बोलताना भाई मानवेन्द्र रॉय यांनी ''आजची कॉंग्रेस म्हणजे गांधी संघ होय असे सांगितले होते. ब्रिटेन आज फॅसिझम विरुध्द लढत आहे. कॉंग्रेसने फॅसिझमला विरोध दर्शविला आहे म्हणून कॉंग्रेसने फॅसिस्ट विरुध्द युध्दात भाग घेणे हिंदुस्थानच्या हिताचे दृष्टीने कसे श्रेयस्कर आहे हे सांगून हल्लीच्या आणिबाणीची परिस्थिती ओळखून स्वतंत्र विचार करण्यास सज्ज रहा असा युवकांना सल्ला दिला होता.

भाई मानवेन्द्रनाथ रॉय यांच्या उपस्थितीमुळेच ही युवक परिषद अत्यंत यशस्वी झाली होती.

नंतर दुसरे दिवशी दि. ९ डिसेंबरला रात्री भाई मानवेन्द्रनाथ रॉय यांचे जोग चौकातील प्रचंड जाहीर सभेत भाषण झाले होते. सभेत गोंधळ माजविण्याचे दुष्ट हेतून एक मेलेला साप जमावात फेकण्यात आला होता व म.गांधीचा जयजयकार करुन काही लोकांनी ही सभा उधळण्याचाही प्रयत्न केला होता.

या प्रचंड सभेसमोर बोलताना भाई रॉय म्हणाले होते की, ''हिंदुस्थानला फॅसिझमच्या संकटाकडे काना डोळा करता येणार नाही. म्हणून फॅसिझमचा पराभव करण्याकरीता व आपल्या देशाच्या भवितव्याचे संरक्षण करण्याकरीता हिंदुस्थानने या युध्दात सामील झाले पाहिजे. हिंदुस्थानच्या सरहद्दी नजीक युध्दाचे संकट दिवसेंदिवस येऊ पहात आहे. हेही लक्षात ठेवले पाहिजे.

कॉंग्रेसने आपल्या हाताने मुलकी अधिकाऱ्यांच्या हाती राज्य सूत्रे दिलीत व आता त्यांच्याच विरुध्द तक्रारी करुन तुम्ही सत्याग्रहाच्या स्वरुपात तुरुंग भरती करीत आहात, हे राजकारण की पोरखेळा हेच मला कळत नाही.

युवकांना उपदेश करतांना भाई रॉय म्हणाले, ''युवकांनी परिस्थितीचे गांभीर्य ओळखून फॅसिझमच्या संकटापासून आपल्या मातृभूमीचे व जगातील स्वातंत्र्यांचे संरक्षण करण्यास सज्ज झाले पाहिजे.

भाई मानवेन्द्रनाथ रॉय :- यांचे मूळ नांव नरेंद्र भट्टाचार्य, श्रेष्ठ साम्यवादी

आणि स्वतंत्र विचाराचे क्रांतिकारक म्हणून यांची ख्याती आहे. शिक्षण धड मॅट्रीक पर्यतही झालेले नव्हते. कोवळ्या वयातच हे क्रांतिकारकांच्या गटात सामील झाले होते. त्यामुळे पोलिसांचा ससेमिरा यांच्या मागे लागला म्हणून हे त्यांना चुकविण्यासाठी जावा, सुमात्रा बेटात गेलेत व तेथून एका अमेरिकन बोटीतील कोळशाच्या कोठारात लपून अमेरिकेत पोहोचले. आणि तेथे हे मार्क्सवादी बनले व मेक्सिकोतील क्रांतीत सामील होऊन आघाडीवर चमकले होते. येथेच त्यांना आंतरराष्ट्रीय कीर्ती मिळाली. कॉम. लेनिन यांनी ''थर्ड इंटरनॅशनल'' या संघटनेची स्थापना केली. तेव्हा त्यांत त्यांनी रॉय यांना ओढले. १९२७ मध्ये चीन मध्ये क्रांती झाली. त्यावेळी रॉय यांना तेथे पाठविण्यात आले होते. पुढे जर्मनीत व तेथून हिंदुस्थानात आले पण येथे डी. महमुद या नावाने वावरत असत. पुढे खटला होऊन त्यांना शिक्षा झाली. आणि कायदेशीर रीतीने देशात उघड वावरण्याची त्यानी-संधी प्राप्त झाली. त्याच वर्षी ते फैजपूर येथे भरलेल्या कॉग्रेसला उपस्थित राहिले होते. तेथेच रॉयवादी विचारांचा एक गट अस्तित्वात आला व त्यानंतर १९३९ साली लिग ऑफ रॅडिकल कॉग्रेसमॅन या नावाची त्यांनी काँग्रेस अंतर्गत एक गट स्थापन केला आणि त्रिपुराच्या काँग्रेस अधिवेशनातही भाग घेतला होता. आणि मार्च १९४० साली त्यांनी कांग्रेस अध्यक्षपदाची निवडणूक लढविली होती.

परंतु त्याच सुमारास (१९३९) दुसऱ्या जागतिक महायुध्दाला सुरुवात झाली आणि या बाबतीतील धोरणासंबंधी त्यांचे या काँग्रेसची मतभेद होऊन ते काँग्रेस मधून बाहेर पडले. व डेहराडून या ठिकाणी त्यांनी ''रॅडिकल डेमॉक्रटिक पार्टी'' ची स्थापना केली. संघटना चातुर्य त्यांचेत होते. विचारात नवीनपणा हे त्यांचे वैशिष्टय, त्यांचे लेखनही विविध प्रकारचे व विपुल आहे.

१९४७ साली देशाला स्वातंत्र्य मिळाले नंतर त्यांनी आपली रॅडिकल डेमॉक्रटिक पार्टी बरखास्त करुन ''नवमानवता वादी'' या नावाचा पक्ष स्थापन केला होता.

२५) खळबळ उडविणारा "भगवा झेंडा" :-

एप्रिल १९४० च्या पहिल्या आठवड्यांत उमरावतीला राजकमल थिएटरमध्ये सुरु झालेल्या सरस्वती सिनेटोनच्या "भगवा झेंडा" अर्थात संत रामदास या बोलपटाने उमरावतीत बरीच खळबळ उडवून दिली होती.

ज्या दिवशी हा बोलपट उमरावतीस सुरु झाला त्याच दिवशी मधल्या विश्रांती नंतर श्री.उत्तमराव मोहिते यांनी सिनेमाच्या पडद्यावर झडप घालून पडद्याचा कांही भाग फाडला. त्यामुळे थिएटरमध्ये गडबड उडाली. पण पोलीसांनी श्री.मोहिते व एका सोबत्यास ताबडतोब अटक केली. पुढे मोहिते व यांना त्याबद्दल झालेल्या खटल्यात पंचवीस रुपये दंड ठोठावण्यात आला होता.

श्री.माधवराव रोंघे यांनी "भगवा झेंडा" हा चित्रपट अमरावतीत दाखविण्यास मनाई करावी अशी आशयाना जो अर्ज येथील जिल्हा न्यायालयात केला होता तो मार्चच्या पहिल्या आठवड्यात फेटाळण्यात आला होता.

इ.स. १९४१

१) टाले आत्महत्या प्रकरण.

२) सुभाष दिन व हरताळ.

३) नगर संरक्षक दलाचा नाट्यप्रयोग.

४) सव्वा बारा आण्यात विवाह.

५) वीर वामनराव दादांचा हीरक महोत्सव.

६) मध्य वऱ्हाड पुरोगामी परिषद.

७) श्रीकृष्ण थिऑ. लॉजचे डॉ. जोशी सभागृह.

८) अमरावतीत रीक्षा आल्या.

९) निझामाचा वाढदिवस.

१०) दे.भ.आबासाहेब ओझरकरांचे निधन.

११) अमरावतीत भयंकर जातीय दंगल.

१२) श्री.कामथ यांचे भाषण.

१३) लालखडी पाणी योजनेचा शुभारंभ.

१४) स्वातंत्र्यदिन.

१५) गोपालकृष्ण व योगेश्वर मंदिरांची स्थापना.

१६) श्री.शिवजयंती उत्सव.

१७) श्री.बाबासाहेब देसाई यांचे भाषण.

१८) सौ.सरोजिनी नायडू यांचे भाषण.

१९) इ.१९४१ ची म.प्र. असेंबलीची पोटनिवडणूक
वीर वामनराव जोशी विजयी.

२०) बॅरि. शरदचंद्र बोस यांच्या अटकेची निषेध सभा.

इसवी सन १९४१

१) टाले आत्महत्या प्रकरण

अमरावतीच्या विदर्भ महाविद्यालयातील (त्यावेळी किंग एडवर्ड कॉलेज) एक विद्यार्थी श्री.दिगबंर टाले याने ७ फेब्रुवारी १९४१ रोजी अफू खाऊन आत्महत्या केली. ही आत्महत्येची बातमी दुसरे दिवशी शहरात पसरताच विद्यार्थ्यात भयंकर खळबळ निर्माण होऊन, किंग एडवर्ड कॉलेजचे इंग्रज प्रिन्सीपाल श्री.टॉस्टवीन यांनी ह्या विद्यार्थ्यांस कॉपी करण्याचे आरोपावरुन बडतर्फे केल्यामुळेच त्याला आपली जीवन यात्रा ऐन तारूण्यात संपवावी लागली, ही भूमिका घेऊन व ''टास्टवीन हटाव'' अशी घोषणा देऊन अमरावतीच्या विद्यार्थ्यांचे आंदोलन संघटित होवू लागले. कम्युनिस्ट पक्षाच्या स्थानिक शाखेने या संधीचा फायदा घेतला व या विद्यार्थी चळवळीचे नेतृत्व स्वीकारले, त्यामुळे कम्युनिस्ट पक्षाकडे अनेक तरुण विद्यार्थी आकर्षित होऊन, काहींनी पक्षाचे सभासदत्व स्वीकारले होते. पुढे टाले प्रकरण सर्व प्रांतातील कॉलेज विद्यार्थ्यांना चळवळीचे व संघटित होण्याचे साधन बनले होते.

विद्यार्थ्यांचा संताप श्री.टॉस्टवीन यांचेवर होता. त्यामुळे नंतर श्री.टॉस्टवीन यांची बदली, प्रांताचे शिक्षणाधिकारी या जागेवर झाली. आणि त्या नंतर कांही काळाने श्री.टॉस्टवीन हे शिक्षणाधिकारी या नात्याने अमरावतीच्या शाळा तपासण्यासाठी आले असता विद्यार्थ्यांनी घेरुन त्यांचेवर शेणामातीचा मारा केला होता. आश्चर्य असे की, एवढे झाल्यानंतरही श्री.टॉस्टवीन यांनी विद्यार्थ्यांच्या कृत्याचा प्रतिकार केला नव्हता. अथवा त्याची तक्रार पोलिस कडेही नोंदविली नव्हती. परंतु गावातील अनेक लोकांनी याबद्दल विद्यार्थ्यांना दोष दिला. तेव्हा विद्यार्थ्यांच्या पुढाऱ्यांनी सारवा सारव करणारे खुलासे प्रसिध्द केले होते.

या टाले प्रकरणांमुळे कॉलेज बंद पडले होते. शाळा शाळातून लोण पोचले व जागृत विद्यार्थी वर्गात चैतन्य निर्माण झाले. सरकारी हायस्कूल (हल्लीचे

ॲकेडेमिक) मध्ये शिकत असलेले श्री.इंगळे यांनी शाळेच्या इमारतीवर तिरंगी ध्वज लावला होता. या गुन्ह्याबद्दल त्यांची शाळेतून हकालपट्टी झाली होती. शाळा शाळेतून विद्यार्थ्यांच्या सभा झाल्या. श्री.नाना मुळे, श्री.वासुदेव देशपांडे, श्री.विजय पटवर्धन, श्री.राजाभाऊ सबनीस, श्री.प्रभु खरे, श्री.आठवले इत्यादी प्रमुख विद्यार्थी कार्यकर्त्यांना एक वर्षाकरीता शाळेतून निलंबित करण्यात आले होते. हे सर्व कार्यकर्ते व कु. वत्सला केकरे ही विद्यार्थिनी नंतर कम्युनिस्ट पार्टीत सामील झाली होती.

२) सुभाष दिना निमित्त अमरावतीत हरताळ :-

उमरावतीच्या पुरोगामी गटाने दिलेल्या आदेशानुसार दि.२३ फेब्रुवारी १९४१ रोजी सुभाष दिनानिमित्त शहरात कडकडीत हरताळ पाळण्यात आला होता.

सांयकाळी बाबू सुभाषचंद्र बोस यांच्या फोटोची मिरवणूक काढण्यात आली व जाहीर सभा घेण्यात आली होती..

दि. २६ डिसेंबर १९४० रोजी देशगौरव बाबू सुभाषचंद्र बोस हे कलकत्त्यातील त्यांच्या घरात उपोषणास बसले असतानाच एकाएकी अदृष्य झाले होते. "संन्यासीच हिंदुस्थानचा उध्दार करील", असे ते आपल्या आईजवळ बोलत असत.

दि. १५ फेब्रुवारी १९४१ रोजी सुभाषबाबू फरार झाल्याबद्दलच्या घोषणेचा जाहीरनामा व सुभाष बाबूंची मालमत्ता जप्त केल्याबद्दलचा हुकूम कलकत्याच्या चीफ प्रेसिडेन्सी मॅजिस्ट्रेटने त्यांच्या निवास स्थानावर लावला आणि सुभाष बाबूंचे पुतणे श्री.अरविंद बोस यांना तपासणीसाठी पोलिस ठाण्यात नेण्यात आले होते.

अशा या पार्श्वभूमीवर आणि बाबू सुभाष चंद्रांच्या अदृश्यतेचे कुतुहल सर्वत्र असतानाच अमरावतीत दि. २३ ला हरताळाचा आदेश येथील पुरोगामी गटाने दिला. त्यामुळे सर्व शहरभर हा हरताळ कडकडीतपणे पाळण्यात आला होता. २.

---

१. अमरावती जिल्हा कम्यु. पक्षाच्या चळवळीचे सिंहावलोकन, गिरगांवकर पा.६.

२. उदय, दि. ७ फेब्रुवारी १९४१.

नेताजी सुभाषचंद्र बोस यांनी १९४० साली ''फॉरवर्ड ब्लॉकची स्थापना केल्यानंतर त्यांना इंग्रज सरकारने कारावासात डांबले होते. कारावासात असतानाच ते सेंन्ट्रल असेंब्लीसाठी निवडले गेले होते. तुरुंगात त्यांची प्रकृती बिघडली, म्हणून सरकारने त्यांना मुक्त केले पण लगेच त्यांना त्यांच्या कलकत्ता येथील राहात्या घरी स्थानबध्द करुन त्यांच्या हालचालीवर प्रतिबंध लावला होता. या काळात दुसरे जागतिक महायुध्द सुरु होते. या अपूर्व संधीचा फायदा घेण्याचे त्यांनी ठरवून कलकत्याच्या आपल्या राहात्या घरातून (स्थानबध्द असतानाच) ते दि. २६ जानेवारी १९४१ रोजी अदृश्य झाल्याचा पुकारा देशभर झाला. वास्तविक दि.१८ जानेवारी १९४१ रोजीच ते बहिऱ्यामुक्या असणाऱ्या झियाउद्दीन पठाणाच्या वेषाने निघाले व पेशावर मार्गे काबूल येथे पोचले होते. तेथून ते बर्लिनला व नंतर सबमरीन बोटीतून जापानला गेले व तेथे ते आझाद हिंद सेनेत सामील झाले व नेतृत्व स्वीकारले.

सिव्हील गार्डचे मदती करिता ''नाट्यप्रयोग''

अमरावतीचा पहिला संमिश्र प्रयोग :-

अमरावती नगर संरक्षक दलाचे मदतीकरता शहरातील काही सुशिक्षित स्त्री पुरुषांनी, अत्रे कृत संगीत ''घराबाहेर'' या नाटकाचा प्रयोग दि. ११ जानेवारी ४१ रोजी प्रभात बोलपट गृहात सादर केला होता. या प्रयोगाला वऱ्हाडचे कमिश्नर हे जातीने उपस्थित होते.

या प्रयोगात सौ.शैलजाबाई गोडबोले व सौ.ताराबाई बापट ह्या महिलांनी व सर्वश्री नाथ गोडबोले, जी.डी.पी. (जगप्रवासी), जी.एन.खरे, वकील,

व्हि.डी.गिजरे वकील, राजाभाऊ दामले वकील, राजाभाऊ सहस्त्रबुध्दे, बोबडे टी.टी.सी. व कु. अरुण यांनी भाग घेतला होता.

या संमिश्र नाट्य प्रयोगात भाग घेतलेल्या हौशी कलावंताचा सत्कार दि. १५ जानेवारी रोजी श्री.चौबळ यांचे घरी, न्यायाधीश भैय्यासाहेब सहस्त्रबुध्दे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आला होता.

अमरावती शहरातील संभवत: हा पहिला व संमिश्र प्रयोग असावा.

४) सव्वा बारा आण्यात विवाह :-

लग्न समारंभा निमित्त हजारो रुपये खर्च करण्याची प्रथा आपल्याकडे आहे. अशा प्रथेविरुध्द जाऊन केवळ सव्वा बारा आणे खर्चात अमरावतीचे श्री.बानुवाकोडे मास्तर यांनी आपला पुत्र आनंद याचा विवाह दि. १६ फेब्रुवारी १९४१ रोजी गढी मारुती येथे साजरा केला होता. वरवधू पक्षाकडील समंजसपणामुळे हे घडू शकले व हा विवाह गावात कौतुकाचा विषय झाला होता.

५) दे.भ.वीर वामनराव जोशी यांचा हीरक महोत्सव.
अमरावतीत झालेला भव्य सोहळा :-

वऱ्हाड प्रांतिक काँग्रेस कमेटीचे अध्यक्ष दे.भ.वीर वामनराव जोशी यांच्या वयाला साठ वर्षे पूर्ण झाल्याबद्दल त्यांचा भव्य हीरक महोत्सव उमरावती येथे वऱ्हाड प्रांतिक काँग्रेस कमेटीच्या वतीने दि. १८ मार्च १९४१ रोजी साजरा करण्यात आला. या समारंभासाठी बाहेर-गावचे सुमारे तीनशे पाहुणे आले होते. समारंभाचे अध्यक्ष म्हणून ''बिहार रत्न'' बाबू राजेंद्रप्रसाद (भारताचे पहिले राष्ट्रपती) हे आले होते.

या हीरक महोत्सवानिमित्त दिवसभर निरनिराळे कार्यक्रम झाले. सांयकाळी कॉटन मार्केट मधून साठ घोड्यांचे रथातून वीर वामनराव दादांची भव्य मिरवणूक काढण्यात आली. हनुमान व्यायाम शाळेचा बँड मिरवणुकीचे आघाडीवर होता. मिरवणुकीत हजारो स्त्री-पुरुष सामील झाले होते.

रस्त्यात ठिकठिकाणी दादांना हार अर्पण करण्यात आले. सर्व शहरात ठिकठिकाणी मोठाल्या कमानी उभारण्यात आल्या होत्या. व त्यास पुढाऱ्यांची नांवे देण्यात आली होती.

ही भव्य मिरवणूक शहरातील प्रमुख मार्गाने फिरुन नेहरु मैदानात आली. तेथे व्यासपीठाची सजावट फारच मनोवेधक करण्यात आलेली होती. व वीजेची रोषणाई केली होती. या समारंभाला सर मोरोपंत जोशी, दिवाणबहादुर ब्रम्ह व इतर प्रमुख नागरिक मोठ्या संख्येने हजर होते. एकूण पाचसहा हजार लोक समारंभाला उपस्थित होते.

बाबू राजेंद्रप्रसाद यांनी अध्यक्षस्थान स्वीकारल्यानंतर कार्यक्रमास सुरुवात झाली. प्रांतिक काँग्रेस कमेटीचे चिटणीस श्री.वि.ब.उर्फ बाबासाहेब वैद्य यांच्या प्रास्ताविक भाषणाने कार्यक्रम सुरु झाला.

या समारंभासाठी महात्मा गांधींनी राजेंद्रबाबूंचे नांवाने संदेश पाठवून "वीर वामनराव शतायू होवोत" असे अभीष्ट चिंतिले होते.

वीर वामनराव दादा व राजेंद्रबाबू यांना सुमारे ४०० संस्थांनी पुष्पहार घातले.

उमरावती जिल्हा कौन्सील तर्फे अध्यक्ष दे.भ. गंगाबिसनजी सिकची यांनी दादांना चांदीचे करंडकातून मानपत्र अर्पण केले.

या प्रसंगाला गोलबोट लावण्यासाठी कांही लोकांनी एक पत्रक वाटले. त्यात वीर वामनराव दादा बद्दल टीकात्मक मजकूर होता. त्यातील सर्व मुद्यांना वि.ब.वैद्य यांनी तेथेच उत्तरही दिले.

नंतर श्रीमती दुर्गाताई जोशी (आकोला), दिवाण बहादुर ब्रम्ह, दे.भ. नानासाहेब बामणगांवकर, डॉ.पटवर्धन, दे.भ. पन्नालाल देवडीया,(नागपूर), जनरल मंचरशा अवारी (नागपूर), बापुसाहेब सहस्त्रबुध्दे (आकोला), आणि दे.भ. हरिहरराव देशपांडे यांची दादांच्या गुण-गौरवपर भाषणे झाली.

शेवटी समारंभाचे अध्यक्ष राजेंद्रबाबू यांचे व वीर वामनराव दादांचे समयोचित भाषण व आभार प्रदर्शन होऊन हा सोहळा संपला.

६) मध्यप्रांत व वऱ्हाडची पहिली पुरोगामी परिषद :-

मध्यप्रांत वऱ्हाडच्या पुरोगामी गटाची (फॉरवर्ड ब्लॉकची) पहिली परिषद उमरावती येथे दिनांक १२ व १३ एप्रिल १९४१ रोजी जोग चौकात पार पडली. या परिषदेसाठी सरदार शार्दूलसिंह कवीश्वर हे अध्यक्ष म्हणून व सौ.लिला रॉय ह्या उद्घाटक म्हणून आल्या होत्या. स्वागताध्यक्ष डॉ.सोमण हे होते.

बाबू सुभाषचंद्र बोस यांच्या ध्येय-धोरणाचा या परिषदेत पाठपुरावा करण्यात आला. विदर्भाच्या सर्व भागातून या परिषदेसाठी कार्येकर्ते आलेले होते.

७) डॉ.जोशी सभागृह :-

उमरावतीचे जोग चौकात इ.स.१९०२ साली थिऑसॉफिकल सोसायटीने ''ब्रम्हविद्या मंदिर'' या समर्पक नावाने एक मोठे सभागृह बांधले होते. या सभागृहाचे आधुनिक रुपांतर येथील डॉ.जोशी यांचे स्मरणार्थ त्यांचे सुपुत्र श्री.बाळासाहेब जोशी यांनी दिलेल्या देणगीतून करण्यात येऊन, सभागृहाचे नाव श्रीकृष्ण थिऑसॉफिकल लॉजचे डॉ.जोशी सभागृह असे ठेवण्यात आले व या पुनरनिर्मित सभागृहाचे उद्घाटन, दिनांक २ एप्रिल १९४१ रोजी प्रख्यात थिऑसॉफिस्ट श्री.सी.जिनराजदास, एम.ए. यांचे हस्ते करण्यात आले होते.

डॉ.जोशी सभागृह ज्यांचे स्मरणार्थ बांधले ते डॉ.जोशी उमरावतीत डॉक्टरी व्यवसाय करीत असत आणि उमरावतीतील सर्व डॉक्टरांची एक ''मेडिकल युनियन'' त्यांनी स्थापन केली होती. ही संस्था नोंदलेली नव्हती. मुंबईच्या कांही डॉक्टरांना उमरावतीच्या ह्या मेडिकल असोसिएशनची कल्पना फार पसंत पडली व त्यातूनच पुढे ''इंडियन मेडिकल असोसिएशन'' ही अखिल भारतीय संघटना निर्माण झाली. या प्रमाणे डॉ.जोशींनी निर्माण केलेल्या उमरावती मेडिकल असोसिएशनने, इंडियन असोसिएशनचे स्थापनेला प्रेरणा दिली आहे.

या उमरावती मेडिकल असोसिएशनसाठी एखादे सभागृह असावे ही डॉ.जोशींची फार इच्छा होती. कारण या असोसिएशनच्या बैठकी कोणत्यातरी डॉक्टरांच्या घरी भरत असत. डॉ.जोशींच्या हयातीत त्यांच्या ह्या सभागृहाची कल्पना मूर्त स्वरुपात येऊ शकली नाही. परंतु त्यांचे निधनानंतर त्यांचे सुपुत्र श्री.बाळासाहेब जोशी यांनी सभागृह बांधण्यास देणगी देऊन कल्पना साकार केली आहे.

१९४० पूर्वी ब्रम्हविद्या मंदिरांची इमारत शिकस्त झाली होती. त्यावेळी सौ.पार्वतीबाई पटवर्धन ह्या ब्रम्हविद्या मंदिराच्या कार्यवाह होत्या. व त्यांच्या समोर ब्रम्हविद्या मंदिराच्या दुरुस्तीचा प्रश्न होता. याच वेळी श्री.बाळासाहेब जोशी आणि डॉ.पटवर्धन यांची भेट झाली व त्यांचे चर्चेतून ब्रम्हविद्या मंदिराचे ठिकाणीच डॉ.जोशी सभागृह बांधण्याची कल्पना समोर आली. त्या प्रमाणे डॉ.जोशी सभागृह बांधले गेले. मात्र त्याच इमारतीत वर दुसऱ्या मजल्यावर थिऑसॉफिकल हॉल (ब्रह्मविद्यामंदिर) कायम ठेवण्यात आला आहे. (मुलाखतीच्या आधारे)

<u>सी.जिनराजदास :- (ज.१८७५)</u>

थिऑसॉफिकल सोसायटीचे जगप्रसिध्द बौध्द धर्मीय कार्यकर्ते, अध्यक्ष, ग्रंथकार, व वक्ते, जन्म सिलोन मध्ये झाला. १९०४ साली थिऑसॉफिकल सोसायटीचे आंतर राष्ट्रीय व्याख्याते, म्हणून त्यांची अमेरिकेत नेमणूक झाली. १९११ पर्यन्त ते तेथेच होते. बेझंट बाईच्या होमरुल चळवळीचे कार्यहि त्यांनी इंग्लंड व भारतात केले. १९४५ साली ते थि.सो.चे अध्यक्ष बनले. त्यांनी अनेक ग्रंथ लिहिले आहेत.

८) <u>अमरावतीत नवे वाहन : रिक्षा :-</u>

छकडा, दमण्या, तांगे ही वाहने उमरावतीत फार जुन्या काळापासून परिचित होती व चालू होती आणि घोड्यावरुन सवारी देखील आम होती. नंतर ''सायकल'' हे वाहन सर मोरोपंत जोशी यांनीच प्रथम या शहरात आणले आणि नंतर हे सायकल

वाहन देखील आम झाले. १९४१ च्या जूनच्या पहिल्या आठवड्यातच उमरावतीत "रिक्षा" नावाने एक नवे वाहन प्रथमच दिसू लागले होते. सायकलला असतात तशी तीन चाके असतात. दोन प्रवासी बसविण्याची सोय असलेले आणि एका माणसाने चालविता येणारे किंवा ओढून नेता येणारे वाहन आहे. ह्या रिक्षा वाहनाची सुरुवातीची या शहरातील संख्या केवळ तीन होती. आज या वाहनाची या शहरातील संख्या सुमारे ३,००० असावी.

९) उमरावतीत निजामाचा वाढदिवस :-

दि.१६ जुलै १९४१ रोजी उमरावतीच्या कमिश्नर कचेरीत निजाम नवाब मीर उस्मान अलीशॉ निजाम उल्मुल्क आसफजहॉ (सातवे) यांचा वाढदिवस सरकारी रीत्या साजरा करण्यात आला. त्यानिमित्त पोलीस परेड होऊन पानसुपारी करण्यात आली होती.

मध्यप्रांत वऱ्हाड या जोड राज्यांतील वऱ्हाडच्या चार जिल्ह्यांच्या (अमरावती, आकोला, बुलढाणा व यवतमाळ) कमिश्नरीची मुख्य कचेरी अमरावतीत होती व या कचेरीत दरबारी निझामाचा वाढदिवस सरकारीरीत्या साजरा करण्याची प्रथा इ.स. १९०२ पासून चालू होती. गादीवर जो निजाम असेल त्याचे जन्मतारखेचे दिवशी हा वाढदिवस साजरा केला जाई. ही प्रथा १९४७ पावेतो चालू होती. कारण वऱ्हाडवर स्वामित्व निजामाचे व कायम वहिवाट इंग्रजांची असा करार होता.

१०) दे.भ.आबासाहेब ओझरकरांचे निधन :-

कलकत्ता येथे १९२० साली सप्टेंबर महिन्यात भरलेल्या काँग्रेसचे खास अधिवेशनात मंजूर झालेल्या "अंहिसात्मक असहकाराचे "ठरावानुसार" वकीलीचा धंदा सोडणारे वऱ्हाडातील पहिले वकील व राष्ट्रीय कार्येकर्ते उमरावतीचे श्री.केशव वामन उर्फ आबासाहेब ओझरकर हे १८ ऑगस्ट १९४१ रोजी दिवंगत झाले.

लोकनायक बापूजी अणे यांनी कै.अण्णासाहेब ओझरकर यांचे निधनानिमित्त आपला दुखवटा खालील शब्दात व्यक्त केला होता.

श्री.ओझरकर यांच्या निधनाची दु:खद बातमी मी मोठ्या खेदाने वाचली. आपल्या सदसद्‌विवेक बुध्दीला स्मरुन देशसेवा करणारे व त्यासाठी सर्वस्व गमावणारे जे काही तेजस्वी लोक आहेत त्यापैकी ते एक होते. कलकत्ता येथे १९२० साली भरलेल्या काँग्रेसचे खास अधिवेशनात असहकाराचा ठराव मंजूर झाला. त्या ठरावानुसार वकीलीचा धंदा सोडणारे श्री.ओझरकर हे वऱ्हाडातले पहिले वकील होते. ते निस्वार्थ वृत्तीचे सार्वजनिक कार्यकर्ते होते. राजकारणात सहिष्णू होते. आपल्या मताशी सहमत नसणाऱ्यांशी मोकळेपणाने वागताना त्यांनी पक्षाभिमान कधीही आड येवू दिला नाही. त्यांच्या निधनामुळे वऱ्हाडचा एक थोर सार्वजनिक कार्यकर्ता नाहीसा झाला आहे.''

कलकत्ता काँग्रेसमध्ये व नंतर १९२० साली नागपूर येथे भरलेल्या काँग्रेस अधिवेशनातील ''अहिंसात्मक असहयोगाचे ठरावातील भाग असा (ड) 'वकीलांना आपला धंदा (प्रॅक्टीस) मुलतबी (सस्पेंड) करण्याबद्दल सांगणे, ह्यात अशिलांनी व वकीलीच्या धंद्यातील त्यांच्या बांधवांनी कोर्टावर बहिष्कार घालणे, आणि आपल्या वादांचा खाजगी पंचायतीच्याव्दारे निकाल करुन घेणे याचाहि समावेश होतो.' (कॉग्रेस सुवर्ण ज्युबिली : नागपूर प्रांताचा इतिहास, १९३५ भाग २ पान ८)

११) अमरावतीची भयंकर जातीय दंगल सन १९४१ :-

दि. २८ सप्टेंबर १९४१ रोजी, ऐन दसऱ्याचे दोन दिवस अगोदर, रविवारचे दसऱ्याचे बाजाराचे दिवशी दुपारी दोनचे सुमारास रविवार बाजारातच एका जमातीच्या लोकांवर हल्ला झाला. आणि दंगल भडकली व अगदी थोड्या वेळात ती सर्व शहरभर पसरली. दंगलीने उग्र स्वरुपही धारण केले.

दसऱ्याचा बाजार म्हणून शहरातील व आजूबाजूच्या खेड्यापाड्यातून हजारो

लोक बाजारासाठी आलेले होते. अगोदर निरनिराळ्या अफवा शहरभर पसरलेल्या होत्या. शांततेसाठीही बरेच प्रयत्न झालेले होते. पोलीस बंदोबस्त शहरात ठिकठिकाणी होता पण बाजारात पुरेसा बंदोबस्त नव्हता. त्यामुळे दंगल भडकताच बाजारातून भराभर वाट मिळेत तिकडून लोक पळू लागले. बाजार आणि दुकान ओळ बंद झाली. अंबागेटचे आंत दुपारी ३ चे सुमारात मृगेन्द्र मठाजवळील रस्त्यावर ४०-५० सशस्त्र लोकांनी संघटितपणे हल्यास सुरुवात केली. त्या हल्यात चौघांना असह्य जखमा झाल्या. तरी त्यांनी हल्लेखोर रोखून धरले होते. बाजारात देखील बरेच लोक दंगलीचे वेळी जखमी झाले होते. लगेच सरकारतर्फे शहरात संचारबंदी पुकारण्यात आली.

रविवारची भीषण रात्र :- रविवारची भीषण रात्र उमरावतीच्याच काय, वऱ्हाडच्या इतिहासात सुध्दा अगदीच नवीन, जेवढा मुसलमान तेवढा प्रत्येक हिंदुला शत्रू समजू लागला व जेवढा हिंदू तेवढा आपसातील भेद विसरुन एक झाला व कालच्या मुसलमान मित्रासहि शत्रू समजू लागला.

या दंग्याची चौकशी करण्यासाठी सरकारने श्री.विकेन्डन आय.सी.एस.डिस्ट्रक्ट ॲन्ड सेशन जज्ज, नागपूर, ऑफिसर ऑन स्पेशल ड्यूटी, अमरावती रॉईट, यांची नियुक्ती केली आणि २८ ऑक्टोंबर १९४१ पासून दंगलीच्या चौकशीला अमरावतीतच कलेक्टोरेटमध्ये सुरुवात झाली. त्यावेळी दिवाण बहादुर के.व्ही.ब्रम्ह, रावबहादुर आर.एम्.खरे आणि एस.ए.आवटे हे ख्यातनाम वकील हिंदूतर्फे श्री.सरनाईक वकील हे लक्ष्मीकांत मंडळातर्फे व श्री.शरफुद्दीन व श्री.हिदायतअली वकील हे मुसमानांतर्फे तसेच बऱ्हाणपूरचे श्री.अजगर अली वकील हे बोहरी समाजातर्फे चौकशी अधिकाऱ्याचे कोर्टात हजर झाले होते.

दि. ३० डिसेंबर १९४१ रोजी चौकशी अधिकाऱ्यासमोर दिवाण बहादुर के.व्ही.ब्रम्ह यांनी आर्ग्युमेंट केले ते न थांबता संध्याकाळपर्यन्त सुरु होते.

कालांतराने चौकशी पूर्ण झाली, ती सरकारी दप्तरात जमा झाली.

आणि पुढे शहराचे वातावरणातही तणाव कमी झाला आणि निसर्ग नियमानुसार हळूहळू शहराचे व्यवहार नियमित चालू झाले. हा १९४१ चा जातीय दंगा उमरावतीचे इतिहासात खरोखरच अभूतपूर्व असा होता. त्यात ८-१० लोक प्राणास मुकले. कित्येक जखमी झाल्याने कायमचे व्यंग त्यांना लागले. कित्येकांच्या संपत्तीची, घरादाराची जाळपोळ व लुटालुटीने हानी झाली. त्यातून निष्पन्न मात्र काहीच झाले नाही.

तब्बल ९ महिन्यांनी गणपती विसर्जन :-

उमरावतीच्या अंबागेटचे प्रख्यात लक्ष्मीकांत मंडळाच्या गणपती विसर्जनाचा एक इतिहास बनला आहे. इ.स.१९४१ मध्ये, ज्या दिवशी हा गणपती विसर्जित करण्याचे ठरले होते व त्याची तयारी चालू होती. त्याचे एक दिवस अगोदर, त्याच मंडळाने आयोजित केलेल्या श्री.संत तुकडोजी महाराज यांचे भजनाच्या कार्यक्रमाला जेव्हा स्त्री-पुरुष व मुलांची प्रचंड गर्दी जमली होती त्यावेळी अंबागेटचे बाहेरील तकियातून निघालेल्या संदलचे मिरवणूकीतील दोन तीन हजार लाठीधारी लोकांनी, त्यांचा आखलेला मार्ग सोडून अंबागेटचे आंत, जेथे भजनासाठी स्त्री पुरुष जमले होते त्याकडे धाव घेतली आणि एकदम सर्व वातावरणात जातीय दंगलीचे चित्र दिसू लागले होते. डॉ.शिवाजीराव पटवर्धन आणि कॉंग्रेस आमदार श्री.गणेशराव बापू देशमुख यांच्या समय सूचकतेमुळे हा भंयकर प्रसंग टळला. तरी लगेच लागू झालेल्या १४४ कलमामुळे हा गणपती उठू शकला नाही. नंतर शहरात जातीय दंगलीचे वातावरण चिघळू लागले. १४४ कलम सतत लावण्यात आले होते. त्यामुळे या मंडळाचे गणपती विसर्जन तसेच राहिले. जातीय दंगल ऐन दसऱ्याचे वेळी झाली. आणि त्यानंतर या दंगलीची चौकशी वगैरे मुळेही हे विसर्जन झालेच नाही. शेवटी वातावरण थोडे शांत झाल्यानंतर दि. २३ मे १९४२ रोजी या मंडळाच्या गणेशमूर्तीचे विसर्जनास परवानगी देण्यांत आली.

ज्या प्रमाणे लक्ष्मीकांत मंडळाच्या गणपतीचे विसर्जन राहिले होते. त्याच प्रमाणे नेहरु मैदानांत नवरात्राचे काळांत भरणाऱ्या रामलिलेतील हनुमान हा शहरभर

फिरतो व नंतर रावण दहन होते असा रिवाज होता. त्या हनुमंताची मिरवणूकहि वरील परिस्थितीमुळे तहकूब झाली होती. आणि अग्रेसन जंयती निमित्त निघणारी अग्रसेन महाराजांची मिरवणूकही याच कारणाने अडकून पडली होती. दि. २३ मे ४२ ला ह्या तिन्ही मिरवणुकी प्रचंड जनसमुदायासह पण साध्या तऱ्हेने निघाल्या. पोलिसने ठरवून दिलेल्या मार्गाने फिरुन भुसारी गेट जवळ ह्या मिरवणुकी आल्या तोच पुन्हा जातीय दंगलीची चिन्हे एका एकी दिसू लागली. आठवडी बाजाराच्या बाजूने एका जमातीचे लोक मोठ्या संख्येने जमा झाले आणि त्यातच मिरवणूकीवर एक-दोन दगड आले. त्यामुळे पळापळ सुरु झाली. पण अखेर पोलीस, स्थानिक पुढारी आणि तिन्ही मंडळाचे कार्यकर्ते यांच्या समजदारीमुळे ह्या मिरवणुकी एकदाच्या पार पडल्या.

दि.१३ सप्टेंबर १९४१ रोजी म्यु. ए.व्ही. स्कूलचे सभागृहात श्री.बाबासाहेब खापर्डे, एम.एल.ए. यांच्या अध्यक्षतेखाली शहरातील जातीय तणावाचे संदर्भात भरलेल्या सभेचा वृत्तांत.

अमरावती शहरातील विविध संघटना व उत्सव मंडळाचे प्रतिनिधी तसेच विविध जाती जमातीचे प्रतिनिधींची सभा आज सकाळी झाली. या सभेत यावर्षी शहरात शांतता रहावी म्हणून गणपतीची मिरवणूक न काढण्याबद्दल विचार करण्यात आला. श्री.बी.जी. खापर्डे, एम.एल.ए.हिंदू महासभेचे उपाध्यक्ष हे अध्यक्षस्थानी होते. अध्यक्षांनी सुरुवातीला सभा बोलावण्याचा उद्देश समजाऊन सांगितला. गणेशोत्सव मंडळाच्या प्रतिनिधींनी चर्चेत भाग घेतला. त्यांत प्रामुख्याने सर्वश्री ठाकूर, फडके, व्ही.डी.ब्रम्ह, चौबळ, शेठ मांगीलाल, मोतीलाल बंसगोपाल आणि छोटमलजी बुच्चा, श्री.हिदायदतुल्ला, मि.शरफुद्दीन यांनीही चर्चेत भाग घेतला. डेप्युटी कमिश्नर मि.मेलड्रम हे सुरुवातीपासून सभेला हजर होते व अनेक प्रश्नाला त्यांनी उत्तरे दिली. श्री.हिदायतअली म्हणाले की, मी माझ्या जमातीच्या लोकांना भेटून आलो नाही म्हणून त्यांच्या तर्फे अधिकृतपणे बोलू शकत नाही. तरी पण संदल जर रद्द केला तर त्याचा मुस्लीम समाजावर विपरीत परिणाम

होईल. श्री.शरफुद्दीन म्हणाले की, मी आणि हिदायत अली दोघे मिळून यावर्षी मोहरमची मिरवणूक निघू नये या करिता मुस्लीम समाजाची मने वळविण्याचा प्रयत्न करु व त्यात आम्हाला यश देखील मिळेल. संदलची मिरवणूक देखील रद्द करता येईल. सभेच्या शेवटी अध्यक्ष श्री. खापर्डे यांनी शांतता भंग होऊ नये म्हणून आपण प्रयत्न करावेत आणि आपण सर्व गणपती मिरवणूक देखील रद्द करण्यात यश मिळवू.

अध्यक्षांनी सभेला विचारले की, माझ्या मताशी सर्व सहमत आहात का ? मी जे बोललो ते सर्वाना मंजूर आहे का ? सभेत कोणीही विरोध दर्शविला नाही. त्यानंतर अध्यक्षांनी जाहीर केले की, ''ही सभा सर्वानुमते ठरविते की, दिल्लीला जी ऐक्य बोलणी सुरु आहेत, त्याला अनुसरुन व शहरात जातीय सलोखा व ऐक्य कायम रहावे म्हणून, यावर्षी गणपती उत्सवाच्या शेवटी जी मिरवणूक निघते ती काढण्यात येणार नाही.''

टाळ्यांच्या कडकडाटात ठराव संमत झाला.

(१. श्री.बाबासाहेब खापर्डे दमर.)

विद्यमान डेप्युटी कमिश्नर साहेब अमरावती यांनी आम्ही खाली सहचा करणार अर्ज करतो की -

हल्ली अमरावती येथे हिंदू-मुसलमानांचे दंगे चालू आहेत. सदर्हू दंगे चालू असता पोलीसांकडून हिंदू लोकांस वेळेवर पुरेशी मदत झाली नाही व हिंदू लोकांकडून काठ्या देखील हिसकल्या गेल्या. परंतु दंगा चालू असता मुसलमानांकडून परदी, भाले, काठ्या, टेंबे आणि कटयारी हिसकले गेले नाहीत. अंबा दरवाजावर व रविवार बाजारात मुसलमांनानी जी मारामारी केली त्या दोन्ही मारामारीत त्यांनी सरसकट धारधार शस्त्रांचा उपयोग केला. हे हिंदू लोकांस लागलेल्या जखमांवरुन सिध्द होते. त्या दिवशी व त्यानंतर ४-५ दिवसापर्यन्त मुसलमानांकडून शस्त्रे काढून घेण्याचा व मुसलमान गुंडे पकडण्याचा कोणताही यत्न केला नाही. हल्लीचे डी.एस.पी.सी. हे मुसलमान आहेत आणि ते

मुसलमानांचा पक्षे घेतात व बादशहांच्या हिंदू प्रजेवर आक्रमण होत असता त्याची उपेक्षा करतात. असा संशय येण्यास कारणे घडली आहेत. हे डी.एस.पी. ह्यापूर्वी ज्या ज्या ठिकाणी अधिकारी होते त्या त्या ठिकाणी पूर्वी असेच दंगे झाल्याचा इतिहास आहे. हे डी.एस.पी.सा. अमरावतीत आहेत तो पर्यन्त तरी शांतता नांदेल असे वाटत नाही. यापूर्वी अमरावतीत असा दंगा कधीही झाला नव्हता. हल्ली येथे बहुतेक पोलीस ऑफीसर मुसलमान आहेत. तर ही परिस्थिती कायम असे पर्यन्त जनतेत भरवसा व शांतता राहणे अशक्य आहे. दुकाने उघडण्यास योग्य संरक्षणाची कोणीही जबाबदारी घेण्यास तयार नाही. अशा परिस्थितीत डी.एस.पी साहेबांची बदली करावी व येथे झालेल्या दंगण्याची व त्याचे कारणांची योग्य चौकशी व्हावी. हा अर्ज ता. ४/१०/४१ इसवी.

याच्या प्रति पाठविल्या --

१. गव्हर्नर जनरल २. गव्हर्नर सी.पी.अॅन्ड बेरार

३. कमिश्नर व डिस्ट्रीक्ट मॅजिस्ट्रेट अमरावती.

(दि. ६.१०.४१ रोजी रजिस्टर्ड पोष्टाने अर्ज पाठविण्यांत आला)

(कै.बाबासाहेब खापर्डे दफ्तर वरुन)

डी.ओ.नं. १०२०

(अ)

अमरावती कॅम्प.

१५ सप्टें, १९४२.

प्रिय श्री.खापर्डे,

मी १३ सप्टें. रविवारी म्युनिसीपल ए.व्ही. स्कूलची सभा सोडून गेलो, तेव्हा

श्री.बेंद्रे यांनी मला वेगवेगळ्या संघटनेच्या प्रतिनिधींची यादी दिली, ज्यांनी स्वत:हून मिरवणूकीत स्वयंसेवकाचे काम करण्याची तयारी दाखविली. मी त्यांना ती यादी तुम्हाला द्यावयास सांगितली त्यामुळे सभेला वृत्तांत लिहिणे सोपे होईल. मला आता समजले की, यादी उशीरा मिळाली त्यामुळे त्याचा वृत्तांत लिहिता आला नाही. तुम्ही आता माझ्या मताशी सहमत असाल की हिंदूंनी अत्यंत समजुतदार पणाने सीमित वक्तृत्व दिले. श्री.बेंद्रेनी दिलेली यादी व संघटनेच्या प्रतिनिधींची नांवे मी सोबत देत आहे. या सर्व वृतांतावरुन वर्तमान राजकीय विचारांचा देखील अंदाज लावता येतो व राजकीयदृष्ट्या फार मोठे संकलन होईल. आपण जो निर्णय घेतला आहे तो एक मोठा फायदाच समजला पाहिजे. अशा प्रकारे दूरदृष्टी असलेला निर्णय अमरावती शहरातील राजकीय वातावरणाला योग्य ते वळण देण्यासारखा होईल व जातीय सलोखा निर्माण करण्यात फायदेशीर होईल. जर तुम्ही माझ्या मताशी सहमत असाल तर मी प्रोसीडींगची कॉपी पाठवीत आहे ज्यामुळे त्यात योग्य ती सुधारणा करता येईल. जर जमल्यास पुढे अधिक प्रतिनिधींची मोठी सभा बोलविता येईल. त्यामुळे शहरातील वातावराण बरेच सुधारेल व राजकीय विचारांना प्रोत्साहन मिळेल. मला वाटते की मी हे सर्व लिहितांना सभेत व्यक्त झालेल्या भावनांचा आदर करीत आहे आणि माझ्या मर्यादेच्या कक्षेबाहेर मी जात नाही.

सही/अस्पष्ट

बी.जी.खापर्डे, एम.एल.ए.

ॲडव्होकेट,अमरावती.

49 (A)

परिशिष्ट क्रं. ३

Facts of the Communal disturbances in Amraoti City.

In tracing the previous history of the communal riot in this city, it may not out of place to note that riot of this

type did not take place up till now. Secondaly the existence of the Police Officers with the castes and religions has a little effect on such incidents. For some time past the City Inspector, the Superintendent, Police, many of the sub Inspectors and the Secretary of the Regional Transport Authority have been Musalmans.

The Motor Stand is, it may be noted a starting place for these conditions and this riot has a start from the Motor Stand. For some time past instances of beating and assaults, against individuals have not been rare and in the large number of them the sufferer will be found to be Hindu, No action seems to have been taken on such complaints. Under these circumstances the Kalyankar affair took place and the person attacked died. The case was started for murder shall be revenged with several murders. The speech was unnoticed by the authorities.

Some time previous to this incident a public meeting called by the congressman in the weekly market was addressed by a Muslim congressman. This congressman was assaulted with the conveners of the meeting and had Dr. Patwardhan not been present at the meeting the meeting would have ended differently. What action has been taken in respect of these assaults is not known ?

A few days before the Ganpati Processions some few Mohammedans were beaten by some Hindus. The case

seems to have been filed. This beating which occured at night was revenged on the Motor Stand by a serious type of assault on one of the suspected person. In broad day light in the presence of a leader of Mohamdedan, the suspected person was thrashed by those who were assaulted previously. The victim ran for shelter and he was followed and thrashed wherever he went. What action the police takes or it has already taken is to be seen. Then came the Ganpati Procession. In one of them "Kalyanker Ki Jai" was it is reported called out as a slogan.

The reply to this came by the procession of the sandal which took place this year earliest by a day or two, there, by bringing the two occassions of the two communities closer. The procession was Historical one. It should have started from Ambagate and passed out of the city wall. But the processionists led by Important Mohammedan leaders insisted on going inside the city wall. The route was unusual as well as the one not previously declared. Hindus then flocked inside Ambagate were equally determined to oppose the new route. The Bhajan of Sant Tukadoji Maharaj had attracted considerable number of ladies, which is given to be a reason why the Hindus did not want to allow the procession enter the Ambagate. Dr. Patwardhan will be able to narrate the tense atmosphere in which the procession went by its usual processionists to avoid the

route inside the gate. He was openly abused and pushed back. Another leader was chosen. He was lifted on the shoulders. The police could surely note him at this time.

The processionists solgan was "Chotuki Jai" Chotu it may be noted was the one who died of wounds caused by Kelyankar. When the processions came to the Motor Stand and passed by the shop of Gunwanta, his shop was broken and material in it was destroyed. Gunwanta was a witness in the Kalyankar case. With Leaders accompanying this attrocity could be accomplished. It is not difficult to trace the persons for some of them must necessarily be the friends of the deceased. In fact many of them must be present on the Motor Stand. How otherwise could they know the exact shop.

The procession used to go through the Dhanraj Lane in the previous year, but this time it passed through the Sarafa, Bhaji-Bazar and Dahisath. A report of the processionists, went beside the Marathi School and they were driven back by Mr. Mani from the point. Mr Mani it may be noted is a sub Inspector.

Since the stray assaults on persons majority of whom shall be found to be Hindus are taking place. The result of each such assualt is a matter of curiosity. It may also be noted that more Hindus have been ordered to execute bounds than Mohammedans. It will not be surprising if

more prosecutions are seen against the Hindus.

In this state a peace move is being started. The Musalmans are represented by their leaders, but the Hindus are not represented herein. For those who claim to represent the Hindus, do not possibly know even the faces of persons who are assualted or who can protect themselves and their community. The Hindu leaders of this peace move will only give authenticity to the report in the Times of India.; The persons in office will get the credit of the move. Possibly the persons affected shall not abide by any decision of the Committee, and they shall be declared to be traitors by the public and by Government too. An effort was made to see that both the leaders should declare the occurance as most unhealthy. Pompletes will do little good but declaration in the open meeting can if the convenes are real leaders be taken by them respectively. The Mohammedan leaders can but the movers of the peace will not.

As stated previously the root of all the troubles lies in the Motor Stand. It is there that so many idlers can get an easy living by administrator of threats. Remedies for this purpose are provided not only by the Indian Penal code and procedure but the Motor vehicle Act contains provisions, Encroachment on the Nazul site, Section 34 Police act will ease much of the trouble. Even if the motor stand is well managed by the city Police there will be no cause of future

trouble and the present trouble will subside in no time.

(कै.बाबासाहेब खापर्डे दफ्तर वरुन)

दंगलीचा प्रारंभ झाल्यानंतर श्री.बाबासाहेब खापर्डे यांनी काही हिंदू पुढाऱ्यांना घरी बोलावून राम सेना नावाची एक संघटना स्थापन केली. हिंदू स्त्रियांचे रक्षण, मालमत्तेची जाळपोळ होऊ न देणे, हिंदूचे प्राण रक्षण करणे असे हेतू ठरविण्यात आले. श्री.गंपूनाना पिंपरकर, श्री.बळवंत पिंपरकर, संभाजीराव गोखले, भीमाप्पा, शकराप्पा, मामर्डे, चांदूरकर वकील लक्ष्मीकान्त देशपांडे, उकंडराव पारधी, साहेबराव देशमुख, विनायक पाटील, वगैरे लोक त्या समितीत होते. प्रत्येकजण आठ दहा लाठीधारी स्वयंसेवक सोबत घेऊन रात्री चौकाचौकावर "जागते रहो" असा इशारा देऊन पहारा करीत असे. मामर्डे कुटूंबियांनी दंगलीपासून पटवी पुऱ्याचे उत्तम तऱ्हेने रक्षण केले.

(मामर्डे यांची आठवण.)

१२) श्री.कामत यांचे व्याख्यान :-

पुढे उत्कृष्ट संसदपटू म्हणून प्रसिध्दीला आलेले श्री.हरि विष्णू कामत (एच.व्ही.कामत) यांचे उमरावतीतस दि. ९ फेब्रुवारी १९४० रोजी प्रथमच व्याख्यान झाले. श्री.कामत हे त्या काळचे आय.सी.एस. असून छत्तीसगढ विभागात कमिश्नर पदावर काम करीत होते. परंतु त्यांनी देशसेवेसाठी आपल्या उच्च पदाचा राजीनामा देऊन सुभाष बापूंच्या फॉरवर्ड ब्लॉक मध्ये सामील झाले व फारवर्ड ब्लॉकच्या दि. ४ व ५ फेब्रुवारी १९४० रोजी बैतूल येथे नुकत्याच भरलेल्या अधिवेशनाला उपस्थित होते. एक आय.सी.एस. अधिकारी आपल्या उच्च पदाला लाथ मारुन देशसेवेसाठी जनतेत येतो ही त्यांची कीर्ती लोकांना आकर्षित करणारी असल्याने या व्याख्यानाला बरीच गर्दी झाली होती. त्यावेळी ते फॉरवर्ड ब्लॉकचे

ऑर्गनायझर म्हणून काम करीत होते. पुढे उत्तम वक्ते आणि स्वातंत्र्योत्तर काळात उत्कृष्ट संसदपटू म्हणून त्यांनी चांगला लौकिक मिळविला.

श्री. हरि विष्णू कामत :- (ज.१९०७ मृ. १९८२) जन्म मंगलोर (कर्नाटक) येथे शिक्षण मद्रासला १९२९ साली आय.सी.एस. होऊन सरकारी नोकरीत त्यावेळच्या मध्यप्रांत मध्ये शिरले. जिल्ह्याचे डेप्युटी कलेक्टर, नंतर अतिरिक्त सत्र न्यायाधीश आणि १९३६ ते १९३८ अंडर सेक्रेटरी या विविध पदावर काम केले. नंतर १९३८ साली त्यांनी सरकारी नोकरीचा राजीनामा देऊन राजकारणात प्रवेश केला. काँग्रेसचे ते क्रियाशील सदस्य होते. तद्वतच काँग्रेसच्या नियोजन मंडळाचे सदस्य होते.

इ.स. १९४० साली नेताजी सुभाष चंद्र बोस यांचे सह ते फारवर्ड ब्लॉकचे स्थापनेत सहभागी झाले व ते त्या पक्षाचे सचिवही होते. १९४२ ते ४५ मध्ये ते घटना समितीचे सभासद होते व याच काळात त्यांनी तुरुंगवासही भोगला. स्वातंत्रोत्तर काळात ते घटना परिषदेचे सभासद आणि पुढे तीनदा भारतीय संसदेचे प्रमुख सदस्य म्हणून त्यांनी कार्य केले होते. उत्कृष्ट संसदपटू म्हणून त्यांची या काळात कीर्ती झाली. भारतीय संसदेवर त्यांनी हुशंगाबाद लोकसभा मतदार संघाचे प्रतिनिधीत्व केले आहे, या काळात ते प्रजासत्तावादी होते. आणिबाणी नंतर ते जनता पक्षाचे सभासद झाले.

श्री.कामत हे अविवाहित होते. मृत्यूपूर्वी त्यांनी आपल्या सुमारे ४ लाखाच्या संपत्तीचा एक ह.वि.कामत विद्यादान विश्वस्त निधी स्थापन करुन त्याव्दारे देशातील विविध विद्यापीठातील गुणवंत विद्यार्थ्यांना बिनव्याजी कर्ज शिष्यवृत्ती देण्याची व्यवस्था करुन घेतली आहे.

१३) लालखडी पाणी पुरवठा योजनेचा शुभारंभ :-

उमरावती शहराला पाण्याच्या तीव्र टंचाईचा त्रास सतत होता. विशेषत: उन्हाळ्यात लोकांचे पाण्याच्या टंचाईमुळे त्याकाळी फार हाल होत. त्यासाठी नगर

पालिकेने शहराच्या वायव्य भागात लालखडी विभागात एक व विहीर खोदण्याचे ठरविले. तेथे भरपूर पाणी लागेल असे तद्‌विषयक तज्ञाने सांगितले होते. त्या प्रमाणे दि. ९ फेब्रुवारी १९४० रोजी दे.भ. वीर वामनराव दादा यांचे शुभ हस्ते या योजनेचा भूमिपूजन समारंभ करण्यात आला.

पुढे ही विहीर बांधून पूर्ण झाली तेव्हा येथून शहराला चांगला पाणी पुरवठा चालू झाला व आजही ह्या विहीरीचे पाणी शहराचे काही भागाला दिले जाते.

१४) स्वातंत्र्य दिनाचे अमरावतीत तीन कार्यक्रम :-

दि. २६ जानेवारी १९४० रोजी अमरावती शहरात स्वातंत्र्य दिनाचे एकूण तीन वेगवेगळे कार्यक्रम आखण्यात आले होते. त्यानुसार नगर काँग्रेस कमिटी तर्फे सकाळ पासून सांयकाळ पर्यन्त कार्यक्रम आयोजित केले होते.

शुक्रवारी सकाळी प्रभात फेरी काढण्यात आली होती व सराफ्याचे मागील शनीचे मंदीरा समोरील मैदानाचे ''सुभाष चौक'' असे नामकरण करण्याचा कार्यक्रम वीर वामनराव दादा यांचे हस्ते करण्यात आला होता. नंतर तेथेच ध्वज वंदनाचा कार्यक्रमही झाला.

त्यानंतर वेगवेगळया सार्वजनिक इमारतींवर आणि शाळांवर ध्वज उभारण्याचे कार्यक्रम झाले. सांयकाळी महात्माजींचे छाया चित्रासह नगर काँग्रेस तर्फे मिरवणूक काढण्यात आली होती. या मिरवणूकीत प्राथमिक शाळांतील विद्यार्थीच जास्त संख्येने होते. ही मिरवणूक नंतर प्रताप चौकात आली व तिचे रुपांतर जाहीर सभेत झाले होते.

पुरोगामी गटा तर्फेही रात्री जोग चौकात स्वातंत्र्य दिनानिमित्य जाहीर सभा घेण्यात आली होती. या सभेला लोक प्रचंड संख्येने हजर होते. डॉ.अण्णासाहेब सोमण यांच्या अध्यक्षतेखाली ही सभा भरली होती. सभेनंतर ध्वजवंदनाचा कार्यक्रमही झाला होता.

अमरावती स्टुडंट फ्रंटचे आदेशानुसार येथील निरनिराळ्या शाळा कॉलेजातील सुमारे ३ हजार विद्यार्थ्यांनी दि. २६ रोजी हरताळ पाळून एक जंगी मिरवणूक काढली होती. ही मिरवणूक शहराच्या मुख्य मार्गाने फिरुन जोग चौकात आली व तेथेच श्री.नाना मुळे यांच्या अध्यक्षतेखाली विद्यार्थ्याची सभा झाली. या सभेत अखिल भारतीय विद्यार्थी फेडरेशनने पाठविलेले ठराव मंजूर करण्यात आले.

श्री.एच.टी. राजदेरकर यांनी ठराव मांडले व त्याला श्री.सबनीस यांनी पाठिंबा दिला, ''हिंदी स्वातंत्र्याचे लढ्यांत कामगार व किसानाचे खाद्यांला खादा लावून तरुण वर्ग लढेल'' असे वक्त्यांनी आपले भाषणांतून सांगितले.

१५) उमरावतीत नवे मंदीर :-

उमरावती - बडनेरा रोडवर सातुर्ण्याचे हद्दीत डॉ.शिराळेकर यांनी स्वत:चे खाजगी जागेत व स्वखर्चाने श्री. योगेश्वर आणि श्री.गोपाळकृष्ण यांची मंदिरे बांधली व त्यांत योगेश्वर आणि गोपाळकृष्ण मूर्तीची प्राणप्रतिष्ठा समारंभ दि. ७ मार्च १९४० रोजी करण्यात आला. उमरावतीचे हे नवे आकर्षण होते. मंदीरात तळघरात ही मूर्ती होती. शिवाय डॉ.शिराळेकरांची कीर्ती ते ''सिध्द पुरुष'' असल्याबद्दल झालेली होती. तुम्ही मागाल तो पदार्थ ते ताबडतोब मंत्राने काढून देतात अशी त्यांचे बद्दल शहर भर चर्चा होती. या कारणामुळे या मंदिरात मूर्तीच्या प्राणप्रतिष्ठा कार्यक्रमात व नंतर दर्शनास जणू सारे शहर उलटले होते. या मंदीराची ख्याती कांही काळ सर्वदूर पसरली होती. परंतु ३०-३५ वर्षातच मंदीराची दुरवस्था झाली. आज भग्न अवस्थेत ती वास्तू उभी आहे.

१६) अमरावतीचा अपूर्व श्री शिवजयंती सोहळा :-

अमरावतीत दि. १० एप्रिल १९४० रोजी छत्रपती श्री.शिवाजी महाराज यांच्या जयंती निमित्त स्थापन झालेल्या श्री. शिव जयंत्युत्सव समितीतर्फे सकाळ पासूनच प्रभात टॉकीजमध्ये कार्यक्रम आयोजित केले होते. त्या प्रमाणे निबंध वाचन पोवाडे व राष्ट्रगीते झाली होती व दुपारी साडे पाच वाजता नेहरु मैदानातून

छत्रपती श्री.शिवाजी महाराज यांच्या फोटोची हत्तीवरुन प्रचंड मिरवणूक काढण्यात आली होती. चिरस्मरणीय अशा ह्या मिरवणुकीत सामिल होण्यासाठी ५ वाजता पासूनच नेहरु मैदानाकडे शहरातील आबाल-वृध्द तरुण मोठ्या संख्येने येऊ लागले. मिरवणुकीत ५,००० वर हिंदू जनसमुदाय सामील झाला होता.

व्यासपीठानजीक मालांकित शिवरायाचा फोटो व त्यानजीक जिवंतपणाचे द्योतक स्वाभिमानाचे प्रतीक असा भगवा ध्वज डौलाने फडकत होता.

सुरुवातीला उत्सव समितीचे अध्यक्ष श्री.चौबळ यांनी आपल्या प्रास्ताविक भाषणात प्रथम श्रोत्यांचे आभार मानून व अभिनंदन करत सन्माननीय पाहुण्याचा श्रोत्यांस परिचय करुन दिला होता. नंतर सभेचे अध्यक्ष रियासतकार सरदेसाई यांना पुष्पहार अर्पण करण्यात आला व ते टाळ्यांच्या गजरात भाषणास उभे झाले.

१७) रियासतकार श्री.बाबासाहेब सरदेसाई यांचे भाषण :-

सुरुवातीस त्यांनी शिवजयंती महोत्सव साजरा करण्याचे कार्यात अमरावतीतील भिन्न भिन्न पक्षांच्या मतांच्या नागरिकांनी जो दुर्दमनीय उत्साह, स्पृहणीय संघटना व एकजूट दाखविली त्याबद्दल आणि अशी कोतुकास्पद एकजूट व स्पृहणीय संघटना क्वचितच पहावयास मिळते असे सांगून अमरावतीच्या नागरिकांना व उत्सव चालकांना त्यांच्या कौतुकास्पद कामगिरीबद्दल धन्यवाद दिले आणि सत्काराबद्दल सर्वाचे आभार मानले. पुढे ते म्हणाले होते. ''आपणा सर्वास शिवरायांच्या चरित्रापासून जर कोणता बोध घ्यावयाचा असेल तर तो म्हणजे तुम्हा सर्वात दिसत असलेली संघटना वाढविणे हा होय. संघशक्ती वाढविण्याची सुबुध्दी परमेश्वराने व शिव प्रभुंनी सर्वास द्यावी. अशी त्यांचे चरणी प्रार्थना करुन सरदेसाई शिवप्रभूचे इतिहासाकडे वळून म्हणाले.

''शहाजी व शिवाजी या पितापुत्राच्या आचार विचारात उत्तर दक्षिण धृवाइतके अंतर असल्यामुळे, पितापुत्रांत विचार प्रवाहाबरोबरच नेहमी खटके उडत

असत. स्वराष्ट्ररुपी आपल्या वडीलांनी पत्करलेली गुलामगिरी पाहून ''फारच बरी विरच अती परवशता शतगुण करी जांच'' असे त्यावेळी मानी व महत्वाकांक्षी स्वभावामुळे शिवरायांना वाटू लागणे स्वाभाविकच होते. शिवाजी महाराज ब्राम्हणांचा व मुसलमानांचा मुळीच व्देष करीत नव्हते. हे विषद करुन सांगण्यासाठी शिवाजी महाराजांनी ब्रम्हे नावाचे आपले उपाध्ये यांना ''आपल्या अनुष्ठाने राज्यपद पावलो'' या प्रमाणे लिहिलेल्या पत्राचा व दिलेल्यासनदेचा उल्लेख केला तव्दतच मुल्ला हैदर नावाचे मुसलमान की जो औरगंजेबाकडे जाऊन न्यायाधीशाच्या महतपदास चढला होता, अशा त्या थोर ईस्लाम धर्माच्या इसमाकडे गुप्त पत्रव्यवहाराचे काम शिवाजी महाराजांनी सोपविले होते. तसेच बाबा याकुत या यवनी सत्पुरुषाला शिवराय रामदासाप्रमाणे मानत असत, असे सांगितले. इतरही शिव चरित्राची माहिती दिल्यानंतर ज्या राष्ट्रात धैर्य नाही त्या राष्ट्राला जगण्याचा अधिकार नाही असे सांगून इतिहास कार सरदेसाई यांनी आपले भाषणाचा समारोप केला होता.

नंतर आभार प्रदर्शन होऊन समारंभ संपला होता. अमरावतीतील सर्व पक्षाच्या प्रमुख पुढाऱ्यांनी साजरा केलेला उत्सव त्यास रियासतकारासारखे लाभलेले अध्यक्ष पाहून ''आम्रात्या पिक सेविता समसमा संयोग की जाहला'' असा अभिप्राय त्या काळात नागरिक व्यक्त करीत असत.

१८) देवी सरोजिनी नायडू यांचे भव्य स्वागत :-

काँग्रेस नेत्या व सुविख्यात कवि कोकीळ सरोजिनीदेवी नायडू यांचे राष्ट्रीय सप्ताहा निमित्त दि. १२ एप्रिल १९४० रोजी उमरावतीस आगमन झाले. सांयकाळी ६ वाजता त्यांची भव्य मिरवणूक प्रताप चौकातून काढण्यात आली होती. ही मिरवणूक शहराच्या प्रमुख मार्गाने नेहरु मैदानात येऊन तेथे वीर वामनराव दादा यांचे अध्यक्षतेखाली देवी सरोजिनी यांचा सत्कार करण्यात आला. नगरपालिकेने त्यांना मानपत्र अर्पण केले होते. ''राष्ट्रीय सप्ताह'' या विषयावर प्रचंड जनसमुदायासमोर त्यांचे भाषण झाले होते.

देवी सरोजिनी नायडू (ज.१८७९ इ.) हिंदुस्थानातील प्रसिध्द काँग्रेस नेत्या, इंग्रजी भाषेतील जगप्रसिध्द कवयित्री व जगातील ख्यातनाम वक्त्यापैकी एक, मद्रास युनिव्हर्सिटीच्या मॅट्रीक नंतर वयाच्या १६ व्या वर्षी त्या इंग्लंडला गेल्या लंडन व कॅंब्रीज येथे त्यांनी शिक्षण घेतले, त्यांचा विवाह डॉ.गोविंद राहुल नायडू यांचेशी झाला होता. हा विवाह आंतरप्रांतीय (बंगाल-मद्रास) आणि आंतरजातीय (ब्राम्हण-ब्राम्हणेत्तर) असा होता. त्यांच्या कविता इंग्लंड मध्ये अतिशय लोकप्रिय झाल्या होत्या. जगप्रसिध्द वक्त्यात त्यांची गणना होत असे. वक्तृत्वाचे बाबतीत त्यांना जादुगार समजले जाई. देशासाठी त्यांनी अनेक वेळ तुरुंगवास भोगला. १९२५ साली कानपूर येथे भरलेल्या काँग्रेस अधिवेशनाच्या त्या अध्यक्षा होत्या. म.गांधीचे सोबत त्या राऊड टेबल कॉन्फरन्सला गेल्या होत्या. त्या समाज सुधारकहि होत्या. (त्यांच्या सुपुत्री श्रीमती पद्मजा नायडू ह्या स्वातंत्र्योत्तर काळात पश्चिम बंगालच्या राज्यपाल होत्या.)

१९) १९४१ ची पोट निवडणुक :-

लोकनायक बापूजी अणे यांनी व्हाईसरॉयच्या एक्झिक्युटिव्हचे सभासदत्व स्वीकारल्यामुळे त्यांना आपल्या मध्यवर्ती असेम्बली सभासदत्वाचा राजीनामा द्यावा लागला. त्यामुळे वऱ्हाडातून ही जागा रिकामी झाली होती. या जागेची पोट निवडणुक नोव्हेंबर १९४१ मध्ये होऊन काँग्रेसचे उमेदवार वीर वामनराव दादा हे प्रचंड बहुमतांनी निवडून आले होते. त्यावेळी झालेले मतदान असे होते ?

वीर वामनराव दादा (कॉग्रेस)	३९६३
श्री.कानिटकर (हिंदू महासभा)	१७७५
डॉ.पटवर्धन (पुरोगामी संघ)	६२७

त्या काळात ही पोट निवडणूक गाजली होती. मतदारांची संख्या मर्यादित होती. वरील निकालाची घोषणा दिनांक २२ नोव्हेंबर १९४१ रोजी करण्यांत आली होती.

२०) बॅरिस्टर शरदचंद्र यांचे अटकेचा निषेध :-

बाबू सुभाषचंद्र बोस यांचे बंधू व बंगालचे पुरोगामी नेते बाबू शरदचंद्र बोस, बार-ॲट-लॉ यांच्या अटकेचे निषेधार्थ दि. २८ डिसेंबर १९४१ रोजी. दे.भ. पन्नालालजी संघई यांचे अध्यक्षतेखाली खापर्डे बगीच्याचे मैदानावर पुरोगामी संघाचे विद्यामाने जाहीर सभा भरुन पुण्याचे दे.भ. एन.व्ही. गाडगीळ यांचे भाषण झाले होते.

त्यापूर्वी दि. २७ डिसेंबर रोजी त्याच ठिकाणी नागरिकांची जाहीर सभा भरुन, बिहार सरकारने हिंदूसभेच्या भागलपूर अधिवेशनावर जी बंदी घातली त्याबद्दल निषेध व्यक्त करण्यात आला होता. या सभेत सर्वश्री के.गो.जोग, डॉ.मशानकर, श्री.बारलिंगे यांची भाषणे झाली होती.

(१. उदय : दि. २२ नोव्हेंबर १९४१.)

इ.स. १९४२

१) अमरावतीत गव्हर्नरांचा दरबार.
२) संत गाडगेबाबांचे अमरावतीत पहिले कीर्तन.
३) फॅसिस्ट विरोधी मेळावा.
४) बॉब हल्याचे प्रात्यक्षिक.
५) सर मोरोपंत पी.के. झटापट.
६) कम्यु. पार्टीवरील बंदी उठली.
७) ९ ऑगस्ट ची सभा.
८) श्री.कारंजकरांचे चळवळीतील योगदान.
९) श्री.के.जी.देशपांडे दिवंगत.
१०) श्रीमती पटेरिया यांचे योगदान.
११) सिव्हिल तिबर्टीज युनियन.
१२) वृत्तपत्रांवरील बंधने वाढली.
१३) उपासमार धान्य टंचाई विरोधी मोर्चे.
१४) २ ऑक्टोंबर १९४२.
१५) आझाद हिंद रेडिओ.
१६) सुभाष बाबूंच्या भेटीसाठी श्री.गोखले.
१७) नुकसान कर्त्यांची माहिती देणाऱ्यांना बक्षीसे.
१८) चिमूर अत्याचारांच्या चौकशीची मागणी.
१९) अब काहे धूम मचाते हो.
२०) भारत छोडो आंदोलन.
२१) दे.भ. देवकिसनजी झंवर.
२२) कार्यकर्त्यावरील खटले.
२३) दे.भ. एस. सत्यमूर्ती अमरावती कारागृहात.
२४) क्रांतिकारी भूमिगत कार्यकर्ते अमरावतीत.
२५) डॉ.पटवर्धन काँ. मधून निलंबित.

इसवी सन १९४२

१) उमरावतीत गव्हर्नरांचा दरबार

दि. ३० जानेवारी १९४२ रोजी उमरावतीतील रिझर्व्ह पोलीस लाईनचे मैदानावर मा. गव्हर्नर, मध्यप्रात वऱ्हाड यांचा भव्य दरबार भरुन गव्हर्नरांच्या हस्ते पदवीदान समारंभ करण्यांत आला. उमरावतीत भरलेला अशा तऱ्हेचा पहिलाच दरबार होता. त्यावेळी कॉन्व्हेंटच्या मदर सुडोंनी यांना "कैसर-इ-हिंद" सिल्व्हर मेडल देण्यात आले आणि रावसाहेब श्री.द.रणदिवे ॲडव्होकेट यांना "रावबहादुर" व युध्दवार्तेचे ऑ.संपादक ॲड द.आ. शिदोरे यांना "रावसाहेब" अशा पदव्या गव्हर्नरांनी दिल्या. या समारंभात सर मोरोपंत यांचे आणि शेवटी गव्हर्नरांचे भाषण झाले होते. ब्रिटीश आमदानीत राजनिष्ठे बद्दल अशा पदव्या सरकारतर्फे बहाल केल्या जात असत.

२) संत गाडगे बाबांचे कॅम्प विभागांत झालेले पहिलेच कीर्तन :-

संत गाडगे बाबा यांचे, उमरावतीच्या कॅम्प विभागातील सेठ भवाशंकर चतुर्भुज दोशी यांच्या बंगल्या नजीक, दि. १७ फेब्रुवारी १९४२ रोजी कीर्तन झाले होते. सुमारे वीस हजार श्रोते कीर्तन ऐकण्यासाठी उपस्थित होते.

कॅम्प मध्ये प्रचंड जमावा समोर झालेले हे पहिलेच कीर्तन होय.

३) उमरावतीचा फॅसिस्ट विरोधी मेळावा :-

विदर्भ किसान सभेतर्फे उमरावतीच्या नेहरु मैदानावर दि. २० मे १९४२ रोजी, विदर्भ प्रांतिक किसान परिषदेचे २ रे अधिवेशन आणि फॅसिस्ट विरोधी मेळावा भरविण्यात आला या मेळाव्यासाठी किसान सभेचे कार्यकर्ते व नेत्यांनी अनेक दिवस अगोदर पासूनच सर्व विदर्भात प्रचार दौरे काढून ठिकठिकाणी सभा घेतल्या व तयारी केली होती. त्यामुळे या मेळाव्याला सुमारे पाच हजार शेतकरी व तितकेच इतर कामगार वगैरे मिळून सुमारे दहा हजार लोक हजर होते.

गुजरातचे किसान पुढारी श्री.इंदुलाल याज्ञिक यांनी अध्यक्षस्थान स्वीकारले होते. स्वामी सहजानंद यांनी किसानांना संदेश दिला.

या मेळाव्याचे मुख्य आकर्षण म्हणजे त्यासाठी उभारलेले भव्य व्यासपीठ. हे व्यासपीठ तोफा बसविलेल्या चिलखती रणगाड्या सारखे हुबेहुब केलेले होते व मागे १५ फुट उंच असा ''शेतकरी-कामकरी'' जोडप्याचा प्लायवूड कट केलेले भव्य पुतळा होता. सर्वत्र विळाकोयत्याचे चिन्ह असलेले लाल झेंडे झळकत होते.

४) अमरावती बॉम्ब हल्याचे प्रात्यक्षिक :-

दुसऱ्या महायुध्दाचे काळात दि. ७ ऑगस्ट १९४२ रोजी, अमरावती वर बॉम्ब हल्ला झाला. त्याबरोबर वार्डन्नी सिटी वाजविली. तांगेवाले, बैल गाडीवाले, पादचारी यांनी ताबडतोब खंदकांचा आश्रय घेतला. अनेक दुमजली घरांना आगलाव्या बॉम्बमुळे आगी लागल्या. वार्डनच्या सूचनेवरुन आग आटोक्यांत आणणाऱ्या पथकांकडून आग आटोक्यात आणण्याचे प्रयत्न सुरु झाले. घरातील लहान मुलांना बाहेर काढण्यात आले. जखमी झालेल्यांना त्वरित प्राथमिक उपचार करण्यात आले व नंतर त्यांना दवाखान्यात नेण्यात आले. आगी विझविणाऱ्या पथकाने आग विझविली.

त्याच वेळी दुसऱ्या भागांत काही लुटारुंनी या संधीचा फायदा घेऊन दुकाने लुटण्याची खटपट सुरु केली होती, तेव्हा सिव्हील गार्डने तेथे जाऊन लूटमार थांबविण्याचा प्रयत्न केला.

शेवटी ''सब कुछ ठिक'' या इशारा देण्यारा भोंगा वाजल्यावर मृत झाले असे दाखविण्यात आलेल्या इसमांना उचलून नेण्यात आले. वरील सर्व प्रकार उमरावतीतच घडला पण तो नेहरु मैदानावर (त्यावेळचा नेकोलेट पार्क) घडला. युध्दकाळातील ए.आर.पी. (हवाई हल्ला प्रतिबंधक दल) आणि सिव्हील गार्ड संघटनांच्या वतीने कमिश्नर साहब आणि हजारो लोकांसमक्ष हे हवाई हल्याचे प्रात्यक्षिक नेकोलेट पार्कवर, आगाऊ जाहीर केल्याप्रमाणे, करुन दाखविण्यात आले होते.

वरील संघटनाचे वतीने हवाई बॉम्ब हल्ला झाल्यात कसे वागावे, आग लागल्यास ती आटोक्यात कशी आणावी इत्यादिंची प्रात्यक्षिके करुन दाखविण्यात आली होती. त्यावेळचे वर्णन वर दिलेले आहे.

इ.सन. १९४२ मध्ये हिंदुस्थानच्या पूर्वेकडून जपानने हवाई हल्ले सुरु केले होते. प्रत्यक्ष कलकत्ता शहर व मद्रास किनाऱ्यावर बॉम्ब फेकण्यात आले होते. त्यामुळे देशातील सर्व शहरातून वरील संघटना निर्माण करण्यात आल्या व बॉम्ब हल्ला वगैरे झाल्यास कसे वागावे ह्यासाठी वरील प्रमाणे प्रात्यक्षिके दाखविली गेली. प्रात्यक्षिका नंतर कमिश्नरांनी दोन्ही दलाची पहाणी केली. मार्च पास्ट झाला. परेडमध्ये सामील होणाऱ्या ए.आर.पी. स्वयंसेवकांची संख्या ८०० पर्यन्त होती.

त्यावर्षी १८ डिसेंबरचे सुमारास भारतावर पूर्वेकडून युध्दाचे संकट वाढले. कलकत्यापर्यन्त जापानी विमानांनी बॉम्ब हल्ले केले. त्यामुळे देशांत ''ब्लॅक औट'' ची प्रात्यक्षिके सुरु झाली. डिसेंबर १८ पासून तीन दिवस उमरावतीत ''ब्लॅक औट'' चा प्रयोग झाला. रात्री दिव्यांचा उजेड घराच्या बाहेर येऊ नये व संपूर्ण शहर काळोखात राहून बॉम्ब हल्ले करणाऱ्या विमानांना शहर दिसू नये म्हणून रस्त्यावरील दिव्यांना शेड्स लावण्यात आले होते. घरांच्या ज्या खिडक्यांना काचा असत त्यांना रंगीत कागद लावून रात्री त्यातून बाहेर उजेड येणार नाही अशी व्यवस्था करण्यांत आली होती. मोटारीचे दिव्याचे अर्ध्या भागाला रंग लावून प्रकाशाची तीव्रता कमी करण्यात आली होती.

याशिवाय युध्द साहित्याच्या नमुन्यांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. युध्द काळात उमरावती शहर वरील अवस्थेत होते. शिवाय पुढे १९४२ चे भूमिगत आंदोलन सुरु झाल्यानंतर सर्व रेल्वे लाईन्स वर बंदुकधारी पोलीसांचे पहारेच ठेवण्यात आलेले होते.

युध्द सुरु असल्याने बॉम्ब हल्यांची भीती होती. त्यामुळे सर्व देशभर ब्लॅक औट व हवाई हल्ला प्रतिबंधक उपायांची प्रात्यक्षिके, ए.आर.पी. दलांत व सैन्यात

भरती, सिव्हील गार्डची संघटना, युध्दाला पैशाचे रुपाने मदत वॉर बॉन्डची विक्री, अशा अनेक गोष्ट सरकारतर्फे चालू होत्या. युध्दप्रयत्नात अडथळा आणणाऱ्यास शिक्षा होत असे. विदेशी रेडियो ऐकण्यांस निर्बंध, वर्तमान पत्रांतील बातम्यांवर बंधने, महागाई , टंचाई, इत्यादिसाठी सरकारी उपाय ह्या गोष्टी चालू होत्या. वरील प्रात्यक्षिक त्यांतीलच एक भाग होता.

५) नॅशनल वॉर फ्रंटच्या सभेत सर मोरोपंत, पी.के.झडप :-

नॅशनलल वॉर फ्रंटच्या विद्यमाने येथील जोशी हॉलमध्ये दि.२ ऑगस्ट १९४२ रोजी भरलेल्या सभेत सर मोरोपंत जोशी यांनी कॉग्रेसला दिलेले आव्हान स्वीकारुन श्री.पी.के. देशमुख, अध्यक्ष जिल्हा कॉग्रेस कमिटी, यांनी भाषण दिले. त्यामुळे सभेत गोंधळ उडाला व सभा बरखास्त करावी लागली. सभेनंतर श्री.पी.के. देशमुखांवर अविवेकीपणाचा आरोप करण्यात आला होता. नंतर श्री.पी.के. देशमुखांनी वृत्तपत्रांतून खुलासा केला. सर मोरोपंतानीही वृत्तपत्रातून आपले म्हणणे मांडले. पुढे ऑगस्ट आंदोलनांस श्री.पी.के.देशमुखांना १० ऑगस्ट रोजी अटक झाली आणि या प्रकरणावर आपोआप पडदा पडला होता.

६) पक्षावरील बंदी उठल्यानंतरची कम्युनिस्ट पार्टीची पहिली सभा :-

भारतीय कम्युनिस्ट पक्षावरील बंदी सरकारने काढून घेतल्यानंतर भारतीय कम्युनिस्ट पक्ष हा कायदेशीर पक्ष म्हणून वावरु लागला. या पक्षाच्या उमरावती शाखेतर्फे दि. ६ ऑगस्ट १९४२ रोजी, बंदी उठल्या नंतरची पहिली जाहीर सभा, विदर्भ किसान सभेचे सरचिटणीस आचार्य त्र्यंबक गुरुजी यांच्या अध्यक्षतेखाली जोशी हॉलमध्ये ''राष्ट्रीय मागण्यांचा पाठींबा देण्या करता भरली होती. सभेला अतोनात गर्दी होती.

७) ९ ऑगस्टची सभा :-

दि. ९ ला सायं ६ वा. दे.भ. रतनलालजी काळे यांना अटक होण्यापूर्वी कांही करणे शक्य असेल तर करावे या विचाराने ते वडाळी येथे गेलेत. तेथील कॉ. कार्यकर्ते

श्री.शेंडे यांच्या सहाय्याने वस्तीतील बऱ्याच मंडळीस धरुन बोलावण्यात आले व अंधारातच सभा घेण्यात आली. रतनलालजीनी या सभेत "अमरावती डिस्ट्रीक्ट सेन्ट्रल जेल" उडविण्याचा सल्ला या सभेतील लोकांना दिला व तेथून रात्री ८ वा. ते बडनेऱ्यास पोचले. तेथील जुन्या वस्तीत कॉ.कार्येकर्ते श्री.दातीर यांच्या सहकार्याने गावातील लोकांना घरोघरी जाऊन बोलावून आणल्या गेले व अंधारातच तेथील सभा पार पडली. या सभेतही त्यांनी बडनेरा रेल्वे स्टेशन उडवून देण्याचा लोकांना संदेश दिला. ही सभा आटोपून कांही मंडळीसह ते रेल्वे यार्डाकडे निघाले. रेल्वे यार्डात बडनेरचे सर्कल इन्सपेक्टर श्री.केकरे हे आपल्या पोलीस पार्टीसह उभे होते. त्यांना चाहूल लागतांच त्यांनी बॅटरीचा झोत या लोकांच्या अंगावर फेकला. तेव्हा रतनलालजींनी सोबतच्या लोकांना परत जाण्याचा सल्ला देऊन ते पोलीसचे स्वाधीन झाले. दुसऱ्या दिवशी त्यांना अमरावती तुरुंगात स्थानबध्द करण्यात आले?.

दि. १० ऑगस्टचे रात्री जोग चौकात प्रचंड जाहीर सभा भरली. तीत मुंबईहून पोलीसांची नजर चुकवून आलेले श्री.पी.के.देशमुख यांचे भाषण होणार अशी शहरात वदंता असल्याने, मुंबई कॉंग्रेसचा संदेश ऐकण्यासाठी सभेला अतोनात गर्दी झाली. सभेच्या वेळी अधिकाऱ्यांनी लाठीधारी पोलीसांची एक तुकडी जोग चौकातील न्यू हायस्कूलच्या इमारतीचे बाजूने (काशीबाई काण्णव बिल्डींग समोर) आणून उभी केली होती. शिवाय जोग चौकाच्या दोन बाजूंचे रस्त्यावर पोलीस व्हॅन्स उभ्या ठेवल्या होत्या. सर्वत्र दहशतीचे वातावरण होते. प्रभात थिएटरच्या बाजूनेहि सर्वत्र काळोख होता रस्त्यावरील कांही दिवे मधून मधून चालू होते तेवढाच काय तो प्रकाश, जोग चौकातहि फक्त सभेच्या ठिकाणी एक विजेचा दिवा चालू होता.

रात्री बऱ्याच उशीरा अचानक एका कोपऱ्यातून श्री.पी.के.देशमुख व्यासपीठावर आले. त्यावेळी श्री.सिंघई वकील हे प्रास्ताविक भाषण करीत होते. ते बंद करुन लगेच श्री.पी.के.देशमुख यांनी आपले भाषण सुरु केले न केले तोच

पोलीस अधिकाऱ्यांनी व्यासपीठावर येऊन त्यांना अटक केली.

दि. ९ ऑगष्ट रोजी सकाळीच श्री.पी.के.देशमुख हे मुंबईचे अधिवेशनातून पोलीसांची नजर चुकवून रेल्वेने अमरावतीस यायला निघाले. परंतु मुर्तीजापूरला आपल्या मागे सी.आय.डी.आल्याचा संशय आल्यावरुन ते तेथेच गाडीतून उतरले व मोटारने अमरावतीस दसरा मैदानावर येऊन उतरले आणि नंतर दुसऱ्या मार्गाने ते श्री.देवकिसनजी झंवर यांच्या खोलीवर आले. श्री.पी.के. देशमुख यांच्यावर सरकारने पकड वारंटही काढले होते.

अशा स्थितीत विचार विनिमय होऊन असे ठरते की, आज रात्री (१० ऑगष्टला) जोग चौकात जाहीर सभा घ्यावी व तेथे श्री.पी.के.देशमुख यांनी ८ ऑगष्टच्या संदेश लोकांना सांगावा. त्यासाठी वेष बदलण्याचा निर्णय घेण्यात आला व त्यानुसार वेष बदलून श्री.पी.के.देशमुख यांना त्यांचे घरी, काळाराम मंदिराच्या मागच्या एका रस्त्याने पोचविण्यात आले. (त्यावेळी ते मच्छीसात मधील वाड्यात रहात असत.)

इकडे रात्रीच्या जाहीर सभेची घोषणा करण्यात आली. या सभेची व्यवस्था श्री.देवकिसनजी झंवर यांनी केली होती. रात्री ८ वा. जोग चौकात सभा भरली. या सभेसाठी श्री.पी.के.देशमुख हे राहात्या घरुन डोक्याला मोठा गुलाबी पटका, लांब काळी शेरवानी व अथकन अशा वेषात निघाले व साबनपुऱ्यातून जोशी हॉलचे मागच्या बाजूने तार होते तेथून येऊन व्यासपीठावर बसले. सभेला सुरुवात झाली. सभेला प्रचंड जनसमुदाय हजर होता. सभेला थोडी उशीरा सुरुवात झाली.

सुरुवातीला दे.भ. बालकिसनजी भंडारी यांचे व त्यांचे नंतर दे.भ. सुदर्शनजी सिंघई वकील यांची भाषणे झालीत. नंतर आठ ऑगष्टच्या संदेश सांगण्यासाठी श्री.पी.के.देशमुख हे आता बोलतील'' अशी घोषणा करण्यात आली. परंतु पी.के.देशमुख लोकांना कोठेच दिसत नव्हते. क्षणार्धात लाऊडस्पीकर समोर तालकुटा व काळी शेरवानी घातलेली एक व्यक्ती उभी झाली

आणि त्यांनी भाषणाला सुरुवात केली तेव्हा आवाजावरुन हेच पी.के.देशमुख हे लोकांनी ओळखले व टाळयांचा प्रचंड कडकडाट झाला. तेवढ्यात सरकारी अधिकारी व्यासपीठावर आले आणि त्यांनी श्री.पी.के.देशमुख यांना लागलीच वारंट दाखवून अटक केली. तेव्हा सभेने त्यांचा प्रचंड जयजयकार केला.

(श्री.देवकिसनजी झंवर यांनी दि. १०.८.८० ची मुलाखत)

त्याच वेळी लाठीधारी पोलीसांचा जत्थापुढे सरकला त्यामुळे सभेत लोटालोटी झाली. सर्व गर्दी मागे लोटल्या गेली. त्या रेट्याने जोग चौक कंम्पौन्डची तांगा स्टॅन्ड कडील भिंत कोसळली व त्याखाली लोक दबल्या गेलेत. आणि नंतर सभेतील लोक टोळी टोळीने शहराच्या विविध मार्गाने घोषणा देत व दगडफेक करीत घराकडे परतले. त्यांनी रस्त्यावरील दिव्यांचे बल्ब फोडले. निरनिराळ्या सरकारी इमारतींवर आणि पोलीस वर दगड फेड केली.

पोलीस आणि तरुणांत लढत :-

ह्या सभेतून निघालेल्या लोकांचे जत्थ्यातच एक मोठा जत्था जयनारायण खंडेलवाल आणि श्री. बापू कारंजकर यांचे नेतृत्वाखाली जवाहर रोडने, भुसारी गेटचे आंत आला. त्यांनी सक्करसाथीतील नगर काँग्रेस कमेटीला पोलीसांनी लावलेले सील तोडून कचेरी उघडी करुन दिली. त्यानंतर हा जमाव, सराफा, भाजीबाजार, बुधवारा या मार्गाने रात्री एकचे सुमारास गांधी चौकात आला. त्यावेळी तेथे रस्त्यासाठी टाकलेल्या गिट्टीचे ढीग पडले होते. तेथेच सभा घेण्याचे ठरले. गांधी चौकात मोटार लॉऱ्या उभ्या होत्या त्यावर चढून कारंजकर हे भाषणास सुरुवात करतात त्याचवेळी समोर साबणपुरा खिडकी बाहेरील भोंदणीचे झाडाखाली त्यावेळच्या डै. कमिशनर मेलटूम हा हातात पिस्तुल घेऊन उभा असल्याचे दिसून आले. समोरच एका बाजूला सैनिक भरती दप्तरातील रेडीयो व फर्निचर रस्त्यावर आणून लोकांनी जाळले होते. ती आग अजून धुमसत होती तर

दुसऱ्या बाजूने (त्यावेळी) तेथील डफरीन हॉस्पीटलच्या उत्तरेकडील कंपौन्ड वॉलच्या आड लाठीबंद पोलीस उभे होते. लोकांनी हे दृश्य पाहिले आणि जोरजोराने घोषणा देत त्या बाजूला दगड फेक सुरु केली. तेव्हा डै. कमिश्नर मेलटूम याने लाठीधारी पोलीसांना या जमावावर हल्ला करण्याचा आदेश दिला. लाठीधारी पोलीस, जुने डफरीन हॉस्पीटलच्या कंपौन्ड वॉलचा आश्रय घेऊन पुढे सरकू लागले. कारण दगफेक सुरु होती. पुढे सरकणाऱ्या पोलीसांवर जमावाने बेसुमार दगडफेक चालू ठेवली तरीही लाठीधारी पोलीस ते हुकवीत शेवटी गांधी चौकात पोचले व त्यांनी जमावावर लाठी हल्ला केला. त्यामुळे जमाव उधळला. तरीही दगडफेक व लाठी हल्हा चालूच होता. सुमारे अर्धा तास ही लढाई सुरु होती. नंतर पांगापांग झाली.

रात्रीच लोकांच्या जमावाने पोस्टाच्या पेट्या, टेलीफोनचे तार व खांबे, विजेचे दिवे इत्यादीची नासधूस केली. रस्त्यात अडथळा निर्माण करुन ठेवले. दि. ११ ऑगस्टला, मुंबईत कॉग्रेस बैठकीहून परतलेले डॉ. पटवर्धन यांना उमरावती स्टेशनवर अटक करण्यात आली. त्याच दिवशी श्री.सिंघई वकील व श्री.वालकिसनजी भंडारी यांनाही अटक झाली. (श्री.सुदर्शन सिंघई वकील ह्यांनी भाजीबाजार मधून निघालेल्या मोर्चाचे नेतृत्व केले होते. हा मोर्चा जवाहर रोडने घेऊन, नगर वाचनालयापर्यन्त आला तेव्हा तेथेच श्री.सिंघई यांना अटक करण्यात आली.

विद्यार्थ्याचे जमावाने तार ऑफीस व पोस्ट ऑफीसवर दगडफेक केली. अनेक ठिकाणी घोषणा होत होत्या. सर्व दुकाने व शाळा बंद होत्या. सरकारने १३४ कलम लागू केले व कर्फ्यु पुकारला. तरीही रात्री सभा भरविण्याचा प्रयत्न झालाच. परंतु पोलीसांनी लाठीहल्ला करुन जमाव उधळून लावला. त्यावेळी झालेल्या दगडफेकीत डिस्ट्रीक्ट मॅजिस्ट्रेट, डी.एस.पी., व सीटी इन्सपेक्टर, यांना मार लागला. एकूण ८० लोकांना अटक झाली. त्यात श्री.रघुनाथमलजी कोचर यांनाही अटक झाली.

दि. १२ ऑगस्टला देखील विद्यार्थ्यांचे जमाव शहरात फिरत होते. रस्त्या रस्त्यावर दगड, टेलीफोन तारा यांचे अडथळे केलेले होते. कोठे कोठे दगडफेक वगैरे चालू होती. शहरात पोलीस गस्त सुरु होती. सर्व बाजार बंद होता. वातावरण तंग होते. त्यावेळी सिटीसुपरिन्टेन्डेटचे जागेवर श्री.गद्रे नावाचे अधिकारी होते. त्यांनी शहरात अशांतता होऊ नये व विशेषत: विद्यार्थ्यांनी या आंदोलनात भाग घेऊ नये म्हणून प्रतिष्ठित नागरिकांच्या सहीने एक पत्रक काढविले. ते पत्रक असे --

- जाहीर विनंती -

काल दिवसा व रात्री शहरात बऱ्याच ठिकाणी फार नुकसान करण्यात आले. टेलिफोनच्या तारा तोडण्यात आल्या. इंपेरिअल बॅंकेवर दगड मारण्यात आले. ताराचे खांबे उपटून फेकण्यात आले. रिक्रुटींग ऑफीसचे सामान जाळण्यात आले व कांही ठिकाणी पोलीसावर दगडफेक करण्यात आली अशा तऱ्हेने पुष्कळच अनुचित प्रकार घडले व ते बरेचशे विद्यार्थ्याकडून घडले असे ऐकण्यात येते. वरील प्रकार करण्यास महात्मा गांधी यांची आज्ञा आहे असाहि समज पसरविण्यात येत आहे.

महात्मा गांधीच्या तत्वाच्या व अनत्याचारी ध्येयाच्या हे अगदी विरुध्द आहे असे आम्हाला प्रामाणिकपणे वाटते व असाच प्रकार चालू राहिल्यास सर्वत्र अंधाधुंदी माजून सर्व नागरिकांचे व विशेषत: मुलांचे फारच नुकसान होईल. तरी या पत्रकाव्दारे सर्व पालकास आमची अशी विनंती आहे की, त्यांनी आपल्या मुलास अशा गोष्टी पासून ताबडतोब परावृत्त करावे.

कळावे, ता. १२.८.४२

एकूण पंधरा सह्या

या पत्रकाचा परिणाम असा झाला की, त्या पत्रकांवर सह्या करणाऱ्यांपैकी कांही लोकांचे तोंडाला नंतर डांबर फासण्यात तरुण मंडळी यशस्वी झाली. त्यामुळे

पुन्हा कोणती पत्रकारावर सही द्यायला तयार होईना. तसेच भुमिगत कार्य करणाऱ्या स्थानिक तरुणांची सरकार धार्जिण्या लोकांत दहशत निर्माण झाली होती.

एकीकडे हा प्रकार घडला आणि दुसरीकडे मुंबई संदेशाच्या सायक्लोस्टाईल प्रति देऊन काही लोक मोर्शी रोडने व कांही लोक अचलपूर रोडने निघांले. त्यात काही लोकांना पकडण्यात आले. नंतर ही १९४२ ची चळवळ भूमिगत झाली. चिमूर, आष्टी, यावली व बेनोडा येथील आंदोलनाच्या बातम्या उमरावतीत येऊन पोचल्या होत्या त्यामुळे पुन्हा उमरावतीत मिरवणूकी काढण्याचा स्वयंस्फूर्त प्रयत्न झाला. पण पोलीसांनी तो मोडून काढला व धरपकड केली. त्याच दिवशी ॲंग्रीकल्चर असोसिएशन मधील कागदपत्रास आग लावण्याचा प्रयत्न केला. हे उघडकीस येताच, आग त्वरीत विझविण्यात आली. शुक्रवारी अटक झालेल्या विद्यार्थ्यांची सुटका झाली. अटक करुन तुरुंगात ठेवलेल्या पैकी ९० लोकांना सोडण्यांत आले १. स्टेशनवर दगडफेक करण्यांत आली. याच सुमारास सरकारने वृत्तपत्रांवर नवीन बंधने घातल्यामुळे, नागपूरची वृत्तपत्रे बंद ठेवण्यात आली होती. अमरावतीत बातम्या फारच संक्षिप्त येत असत. रेडियो ऐकण्यावरहि प्रतिबंध होतेच.

दि. १९ ऑगष्टला सरकारने प्रसिध्द केलेल्या पत्रकांत ..... आष्टी ठाण्यांतील ४ शिपाई जमावाने ठार मारले. दोघांना घासलेट टाकून जाळण्यात आले व पोलीस अधिकाऱ्याला दगडाने ठेचून ठार केले गेले. चिमुर येथेही चार अधिकारी लोकांनी ठार मारले त्यांची प्रेतेही निदर्शकांनीच जाळली. सरकारी निवास त्यांच्यातील एक एस.डी.एम. व नायब तहसिलदार यांचा खून करण्यात आला.,

नागपूर शहर व प्रांतांत इतर ठिकाणी पूर्ण अराजक आणण्यासाठी लोकांनी वाटेल ती निदर्शने केली. सरकारी इमारती, रेल्वे, तारा, यांचा नाश करण्यात आला. इतकेच नव्हेतर अनेक अधिकाऱ्यांना ते कर्तव्य करीत असताना कठोरपणे मारण्यात आले. पोलीस व लष्करावर या आंदोलनातील कामाचा खूप ताण पडला आहे असे म्हटले आहे.

दि. २८ ऑगष्टला सरकारी अधिकाऱ्याची उमरावतीत प्रेस कॉन्फरन्स झाली. त्यावेळी यांनी दिलेली माहिती अशी जिल्ह्यात आता सर्वत्र शांतता आहे. आता पर्यन्त अटक झालेल्या पैकी १४७ लोकांना सोडण्यात आले. त्यापैकी बरेचसे दि. ११ व १२ रोजी उमरावतीत झालेल्या दंगलीत अटक झालेले होते. यावली येथील गोळीबारात ४ ठार व जखमी झाले .....

नासधूस करणारे, आंदोलनांत भाग घेणारे अशांचे खटले तडकाफडकी निपटण्यासाठी सरकारने खास फौजदारी कोर्ट नेमले व उमरावती जिल्ह्यात लष्करी तुकडीची गस्त सुरु केली.

सप्टेंबर १९४२ मध्ये श्री संत तुकडोजी महाराज यांना चांदा जिल्ह्यात अटक करण्यात आली. "अब काहेको धुम मचाते हो" या त्यांच्या त्यावेळच्या प्रख्यात गीता बद्दल त्यांना अटक झाली होती.

वरील प्रेस कॉन्फरसन्स मध्ये आणि १९ तारखेचे सरकारी प्रसिध्दी पत्रकांत अमरावतीत गोळीबार झाल्याचे कोठेही नमूद नाही हे लक्षात ठेवले पाहिजे कारण दि. ९ ऑगष्ट १९८१ रोजी अमरावतीत स्वातंत्र्य संग्राम शहीद स्मृती गृहाच्या जागेचे भूमिपूजनाचे प्रसंगी राज्य शासनाच्या जिल्हा प्रसिध्दी अधिकाऱ्यांशी प्रसिध्द केलेल्या पुस्तिकेत, अमरावती येथील गोळीबारात कृष्णाबाई रंगारी शहीद झाल्याचे म्हटले आहे. अर्थातच ही गोळीबाराची माहिती चुकीवर आधारीत आहे हे उघड आहे.

वरील १० ऑगष्टच्या सभेनंतरच्या काळात शहरात व ग्रामीण भागांत "सायक्लोस्टाईल बुलेटीन" (१९४२ चा संदेश देणारे) काढणे व वाटणे हा कार्यक्रम गुप्तपणे सुरु केला गेला. त्यासाठी शहराच्या निरनिराळ्या चार भागात चार सायक्लोस्टाईल मशीन्स गुप्तपणे ठेवल्या होत्या. पैकी एक मशीन विदर्भ महाविद्यालया जवळील (त्यावेळचे किंग एडवर्ड कॉलेज) एका म्हशीवाल्यांचे झोपडीत ठेवली होती तर दुसरी मशीन पोलीस खात्यात पोलीसाची नोकरी

करणाऱ्या इसमाचे मास्तर असलेल्या भावाचे घरात ठेवली होती. तिसरी मशीन भाजी बाजार विभागात (ब्राम्हणवाडा) श्री.बालाजी कळसकर यांच्या घरात व चौथी मशीन फिरती. या प्रमाणे चारी ठिकाणहून बुलेटीन आळीपाळीने काढून ती वाटण्यात येत असत. त्यावेळी मोटार स्टॅन्डवर ड्रायव्हर म्हणून काम करणारा उत्तम पहेलवान या नांवाचा एक तरुण जुगलकिोर आखाड्यात येत होता. एकंदर वातावरणाने त्याला प्रेरणा निर्माण झाली व त्याने श्री.देवकिसयनजी झंवर यांचेकडे येऊन मलाही काही काम सांगा असे म्हटले वरुन त्याचे जवळ बुलेटीनच्या प्रति देऊन मोर्शीकडे रवाना केले. हे उत्तम पहेलवान त्या बुलेटिन्सच्या प्रति घेऊन यावली, मोर्शी व बेनोडा येथे गेल्यानंतर तेथेही आंदोलन पेटले. उत्तमला अटक झाली. पण यावेळी बेनोडा येथे नंतर गोळीबार होऊन कांही लोक शहीद झालेत.

.. श्री देवकिसनजी झंवर यांची दि. १०.८.८० रोजी घेतलेली मुलाखत

---

८) ग्रंथकर्त्याचे १९४२ च्या चळवळीतील योगदान :-

दि. १० ऑगष्ट १९४२ च्या रात्री जोग चौकातील प्रचंड जाहीर सभेत दे.भ. पी.के. देशमुख यांना अटक होताच सभेत घोषणा व गडबड सुरु झाली. तसे लाठीधारी पोलीसचे पथक पुढे सरकले आणि सभेतील लोक मागे रेटल्या गेले. त्यामुळे जोग चौकाच्या उत्तरेकडील कंपौन्डची भिंत पडली. त्यात काही तरुणांना मार लागला त्यापैकी जास्त जखमी झालेले तरुणास, त्यावेळी प्रभात टॉकीज समोरच्या इमारतीत रहाणारे डॉ.हंतोडकर यांनी उपचार केले होते.

सुमारे २००-२५० तरुणांचे नेतृत्व पत्करुन श्री.जगनारायण खंडेलवाल आणि ग्रंथकर्त्यांनी ही मिरवणूक जवाहर रोडने सक्कर साथमध्ये आणली व तेथील नगर कार्यालयाला पोलीसांनी जे सील ठोकले होते ते मोडून कार्यालय उघडे करुन दिले. नंतर भाजीबाजार, टिळक चौक मार्गे हा मोर्चा गांधी चौकांत आला. तेथे पोलीस

आणि मोर्चातील युवकांत चकमक उडाली. याचे वर्णन वर दिले आहेत.

दुसरे दिवशी म्हणजे ता. ११ रोजी ग्रंथकर्ता व त्याचे साथीदारांनी इतर शेकडो युवकांसह राजकमल चौक-रेल्वे स्टेशन या रस्त्यावरील टेलीफोनच्या तारा तोडण्यात भाग घेतला. सकाळी अकरा साडे अकराचे सुमारात सीटी कोतवाली समोरुन सीटी लायब्ररीकडे येत असतांना तत्कालीन सीटी सुपरिन्टेन्डेंट श्री.गद्रे यांनी या सर्वांना कोतवालीत बोलावून तंबी दिली व परत आपआपल्या घरी जा असे सांगून त्यांना जाण्यास सांगितले.

नंतरच्या काळात शहरातील व्यवहार सुरळीत सुरु झाले म्हणून ग्रंथकर्ता व त्याचे दोन मित्रांनी मिळून हस्तलिखित बुलेटिन काढणे सुरु केले होते. आठवड्यांतून एक दिवस हे बुलेटिन वाटले जात असे. त्याकाळी बुलेटिन लिहिणे सोपे होते पण वाटणे फार कठीण होते. कारण युध्द विरोधी प्रचाराला डिफेन्स ऑफ इंडिया ॲक्ट हाच उपयोगात आणला जात असे. हे कार्य सुमारे दोन महिने सुरु होते. पण शेवटी पैशाअभावी आणि वातावरणात फरक पडल्याने हे काम थांबविण्यात आले.

याच दरम्यान अशीही एक घटना घडली की, ग्रंथकार हे मलेरीयाने आजारी होते. पुढे प्रकृती ठीक झाली पण अशक्तता फार होती. म्हणून घरीच पडून होते. अशा वेळी जुन्या कोतवालीचे पोलीस इन्सपेक्टर श्री.वाटाणे हे एक दिवशी सकाळी ९ चे सुमारात ग्रंथकर्त्याचे घरी आले. प्रकृतीची विचारपूस केली आणि समोरच्या माडीत जाऊन बसले. त्यामुळे ग्रंथकर्त्याला शंका निर्माण झाली की, पोलीस इन्सपेक्टर येथे का बसले ?

थोडा वेळ गेला, तोंच "राजाभाऊ आहेत काय ?" असा आवाज आला म्हणून ग्रंथकर्त्यांनी खिडकीतून बाहेर पाहीले तो प्रधान नांवाचे सी.आय.डी. खात्यातील गृहस्थ श्री.राजाभाऊ बार्लिंगे यांचे पायरीवर पाय ठेवून सायकलसह उभे होते. त्या बरोबर ग्रंथकर्त्याला सर्व कल्पना आली. आपल्या घरी बसून भूमिगत

देशभक्त राजाभाऊ बालिंगे यांना अटक करण्याचा हा प्रयत्न हाणून पाडला पाहिले असा ग्रंथकर्त्याने निश्चय केला मातोश्रीस बोलावून मोहोल्यातील काही लोकांकडे पाठवून सर्वाना सावध केले व मोहल्याकडे येणारे प्रत्येक रस्त्यावर एकेका मुलास पाठवून, राजाभाऊ दिसल्यास त्यांना सावध करा अशा सूचना दिल्या त्या दिवशी राजाभाऊ बालिंगे हे अमरावतीस घरी येणार होते. याची बातमी पोलीस खात्यात कळली होती म्हणून हा सापळा त्यांनी रचला होता व त्यासाठी ग्रंथकर्त्याचे घराचा उपयोग करु पहात होते.

शेवटी प्रयोग यशस्वी झाला. श्री.राजाभाऊ बालिंगे हे मुंबईहून वेष बदलून व अमरावतीतील मुख्य रस्ते टाळून घराकडे येत असतानाच, त्यांना मुलांनी सावध केले व ते परत इतरत्र गेले आणि शेवटी रात्री मुंबईस परत गेले. त्यांना पुढे मुंबईत अटकही झाली.

पोलीसांनी मात्र ग्रंथकर्त्याला दोष दिला पण करतील काय ? सावज सुखरुप निसटले होते.

(१९४२ च्या स्वातंत्र्य संग्राम सैनिकाची यादी पुढे दिली आहे.)

१) श्री.के.जी.देशपांडे, वकील दिवंगत :-

उमरावतीचा एक "मासलेवाईक माणूस" गेला.

दरम्यानचे काळात दि. १० ऑगष्ट १९४२ रोजी, उमरावतीचे एक प्रख्यात वकील आणि पट्टीचे कास्तकार श्री.कृष्णाजी गोपाळ उर्फ भाऊसाहेब देशपांडे हे दिवंगत झाले. एक मासलेवाईक माणूस अशी त्यांची कीर्ती होती. त्यांनी नांगराला उंट जोडून शेती नांगरली आणि नांगराला हत्ती जोडल्यास किफायतशीर पडेल असे त्यांचे मत होते. शंकरपटाचा त्यांना फार नाद होता.

१०) श्रीमती सुंदराबाई मन्सुखलाल पटेरिया यांचे योगदान :-

१९४२ च्या आंदोलनाचे काळात "करा किंवा मरा" हा कॉंग्रेसने दिलेला

संदेश मोठा स्फूर्तीदायी प्रेरणादायी होता. अशा वेळी देशासाठी त्याग करण्याची, काहीतरी करुन दाखविण्याची दुर्दम्य इच्छा कोणाला होईल हे सांगता येत नव्हते. अशा काळांत अमरावतीच्या छत्रपुरी खिडकी विभागात रहाणाऱ्या एका साधारण परिस्थितीच्या जिजोदिया ब्राम्हण परिवारातील श्रीमती सुंदराबाई मन्सुखलाल पटेरिया (३५-३६) या महिलेने सरकारी कार्यालयात जाण्यासाठी मोर्चा काढला. मोर्चात थोड्या महिला व पुरुष होते. अमरावतीतील "झांशीची राणी" असे म्हणून लोकांनी ठिकठिकाणी त्यांना पुष्पहार टाकून गौरविले होते, हा मोर्चा प्रथम कॅम्प वरील वकीलांच्या बार रुममध्ये गेला. श्रीमती सुंदराबाई ह्या स्वत: बाररुम मध्ये गेल्या. तेथे "वकीलांनी देशासाठी वकीली सोडावी" अशा आशयाचे लहानसे भाषण खडखडीत आवाज केले व सोबत गेलेल्या बांगड्या नेल्या होत्या.

तेथून ही महिला कलेक्टर (त्यावेळी डेप्युटी कमिश्नर म्हणत) याचे कार्यालयात आली. तेथील चपराश्यांनी तिला अटकाव केला. तेथेही बाईनी घोषणा दिल्या. पोलीसांना बोलावण्यात आले. लगेच या महिलेला पोलीस व्हॅन मधून कोतवालीत आणण्यात आले. तेथे त्यांनी माफी मागावी असे पोलीसांनी वारंवार म्हटले. परंतु मी घराबाहेर पडली ती माफी मागावी म्हणून नव्हेच असे बाणेदार उत्तर महिलेने पोलीस अधिकाऱ्यास दिले. या महिलेला दीड वर्षाचा लहान मुलगा होता. त्यामुळे मुलास महिलेचे स्वाधीन करण्यात येऊन तिची रवानगी अमरावती कारागृहात करण्यात आली. तिच्या विरुध्द पोलीसने कोर्टात खटला दाखल केला होता. दोनंदा कोर्टा समोर महिलेला हजर केले होते. नंतर तिला सुमारे एक महिन्यानंतर मुक्त करण्यात आले.

त्याकाळी या समाजात पडदाप्रथा कटाक्षने पाळली जात असल्याने श्रीमती सुंदराबाईनी ती प्रथा सोडून रोष्ट्रीय कार्यात भाग घेतला होता. ही पडदा प्रथा तोडल्या बद्दल त्यांचे समाजाने या महिलेवर कडक टीका केली होती.

श्री.रतनलालजी वर्मा यांनी या महिलेला राष्ट्रीय कार्यात भाग घेण्यासाठी प्रेरणा दिली असे श्रीमती सुंदराबाई म्हणतात. त्यापूर्वी श्रीमती कांताबेन वर्मा ह्यांना

अटक झाली होती.

१९४२ च्या काळात राजकारणात विशेष भाग न घेतलेल्या व्यक्तीने व त्यातही एका साधारण कुटूंबातील स्त्रीने घराबाहेर पडून, प्रथा मोडून सरकारी कचेरीत घुसावे ही गोष्ट खरोखरच मोठ्या साहसाचीच होती. श्रीमती सुंदराबाई पटेरिया ह्यांनी हे साहस केले होते यांत शंकाच नाही.

त्या काळचे स्थानिक वृत्तपत्रातून या घटनेला प्रसिध्दी मिळाली होती. पण महिलेचे नाव वृत्तपत्रातून आलेले नव्हते. या महिलेचा परिचय हाच प्रथम करुन देण्यात येत आहे. १

---

१. श्रीमती सुंदराबाई मनसुखलाल पटेरिया यांचे दि. २६.६.८५ चे मुलाखतीचे आधारे, व उदय ६ ऑक्टोबर १९४२.

---

११) सिव्हील लिबर्टीज युनियन :-

नागरिक स्वातंत्र्यावर घाला आला तर अशा लोकांना मदत करण्यासाठी अमरावतीत "सीव्हील लिबर्टीज युनियन" स्थापन करण्यात आले होते. ठाकुर आणि कं. चे श्री.नानासाहेब ठाकूर व श्री.लड्ढा वकील हे कायद्याची मोफत मदत, औषधांची मदत आणि निराश्रितांना मदत करण्याचे कार्यात पुढाकार घेत असत.

या सिव्हील लिबर्टीज युनियन तर्फेच दि. ४ डिसेंबर ४२ रोजी सांयकाळी इरवीन हॉस्पीटलचे मागील मैदानावर जाहीर सभा आयोजित करण्यात आली होती. तीत चिमूर येथील अत्याचाराच्या चौकशीची मागणी करण्यात आली होती.

१२) वृत्तपत्रांवरील बंधने वाढली :-

याच काळात सरकारने वृत्त पत्रांवर नवीन बंधने घातल्यामुळे नागपूरची वृत्तपत्रे, नागपूर टाईम्स, नवभारत, राष्ट्रदुत, लोकमत, भवितव्य, इंडिपेन्डन्ट या

पत्रांनी आपली प्रकाशने बेमुदत बंद केली होती. त्यामुळे नागपूरची वृत्तपत्रे अमरावतीत येणे बंद झाले होते.

१३) धान्य टंचाई रॉकेल टंचाई उपासमार :-

सप्टेंबर १९४२ मध्ये शहरात धान्य, रॉकेलची टंचाई जाणवू लागली होती. विजेचाही तुटवडा भासू लागला होता. घर भाड्यातही वाढ होऊ लागली होती. ''श्रीमंताचे सहकार्याने अमरावती नगरपालिकेने शहरातील उपासमार थांबवावी'' अशी मागणी होऊ लागली होती.

त्याच आठवड्यात म्यु. ने घासलेटसाठी कार्ड वाटले होते. आणि नोव्हेंबर महिन्यातच शहरातच ज्वारीची १० स्वस्त धान्य दुकाने उघडून तेथून सव्वा चार आणे पायलीचे दराने ज्वारीची विक्री केली जाऊ लागली होती. ही दुकाने हवाई प्रतिबंधक दल (ए.आर.पी.) तर्फे सुरु करण्यात आली होती. त्यासाठी कुपन पध्दत होती.

महागाई टंचाई विरुध्द मोर्चे

युध्दकाळात महागाई फार वाढली होती. टंचाई जाणवू लागली होती. यासाठी अमरावती नगरपालिकेत मार्च १९४२ मध्ये स्वस्त धान्याचे दुकान उघडण्यात आले होते. त्यापुर्वी कामगारांचे मोर्चे निघाले होते. त्यात त्र्यंबक गुरुजी, डॉ.दिवाणजी वगैरे पुढाऱ्यांनी नेतृत्व केले होते. या मोर्चात भेटून त्यांचे निवेदन स्वीकारण्यासाठी एस.डी.एम.श्री. अग्रवाल हे स्वत: ''उदय'' कार्यालयासमोर आले होते. पुढे १९ जुलै रोजी देखिल सर्व सेवा संघातर्फे महागाई टंचाई विरुध्द प्रचंड मोर्चा काढण्यात आला होता. मोर्चाचे नेतृत्व डॉ.पटवर्धन, डॉ.सोमण व डॉ. भोजराज यांनी केले होते. मोर्चो कॉटन मार्केट मध्ये आला त्यावेळी इ.ए.सी.श्री.अग्रवाल हे स्वत: निवेदन स्वीकारण्यासाठी तेथे आले होते. शहरात रॉकेलची टंचाई जाणूव लागली होती. म्हणून म्यु. मार्फत तेलाच्या टाकीवरुन घरगुती कामासाठी रॉकेल घेण्याकरीता परवाना देण्यात येऊ लागला होता.

श्री.संत तुकडोजी महाराज यांची सुटका व्हावी म्हणून उमरावतीला नागरिकांची सभा झाली. सरकारकडे अर्ज ठराव पाठविण्यात आलेत. नागरिक समिती स्थापन झाली. याच महिन्यात रेडियोवर आणखी प्रतिबंध आले) लोक बर्लीन रेडियोवरुन सुभाष बाबूंची भाषणे ऐकत. याशिवाय देशातच एक गुप्त रेडियो स्टेशन भूमिगत देशभक्तांनी सुरु केले होते. त्यासाठी प्रतिबंध होते. श्री.भंडारीजी व श्री मालपाणी यांच्याकडील रेडिओ सेट सरकारने जप्त केले होते.

१४) २ ऑक्टोबर १९४२ :-

गांधी जयंती सप्ताहा निमित्त उमरावतीत दि. २ ऑक्टोबर १९४२ रोजी जौग चौकात जाहीर सभा झाली. सभेला दहा हजार लोक उपस्थित होते. सभेचे अध्यक्षस्थानी श्री.नानासाहेब बामणगांवकर हे होते. सभेत मा.गांधीचा पुतळा ठेवण्यात आला होता. सवश्री एन.टी.पांडे, गोखले वकील, जोध वकील व माधवराव देशपांडे यांची भाषणे झालीत. कॉंग्रेस कायदेशीर करा '' राष्ट्रीय पक्ष स्थापन करा'' अशा घोषणांत सभा समाप्त झाली.

गांधी जयंतीचे दिवशी निदर्शने केल्याबद्दल एकूण ७ लोकांना अटक होऊन प्रत्येकास तीन तीन महिन्याची शिक्षा ठोठावण्यात आली. एकाला कोर्टात बेकायदा पत्रके वाटण्याबद्दल पकडण्यात आले. श्री.ठाकूर वकील एका केससाठी जेलवर गेले होते त्यांना तेथेच अटक करण्यात आली.

१५) आझाद हिंद गुप्त रेडिओ :-

१९४२ च्या क्रांतीत भूमिगत नेत्यांच्या प्रेरणेने मुंबईत खेतवाडीत एका सायन्स शाखेच्या विद्यार्थीनीने इमारतीच्या ५ व्या मजल्यावर एक आझाद भारताचे गुप्त रेडिओ केंद्र स्थापित केले. अरुणा असफअली डॉ. मोहिया आदींनी प्रस्तुत केलेले बुलेटिन्स त्या रेडिओहून प्रसारित करणारी ही युवती होती श्रीमती उषा मेहता सुमारे २॥ वर्षे मुंबईच्या पोलीसांना ते भूमिगत केंद्र गवसले नाही. ह्या क्रांतिप्रिय उषा मेहतांचे मणिभुवनमध्ये १९९४ मध्ये निधन झाले.

१६) सुभाषबाबूंच्या भेटीसाठी - अमरावतीचे श्री.एम.एस. गोखले :-

१९४३ च्या फ्रेबुवारीत सुभाषबाबू जर्मन पाणबुडीतून टोकिओस येऊन पोहोचले. जुलैमध्ये त्यांनी आपली निष्ठा आझाद हिंदसेनेस असल्याचे जाहीर केले व ऑगष्टमध्ये आझाद हिंद सेनेचे ते प्रमुख झाले. कोहिमा मार्गे ब्रम्हदेशात उतरुन सुभाषबाबूंशी संपर्क साधावा म्हणून एम.एस.उर्फे बाळासाहेब गोखले अमरावती यांना व्यापाऱ्यांच्या तांड्याबरोबर धाडण्यात आले होते. ते व्यापाऱ्यांचे मुनीम बनून कोहिमापर्यन्त पोहोचले. पण ब्रिटीशांचे गुप्तचर खाते कमी हुशार नव्हते. गोखले हे व्यापारी नाहीत आणि मुनीम तर नाहीतच नाहीत हे त्यांनी ओळखले व त्यांना पुढे जाण्यास मज्जाव केला. गोखल्यांच्या बुटाच्या तळव्यात एक ओळखपत्र शिवून टाकले होते. या पलीकडे गोखले यांच्यापाशी दुसर काही नव्हते. ते ओळखपत्र कोणाच्याच हाती पडले नाही. तरीही गुप्तचर अधिकाऱ्यांना गोखल्याचा संशय येऊन त्यांनी त्यास सांगितले तुम्ही येथून पुढे जाणे योग्य नाही.

(१. उदय दि.६ ऑक्टोबर १९४२, २. श्री.कै. भिशिकर गुरुजी यांचे सौजन्याने साभार, ३. मी. अेस.अेम.पान. १४२.)

---

१७) नुकसान करणारांची माहिती देणाऱ्यांना बक्षीसे :-

दि. २० ऑक्टोबर १९४२ रोजी उमरावतीच्या डी.एस.पी.नी एक पत्रक प्रसिध्द करुन दिनांक ११ व १२ ऑगष्ट रोजी, उमरावतीतील टेलिफोन तारा, खांबे, पोष्टाचे डबे वगैरे सरकारी मालमत्तेला नुकसान पोचविणारांची माहिती देणारासांठी बक्षीसे जाहीर केली. त्या पत्रकाचा सारांक्ष असा -

पुढे दिलेल्या तारखांस, खालील गुन्हे करणाऱ्या गुन्हेगारांच्या अटकेस व शिक्षेस सहाय्यभूत होणारी माहिती देणारास सरकारकडून पुढील प्रमाणे बक्षिसे देण्यात येतील.

ता.११ व १२ ऑगष्ट रोजी (१) (अ) टेलिफोन व टेलीग्राफच्या तारांचे नुकसान करणे (ब) पोस्ट बॉक्स वगैरेचे नुकसान करणे, बक्षीस रु. २५० (२) ता. १७ ऑगष्टला रात्री टेलिफोन वायर्स कापणे. बक्षिस रु. १००/-. (३) ता. १० सप्टेंबरला सातुर्णा खेडेगावाजवळ टेलिफोन वायर्स कापणे. बक्षिस रु. १००/-

१८) चिमूर अत्याचाराचे चौकशीची मागणी :-

ऑगष्ट आंदोलनाचे काळांत चांदा जिल्ह्यातील चिमूर या गावी, जमावाने काही पोलीस व सरकारी अधिकाऱ्यांना मारले, त्यामुळे सरकारने तेथे लष्कर पाठविले होते. लष्कराच्या भीतीमुळे गावातील पुरुष मंडळी जंगलाच्या आश्रयाला गेली होती व गांवात बहुतेक स्त्रियाच होत्या. हे पाहून लष्करांतील शिपायांनी अनेक स्त्रियांवर अनन्वित अत्याचार केलेत. ही बातमी बाहेर आल्यावर सर्वत्र भयंकर असंतोष निर्माण होऊन, ह्या अत्याचाराची चौकशी होऊन गुन्हे करणारांना शासन व्हावे यासाठी पवनारचे आचार्य भन्साळी यांनी उपोषण सुरु केले आणि सर्व प्रांतातून चौकशीची मागणी होऊ लागली होती.

आचार्य भणसाळी :- आचार्य जयकृष्णजी भणसाळी हे मुंबई विद्यापीठाचे एम.ए. असून बॉम्बे कॉलेजात प्रोफेसर होते. त्यांनी सर्व युरोपाचा प्रवास केला आहे. १९२१ च्या गांधीजीच्या असहकार आंदोलनातील स्वातंत्र्य सैनिकांच्या प्रशिक्षणासाठी म्हणून काढलेल्या अंधेरीच्या साधकाश्रमात ते प्राध्यापक होते. त्यानी हिमालयात पदयात्रा केली. वैराग्यवृत्तीने गीरी कंदरात राहिले. पारमार्थिक दृष्टीने मौन साधण्यासाठी तोंड ताब्यांच्या ताराने शिवून घेतले आणि एका नलिकेच्या व्दारे फक्त दूध तेवढे घेत राहीले. लहान बाकाप्रमाणे ते सदा आनंदी, निष्पाप व साधेभोळे दिसत त्यांची गांधीजीच्या जीवनावरील निष्ठा अनन्य साधारण आहे. कित्येक वर्षे त्यांनी मौन धारण केले होते. पाण्यात कालवलेले मीठ व निंबाची पाने हा त्याचा आहार असे. कै.शामजी कृष्ण वर्मा यांचे ते भाचे होते.

१९४२ साली चिमूर येथे गोऱ्या सोजिरांनी स्त्रियांवर अमानुष अत्याचार केले.

त्याची चौकशी व्हावी म्हणून भणसाळीजींनी ६३ दिवस उपास केला होता. शेवटी सरकारला झुकावे लागले व त्या घटनेची चौकशी करावी लागली. प्रथम सेवाग्रामला व नंतर नागपूर जवळील टाकळी या गावी त्यांनी वास्तव्य केले. टाकळीचा ''भणसाळी आश्रम'' म्हणजे दीन दुबळे, आदीवासी यांना मोठा आधार आहे.

चिमूर अत्याचाराच्या चौकशीची मागणी :-

अमरावतीतही दि. ४ डिसेंबर १९४२ रोजी ''सिव्हील लिबर्टीज युनियन'' तर्फे खापर्डे बगीच्यातील मैदानावर जाहीर सभा होऊन या अत्याचाराच्या चौकशीची मागणी करण्यांत आली होती. या सभेचे वक्ते श्री.बाबासाहेब खापर्डे श्री.गंगाबिसनजी सिकची व श्री.वि.दा. ब्रम्ह हे होते.

चिमूर व आष्टी :-

१९४२ च्या आगष्ट क्रांती आंदोलनात चिमूर येथे पोलीस व सरकारी अधिकारी हे लोकक्षोभाला बळी पडले त्या आरोपावरुन एकूण आष्टीचे ६ व चिमूरचे ८ लोकांना फांशी कायम झाली होती. त्या विरुध्द प्रिव्हि कौन्सील कडे अपील फेटाळल्या गेले होते.

शेवटी आष्टी चिमूर फांशी निवारक समिती तर्फे या लोकांना प्राणदान मिळावे म्हणून लोकांकडून गव्हर्नर व व्हाईसरायचे दयेचे अर्ज पाठविण्याची मोहीम सुरु झाली.

७ राजबंधांच्या दयेचा अर्ज राजे साहेबांनी फेटाळला त्याच प्रमाणे महात्मा गांधी व इतर अनेक कार्यकर्त्यानी त्यांचे प्राण वाचविण्यासाठी केलेले सर्व प्रयत्न असफल झाले. त्यामुळे संपूर्ण देशभर उदासीनतेचे वातावरण पसरले होते.

दि. ३ एप्रिल १९४५ हा दिवस अखिल भारतीयांतर्फे निषेध व्यक्त करण्यासाठी पाळला जावा व त्या दिवशी सर्व व्यवहार बंद ठेवावेत. असे पत्रक महात्मा गांधीच्या संमतीने कस्तुरबा गांधी राष्ट्रीय स्मारक ट्रस्टच्या चिटणीस श्रीमती

मृदला साराभाई यांनी काढले. दि. २ रोजी संपूर्ण भारतात आष्टी चिमूर दिनानिमित्त हरताळ पाळण्यात आला होता व फाशीची शिक्षा झालेल्यांना जीवदान द्या अशा आशयाचे ठराव निरनिराळ्या संस्थांनी गव्हर्नर व व्हाईसरॉय, राजे साहेब यांचेकडे पाठविले होते.

अमरावतीत हरताळ पाळण्यात आला. पुढे महायुध्दात दोस्तांचा विजय होऊन सर्वत्र विजय दिन साजरा केला गेला. तेव्हा फाशी निवारक समितीने व्हाईसरायना तार पाठवून विजयादिनानिमित्त या आरोपींना माफी देण्यात यावी अशी विनंती केली होती. पुढे २१ आगष्ट १९४५ चे सुमारात विसरा व क्षमा करा या धोरणानुसार चिमुर आष्टीचे आरोपींना फांशीची शिक्षा माफ करण्यात आली होती.

राष्ट्रीय पुढाऱ्यांच्या अटकेविरुध्द देशभर जनतेची निदर्शने झालीत व काही ठिकाणी असंघटित झगडे व दंगे झाले. ते निर्दयपणे चिरडून टाकण्यासाठी पाशवी दडपशाही व गोळीबार करण्यात आलेत.

पोलीस लष्कराचा धुमाकुळ सुरु झाला दि. ९ ऑगष्ट ते ३१ डिसेंबर ४२ पर्यन्त ६०,२२९ लोकांना अटक केली. १८००० लोकांना भा.स. कायद्याखाली तुरुंगात स्थानबध्द केले. पोलीस किंवा लष्करांच्या गोळीबारात ९४० लोक ठार व १६३० लोक जखमी झाले असे मध्यवर्ती असेम्ब्लीत गृहमंत्र्यांनी केलेल्या सरकारी निवेदनावरुन दिसून येते. (उदय. दि. १६.१.१९४३).

दि. ९ ऑगष्ट १९४२ रोजी गांधीजींचे अटकेनंतर देशातील इतर ठिकाणाप्रमाणेच चिमूर (जि.चंद्रपूर) येथेही गांधीजींचे अटकेच्या निषेधार्थ दररोज लोकांच्या प्रभात फेऱ्या निघून देशभक्त व कार्यकर्ते ''गांधीजींकी जय, भारत माताकी जय '' इन्क्लाब जिंदाबाद'' च्या घोषणा देऊन आपल्या भावना व्यक्त करीत होते. पोलीसांनी अशा प्रभात फेऱ्यांवर बंदी घातल्यानंतरहि चिमूर येथील देशभक्तांनी प्रभात फेऱ्या काढणे सुरुच ठेवले. त्यातच १६ ऑगष्टच्या नागपंचमीचा दिवस उजाडला.

या दिवशी निघालेली प्रभात फेरी चिमूर येथे पोलिसांनी अडविली व चिडून जमावावर लाठिमार केला. त्यात बालाजी रायपूरकर हा १६ वर्षाचा मुलगा जखमी होऊन नंतर मरण पावला. त्यामुळे संतप्त झालेल्या जमावाने टपाल कचेरीला आग लावली. या वेळी चिमूरच्या परिस्थितीची पाहणी करण्यासाठी डाक बंगल्यात तळ ठोकून बसलेले एस.डी.ओ. श्री.डुंगाजी व नायब तहसिलदार श्री.शनुवाणी यांना पोलिसी अत्याचाराची कहाणी सांगण्यासाठी गेलेल्या जनसमुदायावर प्रत्यक्ष श्री.डुंगाजी यांनीच आपली बंदूक रोखली. त्यामुळे आतापर्यत शांत व शिस्तबध्द असलेला हा जमाव या कारवाईमुळे एकदम प्रक्षुब्ध झाला व त्याने दगडफेक सुरु केली आणि या दोन्ही अधिकाऱ्यांना बेदम मारहाण केली. यावेळी जमावाने डाक बंगल्याला लावलेल्या आगीत ते दोन्ही अधिकारी मृत्युमुखी पडले.

या अधिकाऱ्यांचे संरक्षणासाठी चार पोलीस अधिकाऱ्यांचे नेतृत्वाखाली आलेल्या सशस्त्र तुकडी बरोबर जमावाचा संघर्ष उडतांच, त्यावेळी झालेल्या गोळीबारात बाबुलाल झिरे वय १६, श्री.वेगेवार वय २०, उध्दव छोयसेकर वय २० आणि कचडू डोमाजी वय ५० हे देशभक्त शहिद झाले. प्रक्षुब्ध जमावाने मग कांताप्रसाद व जरासंध या दोन पोलिस अधिकाऱ्यांना ठार केले. इतर दोन अधिकारी निसटले. नंतर जमावाने पोलीस ठाणे पेटवून दिले.

या गोळीबारानंतर तीन दिवसांनी सशस्त्र मिलिटरी जवानांनी चिमूरचा ताबा घेतला व अटक सत्र सुरु केले. १९ ते २६ ऑगष्ट या आठ दिवसात सुमारे २५० लोकांना अटक करण्यात आली व त्यांना बेदम मारहाण करण्यात आली. या काळात मिलिटरी जवानांना चिमूरच्या स्त्रीपुरुषांवर केलेले अनन्वित अत्याचार अंगावर शहारे आणणारे आहेत. भयापोटी लोक गाव सोडून पळाले. सरकारी अधिकाऱ्यांच्या खून प्रकरणात सुमारे २५० लोकांवर ३०२ कलमाखाली खटले भरण्यात आलेत. त्यांत २१ लोकांना फांशी, २८ लोकांना जन्मठेप, व बाकीच्यांना निरनिराळ्या मुदतीच्या शिक्षा ठोठावण्यात आल्या. पुढे २१ पैकी ज्या ७ आरोपींची फाशीची शिक्षा कायम करण्यात आली त्यांत चिमुरचे दे.भ. गोपाळराव कोरेकर,

अण्णाजी शिरास, बाबुराव भोपे, सखाराम सालेवार आदींचा समावेश होता.

आरोपींना फांशी देण्याचा दिवसहि मुक्रर करण्यात आला होता पण पुढे ही फांशीची शिक्षा तहकूब करण्यात आली.

आष्टी :- दि. १६ ऑगष्ट १९४२ नाग पंचमीचे दिवशीच वर्धा जिल्ह्यातील आष्टी येथे सत्याग्रही मंडळींनी पोलीस ठाण्यावर तिरंगाध्वज लावण्याचा आग्रह सुरु केला. शिरसोली, डाळापेठ, अमदापूर, मोरागंणा, वर्धा आदी गांवचे हे नि:शस्त्र सत्याग्रही पोलीस इन्स्पेक्टर रामनाथ मिश्रा, यांच्याकडे पोलिस रेकार्ड जाळण्यासाठी मागत होते. शब्दाने शब्द वाढला. वातावरण तापले आणि कान्स्टेबल अ. समदखानने जमावावर पहिली गोळी झाडली. त्या गोळीने गोविंदराव बाजीराव मालपे यांचा बळी घेतला. दुसऱ्या गोळीत लंगडा रशिदखां नबाब पडला. वडाळाचा पंछी गोंड झाबुजी पोटे, केशव ढोंगे, उदेभान कुबडे, या शहीदांनी एका पाठोपाठ एक देह ठेवले. रामभाऊ लोहे यांसही गोळी लागली. काही लोकांनी त्यास तात्काळ उपचारार्थ उचलून नेले व त्याचा जीव वाचला. पांडुरंग सव्वालाखे व सखाराम होते यांना पोलिसांनी कैद केले.

आष्टीच्या बाजाराचा तो दिवस होता. डॉ.कामत जखमीवर इलाज करत होते. या वेळ पर्यत सभोवारच्या परिसरातीत सुमारे दीड-दोनशे मंडळी जमा झाली व गुलाबराव वाघाचे नेतृत्वाखाली हा मोर्चा पोलिस स्टेशनचे बंद फाटकाजवळ धडकला. मोर्चा बघताच पोलीसांनी प्रथम हवेत गोळीबार केला. त्याला प्रत्युत्तर म्हणून लोकांनी दगडफेक सुरु केली. तर पोलीसांनी पुन्हा गोळीबार केला. गावातील महिला वर्ग नदीतील दगड पुरुषांना पुरवून या रण संग्रामाला हातभार लावीत होत्या. पोलिसांची एक गोळी अहिल्याबाईचे दंडास लागली तर वासुदेव सोनाराचे तोंड फुटले. त्यामुळे प्रक्षुब्ध जमाव पोलिस स्टेशनचे बंद फाटक तोडून आत घुसला. पोलिस सैरावैरा पळू लागले. हाती आलेल्या एक इन्स्पेक्टर व कॉन्स्टेबलला जमावाने बेदम मारहाण केली. त्यात त्याचा प्राण गेला. जंगलात पळून गेलेल्या पोलिसांचे मागे कांही लोक लागले. लोकांनी समदखांला हुडकून

काढले. व त्याला जीवानिशी मारले. समूहाने घेतलेला हा अखेरचा बळी यात कालेखा व उंबडराव भोई आघाडीवर होते. पांडूरंग सव्वालाखे व मोतीराम होले यांची कैदेतून सुटका करण्यात आली.

शहीदांची भव्य प्रेत यात्रा निघाली. सुमारे २००० लोक या वेळी उपस्थित होते. अंत्ययात्रेनंतर सर्वजण एकचित्तपणे तुरुंगात जायला तयार झाले.

सर्वश्री गुलाबराव वाघ, उकंडराव सोनबा सोनोने, नत्थुजी जयराम आखळे, बकाराम रामजी मुकदम, वामन बळीराम ढबाळे, राघु पांडुरंग जवळेकर, पांडुरंग जयस्वाल, माधव श्रावणजी, डॉ.तुळशीराम पाचघरे, कालेखाँ यांना फांशीची शिक्षा सुनावण्यात आली. परंतु फांशी देण्यापूर्वी दोन तास अधिकाऱ्यांच्या तांत्रिक चुकीमुळे ही फांशी रद्द करण्यात आली.

वरील फांशीची शिक्षा झालेल्या पैकी, चिमूरचे श्री.गणपती चन्ने हे अमरावतीचे तुरुंगात होते. त्यांची भेट सौ. पार्वतीबाई पटवर्धन आणि श्री.मराठे यांनी डिसेंबर १९४४ च्या शेवटच्या आठवड्यात येथील जेलवर जाऊन घेतली होती. श्री.पन्ने यांनी जेल मधूनच दे.भ. रघुनाथमलजी कोचर यांना एक पत्रही पाठविले होते ते असे :-

पूज्य सन्माननीय रघुनाथमलजी यांना सप्रेम वन्दे, वि.वि. लिहिण्यास कारण की, आष्टी तसेच आमची म्हणजे चिमूर कांडची अपीले प्रिव्ही कौन्सिल ने फेटाळली आहेत, हे सर्वत्र माहितच आहे, त्याकरिता आपण पुढील सविस्तर माहिती सहित माझे पत्र पहाताच भेट घेण्यास याल अशी अशा जाणून सेवेशी पत्र पाठवीत आहे. सोबत श्री.छक्कीलालजी, सिंघई वकील साहेब, भंडारीजी यांना जरुर आणावे, आपण आल्याने माझ्या मनाचे समाधान होईलच.

मी काही घाबरत नाही भेटी नंतर सर्व खुलासा होईलच :

उमरावती नगरपालिकेचा ठराव :- दि. १७ डिसेंबर १९४४ रोजी उमरावती नगरपालिकेच्या सभेने श्री.रामदयालजी गुप्ता यांचा "चिमूर व आष्टी राजबंधाची

फांशीची शिक्षा भूतदया म्हणून तरी ना. व्हाईसरॉय यांनी रद्द करावी'' अशा आशयाचा ठराव सर्वानुमते मंजूर केला होता.

याशिवाय फेब्रुवारी १९४३ मध्ये सौ.पार्वतीबाई पटवर्धन यांच्या संयोजकत्वाखाली ''उमरावती जिल्हा फांशी निवारक समितीची स्थापना'' होऊन या समितीतर्फे गोळा केलेला फंड, आष्टी चिमूरच्या फांशीची शिक्षा झालेल्यांची अपीले, फेडरल कोर्ट व प्रीव्ही कौन्सिलकडे करण्यासाठी देण्यात व्हाईसरॉयकडे ठराव करुन पाठविले होते.

(: उदय : दि. २९ डिसेंबर १९४४.)

---

१९) राष्ट्रसंत तुकडोजींचे सुविख्यात गीत :-

''अब काहे धूम मचाते हो''

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांना ज्या भजनामुळे चांदा जिल्ह्यांत सप्टेंबर १९४२ मध्ये अटक झाली, हे त्यांचे गीत येथे दिले आहे.

अब काहेको धूम मचाते हो, दुखवाकर भारत सारे आते है नाथ हमारे ॥धृ ॥

जब तक पाप भरा न पुरा तो - करलो मौज भरारे

अब कुछ देर नही है उनको - उतरा गरुड किनारे ॥ १ ॥

वीरोने हिंमत आवेगी - ले तलवार कटावे

दौर दौर कर गज घोडोंपर - रण कंदन कर डोरे ॥ २ ॥

रावण जब धुमधाम मचाई - लंका नाश कराई

कूद कूद बंदर सेनासे - राक्षस मरवा डारे ॥ ३ ॥

राजा कंस उमंग उमंगे - लीला कर वधवाई

किसीका गर्व सहे नही प्रभुको - अपना कुल संहारे ॥ ४ ॥

भारत अब हिन दिन भयारे - ना कोई यार सतावो

करनी के फल पावोगे, गर - प्रभुका देश बिगारे ॥ ५ ॥

झाड, झडूले शास्त्र बनेंगे - भक्त बनेगी सेना

पथ्थर सारे बॉम्ब बनेंगे - नाव लगेगी किनारे ॥ ६ ॥

तुकडयादास कहे मत भुलो - वे दीन आये हमारे

सब दुनियाके पालन कर्ता - उन्हे है हम प्यारे ॥ ७ ॥

२०) भारत छोडे आंदोलन :-

इसवी सन १९४२ च्या "भारत छोडो " आंदोलनात, ज्यांना १ महिन्यापेक्षा जास्त शिक्षा व रु. १०० पेक्षा जास्त दंड झाला, अशा स्वातंत्र्य संग्राम सैनिकांची यादी.

क्र.	नांव	अटकेची तारिख	शेरा
१.	दे.भ. शंकरलाल जमनलाल दुबे	५.८.४२	शिक्षा
२.	दे.भ. संभाजी विनायक उर्फ नानासाहेब गोखले, वकील.	९.८.४२	
३.	दे.भ.वामन गोपाल उर्फ वामनरावदादा जोशी	९.८.४२	
४.	दे.भ.डॉ.गणेश गोविंद भोजराज	९.८.४२	
५.	दे.भ.डॉ. दत्तात्रय बलवंत उर्फ अण्णासाहेब सोमण	१०.८.४२	
६.	बाळकृष्ण विष्णु उर्फ बाळासाहेब मराठे	१०.८.४२	
७.	पुरुषोत्तम काशीराव उर्फ अण्णासाहेब देशमुख	१०.८.४२	

८.	बालकृष्ण गुलचंद उर्फ बाळासाहेब भंडारी केस.डिटेनशन	१०.८.४२	
९.	दे.भ.शिवाजीराव गणेश उर्फ दाजीसाहेब पटवर्धन	११.८.४२	
१०.	दे.भ.सुदर्शन गुलाबचंद सिंघई	११.८.४२	केस
११.	दे.भ.रामदयाल अयोध्याप्रसाद गुमा	१३.८.४२	
१२.	दे.भ.नारायण रामचंद्र डोळे	१३.८.४२	
१३.	दे.भ.यादवराव विठोबाजी शेंडे	१३.८.४२	
१४.	दे.भ.बाळकृष्ण गोविंद बोधनकर	१३.८.४२	
१५.	दे.भ.मनोहर त्रिबंक बाळापुरे	१३.८.४२	
१६.	दे.भ.शंकर बिसनसा बाळापुरे	१३.८.४२	
१७.	दे.भ.रामेश्वर देवीदीन अवस्थी	१५.८.४२	
१८.	दे.भ.मोतीसा पासोबा काळे	१५.८.४२	
१९.	दे.भ.देविदास रामजी महाजन सराफ	१६.८.४२	सुटका ९.९.४३
२०.	दे.भ.रघुनाथमल सबसुखमल कोचर	१७.८.४२	
२१.	दे.भ.वामन अण्णा	१७.८.४२	
२२.	दे.भ.मदनलाल रामदेव नाई चोव्हाण	१७.८.४२	
२३.	दे.भ.पुजाच्या महादेवआप्पा वैद्यवार	१७.८.४२	केस
२४.	दे.भ.नारायण अण्णा आरद	१७.८.४२	केस
२५.	दे.भ.शंकरसिंग अनवर रामसिंग ठाकुर	१७.८.४२	डीटेनशन

			व केस
२६.	दे.भ.छक्कीलाल रामलाल गुप्ता	१८.८.४२	केस
२७.	दे.भ.रतनलाल बापुजी काळे	१८.८.४२	
२८.	दे.भ.माणिक झिंगुजी मोरे	१८.८.४२	केस
२९.	दे.भ.मोतीलाल बसोलाल सरवैय्या	१८.८.४२	केस
३०.	दे.भ.सौ.कांताबेन रतनलाल वर्मा	१८.८.४२	केस
३१.	वैकुटराजारामजी	१८.८.४२	केस
३२.	दे.भ.नारायण गुंजाजी	१८.८.४२	
३३.	दे.भ.विनायक विष्णुपंत	१८.८.४२	केस
३४.	दे.भ.नारायण गणपत	१८.८.४२	
३५.	दे.भ.महादेव सदाशिव बर्वे	१८.८.४२	केस
३६.	दे.भ.वामनराव मारोतराव	१९.८.४२	
३७.	दे.भ.अण्णा विठ्ठल काळे	२०.८.४२	
३८.	दे.भ.शिवराज कस्तुरचंद सेवक	२०.८.४२	
३९.	दे.भ.हिरालाल परमेश्वरदीन	२०.८.४२	
४०.	दे.भ.बद्रीप्रसाद बलदेवप्रसाद	२१.८.४२	
४१.	दे.भ.वामन मारोतराव	२४.८.४२	केस
४२.	दे.भ.कानजी लक्ष्मण उर्फ टप्पुभाई नाई	२४.८.४२	केस
४३.	दे.भ.गोपाळ केशवराव काळे	२४.८.४२	एदलजीवा (नोकर)

४४.	दे.भ.लक्ष्मणप्रसाद गंगाबक्ष	२४.८.४२	
४५.	दे.भ.विश्वनाथ नामदेव घोंगडे	२४.८.४२	
४६.	दे.भ.भास्कर गोपाळ गाडे	२४.८.४२	केस
४७.	दे.भ.बापुराव उर्फ अमरसिंग वल्द तुकाराम गुरु गोविंदसिंग ना.पेठ	२४.८.४२	
४८.	दे.भ.नारायण जयरामजी	२४.८.४२	
४९.	दे.भ.दत्तात्रय सदाशिव	२४.८.४२	
५०.	दे.भ.सदाशिव राजाराम	२५.८.४२	
५१.	दे.भ.नामदेव सखाराम उर्फ सीताराम	२५.८.४२	
५२.	दे.भ.देवलाल सुंदरलाल भट्डड	२५.८.४२	केस ५० रु दंड
५३.	दे.भ.अनंतलाल किसनगोपाल दम्माणी	२५.८.४२	केस
५४.	दे.भ.जयनारायण गोविंद नारायण खंडेलवाल	२६.८.४२	केस
५५.	दे.भ.शिवाप्पा मननाप्पा हिंगमीरे	२८.८.४२	
५६.	दे.भ.शंकर वासुदेव भेंडकर	२८.८.४२	
५७.	दे.भ.रंगराव बळीरामजी जाधव (गाडगेनगर,वृत्तपत्र विक्रेता.)	२८.८.४२	केस
५८.	दे.भ.आनंदराव बळीराम	१७.८.४२	
५९.	दे.भ.अयोध्याप्रसाद भुरेलाल गंगेले	५.९.४२	
६०.	अमृतराव शंकर खंगाळे (कोष्टी)	२८.९.४२	
६१.	त्रिंबक शिवराम ठाकुर वकील	२८.९.४२	

६२.	रामराव पुर्णाजी माळी	२४.९.४२	
६३.	वामन पांडूजी मराठा (नया आकोला)अमरावती	.२.१०.४२	
६४.	दे.भ.अजाबराव सिताराम भाट (तायवाडे)	२.१०.४२	केस
६५.	दे.भ.भाऊराव झिंगुजी मोरे	२.१०.४२	केस
६६.	दे.भ.रतनलाल जानकीलाल वर्मा	१०.१०.४२	केस
६७.	दे.भ.हिरालाल परमेश्वरदीन	१०.१०.४२	केस
६८.	दे.भ.दुर्गाप्रसाद बाळकृष्ण मोरे	२२.१०.४२	केस
६९.	दे.भ.जानराव लक्ष्मण	३१.१०.४२	केस
७०.	दे.भ.तुळशीराम सोनाजी उर्फ इलायची	१७.१२.४२	केस व डिटेनशन
७१.	दे.भ.रतनलाल अंबाप्रसाद गुप्ता	४.१.४३	केस
७२.	दे.भ.रामभाऊ बापुराव शेळके (सोळंके)	१२.१.४३	केस
७३.	दे.भ.एकनाथ माधवसा हिरुळकर	२६.१.४३	केस
७४.	दे.भ.बबन विठ्ठल बनारसे	१९.२.४३	
		७.१०.४२	केस
७५.	दे.भ.रामकृष्ण वासुदेव लाहुडकर	२७.२.४३	केस
७६.	दे.भ.महादेवराव नामदेवराव कुंबडे	४.९.४२	केस
७७.	दे.भ.रखबसा नारायणसा जैन पोस्टर्स लावले.	२०० रु. दंड फक्त	

७८.	दे.भ.कृष्णा हरीहरराव देशपांडे		केस, बॉडवर सुटका
७९.	दे.भ.रामरतन सीकची	१७.८.४२	फटक्याची शिक्षा
८०.	दे.भ.राजाभाऊ उर्फ गुणवंत नारायण बारलिंगे	१७.२.४३	
८१.	दे.भ.शरद जगन्नाथ	१३.२.४५ ते १८.६.४७	
८२.	दे.भ.रामचंद्र किसनलाल मालपाणी	१२.९.४२	
८३.	दे.भ.उत्तमराव पांडुरंग मोहीते		
८४.	दे.भ.त्र्यंबकराव गुंबळे		
८५.	दे.भ.माणिकराव रामभाऊ खारकर		
८६.	दे.भ.राजेंद्र जगन्नाथ मालपाणी		
८७.	जगन्नाथजी तिवारी		
८८.	दे.भ.डॉ.साऊरकर		
८९.	दे.भ.कन्हैयालाल झेंडालाल		
९०.	दे.भ.प्रल्हाद केडीया (मुंबई)		
९१.	दे.भ.ब्रिजमोहन गुप्ता		१५ दिवस
९२.	दे.भ.सुंदराबाई मनसुखलाल पटेरिया	६.१०.४२	अटक १९.१०.४२ सुटका

---

१ : क्रिमिनल रेकार्ड ऑफ कलेक्टोरेट, अमरावती
श्री.कोचर, ॲडव्होकेट यांनी दिलेले टिपण.

२१) दे.भ. देवकिसन जोगीरदासजी झंवर, वय ७९ :-

१९४२ च्या आंदोलनांत सर्व देशभक्त कार्यकर्ते तुरुंगात गेल्या नंतर हे आंदोलन तेवत ठेवणे, भूमिगत कार्यकर्त्यांना आश्रय मिळवून देणे, बुलेटिनचे प्रकाशन व वाटप, अमरावती जेलमधील मद्रासच्या ३२ देशभक्तांना फळे वगैरे पाठविण्याचे कार्य, अशा अत्यंत जोखमींची कामे श्री देवकिसनजी झंवर यांनी केली आहेत. त्यासाठी त्यांनी व दे.भ. छक्कीलालजी खारैय्या यांनी एक निधीही जमविला होता.

दि. ८ व ९ ऑगष्ट १९४२ रोजी अमरावती शहर व जिल्ह्यातील बहुतेक सर्व कार्यकर्त्यांना अटक झाली. परंतु हे कार्य चालू ठेवण्याकरीता योग्य व्यक्तीला बाहेर रहाणे जरुरीचे होते. त्या खेरीज या आंदोलनाला खतपाणी मिळाले नसते. ही गरज लक्षांत घेऊनच त्यावेळी श्री.देवकिसनजी झंवर यांनी आपल्या कार्यांची रुपरेषा श्री.काकासाहेब गोखले वकील यांच्या संमतीने ठरविली होती व त्याचा उपयोगही झाला.

अमरावती नगर कॉंग्रेस कमेटीचे कार्यालय त्यावेळी सक्करसाथ मधील श्री.मांगीलालजी नांगलिया यांच्या जागेत होते व या कार्यालयाच्या काही भागात लोकांना कमी दराने ज्वारी वाटण्यासाठी म्हणून ज्वारी पोत्यांचा साठा करुन ठेवला होता. दि. ९ ऑगष्ट ४२ रोजी कॉंग्रेस पक्ष बेकायदा म्हणून सरकारने जाहीर करताच पोलीसांनी या नगर कॉंग्रेस च्या कार्यालयाला सील केले होते.

तत्पूर्वी या कार्यालयातील काही कागदपत्रे (मुख्यत: अमरावती जिल्ह्यातील १९३०-३२ चे सत्याग्रहाचे इतिहासाच्या शे दीडशे छापील प्रती) व इतर काही सामान रात्रीच मागच्या दरवाजातून श्री.मांगीलालजी नांगलिया व श्री.पी.के.देशमुख यांनी तेथून काढून ते श्री.देवकिसनजी झंवर राहात होते त्या खोलीत आणून ठेवले होते. हे सामान जतन करुन जाहीर केलेल्या पत्रिकांच्या प्रती श्री.देवकिसनजी यांनी श्री.रतिलालजी देसाई यांच्या किराणा मालाचे कोठ्यात

ठेवण्याची व्यवस्था केली होती. त्याकाळी सरकारच्या भीतीने कोणी आपल्या घरात असे सामान ठेवू देत नसत. परंतु रतिलालभाईंनी हे धाडस केले होते.

या प्रमाणे मागे राहून आंदोलनाला खत पाणी व भूमिगत देशभक्तांना आश्रय देणे वगैरे चालू असतानाच श्री.देवकिसनजी झंवर यांना अटक करण्याचा पोलीसांचा विचार त्यांना कळला तेव्हा श्री.काकासाहेब गोखले यांच्या सल्ल्यानुसार पोलिसांचे हाती न सापडता हे कार्य चालू ठेवण्याचा त्यांनी निर्धार केला व श्री.मंगलचंद बुलाखिदास यांच्या सहकार्याने पोलीसची नजर चुकवून त्यांनी मुंबईची वाट धरली. शहरातील काही १०-१२ तरुणांना त्यांनी अगोदरच मुंबईला रवाना केले होते. मुंबईला श्री.देवकिसनजी हे सायन येथे श्री.शिवनाथबाबू यांच्याकडे थांबले होतें १

(१. श्री.देवकिसनजी यांच्या मुलाखतीवर आधारित.)

---

२२. अमरावती तुरुंगातील खटले :-

१९४२ च्या आंदोलनात यावली, इत्तमगांव, बेनोडा, लोणी वगैरे भागातील शेकडो कार्यकर्त्यांना अटक करुन अमरावती तुरुंगात आणले होते. व त्यांच्या विरुध्द जेलमध्येच कोर्ट भरवून खटल्याचे कामास सरकारने सुरुवात केली होती. श्री.अनामुल्ला या नावाचे एक मॅजिस्ट्रेट होते. त्यांची नियुक्ती हे खटले चालविण्यासाठी सरकारने केली होती. दररोज जेलचे आवारात त्यांचे कोर्ट ११ ते ५ पावेतो चालत असे. दररोज ५०-६० लोकांच्या केसेस चालत.

या कार्यकर्त्यां विरुध्दच्या खटल्यात अमरावतीचे वकील श्री.बाबूराव पांगारकर यांनी कार्यकर्त्यांचे बाजूचे कित्येक महिने पावेतो बचावाचे विनामूल्य काम केले होते. यावेळी केस प्रकरणी सेशन कोर्टात ॲड.राजाभाऊ गोखले व बी.एस.टी.पांडे वकील यांनी काम चालविले होते.

ॲड. बाबुराव पांगारकर यांनी या संबंधीची कोर्टाचे मॅजिस्ट्रेट श्री.अमानुल्ला यांची आठवण सांगितली. त्यांनी या सर्व कार्यकर्त्यांचे खटले फार सहानुभूतीने चालविले. आरोपीचे वकील श्री.बाबुराव पांगारकर यांना ते ''बेटा'' या नांवाने संबोधित असत. इतकेच नव्हे तर खटले संपताना सायंकाळचे वेळी फारशी वर्दळ नसे. म्हणून बाबुराव सोबत खास पोलीस जमादार देऊन त्यांना घरापर्यन्त पोचविण्याचे श्री.अमानुल्ला फर्मावित ''बेटे'' को हिफाजतसे और बराबर घर पहुंचाना'' अशी त्यांची जमादाराला आज्ञा असे. या प्रमाणे हिंदु मुसलमान सर्व लोक स्वातंत्र्याचे भावनेने या आंदोलनाकडे पहात. हे खटले दीर्घकाळ जेलमध्ये सुरु होते. या काळात वरील वकील मंडळींनी आपले कर्तव्य विनामूल्य व बिनतक्रार पार पाडले होते हे यावरुन दिसत येते.

(श्री.बाबूराव पांगारकर यांच्या मुलाखतीवर आधारित.)

इ.स. १९४२ साली मुंबई येथे भरलेल्या अखिल भारतीय कॉंग्रेसचे अधिवेशनात आठ ऑगष्टचे रात्री जो ठराव मंजूर करण्यात आला त्याव्दारे इंग्रज सरकारला असा इशारा देण्यात आला होता की त्यांनी भारत सोडावा (छोडो भारत) त्याच प्रमाणे भारतीय जनतेलाही याच ठरावाव्दारे असे आवाहन करण्यात आले होते की भारतावरील इंग्रजांची सत्ता उलथून पाडा. आणि त्यासाठी प्रजेने त्यांना जे काही करतायेणे शक्य असेल ते करावे. म्हणजे ''करा किंवा मरा'' असा आदेशही देण्यात आला होता.

हा ठराव मंजूर होताच दुसऱ्या दिवशी म्हणजे ९ ऑगष्टचे भल्या पहाटे पासूनच तत्कालीन इंग्रज सरकारने कॉंग्रेस नेते आणि त्यांच्या अनुयायांची धरपकड जोरात सुरु केली. हे धरपकडीचे सत्र सुरु असतानाच मुख्यत: कॉंग्रेस मधील समाजवादी गटाचे पुढारी व कार्यकर्ते भूमिगत झाले व त्यांनी देशाच्या निरनिराळ्या प्रांतात जाऊन जनतेला इंग्रजांची सत्ता उलथून पाडण्यासाठी प्रवृत्त

करण्याचा प्रयत्न सुरु केला. दुसऱ्या जागतिक महायुध्दाचा हा काळ असल्याने व भारताचे इंग्रज सरकार हे या युध्दात गुंतले असल्याने देशातील सैन्य आणि युध्द साहित्याची वाहतूक रेल्वे मार्गाने होई. म्हणून युध्द साहित्य वाहणाऱ्या रेल्वे गाड्या पाडण्याचा प्रयत्न क्रांतीकारकांकडून सुरु झाला होता. इंग्रजाविरुध्द प्रचार करणारे एक रेडियो स्टेशनही मुंबईत गुप्तपणे सुरु होते. शिवाय उत्तर प्रदेशातील बलीया व गाझीपूर आणि बंगालमधील मिदनापूर-महिशदल व वटीपेरा ही गावे क्रांतीकारक कार्यकर्त्यांनी जनतेच्या सहकार्याने स्वतंत्र केली होती.

महाराष्ट्राच्या कर्जत खोऱ्यातील भाई कोतवाल यांच्या नेतृत्वाने स्थापन झालेले संघराज्य प्रसिध्द आहे. विदर्भात चिमूर, आष्टी, यावली, बेनोडा अशा अनेक ठिकाणी उठाव झालेत.

या प्रमाणे सर्व देशभर इंग्रज सरकार विरुध्द लहान मोठे उठाव होत असतानाच महाराष्ट्रातील सातारा जिल्हा व त्याचे परिसरात फेब्रुवारी ते जून १९४३ या काळात प्रती सरकार अस्तित्वात आले. क्रांतीसिंह नाना पाटील हे त्याचे प्रणेते होते. या खेरीज श्री.जी.डी.लाड, नाथाजी लाड, आप्पाजी लाड, जगन्नाथ नायकवडी, बाबुराव पाटणकर, बडे गुरुजी, यशवंतराव चव्हाण, माधवराव जाधव, लक्ष्मणराव कुळकर्णी, किसन वीर, आदि देशभक्त क्रांतीकारकांनी या प्रती सरकारचे कार्यात भाग घेतला. हे कार्यकर्ते स्थानिक गटात संघटित होऊन कार्य करीत असत. तरीही या सर्व गटात सुसूत्रता राखली जात होती. या पैकी काही गटांचा संबंध मुंबईतील भूमिगत समाजवादी गटाशीही होता सेवादलाचे कार्यकर्त्यांचा देखील यात वाटा होता असे दिसते.

या प्रती सरकारने १९४३ च्या मध्यापासून ब्रिटीश सत्तेशी व ब्रिटीश हस्तकांशी सशस्त्र लढे दिले होते. यांना त्या भागातील दरोडेखोरांशीही सामना करावा लागला होता. प्रती सरकारने न्यायदानाची केंद्रे स्थापन केली होती. या प्रती सरकारने विविध प्रकारचे नागरी, गुन्हेगारी विषयक आणि सामाजिक प्रश्नही हाती घेतले होते. सावकारांकडून होणारी गोरगरीब व शेतकऱ्यांची पिळवणूक

बंद पाडली. दारु पिणाऱ्यांना, स्त्रियांना त्रास देणारांना, गावात गुंडगिरी करणाऱ्यांना प्रतीसरकारने शिक्षा दिल्या. बलात्कार, मुलींची मुंबईत नेऊन विक्री या सारख्या गुन्ह्यांस अत्यंत कडक शिक्षा देण्यात आल्या. इंग्रजांशी संगनमत करणारे, इंग्रजांना खबर देणारे व फितूर अशा लोकांचाही या प्रती सरकारने बंदोबस्त केला. प्रती सरकार जिवंत ठेवण्यासाठी हे आवश्यक होते. त्याच प्रमाणे ते चालविण्यासाठी पैशाचीही गरज होती. म्हणून सरकारी खजिने लुटण्याचाही तुरळक पण यशस्वी प्रयोग झाला. धुळ्यावरुन नेण्यात येणारा सरकारी खजिना श्री.उत्तमराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली लुटण्यात आला होता.

एकीकडे प्रती सरकार (पत्री सरकार) त्यांचे सामाजिक असे विधायक कार्यक्रम पार पाडीत असे तर दुसरीकडे इंग्रज सत्तेशी त्यांना सामनाही करणे क्रमप्राप्त होते. ब्रिटीश सत्तेशी लढा देणे सोपे काम नव्हते. पण तळहातावर शीर घेऊन राष्ट्राला इंग्रजांच्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी हे पत्री सरकारचे सर्व कार्यकर्ते अविश्रांत कार्यरत असत. त्यामुळे सातारा जिल्हा व त्याचा परिसर हा स्वतंत्र आणि प्रती सरकारचे नियंत्रणाखाली आला होता.

---

१. प्रती सरकार : एक दृष्टीक्षेप (उत्तरार्ध) ले.गेल. ओमवेट (पृ.४१)
बापुसाहेब लाड स्मरणिका, १९८३.

२. व ३ : प्रती सरकार : एक दृष्टीक्षेप : (पान ५३)

अशा या काळात देशभरात गाजलेल्या या पत्री सरकारचे कांही प्रमुख कार्यकर्ते, विदर्भातही असाच उठाव व्हावा म्हणून प्रयत्न करीत होते. त्यासाठी मधून मधून ते अमरावतीस येऊन वेष व नांवे बदलून, दोन दोन महीने राहात असत व तेथूनच जिल्ह्यांतील निरनिराळ्या लोकांशी संपर्क स्थापन करीत. त्यांच्या गुप्त बैठका घेत असत. शिवाय नागपूर शहरातही त्यांनी श्री.डोमा वस्ताद आणि त्यांचे चिरंजीव श्री.ईश्वर देशमुख यांचेशी संपर्क ठेवला होता. अमरावतीचे देशभक्त

श्री.देवकिसनजी झंवर हे या कार्यकर्त्यांना शक्य तेवढी आर्थिक मदतही करीत असत. या भागांतील संपर्कात आलेल्यांना क्रांतिकार्याचे धडे व इतर शिक्षण देण्यासाठी सातारचे श्री.राम लाड व आकाराम पवार यांची नियुक्ती केली होती.

अमरावती शहर हे साताऱ्यापासून पुष्कळ दूर. त्यामुळे या अमरावती शहराशी या भूमिगत क्रांतीकारांचा जो संबंध आला तो मोठ्या चमत्कारिक रीतीने आला. त्याची हकीकत अशी.

१९४२ आंदोलनाचे संदर्भातव खांदेश मधील जळगाव नजीक पंजाब मेल उलथून पाडण्याची योजना (कट) होती. त्यात बरेच तरुण सामील होते. पण दुर्देवाने यांतील अनेकांना अटक झाली. मुख्य आरोपी श्री.एस.पंडीत या नांवाचे तरुण फरार झाले होते. त्यांना पकडण्यासाठी सरकारने पाच हजाराचे बक्षीस जाहीर केले होते. म्हणून श्री.पंडीत हे भूमिगत अवस्थेत असतानाच त्यांचा संबंध साताऱ्याच्या पत्री सरकारच्या कार्यकर्त्याशी आला. नंतर ते हैद्राबाद (दक्षिण) येथे असतांना त्यांचा संपर्क हैद्राबाद येथील खादी भांडारचे श्री.काशीनाथ भोंगाडे यांचेशी येऊन त्यांचे पर्यवसान गाढ मैत्रीत झाले. श्री.भोंगाडे हे मूळ नागपूरचे पण त्यांची बदली हैद्राबादचे खादी भांडारावर झाली होती. श्री.पंडीत हे फरार अवस्थेत आहेत ह्याची कल्पना श्री.भोंगाडे यांना होतीच.

पुढे श्री.भोंगाडे हे अमरावती येथील खादी भांडारवर बदलून आले. येथे राजापेठ वस्तीत भाड्याने घर घेऊन राहात असत. म्हणून श्री.एस.ए. पंडीत हेही फरार अवस्थेत श्री.भोंगाडेकडे राहू लागले. यातूनच त्यांची ओळख शेजारचे श्री.शामराव राजारामजी वऱ्हाडे यांचेशी झाली.

श्री.पंडीत अशा रीतीने एकीकडे पत्री सरकारच्या प्रमुख कार्यकर्त्याचे संपर्कात होते तर दुसरीकडे ते अमरावतीत आपले दिवस नाव व वेष बदलून श्री.भोंगाडे यांचेकडे राहून व्यतीत करीत असत. नंतर त्यांनी पत्री सरकारचे मुख्य कार्यकर्त्याना या अमरावती (विदर्भाचे) भागातहि त्या चळवळीचे लोण

पोंचविण्याचे प्रयत्न करावे असे सुचविले. विश्रांतीसाठी म्हणून अमरावतीला येऊन राहू लागले. आणि त्यांनी आपल्या कार्याचे विस्ताराचे दृष्टीने शहरांतील व जिल्ह्यातील निरनिराळे लोकांशी संपर्क सुरु केला. अर्थात येथील मुक्कामात ही मंडळीही वेष आणि नाव बदलूनच राहात असत.

आसऱ्याचे पण अमरावतीत राहाणारे कट्टर गांधीवादी तरुण श्री.नामदेवराव मोहोड हे नेहमी येथील खादी भांडारात जात असत. तेथेच त्यांची ओळख बदलून आलेले श्री.भोंगाडे यांचेशी होऊन त्यांचे कडूनच त्यांना श्री.पंडीत यांची माहिती कळली आणि तत्कालीन देशभक्तीचे कल्पनेतून त्यांनी या भूमिगतांना जरुर ते सहकार्य देण्याचे मान्य केले. व नंतर या सर्वांचा एक गटच अमरावतीत उभा झाला. कारागृहा बाहेर असलेले तत्कालीन दे.भ.डॉ.देवकिसनजी झंवर यांचेशीही या लोकांचा संपर्क आला. श्री.देवकिसनजी प्रसंगोचित या कटाला आर्थिक मदतही देऊ लागले. या कार्यकर्त्यांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने या शहरात एकूण तीन खोल्या भाड्याने घेण्यांत आल्या होत्या. त्यापैकी एक राजापेठला, दुसरी नमुना भागात आणि तिसरी मुधोळकरपेठ येथे होती.

पत्री सरकारचे जे बीनीचे कार्यकर्ते येथे आपल्या कार्यासाठी येत ते त्या दृष्टीने अनेकांच्या भेटीगाठी घेत. उपयोगाचा माणूस असेल तर संपर्क वाढवित. या शिवाय त्यांनी नागपूर येथील श्री.डोमा वस्ताद आणि त्याचे चिरंजीव श्री.ईश्वरबाबू देशमुख यांचेशीही संपर्क वाढविला होता.

अमरावतीत आपल्या क्रांती कार्याचा विस्तार करण्याचे हेतूने विश्रांतीचे नावांने येऊन राहाणारे पत्री सरकारचे बीनीचे कार्यकर्ते व सेनापती श्री.बापूसाहेब लाड (बापू), श्री.एस.ए.पंडित (गोविंद चव्हाण) महादेव मिरगे (आमदार दिनगर), नाथाजी लाड (सुरेश), भगवान पाटील (बाप्पा), जयसिंगराव माने (वकील), शंकर पाटील (मास्तर), सावळाराम एडके (सावळा), सीताराम वडर (धोंडोराम), वाय.सी.पाटील वकील (अण्णा), शामराव लाड (शाम बापू),

ज्ञानबा जाधव (पहेलवान), गोविंद जोशी (बाळ), रावसाहेब केळके (रावसाहेब).

. . . . . (कंसातील नांवे टोपण नांवे होत) . . . . . .

या सर्वांना आपल्या हालचाही गुप्तपणे कराव्या लागत. वाटेल त्या माणसाशी संपर्क ठेवणे फार धोक्याचे असल्याने संपर्कात येणारा माणूस पूर्ण पारखून नंतरच त्यांचेशी मित्रत्व करायचे. राजापेठचे श्री.शामरावजी वऱ्हाडे यांचेशी या सर्व कार्यकर्त्यांचे संबंध घरोब्याचे झालेले होते. श्री.वऱ्हाडे यांना ही मंडळी कोण आहे याची कल्पना होती. पण ते येथे राहून कोठे जातात आणि कोणास भेटतात याची ते चौकशी करीत असत. त्यामुळेच वेळोवेळी अमरावतीला येऊन राहाणारे पत्री सरकारचे बिनीचे हे कार्यकर्ते सुरक्षित होते. वास्तविक त्याकाळी अशा लोकांशी संपर्क ठेवणे मोठे जोखमीचे होते. कारणक सर्वत्र हेरगिरीचा सुळसुळाट होता. परंतु त्याकाळचे सर्व वातावरण देशभक्तीने भारलेले होते. एकमेकाला समजून उमजून मदत करीत. कारण देशावरील इंग्रजांची सत्ता उलथून पाडायची होती ना . . . .

पत्री सरकारच्या बीनीच्या या कार्यकर्त्यांनी येथील वास्तव्यात जे प्रयत्न करायचे ते केलेत पण त्यातून फारसा लाभ झाला असे दिसत नाही. तरी पण आणखी एक वर्ष मिळाले असते तर येथेही पत्री सरकारची शाखा सुरु झाली असती.

संदर्भ :- १. जी.डी.बापु लाड स्मरणिका १९८३.

२. श्री.शामराव राजारामजी वऱ्हाडे यांची मुलाखत.

३. श्री.नामदेवराव मोहोड यांची मुलाखत.

---

२३. दे.भ. सत्यमूर्ती उमरावती कारागृहांत :-

मद्रासचे थोर कॉंग्रेस नेते व मध्यवर्ती असेम्ब्लीतील कॉंग्रेस पक्षाचे

उपनेते दे.भ. सत्यमूर्ती यांना आंदोलनात अटक झाली होती. त्यांना उमरावतीचे कारागृहात आणून ठेवण्यात आले. उमरावती जे मध्ये ते बरेच आजारी झाल्याने त्यांना नंतर इरविन हॉस्पीटल मध्ये हलविण्यात येऊन तेथेच पोलीस पहाऱ्यात ठेवण्यात आले होते व पुढे त्यांना परत मद्रास येथे नेण्यात आले होते.

(:उदय दि. ३० ऑक्टोबर १९४२:)

या संदर्भात त्यावेळी ''उदय'' पत्राचे सह संपादक असलेले श्री.रघुपतराव देशमुख यांनी सांगितलेली हकीकत अशी :-

१९४२ च्या ''छोडो भारत '' आंदोलनात त्या वेळच्या मद्रास प्रांताच्या कॉग्रेस नेत्यांना अमरावती कारागृहात स्थानबध्द करण्यात आले होते. या राजबंद्यांत मद्रास प्रांताचे थोर नेते, मुत्सद्दी, संसदपटु आणि प्रभावी वक्ते श्री.सत्यमूर्ती यांच्या शिवाय श्री.टी.प्रकाशम, श्री.व्ही.व्ही. गिरी (नंतरचे राष्ट्रपती), श्री.नीलम संजीव रेड्डी (नंतरचे राष्ट्रपती), श्री.कामराज नादर आदी नेत्यांचा समावेश होता. वऱ्हाडची उष्ण हवा श्री.सत्यमूर्ती या वयोवृध्द नेत्याला मानवली नाही व ते तुरुंगातच आजारी पडले. त्यांना उपचारासाठी अमरावतीच्या इरविन रूग्णालयात ठेवण्यांत आले होते. आजार बळावल्यामुळे त्यांच्या कुटुंबियांना त्यांच्या सेवेसाठी अमरावतीला येण्याची व रुग्णालयात राहण्याची परवानगी देण्यात आली. वऱ्हाड भागातील उष्ण हवा आपल्या प्रकृतीला मानवत नाही, तेव्हा आपली मद्रासच्या तुरुंगात बदली करावी अशी श्री.सत्यमूर्ती यांनी इच्छा होती. पण ही इच्छा सरकारच्या कानी जावी कशी ? हा प्रश्न होता. त्या बाबात वृत्त पत्रात लिखाण यावे असे त्यांना वाटे. त्यासाठी उदयच्या प्रतिनिधीने आपली मुलाखत घ्यावी. अशी इच्छा त्यांच्या शुश्रुषेसाठी आलेल्या त्यांच्या बालकांनी उदयचे संपादक श्री.नानासाहेब बामणगांवकर यांच्या जवळ व्यक्त केली. पण ही मुलाखत कशी घडवून आणता येईल हा प्रश्न होता. कारण श्री.सत्यमूर्ती यांच्या रुग्णालयांतील खोलीवर रात्रदिवस पोलीसांचा पहारा असे. कोणालाही त्यांना भेटू देत नसत. त्या स्थानबध्दतेतही श्री.सत्यमूर्ती यांनी त्यांची पत्नी, कन्या व बालक यांच्यासह

दिवाळीचे चार दिवस आनंदात घालविले. दिवाळी साठी नवीन कापड खरेदी करुन त्यांचे बालक कापडाचा गठ्ठा घेऊन उदय कार्यालयात आले व "आपला प्रतिनिधी माझ्या बरोबर द्या कापड दुकानाचा गुमास्त म्हणून मी त्या पोलीस पहाऱ्यातून श्री.सत्यमूर्ती यांच्या भेटीला घेऊन जातो." असे उदयकार श्री.नानासाहेब बामणगावकर यांना त्यांनी सुचविले. कापड दुकानदाराचा गुमास्ता म्हणून बतावणी करण्याचे काम उदयचे सह संपादक श्री.रघुपतराव देशमुख यांच्याकडे सोपविण्यात आले. कापड दुकानचा गुमास्ता म्हणून त्यांनी पोलीस पहाऱ्यातून श्री.सत्यमूर्ती यांच्या खोलीत प्रवेश केला व त्यांची मुलाखत घेतली. आंदोलनात कॉंग्रेसच्या नावावर सुरु असलेल्या मोडतोडीच्या प्रकाराबद्दल त्यांनी या भेटीत नापंसती दर्शविली. या मुलाखतीनंतर श्री.नानासाहेब बामणगांवकर यांनी उदयमध्ये संपादकीय सूचना करुन प्रकृती स्वास्थासाठी श्री.सत्यमूर्ती यांची ताबडतोब सुटका करावी, निदान बदली करणे किती आवश्यक आहे हे सरकारच्या कानी घातले.

उदयच्या सूचनेची दखल भारत सरकारने व मद्रास सरकारने घेतली. त्याप्रमाणे श्री.सत्यमूर्ती यांची मद्रास तुरुंगात बदली करण्याचे ठरले. पण त्यांच्या भेटीसाठी अमरावतीला आलेल्या त्यांच्या कुंटुंबियांना तत्पूर्वी मद्रासला जाण्यास सांगण्यात आले. त्या प्रमाणे ते नाईलाजाने गेले. पण श्री.सत्यमूर्ती यांची प्रकृती काळजी करण्याजोगी असल्यामुळे, मद्रासचे त्यांचे आगमन आपणाला कळण्यासाठी सांकेतिक भाषेत आपल्या मद्रासच्या पत्त्यावर तार पाठविण्यासाठी ते सांगून गेले. श्री.सत्यमूर्ती यांना अमरावतीहून हलविण्याचा विशेष गाजावाजा होऊ नये व ती बातमी गुप्त रहावी म्हणून त्यांना अमरावतीहून मोटारने वर्धा येथे नेण्यात आले व तेथून गाडीने मद्रासला पाठविण्यात आले.

पण श्री.सत्यमूर्ती यांना इरविन हॉस्पीटलातून हलविण्यात आल्याचा व त्यांच्या प्रयाणाचा सुगावा उदयचे सह संपादक श्री.रघुपतराव देशमुख यांना त्याच दिवशी लागला. लगेच "आज पार्सल रवाना झाले." असा जरुरीचा

सांकेतिक भाषेतील तार त्यांनी मद्रास येथे त्यांच्या कुटुंबियांना पाठविला. श्री.सत्यमूर्ती ज्या गाडीने मद्रासला पोचले ती गाडी येण्यापूर्वीच त्यांच्या कुटुंबातील मंडळी त्यांच्या भेटीसाठी मद्रास स्टेशनवर आलेली पाहून श्री.सत्यमूर्ती यांच्या प्रयाणाची व आगमनाची बातमी गुप्त ठेऊ पहाणाऱ्या ब्रिटीश सरकारच्या अधिकाऱ्यांनाही धक्का बसला असेल.

श्री.सत्यमूर्ती यांना फारच थोडे दिवस मद्रास तुरुंगात ठेवण्यांत आले. त्यांची प्रकृती जास्त बिघडल्याने त्यांची मुक्तता करण्यात आली व त्यानंतर अल्प काळातच त्यांना मृत्यू आला.

स्वातंत्र्यपूर्व काळात अमरावती येथील राष्ट्रीय बाण्याच्या वृत्तपत्रात काम करणाऱ्या पत्रकारांनी व वार्ताहारांनी स्वातंत्र्य आंदोलनात अनेक प्रकारे हात भार लावला व वेळ प्रसंगी धाडसही पत्करले, त्याचे हे एक उदाहरण.

एस. सत्यमूर्ती : (ज. १८८७ मृ. १९.८.१९४३)

मद्रास प्रांतातील सुप्रसिध्द कॉग्रेस कार्यकर्ते व वक्ते, पदुकोटा संस्थानातील निरुमयम हे गांव त्यांचे जन्मस्थान होय. त्यांचे वडील डी.सुंदर शास्त्रीगल हे वकील होते. हेही पदुकोटाचे महाराजा कॉलेज व मद्रास लॉ कॉलेज येथे आपले शिक्षण संपवून वकील झाले. मद्रास मधील प्रमुख वकीलांत एस.सत्यमूर्ती यांची गणना होत असे.

तामिळनाडू प्रांतातील राजकीय चळवळीचे उत्थापक व कुशल संघटक म्हणून त्यांची प्रसिध्दी होती. त्यासाठी त्यांनी त्या प्रांतातील लहान लहान खेड्यात दौरे काढुन व बारीक सारीक चळवळीतही भाग घेऊन जागृति करण्याचा प्रयत्न केला. तामिळनाडू कॉग्रेस कमेटीचे ते कित्येक वर्ष अध्यक्ष होते. व तामिळनाडू पोलिटीकल कॉन्फरन्सचे अध्यक्षस्थानहि त्यांना देण्यात आले होते. १९१९ व १९२५ साली इंग्लंडला गेलेल्या कॉग्रेस शिष्टमंडळाचे ते सभासद होते.

मद्रासच्या सुगुण विलास सभेशी नट म्हणून त्यांचा संबंध होता.

त्यांच्या कलाभिरुची बद्दल मुंबईच्या हिंदी चित्रपटाच्या रौप्य महोत्सवाचे अध्यक्षस्थान त्यांना देण्यात आले होते. (अर्वा.च.कोश. ५६०)

२४. क्रांतिकारी भूमिगत कार्यकर्ते अमरावतीत :-

१९४२ च्या आंदोलनातील क्रांतिकारक श्री.श्याम नारायण काश्मिरी हे भूमिगत कार्यकर्ते अमरावतीस आले होते. त्यांना, कालाराम मंदीराचे मागे राहणारे श्री.जेठमलजी वजीर यांच्या घरात ८-१० दिवस ठेवले होते. त्यांच्या मागोमाग लाल सेनेचे श्री.मंगललालजी बागडी हे अमरावतीला फरार अवस्थेत आलेत. त्यांना दहिसाथीतील श्री.मंगलचंद बिसोरीलाल यांच्या वाड्यात ८-१० दिवस ठेवले होते. पुढे आष्टीचे प्रकरणातील एक फरारी तरुण अमरावतीला आला. त्याचे जबड्यात बंदुकीची गोळी होती. त्याला श्री.महादेवराव कुबडे यांच्या तारखेडा विभागातील घरात ठेवले होते. त्याच्या जबड्यातील गोळी काढण्यास कोणी डॉक्टर तयार होईना. म्हणून शेवटी त्याला तेथून वापस पाठवावे लागले. १.

(देवकिसनजी झंवर यांची मुलाखत)

---

२५. वऱ्हाड प्रांतिक कॉंग्रेसचे अध्यक्ष श्री.ब्रिजलालजी बियाणी यांनी अमरावतीचे डॉ. शिवाजीराव पटवर्धन यांना पाच वर्षासाठी आणि शेंदूरजन्याचे (ता.मोर्शी) श्री.जग्गुलालजी तांबी यांना दोन वर्षासाठी जानेवारी १९४२ मध्ये कॉंग्रेसमधून काढून टाकले होते.

इ.स. १९४३

१) चलनातून कलदार रुपया बंद.

२) तुरुंगात राजबंद्यांचे उपोषण.

३) संत तुकडोजी महाराजांचे भजन.

४) ऑगस्ट क्रांतीचा हिशेब.

५) ह्या निमित्त म.प्र.वऱ्हाड सरकारचा जमाखर्च.

६) म. गांधीचा अपघात.

७) अमरावतीच्या युवकांना पुण्यात अटक.

८) मुस्लिम लीगची सभा.

९) बोरगाव मंजूचा अपघात.

१०) स्वा. सावरकर यांची अमरावतीस भेट.

११) डे.कमिश्नरांची बदली.

१२) महाविदर्भ विकास परिषद.

१३) श्री.काशीराम बापूंचा स्वर्गवास.

१४) नगर पालिकेचे स्वयंवर.

१५) दे.भ.बाळासाहेब मराठे यांच्यावर भाषणबंदीचा हुकूम.

१६) मराठी रंगभूमि शतसांवत्सरिक सोहळा.

१७) टिमटाला प्रकरण व खटला.

इसवी सन १९४३

भारतीय चलनातून बंद करण्यांत येणाऱ्या रुपया (कलदार) संबंधी जाहीरनामा

१) खालील छापाचे रुपये, भारतीय चलनातून बंद करण्यासंबंधीचा भारत सरकारचा जाहीरनामा दि. १ जानेवारी १९४३ चे अमरावतीतील वृत्तपत्रातून प्रकाशित झाला होता. त्यानुसार -

१. व्हिक्टोरिया छापाचे व सातव्या एडवर्डाच्या छापाचे रुपये (कलदार) दि.१ मे १९४३ पासून चलनातून बंद करण्यात आलेत.

२. तसेच ११-१२ मासे चांदी असलेले पंचमजॉर्जचे व कंगोरेदार काठाचे सहाव्या जार्जच्या छापाचे रुपये आणि अधेल्या (अठन्नी) दि.१ मे १९४३ पासून कायदेशीर चलन म्हणून म्हणून बंद होणार आहेत.

२) अमरावतीत तुरुंगात राजबंद्यांचे उपोषण :-

जानेवारी १९४३ मध्ये उमरावतीच्या तुरुंगा मधील राजबंद्यांनी उपवास सुरु केल्याची बातमी उमरावती शहरात पसरली. त्यामुळे शहरात खळबळ माजली. कांही (सुमारे ५०) लोकांनी ६ जानेवारी रोजी मध्यप्रांत सरकारच्या चीफ सेक्रेटरींना तार केली पण उमरावतीचे तार ऑफीसने ही तार आक्षेपार्ह असल्याचे सबबीवर घेण्याचे नाकारले होते. उमरावतीच्या जेल मध्ये दे.भ.रघुनाथमलजी कोचर यांनी जेल व्यवस्थेविरुध्द उपोषण सुरु केले होते. त्याची बातमी बाहेर आली. त्यामुळेच खळबळ माजली होती. शवेटी श्री.डॉ.शहाणे आणि श्री.चौबळ ह्या जेल व्हिजिटर्सनी स्वत: जेलमध्ये जाऊन गाऱ्हाणे दूर करण्याचा प्रयत्न केला व राजबंधांचे उपोषण सोडविले होते.

३) संत तुकडोजी महाराज यांचे सुश्राव्य भजन :-

अमरावती शहरातील मध्यवर्ती अशा गांधी चौकात दि. २८ जानेवारी १९४३ रोजी संत तुकडोजी महाराज यांचे सुश्राव्य भजनाचा कार्यक्रम झाला. त्यासाठी

उंच व्यासपीठ तयार केले होते व वीजेची रोषणाई केलेली होती. या कार्यक्रमाला श्रोतृवर्गाची प्रचंड गर्दी झाली होती.

भजनानंतर ''विश्वशांती-नामसमाह'' या विषयावर श्री.तुकडोजी महाराज यांचे प्रसंगोचित भाषण झाले. या विश्वशांती नाम समाह प्रचार दौऱ्यातच महाराजांच्या या भजनाचा लाभ अमरावतीकरांना झाला होता. २८ डिसेंबर १९४२ रोजी महारांजाची रायपूर कारागृहातून बिनशर्त सुटका झाल्यानंतर त्यांचा अमरावतीचा हा प्रथम दौरा होता.

२८ ऑगष्ट १९४२ ते ३ डिसेंबर १९४२ या काळांत तुकडोजी महाराज हे नागपूर व रायपूर तुरुंगात होते. त्यांना चांदा जिल्ह्यात आगष्ट क्रांतीचे संदर्भात अटक झाली होती.

संत तुकडोजी महाराज यांचा जन्म शके १८३२ च्या कार्तिक शुध्द पोर्णिमेला यावली या गावी झाला. जन्मनाव ''माणिक'' होते. जात, ब्रम्हभाट आजोबा गणेशपंत ठाकूर व आजीचे नाव तानाबाई. ते पंढरीचे वारकरी होते. भीक्षा मागून उदर निर्वाह करीत. पती-पत्नी पंढरपुरात वारले. त्यांचे पुत्र बंडाजी पंत, त्यांची व्दितीय पत्नी मंजुळाबाई, मंजुळाबाईच्या वडिलांचे नांव तुकाराम. तेही पंढरीचे वारकरी होते. मंजुळाबाईला पुत्र झाला. माणिक लहानपणी सर्वागाला बिबा लावला होता. बाळ सुजले गुटगुटीत दिसावे म्हणून बिबा लावला होता.

त्याला आकोटचे हरिबुवा संत व गुलाबराव महाराज यांचे दर्शनास वारंवार नेत. भारतीबुवा (चांदुर) यांचा महाराजास सहवास लाभला. शाळेत असतानाही भजन करीत व अभ्यासही करीत. शाळेचा वेळ ते भजनात घालवीत असले तरी ते अभ्यासात आघाडीवर राहिलेत. सातळी-कोतळीकर महाराजांनी भेटीअंती महाराजावर कृपा दृष्टीकोन करुन ''दास'' व्हावे म्हणून आशीर्वाद दिला. आणि घोंगडे महाराजांनी ''स्वोध्दाराचा मार्ग दाखविला. एकतारीवर भजन-कीर्तन करण्याचे व ईश्वर गुण वर्णन ऐकण्याचे त्यांना इतके वेड लागले की, ग्रामवासीयांनी

''माणिक'' ची वेड्यात गणना केली. पुढे संत अडकोजी महाराज यांचे दर्शनानंतर गुरुसेवा, विद्याभ्यास कवित्व, शंकराधना करुन व तुकडे मागून ते कालक्रमणा करीत, लौकरच ''माणिक'' ''तुकड्या'' म्हणून प्रकाशांत आले.

सालबर्डी येथील १९३५ च्या ''महारुद्रयज्ञ'' आरती मंडळ, श्री.गुरुदेव सेवा मंडळ, विश्वशांती-नामसप्ताह'' ह्या त्यांच्या जीवनाच्या प्रमुख गोष्टी होत्या. खेड्यांच्या उध्दाराचे कार्य, जनतेत शिस्त व नैतिकता निर्माण करणे. स्वातंत्र्य संग्राम काळांतील त्यांची क्रांतीकारी भजने व कारावास हे महत्वाचे कार्य होय. साधुसमाजाचे नेते होते. राष्ट्रपती व पंतप्रधान यांचे उपस्थितीत त्यांची खंजीरीची भजने झाली होती. त्यांना ''राष्ट्रसंत'' हा मान देशात प्राप्त झाला आहे. ते विश्वहिंदू परिषदेच्या संस्थापकां पैकी एक होत.

४) ऑगष्ट क्रांती चा हिशेब :-

''सन १९४३ च्या अखेरपर्यन्त ५९८ वेळा गोळीबार करण्यात आलेत. ६०,२२९ जणांना पकडण्यात येऊन, त्यापैकी २६,००० जणांना शिक्षा झाल्या. भारत संरक्षण कायद्याच्या २९ व १२९ कलमान्वये १८,००० जणांना स्थानबध्द म्हणून ठेवण्यात येऊन, १४,००० लोक तुरुंगात असून त्यापैकी ११,००० जणांना चौकशी शिवाय ठेवण्यात आले आहेत. १९४२ अखेरीस पोलीसांचे गोळीबारात ९१० ठार व १६३० जखमी झाले. ''मध्यवर्ती असेंम्बलीत ता. १२ फेब्रु. १९४३ रोजी प्रश्नोत्तराचे वेळी गृहमंत्र्यांनी ही माहिती सभागृहाला दिली होती.

(टिप :- मध्यप्रांत सरकारने १९४२ साली एक हजार नऊशे तेरा लोकांना फटक्याची शिक्षा सुनावली होती.)

५) ऑगस्टक्रांती निमित्त मध्यप्रांत वऱ्हाड सरकारचा खर्च :-

ऑगस्ट १९४२ मधील दंगली दडपण्यासाठी ''मध्यप्रांत-वऱ्हाड'' सरकारच्या तिजोरीवर एकूण साडे अकरा लक्ष रुपयांचा बोजा बसला होता. पैकी सरकारी मालमत्तेचे नुकसान दोन लक्ष रु, रामटेकच्या ट्रेझरीची लूट साडेतीन लक्ष रु,

(पैकी १ लक्ष रुपये मागाहून वसूल झाले होते.) व जादाखर्च सात लक्ष रुपये अशी त्याची विभागणी आहे. पोलीस खात्यातील जादा भरतीचा खर्च अलाहिदा आहे. पोलीस खात्याचा खर्च अंदाजापेक्षा १४ लक्ष ६८ हजारांनी म्हणजे ६० लक्ष ६८ हजार वरुन ७५ लक्ष ३६ वर वाढला होता.

६) महात्मा गांधीचा उपवास : अमरावतीचा बाजार बंद :-

महात्मा गांधीनी पुण्याच्या आगाखान पॅलेस मध्ये दि. १०.२.४३ पासून एकविस दिवसांच्या उपवासाला सुरुवात केली. ही वार्त अमरावतीत आल्याबरोबर येथील सराफा बाजार तीन दिवसपर्यत बंद होता. नंतर कापड बाजार, बाजार पेठ आणि कॉटन मार्केटही बंद ठेवण्यात आले.

७) अमरावतीचे युवकांना पुण्यांत अटक :-

या उपवासाचे काळातच उमरावतीचे काही युवकांनी पुण्यात जाऊन तेथे मोर्चा नेण्याचा प्रयत्न केल्यावरुन त्यांना अटक करण्यात आली व खटला होऊन त्यापैकी श्री.अनंतलाल दम्माणी, श्री.रतनलाल गांधी, श्री.आकाराम खुंडे व श्री.भाऊराव इंगोले या चौघांना येरवडा तुरुंगात प्रत्येकी तीन महिने सक्त मजुरीची शिक्षा सुनावण्यात आली होती. श्री.माणिकराव खारकर आणि श्री.महादेव बर्वे यांना, वय कमी असल्यामुळे सोडून देण्यात आले होते.

१: उदय : ३.८.४३ :

८) मुस्लीम लीगची सभा :-

दि. १२ एप्रिल ४३ चे रात्री श्री.दौलतखान यांचे अध्यक्षतेखाली मौलापुरा बंगला येथे अमरावती शहर व जिल्हा मुस्लीम लीगची सभा भरुन तीत, महागाई व धान्य टंचाईचा विचार करण्यात आला होता.

शहरात स्वस्त धान्यांची दुकाने उघडावीत अशी मागणी करणारा ठराव मंजूर करण्यात आला, तसेच कमिश्नर साहेबांकडे यासाठी एक शिष्ट मंडळ

पाठवावे असे ठरविण्यात आले होते. सभेला २०० मुस्लीम हजर होते. सभेत मुस्लीम लीगच्या शहर व जिल्हा शाखेचे केलेल्या कार्याचा अहवाल सादर करण्यात आला. लीगचे सेक्रेटरी श्री.हिदायतअली वकील सभेला उपस्थित होते.

९) बोरगांव मंजू रेल्वे अपघात :- उमरावतीचे श्री.आपटे वकील यांचा अंत:-

दि. ४ जून १९४३ रोजी उमरावतीला सकाळीच एक भयंकर बातमी लोकांचे कानावर आदळली. आकोला जिल्ह्यातील बोरगांव (मंजू) रेल्वे स्टेशनजवळ मुंबई मेल एक मालगाडीवर आदळून भयंकर अपघात झाल्याची ती बातमी होती.

या बातमीने ज्यांचे कुंटुबिय या गाडीतून येण्याची शक्यता होती. अशा लोकांना आणि इतर नागरिकांनाहि भयंकर धक्का बसला. जो तो अपघाताची चौकशी करु लागला. या गाडीने उमरावतीचे श्री.शंकरराव आपटे वकील आपल्या कन्येसह उमरावतीस येत होते. झालेल्या अपघातात शंकररावांचा हृदयद्रावक अंत झाला.

१०) स्वा.वीर सावरकर यांची अमरावतीस भेट :-

दि. १ ऑगस्ट १९४३ रोजी स्वांतत्र्यवीर सावरकर हे अमरावतीस त्यांच्या परिवारासह पोचले. तेव्हा स्थानकावर त्यांचे भव्य स्वागत करण्यात आले. तेथून निवासस्थानी खापर्डे वाड्यात पोचल्यावर त्यांनी डॉ.मुंजे, प्रा.देशपांडे, विश्वनाथराव केळकर यांच्याशी हिंदुमहासभेची आगामी कार्यकारिणी व त्यागपत्र याविषयी चर्चा केली.

त्यानंतर सकाळी ९.१५ वाजता येथील जोग चौकांत डॉ.मुंजे यांच्या अध्यक्षतेखाली सत्कार समारंभास प्रारंभ झाला. स्वागतगीतानंतर संत तुकडोजी महाराज यांनी प्रार्थना केली की, हिंदूसमाजाच्या पुनरुध्दाराचे कार्य तडीला नेण्यासाठी परमेश्वर तात्याराव यांचे कार्यास यश देवो. श्री.शेकदार यांनी संदेश वाचून दाखविल्यानंतर विदर्भ - सावरकर सत्कार समितीचे अध्यक्ष श्रीमान बाबाराव खापर्डे प्रास्ताविक भाषणात म्हणाले, आज गेल्या सहा वर्षाच्या प्रथेप्रमाणे टिळक पुण्यतिथीला सावरकर पुण्याला जावयाचे, पुण्याचा तसा आग्रहही होता. आम्ही हा समारंभ आज

घेऊ नये असेही त्यांनी सांगितले. पण अनेक कारणांनी आम्हाला हाच दिवस सोईचा होता आणि सावरकरांनीही त्याला मान्यता दिली. तरी पुणेकर मित्रांनी राग न मानता मला क्षमा करावी. या सावरकर सन्मान निधीसाठी विदर्भातून १८,२४७ रु. गोळा झाले. पैकी ३२२५ रुपये पुण्याला पाठविले आणि उरलेली १३,१९८ रुपये येथे देत आहो. अद्यापही कांही देणग्या यावयाच्या आहेत. त्यानंतर सावरकरांकडे पाठवू.

डॉ.मुंजे अध्यक्ष म्हणून बोलतांना म्हणाले, ''आजच्या आणीबाणीचे काळात सावरकर हेच आम्हाला नेते हवेत. चालू युध्द संपून नंतर होणाऱ्या वाटाघाटी त्यात निघणारा पाकीस्तानचा प्रश्न हे सर्व होईपर्यत तरी निदान स्वा.वीर सावरकर हेच आम्हाला हिंदूमहासभेचे अध्यक्ष पाहिजे आहेत. त्यांची इच्छा असली तरी त्यांना अध्यक्षपद सोडता येणार नाही.''

त्यानंतर मानपत्र वाचून दाखवून ते मानपत्र आणि निधी स्वा.सावरकरांना अर्पण करण्यात आला. ह्या सत्काराला उत्तर देताना स्वा.सावरकर म्हणाले, ''आपल्या येथील कै.दादाराव खापर्डे हेही वऱ्हाडचे टिळकच असल्याने आज टिळक पुण्यतिथीला येथेही मला पुण्याप्रमाणे टिळकांचे दर्शन घडत आहे. लो. टिळक नि दादाराव खापर्डे हे जसे खांद्याला खांदा लावून कार्य करीत तसेच आज मी आणि बाबाराव कार्य करीत आहोत. टिळक कॉग्रेसमध्ये होते ही गोष्ट खरी आणि ती कॉग्रेस आज असती तर मीही आज त्यातच दिसलो असतो. टिळकाच्या काळात देशभक्ती हा व्यापार नव्हता, मुसलमांनाना संपूर्ण राज्य द्या आणि अहिंसेनेच स्वराज्य मिळवू असल्या आचरट घोषणा त्या काळी टिळकांची कॉग्रेस करीत नव्हती. राजकारणात कोणताही धर्म, पंथ, जात न पाहाणे हेच हिंदूमहासभेचे धोरण आहे. अर्थात अगदी लोकसत्तेच्या तत्वाप्रमाणे हिंदुस्थानात बहुसंख्य हिंदू हेच या राष्ट्राचे स्वामी होत आणि इतर समाज अल्पसंख्य होत. या दृष्टीने कॉग्रेस खऱ्या अर्थाने राष्ट्रीय राहील तर मीहीतीत राहीन. कॉग्रेस केव्हा धरावी नि केव्हा सोडावी हे मी लोकमान्यांपासून शिकलो आहे. आपण लखनौ करार नीट वाचा म्हणजे त्यात लोकमान्यांनी कांहीही गमावलेले नाही आणि मुसलमानांच्या लगटीसाठी वा भीतीसाठी पक्षपातही केलेला नाही असे आपणास

दिसून येईल. मालेगाव, मुंबई इत्यादि ठिकाणी मुसलमानानी जे दंगे केले त्या संबंधीचे त्यांचे लेख वाचा, म्हणजे आज सावरकर जे बोलत आहे ते लोकमान्यांचेच विचार आहेत असे दिसून येईल. राष्ट्रीय जागृती साठी त्यांनी "शिवाजी महाराजांचा उत्सव नि गणेशोत्सव चालू केला तेव्हा चालू असलेल्या मोहरमच्याच उत्सवात पंजे नाचवा असे त्यांनी सांगितले नाही. आपला लढा त्रिकोणी आहे असे ते नेहमी सांगत असत.

लोकमान्यांच्यावेळी पाकीस्तानच्या प्रश्नाने आजचे स्वरुप धारण केले नव्हते. आज हा प्रश्न तीव्र झाला आहे. आणि म्हणूनच त्यांच्यापेक्षाही अधिक कट्टरपणाने मला हिंदु-राष्ट्र वादाचे प्रतिपादन करावे लागत आहे. लोकमान्यांच्या संदेशात परिस्थितीप्रमाणे अवश्य ती भर घालून त्यांचेच कार्य हिंदूसभेच्याव्दारे मी पुढे चालवित आहे. प्रकृतीमुळे मला अध्यक्षपद सोडावे लागत आहे. हिंदुत्वाची बीजे आत चांगली रुजत आहेत. हे अग्निकुंड आता विझत नाही. माझा सत्कार हा टिळकांचे स्फूर्तीचा सत्कार आहे. यामुळे मला अधिक धन्यता वाटते.

दुपारी मोरोपंत जोशी यांचेशी विचारविनीमय, स्त्रियांचे वतीने जोशी सभागृहात झालेल्या सत्कार सभेत पाऊण तासांचे भाषण, गुरुद्वारात मानपत्र सत्कार, आणि शीख समाजाच्या आजच्या कर्तव्याविषयी अर्धा तास भाषण, रा.स्व. संघ शाखेला भेट आणि त्यांच्याशी चर्चा, संत तुकडोजी महाराज यांच्या गुरुदेव मासिक कार्यालयास भेट, इतके कार्यक्रम स्वातंत्र्यवीर सावरकरांनी दुपारी पार पाडले.

ता. २ ऑगस्टला सकाळी १२ ते २ वऱ्हाडातील हिंदुत्वनिष्ठ कार्यकर्त्यांसमवेत मनमोकळी चर्चा, दुपारी ३ वाजता हिंदू विद्यार्थी संघाचे वतीने चालू युध्द या विषयावर भाषण, नंतर हनुमान व्यायाम शाळेस भेट, अस्पृश्य वस्तीत सहभोजन, तेथे आपली समाज सुधारणा या विषयावर चर्चा, असे अनेक कार्यक्रम झाले. येथील अस्पृश्य वस्तीतील महार नेते श्री.घाटगे यांच्या बी.ए. च्या वर्गात शिकणाऱ्या मुलीला सावरकरांनी दहा रुपये पारितोषिक दिले. हे सर्व कार्यक्रम संपूवन स्वा.सावरकर संध्याकाळी मुंबईकडे परत गेले.

स्वातंत्र्यवीर सावरकरांचा उमरावतींत भव्य सत्कार :-

दि. १ ऑगस्ट १९४३ रोजी स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा उमरावतीत भव्य सत्कार करण्यात येऊन, अठरा हजार रुपयांचा निधी त्यांना अर्पण करण्यात आला.

हा सत्कार दि. १ ऑगष्ट रोजी सकाळी जोग चौकातील मुद्दाम उभारलेल्या शोभायमान व्यासपीठावर धर्मवीर डॉ.मुंजे यांच्या अध्यक्षतेखाली करण्यांत आला. त्यावेळी संत तुकडोजी महाराज, धर्मभास्कर पाचलेगावकर, स्वामी शिवानंद सर मोरोपंत जोशी, प्रा. वि.घ.देशपांडे, डॉ.शहाणे, दे.भ.नानासाहेब बामणगांवकर, इत्यादी प्रमुख मंडळी हजर होती.

श्री.बाबासाहेब खापर्डे यांनी सत्कार समितीतर्फे स्वागताध्यक्ष म्हणून भाषण केले व उमरावतीचे वतीने स्वातंत्र्यवीराचे स्वागत केले. संत तुकडोजी महाराजांचे आशीर्वादपर भाषण झाले. त्यानंतर स्वा.वीर सावरकरांचे उत्तरादाखल भाषण होऊन दुपारी २ वाजता हा सत्कार समारंभ संपला. या भाषणात त्यांनी हिंदूराष्ट्राचे सैनिकीकरण व्हावे, यावर भर दिला.

त्याच दिवशी सायंकाळी ५ वा. राष्ट्रसेविका समितीतर्फे स्वा. वीर सावरकरांचा सत्कार करण्यात आला.

दि. २ ऑगस्ट रोजी दुपारी डॉ.जोशी हॉलमध्ये स्वातंत्र्यवीर सावरकरांचे '' सैनिकीकरण'' ह्या विषयावर जाहीर भाषण झाले.

वरील सर्व कार्यक्रमांना प्रचंड जनसमुदाय उपस्थित होता. स्वा.वीर सावरकरांनी शहरातील विविध संस्थांना भेटी दिल्या व हरिजनांसोबत सहभोजन केले. हिंदूंच्या शुध्दिकरणावर ते भर देत असत. त्यासाठी पतितपावन मंदिराची स्थापना केली. लष्कराच्या आधुनिकीकरणावर भर दिला.

स्वा.सावरकराचे उमरावतीच्या नागरिकांना अपूर्व स्वागत केले. व सकाळी रेल्वेने त्यांचे आगमन झाले त्यावेळी रेल्वे स्टेशनवर मोठ्या संख्येने लोक हजर होते १.

१) **स्वातंत्र्यवीर सावरकर** :- शामजी कृष्ण वर्मा यांची शिवाजी शिष्यवृत्ती घेऊन श्री.विनायक दामोदर सावरकर हे बॅरिस्टरीच्या परिक्षेसाठी विलायतेला गेले होते. इंग्लंडला असतानाच त्यांनी १८५७ चे स्वातंत्र्य युध्द हा ग्रंथ सन १९०७ चे सुमारास लिहिला. लंडनमध्ये कर्झन रायलीचा खून झाला. त्या कटात सहभागी असल्याचा त्यांचेवर आरोप होता. त्यापूर्वी सावरकरांनी विलायतेतून शस्त्रे पाठविली व त्या शस्त्रांनी नाशिकला कलेक्टर जॅक्सन याचा खून झाला असे गृहीत धरुन विनायकराव सावरकरांना इंग्लंडमध्ये पकडण्यात आले व भारतात आणण्यासाठी बोटीने पोलीस पहाऱ्यात रवाना केले. दि. ८ जुलै १९१० रोजी त्यांना घेऊन येणारी बोट फ्रांसच्या मॉर्सेल्स बंदराजवळ थांबली. तेव्हा सावरकरांनी बोटीच्या शौचकूपातील पोर्ट होलमधून समुद्रात उडी घेऊन फ्रांसच्या किनाऱ्याकडे वेगाने पोहत निघाले. ही गोष्ट बोटीच्या अधिकाऱ्यांच्या लक्षात आल्याने, पोलीसांनी सावरकरांचा पाठलाग सुरु केला. सावरकर समुद्रकिनाऱ्याच्या जमीनीवर जाऊन पोचले व कॅब कॅब ओरडत धावू लागले. इतक्यात पोलीसांनी सावरकरांस पकडले.

सावरकरांना जॅक्सन खून प्रकरणात गोवण्यात येऊन त्यांना दोन जन्मठेपेची शिक्षा देण्यात आली. १९१० ते १९२१ पर्यत ते अंदमानच्या जेलमध्ये होते. त्याच वेळी त्यांचे वडील बंधू गणेश दामोदर उर्फ बाबा सावरकर हेही त्यांनी गोविंद कवीचे राजद्रोही वाङ्मय प्रसिध्द केल्याचे आरोपावरुन जन्मठेप काळयापाण्याची शिक्षा अंदमानच्या जेलमध्ये भोगत होते.

या दोन्ही बंधूंची सुटका अंदमान मधून १९२१ साली झाली व त्यांना भारतात आणून येरवडा आणि रत्नागिरी येथील तुरुंगात ठेवण्यात आले होते. नंतर सोडले, पण विनायकराव सावरकरांना १९३७ पर्यन्त रत्नागिरी जिल्ह्यातच स्थानबध्द करुन ठेवले होते. त्यांनी हिंदी, हिंदुस्थान, हिंदू हा महामंत्र तरुणांना दिला.

१९३७ साली त्यांचेवरील ही बंदी उठली. नंतर त्यांनी हिंदुमहासभेचे नेतृत्व केले. त्यांचे संपूर्ण चरित्र वाचण्यासारखे आहे. जनतेनेच त्यांना ''स्वातंत्र्यवीर'' ही पदवी दिली होती. ते अ.भा. हिंदू महासभेचे अध्यक्ष होते. ''कमला, गोमंतका,

अंदमानच्या अंधेरीतून, ''काळेपाणी'', संन्यस्त खडंग'' इ. पुस्तकांचे लेखक दै. अग्रणीचे संपादक. सुविख्यात निबंधकार नाटककार व वक्ते म्हणून विख्यात.

दि. २६ जून १९६६ रोजी आत्मसमर्पण मार्गाने देहांत.

११) **अमरावतीच्या डे. कमिश्नरांची बदली :-**

१९४१ च्या जातीय दंगलीचे काळांत आणि १९४२ च्या स्वातंत्र्य संग्राम आंदोलनाचे काळांत अमरावती जिल्ह्याचे डेप्युटी कमिश्नर पदावर असलेले इंग्रज अधिकारी श्री.मेलडूम यांची बदली १० ऑगस्ट १९४३ रोजी होऊन नोव्हेंबर १९४३ पासून मि.जी.एल.वाटसन, आय.सी.एस. हे इंग्रज अधिकारी डेप्युटी कमिश्नर म्हणून आले.

१२) **उमरावतीत भरलेली ''महाविदर्भ परिषद'' :-**

तत्कालीन मध्यप्रांत - वऱ्हाड राज्यातून, मराठी बोलणाऱ्या जिल्ह्यांचे स्वतंत्र महाविदर्भ राज्य निर्माण केले जावे, या मागणीसाठी दि. ३ ऑक्टोबर १९४३ रोजी अमरावती येथे नामदार डॉ.मुकुंदराव जयकर यांचे अध्यक्षतेखाली महाविदर्भ परिषद डॉ.जोशी सभागृहात भरली होती. परिषदेला सर्व वऱ्हाड आणि मध्यप्रांतातील मराठी विभागातून प्रतिनिधी उपस्थित होते. परिषदेला दुपारी ३ वाजता सुरुवात झाली. स्वागताध्यक्ष बॅरिस्टर रामराव उर्फ अण्णासाहेब देशमुख यांचे स्वागताचे भाषण झाले. इतर अनेक वक्त्यांचीही भाषणे झालीत आणि नंतर अध्यक्ष श्री.जयकर यांचे सुमारे दीड तास भाषण झाले. श्रोत्यांनी जोशी हॉल फुलून गेला होता. ''उदय'' चे संपादक दे.भ. नानासाहेब बामणगांवकर यांनी आभार प्रकट केले. तसेच श्री.बाबासाहेब खापर्डे यांचेही आभाराचे भाषण झाले ही परिषद त्यावेळी चांगली गाजली होती.

बॅरि. जयकरांनी शहरातील अनेक संस्थांना भेटी दिल्या. त्यांचा मुक्काम सर मोरोपंत जोशी यांचेकडे होता.

दि. ५ ऑक्टोबरला राजकमल टॉकीजमध्ये ''महाराष्ट्र विद्यापीठ'' या विषयावर त्यांचे जाहीर भाषण झाले.

उमरावतीत भरलेली महाविदर्भाची संभवत: ही पहिलीच परिषद होय. ना.डॉ.मुकुंदराव रामराव जयकर हे हिंदुस्थानातील विख्यात कायदे पंडित, राज्य घटना शास्त्रज्ञ, प्रिव्ही कौन्सिलचे न्यायमूर्ती इंग्रजी भाषेचे जगप्रसिध्द वक्ते, व अष्टपैलू विधायक मुत्सद्दी, शिक्षणतज्ञ होते. अनेक परिषदांचे अध्यक्षस्थान त्यांनी भूषविले. १९४१ मध्ये महाराष्ट्र विद्यापीठाच्या संघटनेची समिती यांच्या अध्यक्षतेखाली नेमली होती. कट्टर राष्ट्रवादी म्हणूनहि त्यांची अविस्मरणीय कामगिरी आहे. गांधी-आयर्विन करार जमवून आणणारे सप्रू यांचेसोबत जयकर होते. त्यांचे व्यक्तिमत्व आणि एकूण कार्य फार मोठे आहे.

१३) सुबोध मालाकार श्री.काशिराव बापू देशमुख यांचा स्वर्गवास.

वऱ्हाडच्या मराठा समाजातील भीष्मगुरु गणल्या गेलेले श्री.काशिराव उर्फ बापूसाहेब देशमूख हे वयोवृध्द मराठा पुढारी दि. २६ ऑक्टोबर १९४३ रोजी निधन पावले. बापूसाहेबांचे मृत्युसमयी वय ८५ होते. त्यांचे एकुलतेएक पुत्र श्री.पी.के. उर्फ अण्णासाहेब देशमूख हे होत. स्मशान भूमीवर श्री.काशिराव बापू यांचे देहाला अग्नी दिल्यानंतर श्रध्दांजलीची सभा होवून गुण गौरव पर भाषणे झाली.

कै. काशिराव बापू हे गरीबीतून कष्टाळूपणाने शिक्षण संपादक केलेले मराठा समाजच्या हितार्थ झटण्याचा प्रयत्न करणारे वऱ्हाडातील पहिलेच शिक्षित सद्गृहस्थ होते.

कै.दादासाहेब खापर्डे यांचे जिल्हा बोर्डाचे कारकीर्दीत अमरावती जिल्हा बोर्डाचे सेवेत काशिराव बापू होते व पंचावनाव्या वर्षी ते निवृत्त झाले होते. त्यांनी क्षत्रियांचा इतिहास लिहून मराठा समाजाला आपल्या जन्मजात आमवृत्तीची जाणीव करुन देण्याचा प्रयत्न केला. वैदिक धर्माचे बीज क्षात्रवृत्तीत आहे व क्षत्रियच सर्व श्रेष्ठ आहेत असे त्यांनी ग्रंथातून प्रतिपादिले होते. यांत त्यांनी अनेक संकटाला तोंड द्यावे लागले पण ते डगमगले नाहीत.

"सुबोध माला" हे मासिक त्यांनी चालविले होते व अनेक ग्रंथ ही

त्यांनी लिहिले आहेत. विदर्भातील मराठा समाजातील पहिला साहित्यिक म्हणून बापूसाहेबाकंडे मान जातो.

सर्व महाराष्ट्रात व वऱ्हाडात मराठा समाजाच्या ज्या सामाजिक व शैक्षणिक चळवळी चालत त्यात काशिराव बापू असतच.

अमरावतीचे शिवाजी मराठा हायस्कूल वगैरे त्यांच्या परिश्रमाचेच फळ होय, असे म्हटले तर अतिशयोक्तीचे नाही. दसऱ्याचे सीमोल्लंघनात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेची रथातून मिरवणूक साजरी करण्याची प्रथा बापूसाहेबांच्या नेतृत्वाखालीच सुरु झाली होती.

स्वर्गीय काशिराव बापू यांचे "सुबोध ग्रंथ" मालेतर्फे प्रसिध्द झालेली ग्रंथ संपदा १. क्षत्रियांचा प्राचीन इतिहास, भाग १ (२) क्षत्रियांचा जातवार इतिहास (३) मराठा क्षत्रियांची इतिहास (४) क्षत्रिय कुलवंश प्रदीप (५) क्षत्रियांचा सामना (६) क्षत्रियांची शक्ति (७) कीर्तन रत्नमाला (८) व्याख्यान रत्नमाला (९) भोंदू भटाचे सांग म्हणजेच हिंदु धर्माचे ढोंग १०) नवे स्वयम पुरोहीत (११) हिंदी सत्यनारायण (१२) सुंदर सत्यनारायण (१३) कोदंडाचा टणत्कार (१४) सत्य शोधक संत तुकाराम (१५) आर्य समाजाचा संदेश (१६) स्वामी दयानंदाची व्याख्याने (१७) स्वामी दयानंद परिचय (१८) वेद ईश्वर प्रणीत आहेत काय ? (१९) संगीत जलशाचे रंगीत फार्स (२०) भटाचे थोतांड खंड १ ला (२१) ग्राम कंटक लिलानाटक (२२) स्वराज्य साधन नाटक (२३) सुधर्म विजय नाटक (२४) हिंदुजनांचा इतिहास व अधःपात वगैरे.

अमरावतीची ही "सुबोध ग्रंथमाला" कै. काशीराव बापूनींच सुरु केली होती व तेच त्या मालेचे संपादक होते.

कै.काशिराव बापु देशमुख हे १९०० साली दुर्गापूर तहसिलमध्ये नायक तहसिलदार होते. फेब्रुवारी १९०१ मध्ये त्यांची बदली त्या जागेवरुन एलिचपूर जिल्हा बोर्डाच्या अकौंटंटचे जागी पुन्हा केली गेली व अकौटंटचे जागेवरुन डेप्युटी कमिश्नरनी त्यांना बडतर्फ केले होते. नंतर सूत्रे देऊन ते अमरावती येथे येऊन राहिले व त्यावर

त्यांनी कमिश्नर वऱ्हाड यांचेकडे अपील केले ते फेटाळल्या गेले होते.

नंतर गुलाबराव महाराज यांचे सांगण्यावरुन त्यांनी हैद्राबादला रेसिडेंटकडे अपील केले ते मंजूर होऊन काशीराव बापूंना निर्दोष ठरविण्यात आले होते ते १४ महिनेपर्यन्त घरी बसले होते. त्यांचा पूर्ण पगार मिळाला होता व कायमची नोकरी मिळाली होती.

(मथुराव्दैताचार्य श्री.गुलाबराव महाराज व्दितियावृत्ती) ले. मिलिंद १९६२.

---

१४) उमरावती शहर नगरपालिकेचे स्वयंवर १९४३ :-

दुसऱ्या महायुध्दाचे काळातच दि. ११ ऑक्टोबर १९४३ रोजी उमरावती शहर नगरपालिकेची निवडणूक घेण्याची घोषणा सरकारने ५ सप्टेंबर रोजी केली होती. या निवडणूकीत नगराध्यक्ष हा मतदारांकडून थेट निवडला जाणार होता व तशी दुरुस्ती कॉंग्रेस मंत्रीमंडळाच्या कारकीर्दीत म्यु. कायद्यात केली गेली होती. वयात आलेल्यांना मताचा अधिकारही यावेळी मिळाला होता. त्यानुसार उमरावतीत ही पहिलीच नगराध्यक्षांची थेट निवड मतदार करणार होते. त्यामुळेच या निवडणूकीला बरेच महत्व मिळाले कॉंग्रेसचे सर्व पुढारी कारागृहात होते. तरीही वीर वामनराव दादा यांचा नगराध्यक्षांचे जागेचा उमेदवारी अर्ज, त्यांची जेलमधून सही घेऊन भरण्यात आला. कॉंग्रेस पक्षातर्फे ही एकच जागा लढविली जाईल असे सांगितले गेले. दादाचे निवडणूक एजंट श्री.मांगीलालजी नांगलिया हे होते आणि एक निवडणूक मंडळही नेमण्यात आले होते. या निवडणूक मंडळाचे अध्यक्ष श्रीमान सदाशिवराव देवरणकर सराफ हे होते व सर्वश्री वल्लभदास ठाकुरदास राठी, व्ही.एस.गोखले, वकिल, सोमाप्पा भेंडसे, मोहनलाल नारायणजी गुजराथी आणि धनराज केसरीमल मुणोत हे सदस्य होते.

नगराध्यक्षंच्या पदासाठी आणखी दोन उमेदवारांनी अर्ज भरले होते. त्यापैकी एक सेठ मथुरादासजी मोहता (मथुरादास मोटार सर्व्हिसचे मालक) आणि

दुसरे श्री.अबुल हसन हे देखील मोटार व्यवसायातील होते. याप्रमाणे नगराध्यक्षाच्या जागेची लढत तिरंगी झाली. वार्ड मेंबर्सचे जागेसाठी एकुण २२ वार्डातून शेकडो लोक उभे होते. मतदारांची संख्या एकूण २४००० होती. वयात आलेल्या प्रत्येकास मतदानाचा अधिकार होता. मतदान दि. ११.१०.४३ ला होऊन १३.१०.४३ रोजी मतमोजणी व निकाल लागला होता. नगराध्यक्षांचे जागेसाठी मतदान एकुण १५,१५७ एवढे झाले. त्यापैकी २०८३ मते रद्द ठरली आणि उरलेल्या मतांची वाटणी खालीलप्रमाणे होऊन वीर वामनराव दादा हे प्रंचड बहुमताने निवडून आले.

वीर वामनराव दादा ७५४२, सेठ मथुरादास मोहता २७९३, श्री.अबुल हसन २७३९.

अध्यक्षांचे मतदाना सोबतच वार्ड मेंबरचे उमेदवारांचेही मतदान झाले त्यात स्वतंत्र असे २२ लोक निवडून आले.

वीर वामनराव दादा निवडून आल्याचे जाहीर होताच त्यांच्या फोटोची मोटारीतून मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकी सोबत अध्यक्ष पदांचे अयशस्वी उमेदवार श्री.अबुल हसन हेही होते. आणि दादांचे जयजयकारासोबतच श्री.अ.हसन यांचाही जयजयकार केला जात होता. मिरवणूक मुख्य मार्गाने फिरुन आल्यानंतर श्री.नानासाहेब गोखले यांनी दादांचे फोटोस हार घातला.

भारताचे सिलोनमधील हायकमिश्नर श्री.बापूजी अणे यांनी सिलोनहून तार पाठवून वीर वामनराव दादा निवडून आल्याबद्दल त्यांचे अभिनंदन केले होते.

नगरपालिकेचे अध्यक्ष म्हणून वीर वामनराव दादा निवडून आले परंतु ते जेलमध्ये असल्यामुळे त्यांना सात दिवसांचे आत आपल्या पसंतीची उपाध्यक्षांची नांवे सरकारकडे पाठविता आली नाहीत. त्यामुळे सरकारनेच (डे. कमिश्नर यांचा आदेश दि. १७.३.४४ प्रमाणे) रायसाहेब गोपाल नानजी टांक या सभासदांनी पालिकेचा कारभार आपल्या हाती घेतला (गॅझेट नोटीफिकेशन दि. १६ मार्च १९४४)

नंतर निवडून आलेल्या म्यु. सदस्यांनी खालील लोकांना को .-ऑप्ट

करुन घेतले होते.

१) श्री.रायसाहेब गोपाल नानजी टांक.

२) श्री.मल्लाप्पा वीराप्पा कुऱ्हे

३) श्री.रामदयाल अयोध्याप्रसाद गुप्ता

४) श्री.एस.एस.मालविया.

निवडून आलेल्या उमेदवारात कोणीही महिला निवडून न आल्याने

५) सौ.पार्वतीबाई शिवाजीराव पटवर्धन यांना सर्वानुमते को-ऑप्ट करुन घेऊन महिला सभासदाची उणीव भरुण काढण्यात आली होती.

पुढे २५ एप्रिल १९४५ रोजी वीर वामनराव दादांची स्थान-बध्दतेहून मुक्तता झाली व त्याच तारखेस त्यांनी नगराध्यक्षपदाची सूत्रे आपले हाती घेतली तेव्हा सरकार नियुक्त उपाध्यक्ष रायसाहेब टांक यांनी आपल्या पदाचा राजीनामा नगराध्यक्षांकडे सोपविला. तो मंजूर करुन दादांनी लगेच श्री.पी.के.उर्फ अण्णासाहेब देशमुख व श्री.अबुल हसन या दोघांची उपाध्यक्ष पदावर नियुक्ती केली होती.

१९४३ साली निवडून आलेल्या कार्यकारिणीचा कार्यकाल पाच वर्षाचा होता. त्याप्रमाणे १९४८ साली या नगरपालिकेची निवडणूक लागली. कार्यक्रमही जाहीर झाला होता. पण तत्पूर्वी अमरावती नगरपालिकेच्या आमसभेने एका ठरावाव्दारे ''अमरावती कॅम्प विभागाची नगरपालिका'' ही इंग्रजांच्या गुलामाची प्रतिक असल्यामुळे स्वातंत्र्यानंतर या नगरपालिकेचे शहर पालिकेत विलीनीकरण करुन संपूर्ण शहरासाठी एकच नगरपालिका करुन भेदभाव दूर केला जावा'' अशाआशयाची मागणी सरकारकडे केली होती व त्यामुळे ही निवडणूक तहकूब होऊन, कॅम्प नगरपालिका शहर पालिकेत विलीन करण्याचे सरकारी कारवाईस सुरुवात झाली आणि आगस्ट १९४९ मध्ये तसा सरकारी आदेशही राजपत्रात प्रसिध्द झाला. आणि या आदेशाची अंमलबजावणी दि. १ सप्टेंबर १९४९ पासून करण्यात आली होती. त्याचप्रमाणे कॅम्प म्यु. चे अध्यक्ष,

उपाध्यक्ष व सदस्यांना पाच आदेशांतर्पत आगामी म्यु. निवडणुकी पावेतो अमरावती नगरपालिकेचे सदस्य म्हणूनही नियुक्त करण्यात आले होते.

याच सुमारास नगरपालिकेचे एक उपाध्यक्ष श्री.पी.के.देशमूख हे मध्यप्रांत वऱ्हाडच्या मंत्रीमंडळाचे सदस्य (मंत्री) म्हणून नियुक्त झाल्याचे त्यांचे जागेवर नगराध्यक्षांनी कॅम्प नगरपालिकेचे नगराध्यक्ष श्री.सुखाप्पा जगन्नाथ प्रेमलवार यांची ''उपाध्यक्ष'' म्हणून नियुक्ती केली होती.

अमरावती नगरपालिकेत विलिनीकरण झालेल्या कॅम्प नगरपालिकेचे ज्या सदस्यांना अमरावती नगरपालिकेचे सदस्य म्हणून सरकारने नियुक्त केले होते त्यांची नांवे अशी --

१)	श्री.सुखाप्पा जगन्नाथ	२)	श्री.शे.महंमद शरफुद्दिन वकील
३)	श्री.डी.व्ही. शिदोरे	४)	श्री.एस.एस.पावणस्कर
५)	श्री.गोपीनाथ वासुदेव बेंद्रे	६)	श्री.प्रकाशचंद्र नरसैय्या
७)	श्री.मिर्झा मोहियोद्दीन वकील	८)	श्री.दानय्या पेन्टय्या
९)	श्री.राजाराम पैकाजी बागडे	१०)	श्री.कचरु पंचम
११)	श्री.यादवराव विठोबाजी शेंडे	१२)	श्री.जगन्नाथ पांडुजी लोखंडे
१३)	श्री.पुंजाप्पा मंडाप्पा	१४)	श्री.शेख जमाल
१५)	सौ.ताराबाई शरश्चंद्र पाध्ये.		

म्यु. उपाध्यक्ष प्रकरण :- अमरावती शहर म्यु. कमेटीच्या ११.१०.४३ रोजी झालेल्या निवडणूकीत वीर वामनराव दादा हे बहुमताने अध्यक्ष निवडून आले होते. त्यानंतर त्यांनी कायद्याप्रमाणे दोन उपाध्यक्ष नेमले नाहीत या सबबीवर प्रांतिक सरकारने रायसाहेब टांक यांना उपाध्यक्ष नेमले होते.

ह्या बाबत श्री.सहस्त्रबुध्दे व श्री.पंत या दोन मतदारांनी येथील

सबजज्जाचे कोर्टात वीर वामनराव दादांनी कायद्याप्रमाणे दोन उपाध्यक्ष नेमले आहेत. त्यामुळे प्रांतिक सरकारने केलेली उपाध्यक्षांची नेमणूक गैरकायदा आहे. असा निर्णय देण्याबद्दल व रायसाहेब टांक यांनी काम सुरु करु नये यासाठी मनाई केली जावी म्हणून प्रांतिक सरकार व रा.सा. टांक यांचेवर फिर्याद दाखल केली होती. वीर वामनराव दादांनाही या दाव्यात प्रतिवादी केले होते. त्यावेळी ते जबलपूर जेलमध्ये स्थानबध्द होते.

या दाव्यात वीर वामनराव दांदांनी जो जबाब दाखल केला होता. त्याचा सारांश असा --

डॉ.नि.बा. बापट आणि श्री.अबुल हसन या दोघांना कायद्याप्रमाणे मी उपाध्यक्ष नेमले व डे. कमिश्नर अमरावती व सेक्रेटरी म्यु. कमेटी अमरावती यांना ही माहिती पाठविण्यासाठी जबलपूर जेलचे सुपरिन्टेन्डेंट यांचे कडे दिली होती. शिवाय दोन ताराही वरील दोघांना पाठविण्यासाठी दिल्यात.

प्रांतिक सरकारचे मुख्यसचिव यांचेकडे तुरुंगाधिकाऱ्या मार्फत व डे. कमिश्नर अमरावती यांना तसे कळविण्याची विनंती करणारा अर्जही पाठविला होता. पण ''प्रा. सरकारचे हुकूमावरुन आपण वरील सर्व पत्र व्यवहार पुढे पाठविला नाही.'' असे तुरुंगाधिकाऱ्यांनी मला कळविले होते. अशा आशयाचा जवाब वीर वामनराव दादांनी दि. २ जानेवारी १९४५ रोजी न्यायालयात दाखल केला होता.

इस.१९४३ च्या १३ ऑक्टोबर रोजी बुधवारी अमरावती नगरपालिकेच्या निवडणुकीचा निकाल जाहीर करण्यात आला होता त्यानुसार निवडून आलेल्या म्यु. सदस्यांची यादी.

वार्ड क्रं.	नांव	शेरा
१)	श्री.जगन्नाथ लालमन पुरवार	
२)	श्री.अब्दुल सत्तार शे.	
३)	श्री.रामभाऊ वासुदेवे चिमोटे.	
४)	श्री.भिमराव देवराव कारंजकर	
५)	श्री.माधवराव नारायणराव बोंडे	
६)	श्री.शंकरआप्पा रुद्राप्पा गदकर	
७)	श्री.रामभाऊ संगाप्पा सपाटे	
८)	श्री.हिरासिंग लटपटसिंग चव्हाण	
९)	श्री.जगन्नाथ रामधन मालपाणी.	
१०)	श्री.बी.जी.मोहोड	
११)	श्री.अबुल हसन शे. गुलाम	
१२)	श्री.महंमद रफी शे. अमीर	
१३)	श्री.घासीराम फुलचंद गुप्ता	
१४)	श्री.रामप्यारे सुरजप्रसाद तिवारी	
१५)	श्री.भगवानदास खुशाली गुप्ता	
१६)	श्री.सुभानराव दादाराव देशमुख	
१७)	श्री.अब्दुलसमद महंमद इद्रीस	
१८)	श्री.धुंडीराज देविदास गणोरकर	
१९)	श्री.वासुदेव रामचंद्र भोंदू	
२०)	श्री.बाबुप्रसाद देविदासप्रसाद दुबे	
२१)	श्री.कान्हुजी दामु कार्ले	
२२)	श्री.पोपटलाल भोवान राजा	

टीप :- वार्ड क्रं. ३ चे निर्वाचित उमेदवार म्हणून प्रथम श्री.दादासाहेब खेडकर यांचे नांव घोषित झाले होते. परंतु न्यायालयीन, याचिकेनंतर नंतर त्या जागेवर रामभाऊ वासुदेवराव चिमोटे यांना निर्वाचित घोषित करण्यात आले.

याप्रमाणे अध्यक्ष, उपाध्यक्षांसह एकुण ४३ सदस्यांची ही समिती १९५३ पावेतो काम करित होती. नंतर १९५३ साली झालेल्या नगरपालिकेच्या निवडणूकीस अमरावतीतून कॉंग्रेस पक्षाचे अधिकृत उमेदवार म्हणून श्री.उमरलाल मथुरादासजी केडीया हे नगराध्यक्ष म्हणून थेट निवडणुकीने निवडून आले होते.

१५) दे.भ.बाळासाहेब मराठे यांची कारावासातून मुक्तता व भाषण बंदीचा हूकूम:

अमरावतीचे दे.भ. बाळकृष्ण विष्णू उर्फ बाळासाहेब मराठे यांची नोव्हेंबर १९४३ चे शेवटचे आठवड्यात जबलपूर जेल मधून मुक्तता झाली होती. १९४२ आगस्ट पासून ''सिक्युरिटी बंदी'' म्हणून त्यांना तुरुंगात डांबले होते.

सुटकेनंतर लौकरच त्यांचेवर जाहीर सभेत त्यांनी बोलू नये '' असा सरकारने हुकूम बजाविला होता.

१६) उमरावतीत मराठी रंगभूमीचा थाटाचा अपूर्व सोहळा.

अखिल वैदर्भीय मराठी - रंगभूमि शतसांवत्सरिक महोत्सव.

मराठी रंगभूमीला एक शतक पूर्ण झाल्याबद्दल त्यानिमित्त अमरावती शहरात दि. ४ ते ९ डिसेंबर १९४३ पावेतो मराठी-रंगभूमि शत सांवत्सरिक महोत्सव अत्यंत थाटाने व भरगच्च कार्यक्रमानिशी साजरा करण्यात आला होता.

मुंबईचे ख्यातनाम नाटककार श्री.भार्गवराम उर्फ मामासाहेब वरेरकर हे अध्यक्ष लाभले होते.

दि. ६ डिसेंबर रोजी रात्री १० वाजता श्री.वरेरकर यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्घाटन आणि दि. ७ डिसेंबर रोजी सकाळी प्रभात थिएटरमध्ये त्यांचे अध्यक्षीय भाषण झाले होते. मराठी नाट्यसृष्टीचे गेल्या शंभर वर्षातील विकासाचे टप्पे दर्शविणारे प्रतिनिधिक नाट्यप्रयोग सादर करण्यात आले होते. सर्व नाट्य प्रयोग, इंद्रभुवन थिएटरमध्ये झाले व महोत्सवानिमित्त नाट्य वाङमय वस्तूंचे प्रदर्शन नूतन

कन्या शाळेच्या हॉलमध्ये भरविण्यात आले होते. सर्व व्याख्याने डॉ.जोशी हॉलमध्ये झालीत, मुख्य व्याख्याते श्री.मामा वरेरकर आणि श्रीमती शांकुतलाबाई परांजपे हे होते.

श्री.ना.कृ.दिवाणजी, श्री.आपटे, श्री.काका सहस्त्रबुध्दे, श्री.दादासाहेब फडके, डॉ.कोलते यांच्या प्रयत्नानेच हा भव्य महोत्स साजरा होऊ शकला.

१७) टिमटाला कॉन्स्पिरसी केस :-

म्हणजे टिमटाला खटला या केसमधील एक आरोपी मिश्रीलाल(बैतुल) यांच्या तिकडम बाजीतून व अवसान घातातून शिजलेले प्रकरण होय असे आता इतक्या वर्षानंतर उपलब्ध झालेल्या माहिती वरुन दिसून येते व ही गोष्ट या ग्रंथातून प्रथम प्रसिध्द होत आहे.

पोलीस आणि तत्कालीन सेंट्रल इन्टलिजन्सने या प्रत्यक्ष दरवडा न पडलेल्या प्रकरणाला राजकीय रंग देण्याचा आटोकाट प्रयत्न केला होता व देशाच्या इतर भागांतही लोकांशीही या प्रकरणाचा संबंध जोडण्याचा प्रयत्न केला होता पण शेवटी ते काहीच न जमल्याने अखेर पोलीसी खाक्यानुसार साक्षी पुरावे उभे करुन ''टिमटाला दरवडा प्रकरण कोर्टात उभे केले. आणि खालच्या कोर्टात यातील अनेकांना शिक्षाही झाल्या परंतु हायकोर्टातून शेवटी पांच आरोपी निर्दोष ठरले व दोघांच्या शिक्षा कमी करण्यांत आल्या होत्या. या निर्दोष ठरलेल्या मध्ये कम्यु. पक्षाचे कार्यकर्ते भाई सुदाम देशमुख, भार्ड वामनराव देशपांडे, भाई पांडुरंग सावरकर, भाई वामनराव कदम, डब्ल्यु. एन.देशपांडे आणि विश्वासराव देशमुख यांचा नौकर देवराव हे होते.

ज्यांना शिक्षेत घट झाली ते भाई विश्वासराव देशमुख (बडनेरा) हे एकटेच कम्यु. कार्यकर्ते होते. बैतुलचे लक्ष्मणसिंग ठाकूर हा माफीचा साक्षीदार झालेल्या मिश्रीलालचा साथीदार होता.

या प्रकरणाची थोडक्यात सत्य हकीकत अशी : मिश्रीलाल नावांचा बैतुलचा एक सुशिक्षित तरुण तेथील काही चौकशीसाठी, त्याच्या सोबतच्या दोन

स्त्रिया व एक पुरुष यांसह बैतूल कारागृहात नजरबंद होता आणि एक दिवस हे चौघेही त्या कारागृहातून पळाले व बहीरम मार्गे अचलपूरकडे येण्यास निघाले. रस्त्यात बहिरम जवळील एका गावी मिश्रीलाल सोबतच्या एका स्त्रीचा एक नातेवाईक राहात होता त्याकडे ते-थांबले. नंतर तेथून मिश्रीलाल याचा एक नातेवाईक परतवाड्यात होता त्यांच्याकडे ते आले. परंतु या नातेवाईकाला हे नजरकैदेतून पळून आल्याचे कळल्यावरुन तो घाबरला व त्याने घरी न रहाता तुम्ही अचलपूरला सुदाम देशमुखाकडे जा असा त्यांना सल्ला दिला तेव्हा हे चौघेही अचलपूरला युनियनचे ऑफीसात आले. तेथे सुदाम देशमुख नव्हते. त्यांचे अमरावतीला हंबर्डे हॉस्पिटलमध्ये मुळव्याधीचे ऑपरेशन झाल्याने तेथे दवाखान्यात होते. पण भाई डब्ल्यु.एन.देशपांडे तेथे होते. त्यावेळी दुसरे महायुध्द व त्यासाठी सैन्य भरती चालू होती व त्यांत भाई डब्ल्यु. एन. ला कमिशन मिळाले होते व ते लौकरच सैन्य सेवेत जाणार होते. अश्या अवस्थेत मिश्रीलालने भाई डब्ल्यु.एन ला बनवून त्यांना तो स्वत: म्हणजे मिश्रीलाल हा एक मोठा क्रांतीकारी पुरोगामी आहे व या संबंधीचे कार्यासाठी पैसा प्राप्त करण्याचे दृष्टीने त्याने भाई डब्ल्यु एन. ला दरवडा टाकण्याची धाडसी कल्पना सांगितली व त्यासाठी दोन चार दिवस सारखा आग्रह चालविला. डब्ल्यु. एन. यांनी शेवटी त्या कल्पनेला संमती दिली. त्यांनी विचार केला की, आता लौकरच आपण सैन्य सेवेत जाणार तेव्हा यास संमती द्यायला हरकत नाही. जास्त दूरचा विचार त्यांनी केला नाही.

याप्रमाणे ठरल्यानंतर हे सर्व लोक बडनेरा (रेल्वे) येथे आलेत. तेथील पक्ष कार्यकर्ते विश्वासराव देशमुख, पांडूरंग सावरकर, आणि अंजनगांव बारीचे वामनराव कदम यांना या कटात ओढण्यात आले. आणि ही मोहीम कोठे करायची त्यासाठी लागणारी साधने वगैरेचा विचार व जुळवा जुळव सुरु झाली. या काळांत भाई सुदाम देशमूख हे अमरावतीला दवाखान्यातच पडून होते. नंतर या कटात विश्वासरावाचा नोकर देवराव, आणि वामनराव कदम यांनी त्यांचे अंजनगांव (बारी) चे रामसिंग व महादेव धोबी या दोघा तरुणांना त्यात सामील केले. अचलपूरचा राघोजी व मुलताईचा दामाजी व आणखी एक गृहस्थ मिश्रीलालने बोलाविले होते.

शेवटी ठरल्याप्रमाणे साधनांची जुळवाजुळव करुन, एकेदिवशी ही सर्व मंडळी रेल्वेने रात्री टिमटाला या गावी पोचली. गावात गेले तेव्हा गांवातील कुत्र्यांनी जोरजोराने भुंकायला सुरुवात केली. इतके दिवस जमाव करुन हिंमतीने ज्या मोहीमेसाठी ही मंडळी टिमटल्यात आली त्या सर्वाचे येथे येताच मात्र अवसान गळाले व ''पुन्हा नंतर येऊ'' असे ठरवून कोणतीही ठरलेली कामगिरी न करता ही मंडळी निमूटपणे परत बडनेऱ्यात वापस आली. दुसरे दिवसी सर्व लोक आपापल्या ठिकाणी परतले. त्यात मिश्रीलाल हा सोबतचे दोन महिला व एका पुरुषासह कारंज्यास गेला. तेथे त्याची सासुरवाडी होती. तेथे राहात असताना एकेदिवशी रात्री १० चे सुमारास दुसऱ्या मजल्याचे खोलीत तो मोठमोठ्याने आपल्या क्रांतिकार्याची फुशारकी मारु लागला. दुसऱ्या महायुध्दाचा तो काळ रात्री १० नंतर सर्वत्र स्तब्धता अशा वेळी गस्त घालणारा पोलीस रस्त्याने जात असता त्याला जोरजोराने बोलण्याचा आवाज ऐकू आला. त्याने आवाज दिला व दरडावून मिश्रीलालला सांगितले की, ''बडबड करु नका चुपचाप झोपा'' पोलीस पुढे निघून गेला आणि काही काळाने त्याच मार्गाने तो पोलीस परतला तेव्हा त्याला पुन्हा त्या घराचे दुसऱ्या मजल्यावरुन आवाज ऐकू आला. त्याने माडीवरील बोलण्यातील काही शब्द ऐकले आणि सरळ पोलीस स्टेशनला येऊन त्याची माहिती आपल्या वरिष्ठ अधिकाऱ्याला दिली. तेथून मिश्रीलाल याला पोलीस ठाण्यात आणून विचारपूस केली. मिश्रीलाल घाबरला होता. त्याने घडलेली सर्व घटना अधिकाऱ्यास कथन केली. झाले पोलीस अधिकाऱ्याने लगेच आपल्या वरिष्ठांना त्याची सूचना दिली व यांत कम्युनिष्ट पार्टीचे कार्यकर्ते असल्यामुळे हा नक्कीच मोठा राजकीय कट असेल ह्या पक्क्या समजुतीवर सर्व पोलीस खाते सतर्क झाले. चक्रे फिरु लागली. बडनेरला येऊन मिश्रीलालने ज्यांची नांवे सांगितली होती, त्यांना अटक केली. त्यांच्या घराची झडती घेऊन कांही वस्तू जप्त केल्या. आणि या कथाकथीत राजकीय कटाच्या चौकशीची सुत्रे सेंट्रल इंटलीजन्स'' च्या एका तरुण हुशार पंजाबी अधिकाऱ्याकडे सोपविण्यात आलीत. पंजाबी अधिकाऱ्यास वाटले आता मोठा राजकीय कट आपण उघडकीस आणणार म्हणून त्याने जंग जुंग पछाडले. पण प्रत्यक्षात दरोड्याची केस

म्हणून कोर्टात दाखल केली गेली. यात मिश्रीलाल हा माफीचा साक्षीदार होता. उच्चन्यायालयात निर्दोष सुटले फक्त दोघांना त्यांचे जवळील विना परवाना शस्त्राबद्दल दिलेली शिक्षा कायम राहिली. अशी ही ''टीमटाला कॉन्स्पिरसी केस''.

इ.स.१९४४

१) धान्य पुरवठा समितीची स्थापना.
२) सेठ रामनाथ बियाणी यांचा गौरव.
३) स्वर सम्राटांचा सत्कार.
४) सौ.कस्तुरबा गांधी याच्या निधनानिमित्य हरताळ.
५) श्री.गोविंद गणेश भोजराज यांना प्रथम पारितोषिक.
६) भाडे नियंत्रण कायदा सुरु झाला.
७) पाकिस्थान दिन.
८) अ. भा. खंत्री संमेलन.
९) उदयचा रौप्य महोत्सव.
१०) न.पा.चा.कारभार प्रतिनिधीच्या हाती.
११) डॉ.विजय गोखले यांची सुटका.
१२) ग्राहक सहकारी दुकाने सुरु.
१३) अमरावतीची बंगाल मधील दुष्काळ ग्रस्तांना मदत.
१४) राजाजी योजनेस पाठिंबा.
१५) कै.दादासाहेब खापर्डे पुण्यतिथी.
१६) कै.श्री.नथ्थुबुवा जोशी.
१७) गोपिकाबाईचा नागपुरात सत्कार.
१८) विजयी मराठा सैनिकांचे स्वागत.
१९) गांधी जयंती.
२०) खाकसार नेते उमरावतीत.
२१) वसंतराव जोग यांचा सत्कार.
२२) अमरावती नगरपालिकेवर राष्ट्रीय ध्वज फडकावला.
२३) विदर्भ नाट्य मंदिर.
२४) पन्नालालजींचे निधन.
२५) भ्रष्टाचार विरोधी विशेष न्यायालय.
२६) सेनापती बापट यांना अमरावतीत अटक.
२७) प्रांतिक विधार्थी कांग्रेसचे अधिवेशन.

इसवी सन १९४४

युध्दजन्य परिस्थितीमुळे दिवसेदिवस महागाई टंचाई वाढत होती.सरकारी उपाय तोकडे पडू लागले. त्यामुळे हे कार्य जनतेतून व्हावे या उद्देशाने शहरातील व जिल्हयातील सर्व पक्षांच्या व अपक्ष अशा निमंत्रित कार्यकर्त्यांची सभा दि.६ जानेवारी १९४४ रोजी डॉ.जोशी सभागृहात बोलावण्यात आली होती. या सभेला शे-दीडशे लोक हजर होते.

स्थानिक सर्व पक्षाचे व धर्माचे कार्यकर्ते एकत्रित होण्याचा हा मोठाच अपूर्व देखावा दिसत होता. माजी गृहमंत्री सर मोरोपंत जोशी हे ही सभेला उपस्थितर होते व सभेपूर्वी त्यांनी मोठ्या उत्साहाने कार्यकर्त्यांशी चर्चा करुन योजना समजावून घेतली. 'उदय'चे संपादक दे.भा.नानासाहेब बामणगांवकर यांना सभेते अध्यक्षस्थान देण्यात आले होते.

सरकारची धान्य पुरवठयाची व धान्य वसुसीची योजना,पिकांची वास्तविक स्थिती,जिल्हयातील शेतकरी -शेतमजूर व इतर जनता यांना पुढील हंगामापर्यन्त लागणारा ज्वारीचा साठा वगैरे प्रश्नांचा सांगोपांग विचार या सभेत झाला व हे कार्यव्यवस्थितपणे घंडवून आणण्यासाठी सौ. पार्वतीबाई पटवर्धन यांच्या अध्यक्षेखाली एक सर्व पक्षीय तात्पुरती अमरावती जिल्हा धान्य पुरवठा समिती' स्थापन करण्यात आली होती.

या समितीत श्री.वल्लभदासजी राठी हे उपाध्यक्ष, सर्वश्री टी.एस.ठाकूर , बापूराव देशमूख श्री.अबुल हसन हे चिटणीस आणि सर्वश्री टी.एस.ठाकूर वकील ,श्री.बापूसाहेब भोंदू,श्री.द.परांजपे,श.बा.बोधनकर,व श्री.पंत वकील हे सदस्य होते.याशिवाय या समितीवर २५ सदस्य नेमण्यात आले .

त्याचप्रमाणे शहरातील धान्य परिस्थितीचाही विचार करण्यात येऊन श्री सेठ छक्कीलाल गिरधारीलाल खरैय्या यांच्या अध्यक्षतेखाली 'अमरावती शहर धान्य पुरवठा समिती' स्थापन करण्यात आली होती.

श्री.मांगीलाल नांगलाया ,श्री,राजाभाऊ ,गोखले,वकील,श्री.एम.बी.पांगारकर व श्री.देवकिसनजी झंवर हे या समितीचे चिटणीस होते.

१९४२च्या आंदोलनानंतर, सर्व पुढारी मंडळी जेलमध्ये डांबली होती आणि लोकांच्या दैनंदिन जीवनाचे प्रश्नावर असा संघटित प्रयत्न वर्ष दीड वर्ष झाला नव्हता. परिणामतः या काळात लोकांचे फार हाल झाले. महागाईने लोक त्रस्त झाले होते. धान्याची टंचाई सतत जाणवत होती. अशा वेळी ही सर्व पक्षीय कार्यकर्त्यांची सभा होऊन, लोकांना दिलासा देणारे कार्य सुरु झाले.

धान्य पुरवठ्याची सविस्तर योजना ठरविण्यांसाठी १२ जानेवारी रोजी जिल्हा समितीची बैठक घेण्याचेही सभेत ठरविले गेले. सभेत सर्वश्री के.टी.देशमुख ,सौ,पार्वतीबाई पटवर्धन, ग्यांनी अमरसिंग ओगले,अबुल हसन,राजाभाऊ गोखले व श्री.द.परांजपे यांची भाषणे झाली .

वरील सर्वपक्षाय सभेपूर्वी दि.१ जानेवारी ४४ रोजी हिंदी कम्युनिस्ट पक्षातर्फे श्री.राजदेरकर यांच्या अध्यतेखाली नमुना विभातात ही सभा घेण्यात येऊन या सभेत'सरकारने रेशनिंग सुरु करावे' अशी मागणी करण्यात आली.

रायसाहेब सेठ रामनाथ बियाणी यांचा गौरव

इ.स.१९४४च्या जानेवारी महिन्यात सोमवार ता.१० रोजी येथील कॉटन मार्केट कमेटीचे अध्यक्ष रामनाथजी बियाणी यांना 'राय साहेब'ही पदवी सरकारने दिल्याबद्दल ,सर मोरोपंत जोशी ,रा.ब.सरंजामे,रा.सा.जी.एन.टांक, व सेठ मथुरादास मोहता यांनी ,कॉटन मार्केटचे उद्यानात चहापान दिले होते .शहरातील सर्व चांगल्या कामाला मदत करण्याचा सद्गुण रा.सा.बियाणी यांच्यात आहे.अशा शब्दात याप्रसंगी त्यांचा गुणगौरव सर मोरोपंत जोशी यांनी आपले भाषणातून केला होता.

स्वर सम्राट श्री.गोविंदराव टेंबे यांचा सत्कारः-

सर्व महाराष्ट्राला सुपरिचित असलेले,स्वर सम्राट श्री.गोविंदराव टेंबे यांचा सत्कार समारंभ डॉ.जोशी सभागृहात दि.जानेवारी १९४४ रोजी , डिस्ट्रीक्ट ॲन्ड सेशन जज्ज श्री.के.टी.उर्फ अण्णासाहेब मंगलमूर्ती यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आला होता. समारंभाला सुमारे ४०० स्त्री पुरुष हजर होते.'उदय' चे संपादक श्री.नानासाहेब बामणगांवकर यांनी परिचयात्मक भाषण केले.त्यांनी आपल्या भाषणांत श्री.

गोविंदरावजींच्या नाट्य व संगीत या विषयात प्रगाढ व्यासंगाची श्रोत्यांना ओळख करुन दिली.

टेंबे गोविंद सदाशिव :(ज.१८८१) महाराष्ट्रातील सुप्रसिध्द पेटी वादनपटू व अष्टपैलू रसिक:-

नागपूरच्या कला जीवनात हचांचा प्रथम प्रवेश पेटी वादनातील यांच्या कौशल्यामुळे झाला. कै.भास्करबुवा बखले यांचे शिष्यत्व व बालगंधर्वाचा स्नेह यांचे सहाय्याने नवनवे स्वर(शास्त्रीय गायकी) प्रकट करुन श्रोत्यांच्या मनाचा ठाव घेण्याची त्यांची कला रसिकांच्या निदर्शनास आली.पेटी वादनाच्या बाबत यांचे सुरुवातीचे आदर्श श्री.भावुभाई भंडारे हे होत. कै. बखल्यांच्या प्रमाणे ह्यांच्या सहवासामुळे बालगंधर्वाच्या गाण्याला आधुनिक वळण मिळाले. मौजुधी खानांची ठुमरीही यांच्या पेटीतून बखले बुवांनी संग्रहित केली होती.

मानापमान नाटकाने मराठी रंगभूमीवर संगीताचे अगदी नवे युग सुरु केले.त्या नाटकाकरिता आपल्या जवळच्या उत्कृष्ट चाली श्री.टेंबे योनी पुरविलेल्या होत्या.

१९३५ साली पुणे येथे भरलेल्या नाटयसंमेलनाचे हे अध्यक्ष होते.तेथील त्यांचे भाषण रंगभूमीच्या दृष्टीने महत्वाचे झाले होते.यांचे टीकालेख नाट्य व संगीत यांच्या अभ्यासक्रमात पाठय पुस्तके म्हणून दाखल करण्या सारखे आहेत.

यांची नाटकेही चांगल्या दर्जाची असून त्यात त्यांचा गुण व्यक्त होतो. गद्यलेखनापेक्षाही यांची पद्यरचना अधिक सुरस आहे.

आधुनिक आकर्षक संगीताचे प्रणेते असा सार्थ गौरव हयांना प्राप्त झाला आहे.(अर्वा.व.कोश.चित्राव :३२५)

४) सौ.कस्तुरबा गांधीचे निधनानिमित्त हरताल:-

महात्मा गांधी यांच्या धर्मपत्नी सौ.कसुरबा गांधी यांचे दि.२२ फेब्रुवारी रोजी, महाशिवरात्रीचे दिवशी पुण्याच्या 'आगाखान पॅलेस मध्ये बंदीवासातच निधन झाले.त्या निमित्त अमरावतीत दि.२३ फेब्रुवारी रोजी स्वयंस्फूर्त हरताळ पाळण्यात आला होता. पुढे दि.१० एप्रिल रोजी अमरावती नगरपालिकेची पहिलीच सभा भरली तेव्हा कैकस्तुरबा

गांधी संबंधी या दुखवटा व्यक्त करणारा ठराव मंजूर होऊन सभा तहकुब करण्यात आली होती.

तद्वतच नोव्हेंबर १९४४ मध्ये अमरावती नगरपालिकेच्या सार्वजिक बांधकाम उपसमितीचे सभेत म्यु.सदस्य श्री.रामदयालजी गुप्ता यांनी.'नेहरु मैदानातील नगर पालिकेच्या 'कारोनेशन गार्डन' या बगीच्याला 'कस्तुरबा बाग' हे नाव देण्यात यावे अशा आशयाचा मांडलेला ठराव सर्वानुमते मंजुर झाला होता. याच सभेत 'राजकमल चौक ते रेल्वे स्टेशन ' या रस्त्याला 'कस्तुरबा गांधी रोड हे नाव देण्याचा ठरावही मंजूर झाला होता.

कस्तुरबा स्मारक समिती :-या समितीची अमरावती नगर शाखा जुन १९४४ मध्ये स्थापन करण्यात येऊन ,समितीचे अध्यक्ष श्रीमान छक्कीलालजी खरैय्या ,उपाध्यक्ष श्री.देविदास पंत महाजन व श्री.जवाहरलाल मुणोत, खजिनदार श्री.वल्लभदासजी राठी, आणि चिटणिस सर्वश्री देवकिसनजी झंवर ,माणकचंदजी कात्रेला,मोहनभाई नारायणजी व श्री.टी.एस.ठाकूर वकील अशी निवड झाली होती.

(त्याच प्रमाणे जिल्हा शाखेच्या अध्यक्षपदी सौ.पार्वतीबाई पटवर्धन व सेक्रेटरी श्री.बा.वि.मराठे आणि श्री.रघुनाथमलजी कोचर हे होते.

५)भारताच्या वास्तववादी जीवनावरील प्रतिस्पर्धेत उत्कृष्ट कथेत अमरावतीचा तरूण पहिला.

१९४० चे सुमारास 'हॉलीवुड' ने काढलेले'' ''द रेन्सकेम '' आणि इतर चित्रपट फार यशस्वी ठरले म्हणून,हॉलीवूडचा एक प्रतिनिधी मुंबईस आला होता व त्याने ''बॉम्बे कॉनिकल'' हया त्यावेळी मुंबईतहून प्रसिध्द होणाऱ्या वृत्तपत्रातून एक निवेदन काढले होते.त्याचा सारांश असा....

हॉलीवुड निर्मात्यांनी भारतातील लोक जीवनावर एक चित्रपट काढण्याचे ठरविले असून ,त्यासाठी योग्य अशी सामान्य जीवनावर मानवी संबंधावर आधारलेली कथा असल्यास ती हॉलिवुडला नेण्यात येईल व निवड झाल्यास ती विकत घेण्यात येईल.

ही रुढ अर्थाने स्पर्धा वगैरे नव्हती.परंतु येणाऱ्या कथांतून योग्य कथांची निवड करुन, त्या अमेरिकेला न्यायच्या व तेथे अंतिम निवड करायची नंतर कथा लेखकाला त्याची पूर्ण किंमत देऊन व त्यालाही अमेरिकेला नेऊन संपूर्ण चित्रपट तयार करायचा. अशी योजना होती.

वरील प्रमाणे हॉलिवूड प्रतिनिधीने केलेल्या निवेदना प्रमाणे बऱ्याच कथा त्यांचेकडे भारतातील विविध प्रांतातील लेखकांनी पाठविल्या. कांही कथा आल्या.त्यांत अमरावतीचे दे.भ.डॉ.भोजराज यांचे चिरंजीव श्री.गोविंद गणेश भोजराज यांनीही भारतीय सामान्य जीवनावरील आपली कथा पाठविली होती.

या कथेत त्यांनी भारतातील तत्कालीन मध्यम वर्गीयांच्या जीवनाचे चित्रण, तसेच काही वैशिष्ट्यपूर्ण कुतुहल जनक.

गोष्टी दाखविल्या होत्या.ही कथा हॉलिवूड प्राडक्शनचे प्रतिनिधी कर्म बागझी. यांचेकडे पाठवल्यानंतर ,त्यांनी १९४४ मध्ये लेखकास कळविले की,आलेल्या सर्व कथातून आपली (श्री भोजराज यांची) कथा अमेरिकेस नेण्यासाठी निवडली असून,त्यासाठी त्यांनी(प्रतिनिधीने) परवानगी मागितली.अर्थातच श्री.भोजराज यांनी तशी परवानगी दिली होती. त्यावेळी हॉलीवुडच्या प्रतिनिधीने श्री.भोजराज यांना अभिनंदनाचे खालील पत्र पाठविले होते.

'आलेल्या सर्व कथात आपली कथातून श्रेष्ट आहे व ती हॉलीवूडला नेण्यासाठी निवडली या बद्दल आपले अभिनंदन''

ही कथा घेऊन प्रतिनिधी अमेरिकेला गेला.तोपर्यत दुसऱ्या जागतिक महायुध्दाने अशी परिस्थिती निर्माण केली की, अमेरिकेतून भारतात सर्व युनिट सामुग्री माणसे आणणे अशक्यप्राय झाले होते.

संक्षिप्त परिचयः-

श्री.गोविंदकृत गणेश भोजराज ,अमरावतीचे म्युनिसिपल,ए.व्ही,स्कूल ,हिंदू हायस्कूल व किंवा एडवर्ड कॉलेज यांमध्ये त्यांचे शिक्षण झाले. अमरावतीत अनेक विद्यार्थी चळवळी व संस्था यांचेमध्ये त्यांचा सक्रिय कार्यभाग होता. तेव्हाच्या विद्यार्थी

नेत्यापैकी ते होते. ''वक्तृत्वोत्तेजळ मंडळ'' ही संस्था त्यांनी अनेक वर्षे चालविली.त्यांनी तेव्हा घडवून आमलेले जाहीर वादविवाद प्रचंड खळबळजनक ठरले. कॉलेजमध्ये अनेक मंडळाचे ते कार्यवाह होते. कॉलेज युनियनचा अध्यक्ष म्हणून निवडूण येण्याचा मान मिळविणारे ते पहिले विद्यार्थी होते, त्याआधी प्राध्यापक अध्यक्ष असत. इंग्रजी वादविवाद स्पर्धेतत ते नागपूर युनिव्हर्सिटीत दुसरे आले. शैक्षणिक जीवनात नेहमीच उत्तम यश संपादन करुन ते १९३७ साली.वयाच्या विसाव्या वर्षी नागपूर युनिर्व्हसिटीच्या एल.एल.बी.परिक्षेत पहिल्या वर्गात पहिले येवून त्यांनी सुवर्णपदक मिळविले.एम.ए.अर्थशास्त्र परीक्षेत्र ग्रुपमध्ये पहीले आले.काही वर्षे अमरावतीत वकिली केली.१९४३ साली सबजज्ज म्हणून त्यांची निवड झाली. ही पदे अल्पवयात मिळविण्याचा उच्चांक मोडला.

मुंबई हायकोर्टाने ''Distinguished academic record and outstanding ability and promise as a judge'' या शब्दात त्यांची वैशिष्ययें नमूद करुन,स्टॅन्फर्ड युनिव्हर्सिटी स्कूल ऑफलॉ,यू .एस.ए.इथे फेलोशीपसाठी त्यांची निवड केली. नंतर मुंबई सिटी कोर्ट आणि त्यांनतर हायकोर्टाचे जज्ज म्हणून त्यांची नेमणूक झाली.

गेल्या वर्षी त्यांची पुस्तके प्रसिध्द झाली,१९३०-३१ साली झालेल्या स्वातंत्र्यलढ्यांचे सर्वसामान्य नागरिकांच्या दृष्टीकोनातून चित्रण त्यांत आहे. अपूर्व अहिंसक लढ्याबद्दल मानसिक स्थित्यंतरे,प्रचंड कुतूहल भावनोत्कटता घटनांचे नाटमय वर्णन वगैरे ,एका अगदी नाविन्यपूर्ण शैलीने चित्रित केलेले आहे. विशेष म्हणजे अमरावतीचे त्या कालखंडात जीवन हे सूत्र घेऊन त्यावेळी देशांत सर्वत्र झालेल्या लढयाचे प्रतिकात्मक रेखाटन केले आहे. अमरावतीचे.दे.भ.डॉ.भोजराज यांचे ते चिरंजीव होत.

६)भाडे नियंत्रण आले.

महागाई-टंचाई सोबतच उमरावतीत घरांची भाडी वाढू लागली होती.आणि भाडेकरुची संघटना स्थापन करण्याची मागणीही वृत्तपत्रातून लोक करु लागले होते. शेवटी दि.१५ मार्च १९४४ पासून उमरावती शहराला व कॅम्प म्यु.हद्दीला १९४२ चा

घरभाडे नियत्रंण कायदा सरकारने लागू केला.उमरावतीत घरभाडयांवर कायघाने नियंत्रण आणण्याचा हा पहिलाच प्रसंग होता.

७)उमरावतीत पाकिस्तान दिन.

दि.२३ मार्च १९४४ रोजी आकोल्याचे मौलाना शेख हसन निजामी यांच्या अध्यक्षतेखाली उमरावतीतील मुजफर चौकांत मुसलमानांची जाहीर सभा भरून ''पाकिस्तान दिन'' साजरा करण्यांत आला होता.''पाकिस्तान हे मुसलमानाचे ध्येय आहे .अशी घोषणा या सभेत करण्यांत येऊन कायदेआजम मंहमदअली जीना यांचेवर विश्वास व्यक्त करणारा ठरावही या सभेत मंजूर करण्यांत आला होता. सभेत बऱ्याच वक्त्यांची भाषणे झाली .

८)अखिल भारतीय खत्री -महा संमेलन.

लाहोरचे रायबहादुर लाला रामरसमलजी भंडारी ,बार-ॲक्ट-लॉ,सी.आय.ई.यांचे अध्यक्षतेखाली दि.८व९एप्रिल १९४४ रोजी उमरावतीच्या जोशी हॉलमध्ये भरलेले हे पहिलेच संमेलेन होते.

९)थाटानं साजरा झालेला उदयचा रौप्यमहोत्सव :-

दि.५ मे १९४४ रोजी अमरावतीचे व्दि-साप्ताहिक ''उदय'' चा रौप्य महोत्सव समारंभ कस्तुरबा बाग (खापर्डे मैदान) वर केसरीचे सह संपादक श्री.दा.वि.उर्फ बाबूराव गोखले यांच्या अध्यक्षेखाली उत्साहाने साजरा करण्यांत आला होता. या समारंभराला सुमारे १० हजार स्त्री पुरुषांचा समुदाय मैदानावर जमला होता. समारंभासाठी हिंदुस्तान सरकारचे सिलोन मधील प्रतिनिधी व वऱ्हाडचे पुढारी लोकनायक बापूजी अणे हे उपस्थित होते.याशिवाय संत तुकडोजी महाराज ''उदय'' चे संस्थापक व पहिले संपादक श्री.बाबाराव खापर्डे व दुसरे संपादक त्यांचे बंधु प्रा.अण्णासाहेब खापर्डे हल्लीचे संपादक व्यासपीठावर होते. श्री.मा.ल..व्हावहारे यांनी रचलेल्या स्वागत गीताने कार्यक्रमास सुरुवात झाली.सुरवातीला श्री.बाबासाहेब खापर्डे यांचे भाषण झाले. त्यांनी ''उदय''च्या जन्माची हकीकत सांगितली व लोकमान्यांच्या प्रभावी राजकारणाला प्रचार करण्यासाठी ''उदय'' सुरु करण्यांतक आला असे सांगितले होते.

या समारंभासाठी अनेक ठिकाणाहून संदेश आलेले होते.ते वाचून दाखविल्यानंतर ''उदय''चे संपादक श्री.नानासाहेब बामणगांवकर यांनी समयोचित भाषण केले.नंतर अध्यक्ष श्री.बाबूराव गोखले ,लोकनायक अणे,व संत तुकडोजी महाराज यांची भाषणे झालीत.श्री.नवाडे यांनी आभार मानले .

उदय ची सुरुवात इ.स.१९२० साली श्री.बाबासाहेब खापर्डे यांनी केली होती व पुढे १९३२ ते सुमारास अरुण छारखाना व उदय वर्तमानपत्र त्यांनी दे.भ.नानासाहेब बाणमगांवकरांना विकला होता.सुरुवातीला ''उदय'' हे साप्ताहिक होते.नंतर १९३३-३४ चे सुमारास त्याचे रुपांतर व्दिसाप्ताहिकांत करण्यांत आले .दर मंगळवारी आणि शुक्रवारी हे पत्र प्रसिध्द होत असे.(सुमारे पन्नास वर्षे अमरावतीत सुरु असलेले हे वृत्तपत्र १९७० च्या सुमारास बंद पडले)श्री. वैद्य बंधू यांनी नंतर हे वृत्तपत्र चालविले व त्याचे रुपांतर दैनिकांत केले होते.पण नंतर ते दैनिक लवकरच बंद झाले.

१०)श्री.बेंद्रे यांचा निरोप समारंभः-

उमरावती नगरपालिकेची सूत्रे लोकनियुक्त प्रतिनिधीचे हाती सोपविल्या नंतर प्रभारी अधिकारी श्री.बेंद्रयांना दि.१२ मे १९४४ रीजी निरोप देण्याचा समारंभ नगरपालिकेच्या आवारात रा.सा .टाक,म्यु.उपाध्यक्ष यांनी घडवून आणला होता.या समारंभाचे अध्यक्षस्थान श्री.के.टी.मंगलमूर्ती 'डिस्ट्रीक्ट ॲन्ड सेशन जज्ज यांनी भूषविले होते.

सर्वश्री बाबूराव चौबळ,नानासाहेब बांमणगांवकर,गोविंददास छविलदास यांची श्री.बेंद्रें गुणगौरव पर भाषणे झाली .

श्री.बेंद्रे हे सरकारी अधिकारी सुमारे पावणे चार वर्ष पर्यन्त अमरावती नगरपालिकेचे सरकार नियुक्त''प्रभारी अधिकारी होते.

११)डॉ.कु.विजय गोखले यांची सुटका :-

अमरातीचे वकील श्री.आर.एस.गोखले यांची पुतणी डॉ.कु.विजया गोखले यांना भा.द.कायद्यान्वये अटक झाली होती.त्यांची दि.३० मे १९४४ रोजी सुटका झाली. त्यांचे बंधू श्री.बाळ गोखले एम.एस.सी.यांना भा.स.कायद्याखाली अटक झाली

होती.कु.विजया गोखले हया अमरावतीचे सुप्रसिध्द ॲडव्होकेट श्री.राजाभाऊ गोखले यांच्या भगिनी,बंगालमध्ये दुष्काळ पडला त्यावेळी शुश्रृषा पथकाबरोबर बंगालमध्ये मदत कार्य करीत होत्या. त्यांना पकडल्यानंतर श्री.मन्मयनाथ मुकर्जी यांच्या मध्यस्थीमुळे त्यांची एक महिन्याने सुटका झाली. त्या दैवास येथे असत, (प्रा.मा.ल.व्हवहारे यांची आठवण)

१२)उमरावतीत ग्राहक सहकारी स्टोअर्स:-

सरकारी धान्य पुरवठा दुकाने काढण्याचे ठरविल्यानंतर ,उमरावतीतील ही दुकाने ग्राहकांच्या सहकारी संस्था मार्फत चालविली जावीत असा प्रयत्न होऊन जून १९४४ मध्ये उमरावतीच्या विविध वार्डातील ग्राहकांच्या त्यासाठी सभा झाल्या आणि सुमारे १४ ग्राहक सहकारी संस्था निरनिराळ्या, वार्डातून स्थापन होऊन ऑगष्ट १९४४ पासून ,त्या संस्थाचे कार्य सुरु झाले.

युध्द सुरु झाल्यानंतर उमरावतीत ए.आ.पी.संघटने मार्फत धान्याची दुकाने शहरातुन चालू केली होती.परंतु दिवसें दिवस महागाई व धान्य टंचाई वाढल्याने सरकारी धान्य पुरवठा पध्दती चालू करण्याचे ठरविले होते. या पद्धती अंतर्गत प्रत्येक वार्डात एक किंवा दोन दुकाने खाजगी व्यक्तींना कमिशनवर चालवायला देणार होते. एक किंवा दोन सरकारी नियंत्रित दराने धान्य दुकाने राहणार होते. आणि ही दुकाने त्या संस्था उमरावतींत प्रथमच उभी झाली होती.

ऑगष्ट १९४४ मध्ये उमरावतींत एकूण १४ ग्राहक सहकारी स्टोअर्स नियंत्रित धान्य पुरवठांची दुकाने चालवीत असत.

१९४४ मध्ये सुरु झालेल्या या ग्राहक सहकारी स्टोअर्स पैकी सतत चालू असलेले संभवतः एकच स्टोअर्स आज पावेतो तग धरून चालू आहे.ते म्हणजे जुना वार्ड नं. ४ (हल्ली वार्ड क्रं.३५ जुनी कोतवाली वार्ड)मधील सहकारी स्टोअर्स हे होय. गेली सुमारे ४०-४५ वर्षे हे स्टोअर्स चालू होते.

<u>१३) बंगालमध्ये उपासमारीचे तांडव उमरावतीची बंगालला मदतः-</u>

इ.स.१९४२ मध्ये बंगाल प्रातांत भयानक अन्न दुर्मिळता आणि उपासमार सुरु

झाली.बंगालचे ५० लक्ष लोक मृत्युच्या कराळ दाढे खाली तडफडू लागले होते.उपासमारीने शेकडो लोक मृत्यु पावल्याच्या बातम्या दररोज वृत्तपत्रातून येऊ लागल्या होत्या.

अशा संकटाचे वेळी सर्व देशात बंगालकडे मदतीचा ओघ सुरुझाला होता.उमरावती शहरानेही बंगालला मदत देण्याचे कार्य सुरु झाले.
दि.३१ ऑगष्ट १९४३ रोजी डॉ.पटवर्धन यांच्या निवासस्थानी शहरातील गणेशोत्सव मंडळाची सभा होऊन ,बगाल मदत फडांत सहाय्य करण्याचा निर्णय घेण्यात आला व सौ.पार्वतीबाई पटवर्धन यांना संयोजक नेमण्यात आले .

निरनिराळ्या मंडळांनी गणेशोत्सवाचे खर्चात काटकसर करुन बंगाल फंडाला मदत दिली. गांवातूनही वर्गणी गोळा करण्यांत आली होती.
आगष्ट १९४३ मध्ये ,बंगाल मधील हिंदु-मुस्लीम क्षतीग्रस्त बांधवांचे मदतीसाठी मध्यप्रांत वऱ्हाडातून खाकसार संघटनेतर्फे एक जथ्था पाठविण्यांत आला.त्यात उमरावतीचे बारा खाकसार होते.

बंगामधील या उपासमारीचे लक्षावधी मृत्युमुळे , देशात भयकर क्षोभ माजला .जेव्हा ब्रिटीश पार्लमेंट मध्ये या संबंधी प्रश्न विचारण्यांत आला होता तेव्हा तत्कालीन भारत मंत्री मि.मेरी यांनी बंगाल मध्ये आजपर्यन्त (आगष्ट ४४ पावेतो)उपासमारी व रोजगारी मिळून सहा लक्ष लोक बळी पडले अशी कबूली दिली.

याच सुमारास ''बंगाल मदत कमेटी'' ची उमरावतीत स्थापना होऊन तिनेही मदत जमविण्याचे कार्यास सुरुवात केली होती.

१. उदय : दि.३१ आगष्ट १९४२

२. उदय : दि. ३१ मार्द १९४४. वरुन साभार)

मे १९४४ मध्ये बंगाल असेम्बलीत या संबंधी प्रश्न विचारण्यात आला होता. तेव्हा १८,७३,७४९ लोक रोगराईने गतवर्षी मरण पावले असे बंगाल सार्वजनिक खात्याचे पार्लमेंट्री सेक्रेटरीनी असेम्बलीत सांगितले. उपासमारीने किती लोक गेले हे सांगणे शक्य झाले नाही.

अशा वेळी उमरावतींत स्टुडंट फेडरेशनातर्फे "भुका बंगाल" नावाने एक प्रर्दशनी न्यू हायस्कूच्या इमारतीत भरविण्यांत आली होती.बंगाल मध्ये बरोबर उपासमारीने तांडव कसे होते .याचे दर्शन या प्रदर्शनाव्दारे उत्कृष्ट रीतीने होत होते हजारो लोकांनी हे प्रदर्शन पाहून बंगाल मदत फंडास मदत केली.

उपासमारीचे पाठोपाठ बंगालमध्ये रोगराईचे तांडव सुरु झाले. तेव्हा बंगाल मदत कमेटीतर्फे वऱ्हाडच्या वतीने एक आयुर्वेदिक सुश्रृषा पथक बंगालला पाठविण्याचे ठरविण्यात येऊन , वऱ्हाड किसान सभेचे अध्यक्ष आचार्य त्र्यंबक गुरुजी यांचे नेतृत्वाखाली दि.९ जुलै १९४४ रोजी हे पथक बंगालकडे रवाना झाले.

या सुश्रृषा पथकाला निरोप देण्याचे अनेक समारंभ उमरावतीस झाले होते व शेवटच्या समारंभ ९ जुलै १९४४ रोजी जोशी सभागृहात दे.भ.बामणगांवकर यांचे अध्यक्षतेखाली भरलेल्या जाहीर सभेत नागरिकांतर्फे करण्यांत आला होता.
या पथकात आचार्य त्र्यंबक गुरुजी, श्री.गजाननराव भारद्वाज, विश्वनाथ देवराम पाटील, गोविंद गणेश पाठक, व डॉ. धर्माधिकारी ही मंडळी होती.

वऱ्हाडांतून बंगालला गेलेले हे पहिलेच सुश्रृषा पथक होते. हे पथक बंगाल मधील चौविस परगणा, रंगपूर वगैरे विभागात सहा महिने शुश्रृषा कार्य करीत होते.
टिप: (उदय : दि. २मे १९४४)

मे १९४४ ते ऑक्टोबर १९४४ या सहा महिन्यांत बंगालमध्ये मलेरियाने २,९२,७१९ बळी घेतल्याचे बंगाल असेम्ब्लीत सरकार तर्फे सांगण्यात आले होते.
टिप : (उदय २ मार्च १९४५)

१४) काँग्रस कार्यकत्यांचा गांधीजीवर विश्वास राजाजी योजनेस पाठींबा :

अमरावती जिल्ह्यातील काँग्रेस कार्यकर्त्यांची सभा दि. १५ ऑगष्ट १९४४ रोजी भारतीय कॉ. कमेटीचे सभासद श्री. पी.के.देशमुख यांच्या निवासस्थानी झाली होती. या सभेला जिल्ह्यातील २५० कॉ.पदाधिकारी उपस्थित होते. सभेत माजी मंत्री श्री. नानासाहेब गोखले, सौ.पार्वतीबाई पटवर्धन व विदर्भ प्रांतिक काँग्रेस कमेटीचे चिटणीस श्री. आप्पासाहेब कुळकर्णी यांची भाषणे झाली होती.

सभेत खालील ठराव मंजूर करण्यात आले.

१) महात्मा गांधीच्या नेतृत्वावर विश्वास.

२) राजाजी योजनेस पाठिंबा.

३) कस्तुरबा स्मारक निधीचे कार्याला जोराने चालना देणे.

४) राजबंदी कुटूंबियांना मदत करण्याकरिता एक उपसमिती या ठरावाने नियुक्त करण्यात आली.

१५) कै.दादासाहेब खापर्डे पुण्यतिथी :

दि. १ जुलै १९४४ रोजी कै. दादासाहेब खापर्डे यांचे पुण्यतिथी निमित्त डॉ. जोशी सभागृहात श्री.अण्णासाहेब देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली स्मृतिदिनाची जाहीर सभा होऊन पुण्यतिथी साजरी करण्यात आली होती.

या सभेत कै. दादासाहेबांच्या गुणगौरवपर सर्वश्री नानासाहेब बामणगांवकर , दादासाहेब फडके, आणि श्री.गोपाळराव काळे यांची भाषणे झाली होती.

१६) प्रसिध्द गवई श्री नथ्थुबुवा यांचे निधन :

अमरावतीचे संगीत चुडामणी कै. नामदेवबुवा जोशी यांचे ख्यातनाम शिष्य व प्रसिध्द गवई आणि नागपूरच्या नॅशनल म्युझीक कॉलेजचे प्राचार्य श्री.नथ्थुबूवा अमरावतीकर यांचे निधन १ जून १९४४ रोजी नागपूर मुक्कामी झाले. प्रि.नथ्थुबुवा यांनी संगीत साधना १. हा मराठी ग्रंथ लिहिला आहे. या शिवाय यांच्या शास्त्रोक्त गायनाचे अनेक कार्यक्रम सर्वत्र गाजले आहेत.

अमरावतीच्या शास्त्रीय संगीत पंरपरेतील नथ्थुबुवा हे एक रत्न होते. ते यावेळी निखळले.

१७) अमरावतीच्या एका दलित कलावंत महिलेचा नागपुरात गौरव.

अमरावतीच्या माता खिडकी येथील दलित वस्तीत राहाणारे श्री.कचरुजी सनईवाज यांच्या पत्नी श्रीमती गोपिकाबाई हया एकतारीवर आपल्या गोड आवाजात भजने म्हणून शहरात भीक मागत असत.

जुलै १९४४ मध्ये त्या नागपुरला गेल्या होत्या. तेथील भोसल्यांचे दोन्ही राजवाडयात आणि नागपूर शहरांत इतर ठिकाणीही त्यांची एकतारी वरील गोड व पल्लेदार आवाजातील भजने झालीत. त्यांच्या ह्या कर्णमधुर भजनांचे श्रवण करुन लोक

थक्क झाले होते. त्यांच्या ''विठ्ठल गजरी'' या भैरवीने श्रोतृसमाज वेडा झाला. नागपूरच्या वृत्तपत्रांनी हया दलित महिलेच्या कार्यक्रमांस प्रसिध्दी देऊन तिचा गौरव केला होता. ''पिकते तेथे विकत नाही'' हेच खरे.

१८) विजयी मराठा सैनिकांचे स्वागत.

भारताच्या पूर्वेकडील आराकन आणि आसाम आघाडी सांभाळणारे व त्या आघाडीवर जपान्यांना दे माय धारणी ठाय करावयास लावणारे एक हजार मराठा सुपुत्र सैनिक पोळयाचे दिवशी रेल्वेने मुंबईकडे गेले. बडनेरा रेल्वे स्थानकावर या सैनिकाचा उमरावती आणि बडनेराच्या नागरिकांतर्फे भव्य सत्कार करण्यात आला.

या सत्कारासाठी बडनेरा स्थानकावर अनेक प्रतिष्ठित कार्यकर्ते व पुढारी जमले होते. सर मोरोपंत जोशी, रावबहादुर रणदिवे, सेठ मांगीलालजी, बडनेरा नगरपालिकेचे अध्यक्ष डॉ.दिवानजी,बडनेरा मिलचे मॅनेजर,बडनेराचे माजी नगराध्यक्ष रायसाहेब जोशी, उमरावती नगरपालिकेचे उपाध्यक्ष रायसाहेब टांक इत्यादी मंडळी व सर्व मोठे सरकारी अधिकारी हजर होते. हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाचा बॅन्ड सैनिकांच्या सत्कारार्थ वाजत होता. सर्व रेल्वे स्थानक लता पल्लवांनी सजविला होता. गाडी आल्या नंतर , एक हजार सैनिकांना चहा, चिवडा, शेप, लोणचे, पंचामृत, पान, सिगरेट, चाकलेट्स वाटण्यात आले. मराठी नार्मलस्कूलचे स्वयंसेवक व डब्ल्यु एस.च्या सभासद भगिनी यांनी हे काम केले.

या गाडीत वऱ्हाडातील सैनिकांना एकत्र करुन त्यांची कमिश्नर मि. ब्रे.यांनी ओळख करुन घेतली व प्रत्येक सैनिकांशी कमिश्नरांनी हस्तांदोलन केले हार तुरे झाल्या नंतर श्री शिवाजी महाराज की जय'' च्या जयघोषात सैनिकी गाडीने बडनेरा सोडले.

१९) गांधी जयंती खाजगी रीत्या साजरी झाली.

दि.२ ऑक्टोबर १९४४ रोजी गांधी जयंती निमित्त झालेले उमरावतीतील सर्व कार्यक्रम खाजगीरीत्या साजरे करण्यात आले. शहरात व कॅम्प विभागात सभाबंदी असल्यामुळे ही गांधी जयंती खाजगी स्वरुपात साजरी करावी लागली.

त्यानिमित्त दि.३० सप्टेंबर रोजी स्त्रियांनी सौ. पार्वतीबाई पटवर्धन यांच्या निवासस्थानी गांधी जयंती सारी केली तर पुरुषांनी दि. २ ऑक्टोबर रोजी दे.भ. पी.के.देशमुख यांच्या

घरी गांधी जयंतीचे कार्यक्रम पार पाडले.

सौ.पटवर्धन यांच्या निवासस्थानी झालेल्या गांधी जयंती निमित्त झेंडावंदन,सुतकताई इत्यादी कार्यक्रम झाले होते. सर्व धर्माच्या प्रार्थना म्हणण्यात आल्या. कु.हेमलता दवे व कु.सुधा सोहनी यांची गाणी झाली. तसेच कु.अनुसया पटवर्धन हिने पंचारती ओवाळली. या प्रसंगी महात्माजींच्या दीर्घायुष्य चिंतनपर सौ.पार्वतीबाई पटवर्धन , सौ.कमलाबाई ठाकुर व श्रीमती दुर्गाताई जोग यांची भाषणे झाली होती.

राष्ट्रीय विद्यार्थी संघाने आपल्या कार्यालयावर या गांधी जयंतीचे दिवशी तिरंगी ध्वज उभारुन ध्वज वंदनाचा कार्यक्रम केला होता.

श्री.पी.के.देशमुख यांच्या निवासस्थानी झालेल्या गांधी जयंतीचे कार्यक्रमातही झेंडावंदन व सुतकताई चा कार्यक्रम झाला होता.

२०) खाकसार नेत्यांचे उमरावतीत आगमन :

खाकसार संघटक श्री.महंमद शफी हे १७ नोव्हे.रोजी महात्मा गांधी यांची ''हिंदू-मुसलमान, ऐक्याबाबत भेट घेउन, सेवाग्रामवरुन अमरावतीस आले होते. हिंदू मुस्लीम ऐक्यासंबंधी अमरावतीत एक महिना मुक्काम करुन प्रयत्न करण्याचा त्यांना विचार होता.

खाकसार चळवळः- ''जनबाड'' या नावांचे कोणत्याही वेळी प्राण देण्यास तयार असलेल्या लोकांचे एक स्वतंत्र दल असे. त्यांची संख्या १३,००० होती खाकसार व सरकार यांचे लढयात त्यांनी महत्वाच्या भाग घेतलेला होता. हे दल '' आयर्न गार्डस'' हया धर्तीवर संघटित केलेले होते.

एकंदरीत खाकसार चळवळीची उभारणी अशाच पध्दतीने करण्यात आलेली होती की, मुख्य नेत्याच्या हुकूमाप्रमाणेच ते कार्य व्हावे.

खाकसारांचे स्वतःचे कोर्ट होते.आणि चाबुक हे कोर्टाचे हत्यार होते. या कोर्टाच्या हुकूमाप्रमाणे चाबकाची शिक्षा आरोपीला भर चौकात दिल्याची उदाहरणे त्या काळात घडलेली होती.

फावडे (बेलच्या) हे खाकसारांचे बोधचिन्ह होते.कष्ट करणाऱ्या खालच्या वर्गाशी आपले असणारे संबध बोधचिन्हाने दाखविले होते.
महंमद पैगंबर देव यांचे सैनिक होणे हे खाकसारचे मुख्य ध्येय होते.

लष्करी शक्तीची उभारणी, छोट्या लढाया, या सगळ्या गोष्टी आपल्या भूतकाळाशी शक्य तितके जवळ जाण्याच्या आंतरिक इच्छेतून उत्पन्न झालल्या आहेत. लष्करी शिक्षण हे प्रत्येक खाकसाराचे मनावर बिंबविण्याचा आटोकाट प्रयत्न ही संस्था करीत असे.खाकसार संस्थेची प्रत्येक हालचाल व धोरणे ही लढाऊ धोरणातून निर्माण झालेली असत. युध्दाचे नियम, युध्दासाठी लागणारी शक्ती, शिस्तीचे कठोर धडे हया गोष्टी प्रत्येक खाकसाराचे रोमारोमातून भिनलेल्या असाव्यात असा या संस्थेचा कटाक्ष असे.

ही खाकसार चळवळ स्वातंत्र्यपूर्व काळात देशाच्या सर्व प्रांतातून पसरु, लागली होती. अमरावतीत ही या संस्थेची शाखा होती. या खाकसार चळवळीचे संस्थापक आणि नेते अल्लाम्मा मश्रीकी हे होते. त्यांचे खरे नाव इनायतुल्ला असे होते. परंतु 'प्राच्य-पंडीत' अशा अर्थाच्या अल्लाम्मा मश्रीकी या नावांने ते प्रसिध्द होते. ते पंजाबचे एम.ए.केंब्रिजचे बी.एस.सी.रॅग्लर सन्मान ट्रायपास मिळविलेले व मास्टर ऑफ ओरिएंटल लर्निग ही केंब्रिजची परिक्षाही झालेले असे विद्वान होते. म्हणूनच पेशावरच्या इस्लामीय कॉलेचजे प्राचार्य व तत्कालीन हिंदुस्थान सरकारच्या शिक्षण खात्याचे दुय्यम सेक्रेटरीच्या जागेपर्यन्त चढले होते. परंतु पुढे त्यांनी सरकारी नोकरीचा त्याग करुन पंजाबात वास्तव्य केले. आणि १९३१ मध्ये त्यांनी मिसी खाकसार चळवळ सुरु केली होती.

खाकसार चळवळीसाठी त्यांनी निवडलेला काळ व सुरुवातीला योजलेले धोरण हे नाझी चळवळीच्या तत्सम धोरणाशी जुळणारे होते. खाकसार चळवळीत हजारो मुस्लीम तरुण भरती झाले होते.

उत्तरप्रदेशात लखनौला हे आपले खाकसार दल घेऊन शिरले तेव्हा त्यांना अटक करण्यांत आली होती. १९३९ मध्ये परत यु. पी.त. शिरतांच त्यांना व खाकसारांना

अटक केली. पुढे पंजाब सरकारने हया चळवळीला बंदी घातली होती. त्यावेळी केलेल्या निदर्शनांत गोळीबार होऊन काही खाकसार मृत्यु पावले व कित्येक जखमी झाले होते. शेवटी अल्लम मश्रीकी अटक होऊन त्यांना मद्रास प्रांतातील बेल्लोरचे तुरुंगात ठेवण्यात आले होते. १९४४ नंतर त्यांना मद्रास प्रातांतच स्थानबध्द केले होते.

त्यानंतर खाकसार चळवळ मागे फेकली गेली व स्वातंत्र्योत्तर काळात या चळवळीचा भारतात मागमूसही राहिला नाही ?.

अमरावती शहरात या खाकसार दलाची शाखा अंदाचे १९३५-३६ मध्ये स्थापन झाली.त्यांचे नेते श्री.मिर्जा गफ्फार बेग हे होते. गांधीजींच्या सेवाग्रामला खाकसारांचा कॅम्प उघडण्यांत आला होता.त्यावेळी उमरावतीच्या खाकसरांनी त्यांत भाग घेतला होता. खाकसारांनी मध्यप्रांत वऱ्हाड मधील क्रांतीकारी हिंदुस्थानी लाल सेना हया श्री.मगनलालजी बागडी यांच्या १९४२ च्या चळवळीचे काळांत साथ दिली होती. खुद्द गफारबेग यांनी मगनलालजी बागडी हे भूमिगत असताना अमरावतीस आले तेव्हा त्यांना स्वतःच्या घरात बराच काळ आश्रय दिला होता. खाकसार चळवळ ही पाकिस्तान विरोधी व लीग विरोधी होती.

तळटिपा : १) अर्वाचीन चरित्र कोश : चित्राव शास्त्री : १९४६ (पा.२७-२९)

२) श्री.गफ्फार बेग यांचे मुलाखतीवर आधारीत.

२१) एका शूर वीराचा सत्कार :

उमरावतीचे कै.शंकरराव जोग हे त्यावेळच्या लेजिस्टेटिव्ह अलेम्बीचे वऱ्हाडातून निवडून गेलेले सभासद होते. त्यांचे सुपुत्र कॅप्टन वसतंराव जोग हे भारतीय सैन्यात होते आणि दुसऱ्या महायुध्दात त्यांनी भाग घेतला होता.

त्यांनी मुलाखतीत दिलेले निवेदन :

दुसऱ्या महायुध्दात उत्तर आफ्रिकेत २ गोळया लागून जखमी झालो.

उत्तर इटलीतील हॉस्पीटलमध्ये तीन महिने राहिल्यांनतर युध्दकैदी कॅम्पमध्ये मला ठेवण्यात आले. तेथे इंटरनॅशनल रेडक्रासची पार्सल येत. त्यांत खाद्य पदार्थ व गरम

कपडे वगैरे उपयोगी वस्तू असत. एकदा एका भगिनीकडून भावाला पत्र आले. तिने लिहिले ' तुम्ही एकटे नाहीत आम्ही तुमच्या पाठीशी आहोत व तुमचे स्वागत करण्यास उत्सुक आहोत.' अशा प्रकारे युध्द कॅम्प मध्ये मदत करणाऱ्या हया संस्थेचे आम्ही सदैव ऋणी आहोत.

युध्द कैदी म्हटल्यानंतर त्यातून सुटका करुन घेणे प्रत्येक सैनिकांचे कर्तव्य ठरते. पंरतु अशा निर्णय म्हणजे सुळावरची पोळीच शिवाय परप्रांत व तोही शत्रूचा, धर्म, भाषा, लोक सर्वच वेगळे , सगळीकडे सर्च लाईटस आणि गुप्तहेर पसरलेले.बाहेर पडताच गोळी खाऊन मुत्यूचा संभव. परंतु तुरुंगात खितपत पडणे तरुण सळसळणाऱ्या रक्ताला पटत नाही. जणू मातृभुमीची हाकच त्याला तो निर्णय घेण्याचे धैर्य देते.

अशा परिस्थितीचा फायदा घेणेच योग्य होते. म्हणन दि.१३ सप्टेंबर १९४६ रोजी मी युध्दकैदी कॅम्पातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला व त्याच दिवशी तो अंमलात आणला. माझे सोबत,युध्दकैदी असलेले माझे काही मित्र व त्यांचे मागोमाग आणखी बरेच सैनिकही बाहेर पडले. त्यापैकी काही सरळ मायदेशी परत आले आणि काही पुन्हा पकडले गेले.

माझेवरही असाच प्रसंग आला . एका बर्फाच्छादित टेकडिवर एका छोट्या झोपडीत मी रहात असतांना मला जर्मन गुप्त हेराने पकडले. हा प्रसंग मोठाच रोमहर्षक होता. त्यांनतर सहा दिवसांनी मी दोस्त राष्ट्राच्या न्युझिलंड सैन्याला मिळालो. पंरतु वरील घटनेपूर्वी नऊ महिने मी अज्ञातवासात होतो. भीक मागून पोट भरावे लागे. शक्यतो गरीब शेतकऱ्यांची कामे करुन मी माझी उपजिविका करीत असे. युध्दकॅम्पातून बाहेर पडलेल्या सैनिकांना मदत करताना कुणी आढळले अशाही परिस्थितीत जिवावर उदार होऊन मला मदत करीत असत. खरी गोष्ट अशी होती की, हे लोक युध्दाला अतिशय कंटाळले होते.

अन्नाचे खरे महत्व मला या अज्ञातवासाचे काळात कळले. जगण्यासाठी अन्न आवश्यक आहे. पण जे अन्नासाठी जगतात त्यांचे जीवन व्यर्थ होय. असे त्यावेळी मला जाणवले. बिकट परिस्थितीत माणसाच्या खऱ्या गुणधर्माची पारख होत असते.

गरीब जनतेत मानवताधर्म प्रामुख्याने आढळतो. त्याला धर्म,भाषा,रंग,ह्यांचे बंधन रहात नाही. असा मला अनुभव आला होता.

इंग्रजांचे गुणधर्म वाखाणण्या सारखे आहेत. कारण प्रथम जरी अपयश आले तरी न डगमगता व धैय न सोडता त्यांनी लढा दिला व शेवटी विजयश्री खेचून आणली. सतत पराभव पदरी पडला असताही सर्वाचे धैर्य शेवटपर्यन्त उच्च दर्जाचे होते. त्यांनी सर्व मूल्य देऊनही लढा दिला.त्यांचे हे मनाधैर्यच त्यांच्या विजयाला बहूतांशी कारणीभूत आहे. मायदेशी परत आल्यानंतर उमरावती करांनी जी मायेने माझी पाठ थोपटली त्याने माझे मन गहिवरुन आले. कोणी कितीही शाबासकी दिली तरी आई ने थोपटलेली पाठ वेगळीच. मला एका गोष्टीची मनाला सतत खंत वाटते. पांढरपेक्षा वर्गातून अन्नाची होणारी नासधूस विशेषत:लग्नकार्याच्या पंगतीतून होणकारी अन्नाची नासाडी मन बैचेन करते'.

(कॅप्टन वंसतराव जोग यांच्या दि.२ ऑक्टो १९७६.
रोजी घेतलेल्या मुलाखतीच्या आधारे.
उदय दि.२५.८.१९४४.)

२२. उमरावती नगरपालिकेवर राष्ट्रीय ध्वज पडकला.

दि. २५ आक्टोबर १९४४ च्या नगरपालिकेचे सभेत ठरल्याप्रमाणे विजयादशमीचे दिवशी सकाळी ,नगरपालिकेते इमारतीवर राष्ट्रीय ध्वज लावण्यात आला होता.

नगर भवनावर राष्ट्रीयध्वज फडकविण्याचा मान म्यु.सभासद दे.भ.हिरासिंगजी चव्हाण यांना मिळाला होता. याप्रसंगी नगरपालिकेच्या सभासद सौ.पार्वतीबाई पटवर्धन आणि इतर म्यु.सभासद उपस्थित होते. उमरावती नगरपालिका स्थापन झाल्या पासून आणि राष्ट्रीय महासभेने "राष्ट्रीय ध्वज" ठरविल्यानंतर नगर भवनावर राष्ट्रीय ध्व लावण्याचा हा पहिला प्रसंग होता.

२३) विर्दभ नाट्य मंदीर :

इ.स. १९४३ साली उमरावतीला जो मराठी रंगभूमी शतसांवत्सरिक महोत्सव साजरा झाला त्यांनतर त्याही काही प्रमुख कार्यकर्त्यांनी जानेवारी १९४४ मध्ये एक सभा घेऊन , विदर्भ नाट्य मंदिराची ''स्थापना केली उमरावतीत काही कायम स्वरूपाचे व सुसंघटित नाट्य विषयक कार्य घडावे या उद्देशाने ही संस्था स्थापन करण्यात आली .

विदर्भ नाट्य मंदिराच्या स्थापनेची जाहीर घोषणा दि. ५ नोव्हेंबर , १९४४ रोजी राजकमल थिएटर मध्ये दे.भ. नानासाहेब बामणगांवकर यांच्या अध्यक्षतेखाली मराठी रंगभूमी महोत्सव दिनानिमित्त आयोजित केलेल्या समारंभाच्या वेळी मंदिराचे चिटणिस श्री प.म. निमदेव यांनी केली.

विर्दभ नाट्य मंदिर या संस्थेने पुढे स्थानिक कलाकारांचे सहकार्याने काही उत्तम नाटके रंगभूमीवर आणली . विदर्भ नाटय मंदिर या संस्थेचा पहिला प्रयोग ' नवीन कल्पना' हा दि.२६ डिसेंबर १९४४ रोजी प्रभात टॉकीज करण्यात आला होता. हा प्रयोग नगर वाचनालयाच्या मदतीसाठी होता. या नाटकांत सवश्री दादासाहेब ,बी.ए.बी.टी.अण्णासाहेबआपटे,एम.ए.शिवरामपंत खरे,परशरामपंत जोशी ,शंकरराव मालवांडे व भाऊराव केळकर यांनी उत्कृष्ट भूमिका केल्या होत्या. दिग्दर्शन श्री. काकासाहेब सहस्त्रबुध्दे यांचे होते. याच काळात 'सरोज नाट्य निकेतन' या नांवांची संस्थाही अमरावतीत स्थापन करण्यांत आली होती. चित्रसृष्टी व रंगभूमीचा समन्वय साधण्याचा उद्देश या संस्थेचा होता.

२४) सिंघई पन्नालालजी यांचे निधन :

सिंघई पन्नालालजी हे वयाच्या साठाव्या वर्षी बिहार राज्यातील पाटण्याजीकच्या आरा हया जैनांच्या तीर्थक्षेत्रात निधन पावल्याची वार्ता १९४४ च्या डिंसबरचे पहिल्या आठवडयांत उमरावती शहरांत आली व त्यामुळे उमरावतीकर जनतेस दुःख झाले होते. व्यापारी वर्गाने हे वर्तमान ऐकताच स्वयंस्फूर्तीने हरताळ पाळला.

स्वर्गीय पन्नालालजी हे अमरावतीतील प्रतिष्ठित व्यापारी आणि सावकार होते व सामाजिक व राजकीय कार्यात उत्साहाने भाग घेत असत.

इ.स. १९२९ च्या प्रांतिक कायदे मंडळाच्या निवडणूकीत ते कॉग्रेसचे उमेदवार म्हणून प्रांतिक कायदेमंडळावर निवडून गेले होते. १९३० च्या सविनय कायदेभंगाच्या चळवळीत त्यांनी देहदंडही सोसला होता. ते गांधीजीचे कट्टर अनुयायी व अहिंसावादी होते.

२५) **अमरावतीत सुरु झालेले स्पेशल ट्रिब्युनल फॉर अँटीकरप्शन कोर्ट :**

दुसऱ्या महायुध्दाचे काळात, हिंदुस्थान सरकारने लष्कराचे कामासाठी अनेक मुलकी अधिकाऱ्यांची सेवा प्राप्त केली होती. या अधिकाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात लाच लुचपत केल्याच्या तक्रारीवरुन त्यांची चौकशी करुन दंड देणे आणि अशा प्रकारांना आळा घालने या हेतूने. हिंदुस्तान सरकारने तीन सदस्यांचे एक ''स्पेशल ट्रिब्युनल कोर्ट'' इ.सन १९४४ मध्ये नियुक्त केले होते. या न्यायधिकरणाचे मुख्य कार्यालय अमरावतीत होते. आणि त्याचे कामकाज दि.४ डिसेंबर १९४४ पासून, अमरावतीच्या जिल्हा कौन्सीलच्या सभागृहात सुरु करण्यात आले होते.

या ट्रिब्युनलचे मुख्य सदस्याला जज्ज ॲडव्होकेट असे म्हणतात. रिटायर्ड, डिस्ट्रिक्ट ॲन्ड सेशन जज्ज रा.ब.ॲड डे (बंगाल), कर्नल बॉल, मिलीटरी सदस्य आणि बॅरिस्टर इ.एम.जोशी (अमरावती), यांची या न्यायाधिकरणाचे सदस्य म्हणून सरकारने नियुक्ती केली होती.

याचे कार्यक्षेत्र तत्कालीन मद्रास व बॉम्बे प्रांत आणि मध्यप्रांत वऱ्हाड (म्हणजे जवळ जवळ संपूर्ण दक्षिण हिंदुस्थान) एवढे होते. सामान्यत: अशा लाच लुचपती सारख्या प्रकरणासाठी खटले चालविण्याचे अधिकार न्यायाधिशाला होतेच. परंतू मग त्यावर अपील पुन्हा सेकंड अपील अशा दीर्घकाळ चालविणाऱ्या कायद्यातील तरतुदींच्या प्रक्रिया टाकून झटपट निकाल लावण्याचे हेतूनेच हिंदुस्तान सरकारने हे अधिकरण नियुक्त केले होते. या अधिकरणाच्या निकालावर अपील करण्याचा आरोपीला हक्क नव्हता. पण पुढे फक्त उच्च न्यायालयाकडे दाद मागण्याचा हक्क देण्यात आला होता.

(द्वि सामाहिक उदय आणि बॅरि.ए.एम.जोशी यांचे मुलाखतीचे आधारे.) याचे कामकाज केवळ दोन वर्षच सुरु होते. इ.स.१९४६ अखेर ते बरखास्त करण्यात आले.

या दोन वर्षाच्या काळात अधिकरणाच्या सदस्यांनी मुंबई, मद्रास, नागपूर व जबलपूर या ठिकाणी दौरा केला होता. अधिकरणा समोर आलेल्या प्रकरणात उच्च अधिकाऱ्यांची प्रकरणे आली नव्हती. तर फक्त लहान दर्जाचे अधिकारी आणि तृतीय व चतुर्थ कर्मचारी यांचीच प्रकरणे होती.

२६) सेनापती बापट यांना अमरावतीत अटक :

प्रांतिक विद्यार्थी काँग्रेसच्या अमरावती येथे भरणाऱ्या अधिवेशनाच्या उद्घाटनासाठी , उमरावतीला आलेले सेनापती बापट यांना दि.२२ डिसें. १९४४ रोजी डॉ.पटवर्धनांच्या निवासस्थानी अटक करण्यात येऊन त्यांना जिल्हा कारागृहात पाठविण्यात आले ही अटक भारत स. कायद्याचे कलम १२९ खाली करण्यात आली. नंतर सेनापती बापट यांना येथून अकोल्याचे तुरंगात ठेवण्यात आले होते. पुढे फेब्रुवारी मध्ये अकोल्याचे न्यायालयाने त्यांना १ वर्षाची शिक्षा सुनावली होती.

२७) प्रांतिक विद्यार्थी काँग्रेसचे १ ले अधिवेशन :

मध्यप्रांत व-हाडच्या काँग्रेसने पहिले अधिवेशन उमरावती येथे दि.२४ व २५ डिसेंबर १९४४ रोजी येथील जोशी हॉल मध्ये पुण्याचे दे.भ.काकासाहेब गाडगीळ ह्यांच्या अध्यक्षतेखाली भरले होते. या अधिवेशनाचे उद्घाटन सेनापती बापट हे करणार होते. परंतु ते अमरावतीत आल्यानंतर त्यांना भा.स.कायद्याखाली अटक करण्यात आली होती. त्यामुळे या अधिवेशनाचे उद्घाटन वर्धा येथील कॉमर्स कॉलेजचे प्रा.बंग यांनी केले.

स्वागताध्यक्ष श्री. दादा भामोदकर यांनी सर्वांचे स्वागत केले. आणि प्रांतिक विद्यार्थी काँग्रेसच्या कार्याचा अहवाल श्री.मधुसूदन वैराळे यांनी निवेदन केला होता. अधिवेशनाचे चिटणीस श्री. मनोहर बाळापुरे यांनी अधिवेशनाला आलेले संदेश वाचून दाखविले होते.

हे अधिवेशन खाजगी स्वरुपाचे व फक्त निमंत्रिता पुरतेच मर्यादित होते. या अधिवेशनाचे निमित्ताने नूतनकन्या शाळेचे जागेत हस्तकौशल्याच्या वस्तूंचे भरविलेल्या प्रदर्शनाचे उद्घाटन त्याच दिवशी मुंबईच्या सौ. साक्रीकर यांनी केले होते.

सेनापती बापट यांची माहिती पुढीलप्रमाणे :-

बापट पांडुरंग महादेव उर्फ सेनापती बापट (ज.१८८०) क्रांतिकारक देशभक्त. कॉलेजातच त्यांनी देशाच्या स्वातंत्र्या प्रीत्यर्थ प्रयत्न करण्याची प्रतिज्ञा केली होती. बी.ए.पदवी घेतल्यानंतर (१९०३) त्यांनी मंगलदान नथुबाई शिष्यवृत्ती मिळविली व एडिम्बर्ग येथे तंत्र विद्येचा अभ्यास करु लागले. पण तेथेही ब्रिटिश सरकारच्या कारभाराविरुध्द मत प्रदर्शन करुन लागले. त्यामुळे त्यांची शिष्यवृत्ती बंद झाली. पुढे क्रांतीकारकांचे आश्रयदाते श्यामजी कृष्ण वर्मा यांच्या आश्रयास गेले. पॅरिस व बर्लीन येथे त्यांची रशियन क्रांतिकारकांशी ओळख झाली व बॅरिस्टर सावरकर वगैरे क्रांतिकारकांशी त्यांचा स्नेह जमला. त्यांनी बॉम्ब तयार करण्याच्या कृतीचे ज्ञान संपादन केले होते.

१९०८ साली हिंदुस्तानात परत आल्यावर काही काळ अज्ञात वासात होते. नंतर काही काळ त्यांनी चित्रमय जगत'' व मराठा या पत्रांचे संपादकीय काम ही केले १९१८-१९२१ या काळात ते डॉ.केतकरांच्या ''ज्ञानकोश'' संपादन वर्गात होते. नंतर मुलशी सत्याग्रहाचे नेतृत्व केले. त्यात त्यांना तीन वेळ दीर्घ मुदतीच्या शिक्षा झाल्या होत्या. नंतर काँग्रेसच्या राजकीय सत्याग्रहात शिरले. महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसचे अध्यक्ष असतांना त्यांना सात वर्षाची शिक्षा झाली होती. १९३७ साली त्यांची सुटका झाली. नंतर संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे ते कट्टर पुरस्कर्ते होते.

इ.स.१९४५

१) बॅ.रामराव देशमुखांचा सत्कार

२) प्रिन्स ऑफ बेरारच्या दौऱ्याला विरोध.

३) वऱ्हाड प्रांतिक मराठा परिषद.

४) प्रिन्स ऑफ बेरारचे काळ्या निषाणांनी स्वागत.

५) प्रिन्स ऑफ बेरार होस्टेलचे उद्घाटन.

६) वीर वामनरावांचा वाढदिवस.

७) आष्टी चिमूर दिनानिमित्त हरताळ.

८) मुस्लीम लीगची निषेधाची सभा.

९) वीर वामनराव दादांची सुटका व भव्य स्वागत.

१०) कै.नामदेवबूवा पुण्यतिथी.

११) बुवाबाजी विध्वंसक मंडळ.

१२) डॉ.पटवर्धन, डॉ.भोजराज यांचे दैव दुर्लभ स्वागत.

१३) टांगेवाल्यांचा संप.

१४) आझाद हिंद सेनेला पाठिंबा.

१५) दादासाहेब गोळे यांचा विजय.

१६) नानासाहेब हिरुरकर यांचे निधन.

१७) मध्य.शेतकरी संघाचे काँग्रेसमध्ये विलीकरण.

१८) जिल्हा युध्द समितीचे विसर्जन.

१९) आझाद हिंद सरकार स्थापना दिन.

२०) येशू ख्रिस्त पुण्यतिथी.

२१) अमरावती नरखेड रुंदीकरण योजनेसाठी मोजमापे.

२२) आचार्य भनसाळी यांचे भाषण.

२३) शिक्षण परिषदेचे अधिवेशन.

२४) इ.१८५७ चा स्मृतिदिन.

२५) महायुध्दाचा विजयदिन.

२६) स्वा.सावरकर जयंती

२७) रेल्वेचे फसलेले कारस्थान.

२८) अ.न.पा.चा राजबंदी मुक्तीचा ठराव.

२९) मौलाना आझाद यांचे स्वागत.

३०) वेव्हेल योजनेसंबधी कम्यु.पार्टीची सभा.

३१) ना.बियाणिजींचे स्वागत जाहीर भाषण, मानपत्र.

३२) गव्हर्नर ना.बोर्न यांची भेट.

३३) स्त्रियांचा ऑगष्ट समाह.

३४) जागतिक महायुध्दाची समामी विजय दिन सोहळा.

३५) देशगौरव सुभाषबाबूंचे निधन, हरताळ.

३६) महाविदर्भ कुमार साहित्य संमेलन.

३७) कॉलऱ्याचा कहर.

३८) काँग्रेसवरील बंदी उठली.

३९) मुस्लिम लीगची जाहीर सभा.

४०) वीर वामनराव नानासाहेब बामणगावकर बचावले.

४१) फ्रेंच राज्यक्रांती दिनाची सभा.

इसवी सन १९४५

१) बॅरि.रामराव देशमुख यांचा सत्कार व मानपत्र :

उमरावतीचे बॅरि.रामराव माधवराव उर्फ अण्णासाहेब देशमूख यांची नियुक्ती हिंदुस्तान सरकारने दक्षिण आफ्रिकेचे हाय कमिश्नर म्हणून केली होती. त्यानिमित्त अमरावती जिल्ह्यातील नागरिकांतर्फे दि.२५ जानेवारी १९४५ रोजी, सर मोरोपंत जोशी यांच्या अध्यक्षतेखाली त्यांचा सत्कार करुन मानपत्र अर्पण करण्याचा भव्य समारंभ, वऱ्हाड सहकारी संघाच्या सभागृहात थाटाने साजरा करण्यांत आला होता.

या समारंभाला प्रतिष्ठीत स्त्री-पुरुष, नागरिक, अधिकारी वर्ग आणि बॅरि.रामराव यांचे जिल्ह्यातील व वऱ्हाडातील मित्र आणि हितचिंतक उपस्थित होते. सभागृहाबाहेर विजेची रोषणाई करण्यांत आली होती.

या प्रसंगी सर मोरोपंत जोशी, डिस्ट्रीक्ट ॲन्ड सेशन जज्ज श्री. के.टी.मंगलमूर्ती, रा.ब.रणदिवे, रा.ब.कोरडे, श्री.व्हि.बी.चौबळ, श्री.शरफ्फूद्दिन वकील, आमदार गणेशराव देशमुख व श्री.भोकरे गुरुजी यांची बॅरि.रामराव यांचे गुणगौरवपर भाषणे झाली.

त्यानंतर अमरावती जिल्ह्यातील नागरिकांतर्फे बॅरि. रामराव यांना चांदीच्या करंडकातून मानपत्र अर्पण करण्यात आले. मानपत्राचे वाचन श्री ए.सी.देशमुख वकील यांनी केले. नंतर जिल्ह्यातील व शहरातील निरनिराळ्या संस्थातर्फे पुष्पाहार घालून बॅरिस्टर साहेबांचा सत्कार करण्यांत आला होता. उत्तरादाखल बॅरि.रामराव यांचे भाषण संयोजकातर्फे आभार प्रदर्शन व राष्ट्रगीत होऊन हा सोहळा संपला.

बॅरिस्टर रामराव देशमुख उर्फ अण्णासाहेब देशमुख : (ज.१८९२ मृ.) विदर्भातील सुप्रसिध्द सार्वजनिक कार्यकर्ते शिक्षण एम.ए. एल.एल.बी. (केंट),बार-ॲक्ट-लॉ, हायस्कूल शिक्षण अमरावतीला व उच्च शिक्षण मॅचेस्टर, लंडन आणि सेंट कॅथराईन कॉलेज (कॅम्ब्रीज) कायदेपंडीत व कृषीतज्ञ; ट्रस्टी-किंग एडवर्ड मेमोरियल मराठा एज्युकेशन फंड, प्रबोधन हायस्कूल, दर्यापूर, टिळक मेमोरियल पर्स फंड, टिळक मंदिर ट्रस्ट पुणे, बेरार किंग एडवर्ड मेमोरियल सोसायटी.

अध्यक्ष - विदर्भ शेतकरी सभा, अखिल भारतीय मराठा परिषद (१९१७), महाराष्ट्र परिषद (१९२५), डेमोक्रटिक स्वराज्य पार्टी कॉन्फरन्स (१९३३), सेक्रेटरी : सेंट्रल इंडिया ॲन्ड अदर स्टेटस् ऑर्गनायझेशन, देवास, (१९३९-४८),

अध्यक्ष : सुंयक्त महाराष्ट्र परिषद मुंबई १९४८. अध्यक्ष : अमरावती डिस्ट्रीक्ट कौंन्सील १९२५, सदस्य ऑल ऑफ इंडिया काँग्रेस कमेटी १९२१-२५ व १९२७. सदस्य लेजिस्लेटीव्ह असेम्ब्ली (सेंट्रल) १९२६-२७, मंत्री मध्यप्रांत वऱ्हाड सरकार, १९२७-२८, १९२९-३०, १९३७-३८.

पॉलिटीकल ॲडव्हासर राजा ऑफ सोंडूर (म्हैसूर) १९३५-३७, पोलीटीकल मिनिस्टर देवास स्टेट १९३९-४१, सदस्य चेंबर ऑफ प्रिंसेस १९४०-४४. हाय कमिश्नर फॉर इंडिया: इन दि युनियन ऑफ साऊथ आफ्रिका १९४५-४७, अल्टरनेटिव डेलीगेट यु.एन.ओ. १९४६, पंतप्रधान-रेवा स्टेट १९४७-४८, डायरेक्टर रिझर्व बँक ऑफ इंडिया १९४९-५२, सदस्य राज्य सभा १९५२-६४, आणि इतर अनेक औद्योगिक आणि सहकारी संस्थाचे पदाधिकारी, कै.दादासाहेब खापर्डे यांच्या बाजूचे त्या काळापासून वऱ्हाडच्या राजकारणांत सक्रीय होते. लहान उद्योग व सहकारी उद्योगांना प्रोत्साहन देणारे होते.

२) प्रिन्स ऑफ बेरार'' यांच्या नियोजित वऱ्हाड'' दौऱ्याला जनतेचा विरोध :

निजामाचे पुत्र ''प्रिन्स ऑफ बेरार'' हे उमरावती येथील श्री शिवाजी शिक्षण संस्थेने निजामाचे देणगीतून बांधलेल्या ''प्रिन्स ऑफ बेरार होस्टेल'' च्या इमारतीचे उद्घाटनासाठी येण्याचे जाहीर झाले होते. या त्यांच्या ''वऱ्हाडभेटी'' चा उद्देश, वऱ्हाडप्रांत परत निजामाला मिळावा अशी जी निजामाची खटपट सतत चालू होती त्याचेशी लावण्यात येऊन, उमरावती नागपूर-पुणे व मुंबईच्या वृत्तपत्रांनी रकानेच्या रकाने भरुन विरोधी लेख छापणे चालू केले होते. आणि वऱ्हाड प्रांतिक हिंदुमहासभेनेही एक ठराव करुन विरोधी प्रचाराचा गदारोळ उडवून दिला होता.

या संदर्भात उमरावतीत झालेली पहिली जाहीर सभा दि.२० मार्च १९४५ रोजी जोशी हॉलमध्ये श्री.वि.घ.देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली भरुन तीत श्री. बाळशास्त्री हरदास व आदेशाचे संपादक श्री.पु.भा.भावे यांची भाषणे झाली. सभेत श्री.बाबासाहेब खापर्डे

यांचेही भाषण झाले. श्री.बाबासाहेब निजामाचे हस्तक होते वऱ्हाड निजामाला देण्याची त्यांनी खटपट प्रांरभिली, वगैरे सर्व गैरसमज या सभेत दूर केले.

३. वऱ्हाड प्रांतिक मराठा परिषद :

वऱ्हाड प्रांतिक मराठा परिषद उमरावती येथे, शिवाजी हायस्कूलचे पटांगणात उभारलेल्या भव्य मंडपात श्री.पंढरीनाथ सीताराम पाटील, एम.एल.ए. (चिखली) यांच्या अध्यक्षतेखाली दि.२० व २१ मार्च १९४५ रोजी भरली होती.

या परिषदेला सर्व वऱ्हाडातून मराठा समाजातील प्रमुख पुढारी मंडळी व इतर ५०० प्रतिनिधी आले होते. शिवाय निजाम सरकारचे वऱ्हाडातील एजन्ट मिर्झा यारजंग बहादूर, वऱ्हाड प्रांताचे कमिश्नर श्री. इनामुर्रहिम, आय.सी.एस. हे ही सन्मानीय पाहुणे म्हणून व्यासपीठावर उपस्थित होते आणि अध्यक्षांचे भाषणानंतर या दोघांची भाषणे झाली होती. या परिषदेला श्री.बापूसाहेब देशमुख, चेअरमन जिल्हा कौन्सिल अमरावती, श्री.नाथे गुरुजी,एम.एल.ए.,यवतमाळ, रावबहादूर कोर्डे, अकोला, रा.ब.राजूरकर, एम.एल.ए.,अकोला,श्री.खंडारे एम.एल.ए.आकोला, रावसाहेब देवसिंग पाटील व श्री.कृष्णराव पाटील बुलढाणा, इत्यादी चारही जिल्हयातील प्रमुख पुढारी हजर होते.

या परिषदेत, शिक्षण ॲडव्हायसरी बोर्डाने मार्च १९४५ मध्ये "प्राथमिक शिक्षणाचे कार्य स्थानिक स्वराज्य संस्थाकडून काढले ते सरकारकडे सोपविण्याची जी शिफारस केली होती, त्याबद्दल निषेध करण्यात आला. आणि "प्राथमिक ४ थ्या व ७ व्या वर्गाच्या परिक्षा प्रांतात एकच दिवशी सामान्य प्रश्नपत्रिका काढून घेण्यात यावी. अशी मागणी करण्यात आली.

वस्तुत: या मराठा परिषदेचा हेतू "प्रिन्स ऑफ बेरार" चे नियोजित दौऱ्याविरुध्द वऱ्हाडात जो प्रचार सुरु होता त्याला शह देणे हा होता असे लोक बोलत असत.

४) प्रिन्स ऑफ बेरार " चे अमरावतीत काळ्या निशाणांनी स्वागत :

निजामपुत्र हिज हायनेस बालाशा नबाब मीर इनायत अलीखाँ, आझमखाँ, बहादूर , सी.बी.ए. "प्रिन्स ऑफ बेरार" हे दि. २३ मार्च १९४५ इ. रोजी सकाळी ११ वा.

आपल्या परिवारासोबत खास गाडीने उमरावतीस आले होते.

रेल्वे स्टेशनवर खास गाडीतून ते खाली उतरताच निरनिराळ्या संस्थाचे प्रतिनिधी व काही प्रतिष्ठित नागरिकांनी त्यांचे स्वागत केले. त्यात सर मोरोपंत जोशी, पारव्याचे जहागीरदार रा.ब.बाबासाहेब देशमुख,शेठ गोपालदास मोहता, रा.ब.वाय.राजूरकर, सय्यद अब्दुल रफिशाही, नवाब मीर मेहेदेअलीखाँ, श्री.व्ही.बी.चौबळ, व वऱ्हाडचे कमिश्नर श्री.इनामूरहिम हे प्रमुख होते. ओळख करुन देण्याचा छोटासा समारंभ पार पडल्यावर प्रिन्स ऑफ बेरार यांना सलामी देण्यात आली व नंतर ते मोटारीने सर्कीट हाऊसकडे रवाना झाले.

काळ्या निशाणांनी निदर्शने :

रेल्वे स्टेशनकडून इर्विन हॉस्पीटलकडे जाणाऱ्या रस्त्यावर अ.भा.हिंदूमहासभेचे चिटणीस, प्रा.वि.घ.देशपांडे, आदेशचे संपादक श्री.भावे, साहित्याचार्य बाळशास्त्री हरदास, श्री.बिंदुमाधव पुराणिक, अ.भा.पाकिस्तानविरोधी आघाडीचे प्रमुख कार्यवाह श्री.एल.जी.शेवडे यांच्या समवेत शंभर स्वयंसेवकांनी उभे राहून, निजाम पुत्राची मोटार स्टेशनच्या आवाराचे बाहेर पडताच काळी निशाणे दाखवून ''युवराज परत जा'' अशी गर्जना करुन निदर्शने केले.

स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या आदेशानुसार शहरातील कित्येक घरांवर युवराजांच्या भेटीला विरोध दर्शविण्याबद्दल काळी निशाणे लावण्यात आली होती.खापर्डे वाड्यावरही काळे निशाण फडकत होते.

स्टेशनवर पोलिस बंदोबस्त कडेकोट होता. स्टेशनवरुन कॅम्पकडे जाणाऱ्या रस्त्यांवरील रहदारी युवराजांची स्वारी जाई पर्यंत बंद ठेवण्यात आली होती.स्टेशनचे आवार व स्टेशन पासून सर्किट हाऊस पर्यन्तचा रस्ता बराच खर्च करुन ध्वजपताकांनी व कमानींनी सुशोभित करण्यात आला होता. या रोषणाईसाठी खर्च झालेला सारा पैसा वऱ्हाडच्या जमीनदार व व्यापाऱ्यांकडून सरकारी अधिकाऱ्यांनी वसूल केला होता.

५) प्रिन्स ऑफ बेरार होस्टेलचे उद्घाटन :

त्याच दिवशी सांयकाळी प्रिन्स ऑफ बेरार यांच्या हस्ते तेथील श्री.शिवाजी

हायस्कूलच्या'प्रिन्स ऑफ बेरार होस्टेलचे' उद्घाटन करण्यांत आले. या सभारंभासाठी सुंदर मंडप तयार करण्यात आला होता.

आकर्षक विजेची रोषणाई करण्यात आली होती.एकूण समारंभारचा थाट दरबारी प्रकारचा होता. वऱ्हाडातील व उमरावतींतील प्रतिष्ठित स्त्रीपुरुष नागरिक व अधिकारी वर्ग उपस्थित होता.

स्वागत गीता नंतर श्री.शिवाजी मराठा हायस्कूलचे अध्यक्ष डॉ.पंजाबराव देशमुख यांनी विदर्भ युवराजांच्या स्वागतपर भाषण केले.त्यात त्यांनी श्री.शिवाजी मराठा हायस्कूलच्या प्रगतीचा आढावा घेतला होता.

त्यानंतर प्रिन्स ऑफ बेरार यांनी उत्तरादाखल भाषण करताना सांगितले, माझ्या पदवीशी संबंध असलेल्या या भागाला भेट देण्याची मला फार आतुरता लागली होती. ती आज पूर्ण होत आहे. या संस्थेची मी आपुलकीने चौकशी करीन अशी हमी देऊन ते म्हणाले ज्ञान आणि संस्कृती यांच्या योगाने सर्व बंधने तुटतात, मानवतेच्या व नागरिकत्वाच्या व्यापक स्वरुपाची जाणीव करुन देणे हेच खरे शिक्षणाचे ध्येय होय. या संस्थेकडून प्रत्येक विद्यार्थी त्या ध्येयाने प्रेरित होऊन बाहेर पडेल अशी मला आशा वाटते.ज्ञान व संस्कृतीचा दीप ते खेड्यात नेतील.अशी आशा त्यांनी प्रदर्शित केली.निजामशहा बद्दलची राजनिष्ठा व्यक्तकरण्यात आली ती त्यांना कळविन असे सांगून उमरावतीच्या गोड व सुखद आठवणी घेऊन मी परत जाईल असे म्हणून त्यांनी प्रिन्स ऑफ बेरार होस्टलचे उद्घाटन केले. या प्रंसगी देशांतून अनेक राजे रजवाडे यांकडून शुभच्छा संदेशही आले शेवटी पानसुपारी होऊन हा सोहळा संपला.

मानपत्रेः-

त्याच दिवशी सांयकाळी सर्किट हाऊसमध्ये युवराजांना मानपत्र देण्याचा कार्यक्रम झाला. आकोल्याचे लोक मानपत्र देण्यासाठी येथेच आले होते उमरावती,यवतमाळ , व अकोला जिल्हातील सुमारे ३३ संस्थांनी.'' प्रिन्स ऑफ बेरार'' यांना चांदीचे करंड्यातून मानपत्रे दिली. उमरावती ची कॅम्प नगर पालिका ,उमरावतीत कॉटन मार्केट कमेटी,मराठा हायस्कूल उमरावती, न्यू एज्युकेशन सोसायटी

,अमरावती,आर्दश हायस्कूल अमरावती, विजय कन्या क्लब ,मुस्लीम एज्युकेशन परिषद,बोहरा समाज इत्यादी संस्था त्यांत प्रमुख होत्या. त्यांत उमरावती नगरपालिकेचे मानपत्र नव्हते ही गोष्ट लक्षात ठेवण्यासारखी आहे. आणि उपस्थितित नगरपालिकेचे उपाध्यक्ष रा.सा.टांक यांचे नाव नाही हे एक वैशिष्टय,नंतर विदर्भ युवराजांतर्फे उपहार देण्यांत आला.

दुसरे दिवशी सकाळी प्रिन्स ऑफ बेरार हे खास गाडीने खामगांवकडे रवाना झाले, प्रिन्स ऑफ बेरार यांनी वऱ्हाडला दिलेल्या भेटीचे स्मरणार्थ दि.१ मे. १९४५ रोजी दीड लक्ष रुपयांच्या देणग्या त्यांनी वऱ्हाडांतील निरनिराळ्या शैक्षणिक संस्थांना दिल्याचे जाहीर करण्यात आले. त्यापैकी दि.होलिक्रास कॉन्व्हेंटच्या उमरावतीच्या संस्थांना देणग्या मिळाल्या होत्या.

६) वीर वामनरावांचा वाढदिवसः-

उमरावतीचे पहिले लोकनियुक्त नगराध्यक्ष वीर वामनराव जोशी यांच्या पासष्टाव्या वाढ दिवसानिमित्त त्यांना दीर्घायुरारोग्य लाभावे अशा अर्थाचा ठराव उमरावती नगरपालिकेच्या आमसभेत दि.३० मार्च १९४५ च्या सभेत मंजूर केला. नगरपालिकेचे सभागृहात वामनराव दादांचा फोटो लावण्यांत यावा असेहि या ठरावाने ठरविण्यात आले होते.

७) उमरावतीत ''आष्टी चिमुर'' दिनाबद्दल कडकडीत हरताळः-

आष्टी व चिमुर येथील फांशीची शिक्षा झालेल्या ७ राजबंद्यांतर्फे राजे साहेबांकडे केलेला दयेचा अर्ज फेटाळण्यांत आला.त्याचप्रमाणे महात्मा गांधी व इतर अनेक कार्यकर्त्यांनी त्यांचे प्राण वाचविण्यासाठी केलेले सर्व प्रयत्न असफल झाले. त्यामुळे संपूर्ण देशभर उदासीनतेचे वातावरण पसरले होते.

दि.३ एप्रिल १९४५ हा दिवस,अखिल भारतीयांतर्फे निषेध व्यक्त करण्यासाठी पाळला जावा व त्या दिवशी सर्व व्यवहार बंद ठेवावेत. असे जाहीर पत्रक महात्मा गांधींच्या संमतीने ,कस्तुरबा गांधी राष्ट्रीय ट्रू स्टच्या चिटणीस श्रीमती मृदुला साराभाई यांनी ता.२ रोजी काढले होते.

या पत्रकाप्रमाणे व महात्माजींचे आदेशाप्रमाणे मंगळवार ता.३एप्रिल रोजी संपूर्ण भारतात 'आष्टी-चिमूर' दिनानिमित्त हरताळ पाळण्यांत आला व फांशीची शिक्षा झालेल्यांना जीवदान द्या अशा आशयाचे ठराव निरनिराळया संस्थांनी करुन, ते गव्हर्नर, व्हाईसरॉय राजेसाहेब व ब्रिटनच्या राणीकडे पाठविले होते.

सर्व देशाप्रमाणेच उमरावतीतही ता.३ एप्रिल १९४५ राजी '' आष्टी-चिमूर'' दिनानिर्मीत्त सकाळपासून ,कडकडीत हरताळ पाळण्यात आला होता.

हा हरताळ इतका कडक होता की, हॉटेल व पानविड्याचे दुकानदारांनी ही स्वयंस्फूर्त दुकाने बंद ठेवली होती. सर्व बाजारपेठ बंद होती.

माणुसकीचा गहीवरः-

१९४२ चिमुर येथील लढ्यात तेथील जनतेने बंगल्यात आग लावून तेथे मुक्कामास अललेले सरकारी अधिकारी श्री.टी.जी.इंगांजी एस.डी.ओ. आणि नायब तहसिलदार श्री.इलीनूर या दोघांना ठार केले होते .त्यात अटक व फांशीची शिक्षा झालेल्या बंद्यांना माफी मिळावी म्हणून निवारण समितीतर्फे प्रयत्नाची पराकाष्ठा चालविली होती.

या प्रयत्नात श्री.इंगाजी यांच्या मातोश्री श्रीमती कुवरबाई यांनी आणि नायब तहसीलदारांच्या पत्नी श्रीमती ग्लेरीज इंजीनर यांनीही ना.गव्हर्नर व व्हाईसराय यांना पत्रे पाठवून '' या आरोरींच्या शिक्षा अंमलात आल्यानंतर आम्हाला आमच्या बळी पडलेल्या पुत्र व पतीच्या आत्म्याला शांती लाभणार नाही.आम्हाला आमचे प्रियजन बळी गेल्याने ज्या वेदना होत आहेत तशाच वेदना हे आरोपी फांशी गेल्याने त्यांच्या विधवांना, आमच्या भगिनींना सोसाव्या लागतील. असा प्रंसग येऊ नये म्हणून त्या आरोपींना जीवनदान द्या'' अशा आशयाचा दयेचा अर्ज जानेवारी ४५ मध्ये पाठविला होता. यालाच माणूसकीचा गहींवर म्हणतात.

फांशी तहकूब कराः- महात्माजींचे व्हाईसरायला पत्रः

'' ऑगस्ट क्रांती'' मधील उत्पाती चळवळी बद्दल फांशीची शिक्षा झालेल्या सर्व आरोपींची फांशी तहकूब करा'' अशी विनंती एका पत्राव्दारे महात्मा गांधीनी

जुलै १९४५ मध्ये व्हाईसरॉयला केली होती..

(त्यानंतर आष्टी-चिमुर कैद्यांचे बाबतीत प्रिव्हाईसरॉयला कडे अपील करण्यांचे ,फांशी निवारक समितीने ठरविले. त्यामुळे फांशी तहकुब करण्यात आली होती. याशिवाय महायुध्दात दोस्तांचा विजय होऊन सर्वत्र विजय दिन साजरा केला होता. तेव्हा फाशी निवारक समितीतर्फे बादशहास तार पाठवून विजय दिनानिर्मित या आरोपींना माफी देण्यात यावी अशी विनंती करण्यात आली होती. पुढे २१ आगस्ट १९४५ चे सुमारांस '' विसरा व क्षमा करा'' या धोरणानुसार चिमुर-आष्टीचे या आरोपींना फांशीची शिक्षा माफ करण्यांत आली होती.)

८) मुस्लीम लीगची जाहीर सभाः-

उमरावती मुस्लीम लीगचे विद्यमाने दि.६एप्रिल ४५रोजी

साबनपुऱ्यातील जुम्मा मशीदीत मुसलमानांची जाहीर सभा भरुन इंदूर संस्थानातून निघणाऱ्या '' हिंदू धर्म प्रचारक मंडळ'' या मासिकाच्या जानेवारी चे अंकात मुसलमान धर्म संस्थापकांच्या वर्तनावर शिंतोडे उडविणारा जो लेख प्रसिध्द झाला त्याच्या निषेध करण्यात आला व इंदूर नरेशांनी जातीय द्वेष पसरविणाऱ्या या लेखाबद्दल त्या मासिकाचे संपादक व प्रकाशकांविरुध्द कारवाई करावी'' अशी मागणी करण्यात आली, व ठरावाच्या नकला इंदूर नरेश आणि व्हाईसरॉय यांचेकडे तारेने पाठविण्याचे ठरविण्यात आले .

९) वीर वामनराव जोशीः(दादांची) सुटका व भव्य स्वागत.ः

उमरावतीचे पहिले लोकनियुक्त नगराध्यक्ष व मध्यवर्ती कौन्सिलचे वीर वामनरान दादा जोशी यांची स्थानबध्दतेतून सुटका होऊन दि.२० एप्रिल १९४५ रोजी ते उमरावतीस रामनवमीचे सुमुहूर्तावर पॅसेजरने येऊन पोचले.

त्यांचे स्वातगासाठी बडनेरा रेल्वे स्टेशनवर बरेच लोक गेले होते. त्याचप्रमाणे उमरावती रेल्वे स्टेशनचे यार्डमध्ये शिरतांच वीर वामनराव की जय, कांग्रेस जिंदावाद च्या जयघोषाने वातावरण दुमदूमून गेले होते.

वीर वामनराव दादा गाडीतून उतरताच उपस्थित कॉग्रेस कार्यकर्ते म्यु. सभासद

व नागरिकांनी पुष्पहार घालून त्यांचा सन्मान केला. नंतर रेल्वे स्टेशनवरुन डॉ.बापट यांच्या गाडीतून वीर वामनराव दादा सरळ नगर पालिकेत आले, तेथे म्यु. सभासदाच्या वतीने त्यांचा पुष्पहार घालून सत्कार करण्यांत आला आणि त्याच दिवशी त्यांनी नगरपालिकेची सूत्रे नगराध्यक्ष या नात्याने आपल्या हाती घेऊन ,सांयकाळी भरलेल्या नगरपालिकेच्या आमसभेत ते प्रथमच नमराध्यक्ष म्हणून उपस्थित राहिले.

नगरपालिकेच्या या बैठकीत (आमसभेत) कारागृरांतून मुक्त झाल्याबद्दल दादांचे अभिनंदनाचा व दादांना सहकार्य देण्याबद्दलचा सौ.पार्वतीबाई पटवर्धन यांनी आणलेला ठराव सर्वानुमते मंजुर करण्यांत आला. दुसऱ्या दिवशी श्री.ठाकूर वकील यांच्या निवासस्थानी, स्थानिक व जिल्हयातील कॉंग्रेस कार्यकत्यांतफ्रे वीर वामनराव दादांचा सत्कार करण्यांत आला.

१०) कै.नामदेव बुवा पुण्यतिथी:-

उमरीवतीचे प्रख्यात ,संगीत चुडामणी कै.नामदेव बुवा जोशी यांची पुण्यतिथी दि.२१ एप्रिल १९४५ रोजी दे.भ.वीर वामनराव जोशी ,नगराध्यक्ष यांच्या अध्यक्षतेखाली साजरी झाली.त्या प्रसंगी दे.भ.नानासाहेब बामणगांवकर यांचे व्याख्यान आणि श्री.गोपाळराव बेडेकर व श्री.वामनबुवा प्रभृतींचा गायनाचा कार्यक्रम झाला.

१०) बुवाबाजी विध्वसंक मंडळ:-

या मंडळाची सभा दि.१६ आगस्ट १९४५ श्री.नानासाहेब गवई याच्या अध्येक्षतेखाली श्री.जोग वकील यांचे ऑफिस मध्ये भरुन तीत खालील आशयाचे ठराव मंजूर करण्यांत आले होते.

१) महाराष्ट्रातील वृत्तपत्रांतील बुवाच्या हालचाली व भजनांस प्रसिध्दी देवू नये.

२) महाराष्ट्रातील आणि मध्यप्रांतात वऱ्हाडातील गैर वर्तन करणाऱ्या बुवाची माहिती जमविणे त्यासाठी श्री.अ.वा.नवाडे आणि श्री.आंनदराव लढके,यांनी कार्य करावे.

३) उमरावतीच्या " उदय द्विसाप्तहिकाने बुवांना प्रसिध्दी न देण्याचे जे धोरण ठेवले,त्याबद्दल उदयचे अभिनंदन.

११) बुवाबाजी विध्वसंक परिषद:

दि.१६ ऑक्टोबर १९४५ रोजी उमरावतीत लढके, यांचे अध्यतेखाली बुवाबाजी विध्वसंक परिषद झाली होती. जनतेने बुवाबाजीचे मागे न जाता लोक कल्याणाच्या मार्गाने जावे असे अध्यक्षांनी सांगितले. पुण्याच्या एका दैनिकाने संत तुकडोजी महाराजांवर जो आरोप केला आहे त्याचा या परिषदेत निषेध करण्यात आला व पूज्य गांधीजींनी याबाबतीत निर्णय द्यावा असे आवाहन करण्यात आले. आरोप सिध्द न झाल्यास तुकडोजी महाराजांनी दैनिकावर खटला भरावा असे सुचविण्यात येऊन बुवाबाजी विरुध्द लोक जागृती करण्यासाठी एक समिती नेमण्यात आली होती. या समितीचे सर्वश्री नानासाहेब गवई जोध, वकील, अ.वा.नवाडे, जी.बी.वऱ्हाडे, आनंदराव लढके हे सदस्य होते. अशा प्रकारची उमरावतीतील ही पहिलीच परिषद होती.

१२) कारावास मुक्त डॉ.पटवर्धन व डॉ.भोजराज यांचा उमरावतीत देवदुर्लभ सत्कार.

उमरावतीचे दे.भ. डॉ. शिवाजीराव पटवर्धन व दे.भ. डॉ.भोजराज यांची शिवणी जेल मधून मुक्तता झाल्यानंतर, नागपूर मार्गे ते दि. १२ सप्टे. १९४५ रोजी उमरावतीत आले, उमरावती रेल्वे स्टेशनवर त्यांचे स्वागतासाठी प्रचंड लोकसमुदाय जमला होता. स्टेशनवर अनेक संस्थातर्फे त्यांना पुष्पहार घालण्यात येऊन त्यांचा सत्कार करण्यात आला होता. नंतर स्टेशनवरुन या दोन्ही पुढाऱ्यांची मोटारीतून प्रचंड मिरवणूक काढण्यात आली. मोटारीतून वीर वामनराव दादांच्या दोन बाजूला डॉ. पटवर्धन व डॉ. भोजराज हे उभे होते. मिरवणुकीचे आघाडीला श्री हनुमान व्यायाम प्र.मं. चा बॅण्ड होता. सर्वत्र तिरंगी झेंडे डौलाने फडकत होते, सर्व वातावरण सुभाष बाबूंच्या जयजयकाराने व काँग्रेसच्या घोषणांनी दुमदुमुन गेले होते.

स्टेशन पासून मिरवणुकीच्या रस्त्यांवर स्वागतार्थ सर्वत्र कमानी उभारल्या होत्या. स्टेशन जवळील कारोनेशन गार्डन जवळ बाबू सुभाषचंद्र बोस यांची भव्य प्रतिमा ठेवली होती. दुरुन पहाणाऱ्याला प्रत्यक्ष सुभाषबाबूच उभे आहेत असे वाटत

होते. ठिकठिकाणच्या कमानींवर सुभाषचंद्र बोस यांची छायाचित्रे प्रामुख्याने दिसत होती.

मिरवणूकीत सर्व वर्गाचे ,दर्जाचे व पंथाचे स्त्री पुरुष हजर होते. म्यु.शाळांना या आनंद प्रीत्यर्थ सुटी देण्यात आली होती.

खापर्डे वाड्याजवळ मिरवणूक येताच, विदर्भ प्रांतिक हिंदु सभेचे अध्यक्ष श्री.बाबासाहेब खापर्डे यांनी उभय नेत्यांना हार घालून त्यांना आलिंगन दिले. त्यावेळेचे दृष्य हदयस्पर्शी होते. बोधनकर वाड्यासमोरील कमानी जवळ मिरवणूक येताच कमानीतून त्यांचेवर आपोआप पुष्पदृष्टी झाली.अंबागेट जवळ मिरवणूक येताच दे.भ.आप्पाजी सुळे यांनी हार घातला.अंबागेट युवक मंडळ व लक्ष्मीकांत मंडळान अंबागेटवर गुढी उभारली होती. अंबागेटचे युवक मंडळ व लक्ष्मीकांत मंडळातर्फे कमानी उभारण्यात आल्या होत्या.व तोरणे लावली होती.अंबागेटचे आत सर्वत्र मंगलदायक रांगोळया काढण्यांत आल्या होत्या . संगेकर फ्रेम मेकर यांनी पुढाऱ्याच्या स्वागतार्थ गॅसच्या बत्त्या लावून रोषणी केली होती. बुधवारात वीरशैष युवक संघातर्फे व रॉयल क्लबतर्फे हार घालण्यात आले व उदयचे संपादक दे.भ.नानासाहेब बामणगांवकर यांनीही आपल्या घराजवळ बुधवारा टिळक चौकात या नेत्यांना सुताचे हार घातले होते. निळकंठेश्वर मंदिराजनळ मिरवणूक येताच , तेथे ठेवण्यांत आलेल्या गांधीजीचें प्रतिमेला पुढाऱ्यांनी वंदन केले आणि श्री.मोतीरामजी विजवे व श्री.रामभाऊअप्पा कोनलाडे यांनी पुढाऱ्यांचे स्वागत केले. सुवासिनींनी पंचारती ओवाळली. इतर अनेक ठिकाणीही पंचारती ओवाळण्यात आली होती. बजरंग क्लब तर्फेही कमान उभारली होती . तेथे पुढाऱ्यांचे पुष्पहार घालून स्वागत करण्यांत आले होते.

<u>पुढाऱ्यांचे रुपयाच्या व सुवर्णलंकाराच्या तोरणांनी स्वागत.</u>

सराफा बाजारातील दृष्य फारच प्रेक्षणीय होते. सराफांनी स्वयंस्फूर्तीने सोन्या चांदीच्या दाग दागिंन्यानी तोरणे उभारली होती. बर्तनबाजारातील व्यापाऱ्यांनी पितळीच्या भांड्याची तोरणे , किराणा बाजारात नारळाची तोरणे,फूल व फळवाल्यांनी आपापल्या परिने स्वागताची तयारी सुरु केली.

असे स्वागत उमरावतीचे इतिहासात आजपावेतो कोणाचे झाले नव्हते. सारी अंबानगरी उत्साहाने आणि जिव्हाळ्याने या दोन्ही नेत्यांचे स्वागताला जणू आतूर झाल्याचे दिसत होते. देवदुर्लभ सत्कार तो हाच. ठिकठिकाणी लोक आपापल्या घरांवरुन व माड्यावरून पुष्पवृष्टी करीत होते, मिरवणुकीचा हा अभूतपूर्व सोहळा पाहण्यासाठी, रस्त्यांच्या दोन्ही बाजूला , घरावर, झाडावर व माड्यांवर, तिथे तिथे लोकांचे थवे दिसत होते. आणि असा विशाल जनसागर या आंनदाने जणू बेहोष झाला होता. तब्बल अडीच तास चाललेली ही मिरवणूक जोग चौकात विसर्जित झाली होती.

रात्रीची विराट सभा :

त्याच दिवशी रात्री ९ वाजता नगर कमेटीतर्फे जोग चौकांत या पुढाऱ्यांच्या स्वागतार्थ विराट जनसभा दे.भ.वीर वामनराव दादांच्या अध्यक्षेखाली भरली.लोक समुदाय सुमारे दहा हजारापेक्षा जास्त असावा. डॉ.पटवर्धन व डॉ.भोजराज या दोधांनाही अनेक संस्थांतर्फे पुष्पहार घालण्यात आलेत. दोन्ही नेत्यांचा पुष्पहारांनी सत्कार केल्यानंतर त्यांच्या गुणगौरवपर अशी दे.भ.रघुनाथमलजी कोचर, वर्धाकॉमर्स कॉलेजचे प्राचार्य श्री.धाबलिया दे.भ.देशमुक दे.भ.संभाजीराव गोखले व दे.भ.सुदर्शन सिंघई वकील यांची भाषणे झाली. येथे नुकत्याच झालेल्या काँग्रेसच्या सभेत श्री.पंढरी पाटलांनी ब्राम्हणेतर चळवळ व कॉग्रेंसची चळवळ एकाच धर्तीवर आहे अशा आशयाचे उद्‌गार काढले होते. तसा थिल्लर प्रचार काँग्रेसच्या व्यासपीठावर यापुढे होणार नाही. अशी अपेक्षा श्री.सिंघई यांनी आपल्या भाषणात व्यक्त केली. त्यानंतर डॉ.पटवर्धन व डॉ.भोजराज यांनी स्वागताला उत्तर देणारी भाषणे झाली. रात्री १२ वाजेपर्यत्न स्वागत सभा चालू होती. शेवटी तीनच व्याक्यात आपण समारोप करणार आहो असे वीर वामनराव दादांनी सांगितले व पुढील
तीन वाक्ये उच्चारली.

१. आज पाच वर्षानी आम्ही व डॉ.पटवर्धन एकाच व्यासपीठावर आली आहोत.

२. पुन्हा पुन्हा येऊ अशी आशा आहे.

३.आशा आहे की,तशी सद्‌बुध्दी परमेश्वर देईल.

नगर काँग्रेसचे अध्यक्ष श्री.कोचरजी यांनी आभार मानल्यानंतर ही विराट सभा विसर्जितझाली.

१२) टांगेवाल्यांचा संप :-

उमरावती शहरातून किंग एडवर्ड कॉलेज पावेतो सुरु होणाऱ्या बस सर्व्हिसचे निषेधार्थ शहरातील टांगेवाल्यांनी दि.२४ सप्टेंबर १९४५ रोजी हरताळ पाळला व रात्री जोशी हॉलमध्ये जाहीर सभा होऊन निरनिराळ्या वक्त्यांची टांगेवाल्यांना पाठिंबा देणारी भाषणे झाली.

१३)आजाद हिंद सेनेला सहानुभूती दाखविण्यासाठी दि.३० सप्टेंबर १९४५ रोजी जोशी सभागृहात लोकपक्षाचे विद्यमाने जाहीर सभा भरली होती. दे.भ. नानासाहेब बामणगांवकर यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या हा प्रंचड जाहीर सभेत श्री.जोग वकील,श्री.बाळासाहेब मराठे,दे.भ.नानासाहेब गोखले,श्रीमंत अण्णासाहेब देशपांडे व श्री.अ.वा.नवाडे यांची भाषणे होऊन आजाद हिंद सेनेला सहनुभुती दाखविणारा ठराव मंजूर करण्यात आला.

आजाद हिंद सेना सप्ताह:-

दि.५ ते १२ नोव्हेंबर रोजी १९४५ पावेतो अखिल हिंदुस्तानात अत्यंत उत्साहाने आजाद हिंद सेना सप्ताह पाळला गेला. त्या निमित्त प्रंचड हरताळ झाले,अभूतपूर्व मिरवणूकी निघाल्या. बचाव समितीसाठी फंड गोळा झाले,नगर पंचायतीने ठराव करुन आपला पाठिंबा दिला.आणि अशा रीतीने या सैनिकांवरील चालू खटला मागे घेऊन , सर्वाची बिनशर्त सुटका करण्याची देशव्यापी मागणी जनतेने केली होती.

पं.नेहरुंचा वाढदिवस आणि आजाद हिंदसेना मुक्तता दिनाची जाहीर सभा :-

नगर काँग्रेस कमेटीच्या विद्यमाने दि.१५ नोव्हेंबर १९४५ रोजी पं. जवाहरलाल नेहरुंचा ५७ वा वाढदिवस आणि आजाद हिंद सेना मुक्तता दिना निमित्त ,दे.भ.रघुनथमलजी कोचर यांचे अध्यक्षतेखाली नेहरु मैदानावर जाहीर सभा होऊन, तीत नागपुरचे भाई रुईकर श्री.वखरे,दे.भ.एच.व्ही.कामत व दे.भ.नानासाहेब गोखले

यांची भाषणे झालीहोती. सभेत श्री.जी.एस.किरडे व श्री.छोटुमियॉ या दोन बंधमुक्त आजाद हिंद सैनिकांचा सत्कार करण्यांत आला. हे दोन्ही सैनिक जबलपूर तुरुंगातून नुकतेच सुटले होते. या सभेत आजाद हिंद सेना बचाव निधि एकूण ४०३ रु.७ आमे जमा झाला,शेवटी जय जयहिंदचे घोषात सभा समाप्त झाली.

आजाद हिंद सेना दिनानिमित्त उमरावतीत कड्कडीत हरताळ व प्रंचड मिरवणूकः-

आजाद हिंद सेना दिनानिमित्त उमरावतीत दि.२७ नोव्हेंबर १९४५ रोजी कडकडीत हरताळ पाळण्यात आला. सर्व बाजार पेठा व कॉटन मार्केट बंद होते. हरताळ इतका कडकडीत होता की,पानविडीची दुकाने व हॉटेल देखिल स्वयंस्फूतीने बंद होते.

परगांवाहून कॉटन मार्केट मध्ये आलेल्या सुमारे एक हजार कापुस गाड्या तशाच पडून होत्या. धर्मदाय कॉटन फंड कमेटीने या गाडीवाल्यांची मोफत जेवणाची सोय केली होती. सिनेमांनी आपसा पहिला खेळ बंद ठेऊन जनइच्छेत भाग घेतला होता.

विद्यांर्थ्याची मिरवणूक :-

त्याच दिवशी 'विद्यार्थी कॉग्रेंस ' चे वतीने आजाद हिंद सेना दिना निमित्त सर्व शाळा कॉलेजातून कडकडीत हरताळ पाडण्यात आला. मिरवणुकीत तिरंगी झेंडे व 'आजाद हिंद सेनाको छोड दो ' इत्यादी घोषणा होत होत्या. ही मिरवणूक शहरातील प्रमुख मार्गाने फिरुन जोग चौकात विसर्जन पावली व तेथेच विद्यार्थ्याची जंगी जाहीर सभा व भाषणे होऊन आजाद हिंद सेनेच्या सुटकेची मागणी व कलकत्ता, मुंबई, लाहोर,लखनौ इत्यादी ठिकाणी विद्यार्थ्यावर जो गोळीबार व लाठीमार करण्यात आला त्याबद्दल सरकारचा निषेध करणारे ठराव मंजूर करण्यात आले.

नागरिकांची प्रंचड मिरवणूकः-

सांयकाळी जोग चौकांतून देशगौरव बाबू सुभाषचंद्र यांच्या भव्य प्रतिमेसह नागरिकांची प्रंचड मिरवणूक निघाली, या मिरवणुकीत हिंदू मुलमान शीख इत्यादी सर्व धर्माचे लोक सामील झाले होत. आजाद हिंद सनेच्या सुटकेची मागणी करणारे व आजाद हिंद सेनेची घोषवाक्य लिहिलेले फलक व तिरंगी झेंडे मिरवणूकीबरोबर

डौलाने फडकत होते. शहरांतील मुख्य मार्गावरुन ही मिरवणूक फिरुन जोग चौकात आली व तिचे रुपांतर जाहीर सभेत झाले. जोग चौकातील या सभेला अपार जनसागर जमला होता. शहरातील सर्व वर्गातील व धर्माचे लोक सभेत दिसत होते. सुमारे १५ हजार जनसमुदाय हजर असावा. सुरुवातीला कु.सुशीला देशपांडे हिनेगायिलेल्या वंदे मारम् गीताने सभेला सुरुवात झाली. नगर कॉग्रेंस अध्यक्ष श्री.कोचरजी हे अध्यक्ष होते. सभेत दे.भ. पंजाबराव सदापुरे,दे.भ.रतनलाल काळे,श्री.पी.के.देशमुख ,श्री.बाळासाहेब मराठे ,श्री नानासाहेब गोखले,डॉ.शिवाजीराव पटवर्धन ,श्रीमती दुर्गाताई जोग आणि विदर्भ प्रांतिक कॉग्रेस कमेटीचे अध्यक्ष ना.ब्रिजलालजी बियाणी यांची भाषणे झाली. वक्त्यांनी आजाद हिंद सेनेची माहिती सांगून ,या शूर वीराचे केसालाही धक्का लागू नये असे सरकारला बजावले होते. सभेत बचावनिधीही गोळा करण्यात आला ही विराट सभा चलो दिल्ली या आजाद हिंद सेनेच्या रणगीताने व जयहिंदच्या घोषणांनी संपली.

१४) काँग्रेंस उमेदवाराचा विजय :-

मध्यवर्ती कायदेमंडळाच्या ,वऱ्हाड मधील मुसलमानेतर मतदार संघातून झालेल्या निवडणुकींत काँग्रेसचे उमेदवार,आकोल्याचे दे.भ.दादासाहेब गोळे निवडून आल्याचे दि.२९ नोव्हेंबर १९४५ रोजी उमरावतीच्या कमिश्नर कचेरीतून मत मोजणीनंतर जाहीर करण्यात आले होते. दे.भ.दादासाहेब बोके यांचे प्रतिस्पर्धी उमेदवार, हिंदुमहासभा पुरुस्कृत श्री.बापुराव देशमुख यांनी ऐनवेळी माघार घेतल्यामुळे मतदान नाममात्र झाले होते. अमरावतीतून शे.४० मतदान झाले होते.

१५) अमरावतीचा कायदेपंडीत हरवला :-

अमरावतीचे प्रख्यात कायदे पंडित श्री.सा.प्र.उर्फनानासाहेब हिरुरकर हे मुंबई हून नागपुर मेलने परत येत असताना बडनेराजवळ त्यांचा हदय विकाराने अकस्मात मृत्यू झाला. हे वर्तमान अमरावतीस कळताच येथून प्रमूख मंडळीनी बडनेरला जाऊन त्यांचे शव अमरावतीस आणले. स्मशानभूमीवरच दुखवटयाची सभा होऊन श्री.बाबासाहेब खापर्डे व रा.ब.खरे यांची हदयस्पर्शी भाषणे झाली. कै. नानासाहेब

यांच्या अकाली निधनाचे वृत्त ऐकून सर्व शहर दु:खी झाले. कोर्ट कचेऱ्या शाळा वगैरेंना ताबडतोब सुटी देण्यात आली. अंत्ययात्रेला शहरातील सर्व प्रमुख लोक हजर होते. श्री.ना.प्र.उर्फ नानासाहेब हिरुरकर हे कायद्यांतील अत्यंत निष्णात पंडित म्हणून नावाजलेले आणि नागपुर विद्यापीठच्या अस्तित्वापासूनच अव्याहतपणे,विद्यापिठांची निरनिराळ्या अंगाने ज्यांनी सेवा केली अशी पैकी एक होते. विदर्भ प्रा. कॉ. कमेटीत इ.स. १९३४ पर्यत काम करीत असत. बॅ. रामराव आणि नानासाहेब यांचा फार स्नेह होता. उमरावती नगरपालिकेचे उपाध्यक्ष होते कोणत्याही निवडणुकीचा प्रसंग येवो. कायद्याचे सल्लागार म्हणून नानासाहेब हिरुरकराकडे त्यांच्या प्रतिस्पर्ध्यालाही यावेच लागे. बेरार लॅन्ड रेव्हेन्यूवर त्यांनी उत्कृष्ट टीका लिहिली आहे. उमरावतीच्या बार रुमचे दोनदा अध्यक्ष होते. ते मार्मिक साहित्यिक व टीकाकारही होते.

१६) मध्यप्रांत वऱ्हाड शेतकरी संघाचे काँग्रेसमध्ये विलीनीकरण :

डॉ. भाऊसाहेब पंजाबराव देशमुखांचे नेतृत्वाखाली कार्य करणाऱ्या, मध्यप्रांत वऱ्हाड शेतकरी संघाचे दि. २४ नोव्हेंबर १९४५ चे सभेत "हिन्दी राष्ट्रीय सभेत विलीन होऊन काँग्रेस संघटनेमार्फत बहुजन समाजाच्या उध्दारा करिता झटण्याचा निर्णय घेण्यात आला होता. ही सभा उमरावती येथे श्री. चौबळ चांचे निवासस्थानी भरली होती.

१७) जिल्हा युध्द समितीचे विसर्जन :

युध्द संपल्यामुळे, जिल्हा युध्द समितीचे विसर्जन दि. १ डिसेंबर १९४५ रोजी करण्यात आले होते. सिव्हिल गार्ड या संघटनेचेही विसर्जन त्याच वेळी केले गेले. जिल्हा युध्द समितीची शेवटची बैठक भरुन तीत जिल्हाधिकारी श्री. कौल, कमिश्नर श्री. रहिम, समितीचे सदस्य खा. सा. मीर रियासत अली, रा.ब. खरे, श्री. व्हि. बी. चौबळ यांची भाषणे होऊन युध्द कामगिरी बद्दल सर्वांनी प्रशंसोद्गार काढले. रा.ब. शिदोरे यांनी आभार मानले.

१८) आजाद हिंद सरकार स्थापना दिन : उमरावतीत मिरवणूक व जाहीर सभा.

देशगौरव बाबू सुभाषचंद्र बोस यांनी २१ डिसेंबर १९४३ रोजी, आझाद हिंद सरकारची स्थापना केली होती. त्या स्थापनेच्या वार्षिकोत्सावानिमित्त दि. २१ डिसेंबर

१९४५ रोजी, अमरावती नगर काँग्रेस कमेटीच्या विद्यमाने, जोग चौकातून सुभाषबाबूंच्या लष्करी वेषातील भव्य प्रतिमेसह मिरवणूक काढण्यात आली होती व नंतर जोग चौकातच दे.भ.कोचर यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरुर डॉ.रतनलालजी काळे, श्री.राजाभाऊ बारलिंगे प्रभृतीची भाषणे झाली.

१९) महिलांनी साजरा केलेला आजाद हिंद सरकार स्थापना वार्षिकोत्सव.

जुन्या कोतवाली समोरील भव्य मैदानात भगिनी वर्गातर्फे आझाद हिंद सरकार स्थापना वार्षिकोत्सव दि. २१ डिसेंबर १९४५ रोजी सौ. पार्वतीबाई पटवर्धन यांचे अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला. सभेच्या जागी देश गौरव सुभाषचंद्र बोस आणि कॅ. लक्ष्मीबाई यांची छायाचित्रे छठेवण्यात आली होती.

सभेत सुभाषचंद्र बोस, कॅप्टन लक्ष्मी आणि आझाद हिंद सरकार या संबंधी माहिती देण्यात आली. सौ. पटवर्धन, सौ. गोखले, श्रीमती दुर्गाताई जोग यांची भाषणे झाली होती व येथे आलेल्या दे.भ.अच्युतराव पटवर्धनांच्या मातोश्री गंगूबाई पटवर्धन यांचे भगिनी वर्गाकडून पुष्पहार घालून स्वागत करण्यात आले होते.

१९) महात्मा येशुख्रिस्त पुण्यतिथी :

उमरावती तालुका कौमीकल्चर सोसायटी तर्फे ता. २५ डिसेंबर १९४५ रोजी सायंकाळी, जोशी सभागृहात श्री. रतनलालजी काळे यांच्या अध्यक्षतेखाली महात्मा येशूख्रिस्त यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली होती. त्यावेळी ख्रिस्त चरित्रावर डॉ. पटवर्धन, श्री.जोध वकील, श्री. सिंघई वकील, श्री. साखरे, डॉ. कुऱ्हाडे यांची भाषणे झाली.

२०) अमरावती नरखेड ब्रॉडगेजची मोजणी सुरु :

जी.आय.पी. रेल्वे कंपनीने उमरावती ते नरखेड ही ७९ मैलांची ब्रॉडगेज लाईन उभारण्याला रेल्वे बोर्डाने मान्यता दिल्याचे वृत्त दि. १ जानेवारी १९४६ रोजी वृत्तपत्रातून प्रसिध्द झाले आणि फेब्रुवारी १९४६ मध्ये या लाईनची मोजणी देखिल रेल्वे खात्याने सुरु केली होती. यापूर्वी या रेल्वे लाईनची मोजणी १९३१ मध्ये पूर्ण झाली होती. आणि मे. १९९५ मध्ये ह्या रेल्वेचे विद्युतीकरण झाल्यावर ही रेल्वे सुरु झाली.

२१) **आचार्य भन्साळी उमरावतीत :**

सेवाग्रामचे तत्कालीन प्रख्यात आचार्य भन्साळी यांचे अध्यक्षतेखाली येथील जैन समाजातर्फे डॉ. जोशी हॉलमध्ये भगवान महावीर जयंती उत्सव साजरा करण्यात आला. त्याप्रसंगी नगराध्यक्ष वीर वामनराव दादा व दे.भ.नानासाहेब गोखले, यांची भगवान महावीरांचे जीवनावर व्याख्याने झाली होती.

श्री. आचार्य भणसाळी गुजराथ विद्यापीठात इंग्रजीचे प्रोफेसर होते. १९३२ मध्ये गांधीजी जेलमध्ये गेल्यानंतर यंग इंडिया पत्राचे मुद्रक झाले आणि नंतर यंग इंडियाचे तत्कालीन संपादक श्री. शेख कुरेशी यांचे सोबत त्यांना दीड वर्षाची शिक्षा झाली. त्यानंतर त्यांचे जीवनच बदलले. जेलमध्ये असतानाच त्यांना ईश्वरदर्शनाची तीव्र आकांक्षा निर्माण झाली आणि कारावासातून मुक्त होताच त्यांनी आश्रमात प्रथम सात दिवस नंतर एकवीस, बेचाळीस व चौपन दिवस उपवास केला. आणि ही साधना पूर्ण होताच त्यांनी सर्व कपडयांचा त्याग करुन निव्वळ लंगोटी लावून व हातात तुंबडी घेऊन हिमालयाकडे पदयात्रा काढली त्यावेळी त्यांनी आपले तोंड तांब्यांच्या ताराने शिवून घेतले होते. अशी तपश्चर्या त्यांनी त्या काळात केली. नंतर सेवाग्रामला गांधीजीशी भेट झाल्यावर त्यांनी तेथेच राहून सेवाव्रत चालू ठेवले.

आचार्य जयकृष्ण भणसाळी मुंबई युनिव्हर्सिटीचे स्नातक होते परंतु एम.ए. चे शिक्षण सोडून ते असहयोग आंदोलनाचे काळात गोधीजीकडे आलेत. कै. श्यामजी कृष्ण वर्मा हे त्यांचे मामा होते. भणसाळीजी युरोपला गेले होते.

अनेक वर्ष भणसाळीजींनी मौनव्रत धारण केले होते. पाण्यात पीठ कालवून घ्यावे आणि निंबाची पाने खावीत असा त्यांचा आहार होता.

१९४२ च्या आंदोलनाचे काळात चिमुरच्या महिलांवर सैनिकांनी व शिपायांनी जे अमानुष अत्याचार केलेत त्यावेळी भणसाळीजींनी ६३ दिवसाचे उपोषण केले होते. व शेवटी सरकारला या अत्याचाराची चौकशी करावी लागली. नंतर पुढे नागपूर निकटच्या टाकळी येथे त्यांनी आपली आदिवासीची सेवा चालू केली. टाकळीला भणसाळी आश्रम चालू आहे.

२२) मध्यप्रांत वऱ्हाड शिक्षण परिषदेचे अमरावती अधिवेशन :

पुण्याचे सुप्रसिध्द शिक्षणतज्ञ डॉ. गजानन श्रीपाद खेर यांच्या अध्यक्षतेखाली उमरावती येथे दि. ४, ५, व ६ मे १९४५ रोजी मध्यप्रांत वऱ्हाड शिक्षण परिषदेचे ११ वे अधिवेशन भरले होते. स्वागताध्यक्ष श्री. बाबासाहेब खापर्डे हे असून यानिमित्त भरलेल्या शैक्षणिक प्रदर्शनाचे उद्घाटन वीर वामनराव दादा यांचे हस्ते झाले होते.

२३) १० मे चा स्वातंत्र्यदिन :

अखिल भारतीय हिंदु महासभेच्या आदेशानुसार स्थानिक हिंदुसभेच्या विद्यमाने दि. १० मे १९४५ रोजी सायंकाळी ६ वाजता बाबाराव खापर्डे यांचे निवासस्थानी स्वातंत्र्य दिनानिमित्त अमरावतीतील निमंत्रित स्त्री-पुरुषांची सभा झाली. सभेचे अध्यक्षस्थानी श्री. नानासाहेब बामणगांवकर हे होते. १८५७ साली जे युध्द स्वातंत्र्यकार्य चालू झाले ते, हिंदुसभेच्या तत्वानुसार चालू ठेवण्याचे वचन आम्ही देत आहोत. अशा आशयाचा ठराव सभेत सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

२४) महायुध्दाचा उमरावतीतील "विजय दिन" :

दि. १ मे १९४५ रोजी जर्मन सैन्याने रशियाचे लाल सैन्यापुढे संपूर्ण शरणागती पत्करल्यामुळे युरोपातील दुसऱ्या महायुध्दाचा जवळ जवळ शेवट झाला. दोस्त राष्ट्र विजयी झाले. त्या विजयाचा उत्सव हिंदुस्थानात सरकारीरीत्या दि. १४ मे १९४५ रोजी साजरा करण्यात आला. उमरावती येथे हा "विजय दिन" विविध कार्यक्रमानिशी साजरा झाला.

सकाळी (नेहरु मैदानावर) परेड झाली. त्यावेळी कमिश्नर साहेबांनी सलामी घेतली. नंतर राष्ट्रीय युध्द आघाडी तर्फे म्यु.ए.व्ही. स्कूल मध्ये सभा झाली. दुपारी सर्व सिनेमा गृहात मोफत सिनेमा दाखविण्यात आला. सायंकाळी कॉटन मार्केटचे पटांगणात गरिबांना अन्नदान करण्यात आले व रात्री बंजारा नृत्य आणि गायनाचा कार्यक्रम झाला.

२५) उमरावतीची "स्वातंत्र्यवीर सावरकर" जयंती :

हिंदु जगताचे विश्वविख्यात महान नेते स्वातंत्र्यवीर डॉ. तात्याराव सावरकर यांचा जयंती उत्सव अमरावती येथे त्यांच्या अनुयायांनी व चाहत्यांनी विविध कार्यक्रमासह दि. २८ मे १९४५ रोजी साजरा केला.

सकाळी श्री जगदंबादेवीला श्री. त्र्यंबकशास्त्री पाठक यांच्या हस्ते अभिषेक करविण्यात आला. नंतर स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा परिचय करुन देणाऱ्या पुस्तिका वाटण्यात आल्या.

सायंकाळी खापर्डेवाडयात चिरागंण, मंगल वाद्यवादन, भगिनींसाठी हळदीकुंकू इत्यादी कार्यक्रमानंतर रात्री ८ वाजता सभा झाली होती. सभेच्या अग्रभागी सावरकरांचे पुष्पमालांकित छयाचित्र ठेवण्यात आले होते. भगिनींनी स्वातंत्र्यवीरांच्या छायाचित्रास ओवाळल्यानंतर सभेच्या कामास सुरुवात झाली.

सभेचे अध्यक्षस्थान मध्यप्रांत वऱ्हाड सरकारचे माजी कॉंग्रेस मंत्री दे.भ. नानासाहेब गोखले यांनी मंडीत केले होते. विदर्भ प्रा. हिंदुसभेचे कार्यवाह श्री. अ.वा. नवाडे यांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांचे अभिनंदन व अभिष्ट चिंतणारा ठराव मांडला, त्यास श्री. नानाराव भवाळकर यांनी अनुमोदन दिले. अध्यक्ष श्री. नानासाहेब गोखले, त्यागवीर नानाराव भट व नागपुरचे साहित्याचार्य बाळशास्त्री हरदास यांची स्वातंत्र्यवीरांच्या गुणगौरवपर माहितीपूर्ण व भावनोत्कट अशी सुश्राव्य व्याख्याने झाली होती. ठराव सर्वानुमते संमत करण्यात आला.

२६) <u>उमरावती बडनेरा रेल्वे मार्गावर पॅसेंजर वाहतुक बंद करण्याचे जी.आय.पी. रेल्वेचे फसलेले कारस्थान</u> :

रेल्वे रोड को-ऑडिनेशन योजनेचे नावाखाली इ.स.१९४५ मध्ये ग्रेट इंडियन पेनिन्शुला (जी.आय.आर.पी) रेल्वे कंपनीने, उमरावती-बडनेरा रेल्वे मार्गाने उतारुची वाहतूक बंद करण्याचे एक कारस्थान रचले होते. हे कारस्थान यशस्वी झाले असते तर,उमरावती शहर कदाचित नेहमी करिता रेल्वे मार्गापासून बाजूला पडले असते. परंतु जी.आय.आर. पी. चा हा प्रयत्न फसला, आणि उमरावती शहर ब्रेंच लाईनने कां हाईना, पण अद्याप रेल्वे मार्गाशी जोडलेले आहे. वरील योजनेनुसार जी.आय.पी.रेल्वे कंपनी इ.स.१९४५ साली मेसर्स एफ.एम.चिर्नाय ॲन्ड ली.या बस कंपनीला अमरावती ते बडनेरा सर्व्हिस सुरु करण्याचा ठेका दिला त्यानुसार सदर कंपनीच्या बसेस रेल्वे आवारांतून दि.६ जून १९४५ पासून चालू झाल्या होत्या. या बस सर्व्हिसचे उद्घाटन

सोहळा दि.६ जून १९४५ रोजी सांयकाळी रेल्वेचे आवारात उभारलेल्या शामियान्यांत पार पडला.त्यावेळी जी.आय.पी.रेल्वेचे जनरल मॅनेजर लेप्टनंट कर्नल मि.इमसन यांनी बस सर्व्हिसचे उद्घाटन करताना असे स्पष्ट सांगितले होते की, प्रातिक सरकार व विश्वासू वाहतूक कंपन्या यांच्या भागीदारीत,सडकांवरील वाहतूक धंद्यात शिरण्याचा रेल्वेचा इरादा आहे. जी.आर.पी.रेल्वे त्यादृष्टीने आज उमरावती बडनेरा दरम्यान उतारूंची वाहतूक योग्य तऱ्हेने करु शकते.याबद्दल एकदा आमची खात्री झाली की, अमरावती-बडनेरा ब्रेंच लाईन वर पॅसेंजर गाडी बंद करण्यात येईल. माल व पार्सल पूर्वी प्रमाणे चालू राहील. आणि टपाल वाहतुकीची शक्य ती चांगली व्यवस्था होईल. इतर ठिकाणीही तेथे रेल्वेवर उतारुचा बोजा पडतो त्या सर्व ठिकाणी आम्ही अशा बस वाहतूक योग्य कालावधीत सुरु करु'' परंतु ह्या,रेल्वेची,ब्रेंच लाईन बंद करण्याचे जी.आय.आर. पी. च्या कारस्थानात उमरावतीच्या जनतेले विरोध केला होता. अमरावती-बडनेरा लोकल ट्रेन्स बंद झाल्यास अमरावती व बडनेरा या दोन्ही ठिकाणच्या नागरिकांची फार मोठी गैरसोय होणार असल्याने नागरिकात रेल्वेचे या निर्णया विरुध्द असंतोष व्यक्त होऊ लागला.या असंतोषाचा पहिला स्फोट अमरावती नगरपालिकेत सभेत होऊन 'अमरावती बडनेरा रेल्वे पॅसेजर वाहतूक बंद करु नये. 'अशा आशयाचा एक ठराव एकमताने मंजूर करण्यांत येऊन तो रेल्वे अधिकाऱ्याकडे पाठविण्यात आला परंतु रेल्वेने त्याकडे दुर्लक्ष करुन दि.२३ जुलै १९४५ पासून या लोह मार्गावरील लोकल ट्रेन्स बंद केल्या. त्यामुळे जनतेचा असंतोष तीव्र होऊन, त्याला आंदोलनाचे स्वरुप येऊ लागले.दि.५डिसेंबर १९४५ रोजी अमरावती येथील जोग चौकात नगराध्यक्ष दे.भ.वीर वामनराव जोशी यांच्या अध्यतेखाली नागरिकांची जाहीर सभा भरुन तीत 'अमरावती-बडनेरा पॅसेजंर गाड्या बंद करु नयेत' अशी मागणी करणारा ठराव मंजूर करण्यात येऊन,संबंधित अधिकाऱ्यांकडे एक शिष्ट मंडळ पाठविण्याचे ठरविण्यात आले. या शिष्ट मंडळात नगराध्यक्ष वीर वामनराव जोशी,दे.भ.नानासाहेब बामणगांवकर ,संपादक उदय, ॲडव्होकेट श्रीकृष्णदास लड्ढा, ॲड .नरसिंहदास अग्रवाल दे.भ.ठाकूर वकील, ॲड.जी.एन.खरे व ॲड .रावबहादुर शिदोरे यांची निवड करण्यांत आली होती.

या सभेत सर्वश्री लड्ढा वकील, आचार्य त्र्यंबक गुरुजी, सिंघई वकील, दे.भ.बामणकगांवकर, के.डी.देशपांडे, दे.भ.देविदासपंत महाजन सराफ, दे.भ.जयकृष्णपंत कुऱ्हाडे व माजीमंत्री, दे.भ. नानासाहेब गोखले वकील यांची भाषणे झाली.

या प्रमाणे अमरावतीतील सर्व क्षेत्रातील वजनदार लोक या रेल्वे निर्णया विरुध्द च्या आंदोलनाच्या पाठीशी उभे राहिले.

नंतर 'बडनेरा-अमरावती' लोकल ट्रेन्स बंद करण्याच्या रेल्वे कंपणीच्या निर्णया विरुध्द दि.१४ डिसेंबर १९४५ रोजी अमरावती शहरात कडकडीत हरताळ पाळण्याचे आवाहन सर्वपक्षीय नागरिक मंडळाने केले होते.

त्या प्रमाणे १४ डिसेंबर रोजी अमरावती शहरात कडकडीत हरताळ पाळण्यांत आला. सर्व हिंदु-मुस्लिमांनाची दुकाने बंद होती. सायंकाळी नेहरु मैदानापासून एक प्रचंड मिरवणूक निघाली. मिरवणूकीत ''रेल्वे बंद करु नका''. ''एकको माल-लाखो के हाल'' अशा घोषणा मिरवणूकीत होत होत्या. फलक आणि काळी निशाणेही मिरवणुकीत होते. ही मिरवणूक शहराच्या प्रमुख मार्गाने फिरत जोग चौकात आली व तेथे दे. भ. नानासाहेब बामणगावकर यांच्या अध्यक्षतेखाली सभा झाली.

या सभेत सर्वश्री अग्रवाल वकील, व्हि.डी. ब्रम्ह वकील, चौबळ वकील, जोग वकील, के.डी. देशपांडे, दे.भ. नानासाहेब गोखले, वकील मोहनभाई, गंगाबिसनजी सिकची, जवाहरलाल मुणोत आणि आमदार ब्रजलाल बियाणी यांची भाषणे झाली.

ॲड.चौबळ, ॲड.अग्रवाल आणि ॲड. जोग यांनी आपल्या भाषणातून हा निर्णय बदलून घेण्यासाठी प्रसंगी सत्याग्रह 'करु अशी घोषणा केली'. या प्रमाणे रेल्वे निर्णयाविरुध्दच्या आंदोलनाला धार येऊ लागली.

जनतेच्या विरोधाला न जुमानता रेल्वे कंपनीने रेल्वे गाड्या बंद केल्या. त्यामुळे उत्पन्न झालेल्या गंभीर परिस्थितीचा विचार करण्याकरिता आणि रेल्वे गाडी पूर्ववत चालू व्हावी यासाठी अमरावतीतील सर्व पक्षोपपक्ष व स्थानिक संस्था या सर्वांची ''संयुक्त परिषद'' अमरावतीच्या वऱ्हाड सहकारी संस्थेच्या सभागृहात सर मोरोपंत

जोशी यांच्या अध्यक्षतेखाली दि. २८ नोव्हेबर १९४५ रोजी दुपारी ३ वाजता भरविण्यात आली. परिषदेला सर्व प्रमुख राजकीय पक्षांचे, धर्माचे व निरनिराळया २०० संस्थांचे प्रतिनिधी हजर होते.

परिषदेचे संयोजक ॲड.नरसिंहदास अग्रवाल यांनी पॅसेजंर ट्रेन बंद केल्यामुळे उतारुचे काय हाल होत आहेत. याचे सोदाहरण विवेचन केले व त्यानंतर ॲड.वि.दा.ब्रम्ह यांनी परिषदे समोर महत्वाचा ठराव मांडला. ''अमरावती बडनेरा रेल्वे पूर्ववत चालू व्हावी'' अशी या ठरावात मागणी होती व सरकारला इशारा देण्यात आला होता. या ठरावावर अनेक वक्त्यांची भाषणे होऊन तो मंजूर झाला व त्या नंतर ''कौन्सील ऑफ ॲक्शन'' निवडण्याचा ठराव श्री. जोध वकील यांनी मांडला तोही मंजूर झाला. त्यानुसार अध्यक्ष सर मोरोपंत जोशी, उपाध्यक्ष वीर वामनराव दादा, रावबहादूर खरे, ॲड.दे.भ. ठाकूर वकील, व ॲड.आण्पासाहेब ब्रम्ह, या शिवाय बरेच सदस्य यावर घेण्यात आले होते. या परिषदेत वक्त्यांनी जरुरी पडले तर यासाठी सत्याग्रह करु असे जाहीर केले.

इकडे हा जन असंतोष उग्र आंदोलनाचे स्वरुप धारण करु लागला तर तिकडे मध्यवर्ती कायदे मंडळात, वऱ्हाडचे सभासद श्री. दादासाहेब गोळे यांनी ह्या प्रश्नाला वाचा फोडली. त्यांनी तेथे हा प्रश्न उपस्थित केला. परंतु अध्यक्षांनी तेथे हा स्थानिक प्रश्न ठरवून त्याचे चर्चेस परवानगी दिली नाही.

म्हणून दि.६ फेब्रुवारी १९४६ रोजी अमरावती येथे सर मोरोपंत जोशी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या ॲक्शन कमेटीचे बैठकीत ''लोकल ट्रेन्स'' सुरु व्हाव्यात म्हणून सत्याग्रह सुरु करण्याचा व त्यासोबतच रेल्वे विरुध्द दिवाणी दावा करण्याचा निर्णय घेण्यात येऊन सत्याग्रहींची नोंदणी सुरु झाली. शिवाय हरताळ पाळावा असेही ठरविण्यात आले. या सत्याग्रहासाठी प्रथम खाली लोकांनी आपली नावे नोंदविली होती.

सर्वश्री ॲड. वि.दा. ब्रम्ह, ॲड. व्हि.बी. चौबळ,ॲड. एम.एस.अग्रवाल, ॲड. टी.एस. ठाकूर, ॲड.के.जी. जोध, ॲड.श्रीकृष्णदास लढ्ढा, ॲड. एन.टी. पांडे.

परंतु सत्याग्रह सुरु होण्यापूर्वीच सनदशीर मार्गाने चालविलेल्या या आंदोलनाला यश येऊन, जी.आय.पी. कंपनीने दि.१ मार्च १९४६ पासून पूर्ववत अमरावती-बडनेरा लोकल ट्रेन्स सुरु करण्याची घोषणा केली. त्यामुळे जनतेस आनंद झाला.

त्याप्रमाणे दि. १ मार्च १९४६ रोजी अमरावती रेल्वे स्टेशन वरुन सकाळी पहिली लोकल ट्रेन बडनेऱ्यासाठी निघाली. तेव्हा स्टेशनवर ॲक्शन कमेटीचे सदस्य हजर होते. त्यांनी रेल्वे इंजीनला हार घातले व आनंद व्यक्त केला. त्या प्रसंगी घेतलेला फोटो उपलब्ध आहे.

याप्रमाणे अमरावतीत चाललेल्या या अल्पकालीन आंदोलनात अमरावतीच्या जनतेने यश संपादन केले.

जी.आय.पी. रेल्वे कंपनीचे हे कारस्थान वर म्हटल्याप्रमाणे फसले. त्या नंतरच्या देशात घडलेल्या घडामोडीमुळे शेवठी या ग्रेट इंडियन पेनिनशुला रेल्वे कंपनीला आपले चंबुगपाळे भारतातुन उचलावे लागले आणि देशातील सर्व रेल्वे मार्ग व रेल्वे संपत्ती भारत सरकारच्या मालकीची झाली.

२७) <u>राजबंदी मुक्त करा</u> : <u>नगरपालिकेचा ठराव</u> :

उमरावतीचे लोकप्रिय पुढारी डॉ. पटवर्धन, डॉ. भोजराज, श्री. राजाभाऊ बारलिंगे, श्री. पी.के. देशमुख व श्री. शरश्चंद्र मालपाणी या स्थानबध्दांची ताबडतोब सुटका व्हावी अशी सरकारला विनंती करणारा ठराव उमरावती नगरपालिकेच्या दि. १० जुलैच्या सभेत मंजुर केला होतो.

२८) <u>राष्ट्रपती मौलाना आजाद यांचे बडनेरा स्टेशनवर स्वागत</u> :

जुन १९४५ च्या तिसऱ्या आठावडयात काँग्रेसच्या वर्कींग कमेटीच्या सभासदांची जेल मधून सुटका झाल्यानंतर, लगेच मुंबईला कॉ. वर्कींग कमेटीची बैठक भरली. या बैठकीला राष्ट्रपती मौ. आजाद हे कलकत्ता मुंबई मेलने दि. २१ जून रोजी जात असता बडनेरा रेल्वे स्टेशनवर उमरावतीचे नगराध्यक्ष वीर वामनराव दादा, बडनेरचे नगराध्यक्ष डॉ. दिवानजी, दे.भ. रघुनाथमलजी कोचर, दे.भ. मोतिसा काळे, इतर काँग्रेस कार्यकर्ते, कम्युनिस्ट व किसान कार्यकर्ते, उमरावतीच्या सराफ बाजाराचे प्रमुख नागरिक आणि इतर जनतेने त्यांचे उत्साहपूर्वक स्वागत केले.

२९) वेव्हेल योजना संयुक्त पणे स्विकारा. विदर्भ किसान सभा व कम्युनिस्ट पार्टीची जाहीर सभा :

विदर्भ प्रांतिक किसान सभा व कम्युनिस्ट पार्टीची जाहीर सभा :

विदर्भ प्रांतिक किसान सभा व कम्युनिस्ट पार्टीतर्फे 'वेव्हेल योजना व हिंदुस्थानचे भवितव्य' या विषयावर दि.३ जुलै १९४५ रोजी डॉ.जोशी सभागृहात दे.भ.आचार्य त्र्यबंक गुरुजी यांच्या अध्यतेखाली जाहीर सभा घेण्यत आली होती.

सभेत भाई सुदाम देशमुख ,भाई सुमेरसिंह नाहाटे ,डब्ल्यु एन.देशपांडे ,बाबाराव मुळे व श्री माधवराव देशपांडे यांची व्याख्याने झाली .

व्याख्यात्यांनी वेव्हेल योजना कॉग्रेस व लीगने एकत्र येऊन स्वीकारली पाहीजे.लीगला वगळून कोणतीही सत्ता घेण्यात नेहमी करता हिंदु -मुस्लीम प्रश्न कठीण होईल. उलट लीगनेही कॉग्रेंसचे राष्ट्रीय स्थान व प्रतिनिधिक स्वरुप याला हीनत्व आणणारे कृत्य करण्यासाठी दुराग्रह व अडेल तट्टूपणाचे धोरण स्वीकारु नये,असे सांगितले होते.

३०) प्रांताध्यक्ष ना. बियायणीचे शानदार स्वागत:

विर्दभ प्रांतिक कॉग्रेंस कमेटीचे अध्यक्ष ना.दे.भ.बिजलालजी बियाणी हे दि.२८ जुलै १९४५ रोजी दुपारी, जिल्हा कॉग्रेस कमेटीचे अध्यक्ष डॉ. गोपाळराव खेडकर यांच्यासह उमरावतीस आले होते.उमरावती व बडनेरा रेल्वे स्टेशनवर त्यांचे कॉग्रेसजनानी स्वागत केले.

सायकांळी ५.० वाजता श्री.टॉकीजमध्ये ,उमरावती नगर व जिल्हा कॉग्रेस कार्यकर्त्यांचे सोबत ना. बियाणी यांचे स्वागताचा समारंभ दे.भ.वीर वामनराव दादा यांचे अध्यक्षतेखाली थाटाने पार पडला.

व्यासपीठावर विराजमान होताच ना.बियाणींनी वीर वामवराव दादांना पुष्पहार घालून, त्यांच्या विषयी वाटत असलेला आदर व्यक्त केला.

नंतर निरनिराळ्या अनेक संस्थांतर्फे व कॉग्रेस संस्थेतर्फे ना. ब्रिजलालजी बियाणी , दे.भ.गोपाळराव खेडकर आणि नुकतेच बंधमुक्त झालेले दे.भ.पी.के.देशमुख

यांना पुष्पमाला अर्पण करण्यात येऊन त्यांचा सन्मान करण्यांत आला. श्री.गोपीना व शास्त्री बुलेट यांनी ना.बियाणी यांच्या सुटकेबद्दल आनंद व्यक्त करणारे गीत म्हटले. त्यानंतर दे.भ.पी.के .देशमुख डॉ.खेडेकर यांची भाषणे होऊन, श्री.बियाणीचे सत्काराला उत्तरादाखल भाषण झाले व आभार प्रदर्शन होऊन हा शानदार स्वागत सभारंभ संपला.

ना.दे.भ.ब्रिजलाल बियाणींचे जाहीर भाषण :

दि. २९ जुलै १९४५ रोजी सायंकाळी सभागृहात दे.भ. वीर वामनराव दादा यांच्या अध्यक्षतेखाली टिळक समाहात ना. ब्रिजलालजी बियाणी यांचे प्रचंड जनसमुदाया समोर जाहीर भाषण झाले.

नगरपालिकेचे मानपत्र : येथील मुक्कामात दे.भ. ब्रिजलालजी बियाणी यांना उमरावती नगरपालिकेने मानपत्र देऊन त्यांचा गौरव केला. इतर व्यापारी संस्थातर्फेही त्यांचा सन्मान करण्यात आला होता. पुरोगामी गट वाल्यांना सोडा अशा आशयाचे पत्रकही ना. बियाणींनी काढले होते.

३१) प्रांताचे गव्हर्नर ना. बोर्न उमरावतीस :

मध्यप्रांत वऱ्हाडचे हंगामी गर्व्हनर ना. बोर्न दि. ८ ऑगस्ट १९४५ रोजी उमरावतीला आले होते. वऱ्हाडचे कमिश्नर श्री. रोहन यांनी त्यांचे रेल्वे स्टेशनवर स्वागत केले . गव्हर्नरांचे आगमनासाठी अमरावती रेल्वे स्टेशन उत्तम प्रकारे श्रृंगारण्यात आले होते.

निरनिराळया संस्थांना भेटी दिल्यानंतर ना. गर्व्हनर हे युध्द समिती या सभेला उपस्थित झाले. सर मोरोपंत जोशी यांचे अध्यक्षतेखाली भरलेल्या या युध्द किमतीचे सभेत वऱ्हाडने आतापावेतो केलेल्या युध्द मदतीचा अहवाल सांगण्यात आला. त्यानुसार दुसऱ्या महायुध्दाचे काळात वऱ्हाडने युध्द ठेवीला ८ कोटी २९ लक्ष २५ हजार ४८४ रुपये ५ आणे १० पैसे च संरक्षण बचत मोहिमेला २९६४ टक्निशियन रिक्रुट्स व १५३२३ नॉन टेक्निशियन रिक्रुट्स भरती केले होते.

विविध वक्त्यांची सभेत भाषणे झाल्यानंतर ना. गर्व्हनर यांनी वऱ्हाडचे प्रशंसनीय युध्दकार्याचा गौरव करुन "विसरा आणि क्षमा करा व अधिक चांगल्या गोष्टीसाठी एकत्र या" असा संदेश सभेत दिला.

३२) <u>स्त्रियांचा ''ऑगस्ट सप्ताह'' : वीर वामनराव दादांचे प्रवचन</u> :

दि.११ ऑगष्ट रोजी डॉ. जोशी सभागृहात स्त्रियांची ''ऑगष्ट समाहानिमित्त खाजगी सभा झाली व या सभेत दे.भ. वीर वामनराव दादाचे '' कर्मयोग'' या विषयावर प्रवचन झाले. प्रवचनानंतर या सभेत पुढील ठराव मंजूर झाला.

१९४२ साली राजकारणाकरता शिक्षा झालेल्या अनेक देशभक्त स्त्रियांना सोडण्यात येऊन बरेच दिवस झाले. त्या वेळच्या मोड-तोडीच्या आरोपाखाली सात सर्षाची शिक्षा झालेल्या शूर भगिनी ठाकुराणी सुमित्रादेवी गोंड या अद्याप उमरावती तुरुंगात शिक्षा भोगीत आहे. त्यांचे पती ठाकूर विष्णूकिंग गोंड यांची फाशीची शिक्षा कमी होऊन ते जन्मठेपेची शिक्षा नागपूर जेलमध्ये भोगीत आहेत. दोघेही पती-पत्नी अशा तऱ्हेने तुरुंगवासात असताना त्यांची मुलेबाळे पोरकी झाली आहेत व घरादाराची वाताहत झाली आहे. तरी भोगलेली तीन वर्षाची शिक्षा वजा करुन सरकारने आतातरी ह्या शूर भगिनीला मुक्त करावे अशी आग्रहाची मागणी आहे.

हा ठराव सौ. पार्वतीबाई पटवर्धन यांनी मांडला होता व श्रीमती शांताबाई जोग यांनी त्यास अनुमोदन दिले होते. ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

त्यानंतर दुसऱ्या ठरावाने १९४२ च्या शहिदांना श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

३३) <u>जागतिक महायुध्दाची समाप्ती : उमरावतीत ''विजय दिनाचा'' सोहळा</u> :

दि. १५ ऑगष्ट १९४५ रोजी जापानने शरणागती पत्करली. आणि दुसऱ्या जागतिक महायुध्दाची समाप्ती झाली. (दि.१ मे रोजी फक्त युरोपातील युध्द संपले होते पण आशियातील युध्द चालू होत.) या विजया निमित्त हिंदुस्तान सरकारने दि. १६ व १७ ऑगष्ट १९४५ रोजी संपूर्ण देशात सुटी जाहीर केली व ''विजय दिनाचे समारंभ दि. १५ ऑगष्ट रोजी साजरे करण्यात आलेत. दि. १७ ऑगष्ट रोजी उमरावतीतही ''विजय दिन'' साजरा करण्यात आला होता. त्यानिमित्त फुटबॉल मॅचेस, गोरगरिबांना भोजन व सैनिकांचे कुटूंबियांना अन्नदान, सर्व सिनेमा मोफत, दाखविण्यात आले होते. रात्री कॉटन मार्केट मध्ये सर मोरोपंत जोशी यांच्या अध्यक्षतेखाली नागरिकांची सभा आणि रात्री गायनाचा कार्यक्रम, अशा रीतीने हा विजय दिन उमरावतीत साजरा झाला. युध्द

संपल्यामुळे सर्व जनतेला हायसे वाटले.

दुसरे जागतिक महायुध्द : दि. ३ सप्टेंबर १९३९ रोजी सुरु झाले होते व या युध्दाचा शेवट दि. २ सप्टेंबर १९४५ रोजी झाला.

मानवी इतिहासातील सर्वात रक्तरंजित व संहारक अशा या युध्दात पाच कोटी पेक्षा अधिक लोक मरण पावले. त्यातील २ कोटी ७० लक्ष लोक युध्दभूमीवर ठार झाले. जगातील लोकसंख्यपैकी ८० टक्के लोक रहात असलेली एकसष्ट राष्ट्रे या युध्दात गुरफटली गेली होती. ब्रिटीश सैन्यात २५ लक्ष हिंदी सैनिक होते.

३४) <u>देशगौरव सुभाषचंद्र बोस यांचे निधनानिमित्त उमरावतीत हरताळ व सभा</u> :

देश गौरव व नेताजी सुभाषचंदद्र बोस हे एका विमान अपघातात निधन पावल्याचे धक्कादायक वृत्त दि. १८ ऑगष्टला ऐकून प्रत्येक भारतवासी हळहळला. या बातमीवर सुरवातीला कोणी विश्वासच ठेवि ना. परंतु दुसरे कोणतेच वृत्त न मिळाल्याने, सर्व देशभर त्यांचा निधन दिन पाळण्यात आला होता.

दि. २४ ऑगष्ट १९४५ रोजी बाबू सुभाषचंद्र बोस यांचे निधनानिमित्त उमरावतीत हरताळ पाळण्यात आला होता. विद्यार्थी वर्गाने हरताळात भाग घेतला. नगरपालिकेची कचेरी बंद ठेवण्यात आली.

रात्री नगर काँग्रेस कमेटीचे गच्चीवर दे.भ. रतनलालजी अण्णासाहेब देशमुख, दे.भ. बाळासाहेब मराठे, सौ. पार्वताबाई पटवर्धन व दे.भ. नानासाहेब गोखले यांची भाषणे झाली.

<u>देशगौरव नेताजी सुभाषचंद्र बोस हेच स्वातंत्र्याचे खरे हक्कदार</u> :

महायुध्दाच्या ऐन कहरात त्यांनी भारताच्या आग्नेय सीमेवर सिंगापूर येथे ता. २१ डिसेंबर १९४३ रोजी ज्यावेळी आझाद हिंद सरकार स्थापन करुन, त्याची फौज दोस्तांच्या फौजेशी सामना देण्यासाठी रणागणांवर आणून उभी केली. त्याच दिवशी ब्रिटीश साम्राज्यसत्तेच्या गर्भावर प्राणांतिक आघात होऊन गेला. १८५७ च्या बंडाने जशी ईस्ट इंडिया कंपनीची इतिश्री केली, तशीच आझाद हिंद सरकारने हिंदुस्थानातील ब्रिटीश साम्राज्यशाहीचाही. म्हणूनच युध्दकाळातील ब्रिटीश इन्टलिजन्स ऑफिसर

श्री. व्ही.यु. टोपे यांनी आपल्या ''सुभाषचंद्र बोस दि स्प्रिनिंग टायगर'' या पुस्तकात असे विधान कलेले आहे की, ''आजाद हिंद फौजेने हिंदुस्थनातील ब्रिटीश राज्याचा अंत अत्यंत नजीक आणला, यात शंका नाही, डॉ. आंबेडकरांनीही १९५१ च्या नोव्हेंबर मध्ये मुंबईस चौपाटीवरील जाहीर सभेत बोलतांना ''सुभाषबाबूंनी भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले. काँग्रेसने नव्हे'' असे जे उद्‌गार काढले, ते याच अर्थाने.

३५) <u>महाविदर्भ कुमार साहित्य संमेलनाचे उमरावतीतील पहिले अधिवेशन</u> :

महाविदर्भ कुमार साहित्य संमेलनाचे पहिले अधिवेशन अमरावती येथे दि. १८ व १९ ऑगष्ट १९४५ रोजी आचार्य दादा धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली यशस्वीरीत्या पार पडले.

या सम्मेलनाला श्री. गोपीनाथ तळवळकर, श्री. वा.रा. मोडक, सौ. सुशिलाबाई सोहनी, प्रभृतींचे संदेश आले होते. श्री. न.ल. इनामदार यांनी आचार्य धर्माधिकारी यांची ओळख करुन दिली. कुमार साहित्य संमेलनाचे प्रवर्तक श्री. विरेंद्र आढिया यांनी कुमार साहित्य मंडळाची कल्पना आणि तिचा शाखा विस्तार यांची माहिती करुन दिली. त्यानंतर अध्यक्ष आचार्य दादा धर्माधिकारी यांचे समयोचित भाषण झाले व शेवटी संमेलनाचे चिटणीस श्री. वसंत मुळे यांनी संमेलनाला ज्यांनी मदत केली त्यांचे आभार मानले.

दुसरे दिवशी विविध विषयांवर चर्चा व ठराव होऊन हे कु मार साहित्य संमेलनाचे पहिले अधिवेशन समाप्त झाले.

३६) <u>कॉलऱ्याचा कहर</u> :

संपूर्ण प्रांतात कॉलऱ्याने कहर केला होता. उमरावती शहरातही कॉलऱ्याची लागण सुरु होती. दि. २५ ऑगष्ट १९४५ रोजी संपलेल्या आठवडयात अमरावती जिल्ह्यातच ३३९२ लागण व १५३६ मृत्यु असे भयानक स्वरुप या रोगाने धारण केले होते. सरकार, स्थानिक स्वराज्य संस्थाकडून या रोगाला प्रतिबंध करण्याचे प्रयत्न सुरु होते. नागरिकांनीही कॉलरा प्रतिबंधक कमेटी स्थापन करुन लोकांना मदतीचा डाव दिला होता.

३७) <u>उमरावतीचा काँग्रेस हाऊस समारंभ</u> :

<u>बंदी उठल्यानंतरची, पहिली प्रचंड जाहीर सभा</u> :

दि. ७ सप्टेंबर १९४५ रोजी नगर काँग्रेस कमेटीचे कचेरीत प्रवेश करण्याचा समारंभ सकाळी सक्करसाथ येथे पार पडला. इ.स. १९४२ मध्ये १० ऑगष्ट रोजी नगर काँग्रेस कमेटीला पोलीसांनी सील लावले होते. हे कार्यालय नुकतेच काँग्रेस कमेटीला पोलीसांनी परत केल, त्याबद्दल हा समारंभ नगर काँग्रेसतर्फे आयोजित केला गेला होता.

सभा मिरवणूकीवरील बंदी उठल्यानंतर नगर काँग्रेस कमेटीतर्फे पहिली प्रचंड जाहीर सभा दि. ७ रोजी रात्री जोशी सभागृहात भरली होती. सभागृह स्त्री पुरुषांनी चिक्कार भरले होते.

या सभेत सर्वश्री बाळासाहेब भंडारी, रतनलालजी काळे, पी.के.देशमुख, बाळ मराठे, पंढरी पाटील (चिखली) हरिहरराव देशपांडे, संभाजीराव गोखले, व वीर वामनराव जोशी यांची भाषणे झाली होती.

श्री. पी.के. देशमुख व श्री. मराठे यांनी, नुकत्याच संपलेल्या युध्दास लोक युध्द म्हणणाऱ्या कम्युनिस्टांना 'देशद्रोही' म्हणून संबोधले व काँग्रेसला मते देणार की नाही? अशी श्रोत्यांना पृष्छा केली. या व्याख्यात्यांनी १९४२ ची चळवळ ही काँग्रेसची चळवळ होती. असे विशद करुन सांगितले. पंढरी पाटील यांनी पुण्या-मुंबईच्या ब्राम्हणांना शिव्या देऊन ब्राम्हणेत्तर पक्षाचे कार्य काँग्रेस करीत असल्याची आपली खात्री पटल्याचे सांगितले. त्यावेळी वीर वामनराव जोशी, संभाजीराव गोखले हरिहरराव देशपोडे यांच्या सारखे वऱ्हाडी ब्राम्हण पुढारी व्यासपीठावर होते. श्री. हरीहरराव देशपांडे यांनी आपल्या भाषणात १९४२ ला जे घडले ते पुढाऱ्यांनी पाहिले नाहि. "देखी और सुना" यांत गढ्ढे असतात असे सांगितले. त्योचे भाषण विद्वत्ता प्रचुर होते. श्री. नानासाहेब गोखले यांना ८ ऑगष्टचा काँग्रेसचा ठराव कायम असल्याचे सांगून, देशात शेतकरी-मजुराचे राज्य होणार असे भविष्य केल, तर वीर वामनराव दादा यांनी स्वातंत्र्यासाठी मरणास तयार झाले पाहिजे. अशी गर्जना केली होती.

३८) **मुस्लिम लीगची प्रचंड जाहीर सभा :**

सर्वात्रिक आगामी निवडणुकीचा नारळ फुटला :

प्रांतिक व मध्यवर्ती कायदेमंडळाच्या आगामी निवडणूकीचे वारे सुरु झाले होते, अशा वेळी उमरावती शहरातील चांदणी चौकात, प्रांतिक मुस्लिम लीगचे अध्यक्ष श्री. रफीकशहा यांच्या अध्यक्षतेखाली दि. १५ सप्टेंबर १९४५ रोजी मुसलमानांची प्रचंड जाहीर सभा झाली होती. या सभेत वक्त्यांनी असेम्बलीचे महत्व आणि आगामी निवडणूका संबंधी आपली भूमिका प्रभावीपणे मांडली.

३९) लष्करी लॉरीने केलेला भयंकर अपघात :

वीर वामनराव दादा व दे.भ. बामणगांवकर बचावले.

१९४५ च्या ऑक्टोबरच्या दुसऱ्या आठवड्यात मोर्शी तालुक्यातील जरुड नजीकच्या वरुड लष्करी लॉरी बैलगाडीवर आदळून भयानक अपघात झाला होता. एका बैलगाडीतील श्री.बाबूराव पाटील समदापूरकर व श्री.शेषराव घाटगे हे जागच्या जागी ठार झाले. मागच्या बैलगाडीतील वीर वामनराव दादा दे.भ.नानासाहेब बामणगांवकर आणि दे.भ.जग्गुलालजी तांबी हे मात्र बचावले. त्यांना किरकोळ जखमा झाल्या. त्यांना स्पेशल मोटारने अमरावतीला आणण्यात आले व डॉ.बापट यांनी त्यांचेवर उपचार केले. ही सर्व मंडळी दे.भ.जग्गुलालजी तांबी यांच्या नातीच्या बारशासाठी शेंदुरजन्याला जायला निघाली होती. परंतु दुर्देवाने वरील अपघात झाला अमरावतीचे दोन्ही नेते प्रसंगातून बचावल्याबद्दल अमरावतीकरांना आनंद झाला.

४०) फ्रेंच राज्यक्रांती दिनांची सभा :

दि.९ जुलै १९४५ रोजी, उमरावती नगर लोकपक्षातर्फे डॉ.जोशी, सभागृहात फ्रेंच राज्यक्रांती दिन श्री.के.जी.जोध वकील यांच्या अध्यक्षतेखाली साजरा करण्यात आला.

इ.स. १९४६

अनुक्रमणिका

१. रॅडिकल डे. पार्टीचे अधिवेशन
२. वि.प्रां.काँ.निवडणूक मंडळाचा वीर वामनरावांचा राजीनामा.
३. संयुक्त महाराष्ट्र आणि श्री.बामणगांवकर,
४. सुभाष जयंती
५. सेनापती बापटांची सुटका व सत्कार
६. वऱ्हाड मागण्याचा निजामास हक्क नाही
७. म. पैगंबर जयंति
८. आरमारी दलातील खलाशाचा ऐतिहासिक संप पाठिब्यांची जाहीर सभा.
९. महाविदर्भ प्रांत निर्माण करण्याची मागणी
१०. कम्युनिस्टांच्या घराची झडती.
११. प्रेस कामगारांचा संप
१२. अमरावती विभागातील निवडणुकांचा निकाल
१३. गुमास्ता परिषद
१४. वऱ्हाडला स्वयंनिर्णयाचा हक्क द्या.
१५. मुस्लीम लीगचा हरताळ संचार बंदी, पत्रकबाजी,निषेध सभा.
१६. अ.भा.शा. शिक्षण परिषद.
१७. संयुक्त महाराष्ट्रासाठी सभा
१८. श्री.भंडारीजी पार्लमेंटरी सेक्रे. झाले.
१९. बुवाबाजी विरोधी परिषद
२०. महामना मालवीयजींचे महानिर्वाण
२१ क्रांतीसिंह नाना पाटीलांचे भव्य स्वागत, मानपत्रे.
२२. श्री.अमृतलाल सेठ यांची अमरावतीस भेट.

इसवी सन १९४६

१) रॅडिकल डेमोक्रॅटिक पार्टीचे अधिवेशन

भाई एम.एन.रॉय यांच्या नेतृत्वाखाली कार्य करणाऱ्या, रॅडिकल डेमोक्रॅटिक पार्टीचे जिल्ह्याचे अधिवेशन दि. १२ व १३ जानेवारी १९४६ रोजी उमरावतीत भरले होते. प्रा. गोवर्धन पारिख हे या अधिवेशनाला अध्यक्ष लाभले होते. उद्घाटक प्रा. दळवी (मुंबई) हे होते.

२) विदर्भ प्रांतिक काँग्रेस निवडणूक मंडळाचा वापर वामनराव दादांचा राजीनामा

विदर्भ प्रांतिक काँग्रेसचे अध्यक्ष श्री.ब्रिजलालजी बियाणी यांनी, श्री.पंजाबराव देशमूख, श्री.पंढरीनाथ पाटील व सेठ गोपालदास मोहता इत्यादी ब्रिटीश धार्जिण्या लोकांना कायदे मंडळाच्या निवडणुकीचे तिकीट दिल्याचे निषेधार्थ वीर वामनराव दादा यांनी वि.प्रां. काँ. च्या निवडणूक मंडळाचा राजीनामा दिला व सरदार वल्लभाई पटेल यांना तारेने आपला हा निर्णय कळविला होता १.

दादांच्या राजीनाम्याचा परिणाम होऊन काँग्रेसच्या केंद्रीय निवडणूक मंडळाने, वरील लोकांची तिकीटे नाकारुन, पूर्व वऱ्हाडसाठी दे.भ. संभाजीराव गोखले, अमरावती खेडे विभागासाठी श्री.पु.का.देशमूख, जमीनदारांचे मतदार संघासाठी श्री.बाळकृष्णजी भंडारी व चांदूर विभागसाठी श्री.रघुनाथमल कोचर यांना तिकिटे दिली होती २.

३) संयुक्त महाराष्ट्र आणि श्री.बामणगांवकर

महाराष्ट्र पत्रकार परिषदेच्या, नागपूर येथे दि. १२ व १३ जानेवारी १९४६ रोजी भरलेल्या सहाव्या अधिवेशनात उमरावतीचे श्री.नानासाहेब बामणगांवकर, संपादक "उदय" यांनी सर्व मराठी भाषिकांचा एक महाराष्ट्र प्रांत निर्माण करावा" असा ठराव मांडला होता आणि या ठरावाला भाई जोगळेकरांनी अनुमोदन दिले होते. हा ठराव बहुमताने पारित झाला होता. ३.

१. उदय : दि. १८ जानेवारी १९४६

२. उदय : दि. २५ जानेवारी १९४६

३. उदय : दि. १८ जानेवारी १९४६

४) उत्साहाचे साजरी झालेली उमरावतीची सुभाष जयंती :-

दि. २३ जानेवारी १९४६ रोजी उमरावतीत नेताजी सुभाष जयंती अत्यंत उत्साहाने साजरी करण्यात आली. त्या निमित्त नेताजी सुभाष बोस यांच्या फोटोची मिरवणूक काढण्यात आली. रस्त्यात ठिकठिकाणी कमानी उभारण्यात आल्या होत्या आणि रात्री रोषणाई केली गेली होती.

सांयकाळी जोग चौकात प्रचंड जाहीर सभा होऊन सुभाष बाबूंचे जीवनावर डॉ.भोजराव, डॉ.पटवर्धन, सौ.कांताबेन वर्मा, श्रीमती दुर्गाताई जोग यांची भाषणे झाली.

सेनापती बापटांची जर सुटका झाली असती तर त्यांचे स्वागत करण्याचे ठरले होते. म्हणून सभेला विशेष गर्दी होती.

५) सेनापती बापटांची सुटका व सत्कार :-

सेनापती बापट हे एक वर्षाची शिक्षा भोगून उमरावती कारगृहातून दि. १४ जानेवारी रोजी बाहेर आले. तेव्हा नगर काँग्रेस कमेटी तर्फे त्यांचा उमरावती येथे जाहीर सत्कार दि. २६ रोजी करण्यात आला.

या प्रसंगी दे.भ.कोचरजी, डॉ.पटवर्धन, दे.भ. संभाजीराव गोखले, व दे.भ. राजाभाऊ बारलिंगे यांची भाषणे झाली. या सभेत सेनापती बापटांना नागरिकांतर्फे एक हजार रुपये भेट देण्यात आले होते. परंतु ते त्यांनी सुभाष वाङमय प्रचारासाठी डॉ.पटवर्धन यांच्या स्वाधीन केले होते. १.

६) वऱ्हाड मागण्याचा निजामास हक्क नाही :-

वऱ्हाड परत मिळावा म्हणून निजामाने ब्रिटीश सरकारला पुन्हा मागणी केली, तेव्हा सर्व वऱ्हाडभर सभा भरुन वऱ्हाडची जनता अखंड भारतातच राहू इच्छिते असे मत ठिकठिकाणी व्यक्त करण्यात आले होते. काही मुस्लीमांनी मात्र वऱ्हाड निजामाचे राज्यात मिळवावा अशी मागणी केली होती.

उमरावतीतही दि. ६ फेब्रुवारी १९४६ रोजी डॉ.भोजराज यांच्या अध्यक्षतेखाली नागरिकांची जाहीर सभा भरुन, दे.भ. बामणगांवकर, दे.भ.डॉ.पटवर्धन,

यांची भाषणे झाली व वऱ्हाड हा निजामाचे राज्यात जाऊ नये असा मतप्रदर्शन ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला होता.

७) पैगंबर जयंती :-

विदर्भ कॉमिकल्चर सोसायटी तर्फे दि. १५ फेब्रुवारी १९४६ रोजी जोशी हॉलमध्ये वीर वामनराव दादांचे अध्यक्षतेखाली, इस्लाम धर्माचे संस्थापक हजरत मोहंमद पैगंबर यांचा जन्मदिन साजरा करण्यात आला होता.

त्या निमित्ताने भरलेल्या सभेत श्री.दौलतखान व श्री.भंडारी यांची भाषणे झाली होती.

८) आरमारी दलांतील नाविक खलाशांचा ऐतिहासिक संप, उमरावतीत पाठिंब्याची जाहीर सभा :-

मुंबई कराची व मद्रास येथील रॉयल इंडियन नेव्ही मधील वीस हजार खलाशांनी दि. १८ फेब्रुवारी १९४६ रोजी उठाव केला होता. खलाशांचे या उठावाला (संपाला) पाठिंबा देण्यासाठी उमरावती येथे दे.भ. वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली दि. २३ फेब्रुवारी १९४६ रोजी जोग चौकात जाहीर सभा भरुन कम्युनिस्ट पक्षाचे भाई मू.ना)मूकर्जी, डॉ.पटवर्धन, लोकपक्षाचे श्री.जोध वकील, व श्री.बाळासाहेब मराठे यांची भाषणे झाली होती.

टीप :- रॉयल इंडियन नेव्हीमधील खलाशांचा उठाव मुंबई कराची व मद्रास येथे झाला होता व त्याला ह्या व इतर शहरातील जनतेने पाठिंबा दिला होता. मुंबई हे या उठावाचे केंद्र होते, त्याची सुरुवात १८ फेब्रुवारी १९४६ रोजी सकाळी "सलवार" नावाच्या ट्रैनिंग स्कूल जहाजावर झाली होती. पुष्कळ दिवस अनेक तक्रारींची दाद न लागल्यामुळे जो असंतोष आतल्या आत घुमसत होता त्याचा हा स्फोट होता. ता. २० रोजी या संपात वीस हजार खलाशी सामील झाले, जहाजावरुन "युनियन जॅक" हे ब्रिटीश निशाण काढून टाकून त्या जागी काँग्रेस व मुस्लीम लीगचे ध्वज व लाल झेंडे एकत्र लावण्यात आले होते.

या संपवाल्यावर हिंदी सैनिकांनी गोळीबार करण्याचे नाकारले तेव्हा

ब्रिटीश सैन्य बोलावण्यात आले, ता. २१ फेब्रुवारी १९४६ रोजी कॅसल बॅरकस्च्या बाहेर सात तास लढाई झाली. त्यानंतर जनताही रस्त्यावर आली होती. जनतेची चळवळ चिरडण्यासाठी ब्रिटीश अधिकाऱ्यांनी पोलिसशाही व लष्कर शाहीला मुक्तव्दार दिले व त्यांनी लोकांवर भरमसाट गोळीबार केला होता. ता. २१ ते २३ फेब्रुवारी या तीन दिवसात सरकारी आकड्याप्रमाणे २५० लोक ठार झाले होते. आरमारी संपाला पाठिंबा देण्यासाठी सर्व कामगारांनी संप पुकारावा असा ट्रेड युनियन्सनी आदेश दिला होता.

दि. २३ फेब्रुवारी १९४६ रोजी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या दडपणामुळे या नाविक संपाच्या मध्यवर्ती आरमारी संप कमेटीने शरण जाण्यास निर्णय घेतला व त्यानुसार "आम्ही हिंदुस्तानला शरण जात आहोत. ब्रिटनला नव्हे" असे जाहीर करुन संप मागे घेतला होता.

(आजचा हिंदुस्तान : पा. ५४६ ते ५५३)

९) महाविदर्भ प्रांत निर्माण करण्याची मागणी :-

नगर हिंदूसभेतर्फे दि. ३१ मार्च १९४६ रोजी श्री.नानासाहेब गवई यांच्या अध्यक्षतेखाली जोशी सभागृहात जाहीर सभा होऊन वऱ्हाडप्रांत निजामाला न देता, महाविदर्भ प्रांत निर्माण करावा अशी मागणी करण्यात आली होती.

१०) दाढी पेढीचे आरोपाखाली अमरावतीत कम्युनिस्टांचे घरांची झडती :-

उमरावती तालुक्यातील दाढी-पेढी या खेडेगावी श्रीमंत मारवाड्याचे घरावर पडलेल्या दरवड्याचे आरोपाखाली पोलिसांनी कम्युनिस्ट पक्षाच्या १९ कार्यकर्त्यांना मार्च १९४६ मध्ये अटक केल्यामुळे सर्वत्र खळबळ उडाली होती.

प्रांतिक कायदे मंडळाची निवडणूक तोंडावर आली होती आणि चांदूर मतदार संघात, काँग्रेस उमेदवाराविरुध्द कम्युनिस्ट पार्टीचे श्री.शंकरराव दिघडे हे उभे होते. अशा वेळी वर प्रमाणे या डाक्याचे आरोपाखाली कम्युनिस्ट कार्यकर्त्यांना पकडल्यामुळे सर्वत्र खळबळ माजली आणि उलट सुलट चर्चा सुरु झाल्या.

या प्रकरणी उमरावतीचे प्रमुख कम्युनिस्ट भाई माधवराव देशपांडे यांच्या घराची झडती घेण्यात येऊन त्यांत अटक करण्यात आली. शिवाय वर्ध्याचे भाई

बाळासाहेब हुद्दार, नागपूरचे श्री.द.अ. परांजपे, व डब्ल्यु.एन देशपांडे यानांही अटक झाली.

पुढे चौकशी होऊन मे १९४६ मध्ये मध्यप्रांत सरकारने या आरोपींची निर्दोष सुटका केली. त्यांचा सत्कार उमरावतीचे जोग चौकात दि. ५ मे १९४६ रोजी आचार्य त्र्यंबक गुरुजी यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या जाहीर सभेत करण्यात आला. सभेत भाई सुदाम देशमुख व भाई माधवराव देशपांडे यांची भाषणे झाली व कलापथकाचा कार्यक्रमही झाला होता.

११) उमरावतीत प्रेस कामगारांचा संप :-

उमरावतीच्या छापखान्यात काम करणाऱ्या कामगारांच्या संपाला दि. ४ मार्च १९४६ पासून सुरुवात झाली व हा संप दोन महिने राहणार होता. परंतु उभयपक्षी न्यायमूर्ती श्री.मंगलमूर्ती यांचा लवाद मान्य झाल्याने दि. २७ मार्च १९४६ रोजी संप मागे घेण्यात आला. प्रेस कामगारांची अभूतपूर्व एकजूट यावेळी दिसून आली होती.

१२) प्रांतिक कायदे मंडळाच्या निवडणुकीचा उमरावती विभागाचा निकाल :-

प्रांतिक कायदे मंडळाच्या पूर्व वऱ्हाड शहर विभागातील जागांच्या निवडणूकी होऊन, त्यांचे निकाल एप्रिल १९४६ मध्ये जाहीर करण्यात आले. त्यानुसार पूर्व वऱ्हाड, सर्वसाधारण शहर विभाग येथून दे.भ.संभाजी राव गोखले (काँग्रेस) यांना १२५४८ मते मिळून ते प्रचंड बहुमतांनी निवडून आले. त्यांचे प्रतिस्पर्धी श्री.अँड.धो.न. लिमये (हिंदुसभा) यांना केवळ ८८२ व कॉ. वऱ्हाडे (रॅ.डे.पार्टी) यांना ४२६ व श्री.सराफ (स्व.) यांना ३२ मते मिळाले होती. चांदूर मतदार संघातून कॉग्रेसचे दे.भ. रघुनाथमलजी कोचर हे ६९६८ मते मिळवून निवडून आले व कम्युनिस्ट श्री.शंकरराव दिघडे यांना १००८ मते मिळाली होती.

पूर्व वऱ्हाड मुस्लिम राखीव जागेवर, मुस्लिम लीगचे श्री.काझी करिमुद्दीन हे ३७९५ मते मिळवून निवडून आले व त्यांचे प्रतिस्पर्धी श्री.नझरखान ११३५ व श्री.अबुल हसन ५८८ मते मिळून पराभूत झाले. त्याच प्रमाणे खेडे विभागातून मुस्लिम राखीव जागेवर लीगचेच श्री.हिदायतअली वकील हे २७१९ मते मिळवून

निवडून आले व स्वतंत्र श्री.अबुल हसन (३३३) पराभूत झाले. अमरावती खेडे विभाग, मुस्लिमेतर जागेवर काँग्रेसचे श्री.पी.के.देशमुख हे निवडून आले. त्यांना ६२७९ मते मिळाली होती व त्यांचे प्रतिस्पर्धी डॉ.ढोले यांना ५४४ मते मिळाली होती.

निवडून आलेल्या काँग्रेस उमेदवारांचा जाहीर सत्कार उमरावती येथे जोग चौकांत ता. १३ रोजी राष्ट्रीय सप्ताहानिमित्त भरलेल्या सभेत करण्यात आला.

१३) उमरावतीत भरलेली गुमास्ता परिषद :-

दि. २१ व २२ एप्रिल १९४६ रोजी वऱ्हाड प्रांतिक गुमास्ता परिषदेचे अधिवेशन जोशी हॉलमध्ये साथी दांडेकर यांच्या अध्यक्षतेखाली भरले होते. नागपूरचे भाई रामभाऊ रुईकर व भाई जोगळेकर यांची या परिषदेत भाषणे झाली. सभेपूर्वी कामगार नेते भाई रुईकर यांची मिरवणूक काढण्यात आली होती.

१४) वऱ्हाडला स्वयं निर्णयाचा हक्क द्या. उमरावतीच्या जाहीर सभेत मागणी :-

घटना समितीच्या निवडीसाठी प्रांताच्या नावाची यादी प्रसिध्द झाली. तीत "मध्यप्रांत" हे नाव असल्यामुळे "वऱ्हाड" बाबत साशंकता निर्माण झाली होती. आणि वऱ्हाड परत मागण्याचा निजामाचा प्रयत्न जोरात सुरु होता. अशा परिस्थितीत वऱ्हाडच्या जनतेची इच्छा व्यक्त करण्याची गरज निर्माण झाली होती. त्यासाठी दि. १ जून १९४६ रोजी उमरावती येथे जोग चौकात वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या वऱ्हाडच्या प्रातिनिधिक सभेत एक ठराव मंजूर करुन वऱ्हाडचा दर्जा जाहीर करण्याची सरकारकडे मागणी करण्यात आली. या प्रातिनिधिक सभेत बुलढाण्याचे श्री.वि.घ.देशपांडे, यवतमाळचे, डॉ.काणे, आकोल्याचे श्री.जोगळेकर आणि उमरावतीचे श्री.नानासाहेब बामणगांवकर डॉ.भोजराज व श्री.नानासाहेब गवई, यांची भाषणे झाली. सर्व वक्त्यांनी आपल्या भाषणात वऱ्हाडवर निजामाला हक्क नाही व वऱ्हाडला भावी हिंदुस्थानच्या घटनेत कोणता दर्जा असावा हे ठरविण्याचा हक्क वऱ्हाडच्या जनतेसच राहील असे स्पष्ट केले.

याशिवाय वक्त्यांनी निजामाची जी चिन्हे वऱ्हाडात आहेत ती नष्ट करण्याची मागणी केली व वऱ्हाडी जनतेला निजामी प्रजा असे देखील संबोधिण्यात येवू नये असेही स्पष्ट केले होते.

१५) मुस्लिम लीगचा हरताळ :-

दि. १६ आगस्ट १९४६ रोजी, मुस्लिम लीगचे आदेशानुसार उमरावतीतील मुस्लिम जनतेने "प्रतिकार दिना" निमित्त हरताळ पाळला होता. त्या निमित्त शहरातील मुसलमान दुकानदारांनी आपली दुकाने बंद ठेवली. रात्री आठवडी बाजारात जाहीर सभा झाली. शहरात पोलीसांचा बंदोबस्त कडक होता.

कलकत्ता शहराचा कत्तलखाना उमरावतीत भीतीचे वातावरण :-

मुस्लिम लिगच्या कौन्सिलने दिलेल्या आदेशानुसार दि. १६ ऑगस्ट १९४६ रोजी सर्वत्र मुस्लिम जनतेने "प्रतिकार दिना" निमित्त हरताळ पाळल्यानंतर कलकत्त्यात जातीय दंगल होऊन, दि. २३ ऑगस्ट पर्यतचे अहवालाप्रमाणे खुद्द कलकत्ता शहरात तीन ते चार हजार लोक मारल्या गेले व पंधरा हजार लोक जखमी झाले. आणि सुमारे पाच कोटी रुपयांची हानी झाली होती. ह्या बातम्या सर्वत्र पसरल्या, तशा उमरावतीतही आल्याने उमरावतीत जातीय दंगलीच्या भीतीचं वातावरण निर्माण झाले होते. पोलिसांचा बंदोबस्त कडक ठेवण्यात आला होता.

पुढे सप्टेंबर १९४६ च्या दुसऱ्या आठवड्यात उमरावती शहरातील वातावरण तंग झाले व शहरात संचारबंदी लावण्यात आली. या काळात एकूण २१६ लोकांना सावधगिरीचा उपाय म्हणून अटक करण्यात आली. या काळात दंगलीत भोसकल्यामुळे एक इसम मृत्युमुखी पडला आणि २१ लोक भोसकल्यामुळे जखमी झाले होते.

नौआखालीतील अत्याचाराचे निषेधार्थ उमरावतीत हरताळ :-

पूर्व बंगालमधील नौआखाली विभागत दंगल होऊन लक्षावधी हिंदु स्त्रियांवर बलात्कार, हजारो देवळे भ्रष्ट आणि सरसकट कत्तलीच्या भयानक बातम्या आल्या. त्याचे सर्व देशभर पडसाद उमटले. बंगालच्या लीग सरकारने दक्षता न घेतल्यामुळे त्याचे निषेधार्थ उमरावतीत दि. २१ ऑक्टोबर रोजी स्वयंस्फूर्त हरताळ पाळण्यात आला होता.

नौआखालीच्या अत्याचाराचे काळात "सुऱ्हावर्दी" हे बंगालचे मुख्यमंत्री होते.

पूर्व बंगालात महिलावरील अत्याचाराचा निषेध :-

पूर्व बंगालातील महिलांवर होणाऱ्या अत्याचाराचे निषेधार्थ उमरावती येथील अ.भ. महिला परिषद, वनिता समाज, शारदा मंडळ व राष्ट्रीय सेविका दल या महिलांच्या संस्थातर्फे दि. २२ ऑक्टोबर १९४६ रोजी सौ.कमलाताई ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली सभा भरुन तीत, सौ.सीताबाई ब्रम्ह, सौ.कांताबेन वर्मा, श्रीमती दुर्गाताई जोग इत्यादि महिलां ची भाषणे झाली.

उमरावतीत कलम १४४ व कर्फ्यु :-

पूर्व बंगालातील दंगलीच्या बातम्यामुळे उमरावतीतही जातीय उत्तेजना वाढल्याने दंगलीची भीती वाढली होती. त्यामुळे सरकारने उमरावतीत कलम १४४ लागू करुन रात्री ७ ते सकाळी ५ पर्यत संचारबंदी लागू केली होती.

ही स्थिती सुमारे दोन महिने होती. आठवडीबाजार मूळ जागेवरुन खापर्डे मैदानावर नेण्यात आला होता, काही दुकाने चित्रा टॉकीज समोरील चौकात बसू लागली होती. गावातील वातावरण शांत व्हावे म्हणून स्थानिक नेत्यांकडून कसोशीचे प्रयत्न चालू होते.

श्री.हिदायत अली एम.एल.ए. यांचे पत्रक :-

उमरावतीच्या जातीय तेढी संबंधी "डी.एस.पी. कडून सरकाला प्राप्त झालेला जो अहवाल मंत्र्यांनी विधानसभेत वाचून दाखविला त्यामुळे तर मला धक्काच बसला. वास्तविक मी व माझ्या सहकाऱ्यांनी उमरावती शहरात शांतता प्रस्थापित व्हावी म्हणून प्रयत्न केले आहेत.

मी माझ्या हिन्दू मुसलमान बांधवांना पुन्हा आश्वासन देतो की, उपरोक्त प्रकारामुळे आमच्या सदिच्छेत व शांतता रक्षणाचे प्रयत्नात मुळीच अंतर पडणार नाही. कोणत्याही परिस्थितीत आम्ही सेवेसाठी हजर राहू." असे पत्रक उमरावतीचे मुस्लिम लीगचे नेते व एम.एल.ए. श्री.हिदायत अली वकील यांनी १२ नोव्हेंबरला १९४६ ला काढले होते.

हैद्राबादच्या निजामाचे पत्रक :-

आक्टोंबर व नोव्हेंबर १९४६ मध्ये देशांत जी जातीय दंगल चालू होती. त्यासंबंधी हैद्राबादच्या निजामांनी एक पत्रक काढून "आपले धार्मिक व राजकीय मतभेद काहीही असोत, त्याची झळ देशातील निरपराध जनतेला लागणे केव्हाही इष्ट नाही. असहाय्य बायकामुलांचे रक्त सांडणाऱ्यांना परमेश्वर क्षमा करणार नाही. यावेळी प्रत्येक देशाभिमानी व्यक्तीने आणि सरकारने देशात शांतता राखण्याचा प्रयत्न केला पाहिले" असे म्हटले होते. दि. २२ नोव्हेंबरला हे पत्रक स्थानिक उदय मधून प्रकाशित झाले आहे.

मुस्लिम लीगचे नेते बॅरि. जीना यांस मुख्यमंत्री ना. शुक्लांचे सडेतोड उत्तर :-

उमरावती येथे सप्टेंबर मध्ये जो जातीय दंगा झाला त्याबद्दल व बडनेराच्या गोळीबाराबद्दल मुस्लिम लीगचे नेते कायदे आझम श्री.महंमद अली जीना यांनी जे वक्तव्य दिले, त्यास मध्यप्रांत वऱ्हाडचे मुख्यमंत्री ना. रविशंकरजी शुक्ला यांनी सडेतोड उत्तर देणारे पत्रक प्रसिध्द केले. त्यात त्यांनी "मुस्लिम लीगवाल्यांनी चिथावणी देणारी भाषणे केली त्यामुळे ५ सप्टेंबर रोजी हिंदूच्या दोन दुकांनावर हल्ला करण्यात आला. मोटारीतून जाणाऱ्या दोन हिंदूंना दगडाने जखमी करण्यात आले. दि. १४ आक्टोबरला बडनेरा येथे पोलिसांना गोळीबार करावा लागला. प्रथम मुसलमानांनी आक्रमण केले, अनेक हिंदू दुकानांना आगी लावल्या म्हणून पोलिसांचा गोळीबार पूर्ण समर्थनीय आहे. बॅरि. जीनांची विधाने अतिशयोक्त असून बेजबाबदार वक्तव्ये केली जातात व त्यामुळे मुसलमानांची डोकी बिथरवली जाता" अशा आशायाचे उद्‌गार काढले होते. १.

(१. उदय दि. १५ नोव्हे. १९४६.)

१६) अखिल भारतीय शारीरिक शिक्षण परिषद :-

अ.भ. शारीरिक शिक्षण परिषदेचे १ ले अधिवेशन उमरावतीला किंग एडवर्ड कॉलेज (हल्लीचे विदर्भ महाविद्यालय) च्या विस्तीर्ण पटांगणावर डॉ.कोकर्डेकर स्टेडियम मध्ये दि. १३ ते १७ आक्टोबर १९४६ रोजी भव्य प्रमाणात भरले होते. या

परिषदेचे अध्यक्षस्थान सुप्रसिध्द वंग नेते दे.भ. शरदचंद्र बोस यांनी स्वीकारले होते आणि उद्घाटन मुंबई प्रांताचे माजी मुख्यमंत्री दे.भ. बाळासाहेब खेर यांनी केले होते. स्वागताध्यक्ष नागपूर विद्यापीठाचे कुलगुरु न्या. पुराणिक हे होते.

या परिषदेला हिंदुस्तान सरकारच्या, पायदळ, हवाईदल आणि नौदलाचे प्रतिनिधी आपापल्या खेळाडूंच्या चमूसह उपस्थित होते, शिवाय संपूर्ण भारतातून व देशी संस्थानातून प्रतिनिधी (खेळाडू) उपस्थित होते. त्यामुळे ही परिषद खऱ्या अर्थाने अखिल भारतीय स्वरुपाची झाली होती.

या परिषदेला बाबू शरदचंद्र बोस व दे.भ. बाळासाहेब खेर यांच्या शिवाय श्री.एच.व्ही. कामत, डॉ.हसन, डॉ.बारलिंगे, दादा धर्माधिकारी, सर मोरोपंत जोशी, श्री.जयरामदास दौलतराम, न्या.पुराणिक, वीर वामनराव जोशी, दे.भ.नानासाहेब बामणगांवकर,श्री.हरिहरराव देशपांडे आणि संत तुकडोजी महाराज हे उपस्थित होते.

या परिषदेत डॉ.म्हैसकर, पं. पन्नालालजी व्यास, श्री.प्रतापसिंगराव भोसले, स्वामी कुवलयानंद, मेजर शहानवाजखान आणि प्राचार्य हिर्लेकर यांची भाषणे झाली.

बाबू शरदचंद्र बोस यांचे स्वागत :-

अ.भा. शारीरिक शिक्षण परिषदेसाठी अध्यक्ष म्हणून आलेले दे.भ.बाबू शरदचंद्र बोस यांचे नगर काँग्रेस कमेटीचे विद्यमाने दि. १३ ऑक्टोबर रोजी मराठा हायस्कूलचे मैदानावर भव्य स्वागत करण्यात आले.

वीर वामनराव चौक :-

बुधवारा या नावाने ओळखल्या जाणाऱ्या चौकाचे नामकरण कॅप्टन शहानवाज खान यांच्या हस्ते याच काळात करण्यात येऊन, त्या चौकाला "वीर वामनराव जोशी चौक" हे नाव देण्यात आले.

वीर वामनराव दादांचे बालपण, शिक्षण व कार्य याच चौकातून सुरु झाले होते. याच चौकातील ते रहिवाशी होते. याप्रसंगी वीर वामनराव दादा उपस्थित होते. समारंभाला मोठा जनसमुदाय हजर होता.

१७) संयुक्त महाराष्ट्रासाठी जाहीर सभा :-

संयुक्त महाराष्ट्राचे प्रश्नासाठी ऑक्टोबर १९४६ च्या शेवटच्या आठवड्यात दे.भ. शंकरराव देव, आचार्य दादा धर्माधिकारी, श्री.माडखोलकर, प्रा. धनंजयराव गाडगीळ, उमरावतीस आले. त्यावेळी उमरावतीचे श्री.डी.जी.अनगळ वकील यांनी, उमरावती व यवतमाळच्या कार्यकर्त्यांचे एक संमेलन उमरावतीस खापर्डे यांच्या दिवाणखान्यात बोलाविले होते. या संमेलनात चर्चा झाली.

त्याच दिवशी रात्री जोग चौकात आचार्य दादा धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली प्रचंड जाहीर सभा भरुन तीत मराठी भाषिकांचा एक महाराष्ट्र निर्माण करावा या विषयावर डॉ.भाऊसाहेब पंजाबराव देशमूख, प्रा.धनंजयराव गाडगीळ व दे.भ. शंकरराव देव यांची भाषणे झाली होती. सुमारे दहा हजार लोक या सभेला उपस्थित होते.

''संयुक्त महाराष्ट्र व्हावा'' या साठी जे संमेलन झाले त्याची प्राथमिक चर्चा खापर्डे वाड्यात झाली व संमेलनाचे इतर सर्व कार्यक्रम व खुले अधिवेशनातील चर्चा वगैरे जोशी हॉलमध्ये झाली.

१८) दे.भ. भंडारीजी पार्लमेंटरी सेक्रेटरी झाले :-

उमरावतीचे दे.भ. बाळकृष्णजी भंडारी हे मध्यप्रांत वऱ्हाडचे पार्लमेंटरी सेक्रेटरी म्हणून नियुक्त झाले. त्यानिमित्त त्यांचा जाहीर सत्कार कॉटन मार्केटचे आवारात दे.भ. ब्रिजलालजी बियाणी यांच्या अध्यक्षतेखाली सप्टेंबर १९४६ चे शेवटचे आठवड्यात करण्यात आला.

१९) उमरावतीची बुवाबाजी विरोधी परिषद :-

दि. १८ आगस्ट १९४६ रोजी जोशी हॉलमध्ये मिरजचे पं. दिघेकर शास्त्री यांच्या अध्यक्षतेखाली बुवाबाजी विरोधी परिषद भरली होती. अध्यक्षांनी आपल्या रसाळ भाषणात बुवाबाजीचे स्वरुप समजावून सांगितले.

२०) महामना मालवीयजीचे निधनाबद्दल दुखवट्याची सभा :-

महामना मदन मोहन मालवीय यांचे १२ नोव्हेंबर रोजी काशी क्षेत्री

निधन झाले. त्यांचे निधनाबद्दल दुखवटा व्यक्त करण्यासाठी उमरावती येथे जोशी सभागृहात जाहीर सभा भरुन डॉ.पटवर्धन, आचार्य त्र्यंबक गुरुजी, श्री.नवाडे आणि श्री.मराठे प्रभृती वक्त्यांची भाषणे झाली होती.

२१) क्रांतिसिंह नाना पाटलांचे उमरावतीत भव्य स्वागत :-

सन १९४२ च्या आंदोलनांचे काळात, सातारा विभागात स्थापन झालेल्या पत्री (प्रती) सरकारचे अध्वर्यू क्रांतीसिंह नाना पाटील यांचे हस्ते, दि. ११ नोव्हेंबर १९४६ रोजी भाजीबाजारात ध्वजारोहण झाले. याप्रसंगी नाना पाटलांचे दर्शनासाठी प्रचंड जनसमुदाय उपस्थित होता. क्रांतिसिंह नाना पाटील, दे.भ.पी.के.देशमुख आणि डॉ.भाऊसाहेब पंजाबराव देशमूख यांची समयोचित भाषणे झाली.

त्याच दिवशी दुपारी ३ वा. शिवाजी कॉलेजच्या मैदानावर क्रांतिसिंहांचे प्रचंड जनसमुदायासमोर भाषण झाले. यावेळी ते म्हणाले "शिवछत्रीपतीचे काळापासून वऱ्हाड व साताऱ्याचा घनिष्ट संबंध आहे. मला आजोळी आल्यासारखे वाटते. सातारची शक्ति पुण्याची बुध्दि आणि वऱ्हाडची श्रीमंती यांचा समन्वय व्हावयास हवा, पत्री सरकार संबंधीची त्यांनी थोडक्यात माहिती देऊन, देशात सुरु असलेले जातीय दंगे परकीय सरकारने निर्माण केले आहेत, आपण त्याला खत पाणी देऊ नये" असे आवाहन त्यांनी केले.

या सभेतच, नाना पाटलांचा वऱ्हाडातील दौरा रोखण्यासाठी मध्यप्रदेश शासनाने जे प्रयत्न केले त्याचा खरपूस सचावार डॉ.भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांनी आपल्या भाषणात घेतला नाना पाटलांचा हा दौरा श्री.ब्रिजलालजी बियाणी यांनी घडवून आणल्याबद्दल त्यांना धन्यवाद देण्यात आले व श्री.बियाणीची शेतकऱ्यांच्या हिताची चळवळ करतील अशी आशा व्यक्त करण्यात आली.

कॉ.नाना पाटलावर भाषण बंदीचा हुकूम :-

उमरावतीच्या डे. कमिश्नरांनी दि. १३ नोव्हेंबर रोजी क्रांतिसिंह नाना पाटील यांचेवर भाषण बंदीची हुकूम बजावला. या कृत्याबद्दल डॉ.भाऊसाहेब पंजाबराव

देशमूख यांनी शुक्ला-मिश्रा मंत्रीमंडळाची निंदा केली होती १.

क्रांतीसिंह नाना पाटील यांना नगरपालिका व कॉटन मार्केटची मानपत्रे :-

वऱ्हाडचा दौरा आटोपून परत जाण्यापूर्वी क्रांतिसिंह नाना पाटील हे दि.२० नोव्हेंबर १९४६ रोजी पुन्हा उमरावतीस आले होते व त्याच दिवशी सकाळी ९ वाजता कॉटन मार्केटच्या भव्य मैदानात त्यांच्या हस्ते झेंडावंदन झाले आणि कॉटन मार्केटतर्फे त्यांना मानपत्र व अकराशे एक रुपयांची थैली अर्पण करण्यात आली होती. या समारंभात येताना त्यांना पुन्हा भाषण बंदीचा हुकूम मिळाला होता. त्यांच्या सोबत महाराष्ट्र प्रदेश कॉ. चे अध्यक्ष श्री.केशवराव जेधे हे होते. या प्रसंगी नानांच्यातर्फे श्री.लाड यांनी आभाराचे भाषण केले होते. श्री.पी.के.देशमुख व डॉ.पंजाबराव देशमुख हे ही बोलले.

उमरावती नगरपालिकेत मानपत्र :-

त्याच दिवशी सायंकाळी ७ वा. उमरावती शहर न.पा. तर्फे अध्यक्ष वीर वामनराव जोशी यांच्या नेतृत्वाखाली नानांचा सत्कार झाला व मानपत्र अर्पण करण्यात आले. हॉल स्त्री पुरुषांनी गच्च भरला होता. आणि समोरील रस्त्यावर तुफान गर्दी होती. श्री.पी.के.देशमुखांनी परिचय करुन दिला. स्वागत समारंभात चिटणीसाचे कार्य श्री.कारंजकर व श्री.देशमूख यांनी मोठ्या आस्थेने व व्यवस्थीशीर केले.

क्रांतीसिंह नाना पाटील यांस विदर्भात भाषण बंदी केली म्हणून डॉ.पंजाबराव यांनी मंत्र्यांवर ठिकठिकाणी कोरडे ओढले व बियाणींच्या विदर्भ कॉंग्रेसवरही वजन आणले. शेवटी मंत्रीही नमले व त्यांनी वर्धेला भाषणबंदी नसल्याचे कळविले. ता. ३ डिसेंबर रोजी विदर्भ प्रदेश कॉंग्रेसच्या कार्यकारिणीने बंदी उठविण्याबद्दल एकमताने ठराव केला होता.

क्रांतिसिंह नाना पाटील : (जन्म १९०० इ.) सातारा जिल्ह्यातील प्रति सरकार किंवा पत्री सरकार'' या संघराज्याचे जनक व सुप्रसिध्द काँग्रेस कार्यकर्ते

सातारा जिल्ह्यातील एका खेड्यात जन्म, वारकरी घराणे, वडिलांचा पेशा पाटीलकीचा मुलकी परिक्षा देऊन तलाठी बनले. १९३० साली काँग्रेसकडे खेचले

गेले व महाराष्ट्र प्रांतिक काँग्रेसवर निवडून आले.

१९४२ च्या चळवळीत भूमिगत राहणाचा मार्ग त्यांनी आपल्या सहकाऱ्यांसह पत्करला. सातारा जिल्ह्यातील "पत्री सरकार" ही त्यांच्या भूमिगत जीवनाची फलश्रुती असुन या कार्यात त्यांनी दाखविलेले संघटना चातुर्य स्पृहणीय आहे. देशात इतर भागातही त्याकाळी (१९४२) संघराज्ये स्थापन झाली होती. कर्जत खोऱ्यात भाई कोतवाल यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेले संघ राज्यही प्रसिध्द आहे. पण या सर्वामध्ये नाना पाटलांच्या नेतृत्वाखालील सातारची उठावणी दीर्घकाळ टिकली. या सरकारने त्या भागात इंग्रज सरकारची यंत्रणा जवळ जवळ बंद पाडली होती. पण त्यांचे ग्रामराज्याची स्थापना हे कार्य अधिक महत्वाचे आहे.

काँग्रेस मंत्रीमंडळ अधिकारारुढ झाल्यानंतर १९४६ साली त्यांचेवरील बंदी आदेश रद्द करण्यात आले. पण आपल्या सर्व सहकाऱ्यांवरील आदेश रद्द होई पर्यत ते भूमिगत राहिले व तो हुकूम रद्द होताच आपल्या १४७ भूमिगत व २७ बंदिस्त सहाकाऱ्यांसह मोठ्या समारंभाने ते कोरेगांवला प्रगट झाले.

जन्मभूमी चे संपादकांची उमरावतीस भेट :-

गुजराती दैनिक जन्मभूमिचे संपादक श्री.अमृतलाल सेठ हे दि. ११ डिसेंबर १९४६ रोजी उमरावतीस आले होते. गुजराती हायस्कूलच्या व्दितीय स्नेहसंमेलनाचे उद्घाटन त्यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी दे.भ. वीर वामनराव दादा हे अध्यक्षस्थानी होते. "गुजराती समाजाने स्थानिक जनतेशी मिळून मिसळून वागावे असा त्यांनी याप्रसंगी उपदेश केला होता.

अंबापेठ मैदानावर श्री.अमृतलाल सेठ यांचे हस्ते ध्वजवंदनाचा कार्यक्रम नगर कॉग्रेस कमेटीने आयोजित केला होता.

इ.स. १९४७

अनुक्रमणिका

१. भाव नियंत्रणाविरुध्द हरताळ सभा, चळवळ.

२. म्यु. शिक्षकांचा लक्षणिक संप.

३. नेताजींची सुवर्ण जयंती.

४. हरिजन मंदिरप्रवेश चळवळ.

५. अन्न परिस्थितीची बिकट समस्या.

६. म.प्र. शिक्षण परिषद

७. प्राथमिक शिक्षकांचा बेमुदत संप

८. भाडेकऱ्यांचे हक्कांविषयी माहिती

९. आठवडी बाजाराची पुनर्स्थापना

१०. कामगार शेतकऱ्यांचा संयुक्त मोर्चा

११. हरताळ, मागण्या, जन जीवनावर परिणाम

१२. साने गुरुजी अमरावतीत, भव्यस्वागत.

१३. अग्रगामी दलाची सभा, क्रांतिकारकांचे पुण्यस्मरण

१४. सरदार शार्दुलसिहांचा सत्कार

१५. धान्य बाजार विषयक सभा व मागणी

१६. देश भक्त नारायणराव बामणगावकर यांचा वर्धापन दिन.

१७. हिंन्दू महा सभेच्या वतीने मागणी विरोधी दिन व प्रत्यक्ष प्रतिकार दिन.

१८. श्रीमती कमलादेवी चट्टोपाध्याय यांचा सत्कार.

१९. शिवाजी शिक्षण संस्थेला निझामची देणगी.

२०. निझामच्या मंत्र्यांचा सत्कार न करण्या विषयी जिल्हा काँ. चा ठराव.

लोकपक्षाचा पाठिंबा, बाँबे क्रॉनिकलचा लेख, पंजाबराव देशमुखांची भूमिका स्पष्ट झाली. शिवाजी मंडळात निझामच्या मुख्यमंत्राचा सत्कार व भाषण, काँग्रेसची भूमिका रामराव देशमुख यांची भूमिका, वऱ्हाडच्या नेत्यांना सर मिर्झाचे निमंत्रण, निझामचा वाढदिवस बंद, रॅ.डे. पार्टीची सभा, अम.जि. स्वतंत्र वऱ्हाड समिती व त्यांच्या वतीने सभा, महिलांची गर्जना, विद्यार्थ्यांचा हरताळ, स्व.वऱ्हाड समिती चालू ठेवण्यासंबधी ना.ब्रिजलाल बियाणी यांचे ना.खापर्डे यांना पत्र.

२१. हैद्राबादच्या फौजा अमरावती वर - एक अफवा.

२२. **भारतीय स्वातंत्र्याचा मंगलदिन.**

१ अमरावतीतील सोहळा, पहाटे पूर्वीचा काळोख, नौरवाली फंडास मदत मृत्यूच्या सुळावर गांधीजींची तपश्चर्या, भारताच्या तरुणा ! आतातरी जागा होशील का ?

हिंन्दुस्तान सरकारने देशी कापसावर लावलेल्या भाव-नियंत्रणाविरुध्द हरताळ

हिन्दुस्तान सरकारने देशी कापसाच्या दोन गाठींचा कमाल भाव २७५ रु. ठरवून दिला होता व त्याची कडक अंमलबजावणी करण्याचे जाहीर केले होते.

सरकारच्या या धोरणामुळे व्यापारी आणि शेतकरी या दोघांचेही नुकसान होणार असल्याने, देशी कापसावरील अमरावतीच्या कापूस बाजारांतील व्यापारी व अडते यांच्या कार्यकारी मंडळाने दि. १३ जानेवारी ते १९ जानेवारी १९४७ असा आठ दिवसांचा कडकडीत हरताळ पाळण्याचे ठरवून तसे जाहीर केले होते व त्यासाठी दि. ११ जानेवारी १९४७ ला जाहीर सभा आयोजित केली होती.

महागाई टंचाई विरुध्द तरुण कार्यकर्त्यांचा सरकारला इशारा

अमरावतीतील कंट्रोल दुकानात गेल्या दीड महिन्यापासून ज्वारी मिळत नाही. गहू सुध्दा बंद झाला आहे. व तादुंळ गरिबांना परवडत नाही.

बाजारात ज्वारीचा भाव ११ आणे पायली, गहू १ रुपया पायली, सर्पण सव्वा रुपया मण, चहापुडा १ छटाक ५ ते ६ आणे, गुळाचा भाव १२ ते १४ आणे शेर असा आहे. दुसरीकडे चिल्लर कपडा व्यापाऱ्यांनी हरताळ पुकारला आहे.

तरुण कार्यकर्ता संघटनातर्फे तर्फे १९ जानेवारीला भाजीबाजारात अन्नवस्त्राचे

प्रश्नावर जाहीर सभा झाली. कंट्रोल दुकानातून दिले जाणारे रिबेट ऐवजी ज्वारी द्या अशी मागणी वक्त्यांनी आपल्या भाषणातून केली. लोकांची हांक सरकारचे कानी जावी म्हणून ही चळवळ आहे असेही वक्त्यांनी सांगितले. "हम भुके नही मरेंगे" अशा घोषणात सभा समाप्त झाली होती.

२. शिक्षकांचा एक दिवस संप

यांच जानेवारी महिन्याचे १५ तारखेला अमरावती व कॅम्प म्यु. शिक्षकांनी आणि म्यु. एम्प्लाईज यांनी एक दिवसाचा हरताळ पाळला. सायंकाळी मिरवणूक निघून ती जोग चौकात समाप्त झाली व तेथेच जाहीर सभा श्री.ॲड ब्रम्ह यांचे अध्यक्षतेखाली भरुन निरनिराळ्या वक्त्यांची भाषणे झाली.

३. नेताजी सुभाष बोस सुवर्ण जयंती. पेटत्या टेंभ्यांची प्रचंड मिरवणूक.

देशगौरव नेताजी सुभाषचन्द्र सुवर्ण जयंती दिनांक २३ जानेवारी १९४७ रोजी नगर पुरोगामी दलातर्फे अत्यंत उत्साहाने व विविध कार्यक्रमानिशी साजरी झाली.

शिवाजीनंतर नेताजी

"स्वातंत्र्य प्रस्थापनेचा पहिला यशस्वी प्रयत्न छत्रपती शिवाजी महाराजांनी केला. त्यानंतर १८५७ चे स्वातंत्र्य युध्द झाले आणि आधुनिक काळात हिंदी स्वातंत्र्याकरिता आझाद हिंद फौजेव्दारे केलेला उठाव म्हणजेच नेताजी सुभाषचंन्द्र बोस यांचा तिसरा प्रयत्न होय" असे उद्‌गार श्री.जोध वकील यांनी याप्रसंगी केलेल्या भाषणात काढले होते.

जळत्या टेंभ्यांची मिरवणूक

सभा संपताच जोग चौकातून जळत्या टेंभ्यांची प्रचंड मिरवणूक काढण्यात आली. मिरवणुकीत बाबू सुभाषचंन्द्र बोस यांचे भव्य छायाचित्र होते व त्या समोर बॅन्ड होता. ही मिरवणुक शहरातील प्रमुख मार्गाने नेण्यात नेऊन नंतर परत जोग चौकात येऊन समाप्त झाली होती. मिरवणुकीत सुभाष बाबूंचे जयजयकारासोबत हिंदु-मुस्लिम एकतेच्या आणि "जगातील कामगारांनो एक व्हा" अशा घोषणा व पेटते टेंभे पाहून, जनक्रांती वा जागृत ज्वाला स्फोट पावला की काय ? असे वाटत होते.

४. हरिजन मंदिर प्रवेश प्रकरण

नागरिकांची जाहीर सभा.

सर्वपक्षीय अस्पृश्यता निवारण समितीत दिनांक ३१ जानेवारी १९४७ रोजी रात्री जोग चौकात आमदार श्री.कोचर यांचे अध्यक्षतेखाली सभा होऊन, येथील अंबादेवीचे मंदिर हरिजनांना खुले करण्यात यावे अशी मागणी करणारी रा.ब.रणदिवे, ॲड.अग्रवाल, सर्वश्री सिकची, रतनलाल काळे, श्रीरामपंत गोखले, सौ.उमाबाई गोखले, श्रीमती दुर्गाबाई जोग आणि श्री.जोध वकील यांची भाषणे झाली.

श्री.केळकर शास्त्री यांनी या प्रश्नाकडे पाहण्यात सनातनी वर्गाचा दृष्टीकोन समजावून दिला होता.

५. तरुण कार्यकर्त्यांनी अन्नमंत्र्यांना निवेदन सादर केले.

अमरावती तरुण कार्यकर्ता संघाचे अध्यक्ष श्री.नारायणराव तांबी यांनी आपल्या दोन सहकाऱ्यांसह दिनांक १४ फेब्रुवारी १९४७ रोजी नागपूर मुक्कामी मा.अन्नमंत्री श्री.पाटील यांची भेट घेऊन अमरावतीच्या अन्न परिस्थितीचे व मागण्यांचे लेखी निवेदन त्यांना सादर केले. ते वाचून त्यावर विचार करण्याचे ना. मंत्र्यांनी आश्वासन दिले. इतकेच नव्हे तर जिल्हाधिकाऱ्यांच्या बैठकीसाठी नागपुरास असलेले अमरावतीचे जिल्हाधिकारी श्री.बहाळ यांना फोनवरुन त्यांनी सूचनाही दिल्या. त्याच प्रमाणे रेंट कंट्रोल ॲक्ट अन्वये, भाडेवाडी संबंधी जे गैरसमज आहेत त्याचे निराकरण करण्याबाबत सर्व रेंट कंट्रोलर्सना एक पत्रक पाठविण्याबाबदल संबंधित अधिकाऱ्यांना सूचना केली. निवेदनातील इतर मागण्यांचा विचार करण्याचे त्यांनी आश्वासन दिले.

६. मध्यप्रांत-वऱ्हाड शिक्षण परिषदेचे अमरावती अधिवेशन.

मध्यप्रांत-वऱ्हाड सरमारमान्य शिक्षण संस्था संघाचे विद्यमाने, मध्य-प्रांत व-हाड शिक्षण परिषदेचे १२ वे अधिवेशन दिनांक ९ फेब्रुवारी १९४७ रोजी अमरावती येथे डॉ.जोशी सभागृहात आचार्य धर्माधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली भरले होते. स्वागताध्यक्ष ॲड. बाळासाहेब रणदिवे आंणि उद्घाटक डॉ.पंजाबराव देशमुख हे होते.

७. प्राथमिक शिक्षकांचा बेमुदत संप.

अमरावती शहर व कॅम्प म्युनिसिपॅलिटीतील शिक्षक दिनांक २४ फेब्रुवारी १९४७ पासून बेमुदत संपावर गेले होते. मराठी, उर्दू, हिंदी व गुजराती शाळांतील सर्व शिक्षक संपात सामील होते. त्यापूर्वी दिनांक २२ रोजी चौकातून विद्यार्थ्यांनी मिरवणूक काढून या संपास पाठिंबा दिला होता. त्याच प्रमाणे नगर काँ. कमेटीतर्फे रॅटि या संपास पाठिंबा देण्यात आला होता. विद्यार्थी फेडरेशनने पाठिंबा दिला. प्रांतिक ट्रेड युनियन काँग्रेसचे आदेशानुसार प्रांतातील सर्व कामगार एक दिवसाचा सहानुभूती संप करणार होते. मुस्लिम लीगने आठवडी बाजारात सभा घेऊन शिक्षक संपाला पाठिंबा दिला होता.

संपापूर्वी शिक्षकांची सायकल फेरी निघाली होती व विद्यार्थ्यांनी मिरवणूकी काढून घोषणा दिल्या होत्या.

शिक्षकांत फूट पाडण्याचे प्रयत्न झाले. परंतु अशा प्रकारांना बळी न पडता एकजूट कायम ठेवून शिक्षकांनी संपाला यशस्वी सुरुवात केली होती. अ.न.पा. ने संप चालू असेपर्यंत सर्व प्राथमिक शाळा बंद राहतील असे जाहीर केले.

अमरावती शिक्षक सत्याग्रहींचे पथक-नागपूरला रवाना.

प्रांतिक प्राथमिक शिक्षक संघाचे आदेशानुसार, अमरावती जिल्हा प्राथमिक शिक्षक संघातर्फे पांच शिक्षक सत्याग्रहीचे एक पथम असेम्ब्ली समोरील सत्याग्रहात भाग घेण्यासाठी दिनांक १० मार्च रोजी मोटारने नागपूरला रवाना झाले होते. या सत्याग्रही शिक्षकांची शहरातून मिरवणूक काढण्यात आली होती.

या सत्याग्रही पथकांत सर्वश्री पाठक, मिटकरी, हाडे, देशमुख व सुलेमानखाँ हे शिक्षक होते. सत्याग्रहात या शिक्षकांना अटक होऊन १ महिना साधी कैद व दंड झाला होता.

अमरावती नगरपालिकेसमोर शांततामय निदर्शने.

सोमवार दिनांक १० मार्च १९४७ रोजी शिक्षकांनी शहर म्यु. कमेटी समोर शांततामय निदर्शन केले. कारण शहर म्यु. कमेटीने केवळ संप काळातीलच नव्हे

तर, काम केलेल्या तेवीस दिवसांचा पगार देखील न देता, उलट संप फोडण्यासाठी चार प्राथमिक शाळा उघडण्याचा प्रयत्न केला होता. परंतु शिक्षकांनी विरोध केल्यामुळे हा प्रयत्न फसला होता.

शिक्षकांसाठी जनतेचा हरताळ

दि. १४ मार्च १९४७ रोजी प्रा. शिक्षक संघाचे आदेशानुसार अमरावती शहरात हरताळ पाळण्यात आला. शिक्षकांना सहानुभूतीदर्शक असा हा नागरिकांचा हरताळ होता. सराफा, कापड बाजार, इतवारी बाजार, हॉटेल वगैरे बंद होते. सांयकाळी शिक्षकांची प्रचंड मिरवणूक निघून अमरावतीच्या मुख्य मार्गाने ती जोग चौकात आली व तेथे डॉ.शिवाजीराव पटवर्धन यांच्या अध्यक्षतेखाली नागरिकांची जाहीर सभा होऊन, डॉ.भोजराज, श्री.गराडे, श्री.वाघ, श्री.दापोरीकर यांची भाषणे झाली.

दि. १७ रोजी पुन्हा ३० प्राथमिक शिक्षकांचे सत्याग्रही पथक नागपूरला रवाना झाले. अमरावती म्यु. कमेटी व जिल्हा कौन्सिलने संपावरील शिक्षकांना सात दिवसाचे आंत कामावर न आल्यास बडतर्फे केले जाईल अशा नोटिसा दिल्या होत्या. दि. २४ मार्च रोजी संप मिटला. व २५ मार्च पासून शिक्षक कामावर रुजू झाले. शाळा पूर्ववत् सुरु झाल्या.

म्युनिसिपल कमेटीवर शिक्षकांचा मोर्चा

दि. २८ जुलै १९४७ रोजी अमरावती शहर म्युनिसिपल कमेटीच्या सर्व हिंन्दु मुसलमान प्राथमिक शिक्षकांचा मोर्चा डॉ. पटवर्धन यांच्या नेतृत्वाखाली म्यु. कमेटीचे कार्यालयावर नेण्यात आला होता. मोर्च्याची पूर्व सूचना नगराध्यक्ष सेक्रेटरी यांना व सर्व म्यु.सभासदांना आगावू दिली होती. मोर्चा ऑफिसवर पोहोचला त्यावेळी जनरल मिटिंग चालू होती, पण मोर्चा आलेला दिसताच सर्व म्यु. सभासद सभागृहातून निघून गेले. म्यु. दिवाणखाना आकस्मिकरीत्या रिकामा झालेला पाहून सभाध्यक्ष डॉ.पटवर्धन यांनी म्यु. सेक्रेटरीला या प्रकाराबद्दल खुलासा विचारला तेव्हा त्यांनी कानावर हात ठेवले. नगराध्यक्ष वीर वामनराव जोशी प्रकृतीचे कारणावरुन गैरहजर होते. अखेर उपाध्यक्ष श्री.अ.हसन यांचे सूचनेवरुन एक लेखी उत्तर दिले. या मोर्चासोबत

दे.भ.जग्गुलाल तांबी, आचार्य त्र्यंबक गुरुजी व वृत्तपत्रांचे स्थानिक प्रतिनिधी होते.

८. भाडेकऱ्यांचे अधिकार. तरुण कार्यकर्ता संघाचे पत्रक.

अमरावतीच्या तरुण कार्यकर्ता संघातर्फे दिनांक २५ फेब्रुवारी १९४७ ला एक पत्रक काढून त्यातून भाडेकरुंना त्यांचे हक्क व अधिकार काय आहेत ह्या बद्दल सविस्तर माहिती देण्यात आली होती.

९. आडवडी बाजार पुन्हा जुन्या जागी भरु लागला.

अमरावतीतील १९४१ मधील जातीय दंग्यामुळे आठवडी बाजार नेकोलेट पार्कवर भरविला जात होता. परंतु १९४७ चे मार्च महिन्या पर्यन्त सर्व वातावरण निवळले, त्यामुळे नेकोलेट पार्कमध्ये भरणारा आठवडी बाजार परत जुन्या जागी भरविण्याची कारवाई सुरु झाली. तेव्हा दुकानदारांनी नगरपालिकेकडे अर्ज करुन, आठवडी बाजार पूर्वीच्या जागी नेऊ नये अशी विनंती केली होती. पण ती विनंती नगरपालिकेने अमान्य करुन वरप्रमाणे कारवाई सुरु झाली व जुन्या जागेवर पुन्हा आठवडी बाजार मार्च १९४७ पासून भरणे सुरु झाले.

१०. कामगार व शेतकऱ्यांचा संयुक्त मोर्चा.

प्रांतिक ट्रेड युनियनचे आदेशानुसार दिनांक ४ मार्च १९४७ रोजी कामागर दिनानिमित्त शेतकरी-शेतमजूर आणि कामगारांचा संयुक्त भव्य मोर्चा, सर्वश्री भाई बाबूराव मुळे, तरुण कार्यकर्तासंघाचे श्री.नारायणराव तांबी, श्री.राजा परांजपे यांच्या नेतृत्वाखाली अमरावतीतून काढण्यात आला होता. शहरातील प्रमुख मार्गाने घोषणा देत हा संयुक्त भव्य मोर्चा उप-आयुक्तांच्या कार्यालयावर नेण्यात येऊन, त्यांना कामगार-शेतकरी यांच्या मागण्या सादर केल्या उपायुक्त श्री.लहाळयांनी शिष्ट मंडळाचे म्हणणे ऐकून घेऊन योग्य ती कारवाई करण्याचे आश्वासन दिले.

त्यानंतर कचेरी चौकातच सभा होऊन मोर्चा समाप्त करण्यात आला. ह्या मोर्चात बडनेराच्या कापडगिरणीचे कामगार आणि बेनोड्याचे शेतमजूर मिळून सुमारे अडीच हजार लोक होते. या मोर्चात राष्ट्रीय ध्वजासोबतच, विळा कोयत्याचे लाल निशाणही फडकत होते.

हरताळ व जाहीर सभा :

त्याच दिवशी रात्री आचार्य त्र्यंबक गुरुजी यांच्या अध्यक्षतेखाली सर्व युनियनस्तर्फे जाहीर सभा झाली व तीत प्रांतिक ट्रेड युनियन काँग्रेसच्या आदेशानुसार मागण्यांचा ठराव मंजूर करण्यात आला. यासभेत दे.भ.डॉ.पटवर्धन, श्री.मिसे, श्री.उंबरकर, श्री.बाबूराव मुळे व श्री.के.डी.देशपांडे यांची भाषणे झाली होती. मेहेतर युनियन व म्यु. एम्प्लाईज युनियनने हरताळ पाळला होता.

पन्नास हजार संपावर.

मध्यप्रांत-वऱ्हाडातील ३५ हजार गिरणी कामगार, १५ हजार प्राथमिक शिक्षक, आणि एक हजार मेहेतर मिळून पन्नास हजार श्रमजीवी व बुध्दिजीवी कामगार मार्च १९४७ मध्ये संपावर होते.

अमरावतीला ता.२१ मार्च पर्यंत पांच मेहतरांना अटक झाली होती.

मजूर मुलभूते मागणयी दिन.

अखिल भारतीय ट्रेडयुनियन काँग्रेसचे आदेशानुसार दिनांक १८ मार्च रोजी मजूर मूलभूत मागणी दिन उत्साहाने साजरा करण्यात आला. सकाळी मेहेत रांची प्रचंड मिरवणूक निघाली होती. रात्री ८ वाजता जोशी हॉलमध्ये श्री.के.डी.देशपांडेयांच्या अध्यक्षतेखाली नागरिकांची जाहीर सभा झाली. तीत श्री.नारायणराव तांबी, श्री.राजंदेरकर, बाबूलाल इत्यादि वक्त्यांची भाषणे झाली होती. मजूरांच्या मूलभूत मागण्यांना पाठिंबा देण्यात आला होता.

११. प्रा.शिक्षक आणि मेहेतर संप.

अमरावती शहरात ता. २४ फेब्रुवारी १९४७ पासून प्राथमिक शिक्षकांचा संप सुरु आहे तर दिनांक १५ मार्चपासून फेडेरशनच्या आदेशाप्रमाणे मेहेतर देखील संपावर गेले आहेत. त्यामुळे शहराचे दैनंदिन जीवन विस्कटले. मेहेतर संपाचे नेते आचार्य त्र्यंबकगुरु आणि श्री.बाबूराव मुळे यांना ता.१७ मार्चला अटक करण्यात आली. मेहेतर संपामुळे नागरिकांनी झाडूहाती घेतला

अमरावती मेहेतर संप सुरु असल्यामुळे नगराध्यक्ष वीर वामनराव दादा,

इतर म्युनिसिपल सदस्य, नगर काँग्रेसचे सदस्य व इतर सन्माननीय नागरिक, शहर सफाईचे काम स्वत: करु लागले होते. सर्व शहरभर हे दृश्य दिसू लागले होते.

अमरावतीत भंगी संप मिटला :-

दिनांक २४ मार्च १९४७ रोजी संपावर असलेल्या भंग्यांनी ऑ.मॅजिस्ट्रेटची भेट घेऊन बिनशर्त कामावर येण्याची तयारी दर्शविली व ता.२४ पासूनच ते कामावर रुजू झाले. याप्रमाणे अमरावतीत भंग्यांचा संप मिटला व लोकांनी सुटकेचा श्वास सोडला.

धान्याचे भाव :- दिनांक २३ मार्च १९४७ रोजी अमरावतीच्या आठवडी बाजारात धान्याचे भाव खालील प्रमाणे होते.

जुनी ज्वारी १ रु. पायली, नवी ज्वारी १२ आणे, तूर डाळ एक रुपया सहा आणे, हरभरा डाळ दीड रुपया व मका १२ आणे पायली.

१२. अमरावतीत साने गुरुजी.

हरिजनांना पंढरपूरचे विठोबाचे मंदिर खुले व्हावे यासाठी महाराष्ट्रात प्रचार दौऱ्यावर असलेले पूज्य साने गुरुजी व सेनापती बापट हे दिनांक २६ मार्च १९४७ रोजी अमरावतीत आले होते.

त्याच दिवशी रात्री श्रीमती दुर्गाताई जोग यांच्या अध्यक्षेखाली जोग चौकात सभा होऊन त्यांची प्रभावी भाषणे झाली होती.

श्री.अंबादेवी संस्थानचे विश्वस्तांनी साने गुरुजींना चर्चेसाठी बोलाविले होते. हरिजनांना मंदिर प्रवेश द्यावा यासाठी जनमत अनुकूल होते.

श्री.साने गुरुजी (ज.१८९९ मृ. १९५०) : पुज्य साने गुरुजी हे साऱ्या महाराष्ट्राला परिचित आहेत. गुरुजींचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातील पालगडला झाला. घरची अत्यंत गरीबी, माधुकरीवर त्यांचे शिक्षण झाले. वयाच्या २४ व्या वर्षी ते एम.ए. झाले. पंधरा वर्षाचे असतांना त्यांच्या आईचे देहावसान झाले होते. बालपणी आईने त्यांच्या मनावर जे संस्कार केले होते, तेच त्यांनी पुढे अमळनेर येथे शिक्षण घेत असतांना विद्यार्थ्यांवर केले, अंत: करणाने अत्यंत निर्मळ आणि भावना प्रधान अशी त्यांची प्रकृती होती. बोले

तैसा चाले या प्रमाणे वागणारे होते.

साने गुरुजींच्या जीवनाचे पैलू अनेकविध होते. थोर समाज सेवक, नाटककार उत्कृष्ट निबंध लेखक, ग्रंथकार, कादंबरीकार, उत्कृष्ट शिक्षक आणि देशभक्त म्हणून त्यांचे महाराष्ट्रात विशेष स्थान आहे. त्यांच्या शामच्या आईने महाराष्ट्रातील आबाल-वृध्दांना रडविले तर त्यांच्या क्रांतीने भारतीय युवकांना क्रांतीची व देशभक्तीची प्रेरणा दिली आहे. निरनिराळ्या भाषेतील उत्कृष्ट ग्रंथ त्यांनी अनुवादित केलेत. साने गुरुजी म्हणजे महाराष्ट्रातील बालकांचे आवडते कवी आणि ग्रंथकार होते.

पंढरीच्या विठोबाच्या मंदीरात अस्पृश्यांना प्रवेश मिळावा म्हणून गुरुजींनी उपोषण केले होते. देशासाठी त्यांनी तुरुंगवास ही भोगला आहे. तुरुंगातही ते स्वस्थ बसले नव्हते तर त्यांचे साहित्य तेथेच, पसरवले आहे. जातीभेदही मानीत नसत.

इ.स. १९४७ साली देशाला स्वातंत्र्य मिळाले. गुरुजींनी १९५० पावेतो हे स्वातंत्र्य पाहिले. अन्याय-अत्याचार-विषमता वाढतच होती. अस्पृश्य बंधूंना अत्याचाराला तोंड द्यावे लागत होते. त्यांचेवर अन्याय सतत होत होता. सरकार - दरबारी थारा नव्हता. त्यातच आई पेक्षाही आदरणीय अशा गांधीजीची हत्या झाली. गुरुजींना जीवनात राम वाटेनासा झाला. त्यांचे कुणी ऐकत नव्हते मृतवत जगण्यापेक्षा मृत्यू अधिक बरा. या विचारांनी त्यांना घेरले आणि ११ जून १९५० रोजी झोपेच्या गोळ्या घेऊन या मूर्ती मंत त्यागीने जागाचा अखेरचा निरोप घेतला.

१३. नगर अग्रगामी दलातर्फे जाहीर सभा.

नगर अग्रगामी दलातर्फेक दिनांक १० मे १९४७ रोजी रात्री ९ वा. प्राणाचार्य खांडे यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा होऊन सन, १८५७ च्या क्रांतिकारकांचे पुण्य स्मरण व साने गुरुजींचा पंढरपूरचा उपवास या विषयावर सर्वश्री रतनलालजी काळे, श्री.हंबर्डे, सौ.कांताबेन, खाकसार नेते श्री.शरार व दे.भ. बाळासाहेब मराठे यांची भाषणे झाली होती.

१४. सरदार कवीश्वर यांना म्यु. चे मानपत्र.

भारतीय अग्रगामी दलाचे अध्यक्ष सरदार शार्दुलसिंग कवीश्वर हे दे.भ.शीलभद्र यांचेसह दिनांक १२ मे १९४७ रोजी अमरावतीत आले होते. स्टेशनवर त्यांचे स्वागत करण्यात आले व शिवाजी चौकात त्यांचे हस्ते ध्वजवंदन करण्यात आले, नंतर शहरातून त्यांची मिरवणूक काढण्यात आली. सर्व रस्ते, तोरणे, लतापल्लवांनी आणि कमानींनी श्रृंगारले होते. दुपारी त्यांचे स्त्रियांचे सभेत भाषण झाले व सायंकाळी अमरावती शहर म्यु. कमेटीने सरदारजींचा म्यु. सभागृहात सत्कार करुन त्यांना मानपत्र अर्पण केले होते.

१५. अमरावतीचा धान्य बाजार खुला करा. तरुण कार्यकर्ता संघाची मोहीम.

दिनांक १७ जून १९४७ रोजी तरुण कार्यकर्ता संघातर्फे डॉ.जोशी सभागृहात, अमरावतीचा धान्य बाजारपूर्ववत सुरु करा अशी मागणी करण्याकरिता नागरिकांची जाहीर सभा दे.भ. मोतीसा काळे यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती.

सभेत मांडलेल्या मागणीचे ठरावावर सर्वश्री दे.भ. रघुनाथमल कोचर, आचार्य त्र्यंबकगुरु, श्री.नवाडे श्री.बाबूराव मुळे, श्री.जोध, श्री.अण्णा काळे, शंकरलाल दुबे, श्री.उंबरकर आणि केशवराव देशपांडे यांची भाषणे झाली होती. ही सभा तीन तास चालली होती.

१६. श्री.बामणगावकर यांचा साठावा वाढदिवस.

अर्ध सामाहिक ''उदय'' चे संपादक दे.भ. नानासाहेब बामणगावकर यांचा साठावा वाढदिवस समारंभ येथील वार्ताहर संघ व मराठी पत्रकार संघातर्फे दि. २६ जून १९४७ रोजी, सायंकाळी ६ वा. डॉ.जोशी सभागृहात साजरा करण्यात आला समारंभाचे अध्यक्षस्थानी नागपूरच्या ''न्यू इंडिया'' या इंग्रजी सामाहिकाचे विव्दान संपादक श्री.व्यंकटरामन हे होते. समारंभानिमित्त जोशी सभागृह तोरण-पताकांनी श्रृंगारण्यात आले होते. व विजेची रोषणाई करण्यात आली होती.

या समारंभासाठी निमंत्रित असे पांचशे प्रतिष्टित स्त्री-पुरुष उपस्थित होते. त्यात अधिकारी वर्ग, वकील मंडळी, कॉलेजचे प्राध्यापक, शिक्षक, व्यापारी व श्री.बामणगावंकरांचे अनेक चाहते आले होते. बाहेर गावाहून आलेले ''मल्ल महाराष्ट्र''

चे संपादक श्री.बाळासाहेब ढवळे, ''न्यू इंडिया'' चे श्री.डिडोळकर, यतवमाळ ''लोकमत'' चे संपादक श्री.सदाशिवराव बऱ्हाळ, नागपूरचे श्री.बाबासाहेब डबीर, श्री.जग्गूलालजी तांबी व बाबाजी मोहरील इ. मंडळी प्रमुख होती.

स्थानिक मंडळीपैकी प्रमुख बॅरि. रामराम देशमुख, वीर वामनराव दादा,बाबासाहेब खापर्डे, डॉ.पटवर्धन, डॉ.सोमण, डॉ.भोजराज, सौ.पार्वतीबाई पटवर्धन, श्री.वाय.जी.देशपांडे, बाळासाहेब मोटे, वैद्यभूषण हिर्लेकर शास्त्री, वैद्य हरिहराव देशपांडे, प्रि.मिराशी, सिव्हिल सर्जन श्री.सहानी, रा.ब.सरंजामे, डॉ.पंजाबराव देशमुख, श्री.अमृतकर वकील, श्री.कोचर एम.ए. हे प्रमुख होते.

वंदेमातरम् राष्ट्रगीताने समारंभाला सुरुवात झाली. श्री.अंबादासपंत कदम यांनी स्वागत गीत म्हटले. संदेश वाचनानंतर श्री.बामणगांवकर यांना अमरावती पत्रकार संघ वार्ताहर संघ व मराठी पत्रकार संघाच्या वतीने मानपत्र अर्पण करण्यात आले. गोखले जव्हेरी यांनी लो.टिळकांचा चांदीचा अर्ध पुतळा अर्पण केला व स्वागत मंडळाने उपरणे व टोपी चांदीच्या तबकातून दिलीच पुष्पहार घालून त्यांचा सत्कार करण्यात आला.

नंतर नानासाहेब बामणगांवकरांसबंधी निरनिराळ्या व्यक्तींची गौरवपर भाषणे झाली. त्यांत सर्वश्री बाबासाहेब खापर्डे, वीर वामनराव जोशी डॉ.पंजाबराव देशमुख, बाळासाहेब ढवळे, श्री.नानासाहेब गवई, अमृतकर वकील, डॉ.पटवर्धन व श्री.रघुनाथमल कोचर हे प्रमुख वक्ते होते.

शेवटी अध्यक्ष श्री.व्यंकट रामन यांचे भाषण होऊन उत्तरादाखल श्री.बामणगांवकरांचे भाषण झाले.

स्वागत मंडळातर्फे सर्वांचे आभार मानल्यानंतर हा सोहळा संपला.

१७. फाळणी विरोधी दिन

दिनांक ३ जुलै १९४७ रोजी जोशी हॉलमध्ये सायंकाळी नगर हिंदु सभेतर्फे काँग्रेसने पाकिस्तानचा स्वीकार केला व हिंदुस्तानची फाळणी केली. ह्याचा तीव्र निषेध करण्यासाठी श्री.बाबाराव खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली प्रचंड जाहीर सभा

झाली होती.

या सभेत काँग्रेसचा व ब्रिटिश सरकारचा तीव्र निषेध करण्यात आला. सभेत श्रीमान बाबासाहेब खापर्डे, श्री.पारनेरकर, श्री.वेखंडे व श्री.गोखले यांची भाषणे झाली होती.

१८. प्रत्यक्ष प्रतिकार दिन -
हिंदुमहासभेतर्फे जाहीर सभा

विदर्भ प्रां. हिंदुमहासभेचे आदेशानुसार अमरावती नगर हिंदुसभेतर्फे दिनांक २ ऑगस्ट १९४७ रोजी जोशी हॉलमध्ये श्री.बाबासाहेब खापर्डे यांचे अध्यक्षतेखाली "प्रत्यक्ष प्रतिकार दिना" निमित्त जाहीर सभा झाली. सभेत श्री.बाबासाहेब खापर्डे व श्री.नवाडे यांची भाषणे होऊन "निजामाच्या वऱ्हाडवरील अधिकारास या सभेचा तीव्र विरोध असून निजामाचे नाममात्र सुध्दा अधिराज्य व कोणतीही चिन्हे, वऱ्हाडावर असू नयेत. असे या सभेचे मत आहे. आणि त्यासाठी ही सभा प्रत्यक्ष प्रतिकाराचे आंदोलन करण्यास सिध्द आहे." असा ठराव मंजूर करण्यात आला होता.

श्रीमती कमलादेवी चट्टोपाध्याय यांचे व्याख्यान.

साम्यवादी पक्षाच्या कार्यकर्त्या श्रीमती कमलादेवी चटोपाध्याय यांचे दिनांक ७ ऑगस्ट १९४७ रोजी सायंकाळी जोग चौकात जाहीर व्याख्यान झाले होते.

१९. शिवाजी शिक्षण संस्थेला निजामाकडून दोन लाखाची देणगी.

अमरावतीच्या श्री.शिवाजी संस्थेला निजाम सरकारने दोन लक्ष रुपयांची देणगी दिली होती. त्याबद्दल संस्थेच्या चिटणीसांनी आभारचे पत्रक प्रसिध्द केले होते. [१]

२. : उदय : दि.१४/२/१९४७.

: उदय : दि. ११ फेब्रुवारी १९४७.)

२०. निजामाचे मंत्री मिर्झा यांना मानपत्र देऊ नये.

अमरावतीत भरलेल्या जिल्हा काँ. मतदारांचे सभेचा ठराव.

दि. ८ एप्रिल १९४७ रोजी सायंकाळी अमरावतीचे जोशी सभागृहात श्री.भोकरे गुरुजी यांचे अध्यक्षतेखाली जिल्हा कौन्सिलचे मतदारांची सभातीत भरुन जिल्हा

कौन्सिलने निजामाचे मंत्री सर मिर्झा यांना मानपत्र देऊ नये असा ठराव सभेत पास झाला. ठराव पास झाल्यावर डॉ.पंजाबराव देशमुख हे सभेला हजर झाले व त्यांनी जिल्हा कौन्सिल मतदारांनी हा ठराव किती मतांनी पास केला हे स्पष्ट करावे असा प्रश्न उपस्थित केला. पण ठराव पास झाल्यामुळेच अध्यक्षांना सदर ठराव योग्य संस्था आणि व्यक्ती यांचेकडे पाठवावयाचा अधिकार असल्यामुळे तसेच ही सभा मतदारांनीच बोलाविलेली असल्यामुळे मतदारांनीच मते दिली हे स्पष्ट करुन अध्यक्षांनी शांततेने सभा संपविली.

ही सभा संपल्या नंतर त्याच जागी लोक पक्षातर्फे जाहीर सभा श्री.जोध वकील यांच्या अध्यक्षतेखाली सुरु झाली. सभेचा उद्देश स्पष्ट करुन मूळ ठराव श्री.जोध यांनी वाचून दाखविला आणि समजावून सांगितला. हा मुख्य ठराव माझे वक्तृत्व गुरु डॉ.पंजाबराव देशमुख आपणापुढे ठेवणार आहेत असे सांगून अध्यक्षांनी डॉ.पंजाबराव देशमुख यांना भाषण करण्यात विनंती केली.

मूळ ठरावात खालील मुद्दे होते --

१) जून १९४८ च्या नंतर वऱ्हाडवर निजामाचा कोणताही हक्क राहात नाही. वऱ्हाड मध्य सरकारात स्वतंत्र घटक म्हणून हक्काने राहील. या हक्कावर निजामाने आक्रमण केल्यास जनता त्यास तोंड देईल.

२) वऱ्हाडी जनतेच्या हक्का विरुध्द वागण्याचा प्रसंग आला असतांना निजामी मुत्सद्यांनी बदसल्ला दिल्यास आजच्या निजामी राज्यातील लोक स्वातंत्र्यवादी प्रजा वऱ्हाडी प्रजेचे हक्क संरक्षण करण्यासाठी मदत करतील असा विश्वास वाटतो.

३) वऱ्हाडी प्रजेचे ध्येय "संपूर्ण व निर्भेळ लोकराज्याची उभारणी हे असून त्या करिता वऱ्हाडी जनता तन,मन, धनाने लढण्याचा निश्चय करते.

४) वऱ्हाडच्या सर्वपक्षीय परिषदेने राष्ट्रीय सभा, व्हॉईसरॉय आणि घटना समितीचे सदस्यांकडे वाटाघाटी करण्यासाठी प्रतिनिधी मंडळ पाठवून वऱ्हाडी जनतेच्या हक्काची कैफियत सादर करावी.

या ठरावावर डॉ.पंजाबराव यांनी भाषण केले. ते म्हणाले, "सदर

ठरावातील सर्व विचार मला तंतोतंत मान्य आहेत. मी वऱ्हाडी असल्यामुळे, वऱ्हाडी प्रजेचे हक्कास धक्का लागला तर, महात्मा गांधीची अहिंसा बाजूस ठेवून मी लढावयास तयार आहो. या बाबतीत काँग्रेस जे ठरवील ते ते मला मान्य आहे. बोलावण्यांत येणाऱ्या सर्वपक्षीय परिषदेचा मी एक जनक आहे. पण "मातृभूमी" माझे नाव घेतच नाही. वऱ्हाडी लोकांना बसण्याकरता मी हत्ती मिळवून दिला. पण त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त न करता वऱ्हाडात माझ्या विषयी गैरसमज पसरविण्याचे कामच काही व्यक्ती व पत्रकार करतात. मला हा ठराव सर्वस्वी मान्य आहे." असे बोलून त्यांनी आपले भाषण संपविले.

सदर ठरावास पाठिंबा देतांना श्री.बामणगांवकर म्हणाले की, १९३५ च्या कायद्याने वऱ्हाडावर निजामाचे स्वामित्व पुन्हा प्रस्थापित केले. पण त्याच बरोबर वऱ्हाडला ब्रिटिश प्रजाजनांचे हक्कही दिले.

घटना समितीचे वऱ्हाडचे प्रतिनिधी डॉ.पंजाबराव देशमुख यांनी वऱ्हाडच्या सार्वभौमत्वाला आज जाहीरपणे पाठिंबा दिला म्हणून आजची सभा जोशी सभागृहातील लोकांचीच नसून, चाळीस लक्ष वऱ्हाडी जनतेची विराट सभा आहे हे स्पष्ट झाले.

BOMBAY CHRONICLE - 21-04-1947

NIZAM TO ASSERT SOVEREIGNTY OVER BERAR

New Delhi, Apri. 19

The Nizam of Hyderbad feels it entitled to ask that his sovereignty over Berar, which has been officially recongnised by the British Government, should assume a more tangible form, especially in view of the fact, that the British are quitting India, "declared Sir Mirza Ismail, Prime Minister of Hyderabad, in an interview with the A.P.A. He added that the Nizam's demand

was not a new one."

Sir Mirza, Who left for Hyderabad today, explained that the Nizam proposed to be, the constititional sovereign of Berar" and that Berar would be set up as" an autonomous province under the Nizam." It would function as such in any Indian Union.

Berar would retain its present form of Government if it be returned to Hyderabad, with the Nizam retaining power to appoint the Governor and Prime Minister, Sir Mirza added. He said the Nizam did not propose to make Berar a district of Hyderabad State.

The Nizam takes considerable interest in the affairs of Berar. Sir Mirza said, and there is a continuing flow of financial suport from Hyderabad for various projects in Berar, including schools and charitable institutions.

The Hyderabad Government feels that Hyderbad's financial resources would also be advantageous to the people of Berar in case of need, the Prime Minister added.

He stated, however, that Hyderabad has no thought of a so called "invasion" of Berar, but said the Government of Hyderabad feels there is a close association between the peoples of the two areas.

Berar, an area of 17,809 square miles with a popu-

lation of about 3-1/2 millions, was turned over to the british East India company by the then Nizam in 1853. The session was officially described as" part of a financial agreement with the Nizam for the maintenance of the Hyderabad Contingent."

Under a new agreement in 1903, Berar was leased in perpetuity to the Central Provinces. The Nizam received an annual income of Rs. 25 Lakhs from Berar.

Under the Act of 1935, however, the Nizam's tile was amended to include Berar his agents were permitted to be stationed there and his heir-apparent was designated Prince of Berar. A.P.A.

अमरावतीत ''हैद्राबाद'' इमारतीचा कोनशिला समारंभ. निझाम(हैद्राबाद) चे मुख्य दिवाण सर मिर्झा इस्माईल यांच्या हस्ते दि.१० एप्रिल १९४७ रोजी श्री.शिवाजी शिक्षण संस्थेच्या ''हैद्राबाद'' इमारतीचा कोनशिला समारंभ मोर्शी मार्गावरील संस्थेच्या जागेत झाला. त्या प्रसंगी श्री.मिर्झा यांचे भाषण झाले. ते पुढील प्रमाणे --

DR\DESMUSH MEMBERS OF THE STAFF AND STUDENTS OF THE AMRAVATI COLLEGE, LADIES AND GENTLEMEN,

The benefincent work of the Sri Shivaji Education Society may be said to have reached its climax in the establishment of the Shivaji College. The Society has already conferred the benefits of Secondary education upon thousands and thousands of young Beraris from all parts of Berar. And

this has been made possible by the enthusiasm and generosity of a large number of people, to whom this day of still greater promise is a reward and stimulus to renewed generosity. His Exalted Highness with his hereditary and personal concern for his people of Berar is keenly interested in their educational progress and has therefore always deeply appreciated the endeavours of this Society: and his munificence on this great occasion is a further and very substantial example of this. His donation is no stranger's gift. And it both emphasises and encourages the essential unity of Hyderbad and Berar, a unity which, in its future development, is full of promise for the welfare of both.

I feel that by natural affinity the peopel of Berar and Hyderabed are drawing very closer toghther, and their destiny in one. Every sign of this is to be welcomed; for exapmle, in education and particularly in higher education. Just as the political individuality of Berar can naturally and fruitfully be realised in association with Hyderabad, so, I think her educational development might best procced in association with the Osmania university with its great resources, high ideals and already rich experience. I have said assocaition not identification. A new university for Berar is much spoken of and this idea is worth all serious and urgent consideration. If such a university is to come into being, it must have its own individuality and amidst the wide purpose, cultural and profes-

sional, education must also have its special regional purpose and function. Nor must it ever be cheaply established and maintained, without a guranteed sum of at least three lakhs a year for the expenses of the university only, quite a part from college expenses, it is simply not worth which in fact it would be discreditable to begin a university. The day is past when a reputable university can be a merely affiliating and examining body. It must, a part from its colleges, be a centre of research and of advanced studies controlled by men of high scholarship and reputation, adequately paid. It must not be willing to fill its coffers by means of low standard school examination. As in other affairs, first-rate edcutional instution. Cost a lot of money. If the necessary resource can be found, Berar might be well justified in establishing a university. Such a university would again much be intereleted with osmania.

The laying of the foundation-stone of a college is ceremony fraught with the richest meaning and this a shrine that is to be built here. It will be sacred to many generation. One cannot but feel how must youthful zest and aspiration will here be quicked and satisfied in all the years to come. The men and women of a new India unkonwn and beyond our prophesying, will here make, and ready to fulfil here destiny. May they know, and help to make, happier than we have ever known and may this college ever be so kindly and so wise a nurse as to win the affectionate gratitude of all its childeren.

२१. वऱ्हाड हा वऱ्हाडी जनतेचाच राहील. - अमरावतीत जाहीर सभा.

रविवारी दिनांक १३ एप्रिल १९४७ रोजी येथील जोग चौकात राष्ट्रीय सप्ताहाचे समारोपानिमित्त नगर काँग्रेस कमेटीचे विद्यमाने जाहीर सभा होऊन तीत विदर्भ प्रांतिक काँग्रेसच्या कार्यकारणीचे सभासद भाई साकी नियाझी, श्री.संभाजीराव गोखाले, डॉ.पंजाबराव देशमुख आणि वीर वामनराव जोशी यांची वऱ्हाडचे प्रश्नावर भाषणे झाली होती.

''वऱ्हाड हा जनतेचाच राहील. ज्या वऱ्हाडी जनतेने ब्रिटिश साम्राज्य शाहीशी झुंज दिली ती प्रजा प्रतिगामी निजामाचे राज्यात स्वखुशीने कधीही सामील होणार नाही. निजामच्या स्वारीची बातमी जनतेत भीती उत्पन्न करण्यासाठी नसून सावधानतेसाठी आहे'' अशा आशयाचे उद्‌गार वक्त्यांनी आपल्या भाषणातून काढले होते.

वऱ्हाडचे प्रश्नावर प्रभावी चळवळ उभारा - बॅरि.रामराव देशमुख यांचे भाषण.

अमरावती नगरपालिकेचे विद्यमाने गुरुवार दिनांक १७ एप्रिल १९४७ रोजी सायंकाळी जोशी सभागृहात महाविदर्भ सभेचे अध्यक्ष व दक्षिण आफ्रिकेतील हिन्दी हायकमिश्नर बॅरि. रामराव देशमुख यांचे वऱ्हाडच्या घटनात्मक प्रश्नावर महत्वाचे भाषण झाले होते. अध्यक्षस्थानी नगराध्यक्ष वीर वामनराव दादा हे होते.

वक्त्यांनी आपले भाषणांत वऱ्हाडचा इतिहास सांगून त्याची घटनात्मक अवस्था वर्णन केली व या प्रश्नावर चळवळ उभारण्याचा सल्ला दिला होतो.

वऱ्हाडचे नेत्यांना सर मिर्झाचे निमंत्रण.

अमरावतीचे श्री. बाबासाहेब खापर्डे बॅरि. देशमुख आणि वीर वामनराव जोशी या तिघांना हैद्राबाद संस्थानचे सर मिर्झा ईस्माईल यांनी दिनांक२३ एप्रिल १९४७रोजी, वऱ्हाड संबंधी बोलणे करण्यासाठी हैद्राबादला येण्याचे निमंत्रण दिले होते. परंतु आकोल्याच्या स्वतंत्र वऱ्हाड परिषदेतील निर्णयामुळे या तिघांनीही जाण्याचे नाकारले होते.

(१: उदय दि. २२ एप्रिल १९४७)

''वऱ्हाड प्रांतावर (म्हणजे अमरावती, आकोला, यतवमाळ व बुलढाणा या जिल्ह्यांचा प्रदेश) निजामाचीच मालकी मान्य, करण्याचे अटीवर वऱ्हाडला स्वतंत्र विधान सभा व (कायदे मंडळ) मंत्रीमंडळ दिले जाईल. या कायदेमंडळला आणि मंत्रीमंडळाला या प्रांताचा कारभार करण्याचे पूर्ण स्वातंत्र्य राहील. मात्र या प्रांताचा गव्हर्नर हा निजामाचे कुटुंबापैकी असेल'' असा प्रस्ताव निजामाने १९०९ ते १९३१ चे दरम्यान ठेवला होता. परंतु पुढे परिस्थिती बदल्याने हा प्रस्ताव थंड बस्त्यात पडला. पर्यायी निजामाच्या एजंटानी सुचविला होता पण तिन्ही पुढारी हैद्राबाद गेले नाही म्हणून हा प्रस्ताव बारगळला.

१. - बॅरि. रामराव देशमुख यांची आठवण. (कै.श्री.बापूसाहेब कारंजकर)

अमरावतीस होणारा निजामाचा वाढदिवस बंद.

हैद्राबाद निजामाचा वाढदिवस दि. २ मे १९४७ रोजी साजरा झाला. परंतु गेल्या कित्येक वर्षापासून अमरावतीच्या कमिश्नर कचेरीत दरसाल साजरा केला जाणारा निजामचा वाढदिवस यंदा ऐन वेळी बंद झाला होता. या वाढदिवसाची निमंत्रणे नेहमी प्रमाणे गेली. दरबारी लोकही येऊ लागले होते. पण इतक्यात निजामाचा वाढदिवस बंद झाल्याचे कळले. यंदा हा चमत्कार कसा घडला याचे आश्चर्य लोक करीत होते.

वऱ्हाड हा वैदर्भीय जनतेच्याच मालकीचा-रॅडिकल डेमोक्रेटिक पार्टीची सभा.

दिनांक १० मे १९४७ रोजी जोशी सभागृहात रॅडिकल डेमोक्रेटिक पार्टीचे वतीने वऱ्हाड-निजाम प्रश्नावर जाहीर सभा झाली होती.

श्री. पळसोकर यांनी सुरवातीस सभेचे प्रमुख वक्ते भाई व्हि.जी. कर्णिक, बी. एस.एल.बी. रॅकीकल डेमोक्रॅटिक पार्टीचा मध्यवर्ती राजकीय कौन्सिलचे सभासद इंडियन फेडरेशन ऑफ लेबरच्या कार्यकारिणीचे सभासद व आंतरराष्ट्रीय पोलाद कमेटीचे सभासद यांचा परिचय करुन दिला. कॉ.शौकत हुसेन जाफ्री हे अध्यक्षस्थानी होते.

कॉ.पागराऊत, कॉ.व्हि.जी. कर्णिकयांची भाषणे होऊन कॉ.शौकात जाफ्रीयांनी समारोप केला होता. रात्री प्रचंड जाहीर सभेत त्यांची भाषणे झाली होती.

अमरावती जिल्हा स्वतंत्र वऱ्हाड समिती.

अमरावती जिल्हा कौन्सिलचे सभागृहात अमरावती जिल्हा स्वतंत्र वऱ्हाड समितीची बैठक दिनांक १४ मे १९४७ रोजी भरली होती.

वऱ्हाडप्रांताला विधानसभा (कायदेमंडळ) मंत्रीमंडळ आणि राज्यपाल (गव्हर्नर) मिळण्याची संधी आली होती पण . . .(१)

वऱ्हाडचे वयावृध्द नेते बॅरि. रामराव उर्फ अण्णासाहेब देशमूख यांनी दि. ६ मार्च १९८० रोजी, खालील आठवण सांगितली.

स्वतंत्र वऱ्हाड दिनाची सभा.

स्वतंत्र वऱ्हाड समितीच्या अमरावती नगर शाखेतर्फे दि. २९ मे १९४७ रोजी ''स्वतंत्र वऱ्हाडदिन'' पाळण्यात आला. रात्री जोग चौकात प्रचंड सभा होऊन प्रमुख वक्त्यांची भाषणे झाली व वऱ्हाडी जनतेच्या आकांक्षा व्यक्त करणरे दोन ठराव मंजूर करण्यात आले.

स्वतंत्र वऱ्हाड समिती : अमरावती नगर शाखा.

स्वतंत्र वऱ्हाड समितीच्या निर्णयाप्रमाणे पुढील सभासदांची अमरावती नगर शाखा बनविण्यात आली होती. सर्वश्री ठाकूर वकील, आमंत्रक कोचरजी, रामनाथाजी बियाणी, दौलतखान, लोटिया, ॲड. अग्रवाल, सुखाप्पा बाबू, मांगीलाल नांगलिय, सौ.वाटाणे, जी.प.गवई, व अं.वा.नवाडे नियुक्त सभासद : सर्वश्री के.डी.देशपांडे, डॉ.पटवर्धन, मोतीसा काळे खोडस्कर मास्तर, चांदूरकर, शिवराज सेवक, रंगनाथपंत चौबल, देवीदासपंत महाजन, राजाभाऊ गोखले व जयकृष्णपंत कुऱ्हाडे.

''निजामी तख्तावर घण पडतील''

अमरावतीत प्रचंड जाहीर सभा.

स्वतंत्र वऱ्हाड कमेटीच्या अमरावती शाखे तर्फे गुरुवार ता. २९ जून १९४७ रोजी स्वतंत्र वऱ्हाडदिन साजरा झाला. त्यानिमित्य रात्री जोग चौकात वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली प्रचंड जाहीर सभा होऊन दे.भ. बामणगांवकर, दे.भ.कोचर, एम.एल.ए. डॉ.गोपाळराव खेडकर, श्री.नवाडे व दे.भ. मोतीसा काळे यांची व्याख्याने झाली.

"निजामी सार्वभौमत्व वऱ्हाडी जनता मानणार नाही. (२) ब्रिटिश व निजाम यांचेतील करार जनतेला बंधनकारक नाहीत." असा ठराव मंजूर झाला. नंतर आपल्या अध्यक्षीय भाषणार वीर वामनराव म्हणाले "वऱ्हाडची जागृत जनता, तिचे इच्छेविरुध्द निजामी सार्वभौमत्व राखण्याचा प्रयत्न झाला, तर निजामी सिंहासनावर घण घातल्या शिवाय राहणार नाही." याप्रमाणे समारोपाचे भाषण होऊन ही प्रचंड सभा संपली होती.

वऱ्हाड वरील निजामाचे स्वामित्व मानणार नाही.

अमरावतीतील महिलांची सभा.

अमरावतीच्या टिळक सप्ताहात, रविवार दिन.२७ जुलै १९४७ रोजी सांयकाळी जोशी हॉलमध्ये सौ.रमाबाई खरे यांच्या अध्यक्षतेखाली स्त्रियांची जाहीर सभा झाली.

सभेत कु.कमल देवधर, श्रीमती दुर्गाताई जोग, सौ.पार्वतीबाई पटवर्धन, कु.ताटके, कावेरी ठाकरे, आशा महाजन, सौ.ताराबाई पाध्ये, कु.देशपांडे, सौ.वीणा सरंजामे, सौ.शांताबाई भट व सौ.बापट यांची समयोचित भाषणे झाली.

"वऱ्हाडवरील निजामाचे स्वामित्व आम्ही मानणार नाही, त्यासाठी व निजामाविरोधी लढ्यासाठी स्त्रियांनी तयार रहावे," असे भगिनींनी प्रतिपादन केले होते.

विद्यार्थ्यांचा "स्वतंत्र वऱ्हाड दिनाचा" हरताळ.

प्रांतिक विद्यार्थी काँग्रेस व स्थानिक विद्यार्थी फेडरेशनचे आदेशानुसार दिनांक ३१ जुलाई १९४७ रोजी शहरातील सर्व हायस्कूले, नार्मल स्कूल व कॉलेजच्या विद्यांर्थ्यानी स्वतंत्र वऱ्हाड दिनानिमित्त कडकडीत हरताळ पाळला.

दुपारी ५ हजार विद्यार्थ्यांची प्रचंड मिरवणूक शहरातून काढण्यात आली. व नंतर जोग चौकात जाहीर सभा झाली होती. सभेत श्री.तांबी व सातारकर यांची भाषणे झाली. नंतर रात्री जोशी हॉलमध्ये दे.भ.डॉ.पटवर्धन यांचे अध्यक्षतेखाली जाहीर सभा होऊन सर्वश्री वसंत चुके, बाळ गोखले, गणोरकर व भाई दांडेकर यांची भाषणे झाली होती.

स्वतंत्र वऱ्हाड समिति

(विदर्भ सर्वपक्षीय परिषदेकडून नियुक्त)

अध्यक्ष

ब्रिजलाल बियाणी

सेक्रटरी,

पु.का.देशमुख

राजस्थान भवन, अकोला

चि.अ.आठल्ये

ता. २४.९.१९४७

प्रमिला ओक

य.रा.डोंगरे

वि.ना.उदासी

श्री.बि.जी.खापर्डे, सदस्य स्वतंत्र वऱ्हाड समिति.

अमरावती.

मान्यवर मित्र,

स.वन्दे, स्वतंत्र वऱ्हाड समितीची शेवटची बैठक ता.१२ ऑगस्ट रोजी झाली. त्यानंतर समितीतर्फे सरदार वल्लभभाई पटेल यांना शिष्टमंडळ भेटले, या विषयीची माहिती आपणांकडे पाठविण्यात आलीच आहे.

स्वतंत्र वऱ्हाड समितीने निझामचे अधिपत्य कोणत्याहि स्वरुपांत स्वीकारावयाचे नाही हे धोरण निश्चित करुन आपल्या कार्यास आरंभ केला व त्या धोरणाच्या पूर्तीकरिता कार्यहि केले. ता.१५ ऑगस्ट पासून वऱ्हाडवर निझामचे निशाण फडकणे बंद झाले आहे. १९३५ च्या गव्हर्नमेंन्ट ऑफ इंडिया ॲक्टमधील कलम ४७ मध्ये निझामाच्या प्रभुत्वाचे जे उल्लेख होते तेहि हिंद सरकारनें सुधारणा कायद्यान्वये गाळून टाकले आहेत. आज वऱ्हाडवर निझामच्या प्रभुत्वाचे कोणतेहि चिन्ह दृश्य स्वरुपात नाही.

अशा स्थितीत स्वतंत्र वऱ्हाड समितीचे कार्य संपले आहे असे वाटणे स्वाभाविक आहे. आज पर्यंतच्या परिस्थितीचा विचार करण्याकरिता प्रांतिक समितीची सभा बोलावण्याचा माझा विचार होता परंतु विशिष्ट कार्यासाठी मी हे पत्र लिहित आहे. निजामाचे वऱ्हाड संबंधीचे हिंदुस्थान सरकारशी बोलणे चालू आहे व या वाटाघाटीचा अखेरचा निर्णय अद्याप जाहीर व्हावयाचा आहे. अंतिम निर्णय जाहीर होईपर्यंत स्वतंत्र वऱ्हाड समितीचे कार्य अद्यापि चालू आहे व चालू राहील. या विषयी मी एक वक्तव्यहि प्रकाशित केले आहे. ते हि आपल्या पहाण्यात आले असेल. जरुरी उत्पन्न होताच समितीची सभा बोलवण्यात येईल कळावे.

आपला नम्र

सही/अस्पष्ट

ब्रिजलाल बियाणी

अध्यक्ष

यावरुन निजाम व वऱ्हाडचा संबंध इत:पर राहत नाही. मग वऱ्हाड निजामी राहणे दूरच. सुविख्यात वैदर्भीय नेते श्री.बा.ग.खापर्डेयांच्या विषयी एक अनैतिहासिक वाक्य नोंदवण्यात आले आहे. ते पुण्या मुंबई कडे एका वृत्तापत्रात एका इतिहास तज्ञ म्हणविणाऱ्या व्यक्तीने एका लेखात लिहिले आहे. ते वाक्य म्हणते की, बाबासाहेब खापर्डेच्या वाड्यावर निझामचा झेंडा फडकत असे. वरील सर्व मजकूर वाचल्यानंतर, अगदी सहज असे आढळते की खापर्डे वाड्यावर निझामचा झेंडा असण्याचे कारणच नाही. बाबासाहेब खापर्डे निझामचे कोणीच सरदार वगैरे नव्हते, त्यांचा व निझामचा काहीही संबंध नव्हता, काही देणे घेणे नव्हते. इतक्या सभा अमरावतीत झाल्या. एखाद्या सभेत एकतरी वक्त्याने निझामचा झेंडा वाड्यावर फडकविल्या बद्दल रोष निषेध व्यक्त केला नाही, तसे करणे त्याला सहज शक्य नव्हते काय ? एणहा विषय कधी निघालाच नाही, कारण त्याला काही मूळ कारण नव्हतेच मुळी आधारच नव्हता, उलट स्वाभिमान व देशभक्तीचे प्रतिक असा भगवा ध्वज वाड्यावर होता.

हैद्राबाद निजामच्या फौजा अमरावतीवर !

२१. अफवांचा प्रचंड कल्लोळ

अमरावती दि. १४ ऑगस्ट १९४७

हैद्राबाद निजामच्या फौजा हल्ला करतील अशी अफवा अमरावतीत पसरली व ती इतक्या वेगाने पसरली की, येथील नेत्यांना शंका वाटायला लागली. त्यामूळे १४ ऑगस्ट १९४७ रोजी भुसारी गेट (नेहरु व्दार) वर तीन मोठमोठे फ्लॅश लाईटस् रात्रभर लावण्यात आले होते. उत्तर, दक्षिण व पूर्वेकडे लाईटस् लावण्यात आले होते. शिवाय भुसारी गेट जवळ लोकांची गदी होती. पुढे काही झाले नाही. हा खेळ इथेच संपला.

२२. १५ ऑगस्ट भारतीय स्वातंत्र्याचा मंगल दिन.

अमरावतीत साजरा झालेला स्वतंत्रता दिनाचा सोहळा.

जनतेत प्रचंड उत्साह : रोषणाईचा अपूर्व थाट.

अखेर, दिनांक १५ ऑगस्ट १९४७ रोजी भारताला स्वातंत्र्य मिळाले सर्व देशभर लोकांत प्रचंड उत्साह होता. अमरावतीतही उत्साहाचा पूर वाहत होता. सर्व शहर राष्ट्रीय ध्वज पताकांनी व कमानींनी श्रृंगारण्यात आले होते.

विशेषत: भुसारी गेट या व्यापारी मुख्य रस्त्यावरील दीपोत्सवाचा थाट अपूर्व होता. अमरावतीत निमित्त विजेची जी रोषणाई करण्यात आली होती तशी रोषणाई प्रांताची राजधानी नागपूर आणि आकोला येथे देखील करण्यात आली होती. पहिला मान भुसारी गेटला.

स्वातंत्र्य दिनोत्सवाचा पहिला मान भुसारी गेट (जवाहर गेट) ला मिळाला. दि.१४/८/१९४७ रोजी रात्री १२ वाजून १ मिनिटांनी भुसारी गेटवर, नगराध्यक्ष वीर वामनराव दादा यांचे हस्ते राष्ट्रीय ध्वज फडकविण्यात आला होता. त्यानंतर शहिदांचे स्मरणार्थ दोन मिनिटे स्तब्धता पाळण्यात आली होती. त्यानंतर राष्ट्रीय ध्वजाला श्री.हरिहरराव देशपांडे व इतर सैनिकांनी ६२ बंदुकांच्या फैरी झाडून सलामी दिली. हनुमान व्या.प्रसारक मंडळ आणि पोलिसांनीही राष्ट्रध्वजाला बँडव्दारा सलामी दिली. याप्रसंगी वीर वामनराव दादा, श्री.पी.के.देशमुख, श्री.कोचरजी, सौ.कांताबेन

वर्मा व मुस्लिम पुढारी श्री.अबुल हसन यांची जोरदार भाषणे झालीत, त्यानंतर आतीषबाजीचा कार्यक्रम झाला. यावेळी सर्व शहरातून घंटानाद करण्यात आला व नगारे वाजविण्यात आले होते.

या कार्यक्रमाला प्रमुख सरकारी अधिकारी, आणि शहरातील हिंदु-मुसलमान, स्त्री-पुरुषांचा समुदाय प्रचंड संख्येने उपस्थित होता.

स्वातंत्र्य दिनानिमित्त भुसारी गेटचे भागात जी दिव्यांची रोषणाई करण्यात आली होती ती शहरातील इतर भागापेक्षा आकर्षक व भपकेबाज होती ती पहाण्यासाठी लोकांच्या झुंडीच्या झुंडी रात्रभर या भागात येत होत्या.

विदर्भ महाविद्यालय

दिनांक १४ ऑगस्ट १९४७ चे मध्यरात्री पासून अमरावतीच्या किंग एडवर्ड कॉलेजचे नांव, त्याकॉलेजातील विद्यार्थ्यांनी बदलवून ''विदर्भ महाविद्यालय'' असे नाव चालू केले होते.

स्वातंत्र्य दिनाचे प्रतीक ''विजय स्तंभ''

ना.संभाजीराव गोखले, शिक्षणमंत्री मध्यप्रांत वऱ्हाड यांचे हस्ते श्री.टॉकीज जवळील चौकात विजय स्तंभाची कोनशिला बसविण्यात आली होती आणि त्यांच्याच हस्ते नेकोलेट पार्क (नेहरु मैदान) वर विजयाचे स्मारक म्हणून वृक्षारोपण करण्यात आले होते.

वऱ्हाडातील मुसलमानांनी स्वातंत्र्य दिनाचे उत्सवात सहभागी व्हावे : लीगचा आदेश.

अखिल भारतीय मुस्लिमलीगचे चिटणीसांनी काढलेल्या पत्रकानुसार वऱ्हाडातील मुस्लीम लीगचे नेते अमरावतीचे श्री.हिदायतअली वकील यांनी एक पत्रक काढून ''वऱ्हाडातील मुसलमानांनी स्वातंत्र्य दिन साजरा करावा व कार्यक्रमात आनंदाने सहभागी व्हावे आणि जेथे निमंत्रण असेल अशा सरकारी कार्यक्रमांसही अवश्य हजर राहावे. त्याचप्रमाणे मुसलमानं बंधूनी शांतता, संयम व परस्पर सहानुभूती राखून याप्रसंगी आनंदाने वागावे'' असा आदेश दिला होता.

दि. १५ ऑगस्ट १९४७ चा सोहळा.

दि. १५ ऑगस्ट १९४७ रोजी अमरावती शहराच्या प्रत्येक मोहोल्ल्यात आणि चौकात सकाळी ध्वजवंदनाचे कार्यक्रम लोकांनी उत्साहाने साजरे केले.

अमरावतीत स्वातंत्र्य दिनाचा सोहळा अत्यंत ऐक्य भावाने, पूर्ण मांगल्याने, तसाच उत्साहाने पार पडला. १९४१ पासून या शहराला दसरा, दिवाळी, उत्सवही कधी इतक्या मंगलप्रद व उत्साहाचे गेले नाहीत. महोत्सवात येथील हिंदु व मुसलमान, दोन्ही समाज निर्भयपणे एकमेकात मिसळले, मिरवणुकी काढल्या, मिरवणुकीत काठ्या व भाले निर्भयपणे फिरले. सर्वत्र शांतता राहिली. सरकारपक्ष व लोकपक्ष ह्यांनी एकजीव होऊन हा उत्सव साजरा केल्यामुळे, अमरावतीच्या इतिहासांत हा नवा दिवस होता.

सर्व सरकारी इमारती त्याच प्रमाणे सार्वजनिक रस्त्यावरील प्रमुख व्यापाऱ्यांच्या ओळीत दीपमालिकांनी व ध्वजापताकांनी आणि उभारलेल्या कमानींनी अत्यंत शोभा आणली होती. त्या दिवशी अमरावती नगरी नटून चाललेल्या नववधूप्रमाणे श्रृंगारण्यात आली होती. सर्वत्र उत्साह ओसंडून वाहत होता.

सरकारी उत्सवात शिस्त अपूर्व होती. तर बिन सरकारी मिरवणुकीही अनेक निघाल्या होत्या. पण शिस्त, गांभीर्य आणि भव्यता ह्यांनी शोभायमान अशी मिरवणुक फक्त एकच होती व ती म्हणजे हनुमान व्यायाम शाळेची मिरवणूक होय. काँग्रेसतर्फेही एक ६२ बैलांच्या रथांतून भारत मातेच्या प्रतिमेची मिरवणूक काढण्यात आली होती.

१५ ऑगस्ट १९४७ च्या रात्रीची जोग चौकांतील सभा प्रचंड झाली. शिक्षणमंत्री ना.संभाजीराव गोखले यांनी पंतप्रधानांचा संदेश वाचून दाखविला. सर्वश्री देवीदासपंत महाजन, सोलव, भाई बाबूराव मुळे, रघुनाथमलजी कोचर, श्रीमती दुर्गाताई जोशी, डॉ.नागुताई जोशी, श्री.रतनलालजी काळे, श्री.पी.के.देशमुख, श्री.अबुल हसन आणि श्री.हिदायत अली वकील प्रभृती सर्वपक्षीय पुढाऱ्यांची भाषणे झालीत.

सकाळी स्त्रियांचीही एक मिरवणुक निघाली होती. जोग चौकात ही मिरवणूक आल्यावर तेथील घंटी घड्याळावर वीर वामनराव दादा यांच्या हस्ते राष्ट्रीय ध्वज

फडकविण्यात आला होता व ध्वजवंदन करण्यात येऊन वीर वामनराव दादा आणि ना.गोखले यांची भाषणे झाली होती.

स्वातंत्र्य दिनाचे सरकारी कार्यक्रम.

१५ ऑगस्ट रोजी सकाळी आठ वाजता पोलीस परेड ग्रांऊडवर (रिझर्व्ह पोलिस लाईन) पोलिस परेड झाली. ना संभाजीराव गोखले यांनी पोलिसांची सलामी घेतली व पंतप्रधानांनी सरकारी नोकरांना दिलेला संदेश वाचून दाखविला.

त्यानंतर इरविन हॉस्पिटल जवळून पोलिसांचा रुट मार्च निघाला. तो शहराच्या मुख्य रस्त्याने फिरुन परत इरविन हॉस्पिटल जवळ येऊन विसर्जित झाला.

स्वातंत्र्य दिनाचे म्यु. कार्यक्रम

सकाळी साडेनऊ वाजता अमरावती शहर म्यु. चे सभागृहावर, म्यु. उपाध्यक्ष श्री.पी.के.देशमुख यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले व ना. संभाजीराव गोखले यांचे भाषण झाले. सर्व म्यु. शाळातून म्यु. सभासदांच्या हस्ते ध्वजारोहण समारंभ होऊन विद्यार्थ्यांना मिठाई वाटण्यात आली होती.

कॅम्प विभाग नगरपालिकेतर्फेही मालटेकडीवर ध्वजारोहण समारंभ करण्यात आला होता. बापूसाहेब कारंजकर यांनी तिरंगा ध्वज फडकवला. प्रमुख पाहुणे म्हणून प्रकाश नरसैय्या हे होते. ध्वज लावण्याचा आग्रह प्रकाशचंन्द्र नरसैय्या यांचा होता. म्हणून तशी व्यवस्था नगरपालिकेने केली होती. समारंभाला १००० लोक हजर होते. शेवटी प्रकाशबाबूनी पेढेवाटून आनंद व्यक्त केला.

याप्रमाणे सुमारे दीडशे वर्षाच्या ब्रिटिश गुलामगिरीतून आणि नव्वद वर्षे केलेल्या स्वातंत्र्य आंदोलनामुळे अखेर १५ ऑगस्ट १९४७ च्या प्रात:काली स्वातंत्र्य रवीच्या रक्तवर्ण किरणांनी सत्यशामला-सुजलां अशी ही भारत भूमी न्हाऊन निघाली. त्याची प्रभा अमरावती नगरीवर पडली तेव्हा, येथील जनता कशी हर्षोन्मादित झाली त्याचे वर्णनवर आलेच आहे, अशा हर्षोन्मादित "त्रिशतकोटी" कंठातून आणि सृष्टीच्या कणाकणातून त्यावेळी जे सहजोव्दार बाहेर पडले ते होते - -

वंदे मातरम्

सुजलां सुफलां मलयज शीतलाम्
सस्यश्यामलां मातरंम् वंदे मातरम्

१५ ऑगस्ट १९४७ रोजीच, भारत भूमीपैकी पूर्व बंगाल, सिंध, पंजाब आणि वायव्य सरहद्द प्रांताचे भूमीवर एकनवे राष्ट्र जन्माला आहे. त्याचें नाव "पाकिस्तान" या पाकिस्तानचे जन्माचे वेळी तेथील हिंदूची भारतभूमीवर येण्यासाठी रीघ लागली होती. प्रेतांनी भरलेल्या रेल्वेगाड्या भारत भूमी वरील रेल्वे स्टेशनवर येत. त्याच तऱ्हेने उलट जाणाऱ्या गाड्यातून तीच परिस्थिती होती. जातीय विव्देषाचे अत्यंत हिडिस रुप यावेळी दिसून आले होते. राष्ट्रपिता महात्मा गांधी हे त्यावेळी नौआखालीतील संकटग्रस्तांचे अश्रू पुसण्यासाठी अत्यंत धोक्याचे परिस्थितीत तेथील ग्रामीण भागात फिरत होते . . भस्मसात झालेले वाडे, रक्षा बनलेल्या गरीबांच्या झोपट्या, कुंकू वाचुनी सुवासिनी, लुंग्या नेसविलेले पतिराज, नमाजाची सक्ती असलेला हिंदु-स्त्री-पुरुषांचा समुदाय, चुकामूक होऊन मृत्यूला, जाळपोळीला, बळी पडलेल्यांची हाडे, नवऱ्यास समक्ष कापणारांची बटीक होऊन राहण्याची जुलुमाची परमावधी व उजागरीने घरात वा गावात येण्याची विलक्षण धास्ती नजरेस पडू लागली. तेव्हा सत्य कोठे आहे ? ईश्वर कोठे आहे ? असाच एक प्रश्न महात्माजींपुढे उपस्थित झाला.

"ज्याचा मी ध्यास करुन जगत आलो तो आहे कोठे ?" त्याचा मला प्रत्यय आताच पाहिजे. तो प्रत्यय यावयाचा म्हणजे हिंदु-मुसलमान १९२०-२१ साला प्रमाणे सलोख्याच्या व परस्पर विश्वयासाच्या थाटाने नांदतांना दिसणे होय" असा गांधीचा निर्धार झाला. बाबूंचा पुलावरुन लांब ठेकीत कालवे ओलांडणे व या खेड्यावर त्या जाण्याचा मार्ग पत्कारणे धोक्याचे नाही काय ? बरोबर नेहमीचे कोणी नाही. फक्त एक दुभाषा, एक लघु लेखक, बंगालचे लीग पक्षीय पंतप्रधान शहिद हसन सुन्हावर्दी यांना शूर व प्रामाणिक असा एक मुसलमान व हिंदु बरोबर मागितला. हेतू हा की, पुन्हा भेटीस येणाऱ्यांना सुरक्षित जाता येईल, अशी व्यवस्था त्या उभयतांनी करावी. जीना साहेबांना वाटते की, गांधीनी बंगाल सोडावा. सुन्हावर्दीस तसे जुलमाने गांधीना करावयास लावता येत नाही. बंगाल लीगचे अध्यक्ष सु-हावर्दीवरच अत्याचारांची

जबाबदारी उघडपणे टाकू लागले. काही लीग मंत्रीही गांधीना वश झाले. मंत्री मंडळ टिकून रहावे, पक्षाचे बळही कमी होऊ नये, म्हणून सु-हावर्दीला मंत्र्याची संख्या वाढविली व सर्वत्रच मंत्रीमंडळे झाली, तर बंगाल मध्येही नवे होण्याची घोषणा केली. पण गांधीजी बंगालमध्ये हिंदु-मुसलमानात एकोपा व परस्पर विश्वास दिसल्यावांचून मरेन पण परंतु फिरणार नाही ह्या दृढनिश्चयाने अधिकाधिक फिरत आहेत. व कष्ट सहन करुन कृशदेह झिजवीत आहेत.

महात्माजींची ही मृत्यूच्या सुळावरील तपश्चर्या नव्हे काय ? ह्या मृत्युच्या सुळावर उभे असतां महात्माजींना मृत्यूच आला तर ? न येवो ? पण दुर्दैव ओढवले व ते आपल्यातच आले तर, अंतर्गत मानवी संहाराने बंगालमध्येच नव्हे ते सर्व देशांत वादळ उठेल व त्यात पाकिस्तान बुडेल. जाती व्देषावर उगम आलेली जातवार देश विभागणीची, कल्पना जळून भस्म झाल्या वाचून हे अत्याचार थांबावयाचे नाहीत, असे डॉ.राजेन्द्र प्रसाद ही म्हणतात. राष्ट्रीय सभेचे अध्यक्षही तेच म्हणतात. ह्या सर्वाचा, एकच प्रश्न सुटावा म्हणून ऐक्याचा, समान धर्माचा व शांततेता महान तपस्वी मृत्युच्या सुळावर उभा राहू तपश्चर्येस बसला आहे.

- अग्रलेख : उदय : २९ नोव्हेंबर १९४६

बंगालमधील नोआखाली जिल्ह्यात तर फारच कहर झाला होता. तेथील हेमचंद्र नांवाच्या गांवी असाच प्रकार झाला. त्या ठिकाणी हिंदूंना व विशेषत: नामशुद्रांना मुसलमानांनी जबर दस्तीने मुसलमान केले होते. ही वार्ता जेव्हा देशांत पसरली तेव्हा, अमरावतील दलीत समाजाचे नेते व माजी एम.एल.ए. श्री.गणेश आकाजी उर्फ नानासाहेब गवई हे व त्यांचे एक मित्र मारुतराव गोडघाटे असे दोघे जण दिल्लीवरुन, (त्यावेळी ते दिल्लीला होते.) नो आखालीतील जर्जर व निराश्रीत लोकांना भेटण्यासाठी, श्री.हेमचंद्र खांडेकर यांनी गोळा केलेले कपडे व गरजेच्या इतर कांही येऊन कलकत्ता येथे गेले व तेथून लोहागोंडा येथे उतरुन नंतर पद्मा नदीतून स्टीमरने चंद्रपूरला पोंचले. हेमचंद्रला जाण्यासाठी कसलीच सोय नव्हती. हेमचंद्र आणि चंद्रपूर हे अंतर वीस पंचवीस मैल असावे. परंतु बैलगाडीचा रस्ता मुळीच नव्हता. तरी ही मंडळी प्राण

धोक्यात घालून कशीबशी हेमचंद्रला पोंचली. त्यापूर्वी तेथे महात्मा गांधी आणि त्यांची इतर मंडळी त्याचप्रमाणे आर्य समाजाचे काही कार्यकर्ते व काही हिंदू संन्यासी लोक पोंचले होते. तेथे श्री.गवई मा.गांधीजींच्या भजनी मंडळीत अचानक गेले असतां त्यांना 'ईश्वर अल्ला तेरो तेरा नाम सबको सन्मती दे भगवान'' हे भजन झोकांत चालले दिसते. भजन संपल्यावर श्री.गवई तेथील एका बंगाली गृहस्थास म्हणाले, ह्या ठिकाणी झालेल्या अत्याचारामुळे येथील सर्व हिंदु भेद विसरुन गेलेले दिसतात अन् ते बाहेरही पडायला धजतनाहीत. उलट मुसलमान गुंड मात्र राजरोसपणे भटकतांना दिसतात. तेव्हा येथील हिंदू लोकांना हिंमत देऊन त्याच्यामध्ये प्रतिकारवृत्ती उत्पन्न करण्याऐवजी तुम्ही ईश्वर अल्ला तेरा नाम'' असे गावून काय मिळविणार आहांत ? तेव्हा ते बंगाली गृहस्थ जरा ओशाळले आणि म्हणाले, आमचा निरुपाय आहे. आम्हाला येथे विधानचंद्र रॉयनी पाठविले आहे. श्री.गवई म्हणतात, हेमचंद्रला महात्मा गांधी हे पायी फिरतात म्हणून सगळ्या देशांत दवंडी पिटण्यात आली होती. पण याचे खरे कारण असे की, मा.गांधीनी गावांत पायी चालण्याशिवाय गत्यंतर नव्हते. या मोहोल्यातून त्या मोहोल्यात जाण्याल केवळ एक पावली रस्ताच काय तो होता. त्या गावांतील लोकसंख्या चाळीस हजार असाची. आम्ही गेलो त्यावेळी महात्मा गांधी तेथे नव्हते. ते दुसरीकडे मदतीला धांवून गेल्याचे कळले. सर्व बाजार जळालेला दिसला. बहुतेक सर्व घरे उध्वस्त झालेली, शेतीचे बैल व काही मालमत्ता मुसलमानांनी चोरुन नेल्याचे कळले. मुसलमानांनी त्या गावी अनेक लोकांचे मुडदे पाडले आणि सगळ्या नामशूद्रांना एका मुसलमानाने पाड्यात एकत्रित करण्यात आले आणि त्यांना मुसलमान केल्याचे कळविण्यात आले. आम्ही त्या गांवच्या फर्लागावर, अर्ध फर्लागावर ज्या बस्त्या होत्या त्यासगळ्या गावी फिरुन हृदय द्रावक व चित्तथरारक अनेक दृष्ये पाहिली. आमच्या मागून केंद्रीय मंत्री श्री.जगजीववनराम हेही आले. धीर देणारी त्यांची एक दोन व्याख्याने झाली. फाळणी नंतर बंगालमध्ये जी जातीय अमानुष दंगल झाली आणि जो हा:हा:कार उडाला, त्याचे वर्णन कठीण आहे. हिंदु व विशेषत: दलीत यांच्या अत्यंत भीषण परिस्थितीचे चित्र आजही नजरपुढे उभे राहिले म्हणजे अंगाची लाही होते.

भारताच्या तरुणा ! आता तरी जागा होशील का ?

- ग.आ. गवई : व्यक्ती आणि कार्य : शेंडे : पा. ६६-६७.

परिशिष्ट १

अमरावतीतील आध्यात्मिक संत पुरुष

काय सांगू संत कृपेचा नवलावा ।
प्रकटला देव । अंतर्या मी ॥

०१. श्री.विष्णू भास्कर लेले.
०२. श्री.तुकडोजी महाराज.
०३. श्री.अच्युत महाराज.
०४. श्री.अंबाडेकर महाराज.
०५. संत आप्पाजी महाराज आर्वीकर.
०६. संत उपासनी महाराज.
०७. श्री.गुलाबराव महाराज.
०८. श्री.संत गाडगेबाबा.
०९. श्री.ब्रह्मचारी महाराज.
१०. श्री.नारायण गुरु, व श्री शंकर गुरु.
११. डॉ.पुनशी.

परिशिष्ट क्र. १

अमरावतीचे एक क्रांतिकारी व योगी

योगेश्वर श्री विष्णू भास्कर लेले उर्फ लेले महाराज.

पुढे योगेश्वर लेले महाराज म्हणून प्रसिध्दीला आलेले श्री विष्णू भास्कर लेले यांचा जन्म १८६७ साली अमरावती नगरीत झाला. त्यांचे वडील श्री.भास्करराव लेले हे त्या काळी अमरावतीला मामलतदार या हुद्यावर होते. श्री.भास्करराव यांना साधुसंताविषयी फार आदर असे, त्यामुळे त्यांचेकडे नेहमी कोणी ना कोणी साधुपुरुष येत व राहत. भास्करराव त्यांची सेवा करीत. त्यातच होळकर राज्यातील सातपुडा पहाडात व नेहमी येणारे ''पहाडी बुवा'' (श्री.नामू पाटील) हे एक असत.

बालक विष्णू सतरा-अठरा वर्षाचा होईपर्यंत अभ्यासा सोबतच देवभक्ती,देशभक्ती व सत्पुष सेवा यात गढून जात असे.

भास्करराव हे आजारी पडले तेव्हा आपला मुलगा विष्णू याला, आपले स्नेही श्री पांडुरंग गोविंद वकील (आळशी) (अमरावती) यांचे स्वाधीन करुनच आपला देह ठेवला व मुलाची जबाबदारी श्री.पांडुरंग गोविंद यांनी स्वीकारली.

पुढे श्री.विष्णु भास्कर लेले हे अमरावतीच्या डिस्ट्रिक्ट कोर्टात कर्मचारी होते. कचेरीत निस्पृहपणे वागत आणि ऑफीसचे काम मन लावून करीत.

या काळात त्यांचा संपर्क राष्ट्रीय चळवळीशी आणि क्रांतिकारकांशी आला, एक अज्ञात क्रांतिकारक या दृष्टीने त्यांच्या जीवनाला एक महत्वपूर्ण पैलू होता. आपली मातृभूमी स्वतंत्र व्हावी या दृष्टीने त्यांनी अहोरात्र श्रम केले व आसेतु हिमाचल ते हिंडले. आपल्या घरातील स्त्रीधनाचा सुध्दा त्याकरिता त्यांनी होम केला. पण ''व्यक्तीचे जीवन काय किंवा समाजाचे जीवन काय ही सर्वंकष ईश्वरी सत्तेने चालत असतात.'' अशी जेव्हा त्यांना अनुभूती आली तेव्हा त्यांच्या सार्वजनिक जीवनाला निराळीच कलाटणी मिळाली. नंतर ते पूर्णपणे पारमार्थिक वृत्तीचे बनून त्यांनी भगवान दत्तात्रयेचा साक्षात्कार करुन घेतला होता.''देश स्वतंत्र करायला गेलो पण मीच स्वतंत्र झालो. देश होता तसाच राहिला.'' असे उद्‌गार त्यांनी एकदा काढले होते.

नोकरी सोडली व ते योग अध्यात्म यांकडे आकर्षित होऊन आपले जीवन व्यतीत करु लागले.

श्री विष्णू भास्कर लेले उर्फ योगेश्वर लेले महाराज यांच्या सत्तर वर्षाचे आयुष्यात तरुणपणी क्रांतिकारी जीवनात बरीच वर्षे गेली. क्रांतिकारकाचे जीवन सर्वतोपरी हाल अपेष्टांचे असते. आर्थिक चणचण त्यांच्या इतकी दुसऱ्या कोणास भासणार? पण श्री लेले यांनी अशा परिस्थितीशी मुकाबला करण्यासाठी जेव्हा जेव्हा पत्नी जवळ स्त्री धनाची मागणी केली त्या त्या वेळी त्यांच्या पत्नीने ते आनंदाने दिले. अर्थात त्यांच्या पत्नीने क्रांतिकारी जीवनाचे महत्व ओळखले होते.

श्री लेले महाराजांचे मुखातून खालील माहिती त्यांच्या शिष्यांना पुढे ऐकायला मिळाली होती.

"नर्मदा तटावर क्रांतिकारकांचे एक विद्यालय काढायचे ठरले होते. त्या शाळेचे प्रमुख अध्यापकत्व श्री वासुदेवानंद सरस्वती उर्फ टेंबे महाराज यांच्याकडे सोपवले गेले होते. या संदर्भात पुण्याला एकदा काही मंडळी जमली, त्यांत श्री लेले महाराज व श्री अरविंद घोष यांचे बंधु बारिंद्रकुमार घोष हेही होते. श्री बारिंद्र यांनाही योगाचा नाद होता. श्री लेले हेही मूळचे हटयोगी होते.

तेथे जमलेल्या लोकांना श्री लेले म्हणाले " मला तुमचे पूर्वीचे जीवन कसे होते ते ऐकावयाचे आहे."

"देशभक्ती हा कांही जीवनांत एकदम उगवणारा कोंब नाही." तानाजी मालुसरे व बाजी फसलकर हे अजून जन्माला यावयाचे आहेत." बंगाल हा क्रांतिकारकांचा बाले किल्ला होता. त्याकरिता बाँब तयार करुन त्याचा उपयोग करण्याचे ठरविले होते. त्यामध्ये अर्थातच श्री.बारिंद्रकुमार होतेच. या संबंधीची हकीकत श्री अरविंद आश्रमातील, योगी अरविंदाचे अगदी प्रथमचे शिष्य श्री नलिनीकान्त गुप्ता यांनी आपल्या "Remini scence" ह्या पुस्तकात पान २८-२९ वर दिली आहे. ती अशी " ती जागा (कलकत्ता देवगड नजीकची) प्रशांत आश्रमासारखी होती. आणि त्यामुळेच श्री.बारिंद्र यांनी श्री लेले यांचेकडून दीक्षा घेऊन योग साधनेचे शिक्षण घेण्याकरता

त्यांना (लेलेंना) तेथे आणले होते. पण आमच्या दुर्दैवाने हे सर्व फसले गेले.''

आम्ही बॉम्बचा पंथ अनुसरला होता, हे जेव्हा लेले महाराजांना कळले तेव्हा त्यांनी हरकत घेतली. ते म्हणाले,'' साधना व बॉम्ब ही दोन्ही एकमेकाशी जमणारी नाहीत, आणि ज्या प्रकारची जोरदार रजोगुणी क्रिया आमच्या मनात होती, ती अंत:करण पवित्र करण्याकरता मुळीच पोषक नाही.'' पुढे ते म्हणाले, ''जरी हिंदुस्थानाचे स्वातंत्र्य ही इष्ट गोष्ट आहे-खरोखरीच ती इष्ट आहे आणि सर्वांना आवश्यक अशीच ती आहे-तरी ती दुसऱ्या मार्गाने प्राप्त होणारी आहे. ती अगदी ठरल्याप्रमाणे शांत मार्गाने येणारी आहे. त्याकरितां रक्तपाताची जरुरी नाही.''

''आम्हाला त्यांचा (लेले महाराजांचा) वीट आला व आम्हीत्यांना अविश्वासाने, कदाचित तिटकाऱ्यानेही हसलो, इंग्रजलोक स्वत:हून आपला गाशा गुंडाळून (हा देश) स्वत:च्या खुशीने, कुरकुर न करता सोडतील, ही जरी मूर्खाने सांगितलेली गोष्ट नसली तरी, ती आम्हाला कल्पित कथा वाटली. आम्ही विष्णू भक्त नव्हतो. आम्ही तांत्रिक कालीपूजक होतो.

लेले महाराजांनी आम्हाला दुसरी समज देऊन धाक घातला.''तुम्ही जर हे सोडून न द्याल तर तुम्ही (आपल्या कार्यात) यशस्वी होणार नाही. एवढेच नव्हे तर, तुम्ही भयंकर आपत्तीत नसला तरी संकटात येणे अपरिहार्य आहे.'' नंतर घडलेल्या प्रात्याक्षिक पुराव्यावरुन त्यांचे (लेलेचे) भविष्य किती खरे होते ते आम्हा सर्वांना माहीत आहे.'' (आठवणी. नलिनी कान्त गुप्त)

इ.सन.१९०८ साली पुण्यात महाराष्ट्र विद्यालय नांवाची शाळा होती. त्यांत श्री.गजानन पुरोहित,गोपाळराव ओगले, लो.टिळकांच्या आठवणी लिहिणारे सदाशिवराव बापट,यशवंतराव केतकर वगैरे अनेक तरुण शिक्षक होते. त्यांतही यशवंत वासुदेव केतकर व फडतरे ज्यांचा १९०६ ते १९१० पर्यंत अनेक क्रांतिकारकाशी संबंध आला, या दोघांचे नाते व दोस्ती होती. त्या काळात योगीराज लेले हे फडतरे यांच्याकडे येऊन त्यांच्या वाडयात उतरत, श्री लेले महाराज यांनीच श्री बाबू अरविंद घोष यांना योग मार्गाची दीक्षा दिली, आणि बंगालच्या माणिकतोळा प्रकरणात माफीचा साक्षीदार



वंदनीय राष्ट्रसंत श्री तुकडोजी महाराज



श्री संत गाडगे महाराज





श्री संत गाडगेबाबांची समाधी



डॉ. पंजाबराव देशमुख मेडिकल कॉलेज, अमरावती.



श्री. नारायण गुरू

श्री.नरेंद्रनाथ गोस्वामी याचा श्री कन्हैय्यालाल दत्त यांनी जो तुरुंगात खून केला, त्याला (कन्हैय्यालाल) गुप्तपणे तुरुंगातच पिस्तुल नेऊन देण्याची कामगिरी श्री.विष्णूपंत लेले यांनीच पार पाडली होती.'' असा पुष्कळ माहितगारांचा समज होता. पुढे स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी वीस ॲटोमॅटिक ब्राऊनिंग पिस्तुले गुप्तपणे विलायतेतून पाठविली. नाशिक केसचे अनेक धागेदोरे उलगडून पोलिसांनी १९ पिस्तुलांचा शोध लावला पण विसावे पिस्तुल कधीही सापडले नाही. ते पिस्तुल श्री.यशवंतराव केतकरांकडे होते व ते त्यांनी श्री फडतरे यांचेकडे ठेवावयास दिले होते.

श्री. लेले अधून मधून केव्हातरी श्री फडतरे यांच्याकडे येत. त्यांना माणसाची परीक्षा फार. फडतरे पोरसवदा तरुण असला तरी हा मुलगा गळा कापला तरी कोठे कांही बोलणार नाही अशी लेले महारांना खात्री होती. त्यामुळे फडतरे याजवर त्यांचा लोभ असे. श्री फडतरे यांनी ते पिस्तुल आपणाजवळ आहे'' असेही श्री लेले यांना सांगितले नव्हते. पण लेलेंना काय अंतर्ज्ञान असेल ते असो, श्री फडतरे यांच्याघरी कपड्याचे कपाटात असलेले पिस्तुल त्यांनी हस्तगत करुन ते घेऊन गेले कोठे तरी ते नाहीसे केले. या पिस्तुलाचा शोध सरकारला पुढे कधीच लागला नाही.
कोल्हापुर संस्थानात इ.स.१८९६चे सुमारास स्थापन झालेली संघटना ''श्री शिवाजी क्लब'' चे सभासदात श्री विष्णूपंत लेले यांचे नाव आहे.

पारतंत्र्याच्या शृखांला तोडून टाकण्यासाठी सारा देश झटत होता. भूमिगत क्रांतिकारक मध्येच आवाज उठवित होते. सारा देश हादरत होता. क्रांतिवीरांची धरपकड चालू होती. नावापुरतीच चौकशी होत होती. चौकशी कसली? निव्वळ तमाशा होता तो. शिक्षा ठोठावल्या जात होत्या. निमूटपणे क्रांतिकारक सहन करीत होते. तुरुंगातून सुटून येत होते. पुन्हा उठाव करीत होते. स्वत:ची तमा कोणालाच नव्हती. ज्याच्या त्याच्या मनात राष्ट्राच्या कल्याणाचेच विचार घोळत होते. सर्व देशच इंग्रजाविरुध्द पेटला होता.

श्री लेले महाराजहि त्याला अपवाद नव्हते. मायभूमीच्या स्वातंत्र्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करण्यात त्यांनी सक्रिय भाग घेतला होता. क्रांतिकारकांतच ते

गणले जात होते. बॉम्ब तयार करण्यासाठी ते पुढे झाले. स्वातंत्र्य मिळविणे हेच ध्येय डोळयापुढे होते.

धरपकडीत लेले महाराजांचाही नंबर लागला. पूर्णयोगी अरविंद हे सुध्दा त्यांच्या बरोबर पकडले गेले. श्री महाराजांना कोर्टासमोर उभे करण्यात आले. सत्यवचनी महाराजांना भीती एकच आणि ती म्हणजे जर वकीलांनी सुलट तपासणीत काही वेडेवाकडे प्रश्न विचारले तर इतरांचा धोका टाळण्यासाठी आपल्याला खोटे बोलावे लागेल.'इकडे आड तिकडे विहीर' अशी त्यांची खरी परिस्थिती झाली होती. परंतु त्यांना कसलीच चिंता नव्हती. परमेश्वर त्यांना कुठल्याही अडचणीत न टाकता सोडवील'' असा त्यांचा विश्वास होता. श्री.अरविंदानाही ''काही काळजी करु नकोस तूं यातून सुटशील'' असे त्यांनी सांगितले.

खरोखरीच महाराज सुटले व तेही कोणतेही असत्य भाषण न करतां. वकीलांनी त्यांना असेच प्रश्न विचारले की, त्यांना खोटे बोलण्याची वेळच आली नाही. बुध्दी-दात्यानेच त्यांना तशी प्रेरणा दिली असावी.

श्री अरविंदाचा खटला सुरु झाला. त्यांचे वकीलपत्र श्री.चित्तरंजनदास यांनी घेतले होते. आणि ते सुध्दा फी न घेता. श्री.चित्तरंजनदास त्या वेळेस फारच प्रसिध्द वकील होते. हे सर्वांना माहित आहे. त्यांची त्याकाळी दरमहा मिळकत दहा हजार रुपयांचे वर होती.....खटला खूप गाजला. अखेर अरविंदाचेच बाजूने खटल्याचा निकाल लागला.

आपला देश स्वतंत्र व्हावा म्हणून श्री महाराजांनी अहोरात्र श्रम केले. ते आसेतु हिमाचल हिंडले. तत्प्रीत्यर्थ घरातील स्त्री धनाचा सुध्दा होम केला. त्याच्या पाठी मागे गुप्त पोलिसांचा ससेमिरा असे. पण ते रस्त्याने जात-येत असले तरी गुप्त पोलिसांना दिसत नसत. हे पाहून गुप्त पोलीस एकदां म्हणाला काहो तुम्ही गुप्त होऊन जाता काय? हे सांगतांना श्री महाराज म्हणाले-मी जाता येतांना कदाचित तो गुप्त पोलिस दुसरीकडे पाहात असला पाहिजे. किंवा त्याने आपले तोंड थुंकण्यासाठी बाजूला वळविले असले पाहिजे.

असे दिसते की',श्री लेले यांचे वास्तव्य अमरावतीत इ.स.१९०४-५ पर्यन्त असावे.अर्थात क्रांतिकार्यानिमित्त ते प्रवास करीत असावेत. पण रहाणे अमरावतीसच होते. त्यांचे लग्न झालेले होते. पत्नीचे नांव गोपीकाबाई याच सुमारास ते योग-विद्या व दत्त उपासना याकडे वळले.

''अमरावतीचे श्री.पाळेकर (अप्रबुध्द) हेही तत्कालीन गुप्त मंडळयात कार्य करीत असत. त्यांनी श्री.विष्णूपंत लेल्यांच्या मध्यस्थीने श्री अरविंदबाबूकडून आठ ब्राऊंनिंग पिस्तुले व शेकडो काडतुसे आणली होती व त्या पैकी कांही पिस्तुले त्यांनी श्री मोरोपंत जोशी यांच्या घरी सुरक्षित जागी ठेवली होती.'' असा उल्लेख एके ठिकाणी आला आहे.तसेच कोल्हापूरच्या श्री शिवाजी क्लबचे सभासदातही त्यांचे नांव आहे. यावरुन अमरावती भागातील तसेच दक्षिण महाराष्ट्रातील क्रांतिकारी गुप्त मंडळाशी ते संबंधित होते असे दिसते.

इ.स.१९०३ साली लेले हे पत्नीसह श्री दत्त क्षेत्रे पहात हिंडत असतांना श्री नृसिंहवाडीस जाऊन नंतर सांगली येथे श्रीधरपंत गोडबोले यांच्या घरी गेलेत. त्यावेळी सांगलीला प्लेग चालू होता. म्हणून सर्वजण शेतात झोपडीत रहायला गेले होते. गोडबोले हे लेले महाराजांचे शिष्य झालेत. तेथून नंतर लेले महाराज हे इंदूर-बडोद या भागात गेले असे दिसते.

बडोद्याला बाबू अरविंद घोष हे १८९३-९४ पासूनच वरिष्ठ सरकारी नौकरीत होते. तेथे क्रमाने रेव्हून्यू नंतर शिक्षण व पुढे बडोदा कॉलेजात इंग्रजीचे प्राध्यापक व व्हॉईस प्रिंसिपॉलचे जागी त्यांना काम करावे लागले. बडोद्यात असतांनाच अरविंद बाबूचे लक्ष हिंदवी भाषा, संस्कृती व धर्म याकडे वेधले, ते इंग्लंडमधून शिक्षण संपवून इकडे आले तेव्हा अंतर्बाह्य बदलले होते. जन्मभाषा सुध्दा धड येत नव्हती. पण त्यांची दृष्टी पालटत चालली. येथे असतांनाच मातृभूमीला स्वातंत्र्य प्राप्त करुन देण्यासाठी,स्वदेश बांधवांना सुस्थितीत नेण्यासाठी व अखेर ईश्वरी साक्षात्कार करुन घेण्यासाठी श्री अरविंदांची तळमळ वाढली. तेथे त्यांनी योगाभ्यासास सुरुवात केली. प्राणायामही शिकले इ.स.१९०३-४ मध्ये श्री लेले महाराज बडोद्याला आले होते. तेथे

नोकरी करु लागले होते.अशा वेळी ''चार वर्षाच्या माझ्या प्राणायाम व इतर काही साधना नंतर जेव्हा माझ्यामध्ये आरोग्य, उत्साहाचा बहर, काही शारीरिक मानसिक विशेष देखावे, काव्य निर्मितीचे मोठा अविष्कार, जागतेपणी डोळे उघडे असतांना मर्यादित सामर्थ्याचे तेजोमय आकार व वस्तू इ.द्रृष्य पाहणे, ही शक्ति जागृत झाली,तरी माझ्या साधन मार्गात संपूर्ण अटकाव निर्माण होवून मला पुढे काय करावे हे सुचेनासे झाले. अशावेळी मला माहित नसलेल्या ,अप्रसिध्द,लहान मनाच्या पण काही अनुभव व (शक्ती) जागृत करण्याचे सामर्थ्य असलेल्या माणसास भेटण्याकरिता माझे मन वळविण्यात आले.

याप्रमाणे श्री अरविंद घोष आणि श्री लेले महाराज यांची भेट बडोदा येथे, सरदार मुजुमदार यांचे वाडयातील एका खोलीत झाली. योगीराज लेले यांचे सान्निध्यात योगी अरविंद यांनी तीन दिवस घालविले. यावेळी अरविंद बाबूंची अवस्था वर वर्णन केल्या प्रमाणे होती. परंतु श्री लेले यांनी तीन दिवसात समाधीची किल्ली अरविंद बाबूंना समाजावून विचाररहित मन करण्याची विद्या शिकवली व त्यांना ईश्वरी आदेश अवलंबविण्यास सांगितले.

''आम्ही दोघे एके ठिकाणी बसलो व संपूर्ण विश्वासाने ते मला कोठे नेत आहेत किंवा मी कोठे जात आहे याचे यत्किंचितही ज्ञान नसतांना ते जे सांगतील ते मी संपूर्ण विश्वासाने अनुसरीत गेलो. याचा पहिला परीणाम म्हणजे महान सामर्थ्यशाली.अनुभुतीची एक मालिकाच मला प्राप्त झाली. माझ्या जाणीवेत ऐकांन्तिक बदल झाला.''असे खुद्द योगी अरविंदानीच आपल्या 'श्री अरविंद ऑन हिमसेल्फ ॲन्ड मदर १९५३'' या ग्रंथात नमूद केले आहे.

नंतर श्री लेले हे योगी अरविंदांचे गुरु म्हणून सर्वदुर प्रसिध्दीला आले होते.पुढे त्याच ग्रंथात योगी अरविंद म्हणतात, ''माझ्या आंतरिक जीवनातील महत्वाचा बदल एका गृहस्थामुळे झाला. ते गृहस्थ माझ्या पेक्षा बुध्दी,शिक्षण,सामर्थ्य यात अत्यंत कमी प्रतीचे होते व कोणत्याही मानाने अध्यात्म द्रृष्ट्या पूर्ण किंवा परमश्रेष्ठ नव्हते. पण त्यांच्या ठिकाणी सामर्थ्य दिसून आल्यामुळे, मदतीकरीता मी त्यांच्याकडे वळण्याचे

ठरविले व सर्वस्वाने मी स्वत:ला त्यांच्या हातात दिले व मार्गदर्शन, यंत्राप्रमाणे निमूटपणे अनुसरीत गेलो.'' पुढे १९२५ साली श्री अरविंदांनी श्री लेले महाराजासंबंधी पुन्हा लिहीले आहे. ''त्यावेळी श्री लेले सर्वसाधारण माणसापेक्षा फारच उच्चस्थितीला जावून पोहचले होते, व त्यांच्या अंगी माणसाच्या सामान्य चेतना शक्तीला उर्ध्व चैतन्यशक्तीप्रत खुली करुन देण्याची महान शक्ती होती. मला त्यांच्या पासून तीन गोष्टी प्राप्त झाल्या.

१. मन प्रशान्त करुन निर्गुण ब्रम्हाचा साक्षात्कार. हे विराट अनंत (विश्व) मुळ छायारुप नसून, ते साक्षात तद्रुप व तद्धन होय. त्यानंतर या अनुभुतीला नित्याच्या माझ्या जाणीवेत मी राखू शकलो आहे.

२. स्थूल मेंदूचा उपयोग न करता बोलण्याची व लिहिण्याची कला.

३. मला स्वत:ला दैवीशक्तीच्या मार्गदर्शनाखाली(मग ती वाटेल ती असो) ठेवण्याचा अभ्यास. ही गोष्ट मला त्यावेळी शक्य नव्हती.'' असे नमूद केले आहे.

श्री लेले महाराजांच्या योगदीक्षेपासून श्री अरविंदांचे वृत्तीत वरील प्रमाणे झालेला बदल हे त्यांचे दैवी रुपांतर होय. श्री लेले महाराज हे दत्त सांप्रदायिक होते. ते केडगांवला नारायण महाराजांचे आश्रमात जावूनही राहत असत. ते सातारा, वाई, सांगली येथेही जात. श्री लेले हे परत आपली जन्मभूमी अमरावती येथे आल्याचे दिसत नाही. त्यांचा शिष्य परिवारही बराच मोठा होता, असे दिसते.

श्री लेले यांची अरविंद घोष यांच्याशी पुन्हा भेट इ.सन १९०७ च्या डिसेंबरच्या दिनांक २८,२९ व ३० या दिवशी बडोदा येथील श्री.खासेराव जाधव यांचे घरी झाली होती. मध्यप्रदेशचे श्री.प्रयागदत्त शुक्ल यांनी त्यांच्या''क्रांतिकेचरण'' या पुस्तकात'' अरविंद का कार्यक्रम हिंसात्मक क्रांतिकारियोसे भिन्न था । व्ही.बी.लेले और अरविंद घोष के मार्ग एकसे थे। परंतू ऐसी संस्था का पता मध्यप्रदेश मे नही चलता। वर्धा के समीप श्रीधर विष्णू परांजपे एक साधू है , और यह कहा जाता है की, उसका सबंध लेले से है।'' असे म्हटले आहे. हे श्रीधर विष्णू परांजपे नागपूरच्या मॉरिस कॉलेजचे प्राध्यापक होते. त्या पदाचा राजीनामा देवून ते साधूपुरुष म्हणून विख्यात झाले होते. वर्ध्याजवळ

हनूमानगड येथे त्यांचा मठ होता. जयकृष्णपंत उपाध्ये हे त्यांचे शिष्य होते. त्या काळी वर्धा येथे आर्य बंधू समाज या नावाची गुप्त क्रांतिकारकांची संघटना होती. या संघटनेला श्रीधर विष्णू परांजपे व नरहर शिवराम परांजपे यांचे सहाय्य असे. या गुप्त मंडळीत श्री.खानखोजे, श्री.हणमंत व्यंकट रेड्डी नायडू, श्री.गजानन रघुनाथ पाठक व लक्ष्मण सुखनंदन शर्मा हे चौघे पुढाकार घेत असत.

(१.टिळक भक्तांच्या गुप्त मंडळ्या : डॉ.य.दी.फडके : केसरी, सोलापूर दि.२८ जूलै १९८५.)

इ.सन १९०८-९ चे काळातच कलकत्त्याच्या माणिकतोळा बॉम्ब केसमध्येही लेले यांचे नाव येते. अर्थातच १८९६-९७ ते १९०८-९ किंवा १० या काळात श्री लेले यांनी योगविद्या हस्तगत केली व क्रांतिकार्यातही भाग घेतला असे दिसते. १९०९-१० नंतर मात्र ते पूर्णपणे अध्यात्म व योग या विषयातच रममाण झालेत व त्यांना लेले महाराज या नावाने लोक ओळखू लागलेत व त्या नावाने ते सर्वत्र संचार करीत. इ.सन १९३८ मध्ये २५ ऑगस्ट रोजी त्यांचे श्री क्षेत्र वाई येथे निधन झाले. त्यांच्या अस्थीची सातारच्या अवधुताश्रम मध्ये स्थापना केली आहे.

श्री लेले महाराज यांना संतती नव्हती. परंतु त्यांनी आपल्या भावाच्या आठ मुलामुलींच्या पोषण व शिक्षणाची जबाबदारी पार पाडली होती.

श्री लेले यांची कांन्ती गौर, डोळे निळे व तेजस्वी होते. मुखमंडळाचा भाग किंचित उभट व दोन दात पुढे दिसत असत. उंची सुमारे पाच फूट होती व त्यांच्या उजव्या भागात कंप होता. चालतांना ते झपाट्याने चालत. जीवनाच्या शेवटच्या आठ वर्षात ते वाई ला होते. त्यांचा पोषाख धोतर, मोठा सदरा व टोपी असा असे.त्यांना बाराक्षार चिकित्सेचे ज्ञान होते. त्यांच्यात काही दैवी गुण होते.

(राजश्री शाहू आणि क्रांतिकारक : राजश्री शाहू गौरव ग्रंथ : १९७६.)

संदर्भ :- १. श्री लेले महाराज : जीवनदर्शन : बा.म.दिक्षित १९७१

२.योगेश्वर श्री लेले : लेखक-प्रकाशक जमीयतराम वजेशंकर आचार्य : श्री राष्ट्रकल्याण प्रभुतत्व प्रचारक ग्रंथमाला : हळवद (सौराष्ट्र)

३.श्री मुजूमदार,बडोदे यांचे पत्र.
४. क्रांति के चरण : प्रयागदत्त शुक्ल :
५. अर्वाचीन चरित्र कोश : चित्रावशास्त्री :
६. राजश्री शाहू गौरव ग्रंथ : १९७६. (म.रा.शिक्षण विभाग)
७. टिळक भक्तांच्या गुप्त मंडळ्या : डॉ.य.दि.फडके.
८. दै.केसरी, सोलापूर दिनांक २८ जूलै १९८५.
९. चित्रमय जगत. स्वातंत्र्यदिन विशेषांक.१९८५

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज

तुकडोजी चे मूळ नाव माणिक. वडलांचे नाव बंडोजी ठाकूर ब्रम्हभट. आजीचे नाव मंजुळाबाई . माणिकचा जन्म यावल गावी झाला. हे गाव पुढे फार मोठे आंदोलन झाले त्यामुळे प्रसिध्दीस आले. जन्माच्या वेळी तुकडोजींचे घर तुफान वादळात उध्वस्त झाले. तो दिवस २४ एप्रिल इ.सन १९०९ हा होता. कुटुंबात मूळचेच दारिद्रय होते. बंडूजी शिवणकाम करीत. वृत्तीने वारकरी होते. माणिकचे बालपणापासूनच अभ्यासाकडे लक्ष नव्हते. प्राथमिक शाळेत जेमतेम अक्षर ओळख झाली, अन् माणिकने शालेय शिक्षण सोडले. त्याचे खेळाकडेहि लक्ष नव्हते. पण धार्मिक व अध्यात्मिक वृत्ती होती. हे परवडणार नव्हते. घरी नेहमी पाणउतारा होत असे. अखेर तो आजोबाकडे गेला. वरखेड ला देखील स्थिती फारशी चांगली नव्हती. माणिकचा जन्म संत आडकोजी महाराजांच्या कृपाशीर्वादाने झाला होता. ते विदर्भख्यात आणि लोक त्यांना अवलिया संत म्हणत असत. वरखेडला माणिकने संत आडकोजी महाराजांना प्रथमच पाहिले. मन मुळातच श्रध्दाळू व भाविक होते. त्यामुळे संतचरणी आश्रय मिळाला. निस्वार्थपणे, निर्हेतूकपणे गुरुची सेवा केली. परिणामी प्रसाद म्हणून माणिकला त्यांनी कवीत्व शक्ति प्रदान केली. माणिक स्वत:ला तुकड्यादास असे नाव घेवून कवने रचू लागला. संतश्रेष्ठ प्रज्ञाचक्षू गुलाबराव महाराजांचे दर्शन घडले. त्यांचा आशीर्वादही लाभला. कवितेत माधुरी आली. साधेपणा मूळचाच होता. खंजिरी व वीणा घेवून तुकडया हिंडे, कविता गायी. अभंग व भजन, भारुड बग रचून गायी. यात्रा सुरु झाली यात्रा करीत वारकऱ्यांच्या

सोबत श्री क्षेत्र पंढरपूरला गेले. पांडुरंगाचे दर्शन घेतले. आणि अचानक आई वडिलांची आठवण झाली. विठ्ठल रखुमाईच्या ठिकाणी मायबाप दिसणे, हयासाठी तुकडोजीचे डोळे हवेत.

सर्व काही बाजूला ठेवून परत आपल्या मूळ गावी यावलीला परतले. आईवडिलाची सेवा हे व्रत घेतले होते. उदरनिर्वाहासाठी वडिलांचाच व्यवसाय होता, तो चालू केला. दोन वर्षे आईवडिलांना सुख दिले. आईवडिल कौतुक करीत होते.घरात चिमण्यांना घालायला चार दाणे सापडू लागले. अन् कसचे काय ! एक दिवस तुकडया घरदार सोडून रामटेकला निघून गेला. मन स्थिर नव्हते. पण स्थिरतेकडे शांततेकडे, अध्यात्माकडे ओढ घेत होते. तेथे श्रीक्षेत्र रामटेकला एक योगी भेटले. ध्यानधारणा,मनन चिंतन हया योग्याच्या सहवासात एका गुहेत सुरु झाले. एक अवलिया फकीर भेटला. त्याने तुकडोजीला मंत्र व तंत्र विद्या शिकविली. असे ऐकिवात आहे की, कोणाला तरी विषप्रयोग करुन पाहावयाचा होता. त्याला नेमका तुकडयादास सापडला. विषप्रयोग झाला. प्राण कसेबसे वाचले. पण मातेच्या नावाप्रमाणेच असलेला. मंजुळ आवाज एकदम रखरखीत, खडबडीत झाला. त्याला पुन्हा पुन्हा रियाझ करुन मार्गावर आणले. तेथून तुकड्या चिमूरला आला. भजन सुरु झाले. लोक त्यांना देवबाप्पा म्हणू लागले. मर्दानी मधूर आवाजावर लोक भूलून गेले. अगणित लोकांचा समूह नागासारखा डोलू लागला.

इ.१९२५ मध्ये तुकडोजींनी लोकांच्या मदतीने भारतदर्शन कार्यक्रम आखला. भारतातील लोकांची आर्थिक सामाजिक स्थिती नजरे खाली आली. कार्याला नवीन दृष्टी आली.समर्थ रामदास स्वामींनादेखील हा दृष्टीकोण भारत भ्रमणानंतर आला होता.खेडया खेड्यातील गोरगरीब शेतकऱ्यांसाठी काही करावे, असे ठरविले, विदर्भच नव्हेतर महाराष्ट्रभर नाव झाले. इ.१९३६ साली म.गांधीजींचे दर्शन घडले. त्यांच्या सांगण्यावरुन काही दिवस सेवाग्रामला सहवास घडला. तत्पूर्वी १९३५ मध्येच तुकडोजींनी मोझरी येथे आश्रम स्थापन करुन तेथे आपल्या ग्रामविकास चळवळीचे केन्द्र बनवले. माणसे घडू लागली. १९४२ च्या आंदोलनात तुकडोजी सह अनेकांना

कारावास घडला. परंतु नामदार ना.भा.खरे त्यावेळी व्हाईस राय कौंसिलात होते. त्यांच्या आग्रहावरुन तुकडोजीसह अन्य अनेक देशभक्तांची सुटका करण्यात आली. त्यांची "आते है नाथ हमारे!" ही कविता जप्त करण्यात आली. कारण हया कवितेने लोकांना स्वातंत्र्य आंदोलनात भाग घेण्यास प्रोत्साहन मिळाले असे सरकारचे म्हणणे होते. तुरुंगातून सुटल्यावर त्यांनी विश्वशांति सप्ताह सुरु केला. पाठोपाठ १९४३ मध्ये श्री गुरुदेव मासिक सुरु केले. तसेच गुरुदेव सेवामंडल सुरु केले.

ठिकठिकाणी भाषणे, भजन, कीर्तन करीत देशभर फिरले, पुस्तके लिहिली. त्यांची ग्रामगीता फार लोकप्रिय झाली. त्यांनी पशुहत्येचा निषेध केला. हरिजनांसाठी मंदिरे बांधली. नसबंदी, दारुबंदीसाठी दौरे केले. आपल्याला साधूंचे साह्य व्हावे म्हणून अखिल भारतीय साधूसमाज स्थापन केला. प्रयागला कुंभमेळयाच्या वेळी विश्वहिंदू परिषदेच्या स्थापनेत सहभागी झाले. जागतिक सर्वधर्म परिषदेत इ.१९५५ साली भारताच्या वतीने भाग घेतला.इ.१९४४ साली जागतिक शांतता परिषदेसाठी प्रतिनिधी म्हणून गेले होते. अठरा देशांनी त्यांना मार्गदर्शक म्हणून मान्यता दिली. राष्ट्रपतींनी त्यांना राष्ट्रसंत ही पदवी दिली. त्यांनी फार दगदग सोसली. कँसरची व्याधी जडली. सर्व औषोधोवचार व्यर्थ ठरुन त्यांचे दि.११-१०-१९६८ रोजी देहावसान झाले. आपल्यासारख्या यातना दुसऱ्या कोणाला भोगाव्या लागू नयेत म्हणून त्यांनी कॅन्सर संशोधन केंद्र काढण्याची प्रेरणा समाजाला दिली.

कविता

राष्ट्रसंत श्री.तुकडोजी महाराजांचे उज्वल लोकशाही बाबत विचार

निवडणुकीची चालू प्रथा हीच मुळी सदोष पाहता।
म्हणोनि योग्य दृष्टी द्यावी समस्ता। गाववासियांना॥
सेवेची ही नैतिक सत्ता। वजन मिळविल गावहिता।
मग कोणी विरोध तत्वता न टिके तेथे॥
टाकूनि दाब कोणावरी। लालुच दावूनी करीती फितूरी।
विध्ने आणिती सत्कार्यावरी। होतील दूर ते सर्व॥

सेवा संघटनेचा प्रमुख । तो निवडोनि देता चोख ।
हळूहळू गां । होईल सुरेख । सर्वतोपरी ॥
श्रोतेजन म्हणती ठीक हे सारे । परिगांवी आले निवडणूकीचे वारे ।
तेणे गांव आमुचे भरी भरे । भलतैशाची प्रकारे ॥
स्वार्थापायी सेवा-विरोध । करणारे जे गावचे मैंद ।
ते नाना मार्गे करिती बुध्दिभेद । जनतेचा तयेवेळी ॥
तेथे आम्ही काय करावे । गांव कैसे सुधारावे ? ।
यांचे समाधान ऐकावे । श्रोतेजनहो! ॥
जीवनाची जबाबदारी । किती आहे निवडणुकीवरी ।
हे पटवोनि निवडणूक खरी । करवावी न गोंधळता ॥
विचार केलिया हळूहळू । अपैसाची मार्ग ये कळू ।
निवडणूकीचे ताव जाता आकळू । मिटेल गोंधळ सहजचि ॥
अहो! पुढारीपण कशाला ? । सेवा गावाची करावयाला ।
मग सेवेची कसोटी लावा की आपुला । समजेल पुढारी कोण तो ? ॥
कोण गावासाठी झटे । कोण उठतो रोज पहाटे ।
घेऊनि हातामाजी खराटे । झाडतो कोण ? ॥
साध्या राहणीने दिवसभरी । कोण गरिबांचे काम करी
कोण पायी फिरोनी करी वारी । गावाची आमुच्या ? ॥
कोण नीतीने असे चांगला । पक्षपात न आवडे कोणा ? ॥
छदामासि नसे लाजीम झाला । गाव-निधीच्या ॥
कोण सर्वांचे पाहतो सुख-दु:ख। कोणाचे दिसे सेवेसाठी मुख ?॥
ही त्याची जाणावी ओळख । निवडावयासाठी ॥
किंवा सकळांना सांगा काम । सोडा हुकूम आपला बेफाम ।
कोण पहा न करिता आराम । काम करी गावसेवेचे ॥
मग तोची म्हणावा पुढारी । आंधळाही त्याची निवड करी ।

येथे कासयास ही टिमकी भरजरी । जाहिरातींची ? ॥
कोण गावाची सेवा करतो । कोण प्रतिष्ठेसाठी मिरवितो ?।
सांगावा प्रसंग येता स्पष्ट तो । गावामाजी ॥
प्रतिष्ठेसाठी सेवा नोहे । ती स्वाभाविक हौसची आहे ।
आत्मसमाधान हेची राहे । पूर्ण फळ तिथेची ॥
ज्यासी गांवाचा जिव्हाळा । जो कार्यज्ञानाचा पुतळा ।
तोची सुख-समृध्द करील गाव सगळा । निवडोनी देता ॥
ऐसे न करता भांडणे माजती । गावाची होईल अनावर स्थिती
मग फावेल स्वार्थी जनाप्रती । सज्जन राहती वेगळेची ।
यासाठी उत्तम गुणी निवडावा । ज्याची सर्व करिती वाहवा ॥
गावाचा बागडोर त्यासी द्यावा । अपुला पुढारी म्हणोनिया ॥
एरव्ही पैशाचे मिळाले तीन । देती भराभरा भाषण ।
न बसावे कोणाचेही मन । तयांवरी ॥
ऐसे पुढारीपण जेथे दिसे । गावाने लावूनि न घ्यावे पिसे ।
जो ईमानदार सेवक असे । तोची समजावा गावधनी ॥
तोची करावा पुढारी । एरव्ही पडो नये कुणाच्याही आहारी ।
धन वेचतो म्हणोनि गावाधिकारी । करु नये कोणाशी ॥
पुढारीपण सेवेनेच मिळे । हेची बोलावे मिळोनि सगळे ।
तेथे पक्षबाजीचे चाळे । वाढोची न द्यावे ॥
नाती-गोती, पक्ष-पंथ । जात-पात, गरीब श्रीमंत ।
देव घेव भीड-मुर्वत । यासाठी मत देऊची नये ॥
भवितव्य गांव अथवा राष्ट्राचे । अपुल्या मतावरीच साचे ।
एकेक मत लाख मोलाचे । ओळखावे याचे महिमान ॥
'मत' हे दुधारी तलवार । उपयोग न केला बरोबर ।
तरि आपुलाची उलटतो वार । आपणावरीच शेवटी ॥

दुर्जन होतील शिरजोर । आपुल्या मताचा मिळता आधार ।
सर्व गावास करितील जर्जर । न देता 'सत्पात्री मतदान' ॥
मतदान नव्हे करमणूक । निवडणूक नव्हे बाजार-चुणूक ।
निवडणूक ही संधी अचूक । भवितव्याची गावाच्या ॥
निवडणूक जणू 'स्वयंवर । ज्या हाती देणे जीवनाचे बागडोर
त्याची लावावी कसोटी सुंदर । सावधपणे 'तुकड्या म्हणे' ॥

(इति 'श्री ग्रामगीता' ग्रंथपंक्ती)

संत सत्पुरुष नी अच्युत महाराज

श्री संत अच्युत महाराजांनी महाराष्ट्रात लोकशिक्षण, जागृती, कुष्ठ सेवा, राष्ट्रीय एकात्मता, व उद्याच्या उज्ज्वल निर्मितीसाठी गेली अनेक वर्षे सातत्याने कार्य केले आहे. त्यांच्या आयुष्यातील प्रत्येक दिवसाला मेहनतीचे, प्रेमाचे, कारुण्याचे, मानवतेचे वलय आहे. त्यांच्या विधायक कार्याचे निरोगी, निर्दोष पोत सर्वांना आवडते असे श्री बाबा आमटे सांगतात. पूज्य श्री दाजीसाहेब पटवर्धन म्हणतात की पूज्य श्री अच्युत महाराज यांनी अखंडपणे समाज प्रबोधनाचा ज्ञानयज्ञ सुरु केलेला आहे. दिनदु:खी क्रुष्ठ, रुग्ण-अपंग यांच्या सेवेचा संदेश त्यांच्या मार्फत समाजाला सतत मिळत राहील दिन-दु:खी आर्त ह्यांच्या सेवेतच प्रभूचे दर्शन आहे, हा कर्मयोग ते स्वत: आचरणात आणीत आहेत. हे अनुकरणीय आहे. व ते आपणा सर्वांना मार्गदर्शन करणारे आहेत. प्रा.राम शेवाळकर लिहितात की, ज्ञान, भक्ती व कर्म या तीनही योगांचा योग्य समन्वय श्री संत अच्युत महाराजांचे ठायी झाला आहे. त्यांच्या भक्तीला कर्माचे अवयव आणि ज्ञानाचे डोळे आहेत. त्यांची वाणी प्रसाद प्राप्त व रससिध्द आहे. आचरण ईश्वर परायण असल्यामुळे नेहमीच समष्टीचे उन्नयन करण्यात ते समर्थ आहेत. रिकामा जावू नेदी क्षण ही समर्थ उक्ती त्यांच्या जीवनात सार्थ ठरते. त्यांनी आतापर्यंत संस्कृतातील अनेक धर्म ग्रंथांचे,स्त्रोत्रग्रंथाचे व मंत्रग्रंथांचे सुरस व सरस भावानुवाद मराठीत केले आहेत. आयुष्यातील जागृतीचा प्रत्येक क्षण हा आध्यात्म साधनेत ईश्वर चिंतनात, समाजाच्या उद्‌बोधनात अथवा साहित्य निर्मितीत खर्च व्हावा हे त्यांचे व्रतच आहे. प्रा.अ.स.जोशी

यांनी त्यांचा गौरव करतांना म्हटले आहे की, सध्याच्या कलह युगात, सद्विचारांची व सदाचरणाची सर्वत्र पडझड सुरु असतांना भारतीय जीवन मूल्यांची ऐन तारुण्यात कठोर उपासना करुन त्यांचा आदर्श सर्वासमोर प्रयास पूर्वक ठेवणारी जी श्रेष्ठ माणसे मला आठवतात, त्यात श्री संत अच्युत महाराजांची गणना करता येते. आजन्म ब्रम्हचर्य , ईश्वरचिंतन व प्रबोधन यासाठी त्यांचे आयुष्य खर्च झाले आहे. भक्ती म्हणजे सर्वाभूती प्रेम असा कळवळा ठेवून ते लाभावीन प्रीती करतात.

याप्रकारे सर्व विद्वान व कर्तबगार मंडळी ज्यांचा गौरव करतात. त्या संत अच्युत महाराजांचा दिनांक २७-१-१९२४ रोजी (पौष वद्य षष्ठी,शके १८४५) रविवारी, सूर्यास्ताचे मुहुर्तावर हस्ती नक्षत्रावर जन्म झाला. जन्मस्थान वरुड. आईचे नाव अन्नपूर्णा व वडिलांचे नाव श्रीधर. कुलदैवत श्री व्यंकटेश स्वामी. मूळचे सधन कुटूंब पण परिस्थितीमुळे हलाखी प्राप्त झाली कुटुंबात शिक्षणावर भर देण्याची प्रथा असल्यामुळे तशाहि स्थितीत ते चिकाटीने शिकत राहिले. व १९३७ साली ते मॅट्रिकची परिक्षा उत्तीर्ण झाले.हया वर्षी चातुर्मास कालखंडात राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांशी त्यांचा सहवास घडला. आणि अच्युतराव अध्यात्माकडे वळले. त्यांच्या वडील बंधुचे नाव श्री रामराव व त्यांचे अडनाव वकील असे आहे. कनिष्ठ बंधूचे नाव व्यंकटेश. अच्युत महाराजांनी श्री क्षेत्र कौंडण्यपूर येथील जगन्माता रुख्मिणी देवीच्या मंदीराचा जीर्णोध्दार केला. त्यांचे वैशिष्ट्य असे की , ते जातीयता , उच्च नीच भाव, गरीबी श्रीमंत यापेक्षा सुस्वभावास अधिक महत्व देतात. मानवतेला महत्व देतात. त्यांना एखादया संप्रदायात कोंडणे इष्ट नाही पण वैश्विक विशालतेच्या कसोटीवर घासून पाहता महाराज आदर्श हिंदू संस्कृतीचे उपासक वाटतात.ॐ सर्वे वै सुखिन : सन्तु ॥ सर्वे भद्राणि पश्यन्तु । मा कश्चित दु:ख भाग्भवेत ॥ ही हिन्दू संस्कृतीची चिर प्रेरणादायी शिकवण आहे. ते उच्च ज्ञानभक्तीने संपन्न असले तरी व्यावहारिक जीवनाकडे दुर्लक्ष करीत नाहीत. सर्वांशीस्नेह, परोपकारी प्रेमळ वृत्ति, आणि साधी राहणी ते अवलंबितात. त्यामुळे त्यांचा चाहता वर्ग सर्वत्र आहे. राष्ट्रसंत तुकडोजी 'हर देशमे तू । हर भेष मे तू' असे म्हणत. संत अच्युत महाराजांनी ती म्हण उरीपोटी बाळगली. महारोग्यांना सारे जग तुच्छ मानते. पण

महारोगाविषयी अज्ञानामुळे लोक त्यांना हिडीस फिडीस करतात. त्या रोगाविषयीच्या भ्रामक कल्पना अच्युत महाराज प्रवचनातून मांडतात. गैरसमज दूर करतात. महारोग्यांना धीर देतात. त्यांच्या विशाल कार्यक्षेत्राकडे पाहून

तेरे सामने आसमा औरभी है।

सितारोंसे आगे जहां और भी है।

हे इक्बालचे शब्द आठवतात.

एकदा श्री संत अच्युतकुमार (मौनीबाबा) वरखेडाला आले होते. श्री अच्युत महाराजांनी त्यांचे दर्शन घेतले व अनेक शंका विचारल्या. त्या शंकांचे निरसन मौनी बाबांनी केले. (अर्थात चिठ्ठी लिहून देत असत.) झाली परिस्थिती कारण धरावया एकांती मुद्राध्यान ! हरिसंकीर्तना कडे मन ओढ घेऊ लागले. वाटचाल सुरु झाली खरी. यात्रा, भ्रमण हे हि सुरु होते. मार्गात एके ठिकाणी पितृछत्र हरपले. कशात मन रमेना शाळा वगैरे सोडून देऊन निसर्गाच्या विशाल चिंतन विद्यालयात प्रवेश केला. संस्कृताध्ययन केले. संकटे का उद्भवतात यावर चिंतन सुरु झाले. संत तुकडोजींनी शंकांचे निरसन केले. तुकडोजींनी सांगितले हिरा ठेविता ऐरणी वाचे मारिता घनी सोशी जगाचे आघात जाणावे तोची संत'. राष्ट्रसंतांनी '' तुझा राम तुला मिळेल''. असा आशीर्वाद दिला. एकान्त भक्तीसाठी अरण्यवास पत्कारण्याची उर्मी होती, तिला वळण लावले. आणि वर्धा सूर्यगंगातीरी पर्णकुटी बांधून दिली. स्वत: मधून मधून भेटीदेवून अध्यात्म मार्गाची दिशा लावून दिली. ध्यान, धारणा, प्राणायम, समाधी यांचे ज्ञान करुन दिले. 'गुरुकृपाही केवलम् सु आर्त भक्त तारकम् ' याचा अच्युत महाराजांना प्रत्यय आला. जन्मोजन्मी दुर्लभ असलेला एक सुवर्णक्षण ह्या आयुष्यात अवतरला. पंचतत्वाशी एकरुप होण्याचा तो मंगलक्षण पातला. अंतरीचा ज्ञानदीप उजळला. जिवा शिवा चे ऐक्य क्षणमात्र भोगले. कणा कणात चैतन्याचा अवतार जाणवला. चराचर चिदानंदमय संवेदिले. 'सोऽ हं' 'अहं ब्रम्हास्मि' चा प्रत्यय आला.

धार्मिक विधी विधान ही केले. पंढरपूरला अष्टग्रही यज्ञ केला. पुर्णाहूतीच्या समयी त्यांना अग्निनारायणनाला आलिंगन देण्याची इच्छा झाली. क्षणार्धात उन्मनी

अवस्थेत गेले. देह यज्ञ कुंडात झोकून दिला. भाविकांनी बाहेर काढले. आत्मिक तेज अग्नि परीक्षेतून तावून सुलाखून लखलखू लागले. त्याची प्रतिछाया शरीरावर उमटली उन्मनी अवस्था लोप पावली. 'आपण काही तरावया ' हे केले. पण आता आत्मविकासाची अवस्था होती.'जगाच्या कल्याणा संताच्या विभूती' हे जाणवले. गुरु स्वराज्याला सुराज्य बनविण्याचा खटाटोप करीत होते. तेच कार्य वेगळ्या स्वरुपात अच्युत महाराजांनी प्रारंभिले. ज्या धर्मग्रंथांनी भारत अध्यात्मिक, स्वरुपात घडविला, भारताला उत्तुंग ज्ञानवैभव, विचारवैभव, संस्कृती वैभव प्राप्त करुन दिले, त्या धर्मग्रंथाचा मराठी अनुवाद करुन सामान्य जनांना त्यांचा जवळून परिचय करुन देण्यासाठी ते सिध्द झाले. धर्मग्लानी दूर व्हावी हा उद्देश होता. ह्या महान ऐतिहासिक कार्याचा प्रारंभ त्यांनी श्री भागवत ग्रंथापासून केला नंतर महाभारत ग्रंथ घेवून पाच खंडात मराठीत आणले. नंतर संगीत अध्यात्म रामायणाची निर्मिती केली. त्या पाठोपाठ दुर्गासप्तशती चा अनुवाद केला. एकंदर एक्कावन संस्कृत ग्रंथांचा सुबोध मराठी पद्यात अनुवाद केला. शिवाय समाजापासून ते फटकून वागले नाहीत. खेडयातील माणूस , स्त्री जीवन, विनाशाचे मोह , स्वातंत्र्योपासना, अल्पबचत, पर्यावरण इ. विषयांवर लेख प्रसिध्द झाले आहेत. या विराट ग्रंथाच्या रुपाने , आपला उध्दार आपण करुन घेण्याचे महत्वपूर्ण साधन आपणाजवळ असतांना त्याचा आपणांस विसर पडतो आहे, म्हणून सर्वसामान्यजनांना समजेल, उमगेल अशा मराठीत त्यांनी हे अनुवाद आणले. भारतीय संस्कृतीची अस्मिता जागृत व्हावी, भारतीयांचा नैतिक अध:पात रोखावा , मानव ज्ञातीला शांति मिळावी, अवघे विश्व सुखी व्हावे, या दिव्य मंगल हेतूने अच्युत महाराजांनी श्री सरस्वतीची उपासना केली. आणि फळे देशाला समर्पित केली. ते विश्वहिंदुपरिषदेत ही सक्रीय सहकार्य करतात. आरतीत मिळणारे द्रव्य कुष्ठ निवारण कार्य करणाऱ्या तपोवनला देतात. दान,देणग्या यांचा उपयोग मंदीराच्या जीर्णोध्दारासाठी करतात.

मानवातील मानवत्व जागवणे हे त्यांचे व्रत आहे. आज पंचाहरतीला आलेला हा तरुण संत अमरावतीचे संतरत्न ठरला आहे.

अंधारातून प्रकाशाकडे - सद्‌गुरु श्री आंबेडेकर महाराज :

अमरावतीत संत आर्वीकर महाराज, लेले महाराज, दादा पांडे महाराज, संत श्रेष्ठ गुलाबराव महाराज, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, संत गाडगेबाबा , संत अच्युत महाराज, श्री अंबाडेकर महाराज, संत ताई महाराज, इ.थोर सत्पुरुष झाले.

अमरावती जिल्हयातील मोर्शी तालुक्यातील अंबाडा हया गावी जयरामजी खांडेकर व त्यांची पत्नी सावित्री राहत असत. घरची गरीबी, सुवर्णकाराचा व्यवसाय होता. पण तरीही उदरनिर्वाहार्थ मोल मजूरी करावी लागे. त्यांना दोन मुले झाली. पहिला नामदेव, दुसरा महादेव.

महादेव चा जन्म दिनांक १ ऑगस्ट १९१५ हया दिवशी झाला. आईवडिलांचे सात्विकतेचा व धार्मिकतेचा सुसंस्कार होवून ते ईश्वरभक्त साधक बनले. कसेबसे चौथी पर्यंतचे शिक्षण झाले. महादेव १३ वर्षाचा असतांना अंबाड़ा गावी एक आत्माराम सुनामे नावाचा अवलिया आला. हा बेलकुंडवाले रामानंद महाराजांचा शिष्य होता. त्यांच्या अल्पशा सहवासाने महादेवाला साधुसंतांच्या सेवेची, अध्यात्माची, भक्तीची गोडी लागली. आत्माराम बाळा कडूनिंबाचा पाला खावून जीवन व्यतीत करीत असे. म्हणून महादेवही कडूनिंबाचा पाला खावून जीवन व्यतीत करु लागला. शेतात कष्ट करीत असे. एके दिवशी शेतावरुन काम करुन येत असता एका घरी खूप गर्दी दिसली. एक रामानंद महाराज तेथे आले होते. ते दादाजी महाराज धुनीवाले यांचे शिष्य होते. त्यांच्या चेहऱ्यावर अप्रतिम तेज होते. ते परमहंस अवस्थेत असल्या सारखे शांत, सात्विक दिसत असत. त्यांना जेवण्यासाठी ताट वाढून आणले. पहिला घास खालल्यावर दुसरा घास हातात घेवून ते गर्दीत महादेव उभा होता. त्याच्या तोंडात घास भरवला. त्यादिवशी एकादशी होती. उपवास होता. पण सत्पुरुषांनी घास भरवला. त्यांना नाही कसे म्हणावे? हा प्रसाद होता. महादेवाच्या अंतरंगात प्रकाश उजळला.

वयाच्या पंधराव्या वर्षी पाटणे गावातील मोतीरामजी व सरस्वती बाई यांची ९ वर्षाची गीता नावाची कन्या होती. तिच्याशी महादेवचा विवाह झाला. एकीकडे गुरुच्या मार्गदर्शनाची ओढ इकडे संसाराची जबाबदारी. साधुसंताच्या गाठीभेटी होत

होत्या. मन भक्तीप्रवण होते. एकेदिवशी अंबाडी गावात बहिरमच्या जनाबाई नावाच्या साध्वी विभूती आल्या. त्यांच्या भेटीत त्यांनी महादेवला सांगितले की, विवरा गावचे श्री जयराम उर्फ भामटी महाराज तुझ्या मनाचे समाधान करतील. काही दिवसांनी करजगांवला भामटी महाराज आले. हे कळल्यावर महादेव तेथे गेला. भामटी महाराजांचे प्रवचन ऐकले. महादेवला मन:शांती लाभली. महादेवच्या आग्रहावरुन भामटी महाराज अंबाडयाला आले. ते एकोणवीसशे बत्तीस साल होते. भामटी महाराजांना गुरु करुन महादेवने माळ घेतली. तसे अनेक गुरु होते. पण ज्या गुरुपासून आत्मज्ञान लाभले तो खरा गुरु. गुरुभक्तीचा ध्यास होताच. मन:शान्ती लाभली. काही काळाने मातापित्यांना स्वर्गवास प्राप्त झाला उदरनिर्वाहार्थ जेष्ठ बंधू कडे यावे लागले. शेवटी दारिद्रयाला कंटाळून गाव सोडले व मोर्शी ला आले. पांढरी येथे दहा रुपये महिना पगारावर एका तेलगिरणीत काम केले. भरीत भर म्हणजे एक कन्या जन्मास आली. तेथे काम दिवसभर करुन घेत असत. त्या मानाने पगार काहीच मिळेना. नाईलाजाने ती नोकरी सोडून कुटुंब सावरगावला मामाकडे आले. तेथे वर्षभर राहिले. काबाड कष्टाला अंत नव्हता. देव परीक्षा पहात होता. सावरगांव सोडून पुन्हा अंबाडा गावी आले व काबाड कष्ट करुन जगू लागले. इह.१९२६ साली एके रात्री महादेव आळंदीला जाण्यासाठी निघाला. चालत विवरागावी भामटी महाराजांकडे आला. आठवडाभर राहून आळंदीकडे निघून गेला.तेथे सिध्दबेटावर राहून साधना केली. जेमतेम शिक्षण झालेले होते. जेवण्याखाण्याची अन् राहण्याची प्रचंड गैरसोय सोसून ज्ञानेश्वरीची एकशे आठ पारायणे केली. तेथे एक अतिशय थरारक अनूभव आला. सिध्द बेटावर नाना महाराज साखरे यांची समाधी आहे. त्याठिकाणी महादेव रात्री झोपत असे. एका रात्री पायाला गारगार काही लागले. चटकन उठून पाहतो तो चोहोबाजूंनी पुराचे पाणी! पुराचे ते भयानक दृष्य पाहून महादेवची घाबरगुंडी उडाली. पण काय करायचे ? तो अतिभक्तिभावे गुरुमाउलीला शरण गेला. आता तुम्हीच तारा अथवा मारा, असे म्हणून गुरुमाउलीच्या समाधीला मिठी मारुन बसून राहिला. थोड्यावेळाने पाणी कमी झाले.आणि जीव वाचला.

त्यावेळी महादेवला आतून साक्षात्काराप्रमाणे सूचना आली की, जेथून आलास

तेथे परत जा. आदेशाप्रमाणे श्री ज्ञानेश्वर माउली चे दर्शन घेवून आळंदी सोडली. विवरा येथे भामटी महाराजांकडे परत आले. हा घरुन कोणाला न सांगता निघून गेला होता हे त्यांना कळले होते. त्यांनी उपदेश केला की, घरी परत जा. बायका मुलांचे पोषण कर. संसार कर. एके दिवशी जवळ बोलावून त्याच्याकडे सूक्ष्म दृष्टीने पाहिले. स्वत: मध्ये असलेल्या सर्व खुणा त्यांच्या ठिकाणीहि जाणवल्या. तेव्हा महाराजांना करुणा वाटली. वाणीला , बुध्दीला अगम्य असे काहीतरी त्यांनी महादेवाला द्यायचे असे ठरविले. आणि हेतूपुर्वक आलिंगन दिले. 'हृदया हृदयी एक झाले! ये हृदयीचे हृदयी ते ठेवीले। द्वैत न मोडिता केले। आपणा ऐसे अर्जुना (१८-१४२) एका दिव्याने दुसरा दिवा लावला. महादेवच्या अंतरी दिव्य प्रकाश उजळला. जीवन कृतार्थ झाले. सारे पुण्य फळाला आले. याच साठी अट्टाहास होता. थोडा आध्यात्माचा, थोडा प्रपंचाचा उपदेश करुन जयराम स्वामींनी त्याला घरी रवाना केले. महादेव अंबाडा येथे परत आला. त्याच्या माघारी कन्या स्वर्गवासी झाली होती. पत्नी फार धीराने कबाड कष्ट करुन जगत होती. गावात आनंद झाला. घर पुन्हा नांदू लागले. संसार सुरु झाला. लीला,शकुंतला,सिंधु,शोभा अशी चार कन्यारत्ने उदरी जन्मली. अभ्यास सतत चालू होता. आयुर्वेदाचे ज्ञान संपादन केले. सरकारकडून वैद्यकीय व्यवसायची परवानगी मिळविली. आणि व्यवसाय चालू केला. स्वत: आयुर्वेदीय औषधे तयार करण्याचा कारखाना सुरु केला. परमामृत औषधालयाचे नाव सर्वतोमुखी झाले.

आता हल्ली कारखाना बंद केला आहे. वैद्यकीय व्यवसाय करतात. अति रसाळ, ललीत भाषा, ज्ञानेश्वरी चा प्रसाद अन् गुरुकृपा या भांडवलावर अमृतासारखी गोड कीर्तने करतात. हजारोंचा जनसंमर्द नागासारखा डोलतो. प्रवचने करतात. अंतिम झेप अज्ञाताकडे , ग्रामगीता , हे ग्रंथ लिहिलेत व प्रकाशित झाले आहेत. आता जग त्यांना श्री संत अंबाडेकर महाराज या नावाने ओळखते. स्वत: काही नवीन संशोधन करुन श्री ज्ञानेश्वरीवर ग्रंथ लिहिण्याचा संकल्प आहे.

दान, दक्षिणा, मिळते तो पैसा गोळा करुन अमरावतीला राजापेठ येथे तत्वज्ञान मंदिर उभारले आहे. विश्वस्त नेमले आहेत. ते कारभार पहातात. दोन दत्तकपुत्र आहे.

मुलींचे विवाह होवून घरोघरी गेल्या आहेत. सध्या डोळ्यापुढे धर्मार्थ दवाखाना, वारकरी शिक्षण संस्था इ. चालविण्याचा संकल्प उभा आहे.

अंबाडेकर महाराजांनी श्री भामटी महाराज चरित्र लिहून गुरुंना काव्यरुपाने वंदना केली आहे. तत्वज्ञान मंदिरात नित्य भजन पुजन कार्यक्रम चालतात. वारकरी सांप्रदायिक वर्ग घेतले जातात. आज वयाच्या ८२ व्या वर्षी त्यांचे डोळे अधू नाहीत, दात शाबूत आहेत , स्मरणशक्ती शाबूत आहे.

वारकरी संप्रदायाचा एकतारा त्यांच्या रुपाने चमकतो आहे.

संत अप्पाजी महाराज, आर्वी,जि.वर्धा :

उमरावती जिल्हयातील तळेगांव दशसहस्त्र येथील श्री राजेश्वर घाटे शास्त्रवेत्ते ब्राम्हण होते. ते फार सदाचरणी होते. त्यांच्या वंशात तिसऱ्या पिढीत (पणतू) दामोदर उर्फ आप्पाजी महाराज , यांचा जन्म झाला.

आप्पाजी महाराजांचा जन्म शके १९७२ (इ.स.१८३०) चा ते एकपाठी होते. त्यांनी उमरावतीचे राघवशास्त्रीयांचे कडे पंच महाकाव्य वाचली, पांडुरंग शास्त्री यांचे कडे व्याकरण केले. ते १६ व्या वर्षी भागवत सांगून सर्वांना नि:शंक करीत. ते श्रीकृष्ण भक्त होते.

आप्पाजींचे सासर उमरावतीस होते. तेथे एकदा आले असता मुरलीधराचे मंदीरात ब्रम्हचारी महाराजांचे त्यांना दर्शन झाले.

आप्पाजी महाराज दरसाल मथुरा, गोकुळ वृंदावनाची वारी करीत. दररोज वाचल्या शिवाय अन्नग्रहण करीत नसत. पुढे गुरुच्या आज्ञेवरुन ते आर्वीस रहायला गेले. आप्पाजीचा नातू , त्यास तात्याजी म्हणत. तात्याजीवर हि, ब्रम्हचारी महाराजांची कृपा झाली. ते जेव्हा उमरावतीला राहात तेव्हा त्याच्यासाठी मुरलीधर मंदीर बांधण्यात आले.

(पुरुषार्थ १९७६ एप्रील, पृष्ठ १७३. लेखक वै.दाणी.)

उपासनी महाराज उमरावतीकर :

अहमदनगर जिल्हयात, साईबाबांच्या प्रसिध्द शिर्डी क्षेत्राजवळ साकोरी नावाचे गांव आहे. हे गांव उपासनीमहाराजामुळेच प्रसिध्दीस आले. तेथे उपासनी बाबांचा मोठा आश्रम व दत्त मंदीर आहे. इ.स.१९३३-३४ चे सुमारास किर्लोस्कर मासिकांतून उपासनी बाबांवर अत्यंत कठोर अशी टीका झाली. त्यामुळे उपासनी महाराज सर्वदूर प्रसिध्दीस आले.

हे उपासनी महाराज दि.२५ सप्टेंबर १९३६ रोजी उमरावतीस आले होते. त्यांचा मुक्काम दादासाहेब खापर्डे यांचेकडेच होता. लोक उपासनी महारांजांना पोचलेले सतपुरुष मानीत, त्यांचा शिष्य परिवार मोठा होता.

इ.सन.१८९७ चे सुमारास श्री.काशिनाथ गोविंद उपासनी हे जळगांव (खांदेश) येथे वैद्यकी करीत असत. त्यांचे हातून चुकीचे औषध दिल्याचा गुन्हा होवून त्यांना ४ महिन्याची शिक्षा झाली होती.

त्यानंतर ते ''अमरावतीला गोविंद यु.सनाटेणेकर'' या नावाने प्रसिध्द होते व वैद्यकीचा धंदा करीत. नंतर ते शिर्डीला जावून राहिले (१९१०) या ठिकाणी ते उन्मत्त अवस्थेत होते. पुढे ते नागपूर व खोडकपूर ला गेले. नंतर त्यांना बरेच शिष्य मिळाले. साकोरीला मोठा आश्रम व दत्त मंदिर बांधले. त्यांनी अनेक मुलींशी लग्ने लावली. त्यांना गोपीरुप समजत साकोरीचे दत्त मंदीरात उपासनी बाबाचा फोटो आहे. त्यावर उपासनी महाराज उमरावतीकर असे लिहिले आहे. उपासनी महाराजांचे येथील वास्तव्यात शहरातील हजारो स्त्री वर्ग त्यांचे दर्शनासाठी दररोज जात असे. उपासनी बाबांना एकूण सात पत्न्या होत्या . पैकी सौ.गोदावरी बाई यांचा अध्यात्मात मोठा अधिकार असून आश्रमाची व्यवस्था त्यांच्याकडे होती. शिर्डीला असतांना त्यांनी दादासाहेब खापर्डे यांच्या जवळ बसून वेदाध्ययन, गीताध्ययन,पंचदशी, उपनिषदे यांचे अध्ययन केले होते. त्यांच्या वचनाचे संकलन करुन दादासाहेब यांनी '' उपासनी वाक्सुधा''हे पुस्तक प्रसिध्द केले. उपासनी वाक्सुधा च्या एकाखंडाचे इंग्रजीत भाषांतरही दादासाहेब खापर्डे ह्यांनी साकोरीस लिहून दिले आहे.

प्रज्ञाचक्षू परमपुज्य श्री गुलाबराव महाराज :

हे मूळचे माधानचे यांचे अडनाव मोहोड. बालपणी दृष्टी गेली. त्यामुळे शिक्षण झाले नाही. परंतू अनेक नामवंत ग्रंथरचना केली. जन्म दिनांक ६ जुलै, अठराशे ऐंशी. वडिलांचे नाव गुडाजी व आईचे नाव आलोकाबाई.चार वर्षाचे असतांना मातोश्रींचे देहावसान झाले. तेव्हा वडिलांनी द्वितीय विवाह केला. गुलाबला आजीने प्रेमाने वाढविले. शाळेत तो केवळ स्मरणाने अभ्यास करी. येथील लक्ष्मण भट जोशी यांचेकडे जाणेयेणे होते. त्यांनी त्याला श्री शिवलीलामृत व व्यंकटेश स्तोत्र वाचून दाखविले. तेव्हापासून गुलाबरावला ईश्वर चिंतनाची आस्था निर्माण झाली. त्यावेळेच्या प्रथेप्रमाणे गुलाबरावचा विवाह मनकर्णीकाबाईशी झाला. ही सितारामजी भोयर यांची कन्या. परंतु संसारापेक्षा गुलाबरावांचे चित्त आध्यात्माकडे अधिक होते. पांडुरंग पंत केशवराव पांडे , यांच्याकडे तो धार्मिक शिक्षण घेण्यासाठी जाई. ते त्याला पुस्तके वाचून दाखवीत. तेथे गुलाबरावांचे वेदांत शिक्षण झाले. संगीत, वैद्यक , वांङ्मय, तत्वज्ञान व विज्ञान यांचाही तो अभ्यास करी बालपणापासूनच योग व समाधी यांचा अभ्यास सुरु होता. आजीचा देहांत झाल्यावर सावत्र आईने त्याला घराबाहेर काढले. म्हणून रामचंद्र भाऊ त्यांचे शिष्य बनले होते, त्यांचेकडे राहावयास गेले. विष्णू भाऊ देखील शिष्य बनले. गुलाबरावांच्या ग्रंथ प्रेमाला सीमा नव्हती. नातेवाईक, चाहते, त्यांना पुस्तके खरेदी करुन देत. कधीकधी ते पुस्तके घेवून अरण्यात जात व पुस्तकांसोबत नाचत.

इ.सन.१९०० मध्ये एकदा स्वयं श्री.ज्ञानेश्वर माउलींनी त्यांना साक्षात्कार दिला व अनुग्रह दिला. स्वत:च्या नामाची दीक्षा दिली.

त्यानंतर ते शिरजगांव (कसबा) तेथे आले. व मधून मधून उमरावतीस येत असत. अमरावतीस त्यांचा मुक्काम श्री केवले सावकार अथवा श्री वासुदेवराव मुळे गुरुजी कडे असे. तेथे त्यांच्या दर्शनार्थ अलोट गर्दी होई. ते वेदवेदांता वर प्रवचन करीत. पत्रे लिहावयास सांगत ते प्रेमाचा संदेश देत. व शिक्षण देत. एकदा सत्यशोधक समाजाशी त्यांचा संपर्क आला. परंतू तेथे ब्राह्मणाचां द्वेष पुरस्कारल्या जातो, यावरुन त्यांनी सत्यशोधक समाज वर्ज्य केला. सर्व वर्णांच्या मध्ये, धर्मात, जात, पंथ यांच्यात

सुसंगती, सुसंवाद, समन्वय असावा असा आग्रह करीत. सर्वांचे मूळ व गंतव्य एकच आहे. मग द्वेष कशाला , असे ते म्हणत.

त्यांना प्रज्ञाचक्षू नावाने लोकमान्यता मिळाली. त्यांच्या पत्नीच्या देहावसाननंतर ते पूर्णतया विरक्त झाले. कथा,कीर्तन,प्रवचन यात त्यांनी उर्वरित काळ व्यतीत केला. अखंड लेखन करीत असत. प्रखर बुद्धिमत्ता, तपस्या योगसाधना , यामुळे त्यांना सर्व भाषांचे ज्ञान आपोआप झाले होते. त्यामुळे श्री.न.चिं.साहित्य सम्राट, त्यांना 'जीवंत ज्ञानकोष' म्हणत असत. श्री गुलाबराव महाराजांनी शिवदीक्षा ग्रहण केली. भाष्ये,निबंध,व्याकरण, सांख्ययोग, षड्दर्शने, साहित्य यावर अनेक पुस्तके रचली. व त्यातून निष्कर्ष काढला की, वरकरणी भेद दिसत असले तरी मूलत: धर्म ग्रंथ, संप्रदाय, एकच सांगतात, व सहिष्णूता, प्रेम यावर भर देतात. श्री गुलाबरावांनी पाश्चिमात्य, तत्वज्ञानाचा सखोल अभ्यास केला व भारतीय तत्वज्ञानाशी तौलनिक अभ्यास करुन निष्कर्ष काढला की, जगातील अन्य कोणत्याही तत्वज्ञानापेक्षा भारतीय विचार सरणी अधिक स्पष्ट व उच्च आहे. ते आत्मविश्वासाने '' अगाध माझी मति '' असे म्हणत. एकदा ऐकलेले ते कधी विसरत नसत. स्मरणशक्ती अगाध होती. त्यांनी चमत्कार व बुवाबाजीवर विश्वास ठेवला नाही. बुध्दिवादी होते. आत्मसंयमी होते. सदैव दुसऱ्यांच्या क्षेम कल्याणाची चिंता करीत असत. त्यांचा ज्ञानसंग्रह अफाट होता कोणताही प्रश्न त्यांच्यापुढे ठेवल्यावर ते चटकन त्या प्रश्नाचे उत्तर कोठे मिळू शकेल त्या पुस्तकाचा पृष्ठक्रमांक यासह सहज सांगू शकत असत. मोठे मोठे प्राध्यापक देखील त्यामुळे आश्चर्यचकित होत असत.

वयाच्या अवघ्या छत्तीसाव्या वर्षी दि.२० सप्टेंबर १९१५ रोजी श्री गुलाबराव महाराजांनी देह ठेवला. त्यांनी जवळपास १३० पुस्तके लिहिली आहेत. व एकंदर पृष्ठसंख्या सहा हजाराच्या आसपास आहे.

अज्ञानदूर करणे, पाश्चिमात्य विचारसरणीवर मात करुन भारतीय संस्कृती व विचारधारा यांचा प्रसार करणे, वेदान्ताची पुनर्स्थापना, हे त्यांचे जीवन कार्य होते. त्यांनी धर्मांतरणास विरोध केला होता. व स्वधर्माच्या आचरणावर भर दिला होता.

स्वत:ला ते ज्ञानेश्वरकन्या मानत असत. त्यांनी भाजीबाजार परिसरात श्री ज्ञानेश्वरांचे मंदिर बांधून घेतले. श्री बाबाजी महाराज पंडित हे त्यांचे शिष्योत्तम होते.

जनमानसांचा कलीजा : संत गाडगेबाबा

डेबूजी चा जन्म मूर्तिजापूर तालुक्यातील काटे गाव हया खेड्यात झिंगराजी व सखूबाई यांच्या उदरी झाला. ह्यांची जात धोबी. चंद्रभानजी हे डेबूजीचे मामा. झिंगराजी वारल्यावर डेबूजीला मामांनी अमरावती जिल्हयातील पूर्णेकाठी असलेल्या दापुरीला आणले. डेबूजीचे बालपण पूर्णेकाठी गेले. गुरे ढोरे चारणे, आणि रिकाम्या वेळात हरिभजन करणे हा त्यांचा छंद होता.

त्यांच्या गोड, रसाळ वाणी मुळे हळूहळू त्यांच्याभोवती मित्रमंडळी जमू लागली. भजनी मंडळ तयार झाले. त्यांनी छोटे छोटे दौरे सुरु केले. मित्रांना व जमलेल्या लोकांना तो अंध अपंग, लुळे, पांगळे यांना सहाय्यता देण्याचा उपदेश करु लागला. पूर्णेच्या पुरात वाहणाऱ्या अनेक माणसांना आणि जीवांना त्याने साहसपूर्ण रीतीने बाहेर काढून वाचविले. त्यामुळे त्याचे सर्वत्र नाव झाले. गरीबीमुळे त्याला कधी उपाशी रहावे लागे. आता डेबूजी मोठा झाला. शेती पाहू लागला. काम सांभाळू लागला. भाचा वयात आलेला पाहून चंद्रभानजीने त्याचा विवाह करुन दिला. बनाजी सावकाराकडून चंद्रभानजीने एक लहानसे शेत विकत घेतले होते. देणे थोडे राहिले असतानाच चंद्रभानजी वारले. सावकार सौदा रद्द झाला, शेत परत दे म्हणू लागला. पण डेबूजी वाघासारखा उभा राहिला. शेताचा ताबा मूळच्या मालकाला दिला नाही. त्याने गुंडानाही भीक घातली नाही. अखेर डेबूजीला सावकाराने पंधरा एकर जमीन तोडून दिली.डेबूजी सुरवात राहू लागला. त्यांच्या पत्नीने मुलीला जन्म दिला. मुलीच्या जन्माप्रीत्यर्थ रीती प्रमाणे मांसमद्याचा रवाना देतात. पण डेबूजींनी ह्या प्रथेला सक्त विरोध केला. पशूहत्या, मद्यपान हे पाप आहे, असे त्यांनी पाहुण्यांना सांगितले. जन्मभर हेच सांगत राहिले. शेतात काम करीत असतांना एका साधूने त्यांना भेट दिली. ते दोघे खारी या गावी गेले. परमार्था विषयी चर्चा झाली. व साधु अदृश्य झाले. डेबुजी घरी परत आले, तेव्हा कळले की एक साधु त्यांची चौकशी करीत होते. त्यांचा खूप शोध घेतला. पण साधुबोवा

सापडले नाहीत. इ.१९०५ साली डेबुजीराव सोबत्यांसह त्रहणमोचन यात्रेला गेले. कुटुंबीय लोकहि होते. तेथे पोहोचल्यावर डेबूजीराव मध्ये आध्यात्मिक परिवर्तन होत असल्याचे सर्वांच्या लक्षात आले. दि.१ फेब्रु.१९०५ पासून डेबूजींनी घरदार सोडले. अंगावर एक फाटके धोतर, हातात एक गाडगे, अशा पोषाखात त्या साधूच्या शोधार्थ निघाले. रस्त्यात ज्वारीच्या कण्या, ओढ्याचे पाणी एवढाच आहार असे. कुठेही दगडावर झोपावे. लोक चिडवतात, चेष्टाकरतात, म्हणून अरण्या-अरण्यातून बारावर्षे साधूच्या शोधार्थ वणवण फिरले. त्या दरम्यान तपस्या चालू होती.

फिरता फिरता काशीला आले. रेल्वेत प्रवेशिका जवळ नव्हती. मग प्रवेशिका निरीक्षक हाकून देई. काशी विश्वेश्वर झाल्यावर अचानक आईची आठवण झाली. ऋहणमोचनला परत आले. व मातेला भेटले. कीर्तन प्रवचन सुरु झाले. ते लोकांना उपदेश करु लागले. लोक त्यांना गाडगे बाबा म्हणू लागले. आज गाडगे बाबा नाव उच्चारले तरी लोक नम्र पणे नमस्कार करतात. एवढी पुण्याई संपादिली. शिक्षण प्रसार, मद्यपान निषेध,स्वच्छता, टापटिप, स्वार्थत्याग अशा विषयांचा प्रसार करु लागले. अहिंसेचा पुरस्कार करु लागले. विचारांचा प्रसार व्हावा म्हणून जीव दया मंडळ सुरु केले. लोक लाखानी येत. त्यांच्या चरणी लाखो रुपये जमा होत. परंतु त्यापैकी खाण्यासाठी अन्न विकत घेण्यापुरते पैसे म्हणजे एक अथवा दोन रुपये घेऊन बाकीचे सर्व पैसे ते विश्वस्तांच्या स्वाधीन करीत असत. धर्मशाळा, विद्यालय, दवाखाने, बांधणे ह्यासाठी त्या रकमेचा विनियोग होत असे. यात्रेकरु जास्त जमतात तेथे धर्मशाळा बांधावी हे कार्य त्यांनी सुरु केले. अनेक ठिकाणी नद्यांवर घाट बांधले. सामाजिक सेवेचा व सुधारणा वादाचा आदर्श उभा केला. गाडगेबाबांचे हे कार्य महान आहे. तसेच , अस्पृश्यता निर्मूलन, जातीभेद निर्मूलन हेही कार्य फार महत्वाचे आहे. विदर्भात गांधीजींना गाडगेबाबांमुळे जनमानसांत बैठक मिळाली. नव्हे नव्हे , सिंहासनी विराजमान होण्याची संधी मिळाली. गाडगेबाबांचे शिष्योत्तम श्री.गो.नि.दांडेकर , श्री. कैकाडी महाराज यांनी हे व्रत पुढे चालविले. आज गाडगेबाबांच्या विचारांचा प्रसार करण्या करिता '' देवकी नंदन गोपाला'' हे मासिक श्री. शंकर पापळकर निष्ठेने चालवीत आहेत.

अमरावतीला असतांना ते भयंकर अत्यवस्थ झाले. मला दवाखाण्यास नेऊ नका म्हणाले मोटारीत घालून वलगांवला नेत असतांना दि.२०-१२-१९६९ रोजी देहांत झाला. प्राणज्योत आत्मज्योतीत विलिन झाली. अमरावतीच्या गाडगे नगर परिसरात असलेली त्यांची भव्य समाधी व स्मारक लक्षावधी यात्रेकरुंचे तीर्थक्षेत्र झाली आहे.

साक्षात्कारी संत पुरुष श्री ब्रह्मचारी महाराज :

श्री ब्रह्मचारी महाराजांचे ओवीबध्द चरित्र श्री. संत अच्युत महाराज यांनी लिहिले आहे. श्री.संत अच्युत महाराज यांचा परिचय दिलेला आहेच. म्हणून तिकडे न वळता श्री. ब्रह्मचारी महाराजांचे चरित्र पाहुया.

मथुरा येथे माध्यांदिन ब्राम्हण शाखेच्या विप्रकुळात ब्रह्मचारी महाराजांचा जन्म झाला. यात्रा प्रवास करीत करीत ते अमरावती जिल्हयातील वाठोडा शुक्लेश्वर हे पूर्णेच्या काठी एक गांव आहे. तेथे पोहचले स्थळ आवडल्यामुळे तेथे मुक्काम केला. व शेजारी भुयार असून गुहेत शिवमंदीर आहे. त्यास्थळी चौवीस वर्षे तपश्चर्या केली. काही कारणाने उमरावतीस आले. आणि यात्रा करीत माहूरास पोहोचले. श्री.क्षेत्र माहूर हे श्री रेणूका मातेचे मंदीर, श्री परशूराम क्षेत्र आणि श्री गुरुदेव दत्त क्षेत्र आहे. तेथे विठ्ठलगिरी वनोवनी भटकत होता. त्यास दृष्टांत झाला की , सद्गुरु आले आहेत. त्याने सद्गुरु श्री ब्रह्मचारी महाराज ह्यांना ओळखले. खार तळेगांव येथील एका ब्राम्हण दंपत्तीस अपत्य नव्हते त्यांनी माहुरच्या श्री दत्तगुरुंना नवस केला होता की. अपत्य प्राप्ती झाल्यास श्री. गुरुचरणी समर्पित करीन. त्याचप्रमाणे त्यांना दोन मुले झाली. पहिल्या मुलास त्यांनी श्री. गुरुचरणी सोडून दिले. व खारतळेगांवला निघून गेले हाच तो विठ्ठलगिरी. माहुरास महाराजांनी विठ्ठलगिरीस उपदेश दिला. मंत्र दिला व खारतळेगांव येथे आणले. गुरुकृपेमुळे त्याला समाधी लागू शकत असे. तेथे श्री अप्पाजी महाराज आर्वीकर होते. त्यांनी विठ्ठलगिरीस समाधी अवस्थेत पाहिले होते. गिरीवर राहत असे म्हणून विठ्ठलगिरी. खरे मुळचे नांव विठ्ठल होते अप्पाजी महाराज हेही ब्रह्मचारी महाराजांचे शिष्य झाले. नंतर गुरुआज्ञेने श्री विठ्ठलगिरी उमरावतीस येउन राहीले. तेथेच त्यांनी श्री लक्ष्मीनारायण मंदीर बांधले. व ते स्वर्गस्थ झाल्यावर त्यांची समाधी तेथेच लक्ष्मीनारायण मंदीराचे आवारात बांधली आहे.

स्वार्थ त्यागी श्री नारायण गुरु :

भाजीबाजाराच्या डाव्या रस्त्याने खडकाडी पुऱ्याकडे वळतांना जरा उजव्या हाताला पंचविस पाऊले गेल्यावर नारायण गुरुचा मठ लागतो. तेथे औदुंबराचे झाड आहे. श्री शंकर महाराजांच्या पादूका आहेत. अन् नारायण गुरुंची समाधी दिसते. हा मूळचा नागनाथ महाराज मठ. नागनाथ महाराजांनी हा मठ नारायण गुरुंना वसतीसाठी दिला. दुर्गे,शांडिल्य, आंबुलकर , साऊरकर, पसारकर आदि शिष्यांनी त्यात योग्य सुधारणा करुन आकर्षक स्वरुपात मठाची उभारणी केली आहे. पूजे अर्चेसाठी तुळशीची रोपे, फुलांची झाडे आहेत. सोबळया ओवळया च्या स्वयंपाकासाठी भव्य मुदपाक खाना आहे. प्रसाद वितरणाची व्यवस्था आहे. शंकर गुरुंची आणि नारायण गुरुंची समाधी हिंदुस्मशानसंस्थेत चांगल्या स्थितीत आहे.

शंकर गुरुंची वर्तणूक वर करणी परस्पर विरोधी दिसते. परंतू ते अंतरात निष्ठावंत अध्यात्मिक होते गुरुचरणी एकरुप झाले होते. नारायण गुरुंचा जन्म अयोध्या येथे झाला. त्यांचे मुळ घराणे अहमदनगर जिल्हयातील मठी येथे होते. इ.१८५७ च्या स्वातंत्र्य युध्दाच्या वेळी नारायण गुरुंचे आजोबा पेशव्यांच्या सैन्याबरोबर अहमदनगरात गेले होते. पुढे युध्दात पराभव झाल्यावर पेशव्यांचे सैन्य सैरभैर झाले. नारायण गुरुंचे आजोबा अयोध्येत स्थायिक झाले. इंग्रज सैनिक त्यांचा पिच्छा करीत त्यांच्यापर्यंत पोहचले परंतू तत्पूर्वी आजोबांनी साधुंचा वेश परिधान केला होता. साधूचा वेश संरक्षण म्हणून परिधान केला तरी ते अंतरंगातून खरोखरी साधू वृत्ती धारण करुन राहत होते. त्यांच्या आचार विचारांचा प्रभाव पाडून त्यांना धरावयसा आलेले सैनिक परत गेलेच नाही त्यांचे शिष्य बनून त्यांच्याजवळ राहिले. अयोध्येस सर्व कुटुंब का गेले ह्याचा छडा लागला नाही. परंतु श्रीराम मंदीरात पुजारी होते दररोज शरयु नदीत स्नान करुन जप करीत. त्यांना एक योग्याचे दर्शन झाले. नारायण गुरुंचे मूळ नांव धरमराज. घरच्या गरीबीमुळे धरमराजाचे शिक्षण झाले नाही. अयोध्येच्या संस्कृत पाठशाळेत संस्कृत व वेदांचे शिक्षण मात्र झाले. बालपणी त्याला बालकृष्ण स्वामी शरयु नदीवर नेउन स्नान घालीत. तेथे त्याला एका योग्याचे दर्शन झाले. योग्याच्या बोलण्यात असे आले की

नारायणाचे कार्यक्षेत्र अमरावती आहे. तेथे त्याचे गुरु त्याला भेटतील. एकेरात्री धर्मराजाच्या स्वप्नात शंकर गुरु आले. व त्याला उपदेश केला आशीर्वाद दिला. हा जीवनातील एक महत्वाचा टप्पा होता. तो संधीची वाट पहात होता. एकेदिवशी त्याने घर जाळण्यासाठी पलिता पेटविला तेंव्हा आजोबांनी त्याला हाकलून दिले त्याला तरी तेच हवे होते तेंव्हा घरदार सोडून सरळ अमरावतीची वाट धरली. त्यावेळी त्याचे वय १३ - १४ वर्षाचे होते. शेगांवला श्री गजानन महाराजांचे दर्शन झाले. त्यांनी देखील धर्मराजाला अमरावतीची वाट सांगितली. दर्यापूरला श्री.गोविंदराव देशपांडे त्यांच्या देवळात काही काळ पुजारी म्हणून राहिला. परंतु मन तेथे रमेना. दर्यापूर जवळ माहुली आहे तेथ येवून काही काळ वास्तव्य केले. तेथून उमरावतीस श्री अंबामातेचे.एकविरा मातेचे दर्शन घेतले. अंबा दरवाज्याजवळ कादर मिया नावाचा अवलिया मुक्काम ठोकून असे. त्याने शंकर गुरुचा पत्ता समजावून दिला. शंकर गुरु धरमराज यांची पहिली भेट स.१९११ मध्ये झाली. शंकर गुरुंनी धरमराज्याला नाम समाहाची दीक्षा दिली. पुन्हा माहुलीस येउन धरमराजाने नामसमाह मांडला. शंकर गुरुच्या आदेशावरुन लोक त्यांना नारायण गुरु म्हणू लागले. नारायण गुरु फार लोकप्रिय झाले. लोकांनी त्यांना तेथे श्री विठ्ठल मंदिर बांधून दिले तेथेच ते राहत.

एकदा गोविंद नावाचा एक मुलगा अचानक अस्वस्थ झाला. औषधपाणी सुरु होते. पण प्रकृतीला आराम नव्हता. नारायण गुरुंना विचारल्यावर त्यांनी त्यांच्या वडीलांनी नामसमाह करावा असे सांगितले. तसे केल्याबरोबर गोविंदाची प्रकृती झपाट्याने सुधारली त्यामुळे नारायणगुरुंचा बोलबाला झाला. प्रसिध्दि झाली. शंकर गुरुंचा दुसरा एक शिष्य हरीसिंग नावाचा होता. तो अचलपूरला राहत असे. तो नारायणगुरुस येवून मिळाला व आमरण त्यांच्या सोबत राहिला. शंकर महाराज अमरावतीत येण्यापूर्वी अचलपूरात होते त्यांना अवलिया म्हणत असत. कधी कधी विवस्त्र ही फिरत असत. पण एकेदिवशी त्यांनी स्वत:च्या जीवनात परिवर्तन घडवून आणले. राहणीची दिशा व पध्दती बदलली अतिशय वैभवात आणि आरामात राहू लागले नंतर परतवाड्याच्या विठ्ठल मंदिरात आले, काही दिवस राहल्यानंतर अचानक

उमरावतीस आले. तेथे एका धोब्याच्या घरी राहिले. व नंतर नमुन्यात श्री गणोरकर यांच्याकडे आले. श्री. गणोरकर वकीलांच्या घरी पश्चिम बाजूला देवघराजवळ त्यांची समाधि आहे. दर्शनार्थ आलेल्या लोकांनी त्यांना पैसे,सोने, चांदी, इत्यादी दिल्यास ते सर्व धन ते गोरगरिबांना वाटून टाकीत असत. त्यांना संगीत फार आवडे. नाच गाणे ही आवडे. कधी कधी ते एखाद्या कोठेवालीच्या अड्डयावर नाच पहात बसत. कधीतर स्वत: देखील तिच्या सोबत नृत्य करीत. अनेक वेळा तिला गोपी संबोधून तिची पूजा करीत असत. तिला आदिशक्ती संबोधून तिचा गौरव करीत असत. त्यांना टांग्यात बसणे फार आवडे. टांगेवाल्याला ते दाम दुपटीपेक्षा अधिक रक्कम देत असत. त्यांचा देहांत इ.सन. १९१२ मध्ये झाला.

नारायण गुरु त्यांचे शिष्य कसे झाले हे वर आलेच आहे. त्यांच्या निधनानंतर नारायणगुरु नागनाथ मठात आले तेथे त्यांनी गुरुदेवतेच्या पादुकांची स्थापना केली आहे. त्यांची राहणी फारच साधी होती. एक धोतर, व चष्मा ऐवढीच त्यांची मालमत्ता. ते देशभर फिरुन आले. कृष्णवर्णीय नारायण गुरु शरीराने बलदंड व काटक यष्टीचे होते. ते यज्ञ करीत असत. त्यांचा शिष्य संप्रदाय ही प्रथा आजही चालवितो. ते यज्ञातील पशुहत्येच्या विरुध्द होते. त्यांना औषधीज्ञान फार चांगले अवगत होते. ज्योतिष्य सांगत, जीवशास्त्राची माहिती सांगत. काळी विद्या त्यांना अवगत होती. पण तिचा उपयोग त्यांनी कधी केला नाही. मीमांसा शास्त्राचे ते थोर ज्ञाते होते. ते तर्क शास्त्राचे ज्ञाते होते, पण तार्किक नव्हते. वेदांत तर बालपणापासूनच अवगत होता. आमरण नैष्ठिक ब्रह्मचर्य अनुसरले. आयुष्यभर केवळ गुरुची पूजा बांधीत राहिले. गरीबीचे जीवन जगले. परंतु, नामसमाह,इ.प्रसंगी त्यांना भरपूर द्रव्य उपलब्ध होइ. ते कर्म संपले की, उरलेले सर्व वाटून टाकीत. शंकरगुरु वेगवेगळ्या रुपात सर्व आणून देतात अशी त्यांची श्रध्दा होती. अन्यसंत विठ्ठलभक्तीचा प्रचार करतात. पण नारायणगुरु यज्ञसंस्थेचा प्रचार व पुरस्कार करीत. त्यामुळे मोक्ष प्राप्ति होते असे त्यांचे विचार होते. अर्थात ते अद्वैत मतवादी होते. मनुष्य आपल्या कर्मानुसार भोग भोगतो. ते त्याने चुकवलेले मोल असते. हया विचारापायी त्यांनी स्वत:ला झालेल्या मुळव्याधीवर इलाज करुन घेतले नाहीत. इ.१९६७ साली मरण येईपर्यंत ते मृत्यूला कधी भ्याले नाहीत.

अध्यात्म चिंतक डॉ.पुनशी :

तेथ ज्या कर्मसुत
मांडून ठेविले स्वतंत्र ॥
ते तिथे गती मात्र ।
हेचि लागे ॥

'परमार्थ प्रत्येकाला करतायेण्यासारखा आहे. त्याला कर्माचे बंधन नाही. किवा सर्वकर्मांनी भगवत्भजन करुन परमार्थ करता येतो' ज्ञानेश्वरीतील ओवीत डॉ.पुनशीचे यथार्य जीवन मला जाणवते.

डॉ. पुनशी यांचा माझा निकट्या स्नेह नाही. पण एकदा रुग्ण म्हणून त्यांचेकडे जाण्याचा योग आला. त्यावेळी त्यांच्या हातात नाममंत्र माळा होती. ते पाहून मला आश्चर्य वाटले. 'रामदास स्वामींची ओळ आठवली' 'रिकामा जावूनेदी क्षण' यांचा प्रत्यक्षदर्शी पुरावा माझ्या समोर आज साकारलेला पाहतांना 'माझी या जातीचे मीळो मज कोणी' चा आनंद मी अनुभवला.

विसाव्या शतकाकडे वेगाने झेप घेणाऱ्या मानवाने मानवी मूल्याचा कधी विचार केला आहे काय ? हा प्रश्न माझ्या मनाशी मी विचारतो. पैशामागे वेडयासारखा लागणे ही मानवाची करुणा अवस्था आहे. पैसा मिळाला की आपणास समस्त सुखे अनुभविता येतात ही मानवी जीवनाची अपूर्णता मानवाला केंव्हाच उमजली नाही. उदात्त ध्येय करीता जीवन समर्पित करण्याची भावना लोपली. स्वार्थांधता पराकोटीची निर्माण झाली. हे आजच्या मानवी संस्कृतीचे चित्र आपण पाहतो. या वित्तमय जादुई नगरीत जीवनाचे ध्येय ठरवून त्याकरीता जीवन झोकून देणाऱ्यांची वाणवा आहे. या पार्श्वभूमीवर डॉ. पुनशी यांचे जीवन एक आदर्शत्वाची वाटचाल दर्शविते.

डॉ. पुनशी यांचे जीवन उत्कृष्ट साधकाची वाटचाल आहे 'शुध्द बीजापोटी फळे रसाळ गोमटी' या तुकोबाचे अभंगवाणीचा प्रत्यय आला. वडिल संत होते. आईकडे देखील संतपदाचा थोर वारसा. त्यामुळे डॉक्टरांची ओढ पैशापेक्षा परमार्थाकडे लागली. साधना करीत असतांनाच त्यांना साधकावस्था प्राप्त झाली. यात थोडीहि अतिशयोक्ती

नाही, साधनेत त्यांना प्राप्त झालेले अनुभव त्यांची साक्ष देतात. आज ते केवळ साक्षीभावाने जीवन जगत आहेत.

अध्यात्मिक माणूस त्यांच्या डोळ्यावरुन ओळखला जातो. डॉक्टरांचे डोळे हेच बोलतात. त्यांच्या डोळ्यातील अध्यात्मिक दिप्ती मुळे त्यांच्याकडे आकर्षित झालो. नामाचे सतत चिंतनाने त्यांचे चित्त प्रकाशमान झाले. चित्तशुध्दीकडे त्यांची वाटचाल होत आहे. पंढरपूरला डॉक्टर साहेब वारीत उभे होते. मनात परमेश्वराचे चिंतन चालू होते. कोणीतरी अनामिक येतो. त्यांचे हात धरुन पांडुरंगाचे चरणी ठेवितो. हाती प्रभात समयी चा प्रसाद देतो. ते डॉक्टरांचे बाबत घडले.देवाचा वशीला पैशाने लागत नाही. ते घडले ते त्यांचे आंतरिक भावनातून त्यांचा भक्तीभाव एक विशिष्ट सीमारेषेत आला. हा वास्तव हा अनुभव त्यांचे पदरी पडला 'न लागती सायास जावे वनांतर सुखे येतो घरा नारायण' चा अनुभव आहे.

आळंदीला ज्ञानेश्वरांचे दर्शनास गेले. रात्री झोपले असता त्यांचेसमोर ज्ञानेश्वर मंदीर साकारले. प्रभात समयी दर्शन घेतांना रात्री पाहिलेले दृष्य ते आता उघड्या डोळ्यांनी पाहात होते. तेथे त्यांना माऊलीचा खास प्रसाद मिळाला. हा प्रसाद सर्वांनाच मिळत नाही. 'चिंतने चिंतने तद्रुपता' त्यांनी अनुभवली ही अवस्था प्राप्त होण्याचे महतभाग्य त्यांना लाभले. कंठातून अमृत श्रवणाचा आस्वाद त्यांनी अनुभविला. ही चित्तशुध्दीची पावती आहे. दृष्य अदृष्यात द्रष्य होणे हीतर तपश्चर्या आहे. हे सर्व डॉक्टरांनी अनुभविले त्यांची ही अवस्था केवळ नामसाधने झाली या साधनेचे वर्णन करतांना तुकोबापंत लिहितात नाम घेता मनी निवे । जिव्हे अमृतचि स्त्रवे । होताती बर्वे । होसे शकून लाभाचे॥

डॉक्टरांचे पाठीशी असे अनुभवलेले अनेक क्षण आहेत. परमार्थिक अनुभव सांगू नयेत असा संकेत आहे. यास्तव हे सांगत नाहीत. अध्यात्मिक चर्चेतून ते सहजगत्या बोललेत. यात त्यांना मानसंन्माची अपेक्षा नव्हती. प्रश्नामधून प्राप्त झालेली ही त्यांची साधनेतील मौलिक धनसंपदा आहे. 'माझा भाव तूझे चरणी । तुझे रुप माझे मनी । सांपडलो एकमेका जन्मोजन्मी । जन्मोजन्मी । नव्हे सुटका ॥ हा नामदेवांचा

अभंग येथे साक्षीभुत आहे. आनंदाचे डोही आनंद तरंग। आनंदाचि अंग आनंदाचे हा तुकारामांचा अनुभव त्यांना अनुभवता आला. ते सदैव मित भाषी असतात. भाषा अतिशय गोड व लाघवी आहे. यासर्व पारमार्थिक खुणा त्यांचामध्ये जाणवतात. एका आदर्श साधकाची ही साधनेची फलश्रृती येथे साकारली.

संत संगतीची त्यांना मनस्वी ओढ आहे. जगद्गुरु शंकराचार्य, कांचीगुढी यांचे आशीर्वाद त्यांना प्राप्त झाले. कल्याण सेवक महाराज, अवतार मेहेर बाबा, गाडगे महाराज, स्वामी मयुरानंद, स्वामी आत्मारामानंद, स्वामी बेलुरमठ , अरविंद आश्रमाचे आजचे आश्रम प्रमुख आदी थोर संत मंडळीचा त्यांना दर्शनाचा लाभ झाला. मागदर्शन लाभले. अमरावतीचे योगी संतपुरुष सीताराम बाबा यांचा त्यांना फार मोठा सत्संग लाभला. 'काय सांगू कृपेचा नवलाव। प्रगटला देव अंतर्यामी' स्वरुपानंदानी ज्या संतकृपेची थोरवी गायली ते सुख डॉ.पुनशी यांना लाभले.

डॉ.पुनशी यांचे जीवन एक साधकाची एक सिध्द अवस्थेकडे जाणारी वाटचाल आहे. सिंधी संत स्वामी बोधराज 'सच्चे साथी' या ग्रंथात सांगतात. 'नम्रतेने वागणे, गोड बोलणे आणि वाटून खाणे' हे तीन गुण माणसाला ईश्वरीय पदावर पोहचवितात. डॉक्टरांची वाटचाल या मार्गाने आहे. यातच त्यांची अध्यात्मिक वाटचाल जाणवते. पहाटे चार वाजता ब्रह्ममुहुर्तावर ते आपली साधना प्रारंभ करतात. त्यांची साधना सिध्द अवस्थेच्या मार्गावर असल्याचा प्रत्यय जाणवतो. 'स्वप्न दर्शन' व त्याचे भावसंकेत आध्यात्मिक प्रगतीवर असलेल्यानांच येतात. डॉक्टरांना ते संकेत सदैव प्राप्त होतात. सर्वात मोठा लक्षणीय व चिंतनीय अनुभव म्हणजे बिंदुदर्शन ते त्यांना झाले. इथे पारमार्थिक अनुभवाची सांगता आहे. हे सर्व अनुभव त्यांचे पदरी आहेत. अनाहत नाद, सुगंध, प्रकाशदर्शन ह्या पाऊलखुणा त्यांनी अनुभविल्यात. यास्तव ज्यांचे जीवन यथार्थ व कृतार्थ झाले. त्यांनी काम-लोभ-मत्सरषड्रीपूचा त्याग केला. विरक्तीचे वैराग्य त्यांना प्राप्त झाले.

माणूस जीवन जगतो तो कशा प्रमाणे यावर त्यांचे मूल्यमापन केल्या जाते. जीवन हे समाजाचे देणे आहे. ही जाणीव बाळगणारी माणसे आज अती दुर्मिळ आहेत.

परमार्थ आणि प्रपंच साधणारी माणसे शोधून सापडणे कठीण आहे. अशा या समाज रचनेमध्ये डॉ.पुनशी यांचे जीवन समाजाला उपकृत करण्याइतके मोलाचे आहे. वैद्यकीय पेशा असल्यामुळे त्यांना रोग्याचे मनोगत सहजगत्या उमजते त्यातूनच त्यांचे जीवन ते खुलवितात.

सर्वाभूती समभाव ही दृष्टी त्यांना प्राप्त झाली आहे. ' जे जे भेटे भूत। ते मानीजे भगवंत। ही त्यांची ज्ञानेश्वरीतील द्वेष भाव विरहित अशी समतेची दृष्टी आहे. जे घडते ते सर्वांतर यामी सर्वात्मक परमेश्वर प्रेरणेतून घडते ही त्यांची जीवनाकडे पाहण्याची स्वच्छ दृष्टी आहे. यास्तव त्यांचा नागरिक सत्कार होत आहे.

हा सत्कार विशिष्ट व्यवसायी, जात व धर्म आणि पंथ, यांचे कडून होत नसून तो त्यांचे जीवन विषयक विशाल दृष्टीकोनातून त्यांनी संपादन केलेल्या मुल्यांची ही समाजाकडून मिळत असलेली पावती आहे. समर्थांचे शब्दात सांगून झाल्यास 'राखावी बहुतांची अंतरे। भाग्य येती तदनंतरे। '

आपल्या सत्कार प्रसंगी आध्यात्मिक जीवन मी जनतेसमोर ठेवले ते इश्वरीय प्रेरणा म्हणून आपण तिचा स्वीकार करावा. परमेश्वर आपणास आरोग्य संपन्न जीवन देवा हीच इश्वरचरणी प्रार्थना.

जयकुमार जैन

५, सुविधा शिक्षक कॉलनी,अम.

दै.हिंदुस्थान वरुन साभार

॥ श्री ॥

॥ श्री गजानन समर्थ ॥

॥ श्री योगीराज ब्रह्मचारी महाराज प्रसन्न ॥

॥ श्री योगीराज अप्पाजी महाराज प्रसन्न ॥

श्री मुरलीधर व ब्रह्मचारी महाराज संस्थान, भाजीबाजार व रेवसा या मंदीरा विषयी माहिती.

श्री नित्यानंद उपाख्य ब्रह्मचारी महाराज यांनी मंदीराची स्थापना केली. साधारणत:

१५० वर्षापूर्वी हे मंदीर महाराजांनी बांधले. हे मंदीर स्थापन झाले यामागे एक अख्यायिका आहे. वास्तविक पाहता महाराज शिवभक्त होते. वाठोडा शुक्लेश्वर या गावी भुयारात असलेल्या महादेवाच्या पिंडीजवळ जंगली श्वापदाच्या सहवासात व कडुनिंबाचे भक्षण करीत महाराजांनी २४ वर्षे तपश्चर्या केली. एकेदिवशी पेढी नदीवर महाराज स्नानाकरीता बसले असता, त्यामंदीराचा श्रीमंत पुजारी समजून त्यांना दरोडेखोरांनी द्रव्यासाठी मारहाण केली महाराजांनी त्यांना वारंवार सांगून त्यांनी ऐकले नाही. त्यांच्याजवळ कोणत्याही प्रकारचे द्रव्य सापडले नाही तेंव्हा ते जावयास निघाले. पण ते अंध झाले. आपण सिध्द पुरुषास मारले असे त्यांच्या लक्षात आल्यावर ते महाराजांना शरण आले. त्यांची क्षमा मागितल्यावर त्यांना दृष्टी प्राप्त झाली. गावकऱ्यांच्या मदतीने त्यांना महाराजांनी गावात आणले. श्री रामभाऊ पांडे यांच्या घरी त्यांची सुश्रुषा करण्यात आली. जखमा बऱ्या झाल्यावर श्री. रामभाऊ यांनी अमरावतीस त्यांना आणले. आज मंदीराची वास्तू आहे त्या ठिकाणी श्रीकृष्णाचा रथ रुख्मिणीचे हरण करतांना थांबला होता म्हणून त्या जागेवर श्रीकृष्णाची मूर्ती स्थापना करावी व मंदीर बांधांवे असा त्यांना दृष्टांत झाला. आणि त्यानुसार महाराजांनी या मंदीराची स्थापना केली. या वास्तूचा जीर्णोध्दार गेल्या वीस वर्षापासूनच होत आहे त्यामुळे पूर्वीच्या वास्तू स्वरुपात संपूर्ण पणे बदल होवून वास्तूचे नूतनीकरण झालेले आहे. पूर्वीच्या काळाची साक्ष देणारी अशी कोणतीच गोष्ट जरी शिल्लक नाही तरी इतिहास मात्र कायम आहे. पुढे भक्तांनी महाराजांना शेतीवाडी दान केली ती अद्यापही रेवसा येथे आहे. तिथेही महाराजांचे मंदीर आहे. भाजीबाजारातील मंदीरात श्रीकृष्ण जन्मोत्सव व भागवत ज्ञान यज्ञ असे मोठ्या प्रमाणावर उत्सव साजरे होतात. रेवसा येथे पौष व ७ला महाराजांची यात्रा भरते. या संस्थानचा कारभार विश्वस्त मंडळी पाहतात.

आध्यात्मिक संत पुरुष

श्री.संत देवनाथ महाराज (सुर्जी अंजनगाव, अमरावती)

महाराष्ट्रातील नाथ संप्रदायाची तीन स्थाने सुविख्यात आहेत. पैठणचे श्री.संत एकनाथ महाराज, त्रिपुटीचे (जि.सातारा) परब्रह्म स्वरुप श्री.संत गोपाळनाथ

महाराज, व सुर्जी अंजनगांव, (जि.अमरावती) चे श्री.संत देवनाथ महाराज, यांची गुरुपरंपरा फार मोठी आहे. हे पारमार्थिक केंद्र म्हणता येईल. भाविकांचे हे स्फूर्तिकेंद्र, अध्यात्म मार्गाचे वाटाडे श्री.देवनाथ महाराजांच्या गुरुपरंपरेत श्री.संत एकनाथ महाराजांना अग्रणी मानतात. सर्वांचा आध्यात्मिक व पारमार्थिक पिंड समान. धर्म प्रसाराचे कार्यहि सारखेच. ग्रंथ साधना तर एवढी मोठी आहे की, श्री सरस्वती इकडे तिकडे न जाता जणू तेथेच मुक्काम ठोकून होती. श्री.देवनाथ महाराज व सच्छिष्य श्री.संत दयाळनाथ महाराज यांनी महाराष्ट्र व उत्तर हिंदुस्थानात यात्रा करुन धर्मप्रसाराचे व नाथ संप्रदाय प्रसाराचे कार्य केले. जिथे जात तिथे कथा, कीर्तन, प्रवचन ठरलेलेच. देव दयाळांची जोडी श्रध्दे बनली, ह्यांच्या काळात मुसलमानी सत्ता होती. साहाजिकच मराठी बरोबर हिंदी भाषेत काव्यरचना करावी लागली. श्री.देवनाथ महाराज श्री.हनुमानाला गुरुस्थानी मानीत. श्री.हनुमंतांच्या अंगी शक्ति, युक्ति, भक्ती व सेवा व चारित्र्य, नीती, हे सद्गुण होते. ते त्यांना प्रकर्षाने आवडले. 'मेहर बलभीम, बलभीम धनी सिरका,' 'आपबीन दुप्मा, दुजा नही कोई,, देखले अपने घर मांही, असे ते म्हणतात.

त्यांनी भक्तीचा प्रसार केला. राम बिन कुछ और वहि रे जानियो। ये जग मो सब राम भरारे अशी त्यांची श्रध्दा होती. श्री हनुमंताच्या उत्कट उपासनेने त्यांना दैवी साक्षात्कार झाला. त्या प्रमाणेच त्रिकुटी गावचे श्री.गोपाळनाथ यांचे सच्छिष्य श्री.गोविंदनाथ महाराज यांनीहि वरदहस्त ठेवून त्यांना साक्षात्काराची प्रतीती घडवली. तेव्हा त्यांना आगळा वेगळा, अलौकिक आनंद झाला. विलक्षण अलौकिक अनुभव प्राप्त झाला. मनाच्या उन्मनी अवस्थेत एकाग्रता झाली व लख लख तारे चमके सारे

तुर्या उन्मनि भई। आंखिया जर्द गई हो रही।
देवनाथ प्रभुनाथ निरंजन। दिल सो दिल मिल गया,
गुरुने जोगत मुझ कु किया॥

अशा भावावस्थेत ते गेले. त्यांच्या एका ग्रंथात त्यांनी दीडशे साधुसंतांच्या प्रशस्तीपर कवने रचली आहेत. यावरुन ते एकांगी शिलेदार नव्हते, हे दिसून येईल.

त्यांच्या मनात जाती, पंथ, संप्रदाय, इ. बाबतीत भेदभाव नव्हता. जे जे भगवंताचे भक्त ते सर्व त्यांना आदरणीय वाटत असत. एकाग्रं यात त्यांनी शेकडो देव देवतांवर भक्तिपर काव्यरचना केली आहे. श्रीकृष्णाचे काव्य लिहितांना ते शृंगारहि वर्ज्य मानीत नाहीत. अर्थात शाहीरी वाङ्मयाप्रमाणे, मुक्त बाष्कळ शृंगार नसून त्यांनी उदात्त शृंगार आळवला आहे.

ते समाजप्रवण व समाजभिमुख संत होते. कधी गोड मधुर बोलत; परंतु प्रसंगी कठोरहि बोलत असत. नागपुरला राजे रघुजी भोसले यांच्या वाड्यात कीर्तन सुरु असतांना महाराजांनी हुक्का ओढणे चालू केले. लगेच संत देवनाथ महाराजांनी त्यांना झापले व महाराजांनी तो अपमान न मानता, आज्ञा शिरसावंद्य मानली.

पंढरपुरला एकदा कीर्तन सुरु असतांना पेशवे सरकारांचा राजकवि अनंत फंदी यांनी श्री.देवनाथ स्वामींना शीघ्र काव्य लिहिण्याबद्दल आव्हान दिले. आणि श्रीमंत बाजीराव पेशव्यांच्या स्तुतीपर काव्य स्वत:रचून गाऊन दाखवले. त्याच्या कवितेतील प्रत्येक पंक्तीचा आधार घेऊन श्री संत देवनाथ महाराजांनी सर्व पेशव्यांच्या काय चुका झाल्या, हे तेथल्या तेथे कविता रचून गाऊन दाखविले. आपण राजकारणहि चांगले जाणतो, राजकारणा कडेहि आमचे सूक्ष्म लक्ष आहे, हे त्यांनी दाखवून दिले.

ते मराठी जेवढ्या कौशल्याने लिहित, तेवढ्याच कौशल्याने संस्कृत व कर्नाटक भाषेतहि कवने लिहीत असत. त्यांची कविता प्रासादिक होती. त्यामुळे त्यांच्या कवनातील काही ओळी सुभाषिते वाटतात. उदा. जहिं तन लागे, सोंदु तन जाने; कोऊं नहि अपना सारा सपना; गुरु ग्यान समजकर बुझे हाखमो बिरला.

त्यांचा एक सुंदर दृष्टांत पुहा --

कहत देवनाथ घरघर वे पुरुख नहि।

बनमाहे अनेक वृच्छ, कल्पवृच्छ कहुं बारी ॥

सर्वसामान्य जीवांना साधन करावे; भावजागृति करुन भक्ती मार्गी लावावे हा त्यांचा हेतू होता.

गरीब ब्राह्मण अण्णा महाराज :

अमरावतीत अगदी नुकत्याच संपलेल्या दशकापुर्वी अण्णा महाराज नावाचे सत्पुरुष होऊन गेले. त्यांचे पूर्ण नाव गोविंद सदाशिव जोशी ते स्वत:ला नेहमी 'गरीब ब्राह्मण' म्हणवून घेत. मी गाणगापूरचा सेवेकरी असेहि स्वत:ला म्हणवून घेत असत.

यांचा जन्म ज्येष्ठ शु. त्रयोदशी शके अठराशे शेहेचाळीस (इ.स.१९२६) व मृत्यु मार्गशीर्ष शु.सप्तमी शके एकोणीसशे सात (इ.१९८६) या दिवशी झाला.

अण्णा महाराजांचे वडील अमरावतीत वेदशास्त्र संपन्न बापूशास्त्री जोशी या नावाने विख्यात होते. घरी थोडी शेती होती. आणि व्युत्पन्न घराणे असल्यामुळे धार्मिक, संस्कारक्षम वृत्ति होती. कठोर व्रत वैकल्ये, धर्म कर्म यांच्या आचरणामुळे येणारा उग्रपणा व तापटपणा अंगी होता. पत्नीचे नाव लक्ष्मीबाई. यांच्या उदरी अण्णांचा जन्म झाला. बालपणी त्यांचे शिक्षण उमरावतीस झाले. बालपणापासुन धार्मिक वातावरणात वाढले. त्यामुळे उपासना मार्गाचा ध्यास होता. एकदा काही करणाने वडील फार रागावले. तेव्हा अण्णा नेसत्यावस्त्रांनिशी घराबाहेर पडले. थेट काशीची वाट धरली. तेरा वर्षाच्या ह्या बालकाला तेथे राहून विधीग्रहण करुन विद्वान म्हणून नावलौकिक कमावण्याची आकांक्षा होती. काशीला भिक्षाग्रहण करुन त्यांनी विद्याग्रहण केले. गंगाकिनारी निवास असल्यामुळे मन शुध्द होते. वेदवाङ्मयाचा अभ्यास केला. परंतु कोणतीहि पदवी न मिळविता अमरावतीस परत आले. आठ पंधरा दिवस राहून गाणगापूरला तपश्चर्येसाठी गेले. तेथेहि भीक्षावृत्तीच नशीबी होती. बारा वर्षे संगमावर तपश्चर्या केली. दत्तगुरुंच्या कृपेने सत्ववाचा सिध्दि व सत्य वाचासिध्दि लाभली. साधूवृत्तीच्या ह्या गरीब उपासकास अनेक लोक अनेक प्रश्न करीत असत. त्यांना हे उत्तर देत. अनेकांचे रोग दुरुस्त केले. अनेकांना आर्थिक लाभ घडवून दिला. सुवत्तेचा लाभ करुन दिला. स्वत:मात्र निष्कांचन, अंकिचन होते. दत्तोपासनेचा ध्यास घेतला होता. श्री क्षेत्र औदुंबर, श्रीक्षेत्र बासर येथेहि ध्यानधारणा, तपश्चर्या केली. वृत्ति अधिकाधिक निष्कांचन होत होती. परंतु वडील आता थकले. आईने त्यांच्या भेटीचा

ध्यास घेतला. म्हणून वडील शोधार्थ निघाले. ते वासर येथे आढळले. त्यांच्या समवेत वडील घरी आले. ह्याला विवाहाच्या बंधनात अडकावला पाहिजे; मग तरी हा पळणार नाही, अशा विचाराने अण्णांच्या विवाहाचा घाट घातल्या गेला. अण्णांच्या पत्नीचे नाव अनुराधा. राधेप्रमाणे अनुरक्त ती अनुराधा. पण घराचे काय ? विवाहानंतर पुत्र लाभ झाला. पुत्र मुखाचे दर्शन घेऊन अण्णा पुन्हा गाणगापूरला तपश्चर्येसाठी गेले. तेथून बासर; तेथून श्रीरामपूर जवळील बेलापूरला येऊन तपश्चर्येत निमग्न झाले. मुलगा मोठा झाला. घरची मालमत्ता पत्नि व तिचे नातेवईक सांभाळीत होते. अकरा वर्षाचा होऊन त्यांचा मुलगा सदानंद विषम ज्वराने वारला. पुन्हा अण्णांचा शोध सुरु झाला. अखेर ते बेलापुरला सापडले. पण परत येण्याऐवजी कुंटूंबासमवेत बेलापूराला व तेथून गाणगापुरला तप करीत बसले. ह्या दरम्यान कन्यारत्न जन्मास आले. गाणगापुरहून इ. १९८० साली अमरावतीस परत आले. येथे त्यांनी त्यांना आर्थिक प्राप्ति करुन देणारा कीर्तन प्रवचनाचा व्यवसाय सोडून दिला. शेतीतून जेवढे उत्पन्न नातेवाईक आणून देत तेवढ्यावरच गुजारा करीत असत. परंतु शिष्य संप्रदाय प्रामाणिक होता. त्यांच्या आशीर्वादाने, त्यांच्या आज्ञेनुसार वागल्याने ज्यांन सुबता, वैभव, लाभले, निवडणुकांत यश प्राप्त झाले, ते सर्व लोक अखेरपर्यत गुरुपोर्षिमेला येऊन त्यांच्या चरणी धनसंपत्ती अर्पण करीत असत. ती इतकी असे की, वर्षभर पुन्हा कुठे पैशासाठी हात पसरण्याची आवश्यकता पडत नसे. त्यांचे नातेवाईक शेतीवाडी पाहण्यास साह्य करीत. त्यांना वैद्यकीचे उत्तम ज्ञान होते. हे ज्ञान आपणास श्री.गुरुदेव दत्त कृपेने लाभले असे ते सांगत असत. महारोग, कॅन्सर सारखे रोग ते दुरुस्त करीत अशी त्यांची कीर्ती पसरली. त्यांच्याकडे विजयप्राप्ति याचनार्थ आलेल्या श्री.सोमवंशी यांनी त्यांच्या सांगण्याप्रमाणे श्री.क्षेत्र येथे गुरुचरित्र पारायण श्रध्दापुर्वक अंत:करणाने केले. व अशक्य वाटणारी निवडणूक पदरात पाडून घेतली. एका भक्ताच्या जुना जीर्ण दमा त्यांनी घालविला व त्याला आरोग्य प्रदान केले. एका व्यक्तीचे वेड नाहीसे केले. अशी अगणित उदाहरणे महाराष्ट्रभर सापडतात. त्यामुळे शिष्यसंप्रदाय त्यांचे कृतज्ञता पूर्वक गुणगान करतो.

'परमहंस श्री आडकुजी महाराज'

ज्ञान ही सम भूमि का अधिकार है।
ऐसे गुरुदेव से ही नमस्कार है।

आडकुजी महाराज म्हणजे 'रुपविशाल नग्न अवधुत' असे होते. जे दिगंबर स्थितीचे परमहंस अवस्थेचे व 'विदेह वृत्ती की निज पूजा' असे होते आणि असे महापुरुष स्मृतीगामी अर्थात हाकेला ओ देणारे दत्त अवधूत असतात. ते प्रेरक असतात. अर्थात ते लोकात फिरुन जनसेवा करतांना दिसनार नाही परंतु हजारो सेवा करणारे सेवक ते आपल्या प्रेरक शक्तीने निर्माण करु शकतात. आडकुजींचे अवतरण -

संताचा आगर। वर्धा तिरावर।
आर्वी हे माहेर। असे ज्यांचे॥

वर्धा जिल्ह्यामध्ये आर्वी तहसील त्या आर्वीत आडकुजी अवतीर्ण झाले ती वेळा त्रिपुरी पोर्णिमा दि. १४ नोव्हें. १८२१ मंगळवार दिवस मध्यांन्ही १२ वा श्री.सदाशिवराव फिसके व सौ.किशीबाई यांना या महात्म्यांचे जन्मदाते होण्याचे परमभाग्य लाभले आणि कासार कुळ पावन केले. राष्ट्रसंत याला प्रमाण देतात.

जन्म कासारा गृही होऊनी,
अवतार रुप प्रगटला।
चरित्रे विचित्र दावी भला

कासार या जाती शब्दांची व्याख्या राष्ट्रसंत हे फार मोठ्या उच्च कोटीने करतात व ती कुळ थोरवी सद्गुरु श्री.आडकुजी महाराजांनी यथार्थतेने पुर्ण करुन दाखविली आहे.

कुल कसार असारनसे, तुम सारथ को पाये।
प्रकट भये बरखेडा, जग तारण आये॥

अर्थात 'का सार' म्हणजे ज्यांना संसारामधान अंसार टाकला व सार घेतला तो कसार.

शैशवावस्था : मुलांचे पाय पाळण्यात दिसतात आडकुचे जीवन पूर्ण दैवी शक्तींनी

युक्त होते. आजानु बाहु, उंच कपाळ, टपोर नेत्र पायी शंख , चक्र गदादी चिन्ह आणि खोडकर वृत्ती होती त्यांची.

वरुषात पाचवे आई मृत्यु पावली।

वय सानपणाची कष्टकरी

'ओ टवळे दाखवते का ब्रम्ह ? तू तर नेहमी ब्रह्म, ब्रह्म म्हणते। त्यावर मायबाईनी म्हणावं 'नाही बर आडक्या ब्रह्म पाहशील तर वेडा होशील। त्यावर आडकुनी म्हणावं ' तु दाखव तर खर ब्रह्म कसे असते तर'

ब्रह्म वादिनी मायबाईनी तत्क्षणी आडकूचे शिरी वरदहस्त ठेवला व म्हणाल्या 'पाह्य लेका ब्रह्म।' आडकु सूर्यास्तापर्यन्त विदेह स्थितीत रमायला लागला. मायबाई हा पुरा पसारा। एक पलमे ओ आडकुजी तारा ॥

आपणासारखे करती तात्काळ असे म्हणतात तसेच झाले आडकुचे पुढे दहेगांव मुस्तफा येथे काननीचा निवास बनला नंतर पुढे.

वय पासष्ट वर्षाचे, आले वरखोडी साचे लोकांना अनेक अनुभव आले आणि 'जे का रंजले गांजले, त्याशी म्हणे तो आपुले या उक्तीप्रमाणे अनंत जिवांच उध्दार करीत इहलोकाची यात्रा संपविली.

अधिकार व प्रसाद

राष्ट्रसंतांच्या मातोश्री पूज्य श्री.मंजुळा माता यांनी आंबा दिला. सत्यदेव बाबांना प्रसाद दिला व लहानुजी बाबांना आशिर्वाद दिला ही महान संत रत्न म्हणजे श्री.सद्गुरु आडकुजी महाराजांच्या दिव्य शक्तीचे अविष्करण होय तसे बघितले तर

'आजवरी तारिले शिष्य बहु घनघोरी.

मी काय वंर्णुबा त्या सद्गुरुची थोरी ॥

असा त्यांचा थोर अधिकार होता त्यांची 'समाधी अजूनही पावले भक्ताच्या कार्या' हा स्वानुभव महाराज सांगतात व ते सत्य आहे. शेवटी त्या महात्म्याचे थोरपण प्रज्ञाचक्षू, ज्ञानेशकन्या व कृष्णपत्नी म्हणून ज्यांच्या वैदर्भीय संतांनी गौरव केला ते माधान निवासी गुलाबराव महाराज आडकुजी महाराजांचे अवतार कार्य फार प्रभावी

पणे व यथार्थपणे सांगतात.

या कलियुगी नर तनू भूतानी, पापे परुनी वाढ झाली खुजी
यास्तव जन तारावा, अवतीर्ण संत आडकुजी

(रा.मो.बेलुरकर,)

वेदांत केसरी श्री.बाबाजी महाराज पंडीत एक आगळे व्यक्तिमत्व !

वैदर्भीय संत व प्रज्ञाचक्षू श्री.गुलाबराव महाराजांचे उत्तराधिकारी आणि मधुराद्वैत संप्रदायाचे व्दितीय आचार्य नारायण पैकाजी पंडित उर्फ श्री.बाबाजी महाराज यांचा जन्म कालीमाते च्या वास्तव्याने पुनित झालेल्या चंद्रपुर या पुराण क्षेत्रात इ.स. १८८६ च्या मकर संक्रांतीच्या शुभ मुहूर्तावर झाला. या विभूतीच्या जन्माबरोबरच जणू काय रविसंक्रमणा बरोबरच अध्यात्म क्षेत्रातही महान संक्रमणाचा काल उदयास आला. 'पैकाजी' घराण्यामधे या ज्ञानमार्तडाचा जन्म म्हणजे जणू संस्कार कंद्रामध्येच हा ज्ञानसूर्य जन्मा आला ज्याने संपूर्ण विदर्भ नव्हे संपूर्ण महाराष्ट्राला ज्ञानामृताचे पान करविले. पैकाजी पंडितांच्या सात्विक घराण्यामधे हे ज्ञनाचे रोपटे जसे जसे वाढू लागले तस तसे आासपासच्या लोकांना या दिव्यविभूतीची अनुभूति येऊ लागली.

वयाच्या १९ व्या वर्षी इ.स. १९०५ मधे आई, वडील, शिक्षण नोकरी वगैरे सर्व सोडून श्री.गुलाबराव महाराजांच्या सेवेत त्यांनी स्वत:ला झोकून दिले. त्यांचे जवळ पराकोटीची गुरुभक्ती असल्यामुळे ते लवकरच श्री.गुलाबराव महाराजांचे पट्ट शिष्य म्हणून ओळखले जाऊ लागले. वस्तुत: इतक्या लवकर प्रसिध्दीच्या झोतात त्यांना यायचेच नव्हते. परंतु विदर्भाने ज्या अनेक संत महंताचे दर्शन घेतले त्यात अलौकिक संत गुलाबराव महाराजांचे नाव अग्रसेर आहे व त्यांचे पट्ट शिष्ट म्हणून आपोआपच प.श्री.बाबाजी महाराजांचे नाव घेतले जाऊ लागले. जन्मत:च कुशाग्र बुध्दीचे व सात्विक वृत्तीचे श्री.बाबाजी महाराज अध्यात्माची जात्याच आवड असल्याने जणू काय 'नराचा नारायण' होऊनच पंडीत घराण्यात जन्मास आले.

बालवयातच विविध लीला आणि प्रसंग त्यांच्या चरित्रातून दिसतात. त्यांची वृत्ती चिंतनशील होती परंतु कसाही प्रसंग असेल तरी खरे बोलावे हा त्यांचा

''बाणा'' बालपणची खेळाडू वृत्ती व मित्राबरोबर खेळण्यात दंग असतांना आपोआपच स्वत:स विसरुन जात व अध्यात्मिक तत्वज्ञान मुखाातात येऊ लागे. एकदा असेच आपल्या चिंतनात गढून गेलेल्या अवस्थेत व खेळात दंग अशा व्दिधा अवस्थेत रस्त्याने जाताना समोरुन प्रेत यात्रा येताना दिसली. त्याकाळी प्रेत पाहणे तर सोडाच प्रेतयात्रा पाहणे (लहान मुलांसाठी) जवळ जवळ बंदीच होती आणि महाराजांना त्याक्षणी काही सुचले नाही म्हणून पळ काढला तो प्रेताच्या खालून निघाले प्रेत यात्रेतील लोकही विचित्र नजरेने पाहू लागले. भानावर आल्यावर महाराजांना आपली चुक समजली. परंतु घरी येताच आपल्या आईला ही सत्य घटना सांगण्यास ते विसरले नाहीत. जे घडले ते वडीलधारी माणसांना सांगण्याचे धैर्य त्यांचेजवळ होते. बालवयात दररोज मारूतीच्या दर्शनास अवश्य जात असत. हा नियम अगदी अखेर पर्यत कायम होता म्हणूनच तेजस्वी बुध्दीला बलोपासनेची जोड मिळाली आणि 'संत सत्ता संयोग की जाहला' असे वाटले सूर्य नमस्कार हा या बलोपासनेचाच एक भाग होता.

घरातील लहान भावडांना 'देवी' निघाल्या असता स्वत: निकोप राहून त्यांची सेवा सुश्रृषा केली. भावंडांना पाळण्यावर बसवावे व देवाची गाणी म्हणून त्या दु:खीजीवांना सहारा द्यावा. शिवाय घरातील अल्प मिळकत लक्षात घेऊन कधी कोणत्या गोष्टीचा हट्ट त्यांनी केला नाही. अकाली 'पोक्तपण' आल्या सारखे ते वागले. नागपूरला जाऊन मॅट्रीक ची परीक्षा दिली. त्यावेळी नागपूरात प्लेग ची साथ सुरु होती. त्यांनी तेथे जाऊ नये असे सर्वांचे मत होते. परंतु मला परिक्षेला जाऊ द्या ! मला काही होणार नाही असे आत्मविश्वास पूर्वक कळकळीचे बोल त्यांनी वडील मंडळी जवळ काढले व शेवटी ते मॅट्रीकची परिक्षा उत्तम रीतीने पास झाले आणि बाबाजींना पुढील शिक्षणासाठी नागपुरलाच पाठवावे असे ठरले.

''रात्रं दिवस नेणे। थोडे बहु न म्हणे।
लोण करी सउळा। जीवीताचे॥

अशी त्यांची अवस्था होती. नागपूरला गुरुचरित्र पारायणाचा ध्यास लागला. एक दोन तीन अशी पारायणे सुरु झाली आणि त्यामुळे जणू काय श्री.गुरु

प्राप्तीचा मार्ग 'सिध्द' झाला. याच सुमारास श्री.भाउसाहेब खापरे यांची भेट झाली. अध्यात्म चर्चा सुरु झाल्या. कुणी गावात सत्यपुरुष आले तर दोघे मिळून दर्शनास जात हा परिपाठ हरिकीर्तन प्रवचन सत्संग सुरु झाला आणि योगा योग असा की, कुणी जन्मांध असे माधान येथील संत आल्याची वार्ता कानी पडली. पहिल्या भेटीतच गुलाबराव महाराजांच्या कृपेचा वर्षाव जणू बाबाजीवर पडला आणि ते अस्वस्थ झाले. वास्तविक ते महाविद्यालयीन शिक्षण घेण्यासाठी नागपुरात आले होते. महाल मधील हिस्लॉप कॉलेज मधे प्रथम वर्षात शिकत होते. परंतु श्री.गुलाबराव महाराजांची भेट झाली आणि त्यांच्या जीवनाला वेगळीच कलाटणी मिळाली. ते वर्ष १९०२ होते. अभ्यास सोडून हा कोण्या महाराजांच्या नादी लागला म्हणून घरच्यांचा रोष वाढीस लागला. परंतु राग, लोभाच्या भावना शिल्लकच राहिल्या नव्हत्या. महाराज शुध्दीवर होते कुठे ? सद्गुरु सेवेत ते रममाण झाले होते. 'पोरगा हातचा गेला' म्हणून पैकाजी पंत पंडितांना फार वाईट वाटले. त्यांनी त्यांना वठणीवर आणण्याचा आटोकाट प्रयत्न केला. त्यांना नागपूरात नोकरी मिळवून दिली व आता तरी हा मुलगा सुधारेल म्हणून वाट पाहू लागले. परंतु मुलगा बिघडतच गेला. नोकरीलाही वेळेवर जाईना. खाडे वरचेवर वाढू लागले. शेवटी सर्वाचाच त्याग करुन गुरु सेवेला वाहून घेतले. पराकोटीची गुरुभक्ती पंडितांच्या हृद्यात अंकुरली व पुढे पुढे फुलतच गेली. वस्तुत: गुरु शिष्यांच्या वयात केवळ 'चार' वर्षाचे अंतर होते. पण गुरु तो गुरु व शिष्य तो शिष्य असे नाते जुळले, जन्मोजन्मीचे. कपडे धुण्यापासुन, स्वयंपाक करण्यापासून तर अगदी ग्रंथ लेखन करण्यापर्यंत सर्व लहान मोठी कामे महाराजांनी उत्साहाने केली. गुरुचा एकही शब्द खाली पडू दिला नाही. जणू काय पंडिताच्या रुपाने ज्ञानेश्वरीत वर्णन केलेली आचार्योपासना म्हणजे 'गुरु सेवा' मूर्तिमंत साकार झाली आणि त्याची प्रचीती म्हणून श्री.गुलाबराव महाराजांच्या मुखातून 'माझे ग्रंथ तू वाच तुला ते समजतील' असा अमोघ 'आशीर्वाद' पंडितांना मिळाला. खऱ्या (पंडिताला) शिष्योत्तमाला याहून मोठा कोणता परमार्थ साधावयाचा असतो.

आशीर्वाद मिळताच व 'गुरु कृपा' होताच त्यांनी स्वरचित अभंग

रचना, हरीपाठ रहस्य, अमृतानुभव कौमुदी, ज्ञानेश्वरी गुढार्थ दीपिका या वारकऱ्यांच्या प्रस्थान त्रयीवर भाग्ये लिहीलीत महाराजांच्या अनेक ग्रंथावर विवरणे लिहिली. राष्ट्रविषयावर, धर्म विषयावर व भक्ति वेदांतावर अनेक, लेख लिहीलेत. विशेष महत्वाचे असे की, शंकराचार्यांच्या अव्दैत रुपी सुवर्णावर संतांची सगुण भक्ती अलंकारा प्रमाणे कशी शोभायमान झाली आहे याचे सविस्तर खंडन पुर्वक विवेचन करुन शांकर तत्वज्ञानाचा त्या आधारावरच श्री.गुलाबराव महाराजांच्या अध्यस्त विवर्ता चा भक्तिसिध्दांत कसा परिपुष्ट झाला आहे हे दाखवून दिले व त्यांना वेदांत केसरी हा बहुमान मिळाला. १९३२ या वर्षात प्रयाग ते आळंदी पायी प्रवास करुन गंगेची कावड आणली व माऊलीस अभिषेक केला आणि १ फेब्रुवारी १९६४ रोजी अमरावती येथील ज्ञानेश्वर मंदीरात देह ठेवला व आपले अवतारकार्य पूर्ण केले.

(प्रा.नारायण दाभाडकर

(जयदंब महाविद्यालय, अचलपुर यांच्या सौजन्याने.)

आकोटचे संत श्री.नरसिंह महाराज

विदर्भातील संतश्रेष्ठ श्री.नरसिंग महाराजांची यात्रा अकोला जिल्ह्यातील आकोट येथे येत्या बुधवार, दि. २४ पासून सुरु होते. ही यात्रा तब्बल दीड महिना चालते ! कार्तिक वद्य पंचमीला शनिवार २७ रोजी महाराजांच्या गुरुच्या पुण्यतिथी उत्सव कार्तिक वद्य अष्ठ रविवार दि. २८ रोजी गोपालकाला होऊन हजारो भाविकांनी महाप्रसाद देण्यात येतो.

हिंदू-मुसलमान यांना जन्म देणारा ईश्वर एकच आहे. तोच सर्वांच्या ठायी आहे. जळी, स्थळी, काष्ठी पाषाणी सर्वत्र तो असून त्यास कोणी ईश्वर तर कोणी अल्ला अगर रहीम म्हणतात. असा वैदर्भीय जनतेला उपदेश देणारे संत श्रेष्ठ श्री.नरसिंग महाराज यांचा जन्म निजामच्या काळात प्रसिध्दी पावलेल्या नाहाटे घराण्यात इ.स.१८०५ साली झाला. महाराजांच्या घरी वतनदारी पाटीलकी होती. महाराजांचा कल लहानपणापासूनच संसारापेक्षा परमार्थाकडेच होता. व त्यात व ते नेहमी मग्न असावयाचे. त्यापायी पुढे त्यांनी स्वत:च्या संसाराकडे दुर्लक्ष केले.

एके दिवशी त्यांना अचानक आलेला अवलिया कुवतशाअली मियॉसाहेब हे संतपुरुष भेटले. ही भेट म्हणजे जणू जीवा-शिवाचीच भेट ठरली. कुवतशाअली हे सिध्द पुरुष होते, असे म्हणतात की, ते मुसलमान असून ही त्यांना वेद पाठ होते ! त्यांना भजनाचा नाद होता, त्यांना गुरु करावे अशी श्री.नरसिंग महाराजांना तीव्र इच्छा झाली व त्यानुसार त्यांनी गुरुउपदेश घेतला.

एकदा महाराज उमरा येथे गुरुजवळ बसले असता महाराजांची आई मरण पावली असा निरोप त्यांना सिरसोली गावावरुन आला. महाराजांनी ते ऐकले, ध्यानस्थ झाले व थोड्या वेळाने म्हणाले एक दिवस सर्वानाच जायचे आहे, आई गेली, ईश्वरचरणी लीन झाली. हे पाहून गुरु मियॉसाहेब म्हणाले, ''केवढा ब्रम्हनिष्ठ झाला हा माझा नरसिंग'' मियॉसाहेबांनी विचार करुन त्यांना आज्ञ केली की, ''तुझी आई मरण पावली. तुला पुत्रकर्तव्य करावायचे आहे. तू आईच्या भेटीस जावे'' तिकडे सिरसोलीत तिरडी. उचलणार एवढ्यात महाराज पोचले व अत्यंत गदगद स्वरात म्हणाले, ''मायबाई ऊठ मला जेवू घाल ! माझ्यावर का रागावलीस ? उठ आता !'' आणि काय आश्चर्य ! आई उठून बसली ! तेथे असलेल्या सर्व लोकांनी महाराजांचा जयजयकार केला. तेव्हापासून महाराजांची कीर्ती वाऱ्यासारखी पसरली व त्यांना संतत्व प्राप्त झाले.

महाराजांचे गुरु अवलिया मियॉसाहेब यांनी महाराजांच्या उपस्थितीत समाधी घेतली तेव्हापासून महाराज दरावर्षी आपल्या गुरुची पुण्यतिथी साजरी करीत व त्यांनी यात्राही सुरु केली. ती यात्रा अजूनही तशीच चालू आहे. ती कार्तिक वद्य एक ते मार्गशीर्षवद्य तेरा या तिथीपर्यत सुरु राहते.

माघ, शुध्द पोर्णिमा पुनर्वसू नक्षत्र शके १८०९ म्हणजे १८८७ रोजी ब्राह्ममुहूर्तावर महाराजांनी यद्मासन घालून समाधी घेतली. तेथे सुंदरसे मंदिर उभारण्यात आले. या संस्थानाची व्यवस्था आसरकर घराण्याकडे वंशपरंपरागत सुरु आहे. श्री.नरसिंग महाराज व संत गजानन महाराज यांच्या वारंवार भेटी झालेल्या आहेत. नरसिंग महाराजांच्या समाधीच्या वेळी गजानन महाराज हजर होते.

एन के देशमुख, यांच्या सहकार्याने

परिशिष्टय (२)

धार्मिक संस्था, संस्थाने , अमरावतीतील मंदिरे

०१) श्री एकवीरा देवी, खडकाडीपूरा.

०२) श्री भोलश्वर मंदीर, महाजनपुरा.

०३) श्री अवधूत महादेवी मंदीर, डोहोरपुरा.

०४) श्री मातादेवी मंदीर, माताखिडकी.

०५) श्री लोश्वर मंदीर, आनंद नगर.

०६) श्री गढी मासती, खडकाडीपुरा.

०७) श्री श्रीकृष्णमंदिर. (महादेव मठ) खडकाडीपुरा.

०८) श्री वामेश्वर मंदिर. आनंद नगर.

०९) श्री कान्होबा मंदिर, माळीपुरा.

१०) श्री रोकडोळा हनुमान नगर

११) श्री सोमेश्वर मंदिर, भाजीबाजार.

१२) श्री मुरलीधर मंदिर, भाजीबाजार.

१३) श्री दत्तमंदिर.(कुंभारवाडा)

१४) श्री पट्टाभिराम मंदिर.कुंभारवाडा.

१५) श्री बापूजी मंदिर.भाजीबाजार.

१६) श्री निळकंठेश्वर मंदिर,बुधवारा.

१७) श्री राधाकृष्ण मंदिर, दहीसाथ.

१८) श्री राममंदीर,दहीसाथ.

१९) श्री शनि मंदिर, जुना बाजार.

२०) श्री गजानन मंदीर, ओसवालपुरा.

२१) श्री एकमुखी दत्त मंदिर, अंबागेट.

२२) श्री कालाराम मंदिर, सक्करसाथ.

२३) श्री महादेव मंदिर, सक्करसाथ.

२४) श्री हनुमान मंदिर, धनराज लेन.

२५) श्री राधाकृष्ण मंदिर, रंगारी गल्ली.

२६) श्री माहेश्वरी (माहेश्वरी मंदिर) धनराज लेन.

२७) श्री सत्यनारायण मंदिर, धनराज लेन.

२८) श्री अंबादेवी संस्थान,अमरावती,अंबागेट.

२९) श्री एकवीरा देवी मंदिर, अंबागेट.

३०) श्री बडे बालाजी मंदिर, अंबागेट.

३१) श्री छत्रपती बालाजी मंदिर, छत्रपुरी.

३२) श्री रामप्यारे मंदीर, मसानगंज.

३३) श्री रामव्दारा सातखिराडी.

३४) श्री श्रीराममंदीर,रामनगर,दीपार्चन,राजापेठ.

३५) श्री हनुमान मंदीर,राजापेठ नाका.

३६) श्री उदासी आखाडा मंदीर, सक्करसाथ.

३७) श्री श्रीराममंदीर (आळशींचे)रेल्वे स्टेशन जवळ.

३८) श्री श्रीकृष्ण मंदिर (ताई महाराज) अंबापेठ.

३९) श्री हनुमान मंदिर,नमूना.

४०) श्री हनुमान मंदीर,नमूना.

४१) श्री तुळजागीर वाडा, गांधी चौक.

४२) श्री बजरंग बाबा मंदिर बालाजी प्लॉट.

४३) श्री रतनगंज मंदिर (चेतनदास बाबा)

४४) श्री व्दारकाधीश मंदिर.(भिवापुरकर गल्ली)

४५) श्री विठ्ठल मंदिर, दहीसात, अमरावती.

४६) श्री विठ्ठल मंदिर,अंबागेट,पटवीपुरा.

४७) श्री विठ्ठल मंदिर, नारखेडा.

४८) श्री काळा मारोती संस्थान, नारखेडा.

४९) श्री पांढरा मारुती, टोपेनगर.

५०) श्री हनुमान मंदिर, गंभीरपुरा.

५१) श्री लाल हरदौल मंदिर, छत्रपुरी.

५२) श्री बालाजी मंदिर, खईगंज,चित्राचौक.

५३) श्री हनुमान मंदिर, जवाहर गेट जवळ.

५४) श्री रामदेव मठ, राममंदिर, प्रभात चौक.

५५) श्री हनुमान मंदिर, जोग चौक.

५६) श्री हनुमान मंदिर,(गोपाल टॉकीज)

५७) श्री राम मंदिर (काठेवाडी),राजापेठ.

५८) श्री हनुमान मंदिर,दसरा मैदान.

५९) श्री ज्ञानेश्वर मंदिर, भाजीबाजार.

६०) श्री नानक शाही मंदिर, वसई चौक.

६१) श्री नृसिंह मंदिर, बुधवारा.

६२) श्री विठ्ठल मंदिर,बुधवारा.(केवले गल्ली)

६३) श्री गडगेश्वर मंदिर.

६४) श्री बालकृष्ण मंदिर, भाजीबाजार.

६५) श्री महादेव मंदिर, वलगाव मार्गे.

६६) श्री भंगी गुरु मंदिर.

६७) श्री साईबाबा मंदिर, साईनगर.

६८) श्री समर्थ मंदिर, मोर्शी मार्गे.

६९) श्री महादेव मंदिर, मांगीलाल प्लॉट.

७०) श्री गणेश मंदिर, भाजीबाजार.

७१) श्री हनुमान मंदिर, भाजीबाजार.

७२) श्री शंकर मंदिर, स्मशान.

७३) श्री गजानन मंदिर, प्रभात नगर.

७४) श्री अक्कल कोट स्वामी मंदिर,कल्याण नगर.

७५) श्री हनुमान मंदिर, कल्याणनगर.

७६) श्री महादेव मंदिर, फ्रेझर पुरा.

७७) श्री हनुमान मंदिर आटोगल.

७८) श्री संतोशी माता मंदिर.

७९) श्री नागनाथ मंदिर, महाजन पुरा.

८०) श्री नागोबा मंदिर, मसानगंज.

८१) श्री तिरुपति बालाजी मंदिर.

८२) श्री हनुमान मंदिर,विलासनगर.

८३) श्री आदिनाथ अतिशयक्षेत्र मंदिर,(जैन).

८४) श्री श्वेतांबर बडा मंदिर.

८५) श्री सीताराम महाराज टेंबे स्वामी मंदिर,(झिरी).

८६) श्री संत श्री गाडगे महाराज मंदिर, गाडगेनगर.

८७) संत श्री नामदेव महाराज मंदिर, गाडगेनगर.

चर्च (प्रार्थना मंदिर.)

०१) रोमन कॅथॉलिक चर्च, कॉन्व्हेट कचेरी रोड.

०२) प्रोटेस्टंट चर्च अंबापेठ.

०३) पाटीपुरा चर्च.

०४) बॅप्टीस्ट चर्च.तपोवन रोड.

धार्मिक संस्था

०१) श्री महानुभाव आश्रम,छत्रीतलाव रोड.

०२) श्री नागदेव आश्रम, बडनेरा रोड.

०३) श्री गोरक्षण संस्था, ह.व्या.प्र.मंडळ परिसर.



पवित्र मेरी



गुरूद्वारा बुटीप्लॉट, अमरावती.



पूज्य दरबार साहेब

०४) आर्यसमाज मंदिर, जुना मोटार स्टँड.

०५) मिशन स्कूल, मोटार स्टँड.

०६) हिंदु बाल अनाथालय, चित्रा चौक.

०७) लिंगायत मठ. गंगाधर स्वामी मठ.माताखिडकी.

०८) हिरे मठ.बुधवारा.

०९) माजलगावकर मठ.

१०) शेटे मठ.

११) लोहार मठ.

१२) देवी मंदिर मठ, औरंगपुरा.

१३) मृगेंन्द्र मठ, अंबागेट.

१४) चंपा मठ, दहीसाथ.

१५) कुऱ्हे मठ, मुधोळकर पेठ.

१६) माहेश्वरी भावन.

१७) मलिका जुने मठ/जुनी कोतवाली.

धर्मशाळा.

०१) सराय, जयस्तंभ चौक.

०२) जवाहर बालमुकद धर्मशाळा, मोटार स्टँड.

०३) सिकची धर्मशाळा.

०४) धामपुरी बालाजी धर्मशाळा.

०५) भुतेश्वर धर्मशाळा.

०६) मोठे सराय.

०७) सराय राजापेठ नाका.

०८) झुनझुनवाला धर्मशाळा.

०९) राजुबाई धर्मशाळा.

१०) धर्मदाय कॉटन मार्केट धर्मशाळा.

११) रेस्ट हाऊस, मालटेकडी रोड, (शासकीय)

१२) रेस्ट हाऊस, जेल रोड (शासकीय)

अमरावतीवासीं श्री. अंबादेवी - एक अभ्यास

(ले.भि.दे.करंजकर,अमरावती.)

विदर्भात अमरावतीला श्री अंबादेवीचे पुरातन मंदिर असून, या मंदिरातून भगवान श्री कृष्णाने देवी रुख्मिणीचे हरण केले. अशी आख्यायिका आहे. आख्यायिका किमान गेली सातशे वर्षे प्रचलित असावी असे वाटते. इ.स.तेराव्या शतकात ही आख्यायिका प्रचलित होती याचा पुरावा उपलब्ध आहे. तो असा -----

महानुभाव पंथाचे प्रवर्तक रिध्दपुरचे श्री गोविंदप्रभु हे तेराव्या शतकांत या भागांत भ्रमण करत ''उंमरावतीस'' आले व येथे त्यांनी ''रुख्मिणी हरण स्थान'' पाहिले. अशी नोंद स्थान - मार्गे - दर्शक पोथीत आहे.

यावरुन तेराव्या शतकात ही आख्यायिका प्रचलित होती व ज्या अंबेचे मंदीराशी ही आख्यायिका निगडीत आहे. ते मंदिरही कोणत्या ना कोणत्या स्वरुपात तेथे अस्तित्वात होते. कारण मंदिरच नसेल तर आख्यायिका अस्तित्वात राहिली नसती. हाच तो पुरावा होय. किंवा दुसरी शक्यता अशी की, श्री गोविंद प्रभु यांच्या सारख्या अधिकार प्राप्त , पोचलेल्या सत्पुरुषानी सांगितल्या मुळे, येथील अंबेच्या मंदिरातून ''रुख्मिणी हरण झाले '' ही प्राचीन माहिती तत्कालिन लोकांना कळली व नंतर सर्वत्र आख्यायिका रुपाने पसरली. असाही या आख्यायिकेचा उगम असू शकेल.

पण मग ज्या मंदिरातून द्वापरयुगात रुख्मिणी हरण झाले ते अंबेचे मंदिर फार जुने आहे असा विश्वास बसावा इतपत, त्याकाळी त्या मंदिराचे स्वरुप व बांधकाम असले पाहिजे. आणि तसे ते असेलही व ही मीमांसा मान्य केल्यास अंबेचे मंदिर त्या तेराव्या शतकापूर्वी शे-दोनशे-चारशे वर्षे अस्तित्वात होते हे आपोआपच सिध्द होते.

ही दुसरी शक्यता बाजूला ठेवली तरी एक गोष्ट निर्विवाद आहे की, तेराव्या शतकात अमरावतीला अंबेचे मंदिर व रुख्मिणी हरण आख्यायिका दोन्ही अस्तित्वात आहेत. हे वरील पुराव्यावरुन स्पष्ट दिसून येते. ही आख्यायिका पिढी दर पिढी आजपावेतो प्रचलित आहे.

वर उल्लेखिलेले व श्री गोविंद प्रभुंनी पाहिलेले आणि आपल्या शिष्यास

दाखविलेले '' रुख्मिणी हरण स्थान'' म्हणजे अमरावतीच्या माता खिडकी विभागातील परकोटाबाहेर नैऋत्येला असलेली महानुभाव मठाची जागा होय. हल्ली येथे श्रीकृष्ण मंदिर आहे. अंबेचे मंदिरापासून हे स्थान सुमारे अर्धा फर्लांग वर पश्चिमेस आहे. त्याचप्रमाणे तेराव्या शतकात पूर्वी अनेक वर्षे हे मंदिर व आख्यायिका अस्तित्वात असावी असे जे वर म्हटले आहे, त्याचे आणखी एक कारण म्हणजे ज्या उमरावतीत हे मंदिर आहे ते अमरावती गांव देखील इसवीसनाच्या अकराव्या शतकात ''ग्राम'' स्वरुपात अस्तित्वात असल्याचा पुरावा म्हणून एक मूर्तिलेख उपलब्ध आहे. या मुर्तीची प्राणप्रतिष्ठा विक्रम संवत अकराशे त्रेपन्न (म्हणजे इसवीसन १०९७) मध्ये झालेली आहे त्या काळी या ग्रामाला ''उदुंबरावती'' हे नांव असून या ग्रामाची वस्ती, अंबेचे मंदीराच्या पश्चिमेला सुमारे अर्धा फर्लांगवर हल्ली जेथे कुंभारवाडा, गढी, खरकाडीपुरा व ब्राम्हणवाडा हे मोहल्ले आहेत, तेथे होती व मूर्तीलेख असलेले जैन मंदिर या भागातच, म्हणजे वस्तीलाच होते व आजही आहे.

यावरुन अंबादेवीचे मंदीर व आख्यायिका तेराव्या शतकापुर्वीही शेकडोवर्षे अस्तित्वात असावी हे अनुमान केले आहे. कारण ''उदुंबर'' या वृक्षाचे संस्कृत नावावरुन या ''ग्रामा'' ला जे उदुंबरावती हे नाव ''ग्राम'' बसले त्यावेळी दिल्या गेले तो काळ म्हणजे संस्कृत भाषेचा बोलबाला असलेला काळ असला पाहिजे हे उघड आहे व असा काळ म्हणजे १० किंवा ९ वे शतक असावे. कारण अकराव्या शतकाच्या उत्तरार्धात व पुढे बाराव्या शतकात मराठी प्राकृत भाषा ही जनसामान्याची भाषा म्हणून उदयाला आली व उन्नत झाली व संस्कृत ही काही मर्यादित संख्येच्या लोकांपुरतीच राहिली व त्यामुळेच बाराव्या शतकात किंवा त्या सुमारास या ग्रामाचे ''उदुंबरावती'' ह्या संस्कृत नावाऐवजी प्राकृत ''उंबरावती'' असे नाव प्रचारात आले. आणि पुढे चौदाव्या शतकात या भागावर जेव्हा उत्तरेस मुस्लीम सत्तेचा अंमल सुरु झाला त्या काळात ''उंबरावतीचे'' ''उमरावती'' असे रुप होवून हेच नाव पुढे इ.सन १९५० पावेतो चालत आले आहे व त्याचे शेकडो पुरावे उपलब्ध आहेत. ''अमरावती'' हे नाम फार अलिकडचे आहे. Amravati हया इंग्रजीच्या अनुवादातून ते जन्माला आले आहे.

इतिहासाचार्य कै.राजवाडे यांच्या ''नामदिशब्दव्युत्पत्तिकोशी'' त देखील ''उदुंबरावती-उंबरावती(प्राकृत) उमरावती'' अशीच या गावाच्या नावाची व्युत्पत्ती दिलेली आहे. पंधराव्या शतकाच्या उत्तरार्धात संभवत: दोन वर्ष दुष्काळामुळे हे गांव उजाड असावे. २९ जून १७०७ ते १७१९ ही बारा वर्षे गांव उजाड आहे व त्याचा २९ जून १७१९ चा एक लेखी पुरावा उपलब्ध आहे. त्यानंतर कसबा व नंतर पेठ बनले आणि इ.सन १७९० चे सुमारास हे गांव वऱ्हाड प्रांतातील अग्रगण्य अशी सावकारी व व्यापारी पेठ म्हणून प्रसिध्दीस आले. म्हणजे हल्लीच्या अमरावतीच्या वस्तीची सुरुवात १७२२ नंतरची आहे . व क्रमाक्रमाने विकसित झालेली आहे.

श्री.अंबेचे मुळ मंदिर दगडी बांधणीचे असावे. कारण हल्ली श्री.अंबेचे मंदिरातील एका भिंतीत काही देवी देवतांची चित्रे कोरलेली दगडी शिल्पे दिसतात. तव्दतच या मंदिराचे दक्षिणेकडून जो ओढा आहे तो उतरण्यासाठी पुर्वी दगडी पायऱ्या होत्या. यातील एका पायरीला देखील असाच एक दगडी शिल्पावशेष दिसून येतो. तसेच एकविरा मंदिरातही जनार्दन स्वामीचे समाधी बाहेर एक दगडी शिल्पावशेष मूळ (बहुधा तो स्तंभाचा भाग असावा) ठेवलेला आहे. हे शिल्पावशेष मूळ मंदिराचे असावेत. कारण तसेच कोरीव विशिष्ट दगड वापरुन बांधलेली कोणतीही वास्तू जवळपास आढळत नाही. अर्थात शास्त्रज्ञ त्यांच्या जुनेपणाचा निर्वाळा देवू शकतील. शिवाय आजुबाजुला उत्खनन केल्यास यावर अधिक प्रकाश पडू शकेल. पण मूळ मंदिर जीर्ण झाल्याने पडले असावे किंवा तेराव्या चौदाव्या शतकात उत्तरेकडील मुस्लीम सत्तेने दक्षिणेकडील प्रवेशाच्या सुरुवातीचे काळात ते उध्वस्त केले असावे. त्यानंतर पुन्हा या मंदिराचा जीर्णोध्दार १९ व्या शतकात झाला असावा असे दिसते. हल्लीचे मंदिर हे गेल्या दीडशे वर्षातील आहे हे त्याच्या बांधणीवरुन व बांधकामासाठी वापरलेल्या साहित्यावरुन दिसून येते.

श्री अंबा भवानीची मूर्ती वालुकामय असून बसलेली आहे. सर्व शरीर तेलकट, काळसर आहे. या मूर्तीवर जे मंदीर आहे त्याच्या कमानी दगडी आहेत व असे दिसते की या मूळ मंदिरात नव्याने बांधल्या असाव्यात.

''अंबेचे मंदीराचा जीर्णोध्दार करण्यासाठी इ.स.१९६३-६४ मध्ये अमरावतीचे कै.श्रीकृष्ण बापूजी उर्फ नाना चिमोटे व कै.केवलचंद सेठ मोता यांनी गावातून वर्गणी गोळा केली व पंच कमेटी नेमली'' अशी माहिती येथील एक वयोवृध्द नागरीक कै.टिकेकर गुरुजी यांनी दिली होती. पण '' ह्या अंबेच्या मंदिराची पूजा व व्यवस्था गोंधळी लोक करीत असत. कै.नानासाहेब चिमोटे व कै.केवलचंद सेठ यांनी न्यायालयातून मंदिराचा ताबा मिळवून नंतर पंच कमेटी नेमली व वर्गणी जमवून याचा जीर्णोध्दार केला '' अशी माहिती कै.नानासाहेब चिमोटे यांचे चिरंजीव श्री रामभाऊ चिमोटे यांनी दिली आहे.

गॅझेटियर मधील माहिती

इ.स.१८७० साली ईस्ट बेरारचे कमिश्नर सर आल्फ्रेड लॉयल यांनी संपादन केलेले '' गॅझेटियर फॉर हेद्राबाद असाईन डिस्ट्रिक्टस (कॉमनली कॉल बेरार) हे पुस्तक प्रसिध्द झाले त्यात अमरावतीची माहिती दिलेली असून, मंदिरे या सदरात ''दोन देवीची १ बालाजीचे व इतर ५ '' मंदिरे या शहरात असल्याचे नमूद आहे, तसेच '' देवीचे मंदिर हजार वर्षापूर्वी बांधलेले असून, इतर १०० वर्षापूर्वीचे आहेत '' असे म्हटले आहे.

गॅझेटियरमधील या माहितीवरुन हे दिसून येते की देवीचे मंदीर हे त्या काळातही महत्वाचे शहरातील प्रमुख व हिंदूंचे पवित्र स्थान गणल्या जात होते. पूर्वापार ही परंपरा चालत असल्यामुळे त्याचा उल्लेख तसा करणे भागच होते. व म्हणूनच देवी मंदीर व सोबत बालाजी मंदीराचा त्यात नावनिशिवार उल्लेख केला आहे. इतर मंदीरे महत्वाची वाटत नसल्याने त्यांची केवळ संख्या दर्शविली आहे. शिवाय देवीचे मंदिर हजार वर्षापूर्वी बांधलेले '' आहे असा स्वतंत्र निर्देश गॅझेटियरला करावा लागला व तो बरोबर आहे.

इ.स.१८७० ची अमरावती

इ.स.१८७० साली अमरावतीची सर्व वस्ती परकोटाचे आतच होती. सायंकाळी परकोटाची महाद्वारे बंद केली जात आणि सकाळी उघडत. परकोटा बाहेर वस्ती नव्हती. केवळ काही जुन्या इमारती होत्या पण त्यात मनुष्यवस्ती नव्हती असे दिसते. शहराबाहेर आग्नेयेला देवीची दोन मंदिर व बालाजी मंदिर आणि पूर्वेकडे दूर

१८५९ साली बांधलेले रेल्वे स्टेशनची इमारत होती. तसेच तहसील कचेरी स्मॉलमॉज कोर्ट, हेड पोस्ट ऑफीस, तार ऑफीस ह्या इमारती नुकत्याच बांधल्या होत्या. अमरावतीचा आठवडी बाजार हल्लीचे जवाहर गेटचे बाहेर मोकळ्या जागेत भरत असे. बाकी सर्व शेते किंवा पडीत जमीन आणि झाडा झुडपांनी व्यापलेली जमीन होती. दिवसादेखिल एकटा दुकटा माणूस बाहेर जायला घाबरत असे. देवीचे दर्शनासाठी किंवा स्टेशनवर जातांना सोबत ५-१० लोक असल्या खेरीज कोणी जात नसे. (अमरावतीच्या परकोटाची महाद्वारे इ.स.१८८३ च्या १५ ऑगस्ट नंतर रात्री सुध्दा उघडी ठेवण्यात येऊ लागलीत. नगरपालिकेने ठराव करुन तसे ठरविले होते १८८३ नंतर हळू हळू परकोटा बाहेर वस्ती होऊ लागली.) अशी त्यावेळी स्थिती होती.

इ.स.१८८९ पावेतो श्री.अंबेच्या मंदिराची बरीच वाढ झाल्याचे रेकॉर्ड वरुन दिसून येते. मुख्य मंदिर व सभोवारच्या इमारती बांधल्या गेल्या होत्या. शिवाय श्री.अंबेचे सुवर्णलंकार देखील पुष्कळ वाढले होते व ते गावातील एका सावकाराच्या वाड्यातील तळघरांत ठेवले जात असत. १८९० साली संस्थानाने मंदीरा समोरील पाठशाळेची दुमजली इमारत व नौबतखाना बांधला आणि देवीचे सुवर्णालंकार संस्थान मध्येच ठेवण्याची व्यवस्था केली. यावरुन हेच अनुमान निघते की, अंबेच्या मंदीराचे वैभव आणि महत्व तत्पूर्वीच्या शतकभर सतत वाढत होते. पंच प्रथाही चालू असली पाहिजे असे वाटते. अनुमान तर असे आहे की, देवीची दोन्ही मंदीरे अठराव्या शतकाचा उत्तरार्ध व एकोणविसाव्या शतकाचा पूर्वार्ध या काळांत क्रमाक्रमाने चांगली विकसित झाली असावीत व मंदीरात पूजा अर्चा व पहाऱ्यासाठी माणसे व इतर सेवक वर्ग असावा.

इ.स.१८७० च्या गॅझेटियरने आणि पुढे १९११ साली प्रसिध्द झालेल्या अमरावती जिल्हा गॅझेटियरने अंबेचे नावावरुन गांवाला अमरावती हे नावं मिळाले. या बद्दल शंका व्यक्त केली आहे व ती यथार्थ आहे. या गावाचे नाव व्युत्पत्तीबद्दल माहिती दिली आहेच.

बळींची प्रथा

''दसऱ्याला गांवच्या पैशाने हेला घेऊन तो मिरवणूकीने नेतात व देवी समोर पाटील स्वहस्ते मारतो व नंतर महारास देतो. असा ह्या प्रथेचा उल्लेखही १८७० च्या गॅझेटियरमध्ये आहे.'' अमरावतीच्या अंबा मंदीरा समोर नवरात्रांत अष्टमीचे रात्री रेडा बळी देत असत. ही प्राचीन परंपरा चालत आली होती व ती पुष्कळ वर्षे चालू होती. नंतर ती बळी घेण्याची जागा बदलली व ती परकोटाचे आंत (एकमुखी दत्त मंदीरा समोर) रस्त्याचे उत्तर कडेच्या खुल्या जागेत बळी देत असत व त्याच्या रक्तांत हात बुडवून त्याच्या पंजाचे छापे गांवातील काही घरांवर मारीत असत. ही प्रथा इ.स.१९३५ नंतर बंद पडली.

अमरावती बौध्द मठ

अमरावतीचे एक इतिहास प्रेमी श्री गुलालकारी यांचे म्हणण्याप्रमाणे अंबा देवीचे मंदीराचे जागी पूर्वीचे काळात बौध्द मठ होता. परंतु यासाठी त्यांनी अजून कोणता पुरावा दिलेला नाही. मात्र प्रसिध्द विव्दान श्री.डी.डी.कोसांबी यांच्या (पुराणकथा आणि वास्तविकता) या ग्रंथातील मातृदेवतांच्या पूजा स्थानांचा एक अभ्यास या प्रकरणात देवी सम्प्रदाय हा मुख्यत्वे करुन जीव हत्येवर आधारलेला आहे. त्यांचे महत्वाचे स्थळ आणि बुध्दांचे मठ हे दोन्हीही मोठमोठ्या रस्त्यांवर किंवा चौरस्त्यांवर आढळलेले आहेत. त्याच्यामध्ये काहीतरी सांकेतिक असा समन्वय असला पाहिजे. वास्तविक पाहता हे सर्वत्र आढळते असे म्हटले आहे. आठव्या-नवव्या शतकांत हे अंबेचे मंदीर येथे असेल तर कदाचित तसा बौध्द मठ असल्याचे म्हटले आहे. श्री आद्य शंकराचार्य जेव्हा आठव्या शतकात विदर्भात आलेत तेव्हा त्यांना येथे बौध्द धर्माची नव्हे तर आपल्या शिष्यांकरवी भैरव संप्रदायाच्या लोकांच्या मंताचे खांडन करुन वेदांतमताचा प्रचार करावा लागला होता.

आणि अंबेचे मंदीरा समोरील दसऱ्याचे वेळेच्या बळीची प्रथा ही परंपरेने १९३५ पावेतो चालू होतो. त्यामुळे बुध्द मठाचे येथील अस्तित्व संशयास्पदच मानावे लागेल. छत्रपती श्री शिवाजी महाराज यांच्या इ.स.१६७४ साली झालेल्या राज्यारोहणाचे निमंत्रण

अमरावतीच्या अंबा भवानीस आले होते. अशी माहितीही कै.टिकेकर गुरुजींनी दिली होती. पण या माहितीला अजून आधार मिळाला नाही. अर्थात शिवाजी राजे हे भवानी भक्त होते आणि या पुरातन देवीस्थानाची माहितीसर्वदूर होती. त्यामुळे या महामंगल कार्याची अक्षत (निमंत्रण) या अंबेला आली नसेलच असे म्हणता येणार नाही. कदाचित दंतकथा म्हणूनही ही गोष्ट त्याकाळी प्रचारात असावी व त्या आधारे कै.टिकेकरांनी ही माहिती दिली असेल.

इ.स.१९११ च्या गॅझेटियरची माहिती

इ.स.१९११ साली अमरावती जिल्हा गॅझेटियर प्रसिध्द झाले. त्यांतही अमरावती शहरातील मंदीरांचा उल्लेख आहे. ते असा ''जैन मंदिरे सामान्य प्रतीची आहेत. हिंदूंची महत्वाची मंदिरे १) अंबादेवी, २) एकवीरा देवी, ३) बालाजी, ४) दत्त, ५) नारायण, ६) सोमेश्वर, यापैकी अंबादेवीचे मंदीर सर्वात जुने असावे. त्याला १००० वर्षाचा इतिहास असावा. असे असले तरी सध्याचे मंदीर इतके जुने असावे असे वाटत नाही. येथूनच श्री कृष्णाने रुक्मिणीचे हरण केले अशी दंतकथा आहे. अमरावती म्हणजे अमीराची वस्ती किंवा अंबेचे नांवावरुन ''अमरावती'' ही व्युत्पत्ति बरोबर नाही. अंबा मंदिर हिंदूस पवित्र वाटते. लग्न मुंजीपूर्वी हिंदूदेवी दर्शनास जातात व अश्विन महिन्यात येथे यात्रा भरते. अंबा मंदीराखेरीज सर्व शहर आधुनिक आहे.

अंबेच्या मूर्तीची प्राचीनता दोन्ही गॅझेटियरनी मान्य केली आहे. त्यावरील मंदीराची वास्तू इतकी जुनी असेल तर वाटत नाही. अशी रास्त शंका प्रकट केली आहे. हं मंदीर ''भवानी मंदीर'' या नांवाने ओळखल्या जाते असेही या गॅझेटियरने म्हटले आहे. त्यावरुन असे दिसते की या देवीचे मूळनाव भवानी किंवा अंबा भवानी म्हणून प्रचलित असावे. हल्ली या देवीस अंबादेवी, अंबा भवानी, जगदंबा, लहान देवी व अंबा या नांवांनी ओळखतात.

निष्कर्ष

या प्रमाणे उपलब्ध पुराव्यावरुन अमरावतीवासीनी श्री.अंबा भवानीची मूर्ति पुरातन असून वास्तू दोनदा जीर्णोध्दारित आहे. अकराव्या शतकात अमरावती. ग्राम

स्वरुपात अस्तित्वात होते याचाही पुराव वर दिला असून संभावत: पंधराव्या शतकांत दोन वर्ष व नंतर इ.स.१७०७ ते १७१९ या बारावर्ष ही वसती उजाड बनली होती. इ.१७२२ नंतर या गावाची उन्नति सवाई संताजी भोसले, अमरावतीकर यांनी केली व त्या काळात हे उजाड गांव वसविल्या जाऊन प्रथम कसबा नंतर पेठ बनले आणि इ.स.१७९० चे सुमारास चांगलेच भरभराटीस आले. या काळी अमरावती हे उमरावती या नांवाने व व्यापारी आणि सावकार पेठ म्हणून प्रसिध्द होते. म्हणजे हल्लीचे अमरावती शहर हे क्रमाक्रमाने विकसित झालेले इ.स.१७२२ नंतरचे आहे.

संदर्भ :-

१. श्री गोविंदप्रभू चरित्र कोलते.

२. स्थान - मार्ग - दर्शक:महंत दत्तराज शेबळीकर

३).श्री.गोविदप्रभू चरित्र :कोलते (लीळा क्र १)

४). राजवाडे नामादिशब्दव्युत्पत्ति कोश : कै. वि .का.राजवाडे.

५).वऱ्हाडचा इतिहास :या.मा.काळे .

६).विर्दभतील ऐतिहासिक लेख संग्रह : (खंड पहिला)

७). पुराण कथा आणि वास्तवता.डि.डी.कोसांबी

८). अमरावती शहराचा इतिहास :अंबा देवी संस्थनची प्रोसिडींग बुके.

परिशिष्ट क्र.१७

उमरावतीचे मोठे बालाजी मंदीर.

अमरावती शहाराच्या परकोटाचे पूर्वेकडील एक महाव्दार असलेल्या दरवाज्याबाहेर,गांधी चौकास लागूनच (व अंबादेवी मंदीराचे उत्तरेस) श्री मोठे बालाजी मंदीर (सस्थान) आहे, हे बालाजी मंदीर सर्वेदूर प्रसिध्द आहे. देवीचे दर्शनास येणारे भाविक या मंदिरात दर्शनास जातातच.

या बालाजी मंदीराची स्थापना इ.स.१७०० चे आसपास (संभवत:सन १७२२ नंतर) झाली असे उपलब्ध माहीतीवरुन दिसते. या मंदीरातील बालाजीची मूळ मूर्ती राजस्थानातून,या मदीराचे संस्थापक श्री पुरणदास बैरागी यांनी आणली होती.

राजस्थान मधील जयपूर शहरा नजीकच्या रेवस येथील रामानंद मठाचे शिष्य व या बालाजी संस्थानचे मूळ संस्थापक श्री पुरणदास गुरु जयकिसनदास आणि त्यांचा चेला तुलसीदास गुरु पुरणदास हे दोघेहि गुरुशिष्य इ.स..१७०० चे आसपास फिरत फिरत उमरावतीला आले व त्यांनी,तेथील एका वाडीतील वडाचे झाडाखाली आपला मुक्काम ठोकला. ती वाडी(ओलीताची जमीन) म्हणजे हल्ली जेथे बालाजी मंदीर आहे तीच जागा होय.ती त्यावेळी उदाजी पाटील यांची वाडी होती व त्यांत केळीची बाग आणि वडाचे झाड होते.

या वडाचे झाडा खाली हे गुरु-शिष्य बराच काळ मुक्काम ठोकून होते.त्यांनी राजस्थानमधून आणलेली बालाजीची मूर्ती वडाचे झाडाखाली स्थापन केली व त्या मूर्तीची पूजा अर्चा ते करीत असत.वाडीचा मालक उदाजी पाटील ह्याने पुढे पुरणदास यांना आपले गुरु मानून आपली ही वाडी पुरणदासजींना दान दिली.

हल्ली बालाजी मंदीराच्या जेवढे आवार आहे व तेवढी म्हणजे दोन-तीन एकर जमीन दान मिळाल्यावर आणि त्या जमिनीची मालकी प्राप्त झाल्यानंतर पुरणदासजी बैरागी यांनी पुढे या जमीनीवर मंदीर बांधून त्यांत बालीजी मूर्तीची प्राणप्रतिष्ठा केली.तेच हे बालीजी मंदीर होय. म्हणजे सुमारे २६०-६५ वर्षी पूर्वी मंदीराची स्थापना झाली असे दिसून येते.

त्याकाळी जी माहिती उपलब्ध आहे त्यानुसार सन १७२२ पावेतो (त्यापूर्वीची १०-१२ वर्षे) उमरावती हे गाव उजाड होते. सन.१७२२ नंतर येथे पुन्हा वस्ती बसविण्यात आली. त्यानुसार मूळ गांव हे,हल्लीचे महाजनपुरा गेट पासून उत्तरेस तारखेडा मोहल्ला आहे तो पावेतो अगदी लहान असे ग्राम होते आणि या वस्तीपासून पूर्वेकडे बरीच दूर अशी उदाजी पाटलाची वाडी होती. दि.२९ जून १७१९ तारखेचा एक दस्तऐवज याच ग्रंथाच्या पहिल्या भागातील पान १४ वर दिलेला आहे. उमरावतीच्या तत्कालीन वतनदारांनी या गांवाच्या निमे पाटीलकीचा हक्क राणोजी वल्द बापूजी यांस विकला होता, त्याचा तो खरेदीनामा असून या खरेदीनाम्यात खरेदी देणारे एकूण चार वतनदारापैकी' कोंडजी वल्द उदाजी गुरव मोकदम उमरावती व मजरे अवरंगहुर'' हा जो

वतनदार आहे त्याचा बाप म्हणजे उदाजी .तो वतनदार म्हणून पाटील हा त्या काळ फार मानाचा किताब असे दिसते की, हा उदाजी पाटील म्हणजे वर नमूद केलेल्या वाडीचा मालक असावा.

तसेच या दस्तऐवजात (खरेदीनाम्यात) मठ मकरंद गोसावी या नावाने अधिकारपरत्वे १८५० एकर जमीन दर्शाविली आहे. हा मकरंद गोसावी व वर नमूद केलेले पुरणदास बैरागी हे एकच की वेगवेगळे हे सांगणे कठीण आहे. परंतु सन १७१९ मध्ये गोसाव्याचा मठ होता व त्यास अधिकारपरत्वे जमीन होती हे मात्र या दस्तऐवजावरून सिद्ध होत आहे.

याप्रमाणे तत्कालीन परिस्थिती कागद पत्रांवरून दिसून येते. याप्रमाणे सुमारे २६०-६५ वर्षांपूर्वी उमरावतीचे हे मोठे बालाजी मंदिर स्थापन झाले व या मंदिराचे पहिले महंत पुरणदास गुरु जयकिसनदास हे होत. त्यानंतरच्या महंतांची नावे अशी -

तुलसीदास गुर, पुरणदास,सीतारामदास गुरु, तूलसीदास,रामरतनदास, गुरु सीतारामदास,रघुवीरदास गुरु राममरतनदास,क जगन्नाथदासगुरू , हरिदास गुरु, बालकदास,मथुरादास गुरु हरिदास(हल्लीचे महंत).

या प्रमाणे गुरु शिष्य परंपरेनुसार या बालाजी संस्थानचा कारभार येथाल मंहत पहात होते व पहातात.या संस्थानला निजामाचे काळात खुद्द निजामाने व नंतर निजामाचा वऱ्हाडचा सुभेदार राजा गोविंदबक्षी यांनी काही जमीन म्हणून दिलेली आहे.(इ.स.१८१७,१८३०,१८७४,आणि १८८०)बालाजी मंदीरा समोरच नगार खान्याची इमारत व त्याचे आंत बगीचा आहे. ती जमीन म्हणून मिळालेली आहे. इतरहि जमिनीचे इनाम वगैरे या संस्थानला आहेत.शिवाय मौजे जामगांव हे या संस्थानला जहागीर म्हणून होते.

राजस्थनामधील वैष्णवपंथी निहंग बैरागी रामाजुन सांप्रदायाचे परंपरतील हे बालाजी संस्थान असून, दरवर्षी या मंदीरात विविध उत्सव असतात. दसऱ्याचे दिवशी या संस्थानचे मंहत येथे येऊन ,या वाडीतील ज्या वडाच्या झाडाखाली राहिले होते ते वडाचे झाडही (मूळ वृक्षाच्या पारंबीपासून निर्माण झालेले झाड) आज मंदीराचे आवारात अस्तित्वात आहे.

(१.बालाजी संस्थानकडून मिळालेले माहितीचे आधारे.)

अमरावती महानुभाव आश्रम-

अमरावती शहरात छत्री तलाव रोड,''महानुभाव आश्रम'' ही एक प्रख्यात धर्मसंस्था आहे.या आश्रमाची स्थापना महानुभाव पंथाचे एक प्रभावी प्रवक्ते श्री मुरलीधरबाबा कारंजेकर (पूर्वीचे विद्वांस दादा) यांनी १९२४ साली केली.

इ.स.१९२४ साली श्री मुरलीधर दादा हे आपल्या काही शिष्यांसह अमरावतीला आले म.श्री.कृष्णराव दादा(हैद्राबाद) यांनी महानुभाव आश्रमासाठी श्रीमान.वा.प.उर्फ बाबासाहेब दंडे यांच्या छत्री तलाव रोड(राजापेठ) येथील शेतातील जागा विकत घेण्यास मदत दिली .तेथेच श्री.मुरलीधर दादांनी आपला आश्रम सुरु केला. पुढे १९४० साली या जागेवर अनेक इमारती बांधण्यांत आल्या.त्यासाठी श्रीमुरलीधर दांदानी पंजाब प्रांतातून,तेथील (रावळपिंडिचे) दानशूर सद्भक्त भगत श्री मित्रचंदजी यांचे सहकार्याने आर्थिक मदत मिळविली होती. प्रामुख्याने या देणग्यातूनच हा आश्रम उभा झाला आहे. उपरोक्त आश्रम १९५८ साली श्रीकृष्ण आश्रम या नांवाने रजिस्टर्ड ट्रस्ट करण्यात आला.या आश्रमाचे मुख्य ट्रंस्टी कविश्वर कुळाचार्य प.पु.प.म.श्री.कारंजेकरबाबा हे आहेत.

आज या आश्रमांत (१९७९ साली) सुमारे २५०ते ३००महात्मे राहतात आणि महानुभाव धर्माचे ,ब्रम्हविद्येचे अध्ययन सतत चालू असते.इतक्या संख्येने राहणाऱ्या या लोकांची निवासाची भोजनाची सर्व व्यवस्था आश्रमातर्फे केली जाते. यावरुन या आश्रमाचा व्याप लक्षात यावा.

हा आश्रम म्हणजे सामुदायिक जीवन पध्दतीचाही एक आर्दश मानावा लागेल. आश्रमाचे प्रमुख संस्थापक श्री मुरलीधर बाबा कारंजेकर(मोठे बाबा) यांनी आश्रमाचे स्थापनेपासूनच आश्रमात धर्माध्ययनासाठी राहणाऱ्या संतांत शिस्त निर्माण केली असून,अध्यापनाची सुगम पध्दती, संगोपन व संघटन कला सर्वाना शिकविली आहे.येथे दररोज गीता व ब्रम्हविद्यापि ग्रंथाचे अध्ययन चालू असते.

आश्रमवासी यांचा दिनक्रम सकाळी ४ वाजता पासूनच सुरु होतो. सकाळी ४ वाजता सामुदायिक प्रार्थना, नंतर मोठे बाबाचे एक तास ब्रम्हविद्येवर वाचन नंतर

देवपूजा व आश्रमीय दैनंदिन कामकाज ,नंतर ग्रंथाचे अवलोकन आणि संशोधन ,दुपारी सामुदायिक भोजन व विश्रांती .हा सकाळचा कार्यक्रम तर दुपारी ३ वा.सामुदायिक पोथी व जिज्ञासूंचे शंका समाधान. सायंकाळी देवपूजा ,आरती आणि सामुदायिक भजनाचा कार्यक्रम अशा कार्यक्रमातील व अध्ययन,अध्यापनांतून या आश्रमांत उपदेशक तयार होतात व नंतर ते प्रचार कार्यासाठी निघतात.

व्यासपोर्णिमा,नारळी पोर्णिमा,श्रीकृष्णजन्माष्टमी,श्री चक्रधर जंयती, श्री.गोविंदप्रभू जंयती व श्री दत्त जंयती इत्यादी महत्वाचे उत्सव या आश्रमातं. दरवर्षी साजरे केले जातात. त्यावेळी आश्रमवासीयासोबतच,बाहेरील अनेक नामवंत व्यक्ती, साहित्यिक आणि व्याख्यात्यांनाहि निमंत्रित करण्यांत येते.

या आश्रमांत औरंगजेब कालीन एक ऐतिहासिक सनद,जुन्या,हस्तलिखित मूल्यवान पोथ्या व बरेच मुद्रित वाङ्मय आणि ऐतिहासिक वस्तू आहेत.

महानुभाव पंथानेच प्रथम मराठी भाषेला प्रतिष्ठित व प्रचालित केले.या पंथाचे सर्व वाङ्मय मुख्यत:मराठीतूनच आहे.अध्ययन -अध्यापनहि मराठीतूनच चालते. केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर या पंथाने मराठीचा ध्वज अटके पर्यन्त पोचविला आहे. ही मराठी मायबोलीची सेवा महानुभाव पंथाची असून अमरावतीचा महानुभाव आश्रम हा या साखळीतील एक महत्वाचा दुवा होय.

या आश्रमाचे संस्थापक मंहत श्री मुरलीधर दादा कांरजेकर(मोठे बाबा) हे मूळत :पंजाबी आहेत आणि त्यांचे वारस बाळकृष्ण बाबा कारंजेकर हेही पंजाबीच होत.मंहत श्री मुरलीधर दादा कारंजेकर(मोठे बाबा) पूर्वीमाचे विव्दान दादा,) यांचा जन्म स्वातंत्र्यपूर्वी भारताच्या वायव्य सरहद्द प्रांतातील अटक जिल्हातीत जाटला(हल्ली पाकीस्तानात)या गावा इ.स.१८८५ साली झाला. त्यांच्या वडीलाचे नांव श्री हुकूमचंद व आईचे श्रीमती अनोखादेवी या आई वडीलांनी मुलांसाठी नवस केला होता. त्या प्रमाणे मुलगा झाल्यानंतर त्यास त्यांनी महानुभाव साधूचे स्वाधीन केले होते .वयाचे ७-८वर्षो पावेतो पंजाबतच वास्वव्य होते. नंतर वयांच्या १० व्या वर्षी महानुभाव पंथाची दीक्षा देऊन त्यांना महाराष्ट्रात-पुण्यास आणण्यात आले.तेथे महंत विर्व्दास बाबाकडे

टिळक येत असत व धर्म चर्चा होत असे. त्यावेळी श्री.मुरलीधर दादा ती लक्षपूर्वक ऐकत असत यातूनच लोकमान्य टिळंकानी आपल्या केसरी सामाहिकातून दि.२१ डिंसेबर १८९९ चे अंकात ''मंहानुभाव पंथ व त्याची धर्ममते '' हा लेख लिहून प्रथमच महानुभाव धर्माची विश्वसनीय माहिती उजेडात आणून आम जनतेपर्यन्त पोहोचविली होती.

मंहत विव्दास बाबाचे देहावसाना नंतर श्री.मुरलीधर दादांनी पुणे सोडले व ते विदर्भस्थ महापंडित श्री.पाचराऊत बाबांचे सानिध्यात १५ वर्षे अध्यनासाठी राहिले. शास्त्रोक्त चर्चेतील यशस्वी वादपध्दती पाहूनच त्या काळातील पंडीतांनी त्यांना''ब्रम्हविद्या वाचस्पति'' ही सांप्रदायिक पदवी बहाल केली होती. त्या वेळे पासून ते''विव्दांस दादा'' म्हणून प्रसिध्दीस आले.

महानुभाव पंथात''कारंजेकर'' ही गादी आहे.कविश्वर शाखेतील सहा आम्नाया पैकी एक कारंजेकर शाखा होय.या शाखेत मूळ पुरुष(मुळ कारंजा निवासी)हे होत.मुनिबासांना नागाइसा कडून आलेले आचार्यपद व वंदनादि साहित्य हे मुनिबासांनी कमळाकर बासांना नांदेड येथे बोलावून तत्कालीन देपाळदरान राजाचे समक्ष भद्रासन रजून दिले व नांदेडचा मठही त्यांचे सुपूर्द करण्यात आला.त्यामुळे मुनिबासनंची संपूर्ण प्रतिष्ठा कमळाकर बास कारंजकर या नावांने सुरु झाली .तीच परंपरा आजतागायत चालू आहे.याच परंपरेतील २६ वे महंत कविश्वर कुळाचार्य प.पू.प.म.श्री. कारंजकरबाबा महानुभाव हे महानुभाव आश्रम अमरावती येथे विद्यमान आहेत.

या गादीवरील माजरी म्हसला येथे राहणारे महंताचे देहावसान झाल्यापासून परंपरेने आलेली कारंजेकर गादीची देवपूजा श्री.गोविंद प्रभूंच्या दाढेचे विशेषक,श्री.चक्रधर स्वार्मीचे वस्त्रादी विशेष(छत्रचामरायदी मोचल, परचल, राजभूषणादी साहित्य चांदूर बाजार (जि.अमरावती)येथील कारंजेकर पिठांच्या मठातील नी बंबासुबुवा यांचे जवळ होते. या गादीवर कोणास प्रतिष्ठित करावे ह्या विषयी खल चालू होता.शेवटी श्री.मुरलीधर दादा विव्दांस ह्या विव्दान व अधिकारी पुरुषांस सर्वानुमते चांदुर बाजार तेथे दि.१३.५.३५ रोजी कारंजेकर गादीवर बसविण्यात आले व तेव्हा

पासून श्री मुरलीधर बाबा कांरजेकर झालेत.(पुढे यांना मोठे बाबा या नावानीच ओळखत) श्री.मोठे बांबानी अमरावतीच्या महानुभव आश्रमाचा कार्यभार आपल्या अंतापर्यत सांभाळल्यानंतर,त्यांचेच तालमीत तयार झालेले .श्री.बाळकृष्ण बाबा यांना त्यांनी दि.७-१२-७८ रोजी स्वहस्ते आपल्या गादीवर बसवले .त्यांनतर मोठे बाबा यांचे ६ मे १९७९ रोजी देहावसान झाले.त्यावेळी त्यांचे वय सुमारे ९३-९४ असावे.नवे महत श्री बालकृष्ण बाबा हे १९४० पासूनच अमरावती आश्रमात मोठे बाबांचे सान्निध्यात ब्रम्हविद्या शास्त्रांत अतिनिपुण झालेले असून त्यांचा जन्म १९२३ साली पंजाबातील होशियारपुर जिल्हयांतील बहादुरपुर या गांवी झाला. त्यांच्या वडीलाचे नांव श्री रामदास जेथे आणि मातोश्रीचे विद्यावती. आईने महानुभाव धर्माची दीक्षा घेतल्यानंतर त्या तपस्विनी मनोहर बाई या नावांने प्रसिध्दीस झाल्या होत्या.श्री बाळकृष्ण बाबा हे मोठे बाबांच्या शिस्तीत वाढलेले असल्यामुळे त्यांचे कारकीर्दीतही आश्रमांची दिवसें दिवस प्रगती झाली.

अमरावतीतील विविध धर्मसंस्था पैकी महानुभाव ही धर्मसंस्था संघटित अभ्यासू आणि आपले कार्य अखंडपणे वाढवीत जाणारी महत्वाची संस्था होय-.

(महंत श्री पुजदेकर बाबा यांनी दिलेल्या माहितीचे आधारे.)

अमरावतीचे ''दशावतार'' मंदीर :

''अवतार'' अव तृ-अवतार.'' उच्चा स्थानावरुन कनिष्ट स्थानावर उरतणे. अवतार कोणाचा, केव्हा आणि कशासाठी होतो हे भगवांन श्रीकृष्णाने भगवत् गीतेत पुढील दोन श्लोकात सांगितले आहे.

यदा यदाहि धर्मस्य, ग्लानिर्भवती भारत :
अभ्युस्थानम् अधर्मस्य,तदात्मानं सृजाम्यहम्
परित्राणाय साधूनाम,विनाशायच दृष्कृताम्
धर्म संस्थापनार्थाय,संभवामि युगे युगे

अर्थ-हे अर्जुना ,जेव्हा जेव्हा धर्माला ग्लानि येते आणि अर्धमाची उठावणी होते, तेव्हा तेव्हा मी स्वतःला उत्पन्न करतो.(अवतार होतो.) साधूचे संरक्षण ,दृष्कृत्ये करणांराचा

विनाश आणि धर्माची संस्थापना याच्यासाठी मी प्रत्येक युगात जन्म (अवतार) घेतो. पुराणे व इतर ग्रंथ यांतून प्रतिपादिलेले अवतार तत्व हे मध्ययुगीन अर्वाचीन हिंदु धर्माचे एक प्रमुख तत्व आहे.''

या आधारावर विष्णूंनी विविध युगांत अवतार घेतले,असे मानतात. या अवतांराची संख्या '' दहा '' अमून त्यास '' दशाअवतार '' असे संबोधित जाते. ते दहा. अवतार असे. १)मस्य २)कूर्म ३)वराह ४) नृसिंह ५) वामन ६) परशुराम ७) राम ८) कृष्ण ९) बुध्द १०) कल्की

या दशावतारांपैकी राम व कृष्ण यांची मंदीरे सर्व देशभर नव्हे तर आता परदेशातही आहेत.बुध्दाचीही मंदीरे (विहार) आहेत. नृसिह,परशुराम,यांची तुरळक मंदीरे आढळतात. पण दहाही अवताराचे एकत्र असे मंदीरे कोठे आढळले नाही. परंतु अमरावतीत असे दहाही अवताराच्या मूर्तीचे म्हणजे दशावतारांचे एक मंदीर आहे हे दशावतारांचे मंदीर अमरावती शहराच्या भाजीबाजार विभागात श्री माधव नारायण उर्फ आबासाहेब जोशी यांचे वाड्यात आहे.अर्थात हे खाजगी मंदीर असून ,दशावताराच्या सर्व मूर्ती एकाच आकाराच्या व काळ्या पाषाणावर कोरलेल्या व वैशिष्टयपूर्ण अशा आहेत. तेथेच गणपती आणि महादेवाची पिंड देखील आहे.

१) (भारतीय संस्कृति कोश : खंड १ ला :महादेव शास्त्री जोशी पान २६४ ,व मराठी विश्वकोश ,भाग १ ला पा.६०६.)

ह्या दहाही मूर्ती भिंतीत लागून ३ फुट उंच चौथऱ्यावर बसविलेल्या असून त्या पूर्वाभिमुख आहेत. पूर्वी ह्यामूर्ती एका मोठ्या सभांडपात होत्या परंतु आता सभामंडपाच्या ह्या खोलीला भिंत केल्यामुळे त्या एका अंरुद खोलीत आहेत. या दशावतार मूर्तीचे दर्शनाला अनेक लोक जातात. दर्शनास कोणासही प्रतिबंध नाही. या तऱ्हेच्या दहाही अवतांराच्या एकत्र मूर्तीचे मंदीर या घराण्याचे पूर्वजांनी आपल्या घरांत कां बांधले हे सांगणे कठीण असले तरी ,अशा तऱ्हेचे मंदीर इतरत्र कोठे मिळत नाही. म्हणजे अमरावती शहरातील हे दशावतार मंदीर,निदान विदर्भातले एकमेव असे दशावतार मंदीर असावे.

पूर्वी गांवाला अलुतेदार-बलुतेदार पध्दती होती. व त्याला लोकजीवनांत अत्यंत महत्वाचे स्थान होते.पण हल्ली ती पध्तत जवळ जवळ नष्ट होत आली आहे. या बलुतेदार पध्दतीत जोशी पणाचे वतन अंतर्भूत आहे. वंशपरंपरेने हा हक्क चालत असे.समाज व्यवस्थेत या पध्दतीला त्याकाळी अत्यंत महत्व होते. त्यानुसार अमरावती गांवाचे जोशीपणाचे वतन या जोशी घराण्याकडे चालत आले आहे. व हल्लीही चालू आहे. परंतु वंश विस्तारामुळे या घराण्यात हे वतन क्रमाक्रमाने एकेका वर्षासाठी चौघाकडे फिरते रहात असे व आजही ती व्यवस्था कायम आहे.

त्यानुसार ही चार घराणी अशी :-

१) कै.नारायण रामचंद्र जोशी.

२) कै.श्रीधर हरभट जोशी.

३) कै.अंबादासभट्ट जोशी.

४) कै.बनपबाई.

या पैकी कै.नारायण रामचंद्र जोशी यांच्या वाड्यात दशवताराचे मंदीर असल्यामुळे घराण्याला ''दशावतारी जोशी घराणे '' असे म्हटले जात असे. व त्या नांवानेच हे ओळखले जातात. वाड्यातील ह्या दशावतारांच्या मूर्ती काळ्या पाषाणावर कोरलेल्या असून ,ह्या दहाही मूर्ती समान उंचीच्या आहेत. अर्थात एकाच कारागीर कडून त्या मुद्दाम करवून घेतल्या असाव्यात असे दिसते. याचे कारण बहुदा, एकतर दशावताराची उपासना करण्याचे धार्मिक इच्छेतून असे असावे किंवा ह्या दहाही मूर्ती पूर्वी कोठे तरी सापडल्याने त्यांची स्थापना या वाड्यात केली असावी. यांत पहिले अनुमान बरोबर वाटते.

अमरावती शहराची जी वैशिष्ट्ये आहे त्यांत हे'' दशावतार मंदीर'' देखिल एक वैशिष्ट्ये होय.

टीप: विदर्भाततील बुलढाणा जिल्हयातील मेहेकर, येथील श्री शारंगधर मंदीरात शारंगधराचे मुर्ती भोवती दशावताराच्या मूर्ती असल्याचा उल्लेख आलेला आहे (त.भा.२३ मार्च १९८६)साभार.

श्री.विष्णूच्या दशावताराव्यतिरिक्त उरलेल्या अवतारांची नांवे :-

१.सुयज्ञ, २.कपिल, ३. दत्त. ४.धन्वंतरी ५.सनातन

७.सनंदन ८.सनतकुमार .९.नर. १० .नारायण. ११.वेणूपुत्र. १२.ऋषभ.

१३.हयग्रीव. १४) हंसख

(श्री विठ्ठल:एक महासमन्वय-ले.रामचंद्र चिंतामण ढेरे: १९८४.

(श्री माधव नारायण उर्फ आबासाहेब जोशी (वय ८५) यांच्या मुलाखतीचे आधारे.)

उस्मानिया मस्जिद,अमरावती.

उमरावतीत जी काही प्रेक्षणीय स्थळे आहेत त्यांत मालटेकडी रोडवरील ''उस्मानिया मस्जिद ''या वास्तूचा समावेश करावा लागेल.

इ.स.१९१५ मध्ये पन्नास हजार रुपये खर्चून बांधण्यात आली असून, दिल्लीच्या मस्जिदची छोटी प्रतिकृती होये.या मस्जीदीचे बांधकामसाठी हैद्राबादचे हिज हायनेस निजाम यांनी पंधरा हजार रुपयाची देणगी दिली होती व भारतातील मुस्लीम जमातीकडून पस्तीस हजार रुपयाचा विधी जमविण्यात आला होता.या मस्जिदीचे घुमट आणि मिनार शिल्पकलेचे उत्कृष्ट नमुने असून ते दिल्लीच्या जामा मस्जिदीची आठवण करुन देतात.

मस्जिदीची जागा प्रशस्त असून चोहोबाजूंनी भिंत व आंत भरपूर पाण्याचा लहान तलाव आहे.मस्जीदीची जागा व लगतची मोकळी जागा,तत्कालीन इग्रंज सरकारने खास मस्जिद बांधण्यासाठी ''बेरार मुस्लीम एज्युकेशनल कॉन्फरंस'' या संस्थेला लीजवर दिली होती. त्या जागेपैकी एकूण ३०,७७७ चौरस फुट जागेवर मस्जिदीचे बांधकाम केलेले आहे.१९०९ साली स्थापन झालेली '' बेरार मुस्लीम एज्युकेशनल कान्फरंस'' ही संस्था विदर्भातील मुस्लीम जनतेच्या शैक्षणिक व धार्मिक उन्नतीसाठी कार्य करणारी संस्था होय.

माल टेकडीच्या पश्चिम पायथ्याशी इ.स.१९१० साली सरकारी मॉहमेडन हॉयस्कूलची इमारत बांधण्यात आली व या हायस्कूलच्या विद्यार्थ्यांचे खेळण्यासाठी म्हणून हायस्कूल समोरच एक विशाल असे मैदान राखून ठेवण्यात आले होते मैदानाचे

पश्चिम टोकावर या हायस्कूलमध्ये शिक्षण घेणाऱ्या बाहेरगांवच्या मुस्लीम विद्यार्थ्यांना राहण्यासाठी वस्तीगृह बांधण्यात आले होते. या मध्ये राहाणाऱ्या विद्यार्थ्यांच्या धार्मिक गरजेसाठी म्हणून वस्तुतःही मस्जिद बांधण्यात आली होती.

पंरतु पुढे इ.स.१९४८ मध्ये ही हायस्कूलची व वसतीगृहाची इमारत आणि तेथील विशाल मैदान जिल्हा परिषदेकडे देण्यात येऊन ,या इमारतीत मल्टीपर्पज हायस्कूल सुरु करण्यात आल्याने येथील मुस्लीम होस्टेल बंद झाले. त्यापूर्वी पर्यत मात्र या होस्टेलच्या विद्दार्थ्यानी ही मस्जीद गजबजलेली असे.

मस्जीदीच्या पूर्वेकडील मोकळ्या जागेत या मस्जीदीचे इमामाचे राहण्यासाठी घर बांधलेले आहे.या मस्जीदीचे इमामांना हैद्राबादचे निजामाकडून दरमहा पन्नास रुपये वेतन दिले जात आहे. परंतु नोव्हेंबर १९५० पासून हे वेतन बंद झाले आहे.

या मस्जीदीत काही मौल्यवान उपयोगी अशा धार्मिक ग्रंथाचा संग्रह आहे.

आता या मस्जीदचा उपयोग, जवळपास रहाणारे मुस्लीम नागरिक आणि समोरच्या बस स्थानकावर येणारे-जाणारे मुस्लीम प्रवासी करीत असतात.

दिवसापासून पांच वेळ ईदच्या प्रसंगी व शुक्रवारी या मशीदीत नियमित नमाज पढण्यात येते, या मस्जिदीचे इमाम ही प्रार्थना व धार्मिक कार्य करतात. या शिवाय शबे-बरात व शबे-कद्र या तारखेस धार्मिक उत्सवही या मस्जीदीत केले जातात.

या मशिदीला जोडूनच एक धार्मिक पाठशाला असून,तीत सुमारे ३५ विद्दार्थी कुराणाचे शिक्षण घेत असतात.

मस्जिदीचा सफाई प्रमुख दिवसातून पांच वेळ,नमाजचे पूर्वी मस्जीद स्वच्छ राखतो.

या उस्मानिया मस्जिदची मालकी बेरार मुस्लीम शिक्षण परिषदेकडे असून ही संस्था या मस्जीदीची सर्व व्यवस्था पहाते. धार्मिक ट्रस्ट क्र.२१८ प्रमाणे ही संस्था नोंदलेली आहे.-:

(ॲडव्होकेट श्री काजी अलाउद्दीन अहमदसाहेब ,जनरल सेक्रेटरी,बेरार मुस्लीम एंज्युकेशनल कॉन्फरंस,अमरावती यांनी दिलेल्या माहितीचे आधारे.)

परिशिष्ट क्र.२४

युसुफशाही वली''चा तकिया-

उमरावतीला अंबागेट बाहेर,अंबादेवीकडे जाणारे रस्त्यावरच उजव्या हाताला''युसुफशहा वलीचा तकिया'' या नांवाने एक मुसलमानाचे धार्मिक ठिकाण असून दरवर्षी १३ साबान (म्हणजे जुन-जुलै चा काळ) पासून सहा दिवस मोठा उरुस भरत असतो.

यावेळी पहिल्या दिवशी स्नान,दुसऱ्या दिवशी मोठा संदल निघतो,तिसऱ्या दिवशी मिल शरीफ आणि त्यानंतर तीन दिवस तवायफ (गाणारणी) च्या हजेऱ्या लागतात. त्यासाठी उत्तमोत्तम गाणाऱ्या कलावंताणी दूर दुरुन येथे हजेरी देण्यास येत असत.

युसुफशहा अला चा हा तकिया इ.स.१३५६ पासून येथे असल्याचे या तकियाचे इनामदार वहीवाटदार श्री जम्मुशहा वल्दा हुसेनशहा फकीर हे सांगतात. त्यांच्याकडे उर्दुतील एक जुनी सनद आहे. त्यावरुन असे दिसते की, युसुफ शहा यांना, नबाब बहादुरखा ,अचलपूर यांनी सात बिघे जमीन हिजरी सन ११६५ मध्ये इनाम दिली होती. पुढे युसुफशहा मरण पावले त्यांची येथे कबर आहे.

मरहुम युसुफशहा हे सैन्यात होते. पुढे त्यांना उपरती होऊन ते फकीर झाले व उमरावतीत येऊन तकीया आहे त्या जागेत राहू लागले. त्यांच्या दर्शनाला अनेक लोक येत. त्यांच्यावरील श्रध्देमुळे अचलपूरचे नबाब बहादुरशहा यांनी युसुफशहा वलीना ही जमीन इनाम दिली. युसुफशहा वलीचे चेले असदउल्ला शहा व त्यांचे चेले गुलाबशहा व त्यांचा चेला बहाद्दरशहा व त्यांची मुले अकबरशह आणि हुसेनशहा.

हल्लीचे जुम्माशाही फकीर हे हुसैन शहाचे पुत्र या नात्याने तकीयाचे इनामदार , वहितदार आहेत व हल्ली तेच तेथील सर्व कारभार पाहतात. सुमारे इ.स.१९२० चे आसपास बंदोकर कंपनीने उमरावतीत मुकी फिल्म (सिनेमा) आणली होती.त्यावेळी त्यांनी या तकियाला पांचशे रुपयांची देणगी दिली होती.तिने या तकीयाला जाळीचा कटघर(कंपौड) बांधून दिला होता. तसेच मुंबईचे श्री रजबअली सेठ खोजा यांनी १९४५

ਸਾਖੀ

अमरावती शहराचा इतिहास



उस्मानीया मस्जिद, अमरावती

साली या तकीयाला मोठे कंपौड, गेट वगैरे स्वखर्चाने बांधून दिले.तसेच १९७१ मध्ये शिवनारायण खंडेलवाल यांचे पुत्राने तकीयाचा समोरील भाग बांधून दिला.
युसुफअली शहा यांचे सुरुवातीचे मुळनांव ख्वाजा नसिरुद्दीन युसुफ तरतोशी हे होते.परंतु त्यांनी फकीर बनल्यांनतर युसुफशहा वली हे नांव धारण केले होते.
(तकीयाचे हल्लीचे व्यवस्थापक आणि इनामदार वहीवाटव्दार श्री जुम्माशहा फकिर यांचे मुलाखतीवर आधारीत)

अमरावती रोमन कॅथलिक चर्च सप्रदाय अर्थात संत फ्रान्सीस द सेलस् (फ्रान्स) चे प्रचारक व त्यांचे कार्य.

प्रभू येशच्या या सम्प्रदायाचे एक प्रचारक संत फ्रॅन्सीस द सेल्स(फ्रान्स) हे धर्मगुरु पोप यांच्या आदेशानुशार इ.स.१८४५ मध्ये भारतातील विशाखापट्टणम या पूर्व किनाऱ्यावरील बंदरात आले. पूर्वी किनाऱ्या पासून मराठवाड्यातील औरंगाबाद या शहरापर्यत प्रवास केला. त्या काळी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत संत फ्रन्सि द सेल्स यांनी औरंगाबाद जालना,नागपूर,कामठी व रायपूर या गांवी धर्म प्रचारार्थ पायी किंवा बैलगाडीने प्रवास केला.

संत फ्रन्सिस यांचे शिष्य इ.स.१८४८ मध्ये प्रथमच अमरावती येथे आले. इ.स.१८७४ मध्ये त्यांनी येथे एक झोपडी व त्याला लागून रहाण्यासाठी एक खोली बांधली ती १८८० पर्यत कायम होती.

इ.स.१८८६ साली तीन आठवड्यांत समुद्र प्रवास करुन होली क्रॉस सोसायटीच्या सहा सिस्टर्स अमरावतीत आल्या व त्यांच्या करिता जवळच मोठ्या खोल्या बांधण्यात येऊन,या सिस्टर्सनीच व नंतर काही वर्षानी कान्वहेंट ,सुरु केले. हे कान्वहेंट रहाणाऱ्या इंग्रज रहिवाशांच्या मुलांसाठी होते (पुढे इ.स.१९३२ साली येथील मराठी भाषी मुलासाठीही एक बोर्डिग सुरु करण्यात आले)
त्यापूर्वी येथील काही इंग्रजी अधिकाऱ्यांचा स्त्रियांनी येथे ,युरोपीयनांच्या मुलांसाठी एक प्राथमिक शाळा चालू केली होती '

वर उल्लेख केलेल्या सहा सिस्टर्स येथे आल्यानंतर त्यांनी स्वतःयेथे इंग्रजी व मराठी चे शिक्षण घेतले होते.

१.हैद्राबाद असाईन डिस्ट्रिक्टस्मध्ये(म्हणजे वऱ्हाडात) युरोपिन विद्यार्थ्याकरिता सर्व प्रथम अमरावती येथे १ एप्रिल १८७९ मध्ये एक शाळा सुरु करण्यात आली होती. या शाळेत सुरुवातीला आठ विद्यार्थी होते व त्यांचे वय सरासरी आठ वर्षे होते. त्यापूर्वी एकही युरोपियन विद्यार्थी खाजगी किंवा सरकारी शाळेत जात नव्हता. अशी माहिती प्रशासनीक रिपोर्ट (हैद्राबाद रेसिडेन्सी) १८७९ पा.५९ वर दिलेली आढळते. हल्लीच्या बिशप हाऊसच्या असलेल्या एका खोलीत जून १८८७रोजी मुलीच्या शाळेची सुरुवात झाली . इ.स.१८८९ मध्ये पूर्व माध्यमिक शाळा आणि पुढे १९२५ साली हॉयस्कूल सुरु करण्यात आले.?हे हायस्कूल केंब्रिज विश्वविद्यालयाला जोडण्यात आले होते.(नंतर १९५१ साली ते नागपूर बोर्डाशी संलग्न करण्यात आले.)

इ.स. १८९१ साली मराठी माध्यमाची मुलींची प्राथमिक शाळा नंतर माध्यमिक शाळा सुरू करण्यात आली.

या शिक्षण संस्थेतून बाहेरगांवच्या ज्या मुली शिकत होत्या .त्यांचेसाठी नंतर येथे होस्टेल सुरु करण्यात आले.तेथे इंग्रजी माध्यमाच्या १०० व मराठी माध्यमाच्या १३० मुलींचे राहण्याची सोय आहे.

मराठी माध्यमाची शाळा मोटार स्टॅड जवळ नगरपालिकेचे इ .स. १८८४ साली दिलेल्या जागेवरील बांधलेल्या इमारतीत सुरू केली होती. नंतर येथे एक दवाखानाही सुरु करण्यात आला .त्या सोबत पुढे होली क्रॉस टायपिंग स्कूल,शिवणकला वर्ग ,दुर्बल घटकांचे ,मुलांसाठी बालवाडी आणि गरीबांसाठी घरे अशी कामे , वडीलांची माहीती नसलेली अनेक बालके मोठ्या संख्येने सिस्टरकडे आणून ठेवीत.त्याची संगोपन व शिक्षण सिस्टर्सनी केले. त्यापैकी अनेकांनी मॅट्रिकचे शिक्षण पूर्ण केले.त्यातील अनेक मुलींची लग्ने करुन देण्यात आली. आहेत. अनेक मुले भारतात व परदेशातील विनापत्य दंपत्तीना '' दत्तक'' देण्यात आली आहेत.

१.होली क्रॉस कान्व्हेंट गर्ल्स उच्च माध्यमिक शाळा, अमरावती ही १८८७ साली स्थापन झाल्याची नोंद, महाराष्ट्र शासनाच्या शिक्षण खात्याने १९७४ साली प्रसिध्द केलेल्या म.राज्यातील माध्यमिक शाळांची यादी या पुस्तिकेत पान ३८७ वर केलेली आहे.

तसेच रिपोर्ट ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शनस् डब्ल्यू.ली,वार्नर (हैद्राबाद रेसिडेन्सी रेकॉर्ड, राष्ट्रीय अभिलेखागार,नवी दिल्ली.) या रिपोर्टात अमरावती येथे मिशन स्कूल (कॅथॉलिक स्कूल) इ.स.१८८० मध्ये मुलांची व १८९४ मध्ये मुलींची शाळा सुरु झाली असे म्हटले आहे. मराठी माध्यमाच्या प्राथमिक शाळेसोबत एक दवाखाना सुरु करण्यात आला.(मोटार स्टॅंड जवळ)

इ.स.१९५३ साली संत फ्रान्सीस कोनस (स्वीस)यांनी अमरावतीत ज्ञानमाता या शिक्षण संस्थेची स्थापना केली.ही संस्था आता पूर्ण भरभराटीत आलेली दिसून येते.मराठी माध्यमातून शिक्षण देणाऱ्या या संस्थेचे पहिले मुख्याध्यापक श्री खजूरकर हे होते.

तसेच १९५३ साली पूर्व माध्यमिक शाळा म्हणून सुरु झालेली ही शाळा ,१९६० मध्ये तेथे ९ वा वर्ग सुरु केल्याने हायस्कूल म्हणून वाढविण्यात आली. विद्यार्थ्यांचे शिक्षण व क्रीडा याकडे विशेष लक्ष दिल्याने या शाळेचा दर्जा उत्तम होता. १९६० मध्ये इंग्रजी माध्यमाचे वर्ग सुरू झाल्याने जागेची उणीव भासू लागली . सुरुवातीला हे वर्ग ''हरिकेन हॉल'' मध्ये भरत असत.नंतर इ.स.१९६८ साली नवीन इमारतीचा पाया भरण्यात आला व लोकाश्रयावर येथे आता एक भव्य वास्तू उभी झाली आहे. या शाळेवर रेव्ह.फादर जॉर्ज जोसेफ यांची मुख्याध्यापक म्हणून नेमणूक झाली असून त्यांचे नेतृत्वाखाली ही शाळा भरभराट करीत आहे.

जागतिक ख्यातीच्या मदर टेरेसा (सिस्टर ऑफ चॅरिटी,कलकत्ता) ह्या अमरावतीला आल्या होत्या.त्यांना येथे अपंग,दुर्बल,मुलांकरता,''मातृगृहा'' ची आवश्यकता पटली.म्हणून अशा गृहाची सुरुवात चपराशीपुरा (कॅम्प)येथे करण्यात आली.नंतर सध्याची इमारत''ईश दया'' बांधण्यात येऊन ,या वास्तूचे उद्घाटन महाराष्ट्राचे राज्यपाल डॉ.येरियन यांच्या हस्ते करण्यात आले.

या मातृगृहात, अपंग, निराधार अशा मुलांची योग्य निगा सिस्टर्स राखतात व त्यांना योग्य शिक्षणही दिले जोते आणि मुलासारखी मातेच्या ममतेने वागविले जाते .यांतील अनेक मुले दत्तक दिली जातात व अनेक लोक ती स्वखुशीने घेतात.

वृध्द निराधार लोकांना आश्रय देणारे''वृध्दाचे घर'' चालविण्यात येते. या शिवाय संस्थतील सिस्टर्स, मुली व मुले यांनी स्वतःच्या पायावर उभे रहावे म्हणून त्यांना टायपिंग व शिवणकला ,विणकाम वगैरे शिकवितात आणि त्यांना त्यांच्या लायकीचे काम मिळवून देण्यात येते.

झोपडपट्टीवासीयांच्या मुलांककरिता सिस्टर्स''बालवाडी'' चालवितात,दोन ते तीन तास येथे बालकांना ठेवण्यात येते. नंतर मिशनरी तर्फे त्यांना दूध देण्यात येत.

कुष्ठ रोग सेवा :-

सिस्टर्स बडनेरा, खोलापूर व अमरावतीच्या जवळपासची खेडी येथील कुष्टरोग्यांची सेवा करितात. त्यांना औषधे दूध व अन्न दिल्यावर जे प्रेम व भावनेच्या सेवेनी उपकृत होतो. भारतातून व परदेशांततून मिळणाऱ्या मदतीचे सहाय्याने या कुष्टरोग्यांना प्रसंगोपात कपडे, धान्य व इतर आवश्यक वस्तू दान दिल्या जातात. मदर टेरेसा यांच्या सेवेचा आदर्श आपल्या नजरेसमोर ठेवून ह्या सिस्टर्स त्या पासून प्रेरणा घेतात. (मदर टेरेसा यांना १९७९ साली ''नोबेल'' पुरस्कार व १९८० साली ''भारतरत्न'' ही पदवी मिळाली आहे.)

संत फ्रान्सिस सेलस्चे प्रचारक याप्रमाणे गेली ९० वर्षे येथील जनतेची सेवा करीत आहे.

होलीक्रॉस सोसायटी ज्ञानमातात, ईश दया ह्या संस्थांची मुख्य कार्यालये अमरावती येथे कचेरी रोडवर असून, तेथेच रोमन कॅथॅलिक चर्च बिशप हाऊस, मालाच्या इमारती वगैरे आहेत. एक शाखा जुन्या शहरानजीक मोटार स्टँड वर आहे.

सदर संस्थेकडून मिळालेली माहिती आणि इतर दस्तऐवजांचे आधारे.

संत फ्रान्सीस द सेल्स : (इ.स.११८१ ते १२२६):

फ्रान्स मधील असीसी येथील एक श्रीमंत गृहस्थ. परंतु त्यांनी संपत्तीची त्याग केला आणि गरीबीने रहाण्याचे व्रत घेतले व ते आजारी व गरीब लोक यांच्या सेवेसाठी जगात भ्रमण करु लागले. जगांत स्वाभाविकच महारोग्यांचे सगळ्यात अधिक हाल होतात आणि त्यांची कोणी काळजीही घेत नाहीत, म्हणून त्यांनी प्रमुखत: त्यांच्या

सेवेला आपले जीवन वाहिले. त्यांनी एक पंथ स्थापन केला. त्याला सेंट फ्रांन्सिसचा पंथ असे नांव आहे. बुध्द धर्मातील संघासारखा हा एक पंथ आहे. फ्रान्सिस जागोजाग हिंडे आणि धर्मोपदेश करी.

ख्रिस्ती धर्माच्या एकुण इतिहासात ज्यांच्या कडे सगळयात मन जास्त वेधते असा हा महान मानव.

जागतिक इतिहासाचे ओझरते दर्शन , ले.जवाहरलाल नेहरु : १९५१ पृ.३५२

फ्री-मेसन्स लॉज (मेसोनिक लॉज) अमरावती.

अमरावतीची ही एक जुनी संस्था, या संस्थेची इमारत मालटेकडी नजीकच्या जलशुध्दीकरण केन्द्रांचे समोर (उत्तरेला) आहे.

फ्री-मेसन्स'' ही एक जागतिक स्वरुपाची सेवाभावी संस्था इसवीसनाच्या चौदाव्या शतकात स्थापन झाल्याचा पुरावा उपलब्ध आहे. परंतु या संस्थेचे प्रत्यक्ष कार्य इ.स.१७१७ पासून जगभर सुरु झाले व संस्थेच्या शाखा जगातील सर्व देशात स्थापन झाल्या आहेत. इ.स.१९६१ साली या संस्थेच्या सभासदांची सर्व जगातील संख्या ६० लाखाच्या वर होती व आजही वाढतच आहे.

भारतात या संस्थेच्या २५० चे वर शाखा असून मुख्य कचेरी दिल्ली येथे तर विभागीय कार्यालये, मुंबई,कलकत्ता व दिल्ली येथे आहेत.

फ्री - मेसन्स'' या संस्थेची तीन मुख्य तत्वे आहेत. ती म्हणजे विश्वबंधुत्व () अडचणीचे किंवा संकटाचे प्रसंगी लोकांची मदत करणे, (णऱ्थेऱ्स) व सत्य (स्छढँऱ्) ही होत.

या संस्थेच सभासद ''फ्री - मेसन्स'' या नांवाने ओळखले जातात आणि फ्री - मेसन्स'' ही :-

१.चारित्र्य संपन्न, निष्ठावान,सेवाभावी,सत्यप्रिय व आपल्या देशाबद्दल निष्ठा व प्रेम बाळगणारा आणि

२. एकनिष्ठ प्रामाणिक नागरिक आणि विश्वाचा निर्माता जो परमेश्वर (द्वढश्लऱ्छ द्वधच्ऱ्छ) त्याचे शक्तिवर आणि स्वधर्मावर द्वढ श्रध्दा असलेला असतो व असावा लागतो.

वरील योग्यता प्राप्त व २१ वर्षाचे किंवा त्यापेक्षा जास्त वयाचे कोणत्याही पुरुष नागरिकांस या संस्थेचे सभासदत्वे स्वीकारता येते. या संस्थेचे मुलभूत तत्वांत कोणतीही गुप्तता नाही. फक्त सभासदाशिवाय इतर व्यक्तीस संस्थेचे सभेला हजर राहण्यास बंदी आहे. स्त्रियांना संस्थेचे सभासद होता येत नाही.

इतर देशातून व भारतातील काही प्रमुख शहरातून या संस्थेमार्फत दवाखाने, शिक्षण संस्था सारखा सेवाभावी संस्था चालविल्या जातात. गरीब व होतकरु विद्यार्थ्यांना शिष्यवृत्त्याही संस्थेकडून दिल्या जातात.

अमरावती येथील "मॅसोनिक लॉज" ही संस्था "लॉज बेरार" या नांवाने ओळखली जाते. या संस्थेच्या स्थानिक शाखेची स्थापना दि.८ ऑगस्ट १८७३ रोजी, बडनेरा येथील रेल्वेच्या प्रतिक्षालयात श्री.एफ.एस.लेव्हलिन (----) या इंग्रज गृहस्थांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या पहिल्या सभेत करण्यात आली होती. नंतर दि.९ डिसेंबर १८७३ रोजी संस्थेच्या लंडन येथील मुख्य कचेरीकडून या शाखेला मान्यता मिळाली. आणि श्री.एस.लेव्हलिन हेच या शाखेचे पहिले अध्यक्ष (वर्शिपकुल मास्टर) निवडले गेलेत. त्यावेळी या शाखेचे फक्त दहा सदस्य होते.

संस्थेच्या या शाखेचे कार्यालय सुरुवातीला बडनेरा येथे एका भाड्याच्या इमारतीत होते. पुढे इ.सन.१८९२ साली संस्थेला अमरावती येथे जागा मिळाली व तेथे संस्थेने स्वत:ची इमारत बांधली आणि बडनेरा येथील या शाखेचे कार्यालय हया इमारतीत स्थानांतरित करण्यात आले. तेव्हा पासून संस्थेची ही शाखा अमरावतीत कार्य करीत आहे.

या शाखेचे सुरुवातीचे सर्व अध्यक्ष (वर्शिपकुल मास्टर) इंग्रजच होते. परंतु नंतरच्या काळात श्री बिंड,बॅरि.काणे, रावबहाद्दूर,अनगळ, श्री जवाहरलाल, श्री एस.जी.जोग, श्री आर.एस.अभ्यंकर रावबहाद्दूर मुधोळकर, दिवाण बहाद्दूर ब्रम्ह , रावबहाद्दूर सरंजामे, रावबहाद्दूर आर.एम.खरे, डॉ.बापट व अलिकडे डॉ. मदनगोपाल इत्यादी प्रतिष्ठित व नामवंत मंडळीनी या शाखेचे अध्यक्षपद भूषविले आहे. अमरावती बाहेरीलही अनेक सदस्य या संस्थेत आहेत.

सन ७९-८० सालासाठी श्री.दी.पु.गुडधे वर्शिपफुल मास्टर व श्री महंमद अली व वाघ (आकोलेवाला) हे सचिव होते. या संस्थेची सभा दर महिन्याच्या पहिल्या मंगळवारी संस्थेच्या सभागृहात होत असे.

संस्थेच्या मूळ कल्पनेनुसार, येथील शाखेकडून काही प्रभावी कार्य झाल्याचे दिसत नसले तरी शाखेच्या सभा नियमित भरत असतात. अलिकडेच संस्थेतर्फे रिक्रिएशन हॉल सुरु करुन तेथे टेबल टेनिस सुरु केले आहे व बालोद्यान, बालक्रीडा भवन, आणि पॉलिक्लिनिक सुरु करण्याच्या योजना विचाराधीन आहेत.

अमरावतीची मुख्य "हिंदु स्मशान भूमी"

जन्माला येणाऱ्या प्रत्येक मनुष्य प्राण्याला कधी तरी पंचतत्वात विलीन व्हावेच लागते आणि अशा प्राणहीन पार्थिव मानवदेहाचे दफन करणे किंवा अग्निला अर्पण करणे भाग पडते. (काही धर्म-पंथात इतरही चालीरिती आहेत परंतु मुख्यत: वरील दोन प्रथाच पाळतात.)

अशा प्राणहीन कलेवरासाठी प्रत्येक वस्तीला स्मशानभूमीची जागा ठरवून दिलेली असतेच आणि गरजेनुसार एखाद्या वस्तीला (विशेषत: मोठी शहरे। एका पेक्षा अधिक स्मशान भूमी असतात. शिवाय विविध धर्मपंथाच्या वेगवेगळ्या दफनभूमी असतात. हया ठरवून दिलेल्या जागे खेरीज इतरत्र प्रेत पुरणे किंवा जाळणे यासाठी कायद्यानेच मनाई केली आहे. यासही काही अपवाद आहेत काही घराण्यांची किंवा धर्मगुरु वगैरेंची प्रेतासाठी स्वतंत्र जागा (खाजगी स्मशान भूमी) असते. वस्तीचे आंत दफनासाठी वरीष्ठ व सरकारी अधिकाऱ्यांच्या परवानगीची गरज असते. इत्यादी प्रथा अस्तित्वात आहेत. परंतु शे.९९ टक्के प्रेतासाठी सार्वजनिक सरकारी स्मशानभूमीचाच उपयोग केला जातो.

अशा सार्वजनिक स्मशानभूमीची मालकी सरकारकडे व व्यवस्था स्थानिक नगरपालिकेकडे (किंवा स्थानिक संस्थेकडे) राहते. हल्लीचे महाराष्ट्र राज्यात लागू आलेल्या महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २२ व महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम १९६५ चे कलम २५६ प्रमाणे सर्व प्रकारच्या स्मशान भूमीचे नियंत्रण केले

जाते. (इतर संबंधित कायद्यातहि याला सुसंगत अशा नियमांची तरतूद आहे.)
अमरावती शहर वसल्यापासून अर्थातच येथेही स्मशानभूमी ठरवून दिली असावी. परंतु जस जशी वस्ती वाढली तस तशी स्मशान भूमीची जागा बदलली असे दिसते. या शहराला हिंदूच्या किमान ६ स्मशानभूमी वेगवेगळ्या भागात आहेत. तसेच मुस्लीम जमातीची १, ख्रिश्चनांची १, बोहऱ्यांचा १, १भंग्यांचा व लिंगायताची १ श्री मुंजाने यांनी दान दिलेली होती. याप्रमाणे अनेक स्मशानभूमी आहेत व त्याचे वहिवाटी प्रमाणे नियमन - नियंत्रण होते.

अमरावतीचे मुख्य हिंदू स्मशान हे शहराच्या जुन्या वस्ती पासून (परकोटा पासून) फर्लांगभर अंतरावर दक्षिणेकडे आहे. ही या वस्तीची जुनी स्मशानभूमी. सन १९०० साली अमरावती शहराचा जो सरकारी नकाशा प्रसिध्द झाला होता त्यांत ही स्मशानभूमी फिल्ड नं.२९ म्हणून दर्शविलेली असून, या भूमीवर कांही समाध्या दर्शविलेल्या आहेत. मात्र इमारत किंवा विहीर वगैरे त्यावर दर्शविलेली नाही.
या स्मशान भूमीचे क्षेत्रफळ हल्ली १० एकर ३७ गुंठे व सर्वे नं.२९ आहे. स्मशान भूमीचे दक्षिण-पश्चिम दिशेने, छत्री तलावातून येणारा "काळी नदी" हा नाला वाहातो, तर पूर्वेकडून सार्वजनिक सडक आहे. त्या दृष्टीने स्मशानासाठी ही जागा सोईस्कर म्हणता येईल.

या स्मशानाच्या जवळील नदीचे पश्चिमेकडील वरच्या अंगाला (सर्वे नं.३०) हे खाजगी शेत लिंगायत स्मशान भूमीसाठी श्री मुंजाने यांना घेऊन दिलेले उपयोगात आणले जाते व त्याचे दक्षिणेकडे थोड्या अंतरावर भंग्यांची सरकारी जागेवर-स्मशान भूमी आहे. शिवाय या स्मशान भूमीचे पूर्वेकडील रस्त्याचे पूर्व बाजूचे खाजगी शेत देखील स्मशानासाठी वापरले जात आहे. त्याचप्रमाणे जवळच जैन धर्मी साधूंच्या समाध्या आहेत. लिंगायत स्मशानभूमी व जैन गुरुंच्या समाध्यांची जागांची व्यवस्था त्या त्या जातींच्या संस्था पहातात. हिंदू स्मशान भूमीची व्यवस्था १९४४ पासून "हिंदु स्मशान संस्था" ही रजिस्टर्ड संस्था पहाते.

ही हिंदु स्मशान भूमीच आज शहराची मुख्य स्मशानभूमी म्हणावी लागेल.

कारण गेल्या ४० वर्षात येथे हिंदु स्मशान संस्थेने अनेक सोईनी उपलब्ध करुन दिल्या आहेत. शहरातील अनेक दानशूर लोकांनी यासाठी या संस्थेला चांगले सहकार्य दिले आहे. हल्ली ही हिंदु स्मशान भूमी, आदर्श स्मशान म्हणायला हरकत नाही. कारण येथे प्रेत पुरण्यासाठी किंवा जाळण्यासाठी सर्व सामुग्रीची व्यवस्था ठेवलेली आहे. स्मशानभूमीचा काही भाग प्रेते पुरण्यासाठी राखून ठेवला असून प्रेते दहन करण्यासाठी जेवढा भूभाग राखून ठेवला आहे तेथे, लहानसा बगीचा व त्यामध्ये एक जुनी सराय, स्नानासाठी पक्क्या खोल्या आणि दशक्रियेसाठी एक कक्ष हया इमारती आहेत. तर त्या लगतचे जागेला पक्के आगार व दर्शनीय फाटक आणि आंत दहन क्रियेसाठी तीन छपऱ्या कार्यालयाची इमारत व त्यालगत दहन क्रियेच्या सामानासाठी दोन मोठी गोदामे आहेत. शेजारचे विहीरीवर पंप बसवून पाण्याची सोय केली असून विहीरी लगतचे पिंपळाचे झाडाला घेरुन सुमारे ५० फुट लांब रुंद असा चबुत्रा बांधलेला आहे. शिवाय मुख्य फाटकाचे आंत दोन्ही बाजूंनी विविध संताच्या व देवदिकांच्या मूर्ती (सिमेंटच्या) बसविलेल्या आहेत. लोकांना बसण्यासाठी सिमेंटचे अनेक बेंच ओळीने येथे ठेवलेले आहेत. एकाच वेळी अनेक प्रेते दहनासाठी खुली जागाही बरीच सोडलेली आहे. एकूण हे हिंदु स्मशान पहाण्यासारखे, थोडे रमणीय म्हणता येईल असे आहे. येथे दहनाच्या सोई उपलब्ध करुन दिलेल्या आहेत. लांकडे, गोवरी, तुराट्या, घासलेट यांचा पुरेसा सांठा असून केव्हाही प्रेत दहनासाठी आल्यास योग्य किंमतीत ही सामुग्री येथे विकत मिळते व त्याची पावती दिली जाते. याशिवाय संस्थेचे एक दुकान (प्रेत यात्रेला लागणारा कपडा, मडके, बांसे इत्यादि.) शहरात जुन्या मोटार स्टँडवर पक्क्या मालकीचे इमारतीत आहे. तेथेही योग्य दराने सामान दिले जाते. हे दुकान रात्री ९ वाजे पावेतो लोकांच्या सोईसाठी उघडे ठेवले जाते.

वर उल्लेख केल्याप्रमाणे इ.स.१९०० साली या स्मशान भूमीवर थोड्याशा समाध्या शिवाय काहीही नव्हते. परंतु १९१४ साली श्री भवानी शिवराम गोंधळी या सद्गृहस्थाने आपल्या वडलांचे स्मरणार्थ येथे एक मजबुत सराय बांधून दिली असून दहनाचे वेळी प्रेत यात्रेस येणाऱ्या लोकांना पावसापासून किंवा उन्हापासून तात्पुरता आश्रय घेता येईल अशी सोय करुन दिल आहे.

या सराई जवळील जुन्या विहीरीला घेरुन ५०-५० फुट एवढ मोठा चबुत्रा, त्यावर पिंपळाची दोन झाडे आणि एक लहानसे हनुमानाचे मंदिर अमरावतीच्या गणेशदास कजोडीमल फर्मचे श्री कजोडीमलजी सुरेका यांनी परोपकार बुध्दीने इ.स.१९१८ साली बांधून दिले आहे. आजही पिंपळाची झाडे खूप मोठी झाली असून चांगली छाया देतात.

इ.स.१९२० साली कै.शेठ छगनलाल दौलतरामन्तोफसी (अहमदाबाद) यांचे स्मरणार्थ त्यांचे पुत्र शेठ वाडीलाल छगनलाल यांनी येथे दोन छपऱ्या बांधून देऊन, पावसाळयात प्रेत दहनाची सोय करुन दिली आहे.

गोरगरीब किंवा बेवारस व्यक्तींच्या शवांना दहन करण्यासाठी पैशाचे अभावी व धर्म संमत नसतांही पुरावे लागत असे. ही गोष्ट लक्षात घेऊन १९३३ साली तत्कालीन नगराध्यक्ष श्री मीनामलजी मनभरदासजी अग्रवाल यांनी, अमरावतीच्या मारवाडी समाजातर्फे गोरगरीब हिंदूंची प्रेते किंवा बेवारस हिंदू प्रेत दहन करता यावे म्हणून , या स्मशान भूमीवर एक लाकडाचे टाल उघडले होते.

हिंदु स्मशान संस्थेची स्थापना :

वरील व्यवस्था बरीच वर्षे चालू होती, पुढे १९४४ मध्ये शहरात लाकडांची तीव्र टंचाई निर्माण झाली. प्रेत दहनासाठी लांकडे मिळणे मुष्कीलीचे होऊन बसले. लाकडाचे भावही खूप वाढलेत.

अशा वेळेस ह्या परिस्थितीचा विचार करण्याचे उद्देशाने १९४४ च्या मार्चचे पहिल्या आठवड्यात नगरपरिषदेचे कार्यालयात शहराचे प्रमुख सर्व दलीय निमंत्रित लोकांची एक बैठक झाली. परंतु या सभेत विचार पूर्ण न झाल्याने दि.१२-३-४४ व १९-३-४४ रोजी नागरिकांची पुन्हा बैठक होऊन -- ''हिंदु स्मशान संस्थेची '' स्थापना करण्याचा निर्णय घेण्यात येऊन संस्थेचे पदाधिकारी निवडण्यात आलेत आणि सुरुवातीला ---- विधिवत संस्थेचे कार्याला सुरुवात करण्यांत आली.

या संस्थेचे पहिले पदाधिकारी व सदस्य खालीलप्रमाणे होते -

अध्यक्ष : श्री श्रीकृष्णदासजी लद्ढा वकील.

उपाध्यक्ष : श्री मिनामलजी मनभरदासजी

सचिव : श्री शिवकृष्णजी लखोटिया

(अमरावती म्यु.चे.सेक्रेटरी)

सदस्य : श्री रा.सा.गोपाल नानजी टांक

'' -- श्री जगन्नाथजी मालपाणी

'' -- श्री मांगीलालजी मुणोत

'' -- श्री मुरलीधरजी अग्रवाल

'' -- श्री देविदासपंत महाजन, सराफ

'' -- श्री गौरी शंकरजी अग्रवाल

'' -- श्री नरसिंगदासजी अग्रवाल, वकील.

संस्थेचे उद्देश खालील प्रमाणे ठरविण्यात आले होते.

१. अन्त्येष्टीचे वेळी, वेळ आणि पैसा नाहक जास्त खर्च होतो. तो होऊ नये. तसेच हरेक मोसमात अंत्येष्टीसाठी लागणारे सामान सुकलेली लांकडे गोवरी वगैरे - योग्य दरांत स्मशानातच संबंधितांना उपलब्ध व्हावीत.

२. अन्त्येष्टीसाठी लागणारे कापड, मडके, बांसे, वगैरे सामान एकाच ठिकाणी योग्य दराने मिळण्याची व्यवस्था व्हावी.

३. प्रथेनुसार जी प्रेते पुरावी लागतात त्यांचेसाठी खड्डे खोदणारे मजूर चौविसही तास, योग्य व ठराविक मजुरीवर उपलब्ध व्होत, अशी सोय करणे.

४. गोर गरीब व द्रव्यहीन हिंदु इसमाचे अन्त्येष्टीसाठी म्यु.सभासदांचे शिफारशीवर दहन क्रियेसाठी मोफत लाकूड वगैरे सामान देणे.

५. शहरात किंवा हॉस्पिटल मधील बेवारस प्रेत असेल तर, संबंधित अधिकाऱ्याचे सुचनेनूसार संस्थेचे गाडीने ते स्मशान भूमीवर आणणे व त्याचे सन्मानपूर्वक दहन करण्याची व्यवस्था करणे.

वरील उद्देश नजरेसमोर ठेवून या हिंदु स्मशान संस्थेने कार्याला सुरुवात केली. त्यासाठी

१९४५ साली, श्री रामधान झुंबरलालजी राठी यांनी संस्थेला या स्मशानभूमीवरच २५-१५ ची एक पक्की इमारत स्वखर्चाने बांधून दिली. या इमारतीत संस्थेने आपले कार्यालय सुरु केले. इ.स.१९५८ पावेतो लाकडे, गोवऱ्या वगैरे सामान तेथील एका तात्पुरत्या शेड मध्ये ठेवित असत. परंतु या वर्षी संस्थेने लागूनच ३०-३० फुटाचे एक गोदाम बांधून तेथे ही सामुग्री ठेवण्याची व्यवस्था केली.

सन १९७९-८० साली हिंदु स्मशान संस्था अमरावती या संस्थेचे पदाधिकारी व सदस्य खालील प्रमाणे होते.

अध्यक्ष	:	श्री श्रीकृष्णदासजी लढ्ढा वकील.
उपाध्यक्ष	:	श्री दत्तदयालजी बिसनदयालजी भिवापूरकर.
सचिव	:	श्री बालकिसनजी गंगाबिसजी लखोटीया
सहसचिव	:	श्री राधावल्लभजी मन्सारामजी हेडा.
सदस्य	:	श्री रामगोपालजी किसनलालजी मालपाणी
'' --		श्री एल.एस.अळापुरकर, वकील.
'' --		श्री शेषराव गोविंदराव पैठनकर
'' --		श्री जमनादासभाई ठक्कर
'' --		श्री रतनलालजी बिहारीलालजी अटल (ॲडव्होकेट)
'' --		श्री पी.आर.देव, आर्किटेक्ट
'' --		श्री नारायणदास लाभचंदजी राठी, वकील.
'' --		श्री निलकंठ अमृतलालजी जोशी

जैन निसई -

हिंदु स्मशानीमीलगतच जैन लोकांची निसई, म्हणजे दिगंबर जैन समाजातील साधूंच्या एकूण पांच समाध्या आहेत. नझुल प्लॉट नं.५ व ६ सीट नं. ९१ डी क्षेत्रफळ एकूण सुमारे १८५०० चौ.फुट एवढी ही जमीन असून त्यावर साधू श्री नेमसागर महाराज यांचा व इतर ४ समाध्या बांधलेल्या आहेत. या जागेला नुकतेच १९६८-६९ मध्ये आवार

बांधून समाध्यांची जागा सुरक्षित केली आहे.

या समाध्यांसाठी सर्वे नं.१८ अमरावतांपैकी सुमारे ६४०० चौ.फुट जमीन दिगंबर आदीनाथ संस्थान,अमरावती श्री शिवराम आप्पा बाळाप्पा शेटे यांचेकडून खरेदी केली होती. तर सर्वे नं.१९"ई" क्लास जमिनांपैकी सुमारे १२१४१ चौ.फूट जमीन संस्थानला मु.मु.नं. ७५/१६/१९१५-१६ मध्ये "इनाम" दिली गेली आहे.

अमरावतीच्या श्री दिगंबर आदीनाथ जैन संस्थानची या समाध्यावर मालकी व ताबा आहे. जैन धर्माचे लोक या जागेला पवित्र मानतात.

१. हिंदु स्मशान संस्थेचे व्यवस्थापक श्री सुरेका यांनी दिलेले माहितीचे आधारे.

२. सेटलमेंट रेकॉर्ड

३. "उदय" अमरावतीचे १९३३ चे अंक.

४. श्री दिगंबर आदीनाथ जैन संस्थानातून भाजीबाजार यांच्या कागदपत्रांवरुन साभार.

श्री समर्थ रामदास स्वामी मंदीर, रहाटगांव

अमरावतीहून मोर्शी मार्गाने जातांना रहाटगांव पोलीस स्टेशन हद्द सुरु होते न होते, तो श्री समर्थ रामदास स्वामींचे मंदीर डोळयांना दिसते. ह्या मंदीराचा परिसर फार स्वच्छ आहे. अंगणात विहीर आहे. तिचे पाणी फार मधुर आहे. मंदिर तसे लहानच म्हणता येईल. पण काही वैशिष्ट्ये चटकन नजरेत येतात. गाभाराच्या प्रवेशद्वाराशी संगमरवी शिळा बसवली असून तीवर पुढील मजकूर कोरला आहे.

" हे मंदिर समर्थ सेवक गणेशदास वऱ्हेकर यांच्या आज्ञेने सेवक प्रती उद्धव सखारामभाऊ गव्हाणकर, दास नमिलाल, नंदलालजी व कृष्णा निन्नाजी रहाटगावकर यांनी आश्रय दत्याकडून मिळालेल्या वर्गणीत श्रमपूर्वक पूर्ण केले. मिती माघं व.९, सवंत १९६२ तारीख ७.२.१९२६.

गाभाऱ्यात मध्यभागी स्वामी समर्थ रामदासांची उभी मूर्ती आहे. हातात जपाची माळ आहे. मूर्तीच्या उजवीकडे संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर व डावीकडे संतश्रेष्ठ तुकाराम यांच्या मूर्त्या आहेत. तेहि उभे आहेत. गाभाऱ्या भोवती प्रदक्षिणा करतांना एका कोनाड्यात श्री हनुमानजीची रामलक्ष्मणांना खांद्यावरुन वाहून नेतांना अशा अवस्थेतील

मूर्ति आहे. डावीकडील कोनाड्यात श्री परमानंद हंस बाबा यांची मूर्ति आहे. एका बाजूला भिंतीत नवीन कोनाडा करुन घेऊन तेथे संत भाऊ महाराज यांची मूर्ति आहे. ह्या मंदिराचे वैशिष्ट्य असे की ह्या मंदिरात श्री गणेशाची मूर्ति नाही. प्रभू रामचंद्राची मूर्ति नाही.

सभामंडपात जी चित्रे लावली आहेत त्यात संत भाऊ महाराज, गणेशदास उर्फ स्वरूपानंद स्वामी , ब्रह्मनिष्ठ जयरामबाबा (विवरेकर) , श्री संत मुंगसाजी महाराज, परमहंस श्री सत्यदेवबाबा, श्री संत परमानंद स्वामी, सत्पुरुष श्री नारायणराव पंडित, श्री बाबाजी महाराज पंडित, श्री संत अच्युत महाराज यांची चित्रे आहेत. अन्य चित्रांची वर्णीही आहे. त्यात भगवान गौतम बुध्द, गुरु नानकदेव, म.जोतिबा फुले, यांचीही चित्रे आहेत. मंदीराच्या भाविक गणांद्वारा जी कथा ऐकली ती अशी की, गणेशदास महाराज उर्फ स्वरुपानंद स्वामी, यांचे शिष्य श्री संत भाऊ महाराज व त्यांचे शिष्य परमहंस श्री सत्यदेवबाबा त्यांचे शिष्य , श्री संत परमानंद स्वामी अशी परंपरा आहे. मंदीर बांधून झाल्यावर दर्शनार्थ ब्रहमनिष्ठ जयरामबाबा विवरेकर, संत अच्युत महाराज पंडित, संत मुगसाजी महाराज, संत लहानुजी महाराज, सत्पुरुष श्री बाबाजी महाराज पंडित ही संत मंडळी दर्शनार्थ येऊन गेली. श्री संत समर्थ रामदास स्वामी, श्री संत तुकाराम महाराज, व श्री संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या मूर्त्या फार सुबक, देखण्या व सुंदर आहेत. दासनवमी, श्री रामनवमी, हनुमान जयंती हे उत्सव प्रामुख्याने संपन्न होतात.

सालबर्डीची यात्रा

वातावरणाला गारवा जाऊन झळा जास्त तीव्र झाल्या व बोचरे वारे दिवसभर वाहू लागले की, सालबर्डीची यात्रा जवळ आल्याची चाहूल लागते व उत्साह वाढीस लागतो व आम्ही महाशिरात्रीची वाट पाहू लागतो.

मोर्शीपासून १०-१२ कि.मी. अंतरावर निसर्गरम्य वातावरणाने सालबर्डीचा परिसर वेढलेला आहे. या परिसरात प्रवेश केल्यावर माडू नदीचे दर्शन होताच मन प्रसन्न होते. नदीच्या काठाकाठाने मोठमोठ्या दगडावरुन चालत गेले की, डाव्या बाजूला वर लहानशा डोंगरावर मुनिबाबांचे मंदिर आहे. इथे महानुभाव पंथाचे आद्य प्रवर्तक चक्रधरस्वामी

यांचे मंदिर आहे. वरच्या बाजूला डोंगर चढून गेलो की, ससारक्षक म्हणून एक स्थान आहे. अशी आख्यायिका आहे की, पारध्यापासून जीव वाचविण्यासाठी शरण आलेल्या सशाचे चक्रधर स्वामी यांनी रक्षण केले. म्हणून याला ससारक्षक म्हणतात. हे महानुभाव पंथाचे प्रसिध्द तीर्थस्थान आहे.

या परिसरात रामाने वनवासात असताना. वास्तव्य केले होते, अशी पण आख्याविका आहे. सीतेची न्हाणी म्हणून, एक पवित्र जागा आहे. तिचे लोकदर्शन घेण्यासाठी जातात.

नदीच्या काठाने उजव्या हातावर डोंगर चढणीची वाट आहे. डोंगर चढतांना थोडी दमछाक झाली तरी वर जाऊन महादेवाचे दर्शन घेतल्यावर आपले श्रम सार्थकी लागले असे वाटते. हे मंदिर ज्या डोंगरावर आहे, तो भाग मध्यप्रदेश सरकारच्या ताब्यात आहे. त्यामुळे प्रत्येक व्यक्तीमागे आपणाला कर द्यावा लागतो. सालबर्डीची डोंगराखालील यात्रा मात्र महाराष्ट्र सरकारच्या जागेत भरते.

वरील पुरातन स्थानाशिवाय अलीकडील काळात बांधलेला मारोतीबाबाचा आश्रम आहे. याशिवाय लहान-मोठी अनेक स्थाने आहेत. भाविक इथे दरवर्षी हजारोच्या संख्येत भेटी देतात.

सालबर्डीच्या आसपासचा निसर्गरम्य परिसर पाहून सरकारने या स्थानाला पर्यटन स्थळ म्हणून मान्यता दिली आहे व त्याचा पर्यटनाच्या दृष्टीने विकास करण्याचे ठरविले आहे तसे झाले व विकास झाला तर हजारोंच्या संख्येने पर्यटक ईथे भेट देतील व धार्मिक कारणांबरोबर सहलीचा पण लोक आनंद लुटतील.

विदर्भातील प्राचीन हेमाडपंथी शिवालय श्री.क्षेत्र कोंडेश्वर

कोंडेश्वरी आम्ही दर्शनासी गेलो । दर्शन पावले शंकराचे ॥ हे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी कोंडेश्वर दर्शनानंतर काढलेले उत्स्फूर्त उद्‌गार आहेत. विदर्भात अनेक प्राचीन शिवालये आहेत. त्यापैकीच एक प्राचीनतम शिवालय. अमरावती पासून अग्नेय दिशेला १५ कि.मी. व बडनेऱ्यापासून पूर्वेला ५ कि.मी. अंतरावर डोगराच्या कुशीत विसावलेले कोंडेश्वर होय.

अमरावती शहराचे पूर्वेला उत्तर दक्षिण पसरलेली टेकड्यांची रांग आहे. या रांगेच्या दक्षिण टोकाशी 'कैलास टेकडीच्या ' पायथ्याशी अतिशय निसर्गरम्य जंगलमय भूप्रदेशात हे शिवालय आहे. श्रावणी सोमवार, महाप्रदोष महाशिवरात्रीला येथे हजारोंच्या संख्येने भाविक दर्शनार्थ येतात. वड, चिंच, पळस, मोहवृक्ष, हिवट, बाभूळ, निंबू, इत्यादी वृक्ष व झेनियाच्या ताटव्यांनी हा परिसर नटलेला आहे. पूर्वी येथे घनदाट अरण्य व श्वापंदाचा वावर होता. वर्तमानकाळी पशु पक्षांचे गुंजारव फक्त कानाची तृष्णा भागवितात. हा परिसर अनेक संत महंतांची तपोभूमी ही राहिलेली आहे. या परिसराला एका आनंदमय, चैतन्यमय, मन:शांती देणाऱ्या सुगंधाचा वारसा लाभला आहे. कोंडेश्वर देवस्थान जागृत मानले जाते व तेथील पुण्याईने उपासकांचे मनोरथ पुर्ण होतात. ही दृढ श्रध्दा वातावरणात वास करते.

भारतवर्षाचा इतिहास प्राचीन आहे, त्याचप्रमोण भारताला धार्मिक श्रध्दा व तत्वज्ञानाचा समृध्द वारसा लाभला आहे. वैदिकपूर्व काळापासून भारतात शिव व शक्ती उपासनेचा प्रवाह अस्तित्वात होता. वैदिक काळातील धर्म निसर्गधिष्टित होता. पंचमहाभूतांच्या कल्याणकारी व प्रलयकारी शक्ती बद्दल मानवाला भीतीयुक्त आदर होता. या शक्तीचे नियमन करणाऱ्या चेतन शक्तीला त्यांनी दैवी स्वरुप दिले. त्यांचे मानवीकरण करुन उपासनेचे विधिनियम बनविले. सृष्टी, स्थिती व लय या निसर्गचक्राला धार्मिक तत्वज्ञानात व उपासनेत प्रविष्ट करण्यात आले. निसर्ग कार्यानुरुप देवता कल्पिल्या गेल्यात. प्रलयकारी शक्तीला 'महाशक्ती' व देवतेला 'महादेव' मानल्या गेले.

निसर्ग देवतेमध्ये चैतन्य शक्तीचा वास असतो म्हणून सृष्टी करणास्तव यज्ञ कर्माचे प्रावधान ठरविण्यात आले. कालांतराने यज्ञ कर्मातील जटीलतेमुळे चेतनशक्तीची आराधना मूर्ती व पूजेत परिणत झाली. चेतन शक्तीचे देवतांच्या मूर्तीच्या स्वरुपात मानवीकरण झाले. मात्र प्रलयकारी महाशक्तीचे शिवलिंग व पिंड या स्वरुपात प्रतिकीकरण झाले हे प्रतिकीकरण पुरुष व प्रकृतीची अभेदावस्था किंवा अव्दैतावस्था म्हणजे परब्रहम परमशिव अवस्था होय.

श्री.रामकृष्ण परमहंसाच्या भाषेत सांगायचे तर जसे पाणी व त्याची तरलता, दुध व त्यांचा शुभ्रपणा, मणी व त्यांची प्रभा, समुद्र व त्यांच्या लाटा किंवा अग्नी व त्याची दाहकता हे सर्व एकमेकांपासून अभिन्न आहेत. तसेच शिव व त्यांची शक्ती अभिन्न आहेत. निर्मिती व लय अभिन्न आहे तेच शिवलिंग.

भारतीय तत्वदर्शन क्षेत्रांत प्रमुख व प्राचीन दोन वैचारिक परंपरा आहेत. एक सर्व परिचित वैदिक परंपरा किंवा निगम परंपरा, तर दुसरी आगम परंपरा, एक वैदिक प्रामाण्य मानणारी तर दुसरी वेदभिन्न प्रामाण्य मानणारी. आगम प्रामाण्य मानणारे तीन संप्रदाय आहेत. वैष्णव, शैव शक्तीं पैकी शैवदर्शनाचा 'शिव हे अंतिम परमतत्व होय' हा केंद्रवर्ती सिंध्दात आहे. वेदातही शिवाची 'रुद्र' ही संकल्पना विस्ताराने चर्चिलेली आहे. अर्थात वैदिक परंपरा व शैव परंपरा परस्पर पूरकच आहेत. भारतीय धार्मिक जीवनात तर त्या एकरुपच झालेल्या आढळतात.

शैव संप्रदायात नाथ संप्रदायाच्या आवर्जून उल्लेख करावा लागेल हा सिध्दांचा संप्रदाय असून हे आदिनाथ गुरु सकल सिध्दांचा या वचनाप्रमाणे भगवान शंकर हे आदिनाथ व संप्रदायाचे मुख्य प्रवर्तक मानले जातात. नंतरच्या थोर आचार्याचे प्रदीर्घ मालिकेत मछिंद्रनाथ, गोरखनाथ, गहिनीनाथ, निवृत्तीनाथ, हैबती, आर्वीच्या मायबाई व त्यांचे सात शिष्यांचा समावेश होतो. त्यामुळेच कोंडेश्वर नाथ पंथीय भोलागीर महाराज, रामगिर महाराज, संत खटेश्वर महाराज, माधवगीर महाराज इत्यांदीची तपोभूमी झाले होते. या संत महंत व संत पुरुषांच्या वास्तव्याचा सुगंध आजही तेथे दरवळत असल्याचे जाणवते.

शैव संप्रदाय काश्मिर पासूनतर कन्या कुमारीपर्यन्त आसेतुहिमाचल पसरलेला आहे. शैवगण बहुजन समाजात अतिशय लोकप्रिय आहे. कोंडेश्वराच्या भाविक व उपासकांत या परिसरातील सामान्यांचाच सर्वाधिक भरणा आहे. श्री.क्षेत्र कोडेश्वर चे शिवालय पुरातन असून त्याचे निर्मिती संबंधीची आख्यायिका या परिसरात सुप्रचलित आहे.

निर्मिती आख्यायिका

पौराणिक कालीन महापराक्रमी भरत राजाचा धाकटा बंधू विदर्भ यांचे वाटणीत दक्षिणेकडील अरण्यमय परंतु सुपीक भुप्रदेश प्राप्त झाला होता. राजा विदर्भ याने आपल्या स्वतंत्र राजधानीच्या निर्मितीसाठी काशीवरुन कौडीण्य नावाच्या स्थापत्यविशारद मुनीस आमंत्रित केले होते. कौडिण्य मुनींनी विदर्भ राजासाठी २६ मैल व्यासाची कुंडलाकार कुंडल (कौडण्यपूर) नावाची राजनगरी बसविली. राजाविदर्भ व कौडिण्य मुनी दोघेही शिवसंप्रदायी होते. त्यांनी कुंडण्यपुर परिक्षेत्रांत निसर्गरम्य ठिकाणी शिवाची प्राण प्रतिष्ठा केली. कौडण्य मुनींना ''कोंड्या'' या लाडक्या लघु नावाने संबोधीत असत. म्हणून या शिवालयाला ''कोडेश्वर'' हे नांव प्राप्त झाले. ते आजही प्रचलीत आहे. कौडिण्य मुनींच्या दोन शिष्य सहकाऱ्यांना ''बोंड्या'' व ''खंड्या'' ही लघुनामे होती. पैकी बोंड्या व्दारा प्रस्थापित ''बोंडेश्वर'' शिवालय अमरावतीच्या पूर्वेस तपोवनेश्वर परिसरात आहे तर ''खंड्या'' व्दारा प्रस्थापित ''खंडेश्वर'' शिवालय अमरावतीचे दक्षिणेस ३० कि.मी. अंतरावर नांदगांव स्थानी आहे. ही सर्व भूमी तपस्यांच्या वास्तव्याने पुनीत झाल्यामुळे तिला तपोवन म्हणतात.

विदर्भ राजा भीमकापर्यन्त श्री.क्षेत्र कोंडेश्वर चा उत्कर्ष काल होता. या काळात कोंडेश्वर परिसरात शेकडो वेळा महरुद्र व लघुरुद्र यज्ञ झालेत. व काशी, प्रयाग, ओंकारेश्वर इत्यादी ठिकाणच्या थोर ऋषि मुनींच्या पाऊलखुणा येथे उमटल्या. त्यामुळे सर्व परिसर शिवभक्त होण्यास मोलाची मदत झाली.

परंतु ऐतिहासिक परिवर्तनाबरोबर शिव उपासनेला उतरणी कळा आली शिवमंदीराची दुर्दशा झाली. इस्लामी आक्रमणेही याला जबाबदार आहेतच. विजयनगरच्या हिंन्दू साम्राज्याच्या निर्मितीनंतर सम्राट हरिहर व्दितीय या शैवपंथीय राजाचे काळात शिवालयांचा जीर्णोध्दार होऊन पूर्व वैभव प्राप्त झाले. देवगिरीच्या रामदेवराय व कृष्णदेवराय यादव राजाचे काळांत पंतप्रधान हेमाद्रोपतांनी शिवालयांचा जीर्णोध्दार तथा अनेक शिवालयांची निर्मिती केली. हेमाद्रिपतांनी नांदगाव खंडेश्वर च्या शिवालयाचा जीर्णाध्दार केल्याचा उल्लेख तेथील शिखालेखांत आहे. तसेच

कोंडेश्वरचे विद्यमान देवालय हेमद्रिपंतांनी बांधले असा त्यांनी लिहिलेल्या संस्कृत ग्रंथरचनेत उल्लेख आहे.

हेमाडपंथी शैली :

हेमाद्रिपतांनी बांधलेल्या अगर जीर्णोध्दार केलेल्या शिवालयांच्या बांधणीची एक वैशिष्ट्यपूर्ण शैली आहे. मोठमोठे शिलाखंड तासून त्यावर कोरीव काम करुन, एकास छिद्र तर दुसऱ्यास खुंटी व्दारा एकावर एक रचून चुन्याच्या प्रयोगाशिवाय देवालय बांधण्याच्या शैलीला 'हेमांडपंथी' शैली म्हणून संबोधिल्या जाते. हेमाद्रिचा 'हेमांड' व पंताचा 'पंथी' असा अपभ्रंश प्रचलीत झाला. या शैलीची अनेक मंदिरे विदर्भात अस्तित्वात आहेत.

कोडेश्वरचे कैलास टेकडीच्या पायथ्यांशी असलेले शिवालय याच शैलीचे उत्कृष्ट उदाहरण होय. काळ्या सच्छिद्र पाषाणाचे कोतीव कोरीच चिरे एकावर एक रचून बारा कोनाची मांडणी व बांधणी या देवालयाची आहे. त्यात चुन्याचा अजिबात उपयोग केला गेला नाही. शिवालयांची उंची साधारण १८ फुट होती. मंदीराच्या बारा कोनांचे पायाभूत खांब ५ फुट लांबीचे व दीड फूट उंचीचे आहेत यांच दगडावर कोरीव हत्तींची विलोभनीय गुंफण केलेली आहे. या हत्तींची रचना अशी कलात्मक आहे की, दोन शरीरांना एक मुख तर काही ठिकाणी दोन मुखाना हत्तीचे एक शरीर आहे. त्यामुळे ह्या कोरीव हत्तीची संख्या निश्चितपणे किती आहे हे मोजणे दुरापास्त ठरते. साधारणत: ही संख्या १६५ ते १७० या दरम्यान भरते. प्रत्येकवेळी ही संख्या भिन्न भिन्न भरते ही वैशिष्ट्यपूर्ण बाब होय.

बाह्य कोनांचे दगड पांच फुटापासून शिखराजवळ सव्वा दोन फूट झाले आहेत. प्रत्येक दोन कोनांत सव्वाफुट लांबी रुंदीचे व दीडफूट उंचीचे दगडावर दगड रचून खांब केलेले आहेत. खांब व कोनांचे दगड आतल्या बाजूस समजिवी आले आहेत. खांबाच्या व कोनांच्या दगडावर चौकोन, फुल्या व वेलबुट्टी अंकीत आहे. एका दक्षिणेकडील उर्ध्व दगडाला हेमांडपंथी चेहरा अंकीत आहे. दगडाला गोलाकार गलथा केलेला आहे. मध्यभाग नागफणी सारखा आहे.

कळस संनिघ भाग गोलाकार रमण्यासारख्या होता. त्यावर दीड फूट उंचीचा दगडी कळस होता. शिवालयाचे प्रवेशव्दार पश्चिमेला असून दर्शनी दोन कोनांचे जागी साधारण १० बाय १० फुटांचा दगडी सभामंडप होता. सभामंडपाचे सहा खांब दगडी गोलाकार व कलात्मक होते.

शिवालयाचे दगडी प्रवेशव्दार अडीच बाय ४ फुटांचे होते. प्रवेश व्दाराचे दक्षिण बाजूला दीडफुट उंचीची गणेशमुर्ती होती व समोर साधारण तीन फुट अंतरावर ४ बाय दीड फूट दगडी चौथऱ्यावर भव्य दगडी नंदी विराजमान आहे. नंदीची उंची मागील बाजूस दोन फूट व पुढील बाजूस सव्वातीन फुट आहे. गळ्यात दगडी घंटा व अंगावर कलात्मक अलंकार कोरले आहेत. शिवालयाचे पश्चिमेकडील विस्तीर्ण संत महतांच्या सात आठ समाध्यांचे पाच पाच फुटांचे दगडी चौथरे होते.

नंदी हे शंकराचे वाहन त्यांचा अग्रपूजेचा मान, हा नंदी पुढे पुढे सरकतो व तो जेव्हा कोंडेश्वराजवळ पोहोचेल तेव्हा प्रलय होईल असा एक भाबडा समज भाविकांत आहे.

प्रवेश व्दारातून तीन चार दगडी पायऱ्या उतरल्यावर बारा कोनांच्या दहा फूट व्यासाच्या गर्भगृहांत प्रवेश होतो. गर्भगृह थोडे अंधारी, अनेक बोल उमटणारे आहे. गर्भगृहाचे बारा कोन बारा ज्योर्तिर्लिंगाचे दर्शक असावेत गर्भगृहाचे आतील बाजूचे काळ्यादगडाचे चिरे सपाट व खरबडीत होते.

गर्भगृहाच्या मध्यभागी दक्षिणेला गोलाकार व उत्तरेस निमुळता भाग असलेली काळ्या सच्छिद्र दगडाची शंकराची पिंड जमिनीच्या समतल आहे. पिंडीचा गोलाकार व्यास चार फुटांचा असून दक्षिणोत्तर लांबी पावणे पाच फुट आहे. पिंडीचे मध्यभागी आठ इंच व्यासाचे व दहा इंच उंचीचे गोलाकार दगडाचे लिंग विराजमान आहे. या पिंडीसंबंधी एक आख्यायिका प्रचलित आहे. आवर्षणाचे वेळी कोंडेश्वराला प्रसन्न करण्यासाठी हजारो भाविक कोंडेश्वराच्या गर्भास जलामृताने भरण्याचा प्रयत्न करतात. गाभाऱ्याचा तळभाग चिरेबंद असून पाणी मंदिराबाहेर न जाण्याची सर्व दखल घेतली जाते. नंतर हजारो भाविकांच्या घागरीने पाण्याची सतत धार सुरु होते.

पण कोंडेश्वराचे लिंग पूर्णपणे पाण्यात कधीच बुडत नाही हा एक चमत्कार व कोंडेश्वराच्या जागृततेचा भक्कमपुरावा मानला जातो. परंतु कोंडेश्वराची पिंड सच्छिद्र दगडाची आहे ही बाब लक्षात घेतल्यास हा चमत्कार मानण्यास मन तयार होत नाही.

शिवालयाचे परिसरात पूर्वेस दोन मोठ्या अष्टकोनी विहीरीआहेत अवर्षण काळातही त्यांचे पाणी कमी होत नाही. लगतच्या शंभर फुटावर साधारण दीडशे वर्षाचा विशाल वटवृक्ष उभा आहे. तेथूनच कोंडेश्वराचा नाला वाहतो. वटवृक्षाचे उत्तरेस तीनशे फुटावर प्राचीन गणेशमंदिर आहे. गणेशमंदिराचे पूर्वेस संत माधवगीर महाराजांची धुनी व समाधी आहे. शिवालयाचे दक्षिणेस साधारण एक फर्लांग अंतरावर श्री.संत खटेश्वर महाराजांची समाधी व मंदिर आहे. शिवालयाचे पूर्वेस संलग्न साधारण पाचशे फूट उंचीच्या कैलास टेकडीवर श्री.भोलागीर महाराजांची तपोभूमी व त्यांचे व्दारा प्रस्थापित छोटे शिवलिंग आहे. या टेकडीवरुन सभोवतालचा निसर्गरम्य मनोहारी परिसर नेत्रांचे पारणे फेडतो. महाशिवरात्रीचे वेळी कैलास टेकडी पळस फुलाच्या लाल गालीच्याने आच्छादीत झालेली असते. या टेकडीवरील दगडाखाली विंचू सापडतात पण ते इजा करीत नाहीत.

भुयारी आख्यायिका :-

या शिवालयाबाबत आणखी एक आख्यायिका प्रचलित आहे. अमरावतीच्या अंबादेवीच्या एकविरा देवीच्या देवळापासून कोंडेश्वरापर्यन्त भुयारी रस्ता आहे. अशी बोलवा आहे. १९६५ मध्ये नवाथे बगिच्यातील एका घराचा पाया खोदत असतांना एक भुयारी रस्ता आढळला होता. हाच तो अंबादेवी मंदिराकडून कोंडेश्वरवर जाणारा भुयारी रस्ता असावा असे अंदाज व्यक्त झाले होते. कारण नवाथे बगीच्या याच मार्गावर आहे. परंतु कोडेश्वर परिसरात भुयारासंबंधीच्या खाणाखुणा आजतागायत अवगत झालेल्या नाहीत. एकंदरीत श्री.क्षेत्र कोंडेश्वर निसर्गाच्या रम्य कुशीत दडलेले, मनाला भुरळ पाडणारे प्राचीन शिवालय आहे.

जीर्णोध्दार :-

कोंडेश्वराच्या प्राचीन शिवालयाचा जीर्णोध्दार करण्यास्तव १९७४

मध्ये जीर्णोध्दार समिती स्थापन होऊन, भाविकांच्या उदार देणगीव्दारा १९७५ पासुन जीर्णोध्दार कार्य सुरु झाले आहे. गेल्या वीस वर्षात शिवालयाच्या कळसाचा साधारण ५ फुट भाग काढून तेथे ५१ फुट उंचीचा चुना सिमेंटचा भव्य कळस उभारण्यात आला आहे. गर्भगृहासमोरील दगडी सभामंडप काढून तेथे ५५ बाय ३० फुटाचा विस्तीर्ण सभामंडप १४ खांबावर उभारण्यात आला आहे. पश्चिमेच्या प्राकारातील समाध्या काढून चौक करण्यात आला आहे. यात्रेकरासाठी नेऋत्येस विश्रांती स्थानाची निमिती झाली आहे. मंदीराला विस्तीर्ण परकोट बांधण्यात आला आहे. प्रवेशव्दार पूर्व परकोट भींतीत असून त्यावर छोटा, नगार खाना उभारला आहे. प्राकारातील एका समाधीला गणपती, मंदिर बनवून चिमुकले हनुमान मंदिरही अस्तित्वांत आले आहे. पूर्वेच्या कैलास टेकडीच्या पायथ्याशी एका तलावाची योजना झाली आहे. शिवालयाचे गर्भगृह आतील दगड काढून ५ फुट व्यासाचे करुन तळ व मंदिराचा अंतर्भाग साधारण बारा फुट उंची पर्यन्त पांढऱ्या संगमवरी फरश्यांनी सुशोभीत केला गेला आहे. गर्भगृहाचे प्रवेश व्दारही मोठे करण्यात आले आहे.

(श्री. पी.एन. देशमुख)

श्री गुरुदेव दत्त मंदीर झिरी

(श्री सीताराम महाराज टॅंब्ये स्वामी संस्थान)

अमरावती शहरात नव्हे, परंतु अमरावती पासून अवघ्या पंधरा सोळा कि.मी. वर बडनेरा हद्दीत झिरी संस्थान आहे. अतीव विशुध्द आनंद प्राप्ती व चित्तशुद्धि आणि चित्त शांतीसाठी अमरावती निवासी लोक झिरी येथे येतात. तेथे सीताराम महाराज टेंब्ये यांची समाधी आहे. श्री.गुरु दत्तात्रेय मंदीर आहे. विश्वस्त मंडळ अति निष्ठेने पूजा अर्चा, व्रते, उत्सव संपन्न करतात. भाविकांच्या दानधर्मावर खर्च चालतो. तसेच अवतीभोवतीची थोडी शेती विश्वस्तांनी मंदिराचा खर्च चालविण्यासाठी विकत घेतली आहे. श्री.वासुदेवानन्द सरस्वती महाराज दिक्षित अयोध्या येथे यात्रेस गेले असताना तेथेच त्यांचे देहविसर्जन झाले. त्यांची मूळ समाधी अयोध्या येथे आहे. परंतु बडनेरा, (झीरी) येथे श्री.सीताराम महाराज मंदीर परिसरात त्यांची नाम समाधि आहे.

सीताराम महाराजांचे श्री.वासुदेवानन्द सरस्वती दीक्षित हे गुरु होते. ते स्वत: श्री.गुरुदेव दत्त यांचा अवतार होते. पत्नीच्या देहांताच्या चवदाव्या दिवशी स्वत: दत्तगुरुंनी त्यांना दीक्षा दिली. नंतर ते यात्रेस निघाले. उज्जैनला नारायणानंद स्वरूप यांनी त्यांना दंड कमंडलू दिला. तेव्हापासून त्यांना वासुदेवानन्द सरस्वती महाराज हे नामाभिधान प्राप्त झाले. गराडेश्वर (गुजराथ) येथे चोवीसावा चार्तुमास व्रत व उत्सव करुन त्यांनी शेजारच्या नर्मदेत देह विसर्जन केले.

सीताराम महाराज सरस्वती हे त्यांचे कनिष्ठ बंधू. त्यांचा वडील भावावर फार लोभ होता. पालनपोषणहि त्यांनीच केलेले आणि दीक्षागुरु तेच होते. आध्यात्मिक गुरुजी तेच होते. यामुळे सीताराम महाराजांच्या जीवनात वासुदेवानंद सरस्वतींना अनन्य साधारण महत्त्व आहे. सीताराम महाराजांना वेदक्रिया योगविद्या, शास्त्रज्ञान, आत्मविद्या, अध्यात्मविद्या, श्री.वासुदेवानन्द सरस्वतीकडून प्राप्त झाले.

अंबापेठस्थित श्री.गोपालकृष्ण मंदिर

इंद्रपुरी अमरावती नगरीतील श्री.गोपालकृष्ण मंदिर हे अनेकांचे 'आध्यात्मिक प्रेरणास्थान' होय.

जगदगुरु भगवान श्रीकृष्णाच्या परमभक्त प.पू. वारुताई कागलकर उपाख्य ताई महाराज यांनी सदर मंदिराची उभारणी केली. मूर्तीची प्राण-प्रतिष्ठापना इ.स. १९३५ मध्ये कै. बाबासाहेब व सौ. मनुताई खापर्डे यांनी केली. परमहंस . परिवाजकाजर्य, जगदगुरु शंकराचार्य प.पू. डॉ.कुर्तकोटी यांनीच सदर मुर्ती प.पू. ताई महाराजांना प्रदान केली, हे उल्लेखनीय।

॥ ॐ ॥

ब्रलचैतन्य व प्रल्हाद महाराज उपासना केंद्रे

इंद्रपुरी अमरावती नगरीत ४२ विमल नगर, फरशी स्टॉपजवळ, दस्तुरनगर रोड, अमरावती याठिकाणी प.पू. नामावतार दत्ताभैय्या महाराज यांच्या प्रेरणेने व कृपाप्रसादाने प.पु.ब्रम्हचिंतन उपासना केंद्र गत २ वर्षापासून स्थापन करण्यात आले. तर दि. ४ मे १९९७ (रविवार) पासून प.पू. प्रल्हाद महाराज काळे 'रामदासी'

(साखरखेडी) यांच्या भक्तमंडळींनी नुकतीच उपासना केंद्राची स्थापना केली. प.पू. नामावतार दत्ताभैय्या महाराज व प.पू. प्रल्हाद महाराज दोघेही 'गुरुबंधू', प.पु. नामावतार ब्रम्हचैतन्य महाराज गोंदवलेकर (जन्म १८४५, समाधिस्त २२ डिसेंबर १९१३), ज्यांना 'दीनक्षस' म्हणून ओळखले जाते यांचे सच्छिष्य।

प.पू. ब्रम्हचैतन्य महाराज गोंदवलेकर यांनी तीनदा भारत भ्रमण केले, ठिकठिकाणी 'श्रीराम मंदिरे' स्थापन करविलीत, 'उपासना केंद्रे' स्थान केलीत श्रीक्षेत्र, भुवैकुट गोंदवले बुद्रुक (ता.माण,जि.सातारा) नंतर पहिले उपासना केंद्र स्थापन करण्यात आले ते राज्याची ''सांस्कृतिक राजधानी'' असणाऱ्या नागरपुरातील २९ समाधान, एल.आय.सी. कॉलनी, खामला मार्ग नागपूर याठिकाणी

उपरिनिर्दिष्ट उपासना केंद्रात अर्धा तास 'श्रीराम जयराम जयजय राम' या तारकमंत्राचा जप, श्रीसद्गुरुंच्या चरित्राविषयी / प्रवचने यातील अध्यायांचे वाचन व आरती अशाप्रकारची 'नित्योपासना' केली जाते.

अवतार मेहेर बाबा केंद्र, अमरावती.

मानव जातीला पवित्र असलेली अनेक श्रध्दा स्थाने या पृथ्वीतलावर आहेत त्या ठिकाणी कांही विशेष प्रसंगी हजारो; लाखो संख्येने लोक गोळा होतात. त्याच्या हृदयाला मनाला शांती मिळते. अशा स्थळा पैकी अमरावती हे एक स्थळ आहे. या शहराला सद्गुरु व अनेक संत महात्म्याचा सहवास व चरण स्पर्श झालेला आहे. या युगाचे अवतार मेहेरबाबा यांचे दोन वेळा या शहरात आगमन झालेले होते. १ जुलै १९४४ २) २० डिसें. १९५१ ह्यावेळी बाबा चार दिवस अमरावती येथे होते. त्यावेळी सार्वजनिक दर्शन कार्यक्रम झाले. १) जोशी हॉल २) डॉ.व्ही.जी.खेर यांचे निवासस्थानी ३) जनता कॉलेजला भेट दिली. सोबत महर्षि डॉ.पंजाबराव देशमुख, कृषी मंत्री भारत सरकार हे सोबत होते धर्म व राजनितीवर बाबांनी संदेश दिला.

ही प्रेरणा घेवून अमरावती येथे आध्यात्मिक अवतार मेहेरबाबा केंद्राची सन १९७९ मध्ये स्थापनाा करुन हर हप्त्याला रविवार ला सत्संग होवून प्रियतम मेहेर प्रभूच्या दैवी संदेशाचा प्रसार करुं लागले. त्यावेळी १०-१५ बाबा प्रेमी एकत्र येवून

बाबाच्या जन्मदिनाचे निर्वाण दिनाचे - मौनदिनांचे व इतरहि प्रसंगी कार्यक्रम घेतले - बाबांचे पुस्तके फोटोज व गरीबाना भोजन व कुष्ठांना भोज व वस्त्र वितरणाचे कार्यक्रम घेवून प्रत्यक्ष कृतीत मेहेरबाबाचे संदेश आणणाचा प्रयत्न करु लागले. त्यानंतर काही जेष्ठ बाबा प्रेमीयांचे सल्ल्यानुरुप केंद्राची ट्रस्ट म्हणून धर्मदाय उपआयुक्ता कडुन नोंदणी करावी म्हणजे पुंढे केलेल्या कार्यासाठी केंद्राची इमारत करता येईल अशी सल्ला तथा सूचना प्राप्त झाल्यावरुन प्रेमीयांनी "अवतार मेहेरबाबा केंद्र - नवजीवन कॉलनी, तपोवन रोड, कॅम्प या नांवाने ट्रस्ट व संस्था सन १९९३ मध्ये स्थापन केले.

जसजसी बाबा प्रेमीयाची संख्या वाढली. त्यामुळे केंद्रा करीता जागा घेणे जरुरीचे झाले. बाबा प्रेमीयांनी कांही निधी गोळा करुन दि. १९/३/९७ ला एक भूखंड खरेदी केला व मेहेरबाबाचे निकटवर्ती मंडळी जन श्री.कृष्णाजी अय्यर मेहेराबाद यांचे शुभ हस्ते दि. १३/४/९७ ला भूमिपूजन करुन घेतले. हे केंद्र स्थापन करण्याचा उद्देश :- १) बाबांचे संदेशाचा प्रसार करणे. २) बाबा चे पुस्तकाचे वाचनालय चालविणे. ३) दीनदुबळे - अपंग व कुष्ठांची सेवा करणे. ४) सत्य आणि प्रेमाचा संदेश सर्वत्र पसरुन - समाजात दैवी - प्रेम व आनंद निर्माण करुन जीवनाचा उद्देश बाबांच्या कार्यातून व दिलेल्य संदेशातून लोकांपर्यत पोहचविणे. ५) खरे ईश्वरी कार्य व कार्यकर्ता काय ? ह्याची समाजाला जाणीव करुन देणे व त्यासाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करणे, इत्यादी. सध्या शहरात ५०० चे वर मेहेरप्रेमी आहेत त्यापैकी ३६ आजीवन सदस्य आहेत केंद्राचा साप्ताहिक कार्यक्रम दर रविवार ला केंद्राच्या ठिकाणी किंवा इतरही ठिकाणी नियमितपणे होतो. सर्व लोकांकरीता व धर्मा करीता केंद्र खुले आहे व सर्व स्तरावरील प्रेमीजन ह्या कार्याचा प्रेमाने व भक्तीभावाने लाभ घेतात. बाबांचे कार्यक्रम जाहीररित्या व सार्वजनिक ठिकाणी सर्वां करिता घेण्यात येतात. 'कार्यात प्रामाणिक पणा व जीवनात ध्येय असणे आवश्यक आहे.' त्याद्दष्टीने आम्ही कार्यरत आहोत.

"Love Alone Prevails" केवळ प्रेम चिरकाळ टिकते "

विठ्ठल मंदीर दहिसाथ :-

पूर्वी श्री.भगवतजी महाराज अंदाजे १८५७ च्या सुमारास सोलापूरचे भागातील पंढरपूरचे आसपास एका गांवी राहत होते. तेथून पोटापाण्याची व्यवस्था लावावी म्हणून वऱ्हाड मध्ये आले व ते हमालीचा उद्योग करीत. मात्र ओझे उचलतांना असो किंवा केव्हाही त्याचें मुखातून तो विठ्ठल विठ्ठल असा स्वर चालू असावयाचा. ते स्वत:ला मी पांडुरंगाचा हमाल आहे असे म्हणत असत. उद्योगानी हमालीचा धंदा असल्यामुळे त्यांना लोक भगत हमाल अशा नावाने संबोधित व ते स्वत:ला हमाल म्हणूनच संबोधित. ते स्वत: मंदीर समोरचे जागेत राहात. त्याकाळी समोरची जागा साधू महात्म्यांच्या समाध्या किंवा पादुका मांडून थोडी बहुत मोकळी जागा होती. तिथेच ते राहत. त्यामुळे तिथे राहण्याला कोणी अडथळा करीत नसे. पुढे आपल्याला उतार वयार दरवर्षी पंढरपूरला जाणे शक्य होणार नाही. करीता दर सालची वारी मुकणार व आपण पांडुरंगापासून दूर राहू ही कल्पना त्यांना सहन होईना. त्याकाळी पंढरपूरला पायीच जाण्याची प्रथा असल्यामुळे श्री.भगतही महाराज पंढरपूरला पायी वारीला गेले व तिथेच श्री.पंढरीनाथाला विनवणी करु लागले. ते स्वत: श्री.पांडुरंगार्पण अशा वृत्तीचे असल्यामुळे श्री.पंढरीनाथांनी दृष्टांत दिला व त्यांना पटला म्हणून त्यांनी श्री.विठ्ठल व माता लक्ष्मीच्या अशा दोन पाषाणाच्या मूर्त्या घेतल्या व पंढरीनाथाला शक्ती मागून घेऊन आपल्या पाठीवर पोते घेतो त्याप्रमाणे पाठीवर घेतल्या व उमरावतीला निघाले. प्रत्येक ठिकाणी दैनंदीन जेवण खाण शारीरिक सोपस्कार असतातच. झोपण्याचे वेळी सुध्दा पाठीवरील श्री.विठ्ठल रुख्माईच्या मूर्त्या पाठीवरच असायच्या. श्रध्दा असल्यामुळे रस्ते, नाले पार करीत अमरावती येथे आले. अमरावतीला आल्यावर श्री.पंढरीनाथांचा गजर करुन त्यांनी आपल्या घरासमोरील जागेवर श्री.विठ्ठल रुखामाईची स्थापना केली. त्याच जागेवर त्याअजून आपण पाहत आहोत. नंतर गाभारा म्हणजे चार मोठे खांब व त्याचे भोवती लाकडी जाळी असा गाभारा बसेच दिवस होता. नंतर शेजारचे गोविंदराव हंबर्डे यांनी पुढाकार घेऊन चार लोकांची मदत घेऊन भगतजी महाराजानंतर मोठे देऊळ बांधले व नव्या मूर्ति स्थापन केल्या. श्री.भगतजी महाराज

प्रपंची होते पण मुलबाळ नव्हते. पुतण्या नामदेवराव नावाचा होता. त्यांचे लग्न गंगुबाई या बाईशी झाले. तिलाही मूल झाले नाही. नामदेवराव लवकर वारले. गंगुबाई बरेच वर्षे देवाची पूजाअर्चा, व्यवस्था पाहत होती. तिचे पश्चात शेजारचे श्री.पांडुरंग सावजी हे मंदीराची देखरेख पंच म्हणून करीत होते. श्री.नामदेवराव असतांना मंदीरामध्ये आषाढी, कार्तिकेला जयराम सावजी तसेच तेली समाज, गोविंदराव सराफ यांची आई

तसेच अनेकजण एक एक दिवस अन्न संतर्पण, भोजन करीत, मंदारामध्ये रोज रात्री पंचपदी १०० वर्षे टिकून होती. गोविंदराव सराफ यांच्या मातोश्रींनी मंदीराला रथ बांधून दिला.

श्री.संत भगतजी महाराज यांची हमाली वगैरे म्हातारणामुळे बंद पडली. मंदीरात "श्री.विठ्ठल विठ्ठल" असा लहान आवाजात जप करित बसलेले असत. एके दिवशी मंदीरावरुन कोणी गृहस्थ घरात भांडण झाल्यावरुन जीव देण्याकरीता निघाला. वाटेत श्री.पंढरीनाथाचे मंदीर लागले. म्हणून घंटा वाजवून मंदीरात श्री.पंढरीनाथांचे दर्शन घेऊन जातांना संतापाचे भरात मोठ्यांनी घंटा वाजवून जाऊ लागला. महाराजांच्या लक्षात येताच अशा वृध्द अवस्थेत महाराजांनी उठून त्याला धरले. तो थांबण्यास तयार नव्हता. पण महाराजांची शक्ती, त्याचबरोबर आत्मशक्ती इतकी भयंकर की, त्याला जबरदस्तीने आपले जवळ २-३ तास बसवून ठेवले व भजन करावयास भाग पाडले. पंढरीनाथचे भजनात मन लागून आत्महत्या करण्याची भूल पडली. नंतर तो घरी जाईना. महाराजांनी त्याला पोहचते केले. तेव्हा त्या गृहस्थांनी सांगितले की, मला जीव देण्यापासून परावृत्त केले म्हणून ते दोघेही पती-पत्नी महाराजांचे चेले झाले. पण गुरुत्व त्यांना माहित नव्हते. त्यामुळे श्री.विठ्ठल, विठ्ठल अशा भजनात त्यांनी इहलोक सोडला. नंतर या मंदिरात रोज निष्ठेने येत शहरातला असा कोणीही नव्हता की, जो येत नव्हता. जे निष्ठेने श्री पांडुरंगाचे दर्शन घेत ती मंडळी नावलौकिकाला पोहोचली. श्री.दादासाहेब खापर्डे मंदीरात दर एकादशीला यायचे. श्री विठ्ठलाचे एकमेव देऊळ शहरात होते. इथे दुकाने वैगेरे उत्सवात लागत असत.

पूर्वी सांगत की, महाराजानी स्थापन केलेल्या पंढरीचे दर्शन नियमाने

घेतले. त्यांचे सहजत्व दिसता सुम गतीने कल्याण होते. हे कळतही नाही पण होते. ज्या सराफ (तेली) समाजाचे घराण्याने श्री.मदीराची सेवा केली तिची मुलाची मुलगा जन्मांध पण तिचे आईवडील त्या काळात लंडनला स्थायिक झालेत. अजूनही त्यांचे संसार लंडनला घर करुन असून त्यांचे घरात भगतजी महाराजांचे नावानी श्री.विठ्ठल रुखामाई मूर्त्या विराजमान आहेत. या मंदीरात आतही प्रसन्नता टिकून आहे.
(श्रीरामभाऊ नारायण हंबर्डे यांनी दिलेल्या माहितीचे आधारे)

क . अमरावतीतील मठ संस्था

इ.स. १७३०-३५ नंतर येथे उदासी पंथांचे (वैष्णव) लोकांनी बालाजी मंदीर (बडे बालाजी मंदीर, देवीजवळ) बांधले असल्याची माहिती मिळते. दुसरा प्रकार मठाचा. त्यांत वीरशैव पंथाचे (लिंगायत) लोकांनी आपल्या गुरुंसाठी उमरावतीत ज्या मठ संस्था निर्माण केल्या त्या महत्वाच्या आहेत. कारण त्यावेळी इ.स.१७३०-३५ ते १८०० या काळात उमरावतीत या पंथाच्या लोकांनी एकूण ११ मठ स्थापन केलेत. या मठांचे क्षेत्रफळ प्रत्येकी सुमारे अर्धा ते पाऊण एकर जमीनीवर आहे व त्यावर बांधकामे सभोवार घरे किंवा भिती आहेत. यावरुन १७२२ ते १८०० या काळात या वीरशैव पंथाचे उमरावतीतील समाजाची सांपत्तिक स्थिती व धार्मिक श्रध्दा यांचा पत्ता लागतो. त्या मठसंस्था अशा - १.बुध्दी स्वामी मठ - हा देवीचे पलिकडे चुनाभट्टी मोहोल्यालगत असून त्यास चिंचबन मठ असेही म्हणतात. कारण पूर्वी त्या भागांत चिंचेचे मोठे वन असावे. हा मठ अंदाजे इ.स. १७२२ ते २५ चे दरम्यान स्थापन झाला.

२. मोठा मठ किंवा हिरेमठ :- हा बुधवारा विभागात असून त्याची स्थापना अंदाजे १७२२ चे आसपास झाली.

३. लासिनमठ :- हा दहिसाथ-सातखिराडी रोडवर असून त्याची स्थापना अंदाजे १७४०-४५ मध्ये झाली.

याशिवाय लोहारमठ, (सिताराम बिल्डींग जवळ), औरंगपुरा मठ (अंबागेटचे बाहेर औरंगपुरा रोडवर) मृगेंद्रमठ साबणपुऱ्यात, मुरगीमठ (हल्लीचे माहेश्वरीभवन), पाथरकर मठ. (जुन्या कोतवाली जवळ), शेट्याचामठ व माजलगांवकर

स्वामीचा मठ (बुधवारा-अंबागेट रोडवर) याप्रमाणे ह्या मठ संस्था इ.स. १८०० पुर्वी अस्तित्वात आल्या. या सर्व मठाची (जागा व इमारती) मिळून लक्षावधी रुपये किंमत होईल, ह्या मठ संस्था उभारण्यासाठी त्या त्या मठाच्या शिष्यवर्गानिच पैसा दिला असावा. त्या खेरीज एवढ्या मोठ मोठ्या जागाव व त्यावरील इमारती उभ्या होऊ शकल्या नाहीत.

उमरावतीत वीरशैव पंथातील या मठसंस्थांची संख्या व त्याचे क्षेत्रफळ पहाता, त्या काळी या समाजाची सांपत्तिक स्थिती व धार्मिक श्रध्दा यांची कल्पना सहज करता येते. उमरावतीत त्या काळी ज्या पंथांचे लोक होते त्यांत या वीरशैव पंथाचे लोकांनी आपल्या गुरुसाठी जे मठ बांधून दिले तसा उपक्रम इतर कोणत्याही पंथातील लोकांनी केल्याचे दिसत नाही. जैन समाजाच्या वसत्या (जैन मंदिरे) उमरावतीत ५-६ आहेत. वैष्णव पंथांची मंदीरे-जी जुनी असावीत असे दिसते. त्यांची संख्या सुध्दा एवढी नाही. यावरुन उमरावतीत वीरशैव लिंगायत पंथाचे लोकांची सांपत्तिक स्थिती, त्यांची संख्या व संघटन यांची कल्पना करता येते.

उदासी (वैष्णव) पंथांची मंदीरे, गंभीरपुर हनुमान मंदीर, पांढरी हनुमान संस्थान, सक्करसाथ महादेव मंदीर, बालाजी मंदीर (रुईगंज) आणि इस्लामिक पंथांच्या मसजीदीचा देखिल या काळांत एवढा प्रसार नव्हता ही गोष्ट लक्षांत घेण्यासारखी आहे.

अमरावती शहरांतील जंगममठ संस्थान

१) श्री.पाथरकर जंगम मठ जुनी कोतवाली जवळ, अमरावती.

२) श्री.सोमशंकर स्वामी मोठा मठा, बुधवारा, अमरावती.

३) श्री.गंगाधरस्वामी मठ, माताखिडकी, अमरावती.

४) श्री.माजलगांवकर मठ हनुमान मंदीर जवळ, बुधवारा, अमरावती.

५) श्री.हरीश्वर अय्या मठ, हनुमान मंदीर, जवळ, बुधवारा, अमरावती.

६) श्री.सिध्दगीरस्वामी मठ, सिताराम बिल्डिंगजवळ, अमरावती.

७) श्री.मृगेंद्र मठ, अंबागेट, अमरावती.

८) श्री.बुध्दिस्वामी मठ, (चिंचबनमठ), अमरावती.

९) श्री.लासीन करस्वामी मठ, बसवेश्वर चौक,अमरावती.

१०) श्री.मृगेंद्र मठ मारवाडी गल्ली, धनराज लाईन, अमरावती.

११) श्री.खाकरे मठ, औरंगपुरा, अमरावती.

१२) श्री.शिवायनम: मठ, बुधवारा, अमरावती.

१३) श्री.रेवनसिध्दच्या स्वामी जंगममठ, बुधवारा चौक, अमरावती.

कालाराम मंदिर सक्करसाथ :

अमरावतीत सक्करसाथ विभागातील ''काळा राम मंदीर'' हे मंदीर फार जुने आहे. या मंदिरातील मूर्ति सुमारे २५० वर्षापूर्वीची आहे.

पुर्वी येथे फक्त रामाचे लहानसे मंदीर लगत बोरीचे एक झाड होते. हे मंदीर शंभर वर्षापूर्वी बांधण्यात आले. त्यासाठी कांही जागा कै.डबरे या गृहस्थांनी दिली होती. या मंदीराचे पुजारी श्री.बापुराव भटजी व रामदासी त्यांचे मृत्युनंतर त्यांचे पुत्र श्री.शंकर भटजी हे होते. हे त्यांचे खाजगी मंदीर आहे. श्रीशंकर भट्यांनी आपल्या मृत्युपत्रात आपला नातू (मुलीचा मुलगा) श्री.भाऊ यांस आपला वारस नेमून हे संस्थान त्याचेकडे सोपविले आहे व सध्या तेच या देवस्थानाचे व्यवस्था पहातात.

श्री.रामनवमी आणि इतर बहुतेक सर्व उत्सव या देवस्थानांत साजरे होत असत. हल्ली राम नवमी व इतर कांही थोडे उत्सव होतात. या संस्थानला थोडे घरभाड्याचे उत्पन्न आहे.

श्री ज्ञानेश्वर मंदीर , अमरावती :

श्री.संत गुलाबराव उर्फ पांडुरंगनाथ महाराज हे माधान सोडून अमरावती येथे वास्तव्य करण्यास आल्यानंतर प्रथम ते अमरावती येथील भाजीबाजारात किरायाच्या घरात रहात असे. त्या ठिकाणी त्यांनी काही दिवस ग्रंथलेखन केले परंतु ती वास्तू त्यांना विशेष उपयुक्त न जाणवल्यामुळे एक दिवस त्यांना दहिसाथांतील एक घर ग्रंथलेखानाकरीता आवश्यक असलेल्या एकांतवासाच्या दृष्टीने पसंत पडले. व त्यानंतर त्यांनी अल्पप्रयत्नाने ती वास्तू विकत घेतली. तीच आजच्या ज्ञानेश्वर मंदीराची जागा. त्यानंतर ह्या जागेचा विकास करुन सोबत ग्रंथलेखन सुरु ठेवले.

नित्यनैमित्तिक व्रतातील कात्यायनी व्रतात महाराज असतांना नागपूर येथील कोर्ट सुपरिटेंडेंट श्री.नारायण पैकाजी पंडित हे त्यांच्या दर्शनास आले व महाराजांचा त्यांच्यावर इतका प्रभाव पडला की, ते नेहमीकरीताच म्हणूनच महाराजांच्या सेवेत रुजु झाले व महाराजांचे पुढील ग्रंथलेखन सुरु ठेवले. हेच श्री.नारायण पैकाजी पंडित महाराजांच्या अतुट सान्निध्यामुळे व असीम कृपेमुळे श्री बाबांजी महाराज पंडित या संबोधनाने ओळखले जावू लागले.

श्री.गुलाबराव महाराजांच्या दिव्य चक्षूंसमोर असलेली मंदीराबाबतची व ग्रंथालयाची कल्पना श्री.बाबाजी महाराज पंडित यांनी मूर्त स्वरुपात साकार केली आणि त्यासोबत, त्यांच्या अमोल ग्रंथाची छपाई करुन ते ग्रंथ अज्ञजनांकरीता उपलब्ध करुन ठेवले.

श्री.संत गुलाबराव महाराज यांनी सांगितलेल्या मधुरा भक्तीचा विस्तार होण्याकरीता श्री.ज्ञानेश्वर मधुराव्दैत सांप्रदायिक मंडळाची स्थापना ह्याच कल्पनेतून झाली. आणि श्री.गुलाबराव महाराजांनी सांगितलेले वार्षिकोत्सव, श्रीकृष्णाष्टमी, कात्यायनीव्रत, श्री.महाशिव रात्र हे तीन उत्सव श्री ज्ञानेश्वर मधुराव्दैत सांप्रदायिक मंडळातर्फे साजरे केले जातात.

तसेच ह्या मंदीरात ज्ञानेश्वरी पठण मनन, चिंतन, स्वाध्याय तसेच ज्ञानेश्वर महाराजकृत हरिपाठ, नित्यपाठ, हे कार्यक्रम होतात. त्यासोबत भजन, चिंतन, प्रवचनादी होतात.

श्री.गुलाबराव महाराज यांच्या अंतीम इच्छेवरुन ह्या मंदीरावर कोणत्याही प्रकारचा बोर्ड, कळस, घंटा हे ठेवण्यात आलेले नाहीत. (इ.स.१९००)

गुलाबराव महाराज पहिल्या प्रथम यावर्षी जमनाबाई या बाईचे निमंत्रणावरुन अमरावतीत आले होते. जमनाबाईचा उतारा होता. वारंवार येऊन येथेच आठ आठ दिवस उतरत असत.[१]

१: गुलाबराव महाराज मधुराव्दैताचार्य: श्री गुलाबराव महाराज : मिलिंद : १९६२
श्री छत्रपुरी बालाजी मंदीर, अमरावती

श्री.छत्रपुरी बालाजी संस्थान हे छत्रपूरी लोकांचे लोकांनी बांधलेले संस्थान आहे. मा.प्रीडॉक्स साहेब, फर्म्स कम मेजेटेन्ड यांच्या कोर्टात प्री.प्रो.कोर्ट कलम १४५ खाली दाखल केलेल्या मुकदम्यात असे दिसून येते की, लोकांनी हे देऊळ सुमारे १५० वर्षा पूर्वी बांधलेली आहे. या देवस्थानाचे पुजारी बैरागी लोक होते. छत्रपुरी लोकांच्या दुर्लक्षामुळे हे सर्व संस्थान व त्याची इस्टेट या बैरागी लोकांनी बळकावली. श्री.छक्कीलालजी खरैय्या ह्यांनी १९२० मध्ये बैरागी लोकांवर कोर्ट कार्यवाही करुन व हायकोर्टा पर्यन्त मुकदमा लढवून १९२९ साली हे देवस्थान व त्याची सर्व इस्टेट पंचलोकांना मिळवून तिली. छक्की लालजींना त्यावेळी पर्यन्त संतती नव्हती व त्यांनी आपली संपत्ती या धार्मिक व सामाजिक कार्यास वाहिली. सन १९२९ साली याच जागेत त्यांनी निशुल्क ''धर्मशाळा'' व भारत हिंन्दी ''पुस्तकालय'' या नावाचे हिन्दी वाचनालय काढले व ते आजही सुरु आहे. त्याच सुमारास त्यांनी येथे व्यायाम शाळेची स्थापना केली १९३६ साली त्यांनी येथे धर्मार्थ आयुर्वेदिक औषधालय व त्यांची बिल्डींग बांधून त्यांना दोन मकाने दान केले. सदर आयुर्वेदिक औषधालय आजही सुरु आहेत. १८९६ साली छक्कीलालजी यांचे वडील गिरधरलालजी यांनी दसऱ्याच्या मुहुर्तावर ४०००/- रु. खर्च करुन त्या देवस्थानाचा जीर्णोध्दार केला होता. व स्वत:च्या वडिलांची परंपरा त्यांनी कार्य करुन सुरु ठेवली. या शिवाय १९३० साली त्यांनी या शहरात हिन्दू बालक अनाथालय या नांवाची संस्था सुरु केली. व तो ट्रस्ट अजून कायम आहेत. श्री.छक्कीलालजी हे अमरावती च्या श्री.एकविरा देवी संस्थानचे सतत ६० वर्षे मरे पर्यन्त अध्यक्ष होते, व तेथेही त्यांनी फार मोठा खर्च करुन पूर्ण देऊळ नवीन बांधून व त्यामध्ये नक्शी कामाचे दगडी शिखर १९४१ साली सतत ३ १/२ वर्ष स्वत: हजर राहून मेहनत करुन तयार करुन घेतले.

सी १०५ नेमसागर महाराज सैतवाळ दिगंबर जैनमंदीर
बुधवारा अमरावती र.नं. ए ७८४ अमरावती.

सदरहू संस्थान अमरावती शहरातील बुधवारा येथे आहे. या संस्थानाचे उत्पत्ती विषयी विशेष माहिती उपलब्ध नाही. प्राप्त झालेल्या माहितीनुसार आम्ही वरील

संस्थानची पूर्व पिठीका जाहीर करीत आहोत.

या संस्थानची स्थापना पूज्य १०५ क्र. नेमसागर महाराज यांनी विक्रम सांवत १८९५ कार्तिक शु ।। १२ ला केलेली आहे. (इ.स. १८३९).

अशाी अख्यायिका आहे की, पूज्य ब्रम्हचारी महाराजांजवळ एकही पैसा नव्हता. कारागिर व मजूर वर्ग मोठ्या उत्साहाने मंदीर बांधण्याचे कार्य करीत होते. मजुरी चुकविण्याचे वेळी पुज्य १०५ ब्र. नेमसागर महाराज येवून गादीवर बसत व प्रत्येक कारागिराला व मजूराला विचारत की "तुमची मजुरी किती झाली १ मजुराने किंवा कारागिराने सांगितलेल्या दिवसाची मजूरी बसलेल्या गादीखाली हात घालून मजुराला देत प्रथम प्रथम मजूर मोजून पाहत काय आश्चर्य . त्याची झालेली पूर्ण मजुरी त्यांचे हातात मिळालेली असे. मजुर सुध्दा मजूरी मोजत नसे यदाकदाचित कोणी मजूर वाद घालून एखादा दिवस जास्त सांगितलाच तर त्याला खोटे बोललेल्या दिवसाची मजूरी मिळत नसे त्यामुळे पुज्य महाराजांवर मजूराची निस्सीम भक्ति जडलेली होती व कोणी मजूर खोटे बोलत नसे किसी ने भी फैलाया हाथ तेरे दर ओ मालिक। तुझे देते नही देखा मगर झोली भर देखो। अशा रीतीने पुज्य १० ब्र. नेमसागर कडून सदरहु संस्थान निर्माण झाले.

या संस्थानच्या योजना उत्तम रीतीने चालविल्या जाव्या या सद्भावनेने दिनांक १.५.१९३० ई रोजी श्रीमती दुरुका यांनी सदरहू संस्थानला अडीच हजार रुपयाची उदार देणगी लेखी दानपत्र संस्थानला करुन दिले वरील अडीच हजार रुपयाची देणगी निवासी परवार समाजाचे भूषण धर्मवीर सेठ स्व. श्रीमान पन्नालालजी सिंग यांचे दुकानावर व्याजाने ठेवलेली आहे.

श्री.शंकर मृगेंद्र स्वामी -चरित्र व वाङ्मयाचा अल्प परिचय

२३ व्या शतकात म.बसवेश्वराच्या नेतृत्वाखाली कर्नाटकात सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक, नैतिक, सांस्कृतिक व साहित्यिक अशी सम्पपैलू संर्वकष समग्र क्रांती झाली. कर्नाटकालगत कानडी विठ्ठलूच्या केन्द्रवर्ती वारकरी सांप्रदायिक ध्येयवादी अशा भागवत सांप्रदाय रुपाने १३ व्या शतकात वरील समग्र क्रांतीचे पडसाद

महाराष्ट्रातही उमटले. कर्नाटकातील सामाजिक समता जातीभेद निरसनांसारख्या भक्ती सांप्रदायाचे माध्यमाने त्या सुधारणांचे बीज केवळ महाराष्ट्रातच नव्हे तर संत नामदेवाने पंजाब पर्यत नेले.

१२ व्या शतकातील म.बसेवेश्वराच्या नेतृत्वाखाली सर्वकष क्रांतीत वचन वाङ्मयाव्दारे शरण साहित्य व सुधारवादी, धार्मिक साहित्यांचे सुकाणू महाराष्ट्रातील वीरशैव संत मंडळीने सुध्दा धरुन मराठी शैव साहित्यात मोलाची भर घातली. श्री.छत्रपती शिवरायाचे कुलदैवत असलेल्या शिखर शिंगणापूर येथील श्रीशांतलिंगाने म.बसवेश्वरांच्या अनुभव मंडळातील षटस्थातत्व ज्ञानाचें प्रणेते श्री.पन्न बसवेश्वर यांच्या कन्नड करण हा मराठी वीरशैव साहित्यात पहिला मराठी भाष्य ग्रंथ रचून श्री.शांतेश्वर हे वीरशैव साहित्यातील आद्य ग्रंथकार ठरले. शांतबोध, विवेक चिंतामुणी आदि मराठीत त्यांचे ग्रंथ आहेत.

१६ व्या शतकात समकालीन जन्मथ स्वामींच्या अभंग शैव अभंग प्रणालीचा पाया घातला मम्यथ स्वामी पासूलीवार थेट लक्ष्मण व १९ व्या शतकातील अमरावतीचे शिवयोगी श्री.शंकर मृगेंद्रस्वामी पर्यन्त महाराष्ट्रात झालेल्या वीर शैव संतांनी शारदोपासना केली. महानुभाव पंथीय चंक्रधारासह भागवत धर्माथ वारकरी संतावर ब वीरशैव सांप्रदायी संताच्या साहय्याने देखील मोलाची भर घालून सर्व पंथीय साहित्याने मराठी साहित्य समृध्द झालेले आहे. अशा रीतीने मराठी भाषेचे संस्कृती समन्वययाचे सुंदर साहित्य पुष्प विविध पाकळ्यांनी फुलले.

मराठी वाङमयात वीरशैव साहित्याला वैशिष्टयपूर्ण स्थान आहे. शांतालिंग स्वामी पासून तर गन्मथा लक्ष्मण सिगेंश्वराचा संतांनी व १६ व्या शतकातील श्री.शंकर मृगेन्द्र आदी केवळ भक्तीवरच साहित्य नसून वीरशैव तत्व प्रणालीचेहि भरपूर विवेचन वीरशैव संतांनी केले होते.वीरशैव संतांनी अभंगाच्या धर्तीवर लिंगेश्वर बसवलिंग लक्ष्मण महाराजांची ही विपुल अभंग रचना आहे. याच तत्वप्रणालीवर १९ व्या शतकाचे उत्तरार्धात व २० व्या शतकाचे प्रारंभात अमरावतीचे शिवयोगी श्री.शंकर मृगेंद्र स्वामींची अभंगरचना आहे.

बसव जयंत्युत्सवाचे पायिक

श्री.शंकर मृगेन्द्र स्वामींनी आपल्या प्रारंभिक जीवन कार्यात वीरशैव तत्वज्ञान प्रचार व समाज सुधारणेसाठी केलेल्या साहित्य निर्मितीत बसव शिकवण्यातच धर्मतत्वे रुढ केलेल्या जाऊ शकतात. असा त्यांना प्रत्यय आल्या वरुन बसव जयंत्युत्सव साजरा करण्यासाठी बसव जन्मतिथीचे निश्चितीकरण आवश्यक आहे असे त्यांनी ठरविल्यावर त्या प्रयत्नास त्यांनी प्रारंभ केला. बसव जन्मतीथीचे इस १९१३ मध्ये त्यांनी देशभर १३७ पत्रे पाठविली व २२/२/१९१४ ला अमरावतीत नागेंद्र मठात सभा आयोजित केली. श्री.शंकर मृगेंद्र स्वामीच्याच अध्यक्षतेखालील सभेत शास्त्री, गणिती, तज्ञांचे मते शास्त्राधारे अक्षय तृतीया मध्यान्ही, निगमावशोक्त धर्म रक्षकांना जन्मोत्सव साजरा करण्याचा तिथी निर्णय घेण्यात आला याचा निर्णयानुसार श्री.शंकर स्वामींनी पहिला उत्सव २४/४/१९१४ ला प्रारंभ केला तो ५ मे पर्यत १२ दिवस चालला. त्यात स्त्रियांचे हळदी कुंकू, विव्दानांची भाषणें, चर्चा मेळावे संकीर्तन भजन व शेवटी मिरवणूक सोहळा असा भव्य सोहळा पार पडून बसवेश्वर जयंत्युत्सव रुढ केला. वरील संदर्भात त्यांनी एक जाहीरात छापली त्यावर लोकमान्यांचे सहकारी कै.दादासाहेब खापर्डे तसेच अमरावती शहरातील त्या वेळच्या प्रमुख व्यक्तिच्या स्वाक्षऱ्या आहेत. पुढे नानासाहेब बामणगावंकरही त्यांच्या शेवटल्या जीवनात सहवासात आले व वचनांचा अभ्यास केला, त्यांचेशी चर्चा करुन म.बसवेश्वराचे प्रधान म्हणून राज दरबारी छायाचित्रहि बेनकर छायाचित्रकाराकडून काढून घेतले व तेच मूळ कल्पकता कायम राखून थोड्याफार फरकाने सर्वत्र रुढ झाले, एकंदर म. बसवेश्वर जयंत्युत्सव, जन्मतिथी व छायाचित्राचे मूळ पायिक श्री.शंकर मृगेंद्र स्वामी होत यांत संशय नाही.

वार्धक्य व निधन

श्री.शंकर मृगेन्द्र स्वामी केवळ संत कवी नव्हते तर समाज जागृतीने झपाटलेले महान वीरशैव धर्म पुरस्कर्ते व सुधारक होते. म.बसवेश्वर जन्म तिथी निश्चिय व जयंत्युत्सव प्रारंभ करण्यासाठी केलेल्या परिश्रमावरुन त्यांचे बसव जयंत्युत्सवाचे चिरस्मरणीय कार्य उल्लेखनीय आहे.

त्यानंतर त्यांचे जीवितकार्य अथवा लिखाण साहित्य रचना आढळत नाही. यावरुन त्यांचा नंतरचा हा काळ शरीरपीडा अथवा वार्धक्याने ग्रासलेला असावा असे दिसते. शारीरिक अकार्यक्षेमतेमुळे ते काही लिहू शकले नाहीत त्याअर्थी त्याची शारीरिक स्थिती सक्षम नसल्याचा हा पुरावा मानावा लागेल. बसव जन्म तिथी व उत्सव-प्रारंभ करणारे वीरशैव धार्मोपालक साहित्य निर्माते वीरशैव धर्माचे खंदे पुरस्कते, वीरशैव महत्व सुसंवादाने बिंबविणारे महान शिवयोगी श्री.शंकर मृगेन्द्र स्वामी यांनी शेवटी इहलोकाची यात्रा १ नोव्हेंबर १९२१ रोजी संपवून ते लिंगैक्य पावले. अंत्यसमयी त्यांचे निकटवर्ती अनुयायी त्यांचेजवळ होते असे उपलब्ध छायाचित्रावरुन दिसते. त्यांचे समाधीस्थान देखील याच नागेन्द्र (बुध्दा स्वामी) मठात आहे.

श्री.अरविंद सोसायटी अमरावती.

महायोगी अरविंद घोष यांच्या विचारप्रणाली चा प्रचार व प्रसार करण्यासाठी श्री. अरविंद आश्रमाची स्थापना अमरावती येथे मोर्शी रोडवर श्री.गनेडीवाल यांच्या बंगल्यात दि.२४ नोव्हें.१९७२ रोजी, कविभूषण अण्णासाहेब (बळवंत गणेश) खापर्डे यांच्या हस्ते झाली. त्यावेळी श्री.मा च्या स्वहस्ताक्षरातील आशीर्वाद प्राप्त झाला होता. कविभूषण अण्णासाहेब ह्यांच्या हस्ते आश्रमाचे उद्घाटन करण्यामागे एक औचित्य होते. ते असे की, कविभूषण अण्णासाहेब मॅट्रिक पास झाल्यावर कलकत्त्याला मेडिकल कॉलेज मध्ये वैद्यकीय अभ्यास करण्यासाठी राहिले होते. त्यावेळी महाकवि रवींद्रनाथ टागोर, प्रा. अरविंद घोष, श्री. बिपिनचंद्र इत्यादी मान्यवरासाठी कै.दादासाहेबांनी ओळख पत्रे दिली होती. श्री.अरविंदाना आठवड्यातून एकदा भेटावे असा संकेत ठरला होता. त्याप्रमाणे श्री.अण्णासाहेब तेथे जात असत. एके दिवशी बोलता बोलता अण्णासाहेबांनी महर्षि अरविंदांना आपण ईश्वराचे दर्शन घेतले आहे काय? ईश्वर तुम्ही प्रत्यक्ष पाहिला आहे काय? असा प्रश्न विचारला. तेव्हा श्री. अरविंदांनी त्यांना होय, मी ईश्वर प्रयत्क्ष ह्या डोळ्यांनी पाहिला आहे, त्याचे दर्शन घेतले आहे, त्याचा मला साक्षात्कार झालेला आहे, जसे मी तुझ्याशी समोरासमोर बसून बोलत आहे, तसे मी ईश्वराशी संभाषण केल, मधून मधून करीतही असतो, अशा अर्थाचे

उत्तर दिले. ही सर्व कथा कै.श्री.अण्णासाहेबांनी 'श्री.अरविंदांनी मला काय सांगितले?' ह्या पुस्तकात नमूद केली असून ही पुस्तिका महा.थि ऑ. फेडरेशन, पुणे यांनी प्रकाशित केली आहे. इ.स.१९०८ मध्ये श्री. अरविंद घोष अमरावतीस आले तेव्हा त्यांचा मुक्काम खापर्डे वाडयातच होता. हे ऋणानुबंध लक्षात घेऊन अरविंद आश्रमाच्या उद्घाटनाचे अध्यक्ष पद त्यांना देण्यात आले होते.

आश्रमाची संकल्पना श्री.वल्लभ गुप्ता यांची होती. संस्थेचे पहिले अध्यक्ष डॉ. शिवाजीराव पटवर्धन हे होते. हल्ली श्री. लालजीभाई मेहता हे अध्यक्ष व श्री. बाळासाहेब देशमूख उपाध्यक्ष आहेत. संस्थेमध्ये ध्यानकेंद्र व वाङ्मय विक्री केंद्र, वाचनालय, प्रवचन कक्ष अशी व्यवस्था आहे. श्री.अरविंद व श्री.माताजी यांनी लिहिलेल्या ग्रंथांच्या व पुस्तक-पुस्तिकांच्या प्रती भारत भरातील श्री. अरविंद केंद्राच्या वतीने प्रकाशित होणारी मासिके, नियतकालिके, विशेषांक येथे वाचावयास मिळतात. ध्यानधारणा करु इच्छिणाऱ्यांसाठी ध्वनिप्रदूषण विरहित शांत कक्ष आहे. पाँडेचेरी आश्रमा कडून आणलेल्या संगीत, भजने, व भाषणे यांच्या ध्वनिफिती, उदबत्त्या, चंदनी वस्तू, ग्राहकांना उपलब्ध होऊ शकतात. इ.स.१९७५ सालापासून ''अभीप्सा'' नावाचे मासिक चालविण्यात येते. इ.स.१९८८ सालपर्यंत सौ.सरलताई नागराज ह्या संपादिका होत्या. एक वर्ष श्री. पडोळे गुरुजी व इ.स. १९८९ पासून श्री. वासुदेवराव खापर्डे हे संपादकत्वाची धुरा सांभाळतात. संपादकांना वेतन दिले जात नाही. हे संपूर्णतया आध्यात्मिक स्वरुपाचे मासिक आहे. आश्रमाचा खर्च, जागेचे भाडे, वीज, रंगरंगोटी, यांचा खर्च आश्रमात दानपेटी ठेवली आहे, तीतून मिळणाऱ्या उत्पन्नातून चालतो. उदबत्ती विक्री मासिकाची वर्गणी, अन्य वस्तूंची विक्री याव्दारेहि काही उत्पन्न मिळते.

काव्य व्याख्यानमाला-

केंद्रातर्फे विविध विषयांवर व्याख्यानमाला आयोजित करुन समाज प्रबोधन व समाजाचे मानसिक, आध्यात्मिक उन्नयन करण्याचा प्रयत्न केल्या जातो- डॉ. विजय अग्रवाल (अमरावती नेत्रतज्ञ प्राचार्य राम शेवाळकर) ; आचार्य गो.नी. दांडेकर, डॉ. सुनील चिंचोळकर, डॉ. देशमुख, डॉ. माहेश्वरी (पाँडेचेरी), डॉ. गोपालन(पाँडेचेरी), डॉ. मनोज दास, (पाँडेचेरी), मंदाताई गंधे, अमरावती, स्वामी पुरुषोत्तमानंद (चिन्मय

मिशन), डॉ. शिशिरकुमार घोष, शांतिनिकेतन, डॉ. शिवाजीराव भोसले, इ. नामवंत वक्त्यांनी येथे येऊन व्याख्यानमाला गुंफल्या आहेत. सौ. सरलताई नागराज व श्री. अजय गुप्ता हे तर अग्रणी कार्यकर्ते व व्याख्याते आहेत.

गायन व नृत्य-

श्री. अरविंदांना शास्त्रीय संगीत फार आवडत असे. कारण त्यांना सर्वत्रच लय, माधुर्य, सुरेलता, सुसंगति, सुसंवाद आवडत असे. संगीतावर त्यांनी महत्त्वपूर्ण लेख लिहिले आहेत. उत्तम संगीत चालू असतांना त्यांना समाधीचा दिव्यानंद मिळत असे. स्वामी विवेकानंदांना देखील उत्कृष्ट संगीत येत असे. व आवडत असे. जे. कृष्णमूर्ति देखील संगीतातून दिव्य आनंदाची समाधि उपभोगत असत. थोर पुरुषांना संगीताची आवड होती हे ध्यानी घेऊन श्री. अरविंद आश्रम अमरावती येथेहि शास्त्रीय संगीताचे कार्यक्रम आयोजित केले जातात. आतापर्यंत सूरमणि सौ.कमल भोंडे, सौ. सुमनताई चौधरी, सौ. अलकनंदा तुळजापूरकर, सौ.सविता तांबे (महाजन), श्री. बाकरे श्री. बोकाडे, श्री. देवपुजारी, विविध प्रसंगी येथे हजेरी देऊन गेले आहेत. येथील कार्य क्रमाच्या वेळी सौ. सविता तांबे यांना एवढा आनंद लाभला की, त्यांनी पाँडिचेरी येथे आश्रमात हजेरी देण्याचा संकल्प ठरवून टाकला. त्याप्रमाणे त्यांच्या गायनाचा कार्यक्रम पाँडिचेरीच्या आश्रमात घडून आला. त्या कार्यक्रमाच्या वेळी एक दिव्य अनुभूति लाभली, असा त्यांचा स्वानुभव कथन केला. अनेक थोर कलावंत पाँडिचेरी आश्रमात आपली कला सादर करुन श्री. अरविंदांना श्रध्दांजलि समर्पित करतात.

अमरावतीच्या हेमंत नृत्य मंदिराच्या कलावंतांनी श्री. दत्तराज बोडे यांच्या मार्गदर्शनाखाली अरविंद आश्रम अमरावती केंद्रात कथकली, भरत नाटयम्, दिपनृत्य सादर केले होते.

विविध उत्सव, शिबिरे इ. अमरावती केंद्राच्या वतीने प्रज्ञाभारती डॉ. श्री.भा. वर्णेकर यांच्या नेतृत्वाखाली द्विदिवसीय संस्कृत शिबिर आयोजित केले होते. श्री. माँ यांचे पाँडिचेरीस आगमन झाले. त्या प्रसंगाच्या स्मृत्यर्थ अमृत महोत्सव भारत वर्षातील सर्व केंद्रांनी संपन्न केला. अमरावतीतहि त्या महोत्सवाचे आयोजन केले होते. त्या प्रीत्यर्थ श्री. छोटेनारायण शर्मा (पाँडिचेरी) यांच्या मार्गदर्शनाचा लाभ झाला. श्री. अरविंदांना दिव्य सिध्दि प्राप्त झाली त्यांच्या स्मृत्यर्थ दि. २६ एप्रिल हा दिवस सिध्दि

दिन म्हणून संपन्न केला जातो.

श्री. अरविंदांचा माहनिर्वाण दिन, श्री. अरविंदांचा जन्म दिन दि. पंधरा ऑगस्ट, वसुंधरेपर शक्ति अवतीर्ण झाली तो सिध्दि दिन,

याप्रमाणे विविध उत्सव संपन्न केले जातात. त्यादिवशी प्रसन्न चित्ताने ध्यान, ग्रंथातील उताऱ्याचे वाचन, त्या प्रसंगाचे महत्व कथन करणारे प्रवचन अथवा भाषण, प्रसाद वितरण असे कार्यक्रम असतात. एखाद्या प्रसंगी पाँडिचेरीचे प्रभावी वक्ते श्री. नवज्योत, श्री. विजय पोद्दार यांच्या हि अलौकीक वक्तृत्वाचा लाभ मिळतो. सौ. सरलताई नागराज तर सिध्दहस्त वक्त्या उपलब्ध असतातच.

दि. १५ ऑगस्ट १९९६ ते दि. १५ ऑगस्ट १९९७ पर्यंत वर्षभर श्री. अरविंदांच्या एकशे पंचविसाव्या जयंती दिना प्रित्यर्थ भारत वर्ष भर विविध कार्यक्रम संपन्न झाले. अमरावतीत या प्रीत्यर्थ सौ. वृंदा लिमये यांनी संस्कृत संवाद शिबिराचे आयोजन केले. प्रा. सोहनी यांनी योगावर प्रात्याक्षिक व्याख्यान दिले.

पाँडिचेरीला जी शिक्षण पध्दति चालू आहे व प्रचलित आहे, त्या धर्तीवर अमरावतीत एक शाळा सुरु करण्यात आली. श्री. गनेरीवाल यांनी जागा उपलब्ध करुन दिली. काही दिवस शाळा चालली. परंतु योग्य प्रकारच्या चिकाटीच्या अभावी आणि शिक्षकांच्या अभावी ही शाळा बंद पडली.

अमरावती केंद्राने पुढाकार घेऊन जळगाव, वरुड, वलगाव, यवतमाळ, पांढरकवडा, नागपूर, परतवाडा, धामणगाव येथे श्री. अरविंद आश्रमाच्या शाखा सुरु केल्या. श्री वल्लभ गुप्ता, सौ. सरलताई नागराज, श्री. लालभाई मेहता, सौ. हंसाबेन मेहता, इ. लोकांचे प्रयत्न ह्यास कारणीभूत झाले.

हॉलीवुड कॉलनी, कठोरा रोड, अमरावती येथे श्री. पडोळे गुरुजी यांनी तीन हजार चौ. फूट जमीन असलेला आठ-दहा खोल्यांचा बंगला अरविंद आश्रमास प्रदान केला. तेथे आता महाराष्ट्राचे मध्यवर्ति केंद्र चालविण्यात येणार आहे. आश्रमात दर गुरुवार व रविवारी महर्षि अरविंदांच्या 'सावित्री' महाकाव्याचे वाचन, व ध्यान, इ. कार्यक्रम चालतात. श्री. चिमणपुरे गीतेवर बालक बालिकांसाठी सुलभ भाषेत प्रवचन देतात.

श्री. अरविंदांचे विचार :-

आध्यात्मिकता वस्तुत: भारतीय मानसिकता की कुंजी है। अनन्तताका भाव उसके लिये स्वभावज है। उसने आरंभ से ही यह देख लिया था -- और उसके तर्क विवेक प्रधान युगों में तथा उसके अधिकाधिक अज्ञानके युग में भी उसकी वह अंतर्दृष्टि कभी लुप्त नही हुई - कि जीवन को मात्र उसके बाह्यांगोंके प्रकाश में ठीक से देखना संभव नही है, अथवा मात्र उनके सामर्थ्य से उसे पूर्णतया जीना संभव नही है। भौतिक ऊर्जाओं तथा नियमों के प्रति भारत सजग था। भौतिक विज्ञानों के महत्त्व के प्रति उस की दृष्टि संवेदनशील थी; सामान्य जीवनकी कलाओंको कैसे सुव्यवस्थित किया जाय, यह वह जानता था। किन्तु उसने स्पष्ट तया देखा की जबतक भौतिक अतिभौतिक के साथ सुसम्बध्द नही हो जाता तबतक उसका परिपूर्ण अर्थ प्राप्त नही होता।उसके अन्दर यह दृढ आस्था होनी चाहिये की भारत को सुनिश्चित रुपसे उन्नत और महान होना ही है, तथा जो भी कुछ धरित हुआ, प्रत्येक कठिनाई,प्रत्येक विपरीत गाते सुनिश्चित प्रकार से सहायक तथा उनके उद्देश्यको प्रगति देनेवाली होगी। प्रवर्तन ऊर्ध्वगामी था और अवनतीका समय समाप्त हो चुका था। प्रभात का समय आ गया था। और एक बार प्रकाश प्रकट हो गया तो रात्रिकाल नही लौट सकता। प्रभात शीघ्र ही पूरा होगा तथा क्षितिज के ऊपर सूर्योदय होगा ही। भारत की नियतिका सूर्योदय होगा ही और भारत को अपनी ज्योति से भर देगा, उसकी ज्योति एशिया में प्रसारित होगी, विश्व भर में फैल जायेगी। विश्व का भविष्य भारतवर्ष पर निर्भर है। राष्ट्र क्या है? हमारी मातृभूमि क्या है? यह न तो धरती का टुकडा है, न अलंकार और न मन की कल्पना। यह राष्ट्र का रुप धरनेवाली करोडों इकाइयोंकी शक्तियाँ व्दारा संघटित महान शक्ति हैं - वैसे ही जैसे असंख्य देवताओं की शक्ति से एक पुंजीभूत एवं एकताबध्द रुप में भवानी महि-मर्दिनी अस्तित्व में आई थी।

भारत समस्त राष्ट्रों का गुरु है। वह गंभीरतर व्याधियों में मानवता का चिकित्सक है। उसकी नियति में है एक बार पुन: विश्व के जीवन का नवगठन और मानवात्मा का पुनरुध्दार। भारत का कर्तव्य है विश्व को प्रकाश एवं पुनरुद्धार का चिरस्थायी स्त्रोत प्रदान करना।

परिशिष्ट ३

अमरावतीतील कीर्तीमान व्यक्ती व महिला

सर मोरोपंत जोशी :

मोरोपंत जोशी यांचे कर्तृत्व संपन्न जीवन असूनहि त्यांच्या विषयी असलेल्या आकसापोटी त्यांना प्रसिध्दी लाभली नाही. त्याचे कारण म्हणजे त्यांना मिळालेला 'सर' हा किताब. यावरुन ते हाजीखोर, खुशमस्करे आहेत. असा शिक्का मारणे सोपे जाते. पण त्यांच्या बुहुविविध कर्तबगारीमुळे त्यांना इंग्रज सरकारने के.सी.आ.ई.(सर) हा किताब दिला होता. ते अत्यंत स्पष्ट वक्ते, निस्पृह निर्भिड व सडेतोड बोलणारे खंबीर पुरुष होते.

मोरोपंतांचे वडील दादासाहेब जोशी फार रसिक, विव्दान व बहुश्रुत होते. त्यांचा सरकारी नोकरीचा व्यवसाय होता. त्यांचे चिरंजीव मोरोपंत. मोरोपंतांचा जन्म कोकणात झाला. त्यांचा जन्म दिनांक १३.१०.१८६१ हा आहे. वडील सरकारी नोकरीच्या निमित्ताने इ.१८६८ मध्ये उमरावतीस आले. त्यावेळी मोरोपंतांचे वय सात वर्षे होते. १८७८ मध्ये ते मॅट्रिक उत्तीर्ण झाले. त्यांना संस्कृतात क्लेअर पारितोषिक प्राप्त झाले. पुढे उच्च शिक्षणासाठी पुण्याला डेक्कन महाविद्यालयात गेले. तेथून पुढे मुंबईला एल्फिन्स्टन महाविद्यालयात गेले. इ.१८८३ साली काँग्रेसचे सहावे अधिवेशन इग्लंडला भरले. त्याला भारतातील प्रतिनिधी म्हणून मोरोपंत जोशी हे होते. तत्पूर्वी पासूनच त्यांचा काँग्रेसशी संबंध राहिला. अमरावतीला इ. १८९७ साली भरलेल्या काँग्रेसच्या स्वागत समितीचे सदस्य होते. रायफल क्लबचे सदस्यहि होते. व आत्मरक्षणार्थ बंदूक चालविण्याचे शिक्षण तरुणांना देत असत. इ. १९१४ साली पुणे येथे भरलेल्या तिसऱ्या सामाजिक परिषदेचे ते अध्यक्ष होते. नंतर नागपूरला इ. १९१६ मध्ये झाले. अमरावती व नागपूर मध्ये उत्कृष्ट वकील म्हणून त्यांनी नाव कमावले. पुरोगामी व सुधारणावादी होते. बालविवाह प्रथेविरुध्द ते प्रचार करीत. इ. १९२० मध्ये ते मध्य प्रांत वऱ्हाड प्रांत शासनात गृहमंत्री बनले. ज्याला गृहमंत्री पद मिळू शकले असे ते पहिले भारतीय होते. त्यांनी प्रशासनात अनेक सुधारणा घडविल्या. यामुळे त्यांना 'सर' हा किताब प्रदान

करण्यात आला. इ. १९२३ साली ही पदवी त्यांना प्राप्त झाली. इ. १९२४ मध्ये उदारमतवादी (मवाळ गट) पक्षाची परिषद आकोला येथे भरली. तिचे ते अध्यक्ष होते. तसेच कलकत्ता येथे इ. १९२६ मध्ये भरलेल्या परिषदेचेहि अध्यक्ष होते. येथे कलकत्त्याला त्यांना पदवीय पदक बहाल करण्यात आले. इ.१९२८ मध्ये संमति व यांच्या बिलावर विचार करण्यासाठी त्यांच्या अध्यक्षतेखाली जोशी समिती नेमण्यात आली होती. या समितीच्या शिफारशीवरुन पुढे शारदा कायदा अमलात आल. इ. १९३७ मध्ये ते सांगलीचे दिवाण नेमले गेले. त्यांच्या उत्तम प्रशासनामुळे सांगली उत्कृष्ट लोकप्रिय संस्थान बनले होते. सांगली संस्थानात त्यांनी अनेक सुधारणा घडवून आणल्या. इ. १९६२ मध्ये वर्ष प्रतिदेच्या दिवशी पुणे येथे त्यांचा देहान्त झाला. इ. १८९७ च्या अमरावती येथील काँग्रेसच्या अधिवेशनाचा मंडप त्यांच्या अंगणात उभारण्यात आला होता. त्यांच्या पत्नि सौ.यशोदाबाई यांना 'लेडी' किताब प्रदान करण्यात आला होता. त्यांनी 'माझा जीवन प्रवास' हे आत्मचरित्र लिहिले आहे. त्यांना सर ही पदवी होती व पत्नीला लेडी पदवी दिली तरी त्यांचा पोषाख मात्र सभ्य भारतीय पध्दतीचा होता. व त्यांच्या डोक्यावर नेहमी फेटा असे. त्यांच्या सौम्य स्वभावामुळे सरकारी अधिकाऱ्यांना ते आवडत असत. सरकार दरबारात असलेल्या मनाचा लाभ घेऊन त्यांनी अगणित सुधारणा घडवून आणल्या.

कै. श्री. बळवंतराव खोत

कै. श्री. डॉ.गोविंदराव खोत

इ.स. १८८७ च्या, मद्रास येथे भरलेल्या इंडियन नॅशनल काँग्रेसचे अधिवेशनाला वऱ्हाड सार्वजनिक सभे तर्फे जे सात प्रतिनिधि पाठविण्यात आले होते त्यात अमरावतीचे श्री.रंगनाथ नरसिंह मुधोळकर वकील, श्री. मोरो विश्वनाथ जोशी वकील आणि श्री. बळवंत व्यंकोजी खोत हे कापूस धंद्यातील तज्ञ गृहस्थ असे तीन प्रतिनिधि होते. पैकी श्री. मुधोळकर व श्री. जोशी हे प्रख्यात आहेत. श्री. खोत यांची थोडक्यात माहिती अशी-

श्री. बळवंतराव खोत यांचे मूळ घराणे बेळगावचे. त्यांचे वडील श्री. व्यंकोजी

खोत हे शेतकरी कुटुंबातील होते व कलकत्त्याचे भागात कामा निमित्त रहात असत. तेथेच श्री. बळवंतराव हे कॉटन एक्सपर्ट म्हणून काम करीत असत. बळवंतराव यांना आणखी सात बंधू होते.

इ.स. १८८२ साली श्री. बळवंतराव खोत हे अमरावतीला वॉलकर्ट कंपनीत कॉटन एक्सपर्ट म्हणून आले व येथेच स्थाईक झालेत. श्री. मुधोळकर व श्री. मोरोपंत जोशी यांचे सोबत ते येथे सार्वजनिक क्षेत्रात सहकारी म्हणून काम करीत असत असे दिसते. इ.स. १८८४-८५ साली त्यांची नियुक्ती अमरावती नगरपालिकेचे सभासद म्हणून झाली होती आणि ती १८८८-८९ पावेतो चालू होती. नंतर ते १८८९ च्या म्यु. निवडणूकीत ईस्ट वार्डातून निवडूनही आले होते व १८९१-९२ पावेतो नगरपालिकेचे सभासद होते, हे नगरपालिकेच्या तत्कालीन प्रोसिडिंग बुकावरुन दिसून येते व वऱ्हाडात काँग्रेस स्थापनेच्या सुरुवातीच्या काळात जी मंडळी काँग्रेसचे कार्य करणारी होती त्यात श्री. बळवंतराव खोत हेही होते. त्यांचे बंधू अमरावतीचे पहिले ॲलो पॅथीचे डॉक्टर, नगरपालिकेचे सभासद व नगरातील एक सन्माननीय नागरिक होते. ते सुरुवातीला रतलामच्या महाराजाचे डॉक्टर होते. स्वभाव अत्यंत स्वाभिमानी. महाराजांनी एकदा तेथील सिव्हिल सर्जनचा सल्ला घेतला तेव्हा आपलेवर महाराजांचा विश्वास नाही असे म्हणून डां. गोविंदराव खोत यांनी रतलाम सोडले व ते इ.स. १८९०-९१ च्या सुमारात अमरावतीला येऊन, त्यांनी भुसारी गेट रोडवर (हल्ली जवाहर रोड) आपला, अमरावतीतील पहिला ॲलापॅथीचा दवाखाना उघडला. अमरावतीचे ते पहिले ॲलापॅथीक डॉक्टर होते. पुढे सन १८९३-९४ पासून तेही अमरावती नगरपालिकेचे काही वर्षे लोकनियुक्त सभासद होते. त्यांना भारताचे व्हॉईसराय व गव्हर्नर जनरल यांनी २१ मे १८९८ रोजी ''रावसाहेब'' हा किताब दिला होता.

अमरावतीचे मुख्य बाजार रोडवर असलेले खोत कंपौन्ड, ही जागा डॉ. गाविंदराव खोत यांनी इ.स. १८८९ मध्ये विकत घेतली. डॉ. गोविंदराव खोत हे १९०१ साली दिवंगत झाले.

पुढे त्यांचे पुत्र डॉ. शंकर गोविंद खोत, नातू, डॉ. निळकंठ शंकर खोत व सुन डॉ.

सौ. लीलाबाई खोत आणि पणतू डॉ. प्रकाश निळकंठ खोत अशी तीन-चार पिढयांची आरोग्य क्षेत्रातील सेवेची परंपरा या खोत घराण्याला लाभली आहे.

डॉ. प्रकाश खोत हे तल्लख बुध्दीचे तरुण एम.बी.बी.एस. (नागपूर), एफ.आर.सी.एस. (इंग्लंड व रर्डिबरो), व एफ.आय.सी.एस. (यूएसए) ह्या पदव्यांना विभूषित असून, सध्या परदेशात आहेत. ते निर्व्यसनी आणि देशाबद्दल प्रेम बाळगणारे तरुण असून, आपल्या विद्येचा लाभ देशवासीयांना मिळावा म्हणून १९८४ मध्ये, त्यांनी नागपूरला आपले सुसज्ज असे हॉस्पिटल सुरु केले आहे.

हल्ली त्यांचा कंसल्टिंग रुम, अमेरिकेतील शिकागो नजीकच्या मेल्सबर्न येथे असून,तेथील काही हॉस्पिटलचे ऑनररी डॉक्टर व तेथील नगरपालिकेचे डायरेक्टर ही आहेत.

अमरावतीची हमालपूरा व गांधी नगर या नावाने ओळखल्या जाणारी वस्तीची जमीन (३६ एकर) श्री. बळवंतराव खोत यांची होती. पूर्वी अमरावतीतील काही झोपड्या आग लागून भस्मसात झाल्या होत्या व अनेक कुटुंबे निराधार झाली होती. त्यांना बळवंतरावांनी आपल्या या शेताचे काही भागावर वस्तीसाठी जागा दिली तोच हमालपुरा. हा हमालपुऱ्याचा भाग काही वर्षापूर्वी या खोत कुटुंबाने डॉ. पटवर्धन यांच्या जगदंबा कुष्ठ निवासास दान दिला. उरलेल्या भागापैकी आठ एकर जमीन कै. नानासाहेब गोखले यांच्या न्यू बेरार एज्युकेशन सोसायटीला विकत दिली. तेथे न्यू हायस्कूलच्या बेलपुरा शाखेची इमारत असून, विद्यादानाचे पवित्र कार्य तेथे सुरु आहे. त्यानंतर जी जमीन शिल्लक होती. तेथे गांधीनगर ही वस्ती उभी झाली, इमारती लाकडाच्या वखारी फर्निचरचे कारखाने आणि सॉ मिलस् येथे आहेत.

अमरावतीला जुनी मातब्बर अशी जी काही घराणी आहेत त्यांतील खोताचे हे घराणे असून गेली १०० वर्षे हे घराणे अमरावतीत नांदत आहे.

(डॉ. निळकंठराव खोत यांचे मुलाखतीवर तसेच म्यु. रेकार्ड आणि वऱ्हाडसमाचारचे सबंधित अंक यावर आधारित.)

दिवाण बहादुर के.वा.उर्फ नानासाहेब ब्रम्ह: (जन्म १५ फेब्रु. १८७८):

शेगाव, खामगांव, उमरावती, पुणे आणि मुंबई येथे शिक्षण घेऊन इ. स. १९०२ मध्ये बी.ए.एल.एल.बी. झालेत व १९०३ साली उमरावतीला वकील सुरु केली. पुढे १९०७-८ साली नगरपालिकेचे सभासद व कित्येक वर्षो उपाध्यक्ष राहिले. जिल्हा बोर्डाचेहि सभासद व उपाध्यक्ष होते. इ.स. १९१४ साली सरकारने त्यांना रावसाहेब ही पदवी दिली नंतर दिवाण बहादूर ही पदवी १९२१ मध्ये सरकारने त्यांना दिली होती. इ.स. १९२१ मध्येच सरकारने त्यांना मध्यप्रांत-वऱ्हाड कायदे मंडळाचे सभासद नेमले. अमरावतीच्या बेरार-को.ऑ.इन्स्ट्यूट या उपयुक्त संस्थेची त्यांनीच स्थापना केली आहे. राजकारणात मवाळांचे ते नेते होते.

इ.स. १९१० साली किंग एडवर्ड बादशहा वारले तेव्हा त्यांचे अमरावतीत स्मारक उभाराचे म्हणून खटपट सुरु झाली. त्यावेळी श्री. नानासाहेब उमरावती नगर पालिकेचे उपाध्यक्ष होते. स्मारकासाठी निधी जमा करण्याची जबाबदारी नानासाहेबांवर पडली व त्यांनीही आपली कसोटी समजून अल्पावधीत दोन लक्ष रुपयांचा निधी जमविला.

हाय स्कूल हे त्यांच्याच प्रयत्नाने अमरावतीत सुरु झाले. शिवाय १९२१ साली कारोनेशन फंड जमा झाला होतो. त्यातुन खर्च वजा जाता जी रक्कम शिल्लक राहिली त्या रकमेतूनच त्यांनीच नेकोलेट पार्कमध्ये एका टोकाला ''कारोनेशन गार्डन''.(हल्लीचा कस्तुरबा गार्डन) हा सुंदर बगीचा शहराच्या मध्यभागी तयार करविला त्यांना कित्येक सार्वजनिक संस्थेशी संबंध होता. इ.स.१९३८ ते १९४१ या काळात त्यांनी दिवाणपद स्वीकारले होते. इ.स. १९११ साली त्यांनी वकील लाईनमध्ये घर बांधले. त्यांचा मृत्यु दि. ११-४-१९५० रोजी झाला.

श्री. भाऊसाहेब असनारे यांचे अमरावतीतील कार्य.

दि. १८ जाने.१९२० रोजी उमरावतीच्या स्वराज्य संघ शाखेच्या विद्यमान राष्ट्रीय सभेचे महत्व सांगण्याकरता वीर मामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली डॉ. वऱ्हाड पांडे व श्री. भाऊसाहेब असनारे यांची भाषणे झाली.

श्री. भाऊसाहेब असनारे जहाल गटातील होते. श्री. मोरोपंत जोशी यांचे एक भाषण गणेश थिएटर मध्ये झाले. त्याला प्रत्युत्तर देण्यासाठी श्री. भाऊसाहेब असनारे यांच्या अध्यक्षतेखाली रा. बाबासाहेब खापर्डे यांचे भाषण झाले. नंतर श्री. दादासाहेब शेवडे वकील, बॅ. पुणतांबेकर यांची भाषणे झाली. सभेचा समारोप श्री. भाऊसाहेब असणारे वकील यांनी केला.

दि. १३ एप्रिल १९२० रोजी जालियनवाला बाग स्मारक समितच्या वतीने शोक दिनाची सभा श्री. भाऊसाहेब असनारे वकील यांचे मुख्य भाषण झाले. अध्यक्ष श्री. बाबासाहेब खापर्डे हे होते.

त्यानंतर दि. १६ एप्रिल रोजी सक्करसाथ राम मंदिर समोर राष्ट्रीय समाहा प्रीत्यर्थ जाहीर सभा झाली. त्यात श्री. भाऊसाहेब असनारे वकील यांचे भाषण झाले.
स्वराज्य संघाच्या पाचव्या सर्धापन दिनी दि. ८ मे १९२० रोजी जेग चौकात श्री. भाऊसाहेब असनारे वकील यांचे जाहीर भाषण झाले. त्यांनी काँग्रेस लोकशाही पक्षाचा जाहीरनामा वाचून दाखविला. व अनुमति मागणारा ठराव मांडला. श्री. वामनरावदादा जोशी यांनी अनुमोदनपर भाषण केल. व ठराव पारित झाला.

जालियनवाला बागेत इंग्रज अधिकाऱ्यांनी नि:शस्त्र जनतेवर गोळीबार केला. त्याच्या निषेधार्थ अमरावतीत जालियनवाल बाग सप्ताह संपन्न झाला. शेवटच्या दिवशी दादासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली निषेध सभा भरली. श्री. भाऊसाहेब असनारे यांनी निषेध प्रस्ताव मांडला. व रौलट बिलाचा निषेध केला. श्री. दादासाहेब शेवडे वकील यांनी ठरावास अनुमोदन दिले. व ठराव पारित झाला.

दि. २४ जून १९२० रोजी जोग चौकात हंटर कमिटीच्या अहवालाचा निषेध करण्यासाठी श्री. दादासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली सभा झाली. इंग्रजांनी आपल्या राज्यात कसे जुलमी कायदे आणले आहेत, ह्याचा तपशील अध्यक्षांनी सांगितला. नंतर, हंटर कमिटी रिपार्टच्या निषेधाचा ठराव श्री. भाऊसाहेब असनारे यांनी मांडला. व त्यावर भाष्य केले. श्री. दादासाहेब शेवडे यांनी अनुमादन दिल्यावर ठराव पारित झाला.

कलकत्त्याच्या चिकनी नामक वृत्तपत्राने हिंदू विधवांच्या चारित्र्या विषयी केलेल्या अन्याय्य विधानांचा निषेध करण्याकरता नागरिकांची जाहीर सभा दादासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली भरली. सभेत श्री. भाऊसाहेब असनारे यांचे प्रभावी भाषण झाले.

लोकमान्यांच्या निधनाचे वृत्त येताच अमरावतीत अनेक शोकसभा झाल्या. बुधवारा चौकातील सभेचे अध्यक्ष श्री. भाऊसाहेब असनारे हे होते. दि १८-८-१९२० रोजी स्वराज्य संघाची अमरावती शाखेची निवडणूक झाली. अध्यक्ष म्हणून श्री. भाऊसाहेब असनारे निवडून आले.

२९ ऑक्टो.१९२० रोजी मजूर संघाचे विद्यमाने मजूरांचे कर्तव्य या विषयावर रा.बाबासाहेब खापर्डे चांचे भाषण झाले. अध्यक्षस्थानी श्री. भाऊसाहेब असनारे होते. त्यांचेहि विचार परिप्लुत भाषण झाले व नोव्हें. १९२० रोजी भाऊसाहेब असनारे यांच्या अध्यक्षतेखाली टेरेन्स मॅक्स्कीनी यांच्या निधना प्रीत्यर्थ जाहीर शोक सभा झाली. गांधीजींच्या असहकार आंदोलनाने सरकारी कोर्टावर बहिष्कार पुकारला होता. त्यामुळे दिवाणी स्वरुपाचे दावे खाजगी रीतीने सोडवण्याकरिता लवाद नेमण्यात आले. त्यात श्री. भाऊसाहेब असनारे अध्यक्ष होते त्या लवादा मार्फत जे खटले सुनावणीस निघाले त्यापैकी दोन मुकदम्यात त्यांनी समाधानकारक निकाल लावून दिला. त्यामुळे पक्षकारांची पुष्कळ आर्थिक बचत झाली.

दि. २८-३-१९२१ रोजी वीर वामनराव दादा जोशी यांना अकोला येथे अटक झाली. तेव्हा श्री. भाऊसाहेब असनारे यांचे भाषण झाले.

१९२१ मध्ये अनत्याचारी असहकारितेची चळवळ झाली, त्यात न्यायालयांवर बहिष्कार घालणाऱ्या वकीलांच्या यादीत श्री. बाबासाहेब खापर्डे व भाऊसाहेब असनारे यांचा समावेश आहे. ब्रम्हविद्या मंदिरात जगत्गुरु श्री. शंकराचार्य यांचे आगमन झाले. त्यावेळी श्री. भाऊसाहेब असनारे यांचे स्वागतपर भाषण झाले होते.

दि. १८ जाने.१९२२ रोजी दारुच्या गुत्यावर पिकेटिंग झाले त्यात भाऊसाहेब असनारे हि सहभागी झाले होते. दि.२७ एप्रिल १९२२ रोजी भाऊसाहेब असनारे यांचा

देहांत झाला. भाऊसाहेब असनारे यांचे वैशिष्ट्य हे की त्यांनी मराठी नाटके अमरावतीत प्रथम सुरु केली. संगीत कलावंतांना आश्रय दिला. दि. ९-११-१९७५ च्या रविवार ची लोकसत्ता अंकात अग्रलेख आहे. त्यात श्री. भाऊसाहेब यांचा गौरव करण्यात आला आहे.

भाऊसाहेब असनारे :

''विदर्भाची नाट्य परंपरा'' असा एक लेख आहे. त्यातील एक परिच्छेद पहा. अमरावती हे ब्रिटीश राजवटीतच भरभराटीस आलेले शहर ह्या शहराची नाट्य परंपरा अखिल महाराष्ट्रात मान मान्यता पावली आहे. पण फारच थोड्या लोकांना हे ठाऊक आहे. ह्या परंपरेचे मूळ पुरुष जयराम श्रीकृष्ण उर्फ भाऊसाहेब असनारे हे होत. हे प्रकांड पंडित होत. वैष्णव संप्रदायाचे उपाध्यक्ष होते. श्रीमंत दादासाहेब खापर्डे यांची छोटी प्रतिमा म्हणूनच लोक त्यांना ओळखत. ह्या कट्टर टिळक भक्ताने 'मुद्राराक्षस' ह्या राजकीय संस्कृत नाटकाचे जे भाषांतर केले ते तात्कालीन ब्रिटिश सरकारने जप्त केले होते. भाऊसाहेबां पासूनच वीर वामनराव जोशी, नानासाहेब बामणगावकर इ. अमरावतीच्या नाटककारांनी स्फूर्ती घेतली.(रविवारची लोकसत्ता दि. ९-११-१९७५ वरुन) 'तरुण भारत' (मध्यमा दि. २३-११-१९८३) च्या एका लेखातील एक उतारा पहा.

संगीताच्या क्षेत्रात अमरावतीच्या काही घराण्यांनी बजावलेली कामगिरी अत्यंत मोलाची. आमच्या पिढीने ह्या घराण्यांचे खरोखरच आभार मानायला हवेत. आज अमरावती संगीत कलोपासक सभेसारखी सुसंघटित संस्था येथे जी पाय रोवून उभी आहे त्याचे खरे श्रेय या जुन्या घराण्यांना आहे. पूर्वीच्या वाडा संस्कृतीतल्या मौलाबक्ष घराण्यापासून अमरावतीच्या रसिकतेचा शुभारंभ होतो. भाऊसाहेब असनारे, दादासाहेब खापर्डे, अण्णा खोत, केशवराव भोळे , हिर्लेकर वैद्य, कृष्णराव रावळे यांनी संगीत श्रवणाला संगीत स्वरुप दिले.

अमरावतीचा इतिहास (खंड १ व २) च्या पृष्ठ ४५५. भाऊसाहेब असनारे यांच्या दु:खद निधनाची वार्ता दिल्यावर त्यांच्या विषयी पुढील मजकूर दिला आहे. त्याची पुनरावृत्ती करतो.

दि. २७ एप्रिल १९२२ रोजी श्री. जयराम केशव उर्फ भाऊसाहेब असनारे यांचे अनपेक्षितपणे निधन झाले. त्याकाळी गावातील जी प्रमुख अशी पुढारी मंडळी होती त्यात भाऊसाहेबांची गणना होत असे. श्री. बाबासाहेब खापर्डे, वीर वामनराव दादा जोशी, यांचे सोबत भाऊसाहेब खापर्डे हे राजकराणात भाग घेत असत. इ. १९२१ च्या न्यायालयांवरील बहिष्कार मोहिमेत, ज्या वकीलांनी आपली वकीली तहकूब केली होती, त्यात भाऊसाहेब असनारे होते, कोर्टावरील बहिष्कार यशस्वी करण्याकरिता त्यावेळी काँग्रेस तर्फे कोर्टाचा स्वावलंबी लवाद असा प्रयोग करण्यात आला होता. त्यात भाऊसाहेब असनारे यांनी मोलाचे कार्य केले. त्याबाबत त्यांचे लेख व कार्याचा अहवाल त्याकाळच्या स्थानिक उदय मधून प्रसिध्द झालेला होता. विदेशी वस्तूंवरील बहिष्कार व मद्यपान विरोधी चळवतीतही त्यांनी भाग घेतला होता. याप्रमाणे राष्ट्रीय आंदोलनाशी ते संबंधित होते.

कै. दादासाहेब खापर्डे यांच्या बैठकीत भाऊसाहेब असनारे नसले तर ती बैठक रंगायची नाही. स्मॉल कॉज कोर्टात तर भाऊसाहेब कोण्यातरी एका पक्षकाराकडून असायचेच. त्यामुळे त्यांची प्राप्ति उत्तम होती. व खर्च खापडर्यांसारखा होता त्यामुळे त्यांना छोटे खापर्डे म्हणत असत. वेदान्ताचा त्यांचा व्यासंग दांडगा होता. टेनिस उत्तम खेळत. सर्वांशी गोड वागत. त्यामुळे ते लोकप्रिय होते. त्यांच्या स्वभावात विनोदाची लकेर होती.

त्यांनी लिहिलेले 'हिंदुस्थानचा व्यापार' हे पुस्तक 'उदय' माले तर्फे प्रसिध्द झाले होते. शिवाय रासक्रीडेचे आध्यात्मिक स्वरुप व इतर काही वंदान्तावरील पुस्तकेही त्यांनी लिहून प्रसिध्द केली होती. भाऊसाहेबांच्या निधनाने उमरावतीकरांना अती दु:ख झाले. सार्वजनिक आणि राजकीय क्षेत्रातील एक महत्वाचा कार्यकर्ता हरवल्या गेला.

कै. दादासाहेब खापर्डे यांचे त्रोटक चरित्र

कै. गणेश श्रीकृष्ण उपाख्य दादासाहेब खापर्डे यांचा जन्म हिंगोली (जि.नांदेड) येथे शके १७७६ च्या चतुर्थीच्या दिवशी झाला. (इ.स. १८५४) अमरावती, अकोला व

नागपूर येथे त्यांचे प्राथमिक व शालेय शिक्षण झाले. मुंबईच्या एलफिस्टन महाविद्यालयातून त्यांनी विधी शाखेची पदवी मिळविली व एक्स्ट्रा कमिश्नर म्हणून सरकारी नौकरीत रुजू झाले. इ.स. १८८४ ते ८९ या काळात यांनी ही नौकरी केली व नौकरी सोडून वकीलीचा व्यवसाय सुरु केला व त्या व्यवसायात बरीच प्राप्ती त्यांना झाली.

त्यांनी सामाजिक कार्यात भाग घेण्यास सुरुवात केली व लवकरच नगर पालिकेचे उपाध्यक्ष म्हणून निवडून आले. तसेच इ.१८८९ ते १९०७ पर्यंत जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्ष होते. इ.स. १८९२ च्या नागपूर प्रांतीय सामाजिक परिषदेचे अध्यक्ष निवडले गेले. इ.स. १८९७ साली अमरावतीस भरलेल्या काँग्रेस अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष होते. सरदार बाबा महाराजांनी नेमलेल्या ट्रस्ट मध्ये सदस्य असल्यामुळे ते लोकमान्य टिळकांचे निष्ठावंत सहकारी झाले. पुढे ते टिळक पथाचे तत्ववेत्ते, प्रवाचक, प्रचारक व प्रमुख बनले. इ.स. १९०७ ची सूरत काँग्रेस त्यांच्या तडफदार वक्तृत्वामुळे टिळक पक्षाच्या ताब्यात आली. लोकमान्य टिळकांना शिक्षा झाल्यावर थेट इंग्लंडला जाऊन त्यांच्या सुटकेविषयी दादासाहेबांनी आटोकात प्रयत्न केले. माँटेग्यू सुधारणांच्या संदर्भात ते होमरुल लीगचे प्रतिनिधी म्हणून इंग्लंडला गेले होते. तेथे निरनिराळ्या विषयावर दिलेल्या वक्तृत्वपूर्ण व कोटिक्रमयुक्त भाषणांमुळे त्यांना ''भारताचे मार्क ट्वेन'' हा किताब तेथील जनतेने स्वयंस्फूर्तीने दिला. इ.स. १९१६ साली बेळगावला स्वराज्य पक्षाची स्थापना त्यांच्या अध्यक्षतेखाली झाली.

ते इ.स. १९१८ ते १९३३ पर्यंत व्हाईसराय यांच्या कौसिल ऑफ स्टेट चे सदस्य निवडले गेले होते. विद्वत्ता, रसिकता, वाक्पटूत्व, अभिनय पटूत्व, वगैरे गुणामुळे आणि जबाबदार व्यक्तीमत्वामुळे ते कोठेही आपली छाप पाडू शकत असत. माँटेग्यू कमिशन समोर त्यांनी फार महत्वाची साक्ष दिली. आजच्या संसदेचे कल्पना चित्र त्यांनी त्या कमिशन समोरील साक्षीत मांडले होते.

त्यांनी लिहिलेल्या कित्येक ग्रंथाच्या प्रस्तावना व विविध वृत्तपत्रीय लेख फार गाजले होते. वैदिक ग्रंथाचे त्याचे विशाल अध्ययन होते. लोकमान्यांच्या मृत्युनंतर ही ते अखेरपर्यंत टिळक पक्षाचेच राहिले.



श्रीमंत गणेश श्रीकृष्ण (दादासाहेब) खापर्डे



सौ. लक्ष्मीबाई खापर्डे

दि. १ जुलै इ.स. १९३८ रोजी वयाच्या ८४ व्या वर्षी त्यांचे देहावसान झाले. त्यांनी नाटकात अनेक भूमिका केल्या होत्या तसेच अनेक नाटकांचे दिग्दर्शनही केल्याचे उल्लेख सापडतात. इ.स. १९०५ च्या पहिल्या नाटय संम्मेलनाचे ते अध्यक्ष होते (शिक्षण) कवि, ''स्वधर्म'' इ. विषयावरील त्यांची व्याख्याने अजूनही संदर्भासाठी वापरतात. गुजराथी उर्दू, संस्कृत, इंग्रजी, बंगाली या भाषांतून भाषणे देण्याइतके प्रभुत्व त्यांनी संपादन केले होते. त्यांच्या वैभवशाली राहणीमुळे लोक त्यांना नबाब म्हणत असत. श्री. शंकराचार्य डॉ. कुर्तकोटी यांनी त्यांना ''भारतरत्न'' ही पदवी दिली होती. त्या काळात अमरावतीतील सर्व प्रकारच्या सार्वजनिक संस्थशी संबंध राहिला. अगणित क्रांतीकारकांना त्यांनी फार मोलाचे सहाय्य व सहकार्य दिले. त्यांच्या वकीलीच्या सखोल ज्ञानामुळे ब्रिटीश सरकारला कित्येक कायदे बदलावे लागले. स्वा. सावरकर, चाफेकर, भिडे गुरुजी, रंगनाथ तिखे, वगैरे लोकांना अडीअडचणीत सहाय्य दिले. काँग्रेस मधील जहाल गटाचा पाया त्यांनी घातला. गांधीवादातील राजकीय अव्यवहार्यता मान्य नसल्यामुळे त्यांनी अखेरपर्यंत विरोध केला. जहालांनी त्यांना ''मवाळ'' समजावे, तर मवाळ त्यांना ''जहाल'' समजत. अशा समतोल राजकीय विचारांचे ते होते. थिऑसॉफीचा त्यांचा व्यासंग सखोल होता.व ते अमरावतीच्या श्रीकृष्ण थिऑसॉफिकल लॉज चे संस्थापक होते. नेपाळच्या शस्त्र कारखान्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला व बरेच पैसे सहाय्यार्थ दिले होते. अनेक कलाकारांना उदार आश्रय दिला. कै. नारायणराव राजहंस (बालगंधर्व) यांच्या बालपणी त्यांना शास्त्रीय संगीताचे प्राथमिक स्वरुपाचे शिक्षण देण्यासाठी त्यांनी पं. नामदेवबुवा, पं. नथ्थूबुवा यांना स्वखर्चाने नेमले होते. काँग्रेसच्या अधिवेशनास ते उपस्थित असतांना बैठकी घेत, त्या बैठकींना ''खापर्डे कॉन्फरन्स'' संबोधण्यात येत असे. असंख्य थोर-थोर साधुसंताशी त्यांचा निकटचा संबंध होता. इ.स. १८९६ व इ.स. १९०० च्या दुष्काळाच्या वेळी त्यांनी घरीच खुले अन्नछत्र चालू केले.

बील ऑफ राईटस् हक्कांचा कायदा. २८-१२-१९१८

कै.ग.श्री. (दादासाहेब) खापर्डे यांचे ठरावावरील भाषण.

बंधूनो व भगिनींनो।

हा फार मोठा ठराव आहे हे सर्वांना कळलेच आहे. मी त्यातील एका भागावर बोलणार असून उवृरित मुद्दे पुढील वक्त्यांच्या करीता सोडून देतो. मी बिल आंफ राईटस् किंवा पेटीशन ऑफ राईटस् म्हणजे काय तेवढे सांगणार आहे. मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे असे म्हणतात.

(श्रोत्यांचे "मराठी, मराठी, हिंदी" उर्दू , असे ध्वनि) इंग्लिश वगैर भाषेतून बोलण्यास लोक सांगत आहेत. हे सर्व एकदम करता येणे कठीण आहे. पण यावरुन मी बालपणी शिकलेल्या एका सर्व भाषिक श्लोकाची आठवण येते.

(यानंतर एक श्लोक व श्रोत्यांचा प्रचंड हास्यध्वनि.)

अनेक विध करणांकरीता पूर्वनियोजित ठरल्याप्रमाणे मला इंग्रजीतून भाषण करावयाचे आहे. हया विषयाशी संबंधित ज्या तांत्रिक स्वरुपाच्या संज्ञा येतील त्या इंग्रजीतून विषद करणे सुलभ होणार आहे. शक्य तेवढे आपल्या भाषेत त्यांचा अर्थ सांगेन

हा विषय आपल्या व्यासपीठावर चर्चेस्तव मागील वर्षीपासून आला व त्याला मुख्यत: श्री राघवचारियर यांचे परिश्रम कारणीभूत झाले आहेत. हा सध्याच्या राजकारणातील एक मैलाचा दगड किंवा पाया आहे. तुम्ही मागत असलेल्या सर्व सुधारणा तुम्हाला लाभल्या तरी मी पुढे सांगणार असलेली गोष्ट जर न मिळाली तर सगळेच व्यर्थ होणार आहे. तुम्हाला भूक लागली आहे. तुम्ही अन्न मागत आहात. तुम्हाला अन्न वगैरे देण्यात आले. पण तुमचे हात बांधून ठेवले आहे व तोंड बांधून ठेवले आहे तर त्या अन्नाचा काय उपयोग? तुम्हाला बाहेर जावयाचे आहे, तुम्ही तयारी पूर्ण केली. तुम्हाला घोडा मिळाला. पण तुमचे पाय मात्र बांधले आहेत. तर कशी सवारी करणार? म्हणून मी सांगितले की, ज्या चार पाच गोष्टी मी मांडणार आहे, त्या मिळाल्या नाहीत तर ह्या सुधारणा व्यर्थ होणार आहेत.

सध्या जगभर एक लाट उसळली आहे. समुद्रात, हवेत, ईथर द्रव्यात लाटा असतात, तशा विचारांच्या लाटाही असतात. हल्ली साऱ्या जगभर लोकशाहीची लाट उसळली आहे.

(श्रोत्यांचा हर्षध्वनि. टाळ्या.) हुकूमशाही कालबाह्य झालेली आहे. ऑलीगॅर्की देखील कालबाह्य मानली जात आहे. हल्लीची महत्वाकांक्षा लोकशाहीशी निगडित आहे. जगतातील सध्याचा सर्वात आकर्षक शब्द लोकशाही हा आहे. लोकशाहीसाठी काही गोष्टींची फारच आवश्यकता असते. मनुष्य विशाल समुदायात राहतो. तो एकटा राहू शकत नाही. वाघ एकटा राहू शकेल. मनुष्य नाही. जर मनुष्य समुदायात राहतो तर पहिली गोष्ट त्याला आवश्यक राहील ती म्हणजे भाषण स्वातंत्र्य. तो बोलणारच नाही किंवा त्याच्या डोक्यावर सतत टांगती तलवार असेत तर तो कसे बोलू शकेल? अशा स्थितीत विचारांचे आदानप्रदान कसे होणार? ते नसेल तर मैत्री कशी उत्पन्न होईल? मैत्रीच नसेल तर सहचर्य कसे संभवेल? संघटन कुणाशी करावयाचे? साहचर्य नसेल तर नियमावली, कायदे वगैर निर्माण होणार नाहीत. समाजात जर नियम, कायदे व्यवस्था नसेल तर समाज टिकणारच नाही. समाज विघटित होईल. म्हणून भाषण स्वातंत्र्य अत्यंत आवश्यक आहे.

दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे संघटनाचे स्वातंत्र्य. याचा अर्थ असा की, मला ज्या लोकांच्यात जाऊन मिळणे योग्य वाटते तेथे मी जाऊ शकलो पाहिजे व योग्य रीतीने त्यांच्यात मिसळू शकलो पाहिजे. मला कोणाशी मिसळून वागता येईल याचा अभ्यास करावयाचे स्वातंत्र्य असले पाहिजे. ज्यांचे व माझे जुळते असे कोण व कोणाकोणाशी माझे जुळत नाही, हे पाहण्याचा मला अधिकार मिळाला पाहिजे. त्यातूनच एक नवा सुद्रढ समाज उत्पन्न होईल अशा रीतीने ज्या भारतात आपण राहतो तो भारत विविध समुदायांच्या संघटनांनी व्याप्त होऊन जाईल. हे समुदाय, गट किंवा संघटना अभ्यासपूर्वक आपसातील सामाईक घटक शोधतील, त्या आधारावर एकत्र येण्याचे राष्ट्रीय धोरण ठरवती, व ज्याबाबत काही ठरविता आले नाही, त्या गोष्टी ते स्वत:पुरत्याच मानतील व ह्या पध्दतीने ते आपले राजकीय जीवन आखतील. हे घडणे अत्यंत आवश्यक आहे.

आपल्या हृदयातील गोष्टी आपण एकत्र येऊन चर्चिल्या नाहीत तर आपण प्रगतिकारक समाज कसा स्थापन करु शकू? ह्या जगात आपले अस्तित्व कायम रहावे म्हणून, ह्या जगताबरोबर आपली प्रगति व्हावी म्हणून, ह्या जगात आपले स्थान कायम रहावे म्हणून, आपण योग्य रीतीने, योग्य वेळी, योग्य पध्दतीने एकत्र येण्यास शिकले पाहिजे व तसे करण्याचे आपल्याला स्वातंत्र असले पाहिजे.

तिसरी तेवढीच महत्वाची गोष्ट म्हणजे मुद्रण स्वातंत्र्य. येथे जे घडले, मी जे जे सांगितले, तुम्ही जे काही बोलाल, आपला जो काही विचार असेल, आपले जे जे ठराव होतील, त्या सर्वांचा वृत्तांत जगताच्या कानाकोपऱ्यात गेला पाहिजे, कारण की, आमचे समविचारी लोक जगतात ज्या कुठे असतील, आमच्या आकांक्षांशी समरस होऊ शकणारे लोक जिथे कुठे असतील, आमच्या मताप्रमाणेच मतांचे जे कोणी असतील, ते एकत्र संमीलित होऊ शकले पाहिजेत, व आपसातील सामाईक आदर्शाविषयी त्यांना निर्णय घेता यायला पाहिजे. हे असे मी म्हणतो ह्याचे कारण नुकतेच कलकत्त्याला मनाई हुकूम जारी झाला. एका वृत्तपत्राने एक परिच्छेद प्रकाशित केला होता. उपमा वगैरे अलंकार वापरुन त्यांनी एक जगप्रसिध्द मुस्लिम व्यक्तिचा विशिष्ट परिचय करुन दिला. बिचारे मुस्लिम बंधू. त्यांनी त्यांच्यातील विद्वान, श्रीमंत वगैरे मंडळींना एकत्र केले. त्यांना एका ठरावाद्वारे निषेध नोंदवून शासनाला असे निवेदन द्यावयाचे होते की, असा परिच्छेद छापल्या जावयास नको होता. ह्यात कोणाला काहीच इजा होणार नव्हती. पण त्यांना त्यापासून परावृत्त केले नसते, त्यांच्या मार्गात अडथळे आणले गेले नसते, तर घटना सुरळीतपणे घडल्या असत्या, ते कसा विचार करतात हे आम्हाला कळले असते. पण दुर्दैवाने बंगाल सरकारने त्यांना एकत्र येऊ दिले नाही व हस्तक्षेप केला. परिणाम काय झाला? ते तुम्हा सर्वांना ठाऊकच आहे, डोकी फुटली, हातपाय मोडले. बरेच लोक डॉक्टरांच्या व आता सरकारच्याही टेबलावर खितपत पडले आहेत. कायदेपंडित त्यांच्या शब्दांचे कीस पाडत बसले आहेत. त्यांना बंगाल सरकारने सभा भरवायला परवानगी दिली असती तर असा त्रास कुणालाच झाला नसता. संघटनेच्या स्वातंत्र्याचा एवढया करिताच मी पुरस्कार करतो.

त्याचप्रमाणे शस्त्रे बाळगण्याच्या स्वातंत्र्याचा पुरस्कार करतो. समजा वर्षभर अतोनात शेतात कष्ट करुन धान्य पिकविले व जनावरे येऊन धान्याची नासाडी करु लागले, तर त्यांना तुम्ही कसे घालवून देणार? तुम्ही एकटेच आहात व दहा हजार जनावरे शेतात घुसली तर तुम्ही काय करणार? एका माणसाला तर हे शक्यच नाही. तुम्ही रात्रभर जागत राहून प्रयत्न केला तरी दहा जनावरांना देखील बाहेर काढू शकणार नाही. यासाठी बंदूक, भाला, लाठी वगैरे यांची आवश्यकता अपरिहार्य आहे. समजा, तुम्हाला काही शस्त्र मिळाले. आता तुम्ही त्या प्राण्यांचा बंदोबस्त कसा करणार? इंडियन पीनल कोडचा कायदा म्हणतो की, प्रत्येकाला पिके, तुमचे शरीर, व ज्यात तुम्हाला तीव्र आवड आहे अशा वस्तूंचे संरक्षण करण्याचा अधिकार आहे. मला पिकांच्या मध्ये तीव्र आवड आहे. डुकरे माझी पिके खाण्यासाठी येतात आणि मी काय करावे? तुम्ही तर लाठीही देत नाही, भालाहि नाही बंदूकही देत नाही. मी डुकरांना कसे हाकलू? ते म्हणतात, वकिलांचा सल्ला घ्या. ठीक आहे. मी वकिलाकडे गेलो. तो म्हणतो, दावा दाखल करा, कोणाविरुध्द करु? डुकरंविरुध्द ! (सभेत हास्यांचा कल्लेळ) तुम्ही डुकरांविरुध्द समन्स काढा. ते ते समन्स स्वीकारणार नाही. ते कोर्टात येणार नाही. आणि मला रिलीफ मिळणार नाही (हास्यांचा प्रचंड कल्लोळ)

आता सांगा, तुम्ही काय कराल? हा दोष कुणाचा? सहा महिने कष्ट करुन वाढविलेले पीक बघता बघता डुकरे फस्त करुन टाकतील. माझे कुटूंब उपाशी तडफडत राहील. ते म्हणतात, तुम्हाला संरक्षणाचा अधिकार आहे. ठीक आहे. पण आर्म्स ॲक्टमुळे शस्त्रे बाळगण्यावर बंदी आहे. तुम्हाला एक उत्तम घोडा स्वारीसाठी द्यावा पण त्याचे खोगीर व लगाम काढून घेतले आहेत. त्याप्रमाणे हे आहे. तुम्हाला घोडा दिलाय. लगाम आणि खोगीर काढून घेतले आहेत. त्याचे काय करायचे ते करा. तर शस्त्र कायद्यात हा असा प्रचंड गोंधळ आहे. आत्मसंरक्षणासाठी शस्त्रे बाळगण्याची अत्यंत आवश्यकता आहे. स्वतंत्र देशात ती मिळतात देखील पटकन व स्वस्त. उदाहरणार्थ, इंग्लंडमधये पहा- पोस्ट ऑफीसमध्ये जा. १० शिलिंग भरा. तो तुम्हाला योग्य किंमतीत बंदूक, तरवार देतो, तशी अवस्था येथे हिंदुस्थानात उत्पन्न झाली पाहिजे. ह्यानंतर

पुढली महत्वाची गोष्ट म्हणजे मतस्वातंत्र्य. तुम्हाला समजा सभा घेण्याचे, बोलण्याचे, हत्यारे बाळगण्याचे स्वातंत्र्य मिळाले तरी एवढ्याने पूर्णता येत नाही. मत स्वातंत्र्य हवेच. आपले मत बाळगणाऱ्याला शिक्षा होता कामा नये. आपण माझ्या दुष्ट कृत्यांना शिक्षा करा, मग मी कितीहि सांगितले की, व्यक्तीच्या किंवा समाजाच्या हितासाठी मी अमुक कृत्य केले, पण न्यायाधीशाचे तसे मत नसेल तर पिनल कोड प्रमाणे मला शिक्षा द्या.

ह्या कायद्यात पहा. ह्या कायद्यात तीन महत्वाचे शब्द आहे. ''एक्स्टरमिटर, इंटरमेंट, आणि इंप्रिझनमेंट'' (हास्याचा कल्लोळ) कारावासाचे तीन प्रकार दिले आहेत. साधी शिक्षा, सक्त मजुरीची शिक्षा व राजकीय तुरुंगवास. राजकीय तुरुंगवास म्हणजे एकांतवास. अरे देवा! हा कसा असतो? ह्याचा शेवट कसा होणार? (सभागृहात शेम शेम च्या घोषणा.)

आमचे म्हणणे असे की, कायद्या समोर सगळे समान आहेत. कोणाचेहि स्वातंत्र्य, कोणाचीहि मालमत्ता, कोणाचेहि कृतिस्वातंत्र्य, साध्या न्यायालयीन आदेशाने हिरावून घेतले जाऊ शकत नाही. ह्यात ''ऑर्डिनरी'' साधे न्यायालय शब्द फसवे आहेत. त्याचा अर्थ असा की, विशेष न्यायालयांना हे अधिकार राहतील. विशेष न्यायालय स्थापन केले की झाले. ह्या न्यायालयात लोकांना उभे केले की झाले. मग ते काहीही जबानी देवोत. हे उचित नाही. योग्य आधारावर स्थापन झालेले, कायद्यावर चालणारे न्यायालय पाहिजेय. आरोपीला वकील देता आला पाहिजे. सरकारला आवश्यक वाटत असेल तर शासनानेही वकील द्यावा. ज्युरी असावेत. इंग्लंडमध्ये फौजदारी कायद्याचा इतिहास पहा. तेथे असे आढळेल की एके काळी असे म्हटले गेले की न्यायासनावर बसून निकाल देणारा एकटा मॅजिस्ट्रेट किंवा न्यायाधीश यांग्य न्याय देणार नाही का? तर त्याच्या रुपाने सरकार प्रतिनिधित्व करते. पण लोकांना न्यायप्रक्रियेत प्रतिनिधित्व मिळत नाही. ह्याकरिता लोकप्रतिनिधित्व करण्याकरिता ज्यूरी आले, राजप्रतिनिधि म्हणून न्यायाधीश व लोकप्रतिनिधि म्हणून ज्युरी असे एकत्र बसून न्यायदान करु लागले. ह्याला समान पद्धतिद्वारा न्यायदानाचा हक्क म्हणतात. येथे एक

न्यायाधीश व तेरा ज्युरी असतात. ते साक्षीपुरावे ऐकतात, छाननी करतात अभ्यास करतात, ते सर्व एकत्र करुन सादर करतात. ह्या तेरा न्यायाधीशांनी जो निर्णय दिला, त्याप्रमाणे न्यायदान घडते.

तर पहा, हा हक्क ह्या स्वरुपाचा आहे. ह्या हक्कासंबंधी आची सूचना मी मांडली आहे. भाषण स्वातंत्र्य, मतस्वातंत्र्य, राहण्याचे स्वातंत्र्य, मालमत्तेचा हक्क मिळालेच पाहिजेत. त्यांचा संकोच होऊ नये. ह्यांच्यासंबंधी निर्णय योग्य सक्षम न्यायाधीशांच्या द्वारेच व्हावेत. ह्यासाठी विशेष न्यायालये स्थापन करण्याची गरजच नाही. साध्या न्यायालयाच्या माध्यमातून ह्यासंबंधीचे न्यायदान व्हावे.

ह्यानंतर ज्याला ''डिस्क्रिमिनेटिंग लॉ'' म्हणता येईल त्यासंबंधी मी सांगतो. आम्ही भारतीय येथे अनंत काळपासून पिढ्यानपिढ्या राहत आहोत. एक विदेशस्थ व्यक्ति येथे येऊन न्यायासनावर न्यायाधीश म्हणून बसते आणि मी गुन्हेगार ठरलो तर मला कायद्याप्रमाणे शिक्षा देऊ शकते. पण तेच जर राजकर्त्या विदेशी लोकापैकी कोणी आरोपी म्हणून न्यायालयात खेचल्या गेला तर त्याला हे म्हणण्याचा पूर्ण अधिकार आहे की, थांबा, माझ्या केसमध्ये मला ज्यूरी हवेत. माझ्या देशातील व्यक्ति न्यायाधीश असली पाहिजे. तोपर्यंत थांबा. ही केवढी मजेदार गोष्ट आहे! एखादी व्यक्ति बाहेरुन येऊन थोडा मुक्काम करुन परत जाणार असेल तरी त्या व्यक्तीला घरातील मुख्य दिवाणखाना बहाल करुन घरमालकाला मात्र ओसरीत किंवा तेथे जागा नसेल तर तबेल्यात रहावयास नेण्यासारखे आहे. (प्रचंड हशा.) म्हणजे, मी उपाशी मेलो तरी चालेल, माझे कुटूंब उपाशी मेले तर चालेल, पण त्याला तेरा ताटांतून वाढले पाहिजे. (हास्य कल्लोळ.)

हे योग्य नाही. सगळे जण समान मानल्या गेले पाहिजेत. सर्वांना समान कायद्यानुसार, समान न्यायप्रक्रियेतून न्यायदान झाले पाहिजे. अशी आमची स्पष्ट मागणी आहे.

''कॉर्पोरल पनिशमेंट'' ही एक अजब गोष्ट पहा. इंग्लंडमध्ये चोरी वगैरे सारख्या दिवाणी दाव्यात शारीरिक दंडाची शिक्षा देत नाहीत. हिंदुस्थानात मात्र फटक्यांची

शिक्षा आहे. ह्याला ते पाठ शेकून देणे म्हणतात. (वॉर्मस् द बॅक) (हशा) त्याची पाठ चांगली मऊ करुन देतात. (हशा). शिक्षेची ही पध्दत चुकीची आहे. सैन्यामध्ये तर फारच तापदायक प्रकार आहे. किरकोळ स्वरुपाचे अनेक गुन्हे सैन्यात घडतात. गंभीर गुन्हेहि घडतात. त्यांना फट क्यांनी झोडपतात. त्यांना ते म्हणे ''धनुष्याच्या दोरीने शिक्षा करतात. पूर्वी ह्याला कॅट ऑफ नाइन टेल्स'' म्हणायचे. दोरखंडाला नऊ गाठी पाडून त्या दोरीन झोडपायचे. कधी कधी सैनिकांना नऊ वाद्यांच्या चाबकाने मार खाण्याची सवलत देत असते. काय भयंकर! हे सर्व थांबले पाहिजे. ह्या प्रकारांना परवानगी देता कामा नये. बैठकीत अजून बरेच कामकाज व्हावयाचे आहे. मी अधिक वेळ घेत नाही. प्रारंभी आवश्य अशा ज्या काही गोष्टी, की ज्यांच्या वाचून काहीही सुधारणा, कल्याण होणे शक्य नाही, अशा स्वरुपाच्या ''बिल ऑफ राईट'' मधील काही भाग मी आपणासमोर मांडला आहे. हे सर्व आपणास मिळालेच नाहीतर आपण पुन्हा एकत्र येऊ शकणार नाही. बैठक होऊ शकणार नाही, आपल्याला विचारविनिमय करता येणार नाही, आपल्याला कोणतेहि राजकीय कार्य करता येणार नाही. आपल्याला आपली धोरणे राबविता येणार नाहीत. सर्व व्यवस्थेचा हा पाया आहे. जी राजकीय स्वरुपाची रचना आपण करु इच्छितो, त्या सर्वांचा हा आधारस्तंभ आहे. आज लोकशाहीची लाट उसळली आहे आणि मी जे मुद्दे आपल्यासमोर मांडले ते लोकशाहीचे मुळ आहे, लोकशाहीचा प्राण आहे, लोकशाहीच्या तत्वाचा तो जणू श्वास-निश्वास आहे. हे जर तुम्हाला मिळाले नाहीत, तर काय वाटेल ते करा. सुधारणा कोसळून पडतील. त्या तुमचे काहीही भले करु शकणार नाहीत. आकाशातून भरपूर पाऊस कोसळत असावा पण तुमच्या डोक्यावर सतत छत टांगले असल्यामुळे तुम्हाला पावसाचा आस्वाद लुटता येणार नाही. तसे हे आहे. जुन्या कवींनी दिलेल्या उपमेच्या आधारे सांगायचे तर स्वच्छ सूर्य प्रकाश सर्वत्र उधळला आहे, पण तुमचे डोळे पट्टी बांधून बंद केले आहेत, तर त्या प्रकाशाचा त्या आंधळ्याला काय उपयोग? सुंदर वनश्रीच्या रम्य देखाव्यांचा त्याला काय उपयोग? सुंदर सुरेल संगीत चालू आहे पण आपले कान बधीर करुन टाकले आहेत तर, त्या संगीताचा आपल्याला काय उपयोग? टेबलवर विविध छान छान

फळांनी भरलेली ताटे ठेवली आहेत, तुम्हाला भूक लागलेली आहे, पण तुम्हाला बांधून ठेवले आहे तर तुमची ती अवस्था मला आवडणार नाही. तुमची आमची ही असह्य अवस्था मला आवडणार नाही. तुमची आमची ही असह्य अवस्था झाली आहे. ह्याकरिता हा ठराव आपण मान्य करावा अशी मी विनंती करतो. ह्या सूचनांचा आपण स्वीकार करावा. मी ह्यापेक्षा अधिककाळ घेऊन सर्वच पैलूंवर प्रकाश पाडणे आवश्यक होते. पण पूर्वी एकदा हा विषय आपल्यासमोर आला होता. पुनरावृत्तीची फारशी आवश्यकता मला वाटत नाही. त्यावेळी माझ्यापेक्षा महान वक्त्यांनी ह्यांचा पुरस्कार केला होता. तुम्हाला एका कठिण हिऱ्याला कठिण हत्याराने छिद्र पाडण्याचे कार्य करावयाचे आहे. त्या योगे दोरा आरपार जाऊ लागेल. एकवेळ हे सर्व कार्य झाले होते. पण तुम्हाला प्रकरण सहजपणे हाताळता यावे म्हणून मी पुनरुच्चार केला एवढेच. ह्याकडे तुम्ही सर्वांनी पुन:पुन: लक्ष द्या. ह्यावर पुन्हा पुन्हा चर्चा करा. तुम्ही सर्व काही सहज करु शकता. हे साध्य केल्याशिवाय प्रगती आणि सुधारणा होणे शक्य नाही, हे नीट लक्षात घ्या. एवढे सांगून मी हा ठराव आपल्यापुढे संम्मतिसाठी ठेवतो.

(टाळ्यांचा प्रचंड कडकडाट.)

कै. लोकमान्य टिळक स्मारक सभागृहाच्या उद्घाटन प्रसंगी केलेले कै. दादासाहेब खापर्डे यांचे विस्तृत भाषण. दि.१/८/१९२५.

(मुळ इंग्रजी भाषणाचा अनुवाद.)

सभ्य स्त्री-पुरुष हो !

लोकमान्य टिळकांच्या स्मृतिगौरवात आपण सर्वसहभागी होत आहोत. ते हयात असतानाच्या अनेक घटनांकडे माझे मन ओढ घेत आहे. विशेषत: मुंबईला ते कालवश झाले तो प्रसंग मन ओढून घेत आहे. सर्व काही कालच घडले इतका तो प्रसंग स्मरणात ताजा आहे. तुम्हा सर्वांना माझ्या प्रमाणेच वाटत असेल. कै. लाकमान्यांच्या राजकीय कार्याकडे मी सर्वांचे लक्ष वेधून घेऊ इच्छितो. विशेषत: ज्या समस्यांना आपल्याला आज तोंड द्यावयाचे आहे, त्या प्रश्नांकडे मी वळतो. एक वेळ लोकमान्य मुंबई प्रांतिक कौन्सिलचे सभासद म्हणून निवडून आलेले होते. व त्यांनी भरपूर विधायक

कार्यही केलेले होते. प्रांतिक विधान मंडळात उपयुक्त कार्ये होतात व ती महत्वाची असतात असे त्यांचे आमरण मत होते. त्यांनी मलाहि असाच आग्रह केला व मला निवडून येण्यास सहाय्य केले, त्यांनी लोकशाही काँग्रेसची स्थापना केली व त्या पक्षाचा जाहीरनामा तयार केला. प्रतियोगीसहकारिता हे त्यांचे तत्व होते. दुर्दैवाने त्या तत्वाचा व्यापकपणा सांगण्यास, त्याच्या विस्ताराच्या मर्यादा ठरविण्यास, अंमलबजावणीचे स्वरुप पाहण्यास, त्याचे समर्थन करण्यास आणि त्या संबंधी चर्चा करण्यास ते अधिक काळ जगले नाहीत. मात्र ह्या प्रसंगी एक घोषणापत्र प्रसिध्द होत आहे. लोकमान्यांनी काय केले असते व काय म्हटले असते हे त्यातून दिसेल ह्यासंबंधी मी काही वाक्य बोलणार आहे.

२. प्रतियोगी सहकारितेचे तत्व प्राणीजीवनात मान्य झालेले आहे. इतके की ते जीवनाचा एक भाग झालेले असते. कोणत्याही स्वरुपात जीवन आपल्या सभोवतालच्या वातावरणाशी प्रतिक्रिया व्यक्त करीत असते. त्या विधानाविषयी विशेष युक्तिवाद करण्याची आवश्यकताच नाही. सर्व शास्त्रज्ञ व जीवशास्त्रज्ञ हया विधानाशी सहमत होतील. मानवाला ही गोष्ट निसर्गत:च लाभली आहे. ती अशी की, ह्या देणगीद्वारे तो केवळ प्राप्त परिस्थितीशी समायोजन करु शकतो एवढेच नव्हे तर हे समायोजन योग्य रीतीने व प्रभावी व्हावे म्हणून तो विविध साधने हाताळण्यास समर्थ होतो. निसर्गनियम शोधून काढून व त्यांचे पालन करुन आणि त्याच वेळी, जो अंश भाग प्रतिकूल असेल त्याचा त्याग करुन, तो हे समायोजन साधू शकतो. दुसऱ्या शब्दात म्हणावयाचे तर तो निसर्गाशी प्रतियोगी सहकारिता स्थापन करतो. प्राचीन लोकांनी हे नीट लक्षात घेतले होते. भारतातहि भगवान श्रीकृष्णांनी श्री भगवद्गीतेत हे तत्व समजावून दिले आहे. त्याचा लोकमान्यांनी ''प्रतियोगी सहकारिता'' असा अनुवाद केला आहे. इतिहासाचा मागोवा घ्यावयाच तर मला आनंद झाला असता. पण विषयाची वेळेची मर्यादा ध्यानात घेऊन मी एवढेच म्हणेन की, आपल्या देशाप्रमाणेच जे अन्य देश अशा बिकट परिस्थितीत सापडले, त्यांनी ह्याच तत्वाचा अवलंब केला होता, परंतु आपल्याला हे तत्व जसे ज्ञात आहे, तसे शब्दरुपाने त्यांना ज्ञात नव्हते. आपल्यावर ही एक कृपाच आहे. हे तत्व

सर्वव्यापक आहे. भिन्न मते बाळगणाऱ्यांना देखील ह्या तत्वाच्या आधारे व्यासपीठावर स्थान देता येते व सर्व अर्थछटा ते सुरेख व्यक्त करते. क्षोभकार घटने विरुध्द सगळेच विविध साधनांनी, विविध पध्दतींनी, संघर्ष करुन अडथळा दूर सारण्याचा यत्न करतात व हेतू साध्य करण्याचा यत्न करतात. म्हणजे, हा नियम सर्वत्र सामान्यपणे आढळून येतो. आजची हिंदुस्थानातील परिस्थिती अशी उद्‌भवली आहे की, सर्व भारतवासियांनी एकत्र येऊन संयुक्त जबाबदारीचे सरकार स्थापन करुन आपले राजकीय अस्तित्व प्रस्थापित करावे. असे झाले तर शुध्द राजकीय स्वरुपातील राष्ट्रीय सभा साकार होऊ शकेल व विद्यमान राष्ट्रीय सभेचे स्वरुप आपल्याला हवे असे वाटते तसे ते स्वरुप तिला येईल. सुरुवातीला काँग्रेस ही संस्थापकांच्या दृष्टीने पाहिले तर राजकीय पक्षच होता. त्यानंतर काही काळाने ही सामाजिक स्वरुपाची संघटना बनली. औद्योगिक स्वरुपाच्या उलाढाल करणारी संघटना बनली. पुढे ह्या दोन भिन्न शाखा मानाव्यात यासाठी खटाटोप करण्यात आले. काही वर्षापूर्वीपासून संयुक्तीकरणाची प्रक्रिया सुरु आहे. धागे अलग करुन राजकीय धाग्यादोऱ्यांशी त्यांची जोडणी करणे अशक्य नाही व कठीण हि नाही. हे असे घडले तर संयुक्त काँग्रेस अवतीर्ण होणे, प्रत्यक्ष रुपात साकार होणे अवघड नाही. नुकत्याच घडलेल्या काही घटना ह्या दिशेने आमच्या भाषणात बोलण्यास आवाहन करीत आहेत.

प्रतियोगी सहकारितेच्या तत्वांचा आणखी एक लाभ म्हणजे स्वराज्य प्राप्तीसाठी सर्वमान्य व्यापक साधन निवडण्याचे स्वातंत्र्य मिळते. धोरण म्हणजे काय? तर विशिष्ट ध्येय प्राप्तीच्या दिशेने जाण्यासाठी आखून दिलेले व्यवहारतत्व. त्या ध्येयाच्या सिध्दिस्तव स्वीकृत केलेली सर्व साधने त्या मानाने गौण ठरतात व ती वेळोवेळी, परिस्थितीनुसार परिवर्तित होतात. धोरण हे श्रध्दास्थानी असते, वर साधने ही निमित्तमात्र असतात. त्यामुळे आरंभी ती राजकीय हेतूप्रणीत वाटतात आणि परिवर्तनशीलता ही त्यात अध्याहृत असते. ह्यास्तव साधनात परिवर्तन म्हणजे धोरणात परिवर्तन नव्हे. प्रतियोगी सहकारितेचे तत्व याचमुळे व्यापक क्षेत्रांना, विविध साधनांना विविध खुब्यांना समाविष्ट करुन घेण्याची आकांक्षा व क्षमता बाळगते. आमची परिभाषा

बहुतांशी रणनीतितून घेण्यात आली आहे, यामुळे युध्दात विजय मिळविण्याचा सेनापतीला सर्वसामान्य आदेश दिला जातो त्याप्रमाणेच हे काहीसे आहे. तो जे आराखडे आखतो तो त्याच्या डावपेचांचा भाग असतो, आणि ज्या प्रत्यक्ष हालचाली करतो किंवा करवितो ते विजय हस्तगत करण्याच्या दृष्टीने वापरण्यात आलेले साधन असते. अंतिम ध्येय विजयप्राप्ति हेच असते व त्यासाठी तो आवश्यकतेनुसार तो अग्रेसर होईल, पिछेहाट करील किंवा कदाचित स्तब्ध उभा राहील. सैन्याची पूर्ण कार्यक्षमता कायम ठेवणे व उपयोगात आणणे व तीहि शक्ति, द्रव्य, वेळ यांचा कमीत-कमी उपयोग करीत असतो. उलटपक्षी, त्याला उचित स्वातंत्र्य दिले नाही व त्याला विशिष्ट वर्तनरेखेवर बंदिस्त करुन ठेवले तर तो हतोत्साह होईल व आपले इप्सित कार्य करणे त्याला कठिण होईल. कदाचित ह्यामुळे विनाश देखील ओढवू शकेल.

असहकारिता चळवळ दुसऱ्या प्रकाराप्रमाणे आहे. सेनापतीने एखाद्या किल्ल्यात बंदिस्त राहून, सैन्याशी पूर्ण फारकत घेऊन, बाह्यजगताशी संपर्क तोडून, राहण्याच्या प्रकारा प्रमाणेच आहे, बाह्य जगताशी नातेगोते राहिले नाही, आणि संबंध तुटलेला आहे व अशा स्थितीत प्रबळ व समर्थ अशा प्रतिपक्षावर विजय संपादन करण्याचा खटाटोप सुरु आहे अकारण अनेक अडचणी उद्‌भवणार आहे व विजयाची आशा दुरावणार आहे. प्रतिपक्षाशी व्यवस्थित लढावयाचे तर आपल्याला प्रतिपक्षाशी संबंध स्थापन करुन त्याच्या हालचालींचा अंदाज घ्यावा लागेल एवढेच नव्हे तर प्रतिपक्षाचे निकटचे व दूरचे अंतिम ध्येय काय, याचा सूक्ष्म तपास केलाच पाहिजे व त्यानुसारच उचित हालचाली करुन, त्यांच्याच युध्दभूमीवर त्यांचा पराभव कसा घडेल हे पाहिले पाहिजे. युध्दाच्या परिभाषेत याला शत्रुप्रदेशात युध्द लोटणे असे म्हणतात, हे आपणास ठाऊकच आहे.

भारतात गेल्या पांच वर्षात काय काय घटना घडल्या हे थोडक्यात सांगतो. असहकार चळवळ उच्चत्तम अवस्थेत होती, त्यावेळी शाळा, महाविद्यालये, विश्वविद्यालये, न्यायालये, विदेश व्यापार वगैरे शपथपूर्वक बहिष्कृत करण्यात आले व प्रतिसरकार स्थापन करण्याचा यत्न कसोशीने करण्यात आला व ह्या निमित्ताने उत्पन्न

झालेल्या उत्साहाच्या भरात बऱ्याच लोकांनी भाग घेऊन सर्वस्वाचा व प्रसंगी प्राणांचाहि त्याग करावयास मागेपुढे पाहिले नाही. पण काय झाले? शाळा, महाविद्यालये बंद पडली नाहीत. रिकामी झाली नाहीत. त्यांच्यावर फार अल्प परिणाम घडला. न्यायालये ओस पडली नाहीत. शासन ठप्प झाले नाही. उलटपक्षी नोकरशाहीने शिताफीने हालचाल करुन प्रशासनात मजबुती आणली व ते अधिक कार्यक्षम बनविले. प्रतिसरकार स्वप्नाप्रमाणे विरुन गेले व आतापर्यंतची घेतलेली सर्व पावले व्यर्थ गेली हे जागृत झालेल्या जनतेला कळून आले आहे. बहिष्कार मार्गाने केलेली सर्व "प्रत्यक्ष कृति" सर्व दृष्टींनी वाया गेली. ह्यातून उद्‌भवलेल्या समस्येवर तोडगा म्हणून स्वराज्यपक्ष स्थापन झाला. स्वराज्यपक्षाने कायदे मंडळात प्रवेश हे प्रमुख सूत्र डोळ्यासमोर ठेवून धोरण आखले. त्याच्या संस्थापकांना एका बाजूने असहकार चळवळीच्या समर्थकांच्या उलटतपासणीला सामोरे जावे लागले, तर दुसरीकडे सामान्य जनतेला तोंड द्यावे लागले. स्वार्थीपणाचा व अहंपणाचा आरोप आपल्यावर येऊ नये म्हणून त्याच्या उमेदवारांना आम्ही सभासद होऊ पण पद ग्रहण करणार नाही अशी शपथ घ्यावी लागली. तसेच गुलामगिरीच्या मनोवृत्तीच्या आरोपातून वाचवून घेण्यासाठी सरकारशी सर्वपातळीवर लढा पुकारावा लागला. बंगाल व मध्यप्रांत वऱ्हाड प्रांतात त्यांना छान बाक मिळाला. मध्यवर्ती कायदे मंडळात सन्माननीय अल्पमत प्राप्त झाले. इतरहि ठिकाणी अल्पमतात का होईना पण त्यांना स्थान प्राप्त झाले. लवकरच त्यांना असे आढळून आले की, त्यांनी स्वत:वर जी बंधने लादून घेतली होती जी जाचक आहेत व कार्यहानीकारक आहेत ती बंधने धोरणात्मक आहेत, परंतु पक्षाच्या सर्वसामान्य व्यापक धोरणाचे अंगभूत घटक नव्हेत व यास्तव ती परिवर्तनीय ठरु शकतात, व प्राप्त कालमान परिस्थितीनुरुप त्यात बदल घडवून आणता येईल. असे त्यांनी केले तर ते उचितच घडेल व त्यातून चांगली फलनिष्पत्ति घडेल. वस्तुत: अर्थविधेयकाला प्रच्छन्नपणे विरोध करणे ही हल्लीचीच गोष्ट आढळते. जनता किंवा विद्यमान राजकीय पक्ष नाममात्रच विरोध करतात. रौलेक्ट कमिटीवरही ते कार्य करतात. त्यांचे नेते मोतीलाल नेहरु यांनी ज्यात फक्त नियुक्त सभासद असतात अशा स्क्रीन कमिटीचे सभासदत्व स्वीकृत केले आहे. हे सर्व

असेच दर्शविते की ते प्रतियोगी सहकारितेचे तत्व अंगिकरतात. हे सर्व मिळून नवीन काँग्रेसच्या राजकीय समितीत महत्वाचे घटक बनतील. गतवर्षी सिमला येथे झाले त्याप्रमाणे स्वतंत्र सभासद त्यांच्या बरोबर सहभागी होतील. पूर्वी ज्यांना ''मॉडरेट्स'' म्हणत ते उदारमतवादी गट एक पाऊल पुढे आले आहेत, आणि फक्त प्रतिनिधि मंडळे धाडणे, अर्जविनंत्या दाखल करणे एवढ्या पुरत्याच मर्यादित ठेविनासे झाले आहेत. अल्पमात्र प्रमाणात का होईना पण विरोध व संघर्षाचे मूळबीज त्यांच्यात हळूहळू जोर धरत आहे व थोड्याशा देवाण-घेवाणीच्या उभयपक्षी सन्मान्य तडजोडीने ते नव्या जोमाने उद्‌भवलेल्या काँग्रेसमध्ये लवकरच सामील होतील अशी नजदीकच्या भविष्याबद्‌दल आशा बाळगता येईल. ठिकठिकाणी गटागटाने विभाजित झालेला मुस्लिम समाज ह्या पुनरुज्जिवित काँग्रेसमध्ये सामील होण्यास उत्सुक आहे. ह्या सर्वांना मी सध्यापुरते ''विविध पक्ष'' असे म्हणतो.जे राजकीय क्षेत्रात प्रत्यक्ष सक्रिय कार्य करण्यास तयार आहेत, पदे ग्रहण करण्यास तयार आहेत, घटनात्मक रीतीने आपल्या तत्वांसाठी राजकीय लढा देण्यास तयार आहेत त्यांच्यासाठी ''पार्टी'', ''पक्ष'' हा शब्द राखून ठेवावा अशा मताचा मी आहे. अर्थात हा फक्त घोषणा काय करावयाची एवढ्या पुरताच प्रश्न आहे. तो सध्या आपण बाजूला ठेवू या- माझी अशी धारणा आहे की, ह्या सर्व गटांनी विधान मंडळात व विधान मंडळाबाहेर एकत्र येऊन कार्य केले तर त्या कार्याला धार प्राप्त होईल व मतभेदाचे कंगोरे झिजून जातील व ह्यातून पक्षाची व्यवस्थित उभारणी होईल. डॉ. एनी बेझंट यांनी बर्कनहेड काय हरकती उपस्थित करतील त्याविषयी पूर्वानुमान करुन एक मसूदा विधेयकाच्या स्वरुपात दाखल केलेला आहे. त्याला ह्यानंतर होणाऱ्या सर्वच चर्चा व वादविवादांचा आधारभूत पाया म्हणून जनमताची मान्यता लाभलेली आहे. मध्यवर्ती कायदेमंडळात त्याला मान्यता प्राप्त करुन घेण्याची त्यांची महत्वाकांक्षा आहे व त्यांना यश प्राप्त झाले तर फारच उत्तम होणार आहे. कारण त्यामुळे सार्वभौम राज्याचा दर्जा प्राप्त होण्याच्या दिशेने आपण त्याद्वारे एक पाऊल पुढे टाकणार आहोत. जर त्यांना अपयश आले तर, आम्ही भारतीय लोक कच खाणारे नाही, आम्ही अन्य दिशेने तीव्र प्रयत्न सुरुच ठेवू. स्वराज्य पक्षाने चांगले कार्य केले आहे हे सर्वांना

माहिती आहे. त्यांचे वर्तन आश्वासनदायक आहे. त्यांच्या मार्गात ज्या काही अडचणी येत आहेत, त्या त्यांना प्रांतिक पातळीवर पक्षांतर्गत देऊन आणि प्रांतिक पातळीवर योग्य, उचित महत्वाचे निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य देऊन दूर सारता येतील. आधीपासूनच ह्याप्रमाणे घडले असते तर त्यांना अधिक प्रगति करता आली असती. प्रत्येक ठिकाणी सर्वांनी विस्तृतपणे प्रत्येक बाबतीत संयुक्त कार्य करण्याचा त्यांचा आग्रह काही प्रमाणात गैरफायदेशीर दिसतो आहे. आत्यंतिक स्वरुपाचे केंद्रीकरण झाल्यावर जे दुष्परिणाम घडतात त्यांना त्या लोकांना तोंड द्यावे लागणार आहे. सध्यापुरता तरी हा मतभेदाचा मुद्दा बाजूस ठेवून चालू या. सध्या भारतात अशी स्थिती उद्‌भवली आहे की, आपण कुठल्याहि अतिरेकी टोकापासून दूर राहिले पाहिजे आणि सुवर्णमध्य साधण्याचा यत्न केला पाहिजे. मुद्रा राक्षस मधील तो सुविख्यात श्लोक तुम्हाला ठाऊकच असेल-

तीक्ष्णा दुभ्दिजते मृघै

जर महान लोकमान्य आज हयात असले आणि काँग्रेस डेमॉक्रॅटिक पार्टीची धुरा सांभाळण्यास समर्थ असते, आणि त्यांचे मार्गदर्शन आपल्याला अविरत मिळते, तर गेल्या पाच-सहा वर्षांचा इतिहास वेगळा राहिला असता. आपण आपल्या लोकप्रिय पक्षाला बलशाली बनविले असते. कोणी असहाय आहे म्हणून त्याला पक्षकार्यात गुंतविले, असे घडले नसते. स्त्री-पुरुषांची शिस्तबध्द सुव्यवस्थित संघटना घडली असती. मुलांना वर्गणीच्या कामाला राबवले नसते, उलट हुकुमशाहीचे पंख छाटण्याच्या कामात त्यांना गुंतविले असते. छोटी, धीमी, सावध पावले उचलली असती. कार्यकर्ते व हितचिंतकांना उत्साह व धीर मिळाला असता. त्यांच्यात आत्मविश्वास व आत्मगौरव प्राप्त झाला असता. जाहिरातबाजी, दिखाऊपणा यांच्या भरीस न पडता दुप्पट उत्साहाने विजयाच्या पुढच्या टप्प्याकडे त्यांना नेता आले असते. प्रगतीसाठी ही एक अपरिहार्य वाटचाल आहे. विराध व प्रतिकार हे त्यांच्या ठिकाणी योग्यच आहेत. पण त्यांच्या विषयी अकारण, अस्थानी अप्रासंगिकपणे बोलणे शहाणपणाचे व मुत्सद्‌देगिरीचे नव्हे. जे धोरण शहाणपणाने आखलेल,योजनापूर्वक ठरविलेले असते व त्या दिशेने शांतपणे वाटचाल सुरु असते, तेच धोरण अंती विजयी ठरते. निरर्थक,

बाष्कळ बडबड, त्याची पावले मागे खेचते. आपला उपक्रम हिंसामय कधीच नव्हता. त्यामुळे प्रतियोगी सहकारितेचे तत्वच आपल्याला ईप्सित ध्येयप्राप्ति साधून देणार आहे.

प्रतियोगी सहकारितेचे तत्व आपणास आवडेल व मान्य होईल अशी आशा आहे.तुमच्या भोवती ज्या समस्या तुम्हाला भेडसावीत आहेत, त्यांच्यावर एकमेव तोडगा म्हणजे प्रतियोगी सहकारीतेचे तत्वच होय. आपल्याला आपसात मतभेद दिसतात. त्यातून आपल्या समाजात विविध जाती उपजाती व त्यांच्यातील भेदभाव दिसतो. त्यांच्यातील जातीयतेचा घटक आज त्यांच्यात विलक्षण सक्रीय झालेला दिसत आहे. पण हे ध्यानात ठेवा की, हा घटक स्वराज्याच्या ध्येयाशी शत्रूत्व करीत नाही. वैर करीत नाही. गूढ गहन निद्रेतून जागे झाल्यावर डोळे ताणून पाहणाऱ्या, सगळीकडे आ वासून पाहणाऱ्या पण वास्तवाची जाणीव झाल्यावर आपले ईप्सित साध्य करण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या व्यक्तीप्रमाणे त्यांची सध्याची अवस्था झाली आहे. इथेहि तसेच आहे. प्रतियोगिता सहकारितेचे तत्व व चळवळ यांचा स्वीकार करा. सारे एक होऊन जातील. श्री अरविंद घोष यांनी ज्या सी.आर.दासांना लोकमान्या नंतरचे स्वराज्य पक्षाचे प्रमुख आधार मानले ते दासबाबू ह्या शहरात भाषण करतांना म्हणाले होते की, प्रतियोगी सहकारिता हे स्वराज्य पक्षाची असहकारिता चळवळ आहे. हेच त्यांचे शब्द होते.

भारताच्या दोन महान सुपुत्रांनी पुरस्कारलेली ही चळवळ. व हे तत्व आहे. हे सहजासहजी दुर्लक्षण्यासारखी आणि टाळण्यासारखी नाही. ह्याचा आपण सन्मानपूर्वक स्वीकार न केल्यास आत्मघात ठरेल. ह्याचा खऱ्या अर्थाने प्रयोग व्हावयाचा आहे. काहींनी अशी समजून करुन घेतली आहे की मवाळ पक्षाने मॉडरेटस् यांनी त्याची अमलबजावणी केली आहे व करीत आहेत. पण ही चुकीची समजूत आहे. त्यांची टिळकपक्षाच्या विपरीत मनोवृत्ति आहे. बनारस काँग्रेसच्या व्यासपीठावर आम्ही एकत्र आली, एकमेकांना साह्यहि केल, एकमेकांना पाठिंबाहि दिला. पण ''कॉमेडी ऑफ एरर्स'' सारखा प्रकार तेथे नव्हता. आपण सर्वांनी वस्तुसिथतीची जाणीव करुन घ्यावी

अशी विनंती आहे. देशबंधू चित्तरंजनदास व लोकमान्य यांच्या पुरस्कृत चळवळी ला आपण पाठिंबा द्यावा अशी विनंती आहे.

दिल्ली दरबार १९०९ व मुक्काम लंडन

दादासाहेब लॉर्ड कर्झन व्हॉईसराय यांनी दिल्ली येथे भरविलेल्या इ. १९०९ मधील दरबारास व्यक्तिश: उपस्थित होते.

मुक्काम लंडन - लॉर्ड कर्झन यांच्या दि. १२-३-१९०९ च्या रोजनिशीतील उतारा पहा - ''एक खापर्डे नावाचे सद्गृहस्थ भेटीस आले. त्यांनी हिंडमन् यांचे ओळखपत्र आणले होते. श्री. लाला लजपतराय किंवा श्री गोखले यांच्या पेक्षा भिन्न प्रकारचा प्रतिभाशाली देशभक्त भटून गेला असे मला वाटले. मंडाले येथे त्यांचे मित्र टिळक यांना शिक्षा झालेली आहे. त्यासंबंधी काय करता येईल हे पाहण्यासाठी श्री खापर्डे लंडन येथे आलेले आहेत. त्यांनी टिळकांची केस प्रिव्हि कॉंसिल मध्ये उपस्थित केली. परंतु अर्थातच सर्व व्यर्थ गेले. आता टिळकांच्या सुटकेसाठी श्री.खापर्डे त्यांच्या लंडन येथील मित्रांच्या सह्यांचा अर्ज पार्लमेंटला सादर करु इच्छित आहेत. ते राष्ट्रीय भावनेने अत्यंत स्वच्छपणे बोलतात. आता हिंदुस्थानातील सगळेच स्वातंत्र्याची भाषा बोलू लागले आहेत. आपल्याला काय म्हणावयाचे आहे याचा स्पष्ट उच्चार न करणाऱ्या मवाळांनाही स्वातंत्र्यच हवे आहे, असे ते म्हणाले. मी विचारले, ''मुस्लिमांना देखील?'' त्यावर ते म्हणाले, की मुस्लिम व हिंदू यांच्यात या बाबतीत मुळीच मतभेद नाहीत. ते क्रांतीच्या वेळी आम्हाला येऊन मिळतीलच. आम्ही इंग्रजांचा जेवढा द्वेष करतो त्या पेक्षाहि जास्त ते करतात. कारण पश्चिमेकडे वगळता, आम्हाला नव्हे तर त्यांना ठिकठिकाणी इंग्रजांनी काढून लावले आहे. त्यांनी असे मत व्यक्त केले की, तेथील इंग्रज त्यांना वाटले होते त्यापेक्षा वेगळे आहेत. ते म्हणतात, त्यांना काही व्यापारी मंडळी भेटली. ते सहनशील, उदार, दयाळू, अतिथ्यशील असतील असे त्यांना बसटले. परंतु ते लोक अपवाद वगळता, फक्त पैसा मिळविण्याच्या उद्योगात गुंतलेले द्रव्यासक्त लोक आढळले. अशा लोकांच्या कडून भारतीय लोकांच्या समस्येमध्ये लक्ष घालणारे व त्यांच्या करता काही प्रत्यक्ष कार्य करणारे लोक उपजतील ही आशा त्यांनी आता सोडून दिली आहे. ते

येथील जनते कडून न्याय्य गोष्टींचे समर्थन प्राप्त होईल ह्या आशेने अपीलासाठी आले होते. पण आता येथील लोकांच्या कडून त्यांनी न्यायाची आशा सोडली आहे. भारतात बोलण्यापेक्षा प्रत्यक्षकृति घडली पाहिजे असे त्यांना वाटते. व हे सर्व व्यापक हिंसाचार व उग्र आंदोलन होण्यापूर्वी होणे इष्ट होईल असे त्यांना वाटते.

मी त्यांना मोर्ले रिफॉर्म विषयी विचारले. तेव्हा ते किंचित रागाने बोलले. मोर्ले सुधारणा मसुदा त्यांना मान्य नाही. फार थोडयांना सरकारी नोकऱ्या, पगार वगैरे मिळेल. ह्या पलीकडे त्यांचा फारसा उपयोग नाही. सरकारने हिंदुस्थानी लोकांना गोळ्या, बाँम्ब दिले, वृत्तपत्रांवरील दडपण दिले, कैदेच्या व तुरुंगाच्या शिक्षा दिल्या. ह्यापलीकडे काहीच दिले नाही, असे त्यांचे मत आहे. पण ह्या द्वारा क्रांतिकारी चळवळ थांबविणे शक्य होईल, त्याचे काय असे मी त्यांना विचारले. त्यावर ते म्हणाले की, ह्या उलट ती चळवळ अधिक फोफावेल. क्रांतिकारक गुप्तपणे संघटित होऊन सक्रिय बनतील व ते अधिक प्रभावीपणे कार्य करु शकतील.

श्री.खापर्डे यांनी पाश्चात्य पोषाख केला आहे. पण त्यांचा शाल फेटा मात्र शिरावर धारण केला आहेच. त्यांची प्रखर बुध्दिमत्ता आढळून आली. तसेच त्यांचे विचार मुद्देसूद, व व्यवस्थित रीतीने ते सांगू शकतात व ठासून प्रभावीपणे सांगू शकतात.

<u>जुलै १९०९ चा उतारा पुढील आशयाचा आहे.</u>

श्री.खापर्डे यांनी अतिशय वेधकपणे त्यांचा धार्मिक दृष्टिकोण सांगितला. ते थिऑसॉफिस्ट आहेत. ते तरुण असतानाच त्यांनी थिऑसॉफि संप्रदाय स्वीकारला होता. आजवर मी अनेक लोकांकडून ऐकलेल्या विचारांपेक्षा अधिक योग्य व समर्पकपणे त्यांनी स्पष्टीकरणे दिली. त्यांनी मन व जडद्रव्य यांचा संबंध ह्याविषयी माहिती दिली. उत्तर देताना असंबध्दता, मुद्दे वगळणे वगैरे प्रकार मुळीच न करता, प्रश्नांची व उत्तरांची उकल ते अतिशय अचूकपणे, तार्किकपणे, सरळ, सोप्या इंग्रजीमध्ये देतात. ते वाखाणण्याजोगे व प्रशंसनीय प्रवक्ते आहेत.

ते जन्माने महाराष्ट्रीय ब्राम्हण आहेत. त्यांनी जातीचा त्याग केला आहे. त्यांचे

वडील योगी होते. त्यांनी जे साधे, सरळ परंतु उच्च विचारसरणीचे जीवन व्यतीत केले, त्याविषयी श्री.खापर्डे यांनी आकर्षक माहिती दिली. त्यांचे वडील झाडांच्या छायेत ध्यानमग्न अवस्थेत दिवसाचा बराच काळ व्यतीत करीत असत. तरुणपणी ते सरकारी नोकरीत डेप्युटी कलेक्टर होते. त्यांचे आजोबा सावकार होते. पण त्यांच्या अखेरच्या दिवसात पेढी बुडाली. परंतु फार थोडी संपत्ती उरली होती. श्री.खापर्डे यांचे पालन पोषण उत्तम झाले.त्यांचेकडे बगीचे, घोडे व गाई म्हशी भरपूर आहेत. मुंबईच्या सरकारी महाविद्यालयात त्यांचे शिक्षण झाले. तेथेच त्यांची काही थिऑसॉफिस्टांशी ओळख झाली होती. आता ते छप्पन वर्षाचे आहेत. त्यांच्या मनात मादाम ब्लाव्हाटस्की व डॉ.ॲनी बेझंट यांच्या विषयी आदर आहे. मात्र डॉ. ॲनी बेझंट हल्ली चुकीच्या राजकीय प्रणालीचा प्रचार करीत आहेत असे त्यांचे मत आहे. त्यांचे तत्व ज्ञान फारच मनोरंजक आहे. पण मला ह्या गोष्टीचे सदैव नवल वाटते की,ह्या विज्ञानवादी लोकांची अद्यापही आत्म्याच्या शाश्वतीवर आत्मा देहांतर करतो ह्यावर, अपार श्रध्दा कशी कायम आहे? मी त्यांना नश्वरतेचा, शून्यतेचा माझा दृष्टिकोन सांगितला. हया विशाल पृथ्वीवर मानव किती क्षुद्र आहे हे मी सांगितले. हे त्यांनी मान्य केले. पण त्यांची अशी पक्की समजूत आहे की, हया जगतापलीकडे एक मानवाहून उच्च कोटीतील विश्व अस्तित्वात आहे. आत्मा पूर्ण मुक्तावस्थेत जाण्यापूर्वी हया लोकात विलीन होतो, रुपांतरीत होतो अशी त्यांची धारणा आहे. त्यांच्या मते, येशू, ख्रिस्त, बुध्द वगैरे फारच थोडयांना हया पृथ्वीवर राहूनहि थेट निर्वाणपदास किंवा मोक्षपदास पोहोचता आले. हया मुद्दयावर विवाद करताना ते यशस्वी झाले. आमच्या घरी होत असलेल्या घरगुती भोजन समारंभास आलेल्या कु.लॉरेन्स,कु.बचर, आणि माझी नातू मंडळी त्यांच्या झगमगत्या फेटयाकडे, त्यांच्या काळया चेहऱ्याकडे अवधानपूर्वक टक लावून ऐकत होते.

नंतर मी त्यांना माझा अरबी घोडा दाखवला. तेव्हा त्यांच्या बुध्दिमतेची चमक दिसून आली. घोडयाचा गडद तपकिरी रंग व पांढरे शुभ्र खूर पाहून त्यांनी सांगितले की हया रंगाचे घोडे भारतीय लोकांना प्रिय असतात. कुवैतमधील अमीर महंमदचा घोडा असाच आहे हे त्यांनी ओळखले.

दि.१७-८-१९०९ च्या दैनंदिनीत त्यांनी दादासाहेबांचे भावी सरकारविषयी विचार मांडले आहेत.

श्री.खापर्डे यांची आणखी एक भेट झाली. त्यांनी विदर्भात स्थापन केलेल्या पाच शाळा नुकत्याच सरकारने बंडखोरीस प्रवृत्त करतात म्हणून बंद पाडल्या, या बद्दल ते रागावले होते.

भारताच्या भवितव्याविषयी आज ते अगदीच स्पष्टपणे व खुलम्खुल्ला बोलले. विचारले की, ते भारतात असे सरकार निर्माण करु शकतील काय? की, जे ब्रिटीशांना दूर करुन त्यांची जागा घेऊ शकेल? त्यावर त्यांनी उत्तर दिले की, हे अगदी सहज शक्य आहे. प्रथम प्रांताची ठोकळ मानाने वांशिक आधारावर पुनर्रचना करण्यात येईल. प्रत्येक प्रांताचे विधिमंडळ राहील व ते मध्यवर्ती शासनासाठी प्रतिनिधी पाठवतील. प्रांतिक विधि मंडळास त्या त्या प्रांताचा कारभार पाहण्याचा पूर्ण अधिकार राहील. मध्यवर्ति शासन सैन्य, डाक व तार खाते, परराष्ट्र व्यवहार इ. खाती सांभाळेल. अशा रीतीने प्राचीन हिंदू साम्राज्य व्यवस्था व अकबर बादशहाच्या धर्तीची राज्यव्यवस्था अस्तित्वात येईल. या संपूर्ण प्रशासनाचा प्रमुख कोण राहील? हे कालमान परिस्थितीवर अवलंबून राहील. कदाचित एखादा यशस्वी योध्दा, कदाचित अमेरिके प्रमाणे राष्ट्रपती. ही सर्व रचना सहज शक्य आहे. त्यांनी ब्रिटिशांना भारतावर राज्य करण्यास जास्तीत जास्त वीस वर्षे मुदत दिली. जर पुरेसा निधि प्राप्त झाला तर संपूर्ण उलथापालथ, समग्र क्रांती कदाचित उद्याहि घडून येऊ शकते. यासाठी पाच दशलक्ष स्टर्लिंग पुरेत. सैन्य दलाच्या दृष्टीने पाहिले तर ज्या बाजूला पैसा अधिक राहील तिकडे सेना वळेल. जेथें पगाराची सुरक्षितता वाटेल त्यांची बाजू ते घेतील. ह्याहून दुसरे सैन्याच्या सध्याच्या राजनिष्ठेचे कारण त्यांना वाटत नाही. राजनिष्ठ संस्था निकां विषयी विचारले असता ते म्हणाले की, इंग्रज रेडिडेंट तेथे दबाव ठेवून असतो, त्यामुळे राजनिष्ठा त्यांच्यावर लादली गेली आहे. ते मनातून इंग्रजांचा द्वेष करतात. रेसिडेंट स्वत:च्या अधिकारात त्यांना आज्ञा देतात. वचनभंग करुन वर धमक्या देतात. जुन्या काळी राजांजवळ खजिना होता. आता रेसिडेंटस् सरकारी सिक्युरिटीजमध्ये पैसा गुंतवण्यास भाग पाडतात.

कॉर्डेरी यांनी इ.१८८४ मध्ये निझामला धमक्या दिल्या होत्या त्याविषयी मॉडेमोसिलने टिपणे लिहिली होती ती मी खापर्डे यांना दाखवली. ती माहिती सत्य असल्याचे त्यांनी मान्य केले. मी हैद्राबाद येथे होतो तेव्हा निझामला वेडसर ठरवून रीजंटच्या हाती सत्ता सुपूर्द करण्याचा कट शिजला होता. लॉर्ड डफरीन त्यावेळी व्हॉईसरॉय होते. त्या संस्थानातील पैसा बळकावणे हो कटाचा मुख्य हेतू होता.

थोर देशभक्त वीर वामनराव दादा :

श्री.वामनराव जोशी यांचा जन्म २१ मार्च १८८१ रोजी अगदी सामान्य कुटूंबात झाला. अगदी लहानपासून त्यांना संगीत, नाटक, साहित्य, आखाडा व वीरकथा वाचण्याचा छंद होता. त्यांचा आवाजही चांगला होता. विदर्भाचे भूषण श्री.दादासाहेब खापर्डे यांच्या प्रेरणेने त्या काळात अंबा दरवाजांचे आत तुकाराम पहेलवान यांना एक तालीमखाना सुरु केला होता. या ठिकाणीच वामनरावांच्या स्वराज्य वेडाचे बीजारोपण झाले. १८९८ साली श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांचे नातू श्री.भास्करराव थत्ते यांनी एका विधवेशी पुनर्विवाह केला. वामनरावांनी भास्करावांचे अभिनंदन करुन या वेळी सुधारक मताची चुणूक दाखविली. मुलांमध्ये राष्ट्रीयवृत्ती वाढावी म्हणून १९०५ साली श्री.दादासाहेब खापर्डे यांनी प्रायव्हेट हायस्कूल काढले. तेथे वामनरावदादा व बापूजी अणे हे शिक्षक होते.

सार्वजनिक चळवळीत प्रत्यक्ष भाग:-

२० डिसेंबर १९०६ रोजी लोकमान्य टिळक अमरावतीला आले. वामनराव आपल्या मित्र मंडळींना घेऊन लोकमान्यांच्या भेटीसाठी गेले. तेव्हा लोकमान्यांनी स्वतंत्र लढ्यात स्वदेशी आणि बहिष्कार हयांचे स्थान यावर बरीच चर्चा केली. यावेळी दादांनी सार्वजनिक चळवळीत प्रत्यक्ष भाग घेण्याचा निश्चय केला. याच सुमारास डेप्युटी कमिश्नरनी अमरावती शहराचा परकोट पाडण्याचे ठरविले. २८ जून १९०७ रोजी नगर पालिकेची सभा होती. त्यात ह्या विषयावर विचार होणार होता. वामनरावर दादांनी परकोट न पाडण्याविरुध्द दोन हजार नागरिकांच्या सहीचे एक निवेदन या सभेत सादर करुन प्रभावी भाषण केले. सभागृहाबाहेर "वंदे मातरम्" च्या घोषणा होत

होत्या. त्याबद्दल श्री.जयराम पाटील व शामराव देशपांडे यांचे विरुध्द खटला भरण्यात आला व त्यांना अनुक्रमे १ रु. व ८ आणे दंडाची शिक्षा झाली. जनतेच्या तीव्र विरोधामुळे परकोट पाडण्याचा निर्णय सरकारला मागे घ्यावा लागला.

सार्वजनिक सूत्रे दादाकडे :-

अमरावतीच्या सार्वजनिक जीवनाची सूत्रे हळूहळू वामनराव दादाकडे केंद्रीत होत होती. १९०७ साली पंजाबचे लाला लजपतराय यांना सरकारने तुरुंगात डांबले होते. १८ नोव्हेंबरला त्यांची सुटका झाली. त्याबद्दल अमरावतीने दीपोत्सव साजरा केला. १९०८ साली वामनरावदादा यांचेविरुध्द नागपूर येथे खटला भरण्यात आला. त्यामुळे त्यांना काही काळ भूमिगत व्हावे लागले. ते मुंबईला गेले. श्री.काका कालेलकर यांच्या राष्ट्रमत वृत्तपत्रात त्यांनी काही काळ काम केले. याच काळात गुजरात मधील स्वामी आनंद व इतर जहाल कार्यकर्त्यांशी त्याचा संपर्क आला.

गीतेचे तत्वज्ञान आत्मसात केले :

श्री. वामनरावदादाचे सुवाच्य अक्षर आणि शुध्दलेखन लोकमान्य टिळकांना आकर्षक वाटले. त्यामुळे गीता रहस्याच्या छपाईसाठी प्रत देतांना त्यांची हस्तलिखित प्रत तयार करण्यासाठी त्यांनी इतरांबरोबर दादांना सांगितले. गीता रहस्य ग्रंथाच्या प्रस्तावनेत त्याचा उल्लेख आहे. गीता रहस्याची प्रत तयार करताना गीतेचे तत्वज्ञान दादांनी आत्मसात केले व जीवनभर ते आचरणात आणले हे त्यांचे जीवन, चरित्र पाहिल्यानंतर विशेषत्वाने दिसून येते.

बिगार बलुता विरोधी मोहिम :

विदर्भात बिगार बलूता पध्दत चालू होती. सरकारी अधिकारी अगर शेठ सावकार मजुरांना वेठीस धरुन त्यांचे कडून विना मोबदला कामे करुन घेत. तसेच अधिकारी त्यांचे गाडी बैल फुकटात वापरत. हया प्रथेविरुध्द श्री.दादासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली श्री.वामनरावदादा चांनी इतर सहकाऱ्यांच्या मदतीने बिगार बलुता विरोधी मोहीम सुरु केली. त्याचा इतका प्रभाव वाढला की २ फेब्रुवारी १९२० रोजी मध्यप्रदेश सरकारने महार बलुता चौकशी मंडळ नेमले व ही प्रथा बंद पडली.

नेमस्तांनी काँग्रेसला डावलून कौन्सिल निवडणूका लढविण्याचे ठरविले. त्याविरुध्द ३१ जानेवारी १९३० रोजी गणेश थिएटरमध्ये जाहीर सभेत दादांनी अत्यंत जहाल भाषण केले.

गांधी युगास प्रारंभ :-

नागपूर काँग्रेसमध्ये गांधी युग सुरु झाले, असहकार बहिष्कार शांतता मय कायदेभंग इत्यादी कार्यक्रम आखण्यात आले. महात्मा गोधींनी वीर वामनरावदादा यांच्याकडे वऱ्हाडच्या चार जिल्ह्यांत आंदोलनाचा प्रचार व संघटनाची जबाबदारी सोपविली. दादांनी विदर्भात झंझावती दौरा सुरु केला. दादाचे अमोघ वक्तृत्व, कर्तृत्व व स्वार्थत्याग यामुळ विदर्भातील तरुण पिढी भारावून गेली व वामनरावदादा विदर्भाचे भीष्मपितामह बनले.

सरकारी शाळांवर बहिष्कार :-

२८ मार्च १९२० रोजी गोधी चौकात श्री.भाऊसाहेब असनारे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सभेत दादा म्हणाले आमची मुले परतंत्र होतील असे शिक्षण आम्हास तीन पिढ्या पासून देण्यात येत आहे. पालकांनी सरकारी शाळेत मुलांना पाठवू नये. मुलांनीही आपण होऊन शाळा सोडाव्या. मातृभूमीच्या कल्याणासाठी आईबापाची अवज्ञा करणे हे पाप नाही. याच विषयावर २१ जानेवारी १९२१ रोजी ब्रम्हविद्या मंदीरात विद्यार्थ्यांची सभा झाली. या सभेत दादा म्हणाले, ''राष्ट्राच्या आज्ञेनुसार यावेळी शाळा सोडणे हे विद्यार्थ्यांचे कर्तव्य आहे. मात्र १६ वर्षांच्या वरच्या मुलांनी पुढे काय होईत ते होवो असा निश्चय करुनच पुढचे पाऊल उचलावे. या सभेत २०० मुलांनी सरकारी शाळा सोडण्याची प्रतिज्ञा केली. त्यांच्यासाठी १४ फेब्रुवारीला बालाजी मंदिरात राष्ट्रीय शाळा उघडण्यात आली.

मजुरांना आवाहन :-

दि. २० ऑक्टोबर १९२० रोजी वामनरावदादांनी मजुरांची जाहीर सभा घेतली. या सभेत वामनरावदादा म्हणाले, ''पोटभर अन्न, नीटनेटके कपडे व राहण्यासाठी साधारण घर मिळविण्याचा प्रत्येकाला हक्क आहे. त्यासाठी आपण झगडाल तर प्रत्येक राष्ट्रसेवक

तुमच्या पाठीशी उभा राहील, देशातील कच्चा माल, विशेषत: अन्नधान्य रेल्वेत अगर बोटीत भरु नका व बहिष्कार चळवळीला साथ द्या. वीर वामनराव जोशी आपल्या तेजस्वी वाणीने सारा विदर्भ पेटवित होते. शेवटी दिनांक १८ मार्च १९२२ रोजी बेजवाडा येथी अखिल भारतीय काँग्रेस कमेटीच्या बैठकीला जात असता मध्यरात्री यावलखेड जवळ दादांना आगगाडीतच अटक करण्यात आली व अकोला येथे त्यांना आणून १२४ अ कलमाखाली खटला भरण्यात आला. अमरावतीला ही बातमी पोहचताच शहरात स्वयंस्फूर्त हरताळ पाळण्यात आला. त्यांच्या निषेधार्थ वलगावमध्ये प्रचंड सभा होऊन तीत वामनराव जोशी यांना "वीर" ही पदवी देण्याचा ठराव जनतेने क्रांतीचा प्रचंड उद्घोष करुन मंजूर केला. अटकेची बातमी मोठया मुष्किलीने त्यांच्या घरी कळविण्यात आली. दादांची आई अंथरुणाला खिळली व तिची प्रकृतीही खालावत चालली होती. पण दादांच्या अटकेची बातमी समजताच आई म्हणाल्या, "त्याने खटला चालवू नये, पुरावा भरु नये, तुरुंगात जावे, त्याच्या कीर्तीला किंचितही कमीपणा येईल असे काहीही होता कामा नये".

अटकेचा सर्वत्र निषेध :-

श्री.वामनराव जोशी यांच्या अटकेची बातमी कळताच खुद महात्माजी अस्वस्थ झाले. त्यांनी १५ एप्रिलच्या यंग इंडिया मध्ये स्वत:च्या सहीने दादाचे अभिनंदन केले. ९ मे रोजी खटल्याचा निकाल लागला व राजद्रोही भाषण केल्याबद्दल दादांना १८ महिने सक्त मजुरीची शिक्षा ठोठावण्या आली. दादांच्या अटकेचा निषेध करण्या करीता ठिकठिकाणी मिरवणुका काढण्यात आल्या व निषेध सभा झाल्या. त्याबद्दल सरकारने ९० जणांवर खटले भरले. वीर वामनराव दादांना छिंदवाडा तुरुंगात हलविण्यात आले. तिथे रायपूरचे प्रख्यात वकील व पुढे काँग्रेस राजवटीत मुख्यमंत्री झालेले पं. रविशंकर शुक्ला यांनाही आणण्यात आले होते. त्यांचा दादावर सख्या भावाप्रमाणे लोभ होता. पंडीतसाठी रोज नवे फराळाचे सामान व जेवण येई. शुक्लाजींनी त्यातील काही पदार्थ घेण्याचा दादांना मनस्वी आग्रह केला पण सरकारने माझ्या श्रेणीसाठी दिलेल्या सोयी व्यतिरिक्त काहीही घेणे मला योग्य वाटत नाही असे नम्रतेने सांगून त्यांनी पंडितजीसाठी आलेल्या पदार्थाना स्पर्शही करण्यास नम्रतेने नकार दिला.

धैर्याचा महामेरु :-

२३ जुलै रोजी वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली टिळक जयंती साजरी करण्यात आली. असहकाराचा प्रचार मुक्तपणे करता यावा म्हणून वीर वामनरावांना १ ऑगस्ट १९२३ रोजी टिळक पुण्यतिथीच्या मुहूर्तावर ''स्वतंत्र हिंदुस्थान'' साप्ताहिक सुरु केले. पुढे १९३० साली सरकारने त्यांच्या प्रकाशनावर बंदी घातली. याच कालखंडात श्री.वामनरावदादावर दोन निष्ठुर दैवी आघात झाले. दादाचा पहिला मुलगा नारायण अतिशय हुशार व दादांना स्वतंत्र हिंदुस्थानच्या प्रकाशनात सहकार्य करीत असे. डिसेंबर १९२४ मध्ये त्याला प्लेग झाला. त्याला सणसणून ताप भरला होता. त्याचे डोके मांडीवर घेऊन दादा स्वतंत्र हिंदुस्थानचा अग्रलेख लिहीत होते. ''दादा मृत्यू म्हणजे काय हो?'' असे नारायणने विचारले नचिकेताचाच प्रश्न होता तो. दादांनीही तेवढयाच गंभीरपणे मृत्यूचे रहस्य त्याला सांगितले. जीर्ण झालेले कपडे काढून टाकतो व नवे कपडे घालतो तसा आत्मा शरीर टाकून दुसऱ्या शरीरात जातो. तेव्हा मृत्यूला भिण्याचे कारण नाही. ''तू शूर आहेस, मर्दासारखा मृत्यूला सामोरा हो'' एक पिता आपल्या लाडक्या पुत्राला मृत्यूचे हे रहस्य सांगतो. त्यासाठी लागणारे अचाट धैर्य आणि थोरपणासाठी वीर वामनरावदादांसारखा आगळा धैर्यमेरुच हवा.

नाटयलेखन :

२६ डिसेंबर १९२४ रोजी नारायणने शेवटचा श्वास सोडला. स्वतंत्र हिंदुस्थानचा अग्रलेख लिहूनच दादांनी नारायणचे मस्तक मांडीवरुन खाली ठेवले. नारायणच्या मृत्यूला दोन वर्ष लोटत नाहीत तोच ९ फेब्रुवारी १९२६ रोजी दादांचा दुसरा मुलगा हरी याचेही पुणे येथे अपेन्डसायटीसच्या आजाराने निधन झाले. पण या दोन वज्राघातामुळे दादांनी आपल्या देशसेवेत खंड पडू दिला नाही.

या काळात वीर वामनराव दादा नाटके लिहून स्वातंत्र्यक्रांतीचा प्रचार करीत होते. राक्षसी महत्वाकांक्षेतील मृणालिनी , रणदुंदुभीतील तेजस्विनी स्वातंत्र्य लढ्यातील क्रांतीकारक महिलांच्या प्रतीक आहेत त्यांचे अतोनात हाल केले. तापलेल्या सळयांनी डोळयांच्या खापा केल्या व शेवटी हिंसक श्वापदापुढे टाकून प्राण घेतले, पण आपल्या

नेत्याचा पत्ता न देणारी देवांगना व शत्रूला फितूर झालेल्या स्वत:च्या नवऱ्याला किल्ल्याबाहेर रोखून पतित्वाची भुरळ धालशील तर हे कुंकू पुसून पाशातून मोकळी होते असे सांगणारी सरोजिनी दादांनी समाजापुढे उभी कली व देशापुढे कोणतेही इतर नाते क्षुल्लक आहे हा धडा समाजाला शिकविला.

''शूरा मी वंदिले'' '' परवशता पाशदैवे ज्यांच्या गळा लागला'', जगी हा खास वेडयांचा पसारा माजला सारा'' देशद्रोही चोर फीतुरी, हरामखोर, जगी ते पातकी, अघोर, या सारखी पदे करमणुकीपेक्षा राजकीय क्रांतीला आव्हान देणारीच आहेत.

लाहोर कटातील राजबंदीचे उपोषण, जतिंद्रनाथदास यांची आत्माहूति या घटनांमुळे सबंध देश पेटला होता. १ डिसेंबरला श्री. सुभाषचंद्र बोस अमरावतीला आले व वीर वामनराव जोशी यांच्या अध्यक्षतेखाली त्यांनी तरुणांना स्वातंत्र्यलढयासाठी तयार राहण्याचा संदेश दिला. वऱ्हाड स्वातंत्र्य संघाची स्थापना झाली. सामाजिक व आर्थिक समानतेवर आधारलेल्या समाजाची निर्मिती हे ध्येय ठरविण्यात आले.

बापुजी अणे सर्वाधिकारी :-

१२ मे १९३० रोजी नागपूर चे बॅ.अभ्यंकर व वीर वामनरावदादा यांचे जोग चौकात व्याख्यान झाले. त्यावरुन ९ मे रोजी बॅ. अभ्यंकर यांना पकडून अमरावतीला आणले. १ जून रोजी दादा अकोल्याहून येत असता बडनेरा स्टेशनवर त्यांना अटक करण्यात आली. उभय नेत्यांना बघायला अमरावती तुरुंगासमोर प्रचंड गर्दी जमली. यावेळी दादांनी संदेश देतांना क्रांतीची मशाल उंचावत व तेवत ठेवा असा संदेश दिला. उभय नेत्यांना तुरुंगातच प्रत्येकी दोन वर्षाची शिक्षा सुनावण्यात आली.

वामनरावदादांबद्दल सरकारी आकस :-

गांधी-इर्विन करारानुसार सर्व राजबंधांची सुटका झाली पण सरकारने वीर वामनरावदादांना सोडले नाही ते यावेळी शिवनी जेलमध्ये होते. त्यामुळे जनतेत प्रक्षोभ व असंतोष वाढला. दिनांक १६ मार्च रोजी जाहीर सभेत सरकारच्या या धोरणा निषेध करण्यात आला. शेवटी दिनांक १७ मार्च १९३१ ला दादांची शिवनी जेलमधून सुटका झाली. अमरावतीत त्यांचे प्रचंड स्वागत करण्यात येऊन मिरवणूक काढण्यात आली व मानपत्र अर्पण करण्यात आले.

विदर्भ काँग्रेसचे सर्वाधिकारी बनले :-

नोकरशाही दुराग्रहाने गांधी तहनामा पायाखाली तुडवून काँग्रेसला युध्दाचे आव्हान दिले. त्या आव्हानाचा स्वीकार करुन सत्याग्रह सुरु करणे काँग्रेसला भाग पडले. अशा आणिबाणीचे वेळी प्रत्येक स्वातंत्र्य भक्ताने रणांगणात दाखल झाले पाहिजे, काँग्रेसने पुकारलेले युध्द शांततामय असल्याने युध्द संपेपर्यंत स्वातंत्र्याचा आग्रह कायम ठेवला पाहिजे. स्वातंत्र्य लढा चालू राहिला तर इंग्रजांना स्वराज्य देणे भाग पडेल असे पत्रक दिनांक ७ जानेवारीला प्रसिध्द केल. वऱ्हाडातील काँग्रेस कमेट्या तहकुब करुन त्या जागी सर्वाधिकारी नेमले. वीर वामनराव जोशी काँग्रेसचे सर्वाधिकारी बनले.

गांधीजींचा ऐतिहासिक दौरा :-

१९३२ सालाच्या स्वातंत्र्य लढयाची परिणती महात्माजीच्या उपोषणापासून व नंतर हरिजन दौऱ्यात झाली. हरिजन निधीसाठी पैसा व मंदीर प्रवेश या दोन गोष्टींना या दौऱ्यात प्राधान्य होते. वीर वामनरावदादा व श्री. ब्रिजलाल बियाणी यांनी महात्माजींच्या दौऱ्याची आखणी केली व काही धर्ममार्तण्डांचा विरोध असता दौरा अपेक्षेपेक्षा जास्त यशस्वी झाला.

दादांच्या प्रभावाचे दर्शन :-

आता काँग्रेसने निवडणूकी लढविण्याचा निर्णय घेतला. या निवडणुकीची जबाबदारी वीर वामनराव दादा व श्री.ब्रिजलाल बियाणी व लोकनायक बापुजी अणे यांच्यावर होती. काँग्रेस कार्यकर्ते नुकतेच तुरुंगातून बाहेर पडले होते व निवडणुकीचे तंत्र त्यांना नवे होते. त्यामुळे या क्षेत्रात पूर्वीच्या अनुभव असलेल्या पक्षांना समजावून घेण्याचा या नेत्यांनी प्रयत्न केला. त्यात श्री. रामराव देशमुख व त्यांचा राष्ट्रीय पक्ष काँग्रेसशी समरस झाला. पण या क्षेत्रातील जुन्या प्रस्थापित नेत्यांविरुध्द निर्धन अनुभवी काँग्रेस उमेदवारांना लढा देणे कठीणच होते. विशेषत: अमरावतीचे अतिशय लोकप्रिय नेते डॉ. पंजाबराव देशमुख काँग्रेस विरुध्द निवडणूकीला उभे होते. खुद्द महात्मा गांधी त्यांच्या विरुध्द उभे राहिले तरी भाऊसाहेबच विजयी होणार असे सर्वच जण म्हणत पण या विभागात निवडणूकीत काँग्रेसचा उमेदवार नसावा ही नामुष्की होती. म्हणून

श्री. गणेशराव देशमुख यांच्या सारख्या निर्धन अशिक्षित पण कट्टर स्वातंत्र्य सैनिकाला डॉ. पंजाबराव यांच्या विरुध्द उभे करण्यात आले. मतदारांच्या यादीच्या नकला करण्यापासून पंचाईत होती. पण निवडणूक जाहीर होताच काँग्रेस कार्यकर्ते पायी, सायकलवरुन चणे फुटाण्याच्या पिशव्या काखोटीस धरुन प्रचाराला निघाले. वीर वामनरावांच्या वक्तृत्वावर सगळयांचा भार होता पण नेमके याचवेळी सरकारने वीर वामनराव दादांवर भाषण बंदीचा हुकूम बजावला. शेवटी दादा सभेत यावेत पण सामान्य कार्यकर्त्यांनी भाषण द्यावयाचे असा प्रचार सुरु झाला पण दादांच्या नुसत्या दर्शनाने समाजाला स्फूर्ती येई व जनमानस तयार होई. यावेळी डॉ. पटवर्धन यांचे विरुध्दहि १०८ कलमान्वये नोटीस बजावण्यात आली होती. मतदान झाल्यावरहि डॉ. पंजाबराव निवडून आले अशी सर्वत्र अफवा उठली पण प्रत्यक्ष मतमोजणी झाली तेव्हा श्री. गणेशराव देशमुख सारखा सामान्य काँग्रेस सेवक विजयी घोषित झाला व काँग्रेच्या आणि पर्यायाने वीर वामनराव दादांच्या प्रभावाचे दर्शन समाजाला घडले.

पं. नेहरु द्वारा प्रशंसा :-

शेंदूरजनाघाट येथे विदर्भ राजकीय परिषद झाली. वीर वामनरावदादा स्वागताध्यक्ष निवडले. या परिषदेला काँग्रेस सेवादलाचे संस्थापक डॉ. हर्डीकर, किसान सभेचे अध्यक्ष स्वामी सहजानंद व स्वत: पं. जवाहरलाल नेहरु आले होते. अफाट जनसमुदाय जमला होता. त्या परिषदेत दादांनी काँग्रेसची निखालस स्वातंत्र्यनिष्ठ भूमिका त्यासाठी द्यावयाचा शांततापूर्ण लढा आणि करावा लागणारा त्याग यांचा उल्लेख करुन काँग्रेस जनांनी अत्यंत शिस्तपूर्ण वागून राष्ट्रीय सभेची शान राखावी असे आवाहन केल. पं. जवाहरलालजींनी परिषदेची व्यवस्था पाहून प्रशंसोद्गार काढले.

१९४२ चा ऑगष्ट महिना उजाडला. मुंबईच्या काँग्रेस सभेत सर्वकष स्वातंत्र्यलढा सुरु करण्याचा निर्णय झाला व ब्रिटिशांनी भारत छोडो, असे आव्हान देण्यात आले. याप्रसंगी बोलतांना महात्माजी म्हणाले, हा शेवटचा लढा आहे. सरकार सर्व पुढाऱ्यांना पकडून नेईल पण नाउमेद होऊ नका, प्रत्येकजण स्वत: पुढारी आहे असे माना व काँग्रेसच्या कार्यक्रमावर "करो या मरो" या जिद्दीने हा लढा स्वराज्य मिळपर्यंत लढत

रहा. महात्माजींच्या भाषणाकरिता मुंबईला गेलेले नेते आपल्या गावी परत येण्यापूर्वी रस्त्यातच पकडले गेले. वीर वामनरावदादा यांना अगोदरच अटक झाली होती. मुंबई ठरावाची वार्ता काँग्रेस नेत्यांनी गुप्तपणे आणली. स्वातंत्र्य लढयाचा ज्वालामुखी पेटला. सर्व नेत्यांना पकडण्यात आले. यंत्रणेस हादरा बसला. पोलिसांना जमाव रोखणे कठीण जाऊ लागले. अशा स्थितीत अधिकारी श्री. गर्दे अमरावतीच्या तुरुंगात आले व त्यांनी वीर वामनरावदादांना विनंती केल, की जमाव आटोक्या बाहेर जात आहे, आपण कृपा करुन नगर पालिके पर्यंत या व जनतेला कायदा हातात न घेता शांततेने चळवळ करा अशी सूचना द्या श्री.गर्दे यांचीही विनंती वीर वामनराव जोशी यांनी धुडकावून लावली व म्हणाले, ''आता खरे लोकयुध्द सुरु झाले, करो या मरो! हा आमचा निर्धार आहे'' अशा स्थितीत मी जनतेला योग्य अमुक करु नका असे सांगणार नाही. दादांच्या या स्पष्ट उत्तराने श्री. गर्दे साहेब नाउमेद होऊन परत गेले.

वीर वामनरावदादा लोकसभेचे आणि विधानसभेचे सदस्य होते पण तेथील कामकाजात त्यांनी विशेष लक्ष दिले नाही. त्यांनी मध्यप्रदेश विधानसभेत १९५५ साली पहिले व शेवटचे एकच भाषण केले. ते म्हणजे गोवा ते गोंदिया पर्यंत मराठी माणसांच्या संयुक्त महाराष्ट्राच्या मागणीसाठी केलेले भाषण दादांचे हे ओजस्वी भाषण विधानसभेतील शेवटचे भाषण होते.

भारताला स्वातंत्र्य मिळाले पण दादांचे संघर्षमय जीवन संपले नाही सत्तेमुळे समाजात काही दुर्गुण येतात. त्यांच्या विरुध्द दादा सतत झगडत राहिले. दैवी आणि आसुरी संपत्ती व भोगनिष्ठा आणि त्यागनिष्ठा यांच्यातील हा संघर्ष आहे असे वीर वामनराव सांगत आणि ज्यांची सर्वस्व त्याग करण्याची तयारी असेल त्यांनाच माझे बरोबर यावे असे सांगतांना ते म्हणत,''कबीरा खडा बजार मे लीये लगुडा साथ, जा घरफुके अपना चले हमारे साथ'' वीर वामनरावांचे हे धोरण प्रांतिक काँग्रेसमधील सत्तानिष्ठ नेत्यांना पसंत पडणे शक्यच नव्हते. निमित्त काढून वामनरावांना काँग्रेस मधून काढण्याचा मनसुबा रचला. पण सरदार पटेल आणि इतर काँग्रेस श्रेष्ठांना त्यामुळे संताप आला आणि त्यांनी प्रांतिक नेत्यांना कळविले की, जहाँ वामनराव जोशी रहेंगे

वही काँग्रेस होगी! बेरार मे काँगेस वामनरावजी से अलग नही हो सकती! इतकेच नव्हे तर पंतप्रधान पंडीत जवाहरलाल नेहरु यांनी वीर वामनरावांच्या देशसेवेबद्दल सन्मानधन म्हणून पाच हजार रुपये पाठविले. पण ''स्वातंत्र्यलढयात माझ्यापेक्षाही दरिद्री देशभक्तांनी असीम त्याग केला आहे तेव्हा मला दिलेले हे सन्मानधन त्यांना वाटून देण्यात यावे '' असे विनयपूर्वक कळवून दादांनी पैसे परत पाठविले. दादांच्या श्रीमंतीचा केवढा हा अमोल दाखला!

२१ मार्च १९५६ रोजी श्रीमती इंदिरा गांधी अमरावतीला आल्या होत्या. जोग चौकातील सत्कार सभेत दादांनी ''तुम्ही भारताच्या सर्व श्रेष्ठ नेत्या व्हाल'' असा त्यांना आशीर्वाद दिला. पुढे वीर वामनरावाच्या रजत जयंतीच्या प्रसंगी बाबू राजेंद्रप्रसाद मुद्दाम आले. त्यावेळी प्रचंड मिरवणूक जाहीर सभा झाली.

त्या सभेत राजेंद्र बाबूंनी वीर वामनराव दादांचे अतिशय गौरवपूर्ण शब्दात स्वागत करुन आशीर्वाद दिला.

असा हा थोर देशभक्त जून १९५६ मध्ये इहलोकीची यात्रा संपवून परलोकी गेला. दादांचे नाव अमर झाले. आले शिरावरी जरी घनघोर घाले. दारिद्रय दु:ख अपमानहि प्राप्त झाले, कारागृही सतत वास जरी असेल पूजीनहि तरी हि निर्भय मातृभूमि.

स्वर्गीय दे.भ. वीर वामनराव दादा

क्रांतीकार्याचा परिचय :

स्व.दे.भ.वीर वामनराव दादा यांचे जन्मभूमि आणि कर्मभूमी अमरावती नगरी होय. आत्यंतिक दारिद्रयामध्येही त्यागाच्या परमोच्च बिंदूचे मूर्तीमंत प्रतीक म्हणजे वीर वामनराव दादा होत. अशा विपन्न अवस्थेतील त्यांची देशसेवा म्हणजे एक महान तपश्चर्याच!

दादांचे जीवन जरी शिक्षक पेशाने सुरु झाले असे दिसून येते, तरी ते आपल्या ऐन तारुण्यात लोकमान्य टिळक भक्तांच्या गुप्त मंडळयांशी संबंधित होते असे आता उपलब्ध झालेल्या माहिती वरुन दिसून येते.

इ.स. १९०२ साली अमरावतीच्या सरकारी हायस्कूल मधून नापास झालेल्या विद्यार्थ्यांनी (त्यात बाबासाहेब खापर्डे हेही होते.) कै. दादासाहेब खापर्डे यांना विनंती करुन एक खाजगी हायस्कूल त्यावर्षी अमरावतीत सुरु केले होते. या हायस्कूल व शिक्षकांत व्यायाम शिक्षक म्हणून आलेले पुण्याचे श्री. भिडे गुरुजी उर्फ भटजी हे होते. हे भिडे गुरुजी म्हणजे १८९७ साली पुण्याला रॅन्ड साहेबांना मारणाऱ्या सोबत्यांपैकी एक होते. आणि अर्थातच टिळक भक्तांच्या गुप्त मंडळात त्याचा सतत संपर्क होता.

पण हे खाजगी हायस्कूल दोन वर्षात बंद पडले. याच सुमारात म्हणजे दि. ५ ऑगष्ट १९०५ पासून वंगभंग चळवळ निमित्त वंगभंग दिन पाळण्याची सुरवात झाली. अशा काळात विद्यार्थी हा आघाडीवर असायचा अशा सभांना विद्यार्थी हजर रहात. ही गोष्ट तत्कालीन इंग्रज अधिकाऱ्यांना मुळीच पसंत नव्हती. म्हणून त्याकाळी वऱ्हाडातील शाळा खात्याचे जे मुख्य अधिकारी क्लीन्हलँड म्हणून एक इंग्रज होते त्यांनी एक परिपत्रक काढून '' जे विद्यार्थी या आंदोलनाशी संबंध ठेवतील त्यांना सरकारी शाळेत किंवा वसतीगृहातून काढून टाकले जाईल''. अशी धमकी दिली होती. या परित्रकाचा परिणाम विपरित झाला. विद्यार्थी उत्तेजित झाले आणि त्यांनी सरकारी शाळांवर बहिष्कार टाकला.

त्यामुळे साहजिकच या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचे नुकसान होऊ नये म्हणून, त्याकाळचे अमरावतीचे वऱ्हाडचे नेते श्री.दादासाहेब खापर्डे यांच्या नेतृत्वाखाली अमरावतीला राष्ट्रीय शाळा काढण्यात आल्या. शाळेचे संचालकात दादा साहेबांन शिवाय वीर वामनराव जोशी, व्ही.के.काळे, वाय.जी. केतकर, असनारे वकील हे होते.तसेच श्री.मुधोळकर, श्री. मारोपंत जोशी वगैर वकील मंडळीनी त्यांना सहकार्य केले होती.

मध्यप्रांत वऱ्हाडातील हीच पहिली राष्ट्रीय शाळा होय. राष्ट्रीय शाळा आणि स्वदेशी आंदोलन हीच स्वराज्य आंदोलनाची मुख्य शस्त्रे होती.

याच शाळेचे शिक्षक म्हणून वीर वामनराव, ल.रा पांगारकर ही राष्ट्रीय वृत्तीची मंडळी कार्य करीत असत.

इ.स. १९०८ साली वीर वामनराव दादांची व्याख्यानेही होत. त्या व्याख्यानामुळे पोलीस खाते हैराण होत होते. त्याच वर्षीचे गणेशोत्सव कार्यक्रमांत नागपूरला दादांचे जे व्याख्यान झाले ते राजद्रोही ठरवून दादांना मॅजिस्ट्रेट समोर हजर करण्यात आले आणि उत्तम वागणुकीसाठी जामीन मांगण्यात आला. तेव्हा दादांनी ''मी कोणताच अपराध केला नाही आणि मी जमानतही घेणार नाही'' असा रोख ठोक जबाब मॅजिस्ट्रेटना दिला. म्हणून त्यांना नागपूरचे तुरुंगात पाठविण्यात आले.

काही दिवसांनी दादाचे मित्र श्री. दुराणी वकील ह्यांनी जमानत देऊन दादांना तेथून सोडवून आणले.

इ.स. १९०८-९ चे सुमारास पैशाअभावी ही अमरावतीची राष्ट्रीय शाळा बंद पडण्याचे अवस्थेत आली. तेव्हा वीर वामनराव दादांचे नेतृत्वाखाली तेथील शिक्षकांनी ती शाळा चालवायला घेतली. पण या शाळेवर सरकारची करडी नजर होतीच. पुढे श्री. ल.रा. पांगारकर ह्यांनी या शाळेचे मुख्याध्यापकत्व पत्करुन काही काळही शाळा चालू ठेवली होती पण १९१०-११ चे सुमारास ही राष्ट्रीय शाळा बंद पडली.

हया राष्ट्रीय शाळेच्या सुरुवातीचे वर्ष-दोन वर्षातच अमरावतीत एक प्रकरण घडले. ते म्हणजे अमरावती शहराचा परकोट पाडण्याचे इंग्रजांचे कारस्थान. त्यासाठी अमरावती नगरपालिकेचे सभागृहात तत्कालीन हे कमिश्नराचे सुचनेवरुन नगरपालिकेच्या सभेत परकोट पाडण्यासंबंधी लोकमत जाणून घेण्यासाठी एक नागरिकांची सभा २८ जून १९०७ रोजी भरली होती. त्यावेळी ''हा परकोट पाडू नये'' अशा आशयाचे दोन अजार सहयांचे चौदा अर्ज वीर वामनरावदादांनी सभेचे अध्यक्षांना सादर केले होते. सभेला देखील नागरिकांची प्रचंड गर्दी होतीच. या सभेचे अध्यक्ष होते श्री.ओंकारजी. नंतर श्री. डोळे यांनी ''गावची सैफिल पाडू नये'' असा ठराव मांडला त्यात, कर्तव्याचे संपादक श्री. सांगाण्पा गुराण्पा आणि वीर वामनराव दादा यांनी जोरदार पाठिंबा व्यक्त केला. ठराव सर्वानुमते मंजूर झाला.

याला दादासाहेब खापर्डे यांची फूस आहे या शंकेने तत्कालीन इंग्रज कमिश्नरांनी शेवटी दादासाहेबांचे म्यु. उपाध्यक्षत्व व सभासदत्व रद्द केले त्याच दिवशी वंदे

मातरम्च्या रस्त्यावर घोषणा दिल्याबद्दल श्री जयराम पाटील व श्री शामराव देशपांडे यांना अटक करण्यात येऊन खटला झाला.

वीर वामनराव दादांचा क्रांती कार्याशी संबंध १९०४ मध्येच आला असे दिसते. पण त्यांचे सार्वजनिक कार्याची सुरुवात वरील सभेत गांवातील लोकांचे अर्ज सादर करण्याने व ठरावास पाठिंबा देणे या पासून सुरु झाल्याचे दिसून येते.

इ.स. १९०८ सालीच लोकमान्य टिळकांना सहा सर्षे शिक्षा होऊन त्यांना मंडाले तुरुंगात पाठविण्यात आले आणि १९०८ ते १९१४ या काळांत देशाची स्थिती मोठी विचित्र झाली. राष्ट्रीय काँग्रसवर मवाळांची पकड होती व तिचे तेज एक प्रकारे लुप्त झाले होते. पण दुसरीकडे १९०५ च्या वंगभंगाचे चळवळीवून निर्माण झालेल्या क्र ांतीकारकांच्या संघटना व महाराष्ट्रातील लो. टिळकांच्या सशस्त्र क्रांतीकारी गुप्त संघटनांच्या हालचाली सुरु होत्या व त्याचा परिणाम देशातील राष्ट्रीय वृत्तीचे तरुणावर होतच होता.

वीर वामनराव दादा हे या गुप्त मंडळयाशी संबंधित होतेच. या संबंधीचा अधिकृत उल्लेख आता उपलब्ध झालेला आहे. वर्धा, नागपूर, यवतमाळ प्रमाणेच अमरावतीला गुप्त संघटना होती. दादासाहेब खापर्डे यांचा ह्या गुप्त मंडळीत आधार वाटत असे. वामन गोपाल उर्फ वीर वामनराव, शामराव प्रल्हाद देशपांडे भाऊसाहेब दुराणी, विष्णु केशव पालेकर उर्फ अप्रबुध्द,रंगनाथ तिखे वगैरे मंडळी स्वातंत्र्य लढयासाठी प्रयत्न करीत असत. त्या काळात नेमस्त किंवा मवाळ पुढारी म्हणून ओळखले जाणारे अमरावतीचे वकील मोरोपंत जोशी यांचाही या प्रकारच्या उलाढालीशी संबंध होता. चाफेकर बंधूचे एक सहकारी दामोदर बळवंत भिडे गुरुजी उर्फ भटजी हे बंड फ सल्यानंतर काही वर्षे अमरावतीला व्यायाम शिक्षक म्हणून काम करीत होत. शामराव देशपांडे, वीर वामनराव जोशी आणि त्यांच्या मित्रांशी भिडे गुरुजी उर्फ भटजी यांची मैती जमली. नागपूरशी संपर्क राखला होता. विष्णुपंत पाळेकरांनी अमरावतीच्या विष्णूपंत लेले यांच्या मार्फत अरविंदांची भेट घेतली होती आणि आठ ब्राऊनिंग पिस्तुले प्राप्त केली. काडतुसे मिळविली होती. त्यानी काही पिस्तुले मोरोपंत जोशी यांच्या घरी सुरक्षित जागी ठेवली होती.

१९०३ साली वऱ्हाड-नागपूरातील गुप्त मंडळ्या, पुण्यातील गुप्त मंडळी, आणि नाशिकची अभिनव भारत ही गुप्त संघटना याच्या निवडक प्रतिनिधीची एक बैठक, भिडे गुरुजी उर्फ भटजी यांनी घेतली होती, या बैठकीत वीर वामनराव जोशी, शामराव देशपांडे, दुराणी व पाळेकर हे जसे हजर होते तसेच धुळ्याचे विष्णू सीताराम उर्फ अण्णासाहेब रणदिवे, विनायकराव सावरकर व विष्णुपंत भट हेही उपस्थित होते. या गुप्त मंडळीचे कार्यात एक सूत्रीपणा आणावा. काही समान कार्यक्रमाचे आधारावर एकमत झाले तर पहावे असा भटजींचा प्रयत्न असावा. पण त्याला यश आले नाही. ''त्यावेळी सावरकरांचे व आमच्या मंडळीचे जमले नाही'' असे वीर वामनराव जोशी यांनी एका खाजगी पत्रात म्हटले आहे.

''.....नऊ एप्रील १९०९ रोजी हिंमतलाल रामचंद्र द्विवेदी उर्फ स्वामी आनंदानंद नावाच्या अवघ्या सोळा-सतरा वर्षे वयाच्या साधूस अमरावतीस अटक करण्यात आली.'' तरुण हिंदू नावाचे साप्ताहिक चालवीत असे भगवी कफनी घालणारा मुलगा होता. त्याची मातृभाषा गुजराती असली तरी तो इंग्रजी व मराठी या दोन भाषांत बोलत असे. पुढे हिंदुस्थानच्या गुप्तचर विभागाचे संचालक झालेले क्लीव्हलॅण्ड साहेब या काळांत वऱ्हाड- मध्ययुग प्रांतात बादशहाच्या सरकारची चाकरी चोख बजावित होते. आनंदानंद नावाने भगव्या वस्त्रात वावरणारा मुलगा हा वीर वामनराव जोशी, दुराणी वगैरेचा हस्तक आहे हे क्लीवलँड साहेबांनी ताडले....

''लो. टिळकांचे एकनिष्ठ भक्त व त्यातही लोक. टिळकांच्या क्रांतीकारक गटाचे एक घटक म्हणून त्यांची (वीर वामनराव दादांची) माहिती झाली व अंजनगांव (सुर्जी) पासून अमरावती पर्यंत पावसाळ्याच्या गडद अंधाऱ्या रात्री चिखल तुडवीत क्रांतीकारकांच्या सभेला ते येत व रातोरात परतही जात. त्यांचा तो कणखरपण व क्रांतीकारी कृतीचे त्यांनी केलेले श्लोकहि आमच्या लहानपणचे आकर्षण असे. लो. टिळकांच्या या आघाडीचे प्रमुख सर्वश्री काकासाहेब खाडीलकर , देशपांडे व वामनराव जोशी हे होते असे स्वतंत्र हिंदुस्तानचे माजी उपसंपादक श्री. बाबासाहेब वैद्य यांनी आपले एका लेखात (केसरी सोलापूर २८-७-८५) म्हटले आहे.

(गुप्त क्रांतीकारकांची माहिती देणारी कागदपत्रे आता चिकित्सक अभ्यासकांसाठी सरकारने उपलब्ध करुन दिली. त्यावरुन तयार झालेल्या डॉ.य.दि.फडके यांच्या ग्रंथातील प्रकरणातून उल्लेख केला आहे.पण खुद्द वीर वामनराव दादांनीच आपले भाषणातून त्यांचा गुप्त क्रांतीकार्याशी संबंध होता हे सांगितले आहे.)

विदर्भ प्रांतिक काँग्रेस तर्फे दि. ५ व ६ फेब्रुवारी १९३८ रोजी मोर्शी तालुक्यातील शेंदुरजनाघाट या वऱ्हाडच्या उत्तर सीमेवरील गांवी जी परिषद आयोजित केली होती व ज्या परिषदेचे अध्यक्ष बाबूराव रामचंद्र घोष व प्रमुख अतिथी म्हणून पंडीत जवाहरलाल नेहरु हे उपस्थित होते. त्यावेळी स्वागताध्यक्ष म्हणून वीर वामनराव दादांनी केलेल्या भाषणात ''पस्तीस वर्षापूर्वी'', जेव्हा ''स्वातंत्र्य'' हा शब्द जाहीरपणे वर राहेच पण एकांतातही मुखावाटे नुसता शब्द उच्चारणे सुध्दा कठीणच नव्हे तर जवळ-जवळ अशक्य होते, तेव्हा त्या अंध:कारमय, भीषण व धूसर काळी एका अस्सल व नि:स्सीम स्वातंत्र्य वीराने या नावाच्या दीन दुबळ्या क्षेत्रात मोठया हिंमतीने स्वातंत्रवृक्षाचे बीज रोवले व आजन्म आपल्या तेजस्वी आत्मत्यागाचे पुण्य जीवन घालून त्यास अंकुर दिले व पालविले. ती गोष्ट कोणास फारशी माहीत नसली तरी मला माहीत आहे. १९०३ साली अमरावती येथील स्वातंत्र्यधर्माच्या गुप्त केंद्रासना समोर एका हातात गीता व दुसऱ्या हातांत खड्ग धारण करुन परमेश्वराच्या साक्षीने स्वदेशास स्वातंत्र्य प्राप्त करुन देण्यासाठी सर्वस्वाचे बलीदान करण्याची घनघोर प्रतिज्ञा मोर्शी तालुक्यातील ज्या स्वातंत्र्य वीरोनी प्रथम केल व ती एकनिष्ठेने पाळली त्यांच्यापैकी कै. कन्हैय्यालाल तांबी हे एक अव्वल दर्जाचे कर्तबगार सेनानी होते'' असे म्हटले होते. ---अर्थात -- गुप्त क्रांतीकार्यासाठी प्रतिज्ञा घेणारांत दादाही होते हे ओघाने येतेच.

कै. आचार्य त्र्यंबक गुरुजींनीही आपली आठवण सांगतांना म्हटले होते की, इ.स. १९०६ चे सुमारास शस्त्रास्त्रे जमवून सशस्त्र क्रांतीची उभारणी करण्याचा प्रयत्न अमरावती, अकोला, वरुड व आकोट हया ठिकाणाहून झाला होता. त्याचे प्रत्यंतर, आकोटाचे राष्ट्रीय शाळेत कार्य करण्यास गेलो असतांना, तेथे शिक्षक म्हणून काम करीत असलेले रामप्रसाद बन्सीधर वैद्य व वासुदेवराव आष्टीकर यांचेपासून माहिती

घेऊन ज्या जागी ही शस्त्रास्त्रे लपविली होती त्या खोल अंधाऱ्या विहीरीत प्रल्हाद जगन्नाथ जोशी हयांस उतरवून खात्री करुन घेऊन आले. त्या उठावणीचे नेतृत्व वीर वामनराव जोशी यांचेकडे होते. पण संघटनेतील काही लोकांनी फितुरी केल्यामुळे ही उठावणी गर्भातच लुप्तप्राय झाली.

वीर वामनराव दादांच्या कार्याची तसेच एक राष्ट्रीय नाटककार म्हणून त्यांच्या जीवनाची माहिती वेळोवेळी प्रसिध्द झालेली आहेच. या लेखात मी त्यांच्या तरुण वयातील क्रांतीकार्याचा अल्पसा परिचय करुन देण्याचा प्रयत्न केलेला आहे.

या लेखात वर स्वामी आनंदानंद यांच्या व त्यांच्या ''तरुण हिंदु'' सामाहिकाचा उल्लेख आलेला आहे. हे तरुण हिंदु सामाहिक कै. दे.भ. नानासाहेब बामणगांवकर काढत असत. नाव स्वामींचे तसेच ''विष्णुपंत लेले'' हे नाव वर आलेले आहे. हे विष्णुपंत लेले म्हणजे अमरावतीचे एक क्रांतीकारक व योगी. आणि योगी अरविंदाचे गुरु म्हणून प्रसिध्द होते.

संदर्भ- १ ते ४ क्रांतीके वरण : प्रयागदत्त शुक्ल:१९५९.

५ अमरावती शहराचा इतिहास.

६ लोकमान्य टिळकांच्या गुप्त मंडळ : सी. फडके केसरी - सोलापूर २८-७-८५.

७ ते ९ दै. हिंदुस्थान दिवाळी विशेषांक: १९७२.

८ स्वागताध्यक्ष भाषण. शेंदूरजनाघाट १९३८.

बॅ. रामराव उपाख्य अण्णासाहेब देशमूख - कर्तृत्वाने सजलेला जीवनपट

यांचा जन्म पिंपळोद, ता. दर्यापूर, जि.अमरावती येथे दि. २५-११-१८९२ रोजी झाला. हे उच्चविद्या विभूषित होते. हायस्कूलचे शिक्षण अमरावती येथे झाल्यावर त्यांना शिक्षणाचा ध्यास लागला. त्यांनी मँचेस्टर (लंडन), सेंट कॅथराईन कॉलेज,(केंब्रीज) येथे उच्च शिक्षण घेतले. त्यांनी एम.ए., एल.एल.बी., बार ॲट लॉ, हया पदव्या प्राप्त केल्या होत्या. ते कृषितज्ञहि होते. शिक्षणाचा ध्यास असल्यामुळेच त्यांनी दर्यापूर येथे

प्रबोधन महाविद्यालयाची स्थापना केली. सतत विविध चळवळीत त्यांनी सक्रिय सहयोग दिला. त्यामुळे त्यांना जी अधिकार पदे प्राप्त झाली, त्यांची जंत्री पाहिली तरी मन थक्क होते.

सदस्य :- बॅ. अण्णासाहेब देशमुख मध्यप्रांत व वऱ्हाड लजि. कौंसिलचे तीन वेळा आमदार होते. (१९२०, १९२७, १९३७) १९२७- २८ साली ते केंद्रीय विधान मंडळात सभासद होते. खासदार म्हणून त्यांची नियुक्ती झाली. भारतीय संसदेत १९५२ ते १९६४ पर्यंत राज्यसभेत खासदार होते. मध्य प्रांतात ते तीन वेळा मंत्री राहिले. (इ.१९२७, इ. १९२९, इ. १९३७). ऑ.इं.कॉं.क.चे इ. १९२१ ते २५, आणि इ. १९२७ साली सदस्यही अमरावती डि. कौंसिल चे इ. १९२५ साली अध्यक्ष होते. व्हॉइसरॉय यांच्या नॅशनल डिफेन्स कॉंसिल चे इ.१९४०-४१ मध्ये सभासद होते. महाराष्ट्र बाहेरहि त्यांचे कर्तृत्व विख्यात होते. सोंढूर(म्हैसूर) च्या महाराजांचे ते इ. १९३५ ते ३७ या कालखंडात पोलीटिकल ॲडव्हायझर होते. इ. १९३९-४१ मध्ये देवास महाराजांचे पोलीटिकल मिनिस्टर होते. ग्वालियर संस्थानात इ. १९४१ ते ४४ अर्थमंत्री होते. रेवा स्टेट चे इ. १९४७ ते ४८ या काळात पंतप्रधान होते. इ. १९४५ ते ४७ या काळात भारताचे द. आफ्रिकेतील हायकमिश्नर होते. आणि संयुक्त राष्ट्रसंघात भारताचे प्रतिनिधी मंडळ इ. १९४६ साली गेले त्या प्रतिनिधी मंडळाचे बॅ. अण्णासाहेब सदस्य होते. इ. १९४९ ते ५२ या काळात रिझर्व्ह बँक चे संचालक मंडळात होते. इ. १९५५ ते १९६५ पर्यंत ते इंडियन फायनान्स कॉर्पोरेशन चे सदस्य होते. तसेच महाराष्ट्र स्टेट फायनान्स कॉर्पो. चे सदस्य होते. स्टेट इंडस्ट्रियल फायनान्स कॉर्पो. चे सदस्य होते. मॅप्को, सिडको या शासकीय मंडळांचे संचालक राहिले. मँगनीज अँड आयर्न ओअर, सोंलूर, कर्नाटक चे संचालक होते. विदर्भ पेपर मिल्स, कन्हान चे अध्यक्ष होते. रुक्मिणी मेटल्स, दिल्ली चे संचालक होते. अमरावती जिनिंग अँड प्रेसिंग, सहकारी सूतगिरणी यांचे अध्यक्ष होते. विदर्भ विभागीय सहकार बोर्ड अमरावती, विदर्भ सहकारी मुद्रणालय, अमरावती यांचे अध्यक्ष होते. कॅप्रोटॅन्स चे अध्यक्ष होते. कृष्णा सहकारी साखर कारखाना, सातारा चे संचालक होते. बृहन् महाराष्ट्र साखर कारखान्याचे संचालक होते. ओगले ग्लास वर्क्स चे संचालक

होते. याप्रमाणे अनेक महत्वाच्या आर्थिक प्रतिष्ठानांमध्ये ते महत्वपूर्ण पदे भूषवीत असत.

शिवाय सामाजिक चळवळी कडेहि त्यांचे अवधान होते. ते अखिल भारतीय मराठा परिषदेचे अध्यक्ष होते. विदर्भ शेतकरी सभेचे अध्यक्ष होते. हिंदू मिशन सोसायटी, अमरावतीचे अध्यक्ष होते. संयुक्त महाराष्ट्र परिषद, मुंबई चे इ. १९४८ मध्ये अध्यक्षपदी होते.

महाराष्ट्र परिषदेचे १९२५ मध्ये अध्यक्ष होते. बॉम्बे को-ऑपरेटिव्ह कॉन्फरन्स चे अध्यक्ष होते. त्याचप्रमाणे त्यांचे राजकीय जीवनहि समृध्द असून डेमॉक्रॉटिक स्वराज्य पार्टी कॉन्फरन्स चे १९३३ मध्ये अध्यक्ष होते. अतिशय विश्वासू व्यक्तीला विश्वस्त नेमतात. व त्यांच्यावर त्या त्या संस्थांचा पूर्ण विश्वास असतो. त्या संस्थेची भरभराट व विकास असतो. बॅ. अण्णासाहेब देशमूख ज्या संस्थांचे विश्वस्त होते, त्या संस्था उर्जीतावस्थेत आल्या. अशा संस्थांपैकी किंग एडवर्ड मेमोरियल मराठा एज्यु. फंड, प्रबोधन हायस्कूल, दर्यापूर, टिळक मेमोरियल पर्स फंड, टिळक मंदीर ट्रस्ट, पुणे, बेरार किंग एडवर्ड मेमोरियल सोसायटी, पुणे. विद्यार्थी गृह, ह्या प्रमुख संस्था होत. त्यांनी शैक्षणिक संस्थेचा फार चांगल्या पध्दतीने विकास घडवला. प्रबोधन विद्यालय,दर्यापूर, शिवाजी शिक्षण संस्था या संस्था त्यांच्या शैक्षणिक कार्याची पावती देतात. त्यांच्या त्या आचाट कर्तृत्वामुळे त्यांना भारत सरकारने मा. राष्ट्रपति डॉ. व्ही.व्ही. गिरी यांच्या हस्ते सर्वोच्च बहुमानदर्शक पद्मभूषण हा सन्मान दिला. संयुक्त महाराष्ट्रासाठी झालेल्या चळवळीत त्यांनी हिरीरीने प्राण ओतला. विचारसरणीच्या दृष्टीने पाहिले तर ते निष्ठावंत टिळकानुयायी वऱ्हाड चे टिळक पंचायतन अशा मथळ्याचा एक फोटो प्रकाशित झाला होता. त्यात स्व. दादासाहेब खापर्डे, बॅ. रामराव देशमूख, वीर वामनराव जोशी, दे.भ. नानासाहेब बामणगावकर, ह्या व्यक्ति होत्या . परंतु बॅ. रामरावांचा गांधीजींच्या नेतृत्वाविषयी वाद झाला नाही. पं.जवाहरलाल नेहरु, इंदिरा गांधी, श्री. जयंतराव टिळक, बाबासाहेब खापर्डे या साऱ्यांशी त्यांचे मैत्रीपूर्ण संबंध होते. प्रबोधन विद्यालयाच्या उद्घाटन प्रसंगी त्यांनी स्व.लोकमान्य टिळकांचा फोटो अग्रभागी लावला होता.

बॅ.धनंजयराव गाडगीळ, स्व.सी.डी.देशमुख, उद्योगपती शंतनुराव किर्लोस्कर इ. व्यक्तींशी त्यांचा घनिष्ट संपर्क होता. ना.भा.खरे मंत्री मंडळात ते बांधकाम खात्याचे मंत्री होते. तेव्हा त्यांचे ना. खऱ्यांशी फार चांगले संबंध होते. कर्तृत्ववान व्यक्तींबद्दल त्यांच्या मनात आदर होता. स्व.दादासाहेब खापर्डे यांचा अमरावतीत कॉर्पोरेशन जवळ पुतळा बसविण्यास व त्याच्या उद्घाटनासाठी मा.राष्ट्रपति डॉ.राजेंद्रप्रसाद यांना येथे उपस्थित ठेवण्यात बॅ.रामराव देशमूख यांचा फार महत्वाचा सहभाग होता. खापर्डे स्मारक कमिटीत त्यांनी फार मोलाचे कार्य केले. बापूजी अणे यांना ते फार मान देत. संयुक्त महाराषट्राच्या निर्मितीत त्यांचा फार महत्वाचा वाटा होता. सहकार क्षेत्रात त्यांना महर्षि पदवी शोभेल. स्वत: टिळकाईट असल्यामुळे टिळकांच्या प्रतियोगी सहकारितेचे पुरस्कर्ते होते. व ह्याच भूमिकेतून त्यांनी सी.पी.अँड बेरार प्रांतात खापर्डे वगैरे मंडळींना लेजिस्लेटिव्ह कौंसिल निवडणुकीत मदत केली. स्वत: उभे राहिले व निवडूनहि आले. प्रसंगी गांधीजींचा रोष त्यांना पत्करावा लागला. १९२५-२६ सालचा बेरार लँड रेव्हेन्यू ॲक्ट यांनी तयार करुन दिला होता. विदर्भाला त्यांनी अत्यंत सुजाण सुबुध्द, प्रतिभावान, सुसंस्कृत नेतृत्व दिले. चिंतनशीलता, व्यासंग, विचारातील सुस्पष्टता, स्पष्ट वक्तेपणा, निस्पृहता हे त्यांच्या वक्तृत्वाचे विशेष होते, लोकमान्यावरील अव्यवहारी निष्ठा त्यांच्या वडिलांकडूनच त्यांना प्राप्त झाली होती. ती त्यांनी आमरण जोपासली. त्यांच्या सोंडूर, देवास, ग्वाल्हेर, येथील दिवाणगिऱ्या, मध्य प्रांतातील मंत्रीपद, राज्यसभेतील खासदार पद, इ. पदे सांभाळताना त्यांनी उतुंग मूल्यनिष्ठा जपली. त्यांनी प्रखर राष्ट्रवाद पुरस्कारिला. त्यांनी त्यांच्या चारित्र्याचा ठसा त्या कार्यावर उमटविला. नवीन काळातील आवश्यक दृष्टि त्यांनी दूर केली नाही. लोकमान्यांच्या पश्चात ते गांधीजींकडे झुकले, तथापि टिळकपंथाचा झुंझारपणा लढाऊपणा, कणखरपणा त्यांनी सोडला नाही. त्यांनी आपसातील संकुचितभावाचा निषेध केला. एकदा एका प्रसंगी त्यांनी स्वत:ला मी दादासाहेब खापर्डे यांचा शिष्य आहे असे म्हटले; तर यवतमाळला लोकनायकांच्या पुतळ्याच्या उद्घाटन प्रसंगी जयंतराव टिळक तेथे उपस्थित होते, मी जयंतरावांप्रमाणे लोकमान्यांचा परात्पर अर्थाने नातू आहे कारण

मी लोकनायक बापूजींचा शिष्य आहे; असे स्पष्ट केले. विनम्रता हा त्यांचा सस्वभावविशेष होता. एकदा पद्मश्री दाजी साहेब पटवर्धन ह्यांनी त्यांना प्रश्न केला की, तुम्ही टिळकाईट असूनहि जवाहरलालजींनी आफ्रिकेतील भारतीय राजदूत म्हणून निवड कशी केली? त्यावर बॅ.रामरावांनी सांगितले की जवाहरलालजी मला म्हणाले, की आफ्रिकेतील हिऱ्यांच्या तेजाला बळी न पडणारा माणूस मला तेथे पाठवायचा आहे म्हणून मी तुमची निवड केली. साधन सुचिता हे बॅ.अण्णा साहेब देशमुख यांचे जीवनव्रत होते. एखाद्या कर्मयोग्याप्रमाणे निष्कलंक राहून त्यांनी देशसेवा केली. मंत्रीपद स्वीकारतांना त्यांनी सत्ता हे स्वराज्याची एक पायरी मानली. स्वराज्य प्राप्तीचे साधन मानले. सत्ता हे ध्येय मानले नाही. त्यामुळे अलिप्त वृत्तीने त्यांनी त्या पदांचा क्षणात त्याग केला. म.प्र.सरकारने कापसावर कर लावताच ते सत्तेविरुध्द दंड थोपटून उभे राहिले. स्वातंत्र्य प्राप्ती नंतर ते राजकारणाच्या गदारोळात न उतरता. शांतपणे विधायक स्वरुपाचे शैक्षणिक कार्य करीत राहिले. ते राष्ट्रीय स्वरुपाचे भारतीय नेते होते. अमरावतीने भारताला नेतृत्वाची परंपरा दिली. अमरावतीच्या नागरिकांनी आपल्या या इतिहासाचा अभ्यास करावा. अण्णासाहेबांसारखा स्वच्छ चारित्र्याचा नेता सामान्य बहुजन समाजातून निर्माण व्हावा व झळकावा, हीच त्यांना खरी श्रध्दाजली ठरेल. स्वार्थ व लाचारी त्यांना कधी शिवलीच नाही. सार्वजनिक जीवन मूल्यांना त्यांच्या वर्तवणुकीने अर्थ प्राप्त झाला होता. ते कठोर नाही, पण सौम्य प्रमाणात धर्मनिष्ठ होते. रामरक्षा पठन, रामदासांचे श्लोक पठन करीत. सोमवारी उपवास करीत. हा उपवास वडीलोपार्जित आहे परंपरागत आहे, या निष्ठेने ते पाळीत. ते भंपकबाजीपासून दूर राहिले. असहकार आंदोलन विदर्भात ज्या नेत्यांनी राखले, त्यात बॅ.अण्णासाहेब हे हि एक अग्रगण्य नेते होते. सी.पी.अँड बेरार प्रांतात राजकारणात मराठी विभागाची जी पिछेहाट झाली होती, ती थोपविण्याची धुरा ना.भा.खरे व बॅ.रामराव देशमूख यांच्यावर होती ती त्यांनी समर्थपणे सांभाळली. हया प्रसंगातून जे खटके उडाले, त्यातून स्वतंत्र विदर्भाची चळवळ सुरु झाली. त्यांनी विदर्भाला अनुमोदन दिले नाही. संयुक्त महाराष्ट्राला जोरदार समर्थन दिले. आणि नागपूर कराराची जडण-घडण बॅ.अण्णासाहेबांच्या मार्गदर्शनाखाली पार

पडली. पण बॅ.रामराव शेफारुन गेले नाही. साधेपणाने त्यांनी श्रेयाचा स्वीकार केला. त्यांच्या साधेपणाची गोष्ट प्रसिध्द आहे. इ. १९२४ साली मंत्री असताना ते मोर्शीला आले होते. मोर्शी येथे एका परिषदेच्या निमित्ताने स्व. दादासाहेब खापर्डे आले होते. बॅ.रामरावांना पाहून दादासाहेब त्यांना म्हणाले, ''अरे अण्णा! आता तू मंत्री झाला आहेस. काय तुझा हा वेष!'' बॅ.अण्णांवर दादासाहेबांचे फार प्रेम होते. इ. १९१६ मध्ये ते विदेशातून विद्याग्रहण करुन आले तेव्हा टिळकानुयायां तर्फे व मराठा समाजा तर्फे त्यांचे स्वागत झाले. अध्यक्ष कै.श्रीमान दादासाहेब खापर्डे हे होते. त्यांचे फार मार्मिक भाषण या प्रसंगी झाले. इंग्लंडमध्ये बॅ.रामराव आणि सयाजीराव महाराज गायकवाड पार्लमेंट हाऊस मध्ये वारंवार जात. त्यामुळे बॅ.अण्णासाहेबांना राजकारणाची गोडी लागली. सत्कारास उत्तर देताना मी राष्ट्राची व समाजाची सेवा करण्याचे व्रत घेईन असे बॅ.अण्णासाहेब म्हणाले. एक खानदानी मराठा माणूस राष्ट्रीय पक्षास मिळाला याचा सर्वांना आनंद झाला. पुढे स्वतंत्र महाविदर्भाची चळवळ सुरु झाली. त्यामागची पार्श्वभूमी भीतीवर आधारली होती. महाकोशल, छत्तीसगढ, मध्यप्रदेश चे रांगडे राजकारणी विदर्भाच्या भोळ्या, साध्या, प्रामाणिक, कष्टाळू आणि गरीब जनतेची पिळवणूक करतील, त्यांना नाडतील; ह्या भीतीपोटी, नाही संयुक्त महाराष्ट्र तर निदान सर्व विदर्भ तरी एकत्र नांदू दे; त्यातून पुढे चलून महाराष्ट्रात विलीन होता येईल, ही बॅ. रामरावांची भूमिका बनली. यातून संयम, सबूरी व राजकीय चातुर्य दिसून येते.

अशा प्रकारचे हे अति दुर्मिळ प्रकारचे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व होते. अमरावतीच्या इतिहासात त्यांना विशेष मानाचे पान समर्पित करताना कोणालाहि अभिमान वाटेल.

बा.ग.(बाबासाहेब)खापर्डे

भारतरत्न कै. गणेश श्रीकृष्ण (दादासाहेब) खापर्डे यांना तीन मुले झाली. पहिला बाळकृष्ण, दुसरा देविदास, तिसरा बळवंत. पैकी येथे पहिले चिरंजीव बाळकृष्ण उपाख्य बाबासाहेब यांचा त्रोटक परिचय देतो.

यांचा जन्म एलिचपूर येथे दि.२७-८-१८८० रोजी झाला. त्या दिवशी जन्माष्टमी होती. म्हणून त्यांचे नाव बाळकृष्ण ठेवण्यात आले. यांचे शिक्षण हिंदू हायस्कूल

वाराणशी, सेंट्रल हिंदू कॉलेज, अलाहाबाद डेक्कन कॉलेज पुणे, व विधि महाविद्यालय मुंबई येथे झाले. त्यांचे पूर्ण शिक्षण एम.ए.एल.एल.बी. पर्यंत झाले. त्याकाळी विज्ञान शाखा वेगळी नव्हती. अन्यथा त्यांनी एम.एस.सी. ची पदवी प्राप्त केली असे म्हणता आले असते. ते गणित विषयात एम.ए.झाले. तथापि संस्कृत, उर्दू, पर्शियन, इंग्रजी, हिंदी या भाषांमध्ये ते अत्युत्कृष्ट भाषणे देत असत. दादासाहेबांचे भाषण विनोद प्रचुर तर बाबासाहेबांचे भाषण मर्दानी व आवेशप्रचुर होते. अत्यंत सूक्ष्म, मार्मिक, आणि चिमटे घेण्यात दोघांचीहि कीर्ती होती. दादासाहेबांचा खरा वारसदार म्हणून लोक त्यांना मानीत. भव्य शरीरयष्टि, रुबाबदार राहणी, ऐटबाज पोषाख, रसिकता, वैचारिक परिपक्वता, अफाट वाचन, चतुर कोटिबाजपणा, खानदानी रितिरिवाज, नाटयप्रेम, अभिनय, संगीत कलेचे प्रेम, कोणत्याहि बाबतीत त्या दोघांची बरोबरी होती. किंचित फरक होता तो दानशूरपणात. दादासाहेब कर्णासारखे उदार होते. पण बाबासाहेब तसे नव्हते. वस्तु अथवा पैसा राखून ठेवण्याकडे त्यांचा कल होता. दुसरा फरक म्हणजे दादासाहेबांना लेखन करावयाचे होते. सरस्वति त्यांच्या जिभेवर नाचत होती. पण लेखन त्यांनी केले नाही. त्यांची तीन चार महत्वपूर्ण भाषणे, उपासनी वाकसुधा, साई वाकसुधा, तीन चार महत्वाचे लेख, एवढेच आज आपल्याला मिळू शकते. बाकीचे काळाच्या उदरी गडप झाले. परंतु बाबासाहेब लिहावयास बसले म्हणजे रसवंती अन् सरस्वती, शारदा सर्व सामुग्रीनिशी दिमतीस असत. यामुळे बाबासाहेबांचे भाषण अथवा लेखन अतिशय मनोज्ञ, रसपरिप्लुत, विचार गर्भ, आशयगर्भ असे. त्यांचे उमर खय्याम, शेक्सपियर, गोविंदाग्रज, कालिदास, लो. टिळक, हिंदूत्व, रवींद्रनाथ टागोर, महर्षि अरविंद, थिऑसॅफिकल डॉ.एनी बेझंट, डॉ.आइन्स्टीन, जे.कृष्णमूर्ति, महात्मा कबीर, संत तुलसीदास, उपनिषद्, वेद, गीता, संत ज्ञानेश्वर अशा आगळ्या वेगळ्या विषयांवर लेख प्रसिध्द झाले आहेत; आणि ह्या विषयांवरील वक्तृत्वाने त्यांनी संपूर्ण हिंदूस्थान पादाक्रांत केला होता. त्यांना राजकीय ज्ञान व राजकारणाची कला अवगत होती. दूरदृष्टि होती. त्यामुळे लोकमान्य टिळकांनी होमरुल लीगचे शिष्ट मंडळ दुसऱ्यांदा इंग्लंडला नेण्याचे ठरविले, त्या शिष्ट मंडळात साहित्य सम्राट न.चि.केळकर व

बाबासाहेब खापर्डे यांचा समावेश होता. लोकमान्य टिळकांना त्यांनी गुरु मानले ते सर्वार्थाने केवळ राजकीय गुरु नव्हते, तर जीवनाचे पथप्रदर्शक म्हणून ते लोकमान्यांकडे पहात असत. व त्यांना मानत असत. भगवद्गीता रहस्यावर भाषण देताना त्यांनी लोकमान्यांच्या तात्विक विचार सरणीचे रहसोद्घाटन केले. हयाला कारण लोकमान्य --- त्यांनी अनेक वेळा हया विषयावर झालेली चर्चा ऐकली होती. आणि क्वचित एखाद्या वेळी शंकाहि विचारल्या होत्या. शिवाय हे सारे समजण्या इतकी बौद्धिक प्रगल्भता त्यांना मुळातच होती. त्यांनी शालेय जीवनापासून नाटकात काम करण्यास सुरुवात केली. मुंबईला महाविद्यालयात असताना त्यांनी शेक्सपियर च्या अनेक नाटकातून यागो, ऑथेल्लो, शय्लॉक्, मॅक्नेथ, सीझर, मार्क अँटोनी, हया व अन्य भूमिका केल्या होत्या. त्यामुळे संपूर्ण शेक्सपिअर त्यांच्या जिभेवर नाचत असे. शेक्सपियरच्या अनेक नाटकांतील अवतरणांचा ते भाषणांतून अपयोग करत. व त्यांची त्यामुळे छाप पडत असे. मध्य प्रदेश शासनाच्या वतीने मध्यप्रदेश शासन साहित्य परिषद व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी जे भाषण दिले ते उत्तमोत्तम साहित्य शास्त्रज्ञांनी असीम स्तुति करावी, अशा तोलामोलाचे होते. हिंदु महासभेच्या भागानगर च्या सत्याग्रहाच्या वेळी पोलीस गोळीबाराला बळी पडलेल्या एका सत्याग्रहाचे प्रेत समोर ठेवून बाबासाहेबांनी जे भाषण दिले, त्यावेळचे भाषण मार्क अँटनीच्या तोंडीचे होते, असे वर्णन प्रसिध्द झाले होते. श्री. नानासाहेब बामणगावकरांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या वीर वामनरावदादा जोशी यांच्या सत्कार प्रसंगी बाबासाहेबांनी उत्तम भाषण करुन वीर ही पदवी बहाल केली, ते भाषण आजही प्रशंसनीय मानले जाते. कै.ना.सी. फडके यांनी भारतातील उत्कृष्ट वक्त्यांविषयी एक पुस्तक लिहिले, त्यात कै.दादासाहेब व कै.बाबासाहेब ह्या पितापुत्रांच्या भाषणाबद्दल गौरवपर लिहिले आहे. आचार्य अत्रेहि उभयतांच्या वक्तृत्वाची प्रशंसा करीत असत. महाराष्ट्र थिऑसॉफिकल फेडरेशन चे पुण्याला अधिवेशन असो, किंवा जागतिक अधिवेशन अडयार (मद्रास) ला असो, अथवा भारतीय अधिवेशन वाराणशीला असो, बाबासाहेब हमखास जात असत; आणि आपल्या अभ्यासपूर्ण वक्तृत्वाची चमक

दाखवून येत. त्यांची ''सायन्स ते समाधि'', ''सायन्स ची समाधि'' ही पुस्तके विज्ञान, थिऑसॉफी व भारतीय तत्वज्ञान यांचा अति मनोहर विचार संगम आहे. तीनहि विचारसरणींचा हा शिखर संगम आहे. ''राजकन्या अनंगरागा'' त्यांचे पुस्तक पंचतत्रशैलीचे आहे. पण बोलणारे सर्व तेच आहेत. पंचतंत्रा प्रमाणे पशुपक्षी नाहीत. ही विशुध्द नितिकथा आहे. एका चतुर राजकन्येचे प्रेम किती उदात्त स्वरुपाचे होते हयाची कथा हया पुस्कात आहे.

ते वऱ्हाडमधील जमीनदार मतदार संघातून मध्यप्रांत वऱ्हाड प्रांतिक कायदे मंडळावर सभासद म्हणून निवडून गेले होते. आणि मध्यप्रांत शासनात शिक्षणमंत्री होते. शिक्षणमंत्री या नात्याने त्यांनी उज्वल कामगिरी केली. त्यांना शिक्षणात गोडी असल्यामुळे अचलपूरच्या सिटी हायस्कूल चे ते संस्थापक होते. व अमरावतीच्या बेरार एज्यू. सोसायटीचे आमराण अध्यक्ष राहिले. हयाच सोसायटीतून पुढे नूतन विदर्भ शिक्षण मंडळ बनले. त्याचेहि ते अध्यक्ष होते. त्यांच्या प्रेरणेनेच नूतन विदर्भ शिक्षण मंडळाने महिला महाविद्यालय सुरु केले. स्कूल कोड तयार करण्यासाठी नेमलेल्या समिती पुढे त्यांनी महत्वपूर्ण साक्ष दिली. अमरावतीच्या श्रीकृष्ण थिऑसॉफिकल लॉजचे ते अध्यक्ष होते. ते मराठवाडा साहित्य परिषदेचे संस्थापक अध्यक्ष होते. ती संस्थाहि आज नावलौकिकास चढली आहे.

इ. १९११ साली त्यांनी वकीलीस प्रारंभ केला. खापर्डेवाडा या इमारतीचा वास्तु समारंभ त्यांच्याच हस्ते इ.१८९५ साली झाला. उमरावती

नगरपालिकेचे ते तीन वर्षे उपाध्यक्ष होते. प्रांतिक काँग्रेस कमेटीचे सेक्रेटरी होते. अ.भा.काँ.कमेटीचे सरचिटणीस होते. लो. टिळकांच्या होमरुल लीगचे कडवे पुरस्कर्ते होते. इ. १९४० साली पुणे येथे भरलेल्या स्वराज्य पत्र परिषदेचे अध्यक्ष होते. व स्वराज्य पार्टीचे उमेदवार म्हणून मध्यप्रांत विधान मंडळावर सतत पाच वेळा इ.१९२३ ते १९४२ पर्यंत निवडून आले होते. स्वा.सावरकरांच्या सांगण्यावरुन ते हिंदुमहासभेस येऊन मिळाले. मध्यप्रांत सरकारात ते शिक्षण मंत्री होते. व अल्पमतातील मंत्री मंडळाचा कारभार पहात होते. हे भारतातील बहुधा पहिलेच अल्पमतातील मंत्रिमंडळ असावे.

हिंदु महासभेचे वऱ्हाड प्रांताध्यक्ष, सरचिटणीस व अ. भा. हिंदुमहासभेचे उपाध्यक्ष होते. दारव्हा येथील इ. १९४० च्या राजकीय परिषदेचे अध्यक्ष होते. हिन्दुमहासभा सभेच्या प्रचारार्थ भारताचा दौरा केला. पहिला बदरिनाथ, केदार विश्वस्त समितीचे अध्यक्ष होते. विदर्भ साहित्य संघाचे --- १९५५ व ५६ मध्ये अध्यक्ष होते. नागपूर विद्यापीठाच्या सिनेट चे सभासद होते. हिंदूत्वाच्या प्राचारार्थ त्यांनी अमेरिकेस जावयाचे ठरविले होते. व पासपोर्ट साठी अर्ज केला होता. डॉ.ॲनी बेझंट यांच्या भगवद्गीता ग्रंथाचे त्यांनी 'भगवद्गीतेचे अंतरंग' हया नावाने मराठीत भाषांतर केले आहे. कॉलेजमध्ये असल्यापासून त्यांना फोटोग्राफीचा छंद होता. महर्षि अरविंद घोष, प्रज्ञाचभू संत गुलाबराव महाराज यांचे त्यांनी घेतलेले फोटो प्रसिध्द आहेत. लो.टिळकांचा सिंहगडावर घेतलेला फोटो हि प्रसिध्दच आहे. त्यांना घोडेस्वारी नाद होता. व कै. दादासाहेबांनी त्यांच्यासाठी उत्तम वेल्हा जातीचा घोडा व एक नेपाळी घोडा घेऊन दिला होता. त्यांच्या अंगी लढाऊबाणा होता. व प्रांतिक युध्द समितीने नागरी सुरक्षा सैनिक संघटना स्थापन करण्याचा त्यांनी पुरस्कार केला. ते स्वा. सावरकरांच्या हिंदूत्ववादाचे निष्ठावंत पुरस्कर्ते होते. अखिल भारतीय हिंदू महासभेच्या पहिल्या अधिवेशनाचे ते अध्यक्ष होते. काही लोकांनी निझामला उमरावतीस बोलावले. व सत्कार करायाचा मनोदय व्यक्त केला. त्यास संमति देऊन निझामने राजपुत्रास अमरावतीस पाठविले होते. हयात बाबासाहेबांचा हात असून वऱ्हाड निझामच्या स्वाधीन करायाचा प्रयत्न केला. अशी अफवा पसरविण्यात आली. खरोखरी गोष्ट मात्र नेमकी हया उलट होती. निझामने त्यांना देऊ केलेल्या अनेक गोष्टी, उदा. पदवी, पंतप्रधानपद, संपत्ति त्यांनी ठोकरुन लावल्या होत्या. पाकिस्तान विराधी परिषदेचे ते निमंत्रक होते. व दिल्लीच्या अनेक घडामोडी त्यांच्या डोळ्यापुढे घडत गेल्या. पं.जवाहरलाल नेहरुंनी त्यांना स्वातंत्र्यानंतर मध्यप्रांत वऱ्हाडचे पहिले मुख्यमंत्री बनण्यासाठी निवडणुकीला उभे राहण्याची विनंती केली. पण 'मी स्वराज्य पक्षातर्फे उभा राहीन व काँग्रेसने मला पाठिंबा द्यावा असे त्यांनी स्पष्टपणे कळविले होते. ते न पटल्यामुळे काँग्रेसने त्यांना विरोध केला. एवढी त्यांची तत्वनिष्ठा अढळ होती. ते भोसला मिलीटरी स्कूल (नाशिक) च्या कार्यकारिणी मंडळावर

पदाधिकारी बेलारी, लखनौ, अलाहाबाद, नेलोरा, भोपाळ, काशी, कलकत्ता येथील जनतेनी त्यांना मानपत्रे दिली आहेत. त्यांचा देहांत दि. २७-१०-१९६८ रोजी झाला.

त्यागमूर्ती द.ब. (अण्णासाहेब) सोमण

हे सोमण मूळचे गोव्यातील सातर्डा या गावचे पोर्तुगीजांनी हिंदूंना जबरदस्तीने बाटवून ख्रिस्ती धर्म स्वीकारण्यास भाग पाडले. तेव्हा अनेक कुटूंबे गोव्याहून परागंदा झाली. सोमण घराणे औधकडे आले. यांचे पूर्ण नाव दत्तात्रय बळवंत सोमण. यांचा जन्म दि. १२-१२-१८८६ हा आहे. औंध व पुणे येथे त्यांचे शिक्षण पूर्ण झाले. एल.सी.पी.एस्. (वैद्यकीय) चा अभ्यास पूर्ण करुन ते डॉक्टरकीचा व्यवसाय करु लागले. औंधमध्ये असतानाच शिवाजीराव पटवर्धन (दाजीसाहेब) यांच्याशी त्यांचा परिचय झाला होता. यांचे बंधू शंकर बळवंत सोमण हे अनंत कान्हे रे या क्रांतिकारकासोबत अभिनव भारताशी संबध्द होते. व अनंत कान्हेरे सोबतच पकडले गेले. अभिनव भारताच्या क्रांतिकारक मंडळीची यादी त्यांच्या जवळ होती म्हणून त्यांचा अनन्वित छळ करण्यात आला. त्यातच त्यांचा मृत्यू घडला. कान्हेरे फासावर चढून वीर हूतात्मा बनले. त्याचे काका वामनराव खोत गोव्यात पाद्री लोकांना मराठी शिकवीत असत. त्यामुळे समाजात थोडे वजन होते. व त्यांची काही कामे होत असते. त्याचा लाभ घेऊन वामनरावांनी गोव्यातून पिस्तुल, गोळया, बाँब मिळवून क्रांतीकारकांना पुरविण्याचे कार्य केले. पुढे क्रांतीकार्य सोडून महर्षि अरविंद यांच्या प्रमाणे ते अध्यात्माकड वळले.

त्यांनी ऋग्वेदाचे संशोधन केले. ऋग्वेदात दोन सूर्यांचे वर्णन आहे. व त्यातील एका सूर्याचे वर्णन वाचल्यावर असे चित्र इजिप्त मधील थडग्यांवरील भिंतीवर रंगवलेले आठवते असा त्यांनी शोध लावला. इ.१९५३ मध्ये त्यांचा देहांत झाला. औध मध्ये असताना अण्णा सोमण व दाजी पटवर्धन एकाच ताटात जेवत. पदवी घेतल्यावर अण्णा सोमण इंदूरला नोकरी करु लागले. तेथे सरकारी दवाख्यानात वैद्यकीय अधिकारी होते. परंतु क्रांतिकारकांशी संबंध असल्याचा संशय आल्यावरुन सरकारने त्यांना नोकरीतून काढून टाकले. अण्णा सोमण अमरावतीस आले. व कायमचे स्थायिक

झाले. दोघेही काँग्रेसचे कार्य करीत. व दोघे हि बापूजींचे अनुयायी होते. परंतु त्रिपुरा काँग्रेस पासून त्यांचे मत बदलले. त्रिपुरा काँग्रेस (१९३३) साली अमरावतीहून कोणाला प्रतिनिधि म्हणून पाठवावयाचे यावर खल झाला. आणि दाजीसाहेब पटवर्धन व अण्णासाहेब सोमण यांची निवड झाली. तेथे डॉ. पट्टाभी सी तारांमय्या यांच्या पाठीशी महात्माजी होते. अध्यक्ष पदाच्या निवडणुकीसाठी डॉ. पट्टाभी व देशगौरव सुभाषबाबू असे उमेदवार होते. सुभाषबाबूंच्या अंगात खूप ताप होता. पण सुभाषबाबू ढोंग करीत आहेत, तापाची बतावणी करीत आहेत, असे डॉ. पट्टामी व बापूजींच्या बोलण्यात आले. शंकेचे निरसन व्हावे म्हणून डॉ. अण्णासाहेब सोमण यांनी स्वत: बोस बाबूंची तपासणी केली. पाहतात तो १०२ अंश ताप होता. त्यांचे हाल बघवत नव्हते. सच्चे कोण हे त्यांच्या लक्षात आले. निवडणुकीत सुभाषबाबू निवडून आले. पुढे बोस बाबूंना अध्यक्ष पदाचा राजीनामा द्यावा लागला. सुभाष बाबूंनी पुरोगामी काँग्रेस दल स्थापन केले. (फॉरवर्ड ब्लॉक). त्यात डॉ. पटवर्धन सामील झाले म्हणून कारवाई होऊन त्यांनी काँग्रेस मधून निष्कासित करण्यात आले. परंतु, डॉ. अण्णासाहेब सोमण यांनी फॉरवर्ड ब्लॉक मध्ये प्रवेश केला हे प्रसिध्द असूनहि त्यांच्यावर कार्यवाही करण्यात आली नाही, हे एक आश्चर्यच.

डॉ. सोमण बराच काळपर्यंत अमरावती जिल्हा काँ.चे अध्यक्ष होते. नगर सेवक होते. अण्णा कलोती नगराध्यक्ष असताना त्यांना पक्षघाताचा विकार ज़डला. तेव्हा त्यांच्या अनुपस्थितीत डॉ. अण्णासाहेब सोमण कार्यकारी अध्यक्ष होते. स्वातंत्र्यानंतर झालेल्या निवडणुकीत डॉ. सोमण निवडाणुकीस उभे राहिले. ते सं. म. समितीचे उमेदवार होते. व काँग्रेस उमेदवाराविरुध्द लढले. तरीहि त्यांच्यावर शिस्तभंगाची कार्यवाही झाली नाही. इंदूरहून अमरावतीस आल्यावर त्यांचा विवाह झाला. ते इ. १९२०, १९३०, १९३२, इ.१९४२ व इ.१९५७साली सत्याग्रह करुन कारावास भोगून आले. संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीत त्यांनी सत्याग्रह केला होता. ते पहिले सत्याग्रही म्हणून नोंद करावी लागेल. त्यांची देशभक्ति व स्वदेशनिष्ठा जाज्ज्वल्य होती. त्यांनी आमरण खादीचा वापर केला. विदेशी औषधोपचारां ऐवजी स्वदेशी

औषधोपचारावर त्यांचा भर होता. त्यांची पत्नी फार अस्वस्थ झाली, तेव्हा गाणगापूर ला श्री समर्थ वासुदेवानंद सरस्वतींच्या अनुग्रहामुळे त्यांची प्रकृति सुधारली. अमरावतीतील अनेक प्रकारच्या चळवळीत त्यांनी भाग घेतला. त्याची माहिती हयाच इतिहास ग्रंथात आलेली आहेच. त्यांचा देहान्त दि. २४-६-१९९४ रोजी अमरावती मुक्कामी घडला. त्यांच्या अंतयात्रेत व स्मशानभूमीवर जो अफाट जनसागर लोटला होता त्यावरुन त्यांच्या असीम लोकप्रियतेची साक्ष पटते.

तपोवनीचा महर्षी : डॉ. शिवाजीराव पटवर्धन :

विदर्भाच्या इतिहासातले डॉ. शीवाजीराव पटवर्धनांचे कार्य म्हणजे एक सोनेरी पान. त्याला वर्ख लावून जपून ठेवावे असे त्यांचे व्यक्तीमत्व. प्रज्ञा , शील , करुणा या त्रिगुण संपन्न असलेल्या या तपस्व्यांचे जीवन म्हणजे एक धगधगते जीवन पर्वच होते. त्यांचा आदर्श आजच्या पीढीला प्रेरणादायी ठरावा व त्यातून काही नैतिक मुल्यांची जोपासना त्यांनी करावी असे व्यक्तीमत्व म्हणजे कुष्ठमहर्षी डॉ. शिवाजीराव पटवर्धन.

कर्नाटकात जन्म घेऊन अमरावती कर्मभूमी करणाऱ्या या महापुरुषाने आपल्या सर्वस्वाचा होमकुंड पेटवून मानवी मुल्याच्या प्रस्थापनेसाठी देह झिजवला. आपल्या अफाट इच्छाशक्तीने , असामान्य त्यागाने या देशात जे कर्तव्य करुन दाखविले त्याबद्दल विदर्भाच्या जनतेला त्यांच्या विषयी अभिमान वाटल्याशिवाय राहणार नाही. सुर्याच्या प्रकाशाने अंधार विरुन जावा तसे डॉ. पटवर्धनाच्या कतृत्वाने अनेक उपेक्षितांच्या जीवनातील अंधार, मरगळ दूर सारुन त्यांना नवजीवन मिळाले.

स्वातंत्र्य आंदोलनात सक्रीय सहभाग :

स्वातंत्र्यपूर्व काळात नेताजी सुभाषचंद्र बोस यांचे निकटचे स्नेही म्हणून डॉ. पटवर्धनांनी स्वातंत्र्य आंदोलनात सक्रीय भाग घेतला व त्यासाठी त्यांना अनेकदा तुरुंगात जावे लागले. म. गांधीच्या असहकार चळवळीत व मिठाच्या सत्याग्रहात त्यांच्या सक्रीय सहभागामुळे त्यांना अटक करण्यात आली होती. असेच एकदा तुरुंगात असतांना जबलपूरच्या तुरुंगात त्यांच्या कोठडीत डोक्यावर परिणाम झालेला एक राजकीय कैदी होता. तो आपली स्वत:ची विष्ठा संपूर्ण अंगाला लावून घेत असे. सारे जण त्याच्या पासून दूर पळायचे. डॉ. पटवर्धनांना त्याची कीव येत असे. दुर्गंधीमुळे तो

एकटा पडायचा, अशावेळी दाजीसाहेब स्वत: त्याला आंघोळ घालून स्वच्छ करायचे. अर्थात तो वेडा पुन्हा तीच गोष्ट करायचा आणि दाजीसाहेब त्याला पुन्हा साफ करायचे. त्यांना त्याची कधीच घृणा येत नसे.

कुष्ठरुग्णांसाठी तपोवनची स्थापना :

डॉ. राजेंद्र प्रसाद, डॉ. राधाकृष्णन हे डॉ. पटवर्धनांचे राजकारणातील सहकारी. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर त्यांना एखादे राजकीय पद सहज प्राप्त करता आले असते.

पण देश स्वतंत्र करणे हे एकमात्र ध्येय असल्याने भारत स्वतंत्र झाल्यानंतर त्यांनी पूर्णपणे राजकारणातून अंग काढून घेतले. म. गांधींनी कुष्ठकार्यासाठी कार्यकर्त्यांना अवाहन करताच डॉ. पटवर्धनांनी त्या आवाहनाला साथ दिली आणि १९५० साली फक्त चार कुष्ठरोग्यांना सोबत घेऊन अमरावती लगतच्या उजाड माळरानावर 'तपोवन' उभारले. कुष्ठरोग्यांच्या सेवेचे व्रत घेऊन.

समाजाने बहिष्कृत केलेल्या , घरच्या माणसांनी टाकून दिलेल्या अशा या कुष्ठरोग्यांच्या वाळवंटी आयुष्यात त्यांनी नंदनवन फुलविण्याचा प्रयत्न केला. त्यांना आढळून आले की, सर्वसामान्य माणसाप्रमाणे कुष्ठरोग्यांमध्येही काही कलागुण आहेत. फक्त त्यांना त्याची जाणीव करुन द्यावी , त्यांच्यातील आत्मविश्वास वाढवावा, त्यांना स्वत:च्या पायावर उभे करावे यासाठी त्यांना तपोवनमध्ये मुद्रणालय, लोहारकाम, सुतारकाम, शिवणकाम, हातमाग, चर्मालय, सतरंजी असे अनेक उद्योगधंदे सुरु केले. कुष्ठरोग्यांची बौद्धिक वाढ व्हावी त्यासाठी तपोवनमध्ये वाचनालय सुरु केले. त्यात आध्यात्मापासून कादंबरीपर्यंत सर्व वाङ्मय उपलब्ध केले. तसेच अनाथ मुलामुलींना तपोवनमध्ये ठेवून घेण्यास सुरुवात केली. कुष्ठरोग्यांचे लग्न लावून त्यांच्या पुनर्वसनाचे कार्य त्यांनी आव्हान म्हणून स्वीकारले. तपोवनात येणाऱ्या अनाथ मुलामुलींना शिक्षणाची सोय व्हावी यासाठी त्यांनी तपोवनात शाळा काढली. कुष्ठरोगी स्त्रियांच्या मुलाबरोबरच कुमारी मातांच्या मुलाचा प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न केले.

कुष्ठरोग्यांनी तयार केलेल्या वस्तुंना बाहेर योग्य भाव मिळावा यासाठी डॉ. लटवर्धनांना वेळोवेळी शासनाशी झगडावे लागले. त्यामुळे आत कुष्ठधाममध्ये तयार होणारे बँडेज, गॉज, चादरी शासकीय रुग्णालयांसाठी विकत घेतल्या जाऊ लागल्या.

तसा जी.आर. त्यांनी शासनाला काढायला भाग पाडले. तसेच कुष्ठरोग्यांच्या प्रवासभाड्यात एक चतुर्थ्यांश सवलत मिळवून दिली. डॉ. पटवर्धन हे एकटेच खऱ्या तळमळीने कुष्ठरोग्यांच्या सामाजिक व राजकीय न्यायासाठी लढले व त्यातून बऱ्याच सवलती कुष्ठ रोग्यांना त्यांनी मिळवून दिल्या. ते कुष्ठरोग्यांसाठी मसिहा होते.

शासनासोबतचा अखेरचा संघर्ष :

डॉ. शिवाजीराव पटवर्धनांचा कुष्ठसंस्थांना मिळणाऱ्या शासकीय अनुदानाबाबत शासनासोबत झालेल्या अखेरच्या संघर्षाने अख्खा महाराष्ट्र हादरवून सोडला. त्यावेळचे मुख्यमंत्री वसंतदादा पाटील यांचा तो प्रतिष्ठेचा प्रश्न झाला होता. तर डॉ. पटवर्धनांसारख्या स्वाभिमानी , त्यागी , समाजकार्यकर्त्याच्या तत्त्वाचा प्रश्न होता.

शासन डॉ. पटवर्धनांच्या आग्रहावरुन ८० % अनुदान कुष्ठसंस्थांना देण्यास तयार होते. पण रोग्यांमध्ये तफावत करुन काही लोकांना १९२ रु तर काहींना ६५ रु. अनुदान असे अनुदान आकारण्यात आले होते. अनुदान देण्यात दोन वेगवेगळे निकष लावल्याने डॉ. पटवर्धनांचा याला विरोध होता. त्यांचे म्हणणे होते की, प्रत्येक रोग्यामागे व्यवस्थापनाचा खर्च धरुनच दर रोग्यामागे निश्चित रक्कम संस्थेला मिळयला हवी व तिचा हिशोब शासनाने घ्यावा परंतु दर रोग्यामागे २४० रुपयांचे खोटे हिशेब देऊन १९२ रुपये मिळवायचे हा प्रकार डॉ. पटवर्धनांसारख्या स्वाभीमानी, निस्पृह व त्यागी व्यक्तीला मान्य नव्हता ते योग्यच होते. परंतु शासनाचे हे अनुदान सुत्र इतर कुष्ठधाम चालविणाऱ्या संस्थांनी मान्य केले होते. कारण त्या संस्था परदेशी मदत स्वीकारत होत्या. तपोवन मात्र परदेशी मदत स्वीकारत नव्हती त्यामुळे डॉ. शीवाजीराव पटवर्धन या संघर्षात एकटेच पडले. त्यामुळे त्यांच्याशी वागतांना शासनाने कधीही आत्मीयता दाखविली नाही. त्यांना त्रयस्थासारखी वागणूक दिली. त्यातून संघर्ष शिगेला पोहचला कारण डॉ. पटवर्धनांची ही तत्त्वाची , सत्याची लढाई होती, तर या संघर्षात सर्व कुष्ठरोग संस्था त्यांच्या पाठीशी उभ्या राहिल्या असत्या तर शासनाला कदाचित झुकावे लागले असते.

अखेर या स्वाभीमानी महान तपस्व्याने तपोवन संस्थेच्या अंतर्गत येणाऱ्या



किर्ती स्तंभ, (जयस्तंभ चौक)



स्वागत कमान, 'तपोवन'



सौ. पार्वतीबाई पटवर्धन



पद्मश्री डॉ. शिवाजीराव पटवर्धन

आठ शाखा मिळून होणारी संस्थेची स्थावर मालमत्ता एकुण ५ कोटी रुपये व अकराशे एकर जमीन १० नोव्हेंबर १९८४ रोजी शासनाच्या स्वाधीन केली व दुपारी १ वाजता रिकाम्या हातांनी त्यांनी तपोवन कायमचे सोडले. एवढे मोठे कार्य एका क्षणात सोडून जातांना त्यांनी १९५० मध्ये तपोवन संस्थेचा नकाशा रेखाटतांना नकाशाच्या मागे लिहीलेल्या ओळींची नक्कीच आठवण झाली असणार.

'परिस्या हे केले हे माझेचीने झाले
ऐस मनी धरिल, नाही पाहिजे '

प्रसिद्धी पराङमुख :

डॉ. शिवाजीराव पटवर्धन हे स्वत: प्रसिद्धी पराङमुख होते. त्यामुळेच त्यांच्या कार्याचा उदो उदो झाला नाही. त्यांची मुलभूत जडण घडण , त्यांचे जीवन विषयक चिंतन सर्वसामान्यापर्यंत पोहचले नाही. त्यांना मिळणारा लोकमान्य टिळक पुरस्कार, अमरावती विद्यापीठाने दान केलेली प्रथम डी.लीट्. पदवी त्यांनी नम्रतेने नाकारली. 'पद्मश्री' ही पदवी केवळ भारताचे पहीले राष्ट्रपती डॉ. राजेंद्रप्रसाद यांच्या स्नेहाखातर स्वीकारली. ते म्हणत,'' स्वत:च्या कामाचे मोजमाप स्वत: करु नका. ते दुयऱ्याच्या लक्षात आल्यावर आपोआपच त्याची किंमत के ली जाईल. तुम्ही स्वत: जर प्रामाणिकपणाने , जीद्दिने आणि शिस्तीने आपापले कार्य करित राहलात तर समाजाचे लक्ष तुमच्या कडे जायला वेळ लागणार नाही.

डॉ. शीवाजी राव पटवर्धनांचा अखेरचा संदेश होता 'मला विसरा पण माझ्या कार्याला विसरु नका'. त्यांना समाजाकडून कुष्ठारोग्यांचे संपूर्ण पुनर्वसन अपेक्षीत होते असे या विधानावरुन लक्षात येते. त्यांनी लिहून ठेवलेले अक्षर वाङ्मय तर त्यांच्या जीवनविषयक चिंतनाचा आढावा किती व्यापक होतो हे त्यावरुन लक्षात येते.

त्यांच्या कार्यापासून प्रेरणा घेऊन युवा पीढीने त्या कार्यास पुर्णत्वास नेण्याचा संकल्प करावा. ७ मे १९८६ रोजी त्यांचे प्राणोत्क्रमण झाले.

प्रा. सुभाष गवई

भारतीय महाविद्यालय,अमरावती यांच्या सौजन्याने

देशभक्त डॉ. गणेश गोविंद भोजराज

देशभक्त कॅ. डॉ. गणेश गोविंद भोजराज यांचा जन्म नागपूर येथे इ.स.१८९६ मध्ये झाला. इ.स.१९२३ पर्यंत ते नागपूरलाच होते. त्यांचे शिक्षण नागपूर व मुंबईला झाले. मुंबई विद्यापीठाच्या बी.ए.एम.बी.बी.एस. व एल.एल.बी. हया दोन्ही परिक्षा पास झाल्यानंतर ते अमरावती येथे स्थायिक झाले. त्यांनी येथे डॉक्टरी व्यवसाय सुरु केला होता. तसेच राजकीय व सामाजिक क्षेत्रातही त्यांनी भाग घ्यायला सुरुवात केली होती. प्रथम ते हिंदुमहासभेचे कार्यकर्ते होते. नंतर १९२८ पासून त्यांनी काँग्रेसचे चळवळीत भाग घेणे सुरु केले. अमरावतीचे डॉ.शिवाजीराव पटवर्धन व डॉ. अण्णासाहेब सोमण हे त्यांचे सहयोगी होते.

इ.स.१९३० साली काँग्रेसने कायदे भंगाची चळवळ सुरु केली. मिठाचा सत्याग्रह, जप्त वांड्मयाचे वाचन व जंगल सत्याग्रहाचे माध्यमातून या चळवळीला चांगलीच धार चढली होती.

त्या चळवळीत सरकारने अवैध ठरविलेल्या विदर्भ प्रांतिक काँग्रेसचे ते चवथे अध्यक्ष सर्वाधिकारी निवडले गेलेत. अमरावतीच्या वडाळीचे जंगलात १७ जुलै १९३० रोजी जंगल सत्याग्रह करुन इंग्रज सरकारचा कायदा तोडण्याचा कार्यक्रम अगोदरच ठरला होता. त्यासाठी विदर्भ प्रांतिक कॉग्रेसचे सर्वाधिकारी लोकनायक बापूजी अणे यांना शिक्षा झाली होती व श्री. ब्रिजलालजी बयाणी व दुसरे सर्वाधिकारी श्री.गोळे यांना आगावूच अटक झाली होती. त्याच वेळी दे.भ.डॉ. भोजराज यांना प्रांतिक काँग्रेसने सर्वाधिकारी म्हणून सूत्रे सुपूर्द केली जी पत्करुन भोजराज यांनी वडाळी येथे सुमारे ३५ हजार लोकांचे व सशस्त्र पोलीस व अधिकारी यांचे उपस्थितीत जंगल सत्याग्रह केला. त्यांना अटक होऊन सहा महीने कारावासाची शिक्षा देण्यात आली होती.

इ.स.१९३७ पर्यंत ते अमरावती जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष होते तो पर्यंत त्यांनी एकूण तीन वेळ कारावास भोगला होतो. १९४० नंतर ते नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या "फॉरवर्ड ब्लॉक" मध्ये गेले होते.

इ.स.१९४२ ला पुन्हा "चले जाव" चा स्वातंत्र्य लढा सुरु झाल्याबरोबर त्यांना

अटक करण्यात येवून स्थानबध्द करण्यात आले होते. त्यांची सुटका साडेतीन वर्षानंतर झाली.

अमरावती नगरपालिकेचे ते लोकनियुक्त सभासद १९२८-२९ ते १९३०-३१ होते. छत्री तलावातून अमरावतीचे जनतेला पिण्याचे पाणी अशुध्द मिळत असे. ते शुध्द करुन देण्याचे कार्यात डॉ.भोजराज यांचा मुख्य सहभाग होता. अनेक सामाजिक, सार्वजनिक, सांस्कृतिक संस्थांशीही त्यांचा संबंध होता. १९४५ साली स्थानबध्दतेतून मुक्त झाले नंतर त्यांनी डॉ. पटवर्धन यांचे सोबत जगदंबा कुष्ठधामाची स्थापना केली. १९२८ ते १९४५-४६ च्या काळांत त्यांना सतत एक तर कारावासात किंवा राजकीय चळवळीत सक्रीय रहावे लागल्याने त्यांचे व्यवसायावर त्याचा अनिष्ट परिणाम स्वाभाविकच होता. परिणामत: त्यांना बिकट आर्थिक परिस्थितीला सतत तोंड द्यावे लागले होते.

पुढे १९५७ पासून ते मुंबईला आपले कनिष्ठ चिरंजीव डॉ. बाळासाहेब भोजराज तिकडे राहावयास गेलेत.

आयुष्यभर झालेले कष्ट व तुरुंगवास, आर्थिक परिस्थितीशी सतत झगडणे व उतारवय या कारणांमुळे, त्यांना पुढे कर्करोग झाला होता. दि.२० डिसेंबर १९८० रोजी त्यांचे मुंबईलाच निधन झाले व अमरावतीचे पण, विदर्भाच्या राष्ट्रीय आंदोलनात सतत आघाडीवर रहाणारे डॉक्टर साहेब वयाच्या ८४ व्या वर्षी अनंतात विलीन झालेत. या आपल्या आवडत्या नेत्याला अमरावतीचे नागरिकांनी २२ डिसेंबर १९८० रोजी रोजी नगरपालिकेचे सभागृहात झालेल्या शोकसभेत श्रध्दांजली अर्पण केली होती. दे.भ.डॉ.भोजराज यांचे मागे त्यांची पत्नी व मुले. जस्टीस जी.जी.भोजराज, --- बाळासाहेब भोजराज, सुपरिन्टेंडींग इंजिनिअर हे नागपूरला रहात असत. एक जावई श्री.मुजुमदार आहेत. अमरावतीतील त्यागी व कट्टर देशभक्तात त्यांचा समावेश होत होता.

डॉ.वा.रा. भट

ह्यांचे कुटुंब पुण्याचे. यांचा जन्म पुणे येथे इ.१८७२ साली झाला. शिक्षण पुणे व

मुंबई येथे पडले. पण पदवी प्रशिक्षण सपूर्ण होऊ शकले नाही. त्यांच्या नोकरी निमित्ताने सहकुटुंब जबलपूर ला आले. तेथे एका व्यक्तीशी भेट घडली. त्याने श्री.वा.रा.भट यांना शिक्षणाचा पुढील प्रगत अभ्यास करण्यासाठी इंग्लंडला जाण्यास साह्य केले. व लंडन ला ते एफ.आर.सी.एस. झाले. अमरावतीला त्यांना नोकरी मिळाली. इंग्लंडहून आल्यावर त्या युरोपीय सद्गृहस्थाचे सर्व पैसे परत केले. विष्णूपंत महाजनांच्या कन्येशी विवाह झाला. व ती वारली विष्णूपंतांच्या दुसऱ्या विधवा कन्येशी पुनर्विवाह केला. विवाहाने अमरावतीत फार प्रचंड खळबळ माजली होती. ह्या कुटूंबावर बहिष्कार पुकारला होता. परंतु डॉ.वा.रा.भट खंबीर राहिले. ते समाज सुधारणावादी होते. त्यांचा विवाह दृढनिश्चयाने पार पडला. त्यांच्या विविध क्षेत्रातील कर्तव्यामुळे सरकारने त्यांना अम. डि. कौंसिलचे उपध्यक्ष नेमले. व अमरावती नगर पालिकेचे अध्यक्ष हि नियुक्त केले. दोन हि ठिकाणी त्यांची कारकीर्द यशस्वी झाली. त्यांनी उत्तम प्रशासन केले. ब्रिटिश सरकारने त्यांना रावबहादूर हा किताब दिला.

ते मानवतावादी होते. त्यांनी पटवीपुरा येथे हरिजनांसाठी वस्तीगृह बांधले. व स्वत:च्या देखरेखीखाली चालविले. ते तेथे आमरण कार्य करीत राहिले. विद्यार्थ्यांना विनामूल्य राहता येत असे. एन्फ्ल्यूएन्झा च्या साथीच्या वेळी फार मोठ्या प्रमाणावर रुग्णसेवा केली. इ.१९१८ च्या महायुध्दाच्या प्रसंगी गरजूंना विनामूल्य औषधे दिली. इ.१९१५ च्या प्लेगच्या साथीत हि फार शर्थीने जनसाह्य केले त्यांचा देहान्त दि. २०-११-१९३६ रोजी अमरावतीस झाला. त्यांच्या जनहितैषी, त्यागाची महति आजहि खेड्यापाड्यातून ऐकू येते.

देशभक्त नानासाहेब बामणगांवकर

कै.नानासाहेब बामणगांवकर यांचेवर अपार श्रध्दा व निष्ठा असलेले विदर्भाचे ख्यातनाम लेखक साहित्यिक व पत्रकार कै.साहित्य भूषण तु.ना.काटकर यांच्या एका प्रकाशित लेखाचेच येथे आम्ही पुर्नमुद्रण करीत आहोत. एका जेष्ठ साहित्यिकाचे लेखणीतून नानासाहेब बामणगांवकरा विषयीचे हे मूल्यमापन-

-संपादक.

बालपणीच पोरकेपण आले . . .

विदर्भातील वर्धा जिल्ह्यात आर्वी तालुक्यातल्या "वेरुळ" गावी वीरशैव ब्रम्हकुलात २६ जून १८८८ रोजी त्यांचा जन्म झाला. त्यांचे वयाचे तिसरे वर्षीच पित्याचे छत्र हरपले व ते सात वर्षाचे होतात न होतात तोच त्यांच्या मातोश्रींनाहि कॉलऱ्याने इहलोकातून ओढून नेले. या साथीत एका आठवडयात तेरा जीवाचे त्यांचे कुटूंब कालोदरात गारद झाले. नानासाहेबांनाहि या माहामारीने घेरले होते. पण --- कालाशी झालेल्या द्वद्वांत ते विजयी ठरले. पण त्यांच्या देहाला शेवटी तो --- ७३ वर्षांनी ८ जुलै १९६१ रोजी पहावाच लागला.

ग्रंथ हेच गुरु झाले...

दुर्दैवाने ओढवलेल्या अशा परिस्थितीत त्यांना काही काल वणवण भटकावे न लागल्यासच नवल. "जावे त्याच्या वंशा" तेव्हाच हे कळणार आहे. त्यांचे काही प्राथमिक शिक्षण वेरुळ व काही अमरावती जिल्ह्यातील खार-तळेगांव येथे झाले. सर्व माध्यमिक शिक्षण न्यू इंग्लिश हायस्कूल नागपूर व उच्चमाध्यमिक शिक्षण सरकारी हायस्कूल अमरावती येथे झाले. पण याचवेळी रिस्ले साहेबांच्या फतव्यास बळी पडावे लागून पुढील शिक्षणास कायमचे मुकावे लागले. पण शिक्षण हे शाळा-कॉलेजात गेल्यानेच होते व ते जन्मभर पुरते असे नाही, लो. टिळकांनी म्हटल्याप्रमाणे "शाळेतील शिक्षण जन्मभर पुरत नाही, यास्तव ग्रंथ हेच आपले खरे गुरु होत." आणि अखेरीस नानासाहेबांना तेच यावज्जीव खरेखुरे गुरु ठरले.

नानासाहेबांच्या जीवनाला पुढे अनेक पैलू आले पण त्या सर्वांचा सुवर्णमध्य --- लेखनानेच त्यांनी साधला होता. अमरावतीचे जुन्या पिढीतील काँग्रेसचे अध्यक्ष दि.ब.ब्रह्म ब.रंगनाथ नरसिंह मुधोळकर यांनी इ.स. १९०१ मध्ये सौ.वाय.चिंतामणी यांच्या मदतीस सहचिटणीस म्हणून श्री. बामणगांवकरांना पाठविले होते. या उभयतांच्या सहवासात असतानाच त्यांचा कल "लाल-बाल-पाल यांच्या राष्ट्रीय पक्षाकडे झुकला. --- पत्रव्यवहारात शिरोभागी "वन्दे मातरम्" लिहिण्याच्या मतभेदावरुन --- त्या जागेचा त्याग केला. त्यांना स्वत: मुधोळकरांनी समजावूनही पुन: त्या जागेवर ते गेले नाहीत त्या नंतर लगेच लग्नाची बेडी पडली व ते चतुर्भुज झाले.

धडाडीचा वृत्तपत्रकार

पुढे १९०७ साली ''तरुण हिन्द'' नावाचे वृत्तपत्र त्यांनी सुरु केले. त्यांत त्यांनी ''भारताचे स्वातंत्र्य तरुण भारताने आत्मयज्ञास तयार व्हावे,'' अशी जनतेस स्फुरण चढविणारी लेखमाला चालू केली. अनुभव कमी पण महत्वाकांक्षा जबर होती. तेच तृत्तपत्र आणि तेच त्यांचे संपादनाचे शिक्षण १९०८ साली लो. टिळक आकोल्यास आले असता तेथे त्यांचे ''वन्देमातरम्'' वर इंग्रजीतून भाषण झाले. त्याचा बामणगांवकरांनी मोडीतून रिपोर्ट घेऊन त्याला मराठीतून आपल्या ''तरुण हिन्द'' मधून प्रसिध्दी दिली. १९०७ साली अमरावतीचे स्वामी शिवानंद सरस्वति यांना इ.पि.कोडाच्या १२४ अ कलमाखाली कारावास झाला तेथून त्यांची नागपूर तुरुंगात रवानगी झाली. ज्या डब्यातून त्यांना रवाना केले त्याच डब्यात बामणगांवकर जावून बसले. स्वामी मोडीत पदे म्हणत व बामणगांवकर ती उतरवून घेत. या प्रसंगास काही दिवस लोटल्यावर ती पदे त्यांनी ''तरुण हिन्द'' मधून ''स्वामी शिवानंद सरस्वतीची बंदीवासातील पदे'' म्हणून प्रसिध्द केली. ती पदे आपल्या पोलादी पहाऱ्यातून बाहेर कशी आली? म्हणून सरकार संभ्रमात पडले. बामणगांवकरांना विचारणा करण्यात आली पण या वीराने सरकारला काही पत्ता लागू दिला नाही. त्यांच्या या धाडसी कृत्यामुळे १९०९ साली क्लीव्हलंड कमिश्नरच्या वेळी त्यांच्यावर खटला भरण्यात येऊन जबर दंड ठोठावण्यात आला. त्यामुळे ''तरुण हिन्द'' बंद पडले. पुढे त्यांनी ''राष्ट्रमत'' संदेश, विनोद, केसरी, महाराष्ट्र वगैरे पत्रातून लिहिणे सुरु केले. केसरीचे तर ते विदर्भाचे प्रतिनिधीच होते. १९२८ मध्ये ''उदय'' चे अधिकृत संपादकत्व श्री.बामणगांवकरांकडे आले. १९३२ साली ''अरुण मुद्रणालय'' व ''उदय'' वृत्तपत्र त्यांच्या पूर्ण मालकीचे झाले. १९३७ साली त्यांनी या संस्थेला लो. टिळकांचे स्मरणार्थ ''टिळकाश्रम'' हे सार्थ नांव दिले. आपल्या हयातीतच त्यांनी ''अरुण प्रेस'' आणि ''उदय'' पत्र यांचा ट्रस्टहि केला होता. १९४४ साली ''उदय'' चा ''रौप्य महोत्सव हि पार पडला. नानासाहेबांना जावून सेवा करणारा ''उदय'' हाच त्यांचा खराखुरा वारसदार आज त्यांच्या पश्चात जनतेसमोर आहे.

प्रतिभा संपन्न नाटककार

श्री.नानासाहेब बामणगांवकर हे जसे जातीवन्त वृत्तपत्रकार होते तसेच ते प्रतिभा संपन्न नाटककारहि होते. त्यांनी भीष्मप्रतिज्ञा, धनुर्भंग, आत्मतेज आणि राष्ट्रध्वज अशी चार नाटके लिहिली. नामदार ए.एस.एस. आणि शिपाई ह्या दोन नाटिकाही लिहिल्या, त्यापैकी आत्मतेज हे पुढे नागपूर विद्यापीठाने आपल्या अभ्यासक्रमात समाविष्ट केले होते व दुसरे ''धनुर्भंग'' शाळा खात्यांत मान्यता पावले होते.

इ.स. १९१६ साली त्यांचे ''धनुर्भंग'' हे नाटक आनंद विलास संगीत मंडळीने प्रथम रंगभूमीवर आणले. त्यावेळी सरकारला बोचणाऱ्या त्यातींल ज्वलज्जहाल भाषेमुळे त्यावर तात्काळ बंदी घालण्यात आली होती. त्यांचे तिसरे नाटक ''आत्मतेज'' याचा पहिला प्रयोग सवाई गंधर्वाच्या नुतन संगीत मंडळीने १९२० साली लो. टिळकांच्या पुण्यात रंगभूमीवर आणला होता. १९३४ साली ते मुंबई मराठी नाट्य सम्मेलनाचे आणि १९४८ मध्ये साली सातारा व नाशिक येथील मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष झाले होते. १९५४ अमरावती विदर्भ साहित्य संघ शाखेचेहि ते अध्यक्ष होते.

देशकार्यार्थ देह झिजविला----

लो. टिळक, साहित्य सम्राट केळकर, नाट्याचार्य खाडिलकर, संदेश कार अच्युत बळवन्त कोल्हटकर प्रभृति जहाल नेत्यांच्या प्रभावळीतील ते पत्रकार होते. आणि नाट्याचार्य काका साहेब खाडिलकर, वीर वामनराव जोशी, औंधकर प्रभृति प्रभावशाली नाटककारांच्या पंक्तीतील ते नाटककार होते. तसेच ते ज्वलज्जहाल देशभक्त होते. लो. टिळकापासून ते काँग्रेस नंतर ते विदर्भ काँग्रेस कमिटीच्या कार्यकारिणीवर आले व पुढे सरचिटणीस पदावरहि चढले. १९२२ ते १९२६ पर्यंत अ.भा.काँ.कमिटीचे ते सदस्य होते. पुढे १९३० मध्ये म. गांधींच्या सत्याग्रही स्वातंत्र्य संग्रामात त्यांनी उडीच घेतली. आणि नंतर स्वातंत्र्य प्राप्त होई पर्यंत ध्यानी मनी भारताच्या मुक्ततेचा ध्यास धरुन ''उदय'' मधून आपली मतें त्यांनी हिरीरीने प्रतिपादिली. स्वातंत्र्योत्तर काळात ते ''महाविदर्भा''कडे वळले ते कायमचे त्यांचे व्यक्तिमत्व प्रभावी होते. दातृत्व हा त्यांचा बाणा होता. त्यांच्याकडे गेलेला याचक कधी रिक्त हस्ताने परतायचा नाही त्यांची

व्यवस्था उदय कार्यालयाचे व्यवस्थापक श्री. फणसळकर यांच्या मार्फत नेहमीच लावून देत असत.

बंदीवास

देशभक्ति म्हटली की तिच्या बरोबर बंदिवास हा आलाच, ''तरुण हिन्द'' चालवीत असतांना पहिला खटला त्यांचे वर त्यांचे वयाचे केवळ २१ व्या वर्षी इ.स. १९०९ साली भरण्यात येऊन त्यांना शिक्षा ठोठावण्यात आली होती. १९२३ साली नागपूर झेंडा सत्याग्रहात ते ब्रिटिश सरकारचें पाहुणे बनले होते. या वेळी शिवनी कारागारांत लोकनायक डॉ. बापूजी अणे, पं.रविशंकर शुक्ल, कर्मवीर कन्नमवार, वीरवामनराव जोशी, पद्मश्री डॉ. शिवाजीराव पटवर्धन हे त्यांचे संगती होते.

आधुनिक बसवदेव

त्यांचे संबंध जीवन ''स्वदेशहित चिन्तनाविण दुजी कथा नावडो'' अशा राष्ट्रीय कार्यात गेले. तसेच ते ज्या वीरशैव धर्मात जन्माला आले त्यांचीहि सेवा त्यांनी तन-मन-धनाने केली. ते जन्मताच ''सारे विश्वचि माझे घर'' अशा मानवी सुधारक मताचे होते. भ.श्री.बसवेश्वराचे ''सर्वाभूति भगवन्त'' हे सुधारकी शिक्षण ''साखर पाकामध्ये जसा मुरंबा मुरला'' असे त्यांच्या जीवनाशी एकरुप झाले होते. त्यांचे ते स्वये प्रथम आचरुन नंतर स्वबांधवांच्या पचनी पाडण्याचा विडा उचलला होता. इ.स. १९१३ ते १९१५ आणि १९३४ ते १९४० पर्यंत त्यांनी या समाजासाठी त्यांच्या उद्धारार्थ ''वीरशवै-संजीवनी'' पाक्षिक स्वत:आर्थिक झीझ सोसून चालविले. सोलापूरचे श्रीमंत रा.ब.वारद यांचे चरित्रहि वीरशैवांसाठी लिहिले.

निस्वार्थी निष्कलंक वैदर्भिय नेता - कै.संभाजीराव गोखले

विदर्भाचे एक वयोवृध्द व ज्ञानवृध्द सार्वजनिक कार्यकर्ते श्री. संभाजीराव तथा नानासाहेब गोखले गेल्या महिल्याच्या २२ तारखेस मुंबईस निधन पावले. त्यानंतर गेल्या १५ दिवसांत त्यांच्या विषयी काही गुण गौरवपर लिखाण वृत्तपत्रातून प्रसिध्द झाले आहे. पण केवळ या लिखाणाच्या मानदंडाने नानासाहेबांचा मोठेपाणा मोजणे इष्ट होणार नाही. कारण या काहीशा औपचारिक लिखाणावरुन ते जेवढे मोठे वाटतील,

त्यापेक्षा ते निश्चितपणे अधिक मोठे होते. काही जाणते जवळूनच अधिक मोठे दिसतात, तर काही डोंगर दुरुनच साजरे दिसतात! नानासाहेब पहिल्या वर्गातील होते, असे माझ्या सारख्या त्यांच्या निकटवर्तीयांना वाटते.

पडद्याआड राहण्याची हौस- पण त्यांच्या या थोरपणाचा डंका विशेष गाजला नाही. एखादा हुशार मारवाडीही अर्थ बळावर "बेरार केसरी" बनू शकतो, पण नानासाहेबांसारखा जातीवंत देशभक्त फारसा गाजत नाही असा हा जमाना आहे. आत्मघोषणेच्या आजच्या काळात दोषास्पद ठरेल अशीच स्वकर्तृत्वा विषयीची नानासाहेबांची गुणवत्ता होती. ते कुणी आत्म प्रसिध्दी पटु "चल वलये" (ऐजिटेटर) नव्हते, तर शांतपणे भरीव करणारे कार्यकर्ते (सायलेंट वर्कर) होते. आपल्या तिळाएवढ्या कार्याला आभाळा एवढा देखावा करण्याचे व्यापारी कसब त्यांना साधले नाही. ते म्हणत "कस्तुरीचा सुगंध आपोआप कळेल तेवढा कळेल त्यासाठी प्रसिध्दीचे तट उभारण्याचे कारण काय?" नानासाहेबांच्या एका कर्तबगारी विषयी लिहितांना "उदय" कार लिहितात- "सन- १९१६ ची सुप्रसिध्द मध्यप्रदेश राजकीय परिषद ही गोखले दुराणी या जोडीच्याच परिश्रमाचे फळ होते. परंतु पडद्यात राहून काम करण्याच्या हौसेमुळे त्यांच्या नावाचा गाजावाजा होत नसे".

तथपि, त्यांचा निकट सहवास लाभलेल्या सर्व स्थरातील नि पक्षातील वैदर्भियांना त्यांचे निस्वार्थी, निर्भय व निष्कलंक जीवन माहीत आहे.

निर्भय-टिळक-वृत्ती- नानासाहेबाची सर्व विद्यार्थी दशा जवळ जवळ पुण्यातच गेली. आणि त्या काळातच त्यांच्या मनावर लोकमान्यांच्या उपरोक्त गुणांचा ठसा उमटला. जवळून पाहणाऱ्यांना त्यांचा पिंड "टिळक भक्ता"चाच असल्याचे दिसून येत असे. १९०८ साली अमरावती येथील एका निरोधनाबद्दल त्यांच्यावर खटला झाला. तेव्हाच त्योची निर्भय "टिळकवृत्ती" विदर्भाच्या नजरेत प्रथमत: भरली. त्यांनी त्या निरोधनाची संपूर्ण जबाबदारी स्वत:वर घेतली आणि "जनतेच्या सहकार्यावर चाललेल्या संस्था जन-कार्याला मदत करीत नसल्यास त्यांच्या वर बहिष्कार घालण्याचा हक्क जनतेस आहे". (पिपल हॅव दि लिगल राईट ॲन्ड मोरॉल जस्टीफिकेशन फॉर इन्स्टीट्यूटींग

बायकॉट ॲन्ड पिकेटींग इन दिज सरकमस्टान्सेस) असे धैर्यशील निवेदन न्यायालयात केले प्रकरणी काही काळ त्यांची सनद रद्द झाली व १००० रु. दंड झाला व काही दिवस सक्तमजुरीहि भोगावी लागली. त्या काळात ही गोष्ट विशेष होती.

वाळवंटातील हरितभूमी!- येथपासून तो थेट १९५१ साली मंत्रीपदाचा राजीनामा देईपर्यंत "राष्ट्राय इदं न मम" या बाण्याने त्यांनी विदर्भाची सेवा केली. त्यांनी केलेला मूक स्वार्थ-त्याग आजच्या धंदेवाईक देशभक्तीच्या काळात, वाळवंटातील हरितभूमि इतकाच दुर्लभ आहे. वऱ्हाडच्या वैभवशाली हंगामात त्या मानाने भरपूर पैसा मिळविणारा हा बुध्दिमान वकील म्हातारपणी निर्धन अवस्थेत मुंबईत मुलाकडे यावा, ही गोष्टच कित्येक व्यवहार-कोविंदाना आश्चर्याची वाटेल. दोन्ही शुक्ल - मंत्रिमंडळात महत्वाची खाती सांभाळणारा हा हुशार मंत्री अगदी कफल्लक राहू शकतो, हि वस्तुस्थिती ही कित्येकांना न पटणारी गोष्ट वाटेल. अनेक उच्चस्थानी बसूनही त्यांनी आपल्या सुविद्य मुलांना व नातेवाईकांना कोठेही चिकटविले नाही, हे तर कित्येकांना वेडगळपणाचेंच वाटल्यावाचून राहणार नाही. पण हा दोष त्यांचा नसून, हल्लीच्या ध्येयशून्य वातावरणाचा आहे या वातावरणाचा उबग येऊनच नानासाहेब दोन वर्षापूर्वी एका टिळक समाहात म्हणाले, "लोकहो, तुम्ही मला अर्थमंत्री म्हणता. पण मी तर व्यर्थ मंत्री किंवा अनर्थ मंत्री झालो आहो"...

तथापि, अशी उद्विग्नता प्राप्त झाली असताही त्यांनी आपले ब्रीद सोडले नाही. ते प्रकृतीच्या अस्वास्थामुळे मंत्रीपदाचा राजीनामा देऊन मुंबईत आले, तरी त्यांचा आमदारीचा भत्ता नियमानुसार चालूच राहिला. नानासाहेबांना या गोष्टीची रुखरुख लागली . त्या भत्याचे जमलेले १५८०/- रु. माझे नसून जनतेचे आहेत. या भावनेने त्यांनी ते अमरावतीच्या न्यू एज्युकेशन सोसायटीस देऊन टाकले. आणि हे केव्हा, तर आयुष्याच्या अखेरीस पैशाची गरज असतांना.

आदरणीय स्वार्थ त्याग- हा निस्वार्थीपणा सर्व गुण समुच्चयाच्या शिरोभागी शोभत होता. अमरावती नगरपालिकेत काय, विदर्भ काँग्रेसमध्ये काय, अथवा मध्यप्रदेश विधि मंडळात काय मुख्यत: या गुणामुळेच त्यांच्या विषयी सर्वांना आदर वाटत असे.

डॉ. हसन यांनी एकदा विधी मंडळात प्रत्येक मंत्र्यावर काही ना काही टीका केली. पण नानासाहेबावर मुळीच टिका केली नाही. तेव्हा एका सभासदाने मध्येच विचारले ''पण गोखल्यांबद्दल काय ? त्यावर डॉ. हसन उद्‌गारले, ''ओह! हि इज बिऑंड ऑल दिस, आय बोऊ (बीओडब्ल्यू) टू दॅट जेंटलमन'' (ते या सर्व गोष्टीच्या पलिकडेच आहेत. त्यांना माझे प्रणाम असोत) सार्वजनिक कार्य व कारावास यांच्या वकिलीची फार वाताहत झाली. विशेषत: १९४२ ते ४६ या कालखंडात त्यांनी भोगलेले दारिद्रच निकटवार्तियांच्या डोळ्यांत अश्रू उभे करत होते.

पक्षातीत सहिष्णु वृत्ति-

कित्येकदा अशा ज्वलंत स्वार्थ त्यागी माणसाच्या स्वभावात कटुता व अहिष्णुता निर्माण होण्याचा संभव असतो पण हे दोष त्यांच्यात उत्पन्न झाले नाहीत. त्यांना अखेर पक्षघाताचा (पॅरालेसिस) चा विकार जडला होता. पण पक्षांधतेचा विकार मात्र त्यांना कधीच जडला नाही. ''साधनांना अनेकता'' या सिध्दांतावर टिळक भक्ती शोभेल अशीच त्यांची दृढश्रध्दा होती. अन्य पक्षीय देशभक्तां विषयी त्यांना नेहमीच यथायोग्य आदर वाटत असे. मतभेदापेक्षा मतैक्याचे मुद्दे शोधण्याकडे त्यांचा कल असे. १९४४ च्या मे महिन्यात (जेव्हा सावरकरांना ''रिक्रूटवीर'' म्हणणे ही उथळ कॉंग्रेस जनाची फॅशन होती) अमरावतीच्या सावरकर जयंतीचे अध्यक्ष स्थान स्वीकारुन व त्यांचे मुक्त कंठाने गुणगान करुन त्यांनी कित्येकांना चकित केले होते. त्यांचे स्नेही डॉ. हेडगेवार दिवंगत झाले. तेव्हा नानासाहेब किती हळहळले हे तर अनेकांनी स्वत:च डोळ्यांनी पाहिले आहे. संघाचे कोणी कार्यकर्ते ''उत्सवास याच'' असा आग्रह करु लागले, की नानासाहेब हसून म्हणायचे ''मी नाही आलो तरी चालेल संघाला मी माझा मुलगा विद्याधर देऊन टाकला''.

सतत ३० वर्षे नानासाहेबाच्या निवासस्थानी, दर शनिवारी भिन्न भिन्न पक्षाचे व मताचे कार्यकर्ते चहा पानासाठी एकत्र जमत असत. व्यासपीठावरील मतभेद तात्पुरते बाजूस ठेवायचे व कटुतेला चहाच्या पाण्यातच समाधी द्यायची. असे नानासाहेबांचे धोरण असे. पक्षीय अहंकार त्यांना कधीच शिवला नाही.

अरविंदाच्या तत्वज्ञानाची पकड- समाजासाठी झिजणारा प्रत्येक माणूस मग तो कम्युनिस्ट असो, हिंदुत्वनिष्ठ असो, की कोणीही असो. त्यांना अतिशय प्रिय असे. त्याची वृत्ती जात्याच समन्वयवादी होती. त्यांच्या तरुणपणी विदर्भातील नेमस्त व जहाल यांच्यात सौहार्द उत्पन्न करण्याची खटपट त्यांनी केली, तर अखेरच्या दिवसात विदर्भ-काँग्रेसमध्ये एकोपा निर्मिण्याचा यथाशक्ती प्रयत्न केला. महर्षि अरविंदाच्या तत्वज्ञानातील भव्य समन्वयवादी (सिन्थेटिक) दृष्टीने त्यांच्या हृदयाची पकड घेतली होती. भारतात आज ना उद्या, ''स्पिरिटयुअल कॅम्युनिझम'' (आध्यात्मिक साम्यवाद) स्थापन होईल अशी त्यांची श्रध्दा होती. ''दैवी संपदेने अलंकृत अशा अतिमानवांकडून (सुपर मॅन) समाज निर्मिण्याचे महान कार्य भविष्य काळी घडणार आहे. त्यास सहाय्यभूत होण्यासाठी मला लौकर पुनर्जन्म घेतला पाहिजे'' असे ते मृत्युपूर्वी वारंवार म्हणत. सध्याच्या सार्वत्रिक अध:पतनाची स्थिती त्यांना असह्य झाली होती.

असा हा थोर विचारांचा वैदर्भीय नेता, जातिवंत टिळकानुयायी, अरविंद-तत्वज्ञानात सदैव रमणारा तत्वजिज्ञासु सर्व भक्षक काळाने हिरावून गेला आहे. बुध्दिमान असूनहि सश्रध्द, तत्वकठोर असूनही परम सहिष्णु, ध्येयनिष्ठ असूनहि वास्तववादी, कर्तृत्ववान असूनहि प्रसिध्दि-विन्मुख अशा खंद्या टिळकानुयायांची परंपरा आता जवळ जवळ संपतच आली आहे, ही विदारक जाणीव नानासाहेबांच्या मृत्युने होते आणि मन फारच विषण्ण होऊन जाते!

कै.संभाजीराव उर्फ नानासाहेब गोखले.

सार्वजनिक चारित्र्याचा आदर्श :- अमरावतीची कै. नानासाहेब गोखले हे इ.स. १९०५ पासून राष्ट्रीय आंदोलनाशी संबंधित होते. पेशाने ते वकील होते आणि बुधवारात रहात असत. त्यावेळी बहुतेक पुढारी परकोटाचे आंतच रहात असत.

वीर वामनराव दादा, अण्णासाहेब कलोती, नानासाहेब बामणगांवकर, ॲड.शेवडे, नानासाहेब गोखले, हे सर्व बुधवारातच राहणारे. कै. नानासाहेब गोखले हे वकीली करत. त्यांची देखणी, गोरीपान शरीरयष्टी आणि त्यांचा त्याकाळचा पोषाख यावरुन लोक त्यांना ''दुष्यंत'' म्हणत. अत्यंत सात्विकवृत्ती आणि त्यागासाठी सदैव तयार,

आपल्या आयुष्यांत त्यांनी कधी पैशाचा लोभ धरला नाही. कै. गुलाबराव बक्षी हे त्यांचे नंतर एक सहकारी झाले. गुलाबराव शिवाय नाना साहेबांचे पान हालत नसे. गुलाबरावांनी देखील नानासाहेबांना जन्मभर साथ दिली. नानासाहेब नगरपालिकेचे सभासद ही होते. पण इंग्रज सरकारने इ.स. १९०९ साली त्यांचे म्यु. सभासदत्व (गॅ.नोटिफीकेशन नं.११८५ ता.७-११-१९०९) रद्द केले होते. पुढे १९२१ साली नानासाहेब नगरपालिकेचे अध्यक्ष झाले.

नानासाहेब गोखले हे टिळक अनुयायी म्हणून १९०५ मध्ये काँ. मध्ये आले. आणि शेवट पर्यंत अत्यंत नि:स्पृह आणि चारित्र्यसंपन्नतेचा लौकीक घेऊन निवृत्त झाले. काँग्रेसच्या प्रत्येक आंदोलनात त्यांनी कारावास भोगला. आर्थिक परिस्थिती जेमतेम वेळीवेळी जेलमध्ये जाण्यामुळे प्रॅक्टीसही बसली. असे असतांही त्यांनी कधी आपली भूमिका सोडली नाही. अखेर पर्यंत देशनिष्ठ होते.

मुंबई चे श्री. विद्याधर गोखले हे त्यांचेच चिरंजीव आहेत. विद्याधरपंत आता सर्वदूर ज्ञात असून वांड्.मय आणि पत्रकारिता या क्षेत्रांत नांव राखून आहेत.
आलो तसा चाललो :- कै. नानासाहेबांसंबंधीची एक हृदयस्पर्शी आठवण येथे सांगणे जरुरीचे वाटते.

१९५४ साली वृध्दापकाळामुळे आपण आपल्या पक्षाचे काम योग्य प्रकारे करु शकत नाही असे वाटू लागताच त्यांनी आपल्या मंत्रीपदाचा राजीनामा दिला व फक्त एक पेटीभर कपडे घेऊन ते मुंबईला मुलाकडे जाण्यासाठी रेल्वेचे डब्यात बसले. बडनेरा स्टेशनवर डॉ. बापट प्रभृति मंडळी नानासाहेबांना भेटायला गेली होती. तेव्हा नानासाहेब म्हणाले, मी वऱ्हाडात वकीली करायला आलो तेव्हा फक्त ५० रुपये घेऊन आलो होतो. आज मी वऱ्हाडांतून जात आहे, तेव्हा ५० रुपयापेक्षा जास्त असलेले मज जवळचे हे दोन हजार रुपये अमरावती नगर वाचनालयात जमा करा'' असे म्हणून नानासाहेबांनी आपल्या खिशांतील दोन हजाराच्या नोटा डॉ. बापट यांच्या हातावर ठेवल्या व सजल नयनांनी सर्वांचा निरोप घेतला. असले सार्वजनिक चारित्र्य आज दुर्मिळ व नवलाईचे ठरावे.

कै. नानासाहेबांचे स्मरणार्थ अमरावती नगरपालिकेने नगरपालिकेच्या नेहरु मैदानांतील ए.व्ही.स्कूलची भव्य वास्तु उभी केली आहे. व तिला कै. नानासाहेब गोखले स्मारक भवन हे नाव देऊन अगदी औचित्य साधले आहे. ती इमारत उभी आहे तोवर नानासाहेबांच्या चारित्र्याचे स्मरण ती जनतेला देत जाईल.

विदर्भातील एक थोर दलित पुढारी- गणेश आकाजी उर्फ नानासाहेब गवई - व्यक्ति आणि कार्य :

जन्म २६ आक्टोंबर १८८८ थुगांव जि. अमरावती.

''बहिष्कृत भारत'' १९१४ साली त्यांनी पाक्षिक काढले ते ६ वर्षे सुरु होते.

डिप्रेस्ड इंडिया असासिएशन स्थापना १९१७ गवई नेते.

फ्रँचाईस कमिटी सरकारने नेमली होती. ही कमिटी अमरावतीस आली. या कमिटीवर कांही सरकारी अधिकारी सर सुरेन्द्रनाथ बॅनर्जी सारखे सदस्य होते. या कमिटी समोर गवई यांची साक्ष झाली. श्री.मुधोळकर हेही साक्षीसाठी आले होते.

नागपूर असेम्ब्ली (कायदे मंडळ) ७०-७२ सदस्यांत २ डिप्रेस क्लास सदस्यांची सरकार कडून नेमणूक १९२० पासून होऊ लागली. श्री. ग. आ. गवई व श्री. कालीचरण नंदागवळी या दोघांची नेमणूक झाली. त्यानंतर नानासाहेब २५ वर्षे कायदे मंडळ सदस्य होते.

इंग्रज सरकारने १२ बलुत्यापैकी जोशी व महार हे दोनच बलुते कायद्याने मान्य केले होते. महारांना गावकीचे काम करण्यासाठी शेतकऱ्यांकडून धान्याच्या रुपाने वेतन मिळत असे व त्याची वसुली शेतसाऱ्या प्रमाणे केली जात असे. यवतमाळच्या डिस्ट्रीक्ट असोसिएशनने वऱ्हाडातील महारकीचा प्रश्न हाती घेऊन चळवळ आरंभिली. लोकांचे काहीही काम न करता शेतकरी लोकांकडून ह्या महारांना बलूते देवविण्यात येते. या प्रथेला असोसिएशनची हरकत होती. त्याचप्रमाणे महाराला जी कामे करावी लागतात त्या कामाकरिता इतक्या महारांची गरज नाही असेही त्यांचे म्हणणे होते. सरकारने त्याकरता १९१८ च्या सुमारास मि.ए.मेक्डोनॉल्ड आय. सी.एस. यांच्या अध्यक्षतेखाली कमिटी नेमली होती. या कमिटीवर महारा तर्फे श्री. गवई यांचा व श्री.

धामक इ.ओ.सी.रा.ब. रामचंद्र विष्णू महाजनी व उगव्याचे देवराव पाटील यांचा समावेश होता. या कमिटीस बलूता कमिटी म्हणत. या कमिटीने चारही जिल्ह्यात फिरुन चौकशी-साक्षी घेतल्या व प्रत्येक कामगार (महाराला) दरवर्षी ३ खंडया ज्वारी किंवा तिची किंमत देण्याची शिफारस केली. कमिटीने १७ हजार महारा ऐवजी १० हजार महार ठेवण्याची शिफारस केली. त्याप्रमाणे महारांची संख्या कमी झाली व त्यांना धान्या ऐवजी पगार सुरु झाले. गवई यांनी भिन्न मतपत्रिका जोडली होती. गवई हे २५ वर्षे कायदे मंडळाचे सदस्य होते. पैकी २० वर्षे नॉमिनेटेड सदस्य होते व १९३५ नंतर ते लोकनियुक्त म्हणून ५ वर्षे सदस्य होते.

''..... उमरावतीला १९१० साली महार सुधारक मंडळ नावाची संस्था स्थापन करण्यात आली होती. त्यामध्ये विठ्ठल मकेस व संपत गणपत नाईक ही मंडळी होती. राजा-मुंजे पॅक्ट हा मिश्र मतदार संघासंबंधीचा हिंदुमहार सभा व डिप्रेस क्लास असासिएशन यांचेतील करार होता.

पुढे आंबेडकरांनीही मिश्र मतदार संघाला मान्यता दिली. तो करार म्हणजे पुणे करार.

राऊंड टेबल कॉन्फरंससाठी गवई गेले होते. डॉ.मुंजे, बॅरि.रामराव, श्री.चॅटर्जी, मेहेरचंद खन्न ही मंडळी सुध्दा होती.

अमरावतीला संपत गणपत नाईक यांच्या खटपटीने बोर्डींग सुरु झाले आणि सध्या ते आदर्श विद्यार्थी गृह म्हणून चालू आहे.

मध्यप्रांत - वऱ्हाड ब्राम्हणेत्तर परिषद अमरावती येथे भरली. (१७ मे १९३६) त्यावेळी स्वागताध्यक्ष गवई' एम.एल.ए. हे होते.

''....बहिष्कृत भारत हे पत्र नागपूर येथून श्री. नानासाहेब गवई यांनी ६ वर्षे चालविले आहे.

शिक्षण महर्षि डॉ. पंजाबराव देशमुख

यांचे जीवन अनेक विध उपक्रम व चळवळींनी परिपूर्ण आहे. भारत सरकार मध्ये कृषी मंत्री असतांना कृषी विषयक कार्यात अमरावती जिल्हा परिषदेचे अध्यक्ष

होते. त्यावेळी पिण्याचे पाणी हरिजनांचा उध्दार यासाठी कार्य केले. दि अम. सेंट्रल को-ऑप. बँकेचे अध्यक्ष होते. कॉटन मार्केट कमेटीचे सदस्य होते. व विद्यापीठ कार्यकारिणीचे सदस्य होते. भारतीय कापूस पणन महा. अध्यक्ष होते. राज्य व्यवहार समितीचे अध्यक्ष होते. जुन्या मध्यप्रांत - वऱ्हाड सरकार मध्ये शिक्षण मंत्री होते. त्यांना भारताच्या कृषी चळवळीचे जनक म्हणता येईल, इतके मोठे कार्य ह्या क्षेत्रात त्यांनी केले. त्यांनी अस्पृश्यता निवारणासाठी कार्य केले. आंतरजातीय विवाहास मान्यता दिली. ते संस्कृतचे गाढे अभ्यासक होते. निष्णात कायदे पंडित होते. त्यांना ऑक्सफोर्ड विद्यापीठाने डॉक्टरेटची पदवी प्रदान केली होती. त्यांनी महिला शिक्षणासाठी अफाट कार्य केले. अनेक शिक्षण केंद्रे स्थापन केली.

त्यांचा जन्म अमरावती जिल्ह्यातील पापळ या गावी एका कुणबी कुळात झाला. स्वत:ला शिक्षणाची आवड असल्यामुळे शहरात येऊन शिक्षण घेतले. पुढे शिक्षणाची गोडी इतकी वाढली की लंडन ला एडिंबरो विद्यापीठात उच्च शिक्षण घेत पदवी प्राप्त केली. परत आल्यावर वकीली सुरु केली.

शेतकऱ्यांचे हाल बघवेनात. म्हणून 'शेतकरी संघ' स्थापन केला व कृषी विषयक चळवळी सुरु केल्या. शिक्षणमंत्री या नात्याने केलेले कार्य म्हणजे शेतकऱ्यांच्या मुलांना नि:शुल्क शिक्षण देण्याची व्यवस्था करणारा कायदा केला. हुंडा प्रतिबंधक कायदा केला; कर्ज निवारण कायदा केला. ग्रामीण विकास कार्यासाठी महामंडळ स्थापन केले; आणि क्रीडा व खेळ यांच्या प्रसारासाठी महामंडळ प्रस्थापित केले. इ.१९३१ साली शिवाजी शिक्षण मंडळ स्थापन केले इ.१९४० साली ते आजीवन अध्यक्ष नियुक्त केले गेले. (शिक्षण प्रसारासाठी त्यांनी निझामाकडून देणगी मिळविली. १९४६ साली श्री.शिवाजी कॉलेज ऑफ कॉमर्स, श्री शिवाजी कॉलज ऑफ आर्टस ची स्थापना झाली. इ.१९५८ साली विज्ञान महाविद्यालय, व १९६९ साली बेसिक ट्रेनिंग कॉलेजहि स्थापन केले.

लगेच कृषि महाविद्यालय स्थापन करण्यात आले. व शिक्षण महाविद्यालय स्थापित झाले. नागपूरचे नॅशनल कॉलेज बंद पडणार होते. परंतु ते शिवाजी शिक्षण



शिक्षण महर्षी डॉ. पंजाबराव देशमुख

संस्थेच्या स्वाधीन करण्यात आले, व आता अगदी व्यवस्थित सुरु आहे. आकोट, आकोला, बुलढाणा, वरुड, दर्यापूर, पातूर, चिखली, मोर्शी, तेल्हारा, तिवसा इ.ठिकाणी महाविद्यालये, शाळा स्थापन करण्यात आल्या आहेत. ही प्रस्थापित शिक्षण प्रणालीची महाविद्यालये आहेत.

परंतु डॉ.भाऊसाहेबांनी शिक्षणात नाविन्य व चैतन्य आणण्यासाठी ग्रामीण महाविद्यालय स्थापन केले. त्यात ग्रामविकासाचे प्रशिक्षण देण्यात येते. इ.१९५० साली लोकविद्यापिठ प्रस्थापित करण्यात आले. आणि त्या विद्यापिठाच्या आधीच रुरल इंस्टिट्युट व जनता महाविद्यालय करण्यात आले. ह्या योजनेतय मूलभुत कृषि विद्यालय, गृह अर्थशास्त्र, ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्र, गांधी ग्रामोद्योग मंदिर इ.संस्था येतात. इ.१९५५ साली भारत शासनाने श्री माळी समितीच्या अहवालाला मान्यता दिली. व दहा ग्रामविकास संस्था स्थापन करण्याचे ठरविले. त्यापैकी त्या अमरावती येथे स्थापित झाली आहे. सर्व जातिधर्माच्या विद्यार्थ्यांसाठी त्यांनी श्रध्दानंद वसतिगृह सुरु केले आहे. तेथे नाममात्र शुल्क घेऊन विद्यार्थ्यांना राहता येते. नागपूरला अनाथ मुलांसाठी श्रध्दानंद अनाथालय सुरु करण्यात आले. ते भारतीय संविधान समितीचे सदस्य होते. आणि आपोआपच नंतर पार्लमेंटचे सदस्य झाले व इ.१९५२ मध्ये लोकसभेचे सदस्य म्हणून निवडून आले. मागासवर्गीय छात्र शिष्यवृत्ति महामंडळाचे ते सदस्य होते. त्यांनी अ.भा.मागासवर्गीय मंडळ स्थापन केले. बिहारच्या अधिवेशनाचे ते अध्यक्ष होते. रॉयल सोसायटी ऑफ आर्टस, लंडनचे सदस्य होते. इंडियन इंस्टि.ऑफ पब्लिक ॲन्ड मिनिस्ट्रेशनचे सदस्य होते इ.१९४८ ला वाशिंग्टन ला व १९५१ मध्ये रोमला भरलेल्या 'फाओ' (एफ ए ओ) चे भारताचे प्रतिनिधी होते. इ.१९५४ च्या सिलोनला भरलेल्या फाओ अधिवेशनात ते भारताच्या शिष्टमंडळाचे नेते होते.

रावबहादूर रा.मो.उपाख्य आप्पासाहेब खरे -

बालपण :- माझा जन्म कोकणात रत्नागिरी जिल्हयात गुहागर येथे दि. २८-२-१८८२ रोजी झाला त्यावेळी माझे वडील सनदी वकील अगर मुखत्यार वकील म्हणून सन १८७२ पासून कोर्टात काम करीत असत. माझ्या बालपणीच त्यांनी माझ्या कडून

नियमितपणे ''केसरी'' (वाचून) घेतला. काळजीपूर्वक -हस्व दीर्घाच्या उच्चाराकडे लक्ष ठेवून वाचन करण्याची, वाचलेले स्मरणात ठेवण्याची व ते सारांश रुपाने कथन करण्याची क्षमता यावी ह्याकडे त्यांचा कटाक्ष होता. माझ्या मनात देशाभिमान व देशकार्याचे बीजारोपण त्यांच्यामुळेच झाले. त्यांनी घडविलेल्या चांगल्या सवयी व संस्कार यांचा लाभ मला अद्यापही होतो. १८९४ मध्ये मी ६ वी उत्तीर्ण झालो.

विदर्भात आगमन :- वडिलांचा देहान्त इ.स. १८९४ मध्ये झाला. इ.१८९६ मध्ये माझे चुलत बंधु नारायणराव मला मूर्तीजापूरला घेऊन आले. तेथे ते शिक्षक होते. त्यांच्या घरी माझे अध्ययन सुरु होते त्यानंतर बंधूंनी मला तळेगांव दशासर येथे शिक्षण घेण्यासाठी पाठविले. तेथे मी ए.व्ही.स्कूलमध्ये १८९७ च्या फेब्रुवारी महिन्यात प्रवेश घेतला हा एक जीवनास कलाटणी देणारा प्रसंग होता. मी अमरावतीहून त्याच साली हायस्कूल एन्ट्रन्सची परीक्षा पास झालो. माझा पहिला क्रमांक आला व मला स्कॉलरशिप मिळाली. पुढे ४ वर्षात मी मॅट्रीकची परीक्षा इ.स.१९०१ मध्ये उत्तीर्ण झालो. नंतर १९०२ च्या १५ फेब्रुवारी पासून १६ जून पर्यन्त अमरावती च्या ए.व्ही.स्कूलमध्ये बदली शिक्षक म्हणून नोकरी केली. त्यावेळी मॅट्रीक उत्तीर्ण झालेल्या व्यक्तीला कायद्याची परीक्षा देण्याची सवलत होती. म्हणून मी कायद्याचा अभ्यास सुरु केला. त्यावेळी श्री बर्वे यांच्या मुलास शिकविण्याची नोकरी पत्करुन मी धामणगांवला गेलो. तेथे काही दिवस गेल्यानंतर ओक नावाचे गृहस्थ भेटले. त्यांच्या सल्ल्यावरुन मी कॉलेजचा अभ्यास करण्यासाठी इंदूरला गेलो (ऑगस्ट १९०२) आणि १९०७ साली अलाहाबाद विद्यापिठाची बी.ए.ची परीक्षा उत्तीर्ण झालो. मधून मधून शिक्षकाची नोकरी व शिकवणी केलेली होती. ते पैसे कॉलेजच्या शिक्षणास कमी पडले. पुढे कायद्याच्या पदवीचा अभ्यास करण्यासाठी नागपूरला सरकारी लॉ कॉलेजमध्ये नांव घातले व इ.स.१९०९ साली अलाहाबाद विद्यापिठाची एल.एल.बी. परिक्षा उत्तीर्ण झालो.

वकीलीचा ओनामा :- वडिलबंधू नारायणराव यांची अमरावतीस बदली झाली होती म्हणून मी अमरावतीस आलो त्याकाळी दादासाहेब खापर्डे यांचे नाव गाजत होते. त्यांचा सल्ला घेण्याची इच्छा होती. पण ते विलायतेत गेलेले होते. म्हणून दुसरे एक

विख्यात वकील सर मोरोपंत उपाख्य अण्णासाहेब जोशी यांच्याकडे मार्गदर्शनार्थ गेलो. वकीली करावी, ती कोठे वगैरे चर्चा सुरु असतांना त्यांचे एक वाक्य पुढे कायमचे लक्षात राहिले. ते म्हणाले 'मी. खरे , देअर इज ऑल्वेज रुम एट द टॉप' पण त्यासाठी खुप वाचन,परिश्रम, कष्ट, अभ्यास करावा लागेल. हे करायची तयारी आहे काय?' मी होय म्हटले तेंव्हा त्यांनी अमरावतीस स्थायिक होण्याचा मला सल्ला दिला. मी नमुन्यात एक घर घेऊन राहू लागलो. व वकिली सुरु केली.

सार्वजनिक कार्याची मूहूर्तमेढ :- इ.स.१८९७ पासूनच माझ्या थोड्या बहूत ओळखी झाल्या होत्या. कै.भाऊसाहेब असनारे यांचे "मुद्राराक्षस" हे नाटक कैलासवासी दादासाहेब खापर्डे यांनी रंगभूमीवर आणण्याचे ठरविले व त्या नाटकात मला भूमिका दिली होती. अभिनयाचे बारकावे, शब्दाचे उच्चार, हालचाली , हावभाव आवाजाचा चढउतार हे सर्व अतिशय मार्मिकपणे त्यांनी मला शिकविले. मी तालीमीसाठी तुकाराम न्हावी यांच्या आखाड्यात जात होतो. माझ्या, शामराव देशपांडे, दत्तात्रय टाकळकर, वीर वामनराव जोशी वगैरे लोकांशी ओळखी होत्या. मी वकीलीच्या निमित्ताने अमरावतीस राहू लागलो पण सार्वजनिक जीवनाशी माझा संपर्क नव्हता. तो पुढीलप्रमाणे आला अमरावती को-ऑपरेटिव्ह सेंट्रल बँक इ.स.१९१२ मध्ये स्थापन झाली. बँक स्थापन करण्याची परवानगी मागणारे अर्जदार आपोआप डायरेक्टर झाले. अनुमती मिळाली नंतर डायरेक्टरांच्या बैठकीत श्री अण्णासाहेब (सर मोरोपंत जोशी) अध्यक्ष व श्री जयवंत सेक्रेटरी झाले.

इ.स.१९१६ मध्ये अण्णासाहेब जोशी नागपूरला गेल्यामुळे श्री जयवंत अध्यक्ष झाले. व मी सेक्रेटरी म्हणून निवडला गेलो. पुढे श्री जयवंत नागपूरला गेल्यामुळे मी १९२० साली अध्यक्ष निवडल्या गेलो. त्या बँकेचा मी २८ वर्ष अध्यक्ष राहिलो व १९५२ मध्ये ती बँक सोडली. इतरही सार्वजनिक क्षेत्रात माझ्यावर विविध जबाबदाऱ्या येत गेल्या व माझ्या स्वभावानुसार मी स्वीकारुन त्या त्या प्रकारची कामे पार पाडीत गेलो. इ.स. १९१४ मध्ये युध्द झाल्यावर नागरिकांचे सहकार्य मिळविण्यासाठी वॉर कमिटी स्थापन झाली. त्यात मला सदस्य नियुक्त करण्यात आले. इर्विन दवाखान्यात ऑननरी

व्हिजीटर नियुक्त करण्यात आले. इ.स.१९२९ साली डफरीन ट्रस्ट फंडवर माझी नियुक्ती झाली. १९१७ साली के.इ.एम. कमिटीवर सदस्य म्हणून नियुक्ती झाली. या सर्वच ठिकाणी मी विविध पदे भूषविली आहेत.

पदव्या व सन्मान :- मी हाती घेतलेले कार्य इमानाने, विश्वासाने सचोटीने व चिकाटीने पार पाडले. प्रत्येक बाबतीतील माझा हिशोब होता व व्यवस्थित होता. ह्या बाबतीत मला कोणीही केव्हाही व कोणत्याही प्रकारे टीकेचे लक्ष बनविले नाही.

मी लक्ष घातले, त्या संस्था परमेश्वर कृपेने भरभराटीस आल्या. ह्याकडे सरकारचे लक्ष होते. माझ्या कार्याचा व समाजसेवेचा गौरव म्हणून मला १९२० मध्ये रावसाहेब व १९२८ मध्ये ओ.बी.ई. हे किताब दिले. माझे निर्णय सडेतोड व सद्सद्विवेकपूर्ण होते. मी इंग्रज दरबारी माझे आवश्यक तेवढे वजन वापरले व कामे करीत गेलो. किंग एडवर्ड मेमोरियल सोसायटीमध्ये राहिल्यामुळे किंग एडवर्ड कॉलेजच्या स्थापनेपासून माझा घनिष्ट संबंध राहिला. डफरीन हॉस्पीटलशी माझा संबंध राहिला. इर्विन हॉस्पीटल साठी इमारत बांधून देण्याची मी खटपट केली. जिल्हा सेंट्रल को.ऑ.बँकेला इमारत स्वस्तात उपलब्ध करुन दिली. को-ऑपरेटीव्ह मुव्हमेंट जिल्ह्यात दौरे करुन लोकप्रिय केली. नेकोलेटपार्क (नेहरु मैदान) येथील म्यु.ची भव्य शाळेची इमारत बांधण्याचा ठराव झाला होता. तेव्हा मी अमरावती शहर म्यु.कमेटीचा उपाध्यक्षच होतो. इंग्रज अधिकाऱ्यांशी मुद्दाम वैर केले नाही पण सत्व किंवा अभिमान न सोडता त्यांच्याशी ऋणानुबंध ठेवले. १९०७ डिसेंबर मध्ये नोकरीसाठी अर्ज करीत असतांना डायरेक्टर ऑफ पब्लिक इन्स्ट्रक्शनच्या कार्यालयात अर्ज केला असे सर्क्युलर आले की, नवीन भरती झालेल्यांनी निदान तीन वर्ष नोकरी केली पाहिजे. तेव्हा जुलै १९०८ मध्ये मी सही करण्याचे नाकारुन नोकरी सोडली व नंतर मला नोकरी मिळाली. १९०८ मध्ये पुणे येथे. बेरार एज्युकेशन सोसायटीशी संबंध - कै दादासाहेब खापर्डे यांनी सुरु केलेल्या बेरार एज्युकेशन सोसायटीच्या शाळा इंग्रज सरकारने बंद पाडल्या. तेव्हा त्यांच्या सूचनेवरुन नवीन नाव देवून संस्था सुरु करावी असे ठरले. आणि - ''न्यू एज्युकेशन सोसायटी'' ह्या नावाने नवीन शिक्षण संस्था १९२४ मध्ये सुरु करण्यात आली. त्या शाळेचे नांव न्यू

हायस्कूल असे ठेवले. नानासाहेब गोखले, बाबासाहेब खापर्डे, नानासाहेब ब्रम्ह, ही मंडळी ह्या संस्थेच्या स्थापनेत पुढारी होती. बैठक खापर्डे वाड्यातच झाली होती. तेव्हापासून माझा या संस्थेशी संबंध कायम आहे. नानासाहेब ब्रम्ह, बाबासाहेब खापर्डे यांच्या कारकिर्दीत बेरार एज्युकेशन व न्यू एज्युकेशन सोसायटी यांच्या एकीकरणाची कल्पना निघाली. मात्र ते स्वर्गवासी झाल्यावर १९७२ मध्ये प्रत्यक्ष एकीकरण घडून आले. नवीन संस्थेचे नांव नूतन विदर्भ शिक्षण मंडळ'' असे आहे. आज सहा हजारावर विद्यार्थी विद्यार्थींनी ह्या संस्थेच्या चार शिक्षण संस्थातून शिक्षण घेत आहेत. ह्या यशाचे श्रेय सुरुवातीचे चार तहहयात सभासद व क्रमांकाने झालेल्या सर्व विविध पदाधिकाऱ्यांचे आहे. खरे मानकरी तेच आहेत.

शक्य तेवढ्या नम्रपणाने आपणासच आपली ओळख व्हावी या दृष्टीने सुचले, तसे नमूद केले.

माझ्या सध्याच्या राजकारणनिवृत्ती मधून मी देशाच्या व्यवहाराकडे, त्यात इष्ट फरक पडेल अशा आस्थापूर्वक वृत्तीने व शांत मनाने पहात आहे.

खात्रीने देशाला सुराज्य प्राप्त व्हावे हे दैवाने संकल्पिले असेलच.

टीप :-(श्री अप्पासाहेब खरे यांची मी मुलाखात घेऊन वरील टिपण त्यांच्या शब्दातच लिहिले. हेच असेच असावे असे वाटले खरे. खरे यांची जन्मशताब्दी झाली तेव्हा जो विशेषांक निघाला त्यात हा लेख घेण्यात आला. वरील लेख जवळ जवळ त्याचेच पुनर्मुद्रण आहे. -- बा.ब.खापर्डे)

अमरावतीचे जेल अधिक्षक श्री पावणस्कर :

अमरावती जिल्हा सेन्ट्रल जेलवर इ.स.१९२७ ते एप्रील १९३२ पावेतो डॉ.सदाशिवराव गोपाळराव पावणस्कर हे जेल अधिक्षक होते. या काळात कायदेभंगाची चळवळ झाली आणि शेकडो सत्याग्रहांना शिक्षा होऊन त्यांना या कारागृहात ठेवण्यात आले होते. या सर्व सत्याग्रहांना अधिक्षक डॉ.पावणस्कर यांनी जेल मॅन्युअलच्या अंतर्गत

राहून चांगली वागणूक दिली होती व त्याचा या सत्याग्रहींनी सुटून आल्यानंतर फार गवगवा केल्याने त्या काळच्या इंग्रज अधिकाऱ्यांचे माथे भडकले. आणि तत्कालीन मध्यप्रांत वऱ्हाडचे इन्स्पेक्टर जनरल ऑफ प्रिझान्स मि.पावेल या नांवाने एक इंग्रज अधिकारी होते. त्यांनी पावणस्करांना त्यांचे कडून कष्टाची कामे घ्या. कोणतीही सवलत मुळीच देउं नका असे बजावले होते. पावणस्करांनी मि.पॉवेल यांना जेल मॅन्युअल दाखवून यांत असलेल्या नियमा बाहेर मी कोणास कोणतीच सवलत दिलेली नाही हे दाखवून दिले. परंतु मि. पॉवेल यांचे डॉ. पावणस्करांबद्दल जे मत दुषित बनले त्यात फरक पडला नाही. इतकेच नव्हे तर एकंदर परिस्थिती लक्षात घेऊन पावणस्करांनी प्रकृतीचे कारणावरुन जो रजेचा अर्ज दिला त्याचा आधार घेउन मि. पॉवेल यांनी अमरावती जेल अधिक्षकाचे पदाचा भार एका इंग्रज गृहस्थाकडे द्यायला लावला आणि पावणस्करांना सिव्हिल सर्जनचे प्रकृतीचे बाबतचे सर्टिफिकेट आणा म्हणजे रजेचा विचार करु असे सांगितले. डॉ. पावणस्कर यांना थोडा रक्तदाबाचा आजार होता. अर्थातच त्यांना कागदी लिहून, पावणस्कर यांना त्रास देण्याचा

नोकरी अपात्र ठरविण्याचा मि. पॉवेल यांचा मनसुबा असावा हे पावणस्करांनी ओळखले. परंतु योगा योगाने याच वेळी मि.पॉवेल यांची बदली झाली. व त्यांचे जागी कर्नल जठार हे मध्यप्रांत वऱ्हाडचे इन्स्पेक्टर जनरल ऑफ प्रिझन्स म्हणून आले.

यावेळी डॉ. पावणस्कर हे नोकरीचा राजीनामा देण्याच्या विचारात होते. परंतू जनरल जठार यांनी त्यांना समजावले व आपल्या पदाचा चार्ज घ्या असे सांगितले पण स्वाभिमानी डॉ.पावणस्करांनी त्यांना नकार दिला. शेवटी व्हालंटरी पेन्शन घेऊन स्वाभिमानाने नोकरीतून ते निवृत्त झाले व पुढे त्यांनी अमरावती येथे १९३४ साली श्रीराम फार्म लि. या नांवाने औषधाचे दुकान लावले. सत्याग्रहांना चांगली वागणूक दिली एवढाच त्यांचा अपराध होता. त्याची परिणती निवृत्त होण्यात झाली.

डॉ.पावणस्कर हे एम.बी.बी.एस. झाले नंतर प्रथम मध्यप्रांततच सरकारच्या आरोग्य विभागात यवतमाळच्या सरकारी दवाखान्यात काम दिले.
काही काळाने त्यांना अमरावती डिस्ट्रिक्ट सेन्ट्रल जेलच्या अधिक्षकाचे जागेवर नियुक्ती देण्यात आली होती.

(डॉ. पावणस्करांचे जागेवर अमरावती जेलचे सुपरीन्टेन्डेट म्हणून आलेले मि.व्हावे या इंग्रज गृहस्थाचे काळात अमरावती जेल मधील सत्याग्रहींचा फार छळ करण्यात आला ती माहिती ग्रंथात आली आहे.)

सहकाराचे प्रतीक भाऊसाहेब भोकरे.

लक्ष्मण बळीरामजी भोकरे यांचा जन्म अमरावती जिल्ह्यात देवरी या गावी दि.१ जानेवारी १९०१ रोजी झाला. बालपणापासून त्यांनी काँग्रेसच्या कार्यक्रमात भाग घेतला. नागपूर काँग्रेसला (इ.स.१९२०) उपस्थित होते. व तेव्हापासून महात्माजींपासून प्रेरणा घेऊन त्यांनी विधायक कार्य सुरु केले. शिक्षकाचा व्यवसाय पत्करला. करजगांव येथे उत्कर्ष सहकारी संस्था स्थापन केली. इ.स. १९३८ मध्ये अमरावतीत स्थायिक झाले. येथील कापूस बाजारात शेतकऱ्यांच्या अडचणी लक्षात आल्या. बॅ.रामराव देशमूख यांच्याा मार्गदर्शनाखाली त्यांनी इ.१९५१ मध्ये विदर्भ शेतकरी सभेची स्थापना केली व निष्ठेने चिकाटीने शेतकऱ्यांसाठी कार्य केले. त्यासाठी सतत पुणे, मुंबई, नागपूर, येथे सरकारशी बोलणी करण्याकरता वाऱ्या करीत, व तेही स्वखर्चाने नंतर मात्र त्यांनी राजकारणाशी संबंध ठेवला नाही. कोणत्याही पक्षात राहिले नाहीत. पण सर्वच राजकीय पक्षांच्या नेत्यांशी त्यांचे घनिष्ठ संबंध राहिले. कापूस एकाधिकारासंबंधी ते आग्रहाने सांगत असत की, कापसाच्या भावाची हमी सरकारनेच घेतली पाहिजे. व शेताला रास्त भाव मिळालाच पाहिजे. शेतकऱ्यांचे हित हेच आपले उद्दिष्ट मानून त्यांनी अनेक संस्थांच्या माध्यमातून सतत कार्य केले. म.रा.सहकारी संघ, मुंबई, म.रा.को-ऑप.मार्केटिंग --.मुंबई, विदर्भ को-ऑप. मार्केटिंग सोसायटी, नागपूर, अम.तालुका शेतकरी खरेदी विक्री संघ, अमरावती., कापूस बाजार समिती, अमरावती, सहकारी भूविकास बँक, अमरावती, डॉ.धनजंयराव गाडगीळ, प्रशिक्षण महाविद्यालय, नागपूर, विदर्भ विभागीय सहकारी बोर्ड, नागपूर इ. संस्थातून त्यांनी सतत कार्य केले. त्यामुळे ते सहकार महर्षि ह्या गौरवाचे मानकरी झाले. ते धार्मिक वृत्तीचे होते. बुलढाणा जिल्ह्यात माकनेर या गावी होऊन गेलेल्या श्री मारोती महाराजांचे शिष्य निळोबा महाराज राउळकर यांच्या प्रेरणेने ते आध्यात्मवादी बनले. सत्वशील, चारित्र्यसंपन्न, निरहंकारी, प्रसन्न

असे त्यांचे व्यक्तिमत्व होते. महाराष्ट्रातील सहकारी चळवळीस त्यांनी कायमचे ऋणी करुन ठेवले आहे.

आमचे दादा

(बालशिक्षण मंडळाचे परम हितचिंतक व सक्रीय सहाय्यक कै.श्री.वि.रा.उपाख्य दादासाहेब राजवाडे यांची ओळख करुन देण्याचा एक प्रयत्न.)

दादाबद्दल लिहायचं म्हणजे मला भाषेचा अपुरेपणा फारच जाणवायला लागतो. काही केल तरी जे म्हणायचंय ते भराभर हाततून निसटत जात असतं. मनात हजारो आठवणीने कल्लोळ उठत असतांना त्यांना त्याच गतीने शब्दात मोजणं कठीण होत जात असते. माझ्या दादाची आठवणी या जास्त करुन 'पिकल्या फणसाच्या' आठवणी आहेत. (कारण माझा जन्म १९३९ च्या अखेरचा) त्यावेळी काटे होते पण गोडी खूपच वाढलेली होती. आणि आधी तरी ती नव्हती असं थोडेच आहे ! उग्र मिशा, जरा रागीट डोळे पण त्याचबरोबर ओठावर सतत हास्यरेखा असं ते विलक्षण रसायन होते. जे जे दादाच्या सहवासात आले ते ते दादाबद्दल बोलतच राहतात. आजसुध्दा दादाच्या विद्यार्थ्यांनी सुध्दा सत्तरी, अंशी गाठलेली आहे. आणि संध्यासमयीच्या वाटा धरलेल्या आहेत. तरी सुध्दा दादांना चौऱ्यांशी वर्षाच्या वयाला मृत्यु आला.

पण आजसुध्दा आमच्या घरातला किंवा कुटूंबपरिवारातला तर राहोच पण इतरही ओळखीपाळखीत कुणाकडेही काहीही समारंभ असला की कोणी ना कोणी दादाची आठवण काढणारच, अन् त्यात रममाण होणारच ! अशा लोकांत सातारा सैनिक हायस्कूल मधून निवृत्त झालेले, सातारा येथेच कालक्रमणा करणारे डी.एस.देशमुख असतील किंवा मोर्शीचे लक्ष्मीनारायणनजी अग्रवाल असतील, किंवा स्टेट बँकेतून अधिकारी म्हणून निवृत्त झालेले लक्ष्मणराव तुंबडे असतील किंवा आमच्याकडे राहून शिकून पुढे पोस्टातून निवृत्त झालेले भगत असतील, किंवा अगदी कालपरवाची अजय लेले, दिलीप लोथे अशी मुले असतील. दादांच्या हाताखाली काम करीत असतांना (१९४१ ते १९८५ पर्यंत दादा पूर्ण विदर्भ विभागाचे शिक्षणाधिकारी होते.

जबलपूरच्या - म्हणजे दादा तिथे असतांना महाराष्ट्र मंडळाचे सदस्य होते तेव्हाच्या त्या आठवणी असतील, एक होतकरु विद्यार्थी म्हणून दादांच्या जवळ राहत असत. म्हणाले रात्री अभ्यास करतांना झोप लागली तरी अंथरुण घालून मग दादा मला उठवायचे, की अरे लक्ष्मण आता झोप, आता कसला अभ्यास होणार ! सकाळी लवकर उठून अभ्यास कर. ही आर्द्रता कोणाची ? तर अक्षरश: कर्दनकाळ म्हणून समजल्या जाणाऱ्या दादांसारख्या शिक्षकांची जेवढी शिस्त तेवढीच माया. आमच्या आईचे मात्र मायेचे पारडं फारच जड होते पण शिक्षक म्हणून लागणारा करडेपणा तिच्यातही होताच.

दादाचे शिकवण्याचे प्रेम तर इतके की आपल्या शैक्षणिक पेशात येणाऱ्या विद्यार्थी खेरीज आजूबाजूच्या आसपासच्या अक्षरश: शेकडों मुलांना दादा कायम शिकवत असत. मग ते पहिलीत असोत वा मॅट्रीकला. दादांच्या विविध विद्यार्थ्यांचे दादांवर जबरदस्त प्रेम व विश्वास. आपल्या मुलांना दादांकडे पाठवायला उत्सुक असत, दादांनी त्यांची वेळ कधीही टाळली नाही -म्हणजे ते शक्यच नव्हत. विषयपण कोणता का असेना - इंग्रजी असो वा संकृत वा गणित इथं काहीच फरक पडायचा नाही. इंग्रजीवर तर अफाट प्रेम आणि टाइम्सशिवाय तर कठीणच.

दादांमध्ये एक घीरोदात्त शान्तवृत्ती असे, सहजासहजी ते विचलित होत नसत. शान्तपणा किती -तर तोही त्यांच्या रागाच्याच तोडीचा. असंख्य प्रसंग आठवतात - दारावर येणाऱ्या केळेवाल्याने काही तरी खोटेपणा केला म्हणून त्याची भरलेली पाटीच्या पाटी उचलून भिरकावून दिलेली पण आठवते आणि रोजच्या नित्यनियमाप्रमाणे अंघोळीच्या आधी लाकडे फोडत असतांना लाकडाची एक झिलपी अुडून डोक्याला जखम झाली (सात टाके पडले होते) अन त्यातून रक्ताची धार लागली तेव्हा सुध्दा बाथरुम मध्ये खुर्ची टाकून दादा वाचत बसले होते. मग 'दादापुता' करुन त्यांना दवाखान्यात नेलं होतं.

या आमच्या घरात - १९४० सालचं घर - तेव्हापासून दादा जाईपर्यंत म्हणजे १९७५ पर्यंत म्हणजे गेले ५०/५५ वर्ष शिक्षणाचे अग्निहोत्र अखंड चालत ओलेलं आहे. या घरात शिक्षण हे एक व्रत होते. एक मजेशीर आठवण सांगितल्याशिवाय राहवत

नाही. ही आठवण श्री मोडक-बोर्डाचे सेक्रेटरी यांनी दादांच्या आठवणी लिहिल्या होत्या यात होती - गोष्ट १९४१ च्या आधीची त्यावेळी दादा इथल्या गर्व्हमेंट हिंदू हायस्कूलचे हेडमास्तर होते. त्यावेळी ती शाळा विदर्भात अग्रगण्य, बोर्डाचे सेक्रेटरी वगैरे त्याकाळी अर्थातच ब्रिटीश होते. साहेबांचे नाव लक्षात नाही - पण त्यांचा दादांवर एक शिक्षक म्हणून विश्वास व रिझल्ट तयार झाला की दादांच्या यादीशी ताडून पाहत असत व तो बऱ्याच प्रमाणात जुळत असे. एके वर्षी काही विषयात - इंग्रजी इत्यादी - मार्कांमध्ये बरी तफावत पडली. तेव्हा त्यांनी असा शेरा दिला की मिस्टर राजवाडे यांना त्यांचे विद्यार्थी इतके चांगले माहित असतात की त्यांचा विद्यार्थ्यांच्या निकालाचा अंदाज चुकत नाही. तरी अमुक विषयांची पेपरांची फेरतपासणी व्हावी. ही फेरतपासणी होईपर्यंत मॅट्रीकचा निकाल रोखून ठेवण्यात आला. नंतर बऱ्याच प्रमाणात ८०% तफावत दूर झालेली आढळली. आता असे हेडमास्तर आणि असे सेक्रेटरी (गोरा साहेबजी नेकी दाखवीत होता ती कुठेगेली ?) आणि अशी विश्वासाची नाती हे सारंच काही इतिहासजमा झालेलं. निवृत्त झाल्यानंतर म्हणजे वयाच्या पंचावन्न ते मृत्युपर्यंत म्हणजे चौऱ्यांशी वर्षाचे होईपर्यंत दादा सतत शिक्षणातच होते - मग ते आसपासच्या मुलाबाळांचे असो, किंवा तपोवनात हायस्कूल स्थापण्याचे काम असो किंवा अंधविद्यालय असो. बालशिक्षण मंडळाला त्यांच्या हातांनी आकार दिला यात नवल काहीच घडले नाही. आयुष्यभर दादा आणि आत्या (आई) मुलांना घडवीतच होते, स्वत:च्याच नव्हे तर इतराच्याही. आणि ते निवृत्तीच्या काळात शिक्षणाचं काम नाही करणार तर कसलं करणार ? बालशिक्षण मंडळाला 'हिशोब' ही चीज माहितच नव्हती. त्यांचे वर्षानुवर्षाचे हिशोब आकाराला आणतांनासुध्दा दादांनी दहा अकाअुंटस्चं काम केल असेल. संस्था काढण्यापेक्षा संस्था चालवणं, तिला स्वयंपूर्ण करणं हे महाकठीण काम आहे. तन्तोतन्त हिशोब, ताळेबंद, उत्पन्नाची सोय, ऑडिट, हे सारं झाल्याखेरीज संस्था उभ्या राहत नाहीत, नावारुपाला येत नाहीत. सुरुवातीला हे काम पगारी करुन घ्यायला संस्थांजवळ अजिबात पैसे नसतात, पण काम काही जादूने होत नसते ते कुणाला तरी करावेच लागते. कमलताईवर दादांचा विशेष लोभ असे. घरचं काम

आटोपून दुपारी वा रात्री दादांच्या सांगण्यानुसार हिशोब लिहायला कितीदातरी कमलताई आमच्या घरी आलेल्या मला आठवतात आणि त्यांचे बरोबर लीलाताई. सकाळी, दुपारी केव्हाही शाळेतून दादांना बोलावणे येत असे, अमुक इन्स्पेक्टर आलेत, तमूक आलेत त्यांना ही माहिती पाहिजे आहे. संस्थेला हिताचा सल्ला देणारी माणसं लागतात, आर्थिक मदत लागते ती सर्व प्रकारची मदत दादांनी केली.

पुढे काही वर्षानंतर कमलताईबरोबर प्रभाताई (ताटके) येऊ लागल्या, त्यांना हिशोबाच्या चोखपणाबद्दल अतिशय सोप्या शब्दात दिलेल्या सूचना नित्य स्मरणीय आहेत केव्हाही पैसा जमा झाला वा खर्च झाला तर प्रत्येक जमाखर्चाची नोंद ताबडतोब आपल्या जवळच्या हिशोबवहीत तारखेनुसार झालीच पाहिजे. स्वैपाक करीत असाल तर होत धुवून प्रथम हिशोबाची वही काढायची आणि त्यात ताबडतोब आवक जावक नोंदवायची अशी ती शिकवण होती. आमचेच नातेबाईक खापर्डे बगिच्यातील राजवाडे बंधूंचे घर घेण्याचे मंडळीने ठरवले तेव्हा ताबडतोब सर्व सभासदांनी (कार्यकारिणीच्या) स्वत: एकेक हजार रुपये द्या व मग इतरांकडे मागायला लागा अशी तोड काढून दादांनी स्वत:चा चेक लिहिला. गोष्ट एप्रिल १९७५ ची . तो शाळेसाठी दिलेला चेक होता. नंतर काहीच दिवसात त्यांचे निधन झाले. कोणती गोष्ट किती तात्काळ झाली पाहिजे व ती करतांना येणाऱ्या अडचणींवर मात कशी करायची याची व्यवहारिक जाण त्यांना होती. या व्यवहारीपणाचा स्वार्थासाठी कधीच उपयोग झाला नाही केवळ समाजकार्यासाठीच झाला हे विशेष. दादा किंवा माई हर्षे वा आबासाहेब देवस्थळे वगैरे सेवानिवृत्तीनंतर स्वत:साठी जगलेच नाहीत म्हणूनच संस्था उभ्या झाल्या.

१९६० च्या आसपास (नक्की साल आठवत नाही) दादांनी स्वत:च्या प्लॉटवर एक हॉलवजा इमारत संस्थेला बांधून दिली. माईच्या घरुन शाळा स्थानांतरित होवून तिथे भरायला लागली. त्याकाळी तीन हजार रुपये घेवून दादांनी संस्थेला अठराहजार रुपयांची पावती दिली होती. त्यावेळी सरकारकडून संस्थेने जागेकरिता खर्च केलेल्या रकमेची ग्रँट सरकारकडून मिळत असे. अशा रीतीने ही जागा, इमारत व त्याची किंमत संस्थेला मिळाली. या व्यवहाराला कोणत्या नंबरचा व्यवहार म्हणायचं ते ज्याचं त्यानं

ठरवावं. खर म्हटलं तर त्या जागेपासूनच खऱ्या अर्थाने संस्थेचा श्रीगणेशा झाला.

स्वत: विलक्षण गरिबीतून कष्टाने वर आल्यावर कशाचाही हव्यास न करता, काटकसरीने राहून, जमवलेला सर्व पैसा दादांनी वेगवेगळ्या संस्थाना दान करुन टाकला. मुलांच्या 'नावे' पैसा ठेवण्याच्या भानगडीत ते पडले नाहीत.

''शतेषु जायते शूर: सहस्त्रेंषूच पंडित:
वक्ता दहसहस्त्रेषु, दाता भवति वा न वा ॥''

(शूरवीर शंभरात एक, पण्डित हजारात एक, वक्ता दहा हजारात एक तर दाता क्वचितच जन्माला येतो.) या श्लोकांत चढत्या श्रेणीने वर्णिलेल्या सर्व गुण, निर्भयता, विद्याव्यसन, वक्तृत्व आणि दातृत्व आमच्या दादांजवळ होते.

(आशा राजवाडे, दादासाहेब राजवाडे यांची कन्या)

क्रांतीवीर गणेश मार्तंड ऊर्फ गंपूनाना पिंपरकर

आमच्या अचलपूर शहरात अनेक क्रांतीकारक होऊन गेलेत. गंपूनाना पिंपरकर म्हणजे, त्या माळेतील एक तेजस्वी हिरा. २२ फेब्रुवारी १८९८ साली जन्माला आलेले गंपूनाना क्रांतीचे लेणेच घेऊन आलेत.

ख्रिश्चन झालेल्या आदिवासी बांधवांना पुन्हा हिंदू धर्मात आणण्यासाठी संत पाचलेगावकर महाराजांनी सुरु केलेल्या कार्यात धडाडीने भाग घेऊन हजारो आदिवासींना त्यांनी हिंदू धर्मात आणले.

१९२६ साली बी.एच.एम.एम. ही कलकत्ता विद्यापिठाची वैद्यकीय पदवी घेतली. परंतु हा व्यवसाय न करता १९३० च्या आंदोलनात सहभागी होऊन कारावास भोगला.

स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या राजकारणात सहभागी होऊन भागानगराचा संग्राम गाजविला. गुन्हेगार ठरविलेल्या पारधी समाजाला संघटित करुन त्यांना त्यांचे हक्क मिळवून दिलेत आणि त्यांना स्वातंत्र्य लढ्यात सहभागी करुन घेतले.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर कै.शिवाजीराव पटवर्धन यांच्या कुष्ट रोग्यांच्या सेवाकार्यात गंपूनानांनी कै.बाळासाहेब मराठे यांच्या खांदा खांद्याला लावून सेवाकार्य केले.

या क्रांतीवीराने कष्ट, विवंचना, कैद, वनवास अतिशय निर्भिडतेने व सुहास्य वदनाने स्वीकारले. आमच्या अचलपूरच्या या महान सैनिकामुळे स्वातंत्र्यवीर सावरकर, महात्मा गांधी, वीर नरीमन सरहद्द गांधी, यांच्यासारख्यांचे चरण अचलपूरला लागले. कै.पु.भा.भाव्यांसारखे महान साहित्यिक यांच्याच घरी विद्यार्थी म्हणून राहत होते.

आमच्या अचलपूरची ही क्रांती ज्योत वयाच्या ८४ व्या वर्षी २४ ऑगस्ट १९८२ रोजी विझली आमच्या अचलपूरच्या या क्रांतिवीराला विनम्र अभिवादन !

कै.गंपुनाना पिंपरकर हे कै.श्रीमंत दादासाहेब खापर्डे यांचे आप्त होते. पण मुख्य म्हणजे त्यांचे निष्ठवंत अनुयायी होते व कै.बाबासाहेब खापर्डे यांचे एकनिष्ठ सहकारी होते. बाबासाहेब खापर्डे निवडणूक लढवीत तेव्हा त्यांची सर्व मदार गंपूनाना पिंपरकर यांचेवर सोपवून ते निर्धास्त असत. अमरावतीस ते कर्मभूमी व पुण्यभूमी मानत असत.

स्वातंत्र्य लढ्यातील मैदानाचे शिपाई - कै.अंबादासपंत वैद्य

भारतीय स्वातंत्र्य संग्रामात जेवढे ज्ञात स्वातंत्र्य सैनिक आहेत. त्यापेक्षा कितीतरी असे अज्ञात स्वातंत्र्य सैनिक आहेत की जे प्रसिध्दी पराङ्गमुखतेमुळे किंवा स्वातंत्र्यप्राप्तिसाठी कार्य करणे हे आपले निहीत कर्तव्यच आहे. अशा निष्काम कर्म भावनेतून कर्तव्य करुन गेले. कर्म केले पण त्याचे श्रेय न घेता इदम् न मम म्हणून पडद्याआडच राहिले.

विश्वविख्यात श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, अमरावतीच्या आद्य संस्थापक वैद्य बंधू पैकी कनिष्ठ बंधु अंबादासपंत उपाख्य दादाजी दरवर्षी त्यांच्या कार्याचा परिचय लेखणीच्या माध्यमातून करुन त्यांना आदरांजली व्यक्त करतांना त्यांच्या स्मृती गंधाने पावन झालेल्या मंडळाच्या इतिहासाची पाने स्पर्शण्याचा योग येतो, आणि मंडळाच्या जुन्या दस्तावेज विभागातील अनमोल खजिन्यातून मोती वेचता वेचता 'देता किती घेशील दो करांनी' हया उक्तीचा प्रत्यय येतो.

दादाजींच्या वार्धक्याच्या काळात त्यांच्या सानिध्यात राहून त्यांची सेवा करण्याचे भाग्य लाभलेल्या त्यांच्या मानसपुत्राला अरुण पाटणेला म्हटले, 'जेष्ठ कार्यकत्यांच्या सानिध्यात तू सदैव असतोस त्यांच्या तोंडून , दादाजी आणि स्वातंत्र्य

लढा ह्या संदर्भात कळलेला एखादा अनुभव सांग जेणे करुन स्वातंत्र्य लढ्यातील दादाजींच्या योगदानाचा परिचय त्यांच्या स्मृतीदिना निमित्त करुन देता येईल.' अरुण एकच वाक्य उद्‌गारला ' 'मैदानावरचे शिपाई आणि रेकार्ड रुम मधून संदर्भ शोधण्यासाठी मला दिशा मिळाली.

स्वातंत्र्यप्राप्तीसाठी आपले योगदान हवेच ह्या हट्टाने सैन्यात जाण्याची पूर्ण तयारी दादाजींनी केली होती, पण त्यांचे गुरुवर्य वीर वामनराव जोशी, बाबासाहेब खापर्डे आणि जेष्ठ बंधू अनंत कृष्णराव वैद्य यांनी सल्ला दिला आणि समाजावले की ब्रिटीश अमलाखाली असलेल्या आपल्या सैन्यात गेलास तर तेथून शिक्षण घेऊन बाहेर पडून क्रांतीकारकात सामील होणे कठीण जाईल. शिवाय सैन्यातील नोकरीत रुळलास तर आपल्या ध्येयापासून वंचित होशील आणि एकटाच काय करु शकशील ? त्यापेक्षा बलशाली युवक संघटित कर आणि त्यातून क्रांतीकारकांची पिढीच तयार कर त्यांची खरी स्वातंत्र्य चळवळीकरीता आवश्यकता आहे. दादाजींना आपल्या गुरुवर्याचा आणि बंधूचा सल्ला पटला आणि युवकांच्या संघटना साठी एक सैनिक म्हणून दादाजी मैदानात उतरले. मैदानी बाजू दादाजी आणि त्यांच्या सर्व गडयांनी सांभाळली आणि युवक संघटन उभारण्याची सिध्दांतिक, वैज्ञानिक आणि कार्यालयीन लिखापढीची बाजू अनंतराव उपाख्य बाबुरावजी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी सांभाळली आणि त्यातून १९१४ साली हनूमान क्लबची मूहुर्तपेढ झाली.

कालोघात हनूमान क्लब आपल्या उद्दीष्टानुसार स्वातंत्र्य लढ्यातील कर्मभूमी बनले. मैदान आणि कार्यालयीन कार्याचा संगम झाला आणि ह्या कार्य व विचारमंथनातून एकएक रत्न उदयास येवू लागले. ह्या सागरसंगमावर अनेक कर्मवीर दम घुमवू लागले. साध्या लाकडी रायफली घेवून कवायती होत पण इंग्रज राज्यकर्ते घाबरले. रायफल संचलन वर बंदी आली मशाल मोर्चे निघू लागले. त्यावरही करडी नजर शेवटी तर धास्तावलेल्या ब्रीटीश राजवटीने संस्थेवर दोन वर्षाकरिता बंदी घातली पण स्वातंत्र्य लढ्याचे कार्य भूमिगत पण सुरुच राहिले. इंग्रजांना हुलकावणी देवून व्यायाम प्रचार व प्रसाराचे निमित्याने श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ ह्या नावाने पुनरुज्जीवीत होवून

संस्थेचे कार्य पुन्हा अविकृत पणे सुरु झाले. तरीपण ब्रिटीश राज्यकर्ते मंडळाकडे साशंक नजरेनेच पाहत. त्यांच्या डोळ्यात धूळ फेकून हुतात्मा शिवराम हरी राजगुरु ह्यांनी मंडळात अज्ञात वासात राहून शारिरीक तंदूरुस्तीचे पाठ केंव्हा गिरवले ते इंग्रजांना कळलेच नाही. सुभाषचंद्र बोसांच्या स्फुर्तीदायक भेटीने हुतात्मा ज्ञानेश्वर देशपांडे, सिध्दनाथ काणे, इत्यादी कितीतरी कार्यकर्त्यांचे बाहू फुरफुरु लागले. स्वातंत्र्य संग्रामात वाटा उचलण्यात जणू चढाओढ लागली.

ब्रिटीश राजवटीच्या क्रोध कोपापासून स्वातंत्र्य सैनिकाचे रक्षण करणे आणि भूमिगत कार्यास अधिक वेग देता यावा यासाठी श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ ही भारतीय परंपरागत व्यायामाचा प्रचार करणारी संस्था आहे. हा ठसा सरकार दरबारी रुजवण्यासाठी मार्गदर्शकांच्या मदतीने योजना तयार करायच्या आणि दादाजींनी सच्चा सैनिकी नात्याने त्या मैदानावर रुजवायच्या ऑलिंपीक चळवळ जोर धरु लागली बर्लिन ऑलींपीक, लिंगियाड फेस्टिवल इत्यादी योजना साकार झाल्या.

ह्या सोबतच काँग्रेस अधिवेशनात स्वयंसेवक पाठविणे आणि स्वातंत्र्य लढ्याचे भूमिगत कार्य ही तितक्याच प्रखरपणे सुरु होते. दादाजींचे व्यक्तिमत्वच असे प्रभावशाली होते की एकाच वेळी ते दोन तीन आघाड्यावर सारखेच समर्थपणे कार्य करीत. बर्लीन ऑलंपिक व लिंगयाड फेस्टिवल मध्ये प्राचीन परंपरागत भारतीय व्यायाम प्रदर्शनासाठी पाठवायच्या चमूची तयारी असो की काँग्रेस अधिवेशनासाठी स्वयंसेवकाची चमू तयार करायची असो किंवा राष्ट्रीय शिक्षणाचे अध्यापकीय कार्य असो. दादाजी सतत त्यात व्यस्त असत. आणि हे सर्व कार्यकरतांना त्यासाठी योग्य माणसे जोडणे त्यांच्याकडे नेतृत्व सोपविणे ह्यात त्यांचा हातखंडा होता. कार्य सिध्दीस नेण्याकरिता दादाजी पुढाकार घेत पण आपण स्वत: कधीच समोर येत नसत. लढाई जिंकण्याचे श्रेय सेनापतींना. पण लढाईचा खरा शिल्पकार सैनिक आपल्या सवंगड्यांच्या सुश्रुषेत असा दादाजींचा बाणा होता. त्यांची प्रसिध्दी ची कास कधीच धरली नाही स्वातंत्र्य सैनिक म्हणून सरकारी दरबारी त्यांच्या नावाची साधी नोंदही नाही. मग ताम्रपत्र, पदव्या , बिरुदावल्या, स्वातंत्र्य सैनिक म्हणून सवलती सारे काही दुरच. कारण दादाजींचा

नव्हे तर पूर्ण वैद्य कुटूंब आणि त्यांच्या सहकाऱ्यांचा तो पिंडच नव्हता.

स्वातंत्र्यासाठी आपण तुरुंगवास भोगला नाही. ह्यांची खंत दादाजींना नेहमी वाटत असे. तसे त्यांनी आपले गुरु वीर वामनराव जोशी ह्यांना अनेकदा बोलूनही दाखविले तेंव्हा त्यांना सतत धीर देवून वीर वामनराव जोशींनी त्यांना समजाविले की तू जरी तुरुंगात गेला नाहीस तरी तू करत असलेले काम ही स्वातंत्र्याच्या प्राप्तीकरिता मोलाचे आहे. आपले काम कमी मोलाचे आहे, असे अजिबात समजू नकोस. कारण आमच्या सारख्याने ते सुरुवात केल्यावर तुमच्या सारख्या माणसांमुळेच चळवळ सुरु होते.

दादाजी जरी स्वत: प्रसिध्दी पराङ्मूख सैनिक होते. तसे आपल्या सहकारी आणि श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ यांना समाज आणि शासन दरबारी आपल्या योग्यतेप्रमाणे स्थान मिळण्यासाठी ते प्रयत्नशील राहिले. स्वातंत्र्य प्राप्तीनंतर स्वातंत्र्यपुर्व काळात मंडळानी केलेल्या स्वातंत्र्य प्राप्तीच्या कार्याची दाखल मध्यप्रदेश, शासन , महाराष्ट्र शासन आणि केंद्र शासनाने घेतली आणि राष्ट्रीय चळवळीच्या इतिहासात मंडळाच्या योगदानाचा गौरवपूर्ण उल्लेख करण्यात आला आहे.

हुतात्मा ज्ञानेश्वर देशपांडे

हुतात्मा ज्ञानेश्वर देशपांडे यांचा जन्म ब्रह्मदेशातील रंगून या शहरात १९१० साली झाला. त्या काळात त्यांचे वडील श्री सदाशिवराव हे व्यवसाया निमित्त रंगून येथे रहात असत. भारत ज्याप्रमाणे त्याकाळी ब्रीटीश वसाहत होता. त्याचप्रमाणे ब्रह्म देश देखील ब्रिटीश वसाहत होता. व म्हणून तेथे विशेषत: रंगून शहरी अनेक भारतीय ब्रिटीश प्रजानन म्हणून व्यवसाय किंवा नोकरी निमित्य राहत असत.

पुढे दुर्देवाने ज्ञानेश्वर यांच्या वडिलांचे रंगून येथेच निधन झाले . व त्यांच्या मातोश्री आपल्या मुलास घेवून अमरावतीस माहेरी आल्या. तेथे त्या भाजीबाजारातील श्री बापोरीकरांचे वाड्यात राहत असत.

श्री ज्ञानेश्वर यांचे शिक्षण अर्थातच अमरावती येथील म्यु.प्राथमिक शाळेत व सरकारी हायस्कूल मध्ये झाले. त्यांना व्यायामाचा नाद असल्याने ते हनुमान व्यायाम

प्रसारक मंडळाच्या श्री हनुमान व्यायाम शाळेचे विद्यार्थी होते. तेथे त्यांनी कुस्ती, मल्लखांब, इत्यादी खेळात उत्तम प्राविण्य संपादन केले होते.

पुढे इ.स.१९२९ - ३० साली , महाराष्ट्रातील ''इचलकरंजी संस्थानाचे अधिपतींनी जपानमधील जु-जुटसू पध्दतीच्या शारीरिक शिक्षणासाठी एक शिष्यवृत्ती जाहीर केली होती व त्यासाठी योग्य उमेदवाराची निवड करण्याचे कार्य पुण्याच्या दि डेक्कन एज्युकेशन सोसायटीकडे सोपविले होते.

योगायोगाने १९२८ साली अमरावतीच्या हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या विद्यार्थ्यांनी पूणे येथे शारिरिक कौशल्याचे (खेळांचे) प्रदर्शन केले होते व त्यांचा प्रभाव पुण्यातील सुज्ञ जनतेच्या मनावर होताच. त्यामुळे डेक्कन एज्युकेशन सोसायटीने हनुमान व्या.प्र.मंडळाच्या उमेदवाराची निवड ह्या शिष्यवृत्तीसाठी नि:संकोच पणे केली आणि मंडळाने त्यासाठी श्री ज्ञानेश्वर देशपांडे ह्यांनाच जापानच्या कोडोक्कन विद्यापिठात या जु-जु-त्सु च्या शिक्षणाकरिता पाठविण्याचा निर्णय घेतला.

त्याप्रमाणे करार होवून श्री ज्ञानेश्वर ह्यांना दि.१४ एप्रिल १९३० रोजी कलकत्ता येथून ''टलामा'' बोटीने जपानला रवाना केले. त्यापूर्वी श्री ज्ञानेश्वर देशपांडे यांना निरोप देण्याचा एक भव्य समारंभ हनूमान व्यायाम प्र.मंडळाचे मैदानावर झाला होता. जपानला कोडक्कन विद्यापिठात पोहोचल्यानंतर श्री ज्ञानेश्वर देशपांडे यांना अल्पावधीतच या जु-जुत्सु पध्दतीच्या शारीरिक शिक्षणात अप्रतिम कौशल्य व प्राविण्य संपादन केले. या काळातच त्यांनी टोकियो या शहरातील तरुणांच्या अनेक सामाजिक व क्रीडा संस्थानाही सहकार्य दिले होते.

तेथे त्यांनी भारतीय पध्दतीची कुस्ती, भारतीय देशाची खो-खो,आट्यापाट्या इत्यादी खेळांची ओळख तेथील तरुणांना करुन दिली व शिकविण्याचेही कार्य केले होते. या काळात श्री देशपांडे यांना गंभीर स्वरुपाची दुखापत होवून ऑपरेशन करावे लागले. त्यामुळे त्यांच्या जु-जुत्सू शिक्षणाची तालिम बंद पडली.

नंतर त्यांनी तेथे प्रथम प्रुफराउंडर म्हणून व नंतर प्रेस रिर्पोटर ह्या नात्याने कामास सुरुवात केली आणि अल्पावधीतच ते जापान मधील , त्या काळातील प्रमूख व प्रचंड खपाच्या

'' अशी शिंबून '' या दैनिकाचे वार्ताहर बनले.

ज्यावेळी चीन - जपान युध्द सुरु झाले त्यावेळी ते युध्द वार्ताहर म्हणून चिन मध्येही राहिलेत. युध्द वार्ताहर असल्याने प्रत्यक्ष रणांगणावर जापानी सैन्यासोबत ते राहत असत.

त्याकाळातच त्यांनी इंग्रजी, फ्रेंच , चिनी , जपानी ह्या भाषांचा अभ्यास केला व त्यावर चांगले प्रभुत्व मिळविले होते.

जपानमधील आपले वास्तव्यात श्री देशपांडे यांना '' धर्म आणि तत्वज्ञान'' या विषयांचे गहन अध्ययन केले होते. जपानच्या ''सिंडोईजम'' या तत्वज्ञानाचा त्यांच्या मनावर बराच पगडा बसला होता. इ.स.१९३५ मध्ये श्री देशपांडे यांनी '' निपोन बॅन्कारेन्मे '' या सांस्कृतिक संस्थेचे '' कल्चरल निपोन'' या जनरल मधून इंग्रजी व फ्रेंच भाषेतून '' सिंटो आणि हिंदूइज्म'' या विषयावर अनेक लेख प्रसिध्द केले होते.

बारावे ऑलिंपीक जापानमध्ये टोकियो येथे १९४० साली भरणार होते. त्यासाठी हनूमान व्या.प्र.मंडळाने आपल्या खेळाडूंची चमू पाठवावी अशी सूचना श्री देशपांडे यांनी पत्राद्वारे मंडळात केली होती. परंतु त्यापूर्वीच दुसऱ्या जागतिक महायुध्दाला सुरुवात झाल्याने ऑलिंपीक होवू शकले नाही.

श्री.ज्ञानेश्वर देशपांडे यांनी १९३८ पावेतो हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाशी पत्राद्वारे संपर्क ठेवला होता. मंडळाचे संस्थापक श्री अंबादासपंत वैद्य यांना त्यांचे शेवटचे पत्र दि.२-१०-१९३७ चे आले होते.

जपान मधील वास्तव्यात श्री देशपांडे हे , येथील वास्तव्य करणाऱ्या भारतीय क्रांतीकारकांच्या संपर्कात आले. भारतातून जपानमध्ये जाण्यापूर्वी ज्ञानेश्वर देशपांडे हे सरदार भगतसिंग आणि शिवराम राजगुरु या दोघांच्या घनिष्ठ संपर्कात होतेच. ज्ञानेश्वर आणि शिवराम राजगुरु या दोन घनिष्ठ मित्रांनी इतर क्रांतिकारी सहकार्यांसोबत, भारतीय स्वातंत्र्यासाठी प्राणार्पण करण्याची शपथ घेतली होती.

इ.स.१९२८ सालीच श्री हनुमान व्या.प्र.मंडळाने गोरखपूर येथे जे शारीरिक प्रशिक्षण शिबीर भरविले होते त्याचे संचालन श्री ज्ञानेश्वर देशपांडे यांनी केले होते.

शिबीराचा समारोप झाल्यानंतर श्री देशपांडे हे श्री राजगुरु यांना भेटण्यासाठी लाहोरला गेलेत. तेथे श्री राजगुरुंनी ज्ञानेश्वर यांची ओळख सरदार भगत सिंगाशी व त्यांच्या इतर क्रांतिकारी साथीदारांशी करुन दिली होती. तेथून ते याच सुमारस दक्षिण महाराष्ट्रात रत्नागिरीकडे गेले होते. तेथे स्वातंत्र्यवीर सावरकर यांचीही त्यांनी भेट घेतली होती. ज्ञानेश्वर यांनी हिंदू महासभेचे सत्याग्रहातही त्यापूर्वी भाग घेतला होता.

वर उल्लेख केल्याप्रमाणे शारिरिक इजा झाल्यामूळे, देशपांडे यांचे जू-जूत्सू चे शिक्षण बंद पडले आणि ते क्रांतीचे दिशेने विचार करु लागले. टोकियो येथे वास्तव्य करुन असलेले सुप्रसिध्द क्रांतिकारक श्री रासबिहारी बोस यांचेशी संपर्क झाला व लवकरच ते समविचारी घनिष्ठ मित्र बनले.

श्री रास बिहारी बोस यांनी टोकियो येथे राहून भारतीय स्वातंत्र्यासाठी प्रयत्न चालविले होते. त्यांनी इन्डो-जापान फ्रेंन्डस सोसायटी स्थापन केली होती. शिवाय जपानी मित्रांच्या सहाय्याने ते भारतीय विद्यार्थ्यांसाठी " विल ओशीअन " हे होस्टेल चालवीत असत.

रासबिहारी बोस यांनी टोकियो येथे "इंडियन इंडिपेन्डेट लीग " ही संस्था काढली होती. या संस्थेचे श्री देशपांडे सक्रिय सभासद झाले होते. आणि या संस्थेचे कार्यासाठी श्री देशपांडे यांनी दक्षिण पूर्व आशिया खंडातील देशांचा दौरा काढला आणि त्या त्या देशातील भारतीयांशी संबंध जोडून संस्थेच्या शाखा स्थापन केल्या. दक्षिण पूर्व आशिया खंडातील या देशातून अनेक भारतीय लोक व्यापार किंवा नोकरी निमित्त राहत होते. त्यांना एकत्र आणून भारतीय स्वातंत्र लढा शक्तिशाली करण्याचा हा प्रयत्न होता. तसेच श्री देशपांडे यांनी या दौऱ्यात काही महत्वाची अशी माहितीही गोळा केली होती व या माहितीचा उपयोग पुढे लवकरच श्री बोस व नंतर जपानमध्ये पोहोचलेले नेताजी सुभाषचंद्र बोस यांना झाला होता. या दौऱ्यानंतर दि.२० मार्च १९४२ रोजी जपानी आणि भारतीय अशा प्रमुख नेत्यांची एक परिषद " टोकियो " येथे भरविण्यात आली होती. या परिषदेत " भारतीय स्वातंत्र्य संघ (इंडियन इंडिपेन्डेट लीग) या संस्थेला व श्री रास बिहारी बोस यांच्या नेतृत्वाला मान्यता देण्यात आली

होती. याच वेळी श्री.देशपांडे यांना या संस्थेचे " संघटन सचिव " म्हणून नियुक्त करण्यात आले होते.

"संघटन सचिव "या नात्यानेच श्री देशपांडे हे दिनांक २९ एप्रिल १९४२ रोजी बँकाक ला आले व तेथेच त्यांनी दि.१५ जून १९४२ रोजी आशिया खंडातील भारतीयांची एक परिषद श्री रास बिहारी बोस यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केली. या परिषदेला मलाया, ब्रह्मदेश, सयाम, मंचुरीया, हाँगकाँग, चंघाय , सिंगापूर इत्यादी ठिकाणाहून ५०० हून अधिक प्रतिनिधी आले होते. याच परिषदेसाठी नेताजी सुभाष चंद्र बोस हे जर्मनी हून बँकॉक ला आले आणि श्री रासबिहारी बोस यांनी स्वातंत्र्य चळवळीची सूत्रे याचवेळी नेताजींच्या हाती सोपविली होती. पुढे श्री ज्ञानेश्वर देशपांडे हे आझाद हिंद सेनेचे प्रचार प्रमुख बनले. तेव्हापासून श्री देशपांडे हे आझाद हिंद सेनेत नेताजींसोबत होते. १९४२ मध्येच जपानने ब्रह्मदेश जिंकला आणि श्री देशपांडे हे रंगूनला आले. तेथूनच नंतर हिंदसेनेने इंफालवर हल्ला केला तो इतिहास सर्व विदित आहेच.

इ.स.१९४३ मध्ये इंग्रजांनी रंगून शहर पुन्हा काबीज केले. तेंव्हा रंगून मधील जपानी नागरिकांना बोटीद्वारे व रेडक्रॉस संघटनेमार्फत जपानला परत पाठविण्याचे ठरविले. श्री देशपांडे यांनी जपानी नागरिकत्व स्वीकारले होते. त्यामुळे सर्व जपानी नागरिकांसोबत श्री देशपांडें हेही त्याच बोटीत जपानकडे जाण्यास निघाले असता ही बोट टार्पेदिनी बुडविण्यात आली. त्यांत इतर सर्व प्रवाशांसोबत श्री ज्ञानेश्वर देशपांडे यांना हौतात्म्य प्राप्त झाले. या कर्तृत्त्वान भारतीय स्वातंत्र्यासाठी परदेशात राहून कार्य करणाऱ्या स्वातंत्र्य संग्राम सैनिकाचा अंत झाला.

श्री देशपांडे हे हनुमान व्या.प्र.मंडळाचे प्रतिनिधी म्हणून इचलकरंजी संस्थानाच्या शिष्यवृत्तीवर व्यायाम शिक्षण घेण्यासाठी जपानला गेले होते. त्यांच्या जपानमधील हालचालीमुळे , संस्थानाने त्यांची शिष्यवृत्ती बंद केली. त्यामुळे त्यांना भारतात परत आणण्यासाठी मंडळाने बरेच प्रयत्न केले. पण त्यात त्यांना यश आले नाही. १९३६ साली मंडळाने श्री रघुनाथराव खांडीवले यांना धर्नुविद्येचे प्रात्याक्षिक दाखविण्यासाठी व देशपांडे यांचे मन वळवून त्यांना भारतात आणण्याची जबाबदारी

ही मंडळाने श्री खांडीवाले यांचेवर सोपविली होती पण त्यातही यश आले नाही.मंडळाने जपान मधील ब्रीटीश कौंसीललाही , योग्य कारवाई करुन देशपांडे यांना भारतात आणावे अशी विनंती केली होती. पण त्यातही यश मिळू शकले नाही.

श्री ज्ञानेश्वर देशपांडे यांच्या मातोश्रींना, ज्ञानेश्वरला जपानला जाण्यास विरोध केला होता. त्यामुळे आता, त्या माऊलीने मंडळात वेळोवेळी'' माझ्या मुलास जापानातून परत आणा'' असे संस्थानाकडून पण आपुलकीचे स्वरांत म्हटले होते. परंतु मुलगा भारतात येत नाही याचे , त्या माऊलीला अतोनात दु:ख झाले होते. ज्ञानेश्वर हा एकुलता एक मुलगा होता आणि माता आपल्या मुलास बघण्यासाठी अमरावतीला आतूर झाली होती. मुलाची सारखी वाट पहात होती.

रंगून येथे असतानांच श्री ज्ञानेश्वर देशपांडे यांनी एक जपानी माहिलेशी लग्न केले होते व त्यांना एक मुलगाही झाला होता. ज्ञानेश्वरचे मृत्युनंतर मंडळाने या त्यांच्या पत्नी व मुलाचा शोध घेण्याचा प्रयत्नही केला होता पण मंडळाला त्यांचा शोध लागला नाही.

भारता बाहेर असून ज्यांनी भारतीय स्वातंत्र्यासाठी चळवळ चालविली होती. त्यांतच श्री ज्ञानेश्वर देशपांडे यांचा समावेश होतो. या स्वातंत्र्य संग्राम सैनिकाचे नांव भारतीय क्रांतिकारकांचे इतिहासात अजरामर झाले आहे.

अमरावती नगरीला अशा सुपुत्राचा स्वाभाविकच अभिमान वाटतो.

दमदार,तडफदार, कर्तबगार हरिभाऊ कलोती.

हरिभाऊ कलोती यांचे वडील श्री अण्णासाहेब कलोती ह्यापूर्वी दोन वेळा नगराध्यक्ष होते इ.स.१९२५ ते २८ आणि इ.स.१९३५ ते १९३८ ह्या वर्षी ते नगराध्यक्ष होते समाज सेवेचे आणि समाज कार्याचे बाळ कडू त्यांना लाभले होते. त्यांचा जन्म दि.१.७.१९२५ रोजी झाला. व्युत्पन्न ब्राह्मण कुलात जन्म झाल्यामुळे उचित संस्कार घडले. चारित्र्य, नीतीमत्ता, यांची महति बालपणापासूनणच कळली होती. हरिभाऊ तसेच घडत गेले. हरिभाऊंचे वडिल बंधू गोपाळराव हेहि इ.१९५१ ते ६२ ह्या काळात नगर पालिकेचे उपाध्यक्ष होते. याप्रमाणे कलोती घराण्याने दीर्घकाळापर्यंत अमरावतीच्या जनतेची सेवा केली आहे.

हरिभाऊंची कार्यशक्ति असामान्य होती. ते कोणालाही सर्व प्रकारची मदत देण्यास व करण्यास सदैव सिध्द होते. हरिभाऊंनी वीर वामनराव दादा जोशींना गुरु मानले. त्यांच्या मार्ग दर्शनानुसार कामे करीत असत. सदसद्विवेक बुध्दीस पटल्यावर ते निर्भयपणे व खंबीरीने निर्णय घेऊन तडीस नेत असत. रुख्मिणी नगर मधील नाल्यावरील पुल, विवेकानंद नगर कडील पूल, काँग्रेस नगर कडे जाणारा पक्का रस्ता, पठाणपुऱ्यातील रस्ते, माताखिडकी मधील सुधारणा, समाधान नगर च्या जनतेचे केलेले समाधान, अनेक रस्त्यांचे डांबरीकरण, इ.कामे हरिभाऊंनी फार झपाट्याने करवून घेतली.

इर्विन चौकात रस्त्यांवरील द्विभाजक कडा, मालटेकडीचे सौंदर्यीकरण वडाळी येथे ८ एक्कर जागेत सहल केंद्र स्थापन करणे, शहरात अनेक ठिकाणी उद्याने व क्रीडांगणे इ. कामे तयार करुन घेतली. मालटेकडी वर छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसवून घेतांना त्यांनी दाखवलेले चातुर्य व खंबीरपणा कौतुकास्पदच म्हणावा लागेल. मालटेकडीच्या दोन बाजूंनी रस्ते तयार करुन घेतले.

हरिभाऊंनी अत्यंत बलाढ्य समजल्या जाणाऱ्या श्री उमरलाल केडिया यांचा नगराध्यक्ष पदासाठी झालेल्या निवडणुकीत पराभव केला. आणि निवडणूक जिंकण्यासाठी साम,दाम, दंड, भेद आदि सर्व मार्ग चोखाळणाऱ्या शक्तीचा पराभव झाला. एवढेच नव्हे तर यापुढील राजकारणाची दिशा बदलली. अमरावतीच्या राजकीय सारीपाटावर नवीन मोहरा उदयासा आला. केवळ चातुरीवर नव्हे तर कर्तबगारीवर निवडणूक जिंकता येते हे त्या निवडणूकीवरुन दिसून आले. हरिभाऊंचे ह्या कामगिरीकरिता सतत स्मरण ठेवले जाईल. अमरावतीच्या राजकारणावर पुन्हा एकदा मराठी लोकांचे वर्चस्व प्रस्थापित झाले. ह्यानंतर कालांतराने श्री.उमरलालजी केडिया यांचा मृत्यु झाला. अन् अमरावतीच्या राजकारणाला कलाटाणी मिळाली. वीर वामनरावदादा जोशी यांच्या त्यागावर व समाजसेवा प्रधानतेवर आधारलेल्या राजकारणाला उजळा मिळाला. श्री. पी.के.(अण्णासाहेब) देशमुख यांचा गट पुन्हा प्रभावी बनला. ह्या सर्व घडाामोडीचे श्रेय हरिभाऊ कलोतींकडे जाते. हरिभाऊ अध्यक्ष बनले तेव्हा अमरावती नगरपालिका कर्ज बाजारी होती. अनेक देयके तुंबून पडली होती.

हरिभाऊंनी प्रथम सर्व देणी चुकती केली. व तडफदार रीतीने उत्पन्न वाढवून शहरात सुधारणा घडवून आणल्या. नगर पालिका कर्मचाऱ्यां मधील बेशिस्तीचा बिमोड केला. इर्विन चौकात शहीद भगतसिंग,सुखदेव, राजगुरु या तिघांचे शहीद स्मारक हरिभांऊनी दि. २३ माार्च १९७६ रोजी भगतसिंगाचे बंधु सरदार कुलबीरसिंग यांचे हस्ते उद्घाटित केले. आणि अमरावतीचा नगराध्यक्ष सळसळत्या रक्ताचा आहे, हे दाखवून दिले. डांबरी रस्ते तयार करण्यासाठी नवीन तंत्र वापरण्यात आले. उकळते डांबर रस्त्यावर शिंपडण्याची व्यवस्था करुन रस्ते दुरुस्त करण्यात आले. हा प्रयोग सर्वप्रथम अमरावतीत केल्या गेला. काम झपाट्याने व्हावे म्हणून जास्तीचे कर्मचारी कामावर ठेवून रात्रीहि कामे चालू असत. नगर पालिकेचे दवाखाने कार्यक्षम बनविले. प्राथमिक शाळेतील बऱ्याच गरीब मुलांना कपडे मिळवून दिले. शाळेत सतरंज्या, फाऱ्या दिल्या. ३०० ते ४०० मुलांना मोफत पुस्तके वाटली. प्राथमिक शाळेतील शिक्षकांना उन्हाळ्याच्या सुटीत पगार मिळत नसे. ही दुष्ट प्रथा हरिभाऊंनी मोडली. पूर्ण वर्षाचा पगार देण्याची प्रथा सुरु केली. शैक्षणिक दृष्ट्या कच्च्या मुलांना जास्तीचे सायंकालीन वर्ग भरवून त्यांना सामान्य पातळीवर आणण्यासाठी प्रयत्न केले.

ते प्राथमिक शिक्षक होते. आणि प्राथमिक शिक्षक संघाचे अध्यक्ष हि होते. त्यांचे व्यक्तिमत्व फार पीळदार, बलदंड होते. आणि स्वभाव धाडसी व दिलदार होता. ते नॉर्मल स्कूल मध्ये शिक्षक होते. सहलीला गेले असताना त्यांना एक सहप्रवासी नदीत बुडताना पाहिला. क्षणात ते तेथे पोहचेले. आणि त्याला ओढून काठावर आणले. एक विद्यार्थी विहीरीत बुडाला. विहीर फार खोल होती त्याला वाचवण्याची हिम्मत कोणी करीना. हरीभाऊंना निरोप गेला. त्या दरम्यान बिचारा बुडालाच. पण हरीभाऊ यांनीच त्याला कपारीतून ओढून बाहेर काढला. एकदा ते सहलीला गेले तेव्हा रात्री सारे झोपले असताना जवळच्या एका घराला आग लागली. हातात लाठी घेऊन हरीभाऊ त्या घरात घुसले, आणि घरातील माणसांना प्रथम बाहेर काढले.

<u>शिक्षणतज्ञ प्रा. दादासाहेब काळमेघ</u>

अंजनगांव सूर्जी तालूक्यातील चौसाळा येथे ८ नोव्हें. १९३२ रोजी

दादासाहेबांचा जन्म झाला. घरची परिस्थिती हलाखीची असतांना स्वकर्तृत्वावर त्यांनी शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रात प्रतिष्ठा प्राप्त केली. डॉ. पंजाबराव देशमुख यांचे पावन आशीर्वाद त्यांना लाभले होते. भाऊसाहेबांनी त्यांच्यातील नैपुण्य हेरुन त्यांची सोय ।श्रध्दानंद वस्तीगृहात केली. त्यानंतर दादासाहेबांच्या यशाची कमान सतत उंचावतच गेली. १९५९ साली सागर विद्यापीठातून भौतिकशास्त्राचा पदव्युत्तर अभ्यासक्रम गुणवत्ता यादीत तिसऱ्या क्रमांकावर झळकून पूर्ण केल्यानंतर त्यांनी अध्यापन क्षेत्रात पदार्पण कले. १९६२ मध्ये खरगपूर आय. आय. टी. मधून त्यांनी औद्यागिक भौतिकशास्त्रामध्ये एम . टेक्. पदवी दुसऱ्या क्रमांकाने प्राप्त केली. भारत शासनाची शिष्यवृत्ती मिळवून ते खरगपूर आय.आय.टी. मध्ये दाखल झाले होते. १९६६ मध्ये ते नागपूर विद्यापीठाच्या अभियांत्रिकी विभागाचे प्रमुख व अपयोजित भौतिकशास्त्र विभागाचे रिडर म्हणून नियुक्त झाले आणि १९७८ मध्ये नागपूर विद्यापीठाचे कुलगूरु म्हणून त्यांनी सूत्रे हाती घेतली. तीन वर्षे नागपूर विद्यापीठाचे कुलगूरुपदी कार्य करतांना दादासाहेबांनी उत्तम प्रशासक म्हणून नावलौकिक मिळविला. तत्पूर्वी नागपूर विद्यापीठाचे अभियांत्रिकी अभ्यास मंडळ, परिक्षा मंडळ संशोधन मार्गदर्शक मंडळ, राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय स्वयंसेवक योजना, विद्यापीठ कार्यकारी परिषद,, विद्यार्थी कल्याण समिती आदी विभागामध्ये महत्वाची पदे भूषविली होती. १९७० मध्ये विद्यापीठाच्या अभियांत्रिकी व तंत्रज्ञान विभागाचे डिन म्हणून त्यांची नियुक्ती झाली होती. १९६७ ते १९७८ पर्यंत नागपूरच्या एल.आय.टी. वस्तीगृहाचे अधिक्षक म्हणून आणि त्याचसोबत नागपूर विद्यापीठ विद्यार्थी परिषदेचे प्रभारी प्राध्यापक व खजिनदार म्हणून कार्य करतांना आपल्या खास कार्यशैलीमुळे प्रा. काळमेघ विद्यार्थ्यांमध्ये अत्यंत लोकप्रिय होते. विद्यापीठाने त्यांना नागपूरच्या व्ही. आर. सी. ई. कॉलेजच्या स्टॉफ सिलेक्शन कमेटीवर आणि त्यानंतर नागपूरच्याच इंदिरा गांधी शासकीय महाविद्यालयावर विद्यापीठ प्रतिनिधी म्हणून पाठविले होते.

शासनाचे सुध्दा एव्हाना दादासाहेबांच्या वादळी पण उत्तम प्रशासक म्हणून नावाजलेल्या व्यक्तीमत्वाकडे लक्ष गेले होतेच त्यामुळे शासनाकडूनही त्यांना अनेक

प्रतिष्ठेच्या पदी वेळोवेळी नेमण्यात आले. १९७० मध्ये व्ही. आर. सी. ई. च्या प्रशासकीय मंडळावरील अशासकीय सदस्य म्हणून त्यांची नियुक्ती झाली. तंत्रशिक्षण मंडळ मुंबईचे सदस्यपद त्यांना बहाल केले गेले. युवक व क्रीडा कल्याण मंडळाचे सदस्यपदी त्यांची नियुक्ती केली गेली. उच्च माध्यमिक व माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे चे ते तज्ञ सदस्य होते शैक्षणिक परिषदेचे सदस्य पदही त्यांनी भूषविले, यानंतर तंत्रशिक्षण अभ्यास मंडळ मुंबईचे ते अध्यक्ष म्हणून नियुक्त झाले. नागपूर जिल्हा शिक्षण समिती, विभागीय अल्पबचत मंडळ नागपूर, तसेच राज्य अल्पबचत मंडळ मुंबई यांचे सदस्य निवडणूक यामध्ये यश मिळविले. उल्लेखनिय असे की दादासाहेबांच्याच पॅनलचे उमेदवार वसंतराव धोत्रे अध्यक्षपदी निवडले गेले.

शिवाजी शिक्षण संस्थेच्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीची नाडी शेवटपर्यंत हातात ठेवून असलेल्या दादासाहेबांनी स्वत: पुढाकार घेऊन अनेक शैक्षणिक व सामाजिक संस्थाची स्थापना केली. नरखेड येथील श्री. पंढरीनाथ कला व वाणिज्य महाविद्यालय आणि जैटला (नागपूर) येथील बालाजी आंतरराष्ट्रीय शिक्षण संस्थेचे ते संस्थापक अध्यक्ष तर नागपूरच्या महाराष्ट्र तंत्रशिक्षण संस्थेचे अध्यक्ष होते. याशिवाय श्रीमती राधाबाई कला व वाणिज्य महा. अंजनगांव सुर्जी, जनता शिक्षण संस्था चौसाळा या संस्थापक सदस्य हेते. धनवटे नॅशनल कॉलेज नागपूरचे संचालक मंडळ सदस्य आणि श्री.शिवाजी विज्ञान महा. चे संचालक मंडळाचे अध्यक्ष म्हणून त्यांनी आपल्या कार्यशैलीचा ठसा उमटविलेला आहे. विदर्भातील कितीतरी शैक्षणिक संस्थांच्या सल्लागार मंडळावर त्यांना घेण्यासाठी जणू चढाओढ लागलेली होती.

नागपूर व अमरावती येथे कार्यरत असतांना वरील ठोस कार्याशिवाय संघटनस्तरावर सुध्दा दादासाहेबांनह आपली छाप पाडली. विदर्भ प्रोफेसर्स क्लब, विदर्भ शैक्षणिक ग्रंथालय संघटना, अखिल भारतीय पोवाडा, शाहीर संमेलन, किसान मजदुर राज, विद्यार्थी सेवा सहकारी सोसायटी, राज्य शासकिय सर्व श्रेणी कर्मचारी उत्कर्ष समिती अमरावती जिल्हा मित्र मंडळ, अखिल भारतीय मागासवर्गीय व अल्पसंख्यांख कर्मचारी कल्याण संघटना, श्री. समर्थ आडकुजी मिशन सर्वधर्म समभाव

विश्वशांती संत विद्यापीठ, विदर्भ रिलीफ सोसायटी चे अध्यक्ष वेळोवेळी नेमण्यात आले, १९७० मध्ये व्ही.आर.सी.ई च्या प्रशासकीय मंडळावरील अशासकीय सदस्य म्हणून त्यांची नियुक्ती झाली. तंत्रशिक्षण मंडळ मुंबईचे सदस्यपद त्यांना बहाल केले गेले. युवक व क्रीडा कल्याण मंडळाचे सदस्यपदी त्यांची नियुक्ती केली गेली. उच्च माध्यमिक व माध्यमिक शिक्षण मंडळ पुणेचे ते तज्ञ सदस्य होते शैक्षणिक परिषदेचे सदस्यपदही त्यानी भूषविले, यानंतर तंत्रशिक्षण अभ्यासमंडळ मुंबईचे ते अध्यक्ष म्हणून नियुक्त झाले. नागपूर जिल्हा दक्षता समिती, विभागीय अल्पबचत मंडळ नागपूर, तसेच राज्य अल्पबचत मंडळ मुंबई यांचे सदस्य म्हणून कार्य करतांना दादासाहेबांनी आपल्या कर्तृत्वाने सुमारे ५४ लाखाची गुंतवणूक अल्पबचत योजनेत घडवून आणली आणि या निमित्ताने कमावलेला सुमारे १ लाख रुपये नफा त्यांनी माधान येथील सर्वोदय आश्रमाच्या रौप्य महोत्सवानिमित्त माधान सर्वोदय आश्रमाला देणगीदाखल देऊन आपल्या दाशूरतेचा परिचय दिला. १९७५ च्या फेब्रुवारी महिन्यात नागपूर येथे आयोजिण्यात आलेल्या सिनेकलावंताच्या कार्यक्रमाच्या आयोजन समितीचे ते महासचिव होते. हा कार्यक्रम त्यांनी आपल्या संघटन कौशल्याने प्रमाणाबाहेर यशस्वी केला. शासनाच्या २० कलमी कार्यक्रमाच्या अंमलबजावणी देखरेखीसाठीच्या नागपूर जिल्हा समितीवर त्यांनी याचमुळे नियुक्ती झाली. नागरी संरक्षण समितीवर सुध्दा त्यांनी कार्य केले.

विदर्भ प्रांत राष्ट्रभाषा प्रचार समितीचे अध्यक्ष म्हणून १९७९ ते ९८ अशी चार वर्षे दादासाहेबांनी कार्य केले. पण या पदावर असतांना ते बरेच वादग्रस्त ठरले होते. भ्रष्टाचाराच्या आरोपावरुन त्यांना अध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा लागला होता. श्री.शिवाजी शिक्षण संस्थेच्या अध्यक्षपदावर ३१ मे १९९५ रोजी निवडून आल्यानंतर लांबलचक कायदेशीर लढाई दादासाहेब हरले त्यामुळे त्यांना अध्यक्षपदावरुन दूर व्हावे लागले होते. १९९५ मध्ये ते पुन्हा अध्यक्षपदी निवडून आले पण दरम्यानच्या काळात त्यांनी केलेल्या हालचालीमुळे त्यांना विरोधकांनी बरेच धारेवर धरले होते तरीही मे १९९७ ची निवडणूक लढविण्यास दादासाहेब संपूर्ण आत्मविश्वास

व ताकदीनिशी मैदानात उतरले होते परंतु विरोधकांनी निर्वाणीचे प्रयत्न करुन त्यांना अध्यक्षपदाची खुर्ची मिळू दिली नाही.

नागपूर व अमरावती येथे कार्यरत असतांना वरील ठोस कार्याशिवाय संघटनस्तरावरसुध्दा दादासाहेबांनी आपली छाप पाडली. विदर्भ प्रोफेसर्स क्लब, विदर्भ शैक्षणिक ग्रंथालय संघटना, अखिल भारतीय पोवाडा, शाहीर समंलेन, किसान मजदुर राज, विद्यार्थी सेवा सहकारी सोसायटी, राज्य शासकिय सर्व श्रेणी कर्मचारी उत्कर्ष समिती अमरावती जिल्हा मित्र मंडळ, अखिल भारतीय मागासवर्गीय व अल्पसंख्यांख कर्मचारी कल्याण संघटना, श्री समर्थ आडकुजी मिशन सर्वधर्म समभाव विश्वशांती संत विद्यापीठा, विदर्भ रिलीफ सोसायटी, युवक बिरादरी, प्रतिबंधक समिती, सामाजिक समता परिषद, विद्यापीठ शिक्षक संघटना आदी संघटनांमधील त्याचे कार्य त्यांच्या संघटनकौशल्याची साक्ष देते. राजकीय क्षेत्रात मात्र दादासाहेबांना अपयशचा सामना करावा लागला. विधानसभेवर जाण्याचे त्यांचे स्वप्न शेवटपर्यन्त पूर्ण होऊ शकले नाही.

दादासाहेबांचा ह.भ.प. म्हणून उल्लेख करणेही अनिवार्य आहे. वारकरी सांप्रदायामध्ये त्यांचे नाव अत्यंत आदराने घेतले जाते. अत्यंत हुरहुन्नरी व बुध्दिमान मात्र तेवढेच वादळी व्यक्तीमत्व दि.२९-७-१९९७ रोजी काळाच्या पडद्याआड गेल्याने अनेकांच्या शोकाला पारावार राहिलेला नाही. सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, व्यापारी, पत्रक्षेत्रातील अनेक नामवंतांनी त्यांच्या निधनाबद्दल तीव्र दुखवटा व्यक्त करुन त्यांना श्रध्दांजली वाहिली आहे.

प्रा. दादासाहेब काळमेघ यांच्या निधनाबद्दल मुख्यमंत्र्यांना दु:ख

नागपूर विद्यापीठाचे माजी कुलगुरु प्रा.वा.मो.उपाख्य दादासाहेब काळमेघ यांच्या निधनाबद्दल मुख्यमंत्री श्री.मनोहर जोशी यांनी दु:ख व्यक्त केले आहे.

विदर्भासारख्या विकसनशील भागात शिक्षण क्षेत्रात प्रा.काळमेघ यांनी एकनिष्ठेने कार्य केले. राज्य शासन शिक्षण क्षेत्रात मुलगामी बदल आणू इच्छीत असतांना आणि विशेषत: साक्षरता प्रसाराला महत्व देत असतांना दादासाहेबांसारख्या

ज्येष्ठ व्यक्तीचे निधन होणे हे आपले दुर्देव आहे, असेही मुख्यमंत्री श्री.जोशी यांनी आपल्या शोक संदेशात म्हटले आहे.

वैद्यकीय, संगीत, सामाजिक क्षेत्रातील शिरोमणी : डॉ.मदनगोपाल

सुप्रसिध्द नेत्ररोग तज्ञ, संगीत प्रेमी आणि शहरातील प्रतिष्ठित वयोवृध्द नागरीक डॉ.मदन गोपाल यांचे प्रदीर्घ आजाराने निधन झाले, ते ८० वर्षाचे होते. केवळ वैद्यकीय क्षेत्रातच नव्हे तर सांस्कृतिक आणि सामाजिक क्षेत्रात नावलौकिक प्राप्त डॉ. मदनगोपाल यांचे निधनाने शहरावर शोककळा पसरली.

रविवार दि. २० रोजी दुपारी डॉ.मदनगोपाल यांचे देहावर हिंदुस्मशान भुमीवर संस्कार करण्यात आले. त्यांची अंत्ययात्रा दु.११ वाजता खापर्डे बगिच्यास्थित निवासस्थानावरुन निघाली.

१९४० साली मद्रास येथे एम.बी.बी.एस. आणि ४८ ला इंग्लंड येथून 'ऑपथॅल्मीक' मध्ये उच्च पदवी प्राप्त केल्यानंतर अमरावतीला डॉ.मदनगोपालांनी वैद्यकीय सेवेला प्रारंभ केला परंतु त्यांनी वैद्यकीय सेवेला कधीही व्यावसायिक रुप येवू दिले नाही. आणि त्यामुळेच अल्पावधीतच त्यांचे नांव अमरावती जिल्ह्यातच नव्हे तर संपूर्ण विदर्भात पसरले.

वैद्यकीय सेवा करतांना आलेल्या अनुभवातून डॉक्टरांनी गरीब रुग्णांच्या हितासाठी ठोस कार्य करण्याचा निर्णय घेतला. लहानपणापासून सामाजिक कार्याची तळमळ असलेल्या डॉक्टरांनी गरीब अंधाचे प्रश्न सोडविण्यासाठी नेत्रदान संस्थेची स्थापना केली. त्या संस्थेनी शेकडो अंध नागरिकांना 'दृष्टी' देण्याचे पुण्य केले.

वैद्यकीय, सामाजिक क्षेत्रात अग्रेसर डॉ.मदनगोपाल अतिशय संगीत प्रेमी, उत्कृष्ट व्हायोलीन वादक म्हणून संगीत क्षेत्रात नांवलौकिक होता. तसेच ते चांगले गायक देखील होते. स्थानिक कलाकारांना त्यांचे गुणाला वाव मिळावा म्हणून त्यांनी अमरावती संगीत कलोपासकची स्थापना केली. डॉ.मदन गोपालांनी लावलेल्या या बीजाचा आता मोठा वृक्ष झाला आहे. संगीत कलोपासक सभेची स्थापना केल्यानंतर डॉक्टर साहेबांनी अनेक वर्ष पर्यत पुढाकार घेवून 'जन्माष्टमी उत्सव' साजरा केला.

अतिशय प्रेमळ, मनमिळावू असलेल्या डॉक्टरांनी वैद्यकीय सेवा करतांना मिळविलेली प्रतिष्ठा अखेर पर्यत कायम ठेवली. वैद्यकीय, संगीत, सामाजिक क्षेत्रात नावलौकीक मिळवलेले डॉक्टर मदनगोपाल मात्र पुत्र वियोगानंतर अतिशय खचले होते. ऐन वृध्दापकाळात पुत्र निधनाने त्यांचा उत्साह अतिशय कमी झाला होता. हळू हळू कमी करत त्यांनी १९९२ पासुन दवाखाना बंद केला. गेले ४ - ५ वर्ष प्रामुख्याने कौंटुबिक सहवासात अधिक वेळ घालवीत असत.

मनाने थकलेल्या डॉक्टरांना नंतर शरीराने देखील साथ दिली नाही. त्यांना श्वासाचा त्रास होत होता. त्यांचे प्राण वाचविण्यासाठी डॉक्टरांनी अथक परिश्रम घेतले. ज न्मभर दुसऱ्यांसाठी झिजणाऱ्या डॉक्टर मदनगोपालांनी अखेर सायंकाळी ६.३० वाजताचे सुमारास खापर्डे बगिचा येथील राहत्याघरी अखेरचा श्वास घेतला.

डॉक्टर साहेबांच्या निधनाचे वृत्त शहरात वाऱ्यासारखे पसरले अनेक, डॉक्टर्स, प्रतिष्ठित नागरीक यांनी त्यांचे अन्त्यदर्शनासाठी डॉक्टरांच्या घराकडे धाव घेतली. ऑप्टीशियन्सनी त्वरीत दुकाने बंद करुन शहरातील जेष्ठ नेत्ररोग तज्ञाला आपली श्रध्दांजली वाहिली.

डॉ.मदनगोपाल यांचा अल्प परिचय

१९१७ - नागपूर येथे जन्म

१९४० - मद्रास विद्यापीठातून एम.बी.बी.एस. पदवी उच्च श्रेणीत उत्तीर्ण नंतर असि. सर्जन म्हणून ३ वर्षे सेवा.

१९४३-४६ - रॉयल इंडियन नेव्हीत सर्जन म्हणून कार्य, दुसऱ्या महायुध्दात महत्वपुर्ण सहभाग.

१९४८ - इंग्लंड डी.ऑ.एम.एस. आणि डी.ओ.पदवी उत्तीर्ण.

१९४९ - अमरावतीत वैद्यकीय सेवेला प्रारंभ.

१९५२-७५ - इर्विन हॉस्पीटल मध्ये मानद नेत्रचिकित्सक म्हणून सेवा, त्या दरम्यान त्यांनी जिल्हा रुग्णालयात १९६१ साली 'नेत्र बँक' (आय बँक) ची स्थापना.

१९५०-९२ - शासकीय तसेच लॉयन्स, रोटरी या सामाजिक क्लब व्दारा आयोजित नेत्ररोग चिकित्सा शिबिरात प्रमुख सहभाग.

परदेश दौरे - अमेरिका, युरोप, इंग्लंड, जापान, हाँगकाँग आदी प्रगत देशात १९५८, १९६९, १९७०, १९८० आणि १९८३ ला अभ्यास दौरे.

१९६५ - अमरावती ब्लाईड वेलफेअर असो. च्या स्थापना. २५ वर्षे अध्यक्षपद.

१९७८ - अ.भा. ऑपथॅल्मीक असो. चे अविरोध अध्यक्ष.

१९७९ - अ.भा. ऑपथॉलिकतर्फे प्रतिष्ठान डॉ.श्रीनिवास सुवर्ण पदक बहाल करुन गौरव.

१९८४ - नेत्रदान संस्थेची स्थापना. आजतागायत त्या संस्थेचे कार्यकारी अध्यक्षपद.

१९९२ - अंध लोकांच्या निस्वार्थ सेवेबद्दल नॅशनल असो. ऑफ ब्लाईंड तर्फे 'रुस्तम मेरवानजी अलपैवाल मेमोरीयल पारितोषिकाने' सन्मानित.

१९६९ - लॉयन्स इंटरनॅशनलचे डिस्ट्रीक्ट गव्हर्नर म्हणून निवड.

१९६४ - अमरावती संगीत कलोपासक सभेची स्थापना.

श्री.बापूसाहेब कारंजकर

यांचे पूर्ण नाव भीमराव देवराव कारंजकर यांचा जन्म दि. १९-११-१९२०. यांचे बालपण अमरावतीतच गेलेत प्राथमिक शिक्षण शाळा मध्ये झाले. त्यानंतर चवथी पर्यंत शिक्षण झाले. व पुढे शालेय शिक्षण सोडले. पण घरी देखील वडिलोपार्जित व्यवसाय सांभाळण्याची जबाबदारी उचलली नाही. गांधीजींच्या विविध चळवळी सुरु झाल्या होत्या. त्यात भीमराव हिरीरीने भाग घेत असत. वीर वामनराव जोशी यांची कन्या मथुताई यांच्या नेतृत्वाखाली प्रभात फेरी, फंड गोळा करणे, दारु दुकानावर पिकेटिंग, शिबीरे आदि सुरु झाले, त्रिबंक गुरुजी जोशी हेही त्यांचे ह्या बाबतीत मार्गदर्शक होते. गांधीजी अमरावतीत आले तेव्हा बापूसाहे ब स्वयंसेवक होते. मीठाचा सत्याग्रह, कायदेभंग चळवळ यातंही ते सहभागी झाले होते. फुले बस्ताद यांच्या व्यायामशाळेत जाऊन त्यांनी शरीर कमावले. उमरखेडच्या श्री.आकाजी फुलारी यांची कन्या रमाबाई यांच्याशी त्यांचा विवाह झाला. त्यांना एक पुत्र आहे.

अमरावती जिल्ह्यातील सर्व प्रकारच्या सामाजिक चळवळीत ते सहभागी झाले. संयुक्त महाराष्ट्र आंदोलन, कृषि विद्यापीठ आंदोलन, झोपडपट्ट्यांतील समस्या, विविध कामगार संघटना, मिल मजदूर संघटना, म्यु. कर्मचारी संघटना, या संस्थांचे नेतृत्व केले. व समस्या सोडवून घेतल्या. विदर्भ प्रवासी मंडळ स्थापन करुन अमरावती बडनेरा रेल्वेची समस्या, नरखेड रेल्वे समस्या, खाजगी मोटर वाहतुकीचे राष्ट्रीयीकरण, शहर बस वाहतूक सुरु करणे, एस.टी. भाडेवाढ विरुध्द आंदोलन, इ. चळवळी त्या मंडळातर्फे केल्या.

इ. १९४३ मध्ये नगरपालिका सभासद म्हणून निवडून आले व १९८१ पर्यत ते सदस्य म्हणून निवडून येत गेले. त्यामुळे प्रदीर्घ अनुभव पदरी होता. त्यांचे बहुतेक सर्व मित्र विरोधी पक्षात असल्यामुळे आयुष्य विरोधी बाकावर बसून गेले. परंतु, त्यांनी निस्वार्थ हेतूने कार्य आरंभिले होते. त्यामुळे स्वत:च्या प्रभागात बरीच कार्ये करुन घेतली. स्वातंत्र्य क्षेत्रात देशगौरव सुभाषचंद्र बोस यांच्या निधनाचे वृत्त येताच त्यांना नगरपालिकेत दुखवट्याचा ठराव पारिक करुन घेतला. राष्ट्रसंत तुकडोजींना अटक होताच, ब्रिटिश सरकारच्या निषेधाचा ठराव पारित करुन घेतला. देशात युध्द परिस्थिति असतांना श्री.बापूसाहेब कारंजकर, श्री.बाळासाहेब मराठे व श्री.नानासाहेब ठाकूर यांनी स्वत: येऊन सरकारी स्वस्त धान्य दुकाने सहकारी तत्वावर सुरु करविली. आज पर्यत ही दुकाने सुरु आहेत. इ. १९४२ मध्ये पोलीसांनी अमरावती नगर पालिकेस कुलूप ठोकले होते. तेव्हा बापूसाहेबांनी कुलूप उखडून फेकण्यात पुढाकार घेतला होता. ते फार निर्भय होते. एकदा कलेक्टर महोदय हाताता पिस्तूल घेऊन गांधी चौकात 'पोलीसांसह उभे होते. तेथे श्री.बापूसाहेब कारंजकर पोहोचले. त्यांना लगेच पोलीसांनी गराडा घातला. परंतु त्याहि स्थितीत भोवतालच्या लोकांना उद्देशून श्री.बापूसाहेबांनी जबरदस्त प्रभावी भाषण केले. पोलीसांनी लाठी मारा केला. त्याचाहि निषेध त्याच सभेत तेथेच बापूसाहेबांनी केला. युध्द काळात युध्दविरोधी मजकूर प्रसिध्द करु नये हा आदेश धुडकावुन लावून बापूसाहेबांनी सुध्दा विराधी बुलेटीन प्रसिध्द केले. व ते ज्वाला नावाचे वृत्तपत्र चालवीत असत. इ. १९५६ साली संयुक्त महाराष्ट्रासाठी आंदोलन

सुरु झाले. श्री.एस.एम.जोशी ह्या त्यागमूर्तीकडे महाराष्ट्राचे सरचिटणीसपद होते. त्यांनी अमरावतीस श्री.बापुसाहेब कारंजकर यांना स्थानिक आंदोलनाचे चिटणीस नेमले. त्यांनी सत्याग्रहात भाग घेऊ नये असे ठरले होते. त्यांनी जिल्ह्याचे नेतृत्व शर्थीने सांभाळणारे सत्याग्रही मिळवून दिले. लढ्यास तीव्र स्वरुप आले. विदर्भाच्या सर्व आठ जिल्ह्यांपैकी फक्त एकट्या अमरावतीतूनच साडेचारशे सत्याग्रही मिळवून दिले. इ. १९५८ साली सत्याग्रह सुरु झाला. त्यातहि बापूसाहेबांनी हिरीरीने भाग घेतला. अमरावतीला संयुक्त महाराष्ट्र समितीचे विराट अधिवेशन भरले होते. त्यांच्या यशाचे श्रेय श्री.बापूसाहेब कारंजकरांना जाते. मात्र आमदार पदाच्या निवडणुकीत पक्षाचे त्यांना तिकीट दिले नाही. ते अपक्ष उभे राहिले. व त्याचा पराभव झाला. परंतु त्यांनी जनतेवर राग धरला नाही. जनहिताची कार्ये करीतच राहिले. अमरावतीला त्यांनी ऑ.ई. इंस्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ गव्ह. या संस्थांचे अधिवेशन अमरावती नगरपालिकेच्यावतीने भरवून नागरिकत्वाच्या दृष्टीने कशी येईल यावर चर्चासत्र आयोजिले होते. ते मनाने फार उदार व सहिष्णू होते. ऑ.इं.इ. ऑफ लोकल सेल्फ गव्ह. च्या परिषदेचे संचालन त्यांनी दुसऱ्या व्यक्तीस दिले. सं.म. समिती अधिवेशनाचे संचालन करण्याचे कार्य एका तरुण विद्यार्थ्यावर सोपवले हरिभाऊ कलोती सारखा कर्तबगार तरुण वॉर्डमधून उभा होत आहे हे पाहताच त्यांनी निवडणुकीतून माघार घेतली. अमरावतीचा इतिहास त्यांनी त्या वाचनाच्या परिपाकातून तयार केला. दि. १५ जानेवारी १९८७ रोजी अमरावतीच्या सर्व पक्षांच्या नेत्यांनी एकत्र येऊन त्यांचा थाटात सत्कार केला. तो पाहून ते इतके भारावले की सभेत भाषण करु शकले नाहीत. त्यापैकी महाराष्ट्राचे नेते श्री.एस.एम. जोशी (श्रीपाद महादेव) अध्यक्ष होते. अमरावतीचा इतिहास हा ग्रंथ श्री.बापूसाहेब कारंजकर यांनी श्री.एस.एम. यांना समर्पित केला आहे. स्वत: सुशिक्षित नसूनहि अनेक सुशिक्षित एकत्र येऊन लिहिणार नाहीत एवढा अफाट ग्रंथ अमरावतीचा इतिहास (खंड १ व २) त्यांनी तयार केला. तो तयार करतांना त्यांनी जातीयपंथ, धर्म यांना महत्व न देता कृति, कार्य, कर्म यांना महत्व दिले. त्यांनी निस्वार्थ समाजसेवा केली. इ. १८६९ साली अमरावती नगरपालिकेची

शताब्दी होती. त्यावेळी शताब्दी महोत्सव करावा अशी कल्पना पुढे आली. नगर पालिकेचे जुने लोक त्यासाठी बापूसाहेबांपुढे आले व त्यांच्यातील चौकस इतिहासकार जागा झाला. आणि अतिशय चिकाटीने, लिहीणे व कष्टाने खस्ता खाऊन त्यांनी संपूर्ण अमरावतीचा इतिहास उभा केला. नगर पालिकेने स्वत:च्या शहराचा इतिहास लिहून काढला अशी भारतातील अमरावती ही पहिली नगरपालिका होय. अनुकरणाने आता अनेक शहरांचे इतिहास लिहिल्या जात आहेत. हे बापूसाहेबांच्या अचाट कल्पनाशकांचे उदाहरण होय. त्यांच्या ग्रंथाचे समीक्षण त्यांच्या विशेष आग्रहावरुन श्री.वासुदेव खापर्डे यांनी लिहून दिले. ते त्यांना फार आवडले. त्याचा समावेश ह्या ग्रंथात आहे. श्री.बापूसाहेब कारंजकर यांनी श्री.सुदाम देशमूख, श्री.जांबुवंतराव धोटे, श्री.सुरेंद्र भुयार, श्री.यशवंत खापर्डे, श्री.बबन मेटकर, श्री.अण्णा वैद्य, बापू वैद्य, श्री.के.दी.मुन्शी, श्री.मोहोड, श्री.वाघ सोमवंशी, श्री.बी.टी.देशमुख, श्री.श्रीकांत अनगळ, श्री.मधु शेरेकर, शेख वझीर पटेल, श्री.मदन भट, श्री.देवीसिंह शेखावत, श्री.रामदास पाटील, श्री.वसंतराव कोल्हटकर, व अन्य अनेक कार्यकर्ते निर्माण केले. त्यांना विधायक कार्याची प्रेरणा दिली, मार्गदर्शन केले; लढावू वृत्ती शिकविली; कार्य करण्याची जिद्द दिली.

थोर अर्थशास्त्रज्ञ, शिक्षणतज्ञ व समाजसेवक प्रा.वा.सि.काळे

अर्थशास्त्र गाढे अभ्यासक, शिक्षणतज्ञ, समाजसेवक तथा दै. हिंदुस्थानच्या 'आर्थिक जगत' चे स्तंभलेखक प्रा.वासुदेव सीतारामपंत काळे यांचे दि. ३०/८/१९९७ दु:खद निधन झाले. प्रा.वा.सी.काळे यांच्या निधानाची वार्ता अमरावती शहरात पसरताच सर्वत्र शोककळा पसरली.

प्रा.वा.सी.काळे हे मागील वर्षापासून अर्धांगवायूमुळे आजारी होते. सकाळी ५ वाजता त्यांची प्राणज्योत मालवली व एक थोर व्यक्तीमत्व काळाच्या पडद्याआड गेले. त्यांच्या मागे त्यांच्या पत्नी समाजसेविका चंपावती काळे, दोन मुले प्रा.श्याम, प्रा.निशिकांत, मुलगी सौ.सुमा, जावई डॉ. घाटोळ व फार मोठा आप्तपरिवार आहे. मृत्यूसमयी ते ७३ वर्षाचे होते.

अमरावतीच्या हिंदू स्मशान भूमीत अत्यंत शोकाकूल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले.

प्रा.काळे यांचा जन्म १ डिसेंबर १९२५ रोजी अमरावती जिल्ह्यातील अचलपूर तालुक्याच्या पांढरी या गावी झाला. त्यांचे दहावीपर्यंतचे शिक्षण शिवाजी महाविद्यालयात झाले. घरची आर्थिक परिस्थिती अत्यंत हालाखीची व प्रतिकूल असतांनाही त्यांनी त्यावर मात करुन आपले शिक्षण सुरु ठेवले. बी.कॉम., एम.कॉम, साहित्य विशारद आदि पदव्या घेवूनही त्यांनी आपली ज्ञानलालसा सोडली नाही. १९४९ साली टाटा कन्सलटंन्समधील लठ्ठ पगाराची नोकरी सोडून डॉ.पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख यांच्या व्यक्तीत्वाने भारावून जावून शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालयात अध्यापनाचे कार्य सुरु केले. आपल्या अष्टपैलू व्यक्तीमत्वाने व अध्यापन कौशल्यामुळे ते विद्यार्थ्यामध्ये तसेच त्यांच्या सहकाऱ्यांमध्ये अत्यंत प्रिय होते.

त्यांनी सीतारामजी चौधरी महाविद्यालय, वरुड, फुलसिंग महाविद्यालय, पुसद, श्री.शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय अमरावती येथे प्राचार्य पदी काम केले. ते करीत असतांनाच त्यांनी अनेक गरजू व गरीब विद्यार्थ्याचे पालकत्वही स्वीकारले.

शिक्षण क्षेत्रातील अण्णासाहेबांचे कार्य जरी प्रचंड असले तरी त्याचसोबत त्यांनी सामाजिक क्षेत्र व साहित्य क्षेत्रातही अत्यंत उल्लेखनीय कार्य केले. ते विदर्भातील अनेक संस्था संघटनांचे पदाधिकारी या नात्याने संबंधित होते. त्यांचे शिवाजी शिक्षण संस्था, नगर वाचनालय, अंध विद्यालय, श्रद्धानंद अनाथाश्रम, साई सेवा समिती, इत्यादी सामाजिक, शैक्षणिक संस्थांशी अत्यंत नजिकचे संबंध होते.

कुशाग्र बुध्दी, तीव्र स्मरणशक्ती व प्रचंड इच्छाशक्ती हे गुण अण्णासाहेबांच्या कार्यातून दिसून येतात. त्यांना वाणिज्यविषयक अनेक शोधनिबंधांवर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर पारितोषिके मिळाली. लोकनायक अणे पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले, तर महाराष्ट्र राज्य वाणिज्य परिषदेने त्यांचा गौरव केला. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स तर्फे आयोजित शोधनिबंध स्पर्धेत तर त्यांनी लोगोपाठ ३ वर्षे प्रथम पारितोषिक पटकाविले त्याबद्दल त्यांना विशेष गुणवत्ता पुरस्काराही बहाल करण्यात आला. अमरावती व नागपूर विद्यापीठात त्यांनी अनेक मानाची पदे भूषविली.

सोबतच जिल्हा नियोजन मंडळाचे ते काहीकाळ सदस्यही राहीले. पुणे विद्यापीठ बहि:शाल शिक्षण मंडळाचे सदस्यपदही त्यांनी भूषविले.

दोन वर्षापूर्वी त्यांना अर्धांगवायूचा झटका आला होता. परंतू इच्छाशक्तीच्या आधारावर त्यांनी स्वत:ला सावरुन पुन्हा आपले काम सुरु केले. अश्याही परिस्थितीत त्यांनी ''साउदर्ग इकॉनॉमिस्ट''. या अर्थशास्त्रविषयक प्रसिध्द नियतकालीकात केलेल्या लिखाणबद्दल त्यांना राष्ट्रीय पारितोषिक मिळाले.

महाराष्ट्रातील अनेक प्रसिध्द नियतकालीके व वृत्तपत्रांमधून प्रा.काळे यांनी अनेक वर्षे लिखाण केले. दै.हिंदुस्थानमधून तर त्यांनी तब्बल ४० वर्ष पर्यत 'आर्थिक जगत' हा प्रसिध्द स्तंभ चालविला. अगदी शेवटपर्यत ते 'आर्थिक जगत' मधून लिखाण करीत होते.

अर्थशास्त्र, शिक्षणक्षेत्र व सामाजिक क्षेत्रावर आपल्या कार्याचा ठसा उमटवून आज हे महान व्यक्तीमत्व अस्तास गेलं.

सायंकाळी ४ वाजता त्यांच्या रुख्मिणीनगरस्थित निवासस्थानावरुन अंत्ययात्रा काढण्यात आली. स्थानिक हिंदू स्मशान भूमिकवर त्यांचे जेष्ठ चिरंजीव प्रा.श्याम काळे यांनी त्यांच्या चितेला अग्नि दिला. यावेळी श्री.भाऊसाहेब भेले यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या शोकसभेत आम. श्री.बी.टी.देशमुख, श्री.देविसिंह शेखावत, सर्वश्री बबन मेटकर, बाबूराजी हिवसे, वसंतराव चर्जन , वसंतराव मालधुरे, प्रा.चिरोदे, प्राचार्य बोके, प्राचार्य कासट, मराठे, श्रीकृष्ण बन्सोड, जाहिर श्रध्दांजलीपर भाषणे झालीत.

श्री.पु.रा. (भय्यासाहेब) पारनेरकर. :-

श्री.पारनेरकरांनी जे कार्य हाती घेतले, त्यानंतर सहा वर्षांनी राज्य सरकारला ह्या कार्याचे महत्व पटले. सरकारी पातळीवर आता व्यवसाय मार्गदर्शन'' सुरु झाले आहे. श्री.पारनेरकरांचे वैशिष्ट्य ह्यातच आहे. श्री.पारनेरकरांनी सुरु केलेली अनेक प्रबोधनाची क्षेत्रे चालू रहावीत. त्यातच राष्ट्राच्या व समाजाच्या अभ्युदयाचे बीज आहे. श्री.पारनेरकरांची कार्यपध्दती हेच इतरांच्या दृष्टीने एक मोठे शिक्षण आहे.

श्री.पु.रा.पारनेरकर यांचा जन्म दि. २० सप्टेंबर १९१५ रोजी झाला. त्यांचे वडील रामचंद्रपंत हे कमेटीत कारकून होते. ते तीन वर्षांचे असतांना एन.फ्ल्यूएंझाच्या साथीत कुटूंबातील बहुतेक सर्व माणसे दगावली. वडील बाराव्या वर्षी दगावले. मेहुणे श्री.पांडव व बहीण यांनी पुरुषोत्तमास अमरावतीस शिक्षणासाठी आणले. हे याज्ञिकी कुटूंब होते. भिक्षुकी, धार्मिक परंपरा, कर्मकांड यांत श्री.पांडव निमग्न होते. घरी गरीबी होती. त्यामुळे पुरुषोत्तम वार लावून जेवत असे. अभ्यासाचा ध्यास होता. इ. १९३१ साली पुरुषोत्तम माध्य.विद्यालय प्रवेश परीक्षा उत्तीर्ण झाला. मध्यप्रदेशातून तिसरा व विदर्भातून प्रथम क्रमांक मिळविला. शिष्यवृत्तीचा मानकरी होता. परंतु इ. १९३०-३१ च्या स्वातंत्र्यचळवळीत भाग घेतला म्हणून शिष्यवृत्ती मिळाली नाही. आणि सरकारच्या हिंदू ॲकेडेमिक हायस्कूल मध्ये प्रवेश मिळू शकला नाही. अखेर इनामदारांच्या शाळेत (न्यू हायस्कूल) प्रवेश मिळाला. इ. १९३४ साली ते एस.एस.सी. परीक्षा उत्तीर्ण झाले. याच वर्षी त्यांनी श्री.वडोदकर गुरुजी व श्री.ठाकरे गुरुजी यांच्या बरोबर दुचाकीवरुन महाराष्ट्र यात्रा केली. एक महिना ते बेनोड्याच्या घनघोर अरण्यात सोबत्यांसह राहिले. नंतर भारत आयुर्वेद विद्यालयात (कै.श्री. वैद्यभुषण पुरुषोत्तम शास्त्री हिर्लेकर) आयुर्वेदाचे शिक्षण घेतले. व आयुर्वेद विशारद ही पदवी प्राप्त केली. व श्री.काणे यांनी स्थापन केलेल्या श्री.समर्थ विद्यालयात शिक्षक म्हणून नोकरी पत्करली. अफाट वाचन व व्यासंग, संस्कृतचा अभ्यास यापूर्वी झालेला होता. तो या कामी आला नंतर राजीनामा देऊन धुळ्याच्या श्री.नानासाहेब देव यांच्या समर्थ वाग्देवता मंदिरात शिक्षण घेणे सुरु केले. पण आजार पणामुळे तेथून अमरावतीस परत आले. व समर्थ विद्यालयात पुन्हा शिक्षक म्हणून राहिले. मन आध्यात्माकडे ओढा घेत होते. अंतरात्मा स्वस्थ बसू देत नव्हता. म्हणून नागपूरला श्री.रामकृष्ण आश्रमामध्ये सेवाव्रत घेण्याकरता गेले. श्री.भास्करेश्वरानंद यांनी शिक्षण कार्य करुन समाजसेवा करण्याचा उपदेश दिला. त्या प्रेरक प्रसंगाची स्मृति म्हणून श्री.पु.रा.पारनेरकर यांनी श्री.रामकृष्ण विद्यालयाची स्थापना कै.दादासाहेब खापर्डे यांच्या आशीर्वादाने दि. २-७/१९३८ रोजी केली. आज हे विद्यालय व्यवस्थित सुरु आहे. श्री.पारनेरकर यांनी इ.

१९३८ ते १९७७ एवढ्या प्रदीर्घ कालखंडात मुख्याध्यापक पदाची धुरा सांभाळली. शिवाय झाडझूड, पाणी भरणे, हिशेब ठेवणे, पत्र व्यवहार, ही कामेही त्यांना करावी लागली. त्यांना श्री.दामोदर अंबादास पंत नावाचा सच्चा सारथी मिळाला. श्री.पु.रा.पारनेरकर, त्यांची पत्नी सौ.शैलजा व श्री.पंत यांनी चिकाटीने व निग्रहाने शाळा चालवली. व नावरुपास आणली. शिकवण्या करुन ते चरितार्थ चालवीत. शिवाय जोडधंदा म्हणून प्रकाश डुप्लिकेटर्स सुरु केले. त्यावेळी अमरावतीत न्यू हायस्कूल, श्री.समर्थ हायस्कूल, विदर्भ हायस्कूल, मराठा हायस्कूल, व श्री रामकृष्ण विद्यालय ह्या शाळा होत्या. श्री.पारनेरकरांच्या ध्येयवादाला, तत्वनिष्ठेला व शिक्षण दान प्रेमाला मान देऊन श्री.ग.त्र्यं.देशपांडे (नानासाहेब) यांच्या सारखे विव्दरत्न ह्या शाळेत शिक्षक म्हणून अल्पशा वेतनावर कार्य करीत होते. हळूहळू श्री.रामकृष्ण विद्यालयाची स्वत:ची इमारत झाली. हे विद्यालय श्री.पारनेरकरांनी जगप्रसिध्द हनुमान व्यायाम मंडळास हस्तांतरित केले. आता त्या शाळेला श्री.रामकृष्ण क्रीडा विद्यालय म्हणतात. महाराष्ट्रात हे एकमेव क्रीडा विद्यालय आहे. हे अमरावती नगरीस कौतुकास्पद वाटावे. एवढेच नव्हे तर संपूर्ण भारतात ह्या शाळेत सर्वप्रथम व्यवसाय मार्गदर्शन केंद्र सुरु केले. मुंबई प्रांताचे माजी पंतप्रधान श्री.ग.श्री.खैर (बाळासाहेब) हे जपानहून उच्च शिक्षण घेऊन आले होते. त्यांच्या प्रेरणेने श्री.पारनेरकरांनी हे व्यवसाय मार्गदर्शन केंद्र सुरु केले. हजारो विद्यार्थ्यांना ते व्याख्याने, पत्रके, लघुपुस्तिका यांच्याव्दारा व्यावसायिक मार्गदर्शन करीत. शिवाय वृत्तपत्रांतून लेखही लिहीत. सुविख्यात उद्योगपति श्री.मुकुंदराव किर्लोस्करांनी त्यांची पुस्तके प्रकाशित करण्यास मोलाचे साह्य केले. श्री.पारनेरकरांचा इतका नावलौकिक झाला की, ते अखिल भारतीय व्यवसाय मार्गदर्शन संघटनेचे अध्यक्षपदी निवडले गेले. श्री.पारनेरकरांनी पालक शिक्षक संघातहि कार्य केले. ते दहा वर्षे ह्या संघटनेचे सचिव होते. ते रोटरी क्लब अमरावतीचे सदस्य, सचिव, व अध्यक्षहि बनले. ह.व्या.प्र.मंडळाचा त्यांचा प्रारंभापासूनच संबंध होता. या मंडळाव्दारे त्यांनी अनेक सहली आयोजित केल्या होत्या. समर्थ भक्त श्री.नानासाहेब देव (धुळे) यांच्यापासून त्यांनी समर्थ रामदास स्वामींची भक्ति घेतली. संत गाडगे

बाबांपासून गोरगरिबांच्या कल्याणाची प्रेरणा घेतली. स्वामी विवेकानंदांपासून राष्ट्र भक्ती ग्रहण केली. स्वा.सावरकरांपासून प्रखर देशभक्तीची प्रेरणा घेतली. आणि या प्रेरणा पुंजाचा उपयोग विद्यार्थ्यांना सुसंस्कृत, सुविचार संपन्न, सदाचार संपन्न, स्वावलंबी व व्यक्तित्व संपन्न बनविण्यासाठी सातत्याने केला. तपस्वी बाबासाहेब परांजप्यांकडून वेळेचा सदुपयोग सत्कार्यासाठी करण्यास शिकले. महाराष्ट्रात कमीत कमी आठशे ठिकाणी त्यांनी व्यवसाय मार्गदर्शन पर व्याख्याने दिली. पंचवीस पुस्तके ह्या विषयावर लिहिली. जीवन व ज्ञान ही मिरविण्याची भूषणे नसून, सेवा व कार्य यांची साधने आहेत, हे व्रत स्वीकारले. मुख्याध्यापक संघात प्रवेश करुन त्या संघटनेच्या उपयोग याच उद्दिष्टपूर्तीसाठी केला. मुळातच अध्यात्मप्रवण मनोवृत्तीचा उपयोग ध्येय निष्ठेसाठी केला. धार्मिकताहि जोपासली. ते हिंदुत्व निष्ठ आहेत. मनाचे श्लोक भगवद्गीता, नारद भक्ति सूत्र, दासबोध, गीतारहस्य, तुकोबांची गाथा, एकनाथी भागवत, अनेक उपनिषदे, यांचा व्यासंग केला. या विषयांवर ते दोन दोन तास प्रवचने देतात. स्वाध्यायमूर्ती पांडुरंगशास्त्री आठवले यांच्या स्वाध्याय मालेचा त्यांच्यावर प्रभाव पडला. ते स्वाध्याय वर्ग चालवतात. त्यांनी स्वा. सावरकर चरित्र लिहिले आहे. नैसर्गिक बुध्दि व अभ्यासाची हौस यातून त्यांनी साहित्य विशारद ही पदवी प्राप्त केली. महाराष्ट्रातील अनेक वृत्तपत्रांतून व मासिकातून त्यांनी लेख प्रसिध्द केले आहेत. त्यातून त्यांची स्वदेशनिष्ठ संस्कृतीप्रेम, नीतिप्रेम, समाजनिष्ठा, शिक्षण प्रेम, विद्याप्रेम, व्यक्त होत असते. समाजात आत्मविश्वास आणि स्वावलंबन जागविण्याचा त्यांनी उपक्रम आरंभिला. ज्या जीवन मूल्यांवर त्यांनी प्रेम केले, ती जीवनमूल्ये त्यांनी एकनिष्ठतेने जपली. स्वत:ला संसाराच्या व्यापातून काढून पवित्र स्थळाला मन गुंतवणे जीवन विषयक चिंतन करणे, वैदिक विचारांशी जीवनाचा मेळ घालणे, निसर्गाच्या सान्निध्यात जाऊन जीवनाचा आढावा घेणे, म्हणजे तीर्थयात्रा, ह्या दृष्टीने त्यांनी अनेक धार्मिक, ऐतिहासिक - प्रेक्षणीय स्थळांची यात्रा केली.

त्यांनी शारीरिक योगहि आत्मसात केले आहेत. योग प्रशिक्षण केंद्रात जाऊन त्यांनी योगाचे प्रशिक्षण घेतले. बृहन् महाराष्ट्र योग परिषदेचे ते तीन वर्षे कार्याध्यक्ष

होते. त्यामुळे त्यांची कार्यदक्षता टिकली आहे.

शिक्षणासोबतच पूरक शिक्षण उपक्रम त्यांनी आरंभिले व चालविले आहेत. हस्ताक्षर सुधारणे, शुध्दलेखन सुधारणे, वादविवादांचे आयोजन चित्रकलेला प्रोत्साहन, पत्र मैत्री, इ. उपक्रम सतत घेत असतात. त्यांनी हिंदी राष्ट्रभाषेला मान दिला. व हिंदी राष्ट्रभाषेचा प्रसार करण्यात ते अग्रेसर आहेत. अभ्यासवर्ग चालविले आहेत. परीक्षांचे संचालन करतात. शिक्षकांमध्ये कार्यक्षमता यावी म्हणून हिंदी टीचर्स ट्रेनिंग इंस्टिट्यूट ची स्थापना केली. राष्ट्रभाषा प्रचार समितीत राहून सक्रिय सहकार्य दिले. आंतरराष्ट्रीय बालक वर्ष संपन्न करण्याची योजना जाहीर झाल्यावर लगेच त्यांनी विदर्भ बाल आनंद समिती स्थापन केली. व अनेक तळमळीच्या कार्यकर्त्यांना समीतीत घेऊन एक नवीन उपक्रम सुरु केला. राजकीय क्षेत्रातहि ते वावरले. मूळचेच हिंदू धर्म प्रेमी असल्यामुळे राजकारणातहि हिंदूत्वास प्राधान्य देणाऱ्या हिंदूमहासभेचे ते सदस्य झाले व बाबासाहेब खापर्डे, बाल शास्त्री हरदास, वि.घ.देशपांडे, स्वा.सावरकर, संत पाचलेगावकर महाराज, संत तुकडोजी महाराज इ. लोकांशी या निमित्ताने त्यांचा संपर्क होता. पण एका विशिष्ट मर्यादेपलीकडे त्यांनी स्वत:ला राजकारणात गुंतवले नाही.

त्यांना विधायक कार्य आवडते. म्हणून त्यांनी रोटरीचे सभासद व्हावयाचे ठरविले. १९६० साली ते सभासद झाले. आणि सचिव, उपाध्यक्ष व १९६४ मध्ये अध्यक्षहि झाले. त्यांच्या कार्याचा आकडा असा भरीव अन ठाशीव असतो. शालेय मुलांसाठी ट्रिपल इंजेक्शनस् देण्याची योजना सुरु केली. दवाखान्यांतील रुग्णांना गरजेच्या वस्तू पुरवण्याची योजना प्रारंभिली. प्रशिक्षणार्थी शिक्षकांना पुस्तके उपलब्ध करुन दिली. युवकांसाठी व्यवसाय मार्गदर्शन पर व्याख्याने व प्रदर्शने सुरु केली. महाराष्ट्र भर प्रचार दौरे केले. स्वामी विवेकानंदावर ठिकठिकाणी भाषणे दिली. क्लबमध्ये त्यांनी त्रिभाषासुत्र स्वीकृत केले. नॅशनल डिफेन्स फंडाला भरीव आर्थिक मदत मिळवून दिली.

विद्यार्थ्यांकडून ते दररोज एक बोधवाक्य पाठ म्हणून घेतात.

त्यांच्याकडून मनाचे श्लोक गीता, इ. पाठ म्हणून घेतात. त्यांना जमदाग्नि, कश्यप, वसिष्ठ, विश्वामित्र, जाबाली, आदि ऋषि मुनींच्या कथा सांगतात. पंचतंत्रातील कथा सांगतात. याप्रमाणे वैचारिक व सांस्कृतिक वारसा जतन करण्यास प्रेरणा देतात. सेवानिवृत्त लोक रिकामा वेळ व्यर्थ घालवतात; त्याऐवजी त्यांनी एकत्र येऊन ठराविक कार्यक्रम, उपक्रम केले, तर आयुष्याची संध्याकाळ सुसह्य होईल; जीवन विकास घडेल, वैचारिक विकास घडेल, आपल्या क्षमतांचा विकास घडेल या हेतूने त्यांनी काही सेवानिवृतांना हाताशी घेऊन अमरावती जिल्हा सेवानिवृत्त कर्मचारी संघाची मुहूर्तमेढ १९८२ साली केली. त्रैमासिक सुरु केले. त्यातून सुविचार मांडले. वधू वर सूचक मंडळ त्यांच्याव्दारा चालविले.

ठिकठिकाणी मार्गदर्शन करत फिरतात, म्हणून निवडक मित्र त्यांना 'मिस्टर गायडन्स' म्हणतात.

अजातशत्रू ज्ञानमहर्षि श्री.पु.हिर्लेकर :-

श्री.श्रीनिवास पुरुषोत्तम हिर्लेकर स्वभावाने फार प्रसिध्दी पराङ्मुख निमित्त कारणावरुन त्यांनी विविध ज्ञानशास्त्रांचा साहित्याचा, शास्त्रांचा जो अफाट अभ्यास केला, त्यावरुन त्यांना ज्ञानर्षि म्हणावे लागेल. ते आयुर्वेदाचार्य म्हणून जेवढे प्रसिध्द आहेत, त्यापेक्षा साहित्याभ्यासू म्हणून अधिक ओळखले जातात. त्यांना संगीत, ताल, सूर, लय, यांचे चांगले ज्ञान आहे. पण गायकाचा आवाज नसल्यामुळे ते गात नाहीत. पेटीवादन मात्र करु शकतात. ते ईश्वभक्त आहेत. विभूतीपूजक आहेत. त्यांचा वेद, उपनिषदे, गीता, इ. ग्रंथांचा अफाट अभ्यास आहे. शंका निकारणार्थ अनेक लोक त्यांचे मार्गदर्शन घेत असतात. त्यांचा नाट्य, काव्य, साहित्यशास्त्र, साहित्य समीक्षण, निबंध, प्रबंध ह्या क्षेत्रात दांडगा अभ्यास आहे. विद्यावाचस्पति पदवी मिळविण्यासाठी अनेक परीक्षार्थी त्यांच्याकडे मार्गदर्शनार्थ येतात. त्यांनी जी परीक्षणे व समीक्षणे लिहिली आहेत ती अत्यंत सडेतोड, सुस्पष्ट आहेत. आयुर्वेदाचार्य ही पदवी त्यांनी मिळालेली आहे. आयुर्वेदाचे ज्ञान व आवड त्यांना वैद्यभूषण पुरुषोत्तम शास्त्री हिर्लेकर यांच्याकडून प्राप्त झाले. आयुर्वेदिक ज्ञानाचा पारंपारिक अभ्यास असून,

ते आधुनिक चिकित्सा विज्ञानालाहि महत्व देतात. पण उलट, आधुनिक चिकित्सकांनी असाध्य ठरविलेल्या अनेक रुग्णांना त्यांनी आयुर्वेद चिकित्सेव्दारा पूर्ण बरे केले. पनवेलच्या आरोग्य मंदिर मासिकात ते काही काळ संपादक होते. अमरावतीच्या ह.व्या.प्र. मंडळात ते व्याख्याते होते. विद्यार्थ्यांना त्यांनी शरीररचना शास्त्र, शरीर कार्यशास्त्र, आरोग्य, योग, इ. शिकविले. आयुर्वेदा योग, व्यायाम यांच्या संतुलनात्मक अभ्यासावर ते भर देतात. संस्कृतमध्यें त्यांनी स्वतंत्र रचना केली आहे. संस्कृतात अनुवाद केले आहेत. मराठीत स्वतंत्र काव्य रचना केली आहे. अनेक अनुवाद मराठीत केले आहेत. हिंदीत स्वतंत्र रचना केली आहे व हिंदीतून मराठीत, इंग्रजीतून मराठीत, मराठीतून इंग्रजीत, असेहि अनेक अनुवाद लिहिले आहेत. संस्कृत 'नारद विराट सुभाषम्' लिहिले आहे. स्वा.सावरकरांच्या 'जयो स्तुते' ह्या गीताचा ते संस्कृतात लोलया अनुवाद लिहितात. संत तुकारामांच्या आचार्य विनोबांच्या, संत ज्ञानेश्वरांच्या रचनेचा सहज सरल संस्कृत अनुवाद बघता बघता लिहू शकतात. हे सर्व लेखन स्वान्तसुखाय केले आहे. संस्कृत विषयात एम.ए. पदवी प्राप्त केली आहे. वाणी रसाळ. पण कीर्तीची, प्रसिध्दीची, नावलौकिंकाची हाव नाही. आणि धडपडहि नाही. सार्वजनिक कार्यात ते कुठेहि फारसे पडलेच नाहीत. त्यामुळे चमकलेहि नाहीत. सात्विक, निगर्वी, प्रामाणिक, श्रध्दाळू असा हा ज्ञानार्णि अमरावतीचे भूषण मानल्या जातो.

एक प्राध्यापक/एक विचारवंत श्री.पद्माकर सिध्दनाथ काणे :-

१७ ऑक्टोबर १९३२ साली यवतमाळ येथे जन्मलेले प्रा. पद्माकर सिध्दनाथ काणे राज्यशास्त्राचे गाढे अभ्यासक, एक विचारवंत, व्याख्यान मालेतील एक वक्ता व शासकीय व गैरशासकिय अशा कितीतरी समित्यांवर राहिलेले एक कार्यकर्ता, प्राध्यापक म्हणून मान्यता पावले आहेत. नागपूर विद्यापीठातून १९५६ साली राज्यशास्त्र या विषयात त्यांनी एम.ए. पदवी मिळविली. १९५६ ते ५८ या काळात त्यांनी अमोलकचंद महाविद्यालय यवतमाळ येथे प्राध्यापकी केली. १९५८ साली बॉम्बे पब्लीक सर्व्हीस कमिशन कडून निवड होवून सरकारी सेवेत ते रुजू झाले. १९५८ ते १९९० या ३२ वर्षाच्या प्रदीर्घ काळात तेविदर्भ महाविद्यालय अमरावती येथे राज्यशास्त्र या विषयाचे

प्राध्यापक राहिले. त्यातील १९८४ ते ९० या काळात विदर्भ महाविद्यालयचे प्राचार्यपद त्यांनी भूषविले. महाराष्ट्र सरकारच्या प्री/आय.ए.एस. कोचिंग सेंटरचे ते संचालक राहिले. ३१.१०.९२ रोजी शासकीय सेवेतून ते सेवानिवृत्त झाले.

१९८५ साली राज्य शासनाचा आदर्श विद्यापीठ शिक्षक हा पुरस्कार त्यांना मिळाला. राज्यशास्त्र (१९६३ साली), काही प्रमुख राज्यशास्त्रज्ञ (१९६४), लोकप्रशासन (१९६७), आधुनिक राजकीय विश्लेषण (१९८०), The Rashtra Sant. इ. पुस्तके त्यांची प्रसिध्द झालीत. कित्येक संशोधन प्रबंधाचे त्यांनी विविध सभा, संमेलनामध्ये वाचन केले. विद्यापीठाने संशोधनासाठी मार्गदर्शक म्हणून ही त्यांची नियुक्ती केली. अभ्यासा व्यतिरिक्तही विद्यार्थ्यांच्या विकासासाठी काणे सर सदैव, प्रयत्नशिल राहिले. वक्तृत्व कला, लेखनकला, वादविवाद, इ. अनेक दालनात त्यांनी विद्यार्थ्यांना तर जनसंपर्क या विषयात प्राध्यापकांना समृध्द केले.

विद्यापीठ अभ्यासमंडळ सदस्य, अध्यक्ष, संशोधन समिती सदस्य इ. अनेक पदे नागपूर, अमरावती विद्यापीठात त्यांनी सांभाळली आहेत, आजही सांभाळत आहेत. महाराष्ट्र राज्य ग्रंथ निर्मिती व पुरस्कार समितीवर ते राहिले. विस्तार शिक्षणामध्ये सरांचे विशेष योगदान राहिले. चंद्रपूर जिल्ह्यातील सिंदेवाही येथील विस्तार शिक्षण प्रशिक्षण महाविद्यालयातही त्यांनी काम केले. भारत सरकार व भारत सेवक समाजाच्या योजनांमध्येही ते कार्यरत राहिले. शिक्षा मंत्रालय, भारत सरकार यांच्या मार्फत बऱ्याच शिबीरात त्यांनी मार्गदर्शन केले.

गांधी अध्ययन केंद्राच्या कार्याशीही ते निगडित राहिले महात्मा गांधीच्या विचारांवर त्यांनी विदर्भभर भाषणे दिलीत. नागपूर आकाशवाणीवरही त्यांची विविध विषयांवर भाषणे झालीत चिंतन याकार्यक्रमातही त्यांचा सहभाग होता.

सरांच्या विचारांचे, भाषणाचे आम्ही दर्दी आहोत. आज सेवानिवृत्तीनंतरही सरांचे लेखन/वाचन/भाषण सातत्याने सुरु आहे. नुकतेच अमरावतीच्या अंध विद्यालयाचे प्राचार्य श्री.बी.एफ.बाहे यांच्या वाढदिवस सत्कार सोहळ्यात मी सरांना ऐकले. अशा समारंभांना कुठलेही आढेवढे न घेता आयोजकांच्या

विनंतीला मान देवून जातात वेळेवर हजर राहणारी काणे सरांच्या योग्यतेची व्यक्ती समाजात विरळाच. यावेळी काणे सर म्हणाले होते, मला माझ्या लहानपणाची एक प्रार्थना आठवते. त्यात परमेश्वराला मागणे केले गेले होते. हे परमेश्वरा, माझ्या नियंत्रणात नसलेले दोष जर मला बदलविता येत नसतील तर आहे त्या परिस्थितीत रहायचे सामर्थ्य मला दे. माझ्याजवळ जे काही वैगुण्य आहे ते उगाळत बसण्यापेक्षा आहे त्या परिस्थितीत राहून आजूबाजूचे वातावरण बदलविण्याचे धैर्य, धाडस मला दे. या प्रार्थनेच्या पार्श्वभूमीवर पाहता, आपले अपंगत्व उगाळत न बसता, निराश न होता, माझ्या जवळ डोळे नाही, किंवा हात नाही, पाय नाही, मला ऐकायला येत नाही, बोलता येत नाही असा विचार न करता, जिद्दीने, चिकाटीने त्यांनी अभ्यास करुन मिळविलेल्या यशाकडे पाहता आपण त्यांच्यासमोर अपंग आहोत असे काणे सर म्हणाले होते.

आपल्या भाषणाचा समारोप करतांना ते पुढे म्हणाले.

ममत्वेताम् वाणी गुणकथन पुण्येन भक्ती।

तव गुणकथेत पुण्येन भवता ॥

अर्थात माझी वाणी तुझ्या गुणकथनाने पुण्यशिल होवो. लौकीक अर्थाने अपंग नसणाऱ्या, आपल्या जिद्दीने दैदीप्यमान कामगिरी करणाऱ्या या बांधवांचे कुठेतरी कौतुक करण्यासाठी माझी वाणी खर्ची पडावी यासाठी मी हे निमंत्रण स्वीकारले.

या व अशा अनेक विचारांनी सर श्रोत्यांना भारावून टाकतात. निवृत्ती नंतरची (तसे ते निवृत्त झालेच नाहीत, वर्गातून शिकवंणं काय ते कमी झालं, बंद नाही कारण काही वर्ग आजही विद्यापीठ अभ्यासक्रमात ते घेतात.) त्यांची सेकंड इंनिंग पहिल्यापेक्षाही अधिक सरस होवो. त्यांना दीर्घायुरारोग्य लाभो, ही प्रभूचरणी त्यांच्या या विद्यार्थ्यांची प्रार्थना.

श्री.एन.एस.(बाबूजी) अग्रवाल :-

यांचा जन्म धामोरी कसबा या खेडेगावी (जि.अमरावती) झाला. दि. २०.१.१९०६. त्याच गावी प्राथमिक शिक्षण झाले. उच्च शिक्षण खारतळे गाव येथे, व इ. १९२४ साली अमरावती येथून मॅट्रीकची परीक्षा उत्तीर्ण झाले. अमरावतीच्या

त्यावेळच्या किंग एडवर्ड कॉलेज (विदर्भ महाविद्यालय) मधून बी.ए. झाले. व नागपूरच्या लॉ कॉलेज मधून एल.एल.बी. झाले. वकीली सुरु केली. एम.ए. (इंग्रजी) झाले. नागपूर हायकोर्ट स्थापन झाल्यावर इ. १९२६ मध्ये हायकोर्ट वकील देखील झाले. आणि इ. १९५३ पासून सर्वोच्च न्यायालयात देखील काम करु लागले. पहिल्याच केसमध्ये त्यांनी ज्या पक्षकारांचे अपील केले त्यात सर्व आरोपी निर्दोष सुटले. त्यामुळे त्यांच्या बोलबाला झाला. नावलौकिक झाला. इ. १९६० साली बार असो. चे अध्यक्ष झाले. मद्रास सरकारविरुध्द वऱ्हाडच्या व्यापाऱ्यांतर्फे सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या प्रकरणात व्यापाऱ्यांना न्याय मिळवून दिला. अन्य अनेक महत्वाच्या केसेस चालवल्या. इ. १९९५ पासून वकीली व्यवसायातून निवृत्त झाले.

इ. १९४७ मध्ये शिवाजी विधि महाविद्यालयात प्राध्यापक त्यांच्या वर्गाचा निकाल शतप्रतिशत लागत असे. अनेक विद्यार्थ्यांना सुवर्णपदके देखील प्राप्त झाली आहेत. पण खुद्द बाबूजींना कॉलेज कडून व्याख्यात्या कामाबद्दल फक्त दरमहा वाहनखर्च मिळत असे. प्राध्यापक होऊन ज्ञानदान करावे ही महत्वाकांक्षा होती. त्या प्रीत्यर्थ हा त्याग त्यांनी केला. इ. १९८७ पर्यंत हे ज्ञानदानाचे कार्य त्यांनी केले.

अमरावतीतील लोकांना योगांचे शिक्षण मिळावे म्हणून त्यांनी शिवटेकडीजवळ योगभवन वडिलांच्या स्मृत्यर्थ उभे केले आहे. तेथे नि:शुल्क शिक्षण दिल्या जाते. श्री.अग्रवालजी (K E M) किंग एडवर्ड मेमोरियल स्कॉलर्शिप मंडळ (हल्लीचे विदर्भ शिक्षण महाराष्ट्र मंडळाचे अनेक वर्षे सदस्य होते. व अध्यक्ष पदहि भूषविले. त्यांनी अनेक सामाजिक चळवळीत भाग घेतला. त्यांचे अमरावती करांवर विशेष उपकार म्हणजे इ. १९४१ साली रेल्वे कमिश्नर यांनी अमरावती बडनेरा रेल्वे प्रवासी वाहतूकीसाठी बंद केली. तेव्हा अग्रवालजींनी त्याविरुध्द लढा देऊन रेल्वे वाहतूक प्रवाशांसाठी खुली करुन घेतली. इ. १९८९ मध्ये अमरावती नगर पालिकेची भरमसाठ करवाढ केली. तेव्हा नागरिक दक्षता संरक्षण समितीव्दारे श्री.अग्रवालजींनी त्याविरुध्द संघर्ष केला व करवाढ रोखली. श्री.अग्रवाल यांनी धार्मिक क्षेत्रातहि मोलाचे कार्य केले आहे. स्वातंत्र्यानंतर सुरवातीच्या कालखंडात धर्म जागृतीचे कार्य

श्री.करपात्रीनी महाराज यांनी केले. अमरावती विभागाची जबाबदारी श्री.अग्रवालजी सांभाळत असत. अमरावतीला विराट विष्णु महायज्ञ झाला. त्याचे पौरोहित्य श्री.नरसिंगदासजी अग्रवाल यांनी केले. अमरावतीस रामराज्य परिषदेचे अ.भा. अधिवेशन भरविण्यात त्यांचा पुढाकार होता. गौरक्षण संस्थेस त्यांनी मोलाचे सहकार्य दिले. श्री.विष्णू महायज्ञ समाप्तीनंतर वरुण राजा प्रसन्न होऊन रात्रभर पाऊस पडला. अशी ते आठवण सांगतात. अंबापेठेतील श्री.गोपाळकृष्ण मंदिराची विश्वस्त समिती कशी नेमावी याविषयी व नियम, कामकाज याविषयी फार मोलाचा सल्ला त्यांनी ताई महारांजाना दिला. व मंदिराचे सर्व कायदेशीर कामकाज त्या असे पर्यंत विनामूल्य केले.

श्री. हरनारायणजी लढ्ढा यांचा उद्या अमृत महोत्सव

येथील प्रतिष्ठित व्यवसायी व प्रगतशील कास्तकार श्री.हरनारायणजी लढ्ढा हे वयाच्या अर्ध्यांशीव्या वर्षी पदार्पण करीत असून त्या निमित्त त्यांचा अमृत महोत्सवी सत्कार समारोह दि. २७ ऑक्टो. रोजी सकाळी ११ वा. माहेश्वरी भवन, धनराज लेन, अमरावती येथे आयोजित करण्यांत आला.

याप्रसंगी आयोजित समारोहाचे अध्यक्षस्थान माहेश्वरी पंचायत अमरावतीचे अध्यक्ष सुंदरलालजी काकाणी, सामाजिक कार्यकर्ते चुन्नीलालजी, मंत्री, राजस्थानी हितकारक मंडळाचे अध्यक्ष देवदत्तजी शर्मा व श्री.गणेशदास राठी छात्रालय समितीचे सचिव सत्यनारायणजी लढ्ढा हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

श्री.हरनारायणजी लढ्ढा यांच्या अमृत महोत्सवी सत्कार समारोहा निमित्त दि. २७ रोजी सकाळी ९.३० वा. पारिवारिक कार्यक्रम (सोने की सीडी) व यज्ञ, दुपारी ११ वा. विविध हितचिंतकांतर्फे त्यांचा सन्मान करण्यात आला असून शाल व श्रीफळ देवून गौरव करण्यात आला.

श्री.लढ्ढाजी यांचे जन्मस्थान अमरावती जिल्ह्यातील शिवणगांव हे असून कर्मभूमी मात्र अमरावती शहर प्रामुख्याने राहिलेली आहे. त्यांनी जीवनात प्रगतीशील कास्तकार व व्यवसायी म्हणून ख्याती मिळविली आहे. तर आपल्या जीवनात

त्यांनी तीन विविध पुस्तकांचे इंग्रजी व मराठीतून लेखनही केलेले आहे. पुस्तकांच्या माध्यमाने कृषी विषयाबाबत शेतकऱ्यांना मोलाचे मार्गदर्शन अनेकवेळा त्यांनी केलेले आहे.

तसेच त्यांना त्यांच्या कार्याबद्दल इंदिराजी गांधी, सुधाकरराव नाईक, भगवंतराव गायकवाड, नानाभाऊ एबडवार, कमलनाथ आदींनी प्रशस्तिपत्र प्रदान केलेली आहेत.

डॉ. मोतीलाल राठी :-

डॉ.मोतीलाल राठी या माणसांविषयी अनेकांचे गैरसमज आहेत. त्यापैकी मी आणि माझ्या सासूबाई आम्ही दोघी देखील होतो. माझ्या सासूबाईंना त्यांच्याकडे तपासायला नेल्यानंतर त्यांनी शांतपणे तक्रारी ऐकून घेतल्या. मग प्रश्न विचारायला सुरुवात केली.

''तुळशीला प्रदक्षिणा घालता का ?'' सासूबाई - नाही.

डॉक्टर 'मग गाडगेबाबाच्या मंदिरात तरी जाता कां पायी - पायी. सासूबाई - नाही.

डॉक्टर - भात, बटाटे, गोड-धोड आवडीनं दोन्ही वेळ जेवत असाल नाही ? सासूबाई - हो आता कोणी जेवतही नसते काय ?

हे बोलत असतांना त्या माझ्या कानांशी कुजबुजल्या 'कसा आहे बाई' हा डागदर ?'

डॉक्टरांनी त्यांना कमी खाण्याचा सल्ला देऊन तुळशीला एकशे आठ प्रदक्षणा घालायला सांगितल्या औषध काहीच नाही.

आपला विशालकाय देह सावरीत सासूबाईनी बाहेर पडता - पडताच बडबड सुरु केली.

या डागदरले माही बेमारीच समजली नाही.'

कमीत कमी औषध देणारा असा हा गरिबांचा डॉक्टर आहे. डॉक्टर मधला दुसरा वाईट गुण म्हणजे परखड अन् खरे बालणे. त्यांच्या दवाखान्यातले संवाद ऐकण्यासारखे असतात. दवाखान्यात पेशंटची रीघ लागलेली असते. त्यातील प्रत्येकाशी डॉक्टर त्यांच्या भाषेत बोलत असतात. भाषा हे माणसाच्या अंत:करणाला

जाऊन भिडण्याचे एक माध्यम आहे. हे डॉ.ना माहित असावे. एकदा एक तब्येतदार तरुण बाई 'डॉक्टर साहब, मुझे भूकही नही लगती ! मै बिल्कुल कम खाती हूँ। कुछ टॉनिक बगैरा दो भी'.

बाईच्या एकंदर तब्बेतीकडे अन् - तजेलदार चेहऱ्याकडे पाहून ती काही कमी खात असेल असे वाटत नव्हते. डॉक्टर अस्वस्थ झाले. तिला काही झालेलं नाही हे त्यांनी तिला समजावून सांगितले तरी तिचा टॉनिकसाठी आग्रह सुरुच होता. शेवटी डॉक्टर चिडून म्हणाले.'

भाभीजी, जब गाडी नयी नवी रहती है तो पेट्रोल कम खाती है। अब जाओ।

त्यानंतर आलेल्या एक गरीब पेशंटला मात्र त्यांनी आपणहून जवळ असलेले सॅप्टचे टॉनिक काढून दिले. विनाकारण औषध घेणाऱ्यावरही चिडतात. एकदा कान दुखतो म्हणून मी कानात खोबरेल तेल टाकले अन् एक वेदनाशामक गोळी घेऊन टाकली. नंतरही बरे वाटले नाही म्हणून डॉक्टरांकडे गेले, माझी तक्रार ऐकून घेत त्यांनी माझ्या किंचित सुजलेल्या चेहऱ्याकडे पहात विचारले.

'घरी काही एखादी गोळी घेतलीस का सगळे सांगून टाकले. आपल्या रागावर नियंत्रण ठेवत त्यांनी विचारले.

' तू डॉक्टर आहेस कां ? तुझ्या शाळेत मराठीचा तास मी घेऊ का ? काय होईल असे झाल तर ? अन् ते खोबरेल तेल कानात टाकण्या ऐवजी डोक्यात लावले असते असते तर बरे झाले असते हे बोलत असतांनाच त्यांनी 'मला चालणाऱ्या औषधांची एक यादी, बनवून दिली व ती नेहमीसाठी जवळ ठेवण्यास सांगितले.

अर्थात त्यांनी दिलेल्या औषधांनी मी लवकरच बरी झाले.

एक कंजुष माणसास कमी खाण्यास सांगायचे होते. डॉ. म्हणाले' अरे बाबा, दोन रुपयांची खिचडी खाशील तर उद्या दोन हजाराचे ऑपरेशन करावे लागेल'.

मात्र कधी डॉक्टर विकतचे श्राध्द घेतात दवाखान्यात एक सुंदर बाई आपण तरुण दिसतो असा अभिमान असणारी, नव्ऱ्यासोबत दवाखान्यात येऊन हात दुखतो, पाय दुखतो, थकवा येतो, हापायला लागली.

डॉ.म्हणाले, अहो वहिनी, आता म्हातारपणात हे सगळे होणारच.'

एखाद्या बाईच्या नवऱ्यासमोर तिला असे म्हटल्यावर तिला राग येणारच ! त्या बाईने म्हणे तात्काळ डॉक्टर बदलला.

डॉक्टर साहेबांनी आयुष्यभर आपल्या डोळ्या समोर डॉ.शिवाजीराव उर्फ दाजीसाहेब पटवर्धनांचा, आदर्श ठेवला. स्व.दाजीसाहेबांविषयी त्यांच्या मनात नितांत आदर आहे. बरेचदा बोलतांना ते दाजीसाहेबांच्या आठवणी सांगतात. 'कार्य त्यांच्या सारखे असावे' ते गहिवरुन म्हणतात त्यांच्या कार्यात मदत म्हणून ते तपोवनात कुष्ठरोग्यांची सेवा करायला जातात. काही डॉक्टर मित्र मंडळींना एकत्रित करुन त्यांनी 'आरोग्य साधना मंडळ' स्थापन केले व त्याव्दारे अमरावती शहरातील झोपडपट्ट्यामध्ये अत्यंत कमी पैशात आरोग्य सेवा उपलब्ध करुन दिली.

डॉक्टर नागपूर विद्यापीठाचे माजी सिनेट सदस्य, अमरावती विद्यापीठाच्या कार्यकारणीचे सदस्य, ल.गणेशदास राठी शिक्षण समितीचे अध्यक्ष, माजी विशेष कार्यकारी दंडाधिकारी, जगदंबा कुष्ठधामाच्या कार्यकारीणीचे सदस्य तसेच अग्रवाल योग भवनाचे सचिव आहेत.

आणखी एक वेगळे रुप आहे. त्यांना साहित्यांची खूप आवड आहे. इंग्रजी मराठी हिंदीतील चांगली पुस्तके त्यांनी वाचली आहेत. बंगालीतील बिमल मित्र आणि शरदचंद्राच्या कादंबरीवर स्व. केच्यांशी चर्चा करतांना मी त्यांना पाहिले आहे. एखाद्याचा लेख किंवा पुस्तक आवडले तर ते त्याला आवर्जून घरी जाऊन सांगतील, दोष हाच की जे आवडले नाही ते देखील स्पष्टपणे सांगतील त्यांच्याशी साहित्यावर गप्पा मारतांना थोडावेळ शंका येते की हा माणूस मराठीचा पदवीधर आहे की काय ? खरे म्हणजे त्यांची मातृभाषा देखील मराठी नाही. पण त्यांच्या घरीदेखील सगळेच मराठी बोलतात. साहित्य प्रेमापोटी बहुतेक साहित्यिकांना हे वैद्यकीय सेवा मोफतच देतात.

काही दिवसांपूर्वी डॉक्टर हृदय विकाराने आजारी झाले. दोन महिने दवाखाना बंद होता. त्यांच्या प्रकृतीत सुधारणा व्हावी म्हणून त्यांचे असंख्य चाहते

परमेश्वराची करुणा भाकीत होते. डॉक्टर बरे होऊन दवाखान्यात रोग्यांची रांग लागली. खरे म्हणजे आता त्यांनी जास्त श्रम न करणेच योग्य. पण स्वस्थ बसतील तर ते डॉ.मोतीलाल कसले ?

त्यांच्या चौसष्टाच्या वाढदिवशी अभिष्टचिंतन करण्यासाठी या लेखाचे प्रयोजन नुकतेच त्यांना 'विजयश्री' पारितोषिक मिळाले त्याबद्दलही अभिनंदन.

जीवेत् शरद: शतम् !

शिवचन्द्र नागर :

मराठी : संपादन :

' मातृभूमि ' - दैनिक समाचार पत्र.

(सन् १९५६ ते सन् १९८९)

' महाविदर्भ ' - मराठी दैनिक (सन १९९२) से अभी तक.

अमरावती

वर्तमान :- १) महाविदर्भ हिन्दी एवं मराठी दैनिकों को संपादन व परामर्शदाता।

२) अमरावती विश्व विद्यालय के प्रलोभन सूचक हिन्दी विभाग में मानद, व्याख्याता.

स्थायीयता - शिवचंद्र नायर, श्रीकृष्ण पेठ, अमरावती (महाराष्ट्र)

दूर भाष : ६६०६३३

विशेष :-

१) ''कर्मि'' गीत सग्रह उत्तरप्रदेश शासन एवं मध्य प्रदेश शासन व्दारा १९५३ एवं १९५४ में पुरस्कृत.

२) 'महादेव: विचार और व्यक्तित्व उत्तर प्रदेश व्दारा १९५४ में पुरस्कृत।

३) विदर्भ हिन्दी साहित्य नागपुर के मंत्री।

४) राष्ट्रभाषा प्रचार समिती, वर्धा की अखिल भारतीय कार्यकारीणी के सदस्य।

५) विदर्भ राष्ट्रभाषा प्रसार समिती के उपाध्यक्ष।

६) महाराष्ट्र राज्य हिन्दी साहित्य अकादमी पर तीसरी बार समाविष्ट।

७) सन १९४६ मे नागपुर विश्वविद्यालय की शाखा के डीम निर्वाचित।
हिन्दी साहित्यकार कोश के लिये

जीवन - वृत्त

१. नाम : नागर, शिवचन्द्र

२. जन्मविधि : ३१ मार्च १९२६

३. भाषाओं की जानकारी :

भाषा का नाम	प्रकाशित साहित्य
हिन्दी	१) ज्योत्स्ना (प्रारंभिक काव्य रचनाओ का संग्रह)
	२) प्रणय - गीत : पद्य गीत संग्रह
	३) महादेव : विचार और व्यक्तित्व (महादेवीजी के संबंधित संस्मरणात्मक ग्रंथ)
	४) या नाद कां दार्शनिक एवं अन्य निबंध

अनुवाद :

मुजराही से के.एम. मुन्शी, लोकल ही मुन्शी, स्नेहरश्मि, एवं गिणूभाई एक दर्जन से अधिक वो का हिन्दी अनुवाद।

संपादित :

कथाचक्र : (विदर्भ के प्रतिनिधी कहानी कारों की कहानीयों का संग्रह)

प्रवाह : त्रैमासिक शोध पत्रिका के संपादन - मंडल में।

महाविदर्भ : हिन्दी दैनिक

परकोटाच्या आतील जिव्हाळ्याचे अजातशत्रू व्यक्तिमत्व :-

श्री.वसंतराव साऊरकराचे वालपण परकोटाचे आत बहिरमबुवाच्या परिसरात गेले. ज्या निळकंठ मंडळाने सामाजिक कार्याला एक नवा आयाम देवून या

परिसराच्या पुर्नवसन शुभारंभ साधला तो हा प्रभाव रक्तदान, गणेशोत्सव, क्रीडा स्पर्धा, नैसर्गिक आपत्ती आदी अनेक प्रसंगी ह्या साऱ्या प्रभागाने श्री.वसंतराव साऊरकर आणि त्याच्या सहकार्याची साच अनुभवली.

१९८५ ची दंगल त्यावेळी श्री.वसंतराव साऊरकर आणि त्याच्या साथीदारांनी दंगलवस्तीची सुमारे आठ दहा दिवस केलेली दत्तमंदीरातील सोय श्री.विटाळकरांच्या घराची भित पडली तेव्हा धावून गेलेले वसंतराव, अनेक अडी अडचणींसाठी धावून जाणारे वसंतराव साऊरकरांचे कार्य परकोटाच्या दुरुस्तीसाठी केलेले प्रयत्न त्यानंतर अतिवृष्टी ज्यावर्षी झाली होती त्यावेळेस महाजनपुरा, माताखिडकी साठी धावून गेले वसंतराव अशा कितीतरी संबंधाना उजाळा मिळतो.

श्री.साऊरकर पक्षाचे उमेदवार म्हणून कॉग्रेस पक्षाशी निगडीत असले तरी परकोटाच्या आतच्या भागातील वसंतराव साऊरकर हे वेगळ्या व्यक्तीमत्वाचे धनी आहेत क्रीडा स्पर्धा असो त्यासाठी मदतीचा हात देण्यात श्री.साऊरकर व त्याचे सहकारी नेहमी एका पायावर तयार असतात. केवळ प्रभागातच नव्हे तर परकोटाच्या आतच्या परिसरात श्री.वसंतराव साऊरकर यांची एक भावनिक जवळीक आहे. येथल्या प्रत्येक घराशी त्यांचा घरोबा आहे. त्यात पक्षीय अभिनिवेश नसतो.

विकासाचा दृष्टीकोन

नगर सेवकाला एक विकासात्मक दृष्टीकोन असावा लागतो. तो वसंतरावाच्या ठायी ओतप्रोत आहे. प्रभागाच्या समस्या कोणत्या व त्याची उत्तरे कोणती याबाबत वसतरावाचा आराखडा तयार आहे. भक्तीमंदीर वार्डात गेल्या ५ वर्षात असे काही झालेले नाही. श्री.वसंतराव साऊरकर ज्या भाजीबाजार प्रभागाचे नगर सेवक होते त्या वार्डात कोट्यावधी रुपयाचे कामे झाली. व भाजीबाजार वार्डाचा विकास झाला. उत्कृष्ट नगर सेवक हा किताब श्री.वसतरावांना वार्डात उत्कृष्ट काम केल्याबद्दल मिळाला. जसा विश्वास येथील नागरीकांना वाटतो व म्हणूनच त्यांनी वसंतराव साऊरकरच हा ठाम निश्चय केला आहे.

बुधवारा ते श्रीकृष्ण मंदीर ते एकविरा मंदीर या परिसरात महिलासाठी

व पुरुषांसाठी सार्वजनिक सुलभ शौचालयाची निर्मिती, ज्या ठिकाणी हजारो पर्यटक येतात त्या श्रीकृष्ण मंदीर परिसरातील आणि खडकाळीपुरा विभागासाठी असलेल्या नऊ नंबर शाळेचा विकास व सौदर्यीकरण, या विभागात बहीरबुवा गुढी परिसरात असलेल्या मैदानाचा क्रीडागंण म्हणून विकास, बौध्दविहार परीसर निर्मिती व विकास परकोटाचे जतन व दुरुस्तीकरण, छोट्या बालोद्यानाची निर्मिती कळया नाल्याची पुनर्बांधणी तसेच रस्ता या सर्व कामाचा विचार श्री.वसंतराव साऊरकर यानी आतापासून केली आहे.

श्री.वसंतराव साऊरकर यावे व्यक्तिमत्व मोठे आणि अजातशत्रू आहे. अनेक महत्वाची पदे आज ते भूषवीत आहे. परंतु परकोटाच्या आतल्या अमरावती शहरात हा माणुस वेगळा आहे. व एकदम जिव्हाळयाचा आहे. श्री.साऊरकर पीपल्स को-ऑफ. बँकेचे अध्यक्ष आहेत. तसेच ब्राह्मण सभेचे अध्यक्ष आहेत.

आयुष्याचे अर्धशतक पूर्ण करणारे समाजसेवक डॉ.गोविंद कासट :-

डॉ.गोविंद कासट म्हणजे विदर्भातील एक चालती बोलती सामाजिक चळवळ ! विदर्भातील अनेक सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा, संस्थांशी त्यांचा अत्यंत निकटचा संबंध आहे नव्हे अनेक सामाजिक संस्था त्यांनी जमा करुन दिलेल्या आर्थिक निधीतून यशस्वीपणे कार्य करीत आहेत, शिक्षण क्षेत्रात-ज्यांनी अनेक पदव्या गुणवत्ता यादीत उत्तीर्ण होऊन मिळविल्यात. क्रीडा क्षेत्रातील व सामाजिक क्षेत्रातील अनेक पुरस्काराचे जे मानकरी ठरले. ज्यांच्या नावाने सामाजिक कार्यातील एकही क्षेत्र सुटले नाही अशा अष्टपैलू व्यक्तीमत्वाचे धनी असणारे डॉ.गोविंदभाई कासट हे आज आपल्या आयुष्याचे अर्धशतक यशस्वीरित्या पूर्ण करीत आहेत.

डॉ.गोविंदभाई तसे व्यावसायिक. त्यांना आवडणाऱ्या क्रीडा क्षेत्राच्याच व्यवसायाशी बांधीलकी स्वीकारुन सतीधाम मार्केट मध्ये 'कासट ट्रेडींग कंपनी' नावाचे स्पोटर्स चे दुकान उभे आहे. वक्तशीरपणा हा त्यांच्या व्यक्तिमत्वाचा आणखी एक पैलू. सकाळी ८.१५ वा. गोविंदभाईचे दुकान उघडेल. म्हणजे उघडेल दुपारी १२ वा. बंद करायचे म्हणजे करायचेच. मग कितीही मोठे गिऱ्हाईक आले तरी

त्याला विनंती करुन २.३० ते ३.०० नंतर बोलवायचे ही त्यांची सवय व्यवसायामध्ये एकदम त्यांनी आपले वेगळेपण जोपासले आहे. शिक्षणाचा ध्यास घेतलेला गोविंदभाईच्या नावाने आजपर्यन्त बारा डिग्री (पदवी) उत्तीर्ण आहेत. त्यात बी.ई (मेकॅनिकल) आणि शारीरिक शिक्षणात निवडलेल्या पी.एच.डी.(आचार्य) ह्या महत्वपूर्ण पदव्याचा समावेश आहे. तर ह्या शिक्षणवेड्या व्यक्तीमत्वाने समाजकार्यातील कुष्ठ महर्षी डॉ.शिवाजीराव पटवर्धन यांच्या कार्यावर दुसऱ्या पी.एच.डी.चे कार्य अमरावती विद्यापीठातर्गत सुरु केले आहे. दोन विषयात पी.एच.डी.मिळविण्याची लालसा ठेवणारे डॉ.गोविंदभाई कासट हे विदर्भातील शिक्षणक्षेत्रातील पहिले व्यापारी असावेत.

शिक्षण क्षेत्रात उत्तुंग भरारी मारणाऱ्या गोविंदभाईना विविध विषयावर लेखन करण्याचा छंद असल्याने वर्तमानपत्रातून पत्रलेखन करण्याचा त्यांचा विक्रम आहे. अनेक वर्तमानपत्रातून त्यांचे स्फूटलेखन, स्तंभलेख, सतत प्रकाशित होत असतात. दै.मातृभूमी मध्ये सध्या सुरु असलेले व्यक्तीविशेष/क्रीडा व्यक्तीत्व या सदरातून त्यांनी विदर्भातील मान्यवर व्यक्तीत्वाच्या कार्याचा परिचय समाजाला करुन देवून त्या कार्यकर्त्यांना प्रोत्साहन दिले आहे, ते देत राहतात. सामाजिक, क्रीडा, सांस्कृतिक शैक्षणिक अशा विविध विषयावर आतापर्यन्त त्यांची पंचवीस पुस्तके प्रकाशित झाली आहे. विविध क्षेत्र सांभाळून पंचवीस पुस्तके लिहिणारे गोविंदभाई एकमेव असावेत. सर्वांमध्ये लोकप्रिय आहेत. विदर्भातील कुठलीही सामाजिक संस्था त्यांना न ओळखणे विरळाच. आपल्या पेक्षा ज्येष्ठ व्यक्ती दिसताच त्यांना चरणवंदना करुन आशीर्वाद मागणाऱ्या गोविंदभाईमधील हा गुण समोरच्याला प्रभावीत करुन सोडतो. आणि तेवढे विनम्र होण्याची शिकवण देवून जातो. त्यांचा समाजात असलेला मान. अतिउच्च शैक्षणिक गुणवत्ता आणि दांडगा जनसंपर्क हे सर्व असतांनाही त्यांच्या वागण्या बोलण्यात मोठेपणा किंवा अहंमतेचा आव नाही.

डॉ.गोविंदभाईचे अमरावतीच्या रक्तदान चळवळीत ही मोलाचे योगदान आहे. त्यांनी आतापर्यन्त पन्नासदा रक्तदान केले असून रक्तदान चळवळीचे

प्रणेते माझे स्नेही श्री.महेंद्र भुतडा यांच्या कार्यावर ते पुस्तक लिहित आहेत. सोबतच अनेक रक्तदान . अमरावती विद्यापीठ इ. ठिकाणच्या शारीरिक शिक्षण महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना शिकवायला ते या सर्व व्यस्ततेतून जातात. नवीन कुठलीही सामाजिक संस्था असो त्यांना एखादा सामजिक प्रकल्प राबवायचा असल्यास त्यांना डॉ.गोविंदभाईची आठवण होते. जणू गोविंदभाईच्या सहकार्य/मार्गदर्शनाशिवाय ते पूर्ण होणे शक्य नाही. असेच ते समीकरण झाले आहे.

सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात अनेक पुरस्कार मिळविणारे डॉ.गोविंदभाई समाजकार्यामध्ये डॉ.शिवाजीराव पटवर्धनांना आपले आदर्श मानतात. आणि म्हणून मागील ३० वर्षापासून सातत्याने तपोवनच्या कुष्ठ बांधवांसाठी ते कार्य करीत आहेत. मंगल कलश योजनेत सातत्य ठेवणारे ते एकमेव व्यक्ती म्हणावे लागतील. अनाथाश्रम, अंध अपंगाच्या विकासासाठी ते सतत धडपडत असतात. त्या विद्यार्थ्यांना मदतीसाठी ते सदैव तयार असतात.

आपले दुकान, शिक्षण, समाजकार्य हे सर्व एकावेळी यशस्वीपणे चालविणारे डॉ.गोविंद कासट महाराष्ट्रातील एकमेव व्यक्तीमत्व असावे. हे करीत असतांना वयाच्या पन्नासच्या वर्षात पदार्पण करणाऱ्या गोविंदभाईच्या चेहऱ्यावर कधी थकवा दिसत नाही. सतत प्रसन्न व हसतमुख दिसणाऱ्या गोविंदभाईचे या मागील गमक आहे. नियमित व्यायाम व खेळ, सकाळी ६ वा. ह.व्याप्र. मं. च्या मैदानावर असतात , त्यात खंड नाही. आणि दुसरे म्हणजे त्यांचे श्रध्दास्थान आहे. त्यांच्या मातोश्री. त्यांना कुठलाही बहुमान मिळेल अथवा, एखादी चांगली गोष्ट घडली तरी ती गोष्ट गोविंदभाई प्रथम आपल्या आईच्या चरणी अर्पण करतील. ते आपल्या आईचे आशीर्वाद घेवूनच कुठल्याही कार्याला सुरुवात करतात. आईच्या शब्दाबाहेर ते अजूनही जात नसल्याचे मी अनुभवले आहे.

या सर्व कार्याचा गोषवारा असणारे, गोविंदभाईच्या कार्यावर एक पुस्तक नुकतेच प्रकाशनाच्या मार्गावर आहे. एखादा लेख लिहून गोविंदभाईचे कार्य बंदिस्त करता येणे शक्य नाही. त्यांच्या व्यक्तीमत्वाचे विविध पैलू आहेत. प्रत्येक पैलू

म्हणजे एक प्रदीर्घ प्रकरण ठरावे. अशा या आगळ्या वेगळ्या व्यक्तीमत्वाला आज ५० वर्षे पूर्ण होत आहेत. या निमित्ताने अमरावती रक्तदान चळवळीने रक्तदान शिबीराचे आयोजन करुन एक वेगळा संदर्भ या वाढदिवसाला प्रदान केला आहे. अशा या समाजाभिमूख व्यक्तीमत्वाच्या हातून अनेक संस्थांची उन्नती होवो. त्यांना उदंड आयुष्य लाभो आणि त्याच्यापासून आमच्या सारख्या युवकांना आणि प्रौढांनाही प्रेरणा मिळो हिच त्याच्या वाढदिवसानिमित्त या संस्थाव्दारे नम्र शुभेच्छा !

सौजन्यमूर्ति डॉ.मोहन पांडुरंग निंभोरकर :-

अमरावतीत चांगले, उत्तम, उत्कृष्ट, असे डॉक्टर आहेत, त्यात डॉ.मोहनराव निंभोरकर यांची गणना होते. रात्री थोडी झोप , आणि नित्याचे आवश्यक कार्यक्रम यात थोडा वेळ खर्च होतो ; तेवढा आणि ध्यान, मनन, चिंतन, जप, देवपूजा ह्यासाठी राखून ठेवलेला एक तास; इतका वेळ वगळता उरलेला दिवसभराचा संपूर्ण वेळ क्षणहि न दवडता रूग्णांच्या साठी देणे हा ह्यांचा स्वभाव धर्म. आणि स्वभाव इतका मधुर की, त्यांना सौजन्यमूर्ति म्हणण्यास संकोच वाटू नये.

त्यांच्या जीवनाची दिशा ठरविण्यास त्यांच्या मातोश्रींचे अध्यात्मगुरु सालबर्डीचे संत मारोती महाराज हे कारणीभूत झाले. आई नेहमी सालबर्डीस यात्रेसाठी जात असे. बरोबर मोहन असे. महाराजांनी बालकाला पहिल्यांदा पाहिले, तेव्हा चटकन् उद्‌गार काढले की, याचा जन्म सेवा कार्यासाठी आहे. हा फार श्रेष्ठ प्रकारचे नाव कमावणार आहे. मोहनरावांचे वडील हि नामांकित शेतकरी होते. आणि दादा तर एवढे विख्यात होमिओपॅथी होते की, अमरावतीत त्यांचे नाव प्रत्येक नागरिकाच्या मुखी असतेच. मोहनरावांच्या वडिलांचे लक्ष व्यवसायाकडे फारसे नव्हते. ते संगीत क्षेत्रात स्वत:ला वाहून घ्यावयाचे या प्रतिज्ञेने काम करीत होते. गायक फार मोठ मोठे तानपुरे जवळ बाळगतात; त्यामुळे तानपुरे बैठकीच्या स्थळापर्यंत नेण्या आणण्यात खूप कष्ट व त्रास पडतो. म्हणून अगदी लहान, सहज नेता येतील असे तानपुरे निर्माण करावेत असे त्यांनी एक मित्राकडे पाहतांना मनात योजिले. आणि तसे तानपुरे निर्माण करणे हे आपले जीवनध्येय ठरवून ते सतत प्रयोग करीत राहिले. संवादिका अत्यंत

कुशलतेने वाजवू शकत असत. त्यामुळे श्री.मालवंडे, श्री.कवीश्वर, श्री.कोळेश्वर, श्री.बापू डोळे यांच्या संगतीत तासचे तास व्यतीत होत असत. काका डबीर साथीला. असायचेत. आपण तर चांगला डॉक्टर होऊ शकलो नाही; निदान आपल्या मुलाने तरी ह्या क्षेत्रात नाव कमवावे; ही इच्छा मनी बाळगून महाराजांना साकडे घातले. आणि मुलाला होमिओपाथीचे शिक्षण घेण्यासाठी महाविद्यालयात धाडले.

मोहनराव यांचा जन्म पार्डी, ता.मोर्शी, जि.अमरावती येथे दि. २१.१२.१९४८ रोजी झाला. मॅट्रिक पर्यंतचे शिक्षण मोर्शी येथेच झाले. व होमिओपॅथीचे शिक्षण अमरावतीच्या महाविद्यालयात झाले. काकांच्या प्रेरणेमुळे ते ह्या क्षेत्राकडे वळले. डॉ.बी.बी.निंभोरकर आज ह्यात नाहीत. पण अमरावतीतील प्रत्येक नागरिक अतिशय आदराने त्यांचे नाव घेतो. इ. १९७२ पासून मोहनरावांनी वैद्यकीय व्यवसायास प्रारंभ केला. त्यावेळी ते रुक्मिणी नगरात राहत होते. जवळच संत लहानूजी महाराज यांचा मठ होता. मंदिर होते. त्यामुळे जाणे येणे होते. स्वभाव श्रध्दाळू व भाविक घरी वातावरण धार्मिक वृत्तीचे. जीवनाची आणि कार्याची दिशा संतमहतांच्या आशीर्वादावर ठरवायची ही रीत. डॉक्टर होण्यासाठी महाविद्यालयात भरती होण्यासाठी निघण्यापूर्वी संतश्रेष्ठ लहानूजी महाराज यांचा आशीर्वाद घेण्यासाठी गेले तेव्हा, बाळ, पैसा हे ध्येय ठरवू नको. गरीबां जवळून पैसा घेऊ नको, अशी त्यांनी दिशा ठरवून दिली. आयुष्यात कधीच कशाचीहि कमी पडणार नाही असा आशीर्वाद दिला.

श्री.संत मारोती महाराज, श्री.संत लहानूजी महाराज, श्री.संत तुकडोजी महाराज, श्री.संत अच्युत महाराज ह्यांचे त्यांना आशीर्वाद लाभले आणि ते विफल झाले नाहीत. आज काँग्रेस नगर मध्ये विस्तीर्ण बंगला, मोटर, स्कूटर, अत्याधुनिक सुखसोयीच्या सर्व वस्तू घरी आहेत. सत्पुरुष श्री.स.कृ.देवधर (बापूसाहेब) यांना बोलावून त्यांच्या करवी गायत्री महायज्ञ करविला. त्याप्रीत्यर्थ ५/१० हजार रुपये खर्च केले. ही ऐपत साधुसंतांच्या कृपेमुळे प्राप्त झाली. असे ते विनम्र भावाने सांगतात. बापूसाहेबांमुळे ते गायत्री चे निस्सीम उपासक बनले. इ. १९८० मध्ये विवाह झाला. सुविद्य पत्नी मिळाली तीहि अशीच सुसंस्कृत, धार्मिक, श्रध्दाशील, सात्विक, आणि

त्यागवृत्तीची. होमिओपॅथीमध्ये निष्णात. पतीच्या खांद्यास खांदा लावून दवाखान्यात बसते. रुग्णांची वास्तपुस्त करते. पैसा व लाभ हे ध्येय न मानता, रुग्णसेवा व रोगदुरुस्तीकडे संपूर्ण लक्ष देणारे डॉक्टर भा.ज.बनसोड, डॉ.वसंतराव बनसोड, डॉ.गिरीश बनसोड, डॉ.अण्णासाहेब गोगटे, डॉ.नी.बा.बापट, डॉ.मोतीलाल राठी वगैरे मंडळी आहेत, त्यात निंभोरकर कुटूंबियांचा गौरवाने उल्लेख करावा लागेल.

डॉ.मोहनराव यांना व्यवसायामध्ये अत्यंत निष्णात होमिओपॅथिक डॉक्टरांचे सतत मार्गदर्शन मिळते. त्यात डॉ.प्रामाणिक, डॉ.पी.शंकरन्, डॉ. एस्.आर.वाडिया, डॉ. पी.एस. कृष्णमूर्ति, डॉ.उमरेडकर, डॉ.कवीश्वर, डॉ.चिमदानवाला, यांची नावे उल्लेखनीय. ग्रीस देशात जागतिक होमिओपॅथिक डॉक्टरांची परिषद इ. १९८८ मध्ये भरली. भारतातून दोन डॉक्टरांची निवड झाली. त्यात डॉ.मोहनराव निंभोरकर व दुसरे; डॉ.पी.एस.कृष्णमूर्ती हे होते. अथेन्सला परिषदेसाठी जो निबंध पाठविला होता तो स्वीकृत तर झालाच; पण प्रबंध निरीक्षण समितीचे अध्यक्षपद विनासायाम लाभले. त्यांनी गोखरुपासुन होणारी औषधे ह्या विषयावर प्रबंध वाचन केले. अनेक डॉक्टरांनी त्यांच्या प्रबंधाची झेरॉक्स प्रत स्वत: सोबत नेली. प्रबंध वाचनासाठी अनेक जागतिक कीर्तीचे मोठे मोठे डॉक्टर उपस्थित होते. त्यांच्यासमोर डॉ.मोहनराव फारच लहान वाटायचे. परंतु, अफाट वाचन, अचूक स्मरणशक्ती, योग्यवेळी योग्य उतारे देण्याची शैली, थोडक्यात मुद्देसूदपणे बोलण्याची सवय, वगैरे गुणांमुळे त्यांनी सर्वांवर छाप पाडली. आणि समितीचे अध्यक्षपद फुकाचे नसून पात्रतेवर पचवावयचे असते, हे सिध्द करुन दाखविले. त्यांचे गुरु डॉ.कृष्णमुर्ति समोरच होते. आपल्या शिष्याचा एवढा मोठा गौरव झालेला पाहून त्यांना परमसंतोष झाला. परिषदेसाठी जाताना अनेक विषयांवर टिपणे संदर्भ व माहिती काढून देण्याचे कार्य धर्मपत्नी सौ.निशा यांनी हौसेने पार पाडले. त्याचा फार लाभ झाला. अमेरिकेत सिअॅटल येथे इ. १९९७ मध्ये असाध्य रोग व होमिओपॅथी या विषयावर परिषद झाली. डॉ.मोहनरावांना निमंत्रण मिळाले. तेथेहि त्यांनी ह्या विषयावर संशोधनपूर्ण निबंध वाचन केले. ज्या महिलेला कॅन्सर मुळे सहा महिन्याच्या आतच मृत्यू येणे अटळ असे

सांगितले होते, त्या महिलेला आज एकोणीस वर्षपर्यत एक पैसाहि न घेता डॉक्टर निंभोरकर होमिओपॅथीच्या भरवशावर आरामदायक जीवन जगू देत आहेत ; ही त्यांच्या सखोल ज्ञानाची पावती आहे.

सतत रुग्णांची गर्दी पाहून कोणाला वाटावे की डॉक्टरांनी अफाट पैसा जमविला असेल. परंतु, हे खरे नाही. त्यांच्या दवाखान्यात नोंदणी एकदाच करावी लागते. आणि कुटूंबातील कोणाहि एकाचे नाव नोंदविल्या गेले की, सारे कुटूंब तेवढ्या खर्चात औषध प्राप्त करु शकते. कसली कमाई होण्यार पुण्याची कमाई भरपूर. आशीर्वाद व सदीच्छा भरपूर मिळतात. स्नेह मिळतो. रुग्णांचे स्मितहास्य हाच संतोष.

दोन गोजिरवाणी मुले आहेत. तेवढीच सालस, तेवढीच विनम्र ; तेवढीच मितभांषी; तेवढीच हुशार, तेवढीच महत्वाकांक्षी, तेवढीच श्रध्दाशील.

डॉ.मोहनराव निंभोरकरांची कीर्ती अमरावती पुरतीच मर्यादित राहिली नाही. मोहिनी होमिओ चॅरिटेबल ट्रस्ट, कॅन्सर रिलीफ सोसायटी, विभा विकलांग सेवा संस्था, फेलोशिप ऑफ द फिजीकल हँडिकॅप्स्, (मुंबई), नॅशनल डायबिटिक असो. ऑफ इंडिया, इंटरनॅशनल होमिओपॅथिक मेडिकल लीग, होमिओपॅथिक मेडीकल लीग ऑफ इंडिया, एशियन होमिओपॅथिक लीग, यासारख्या महत्वपूर्ण संस्थांमध्ये ते सदस्य अथवा पदाधिकारी आहेत. आणि कार्यकरीत आहेत. त्यांच्यारुपाने मानवदेहधारी एक चंदनाचे खोड सेवा करीत करीत झिजत आहे.

वडिलांच्या सेवेत असतांना वाद्यांच्या मध्ये दुरुस्ती करुन, सुधारित वाद्ये निर्माण करण्याची उपक्रमशीलता त्यांच्यात होती. आता अतींद्रिय शक्तीचा उपयोग करुन रुग्णांना दिलासा देण्यासाठी उपचार पध्दतीत इष्ट बदल करण्याचा उपक्रम त्यांनी मांडला आहे. त्यात त्यांना सुयश मिळो.

श्री.सूर्यकांत जोग

जन्म :- अमरावती

शिक्षण :- न्यू. हायस्कूल मेन (मॅट्रिक), किंग एडवर्ड कॉलेज (बी.एस.सी.) अमरावती, कॉलेज ऑफ सायन्स नागपूर (एम.एस.सी. केमेस्ट्री) शिष्यवृत्ती प्राप्त करुन शिक्षण

घेतले. गुणवत्ता यादीत सातत्याने नांव मिळविले. आय.एस. परीक्षेत (१९५३) भारतात चौथा क्रमांक, आय.पी.एस. परीक्षा उत्तीर्ण करुन पोलिस खात्यात प्रवेश.

व्यवसाय :- विदर्भ महाविद्यालयात दीड वर्ष प्राध्यापक पुढे पोलिस खात्यात कार्यरत. गोवा - मुक्ती संग्रामात पोलिस कार्यवाहीत प्रमुख भुमिका, दिल्लीत गृहमंत्रालय सुरक्षा व्यवस्था, एशियाडचे वेळी संरक्षण व्यवस्थेची जबाबदारी, मुंबईत पोलिस महासंचालक अशा महत्वाच्या पदांवर कार्य.

पुरस्कार :- आय.पी.एस.प्रशिक्षणाचे काळात खेळ आणि शौर्य याकरिता सुवर्ण चषक. सेवाकाळात ४ राष्ट्रपती पुरस्कार, एशियाडमधील कामगिरीबद्दल दोन पुरस्कार. क्रिकेट आवडता खेळ. त्यासाठी जगातील देशात प्रवास. क्रिकेट हा खेळ विद्यापीठ आणि राज्यपातळीवर खेळले.

निवृत्तीनंतर :- नवजीवन संस्थेच्या वतीने तरुण तरुणींची साहस शिबिरे आयोजित करतात. चिखलदरा येथे निवासी शाळा चालवतात. अखंड कार्यरत अमरावतीच्या सुप्रसिध्द जोग चौक आजोबांनी नूतन विदर्भ शिक्षण मंडळ, व्यायाम शाळा, टॉवर, मारुती व धमार्थ दवाखाना यांना अर्पण केला. मा.सूर्यकांत आजोबांची परंपरा चालवून निवृत्त जीवन समाज सेवेत वाहून अमरावती हीच कर्मभूमी ठेवून कार्यरत आहेत

प्र.वा.जावरकर

यांचा जन्म ३१ जुर्ले १९३८ रोजी झाला. वऱ्हा येथे सामान्य कुटूंबात जन्म झाला. घरची विलक्षण गरिबी वर्ग ७ पर्यंत शिक्षण झाल्यावर शिक्षण बंद करावे लागले. हॉटेल, खाणावळ, चित्रपट गृह, अशा ठिकाणी नोकरी करावी लागली. पुढील शिक्षण अमरावती व नागपूर येथे झाले. पण तेहि अपूर्णच राहिले. पोट भरायासाठी मुंबईला गेले. मध्यंतरी काही काळ महाराष्ट्राचे मुख्यमंत्री राहिलेले श्री.मनोहर जोशी यांच्या कुटुंबात आश्रय मिळाला. फार उत्तम संस्कार घडले. मुलासारखी वागणूक मिळाली. वाचन लिखाणाची गोडी लागली. थोरा मोठ्यांचे दर्शन घडले. जागतिक कीर्तीचे स्वाध्यायी पांडुरंग शास्त्री आठवले यांचा गुरुमंत्र लाभला. साने गुरुजींच्या पुस्तकांनी जीवन विषयक तत्वज्ञान घडले. ध्येयवाद निर्माण झाला.

संयुक्त महाराष्ट्र आंदोलनात भाग घेतला. त्यामुळे सेनापती बापट, आचार्य अत्रे, एस.एम.जोशी, मामा पेंडसे, न.र.फाटक, आप्पा पेंडसे, इ. चे विचार मिळाले. घरच्या आठवणीने व ओढीने अमरावतीस परत आले. पुन्हा अभ्यास सुरु केला. शिक्षण व्यावसायिक प्रशिक्षण घेतले. व धानोरा (गुरव) येथे प्राथमिक शाळेत शिक्षक बनले. इ. १९६३ पासून अमरावती जनगरपालिकेच्या प्राथमिक शाळेत नोकरी मिळाली.

अमरावतीला महर्षि डॉ.शिवाजीराव पटवर्धन, यांच्या सहवासात राहिले. दाजीसाहेबांनी त्यांना अनेक ग्रंथांच्या प्रकाशन कार्यात सहकार्य दिले. साह्य केले. प्रेरणा दिली. इ. १९७४-७५ मध्ये पुण्याचे श्री.बेडेकर गुरुजी यांनी सानेगुरुजींच्या चाहत्यांचा मेळावा भरविला. सानेगुरुजी कथामाला सुरु केली. त्यात श्री.जावरकरांनी 'साने गुरुजी जीवनगाथा' नावाचा ग्रंथ लिहून दिला. त्याच्या प्रकाशनासाठी क्रांतिकारक शिरुभाऊ लिमये अमरावतीस आले होते. शंकरलालजी माधान हेहि आले होते. गणेशराव पाटील यांच्या सहवासात मागासवर्गीय जनतेच्या उत्थानाचे कार्य केले. त्यांची सेवा लक्षात घेऊन १९७६ ते १९७९ पर्यंत श्री.जावरकर यांना मानद दंडाधिकारी नेमण्यात आले. १९७९ पासून बालविकास कार्यात सहभागी झाले. अनेक बाल रुग्णांना सहाय्य केले. त्यासोबतच हृदय विकाराने ग्रासलेल्या गरीब रुग्णांना आर्थिक साह्य मिळवून देणे हे ध्येय ठरविले. कार्यात अडथळा येऊ नये म्हणून बारावर्ष अगोदर सेवानिवृत्ति स्वीकारली.

इ.१९९९ पर्यंत एक लाख लोकांनी ह्या संस्थेला भेट दिलेली आहे. पाच हजार रुग्णांशी संपर्क प्रस्थापित केला. त्यापैकी दोन हजार हृदयरुग्ण व बालरुग्णांना आर्थिक साह्य मिळवून दिले आहे. ''सदा जे आर्त अति विदक, जयांनी गांजिती सकळ। तया जाऊन उठवावे। जगाला प्रेम अर्पावे।'' (सानेगुरुजी) ह्या वचनानुसार जावरकर कार्यरत आहेत. त्यांचा जीवनदान महायज्ञ सुरु आहे. त्यासाठी ''मानव सेवासंस्था अमरावती '' नावाची संस्था सुरु केली आहे. ही पंजीबध्द संस्था आहे.

संस्थेची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे :-

१) रुग्णांसाठी रक्तदान दात्यांना रक्तदाबासाठी प्रवृत्त करणे. व त्यांना आवश्यकता असलेल्या ठिकाणी पाठविणे.

२) रुग्णशिबीर आयोजित करुन आलेल्या रुग्णांची विनामूल्य सर्व तपासणी.

३) कुष्ठरोगी शोधून काढून त्यांना उपचारासाठी पाठविणे.

४) अत्यंत गरीब रुग्णांचे पुनर्वसन करण्यास साह्य करावे.

५) दलित समाजातील मुलगी/युवती यांना दत्तक घेऊन तिच्या शिक्षणाची व्यवस्था लावून देणे.

६) कुष्ठमुक्त, अपंग युवक युवतींच्या विवाहास उत्तेजन व साह्य.

७) आंतर जातीय, आंतर धर्मीय विवाहास उत्तेजन.

८) संस्कार क्षम वाङ्मय प्रकाशित करुन वाचनालयांना पुरविणे.

९) औषधांची पेढी चालवून, लोकांना घरातील चालू उपयोगी औषधे वृध्दाश्रमांना देण्यास प्रेरणा देणे.

याप्रमाणे सामान्य तळागाळातील माणूस केवढे मोठे कार्य तडीस नेऊ शकतो, ह्याचे हे उत्तम उदाहरण आहे.

(आधार - मानव सेवा स्मरणिका . १९९६)

एक परखड व्यक्तीमत्व डॉ.अरुण मराठे

डॉ.अरुण मराठे यांचे अग्रलेख वाचल्यानंतर असे वाटते की या माणसावर सरस्वती प्रसन्न आहे. त्यांचे लेख अतिशय तळमळीने आणि सामाजिकतेने भान ठेऊन लिहिलेले असतात. त्यांच्या वरील लेख वाचेपर्यंत ते एक मेडिकल ऑफीसर होते याची मला मुळीच कल्पना नव्हती. ते मराठी भाषेचेच आचार्य असावेत अशी माझी धारणा होती. आपल्या स्व.वडीलांच्या इच्छेनुसार त्यांनी नोकरी सोडून प्रेसमध्ये काम पाहण्यास सुरुवात केली. ''साधी राहणी आणि उच्च विचारसरणी'' याचे ते एक चालते - बोलते प्रतीक आहेत. 'अशक्य' हा शब्द त्यांच्या शब्दकोषात नाही. अतिशय जिद्दीने ते आपले काम परिस्थितीवर मात करुन पूर्ण करतात. त्यांचे अग्रलेख अतिशय वाचनीय असतात. उत्कृष्ट पत्रकारितेबद्दल त्यांना ''दर्पण पुरस्कार'' देऊन गौरविण्यात

आले.

'भले तरी देऊ कासेची लंगोटी
नाठाळाचे माथी हाणू काठी '

असा त्यांचा बाणा आहे. आपले विचार ते परखड शब्दात मांडतात. कुठल्याही बंधनाखाली किंवा दबावाखाली ते लिहित नाही. ''मोडेन पण वाकणार नाही'' अशी त्यांची वृत्ती आहे. स्वार्थापेक्षा समाजाचे हीत त्यांना अधिक महत्वाचे वाटते. सत्यासाठी झगडणे हा त्यांचा स्वभावधर्म आहे. त्यामुळे अनेक लोकांना ते कठोर किंवा रागीट वाटतात पण ते नारळासारखे वरुन टणक आणि अंर्तयामी प्रेमळ आहेत. त्यांचा मित्र परिवार मोठा आहे. वर्षातून एकदा - दोनदा तरी सर्वांनी एकत्र यावे. आपण एकत्र भोजन करावे अशी त्यांची इच्छा असते आणि त्यासाठी मग ते कुठलेतरी निमित्त शोधीत असतात.

स्वातंत्र्यासाठी तुरुंगवास भोगणाऱ्या देशभक्त स्व.बाळासाहेबांचे पुत्र आजही त्यांचा वारसा चालवीत आहेत. भारतीयांची संस्कृती टिकवून ठेवण्यासाठी धडपडत आहेत. ज्यांच्या अंगी कला आहे. गुण आहे अशा तळागाळातील लोकांना देखील प्रोत्साहन देऊन वर आणीत आहेत. अमरावती जिल्ह्यातील साहित्यिकांना वर आणण्याचे व थेट मुंबई-पुण्यापर्यंत नेऊन पोहचवण्याचे कार्य दै.हिंदुस्थानच्या संपादकांनी केले हे कुठलाही मोठा साहित्यिक मान्य करील. माणूस कितीही मोठा झाला तरी त्याला बोट धरुन चालण्यास शिकविणारी आई ही त्याच्यासाठी श्रेष्ठच असते. साहित्यिक आणि दै.हिंदुस्थानाचे संपादक यांचे असे हे माय - लेकराचे नाते पूर्वापार चालत आले आहे. त्यांच्या जवळ आलेली व्यक्ती मग ती कुठल्याही जातीची असो, धर्माची असो हिंदुस्थान परिवारातील एक सदस्य बनून जाते. माणसे जोडण्याची ही किमया डॉ.अरुण यांनी कुठे प्राप्त केली कोणास ठाऊक ? अमरनाथ यात्रेच्या वेळी ते तिकडे अडकून पडले असता लाखो लोक त्यांच्यासाठी ईश्वरास प्रार्थना करीत होते. यात्रेवरुन परत आल्यावर त्यांनी त्यांचे जे अनुभव लिहिले ते प्रवास वर्णनाचा एक दर्जेदार, उत्कृष्ट नमुना होते.

श्रीमती मुक्ता मधुकर केचे, 'दुर्गा' राठीनगर, अमरावती.

अष्टपैलू व्यक्तिमत्व डॉ.गोगटे

जन्म आणि मृत्यू हा तर निसर्गाचा नियमच आहे. जन्माला आलेल्या प्रत्येक व्यक्तीला मृत्यूला सामोरे जावेच लागते. काळ कोणासाठी थांबत नाही, निसर्ग आपले नियम पाळतच असतो, परंतु अष्टपैलू असते. अशाच अष्टपैलू व्यक्तीमत्वाचे आयुर्वेदाचार्य म्हणजे अमरावती येथील प्रसिध्द डॉ.त्र्यंबक महादेवराव उर्फ नानासाहेब गोगटे होत.

४ ऑगस्ट १९१३ साली ठाणे जिल्ह्यातील अशगड या गावी वैद्याच्या घराण्यात त्यांचा जन्म झाला. आठ भाऊबहीणीत चौथा नंबर असलेले डॉ.गोगटे गाव लहान व मोठे कुटूंब त्यामुळे परिस्थिती बेताचीच होती. माध्यमिक शिक्षणानंतरचे शिक्षण पुण्याला दुरच्या बहिणीकडे राहून त्यांनी पूर्ण केले. परंतु तेथे त्यांना पूर्ण कामे करावी लागत असे १९३४ साली त्यांनी आपली आयुर्वेद पदवी अहमदनगर येथे घेतली. शिक्षणानंतर नोकरी करावी अशी त्यांच्या वडीलांची इच्छा होती पण त्यांना नोकरीमध्ये रस नव्हता. त्यांना आयुर्वेदाचा गाभा म्हणजे पंचशोधन या क्रिया व्दारे उपचार करावयाचा होता. त्यासाठी ते सोलापूर येथे गेले. तेथील आयुर्वेद सेवा संस्था येथे त्यांनी नोकरी केली तेथे त्यांनी पंचशोधन क्रिया (शुध्दी) व्दारे रुग्णावर उपचार केला पण त्याच काळात वडील आजारी असल्यामुळे त्यांना जव्हार गावी परतावे लागले. तीन महिने वडिलांची सेवा करण्याचे भाग्य त्यांना लाभले. स्वत:च्या कर्तबगारीवर त्यांना फार विश्वास होता, म्हणूनच त्यांनी वडिलांच्या निधनानंतर त्यांच्या संपत्तीतील एकही पैसा न घेता स्वत:च्या कर्तृत्वबावर सर्व मिळविले. त्यानंतर डॉ.गोगटे आर्य समाजातर्फे लाहोरला गेले. तेथे त्यांनी ८ रु. प्रति महिन्याने डोअर किपरची नोकरी केली. तेथे त्यांनी डेन्टिस्टचे शिक्षण घेतले. डॉ.गोगटे लाहोराहून पुन्हा सोलापुरला नोकरीसाठी परतले तेव्हा त्यांना आयुर्वेद सेवा संस्थेतर्फे अमरावतीस नोकरीसाठी पाठविले. अमरावतीला आले तेव्हा त्यांचा कोणाशीही परिचय नव्हता. परंतु त्यांच्यातील असलेल्या बौद्धिक गुणामुळे कालांतराने अमरावती येथेच जिल्हास्तरीय डॉक्टर म्हणून त्यांची निवड झाली. त्यांनी आपल्या कारकिर्दीत आयुर्वेद शुध्दी व

अनस्थेशिया यावर फार मोलाचे काम केले. डॉ.गोगटे आयुर्वेदाचार्य तरीही त्याची अमरावती येथील इर्विन हॉस्पिटलमध्ये ॲनेस्थेसिष्ट म्हणून निवड केली गेली, ते प्रथमच असे डॉ.होते की अलोपॅथीचे डॉ.नसूनही त्यांची निवड केल्या गेली.

माणसाच्या जीवनात सर्वात मोठा गुण म्हणजे माणुसकी होय. माणुसकी नसेल तर जीवनाला अर्थच नसतो. डॉ.गोगटे गरीबांचे कैवारी होते. एकेदिवशी त्यांच्याकडे एक अनाथ मुलगा आला त्याला स्वत:च्या घरी ठेवून मुलाप्रमाणे वागविले व शाळेत घातले. आयुर्वेदिक पदवी पर्यंत शिकविले, हा अनाथ असलेला मुलगा म्हणजे अनंतराव होय. शेवटच्या क्षणापर्यत त्यांनी अनंतरावाची साथ सोडली नाही.

प्रत्येक कर्तबगार पुरुषाच्या मागे स्त्रीचा हात असतो. परंतु डॉ.ईशदयाताईच्या मागे डॉ.गोगटेंचा हात होता. त्याकाळात स्त्री शिक्षणाला फार महत्व नव्हते व लग्नानंतर फार कमी स्त्रिया शिक़त होत्या. डॉ.गोगटेंनी ईशदयाताईना नागपूरला एल.एम.पी. कोर्स करावयास लावला नंतर मुंबईहून डी.जी.ओ. केले. व अमरावती येथील त्यांनी प्रथम महिला डी.जी.ओ. हे पद भूषविले. शिक्षणामुळे त्या दोन्ही दाम्पत्यांना ७ वर्षे परस्परापासून दूर राहावे लागले. डॉ.गोगटे याचे गंमतीने वर्णन करतांना म्हणत, लग्नापूर्वीची सात वर्ष व नंतरची सात वर्ष असा प्रभू रामचंद्राप्रमाणे वनवास हा कुटुंब वत्सल वनवास होता. त्यांच्या सोबत सीतामाई होत्या. आमचे मात्र तसे नाही.

डॉ.गोगटे हे अभिजात कलावंत होते. वयाच्या ७ व्या वर्षी त्यांनी जव्हार संस्थानाच्या महाराजाचे चित्र काढले तेव्हा तेथील राजाने त्यांचा गौरवही केला. तेव्हा त्यांच्या वडिलांनी त्यांच्यातील चित्रकलेचा छंद पाहून जे जे स्कूल ऑफ आर्ट मध्ये ॲडमिशन देण्याचे ठरविले. परंतु घरच्या आर्थिक परिस्थितीमुळे डॉ.गोगटेंना तेथे प्रवेश मिळू शकला नाही. चित्रकलेचे शिक्षण नसूनही त्यांच्यातील कलेमुळे ते मोठे आर्टिस्ट म्हणूनही ओळखले जात. अहमदनगर येथील आयुर्वेद कॉलेजमध्ये श्री.धन्वंतरीचे भव्य तैलचित्र डॉ.गोगटे यांनी काढले आहे. कचऱ्यातून कला या उक्ती



डॉ. अरूण मराठे, संपादक

प्रमाणे त्यांनी स्वत: तयार केलेली शुभेच्छा पत्रे अनेकांना पाठविली आहे. अमरावतीत फार कमी व्यक्ती असतील ज्यांना डॉ.गोगटेनी शुभेच्छापत्र पाठविले नसेल. त्यांची इतकी शुभेच्छा पत्रे आहेत की त्यांच्या वयाच्या ७६ व्या वर्षी श्री.हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ येथे त्यांच्या चित्राचे प्रदर्शन गोविंद कासट व श्री.उल्हास मराठे यांनी भरविले होते. हीच परंपरा आज त्यांची मुलगी डॉ.सौ.वसुधा गुर्जर ह्या चालवीत आहेत. शेवटच्या क्षणापर्यत त्यांनी आपले काम चालूच ठेवले. इंग्लंडवरुन पदवी प्राप्त करुन आलेले त्यांचे जावई डॉ.प्रमोद गुर्जर यांना त्यांनी अतिशय सुंदर शुभेच्छा पत्र दिले.

माणसाचा स्वत:वर विश्वास असता तर त्याला कितीही संकट किंवा अपयश आले तरी तो त्यावर मात करतो. Success often comes to those who dare and act.

डॉ.गोगटे ह्यांच्या जीवनात असा एक प्रसंग आला. एका रुग्णाच्या मृत्यूप्रकरणी त्यांना गोवण्यात आले. प्रकरण न्यायालयात गेले परंतु त्यांना स्वत:च्या कर्तृत्वावर इतका विश्वास होता की त्यांनी शांतपणे आपली बाजू मांडून स्वत:वर लागलेले आरोप दूर केले. तसेच रशियातील इंडो सोवियट कल्चरल मॉडर्न ऑर्गनायझेशन सोसायटी तर्फे अमरावती येथील शाखेचे अध्यक्ष म्हणून त्यांची निवड झाली. परंतु जातांना अनेक अडचणी आल्या. निवड झाल्यानंतर त्यांची कागदपत्रे वेळेवर न मिळाल्याने निवड रद्द केली गेली. पण प्रयत्नवादी डॉ.गोगटे हे दुसऱ्या व्यक्तीच्या जागेवर रशियात गेले. मास्को येथील मेडीकल कॉलेजमध्ये कार्यक्रम झाला तेथे त्यांना शिक्षण क्षेत्रातील साहित्यीक आचार्य दोंदे यांनी व्याख्यान देण्यास सांगीतले. तेथील व्याख्यान इतके गाजले की त्यांच मॉस्को रेडिओवर व्याख्यान ठेवले गेले.

आयुर्वेदीक उपचारात पंचशाधन क्रिया त्यांनी रुग्णोपचारात आणली. अनेक पंचकर्मावर त्यांनी पुस्तके लिहिली. आयुर्वेद प्रचारासाठी त्यांनी परदेशात जावून भाषणे केली. अमेरिकेतील ब्राझील येथे महर्षि महेश योगी या मिशनरीने हेल्थ युनिव्हर्सिटी तर्फे त्यांना आयुर्वेद कामासाठी बोलावण्यात आले होते. इटाली, जर्मन, स्वित्झर्लन्ड,

डेन्मार्क येथे पंचकर्मावर त्यांनी प्रयोग केले.

१९७२ साली वेस्ट बंगालला कन्टाय कॉन्फरन्स झाली तेथे त्यांनी अध्यक्ष पद भूषविले. १९९१ ला महर्षी अण्णासाहेब पटवर्धन हा पुरस्कार पुणे येथे त्यांना मिळाला.

जीवन सर्वांगावे कसं जगावं याचं मूर्तीमंत उदाहरण म्हणजे डॉ.गोगटे उर्फ नानासाहेब होते. व्यवस्थितपणा व नियमितपणा इतका की समोरच्या व्यक्तीला ते नकळत प्रभावित करुन जात असत.

न थांबता, प्रामाणिकपणे आपले कार्य करणाऱ्या, अनेकांना सदिच्छा पत्रे पाठूवन त्यांचे मन आपलेसे करणाऱ्या डॉ.त्र्यं.म.गोगटे यांनी जगाचा निरोप घेतला. तो दिवस होता २६ नोव्हेंबर १९९८ त्यांच्याबाबतीत एवढेच म्हणावे लागेल. पंचकर्मातील स्नेह हरपला.

अशी पाखरे येती
आणिक स्मृती ठेऊनी जाती ॥

जया वा.जाधव, अंबिका नगर, अमरावती यांच्या सहकार्याने.

प्रा.बी.टी.देशमुख : अल्प परिचय

एका अत्यंत गरीब पण 'शुचीनाम' कुटूंबात बेलोरा, ता.चांदूरबाजार, जि.अमरावती येथे २१ ऑगस्ट १९३९ रोजी ज्नम. मेहनतीवर काम करुन स्वत:च्या शिक्षणासाठी स्वत:च्या मेहनतीने पैसे कमावून माध्यमिक, उच्च माध्यमिक, महाविद्यालयीन व पदव्युत्तर शिक्षण संपादन केले. शालेय व महाविद्यालयीन कळात वादविवाद स्पर्धेतून प्रभावी वादविवादपटू व वक्ता म्हणून 'महादेव गोविंद रानडे वक्तृत्व स्पर्धे' सारख्या प्रतिष्ठाप्राप्त स्पर्धेतून प्रथम पारितोषिकांचे मानकरी.

आर्थिक दुर्बलतेवर मात करुन समाजकार्य करण्याची जिद्द असल्याने १९६०-६१ च्या शैक्षणिक वर्षात अमरावतीच्या विदर्भ महाविद्यालयाच्या छात्र संघाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयात तत्कालीन शासनाकडून राज्यशास्त्र, इतिहास, संस्कृत व इंग्रजी या विषाचे पदव्युत्तर वर्ग आणि आणखी एक मुलींचे नवे भव्य वसतिगृह

मिळविण्यात सिंहाचा वाटा. नागपूर विद्यापीठ विद्यार्थी संघाच्या कार्यकारिणीचे १९६०-६१ मध्ये सदस्य, त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेचे व विद्याव्यासंगाचे फळ म्हणजे १९६४ साली राज्यशास्त्र विषयाच्या एम.ए. परिक्षेत नागपूर विद्यापीठातून त्यांनी प्राप्त केलेले प्रथम क्रमांकाचे स्थान.

१९६४ पासून कर्मयोगी शिक्षण महर्षी डॉ.भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांनी स्थापन केलेल्या अमरावतीच्या श्री.शिवाजी महाविद्यालयात प्राध्यापक म्हणून राज्यशास्त्राच्या अध्यापनास प्रारंभ. एक अत्यंत कुशल प्राध्यापक म्हणून लौकिक. ''भारतीय संविधान व स्वातंत्र्य आंदोलन'' या अभ्यासपूर्ण ग्रंथाचे १९६५ मध्ये लेखन. त्यांनी राज्यशास्त्र विषयावर लिहिलेली अनेक पुस्तके विद्यार्थ्यांच्या अतिशय आवडीची ठरली आहेत.

नागपुर विद्यापीठ सिनेट सदस्य, १९६९ ते १९८६, नागपूर विद्यापीठ कार्यकारिणीचे सदस्य, १९७६ ते १९८५, नागपूर विद्यापीठ ॲकॅडेमिक कौन्सिल सदस्य १९७९ ते १९८२, नागपूर विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्रे विद्याशाखेचे डीन (अधिष्ठाते) १९७९ ते १९८२, नागपूर विद्यापीठ राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे सदस्य १९६७ते १९७५. अमरावती विद्यापीठाच्या स्थापनेपासून (१९८३) १९९२ पर्यंत व १९९५ पासून पुन्हा आजतागायत कार्यकारिणीचे सदस्य म्हणून कार्य. अमरावती विद्यापीठाच्या स्थापनेपासून सिनेट सदस्य, सोशल सायन्स फॅकल्टीचे डीन (१९९२ ते १९९६) म्हणून कार्य, यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ नासिकच्या पहिल्या व्यवस्थापन मंडळाचे सदस्य (१९८९ ते १९९२). पंजाबराव देशमुखा कृषी विद्यापीठाच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य (१९८४ ते १९८६) व त्यानंतर पुन्हा १९९४ ते आजतागायत सदस्य.

संलग्न महाविद्यालयातून काम करणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांना ''नियमित वेतनाची व्यवस्था'' लागू करण्यासाठी १९७७ मध्ये शासनाने नेमलेल्या समितीचे सदस्य. अतिरिक्त शिक्षकांचे निर्धारण व समायोजन करण्यासाठी नागपूर विद्यापीठाने नेमलेल्या ''ॲडव्हाक कमेटीचे'' (१९७६) सदस्य म्हणून महत्वपूर्ण कार्य. अतिरिक्त शिक्षकांना संरक्षण देण्यासाठी योजना तयार करणाऱ्या राज्यस्तरीय

पाच सदस्यीय समितीचे सदस्य म्हणून अतिरिक्त शिक्षकांच्या दृष्टीने फार महत्वपूर्ण भूमिका.

नागपूर विद्यापीठ शिक्षक संघ (NUTA) या प्राध्यापक संघटनेचे १९७३-७४ पासून आजतागायत अध्यक्ष. महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाचे (MFUCTO) एक संस्थापक सदस्य, प्रारंभापासून आजतागायत महासंघाच्या कार्यकारी मंडळाचे सदस्य, १९९० ते १९९२ व पुन्हा १९९२ ते १९९४ पर्यत महासंघाचे अध्यक्ष म्हणून कार्य.

डिसेंबर १९८० मध्ये विदर्भ पदवीधर मतदार संघातून महाराष्ट्र विधानपरिषदेचे सदस्य म्हणून पहिल्यांदा निवड. डिसेंबर १९८६ मध्ये अमरावती विभाग पदवीधर मतदार संघातून विधानपरिषदेवर तिसऱ्यांदा निवड ही मतदारसंघाने दिलेली त्यांच्या कार्याची पावती ठरते.

डिसेंबर १९९६ मध्ये राष्ट्रकुल सांसदीय मंडळ महाराष्ट्र शाखेतर्फे महाराष्ट्र विधानपरिषदेतील पहिल्या ''उत्कृष्ट संसदपटू'' पुरस्काराचे मानकरी. राष्ट्रकुल संसदीय मंडळाच्या महाराष्ट्र शाखेच्या वतीने पाठविण्यात आलेल्या प्रतिनिधी मंडळाचे सदस्य या नात्याने ग्रेट ब्रिटन, बेल्जियम, फ्रान्स, नेदरलंड, स्वित्झर्लंड, जर्मनी या देशांच्या अभ्यास दौऱ्यात सहभाग. (२६ सप्टेंबर १९९७ ते १३ ऑक्टोबर १९९७) महाराष्ट्र विद्यापीठ कायद्याच्या (१९९४) विधेयकासाठी महाराष्ट्र विधानमंडळाच्या उभय सभागृहांनी नेमलेल्या संयुक्त चिकित्सा समितीचे सदस्य म्हणून महाराष्ट्र विद्यापीठ कायद्याच्या निर्मितीत महत्वाचे योगदान.

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या आश्वासन समितीचे १९८२ पासून आजतागायत सातत्याने सदस्यत्व. १९८९ मध्ये या समितीचे समिती प्रमुख म्हणून कार्य संचालन. या व्यतिरिक्त विधानमंडळाच्या ग्रंथालय समिती, नियम समिती, विशेषाधिकार समिती, उपविधान समिती इत्यादी समित्यातून बजावलेली महत्वपूर्ण भूमिका. विदर्भाच्या शैक्षणिक आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व अनुशेष विषयक प्रश्नांची विशेष जाण असलेला सांसद म्हणून लौकिक. अनुशेष विषयक प्रश्नांची

विवेचक व अभ्यासपूर्ण चर्चा विधानपरिषदेत घडवून समस्यांचे निराकरण करण्याची त्यांची हातोटी व कार्य बहुमोल, सर्वश्रुत, सर्वविदीत व प्रशंसनीय सिध्द झाल्याचा सर्वच प्रसारमाध्यमांचा एकमुखी निर्वाळा.

''अनुव्देगकरं वाक्यं सत्यं प्रियहितं च यत्! स्वाध्यायाभ्यासनं चैव''

(हितार्थ बोलणे सत्य, प्रेमाने न खुपेलसे, स्वाध्याय करणे नित्य) या बाण्याने आपल्या वाणीच्या सामर्थ्याने इप्सित लक्ष्य टिपणारा एक सुदूरदृष्टीचा आमदार म्हणून सर्वदूर मान्यता. एक अत्यंत अभ्यासू सांसद, प्रभावी वक्ता, आणि उत्कृष्ट संघटक म्हणून महाराष्ट्रभर लौकिक.

शेख वझीर पटेल

शेख वझीर पटेल यांचा जन्म दि. १ जुर्ले १९४० रोजी अमरावतीस झाला. यांच्या वडीलांचे नाव शेख नझीर पटेल असे आहे. शेख वझीर पटेल उर्दूमध्ये एम.ए. पर्यंत शिकले. तसेच मुंबईच्या भारतीय विद्याभवन च्या वतीने संस्कृत परीक्षा देण्यात येतात. त्यापैकी शेख वझीज पटेल हे संस्कृत कोविद परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत. नागपूर विद्यापीठातून वाचनालय व्यवस्थापन ह्या विषयात त्यांनी प्रशस्तिपत्र मिळविले आहे. व केशरबाई लाहोटी महाविद्यालयाच्या वाचनालय विभागात त्यांनी सेवानिवृत्ती पर्यंत कार्य केले.

युवा मुस्लिम सामाजिक संघटनेचे ते सचिव होते. महाराष्ट्र शासनाच्या राष्ट्रीय एकात्मता समितीचे सदस्य आहेत. मदू (इंदूर, मध्यप्रदेश) येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाजशास्त्र राष्ट्रीय संस्थेचे ते सभासद आहेत. मध्यवर्ति रेल्वेच्या सल्लागार समितीवर सभासद आहेत. अमरावती येथील पोस्टल फोरम चे सभासद आहेत. मुंबईच्या कुटूंब नियोज़न व वैद्यकीय सहाय्यता विश्वस्त मंडळाचे सभासद आहेत. सुविख्यात उर्दु साप्ताहिक ''बाग पान'' ह्याचे ते संपादक आहेत. त्यांनी शिक्षण क्षेत्रात कार्य केले आहे. मुस्लिम शाळा संघटनेचे सक्रिय सभासद आहेत. मुस्लिम सत्यशोधक समाजाचे नेते आहेत. ते स्वत: उर्दु शिक्षण संस्थेचे संस्थापक आहेत व ही संस्था चालविण्याचे श्रेय त्यांच्या कडेच जाते. मुस्लिम समाजात कुटूंब नियोजन योजना

लोकप्रिय करण्याचे श्रेय त्यांच्याकडे जाते. कुटूंब नियोजनाचा प्रचार करुन त्यांनी आजवर सुमारे पंधरा हजार मुस्लिम स्त्री पुरुषांवर शस्त्रक्रिया करविली आहे. तलाक पिडित एक हजार महिलांचे पुनर्वसन करण्यास साह्य केले आहे. तसेच त्यांना रोजगार मिळवून देऊन आर्थिक दृष्टीने स्वावलंबी बनविले आहे.

शेख वझीर पटेल सर्वधर्म समभावाचे निष्ठावंत पुरस्कर्ते आहेत. त्यांच्या मुस्लिम वसाहतीत ते दरवर्षी श्री शिव जयंति संपन्न करतात. त्यांच्या बागवान वृत्तपत्रातून ते पुरोगामी, सुधारणावादी, विचार प्रस्तृत करुन, मुस्लिम समाजाला मुख्य राष्ट्रीय प्रवाहात सामील होण्याचे आवाहन करीत असतात. ह्या पायी कडच्या लोकांनी त्यांच्यावर तलवारीने हल्ला केला होता. सध्या ते पोलीस संरक्षणात वावरत असतात. मुस्लिम स्त्रियांसाठी प्रसूतिगृह, कुटूंब कल्याण केंद्र, सार्वजनिक वाचनालय, तलाक पीडित मुस्लिम महिला पुनर्वसन व लघु उद्योग प्रशिक्षण केंद्र आणि टंकलेखन केंद्र (गरीब मुस्लिम महिलांसाठी) चालवीत आहेत. अंधत्व निर्मुलन योजनेत त्यांनी सुमारे एक हजार अंधावर शस्त्रक्रिया घडवून आणल्या आहेत. सुमारे चौदा हजार बालकांना पल्स पोलीओ योजनेअंतर्गत लस टोचण्याचे कार्यात साह्य केले आहे. गरीब झोपडपट्टीत राहणाऱ्या अकराशे महिलांच्या बाळंतपणात साह्य मिळवून दिले आहे. त्यांच्या कामगिरी प्रीत्यर्थ त्यांना इंदिरा गांधी राष्ट्रीय पारितोषिक, इ. १९९० चे एफ आय इ (फाय) पारितोषिक, महाराष्ट्र शासनाचे कुटूंब कल्याण योजना पारितोषिक वर रोटरी इंडिया अवार्ड, (१९९३) ही पारितोषिके, पुरस्कार व सन्मान प्राप्त झाले आहेत. रोटरी इंडीया अवार्ड नवी दिल्ली येथे दि. ४.२.१९९४ रोजी भारताच्या सर्वोच्य न्यायालयाच्या प्रधान न्यायमूर्तीच्या हस्ते प्राप्त झाले होते. शेख वझीर पटेल यांच्या राष्ट्रीय प्रवाहात सामील होण्याच्या उपक्रमाचा पुरावा म्हणजे स्वत: विश्व हिंदू परिषदेचे अधिकृत सभासद झाले होते.

दांभिकतेचा तिटकारा, मनमिळाऊ स्वभाव, हरप्रमारे साह्य करण्याची प्रवृत्ति यामुळे ते खूप लोकप्रिय आहेत. त्यांच्या घरी गेलो तर आतील बैठकीपर्यत प्रवेश मिळू शकतो. एवढेच नव्हे तर घरातील महिलांशी ते ओळख करुन देतात. त्यांच्या कुटूंबातील सर्व मंडळींना सामाजिक कार्याची आवड व तळमळ आहे.

परिशिष्ट ३ (ब)

अमरावतीतील कर्तबगार महिला :-

कर्तृत्वाच्या बाबतीत अमरावतीतील महिला कुठेहि कमी पडल्या नाहीत. परंतु दुर्देवाने एक लेडी यशोदाबाई जोशी (माझा जीवन प्रवास) वगळल्या तर, कोणत्याहि महिलेने आत्मचरित्र लिहिले नाही. तव्दतच त्यांचे चरित्र कोणीही लिहिले नाही. त्यामुळे, काही व्यक्तींची चरित्रे काही संस्थांचे विशेषांक यांच्या आधारे हे टिपण तयार करावे लागत आहे. अनेक व्यक्तींच्या कुटूंबियांच्या कडून माहिती मागविली. व तेथून मिळाली तेवढी देता आली. ज्या आदरणीय महिलांची माहिती देता आली नाही. त्याबद्दल क्षमायाचना करणे एवढेच माझ्या हाती आहे. येथे फक्त सामाजिक व राजकीय क्षेत्रात कार्य करणाऱ्या उल्लेखनीय महिलांचा अथवा त्यांच्या कार्याचा त्रोटक परिचय देत आहे. साहित्य, नाट्य, काव्य, धार्मिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या, कलाकार, कलावंत, सांस्कृतिक क्षेत्रातील महिला यांचा परिचय त्या त्या परिशिष्टात दिला आहे.

अमरावतीतील कर्तबगार महिलांचा उल्लेख करताना सर्वप्रथम लेडी यशोदाबाई जोशी यांचे नाव घ्यावे लागेल. साताऱ्याचे श्री.अभ्यंकर यांच्या घरी यशोदाबाईचा जन्म इ. १८६८ साली झाला. सातारच्या छत्रपतींच्या कडे श्री.अभ्यंकर दफ्तरदार होते. वयाच्या दहाव्या वर्षी इ. १८७८ मध्ये त्यांचा विवाह श्री.मोरोपंत जोशी (अण्णासाहेब) यांच्याशी झाला. मोरोपंत जोशांचे मूळ घराणे पावसचे. छत्रपति शिवाजी महाराजांनी त्यांना पावसहून साताऱ्यास आणले. जोशी पणाची वंशपरागत वृत्ति दिली. इनाम करुन दिले. हे फार विव्दान घराणे होते. घरी यज्ञकर्म असल्यास स्वत:च पौरोहित्य करीत असत. अण्णासाहेबांचा जन्म ई. १८६१ साली झाला. त्यांचे वडील विश्वनाथ पंत जोशी अमरावतीच्या हायस्कुलात शिक्षक होते. विवाहनंतर मोरोपंत व यशोदाबाई अमरावतीस आल्या. मुंबईत काही काळ राहिल्या इ. १८८३ साली अण्णासाहेब वकीलीची परीक्षा उत्तीर्ण झाले. व भुसावळला अमरावतीस वकीली सुरु केली यशोदाबाईंना जेमतेम लिहिता वाचता येत होते. पण अण्णासाहेब यांनी त्यांना वाचन करण्याची, लिहिण्याची गोडी निर्माण केली. कॉंग्रेसच्या स्थापनेच्या

हा कालखंड होता. अण्णासाहेब वेगवेगळ्या विषयांवर लोकांशी चर्चा करीत. यशोदाबाईंना त्यात गोडी वाटू लागली. व त्यांच्या सर्व कामात त्या साह्य करु लागल्या. अशा प्रकारे त्यांच्या सार्वजनिक जीवनाचा पाया उभारल्या गेला. बघता बघता राजकीय क्षेत्रातील कामे अण्णासाहेबांनी आणि स्त्रियांच्या उन्नतीसाठी कामे सौ.यशोदाबाईंनी करावी, असा अलिखित संकेत ठरला. अनेक वर्षांनी त्या माहेरी गेल्या तेथील बायकांशी हळूहळू कुजबुजत गोष्टी व्हायच्या. स्त्रियांच्या असहाय्य अवस्थेची चर्चा वाढे. त्यामुळे स्त्री विषयक चळवळ उभारण्याचा त्यांचा मनोदय दृढमूल होत गेला. पुण्याला महाबळेश्वरला, मुंबईला त्याकाळातील अनेक नामवंत, कीर्तिमान व्यक्तींशी मोरोपंताचा परिचय घडून आला व सोबतच सौ.यशोदाबाईंचीही त्या व्यक्तींशी ओळख झाली. त्यापैकी न्या.रानडे, डॉ.भांडारकर, डॉ.भाटवडेकर, धोंडो केशव कर्वे, इ. मंडळी होती. विचारांची आदान प्रदाने झाली. पंडिता रमाबाई; त्यांचे दर्शन झाले. बाळ गंगाधर टिळक, गोपालकृष्ण गोखले, शि.म. परांजपे, दादाभाई नौरोजी भेटत. सौ.यशोदाबाईंना अण्णासाहेब सोबत नेत असत. त्यामुळे त्यांना अनेक अनुभव प्राप्त झाले. विभिन्न राजकीय मते असूनहि सर्वांशी हसत खेळत बोलण्याची सवय लागली. हाच अनुभव त्यांना अमरावतीतही आला. दादासाहेब चिटणीस, माधवराव दामले, अनगळ वकील, भाऊसाहेब मुंडले, काळे वकील, दादासाहेब खापर्डे, रावबहादुर मुधोळकर, वगैरे मंडळीपैकी कोणी जहाल, तर कोणी मवाळ खूप कडाक्याचा वाद चाले. हा वादविवादाचा रंग आणि खेळ संपला की, सगळे एकमेकांशी प्रेमाने वागत. खेळीमेळीने वागत. हे सर्व पाहून सौ.यशोदाबाईंचे मन विशाल व व्यापक बनत गेले. इ. १८८९ मध्ये नव्या बंगल्यात रहावयास गेल्यापासून सुधारणांना प्रत्यक्ष आचरणात आणण्याचा उपक्रम सुरु झाला. उदाहरणार्थ, सायंकाळी, पहाटे जोडीने फिरावयास जाणे, पायात बूट घालणे, इ. त्यांच्या घरासमोरच 'होली क्रॉस' ज्ञानाचे प्रार्थना मंदिर होते. फ्रेंच बाया ते चालवीत असत. त्यांच्याकडे रोज जाऊन त्या इंग्रजी वाचन , लेखन, संभाषण, शिवण काम, अन्य कलाकुसरीची कामे शिकू लागल्या. चूल, मूल, गृहकर्तव्ये सांभाळूनहि लोकसेवेची कामे उत्तम करता येतात. हे त्या सिस्टर सूझन कडून शिकल्या. दादासाहेब



ताराबेन मशरूवाला

चिटणीस यांच्या सहाय्याने त्यांनी 'वनिता समाज' नावाची संस्था सुरु करण्याचे ठरविले. सुरुवातीस बायका गोळा व्हावयास ह्या आणि स्वदेशीच्या प्रतीच्या प्रसारासाठी वऱ्हाडभर हौस करुन भाषणे दिली. मुलाच्या मुंजीसोबत त्यांनी अकरा गरीब ब्राह्मण मुलांच्या मुंजी लावून दिल्या. आपल्या मुलींना त्यांनी पुष्कळ शिकविले. एक डॉक्टर झाली. एक मुलीला शिक्षणासाठी विलायतेला पाठविले. त्या सायकल चालवू शकत. त्यांना उत्तम घोडेस्वारी अवगत होती. आणि टेनिस बॅडमिंटन खेळत असत. त्यांच्या मुलामुलींना देखील त्यांनी हे खेळ खेळण्यास उत्तेजन दिले. पण धार्मिक व सात्विक वृत्ती मुळे त्यांचे आध्यात्माकडे लक्ष होते. त्यांनी माधवनाथ महाराजांचा उपदेश घेतला. इ. १९३१ साली अमरावतीस वनिता समाजतर्फे विदर्भ महिला परिषद सौ.यशोदाबाई च्या पुढाकाराने भरली. त्याचवेळी अखिल भारतीय महिला परिषदेच्या अमरावती शाखेची स्थापना झाली. इ. १९३३ साली त्यांना हृदयविकाराचा झटका आला. व प्रकृति अशक्त झाली. इ. १९४३ साली वनिता समाजाने त्यांचा ७५ वा वाढदिवस थाटात संपन्न केला. दि १६.१.१९४८ रोजी त्यांचे देहावसान झाले.

परिशिष्ट ३ (ब)

अमरावतीतील कर्तृत्वशाली महिला :-

१) सौ.यशोदाबाई जोशी - वनिता समाज.

२) सौ.लक्ष्मीबाई खापर्डे - महिला काँग्रेसची स्थापना.

३) सौ.ताराबाई पाध्ये - शारदाउद्योग मंदिरची स्थापना.

४) सौ.दुर्गाताई जोग - सामाजिक कार्य. काँग्रेस कार्यकर्ता संयुक्त महाराष्ट्राच्या आंदोलनात सहभाग.

५) सौ.दुर्गाताई जोशी - सामाजिक कार्य काँग्रेस कार्यकर्ता.

६) सौ.मधुताई साने - सामाजिक कार्य, काँग्रेस कार्यकर्ता, वीरवामनराव दादांची कर्तबगार कन्या

७) सौ.गिरीजा बाई सोमण - संयुक्त महाराष्ट्र आंदोलन, राष्ट्रसेविका समिती., राष्ट्रभाषा हिंदी चा प्रचार.

८) सौ.आशा वाटाणे - संयुक्त महाराष्ट्र आंदोलन, काँग्रेस कार्यकर्त्या.

९) सौ.नलिनी लढके - दलित मित्र पुरस्कार.

१०) सौ.नलिनी लिमये - राष्ट्रसेविका समितीचे संघटन.

११) सौ.सखुताई भट - काँग्रेस कार्यकर्ता.

१२) श्रीमती.चंद्राताई पटवर्धन - काँग्रेस कार्यकर्ता.

१३) सौ.मनूताई खापर्डे - थि ऑ सॉफिस्ट, गोपाल कृष्ण मंदिर, अमरावती ची स्थापना.

१४) सौ.प्रभावती जोशी - निरंतर धार्मिक सण, समारोह, उत्सव, व्रत्ते.

१५) सौ.पार्वतीबाई पटवर्धन - थिऑसॉफिस्ट, कॉग्रेस कार्यकर्ता, कुष्ठरोग्यांची सेवा.

१६) डॉ.सौ.माणिक पाटील - संस्कृत व मराठी दोन विषयात पी.एच.डी. समाजसेवा , लेखिका.

१७) सौ.सुंदराबेन पटेरिया - इ. १९४२ च्या आंदोलनात सक्रिय सहभाग.

१८) सौ.विमलाबाई देशमुख - खासदार, काँग्रेसचे कार्य.

१९) सौ.प्रतिभा पाटील - आमदार; खासदार. महाराष्ट्रात मंत्रि, काँग्रेस कार्यकर्ता.

२०) सौ.चंद्रप्रभा बोके - शारदा उद्योग मंदीर, काँग्रेस कार्यकर्ता, समाजसेवा.

२१) सौ.उषाताई चौधरी - आमदार; खासदार

२२) सौ.विद्या देशपांडे - महापौर, सामाजिक कार्य.

२३) सौ.किरण महल्ले - महापौर, महा.भा.ज.पा. च्या महिला आघाडी प्रमुख.

२४) श्री.संत ताई महाराज - आजन्म गोपालकृष्ण भगवान ची निरंतर सेवा.

२५) कु.मंदाकिनी गंधे - गणितज्ञ, कीर्तनकार; प्रवचनकार.

२६) सौ.शारदा अनगळ - नगरसेवक, संयुक्त महाराष्ट्र आंदोलन, सामाजिक कार्य.

२७) सौ.येसूमाई निमदेवकर - हिंदू महासभा कार्यकर्ता, संयुक्त महाराष्ट्र आंदोलनात सहभागी. समाजसुधारक.

२८) श्रीमती टिकेकर - हिंदू महासभा कार्यकर्ता, समाजसेवा.

२९) सौ.शांताबाई भट - बनिता समाजच्या सातुर्णा शाखेसाठी भूखंड दान दिला. समाजसेवा महिलांसाठी, गरीब मुलांसाठी समाज कार्य.

३०) राधाबाई बापट - स्वदेशीचा प्रचार, हिंदुसभेच्या कार्यकर्त्या, जंगल सत्याग्रहातील सत्याग्रही.

३१) कांताबेन राव - काँग्रेस कार्यकर्त्या, १९३० च्या सत्याग्रहात सहभाग, नगर काँग्रेसच्या अध्यक्ष. १९४१ च्या दंग्यात महिलांच्या रक्षणासाठी झटल्या. १९४२ च्या आंदोलनात शिक्षा भोगली.

३२) रमाबाई बालिंगे - राष्ट्रीय स्वरुपाची नाटके बसवून जनजागृति केली. फॉरवर्ड ब्लॉकच्या कार्यकर्त्या मुलींना कवायती शिक्षण देत असत.

३३) राधाबाई जोशी - वीर वामनराव दादांच्या धर्मपत्नी हिंदबाला मेळावा च्या संस्थापिका, वामनराव दादांच्या कार्यात सहकारी झाल्या.

३४) लक्ष्मीबाई देवधर - कार्यकर्त्या, निरनिराळ्या चळवळीत स्वत:च्या मुलींसोबत भाग घेत. आझादहिंद सेनेच्या लक्ष्मी दलाच्या अमरावती शाखेचे कार्य सांभाळत असत. गढवाल दिनात

सक्रिय सहभाग.

३५) शांती नाथ पिंजरकर - १९२३ च्या शस्त सत्याग्रहात, १९३० च्या जंगल सत्याग्रहात, १९४२ च्या सत्याग्रहात सहभागी झाल्या होत्या.

३६) प्रभावती बाळकृष्ण बेलसरे - १९४२ साली भूमिगत राहून क्रांति कारकांना साह्य केले.

३७) मालती जोशी - आमदार, काँग्रेस कार्यकर्त्या, संयुक्त महा.चळवळीत नेतृत्व, मुख्याध्यापिका व संस्थापिका वीर वामनराव जोशी विद्यालय, सामाजिक चळवळीत सहभाग.

अमरावतीतील महिलांचे कार्य :-

दि. ३.१२.१९१४ रोजी गणेश नाटक गृहात स्त्रियांच्या गायन वादनाचा जलसा झाला. या जलशाचे खर्च वजा जाता रु. ६००.०० उत्पन्न झाले. ते शहरातील आंधळे, पांगळे लोकांना थंडीचे निवारणार्थ उबदार कपडे देण्यासाठी खर्च करण्याचे जाहीर करण्यात आले. हा जलसा पुरुष वर्गाच्या मदतीची अपेक्षा न करता केवळ स्त्रियांनीच पार पाडला होता. व्यवस्था करणाऱ्या सर्व स्त्रियाच होत्या. बॅ. काणे यांच्या पत्नि सौ.इंदिराबाई काणे यांनी याप्रसंगी व्हायोलीन व मेंडोलीन वादन केले होते. दि मेल हायस्कूल व नॉर्मल स्कूल मधील मुलींनी काही गद्य पद्य मिश्रित संवाद करुन दाखवले. नंतर ईशस्तवन पद्याचे गायन होऊन हा कार्यक्रम संपला. (केसरी दि.८.१२.१९१४). अमरावतीचा इतिहास खंड (१ व २) मध्ये हा परिच्छेद आला आहे. स्त्रियां संबंधीचा हा ह्या पुस्तकातील पहिलाच उल्लेख. परंतु स्त्री जागृतिचा हा संक्रमणाचा काळ होता. आणि येथील स्त्रियांनी सार्वजनिक कार्यक्रमात भाग घ्यावयास सुरुवात केली होती हे यावरुन दिसते. दि. १ ऑगष्ट १९२० ला लोकमान्यांचे देहावसान झाल्यावर अमरावतीत शोककळा पसरली. ९ तारखेला लोकमान्यांच्या चौरंगाची जंगी मिरवणूक निघाली. मिरवणुकीत दीडशे स्त्रियांनी भाग घेतला होता. आणि दि. २२ ऑगष्टला

स्त्रियांची शोकसभा झाली. सौ.लक्ष्मीबाई खापर्डे त्या सभेच्या अध्यक्षस्थानी होत्या. आणि सभेत सौ.शेवडे, सौ.पार्वतीबाई पटवर्धन, सिंधुताई गोळे यांची भाषणे झाली.

दि. २० ऑक्टो. १९२० रोजी सौ.ताराबाई मोडक यांचे असहकारिता याविषयावर श्री.भाऊसाहेब असनारे यांच्या अध्यक्षतेखाली भाषण झाले. दि. २८.२. १९२१ रोजी सौ.पटवर्धन, कु. चंद्राताई शेवडे यांची गणेशविहार मध्ये असहकारिता याविषयावर स्त्रियांचा जाहीर स भाषण झाले. २९ मार्च १९२१ ला महात्मा गांधी यांचे स्त्रियांच्या जाहीर सभेत भाषण झाले. सुमारे तीन हजार स्त्रिया जमल्या होत्या. सौ.मनूताई खापर्डे, सौ.विमलाबाई शेवडे, कु. चंद्राताई शेवडे, सौ.पार्वतीबाई पटवर्धन यांनी चोख व्यवस्था ठेवली होती. वीर वामनराव दादा जोशी यांना अटक झाल्यावर वलगावला निषेधाची फार मोठी सभा झाली. त्यात अन्य वक्त्यासोबतच सौ.मनूताई खापर्डे, सौ.विमलाबाई शेवडे, कु.चंद्राताई पटवर्धन यांची भाषणे झाली. लोकमान्यांच्या जयंतीला सभेच्या अध्यक्षस्थानी सौ.शेवडे होत्या. परदेशी कापडाची होळी करण्याचा कार्यक्रम झाला. त्यावेळी २०० स्त्रियांनी सहभाग घेतला होता. दि. ४ ऑगस्ट १९२१ रोजी अमरावतीत नगर महिला काँग्रेसची स्थापना सौ.लक्ष्मीबाई खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. या निमित्त झालेल्या सभेत सौ.मनुताई खापर्डे, सविता बेन चोकसी, श्रीमती परांजपे, सौ.पार्वतीबाई पटवर्धन यांची भाषणे झाली. कार्यकारी मंडळात अध्यक्ष सौ.लक्ष्मीबाई खापर्डे, उपाध्यक्ष सौ.गिरजाबाई देशपांडे व सौ.अमृताबाई या सभेत गावातील माखाडी, गुजराती स्त्रियांनी ही भाग घेतला होता.

८ ऑक्टो. १९२१ ला श्रीमंत शंकराचार्य यांचे ब्रह्मविद्या मंदिरात स्त्रियांपुढे प्रवचन झाले. त्या सभेत सौ.भाग्यवती देवी, सौ.मनुताई खापर्डे, सौ.मनोरमाबाई पटवर्धन, सौ.पार्वती पटवर्धन, सौ.सखूताई भट, श्रीमती ताई गुर्जर यांची भाषणे झाली. सौ.सखूताई भट या पुनर्विवाहाच्या. त्यांनाहि श्री.शंकराचार्यांपुढे हजरी लावता आली. श्रीमती ताई गुर्जर म्हणजे ताई महाराज मूळ नाव वारुताई. कागल संस्थामिक श्री.कागलकर यांच्या त्या कन्या. अमरावतीला श्री.गुर्जर यांच्याशी त्या विवाहबध्द झाल्या. गतधवा झाल्यावर येथे गोपालकृष्ण मंदिर उभारुन तेथेच

आमरण कृष्ण भजनात लीन झाल्या. येथील श्रीकृष्ण मूर्तिची प्राण प्रतिष्ठा सौ.मनुताई खापर्डे यांच्या हस्ते झाली होती.

सौ.पार्वतीताई पटवर्धन यांनी प्रांतिक कॉंग्रेस कमेटीतर्फे वऱ्हाडभर दौरा करुन भाषणे दिली. दि. ४.११.१९२३ ला झालेल्या वऱ्हाड प्रांतिक कॉं. क. निवडणुकीत सौ.दुर्गाताई जोशी सभासद म्हणून निवडून आल्या. दि. १९ व २० एप्रिल १९२४ रोजी ब्रम्हविद्या मंदिरात विदर्भ साहित्य संघाच्या दुसरे अधिवेशनात झालेल्या कवि संमेलनात कु. गीता साने यांनी कविता म्हटल्या होत्या. इ. १९२५ च्या लो.टिळक समाहात सौ.सरस्वतीबाई देशपांडे यांचे भाषण झाले. इ. १९२७ साली गावात एकंदर पंधरा ठिकाणी गणेशोत्सव झाला. ब्रह्मविद्या मंदिरात स्त्रियांनी गणेशोत्सव साजरा केला. इन्फन्ट वेलफेअर कमेटी या संस्थेने इ. १९२८ साली शिशु समाह संपन्न केला. या शिबिरास हजारो स्त्रियांनी भेट दिली. तेथे एका मंडपात प्रदर्शन भरविण्यात आले होते. स्त्रियांना आरोग्य शास्त्राची, रोगांची व प्रतिबंधक उपायांची माहिती त्या प्रदर्शनात होती. सौ.सोमण, सौ.आठवले यांनी या कामी पुढाकार घेतला होता. सौ.अन्नपूर्ण शेवडे, सौ.चंद्राताई पटवर्धन, सौ.पार्वतीबाई पटवर्धन यांची महितीपूर्ण उद्‌बोधक भाषणे झाली होती. शेवटच्या विश्वस्त सौ.लेडी यशोदाबाई जोशी यांचे हस्ते आरोग्य संपन्न सुदृढ बालकांना बक्षीसे देण्यात आली. दि. २०.१०.१९२८ रोजी डॉ.हार्डीकर यांच्या 'अध्यक्षतेखाली गणेश थिएटरमध्ये विदर्भ युवक परिषदेचे पहिले अधिवेशन भरले. त्या परिषदेत जी विविध राजकीय, सामाजिक विषयांवर भाषणे झाली, त्यात श्रीमती दुर्गाताई जोशी, कु. गोदूताई केमकर, कु. कृष्णा खरे यांचीहि भाषणे झाली होती. लाला लजपतराय यांचा लाठीमारामुळे मृत्यू झाला, त्यानंतर देशव्यापी हरताळ, संप झाले. अमरावतीलाहि हरताळ पडला. सभा झाल्या. दि. २४ नोव्हें रोजी ब्रह्मविद्या मंदिरात सौ.मनूताई खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली महिला समाजाने शोकसभा आयोजित केली होती. हा महिला समाज इ. १९२६ साली स्थापन झाला होता. सर्व साधारण बायकांना देशाची परिस्थिति, देशस्थिती, सभौतालची स्थिती याविषयी माहिती देणे असे कार्य हा समाज करीत असे. सर्व जातीच्या कुलीन स्त्रियांना समाजाचे

सभासदत्व स्वीकारता येत असे. निबंध वाचन, व्याख्यान, वादविवाद, कीर्तन इ. कार्यक्रम ह्या समाजातर्फे होत असत.इ. १९२९ साली सौ.सीताबाई ब्रह्म ह्या समाजाच्या अध्यक्षा होत्या. यतींद्रनाथांनी प्राणांतिक उपोषण मांडले तेव्हा अमरावतीला त्यांच्या अभिनंदनाची सभा भरली होती. व त्यांच्या देहावसानानंतर शोकसभा व मिरवणूक निघाली. त्यात सौ.मनूताई खापर्डे व सौ.चंद्राताई पटवर्धन या सहभागी झाल्या होत्या. म. गांधीजी यांच्या जयंती हीरक महोत्सवाच्या कार्यक्रमात सौ.पार्वतीबाई पटवर्धन सहभागी झाल्या होत्या. शारदा बिलास पाठिंबा दर्शविण्यासाठी सर मोरोपंतांच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या सभेत सौ. चंद्राताई पटवर्धन यांचे भाषण झाले होते. इ. १९२९ मध्ये गांधीजींना अटक झाली. त्याच्या निषेधार्थ अमरावतीत सभा झाली. ह्या सभेत सौ.विमलाबाई अभ्यंकर, सौ.पार्वतीबाई पटवर्धन यांनी भाषणे झाली होती. इ. १९३० साली दारुच्या दुकानांवर पिकेटिंग झाले, त्यात सौ.पार्वतीबाई पटवर्धन, सहभागी झाल्या होत्या. डॉ.पटवर्धन व डॉ.सोमण यांना अटक झाली त्याप्रसंगी झालेल्या निषेध सभेत श्रीमती दुर्गाताई जोशी, पार्वतीबाई पटवर्धन यांची भाषणे झाली होती. त्याच रात्री डॉ.भोजराज यांना पकडण्यात आले. तेव्हा झालेल्या निषेध सभेत कु. प्रमीला ओक, सौ.पटवर्धन, सौ.दांडेकर यांची भाषणे झाली होती. सामाजिक जागृतिसाठी सौ.पटवर्धन, सौ.चंद्राताई पटवर्धन, श्रीमती विमलाबाई आयंदे, यांनी जिल्हाभर दौरा करुन भाषणे दिली. एकदा एके ठिकाणी पिकेटिंग चालू असताना सौ.पार्वतीबाई पटवर्धन यांना अटक करण्यात आली. सौ.जावळे, सौ.लक्ष्मी दांडेकर, सौ.राधाबाई गोखले यांना अटक केली. श्रीमती दुर्गाताई जोशी यांनाहि अटक झाली. कौंन्सिल बहिष्कार कार्यक्रमाच्या प्रचारासाठी स्त्रियांनी मतदान विरोधी मिरवणूक काढली. बाकीच्या महिलांना अटकेनंतर लगेचच सोडण्यात आले. परंतु, सौ.पार्वतीबाई पटवर्धन व श्रीमती दुर्गा जोशी यांना न्यायालयाने सहा महिने कारावासाची शिक्षा दिली. दुसऱ्या दिवशीच्या जाहीर सभेत त्यांचे अभिनंदन करणारा ठराव पारित करण्यात आला.

गढवाल दिन १२ डिसेंबर १९३० रोजी पाळण्यात आला. तेव्हा मिरवणुकीतील ७५ व्यक्तींना अटक करण्यात आली. पस्तीस लोकांना सरळ तुरुंगात

नेले. बाकीचे सोडून दिले. त्या पस्तीसमध्ये सौ.लक्ष्मी दांडेकर, सौ.राधा गोखले, कु.जावले, श्रीमती मधुताई लिमये या सहभागी होत्या. सौ.गोखले व श्रीमती लिमये यांचेवरील खटला काढून टाकण्यात आला. व सौ.दांडेकर, यांना चार महिन्यांची शिक्षा झाली. कु जावले यांना ५००.०० जामीन मागण्यात आला. परंतु रु. २५०.०० भरल्यावर त्यांची सुटका झाली. याशिवाय कु.अंबूताई साठे, श्रीमती यमूताई टाकरखेडकर, इ. स्त्रियांनीहि ह्या चळवळीत भाग घेतला होता. दि. २७.१.१९३१ रोजी सुभाषचंद्रबोस यांना जाहीर पाठिंबा देण्यासाठी महिलांनी जाहीर सभा अयोजित केली होती. गांधी इर्विन करारानुसार राजबंद्यांची सुटका झाली. तेव्हा सुटलेल्या देशभक्तांचे अभिनंदन करण्यासाठी जाहीर सभा भरली. त्यासभेत सौ.पटवर्धन, दुर्गाताई जोशी यांचे भाषण झाले. स्त्रियांच्या जाहीर सभेत सौ.पटवर्धन व सौ.दांडेकर यांचे अभिनंदन करण्यात आले. भगतसिंग राजगुरु दिनाप्रित्यर्थ मिरवणूक काढण्यात आली. जाहीर सभा झाली. त्यात सौ.लक्ष्मीबाई दांडेकर, कु. अंबुताई साठे यांची भाषणे झाली होती. सेवादलाच्या कार्यकारीणी मंडळावर सौ.लक्ष्मीबाई दांडेकर यांची नियुक्ती झाली. ४ सप्टेंबर १९३१ ला, ब्रह्मविद्या मंदिरात सभा भरुन, अमरावतीत अ.भा. महिला परिषदेची शाखा स्थापन करण्यात आली. सभेच्या अध्यक्ष सौ.पार्वतीबाई पटवर्धन होत्या. शाखाध्यक्ष सौ.लेडी यशोदाबाई जोशी यांच्या अध्यक्षतेखाली ग्वाल्हेरच्या सौ.लक्ष्मीबाई राजवाडे यांचे स्त्री शिक्षण व स्त्रियांची सामाजिक जबाबदारी ह्या विषयावर भाषण झाले. दि. ३१ ऑक्टो. ला अंबादेवी संस्थान सभागृहात सौ.पार्वतीबाई पटवर्धन यांच्या अध्यक्षतेखाली स्त्रियांची जाहीर सभा झाली. विषय स्वदेशीचे महत्व हा होता.

विदर्भ युवकपिरिषदेचे दुसरे अधिवेशन २४ ऑक्टोबरला भरले. त्यात सौ.राधाबाई ओक यांचे स्फूर्तिदायक भाषण झाले. विदर्भ प्रांतीय महिला परिषदेचे पहिले अधिवेशन गणेश थिएटरमध्ये दि. २४.१०.१९३१ रोजी भरले. विदर्भातून सुमारे पाचशे महिला प्रतिनिधी आल्या होत्या. स्वागताध्यक्ष सौ.लेडी यशोदाबाई जोशी, चिटणीस सौ.कालिंदी घाटे, होत्या. संमेलन सौ.कमलाबाई देशपांडे (सातारा) यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाले. त्यांनी अनेक महत्वाच्या मुद्यांना आपल्या भाषणात स्पर्श

केला. सौ.ताराबेन मश्रुवाला ह्याहि बोलल्या. चर्चेत सौ.पार्वतीबाई पटवर्धन, सौ.सीताबाई ब्रह्म, सौ.नाम जोशी, सौ.निमदेवकर, सौ.कांलिदीबाई घाटे, सौ.शांताबाई भट, सौ.ताराबाई रणदिवे, सौ.गंगूताई भोळे, ताई महाराज, यांनी भाग घेतला. एकंदर तीन दिवसांच्या संमेलनात तेवीस ठराव पारित झाले.

सुभाष बाबूंना अटक झाली त्याच्या निषेधार्थ भरलेल्या सभेत सौ.लक्ष्मीबाई दांडेकर यांचे भाषण झाले.

लाला लजपतराय यांच्या प्रथम पुण्यनिथिनिमित्त भरलेल्या जाहीर सभेत सौ.विमलाबाई देशपांडे यांचे भाषण झाले. सरकारने डिसेंबर १९३१ पासून उर्दू मुलींची शाळा सुरु केली. दे.भ. त्र्यंबक गुरुजी जोशी यांच्या अटकेच्या निषेधार्थ श्री.लक्ष्मीनारायण मंदिरात सौ.पार्वतीबाई पटवर्धन यांच्या अध्यक्षतेखाली स्त्रियांची जाहीर सभा झाली. पं. जवाहरलाल नेहरुंच्या अटकेच्या निषेधार्थ दि. २७.१२.१९३१ रोजी स्त्रियांनी जाहीर हरताळ पाडला. म.गांधीच्या अटकेच्या निषेधार्थ मिरवणूक व जाहीर सभा झाली. त्यात सौ.विमलाबाई देशपांडे, सौ.पार्वतीबाई पटवर्धन, सौ.लक्ष्मीबाई जोशी, यांची भाषणे झाली. या सभेत सौ.लक्ष्मीबाई जोशी यांनी सोन्याची अंगठी व सौ.देशपांडे यांनी सोन्याचा हार काँग्रेस फंडास अर्पण केला. गांधीजींच्या सुटकेच्या निमित्ताने अभिनंदन सभा झाली त्यात सौ.देशपांडे, सौ.पटवर्धन, सौ.दांडेकर यांची भाषणे झाली.

श्रीमती चंद्राताई पटवर्धन :-

इ.स. १९०० साली अमरावती तालुक्यातील तिवसा येथे जन्म त्यांचे वडील येथील एका शाळेत शिक्षक होते. वडीलांच्या मृत्यूनंतर त्या धावडशी येथे मामाकडे राहिल्या. तेथेच त्यांचे शिक्षण झाले. प्राथमिक शिक्षण सातारा येथे व हायस्कूलचे शिक्षण पुणे येथे इंटर पर्यंतहि झाले.

भाऊ पुढे वकीलीत स्थिर झाल्यावर त्या अमरावतीला आल्या. गणेशोत्सवात भाषणे देत असत. (वलगांव, तिवसा, भातकुली) सभाघीट होत्या. उ त्यामुळे हजारोंच्या सभेत भाषणे देत. रामायण, महाभारताची उदाहरणे भाषणातून देत

असत. त्यांच्या भाषणात तोफांचा गडगडाट व विजेचा कडकडाट असे.

त्यांचे लग्न लेफ्टनंट कर्नल पटवर्धन यांचेशी झाले. ते रॉयल एअर फोर्समध्ये लंडन येथे होते. त्यांचे नवऱ्याशी पटले नाही. नंतर त्या स्वतंत्र राहू लागल्या. त्यांनी ''स्वदेशी स्टोअर्स'' नांवाने किराणा मालाचे दुकान काढले व ते भरभराटीला आणले होते. हे दुकान सुरुवातीला बर्डीवर व नंतर धंतोली पार्क समारे होते. पुढे दुकानात चोरी झाल्याने हे दुकान बसले.

चंद्राबाई लहानपणापासूनच दत्ताची पूजा करीत. चंद्राबाईंचे वडील ह्यांच्या मदतीने त्यांनी प्लॉट घेतला. घर बांधले, ताई उद्योगी व कर्तबगार, त्यांनी पेईंग गेस्ट ठेवून घर चांगले वाढविले. व्दितीय युध्दाच्या काळात दिल्लीला जाऊन त्यांनी ''डायरिक्सचा कोर्स'' पूर्ण केला व प्रथम कामठी व नंतर अमरावतीच्या इरविन हॉस्पिटल मध्ये नर्सिंग होस्टेलवर मेट्रॅन म्हणून नोकरी केली आणि उत्तम मेट्रेन म्हणून लौकीक कमावला. ताईची असहकाराचे चळवळीत बरेच काम केले होते. सत्याग्रात भाग घेतला होता. सेंट्रल जेलची पण हवा खाल्ली होती. म्हणून त्यांना स्वातंत्र्य संग्राम सैनिक पेन्शन मिळाले होते.

त्यांनी आपल्या मुलांमुलींचे शिक्षण उत्तम तऱ्हेने केले. त्यांची एक मुलगी ऑस्ट्रेलियात लेक्चरर आहे. दुसरी त्यांचे जवळ राहाते. त्यांचा एक नातू प्रसिध्द ॲडव्होकेट व दुसरा क्रिकेटपटू आहे. (सुधा देशपांडेची मुले)

चंद्राताई नागपूरला ललाममभूत ठरल्या होत्या. म.प्र चे ॲड जनरल त्र्य.ल. उर्फ दादासाहेब शेवडे हे त्यांचे बंधू होते.

त्यागमूर्ती माई हर्षे :-

कै.माई हर्षे यांच्या अथक परिश्रमांनी, त्यांच्याप्रेरणेने इ. १९४७ साली बालशिक्षण मंडळाची स्थापना झाली व आज त्याचा खूप मोठा विस्तार झाला आहे. त्यांची बालशिक्षण संस्था सध्या बारा उपक्रम चालवीत आहे. सध्या श्रीमती सुधा सोमण या संस्थेच्या अध्यक्ष आहेत. आणि उषा महाजन सचिव आहेत.

श्री.पराडकर यांची ही कन्या राहणे पश्चिम महाराष्ट्रात बारामतीला

पेशा शिक्षकांचा. त्यांना चार मुली व तीन मुले त्यापैकी माई पहिली. माईचे नाव मधुरा. लग्न बालपणीच झाले. लग्न झाल्यावर वयात येईपर्यंत मुलगी माहेरीच ठेवण्याची प्रथा होती. त्यानुसार माई माहेरीच होत्या. आणि वयात येण्यापूर्वीच वैधव्यहि प्राप्त झाले. श्री.हर्षे वारले. सासरच्यांनी माईला घरी आणले नाही. माहेरी राहूनच शिक्षणास सुरुवात झाली. नववी पर्यंत शिक्षण झाले वडिलांना अर्धांग वायूचा झटका आल्यामुळे शिक्षण सोडून देऊन कुटूंबाची जबाबदारी उचलली. भावाबहिणींचे शिक्षण सुरु ठेवले. ते सर्व शिकून मोठमोठ्या पदांवर नोकरी करु लागले. कौटूंबिक गरज म्हणून शिक्षिकेचे प्रशिक्षण सेवासदन येथे घेतले. व यवतमाळला शिक्षिका म्हणून नेमणूक झाली. येथे आल्यावर त्यांचे वडील व आई यांचा देहान्त झाला. माईंचा उत्तम शिक्षिका म्हणून नावलौकिक पसरु लागला. अमरावतीला शासनाने पहिले मुलींचे हायस्कूल काढले. वसतीगृहाची व्यवस्थाहि केली. येथे माईंची बदली झाली. त्यांची शिस्तीप्रियता, नीटनेटकेपणा या गुणांमुळे वसतिगृह प्रमुख म्हणून त्यांची नियुक्ती झाली. तेहि काम त्यांनी अतिशय व्यवस्थित रीतीने पूर्ण केले. वसतिगृहात भोजन घेण्याचा त्यांचा अधिकार होता. पण त्या एकहि दिवस तेथे जेवल्या नाहीत. घरी भोजन करीत. त्यांनी वसतीगृहातील मुलींना शिस्त लावली. अभ्यासाला उत्तेजन दिले. प्रार्थना व भाक्तिगीते शिकविली. शिवणकाम शिकवले, वसतीगृहात भरपूर खोल्या होत्या. दोनतीन खोल्या रिकाम्या रहात. तेथे परगावहून आलेल्या शिक्षिकांना त्यांनी ठेवून घेतले. त्यांचे व माईंचे चांगले स्नेहसंबंध राहिले. खेळ, संगीत, वगैरे मध्ये माई देखील सहभागी होत. नागपूरला परिचारिकांसाठी शासकीय प्रशिक्षण केंद्र सुरु झाले. केंद्रावर देखरेख करण्यासाठी माईंची नियुक्ति झाली. निवृत्त झाल्यावर माई उमरावतीस परतल्या.

ह्यावेळी बाल शिक्षणतज्ञ ताराबाई मोडक ह्यांचे कार्य जोरात सुरु होते. त्यांना मदतनीसाची आवश्यकता होती. माई त्यांना येऊन मिळाल्या. मागासवस्तीत साक्षरता प्रसाराचे कार्य सुरु केले. पुढे ताराबाई अमरावती सोडून पुण्यास गेल्या. पण माईंनी ते कार्य सुरु ठेवले. मुलांसाठी काही करावे असे मनात फार येत होते. त्यासाठी

एक सुवर्णसंधी चालून आली. त्या शिक्षिकांना त्यांनी वसतीगृहात जागा दिली होती. त्या माईंच्याकडे आल्या. आणि आमच्या लहानग्या मुलांसाठी बालक मंदिर सुरु करा असे म्हणाल्या. माईंना ती सुवर्णसंधीच वाटली. राहत्या जागेतच त्या चिमुरड्यांसाठी बालक मंदीर सुरु झाले. लगेच बालशिक्षण शास्त्राचा अभ्यास केला. शिक्षण पत्रिका मासिक ताराबाई मोडक यांनी सुरु केले होते. त्या पुण्यास गेल्यामुळे ते बंद पडले होते. माईंनी त्याचा जीर्णोध्दार केला. बाल आजारशास्त्राची पुस्तके विकत घेतली. व वाचली बालशिक्षणासाठी आवश्यक तेवढी साधने विकत घेतली. अशा जय्यत तयारीनिशी पाच सहा मुलांसाठी बालशिक्षण मंदिर सुरु केले. माईंनी शाळा सुरु केली म्हणून घरमालक तक्रार करु लागले. नवीन जागेचा शोध सुरु झाला. तेव्हा कै.वि.रा. (दादासाहेब) राजवाडे पुढे आले. खापर्डे बगीचात त्यांचा एक भूखंड रिकामा पडला होता. ती जागा तर त्यांनी दिली व तेथे एक कक्षबांधून दिला. लगेच प्रशिक्षित शिक्षिका नेमून बालक मंदिर तेथे हलविले. जोमाने कार्य सुरु झाले. मुलांच्या पालकांसाठी व विशेषत: मातांसाठी अभ्यासवर्ग सुरु केला. वाचनालय सुरु केले. गृहविज्ञान, प्रथमोपचार, यांचा अभ्यास सुरु झाला. बॅडमिंडनसाठी मैदान तयार केले. शोभेची झाडे, फुलझाडे लावून परिसर रमणीय केला. बालशिक्षण मंडळाची घटना तयार करुन पंजीकृत करुन घेतली. नोंदणी करुन घेतली. कार्यकारीमंडळ निवडले सौ.पद्माताई मोटे ह्या पहिल्या अध्यक्ष होत्या. दादा राजवाडे, निळूभाऊ राजदेरकर यांनीहि भरघोस सहकार्य दिले. गरीब मुलांसाठी कल्याण केंद्र सुरु केले. रेडक्रॉस सोसायटी कडून दुधाची भुकटी मिळवली. मोड आलेली कडधान्ये मुलांना न्याहारीसाठी देत असत. बघता बघता वर्ष गेले. मुलांची प्रगतिपाहून पालकांनी पहिला वर्ग काढण्याचा आग्रह धरला. कुडाच्या भिंती बाधून खोली तयार झाली. पहिला वर्ग, पाठोपाठ दुसरा, तिसरा, वर्ग सुरु झाले. माईंची चिकाटी, उत्साह, तळमळ, त्याग पाहून शेजारची रियासतबी नावाची मुस्लिम महिला प्रभावित झाली. माझी राहती जागा माई विकत घेणार असतील तरच विकीन अशी अट होती. माईंनी हप्त्या हप्त्याने पैसे देऊ केले. तरी ती कबूल झाली. आणि संस्थेचा पसारा वाढवण्यास माईंना जागा मिळाली. नंतर

मोठ्या प्रमाणावर देणग्या मिळू लागल्या. कै.भागीरथीबाई कलंत्री यांच्या स्मरणार्थ देणगी मिळाली. राजवाड्यांनी आपले राहते घर संस्थेलाच विकत दिले. त्यामुळे भरपूर जागा झाली. पालकमंडळींनी, शिक्षण प्रेमी नागरिकांनी देणग्या दिल्या. सिनेमा, नाटक, वगैरेंची तिकीट विक्री करुन पैसा गोळा केला. इतक्या प्रचंड खटाटोपानंतर शिक्षण खात्याने साठ टक्के अनुदान मान्य केले. खापर्डेबगीचा विभागातील काम सुरळीत चालू झाल्यावर भाजीबाजार विभागातील महिलांच्या सोईकरीता माईंनी तिकडे लक्ष पुरविले. माईंचा प्रभाव असा विलक्षण होता की जातील तेथे त्यांना यश मिळत असे. लक्ष्मीनारायण मंदिराने त्यांना जागा उपलब्ध करुन दिली. कार्य करणारे सहकारी मिळाले. महाविद्यालयात न जाऊ शकणाऱ्या तरुण मुलींसाठी अभ्यास वर्ग व प्रशिक्षण वर्ग सुरु केला. चांगली दाद मिळाली. मुलांचे कपडे, क्रेप कागदाच्या वस्तू, रुमाल, चादरी, भरतकाम यांचे शिक्षण तेथे मिळे. गीतापठन शिकविले. सुटीत मुलांसाठी संस्कार वर्ग भरवीत. आळसाचे नावच नसे. तुरुंगास भेट देऊन भगिनींशी हितगुज व्हायच्या. त्यांना चांगल्या वर्तनाचे पाठ द्यायच्या सुपारी कातरण्याचे यंत्र घरी आणले. लोकांना सुपारी बारीक करुन द्यायच्या. चार पैसे मजुरी मिळे. साबणभुक्ट्टीचे पुडे विकायच्या. उदबत्या विकायच्या. एक बोहरा बाई कडून एम्ब्रॉयडरीच्या यंत्रावर काम करायला शिकल्या. ते शिक्षण मुलींना दिले. लक्ष्मीनारायण मंदिर, मारुती मंदीर यांना त्यांनी ज्ञानकेंद्र व संस्कार केंद्र बनविले. साऱ्या जणी मिळून चैत्र गौर सजवायच्या. हळदीकुंकू, संक्रातसण साजरे करायच्या. उत्साहाला खंड नाही. इतका सारा व्याप सांभाळून स्वामी विवेकानंद स्वामी रामकृष्ण, गांधीजी, विनोबा यांचे वाङ्मय वाचत असत. व ते सारे त्यांच्या लक्षात होते. मॉंटेसरी शिक्षण पध्दतीचा भारतीय संस्कार पध्दतीशी सांधा जुळवून त्या शिकवीत. त्यामुळे त्यांची स्वत:ची एक प्रसन्न, आगळी वेगळी शैली बनली होती. त्या उत्तम शिक्षिका म्हणून त्याचमुळे नावलौकिकास चढल्या. रामायण, महाभारत, देवी भागवत, योगवासिष्ठ, यांचे वाचन करीत. शिवाय, मामा दांडेकर, दत्ताकाळे, बाळशास्त्री हरदास, स्वामी विज्ञानानंद, स्वामी सत्यानंद यांची प्रवचने ऐकायला हमखास जात. स्वत: संगीतातल्या चांगल्य । दर्दी रसिक

होत्या. चित्रकलेत थोडी गती होती. रियासतबीला त्यांनी महानंदा हे नाव ठेवले. आणि ते तिला खूप आवडले. तिने शेती, घरदार माईंच्या शाळेला दिले. वयाच्या ९४ व्या वर्षी, दि. ५ मार्च १९८० रोजी त्यांचा देहान्त झाला.

समाज ऋणाची सतत जाणीव असणारी एक विशेष कर्तबगार महिला म्हणून माई हर्षे यांचे स्थान अमर राहील. त्यांचा प्रत्येक क्षण उद्योगात गेला. त्यांना नीरसता ठाऊकच नव्हती. परिस्थितीमुळे वाहून गेल्या नाहीत. उलट्या परिस्थितीत संघर्षाला उभ्या ठाकल्या. आणि हसून प्रसन्नपणे वार झेलले. पुढच्या पिढीसाठी संपन्न कर्तृत्वाचा वारसा ठेवला. सीताबाई बह्म, कमलाबाई ठाकूर, शांताबाई भट, चंद्रकलाबाई गणोरकर, ताराबाई पाध्ये, लीलाताई बन्नोरे, कमलाबाई गोखले, सुधाताई सोमण, सुनिती अलूरकर, पद्मावती मोटे, कमलाबाई पोतदार, इंदिराबाई कुळकर्णी, विजया गोखले, आशा राजवाडे, मंगला बक्षी, अशी महिला कार्यकर्त्यांची एक अखंड मालिका त्यांच्या सहवासात तयार झाली.

(बालशिक्षण मंडळ, सुवर्ण महोत्सवी विशेषांक वरुन संकलित)

दुर्गाताई जोग :-

जन्म इ. १८९७. बालशिक्षिका

बी.ए.बी.टी. बनारस विद्यापीठ.

काँग्रेस कार्यकर्ता , अच्युतराव पटवर्धन यांच्या सोबत कार्य.

सोशॅलिस्ट ग्रुप मध्ये सामील. आणि आणिबाणीच्या काळात एस.एम., ना. गोरे , मृणाल गोरे, एकनाथ थतो, यांना स्वत:च्या घरी आश्रय दिला होता. सामाजिक कार्यकर्त्या, जोग दवाखाना, धन्वंतरी सहकारी रुग्णालय, माई हर्षे यांचे बालशिक्षण मंडळ, मोटे सुतिकागृह, तपोवन, इ. संस्थांच्या मध्ये विश्वस्त होत्या. माई हर्षे यांच्या सोबत शैक्षणिक कार्य केले. कणखर, जोमदार वक्तृत्व. थिऑसॉफिकल सोसायटीच्या सदस्या. स्वातंत्र्य संग्राम सैनिक म्हणून निर्वाह भत्ता मिळत होता. संयुक्त महाराष्ट्र आंदोलनात सक्रिय सहभागी झाल्या होत्या.

सौ.सय्यदा वसीम दुरदाना वासीम. :-

ह्या प्रा. वासीम ह्यांच्या पत्नी होत. इ.१९७७ मध्ये ह्यांनी एम.ए.,पी.एच.डी. ची पदवी मिळविली. मुस्लिम समाजात ही पदवी मिळविण्याऱ्या ह्या पहिल्या महिला होत. त्याबद्दल त्यांना मौलवी आलिम हा किताब बहाल करण्यात आला आहे. ''अचलपूरचे प्राचीन कवी'' ह्या विषयावर त्यांनी प्रबंध लिहिला व नागपूर विद्यापीठास सादर केला.

हा प्रबंध लिहिण्यासाठी त्यांनी जी विविध कागदपत्रे तपासली त्यावरुन एक नवीन माहिती उजेडात आली आहे. ती अशी की इ. १८६९ मध्ये अमजद हुसेन खातीब यांनी पार्शियन भाषेत वऱ्हाडचा इतिहास लिहिला होता. त्याचे उर्दू भाषांतर करुन घेण्यात आले असून त्याची प्रत डॉ.अबार हुसेन खातीब यांच्याजवळ आहे. वऱ्हाडचा इतिहास लिहून काढल्याबद्दल इंग्रज सरकारने श्री.अमजद हुसेन यांना अफताब-ए=बरार हा किताब दिला होता. तसेच इ. १८६९ साली त्यांना रु. दोनशे पन्नास इनाम देण्यात आले. शिवाय खानबहादूर ही पदवी देण्यात आली. त्या पुस्तकाचा चिरागे बरार असा गौरव करण्यात आला. त्यांचे जन्मनाव अबुल फतह जियाउद्दीन उर्फ अमजद हुसेन असे होते. त्यांचा जन्म इ. १८३० व परलोकवास इ. १९०५ मध्ये घडला. ते विख्यात शायर होते. त्यांनी दिवाने अमजद नावाखे शायरीवर पुस्तके लिहिले होते.

अमरावती जिल्ह्यातील महिलांचा स्वातंत्र्य संग्रमात सहभाग ३०-३२ :-

अब्बास तैयबजी ह्यांच्या निषेधार्थ अमरावतीला हरताळ पाळण्यात आला. तैयबजी अभिनंदन करण्याकरीता १३ मे १९३० ला सभा झाली. पोलीसांनी महिलांना त्रास दिल्याचे पार्वतीबाईंनी आपल्या भाषणात सांगितले. परंतु पोलीसांचे म्हणणे आहे की आक्षेप खोटा आहे.

जोग चौकात ३० व ३१ मे ला सार्वजनिक सभा घेण्यात आल्या. हरिहर वामन देशपांडे व सौ.पार्वतीबाई पटवर्धन ह्यांनी आपल्या भाषणातून सरकारी नोकरावर सामाजिक बहिष्कार घालावा ह्या गोष्टीवर भर दिला. ६००० ते ८००० लोक उपस्थित होते त्यात ५०० महिलांही होत्या.

इ. १९५० च्या नोव्हेंबर महिन्यात नेहरु जयंतीच्या दिवशी पार्वतीबाईंनी सभा घेऊन नेहरु जयंती साजरी केली. दि. २.१२.३१ ला १५० महिलांची सभा पुण्याच्या कॉंग्रेस कमेटीच्या अध्यक्ष बापट ह्यांना कारावासात टाकण्याबद्दल ब्रिटिश सरकारच्या कृतीचा निषेध व्यक्त करण्याकरीता झाली. पार्वतीबाईंनी आपल्या भाषणात निषेध व्यक्त केला.

विदर्भ शाहीर गोपालकृष्ण चोळकर हे वीर वामनरावांचे मेव्हणे, ह्यांनी अनेक पोवाडे इंग्रजांविरुध्द रचले व ते लोकप्रिय झाले. त्यांचे बहिष्कार व स्वदेशीपर रचलेले पोवाडे त्या काळात प्रसिध्द झाले. ते वारंवार अमरावतीला येत. त्यांच्या पोवाड्यातील ओळी.

''बहिष्कार मंत्र जोरदार, बसता गो दावरा। भूतसंचार अंगी झाला, तेव्हा सैतान नाचू लागला.।'' भगिनीवर्ग स्वदेशीचा प्रचार करताना, चरखा चालवतांना सुत काढतांना चोळकरांचा पोवाडा म्हणत तो असा -

''अरे ही टकली, इंग्लंडच्या बोकांडीवरली। टकली चरख्याची पोर, मोठी झाली शिरजोर अब्रुसरकारची बाजारी विकली, ... ''. चोळकरांचे प्रेरणा स्थान वीर वामनरावच होते.

पार्वतीबाई पटवर्धन अमरावती जिल्ह्यातील पहिल्या महिला सत्याग्रही होत्या. इ. १९२० साली कॉंग्रेसच्या सदस्या झाल्या. डॉ.पटवर्धनांनी प्रॅक्टीस सोडली आणि स्वत: देशसेवेला वाहून घेतले. अमरावतीच्या राजकारणात १९२० पासून महिलांनी सक्रीय सहभाग घेण्यास सुरुवात केली. हनुमान व्यायाम शाळेत मुलींच्या शिक्षणाला सुरवात झाली त्यात पार्वतीबाईंनी पुढाकार घेतला. प्रांतिक कॉंग्रेस कमेटीच्या त्या सदस्य होत्या.

विदेशी कापडावर बहिष्कार ही चळवळ त्यांनी चालविली. १९२९ साली खेड्यापाड्यात जाऊन प्रचार केला. मुलगी कमल हीला घेऊन माहुली येथे हि प्रचाराकरीता गेल्या. जंगल सत्याग्रहाचे वेळी ताडीची झाडे कुठे कुठे आहेत ह्यांची पहाणी मोर्शी तालुक्यात केली. १९३० मध्ये वीर वामनरावांची मुलगी मनुताई, छबू

पाटील. अंबु साठे, ओझरकर, सावित्रीबाई आयदे, सहस्तबुध्दे, लक्ष्मीबाई दंडवते, पार्वतीबाई मुळे या सर्व भगिनींना घेऊन प्रभात फेरी सुरु केली.

शांताबाई श्रीधर भट :-

ह्या कम्युनिष्ट विचारसरणीच्या कार्यकर्त्या होत्या ३०-३१ मध्ये त्यांनी राजकीय कार्य केले. जन्म रत्नागिरी येथील अंबोलीचा, वडिल हरिपंत ओक आईलक्ष्मीबाई घरची परिस्थिती बेताची वडील खोत होते. प्राथमिक शिक्षण हिंगणे येथील वसतीगृहात झाले कर्वे विद्यापीठाची गृहितगमा ही पदवी घेतली. राजकीय कार्यकर्त्यांना घरी ठेवावे आर्थिक मदत करीत. भुमिगतांना भरपूर मदत केली. मीनाक्षीताई साने आणि शांताबाई अत्रे ह्यांच्या विचार सरणीचा त्यांच्यावर प्रभाव होता तिघीही जीवलग मैत्रिणी होत्या. मीनाक्षी सानें नी बरेचदार तुरुंगयात्रा केली. बालवाडी चालवित व वनितासमाज ह्या संस्थेचा पाया घातला.

राधाबाई बापट :-

राधाबाई दामोदरपंताशी १९१० साली लग्न होऊन अमरावतीला आल्या. त्यांनी आणि गिरजाबाई सोबत ह्यांनी स्वदेशीचा प्रचार निरनिराळ्या मार्गांनी केला शिक्षण ४ च्या वर्गापर्यंतच असून सुध्दा उत्तम व्याख्याता म्हणून नांव कमविले. शिक्षण पुणे येथील न्यू इंग्लीश शाळेत झाले आहे. अंत: प्रेरणेने त्यांनी कामे केले. बुलंद आवाज लाभलेल्या राधाबाई मंचावर न भीता उभे राहून स्वदेशीच्या प्रचाराकरिता व्याख्याने देत. स्त्रीवर्गाचे भारतात तयार झालेल्या वस्तूच विकत घ्याव्यात. असा आग्रह करीत. खणखणीत आवाजामुळे त्यांच्या भावनाचा परिणाम श्रोत्यांवर चांगला होईल निर्भीड वृत्तीच्या राधाबाईंनी स्वदेशीच्या प्रसाराकरीता कीर्तने केली नाटकांमध्ये पुरुष पात्रांचेही काम केले. त्या हिंदू महासभेच्या सभासद होत्या. सभेचे काम करीत, वडाळीच्या जंगल सत्याग्रहातही त्यानी भाग घेतला होता. वनिता समाजच्या सक्रीय कार्यकर्त्या असलेल्या राधाबाईचे कार्य त्या काळाचे मानाने निश्तिच कौतूकास्पद आहे.

गिरिजा सोमण :-

राधाबाई बापटांप्रमाणेच गिरीजाबाई सोमणही राष्ट्रीय प्रचारकार्यातील आघाडीच्या प्रसारक होत्या. शिक्षण ४ वर्गच झालेले असले तरी वाचनाच्या आवडीमुळहे बुध्दी प्रगल्भ होऊन देशप्रेम जागृत झाले आणि राष्ट्रीय कार्याला सुरुवात झाली. राजापेठेतील आपल्या घरी त्यांनी चरखा वर्ग काढला. गोरेबाई, सिंधु, सुमती ओक ह्या महिला वर्गाला येत. ७ ते ८ अशी वर्गाची उपस्थिती असे.१९२० ते ३० पर्यंत व्याख्यानातून महिलांना राष्ट्रीय कार्य करण्यास प्रवृत्त केले. अमरावती जिल्ह्यातील काही तालुक्यात त्यांनी एक कल्याण योजनासुरु केली होती. कमलाताई ठाकूर, सीताबाई ब्रम्ह, कमलताई गोखले, गिरीजाबाई वाटाने ह्या महिला ह्या योजनेच्या सभासद असून महिन्यातून एकदा त्या ठिकठिकाणच्या केंद्राला भेटी देत. चरख्यावर सूत कातणे आणि राष्ट्रभाषा हिंदी ह्या गोष्टी शिकविलया जात. गिरीजाबाई सोमणांनी ७ वर्षे ह्या योजनेत काम केले.

गिरीजाबाई वाटाणे :-

वीर वामनराव जोशी पासून राष्ट्रीय कार्याची प्रेरणा मिळाली. ग्रामिक भागाच्या विकासात कार्य करुन जनजागृती केली. हरीजन फंड गोळा केला. स्वातंत्र्यचळवळीत सक्रीय सहभाग होता. १९३० ते ३३ च्या दरम्यान ३ दिवस मावशी बरोबर अकोला अमरावती पदयात्रेत फिरल्या. साऊरच्या सभेत सरकारला शिव्या दिल्या मुळे कारावास घडला. खेड्यांमध्ये जाऊन स्वदेशीचा प्रचार व विदेशांवर बहिष्कार ह्यावर व्याख्याने देत. वनिता समाज व महिला परिषदेच्या सक्रिय कार्यकर्त्या होत्या. तळेगाव ठाकूरला त्यांच्या अध्यक्षतेखाली अस्पृश्योद्धाराकरीता एक महिला परिषद भरली होती. पती शंकरराव वाटाणेंची पूर्ण साथ होती. त्यांचे घर राजकारणांचा अड्डाच होता. राष्ट्रकार्यात पूर्ण कुटुंबाचा सहभाग होता.

१९३४ साली अमरावतीत एक ऐतिहासिक व्याख्यानमाला दि. ७-१० व १२ जानेवारीला ब्रम्हविद्या मंदिरात आयोजित करण्यात आली होती. दादासाहेब खापर्डेच्या अध्यक्षतेखाली पुण्याचे प्रसिध्द इतिहास संशोधक बाबासाहेब देशपांडे यांची व्याख्याने

झाली. ह्या व्याख्यानांना पुरुषांबरोबर मोठ्या संख्येने महिलाही उपस्थित होत्या. ही व्याख्याने ''भारतीय संस्कृतीचा जगावर परिणाम, शिव छत्रपतींचा दक्षिण दिग्विजय'' अशा ऐतिहासिक विषयांची निवड करण्यात आली होती. ह्या व्याख्यान मालेचा महिलांवर राष्ट्रीय जागृतीच्या दृष्टीने मोठा परिणाम झाला व त्यांनी निरनिराळ्या मार्गांनी जन जागृतीचे कार्य केले.

रमाबाई बारलिंगे :-

जनजागृती मोहिमेत रमाबाई रामभाऊ बारलिंगे ह्यांचा वाटाही तितकाच महत्वाचा आहे. पती स्वातंत्र्य संग्रामात सक्रीय होतेच परंतु रमाबाईही घरदार सांभाळून स्वातंत्र्य चळवळीत सहभागी झाल्या. जनजागृतीच्या दृष्टिकोनातून नाटके बसवून त्यांचे दिग्दर्शनही केले. राष्ट्रीय डोहाळे रचून म्हणत. हिंदमातेला डोहाळे लागले आहेत असे सांगून सीतामाई हिला शिवाजी महाराजांसारखा राष्ट्रप्रेमी मुलगा दे; मुलगी राष्ट्र सेवेला वाहून घेणारी असती असे ह्या गीतामधून गात. तसेच डोहाळ्यांतून; होऊ घातलेल्या मातेला हिरव्या शालू ऐवजी खादीचे डोहाळे लागल्याचे सुचवीत. कॅप्टन लक्ष्मी, गड आला पण सिंह गेला अशी नाटकें बसवीत. ह्या फॉरवर्ड ब्लॉकच्या होत्या. नाटकांपासून मिळालेले उत्पन्नचा वाटा पक्षाला देत. मुलींच्या कवायती घेत असत.

राधाबाई वामनराव जोशी :-

१९३४ च्या गणेशोत्सवात ''हिंदबाला मेळा'' राधाबाई वामनराव जोशी यांच्या चालकत्वाखाली तयार करण्यात आला. या मेळ्यासाठी जे संवाद तयार करण्यात आले त्याव्दारे स्वदेशी संबंधी लोक जागृती करण्यात आली. या मेळ्यातील मालती वामनराव जोशी हिची सरलेची भूमिक स्मरणीय झाली. ह्या मेळ्यात कमल जमखिंडीकर व इंदू फाटक ह्यांनीही कामे केली. ह्या शिवाय अनेक बालिकाही ह्या कार्यक्रमात सहभागी झाल्या होत्या. अशा प्रकारचे मेळे हे त्याकाळात प्रचाराचे एक प्रभावी साधन होते. महिलां मध्ये राष्ट्रीय वृत्ती निर्माण करण्याच्या दृष्टीने ते उपयुक्त ठरले.

दि. २४ नोव्हेंबर १९३४ रोजी इंद्रभुवन थिएटर मध्ये दुपारी ४ वाजता विदर्भ महिला परिषदेच्या स्थानिक शाखे तर्फे महिला दिनाची जाहीर सभा संभाजीराव

गोखले यांच्या अध्यक्षते खाली झाली. या सभेला बऱ्याच मोठ्या प्रमाणावर स्त्रीपुरुष उपस्थित होते. रावबहादूर खरे यांनी स्त्रियांचा वारसा हक्क, स्त्रीधन, घटस्फोट, दत्तक, या कायदेशीर हक्कात दुरुस्ती व्हायला पाहिजे असे सांगितले. कमलताई ठाकूरांनी आभार प्रदर्शन केले.

कालखंड ४०-४२ :-

महिलांचे कार्यक्षेत्र दिवसें दिवस विस्तारित होत होते. २१.१०.४१ ला दर्यापुरला महिलांचे सम्मेलन झाले. लक्ष्मण जनार्दन खेरांच्या पत्नीच्या अध्यक्षतेखाली महिलांना शिक्षण देणे आणि हिंदू कायद्यानुसार अधिकार देणे हे ठराव पारीत करण्यात आले. १९४१ मध्ये अकोल्याच्या महिला नेत्या राधाबाई ओकांच्या अध्यक्षतेखाली चांदूर रेल्वेला व्याख्यानाचा कार्यक्रम झाला. अयोग्य राजाला गादीवरुन काढण्याचा अधिकार जनतेला आहे. दोन कोटी लोक संख्या असलेले ग्रेट ब्रिटन ४० कोटी लोकसंख्या असलेल्या भारतावर राज्य करीत आहे अशा विषयांवर राधाबाई बोलल्या.

१५ जूनला हिंद सेवा दलाने मुलींच्या शिबिराचे आयोजन केले होते. ५५ विद्यार्थिनींच्या रोहन रोड सधामनगांव येथील शिबिरात गौराबाई कोरडेंनी मुलींना मार्गदर्शन केले. अनेक खेळ मुलींना शिकविले. मुलींना टिकली आणि रुमाल बक्षिस देण्यात आले. जपानच्या आक्रमणामुळे भयभित झालेल्या देशाची सेवा करावी असे मुलींना सुचविण्यात आले.

१९४२ मध्ये दिवाणजी बाईंनी अमरावतीला कामगारांचा मोर्चा काढला निश्चित पगार कामगारांना मिळावा त्याचप्रमाणे महागाई भत्ता मिळावा. ह्या उद्देशाने मोर्चा काढलेला होता. ५० महिलांच्या या मोर्चाच्या त्या नेत्या होत्या. डॉ.बी.के.दिवाणजींच्या पत्नी होत्या.

कांतबेन राव (वर्मा) :-

१९३० च्या सविनय कायदेभंग आंदोलनात भाग घेऊन त्यांनी आपल्या सार्वजनिक जीवनाला सुरुवात केली. १९३९ पासून काँ. च्या सभासद झाल्या होत्या.

वैयक्तिक सत्याग्रहात भाग घेऊन पदयात्रा केली. १९४५ मध्ये कॉ.च्या अध्यक्ष होत्या.

१९४१ मध्ये अमरावतीला हिंदु मुसलमानांचा जातीय दंगा झाला. तणाव जोरदार होता. त्यावेळी दोन्ही समाजाच्या मध्ये जाऊन उभ्या राहिल्या व तणाव शांत करण्याचा प्रयत्न केला. दोन्ही समाजाच्या महिलांना दंग्याच्या जागेवरुन एकटीने हलवून सुरक्षित स्थळी पोहोचविले.

खादी वारण्याचा निर्धार :-

१९४२ च्या आंदोलनात युवक युवतींसह सहभागी झाल्या. त्यांना दीड वर्षाची शिक्षा झाली. त्यांच्या मार्गदर्शनामुळे आणि त्यांच्या पासून स्फूर्ती घेऊन बऱ्याच महिलांनी सुंदराबाई पटेरिया सारखी कामे केली. अमरावतीच्या वडाळी तुरुंगात खादीचे कपडे घालेन असा निर्धार व्यक्त केला. स्त्री पोलीसांनी त्यांचे कपडे काढले. दुसरे कपडे घातले नाही. जेलमधील पुरुष वर्गाने उपोषण सुरु केले त्यांत शंकरराव पापडकरही होते. कांताबेनला खादीचे कपडे द्यावे म्हणून पुरुष वर्गही स्वत: उपोषण करुन त्यांच्या निर्धारामागे उभा राहिला. जेलरने उपोषण कर्त्यांना पाणी दिले नाही. शेवटी मासुमअली जेलचे सुपरिटेंडेट व कुंभारे हे जेलर होते. त्यांनी आपला हट्ट सोडून त्यांना खादीचे कपडे दिले. परंतु जेल कायदा तोडला म्हणून पुन्हा ६ महिन्याची कांताबेनची शिक्षा वाढविली.

अमरावती शहरात ज्यांनी निरनिराळ्या चळवळीत भाग घेतला त्यातील अनेक कुटुंबापैकी देवधरांचे कुटुंबही तितकेच महत्वाचे आहे. स्वत: हरिपंत देवधर सरकारी नोकरीत होते. परंतु त्यांच्या कुटुंबातील (पत्नी, भाऊ, मुले) ह्यांनी स्वातंत्र्य चळवळीत भाग घेतला. लक्ष्मीबाई देवधर , पार्वतीबाई पटवर्धनांसोबत बऱ्याच वेळी त्यांच्या राष्ट्रीय कार्यात सहभागी होत असत. देवधरांच्या मुली कु. शांता व इंदू ह्या जुळ्याभगिनी प्रभात फेऱ्यामध्ये राष्ट्रीय गाणी आणि सभांमध्ये स्वागत गीते म्हणावयास जात असत त्यावेळी ह्या भगिनींचे वय आठ वर्षाच्या दरम्याने होते. ह्या भगिनी, पटना दिनाच्या दिवशीही मिरवणुकीत होत्या. इंदू खेडकर ह्या अमरावती मधील आझाद हिंद सेनेच्या लक्ष्मी दलाच्या अमरावती शाखेत कांताबेन राव सोबत काम करीत. ह्या दलात कुऱ्हेकर व भटांच्या मुलीही होत्या. ह्या दलातील स्त्रियांची संख्या बरीच मोठी होती.

शांती नायजी पिंजरकर :-

जन्म गांव शेंदरजना घाट, ता.मोर्शी, जि.अमरावती यांनी १९२३ मध्ये शस्त्र सत्याग्रहात भाग घेतला. १९३० साली जंगल सत्याग्रह दारु पिकेटिंग खेडोपाडी प्रचार कार्य केले. १९४२ साली सत्याग्रहात भाग घेतला.

प्रभावती बाळकृष्ण बेलसरे :- जन्म १९२३ ता.मोशी, जि.अमरावती शिक्षण मराठी चवथ्या इयत्ते पर्यंत, यांनी १९४२ च्या चळवळीत १ वर्ष भूमिगत राहून कार्य केले.

(सौ.दमयंति पाठक, नागपूर. यांच्या सहकार्याने)

प्राचार्या, सौ.माणिक पाटील

नुकताच महाराष्ट्र शासनाने सौ.पाटील यांना "पंडिता" ही पदवी प्रदान केली. आणि त्या प्रकाशात आल्या. प्रसिध्द नव्हत्या असे नाही. परंतु आपल्या ज्ञान दानाच्या आणि संस्कृतच्या प्रेमाच्या कार्याची ही पावती असे त्या मानतात. अशी पावती त्यांनी कधी कोणाला मागितली नाही. सर्व मानसन्मान त्यांच्याकडे चालत आले.

प्रा.सौ.पाटील यांचा जन्म दि. ६.४.१९३६. त्यांचे वडील कै.श्री.गोविंदराव बोधनकर यवतमाळला शिक्षक होते. त्या इ.१९५२ साली मॅट्रिक झाल्या. शालेय जीवनात वक्तृत्व निबंध स्पर्धा यात त्या सहभागी होत होत्या. इ.१९५६ मध्ये बी.ए.झाल्या. इ. १९५९ मध्ये संस्कृत मध्ये एम्.ए. व १९९२ मध्ये मराठी विषयात एम.ए. झाल्या. डॉ.श्री.भा.वर्णेकर (प्रज्ञाभारती) सारख्या महान विभूतीच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी अर्वाचीन संस्कृत महाकाव्यांचे समालोचन ह्या विषयावर पी.एच्.डी. चा प्रबंध लिहून पदवी प्राप्त केली.

चंद्रपुर, यवतमाळ येथे शिक्षिकेची नोकरी केली. व इ. १९६८ पासून निवृत्ती पर्यत (इ.१९९६) महिला महाविद्यालय, अमरावती येथे प्राचार्य पदी होत्या. नूतन विदर्भ शिक्षण मंडळ अमरावती. ह्या संस्थेच्या वतीने हे महाविद्यालय चालविण्यात येते. सौ.माणिक पाटील यांनी संस्थेच्या प्रशासनावर आपल्या कर्तबगारीचा ठसा उमटविला. त्यांच्यापासून संस्थेत अनेक सुधारणा आल्या. महिला महाविद्यालयास

त्यांनी उज्ज्वल कीर्ती मिळवून दिली. आर्थिक दृष्टीने महाविद्यालय स्वावलंबी केले. म.म. चे स्नेहसंमेलन म्हणजे ज्ञान व दर्जेदार उच्च अभिरुचीच्या कार्यक्रमांचे केंद्र स्थान बनले. संस्थेचे अध्यक्ष व म.म. चे संस्थापक कै.बाबासाहेब खापर्डे यांच्या नावाने प्रतिवर्षी व्याख्यान माला सुरु केली. भारतातील नामवंत वक्ते येथे व्याख्यान मालेत आपले विचार मांडून गेले आहेत. स्वाध्याय सत्र सुरु करुन वर्गातील अभ्यासा व्यतिरिक्तहि परीक्षांची पूर्वतयारी विद्यार्थिनीकडून करुन घेतली. त्या त्या विषयातील गुणवत्ता पारितोषिक विद्यार्थिनी लीलया मिळवू लागल्या. विद्यार्थिनींना आधुनिक जगत व सांस्कृतिक विश्व यांचा परिचय व्हावा म्हणून राज्यशास्त्र, अर्थशास्त्र, गृहविज्ञान शास्त्र, इ. विषयांच्या परिषदा भरविल्या. त्यांनी सुरु केलेली प्रार्थना पध्दति आदर्श आहे. प्रत्येक कार्यक्रमाच्या अखेरीस पसायदान गायिले जाते. प्रार्थना व पसायदान श्रवण करणे हा एक रोमांचक क्षण असतो. महिला महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थिनींची संघटना स्थापन केली. त्यांना संस्कृत अभ्यास मंडळ, नागपूर विद्यापीठ विव्दत् परिषद, नागपूर विद्यापीठ सिनेट, अमरावती विद्या-सिनेट सदस्य अशी पदे प्राप्त झाली. यवतमाळ च्या अणे महाविद्यालयावर सदस्यता प्राप्त झाली आहे. अनेक विद्यालयांच्या निवड मंडळावर सदस्यत्व लाभले आहे. त्यात यवतमाळ, मेहेकर, पुसद, अमरावती येथील महाविद्यालयांचा समावेश आहे.

त्यांचे सामाजिक कार्य प्रशंसनीय आहे. वनिता समाज अमरावती, शारदा उद्योग मंदीर अमरावती येथे त्या आजीवन सदस्या आहेत. अमरावतीच्या महिला मंडळाच्या आजीवन सदस्य आहेत. हुंडा निर्मूलन मंडळाच्या समाज कल्याण खात्याच्या सदस्या आहेत. नूतन विदर्भ शिक्षण मंडळाच्या सचिव, उपाध्यक्ष अशी पदे भूषविली आहेत. इ. १९९१ साली लोक अदालत चे अध्यक्षपद त्यांनी भूषविले. अंबा जेसीज, रोटरी क्लब अमरावती येथे भाषणे दिली आहेत. ह्या उत्तम प्रकारच्या लेखिका आहेत. शर्मिष्ठा दास्यम्, अर्थस्थ पुरुषोदास:, कन्यादानम् ही संस्कृत मधील नाटके त्यांनी रचली. ह्या नाट्य प्रयोगांना शासकीय पारितोषिके मिळाली आहेत.

नागपूर नभोवाणीवरुन त्यांना अनेक वेळा स्त्री विषयक समस्यांवर

भाषण देण्यासाठी पाचारण केले होते. अनेक विशेषांकांतून त्यांचे विविध विषयांवर लेख प्रकाशित झाले आहेत. अनेक विख्यात संस्कृत संमेलनात त्यांनी निबंध वाचन केले आहे. यवतमाळ, वणी, पुसद, हिंगणघाट, उमरखेड, परतवाडा, इ.ठिकाणी सांस्कृतिक शैक्षणिक विषयांवर त्यांची भाषणे झाली आहेत. त्यांचा व्यासंग निवृत्तीनंतर खंडित झाला नसून, महाकाव्यांचे दार्शनिक अधिष्ठान ह्या विषयावर डी.लिट्.साठी प्रबंध लिहित आहेत. एस्.एन्.डी.टी. विश्वविद्यालय, पुणे व स्त्री शिक्षणातील प्रशासन व नियोजन खाते, भारत सरकार, नवी दिल्ली, यांच्या संयुक्त विद्यमाने भरलेल्या अभ्यास शिबीरास उपस्थित राहून सौ.माणिक पाटील यांनी उद्बोधन केले. इ.१९९३ साली दिल्लीला भरलेल्या एन्.आय.इ.पी.ए.ने आयोजित केलेल्या प्राचार्य पदाचे व्यवस्थापन व नियोजन ह्या राष्ट्रीय पातळीवरील परिषदेत त्यांनी उद्बोधन केले. इ.१९९७ साली महाराष्ट्र शासनाने त्यांना संस्कृत पंडिता ही पदवी बहाल केली.

मृदू अंत:करण, कोमल स्वभाव, शिस्तप्रिय, व्यवहारात व हिशेबात चोखपणा, सहकार्य वृत्ति, मनमिळाऊपणा, भारदस्तता आणि शालीन आत्मसंयम, प्रसंगी कठोर निर्णयशक्ति, उच्च अभिरुची, ज्ञानलालसा अशा बहुविध गुणांनी त्यांचे व्यक्तिमत्व विनटले आहे. महिला महाविद्यालयातील स्नेह संमेलन प्रसंगी श्री.बिंदू माधव जोशी यांनी त्यांना मिळालेला सत्कार सौ.माणिकताई पाटील यांना तेथल्या तेथे नम्रतेने प्रदान केला. ह्यात दोघांचाहि गौरव झाला.

आकांक्षा पुढती जिथे..... कै.कमलताई ठाकूरांचे योगदान

खरे तर कमलाताईचा जन्म नागपूरचाच ! १९११ मधला. पण कर्मभूमी मात्र अमरावतीची ! आईविना वाढलेल्या कमलाताईना वडिलांनी अतिशय कौतुकाने वाढवले. म्हणूनच कमलाताईचे वडिलांवर नितांत प्रेम आणि श्रध्दा होती. त्यावेळचा समाज स्त्रियांनी शिक्षण घ्यावे असा नव्हताच. पण घरी मात्र शिक्षणाचे धडे त्यांनी घेतले. नागपूरच्या सेंट उर्सुला शाळेतून त्या मॅट्रिक पहिल्या वर्गात उत्तीर्ण झाल्या. शिक्षणाचे प्रचंड आकर्षण असूनही त्या काळाप्रमाणे लग्न लवकरच झाले. परंतु मनामध्ये पदवी परीक्षा पास व्हायचेच ही महत्त्वाकांक्षा होती. कमलाताईचे पती श्री.त्रिंबकराव

ठाकूर मुंबईचे वकील झालेले! पण व्यवसायानिमित्त अमरावतीला आलेले ! तेहि सुधारक विचारांचे असल्याने अमरावतीला किंग एडवर्ड कॉलेजमध्ये कमलाताईनी आपले बी.ए.पर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. कॉलेजमध्ये असताना अनेक वक्तृत्व आणि वादविवाद स्पर्धा त्यांनी जिंकल्या आणि अतिशय हुशार व अभ्यासू विद्यार्थिनी म्हणून नावलौकिक मिळवला. ज्या काळात मुलींना शिकायलाही मिळत नव्हते, त्या काळात म्हणजे १९३५ साली त्या बी.ए. झाल्या. एवढेच नव्हे तर अमरावतीच्याच गव्हर्नमेंट गर्ल्स हायस्कूलमध्ये शिक्षिका म्हणून अध्यापन केले. प्रसन्न आकर्षक व्यक्तीमत्व आणि जीव तोडून शिकवण्याची तळमळ यामुळे त्या विद्यार्थिनींमध्ये प्रिय शिक्षिका होत्या. पण दुर्देवाने तरुणपणातच श्रवणशक्ती कमी झाली व त्यामुळे ते काम सोडावे लागले.

त्यांच्या मनावर या आघाताचे दु:ख जरुर झाले, परंतु त्यांनी श्रवणयंत्र मिळवले. त्या काळी ते चांगलेच अवघड होते. परंतु ते वापरण्यात कमीपणा न मानता त्यांनी समाजक्षेत्रात प्रवेश केला. त्यांच्या चिकाटीचे आणि काम करण्याचे कुणालाही कौतूक वाटावे असेच त्यांचे कार्य होते बी.ए. ला असतांना घरच्या अडचणींमुळे त्यांचे शिक्षण थांबण्याची वेळ आली, तेव्हा नागपूरला त्यांचे मामा शिक्षणप्रेमी ॲड. बाबुराव हेर्लेकर यांच्याकडे राहून त्यांनी एक वर्ष पूर्ण केलं आणि पदवी प्राप्त केली. त्यांच्या जिद्दीमुळेच श्रवण-दोष येऊनही त्यांनी अनेक कार्यात स्वत:ला वाहून घेतले. अमरावतीच्या 'वनिता समाज' या प्रसिध्द संस्थेच्या त्या संस्थापक सदस्य होत्या. बालशिक्षण आणि स्त्रियांना मदतीचा हात देणे अशी त्या संस्थेची उद्दिष्टे होती. श्री.त्रिंबकराव ठाकूरही कॉग्रेसचे सक्रिय कार्यकर्ते होते. बेचाळीसच्या आंदोलनात त्यांनी कारावास भोगला होता. कमलताईही कॉग्रेसच्या महिला आघाडीत काम करीत होत्या. प्रभावी वक्तृत्व आणि काम करण्याची तळमळ यामुळे त्या काँग्रेसच्या महत्त्वाच्या कार्यकर्त्या बनल्या. याच सुमारास अमरावतीला डॉ.राजेंद्र प्रसाद यांचे भाषण होते. डॉ.राजेंद्र प्रसादांनी ते भाषण इंग्लिशमधून केले. त्यावेळच्या समाजाला ते मराठीतून हवे होते. त्यावेळेस व्यासपीठावरुन सांगण्यात आले की राजेंद्र प्रसादांच्या भाषणाचा मराठीत अनुवाद ज्याला करता येत असेल. त्यांनी स्टेजवर यावे. प्रचंड

हजारोंचा समुदाय . . .. थोडा वेळ स्तब्धतेत गेला आणि एक प्रसन्न व्यक्तीमत्वाची नऊवारी साडी घातलेली स्त्री शांतपणे पावले टाकीत व्यासपीठावर गेली आणि सांगितले की मी करते अनुवाद ! . . . . ती स्त्री होती कमलाताई ठाकुर ! आणि त्यांनी तिथल्या तिथे त्यांच्या भाषणाचा अनुवाद केला.

स्वस्थ बसणे त्यांना माहितच नव्हते. काही काळाने 'शारदा उद्योग मंदिर' ही महिलांसाठी सहकारी संस्था त्यांना व कै.ताराबाई पाध्ये यांनी मिळून स्थापन केली. काही मतभेंदामुळे त्या संस्थेतून कमलाताई बाहेर पडल्या व 'महिला सहकारी औद्योगिक भांडार' ही स्वतंत्र संस्था स्थापन केली. एकूणच महिलांच्या उन्नतीकडे त्यांनी सतत लक्ष दिले. भारत सरकारने पंचवार्षिक योजनांच्या अंतर्गत 'योजना परिपुरण समित्या ' (प्रॉजेक्ट इम्प्लिमेंटिक कमिटीज) स्थापन केल्या होत्या. त्यात अमरावती जिल्ह्याचे काम कमलाताईकडे सोपवण्यात आले होते. त्या केंद्रांना नियमित भेटी देऊन, गावकऱ्यांचा विश्वास त्यांना संपादन केला. कुटूंब नियोजन योजनेचेही अमरावती जिल्ह्याचे काम त्यांच्याकडे होते. खेडोपाडी जाऊन स्त्रियांचे प्रश्न समजावून घेऊन त्या तळागाळातल्या स्त्रियात मिसळत राहिल्या.

अमरावतीच्या बालशिक्षण मंडळाच्या त्या अध्यक्षा होत्या. निवृत्तीनंतरही त्या संस्थेच्या सल्लागारपदी काम करत राहिल्या.

राजकीय-सामाजिक जीवनात अतिशय नि:स्वार्थीपणे व तळमळीने काम करणाऱ्या गेल्या पिढीतील त्या ध्येयवादी कार्यकर्त्या होत्या. कित्येक पुरस्कार त्यांच्यापर्यंत येऊन परत गेलेत, पण त्याची तमा त्यांना बाळगली नाही. कामाची नशा त्यांना होती, त्यात त्या इतक्या समरस होत की त्या काळाप्रमाणे उगाचच कुठे वेळ काढावा असे त्यांना वाटले नाही. बुध्दिमत्तेबरोबर कलात्मकता, साहित्याची आवडही त्यांनी जोपासली होती. कौटुबिंक क्षेत्रातही त्यांना कधी नीरसपणे पाहिले नाही. घरगुती समारंभ- कलात्मकतेने साजरे करण्यात त्यांचा कटाक्ष असे. स्वत: अतिशय पाककुशल होत्या. भरतकाम उत्तम करीत. डोळ्यांमुळे भरतकाम जमेनासे झाले. तसे त्यांनी वीणकाम सुरु केले. ते अक्षरश: अखेरपर्यंत, त्यात मुलं-मुली-नातवंडाबरोबर

घरकाम करणाऱ्यांच्या मुला-मुलींसाठीही स्वेटर विणले ! एखाद्याचा जन्मच दुसऱ्यांसाठी फुलण्याचाअसतो.

स्मरणशक्तीचे वरदान त्यांना लाभले होते. संस्कृत, इंग्रजी, मराठी अवतरणे त्यांना सहज सुचत असत. वाचनाची आवड तर शेवटपर्यंत टिकून होती. दोन्ही डोळ्यांवर मोतीबिंदूची शस्त्रक्रिया झालेली; त्या जाड काचेतूनही दिसेना तेव्हा मॅग्निफाईंग ग्लास घेऊन त्या सतत विविध विषयांचे वाचन करीत राहिल्या. प्रखर बुध्दिमत्ता, अढळ ध्येयवाद आणि जीवनात आनंद घेण्याची वृत्ती यांचे आगळे शिक्षण त्यांच्या स्वभावात होते. कॉंग्रेसचे काम दोघेही नवरा-बायको करीत. त्यांत त्रिंबकरावांना राजकारणात वरपर्यंत जावे असे वाटत असताना, कार्यरत कमलाताईनाच अशी विचारणा झाली, पण त्यांनी सौम्यपणे नकार दिला. केवळ पतीला त्यामुळे दु:ख होऊ नये, या भावनेतून त्यांनी त्यांचे कौटुंबिक स्वास्थ्य जपले. आजच्या तू-मी च्या स्पर्धेच्या काळात हा त्यांचा गुणमहत्वाचा ठरतो. त्यामुळे त्यांच्या सहवासात आलेली माणसे प्रभावित झाली तर नवल नव्हते. त्या गेल्या तरी त्यांच्या कार्याने अमर झाल्या. आफ्रिकन पोएट्रीत मृत्यूला Lotus Flower (कमळाचे फूल) म्हटले आहे. जीवन-मृत्यु संदुर करणाऱ्या या 'कमला' नावाप्रमाणेच कमलाताईचे जीवन होते. त्या पवित्र फुलाप्रमाणे भारतीय संस्कृतीचे 'स्त्री' असण्याचे सारे आयाम शेवटपर्यंत कमलाताईनी समाज, राजकारण-राष्ट्राला दिले. त्यांनी आत्मचरित्र लिहिले असते तर एखाद्या तेजस्वी बुध्दिवान स्त्रीचे हे चरित्र मराठी वाङ्मयात अजरामर ठरले असते.

डॉ.सुलभा हेर्लेकर

शेवटची वेल सुकली ?

विदर्भातील थोर सामाजिक कार्यकर्ते, कृषी व शिक्षण तज्ञ स्व.भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांच्या पत्नी श्रीमती विमलाबाई देशमुख यांच्या निधनाने शिवपरिवारातील शेवटची वेल सुकली असे म्हणावे लागेल. श्रीमती विमलाबाई गेल्या काही वर्षापासून आजारी अवस्थेत नागपुरातील रामदासपेठमधील चेतना सहनिवासात जवळपास एकाकी आयुष्य जगत होत्या. त्यांचे सुपुत्र

श्री.बाळासाहेब देशमुख यांचे १९७१ मध्ये निधन झाल्यानंतर तर त्या निराधारच झाल्या होत्या. पण गो.से.वाणिज्य महाविद्यालयाचे माजी प्राचार्य श्री.आत्मारामजी उखळकर यांनी विमलाबाईची आस्थेने सेवाशुश्रुषा केली. पण शेवटी वार्धक्य हा भाग आहेच. त्या अवस्थेतच विमलाबाईना काही व्याधींनी गाठले आणि त्यातच त्यांचा करुण अंत झाला. भाऊसाहेबांसारख्या एवढ्या थोर कार्यकर्त्याच्या पत्नीची त्यांच्या निधनानंतर अशी वाताहात व्हाही, हा अतिशय वेदनादायक प्रकार आहे.

थोरा-मोठ्यांच्या पत्नींच्या बाबतीत दोन प्रकारचे अनुभव येतात. एकतर त्या आपल्या थोर पतीच्या सावलीतच पडद्यामागे अप्रसिध्द अवस्थेत वावरत असतात. एखादा जाहीर सत्कार-समारंभ वगैरे झाला तर त्यात त्या महिलेला थोर कार्यकर्त्याच्या यशातील वाटेकरी ठरविले जाते. ते अर्थातच औपचारिक. दुसऱ्या प्रकारात थोर कार्यकर्त्यांच्या पत्नी 'घोड्यापेक्षा खोगीर जास्त उसळतो' या नात्याने आपला तोरा मिरवीत असतात. पण विमलाबाई या दोन्ही प्रकारांपेक्ष वेगळ्या होत्या. त्यांना प्राप्त झालेल्या मोठेपणाचा केवळ भाऊसाहेबांच्या पत्नीपणाशी संबंध नव्हता. त्या स्वत: सुविद्य होत्या आणि भाऊसाहेबांच्या बरोबरीने सामाजिक कार्यात सहभागीही होत होत्या. एक प्रकारे या भाऊसाहेबांच्या सहकारीच होत्या. श्री.शिवाजी शिक्षण संस्थेच्या विस्तारात जशा त्या रुची घेत होत्या तशाच राज्यसभा सदस्य या नात्याने त्या संसदही गाजवीत होत्या. शिवपरिवारातील कार्यकर्त्यासाठी तर त्या मातोश्रीच होत्या. अशा या कार्यकर्तीचे दिवस उपेक्षित अवस्थेत जावेत, हा दैवदुर्बिलासच म्हणावा लागेल. श्रीमती विमलाबाई देशमुख यांच्या निधनाने विदर्भ एका ज्येष्ठ व प्रेरक व्यक्तीतत्वाला मुकला आहे. त्यांच्या स्मृतीस श्री नरकेसरी प्रकाशन या तरुण भारत यांच्या वतीने विनम्र अभिवादन.

भारतातील महत्वपूर्ण स्त्रीरत्ने

संयुक्त राष्ट्रसंघाची (युनो) पहिली स्त्री अध्यक्षा	विजयालक्ष्मी पंडित
पहिली केंद्रीयमंत्री	राजकुमारी अमृत कौर
पहिली स्त्री मुख्यमंत्री	सुचेता कृपलानी
पहिली स्त्री राज्यपाल	सरोजिनी नायडु
पहिली स्त्री आमदार	मुन लक्ष्मी रेड्डी
भारताची पहिली राजदूत	बी. मुथम्मा.
भारतीय नौसेना प्रथम कमांडर	डॉ.बाबरी घोष
पहिली महिला डीएसपी	शंकुतला विराष्ट
पहिली महिला जज्ज	अण्णा रेड्डी
प्रथम महिला सर्जन	डॉ.मेरीशनन लुमोडा
प्रथम महिला स्त्री इंजीनिअर	जे.ललिता
प्रथम महिला विश्वसुंदरी	रिता क्रिया
भारतातील भारतीय रेल्वेच्या प्रथम महिला इंजिन ड्रायव्हर	श्रीमती सुरेखा भोसले
प्रथम महिला पंतप्रधान	श्रीमती इंदिरा गांधी
पहिली व्यावसायिक टेनिसपटू झालेली भारतीय महिला	सुझान लेंगलीन
प्रथम शौर्य चक्राची मानकरी	मोहसीना उर्फ मनीषा वर्मा
भारतातील पहिली महिला पोस्टमन इंग्लीश खाली पोहून जाणारी	तारा चौधरी

पहिली महिला	आरती शहा.
दिल्लीच्या सिंहासनावर बसलेली पहिली महिला	रजिया सुलतान
१९९२ च्या 'बोरलॉग' पारितोषिकाची पहिली स्त्री मानकरी	डॉ.अमृता पटेल
सुप्रीम कोर्टाच्या पहिल्या स्त्री न्यायाधीश	श्रीमती मिरासाहेब फतिमा बीबी
भारतीय महिला कॉम्प्युटर	श्रीमती शंकुतला देवी
पहिली भारतीय महिला सभापती	सुशिला नायर
भारताची सुवर्ण कन्या	पी.टी.उषा
तुरंग महानिरीक्षक ही पदवी भूषविणारी पहिली महिला	आर.पी.एस.किरण बेदी
पहिली महिला डॉक्टर	आनंदीबाई जोशी
प्रथम भारतीय राष्ट्रगीत गाणारी महिला	श्रीमती पोर्णिमा मुखर्जी
हवाई छत्रीव्दारे अवकाशात उडणारी पहिली भारतीय महिला	कॅप्टन गीता चंद्रा
प्रथम दादासाहेब फाळके पुरस्कार मिळविणारी महिला	श्रीमती देवकीरानी
उत्तर ध्रुवावर पाऊल ठेवणारी पहिली भारतीय महिला	प्रीतीसेन गुप्ता
प्रथम एअर इंडिया पायलट महिला	प्रीतू अहुलवालिया

संकलन - विजकुमार के.फुटाणे, अंबाडा, तालुका मोर्शी

परिशिष्ट ४

डॉ.आंबेडकरांनी ता. १४ नोव्हेंबर १९२९ रोजी अमरावतीच्या इंग्रभुवन थिएटर मध्ये दिलेले महत्वाचे भाषण :-

१९२७ च्या आगस्टमध्ये उमरावती येथे अंबादेवीच्या मंदीर प्रवेशाळाच्या प्रश्नाचा विचार करण्याकरीता सर्वपक्षीय कार्यकर्त्यांची परिषद भरली होती. तिच्या अध्यपदावरुन भाषण करतांना डॉक्टर साहेबांनी मंदीर प्रवेशाच्या सत्याग्रहाचे असे समर्थन केलेले होते की, ''आम्हाला ही गोष्ट सिध्द करावयाची आहे की, आमच्या प्रवेशाने देवालय भ्रष्ट होत नाही किंवा स्पर्शाने मूर्तीचे पावित्र्य कमी होत नाही. देवळे जरी स्पृश्य हिंदूंनी बांधली, तरी ती हिंदू धर्माची असून हिंदू धर्माकरीता बांधलेली आहेत. हा दावा कोण एकाने केलेला असला, तरी तो सर्व हिंदूच्या उपयोगाकरीता आहे. . . .

सांस्कृतिक दृष्टीने - ही हा प्रश्न अत्यंत महत्वाचा आहे. हिंदूत्व ही जितकी स्पृश्यांची मालमत्ता आहे तितकीच अस्पृश्यांचीही आहे. ह्या हिंदुत्वाची प्राण प्रतिष्ठा जितकी वशिष्ठा सारख्या ब्राम्हणांनी कृष्णासारख्या क्षत्रियांनी, हर्षा सारख्या वैश्यांनी, तुकारामा सारख्या शूद्रांनी, तितकीच वाल्मीकी, चोखामेळा, रोहिदास इत्यादि अस्पृश्यांनीही केलेली आहे. या हिंदूत्वाचे रक्षण करण्यासाठी हजारो अस्पृश्यांनी आपली माणूसकी खर्ची घातली आहे. ''व्याध-गीते'' तील अस्पृश्य दृष्ट्या पासून तो खार्ड्याचे लढाईतील सौदनात महारापर्यंत ज्या अस्पृश्यांनी हिंदुत्वाच्या संरक्षणार्थ आपले शिर हातावर घेतले, त्याची संख्या लहान होणार नाही. ज्या हिंदुत्वाची रास स्पृश्य व अस्पृश्य या अभयतांनी मुठ टाकून वाढवली आणि तिच्यावर घाला आला असता, जिवाची पर्वा न करतां तिचे रक्षण केले, त्या हिंदुत्वाच्या नावाखाली उभारलेली मंदीरे जितकी स्पृश्यांची तितकीच अस्पृश्यांचीही आहेत. त्यावर जितका स्पृश्यांचा तितकाच अस्पृश्यांचाही वारसा आहे. एकदा वारसा मान्य केली की, मग जुन्या वहिवाटीचा प्रश्नच शिल्लक राहात नाही. कारण, कायद्याच्या दृष्टीने पहाता, सार्वजनिक बाबतीतील व्यक्तीमात्राचा हक्क कोणास काही सनद देऊन निर्माण करावयाचा नसतो. तो दरेकाचे ठायी कायमच असतो. त्याची वहिवाट नसली किंवा त्यांच्या वहिवाटीत जरी खंड पडला तरी तेवढ्यावरुन तो हिरावला जात नाही.'' १.

१. महाराष्ट्राचे विचारधन (पृ. १६९-१७०)

परिशिष्ट ५

अमरावतीतील विधायकांचा परिचय :-

१. श्री.रामकृष्ण सुर्यभानजी गवई, बी.ए. (उपसभापति)
२. श्रीमती प्रतिभा देवीसिंह पाटील. मंत्री १९९१ ते ९५
३. श्री.शरद मोतीराव तसरे (उपसभापति)
४. श्री.नरसिंगराव शेषराव देशमुख (आमदार)
५. श्री.पुरुषोत्तम काशीराव देशमुख (मंत्री) सी.पी.
६. श्री.रामू म्हातंग पटेल (मेळघाट, जि.अमरावती.)
७. श्रीमती कोकिळाबाई पाटील (दर्यापुर) (मंत्री)
८. श्री.मल्हारराव गणपतराव माहूलकर (मंत्री)
९. श्री.दत्तात्रय नागोराव मेटकर (बबनराव) आमदार १९७२ ते ७८
१०. श्री.धैर्यशील विनायकराव वाघ (आर्णी) (कै.)
११. श्रीमती प्रतिभा भगवंत तिडके (मुर्तिजापूर)
१२. कुमारी मालती जोशी (आमदार) १९५७ ते ६२
१३. श्री.सुरेंद्र भुयार (मंत्री) १९७८ ते ८०; ८० ते ८५.
१४. श्री.जगदीश गुप्ता (मंत्री) १९९० ते १९९५ ; १९९५ ते
१५. श्री.रामदयाल गुप्ता (आमदार) (कै.) सी.पी. ॲड बेरार.
१६. कै.म.श्री.दादासाहेब खापर्डे (व्हाईसरॉय कॉन्सील)
१७. श्री.पंजाबराव देशमुख. केंद्रीय मंत्री (कै.) १९६२ ते १९६५.
१८. सौ.उषाताई चौधरी खासदार १९८० ते ८५ व ८५ ते ८९
१९. श्री.देविसिंह पाटील, आमदार १९८५ ते १९९०.
२०. सौ.प्रतिभा पाटील (उपसभापति) १९९१-९५
२१. श्री.बाळकृष्ण गणेश खापर्डे (मंत्री) (कै.) १९३६ ते ३८ सी.प.
२२. श्री.विठ्ठल बंधुजी चौबळ (मंत्री) (कै.) सी.पी.- बेरार
२३. श्री.के.जी. देशमूख खासदार (कै.) १९५२ ते ६२; १९६७ ते १९७१ ; १९७१ ते १९७५



डॉ. बाबासाहेब आंबेडकर

२४. श्री.काकासाहेब नवाथे आमदार (कै.) १९६७ ते १९७२

२५. वीर वामनराव जोशी (आमदार) (कै.) ५२ ते ५७

२६. श्रीमती विमलाबाई देशमूख (खासदार) (कै.) १९६५ ते १९६७

२७. श्रीमती वसुधा देशमूख (आमदार)

२८. श्री.एन.यू. देशमुख (मंत्री) (कै.)

२९. श्री.नानासाहेब बोंडे (खासदार) १९७७ ते १९८० (कै.)

३०. श्री.सुदाम देशमूख (खासदार) १९८९ ते १९९१ (कै.)

३१. श्री.अनंतराव गुढे (खासदार) १९९५ ते

३२. श्री.उमरलाल केडिया (आमदार) १९६२ ते ६७ (कै.)

दादासाहेब गवई :-

पूर्ण नाव रामकृष्ण सूर्यभानजी गवई.

जन्म दि. ३०.१०.१९२९ दारापूर ता.दर्यापुर, जि.अमरावती.

शिक्षण - बी.ए.

वाचनाची आवड, व्यवसाय शेती, रिपब्लिकन पक्षाचे कार्यकर्ते, मार्गदर्शक, व नेते शैक्षणिक व सामाजिक सुधारणा घडविण्याच्या उद्देशाने कार्य केले. विशेषत: दलितोद्धाराचे कार्य. डॉ.बाबासाहेब आंबेडकर शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष डॉ.आंबेडकर स्मारक समिती, नागपूर चे अध्यक्ष इ. १९६४ ते १९७० पर्यंत नागपूर विद्यापीठाच्या विधीसभेचे सदस्य इ. १९५९ मध्ये विदर्भ रि. पक्षाचे सचिव, संयुक्त महाराष्ट्र चळवळीत सहभागी. विदर्भ स.न. समितीचे सचिव इ. १९६३ मध्ये महाराष्ट्र विधान परिषदेचे सदस्य बनले. इ. १९६० मध्ये उपसभापति पदासाठी निवड झाली. इ. १९६९ मध्ये कॉमनवेल्थ पार्लमेंटरी असोशि. चे प्रतिनिधी (त्रिनिदाद) इ. १९७० मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड व उपसभापति पदावर फेरनिवड. शिवाय, मागासवर्गीय रोजगार विषयक व समाज कल्याण समितीचे सदस्य. इ. १९७२ मध्ये रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्ष. महा. राज्य शेतमजूर (किसन वेतन) समिती व राष्ट्रीय

एकात्मता समिती; इ. समित्यांचे सदस्य. इ. १९७६ मध्ये महा. राज्य विधान परिषदेवर फेरनिवड. लोकसभेवर निवड , राज्यसभेवर निवड.

अखिल जागतिक बौध्द महासमितीचे सदस्य.

राम मेघे :-

पुर्ण नाव - राम कृष्णराव मेघे.

जन्म - दि. ८.१२.१९२९. बोरगाव (मेघे), जि.वर्धा. शिक्षण - एम्. कॉम. सहकार, सहकारिता या विषयावर अभ्यासपूर्ण लेखन यांना नाट्य संगीत व खेळ यांची आवड आहे. शेती हा व्यवसाय ; व प्राध्यापक. कॉग्रेस पक्षाचे कार्यकर्ते. महा.प्रदेश युवक कॉग्रेसचे अध्यक्ष महाराष्ट्र भारत सेवक समाजाचे अध्यक्ष विदर्भ यूथ वेलफेअर सोसायटीचे अध्यक्ष. अध्यापक गृहनिर्माण संस्थेचे अध्यक्ष, जय वराह सहकारी संस्थेचे संचालक ; माजी सैनिक वेलफेअर सोसा. चे संचालक ; महा.राज्य अध्यापक समाजाचे संस्थापक. ग्रामसफाई मंडळाचे सदस्य. बोरगाव येथील ग्रामपंचायतीचे सरपंच या नात्याने समाजसेवेस प्रारंभ. महाराष्ट्र खादी ग्रामोद्योग मंडळाचे सदस्य महा. राज्य युवक कल्याण मंडळाचे सदस्य; अमरावती जिल्हा खादी ग्रामोद्योग मंडळाचे अध्यक्ष. इ. १९६८ मध्ये महा. राज्य विधान परिषदेवर सदस्य म्हणून निवड इ. १९७४ मध्ये फेरनिवड. मा. राज्याचे शिक्षण राज्यमंत्री म्हणून कार्य केले.

नारायणराव देशमुख :-

जन्म - २०.९.१९०९, येवदा, ता.दयापूर, जि.अमरावती, शिक्षण - बी.ए., एल.एल.बी.

व्यवसाय - बागकाम, शेती व वकीली.

कॉंग्रेस कार्यकर्ता - अमरावती जिल्हा कॉं. क. चे १९६३-६७ या काळात अध्यक्ष सदस्य विदर्भप्रदेश कॉं.क, महा. प्रदेश कॉं.क.-, अ.भा. कॉं.कमिटी. चे सदस्य दर्यापूर नगरपालिकेचे अध्यक्ष. जनसभा दर्यापूरचे सभासद महाराष्ट्र विधान सभेचे सभासद, उपमंत्री, महा. विधान परिषदेचे सदस्य, अंदाज समितीचे सदस्य, महा. राज्य जलप्रदाय मंडळाचे सदस्य, आश्वासन समितीचे सदस्य.

द.ना. (बबन) मेटकर :-

जन्म दि. ३.१२.१९३४ चिंचोली (पूर्णा), अमरावती. शिक्षण - बी.ए., वाचनाची आवड. काँग्रेस कार्यकर्ता संयुक्त महाराष्ट्र चळवळीत भाग. व कारावास. भारतीय विद्यामंदीर संस्थेचे संस्थापक सदस्य. ह्या संस्थेची ८ विद्यालये, ३ महाविद्यालये व २ वसतीगृहे आहेत. नागपुर विद्यापीठ विद्यार्थी युनियनचे उपाध्यक्ष, नॅशनल कौंसिल ऑफ युनि. स्टुंडटसचे सेक्रेटरी, अमरावती जिल्हा काँ.क.चे सचिव; महा. प्रदेश काँ.क.चे सहसचिव, प्रदेश युवक काँ.क.चे. सहसचिव, १९७२ मध्ये महा. विधान सभेचे सदस्य काँग्रेस पक्षाचे उपमुख्य प्रतोद. अशासकीय ठराव व विधेयक समितीने सदस्य. उपविधान, अंदाज समिती चे सदस्य.

श्रीमती विमलाबाई देशमुख :-

डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या धर्मपत्नी श्रीमती विमलाबाई देशमुख ९.९.१९९७ रोजी नागपूर येथील सहकारी नागरी रुग्णालयात अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ९४ वर्षाच्या होत्या.

श्रीमती विमलाबाई देशमुख ह्यांच्या दु:खद निधनामुळे डॉ.पंजाबराव देशमुख कुळाचा शेवटचा दुवा निखळला. डॉ.भाऊसाहेब विमलाबाई ह्यांचा विवाह २६ नोव्हें. १९२७ साली झाला. विमलाबाई ह्या तळेगाव दाभाडे येथील नाना वैद्य ह्यांच्या कन्या विमलाबाई ह्या सुवर्णकार घराण्यातील असल्यामुळे ह्या आंतजातीय विवाहावर त्या काळात बरीच टिका झाली होती. मुंबईच्या प्रार्थना समाज मंदिरात सत्यशोधकीय पध्दतीने झालेल्या विवाहास अवघे साडे सात वऱ्हाडी भाऊसाहेबांकडून गेले होते. श्रीमती विमलाबाई देशमुख यांनी विवाहानंतर बी.ए., एल.एल.बी. पर्यन्त शिक्षण घेतले लॉ कायद्याची परिक्षा उत्तीर्ण करणाऱ्या त्या काळातील पहिल्या महिला होत. डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या सामाजिक व राजकीय कार्यक्षेत्रात देखील त्या तितक्याच हिरहिरीने सहभागी झाल्या होत्या. १९४६ साली अमरावतीस जीजामाता मंडळ ही महिला संस्था विशेष प्रयत्न करुन स्थापन केले. १९४७ मध्ये विमलाबाईच्या प्रोत्साहनाने अमरावतीस शिव बालमंदिराची स्थापना त्यांनी करुन १९५५ पासून

श्रध्दानंद छात्रालय ची मुलींची स्वतंत्र शाखा त्यांनी उघडली व तिच्या व्यवस्थेकडे जातीने लक्ष घातले. अखिल भारतीय महिला परिषदेच्या सोशल लेजिस्लेशन मेंबर म्हणून समाजाच्या उद्धार कार्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. महिला परिषदेच्या कार्यासाठी आणि भाऊसाहेबांच्या कार्याला हातभार लावण्यासाठी त्यांनी भारतभर परिभ्रमण केले होते. भारतीय ग्रामीण महिलांची अधिकाधिक सेवा करता यावी हाच उद्देश व दृष्टीकोन होता. दोन वेळा त्यांनी राज्यसभेचे सदस्यत्वही सुशोभित केले. डॉ.पंजाबराव देशमुख यांच्या प्रोत्साहनामुळे महिलांच्या विकासासाठी विमलाबाईंनी भरीव कार्य केले. भाऊसाहेब व विमलाबाईचा एकुलता एक मुलगा अनंतकुमार उर्फ बाळासाहेब ह्यांच्या निधनानंतर विमलाबाई ह्या नागपूरच्या रामदासपेठ येथील निवासस्थानी वास्तव्यास होत्या. अल्पशा आजाराने त्यांचे दु:खद निधन झाल्याची. बातमी कळताच शिवाजी संस्थेचे सर्व कार्यालये, शाळा, महाविद्यालय बंद ठेवण्यात येवून अनेक ठिकाणी त्यांच्यावर श्रध्दांजली अर्पण करण्यात आली. मध्यरात्री त्यांचा मृतदेह अमरावतीला आणण्यात आला. त्यांचे पार्थिव अंत्यदर्शनासाठी सकाळी ९ ते १२ वा. रुरल महाविद्यालयाच्या सभागृहात ठेवण्यात आला व दुपारी १ वा. त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यावेळी असंख्य शोकाकुल लोक उपस्थित होते.

स्वास्थ्य उपमंत्री, समाजकल्याण व सांस्कृतिक कार्य मंत्री, समाजकल्याण मंत्री, सार्वजनिक आरोग मंत्री, दारुबंदी, पुनर्वसन, सांस्कृतिक कार्य इ. खात्यांची मंत्रीपदे भूषविली. अमरावती विद्यापीठ, अमरावती महानगर पालिकेच्या निमिर्तीचे काही अशी श्रेय. उत्तम वक्तृत्व. समाजसेवेची तळमळ.

नरसिंगराव शेषराव (भय्यासाहेब) देशमूख :-

जन्म ३०.८.१९२८. तळवेल (अचलपूर) जि.अमरावती., शिक्षण - बी.ए. एल.एल.बी., काँग्रेस कार्यकर्ता विद्यार्थी दशेपासून सार्वजनिक कार्य. व्यवसाय - शेती व वकीली. अमरावती जिल्हा औद्योगिक संघाचे संस्थापक व १९५६ ते ६२ पर्यंत अध्यक्ष बाबाराव शिक्षण संस्थेचे संस्थापक व अध्यक्ष अमरावती भूविकास बँकेचे संचालक सदस्य. भारत कृषक समाजाचे आजीव सभासद. अमरावती जिल्हा

काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अखिल भारतीय काँग्रेस पक्षाचे डेलिगेट. अमरावती जि.प. चे उपाध्यक्ष; चिखलदरा गिरीस्थान नगर परिषद सदस्य; सदस्य महाराष्ट्र राज्य विधान सभा १९६७ व १९७२, संयुक्त महाराष्ट्र आंदोलजनात सहभागी. 'मराठी प्रदेश' ह्या साप्ताहिकाचे संपादक.

रामू पटेल :-

कॉग्रेस कार्यकर्ता, अमरावती जिल्हा परिषदेचे सदस्य; महा. विधान सभेचे सदस्य (१९६७), वनउपमंत्री, १९७२ मध्ये विधानसभेवर फेरनिवड वन व समाज कल्याणमंत्री, सन व तुरुंग खात्याचे राज्यमंत्रीह

देशमुख पु.का. (अण्णासाहेब) :-

जन्म दि. ७.११.१९११, अमरावती. शिक्षण - एम्. ए., एल.एल.बी., व्यवसाय - शेती, वकीली.

काँग्रेस कार्यकर्ता यांनी इ. १९४१, १९४२ व १९४४ यावर्षी आंदोलनात सक्रीय भाग घेऊन कारावास भोगला. सभा, काँग्रेस कार्य कारिणीचे सदस्य. मध्यप्रदेश विधान सभेत सदस्य, महसूलमंत्री, शिक्षणमंत्री, स्थानिक स्वराज मंत्री, १९४६, १९५७, १९६२, १९७२ यावर्षी झालेल्या निवडणुकांमध्ये आमदार पदी विराजमान. मध्यप्रदेश विधानपरिषदेत असतांना जमीनदारी पध्दती नष्ट करण्याच्या कार्यात पुढाकार. संयुक्त महाराष्ट्र आंदोलन समितीचे नेतृत्व. आंदोलनात सहभाग. प्रभावी वक्ते. शेतकऱ्यांच्या आंदोलनात नेतृत्व.

मल्हारराव माहुलकर :-

जन्म - ३१.८.१९३३ करमाबाद, आर्वी, जि.वर्धा, शिक्षण - कृषि प्रशिक्षण (अमेरिका) बी.ए., वाचन ,पोहणे व खेळ यांची आवड, व्यवसाय - शेती, बागकाम., काँग्रेस कार्यकर्ता शेतकरी संघाच्या जिल्हाशाखेचे अध्यक्ष , दि. जवाहर को-ऑप. हाऊसिंग सोसा. चे अध्यक्ष, सदस्य - अमरावती जिल्हा परिषद. शेती व सहकार समितीचे सभापती; महाराष्ट्र विधान परिषदेचे सदस्य मंत्रि.

श्रीमती प्रतिभा पाटील :-

जन्म १९.१२.१९३७, नांदगाव , जि. जळगाव, शिक्षण - एम.ए.एल.एल.बी., वाचनाची आवड, व्यवसाय - शेती, वकीली, राजकारण, काँग्रेस कार्यकर्ता विद्यार्थी दशेतच जनसेवेची आवड; इ. १९६२ ते १९६७, व १९७२ च्या वर्षी झालेल्या निवडणुकांमध्ये आमदार म्हणून निवडून आल्या स्वास्थ्य उपमंत्री, समाजकल्याण, व सांस्कृतिक कार्य मंत्री, समाजकल्याण मंत्री, सार्वजनिक आरोग्य मंत्री, दारुबंदी, पुनर्वसन, सांस्कृतिक कार्य इ. खात्यांची मंत्रिपदे भूषविली. अमरावती विद्यापीठ, अमरावती महानगर पालिकेच्या निर्मितीचे काही अंशी श्रेय. उत्तम वक्तृत्व समाजसेवेची तळमळ.

श्री यशवंतराव शेरेकर :

जन्म दि. १३ जून , १९३४ ता. मोर्शी , जि. अमरावती. बालपणीच १९४२ च्या चळवळीत सहभाग.

शिक्षण :- बी.एस.सी., एल.एल.बी.

हल्ली शेती , बाग बगिचा सांभाळतात.

विद्यार्थी दशेपासून सामाजिक कार्याची आवड होती. अमरावती विदर्भ महाविद्यालयात असतांना संयुक्त महाराष्ट्र विद्यार्थी परिषदेच्या स्थापनेत व चळवळीत पुढाकार. वि.म.वि. मध्ये पदव्युत्तर वर्ग सुरु करावे , कापूस बाजार ते वि.म.वि. पक्का रस्ता करावा, अमरावतीस विद्यापीठ स्थापन करावे , अमरावतीस मेडीकल कॉलेज द्यावे इ. चळवळीत प्रमुख सहभाग. शिक्षण संपल्यावर नोकरित रुजू झाले. तेवढ्यात भारत-चीन युद्ध सुरु झाले. त्यावेळी अमरावतीहून अनेक विद्यार्थी भरती झाले. अधिकाऱ्यांसाठी परिक्षा असते. तीत उत्तीर्ण झाल्यावर कमिशन (बढती) मिळते. अमरावतीहून अनेक अधिकारी सैन्यास मिळाले. काही अधिकारी फार वरिष्ठ दर्जापर्यंत पोहचले. गुप्त अहवालानुसार श्री शेरेकर यांनी संयुक्त महाराष्ट्र आंदोलनात भाग घेतल्याचा आरोपावरुन सैन्यातून कमी करण्यात आले. तेव्हा पुन्हा नोकरीत रुजू झाले. महाविदर्भ वाद्यांची सभा उधळून लावण्याच्या आरोपावरुन नोकरीतून कमी करण्यात

आले म्हणून वकीली सुरु केली. वकीलीत यश मिळाले. विवाह झाला. सुविद्य पत्नी लाभल्या. सौ. प्रभावती शेरेकर डॉक्टर आहेत. मुलगाहि (रमेश) डॉक्टर आहे. कन्या सौ. कांचन ह्याही डॉक्टर आहेत. नंतर सोशालिस्ट पार्टीत सहभागी झालेत व कै. श्री. बापुसाहेब कारंजकर यांच्या समवेत कार्य करु लागले. स्व. इंदिरा गांधींना अटक झाली त्याविरुद्ध चळवळीत भाग घेतल्यावरुन अटक झाली. नंतर काँग्रेस मध्ये सामिल झाले. चांदूर रेल्वेहून विधानसभा निवडणूक लढविली व आमदार म्हणून निवडून आले. इ. १९८० ते १९८५ व इ. १९८५ ते १९९० अशा दोन विधानसभांमध्ये होते. इ. १९८० ते ८५ ह्या कालखंडात मंत्री होते. या कालखंडात अमरावतीचे मेडीकल कॉलेज, अ.म.न.पा. विद्यापीठ, क्रीडांगण, बडनेरा-नागपूर उपमहामार्ग, एम.आय.डी.सी. इत्यादी महत्वपूर्ण कामे पार पडली. त्यात श्री. यशवंत शेरेकर यांचाहि महत्वपूर्ण वाटा होता. ते अमरावतीचे जिल्हा पालक मंत्री होते.

परिशिष्ट ६ अ

साहित्य सोनियाच्या खाणी -विदर्भ साहित्य संघ

अमरावतीतील साहित्य सोनियाच्या खाणी :-

(अमरावती नगर वाचनालय शताब्दि विशेषांक १९७० मधील श्री.मा.ल.(अण्णासाहेब) व्यवहारे यांच्या लेखाचा संक्षेप, साभार, संपादक)

प्राचीन महाकवि राजशेखर याने विदर्भाला साहित्य रत्नांची खाणी असे गौरविले आहे. ''विदर्भ विषय : सारस्वति जन्मभू:''

त्यापैकी आधुनिक कालखंडातील काहीचा केवळ नामोल्लेख करतो.

दादासाहेब खापर्डे :- फार दांडगा व्यासंग, संस्कृत, अरेबिका, उर्दू, फारसी, पार्शियन, इंग्रजी, हिंदी, गुजराथी, भाषांचे विस्तृत ज्ञान होते. प्रकाशित वाङ:मय उपासनी वाकसुथा, पत्की यांच्या कविता संग्रहास प्रस्तावना, ''कवि'' या विषयावरील वि.सा.संघाच्या अध्यक्षपदावरुन दिलेले भाषण, लो. टिळक आठवणी व आख्यायिका (खंड ३) ला लिहिलेली प्रदीर्घ प्रस्तावना, कवित नर्मदाशंकर जोशी (गुजराथी) यांच्या

काव्याचे सांगोपांग समीक्षण, ह्यातील आशयघटना, सखोलता, वैचारिक उंची, काव्य व साहित्याचा दांडगा व्यासंग, सूक्ष्म निरीक्षण शक्ति यांचा प्रत्यय येतो. विशेषत: विनोदी शैलीतील वक्ते ना.बा.ग. (बाबासाहेब) खापर्डे :- हिंदी, इंग्रजी, उर्दू, पर्शियन, संस्कृत भांषावर विलक्षण प्रभूत्व होते. ह्या सर्व भाषांतून उत्कृष्ट दर्जेदार भाषणे देत. उमर खय्याम, ध्यानयोग राजकन्या अनंगराजा, सायन्स ते समाधी, सायन्सची समाधी ही विलक्षण आगळी वेगळी पुस्तके प्रकाशित भारतीय वेद वेदांत, उपनिषदांचा सखोल सूक्ष्म अभ्यास विज्ञान व भारतीय दर्शनांचा तौलनिक अभ्यास अत्यंत प्रभावी, भारदस्त प्रकारचे वक्ते.

ना.सी.फडके यांनी "असे वक्ते अशा मैफिली" च्या पुस्तकात त्यांच्या वत्कृत्वाचा विशेष उल्लेख केला आहे. संस्थापक व संपादक दै.उदय, अमरावती कविभूषण बळवंत गणेश (अण्णासाहेब) खापर्डे :- यांच्या संबंधी एक स्वतंत्र परिशिष्ट घेण्यात आले आहे. त्यातून माहिती मिळेल. महाकाव्याची निर्मिती हा विषय घेऊन त्यावर मराठीत महाकाव्य लिहिणारा विश्वातील एकमेव महाकवि विदर्भाचे टागोर विदर्भ साहित्य संघाचे संस्थापक संपादक "उदय" बजाबा रामचंद्र प्रधान :- "देवसेनी" हे खंडकाव्य सर बॉल्टरस्कॉट यांच्या लेडी ऑफ द लेक चा मराठी अनुवाद भ्रांतिकृत चमत्कार (नाटक) करमणूक मासिकात कथा लेखन.

मल्हार खंडेराव चिटणीस :- "आकाशातील चमत्कार" "ज्यातिषविषयक ग्रंथ" मराठीतील गद्यकाव्याचे उद्गाते.

पांडुरंग शास्त्री पारखी :- वर्णन, कृष्णकुमारी, बोधामृत इ. काव्यलेखन.

श्रीधर व्यंकटेश केतकर :- (ज्ञानकोषकार) मराठीतील उत्कृष्ट ज्ञानकोष, महाराष्ट्रीयांचे काव्यपरीक्षण, ब्राम्हणकन्या, गोंडवनातील प्रियंका, परागंदा ह्या कादंबऱ्या विशेष प्रसिध्द, ' भारतीय समाजशास्त्र ' हा समाजशास्त्रावरील प्रबंध विशेष अभ्यासनीय, 'उत्तर अमेरिकेतील वसंतऋतू ' हे काव्य प्रसिध्द.

बाळकृष्ण संतुराम गडकरी :- वृन्दा "ही कादंबरी साहित्यशास्त्रीय परीक्षणपर अनेक

विदर्भ साहित्य संघाची स्थापना (संस्थापक कविभूषण बळवंत गणेश खापर्डे, अमरावती).

विदर्भ साहित्य संघाचे पहिले संमेलन : १३ व १४ जानेवरी १९२३ : अध्यक्ष श्री. श्री. कृ. कोल्हटकर



खुर्चीवर डावीकडून उजवीकडे: १.गु. ह. देशपांडे, २. दुर्गाप्रसाद तिवारी, ३. ना.के. बेहरे, ४. श्री. कृ. कोल्हटकर,
५. न्या. केशवराव कोरटकर, ६. दा.के. ओक, ७. गो. अ. ओगले, ८. का. वा. पंडित उर्फ कवि भृंग ९. नी. ब. भवाळकर, १०. आनंदराव टेकाडे.
मागच्या दुसऱ्या उभ्या रांगेत पहिले वि. सा. संघाचे संस्थापक कविभूषण प्रो. खापर्डे आहेत (प्रो. खापर्डे यांच्या कृपेने)

लेख व समीक्षणे प्रसिध्द.

हरि विष्णू मोटे :- संपादक ''प्रतिभा'' (मुंबई) ''कोल्हटकर पत्रव्यवहाराचे प्रकाशन अनेक वैदर्भीय कवींना प्रकाशात व प्रसिध्दीस आणले. कृष्णभाई मोटे लेखिका मीनाक्षीचे जीवन (कांदबरी) व माझी गुणांची पोर (नाटक) प्रसिध्द साहित्य समीक्षात्मक लेख, आत्मचरित्र लिहिले गणेश मोरेश्वर मोरे :-

'' अलंकार चंद्रिका '' काव्यशास्त्रीय प्रबंध

दयाळनाथ :- संतकवि (माहूर) भक्तिपर अभंग.

देवनाथ महाराज :- संतकवि भक्तिपर अभंग.

अप्रबुध्द :- (पालेकर वकील. महर्षि अण्णासाहेब पटवर्धन चरित्र हिंदूधर्म व साम्यवाद. हिंदूधर्माचे तत्वज्ञान. इ. ग्रंथाचे लेखक महान थोर आध्यात्मवृत्तीचे सत्पुरुष संपादक - प्रज्ञालोक.''

पु.य.देशपांडे :- विचार प्रवर्तक लेखन, बंधनाच्या पलीकडे ''सुकळेले फुल'' ''सदाफुली'' विशाल जीवन ''काळी राणी '' ''नवे जग'' या सामाजिक क्रांतीकारक विचारांच्या कादंबऱ्या भवितव्याचे संपादक विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष.

शालीनदत्त शिदोरे :- कादंबरी लेखक ''देवकन्या'' शिवाय, मनोरंजन, काव्य कौमुदी, आनंद इ. मासिकातून कथा प्रसिध्द झाल्या.

अ.तु. वाळके :- कादंबरीकार ''अपोलो बंदरावर'' कथासंग्रह संवेदना '' वऱ्हाडशाळा पत्र चे संपादक.

डॉ.द.ह. अग्निहोत्री :- शास्त्रीय ग्रंथलेखन ''विमान विद्या'' शिक्षकांसाठी मार्गदर्शनपर कथा लिहिल्या प्रबंध लेखन :- मराठीतील वर्णोच्यार विकास.

श्रीमती शंकुतलाबाई दिवाणजी :- सुविध लेखिका उदयोजस्तु अंबे, संस्कृत रंगदर्शन बाल वाङ्मय संपादक ''वाग्वीण'' ''वैशिष्ट्य''.

पद्माकर निमदेव :- कुस्करलेल्या कळ्या, निबंध नंदिनी, निबंध कुसुम, इ. निबंध संग्रह प्रसिध्द कथासंग्रह मृगाचा पाऊस.

सौ.मालती बेडेकर :- आत्मचरित्र प्रसिध्द.

के.ज.पुरोहित (शांताराम) अनेक कथासंग्रह प्रसिध्द.

विद्याधर गोखले :- सुवर्णतुला पंडितराज जगन्नाथ, मंदारमाला, कट्यार, काळजात घुसली. मेघ मल्हार, इ. संगीत नाटकाचे नाटककार उत्कृष्ण वक्ते. माजी खासदार.

प्रा.भ.प्र. मोहरीर :- ''अनूभूती व अभिव्यक्ती'' हा संशोधनात्मक प्रबंध वरेरकरांच्या कादंबऱ्या हा समीक्षणात्मक प्रबंध प्रसिध्द.

उध्दव शेळके :- सामाजिक विषय हाताळणारे कांदबरीकार ''धर्म'', ''दांळीबांचे दाणे'' खंजीरीचे बोल, शिळान, मन:पूत साहेब वगैरे ११२ कादंबऱ्या १३ कथासंग्रह प्रसिध्द आहेत.

मनोहर तल्हार :- सामाजिक जाणीवांचा आधुनिक कवि.

रा.दि. भवाळकर (नाना) : 'राजा श्रीयाळ' नाटकाचे कर्ते व्रतस्थजीवन हा कथासंग्रह.

केशवराज भोळे :- ''अस्ताई'', अंतरा, ''माझे संगीत'' हे संगीतविषयावर आठवणी व माहितीपर लेख संग्रह प्रसिध्द.

प्रा.य.गो. निजसुरे :- ''वृत्तालंकार व व्युत्पत्तिदीपिका '' या काव्यशास्त्र विषयावरील पुस्तिकेचे लेखक.

डॉ.वि.भि.कोलते :- लव्हावी काव्यसंग्रह. कुलगुरु, नागपूर विद्यापीठ महानुभाव वाङ्मयाचे महान संशोधक व संपादक.

डॉ.मा.गो.देशमुख :- मराठी साहित्यशास्त्र प्रबंध प्राचार्य, वि.म.वि.

डॉ.ग.त्र्य. देशपांडे :- ''साहित्यशास्त्र प्रबंध. भारदस्त वक्ते.

सुरेश भट :- ''पुनवेचा थेंब'' , कविता संग्रह ''एल्गार'', रंग माझा वेगळा'.

मधुकर केचे :- दिंडी चालली पुढे कविता संग्रह.

प्रा. राम शेवाळकर :-असोशी कवितासंग्रह. प्रतिभाशाली वक्तृत्व, डी.लीट.

शरदचंद्र सिन्हा :- ''वऱ्हाडमाती'' कविता संग्रह.

गोविंदराव मुंगशीकर :- नाटककार, ''शेतीचे मोती'', ''मराठ्याचे सिंहासन'',

तात्यासाहेब गंगाधरपंत सबनीस :- संस्कृत पद्यावली, नाटक रत्नावली.

जयराम केशव असनारे :- (भाऊसाहेब) ''मुद्राराक्षस'' चा मराठी अनुवाद

अमरावतीतील आद्य अनुवाद नाट्यलेखक व दिग्दर्शक.

गोपाळराव बेडेकर :- नाटककर्ते ताराविलास तसेच कीर्तनकार

आत्माराम रावजी देशपांडे (अनिल) : फुलवात, काव्यसंगह, मराठी मुक्तछंद यांनी प्रथम आणला. वि.सा.संघाध्यक्ष.

सौ.कुसुमावती देशपांडे :- फुलवात, काव्यसंग्रह, सुविख्यात कवयित्री. वि.सा. संघाध्यक्ष.

(फुल - कुसुम आणि वात - अनिल वारा)

नारायण कृष्ण दिवाणजी - नाटककार ''राजकन्या चम्पावती'', ''सुनेचा सापळा'' परिवर्तन, सुर्यग्रहण इ. नाटके प्रसिध्द स्फूट कविता प्रसिध्द कवि कृष्णमूर्ती कवित काव्यसंग्रह ''कृपा''.

वीर वामनराव जोशी (वामन गोपाळ जोशी) नाटककार ''कर्णवध, न्यायाचा दरबार. राक्षसी महत्वाकांक्षा - रणदुंदुभि धर्म सिहांसन, शीलसंन्यास, झोटींग पादशाही सत्याग्रही इ. नाटकाचे कर्ते कीर्तनकार प्रवचनकार, व्याख्याते, राजकीय नेते, नगराध्यक्ष, आमदार, असीम त्यागमूर्ती संपादक - स्वतंत्र हिंदुस्थान.

नारायण रामलिंग बामणगावकर - वृत्तपत्र संपादक दै. उदय वक्ते राजकीय कार्यकर्ते धनुर्भंग, आत्मतेज पुढारी पाहिजे इ. नाटकांचे कर्ते नामदार ए.एस.एस. हे प्रहसन प्रसिध्द. विदर्भ साहित्य संघाध्यक्ष

शं.ना. (काकासाहेब) सहस्त्रबुध्दे :- नाटककार व नाट्यसमीक्षक दिग्दर्शक व्याख्याते, आयुर्वेदाचार्य, नाटके, आत्मविश्वास, राणी चंद्रावती, खरा प्रेमसन्यास, हीच मुलीची आई, नाट्यसमीक्षण. कीचकवध, आग्राहून सुटका, राक्षसी महत्वाकांक्षा करीन ती पूर्व भाऊबंदकी सवाई माधवरावांचा मृत्यु उमाजी नाईक वेगळ व्हावयच मला, नवीन कल्पना इ. नाटकांच्या मार्गदर्शिका लिहिल्या. नाट्याचार्य खाडिलकर, नाट्यस्वरुप गडकरी नाट्यलेखन रहस्य इ. समीक्षापर लेखनही प्रसिध्द.

काशिनाथबापू देशमुख :- ह्यांनी सुबोध मालेव्दारे अनेक ग्रंथ लिहिले

दादासाहेब आसरकर :- नाटककार "तिजोरीची किल्ली."

वि.रा.हंबर्डे :- नाटककार, वृत्तपत्रकार संपादक सामा. "किरण" नाटके "बिगारीया बैल", 'महाराणी लक्ष्मीबाई', बाजीराव मस्तानी, कमलाच्या पाकळ्या, अठरा अक्षेहिणी, भवानराव म्हैसाळकर - डॉक्टर, नाटककर्ते "प्रजेचा राजा" उत्कृष्ट नाट्यदिग्दर्शक म्हणून प्रसिध्द.

किशोर दिघेकर :- नाटककर्ते दिग्दर्शक - नाटके चलो दिल्ली महाराणा प्रताप, माझच चुकलं, भयान थुतरे, शहिदशंकर सिंहगड न्याय, विख्यात दिग्दर्शक म्हणून प्रसिध्द.

प्रा. मधुकर आष्टीकर :- नाटककर्ते संस्कृतचे गाढे अभ्यासक साहित्य संस्कृति मंडळाचे अध्यक्ष, नाट्यदिग्दर्शक, तीन इसमतेरा आणे जग माझे आहे, प्रत्येकालाच जोडा-चावतो, सकाळच्या वरणाला संध्याकाळची फोडणी, अमृतघट तुझ्या घरी, वैरी, क्षणाची सून, माझा रघू बोलला, सावळा गोंधळ इ. नाटकांचे कर्ते. विदर्भ साहित्य संघाध्यक्ष

प्रा.मा.ल. व्यवहारे :- कवि भूषण अण्णासाहेब (ब.ग.खापर्डे) यांनी जागतिक रंगभूमीस मूकाभिनय, ह्या नावाने नवीन योगदान दिले. त्याप्रमाणे अण्णासाहेब व्यवहारे यांनी

मराठी रंगभूमीस संगीतमय मूकनाट्याची देणगी दिली. त्यांनी महात्मा गौतम बुध्द "विश्वमित्र मेनका, हरीशचंद्र भक्त धुव्र झाशीची राणी शतमन्यु, राजा श्रीयाल, इ. संगीतिका लिहिल्या आहेत. शिवाय "नंदलाल", "रामवनवास", ही नाटके लिहिली आहेत. गणेशोत्सवासाठी घोषयात्रा, हरिशचंद्र, सावित्री, संभाजी, चंद्रराव मोरे, कचदेवयानी, धुव्र सुर्य मावळला इ. नाटुकल्या लिहिल्या आहेत. काही कविता, लघुकथा विनोदी कथा, लघु निबंध विविध मासिकातून प्रसिध्द केले आहेत. अमरावतीचा इतिहास (खंड १ व २) तयार करण्यात त्यांनी साह्य केले.

प्रा. मनोहर कवीश्वर :- कवि म्हणून प्रसिध्द आहेत. गीतगोविंद, गीत गजानन, गीतसाईनाथ, ही काव्ये प्रसिध्द, अनेक मासिकांतून कविता प्रकाशित गीत रचनाकार, संगीतकार म्हणून प्रसिध्द स्वत: नट व दिग्दर्शक.

विश्राम बेडेकर :- मूळचे अमरावतीचे नाटककार, नाटके - ब्रम्हांकुमारी, रणागंण, वाजे पाऊल आपले, रणांगण ही कादंबरी संज्ञाप्रवाह पध्दतीने लिहिणारे मराठीतील पहिले कादंबरीकार, इब्सेनंतंत प्रथम यांनी मराठीत प्रचलित केले.

रमेश लोंढे :- मीच माझा वैरी, पूर्तता माझ्या व्यथेची, इ. नाटकांचे कर्ते प्राचार्य डॉ.सौ.विजया डबीर, डॉ.सौ.माणिकताई पाटील, डॉ.कु.सुशिला पाटील, डॉ.सौ.सिंधू मांडवकर, डॉ.सौ.कल्पना परांजपे, डॉ.वसुधा घुरडे, यांनी भारदस्त संशोधन प्रबंध लिहून मराठी वाङमयात मोलाची भर घातलेली आहे. डॉ.सौ.माणिकताई पाटील यांनी संस्कृत मध्येही नाट्यरचना केली आहे. त्यांना संस्कृत व मराठीमध्ये दोनदा डॉक्टरेट मिळालेली आहे. ज्ञानेश्वरीचा त्यांचा अभ्यास अफाट आहे. अत्यंत रसपरिप्लुत भारदस्त वक्त्या म्हणून विख्यात आहेत. डॉ.सुशीला पाटील यांनी महाभारतातील पात्रावर विपुल लेखन केले यापैकी यज्ञ संभवा हे द्रौपदी वरील प्रबंध आहे. सौ.मंगला बक्षी नाट्य लेखिका व दिग्दर्शिका म्हणून विरोध उल्लेखनीय नाव कमावले आहे.

सौ.मंगला बक्षी ह्या बालनाट्य चळवळ व बाल साहित्य क्षेत्रात १९७८ पासून कार्यरत आहेत. बालानंद या नाट्यसंस्थेतर्फे सुमारे १६-१७ बालनाट्ये,

छंदशिबीरे, पथनाट्य सादर करतात. त्या स्वत: नाटयकलाकार असून गेल्या २० वर्षापासून राज्य नाट्य स्पर्धेत अभिनय दिग्दर्शन, व समीक्षण क्षेत्रात त्यांनी कार्य केले, त्या लेखिका असून विविध मासिके, वर्तमानपत्रे यातून लेख व कथा प्रसिध्द झाल्या आहेत. २-३ वर्षा पूर्वी भांबरभूत झिंदाबाद हा किशोर कथा संग्रह प्रसिध्द झाला आहे.

अमरावतीतील बालरंगभूमध्ये चैतन्य व जोम आणण्याचे महान कार्य त्यांनी केले. व्यवसायाने शिक्षिका असल्यामुळे बालमानसशास्त्राचा आपोआपच अभ्यास होत गेला. त्याचा लाभ त्यांना बाल रंगभूमीच्या विकासासाठी झाला. त्याचे चिरंजीव मंगेश बक्षी हेही बालरंगभूमीवर कसलेले नट व दिग्दर्शक म्हणून चमकून गेले. त्यांनाही अनेक पारितोषिके प्राप्त झाली आहेत. स्वतंत्र प्रकरण लिहिले आहे. म.पू. संत अच्युत महाराज, प.पू.संत गाडगे बाबा, प.पू. संत गुलाबराव महाराज आदि संतश्रेष्ठांना ह्या साहित्यकारांच्या मालिकेत श्रेष्ठत्व आहे, ह्यात शंकाच नाही. या साऱ्यांची वाङमय निर्मिती एवढी अफाट आहे, आणि उत्तुंग भव्य दिव्य आहे की, ते पाहून मन आदराने लवून भारावून राजे. त्यांचा ह्या त्रोटक परिचयपर लेखात समावेश नसल्यास त्यांची कीर्ती कमी होते असे नाही. मोठीच माणसे ती ! माहितीच्या अथवा संदर्भाच्या अभावी काही साहित्यकांचा परिचय देणे राहिले असल्यास क्षमा मागतो. अमरावती साहित्यीकांच्या मालिकेत कुठेही कमी नाही, उलट अनेक बाबतीत सरस व श्रेष्ठ आहे. प्रेरक व मार्गदर्शक व मानदंड स्थानी आहे एवढेच ह्या आढाव्याव्दारे लक्षात आणून देणे हा हेतू आहे.

विदर्भ साहित्य संघ :-

(साहित्यभूषण तु.ना. काटकार)

प्राचीन विदर्भविषय : सारस्वती जन्मभू;

कविवर्य राजशेखर विरचित बालरामाययणतील राम रावण युध्दात राम सीतेसह पुष्पक विमानात बसून खालील प्रदेश पाहत पाहत आकाशमार्गे लंकेहून अयोध्येस येत असतांना सांगतात.

यत्थेमं त्रिदिवायवत्सं निगमस्याङर्ग यत्सममस्
स्वादिष्टंच यदिक्षवादपि रसाश्वपुचयव्दाङ यम् ।
तथास्मिमन्मधुर प्रसादि रसवत् कान्तचकाव्यामृतम्
सोडयं सुभ्र पुरी विदर्भविषय : सारस्वती जन्मभू ॥ १०-१४

अर्थात हे सीते स्वर्गाचा सुखकर मार्ग, वेदाचे सातवे अंग, उसाच्या रसापेक्षाही मधुर व शब्दरुपी नेत्रचकीकाय असे सुमधुर प्रासादिक सुरस व मनोहर काव्यामृत ज्या देशात आहे व जो देश विद्येचे माहेरघर आहे, असा हा विदर्भ देश पुढे पहा.

यावरुन हे स्पष्ट आहे, की विदर्भ हा अतिप्राचीन प्रदेश, प्राचीन कालापासून सरस्वतीचे माहेरघर म्हणून ओळखला जातो. याचा इतिहास अति उज्ज्वल, विदर्भालाच पूर्वी कथाकोशिक, भोजकट, वर्धतट, वऱ्हाड व विदर्भ विस्तारीत महाराष्ट्र अशा संज्ञा असलेल्या इतिहासात आढळतात. त्यांचा विस्तार उत्तरेस अमरावती पासून दक्षिणेस प्रतिष्ठानपर्यत होता.

विदर्भ साहित्य संघ इतिहास :-

आजपासून ७५ वर्षापूर्वी "विदर्भ साहित्य संघा" ची रीतसर स्थापना झाली. त्याची जन्मकथा अशी आहे. इ.स. १९०५-०६ मध्ये पुणे येथे "महाराष्ट्र साहित्य परिषद" ही साहित्यसंस्था अधिकृतपणे स्थापन झाली. तिचे कार्य व कार्यक्षेत्र मराठी साहित्याचा उत्कर्ष व महाराष्ट्र हे असले व तिची महाराष्ट्र साहित्य संमेलने व वार्षिक अधिवेशने पुणे मुंबईच्या आसमंतात होत असली तरी इ.स. १९२० पर्यत विदर्भ, मराठवाडा व खानदेश या भागात तिचे लोण पोहोचले नव्हते.

अमरावतीचे कविभूषण श्री.बळवंत गणेश उर्फ अण्णासाहेब खापर्डे सांगतात, इ.स. १९२२ च्या मे महिन्यातील ही घटना, पुणे येथे एक मराठी भाषिकांचे कविसंमेलन झाले. निमंत्रणावरुन त्या "संमेलनास मी मोठ्या जिज्ञासेने गेले होती. संमेलन उत्कृष्ट झाले. एकापेक्षा एक सरस कविता ऐकताना स्वर्गीय आनन्द

उपभोगावयास मिळाला. त्याचा माझ्या मनावर अप्रतिम परिणाम झाला. असे वाङमयाचे आनन्दोत्सव-मेळावे आपल्या वऱ्हाडातही कां होऊ नयेत, असे मला तीव्रतेने जाणवू लागले या दिव्य आनंदाकरीता मला पुणे नगरापर्यत धाव घ्यावी लागली. वऱ्हाडच्या किती लोकांना इतक्या दूरवर येणे शक्य आहे ? पुणे मुंबईची साहित्यिक मंडळीही लांबवर कितीसे कार्य करणार ? तेव्हा विचार केला की वऱ्हाडातही असे वाङमयीन सोहळे व्हावेत. पुण्याहून अमरावतीला परत येईपर्यत हेच काहूर डोक्यात घोळत होते. अमरावतीस परत आल्याबरोबर या प्रयत्नाला आरंभ केला.

कविभूषण श्री.अण्णासाहेब खापर्डे अमरावतीस येऊन पोहचताच त्यांनी सर्वप्रथम आपले तीर्थरुप श्री.दादासाहेब खापर्डे, वीर वामनराव जोशी, नानासाहेब बामणगावकर प्रि. दामोदर केशव ओक, मीमांसा भूषण पु.वा. साठे, बाळकृष्ण संतुराम गडकरी, ना.प्र. हिरुरकर, नी.ब. उर्फ बापूसाहेब भवाळकर यांच्याशी विचारविनिमय करुन प्रोत्साहन व सहकार्य मिळविले. नंतर वऱ्हाड नागपूर, मराठवाडा व खानदेश येथील साहित्यप्रेमीशी पत्रव्यवहार सुरु केला. यवतमाळहून लो.माधव श्रीहरि उर्फ बापूजी अणे, डॉ.यशवंत खुशाल देशपांडे, स.ह. बऱ्हाळ, पृथ्वीगीर हरिगीर, वा.ना.देशपांडे, बुलढाण्याहून ॲड. यादव माधव काळे, खांमगावहून श्री.श्रीपाद कृष्ण कोल्हटकर, नागपूर विभागातून प्रि. केशवराव लक्ष्मण दमरी, कविवर्य आनन्दराव टेकाडे, श्रीनिवास रामचंद्र बोबडे, गो.म.देव, ज.के. उपाध्ये म.म.वा.वि.मिराशी, विश्वनाथराव केळकर, गोपाळ अनंत उर्फ दादासाहेब ओगले, चन्द्रपुरहून लोकाग्रणी बळवंत राघव उर्फ बाबासाहेब देशमुख, वर्धेहून प्रा.नारायण केशव बेहेरे व ॲड. मनोहरपंत बोबडे, खानदेश विभागातून काव्यरत्नावली ''कार नारायण नरसिंह फडणीस, कविवर्य, दु.आ. तिवारी, के.म. सोनाळकर, कवि बलवन्त, मराठवाडा विभागातून न्या.मू. केशवराव कोरटकर, न्या.मू.पळणीटकर, श्रीमंत वामनराव नाईक, दिंगबरराव बिन्दू, औरंगाबादहून दत्तबुवा पद्याकर व कवि कोरेवल, नांदेडहून दे.ल. महाजन प्रभृतीशी त्यांनी संपर्क साधला.

या सर्वानी कविभूषणांच्या कल्पनेचे स्वागत करुन पुढील कार्यास प्रोत्साहित केले.

साहित्यप्रेमी लोकांचे पहिले संमेलन :-

इ.स. १९२२ च्या मे पासून डिसेंबर या आठ महिन्यात संमेलनाची सिद्धता झाली. साहित्याचार्य श्री.कृ.कोल्हटकर अध्यक्षपदी निश्चित झाले. स्वागताध्यक्ष प्रि.दा.के. ओक निवडल्या गेले संमेलनाच्या तारखा १३ व १४ जानेवारी १९२२ (मकरसंक्रमण) ठरल्या संमेलनस्थान ब्रम्हविद्या मंदिर आणि निवासस्थान खापर्डेवाडा, ठरला.

शेवटी संमेलनाचा दिवस उजाडला. वरील चार विभागातून प्रतिनिधी आले होते. त्यात नियोजित अध्यक्ष साहित्याचार्य श्री.कृ.कोल्हटकर, दक्षिण हैद्राबाचे न्या.मू. केशवराव कोरटकर, अन्य प्रदेशातून केवळ चौदाच प्रतिनिधी होते. पण एक एक एवढा तोलामोलाचे होते की त्यांचे वजन अमरावती नगरीवर कल्पनातीत पडले. या सर्वाचा मुक्काम खापर्डेवाड्यात होता. त्यामुळे ते किती होते हे लोकांना कळलेदेखील नाही. स्थानीय अध्यापक वकील, डॉक्टर्स, विद्यार्थी साहित्यप्रेमी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. साहित्यप्रेमी जनांचे संमेलन भरदार झाले.

६ ब) विदर्भ साहित्य संघ :- स्थापना

१३ जानेवारी १९२३ रोजी सायंकाळी साहित्य चार्याकडून संमेलनाचा संदेश मिळाल्यावर १४ जानेवारी रोजी सकाळी ८ वाजता खुल्या अधिवेशनात ठराव रुपाने उपरोल्लिखित शीर्षकाची संस्था एकमताने स्थापन झाल्याचे पहिल्याच ठरावाने टाळ्यांच्या गजरात घोषित करण्यात आले. दुसऱ्या ठरावाने तिची कार्यकारिणी अविरोध निवडण्यात आली.

पहिले संघाध्यक्ष :- न्यायमूर्ती केशवराव कोरटकर

उपाध्यक्ष :- सवश्री माधव श्रीहरी अणे.

श्रीपाद कृष्ण कोल्हटकर

यादव माधव काळे

बाळकृष्ण गणेश खापर्डे

नारायण नरसिंह फडणीस

सरचिटणीस :- विश्वनाथराव केळकर.

(नागपूर विभाग)

दुर्गाप्रसाद तिवारी (खानदेश)

गणपतराव मोलेकर (निजाम स्टेट)

कोषाध्यक्ष :- ॲड. दादासाहेब शेवडे, अमरावती.

आणि काही सदस्य चारही भागातून

दोन दिवस नव्या दमात, नव्या उत्साहात काव्य शास्त्रविनोदात कसे निघून गेले हे कळले देखील नाही. तेथूनच विभागश: प्रत्यक्ष कृतिकार्यास प्रारंभ झाला. हेच विदर्भाचे कार्यक्षेत्र ठरल्या गेले आणि तेथील साहित्यिकांना एकत्रित येऊन मराठी व प्रचार-प्रचारासाठी संघटित प्रयत्न करण्यास मराठीचे आद्यकवी मुकुंदराजांची ही मराठीची मूळभूमी ''विदर्भ साहित्य संघ'' रुपाने खुली झाली. प्राचीन ''विदर्भ'' नावाचा नव्याने पुनरोध्दार कविभूषणांनी केला.

कविभूषण अण्णासाहेब खापर्डे नावासंबंधी स्पष्टीकरण देतात :

१) प्रदेशास्तव ''विदर्भ'' आणि (२) उद्देशास्तव ''साहित्य'' हे दोन ह्या नावातील शब्द मी प्रथम कायम केले. पण ह्या दोन शब्दांना समिती, मंडळ, संघ वगैरे अनेक शब्दापैकी कोणता संघटित समूहवाचक तिसरा शब्द घ्यावा हा विचार मला बरेच दिवस पडला. अखेर माझे सर्वात वडिलबंधू सौ.बाबासाहेब यांच्या सल्याने असे ठरविले की, बौध्दधर्मतिहासात गाजलेला जो संघ शब्द तोच ऐतिहासिकतेच्या प्राचीनतेच्या, पवित्रतेच्या व सूचकतेच्या दृष्टीने सर्वात उत्तम आणि म्हणून तो घ्यावा हे निश्चित झाले. अशा रीतीने या संस्थेचे नाव पूर्ण झाले. ते पूर्ण समाधानी नाव ''विदर्भ साहित्य संघ'' होय. लगेच दुसऱ्या वर्षी १९२४ साली दुसरे सम्मेलन.

अमरावती येथे १९ एप्रिल रोजी ॲड. यादव माधव काळे यांचे अध्यक्षतेखाली, तिसरे संमेलन १९२६ साली यतवमाळ येथे १७ व १८ जानेवारी साहित्यसम्राट न.वि.केळकर यांचे अध्यक्षतेखाली, चौथे संमेलन १९२७ साली दक्षिण हैद्राबाद येथे १० व ११ जूनला भारताचार्य वि.वि. वैद्य यांचे अध्यक्षतेखाली, पांचवे संमेलन १९२८ साली जळगांव येथे १५ व १६ नोव्हेंबर रोजी न्यायमूर्ती केशवराव कोरटकर यांचे अध्यक्षतेखाली व सहावे संमेलन १९२९ साली नागपूर येथे व ६ व ७ सप्टेंबर रोजी ना.दादासाहेब खापर्डे यांचे अध्यक्षतेखाली नागपूरच्या वैभवात संपन्न झाले.

यानंतर संघाचे संस्थापक कविभूषण अण्णासाहेब खापर्डे यांना महामना पं. मदन मोहन मालवीयजी यांनी आपल्या बनारस विद्यापीठात मराठीचे प्राध्यापक म्हणून बोलावणे केल्यावरुन ते बनारसला निघून गेले. त्यामुळे इ.स.१९२९ पासून वार्षिक अधिवेशन बंद पडली. १९३६ मध्ये प्रा.वि.भि. कोलते नागपूर येथे स्थलांतरित झाले. व विदर्भ साहित्य संघाच्या निद्रिस्थ कार्यास पुन: जाग आली.

सातवे अधिवेशन :-

यावेळी वऱ्हाड मध्यप्रांतात प्रांतीय स्वायत्तता कार्यान्वित झाली होती. प्रांताचे पंतप्रधान (आजच्या भाषेत मुख्यमंत्री) मा.डॉ.ना.भा.खरे हे होते. प्रा.वि.भि.कोलते, प्रा.श्री.ना.बनहट्टी व श्री.ना.कृ.दिवाणजी यांनी पुढाकर घेऊन सातवे अधिवेशन अमरावती येथेच मुंबईचे प्रा.न.र.फाटक यांच्या अध्यक्षतेखाली २१ व २२ आगस्ट १९३७ रोजी यशस्वीरीत्या पार पाडले. या संमेलनाचे स्वागताध्यक्ष प्रा.वि.भि.तथा भाऊसाहेब कोलते होते, तर उद्घाटन पंतप्रधान डॉ.ना.भा.खरे यांनी केले होते. स्वातंत्र्य वीर सावरकरांचा मॅझिनी पेंडसे यांचा ''गुन्हेगार'',शि.म.परांजपे यांचे काळातील निबंध, ''चिपळूणकरांची पत्रे'' या जप्त केलेल्या पाच पुस्तकावरील बंद उठविल्याची क्रांन्तीकारी घोषणा या सातव्या संमेलनात डॉ.खरे यांनी केली.

याच अधिवेशनात पुढील वर्षाकरीता नवी कार्यकारिणी निवडण्यात आली. संघाध्यक्ष : लो.बापूजी अणे, सरचिटणीस श्री.अ.तु.वाळके, चिटणीस

सर्वश्री.र.वि.कुळकर्णी, व सदस्य प्रा. या.मु.पाठक, प्रा.श्री.ना.बनहट्टी, प्रा.वि.भि. कोलते, प्रा.मा.गो.देशमुख, सौ.मथुराबाई द्रविड व श्री.वा.सं.गडकरी.

सरचिटणीशी म्हणजे प्रांताबाहेर जाण्याची सुपारी :-

पण संघाचे सरचिटणीस श्री.अ.तु.वाळके यांना एकाएकी परप्रांती जाण्याचा प्रसंग आला. ते निघून गेले त्यावेळी प्रा.बनहट्टी सहज उद्‌गारुन केले. ''संघाचे सरचिटणीसपद म्हणजे जणू काही प्रांताबाहेर जाण्याची सुपारीच ठरावी'' आणि खरोखरच कविभूषण खापर्डे यांच्यानंतर संघाची जी अवस्था झाली तीच प्रती अवस्था श्री.वाळके परप्रांती जाण्याने झाली व पुन: संस्थेपुढे पेचप्रसंग उभा राहिला. नव्हे पुन: सात वर्ष संघ अज्ञातवासात राहिला.

पुनरुज्जीवन :-

सातव्या अधिवेशनानंतर दोन वर्षातून दुसरे जागतिक महायुध्द सुरु झाल्याने अधिवेशनाचे सोहळे स्थगित झाले. पुन: १९४४ मध्ये प्रा. श्री.ना.बनहट्टी यांचे नागपूरहून अमरावतीस स्थानांतर झाले. यावेळी संघाध्यक्ष लो.मा.श्री.उर्फ बापूजी अणे हे श्रीलंकेत भारत सरकारचे हायकमिश्नर म्हणून काम पहात होते. त्यांनी संघाध्यक्षचे सर्व अधिकार प्रा.श्री.ना.उर्फ दादासाहेब बनहट्टी यांचे स्वाधीन केले व आकोट येथे आठवे अधिवेशन मार्च १९४५ मध्ये संपन्न झाले. या अधिवेशनाचे संमेलनाध्यक्ष होते. डॉ.यशवंत खुशाल उपाख्य अण्णासाहेब देशपांडे, संमेलनापूर्वी १ जानेवारी १९४५ मध्ये नवी घटनासमिती नेमून विदर्भ साहित्य संघाची नवीन घटना तयार करण्यात आली. संघाध्यक्ष पदावर प्रा.श्री.ना.बनहट्टी, सरचिटणीस प्रा.ना.कृ.दिवाणजी, सदस्य कविभूषण प्रा.ब.ग.खापर्डे प्रा.वि.भि.कोलते, श्री.श.ना.सहस्तबुध्दे व श्री.अ.तु. वाळके अशी केन्द्रीय कार्यकारिणी निवडण्यात आली.

प्रा. दादासाहेब बनहट्टी यांनी एक छोटासा पुनरुज्जीवनाचा समारंभ अचलपूरचे श्रीमंत नारायण व्यंकटेश उर्फ नानासाहेब देशमुख यांच्या अध्यक्ष तेखाली

३० मार्च १९४५ रोजी आकोट येथे साजरा केला.

याच अधिवेशनात संघाचे मुखपत्र म्हणून "युगवाणी" १ जानेवारी १९४६ पासून सुरु करण्याचे व संघाच्या "मराठी साहित्य परीक्षा चालू करण्याचे ठरविण्यात येऊन त्याचे दायित्व अनुक्रमने "किर्लोस्कर मनोहर "चे" रामशास्त्री श्री.वा.ना.देशपांडे व प्रा.वि.भि.कोलते यांचेवर सोपविण्यात आले.

पुनरुजीवनानंतरची संमेलने :-

इ.स. १९४५ मध्ये नववे संमेलन दर्यापूर येथे प्रा. श्री.ना.बनहट्टी यांच्या अध्यक्षतेखाली, १९४८ साली दहावे संमेलन पुसद येथे श्री.पु.प.उर्फ बाबासाहेब देशपांडे यांच्या अध्यक्षतेखाली, १९४८ साली अकरावे संमेलन गोदिंया येथे डॉ.वि.भि.कोलते यांचे अध्यक्षतेखाली, व संस्थेला २५ वर्षे पूर्ण झाले म्हणून संस्थेचा रौप्यमहोत्सव बिहारचे राज्यपाल बापूजी अणे यांच्या अध्यक्षतेखाली गोदिया येथेच पार पडला. आणि इ.स. १९४९-५० करीता प्रा.डॉ.मा.गो.देशमुख हे संघाध्यक्ष पदावर निवडून आले.

गोदिंया येथील अकरावे संमेलन हे स्वातंत्र्यातील पहिले साहित्यसंमेलन, व २५ वर्षापूर्वी पारतंत्र्यात जन्म झालेली ही संस्था, तिचा स्वातंत्र्यातील हा रौप्य महोत्सव होता.

अध्यक्षांची एक वर्षीय कारकीर्द :-

या वेळची घटना अशी होती की आपल्या कार्यकारिणीसह अध्यक्षाने निवडून यावयाचे वर्षभर कार्य करावयाचे शेवटी संमेलनाचे अध्यक्षपद भूषवायचे व नवीन निवडून आलेल्या संघाध्यक्षांच्या घरी नवीन वर्षाची संघाची सूत्रे देऊन निवृत्त व्हावयाचे.

यावेळी भारत स्वतंत्र होऊन दोन वर्ष लोटली होती. २६ जानेवारी १९५० पासून भारतात लोकशाही प्रजासत्ताक चालू झाले होते.

''विदर्भ साहित्यमंदिरा'' ची मुहूर्तमेढ :-

इ.स. १९५०-५१ च्या संघाध्यक्षपदाकरिता साहित्यभूषण प्रि. हरि नारायण नेने यांची रीतसर निवड झाल्यासारखीच होती. पण या वर्षात विदर्भ साहित्य संघाचे कमीत कमी हजार सभासद करायचे (२) संघाच्या कार्यालयाकरीता विदर्भ साहित्य मंदिर उभे करायचे. (३) त्याकरीता अशी भूमी शासनाकडून मिळवायची अशा भव्य उद्देशाने ऐनवेळी पत्रपंडीत ''तरुणभारतकार'' व विख्यात साहित्यिक श्री.गजानन त्र्यंबक उर्फ भाऊ साहेब माडखोलकर यांच्या नावाची शिफारस साहित्यिक श्रेष्ठींनी केल्या वरुन प्रि.ह.ना. नेने यांनी दिलदारपणे संघाध्यक्षपदाचे आपले नाव मागे घेतले व श्री.भाऊसाहेब माडखोलकर यांनाच निवडून देण्याविषयी त्यांनीही प्रकट विनंती केली. श्री.भाऊसाहेब माडखोलकर आपल्या कार्यमंडळासह अविरोध निवडून आले.

१२ वे विदर्भ साहित्य संमेलन ४ व ५ फेब्रुवारी १९५० रोजी चन्द्रपुरच्या ऐतिहासिक भूमीवर प्रा.डॉ.माधव गोपाळ देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली यशस्वीरीत्या पार पाडले. या संमेलनात साहित्य मंदिराचा भावगंध सर्वत्र दरवळला. डॉ. देशमुखांनी पुढल्या १९५०-५१ च्या भरीव कार्याकरीता संघाध्यक्षांची सूत्रे श्री.भाऊसाहेब माडखोलकर यांच्या स्वाधीन केली. भाऊसाहेबांनी निर्वाचित सदस्यांच्या व्यतिरिक्त अध्यक्षांनी स्वीकृत करावयाच्या दोन सभासदात (१) सर्वश्री ए.श्री.पटवर्धन व (२) पुरुषोत्तम दिवाकर उर्फ बाळासाहेब ढवळे यांना आपल्या कार्यकारिणीत सर्वप्रथम समाविष्ट करुन घेतल्याची घोषणा केली. आणि पहिल्याच ठरावाव्दारे त्या वेळचा भाषाविषयक वाद लक्षात घेऊन मराठीचे कार्यक्षेत्र वाढविण्याकरीता त्या वेळचा भाषाविषयक वाद लक्षात घेऊन मराठीचे कार्यक्षेत्र वाढविण्याकरीता ''विदर्भ साहित्य मंदिर'' उभारण्याचे, अमरावतीचे केन्द्रीय कार्यालय व दप्तर नागपूरात हलविण्याचे व ताबडतोब जागेच्या प्रयत्नास लागण्याचे याच चन्द्रपूर अधिवेशनात घोषित केले.

त्याचबरोबर संघाध्यक्ष श्री.भाऊसाहेब माडखोलकर यांनी नवीन कार्यकारिणीही घोषित केली ती अशी :- या संमेलनापूर्वी संमेलनाचे कर्तबगार सरचिटणीस प्रा.ना.कृ.दिवाणजी हे मोटर अपघातात ठार झाल्याने त्यांच्या जागी

सरचिटणीस श्रीमती शंकुतलाबाई दिवाणजी, चिटणीस श्री.रा.पु.सगदेव आणि सल्लागार न्यायमुर्ती के.तु.उर्फ अण्णासाहेब मंगळमूर्ती श्री.पु.य.देशपांडे, श्री.बाळासाहेब मंगलमूर्ती, श्री.बाळासाहेब ढवळे, श्री.ना.रा.शेंडे, श्री.ए.श्री.पटवर्धन, याच सभेत ठराव करुन दोन उपसमित्याही निर्माण करण्यात आल्या. (१) निधी समिती व (२) मंदिर समिती.

निधी समितीचे अध्यक्ष न्या. मू. अण्णासाहेब मंगळमूर्ती व आमंत्रक श्री.बाळासाहेब ढवळे तर मंदिर समितीचे ही अध्यक्ष न्या. मू. अण्णासाहेब मंगळमूर्ती व आमंत्रक श्री.ए.श्री.पटवर्धन यांची योजना करण्यात आली.

भूमी प्राप्त झाली :-

संघाध्यक्ष श्री.भाऊसाहेब माडखोलकर यांनी २० फ्रेबुवारी १९५० रोजी नागपूरच्या डेप्युटी कमिश्नरकडे आवेदनपत्र देऊन विदर्भ साहित्य संघ भवनाकरीता जागेची मागणी केली होती. या आवेदनाचा विचार होऊन १ मार्च १९५० रोजी जेलरोड (हल्लीचा पं.जवाहरमार्ग) व उत्तर अंबाझरी रोड यांच्या कोपऱ्या वरील ००.७५ एकर (३२,००० चौ.फुट) जागेस स्वीकृती देण्यात आली. या जागेचे वार्षिक भाडे केवळ एक रुपया आहे. पण ही जागा अपुरी पडेल असे दिसून येताच पुन: सरकारकडे अधिक जागेची मागणी करण्यात आली. ही मागणी स्वीकृत होऊन संघाला आता १.२० एकर म्हणजे ५२,५०६ चौ.फुट भुमी निश्चित झाली. तिचे पंजीकरण झाल्यावर मंदिराच्या उभारणीस प्रारंभ झाला.

भूमिपूजन :-

२० ऑक्टोबर १९५० रोजी सकाळी ९.३० वाजता विजयादशमीस भूमिपूजनाचा समारंभ संघाध्यक्ष श्री.भाऊसाहेब माडखोलकर यांचे शुभहस्ते उत्साहात पार पडला. या समारंभास सर्वश्री अण्णासाहेब मंगळमूर्ती, ए.श्री.पटवर्धन, बाळासाहेब ढवळे, डॉ.वि.भि.कोलते, प्रा.वा.कृ. चोरघडे, रा.पु.सगदेव, डॉ.मा.गो.देशमुख, नानासाहेब जोग, ना.रा.शेंडे, म.नी.भवाळकर, कुंदर दिवाण, केशवराव केळकर, सुरेश डोळके प्रभृती सान थोर उपस्थित होते.

नानासाहेब जोग यांचा "रुपया निधी" :-

भूमीपूजनाच्या वेळी भूमिपूजनाच्या भूमीवरच श्री.नाना जोग यांनी मंदिर उभारणीसाठी आपली पहिली देणगी म्हणून एक रुपया कोषाध्यक्षांचे हाती देऊन "रुपया निधी" सुरु केला. त्यांच्या या औचित्यपूर्ण कल्पनेचे सर्वांनी सहर्ष स्वागत केले. व तिथल्या तिथे बराच निधी जमाही झाला. अशाप्रकारे विजयादशमी च्या मुहूर्तावर आलेला श्री.जोगांचा निकट संबंध विदर्भ साहित्य मंदिर व पुढे वि.सा.संघाचे धनवटे रंगमंदिराचे काम सुरु होईपर्यत आजीव राहिला. भाऊसाहेब माडखोडकर योग्य माणसे योग्य कामी जोडण्यात मोठे कुशल होते. ए.श्री.पटवर्धन, बाळासाहेब ढवळे, यांच्या बरोबरीने कुशल कार्यकर्त्यात नानासाहेब जोगांची विशेषत्याने भर पडली. त्यांची कामगिरी मंदिर उभारणीत ऐतिहासिक अशी चिरस्मरणीय ठरली आहे.

लोकनायकांची भेट व आशीर्वाद :-

बिहारचे राज्यपाल लो. बापूजी अणे यांनी नव्या वर्षारंभी १ जानेवारी १९५१ रोजी विदर्भ साहित्य संघ भूमीस भेट दिली व रु.१००० ची देणगी जाहीर करुन मंदिर उभारणीच्या कार्यास आपला शुभाशीर्वादही दिला.

पहिले आश्रयदाते :-

यानंतर २६ मार्च १९५१ रोजी श्रीमंत बाबूरावजी देशमुख यांनी रु. ५,००० ची उदार देणगी देऊन ते विदर्भ साहित्य संघाचे पहिले आश्रयदाते झाले. या देगणीमुळे साहित्य मंदिर उभारणीच्या कार्यास उत्साही चालना मिळाली. तसेच सर्वश्री माडखोलकर, ढवळे व पटवर्धन यांच्या शिष्टमंडळाने केलेल्या जिकिरीच्या प्रयत्नामुळे दुसरी देणगी मध्यप्रदेश वऱ्हाड शासनाची सुध्दा रु. ५००० हाती आल्याने कार्यकर्त्यांचा उत्साह व्दिगुणित झाला. विदर्भ साहित्य मंदिराची कोनशिला :-

१५ एप्रिल १९५१ रोजी रामनवमीच्या मुहूर्तावर विदर्भ साहित्य मंदिराची कोनशिला बसविण्याचा समारंभ मध्यप्रदेश वऱ्हाड शासनाचे गृहमंत्री ना.प. व्दारकाप्रसाद मिश्र यांच्या हस्त मोठ्या थाटाने पार पडला. त्याप्रसंगाची स्मृती म्हणून

साहित्य मंदिरावर खालील लेख कोरलेला आहे.

श्री

विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य मंदिर - कोनशिला स्थापना

नामदार पंडित व्दारकाप्रसार मिश्र

गृहमंत्री, मध्यप्रदेश यांच्या हस्ते

मिती रविवार, चैत्र शुध्द ९, शके १८७३

दि. १५ एप्रिल १९५१

संघाध्यक्ष : श्री. गजानन त्र्यंबक माडखोलकर

या कोनशिलेसोबत विदर्भ साहित्य मंदिराच्या पायात ठेवण्यासाठी जो ताम्रपट तयार करण्यात आला होता तो संपूर्ण पुढे दिला आहे.

श्री. विदर्भ साहित्य संघ

स्थापना : उमरावती येथे शालिवाहन शके

१८४४ इ.स. १९२३ या वर्षी

संस्थापक : बळवंत गणेश खापर्डे

प्रथम संमेलनाध्यक्ष : श्रीपाद कृष्ण कोल्हटकर

कार्यक्षेत्र : वऱ्हाड आणि मध्यप्रदेश

उद्देश : मराठी भाषा व साहित्य यांच्या

अभिवृध्दर्थ सर्व दृष्टीने प्रयत्न करणे.

जुन्या कार्यकारिणीची बैठक :-

सकाळी हा कार्यक्रम आटोपल्यावर दुपारी ३ वाजता संघाध्यक्ष श्री.ग.त्र्यं. माडखोलकर यांचे अध्यक्षतेखाली त्यांच्याच "प्रसाद" बंगल्यावर जुन्या अधिकाऱ्यांची सभा घेण्यात येऊन खालील निर्णय घेण्यात आले.

१) विदर्भ साहित्य संघाचे पहिले आश्रयदाते श्रीमंत बाबूरावजी देशमुख यांचा सत्कार, (२) ग.श्री.उर्फ नानासाहेब जोग यांची मंदिर समिती स्वीकृती (३) विदर्भ साहित्य संघाचे बोध चिन्ह स्वीकृती.

विदर्भ साहित्य संघाचे १३ वे अधिवेशन अकोला येथे २८ व २९ एप्रिल रोजी श्री.ग.त्र्य. माडखोलकर यांचे अध्यक्षतेखाली अपूर्व थाटात पार पडले. स्वागताध्यक्ष विदर्भ केसरी ना. ब्रिजलाल बियाणी होते. सारे कार्यक्रम वैभवशाली झाले. त्यांची चित्रफीत घेण्यात आली होती. नवनिर्वाचित संघाध्यक्षा प्रा.सौ.कुसुमावती देशपांडे यांचे स्वाधीन संघाची सूत्रे करण्यात आली. स्वत: श्री.माडखोलकर हे संघाचे सरचिटणीस पदावर आले. याच कार्यकारिणीपासून प्रस्तुत लेखकचा विदर्भ साहित्य संघाच्या कार्यात प्रवेश झाला.

पुष्करिणी व लोहकुटी :-

यानंतर थोड्यात अवधीत नागपूरचे दानशूर श्रीमंत लक्ष्मण श्रीधर उर्फ बाबूरावजी देशमुख यांनी विदर्भ साहित्य मंदिरासाठी एक थोरली विहीर बांधण्याचा संपूर्ण खर्च करण्याकरीता विदर्भ साहित्य संघाला रु. २,५०० ची उदार देणगी श्रीमंत सौ.सत्यभामाबाई तथा माईसाहेब देशमुख यांच्या तर्फे देवविली. पुष्करणी तयार होत असतांनाच विदर्भ साहित्य संघाचे स्वत:चे कार्यालय थाटण्याकरीता शेजारीच एक प्रशस्त "लोहकुटी" तयार केली. या स्वत:च्या लोहकुटीत कार्यकारिणीची पहिली सभा १६ सप्टेबर १९५१ ला रविवारी झाली. या वेळपावेतो कार्यकारिणीच्या तैमासिक सभा संघाध्यक्षांच्या निवासस्थानीच होत होत्या.

गृहप्रवेश :-

गृहप्रवेशाचा मुहूर्त १ जुलै १९५१ हा ठरला. विविध कार्यक्रम आखला गेला. (१) पुष्करणीचे जलसंस्करण, (२) गृहप्रवेश व (३) वृक्षारोपण या कार्यक्रमाचे पौरोहित्य श्री.दामलेगुरुजी यांचेकडे सोपविले होते. सकाळी ८-१५ ला गृहप्रवेश करण्यात आला. गृहप्रवेशाच्या वेळी अग्रभागी हातात ताम्रकलश घेतलेल्या संघाध्यक्ष सौ.कुसुमावती देशपांडे. त्यांच्या दोन्ही बाजूना हातात मंगलदीप व नैवेद्य असलेल्या सौ.विमलाबाई देशपांडे व सौ.सिंधुताई जोग, नंतर हातात सरस्वतीची मुर्ती घेतलेले उपाध्यक्ष श्री.पु.य.देशपांडे, नंतर संघाचे धन चांदीच्या ताटात घेतलेले कोषाध्यक्ष बाळासाहेब ढवळे या पदाधिकाऱ्यांच्या व्यतिरिक्त संघाचे आश्रयदाते श्री.ब्रिजलालजी बियाणी, न्यायमूर्ती अण्णासाहेब मंगलमूर्ती, व त्यांच्या मागून पूर्वाध्यक्ष प्रा. दादासाहेब बनहट्टी, डॉ.भाऊसाहेब कोलते, डॉ.मा.गो. देशमुख , श्री.नानासाहेब जोग, श्री.भाऊसाहेब माडखोलकर, रा.पु. सगदेव अशी गृहप्रदक्षिणेची आयोजना करण्यात आली होती. प्रदक्षिणेनंतर आपल्या स्वत:च्या मालकीच्या टुमदार उभारलेल्या लोहकुटीत प्रवेश करण्यात आला. शेवटी मंत्रपुष्प होऊन सर्वाना प्रसाद वाटण्यात आला.

आजपर्यत संघाच्या कोणत्याही सभा संघाध्यक्षांच्या घरी होत असत. पण गृहप्रवेशानंतर या लोहकुटीत त्या होऊ लागल्या व कार्यालयही त्यातच थाटण्यात आले.

धनिकांची व शासनाची मदत :-

पाहता पाहता मंदिर उभारणीच्या कार्याला जोर चढला. तीन लाखाची मंदिर योजना निश्चित केल्या गेली. विदर्भ साहित्य मंदिराच्या उभारणीकरिता ''रुपयानिधी'' नंतर श्रीमंत दामूअण्णा व सौ.सगुणादेवी देशमुख, पूर्णचन्द्रराव बुटी व बंधु, लो.टिळक पर्स फंड, गडकरी स्मारक समिती, संशोधन समिती अशा व्यक्ती व समित्यांकडून देणग्या प्राप्त झाल्या. त्याचप्रमाणे त्यावेळचे मुख्यमंत्री पं. रविशंकर शुक्ल, अर्थशास्त्राचे उपमंत्री ना.ख. उर्फ बाळासाहेब तिरपुडे यांनीसुध्दा मंदिराच्या

बांधकामासाठी सढळ हाताने अनुदाने देण्यात तत्परता राखली व राज्यपुनर्रचनेच्या कालात शेवटले रु साठ हजार संघाच्या हातात येताच मंदिरावर कळस चढला.

विश्वस्तमंडळ :-

चन्द्रपुर येथील १२ व्या अधिवेशनात नवनिर्वाचीत संघाध्यक्ष श्री.ग.त्र्य. माडखोलकर यांनी विदर्भ साहित्य संघासाठी ''विदर्भ साहित्य मंदिर'' उभारण्याचे ५ फेब्रुवारी १९५० रोजी घोषित केले. व १ मार्च १९५० रोजी मंदिराच्या जागेस त्यांनी स्वीकृती मिळविली. तडकाफडकी अमरावतीचे केन्द्रीय कार्यालय नागपुरात आणण्यात आले. संघाध्यक्ष श्री.भाऊसाहेब माडखोलकर, सरचिटणीस श्रीमती शकुंतलाबाई दिवाणजी, चिटणीस श्री.रा.पु.सगदेव आणि सल्लागार न्यायमूर्ती अण्णासाहेब मंगळमूर्ती व श्री.पु.य. देशपांडे आमंत्रक श्री.बाळासाहेब ढवळे व श्री.ए.श्री.पटवर्धन प्रभृतीच्या कार्यदक्षतेने लवकरात लवकर मंदिर साकार झाले.

विश्वस्तमंडळ निर्माण समिती :-

आता हा वाढलेला निधी, समित्या व अन्य सर्व व्याप लक्षात घेऊन विश्वस्तांची निकड भासू लागली म्हणून विश्वस्तांची योजना करण्याकरिता इ.स. १९५२ मध्ये न्यायमूर्ती के.तु. मंगळमूर्ती त्यांच्या अध्यक्षतेखाली विदर्भ साहित्य संघ केन्द्रीय कार्यकारिणीने एक समिती निर्माण केली ती अशी :-

न्यायमूर्ती के.तु. मंगळमूर्ती
डॉ.यशवंत खुशाल देशपांडे व
श्री.पुरुषोत्तम यशवंत देशपांडे

या समितीने शिफारस केल्याप्रमाणे पहिल्या विश्वस्त मंडळावर खालील श्रेष्ठींना घेण्यात आले.

१) बिहारचे राज्यपाल लो. माधव श्रीहरी उर्फ बापूजी अणे.

२) न्यायमूर्ती श्री.केशव तुकाराम उर्फ अण्णासाहेब मंगळमूर्ती.

अमरावती जिल्ह्यातील साहित्यिकांची दिंडी :-

विदर्भ देशाला "सारस्वतांचा देश" म्हणतात. साहित्य प्रांगणात पाऊल टाकणाऱ्या सहित्य-पूजकाला पहिला दंडवत घालावा लागतो उपासनस्य महिंद्रभट्टाला. त्याने लिहिलेले लीळाचरित्र साहित्यातला नीलमणी असून त्याच कालखंडातल्या महंदबेने लिहिलेले धवळे मराठी भाषेतला मौक्तिकहार आहे. यादव काळातील या महानुभाव ग्रंथकारांनी मराठी भाषेच्या समृध्दीला गौरवास्पद योगदान दिले.

पेशवे काळात अंजनगाव सूर्जी येथील देवनाथ व दयाळनाथ या गुरुशिष्यानी ग्रंथ रचना केली. नवनवीन छंद बाधले. आपल्या वाणीने पेशवे-शिंद्याची मने आकर्षित करुन त्यांचा दरबार मंत्रमुग्ध केला.

एकोणिसाव्या शतकाच्या पूर्वार्धात माधान येथील प्रज्ञाचक्षू संत गुलाबराव महाराजानी विपूल ग्रंथरचना करुन मधुरा भक्तीचे दैदिप्यमान लेणे मराठी भाषेला लेवविले. ते स्वत:ला ज्ञानेश्वर कन्या म्हणवून घेण्यात अन्य समजत. मंगरुळ दस्तगीरचे गणपत महाराजानी ओवीबध्द थोडी ग्रंथरचना केली आहे. या कालखंडात केतकर, कविभूषण अण्णासाहेब खापर्डे, बाळकृष्ण संतुराम गडकरी, वामनराव जोशी, बामणगाकर, अनंतवार ह्यानी साहित्य नाटकाची जोपासना केली. ब्राम्हण कन्येसारख्या वैचारिक व स्फोटक कादंबऱ्या व महाराष्ट्राचे काव्यपरीक्षण या सारखे प्रबंध लिहिणाऱ्या केतकराचे आयुष्य पुण्यास गेले असले तरी त्यांचा जन्म, बाळपण व शिक्षण अमरावतीत झाले. सध्याची श्याम टॉकीज असलेली वास्तू ज्या ठिकाणी आहे, तेथेच त्यांचे राहाते कौलारु घर होते. अमरावती जिल्ह्याच्या साहित्य विश्वातील काव्यदालनाचे दर्शन घ्यावयाचे झाल्यास महाराष्ट्रातून प्रवेश करतांना कविभूषण ब.ग.उपाख्य अण्णासाहेब खापर्डे यांना मानाचा मुजरा करावा लागतो. वैदभीय साहित्यिकांना स्वत:चे असे प्रतिष्ठेचे साहित्यिक व्यासपीठ असावे या भूमिकेतून त्यानी विदर्भ साहित्य संघाची स्थापना केली. ही त्यांची बहुमोल कामगिरी होय. बाळकृष्ण संतुराम गडकरी हे कादंबरीकार सध्याच्या न्यू हायस्कूल मध्ये इंग्रजीचे मास्तर होते. त्यांच्या कादंबऱ्या

त्याकाळी लोकांना प्रिय होत्या, नाटकात वीर वामनराव जोशी चांगले गाजले. ''रणदुंदुभि'' नाटकातले उतारे व गाणी लोकांनी मुखोद्गत केली होती. उदयकार बामणगावकर हेही नाटककार म्हणूनच ओळखल्या जात.

१९४० ते ५० च्या काळात पु.य.व अनिल हे देशपांडेब्दय, कविरत्न कृष्णमूर्ती, मा.ल.व्यवहारे, तुकडोजीं महाराज साहित्य क्षेत्राच्या उदयगिरीवर साहित्यपताका खांदी घेऊन उभे होते. बाजच्या पिढीला कृष्णमूर्तीचे नाव माहित नसेल, परंतु तुकडोजी महाराजाचे नाव माहित नसणारा सापडणे अशक्य आहे. त्यांची ग्रामगीता घरोघर पोहचली. त्यांची रसाळ गीते जनतेच्या ओठी नाचू लागली. त्यांचे अभंग काव्य मराठी साहित्याच्या दरबारातील समाजसबोधनाचा व आत्मिक आनंदाचा अमूल्य ठेवा होय. मा.ल.व्यवहारेच्या कविता किर्लोस्कर सारख्या मान्यवर मासिकातून छापून येऊ लागल्या. दिनानाथ म्हणवून घेणाऱ्या संत पुरुषाने विपूल ग्रंथरचना केली आहे. पण ती अप्रकाशित असून संदुकात पडून आहे. मुंबईस वास्तव्य करुन असलेले सिनेमा दिग्दर्शक विश्राम बेडेकर हे मूळचे अमरावतीचेच, त्यांची रणांगण ही कादंबरी १९३८ साली चर्चेचा विषय झाली होती. त्यांनी नाटकेही लिहिलित. नाट्य क्षेत्रात अमरावतीचेच विद्याधर गाखले अद्यापही ख्यात आहेत. याच काळात नुकताच किंग एडवर्ड कॉलेजात मराठीचे प्राध्यापक झालेले कोलते काव्यरचना करु लागले. त्यांनी आपली दृष्टी शोधनाकडे वळविली, ते अमरावतीचे नसले तरी सुरुवातीला त्यांचे साहित्यक्षेत्र अमरावती होते.

ज्यांच्या पावन वैखरीने नुसता विदर्भच नव्हे, तर अख्खा महाराष्ट्र दुमदुमून निघाला ते कर्मयोगी गाडगे महाराज अमरावती जिल्ह्यातील शेणगाव येथे जन्मास आले. त्यांनी कीर्तनाच्या माध्यमातून आपला रोकडा मानव धर्म रंजल्या गांजल्या ग्रामीण लोकापर्यत वऱ्हाडी बोलीतून पोचविला. आजच्या वऱ्हाडी साहित्य गंगेचे मूळ गाडगे बाबाच्या अमृतवाणीत शोधावे लागते.

१९५० नंतर काव्य प्रांतात अमरावती जिल्ह्यात जी नवी पिढी उदयास आली तिने विदर्भास साहित्यिक चेहरा दिला. या पिढीचे बिनीचे शिलेदार प्रा.मधुकर

केचे आहेत. त्यांनी अभंगवृत्तात काव्यलेखन करुन महाराष्ट्र शाखेच्या प्रांगणात आपली "दिंडी" पुढे नेली. वऱ्हाडी बोलीस शरश्चंद्र जिव्हाळ्याने व्यक्त केले आहे. गीत गोविंदकार मनोहर कविश्वर श्रेष्ठ दर्जाचे कवित आहेत. गीतगोविंद या त्यांच्या काव्यातील कल्पना उत्तुंग, उदात्त व उत्कट आहेत. गीत गौतम, गीत गजानन इत्यादी त्यांची ग्रंथसंपदा आहे. अच्युत महाराजाचे अप्रकाशित ग्रंथलेखन विपुल आहे. अध्यात्मिक क्षेत्रात त्यांचे स्थान फार मोठे आहे.

प्राचार्य राम शेवाळकराची लेखणी काव्याच्या प्रांतात वैशिष्ट्यपूर्ण ठसा उमटून आहे. त्यांचे वैचारिक व ललित लेखन आणि विशेषकरुन रसाळवाणी अधिक सुपरिचित आहे. विदर्भ साहित्य संघाच्या अध्यक्षपदाची सुत्रे त्यांच्या हाती सोपवून साहित्यिकांनी त्यांच्या साहित्य सेवेची पोच दिली आहे. या कालखंडात नाटक, कथा व समीक्षाण क्षेत्रात अमरावती जिल्ह्यात दमदार साहित्यिक नावलौकिकास आले. किशोर दिघेकर व मधुकर आष्टीकर हे दोन नाटककार दोन ध्रुवाप्रमाणे अद्यापही नाट्य क्षेत्रामध्ये तळपत आहेत. दिघेकराचे "स्वतंत्र भारत" व आष्टीकराचे "वैरी" ही गाजलेली व लोकप्रिय नाटके आहेत. कथा कादंबरी प्रातात उध्दव शेळके व मनोहर तल्हार यांनी वऱ्हाडी जीवनाचे वास्तव दर्शन काळजाला स्पर्श करील एवढे प्रभावी केले आहे. मनोहर तल्हाराची माणूस ही कादंबरी जीवनातील संकटाशी झुंज देणाऱ्या दोन मित्रांच्या अव्दैत मैत्रीची हृद्यभेदक कहाणी आहे. शेळकेच्या धग कादंबरीच्या विद्यापीठाने अभ्यासक्रमात समावेश करुन गौरव केला. प्रबंध रचनेत अ.बा.देशपांडे व ग.त्र्यं. देशपांडे यांनी किर्ती संपादन केली. अ.ना.देशपांडे, चांदूर तालुक्यातील कळाशी गावचे कळाशीकर देशपांडे, मराठी वाङ्मयाचा इतिहास लिहून त्यांनी साहित्यिकांच्या प्रथम रांगेत बसण्याचा बहुमान प्राप्त केला. वडनेरगंगाईच्या ग.त्र्यं. देशपांडेनीहि मराठीत भारतीय साहित्य शास्त्राचे प्रबंध लिहून लौकिक संपादन केला. या दोन्ही देशपांडे व्दयांनी मराठीची केलेली सेवा अनन्य साधारण अशीच आहे.

गझल सम्राट म्हणून गाजत असलेले अमरावतीचे सुरेश भट हे १९५०

सालापासून काव्यरचना करीत. तथापी ते मराठी गझल क्षेत्रातले किमयागार मनसबदारच झाले. त्यांनी गझलकाराची सेना उभी केली. हा प्रतिभासंपन्न कवी अमरावती जिल्ह्याचा साहित्यिक मानबिंदू असून विदर्भाचे भूषण आहे. भटानी ''रंग माझा वेगळा'' व ''एल्गार'' च्या माध्यमातून रसिकाची मने जिंकली आहेत.

तुळशीराम काजे हे मोर्शी तालुक्यातील लोणी येथे अध्यापक मान्यता प्राप्त साहित्यिक पत्रिकातून प्रकाशमान झालेले नव्यावळणाचे एक तेजस्वी कवी. ''भ्रमिष्टाचे शोकगीत'' या त्यांच्या कविता संग्रहाला पारितोषिक देऊन शासनाने गौरविले आहे. बाबा मोहड हे माधानचे एक साहित्यिकपिंड असलेले व्यक्तिमत्व. कवि, कथाकार, ललित लेखक या विविध रुपांनी ते सुपरिचित आहेत. त्यांना समकालीन असलेले वरुडचे श्याम सोनारे मान्यताप्राप्त नावाजलेले कवि आहेत. त्यांच्या गनमन भवरीची भोवळ अजूनही रसिक मनावर कायम आहे. धावणगाव रेल्वे येथील गोविंद बन्नोरे या कविची ''तळमळ'' रसिकांना सुपरिचित आहे. तसेच तिवसा तालुक्यातील वर्धा व विदर्भा नदीच्या संगमावर वसलेल्या व कौडिण्यपूर तीर्थक्षेत्राच्या सान्निध्यात असलेल्या धारवाड या गावचे व केवळ वऱ्हाडीतच विपुल काव्यलेखन करणारे जेष्ठ कवि देविदास सोटे यांनी वऱ्हाडी साहित्यात उल्लेखनीय भर टाकली. वऱ्हाडी भाषेचा शब्दकोष तयार करुन त्यांनी भाषेच्या पुरातन वास्तूची नव्याने पायभरणी केली.

१९५६ नंतर अमरावती जिल्ह्यात उदयास आलेल्या व सातत्याने सकस काव्यलेखन करणाऱ्या कवीम्धये सुधाकर देशमुख, कृष्णा चौधरी, केशव बोबडे व ललित सोनोने ह्यांचा उल्लेख करावा लागेल. १९६५ नंतर मात्र प्रतिमाच्या माध्यमातून जबरदस्त आशय व्यक्त करणाऱ्या कवितेचा वेगवान प्रवाह अमरावती जिल्ह्याच्या क्षेत्रातून धावू लागला. या प्रवाहाचे गतिमान यात्रिक म्हणून सुभाष सावरकर, मधुकर वाकोडे, सुखदेव ढाणके, राम देशमुख, प्रभा गणोरकर, शिवा इंगोले, देवानंद गोरडे, बबन सराडकर, अरुण सांगोळे, गंगाधर पुसदकर, अशोक थोरात, प्रतिमा इंगोले, सुनिता झोड, नरेंद्र काठोळे, अशोक अळे, कुमार बोबडे, अशोक राणा, प्रा.कविता डबरे, राजा धर्माधिकारी, अशोक बोंडे, अशोक ढोले, गणेश टाले, हरिदास बन्सोड,



कविभूषण, महाकवी बळवंत गणेश खापर्डे

मंगेश बन्सोड, शिवनयन ठाकरे, राज यावलीकर इत्यादींचा उल्लेख करावा लागेल, कथा कादंबरी क्षेत्रात अरुण साधू व गो.नि.दांडेकराचा उल्लेख क्रमप्रात आहे. सध्या अमरावती जिल्ह्याच्या बाहेर त्यांचे वास्तव्य असले तरी त्यांचे बालपण अमरावती जिल्ह्यातलेच, त्यांच्या मनावरचा संस्कार येथल्या काळ्या मातीचा व पूर्णेच्या पाण्याच्या ! ग्रंथक्षेत्रात ''अमरावती'' हा ग्रंथ लिहिणारे बापूसाहेब कारंजकर, मोर्शीकडले रु.पा.पाजणकर व अमरावतीस स्थायिक होऊन ग्रंथसंपदा लिहिणारे भाऊ मांडवकर ह्यांचा नामनिर्देश करावा लागेल.

कथेंच्या प्रदेशात नव्या पिढीचे सुभाष सावरकर, सुरेश आकोटकर, प्रतिमा इंगोले, सतीश तराळ, रमेश गाडे, अनुराधा वऱ्हाडे, अविनाश चिंचवडकर, बी.रंगराव, अरविंद महल्ले, अनिल प्रांजळे यांची यशस्वी वाटचाल सुरु आहे. कादंबरी क्षेत्रात सुभाष सावरकर, निरंजन माधव कृष्णकांत पराते व प्रथम पाऊल टाकणारे ना.म. वानखडे यांचा उल्लेख करावा लागेल. एकांकिका क्षेत्रात अनिल प्रांजळे यांची धडपड उल्लेखनीय आहे.

अमरावती जिल्हयातील दलित साहित्याचे व्यासपीठ तेवढेच सक्रीय आहे. मागील वर्षी संपन्न झालेल्या अस्मितादर्श मेळाव्यात अमरावती जिल्ह्यातील दलित साहित्यिकांनी लावलेल्या हजेरीवरुन याची साक्ष पटते. दलित साहित्य हे संस्कृतीने नाकारलेल्या समाज मनाचा हुंकार आहे. दलित कवितेतून जनसामान्याच्या उपेक्षित जीवनाचे वास्तववादी दर्शन घडत असल्यामुळे ती हृदयाचा ठाव घेतल्याशिवाय राहत नाही. या पार्श्वभूमीवर रमेश पाटील, प्रभाकर गंभीर, इब्राहिमखान, सतेश्वर मोरे, दिंगबर झाटे, नरेंद्र तायडे, शरद सुरजुसे, शिवा प्रधान, रोहण नागदिवे, सुदाम सोनुले, शरद रोहणकर इत्यादी दलीत कवींचा उल्लेख अपरिहार्य ठरतो.

अमरावती जिल्ह्यातील साहित्यिकांच्या दिंडीची वाटचाल अखंडितपणे चालू आहे. वाटचालीतील साहित्यिकांनी उधळलेले बहुविध रंग अवलोकून व त्यांच्या साहित्य प्रवाहातून वाहत असलेल्या भावतरंगाचा आस्वाद उपभोगून सामान्य रसिक जीवनाची पायवाट गुणगुणत दिंडीच्या मागोव्याने चालतो ही दिंडीची यशोगाथा म्हटली पाहिजे.

कविभूषण बळवंत गणेश खापर्डे (अण्णासाहेब खापर्डे) :-

कै.दादासाहेबांचे हे तिसरे चिरंजीव. पहिल्या चिरंजीवांचे नाव बाळकृष्ण, दुसऱ्याचे नाव देविदास, व तिसरे अण्णासाहेब (बळवंतराव). त्यांचा जन्म वऱ्हाडात अचलपूर येथे दि. ६.११.१८९० रोजी झाला. प्राथमिक शिक्षणास सरकारी शाळेत सुरुवात झाली. परंतु यांच्यामुळे एका शिक्षण संस्थेचा जन्म झाला. लो.टिळकांनी सुरु केलेल्या उपक्रमात भाग घेऊ नये, ते कार्यक्रम शाळेत घेऊ नयेत, वंदेमातरम् म्हणू नये, वगैरे नियम होते. परंतु एका गणेशोत्सव अथवा शिवाजी उत्सवास काही विद्यार्थी उपस्थित होते. ते लक्षात येताच त्यांना मुख्याध्यापकाने काढून टाकले. मुलांनी दादासाहेब खापर्डे यांच्याकडे रडत तक्रार केली. तेव्हा "बरं, आपणच एक शाळा सुरु करु." असे दादासाहेब म्हणाले. आणि प्रथम शिवाजी हायस्कुल, पुढच्या वर्षी राष्ट्रीय शाळा आणि पाठोपाठ प्रायव्हेट हायस्कूल दादासाहेबांनी सुरु केले. त्या शाळेचे अण्णासाहेब हे पहिले विद्यार्थी होते. ह्या संस्थेला प्रथम बेरार एज्यू. सोसायटी व हल्ली नूतन विदर्भ शिक्षण मंडळ म्हणतात. मॅट्रिकपूर्ण झाल्यावर कलकत्त्यास नॅशनल मेडिकल कॉलेजात शिक्षण घेण्यास सुरुवात केली. ह्या काळात देशभक्त नारायणराव सावरकर व देशभक्त केशव बळीराम हेडगेवार हेहि त्यांच्या सोबतच होते. कलकत्त्यास तरुण वयातच रवींद्रनाथ टागोर, विपिनचंद्र पाल इ. महान विभूतींशी परिचय झाला व सुसंस्कार घडले. त्यांना अभ्यास झेपेना शिवाय चिरफाड बघवेना. म्हणून त्यांनी शिक्षणास रामराम ठोकला. घरी शेती पहात असत. वर्तमानपत्र सुरु करता यावे म्हणून केसरीत व संदेशमध्ये काही काळ निर्वेतन उमेदवारी केली. व अमरावतीस येऊन उदय वृत्तपत्र बाबासाहेब व अण्णासाहेब यांनी सुरु केले. बनारस ला प्राध्यापक म्हणून नियुक्ति होईपर्यंत त्यांनी 'उदय' वृत्तपत्र चालविले. बालपणापासून काव्यलेखन करीत. इ. १९०९ पासून त्यांच्या कविता, स्फुटलेख, समीक्षणे, परीक्षणे, समालोचन इ. प्रसिध्द होऊ लागले. काव्यकांतार, (पूर्वखंड व उत्तरखंड), काव्य कान्तारातील फुले, सर्वस्वाची गद्यगाणी, मोलवान वस्तूंचा मोडका बाजार, अफजल वधाचा पोवाडा (ध्वनि मुद्रिका), अनन्ताची हाक, गाणे अता, कशाचे, रवींद्र साहित्य परिय (भाषांतर), कविता (स्वामी

विवेकानंदांच्या कवितांचे भाषांतर), भगवद्गीतेचे अंतरंग, साहित्याचा संसार, (पुणे विद्यापीठ) नाटकाचा संसार, विश्वाचा संसार, मनाचा संसार, योगी अरविंद व अंतर्ज्ञान, पुष्पांजलि, निरवाची वाणी, रा.ग.गडकरी यांचा कवि या नात्याने विचार विदर्भगीत, इ. पुस्तके प्रकाशित झाली आहेत. अस्तोदय, नवा बंगला, सत्याग्रही, जयभवानी, ही नाटके अप्रकाशित आहेत. काशी हिंदू विश्वविद्यालय तेवीस वर्षे मराठीचे प्राध्यापक या नात्याने सेवेत राहून इ. १९५२ मध्ये निवृत्त झाले. तेथे मराठी नाटके तर बसविलीच, परंतु हिंदी व बंगाली नाटकेहि दिग्दर्शित केली. यांनी बंगाली, हिंदी, संस्कृत, इंग्रजी, भाषांमधूनहि काव्यलेखन केले आहे. ते स्वत: नाटकात काम करीत असत. आणि मुख्य म्हणजे ह्यांनी रंगभूमीसाठी एक नवीन अभिनय देणगी दिली. ती म्हणजे मुकाभिनय. गोंदिया व भंडारा येथील विदर्भ साहित्य संमेलनात त्यांनी याचे प्रयोग देखील केले होते. व काशीला तर अगणित प्रयोग केले. अभिनय कलेचा वारसा त्यांना वडील कै.दादासाहेब खापर्डे यांच्याकडून मिळाला. एके काळी मराठी रंगभूमीवर दादासाहेब खापर्डे शैली ही अभिनय एक विशेष शैली गाजली होती. अण्णासाहेबांच्या काव्यावर प्रसन्न होऊन जगद्गरु श्री.शंकराचार्य (डॉ.कुर्तकोटी) यांनी अण्णासाहेबांना एका समारोहात ''कविभूषण'' हा किताब दिला. महाराष्ट्र शासन, भारत सरकार यांनीही अण्णासाहेबांना उत्कृष्ट काव्यलेखना बद्दल तीन वेळा विशेष पुरस्कार प्रदान केला आहे. अण्णासाहेबांनी विदर्भ साहित्य संघाची स्थापना केली. व सात आठ वर्षे ते सरचिटणीस होते. इ. १९६३ साली विदर्भ साहित्य संमेलनाचे अध्यक्ष होते. ''विदर्भ'' ह्या शब्दाचे, आणि वैदर्भीय अस्मितेचे जनकत्व अण्णासाहेबांकडे द्यावे लागेल. त्यांनी ''विदर्भगीत लिहून वैदर्भीय अस्मिता जागृत केली. ह.व्या.प्र. मंडळाचे गीत त्यांची रचले आहे. नागपूरचे पंडित, महामहोपाध्याय आचार्य बाळशास्त्री हरदास यांनी ''महाकाव्य हा विषय घेऊन महाकाव्य लिहिणारा जगातील एकमेव महाकवी'' असे अण्णासाहेबांचे वर्णन एका लेखात केले आहे. मराठीतील समीक्षकांनी वैदर्भीय असूयेपोटी, त्यांच्या ह्या अद्वितीय स्थानाकडे दुर्देवाने दुर्लक्ष केले. परंतु, अमरावती करांना तर ह्या गोष्टीचा अभिमान निश्चितच वाटेल. दुसरे म्हणजे मराठी भाषेत खऱ्या

अर्थाने गूढगुंजन काव्य लिहिणारे दोनच महाकवि (अर्थात आधुनिक काळातील) एक यतवमाळ जिल्ह्यातील वाटखेड येथील कै.गु.ह.देशपांडे व दुसरे अमरावतीचे कै.ब.ग. (अण्णासाहेब) खापर्डे. दोघेहि विदर्भाचे कै.मधुकर केचे यांनी एका लेखात अण्णासाहेबांना विदर्भाचे टागोर असा बहुमान दिला आहे. एका समीक्षकाने त्यांना ''विदर्भातील डान्टे'' असा बहुमान दिला आहे. सर्व मराठी भाषेच्या इतिहास कारांनी काव्य भूषण ब.ग. (अण्णासाहेब) खापर्डे यांना मराठीतील गद्यकाव्याचे आद्यप्रवर्तक जनक मानले आहे. मराठीत गद्य काव्य लिहिणारे दोनच श्रेष्ठ कवि झाले. एक कै.म.खं. चिटणीस व दुसरे कविभूषण अण्णासाहेब खापर्डे, कै.अण्णासाहेब श्रेष्ठ दर्जाचे व्याकरण कार होते. मडगाव (गोवा) येथील मराठी साहित्य संमेलनात (इ. १९२९), त्यांनी मराठी शुध्दलेखनाचे नियम मांडले ते स्वीकृत होऊन महाराष्ट्र शासनाने शुध्द लेखनाचे नवीन नियम तयार करेपर्यंत (इ.१९६४) ते नियम महाराष्ट्रात प्रचलित होते. कविभूषण अण्णासाहेब उत्कृष्ट वक्त्यांपैकी एक होते. महाराष्ट्रभर त्यांची व्याख्याने झाली आहेत. साहित्य, थिऑसॉफी, नीती, चिंतन, अध्यात्म हे त्यांचे भाषणाचे विषय असत. थिऑसॉफी (ब्रह्मविद्या) या त्यांचा अभ्यास फार दांडगा होता. महाराष्ट्र भर त्यांची थिऑसॉफीवर भाषणे झाली आहेत. अमरावतीच्या श्रीकृष्ण थिऑसॉफीकल लॉज (श्रीकृष्ण ब्रह्मविद्या मंदिर) चे ते काही काळ उपाध्यक्ष व काही वर्षे अध्यक्ष होते. त्यांचा स्वभाव शांत, होता. ते राष्ट्रवादी व हिंदूत्ववादी प्रवृत्तीचे होते. स्वा. सावरकरांचे नागपूर विद्यापीठात जे भाषण झाले ते त्यांना कै.अण्णासाहेबांनी तयार करुन दिले होते. दोऱ्याच्या धामधुमीत तात्यारावांना भाषण तयार कराव्यात वेळ मिळेना. तात्यारावांच्या त्या भाषणाची फार वाखाणणी झाली होती. ते फार चांगले रसिक आणि कला प्रेमी होते. ते फारच वक्तशीर आणि टापटीप पोषाख करणारे होते. नाममात्र स्वरुपात त्यांनी हिंदु महासभा व विश्व हिंदु परिषदेचे कार्य केले. त्यांच्या हस्ते ख्रिस्ती लोकांचे शुध्दीकरण करुन त्यांना हिंदूधर्मात पुनरागमन करण्याचे समारंभहि पार पडले. वडिलांप्रमाणे त्यांनीही रोजनिशी लिहिली आहे. त्यांचा मृत्यू दि. २५ जून १९७६ रोजी राहत्या घरी झाला.

बाळकृष्ण संतुराम गडकरी यांचे चरित्र :-

कै. बाळकृष्ण संतुराम उपाख्य भाऊसाहेब गडकरी विदर्भाचे हरिनारायण आपटे म्हणून ओळखले हात. त्यांचा जन्म २ ऑक्टो. १८८३ रोजी उमरावती येथे झाला. ते उमरावतीच्या हिंदू हायस्कूलमध्ये शिक्षक होते. तेथून ते निवृत्त झाले. त्यांनी अकरा कादंबऱ्या लिहिल्या. या कादंबऱ्यातून त्यांनी आंतर जातीय विवाह, दारुबंदी, अस्पृश्यता निवारण, भ्रष्टाचाराचे निर्मूलन, हुंडाविरोधी इ. सामाजिक, धार्मिक आणि राजकीय समस्यांचा सखोल उहापोह केला व कमी, कथालेखाक, नाटककार संपादक व टीकाकारही होते.

त्यांनी ५ नाटके २ प्रहसने व बरेच स्फुट लेखा लिहिले आहेत. त्यांचे हरिगीतांजली हे काव्य रचना, वृत्त, रागदारी अलंकार इ. गुणांनी परिपूर्ण असे काव्य आहे. त्यांना शास्त्रीय संगीताची अत्यंत आवड आणि व्यासंग होता. ते काही काळ "महाराष्ट्र वाग्विलास " व "वऱ्हाड शाळा पत्रक " या मासिकांचे संपादक होते.

अनेक अभ्यासकांनी त्यांच्या वाङ्मयाचा अभ्यास करुन त्यांना जेष्ठ साहित्यीकांच्या पंक्तित नेऊन बसविले आहे. अमरावतीच्या सौ.सिंधू मांडवकर यांनी कै.गडकरी यांच्या वाङ्मयाचे संशोधन करुन नागपूर विद्यापीठाची पी.एच.डी. पदवी संपादन केली. कै.गडकरी यांच्या साहित्याचे संक्षिप्तीकरण करुन सौ.मांडवकर यांनी तयार केलेल्या ग्रंथ साहित्य संस्कृती मंडळाच्या सहकार्याने स्मुतिदिनी १० डिसेंबरला १९८३ रोजी प्रकाशित झाला आहे.

शब्दकोशकार डॉ. द.ह. अग्निहोत्री :

शब्दकोशकार म्हणून विदर्भालाच नव्हे तर साऱ्या महाराष्ट्राला ललामभूत असलेले अमरावतीचे डॉ.दत्तात्रय हरि अग्निहोत्री (एम.ए.पीएच.डी.) यांचे दिनांक २२.११.९० रोजी अमरावती मुक्कामी ८० व्या वर्षी निधन झाले. एक ऋणानुबंधी यानात्याने त्यांचा अल्पसा परिचय करुन देण्याचा हा नम्र प्रयत्न.

डॉ.द.ह.उपाख्य बापूसाहेब अग्निहोत्री पूलगाव येथील जून्या स्टेशन

हायस्कुलचे मुख्याध्यापक असतांना प्रथमत: माझा यांचेशी परिचय झाला. नंतर आदर्श शिक्षण प्रसार सभा पुलगावचे संस्थापक सदस्य झाल्यावर माझी घनिष्ठता वाढली पण ती फार अल्पकाळ टिकली. कारण नंतर डॉक्टर वणी येथील लो.टिळक महाविद्यालयात (श्री.राम शेवाळकर यांचेपूर्वी) प्राचार्य रुजू झाले. १९६५ साली वणी येथे सेवानिवृत्त झाल्यावर नेरपरसोपंत या लहान गावी प्राचार्य म्हणून एक वर्षासाठी विद्यापीठाने मान्यता दिल्यामुळे सेवेत रुजू झाले. १९६६ नंतर अमरावतीलाच डॉक्टरांचे वास्तव्य होते. वरील कालखंडात एक शिस्तप्रिय कुशल प्रशासक व शिक्षणतज्ञ म्हणून डॉक्टरांनी नावलौकिक मिळविला. डॉक्टरांच्या स्वभावात मुळातच सौजन्य, मृदूता, ऋजुता व ज्ञानसाधनेमुळे आलेली सात्विकता अशा गुणसमुच्ययाचा समावेश होता. त्यासाठीच ते विद्यार्थी शिक्षक, प्राध्यापक, पालक, शिक्षणमंडळ, विद्यापीठ व सामाजिक, सांस्कृतिक क्षेत्रतात मान्यता पावले.

डॉ.अजातशत्रू होते, आळस हा त्यांचा एकमात्र शत्रु होता. डॉक्टर आमचे 'पॉवर हाऊस' होते. ज्या महत्वाच्या कर्तृत्वामुळे डॉक्टरांचे व्यक्तित्व अखिल महाराष्ट्रात मान्यता पावले ते म्हणजे त्यांनी संपादन केलेला 'अभिनव मराठी शब्द कोश'.

मराठी शब्दकोष निर्मितीचे कार्य डॉक्टरांनी एका हाती आव्हान म्हणून स्वीकारले होते. डॉक्टरांनी संपादन केलेल्या शब्दकोशाचे खंड प्रसिध्द झाले. या कोशाची मुद्रित पृष्टसंख्या अंदाले २५०० होईल. यात एकूण २६ परिशिष्टचे आहेत. कोशाची काही वैशिष्ट्ये अशी - यात प्रमाणित मराठी शब्दांचे उच्चार व मराठीच्या प्रमुख बोलींची वैशिष्ट्ये, प्रमुख पौराणिक व्यक्तीचा परिचय, अभिजात मराठी साहित्यात आढळणाऱ्या जुन्या व नव्या अलंकारांची लक्षणे, इंग्रजी शब्दांना समर्पक अशा मराठी प्रतिशब्दांची निर्मिती, शब्दांची व्युत्पत्ती, शब्दांचे संदर्भानुसार होणारे भिन्न-भिन्न अर्थ, महानुभाव पंथ, नाथ वारकरी, दत्त व रामदास या संप्रदायांच्या प्रमुख ग्रंथांचा सखोल अभ्यास व त्यांची ओळख. मराठीतील प्रमुख बोलीमधील शब्दांचा अर्थ व त्याची व्युत्पती, शासकीय व्यवसायातील शब्द, ऐतिहासिक पत्रव्यवहार व बखरी

यातील शब्द, ज्या शब्दांचे उच्चार त्यांच्या लिखित रुपाहून वेगळे आहेत त्या उच्चार इ. या पूर्वीच्या एकाही मराठी शब्दकोशात शब्दांचे उच्चार दर्शविण्याचाप्रयत्न झालेला नाही. हे विशेष वरील शब्दकोशाव्यतिरिक्त त्यांनी डॉक्टरेटसाठी लिहिलेला मराठी वर्णोच्चार विकास हा प्रबंध ग्रंथ, व त्याचे भवितव्य डॉ.श्रीधर व्यंकटेश केतकर याचे सामाजिक विचार इत्यादीचे लेखनही महत्वाचे आहे. ''महाराष्ट्र संस्कृतीचे तात्विक अधिष्ठान'' या त्याच्या ग्रंथासही विव्दानानी मन:पूर्वक दाद दिली आहे.

डॉ.साहेबासारखा अष्टपैलू व विलक्षण प्रतिमेचा सरस्वतीपुत्र आज काळाच्या पडद्याआड गेला आहे. त्याच्या पायावर श्रध्देने डोके ठेवावे अशी माणस आजकाल अभावानेच आढळतात. बापूसाहेब त्यापैकी एक होते. त्यांच्या स्मृतीला शतश: अभिवादन. (डॉ. योगेन्द्र भट)

सरस्वती पुत्राचे स्मरण :-

महाराष्ट्राची राजधानी मुंबई ही प्रख्यात पत्रकार स्व.खा.विद्याधर गोखले यांची कर्मभूमी असली तरी त्यांची जन्मभूमी मात्र अमरावतीच आहे. एक प्रख्यात पत्रकार, नाटककार, लेखक शायर, अभ्यासू, शिक्षण, संपादक वक्ते, खासदार असे कितीतरी पैलू गोखलेचे सांगता येतील.

सरस्वतीशी गोखले यांचे लहानपणा पासूनच सख्य असल्याने ते बहुभाषी, विव्दान होते. मिस्कील होते. हजरतबाबी होते व त्याहीपेक्षा एक सहृदयी माणूस होते. त्यांच्या वागणूकीत ओलावा असे. पण याचा अर्थ ते मिळमिळीत नव्हते. अभिजात बंडखोर होते. जे पटते ते स्वीकारायचे न पटलेले अव्हेराचे, हा त्यांचा बाणा.

शब्दप्रभू असल्याने त्यांनी सरस्वतीची खऱ्या अर्थाने सेवा केली. सरस्वतीचा त्यांना वरदहस्त होता. रंगभूमीची, विशेषत: संगीत रंगभूमीची त्यांनी खऱ्या अर्थाने सेवा करुन संगीत नाटकांना जीवनदान दिल. १९६० साली त्यांचे ''सुवर्णतुला'' हे नाटक रंगभूमीवर आले व संगीत नाटकांची परंपरा पुन्हा एकदा उजळून निघाली. याखेरीज ''मंदारमाला'' मदनाची मंजिरी, मेघ मल्हार, जय जय गौरीशंकर,

स्वरसम्राज्ञी, चमकला ध्रुवांचा तारा अशी १८ संगीत नाटके त्यांनी महाराष्ट्राला देऊन मराठी रंगभूमीची अजोड सेवा केली.

रसाळ, प्रसादिक व अर्थवाही भाषा ही त्यांच्या लेखणीची वैशिष्ट्ये म्हणता येतील.

केवळ नाट्यरचनाच नव्हे तर 'रंगशारदा नावाची नाट्य संस्थाही त्यांनी काढली. केवळ स्वत:चीच नाटके नव्हेत. तर मानापमान, विद्याहरण सारख्या जुन्या नाटकांचे प्रयोग खऱ्या अर्थाने सुविहीत केले. नवीन नट, गायक, नट्या त्यांनी रंगभूमीवर आणल्या. तसेच, संगीत नाट्य पथक योजना ही त्यांनी यशस्वीरीत्या राबविली.

उत्तम शेरशायरी व संस्कृतचे पांडित्य ही त्यांची जान. त्यांच्या लेखणीत व पत्रकारीतेतही याचा सुखद प्रत्यय येत असे. ते फर्डे वक्ते होते. पण आपल्या या लेखणीचा किंवा वक्तृत्व शैलीचा त्यांनी कधी गैरफायदा घेतला नाही. प्रचलित पत्रकारितेविषयी गोखले म्हणतात.

पत्रकारितेतला तो सात्विक नि तात्विक जमाना झपाट्याने दूर होत चाललाय. स्टंट बहादरांचा नि 'करिअरिस्टांचा' नवा जमाना सुरु झाला आहे. ''कॉकटेल जर्नालिझम'' दिवसेंदिवस फोफावत आहे. पण हेही दिवस जातील.

सरस्वतीपुत्र स्व. श्री.गोखले हे लोकप्रिय व व्यासंगी पत्रकार होते. पण शिवराळपणाचा वा पीत पत्रकारितेचा त्यांनी कधी वापर केला नाही. (तसे असते तर कालौद्यात त्यांचे कीर्तीला ग्रहण लागले असते) नि यातच त्यांची थोरवी आहे. या अष्टपैलू व्यक्तिमत्वाचा 'पत्रकारिता' हा महत्वाचा पैलू होता. त्यांनी 'पत्रकारिते' निमित्त व्यक्त केलेली चिंता ध्यानी घेऊन कै.अत्रे जन्मशताब्दी वर्ष व खा. गोखलेंच्या प्रथम स्मृतिदिनी (दि. २६) त्यांच्याप्रमाणे बनण्याचा संकल्प करु या ! त्या भाषाप्रभुला तीच खरी श्रद्धांजली ठरेल. त्यांचे तेच खरे स्मरण ठरेल.

अमरावतीची साहित्यधारा

वीर वामनराव जोशी (१८८१- १९५६)

अमरावतीच्या साहित्यविश्वात वीर वामनराव जोशी ध्येयवादी नाटककार, जागरुक पत्रकार आणि प्रभावी वक्ते म्हणून प्रसिध्द आहेत. १९३० ते १९४४ या काळात ते विदर्भ प्रदेश कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष आणि अखेरपर्यंत म्हणजे १९५६ पर्यंत ते अखिल भारतीय कॉंग्रेस कमिटीचे सदस्य होते. 'मोडेन पण वाकणार नाही', हा कणखर बाणा त्यांच्या जीवनात अन् लेखनातही प्रगटला आहे. प्रथम टिळकांच्या राजकारणात आणि नंतर गांधीजींच्या चळवळीत त्यांनी सक्रिय भाग घेतला. परिणामी त्यांना वेळोवेळी एकूण आठ वर्षे तुरंगवास भोगावा लागला.

वामनरावदादांना आपल्या विचाराची युवापिढी स्वातंत्र्यप्राप्तीकरता घडवायची होती. त्याकरता त्यांनी वृतपत्रांचा मार्ग अवलंबिला. जनजागृतीकरता १९२३ मध्ये त्यांनी 'स्वतंत्र हिंदुस्थान' हे पत्र काढून तेजस्वी पत्रकारितेचे व्रत स्वीकारले. पुढे सरकारच्या दडपशाहीमुळे व 'प्रेस ॲक्ट' चा निषेध म्हणून १९३० मध्ये हे पत्र बंद पडले आणि स्वातंत्र्यप्राप्तीनंतर १९४८ मध्ये पुन्हा सुरु झाले. श्री.ना.रा.बामणगावकर यांनी संपादित केलेल्या 'उदय' या वर्तमानपत्रातून दादांचे लेख, पत्रके, वृत्ते वेळोवेळी प्रकाशित होत गेले.

वर्तमानपत्री लेखनाबरोबरच त्यांच्या अमोघ वक्तृत्वानेही त्यांच्या राष्ट्रहितैषी विचारांचा प्रसार त्यांनी केला. अमरावती शहरातून कधी अध्यक्ष म्हणून, तर कधी वक्ता म्हणून वीर वामनरावदादांची कितीतरी भाषणे झाली. विषयांची मांडणी, बोलण्यातील चढउतार, आदेश, शब्दसामर्थ्य, भाषाशैली आदी गुणांनी त्यांची व्याख्याने अतिशय प्रभावी होत.

वामनरावदादांचा त्याग, सेवा, झुंजार वृत्ती, निर्भयता अन प्रभावी नेतृत्व लक्षात घेऊन वलगाव येथील सत्कार समारंभात त्यांचा गौरव करताना त्यांना 'वीर' ही उपाधी देण्यात आली.

आर्थिकदृष्ट्या हलाखीची परिस्थिती असूनही त्यांना पैशाचा मोह

कधी वाटला नाही. केशवराव भोसल्यांनी एका सत्कारप्रसंगी त्यांना दिलेली भरघोस देणगी त्यांनी पुण्याच्या अनाथ बालिकाश्रमाला देऊन टाकली. स्वातंत्रोत्तर काळात भारत सरकारने देशसेवेच्या गौरवार्थ दिलेले पाच हजार रुपयांचे मानधन 'मी देशाची सेवा केली, ती वैयक्तिक मोबदला मिळविण्याच्या उद्देशाने केली नसून समाज व राष्ट्र ऋण फेडण्याच्या कृतज्ञता बुध्दीने आणि कर्तव्यबुध्दीने केली, असे म्हणून राष्ट्रपतींना परत केले.

१९४१ मध्ये दिल्ली असेंब्लीकरता आणि १९४३ मध्ये अमरावती नगर परिषदेच्या नगराध्यक्षपदासाठी उभे असतांना दोन्ही वेळा ते तुरुंगात होते, पण तरीही जनतेने त्यांना निवडून दिले. एवढा जनतेचा त्यांच्या नेतृत्वावर विश्वास होता.

वामनरावदादांच्या ध्येयवादी जीवनदृष्टीचे आणि राष्ट्रवादी विचारसरणीचे प्रतिध्वनी त्यांच्या नाटकातही ऐकू येतात.

१)'कर्णवध' (१९११) हे त्यांचे पहिले नाटक. ते रंगभूमीवर आले नाही. २) 'राक्षसी महत्वाकांक्षा' (१९१४) या नाटकाने मात्र त्यांना अमाप लोकप्रियता मिळवून दिली. या नाटकाची मूळ कल्पना 'खुबसुरत बला' या एका उर्दू नाट्यकथेवरुन त्यांना सुचली. उर्दू साहित्यात त्यांना रुची होती. ललित कलादर्श नाटक मंडळीने हे नाटक रंगभूमीवर आणले, या नाटकातून ब्रिटिशांच्या आसुरी राजवटीवर त्यांनी प्रच्छन्न टीका केली. निस्सीम देशभक्तीच्या संसूचनामुळे या नाटकाला भरपूर यश मिळाले. या नाटकाच्या यशानेच वीर वामनरावदादा सुप्रसिध्द साहित्यिक ठरून महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून निवडले गेले. ३)'रणदुदुभी' हे त्यांचे आणखी एक गाजलेले नाटक. १९२७ मध्ये बळवंत संगीत मंडळाने ते सादर केले. धर्मसिंहासन, शीलसंन्यास, झोटिंग पाच्छाई न्यायाचा दरबार या त्यांच्या आणखी काही नाट्याकृती. या सर्व नाटकांत 'राक्षसी महत्वाकांक्षा' आणि 'रणदुदुभी' ही दोन नाटके विशेष गाजली. इंग्रज राज्यकर्त्याविरुध्द असंतोष निर्माण करुन जनतेला स्वातंत्र्यप्रवृत्त करण्याच्या हेतून त्यांनी नाट्यलेखन केले. तेव्हा रंगभूमीवर संगीताचे वर्चस्व होते. दादांची सारी नाटके संगीत नाटके आहेत. आपल्या नाटकातील पदे त्यांनी स्वत: रचली. यावरुन

त्यांच्या अभिजात काव्यशक्तीची ओळख पटते, त्यांची पदे लोकप्रिय ठरली. 'परवशता पाश दैवे ज्याच्या गळा लागला,' 'कोमल करुणा हालवि काळहृदया', 'जगी हा खास वेड्यांचा पसारा माजला सारा,' 'भरवसा नको या चोरांचा' या त्यांच्या नाटकातील पदांच्या ओळी आजही रसिकांच्या मनात निनादत आहेत.

उध्दव शेळके - अंगभूत तेजाचा मानकरी

वऱ्हाडच्या मातीतून मायदेशी माणसाच्या तोंडीचं काही लिहलं जाऊं शकतं हे गो.नि.दांडेकरानंतर विदर्भाच्या उध्दव शेळक्यांनी सिध्द करुन दाखविले आहे. शेळक्यांचे नाव उच्चारताच नागर जीवनानुभव आणि त्याचबरोबर ग्रामीण जीवनानुभव तितक्याच ताकदीने व समर्थपणे रेखाटणारे साहित्यिक व्यक्तिमत्व डोळ्यासमोर उभे राहते.

श्री.उध्दव जयकृष्ण शेळके यांचा जन्म वर्धा जिल्ह्यातील हिंगणघाटचा. बालपणानंतर उर्वरित जीवनक्रम अमरावती जिल्ह्यातील तळेगाव ठाकूर या छोटेखानी खेड्यात गेला. उपेक्षित नैराश्यपूर्ण जीवन, आर्थिक ओढाताण आणि प्रेमाचा अभाव या स्थितीतून त्यांनी जे भोगलं, जे अनुभवलं व जे सभोवताल पाहिलं, त्याच प्रतिबिंब त्यांच्या साहित्यात उमटले. १९५३ पासून उद्धव शेळक्यांनी लिखाणास सुरुवात केली. 'शिळान आठकथा' या त्यांच्या कथासंग्रहाला १९५९ मध्ये महाराष्ट्र सरकारचे पारितोषिक मिळाले.

उद्धव शेळक्यांनी ज्या कथा लिहिल्या विशेषत: 'लेकुरवाळी', 'माय', 'ताटातूट', 'त्याच गावच्या बाभळी', 'काहूर', 'भांडण' या कथामधून स्त्री जीवनाचे वास्तववादी चित्र रेखाटले आहे. आपल्या चिल्यापिल्यांसाठी, संसारासाठी, अर्धपोटी राहून खस्ता खाणारी, वात्सल्येची मूर्ती 'आई' होऊन, तर कधी 'बहिण' होऊन, तर कधी पत्नी होऊन वावरताना दिसते. वात्सल्यतेचे प्रतीक असणारी व जीवन संघर्षाला सर्व शक्तीनिशी समोर जाणारी 'स्त्री' प्रतिमा शेळके यांच्या ग्रामीण कथेचे वैशिष्ट्य आहे. त्यांच्या कथा-कादंबऱ्यातील स्त्री ही सरळमार्गी, कटिक, भाबडी, स्वत:च्या संसारावर मनस्वी प्रेम करणारी अशी वात्सल्यमूर्ती आहे. तसेच ती गरीब परंतु

स्वाभिमानी आहे. पण तिचा स्वाभिमान, अभिमान, तिची जिद्द अपत्यप्रेमापोटी ती गुंडाळून ठेवते. तात्पर्य प्रेम हे तिचे आद्यकर्तव्य आहे.

धग

शेळके 'धग' कार म्हणूनच पसिद्धीला पावले. या 'धग' कादंबरीवर 'पोहा चाल्ला महादेवा' हे शंभर टक्के वैदर्भीय संस्कृतीवर आधारित वैदर्भीय रंगभुमीवरचे आगळे वेगळे नाटक आहे. १९३५ नंतरच्या दशकाने कालबाह्य प्रेरणापायी भरकटलेल्या मराठी कादंबरीला पुन्हा मार्गावर आणण्याचे काम ज्या कादंबऱ्यांनी केले त्यापैकी एक महत्वाची कादंबरी म्हणजे 'धग' होय. 'धग' जनमाणसात इतकी रुजली की वाचक रसिकांना शेळकेंच्या अन्य कलाकृतींचा विसर पडला. धग ही कठोर वास्तवाचे कलात्मकरुप अविष्कृत करणारी पहिली ग्रामीण कादंबरी म्हणता येईल. ग्रामीण परिसराचे वास्तवपूर्ण चित्रण करणे हे 'धग' चे उदिष्ट नाही. माणसे पोकळीत जगत नसतात. समाजाच्या दृश्य-अदृश्य पाशांनी माणसाचे जीवन घेरलेले असते. माणसे साकार व्हावी याकरिता परिसर उभा करणे आवश्यक असते. शेळक्यांनी तो 'धग' मधून समर्थपणे उभा केला आहे. सुप्रसिद्ध समीक्षक डॉ.द.भि.कुळकर्णी 'धग' विषयी म्हणतात. ''उद्धव शेळके यांची धग एकीकडे आणि श्री.ना.पेंडसे यांच्या सर्व कादंबऱ्या एकीकडे केल्या तरी 'धग' च काकणभर सरस ठरेल. ''धग मधील संवाद जिवंत व व्यक्तिमत्वाचे वाहक असल्यामुळे त्याला वेगळी घाटणी आहे. थोडक्यात या कादंबरीत शेळके यांनी कुठेही कालबाह्य प्रेरणांशी तडजोड केली नाही.

अन्य कादंबऱ्या

धग मुळे लेखकाच्या अन्य कलाकृतीची दखल न घेणे म्हणजे त्यावर अन्याय करण्यासारखे होईल. शेळके यांनी 'डाळिबांचे दाणे' मधून शोषणाची कथा फार चांगली सांगीतली आहे. 'तमाशा जरी थेटरात जाऊन पोहचला तरी समाजातील स्त्री रस्त्यावरची वस्तू असंच धनदांडग्यांना वाटतं. तमाशातील कलावंतांना मन असतं, भावना असतात, आकांक्षा असतात हे त्यांनी या कादंबरीतून दाखविले आहे. या कादंबरीला म्हणावा तेवढा वाचकांचा आणि समीक्षकांचा प्रतिसाद मिळाला नसल्याची

खंत शेळक्यांच्या वाङ्मयाचे अभ्यासक डॉ.मदन कुळकर्णी यांनी व्यक्त केली आहे. १४ भाषेत भाषांतर होण्याचा मान 'धग' ला लाभला आहे. त्यांची 'महापाप' ही कादंबरी ग्रामीण जीवनातील कुळकायद्याच्या प्रश्नाला समर्थपणे चित्रीत करणारी कादंबरी आहे. 'रग' या कादंबरीने चित्रपट व्यवसायातील बेभरवशाचं स्वरुप व्यक्त केले आहे. 'खंजिरीचे बोल' या राष्ट्रसंताच्या चरित्रावरील कांदबरीतून तुकडोजी महाराजांचे देशकार्य, प्रसंगी त्यांनी दाखविलेल्या अलौकिकपणाच्या खाणाखुणा या सर्व बाबी त्यांनी बोलक्या केल्या. सामान्यातून असामान्यतेकडे महाराजांनी घेतलेली झेप हे आजच्या तरुण पिढीला समजेल, अशी संस्कारक्षमता 'खंजीरीचे बोल' या कादंबरीत आहे. पु.भा.भावे यांच्या जीवनावरील 'मन:पूत' व आचार्य अत्र्यांवरील 'साहेब' या कादंबऱ्या चरित्र वाङ्मयाचे दाल समृध्द करण्याऱ्या आहेत. याशिवाय 'अगतिक', 'अनौरस', 'असा उधळतो डाव', 'लेडीज होस्टेल', 'लालदिवा', 'हव्यास', 'डार्करुम' अशा ११२ कादंबऱ्या, १३ कथासंग्रह याशिवाय बालसाहित्य, नाटके, अनुवादित साहित्य, चित्रपटकथा, इत्यादी वाङ्मय प्रकार त्यांनी हाताळले आहेत. १९७१ ते ७६ या कालावधीत पुणे येथे 'किशोर मासिकांचे' संपादक म्हणून त्यांनी काम पाहिले.

नुकतेच त्यांनी वयाची ६० वर्षे पूर्ण केली. तब्येतीने सुरुवातीपासून नाजुक असलेल्या शेळक्यांना दोन मोठ्या आजारातून जावं लागलं आहे. फारस शिक्षण नसलेल्या उध्दव शेळक्यांना अमरावती विद्यापीठाने मराठी साहित्य अभ्यास मंडळावर घेतले आहे. तर त्यांच्या साहित्यावर ७ विद्यार्थी पीएच.डी. व एम.फिल. करीत आहेत.

आज ग्रामीण जीवनही एका संक्रमणावस्थेतून जात आहे. 'त्या बदलत्या जीवनाची स्पंदने शेळके सारख्या कुशल लेखकाने ग्रामीण साहित्यातून अविष्कृत करावे ही या निमित्ताने' अपेक्षा आहे.

जीवन जगण्याच एक साधन म्हणून वसा घेतलेल्या विदर्भाच्या या सरस्वती पुत्राकडून अधिकाधिक सरस्वतीची सेवा घडावी ही परमेश्वराजवळ प्रार्थना करीत असतानाच इ. १९९५ साली त्याचा स्वर्गवास घडला.

प्रा.म.गं.उपाख्य मनुताई नातु (१९१९-१९८८)

अमरावतीच्या साहित्यविश्वास प्रा.मनुताई नातू या एक विवेचक समीक्षक म्हणून गाजल्या. १९४७ पासून १९७७ पर्यंत-सेवानिवृत्तीपर्यत- त्या अमरावतीच्या विदर्भ महाविद्यालयात मराठीच्या प्राध्यापिका होत्या. बुद्धिप्रामाण्यवाद, विवेकनिष्ठ इहवादी दृष्टी आणि सामाजिक बांधिलकी हे त्यांचे महत्वाचे विशेष होत. स्त्रीची स्वतंत्र अस्मिता जागवण्याचा त्यांचा नेहमी प्रयत्न असावयाचा. पारंपरिक समाजातील स्त्रीचे दुय्यम स्थान त्यांना अमान्य होते. स्त्री-शक्तीची स्त्रीला जाणीव करुन देण्याचे कार्य त्यांनी केले. स्त्रीप्रमाणेच समाजातील दलित वर्गाच्या उन्नतीची कळकळ त्यांच्या ठायी होती. स्त्रीवर्गाच्या वा दलितवर्गाच्या उपेक्षेने समाजाची समूहशक्ती उपाणते, समाजजीवनाचा तोल ढळतो, परिणामी हा समतोल आपल्या प्रगतीला कुंठित करतो, या विचारधारेमुळे स्त्रिया व दलित यांच्याबद्दल त्यांना आत्यंतिक सहानुभूती वाटायची. 'नरेचिकेला हीन किती नर' या जाणिवेने त्या अनेकदा व्यथित होत. संवेदनक्षम मनोवृत्तीमुळे दीनदुबळ्यांची दु:खेच त्यांच्या लेखनातून प्रगटली आणि बौध्दिकदृष्ट्या त्यांनी त्या दु:खाची विवेकाधिष्ठित चर्चा आपल्या लेखनातून आणि भाषणातून केली. वेळोवेळी लिहिलेल्या त्याच्या लेखांचा संग्रह 'विवेकाची गोठी' (१९७७) या नावाने अमेय प्रकाशन, नागपूर यांनी प्रसिध्द केला. या पुस्तकात समाजातील ज्या चालीरीती विवेकवंतांना खटकल्या आणि आपल्या विवेकबुध्दीने ज्यांनी समाजाला जागे करण्याचा प्रयत्न केला, अशा ज्योतिबा फुले, आगरकर यांच्याबद्दलची कृतज्ञता त्यांनी व्यक्त केली. ज्यांनी प्रथम बुध्दिपुरस्सर सुधारणांचा स्वीकार केला आणि त्यानंतर जे पारंपारिक विचारांना शरण गेले अशांच्या दोलायमान मनोवृत्तीची नोंदही यात घेतली. जातीय विषमतेविषयीच्या परंपरेने चालत आलेल्या समजुती ज्या संतमहात्म्यांनी खपवल्या, इतकेच नव्हे तर पोसल्या त्या संताच्या संतपणाविषयीची आशंकाही त्यांनी यात धीटपणे व्यक्त केली आहे. कोणत्याही सामान्य घटितांची इष्टानिष्टता, रुढींची ग्राह्य-अग्राह्यता याबाबत विवेकशील असणारा समाजच विकासोन्मुख असतो, गतिमान असतो. कालमानानुसार समाजजीवन बदलत राहणे,

प्रवाही असणे, समाजाच्या आरोग्याच्या दृष्टीने हितावह असते. पण अनेकदा कुणीतरी, केव्हातरी ठरवून दिलेले नियमच निबुध्दपणाने पाळले जातात. असे गतार्थ नियम मग जिवंत समाजाची गळचेपी करतात. अशावेळी त्या नियमांचा गटचेपेपणा दर्शविण्याचे काम एखाद्या विवेकशील माणसाला करावे लागते. विवेकशीलता आणि समाजाची गतिमानता यांचा परस्परसंबंध घनिष्ठ असतो. समाजाची मती व गती कुंठित होण्यास विवेकाचा अभाव हे एक महत्वाचे कारण असते. विवेक हे माणसाचे फार मोठे बळ आहे. 'विवेकाच्या गोठी' त या विवेकाचे सूत्र सर्व लेखात जाणवते.

प्रा.म.गं.नातू यांचा हाच विवेकवाद 'वेदनेचा वेध'(१९७८) या त्यांच्या अभिनव प्रकाशनाने प्रसिद्ध केलेल्या दुसऱ्या पुस्तकातही आगळ्या रुपात आविष्कृत झाला आहे. चि.त्र्यं.खानोलकरांच्या केवळ कादंबऱ्यांचा आणि त्यातहि फक्त स्त्रीदुःखाचा विचार या पुस्तकात मांडला आहे.

'विवेकाची गोठी' आणि 'वेदनेचा वेध' या दोन्ही पुस्तकांत समाजस्वास्थ्याच्या अनुषगांने लेखिकेचे चिंतन व मनन प्रगटले आहे. समाजहिताविषयीची तत्परता आणि स्त्री जातीविषयीची अनुकंपा हे त्यांचे विशेष, या दोन्ही पुस्तकातून सारखेच प्रगटले आहेत.

आगरकरांच्या बुध्दिप्रधान, इहवादी, समाजभिमुख दृष्टीचा प्रा.नातू यांनी सतत पुरस्कार केला आणि आयुष्याच्या अखेरीस आगरकर वाङ्मयाच्या संपादनाचे काम हाती घेतले. 'समग्र आगरकर' खण्ड-१(१९८४), खण्ड-२ (१९८५), खण्ड-३ (१९८६) असे तीन खण्ड प्रा.म.ग.नातू आणि प्रा.दि.य.देशपांडे यांनी संपादित केले. महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाने ते प्रकाशित केले. संपादकव्दयांच्या विवेचक प्रस्तावनेने या ग्रंथाचे मोल वाढले आहे.

अमरावतीच्या साहित्य जगतात प्रा.म.गं.नातू यांनी विवेकनिष्ठ, व्यक्तिस्वातंत्र्यवादी विचारवंत समीक्षक म्हणून एक विशिष्ट स्थान मिळविले आहे.

डॉ.सुशीला पाटील, 'ज्ञानदीप', राठी नगर, अमरावती.

शतकातील सर्वश्रेष्ठ प्रतिमावंत, ग.त्र्यं. देशपांडे

संस्कृतीच्या भाष्यकार म्हणून दुर्गा भागवत जशा अद्वितीय आहेत, तसे संस्कृत साहित्यशास्त्राचे भाष्यकार म्हणून डॉ.गणेश त्र्यंबक देशपांडे अनन्य होत. 'भारतीय साहित्यशास्त्र,' 'भारतीय साहित्यशास्त्रातील सौदर्य-कल्पना', 'स्पंदकारिका', 'राष्ट्रीय उत्थानात साहित्याचे स्थान,' 'अलंकार-प्रदीप' आणि 'अभिनवगुप्त' या ग्रंथातून त्यांच्या समग्र साहित्यशास्त्रीय विचार प्रकट झाला आहे. डॉ.देशपांडे यांनी साहित्य आणि साहित्यशास्त्र यांचे तात्विक अधिष्ठान स्पष्ट करुन साहित्यशास्त्रास दर्शनाची प्रतिष्ठा मिळवून दिली. लौकिक जीवन आणि लौकिक मूल्ये ही साहित्याची सामग्री असते तर तात्विकमूल्ये आणि सौंदर्यमूल्ये हे साहित्याचे अधिष्ठान असते असे त्यांच्या मांडणीचे स्वरुप आहे. व्यक्ती, वस्तू, स्थल आणि काल यांच्या सीमेतून मुक्त होणे हे तात्त्विकमूल्य आणि या मुक्ततेचा प्रत्यय हे सौंदर्यमूल्य. भारतीय साहित्यशास्त्राने व अर्थात डॉ.देशपांडे यांनी साहित्य व साहित्यशास्त्र यांचा वेध घेताना समावेशक पध्दतीने शोध घेतला नाही; कारण तर्कशास्त्र, व्याकरण, धर्मशास्त्र इत्यादी शास्त्रांनी तो आधीच घेतला होता; तो गृहीत धरुन आणि आत्मसात करुन साहित्य व साहित्यशास्त्र यांच्या अनन्यतेचा त्यांनी वेध घेतला; तो ज्ञानशास्त्राशी सुसंगत मूलगामी साहित्यविचार आहे. भारतीय साहित्यशास्त्राने साहित्यकृतीच्या समीक्षेकडे दुर्लक्ष केले या आक्षेपालाही डॉ.देशपांडे यांनी उत्तर दिले : साहित्यकृतीचा आस्वाद आणि तिची समीक्षा यांच्यात कालसापेक्ष सलगपणा असावा लागतो व रसिकागणिक तिच्यामध्ये भिन्नता येत असते; त्यामुळे सुट्या लिखित समीक्षेपेक्षा अध्यापन आणि कवि-रसिकसंवाद या मार्गाने समीक्षा मौखिक स्वरुपात प्रकटणे अधिक लाभप्रद असते. अशी मौखिक समीक्षा प्राचीन काळी होत असे. ती ध्वनिमुद्रित करण्याची सोय दुर्दैवाने त्या काळी नव्हती. डॉ.देशपांडे यांनी 'गोकुळ' सभागृहात भक्तिरसावर सात व्याख्याने दिली होती; ती ध्वनिमुद्रितही झाली आहेत. ती ऐकली म्हणजे भारतीय साहित्य शास्त्रसुसंगत समीक्षा कशी असते याची कल्पना येते. कै.बा.सी.मर्ढेकरांना साहित्य आणि सौदर्यशास्त्र या क्षेत्रांत क्रांती करताना फार मोठा वाङ्मयीन रक्तपात

करावा लागला, डॉ.ग.त्र्यं.देशपांडे यांचे भाग्य हे की त्यांनी साहित्य शास्त्रीय क्षेत्रात जी क्रांती केली ती रक्तविहीन होती; अर्थात अशा शांत रसात्मक क्रांतीकडे अभ्यासक आकृष्ट झाले, तरी सामान्य जनतेच्या कर्णरंधापर्यत पोचायला अशा क्रांतीला वेळ लागतो; तशी ती पोचते तेव्हा समाजाची जीवनशैली आणि कलाभिरुचीच बदलून जाते. विकृतिग्रस्त समाजाला आणि साहित्याला ते दैवी वरदान असते.

गझल सम्राट - सुरेश भट

आज महाराष्ट्रभर सुरेश भट , गझल सम्राट म्हणून, विख्यात आहेत. माधव ज्यूलियन यांच्यानंतर शेरो-शायरी करता यवतमाळचे भाऊसाहेब पाटणकर गाजले आणि गझलगीतकार म्हणून अमरावतीचे सुरेश भट गाजले. डॉ. श्रीधर व सौ. शांताबाई भट यांचे हे चिरंजीव. महाविद्यालयीन जीवनातच चांगल्या दर्जाचा कवी म्हणून नाव कमावले होते. 'रुपगंधा' या पहिल्या कविता संग्रहाला महाराष्ट्र शासनाचे पारितोषिक मिळाले. त्यानंतर प्रसिद्ध झालेल्या , 'पुनवेचा थेंब', 'एल्गार', 'रंग माझा वेगळा', ह्याहि गीतसंग्रहांना महाराष्ट्र शासनाची पारितोषिके मिळाली.

गेयता हा गझल गीताचा आत्मा आणि स्वत: सुरेश भट गातात तेव्हा श्रोते नुसते डोलत राहतात. अतिशय भावविभोर , मनोवेधक असा हा गीतप्रकार सुरेश भट लीलया पेलतात. अर्धचमत्कृति किंवा कल्पना चमत्कृति यापेक्षा भावाविष्करण, हृदयाविष्करण याला त्यांनी प्राधान्य दिले आहे. त्यांची कविता काही प्रमाणात आत्मलक्षी आहे. त्यातून अंतरंगदर्शन घडते. व्यथेला उत्तुंग कलाविष्काराप्रमाणे त्यांनी हाताळले. त्यामुळे ते श्रेष्ठ कवीच्या दर्जाला जाऊन पोहोचले. कळ उमटवून जाण्याची तिची शक्ती फार मोठी आहे. त्यांच्या कवितेत सुगंधासारखे गाणे दडले आहे. त्यांची कविता गात येते. त्यांच्या काव्यात एक सुंदर निवृत्ति आहे व ती फार लोभस आहे. शब्दांची आतिषबाजी नाही. कसले अवडंबर नाही. उगाचच उर्दू-पार्शियन पेरण्याची हौस नाही. ज्या अनुभूतीतून कविता स्फुरली तेवढी प्रामाणिकत: अभिव्यक्त केली. त्यांच्या कवितेचे नाते आहे उत्कटतेशी. त्यात भावभावनांची विविधता आहे. क्वचित , फार क्वचितच , उदासिनता, औदासिन्य आहे. पण वैफल्य, हताशता, निराशा यापासून त्यांची कविता दूर राहते.

'आज जे मी गीत गातो ते उद्या गातील सारे' , हा त्यांचा गर्वाभिमान सार्थ ठरणार आहे. दु:खाच्या व्यापकतेची जाण असणारा कवि, 'माझीया गीतात वेडे, दु:ख

संतांचे भिनावे', असे म्हणतो. अशा व्यापक जीणीवेमुळे त्यांच्या अंत:करणातील व्यथा उच्च कलात्मक पातळीवरुन अभिव्यक्त होतांना आढळते. लता मंगेशकर यांनी त्यांच्या अनेक कविता सुरेल गाण्यातून रसिकापर्यंत पोहोचविल्या आहेत.

परिशिष्ट ७ (अ)

अमरावतीतील संगीत कला

प्रा.श्री.मनोहर कवीश्वर

श्री.वा.ल. डोळे (बापूसाहेब)

यांच्या लेखां वरुन संकलित.

श्री.सरस्वति स्तवन :-

हे परिशिष्ट गानदेवता श्री.शारदेच्या चरणी समर्पण.

या कुन्देन्दु तुषार हार धवला या शुभ्रवस्त्रावृता

या वीणावरदण्ड मण्डित करा या श्वेत पद्मासना ॥

या ब्रह्माच्युत शंकर: प्रभृतिर्भि देवै: सदा वंदिता

सा मां पातु सरस्वती भगवती नि:शेष जाड्यापहा ॥

॥ शुभं भवतु ॥

सुरांशी नाते म्हणजे ईश्वराशी नाते :-

'मद्भक्त यत्र गायन्ति - तत्र तिष्ठामि नारद' भगवान श्रीकृष्ण

ज्यांच्या हृदयात संगीत नाही अशा माणसापासून सावध रहा - अशी माणसे धोकेबाज असतात शेक्सपिअर.

भगवान श्रीकृष्णापासून तर शेक्सपिअरपर्यंत संगीताची अशी थोरवी अनेकांनी युगायुगापासून गायिलेली आहे. मनुष्य जातीच्या जन्मापासून माणसाला

संगीताची सुरेल साथ लाभत आलेली आहे. सारा निसर्गच मुळी संगीताच्या सुमधुर तालसुरांनी व्यापलेला आहे. पहाटेपहाटे होणारा पक्षांचा मधुर कलख रानावनातून घोंघोवणाऱ्या वाऱ्यातून प्रकटणारी सरगम, निर्झरातून झुळूझूळू लयध्दपणे वाहणारे पाणी इतकेच नव्हे तर विजेच्या गडगडासह आकाशातील मेघांचे घनगंभीर आणि तालबध्द तांडव हे सर्व निसर्गातील संगीतातलेच मनोहारी अविष्कार नाही काय ?

अन्य कोणत्याही ललित कलेपेक्षा संगीताचा, मानवी जीवनाशी अतिशय घनिष्ट संबंध आहे. ज्याच्या जीवनातील संगीत हरवले त्यांचे जीवन रुक्ष, एकाकी उदासवाण बनतं, ही वस्तुस्थिती आहे. संगीताशी नात म्हणजे प्रत्यक्ष सुराशी देवाशी नाते आणि संगीताशी दुरावा म्हणजे असुरांशी दोस्ती असं हे साध गणित आहे. भारतीय संगीतातच 'सूर' हा प्रत्यक्ष ईश्वराला पर्यायी शब्द आलेला आहे. यावरुनच भारतीय संस्कृतीत संगीताला किती महत्व आहे ह्यांची कल्पना यावी.

संगीतावाचून जीवनाचा ताल बिघडतो संगीतावाचून जीवनातला ताल जातो ते बेताल बनतं. दुर्दैवाने आज आपण सर्वजण अशाच बेताल स्थितीचा अनुभव घेत आहोत. सर्वसामान्य माणसांच्या जीवनातला सूर हरवला आहे ते नुसत बेसूरच नव्हे तर भेसूर ही बनलं आहे. भोवतालच्या सामाजिक राजकीय व सांस्कृतिक जीवनातून आलाप लोप पावले आहेत आणि विलापच सर्वत्र भरुन राहिला आहे. कौटुबिंक व व्यक्तिगत जीवनात सुखशांतीमय आयुष्याकडे आरोहित होण्याऐवजी आमची अवरोहाकडेच वाटचाल सुरु आहे परिणामी जीवनातील संगीताचा अभाव वैयक्तिक आणि सामाजिक जीवनातले भावबंध गळून पडले आहेत. स्नेहांकित संबंधाची रेशमी नाती तोडून आपण एकमेकापासून खूप दूर जात आहोत.

राजवाड्यापासून राज्यमार्गावर आता तर खरं म्हणजे संगीत राजवाड्यातून व रिक्षापासून तर विमानापर्यंत बस स्थानकापासून तर पंचतारांकित हॉटेलापर्यंत राजमार्गापासून तर गल्लीबोळापर्यंत कुठे ही गेला तर संगीताचा मारा सतत तुमच्या कामानावर सुरुच असतो. वर म्हटल्याप्रमाणे संगीताची इतकी थोरवी असेल तर मग सर्वत्र हिसाचार बलात्कार, जाळपोळ, भ्रष्टाचार ह्यांचा उघडानागडा धांगडधिंगा

का चालू राहावा ? मानवी जीवनात सुखशांतीदायी करणारी संगीताची महती सांगणाऱ्या कल्पना ह्या मग काय केवळ वल्गनाच तर नाहीत ना ! सर्वत्र व्यापलेल्या संगीताचा आणि आजच्या विकृत जीवनशैलीचा संबंध मग कसा जोडावा?

शास्त्रीय संशोधनाचे मार्मिक निष्कर्ष मानव पशु आणि वृक्षवल्ली ह्या सर्वावर संगीताचे काय परिणाम होतात हे जाणून घेण्यासाठी पाश्चात्य देशात विशेषत: रशिया व जर्मनीत खूप मोठ्या प्रमाणात शास्त्रीय संशोधन सुरु आहे. ह्या संशोधनातून संगीताच्या प्रमाणाचा शास्त्रीय आधार निर्विवादपणे प्रसिध्द झाला आहे. जर्मनीतील डॉ.राल्फ रिफन्झ ह्यांनी नव्वद हजार रोग्यांवर संगीतोपचार केला आणि ह्या उपचाराने त्यांनी लौकर रोगमुक्त करता येते, हे तसेच अत्यंत अवघड शस्त्रक्रिया करतांना रोग्याला मूल देण्याचे प्रमाण निम्म्यान कमी करता येते असे केले आहे. पार्थिन्सस व अन्य मनोरुग्णांना अन्यथा अशक्य असलेल्या शारीरिक हालचाली करण्याची शक्ती संगीतोपचाराने मिळते असे ही सिध्द झाले आहे. भारतात बंगलोर येथील राष्ट्रीय मनोरुग्ण संशोधन संस्थेतील व्यक्तींना त्याच्याच भाषेतील कंठसंगीत ऐकविले तर त्यांच्यात लक्षणीय सुधारणा होते. चिंताग्रस्त, मानसिक असंतुलनाच्या रोग्यांना धीरगंभीर तंतूवाद्य संगीत ऐकविले. तर संगीताची आणि ह्या रोग्याची लय एकदा जमायला हवी ती जितकी चांगली आणि जास्त जुळेल तितका हा नुसते ऐकण्यापेक्षा ह्या रुग्णांना स्वत:ला गायला वाजवायला शिकवले तर आपला हरविलेला शारीरीक मानसिक तोल ते पुन्हा सहजपणे प्राप्त करु शकतात. यंत्रावर एकसूरी काम करणाऱ्या कामगारांची योग्य संगीताव्दारे उत्पादकता व कार्यक्षमता वाढविता येते हे देखील सिध्द झाले आहे. दीप राग आळवून दिवे लावता येतात. किंवा मेघ मल्हार गाऊन पाऊस पाडता येतो ही कवीचा कल्पनाविलास म्हणून आपण सोडून देऊ यात, पण आधुनिक शास्त्रीय साधनाच्या साहय्याने झालेले संशोधन व त्याचे निष्कर्ष आपल्याला नाकारता येणार नाहीत.

मायकल जॅक्सननेच ह्यांचे उत्तर द्यावे !

पण आपल्या मूळ प्रश्नाचे उत्तर तरी आपल्याला मिळत नाही.

कदाचित मायकल जॅक्सन ह्याचे उत्तर देऊ शकेल. त्याच्या रॉक संगीताच्या चाहत्यांची चलती आहे. त्याच्या उघड्यानागड्या आणि धांगडधिंगा युक्त संगीताने मोठ्या शहरातील नव्या तरुण पिढीला वेडे केले आहे. पण ह्या अशा कानफोडू डोकं फिरवू संगीताचा परिणाम हिंसक, विकृत व गुंडागीरी प्रवृत्तीत वाढ होण्यात होते. हेच आता पाश्चात्य शास्त्रज्ञ म्हणू लागत आहेत. इतकंच नव्हे तर वाढत्या गुन्हेगारी प्रवृतींना आळा बसावा म्हणून अशा संगीतावर बंदी घालावी अशी मोहिम देखील पाश्चात्य राष्ट्रात सुरु आहे. संगीताच्या ह्या बऱ्यावाईट प्रभावांचा विचार प्लोटोपासून करण्यात आलेला आहे. माणसाला दु:खी निराश करणाऱ्या किंवा त्याला हिस्त्र बनविणाऱ्या संगीताला कायद्याने बंदी घालावी असे प्लेटोने हजारो वर्षापूर्वी सांगू ठेवले आहे.

भारतीय संगीताला तोड नाही

नवरसांची अत्यंत भव्य आणि श्रेष्ठ अविष्कार करण्याची प्रचंड शक्ती भारतीय संगीतात आहे. त्याच्यामागे हजारो वर्षाची उज्वल. यशस्वी परंपरा व तपस्या आहे. खरं म्हणजे भारतीय संगीताला जगात तोड नाही.

मायकल जॅक्सनचं यश हे त्याच्या घणाघाती प्रचार तंत्राचं यश अधिक आणि कलेचं कमी आहे. आधुनिक प्रचारतंत्र व साधनांचा त्याने अतिशय प्रभावीपणे वापर करुन तरुण पिढीला वेड लावलं आहे. मायकल जॅक्सनशी आमचं भाडण नाही. पण त्याच्या संगीताच्या विकृत परिणामाची जाणीव करुन दिली पाहिजे.

सूरनगरी - अमरावती !

आपली अंबानगरी संगीताच्या दृष्टीने अतिशय वैभवशाली आहे ही अत्यंत अभिमानाची गोष्ट आहे. डॉ.मदनगोपाल स्व.आप्पासाहेब केतकर, श्री.यशवंतराव भट ह्यांच्यामुळे अखिल भारतीय कीर्तीचे सारे संगीतकार अमरावतीत आपली कला पेश करुन गेले. येथील श्रोत्यांच्या रसिकतेची मर्मज्ञतेची दाद देऊन गेले. अमरावती संगीत कलोपासक सभा, सुरभि स्वरगांधार अशा संस्थांनी तरुणवर्गात शास्त्रीय अभिजात संगीताची गोडी निर्माण केली. संगीताचे रसग्रहण करायला त्याना

शिकविले. संगीत क्षेत्रातील स्थानिक विविध गुरुजनांचा नामोल्लेख करायला देखील एक स्वतंत्र लेख लिहावा लागेल. पण ह्या सर्वांनी अमरावतीला सूर नगरी बनविले ही त्यांचे अत्यंत प्रशंसनीय कामगिरी आपण लक्षात घ्यायलाच हवी.

आधुनिक जीवनातील ताण तणाव, धावपळ आणि धडपड ह्यांनी सामान्य माणसाला वैताग येतो त्याचे मानसिक व शारीरिक संतुलन बिघडते हे आपण जाणतो ह्या सर्वांवर बिन खर्चाचा आणि अत्यंत प्रभावी उपचार अभिजात संगीतानेच होऊ शकेल ह्यात शंका नाही. संगीताशी नाते म्हणजे प्रत्यक्ष परमेश्वराशी नाते हे विसरु नका.

(साभार).

अमर - स्वर - सृष्टी

(अमरावती शहरातील संगीत कलेच्या विकासाचा संक्षिप्त इतिहास)

लेखक :- श्री.मनोहर कविश्वर, प्रभू, प. संगीत अलंकार.

.....

आमचा दरवाज्याच्या आतील उमरावांची प्रत्येक गुलाबी संध्याकाळ गॅसबत्यांच्या उजेडात न्हाऊन निघालेल्या प्रशस्त दिवाणखान्यात - मंजुळ सारंग्याच्या स्वरलहरीत - नुपुरांच्या झनकारीत विरुन जाऊन (मदनाक्षींच्या) सुरांच्या मस्तीत रंगून जाई. सीताराम बिल्डींग आणि त्या शेजारच्या अनेक उंच माड्यातून त्यावेळी म्हणजे सुमारे शंभर वर्षापूर्वी आपल्या शहरात कितीतरी नायकिणी रोज संगीताच्या मैफिली आपल्या गायनाने व अदाकारीने रंगवीत असत. त्या काळच्या गायिकांपैकी लावणी बाज गाण्यांत श्रीमती धोंडूबाई पुणेकर .... शास्त्रीय गायनामध्ये सौ.शान्ताबाई जतकर व श्रीमती सोनूबाई आणि ठुमरी गाायनामध्ये श्रीमती अफजलबाई यांची नांवे अजूनही ऐकायला मिळतात. याच मैफिलीमधून त्याकाळचे महान तबलावादक मरहूम अल्लादिया खानसाहेब (ज्यांचे कित्येक शिष्य आजही मुंबई-पुण्याकडे आढळतात.) तसेच आकाशवाणीचे सुविख्यात सारंगी वादक - श्री.रमजान खानसाहेब साथसंगत करीत असत.

तथापी या शहरात संगीताची ज्ञानगंगा आणली ती कै.नामदेवबुवा जोशी यांनी मोठा हलवायाच्या घराजवळ या विद्वान निष्ठावान माणसाची गायनशाळा होती. बडोद्याचे राजगांयक पं.वा.नौलख्खा यांच्या घराण्याची सुंदर गायकी अमरावती मध्ये कै.नामदेवबुवा जोशी यांनी कै.नत्थुबुवा तावडे, श्री.बाबासाहेब कासलीकर आणि कै.वामनबुवा जोशी यांच्या प्रमाणे अनेक शिष्यांना शिकविली, कै.नत्थुबुवांच्या सहवासात कै.बिट्याबुवा, कै.विष्णुपंत तांबे, वगैरे मंडळींच्या बरोबर सुर्वाचे शिष्य कै.प्रल्हादराव खोलापूरकर (प्रसिध्द वादक - गायक व संगीत शिक्षक) आणि कै.नामदेवबुवा वऱ्हेकर - नामवंत गायक आणि तबला वादक तयार झाले. या कलावंतानी संगीत विद्यालये चालवून संगीताचा चांगला प्रसार केला. कै.वामनबुवा जोशी यांचे आणि अनेक गुरुंकडे मेहनतीने शिक्षण घेतलेले कै.राजाभाऊ नवसाळकर हे नाव. अमरावतीकरांना कदापी विसरता येणार नाही. आपल्या प्रतिभा संपन्न गायकीमुळे मुंबई-पुण्याकडे उज्ज्वल कीर्ती मिळविलेला हा महान कलावंत आज आपल्यात नाही. याचे दु:ख झाल्यावाचून राहात नाही. स्व.केशवराव भोळे, श्रीमती जोत्स्ना भोळे या त्याच्या पत्नीने उत्कृष्ट संगीत गायक म्हणून कीर्ती कमावली.

स्व. नत्थुबुवांच्या शिष्यात विशेष नाव मिळविले ते दत्तोबा तावडे यांनी. अजूनही मुंबईला त्यांचे संगीत विद्यालय सुरु आहे. श्री.दत्तोबा तावडे यांचे वडील कै.तुलाराम भैया हे उत्कृष्ट तबला वादक होऊन गेले. त्यांची परपंरा श्री.माधवराव भुताड आणि त्यांचे शिष्य व धाकटे बंधु श्री.गोविंदराव भुताड अजूनही चालवीत आहे. जुन्या परंपरेत मनोहर संगीत विद्यालया चे संचालक मरहूम मिया उर्फ शब्दारोशन खानसाहेब हे समय गायक-उत्तम दिलरुबा वादक - श्रेष्ठ संगीत शिक्षक होऊन गेले, हिंदु मुसलमानांच्या दंगलीत १९३९-४० च्या सुमारात यांच्या सारख्या अनेक कलावंताना अमरावती मुकली.

शालेय क्षेत्रात जसे सर्व प्रथम संगीत शिक्षक म्हणून श्री.बेडेकर यांचे नांव नोंदविणे अनिवार्य आहे, तसेच वृंदवादनाचा प्रयोग करणारे म्हेणून स्वर्गीय दादासाहेब आसरकर यांचा गौरवपूर्ण उल्लेख करावा लागेल.

सतारवादनाच्या क्षेत्रांत पं.रा.गुलामअली खानसाहेब आणि तबला वादनात पं.वा. खुरातखान साहेब, कै.भगवानदास काश्यप यांची नावे अमरावतीच्या संगीताच्या इतिहासात सदैव तळपत राहतील.

श्रेष्ठ संगीतज्ञ - उच्च श्रेणीचे तबला वादक आणि महान संगीत शिक्षक या नात्यांनी श्री.शंकरराव मुर्तिजापूरकर हे विदर्भातील जुन्या आणि नव्या रसिकांना चांगले ठाऊक आहेत. कैरघुनाथबुवा हे देखील उत्कृष्ट संगीत शिक्षक होते.

नागपूर निवासी कै.गोविंदराव विलायची यांचे शिष्य श्री.केशव बुवा कवीश्वर हे स्वत: त्याकाळचे गायक - चांगले पेटी वादक आणि उत्तम संगीत शिक्षक म्हणून प्रसिध्द होते. (जुन्या पिढीतील या गायकांपैकी श्री.शंकरराव मूर्तिजापूरकर, श्री.अण्णासाहेब केमदेव आणि श्री.केशवबुवा कवीश्वर हेही प्रसिध्द होते.)

तबला वादनाचे क्षेत्रांत आमचे शहर आज आघाडीवर आहे असे म्हणायला हरकत नाही. मी अहमदअली गुलामअली उर्फ लड्डूमिंया यांनी तर तबला वादनाच्या शिक्षणाचे अग्निहोत्रच चालविले आहे. मोठ्यापांसून छोट्यापर्यंत कोणीही त्यांचे कडे जावे आणि हवे तितके दिवस तबला शिकावा-आणि तोही नि:शुल्क आज तबला वादन क्षेत्रात त्यांचे अनेक शिष्य नावाजलेले आहेत. ग्वाल्हेर घराण्याचे श्री.नायब हे विव्दान संगीतज्ञ असून ते तबला व सतार शिकविणारे श्रेष्ठ दर्जाचे शिक्षक आहेत. कै.अण्णासाहेब असनारे यांनी तबला या विषयाचा निष्ठेने अभ्यास करुन आपला पुत्र प्रा. आनंद असनारे या तरुण असामान्य तबला वादकाच्या रुपाने आपल्या ज्ञानकलेचा ठेवा कायम आम्हाला देऊन ठेवला आहे. किशोर नवसाळकर हि चांगला तबला वाजवतात.

आज अमरावतीमध्ये संगीताच्या क्षेत्रात अध्यायनाचे कार्य करणाऱ्या अनेक संस्था आहेत. त्यामध्ये श्री.शंकरराव मालवंडे यांचे गांधर्व महाविद्यालय ही संस्था जुनी आणि प्रसिध्द आहे. शास्त्रीय गायनाच्या अध्यायनामध्ये श्री.देविदासराव काळे यांची अभिनवी कला मंदिर ही संस्था विद्यार्थ्यांची अत्यंत आवडती आहे.

श्री.काळे यांच्या सारखा मेहनती विद्याप्रेमी शिक्षक विरळाच. नवीन विद्यालयामध्ये श्री.नरसिंह बोडे, त्यांचे धाकटे बंधू श्री.दत्तराज बोंडे व श्री.रमेश बोंडे यांची हेमन्त कलामंदिर नृत्याचे शिक्षण देणारी विदर्भातील पहिली संस्था होय. श्री.बोडे बंधू स्वत: नृत्य कलेचे कार्यक्रम जरी करीत नसले तरी त्यांनी तयार केलेल्या कित्येक बाल नर्तिकांनी विश्वभर आपल्या गुरुजनांची आणि त्यांच्या कलामंदिराची कीर्ती पसरविली आहे.

गेल्या काही वर्षापासून श्री.दिनकरराव उपाख्य भैयासाहेब देशपांडे यांनी वनिता समाज या ठिकाणी स्वत: चे नवीन विद्यालय सुरु केले असून तेथे संगीताच्या एम.ए. परिक्षा पर्यन्तचे शिक्षण देण्यात येते. भैयासाहेब देशपांडे महाराष्ट्रातच नव्हे तर महाराष्ट्रा बाहेर देखील रसिकजनात अतिशय लोकप्रिय असे प्रथम श्रेणीचे गायक आहेत. त्यांचा विशेष विक्रम असा की नागपूर विद्यापीठाच्या संगीताच्या एम.ए. परीक्षेत ते सर्वप्रथम आले. आणि शिवाय त्यांनी विद्यापीठाच्या सर्व एम.ए. व एम.एससी. परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या सर्व विद्यार्थ्यामध्ये सर्वाधिक गुण, मिळविले अशा दोन सुवर्णपदकांचा त्यांना सन्मान प्राप्त झाला आहे, हीगोष्ट आम्हा संगीतज्ञांना अत्यंत भूषणाची वाटते.

यवतमाळहून येऊन आमच्यात मिसळलेले गायक आणि श्रेष्ठ शिक्षक आकाशवाणीचे नामवंत कलाकार प्रा. मनोहर कासलीकर हे आपल्या दमदार गायकीमुळे महाराष्ट्र व आणि महाराष्ट्र बाहेर रसिकांच्या आदरास पात्र ठरलेले आहेत. प्रा.मनोहर कासलीकर यांचे गुरु व वडील बंधू श्री.रावती कासलीकर हे देखील आम्हा अमरावती करामध्ये आहेत, ही गोष्ट आम्हाला अभिमानाची वाटते. दोघेही बंधू प.वा.बडे गुलामअलीखा साहेबांचे शिष्य आहेत.

श्रीमंत दादासाहेब खापर्डे रसिकग्रणी म्हणून ख्यातनाम होते.

श्री.शिवाजी शिक्षण संस्थेचे सुत्रधार श्री.बाबासाहेब धारफळकर हे अत्यंत संगीत प्रेमी व रसिक श्रेष्ठ असून ते स्वत: अजून जुने नाट्यसंगीत उत्साहाने जोपासत आहेत. डॉ.मदन गोपाल हेही उदारपणे संगीत कलावंताना साह्य करीत असत.

व्हायोलीन वादनाच्या क्षेत्रात श्री.कै.बकाराम देशमुख, यशवंतरावजी भट यांचे नांव सर्वपरिचित आहेत. गेली पंचवीस वर्षे त्यांचा संगीताचा व्यासंग सतत सुरु आहे. तसेच श्री.वामनराव धावंजेवार हे अमरावतीचे श्रेष्ठ व्हायोलीन वादक - उत्कृष्ट सतार वादक आणि उत्तम संगीत शिक्षक म्हणून मान्यता पावलेले आहेत. रमेश पाध्ये उत्कृष्ट व्हायोलीन वादक होते.

संगीताचा निस्वार्थ व्यासंग असलेले श्री.केशवराव सावरकर हे रेल्वे स्टेशन मास्तर गात होते. त्यांचे बरोबर श्री.तात्यासाहेब नवसाळकर हे व्यवसाय सांभाळून व्हायोलिन वादनात दिन प्रतिदिन प्रगती करीत होते.

स्त्री गायिकांमध्ये प्रा.सौ.मालतीबाई मादुस्कर, प्रा.सौ.बेनोडेकर, सौ.लीला पत्की, सौ.सुवासिनी पोहेकर, सौ.इंदुमती नागर, सौ.कमल भोंडे, श्रीमती दाणी ही नांवे, त्यांची कला आणि प्रसन्न अशा महान रसिकतेला कसे विसरणार ? ते अशक्य आहे. प्रा.सौ.अलका नंदा तुळजापुरकर, प्रा.सौ.सुमन चौधरी, या नवागत कलावंताची त्यांच्या उज्ज्वल कार्याची विश्वासपूर्वक वाट पाहात आहोत.

श्री.विनायकबुवा पटवर्धन या ख्यातनाम गायकाचे शिष्य कै.श्री.वसन्तराव खरे हे श्रेष्ठ संगीतज्ञ आणि तज्ञ संगीत शिक्षक होते. दुसरे शिष्य श्री.राजाभाऊ भोजराज आता जबलपुरास राहतात.

सिने संगीताचे वृंदवादनाचे कार्यक्रम करणाऱ्या संस्थांची परंपरा देखील अमरावतीत जुनी आहे. श्री.जयस्वाल बंधूना जयस्वाल युनियन ऑकेस्ट्रा. त्यानंतर मधुसूदन कलामंदिर, या संस्थांची परम्परा गेल्या दहा वर्षातील नव्या दमाच्या कलावंतानी निष्ठेने व चालू ठेवली आहे. श्री.महंमद शेख यांचा संगम आर्केस्ट्रा, श्री.सुरेश येवले व श्री.हसमुख सांगाणी ललित मिलन ऑर्केस्ट्रा , श्री.जयन्त देशमुख व श्री.विनय देशमुख यांचा सारंग आर्केस्ट्रा, श्री.बोडे बंधू व श्री.हनुवन्ते दिग्दर्शीत आराधना आर्केस्ट्रा, श्री.नावे सिने संगीताच्या क्षेतात उज्ज्वल कीर्ती मिळवीत आहेत.

बॅन्ड पार्टीत याकुबअली बॅन्ड व मिस बॅन्ड सर्वप्रिय आहेत. गझल

गायनामध्ये श्री.महमूद दारा, श्री.अफसर साहाय, श्री.प्यारेलाल पहेलवान, श्री.मधुकर जांगतोड आणि श्री.नुरबेग ही लोकप्रिय झाले आहेत.

वरील सर्वच क्षेत्रात प्रा. नव्या आकांक्षा घेऊन नवीन पिढी तयार होत आहे. गायकामध्ये प्रा. विवेक कपिले, श्री.श्रीराम प्रभुणे, ललित संगीतात श्री.विनम्र धानोरकर, श्री.जयराम, श्री.ज्ञानेश्वर राजगुरे, श्री.आसरकर, श्री.राजकुंवर पटेल, तबलावादनात श्री.किशोर नवसाळकर व श्री.प्रभाकर देशपांडे, सतार वादनांत श्री.राजेन्द्र देशपांडे ही मंडळी आत्मविश्वासाने आणि निष्ठेने आपला व्यासंग वाढवित आहेत.

वादवादनात आपापल्या क्षेत्रात आघाडीवर असलेले अनेक कलावंत आमच्या शहरी आहेत. सुप्रसिध्द तबला वादक श्री.मदनसिंह पवार, श्री. नगन्नाथबुवा दळवी, गीतगोविंदकार श्री.मनोहर कवीश्वर, आकाश-वाणीचे जलतरंग वादक श्री.अनंत चौधरी, पेटीवादक व लोकप्रिय गायक श्री.कृष्णराव वऱ्हेकर, आकाशवाणी गायिका सौ.सरिता तुळाणकर, सतार तबला वादक श्री.श्रीराम तुळाणकर, गीत गजानन गायक श्री.वसन्त रत्नपारखी व त्यांचे तबला वादक चिरंजीव श्री.रमेश रत्नपारखी, गायक श्री.गणपतराव ढगे, बासरी वादक मनोहर काळेश्वर, सिने संगीत गायक, प्रा.खिरे, तबला वादक महल्ले, श्री.कवीश्वर गुरुजी (तबला वादक) जुने तबला वादक श्री.महादेवराव जोशी, ही नांवे नेहमी व अमरावतीकर रसिकांच्या नजरे समोर असतात.

आपल्या शहरात अमरावती कलोपासक मंडळ नांवाचे संगीत मंडळ असून वेळोवेळी मोठमोठ्या कलावंतांचे कार्यक्रम घडवून आणण्याचे कार्य मंडळाचे उत्साही कार्यकर्ते सर्वश्री. विजयराव आणि मुकूंदराव पटवर्धन, श्री.गोळे, श्री.तांबे, श्री.कृष्णराव गोडबोले व श्री.वसंतराव खरे करीत आहेत. अमरावतीच्या संगीत विकासाच्या पाठीमागे एक अगम्य लहान शक्ती एक अखंड प्रेरणा स्त्रोत म्हणजे रसिकाग्रणी डॉ.मदनगोपाल ज्यांना संगीताची विशेष दृष्टी निसर्गत: लाभलेली आहे. त्यांच्या बरोबरच डॉ.बाबासाहेब असनारे हे देखील आमच्या विकासाचे स्फूर्तिस्थान आहे. हल्ली श्री.रमाकांत देवपुजारी व किशोर नवसाळकर कीर्ती शिखरावर आहेत.

बाबूराव टिकेकर

गंधर्व नागरी अमरावतीतील संगीत संस्था, गायक, वादक, नर्तक.

कै.नारायणराव राजहंस (बालगंधर्व) यांचे संगीताचे प्राथमिक शिक्षण अमरावतीस खापर्डे वाड्यात झाले. त्यांची भजने, श्लोक इ. ऐकून त्यांचे सवंगडी व बालमित्र त्यांना कौतुकाने बालगंधर्व म्हणू लागले. हा विलक्षण जादूई शब्द लोकमान्य टिळकांच्या मुखातून बाहेर पडला आणि नारायणराव राजहंस बालगंधर्व झाले. अमरावतीची संगीत परंपरा फार मोठी आहे. एके काळी अमरावतीत सायंकाळी दीडशे सारंगी वाजत असे. अनेक कलावंत तर येथे झालेच. परंतु, त्यांना व बाहेरच्या कलावंताना दाद देणारा रसिकवर्गहि फार मोठा होता. श्रोतृवर्गाची प्रशंसा आणि वाखाणणी पं. रविशंकर, पं. बिरजू महाराज, उस्ताद बिस्मिल्लाखान, उस्ताद साबीर खां, पं.व्ही.जी.जोग, पं.द.वि. पलुस्कर, पं.राधिका मोहन मोइत्र , पं. अहमदजान थिरकवाँ साहेब, पं. अल्लारखां साहेब, उस्ताद झाकीर हुसेन, पं. बालगंधर्व, पं. भीमसेन जोशी, गानकोकिळा हिराबाई बडोदेकर, पं. रामभाऊ कुंदगोळकर (सवाई गंधर्व), गिरिजा देवी, सिध्देश्वरी देवी, संयुक्ता पाणीग्रही, किशोरी आमोणकर, परवीन सुलताना, सरस्वतीराणे, गंगूबाई हनगळ, बळवंतराज इ. नामवंतांनी केली आहे. दरवेळी रसिकाग्रणी दादासाहेब खापर्डे यांचा उल्लेख व्हायचाच. तसेच रसिकवर्ग भाऊसाहेब असनारे यांचेहि स्मरण होतेच.

कै.नामदेवबुवा जोशी यांनी "मौलाबक्ष गायन समाज " सुरु करुन संगीत गायन वादनाच्या शिक्षणाची मुहूर्त मेढ केली. ह्यांचे नामवंत शिष्य कै. नथ्थूबुवा कथ्थक, वामनबुवा जोशी , विष्णूपंत तांबे, पं.बिट्याबुवा, मुकूंदबुवा, बाबूराव बझे, मार्डीकर गुरुजी, बाबुराव दंडे, अशी परंपरा चालली. केशवबुवा कवीश्वर यांनी घरोघर जाऊन संगीत जागविले. प्रल्हाद बुवा खोलापुरे उत्तम हार्मोनियम वादक होते. नामदेव बुवांनी गायन समाज संस्था चालवली होती. दादासाहेब आसरकर यांची गायन शाळा बालाजी मंदिरात चालत होती. दत्तुबवा तावडे यांची गायनशाळा होती. व्यकंटराव देशमुख यांची गायन शाळा कुंभारवाड्यातील दत्तमंदिरात चालत होती.

सुरेंद्र राव कँप विभागात घरोघरी जाऊन गायनकला शिकवीत. मरहूम रमजानखाँ (सारंगी), पं. अल्लादिसखाँ (तबला) पं.सफदरहुसेन (शब्बूमियां) (गायन), तुकाराम भैय्या (तबलानवाज), ही दिग्गज मंडळी अमरावतीची होती. या कलावंतानी येथील नायकिणींना संगीत गायन अथवा वादन शिकविले.

हल्ली अमरावतीत ह्या स्वातंत्र्योत्तर कालखंडात खालील व्यक्ती अथवा संस्था संगीत शिक्षण देत आहेत.

अमरावती विद्यापीठ; विदर्भ महाविद्यालय, महिला महाविद्यालय, शासकीय माध्यमिक कन्या विद्यालय, भिवापूरकर अंध विद्यालय, सरस्वती विद्यालय, माई हर्षे कला क्रीडा मंडळ, लक्ष्मीनारायण बालक मंदीर, व्यक्तिश संचालक त्याची जबाबदारी असणाऱ्या संगीत पाठ देणाऱ्या संस्था पुढीलप्रमाणे आहेत.

अभिनव संगीत कलामंदिर, चीचफैल. संचालक श्री.डी.के.काळे गुरुजी.

विदर्भ संगीत विद्यालय, अंबापेठ. गांधर्व संगीत विद्यालय, खापर्डे चौक (जुना राजकमल चौक) संचालक मालवंडे गुरुजी.

श्री.वामनराव धावंजेवार व्हायोलीन वादक आकाशवाणी कलावंत. हेमंत नृत्य कला मंदिर, वनिता समाज, राजकमल चौक, संचालक - श्री.नरसिंह बोडे नृत्य अलंकार - गायन विशारद - तबला विशारद.

पं. दिनकरराव (भय्यासाहेब) देशपांडे मूर्तीजापूरकर, अंबिकानगर, संगीतालंकार, आकाशवाणी चे कलाकार. एम्.ए.(संगीत) तीन सुवर्ण पदकांचे मानकरी. श्री.बाळासाहेब कासलीकर एम्.ए. (संगीत).

मातोश्री संगीत विद्यालय -

संचालक - व्यंकटेश नारायण जोशी, संताजीनगर, दीपा संगीत विद्यालय, संचालक - श्री.सत्यनारायणजी शर्मा, संस्थेचे संस्थापक - मीर महम्मद

अली मीर गुलामअली (लहूमियां) श्री.सदाशिवराव गुजन, विलासनगर, अस्मिता संगीत विद्यालय - पन्नालाल नगर, संचालिका - प्रा.सौ.कमल भोंडे, ''सूरमणि''. येथील शिक्षण नामवंत शिक्षकांकडून दिले जाते. शिक्षक सहकारी श्री.मिलिंद पंत (तबला), श्री.ए.के. देशपांडे (गायन), श्री.प्रमोद ठुसे (गायन), श्री.रमेश बोडे (नृत्य), सौ.मंगला पेढे (गायन), श्री.किशोर नवसाळकर, जनार्दन पेठ, श्री.दुर्गा संगीत विद्यालय, सातखिराडी. संचालक - श्री.जयरामजी बावने, संगीत विशारद, श्री.अनंतराव चौधरी, अंबापेठ., संगीत विशारद, आकाशवाणी कलावंत.

एम्.ए. (संगीत)

श्री.मनोहर कवीश्वर, नमूना, एम्.ए. संगीत, एम्.ए. (संगीत). एम्.ए. (मराठी) संगीत अलंकार.

''गीत गोविंद'' कार. ध्वनि मुद्रिका प्रसिध्द झाल्या आहेत. श्री.साहेबराव गोविंदराव उमप संगीत विशारद (तबला) कलापथक, रुख्मिणी नगर, सरस्वती संगीत विद्याल, कल्याण नगर. संस्थापक - श्री.ढोकणे संगीत विशारद, नाट्य कलावंत.

श्री.महादेवराव उडाखे,

खाजगी रीतीने घरोघरी जाऊन शिक्षण देतात.

श्री.माणिकराव (बाळासाहेब) उडाखे, महावीर नगर,

श्री. सुरेंद्र डवरे, राजापेठ नाका, श्री.मनोहर कोळेश्वर, बुधवारा.

श्रीमती वैशाली व्यवहारे, खापर्डेबगीचा, एम्.ए. (संगीत)

श्री.माधवराव शंकरराव रेखे, संगीत विशारद, मोर्शी रोड.

श्री.कृष्णराव वऱ्हेकर, गाडगे नगर, संगीत विशारद, नामवंत हार्मोनियम वादक.

श्री.बाबासाहेब नायब राजापेठ, नामवंत तबला वादक.

श्री.पुंडलिकराव महल्ले, डोळेवाडा, महाजनपूरा, तबला विशारद.

श्री.अरविंद रघुनाथ दलाल

श्री.विष्णू रत्नपारखी, (संगीत विशारद) भाजीबाजार,

श्री.सुरेश देशपांडे, (तबला अलंकार) विद्युत कॉलनी,

श्री.किशोर पांडे, (तबला अलंकार) हरिभाऊ कलोतीनगर, नामवंत तबला वादक

श्री.अरविंद तेलंग, अंबादेवी रोड, नमूना, सतार वादनाचे शिक्षण देतात.

श्री.श्रीराम तुळाणकर, एम्.ए. (तबला अलंकार), संचालक मधुवंती संगीत विद्यालय, सतार जलतरंग, तबला, सारंगी इ. चे शिक्षण देतात.

श्री.मिलिंद तुळाणकर, जलतरंग वादक.

उत्साद मीर अहमद मीर गुलाम अली (लड्डूमियां साहेब) भारतातील विख्यात वादकांकडून तबल्याचे शिक्षण घेतले.

सौ.अनिता शेलूकर एम्.ए. संगीत, रवीनगर,

श्री.कृष्णराव जिरापुरे, पन्नालाल नगर, संगीत विशारद (तबला), आकाशवाणी, दूरदर्शन कलाकार.

श्री.वा.ल. (बापूसाहेब) डोळे , संगीत विशारद.

श्री.सुनील बर्दापूरकर, संगीत विशारद, अंबिका नगर, आकाशवाणी व दूरदर्शन कलाकार.

श्री.नारायण दरेकर, संगीत विशारद, सरस्वती नगर, आकाशवाणी, दुरदर्शन कलावंत.

कु. शुभदा पेंढारकर, अंबापेठ, संचालक.

आठवणीतले लड्डू खाँ साहेब

सुमारे पंधरा वर्षापूर्वीची गोष्ट आहे. अमरावतीची संगीत कलोपासक सभा एकदम फार्मात होती. महानगरपालिकेच्याप्रांगणात एकाहून एक सरस कार्यक्रम

व्हायचे. अमरावतीत सुरुवातीपासूनच तबलावादकांचे अमाप पिक ! जाकीर हुसेनचा तबला रंगात आला होता. सोलो ऐकण्यासाठी समोर बसलेले 'मिनी जाकीर' मांडीवर थापा देऊन तबल्याला वाहवा देत होते. कदाचित जाकीरच्याही डोळ्यात भरतील अशा पध्दतीने या मंडळींची श्रवणभक्ती सुरु होती. मध्यतरात जाकिरचे रुप डोळ्यात साठवून घेण्यासाठी ही युवक मंडळी जाकीर जवळ गेली. मात्र, कार्यक्रमात ''प्यारा'' भासणारा जाकीर भडकला. जागतिक कीर्तीच्या आणि लोकप्रियतेच्या उत्युच्च शिखरावर असलेल्या उस्ताद जाकीरचे शब्द होते . . . ''तबला सिखते हो ?, फिर यहाँ क्या रख्खा है, समय खराब कर रहे हो, जाओ लड्डू मियाँ खाँ साहेब के पास जाओ. 'धा' भी सिखा दिया जो जिंदगी बन जाएगी !'

जाकीर हुसेनने उल्लेख केलेले लड्डू मियाँ खाँ साहेब नुकतेच पैगंबर वासी झाले आहेत. सांस्कृतिक अमरावतीच्या शिरपेचातील एक मानाचा तुरा निखळून पडला आहे. सरस्वतीचा वरदहस्त लाभलेला असतानाही, हजारो लोकांच्या टाळ्यांचा कडकडाट खाँसाहेबाच्या तबल्यासाठी आसूसलेला असतानाही खाँ-साहेबांनी केवळ विद्या-प्रसारावरच आपले आयुष्य खर्ची घातले. मशीन दुरुस्तीत काळे होणारे आणि कुस्तीच्या आखाड्यात प्रतिस्पर्धावर घट्ट पकड मिळवणाऱ्या खाँ साहेबांच्या हाताचा तबल्यावरचा करिष्मा भल्याभल्यांची मती गुंग करणारा होता.

संघ आणि खॉसाहेब

'कलेला परमेश्वराचे अधिष्ठान लाभावे आणि ही आवड शिष्यांमध्येही रुजल्या जावी, असा खाँसाहेब सातत्याने प्रयत्न करायचे' खॉसाहेबांच्या पहिल्या गंडाबध्द शिष्यपिढीतील एक शिष्य आणि अमरावतीचे ख्यातनाम तबलावादक तालमणी पं. किशोर नवसाळकर यांची ही नोंद खॉसाहेब यांना गायत्री मंत्र मुखोद्‌गत होता. गायत्रीमंत्राचा जप करण्याचा खाँ साहेबांचा शिष्यांना आग्रह राहात होता.

खाँसाहेबांकडे किशोरावस्थेत तबला शिकायला गेलेल्या श्री.किशोर देशपांडे आणि श्री.संजय बहाळ या संघ स्वयंसेवकांसारखाच अनुभव अनेक शिष्यांनाही आलेला

आहे. खाँसाहेबांना संघाविषयी कमालीचा आदर होता. पूजनीय श्री.गुरुजीविषयी खाँ साहेबांना नितांत आदर व जिव्हाळा होता. गुरुजींना असलेल्या संगीताच्या ज्ञानाचीही आणि आध्यात्मिक प्रवृत्तीची लड्डू मियांना पुरेपूर जाणीव होती. सोबतच संघाकडे पाहण्याचाही त्यांचा सम्यक दृष्टिकोन होता. शाखेत जाणाऱ्या स्वयंसेवकांना सोयीच्या वेळेवर शिकवण्यात ते राजी असत.

एकेकाळी दिल्लीला असताना, संघ स्वयंसेवकांनी फुटपाथवर झोपणाऱ्या गरिब लोकांना कंबळ वाटले होते. फिरायला जाताना हा क्षण लड्डू मियाँनी टिपला होता. कंबळ वाटताना संघवाले कोणाला जातपात व धर्म विचारत नव्हते. या एकाच बाबीने लड्डूमियाँचे संघ प्रेम वृध्दिगंत झाले होते. हा किस्स खाँ साहेबांनी अनेक शिष्यांना अनेकदा ऐकवलेला आहे. अमरावतीत अनेक वर्ष काम केलेले संघ प्रचारक स्व. बाळासाहेब हरकरे आणि खाँ साहेब यांचे स्नेहसंबंध होते. याच संघ प्रेमातून लड्डूमियांनी अमरावतीत संघाचा घोष उभा करण्यास मदत केली होती. सेक्सॅफोनसारखे वाद्य घोषात नवीन आल्यावर त्याच्या रचना बसवण्यात व स्वयंसेवकांना शिकवण्यातही खाँसाहेबांनी पुढाकार घेतला होता.

प्रभावी व्यक्तिमत्व

प्रख्यात महिला तबला वादक श्रीमती आबान मिस्त्री यांनी ही खाँसाहेबांना आपले प्रेरणास्थान मानले होते. त्यांनी लिहिलेल्या पुस्तकातही खाँसाहेबांचा अतिशय गौरवपूर्ण उल्लेख आलेला आहे. भारतातील ख्यातनाम तबलावादकांमध्ये लड्डूमियाँचे आदराचे स्थान होते. कार्यक्रमाव्दारे श्रोत्यांना रिझवणे ही बाब त्यांच्या व्यक्तीगत जीवनात नव्हती. खाँ साहेब कार्यक्रमात तबलावादन करीत नसत, याविषयीचे अनेक नुरखे अमरावतीच्या संगीत जगतात प्रसिध्द आहेत.

खाँसाहेबांनी गंडा बंधनातून शिष्य परंपरेला प्रारंभ केला. त्या तुकडीत स्व.पं. मदनसिंग पवार, पं.जगन्नाथबुवा दळवी, पं.किशोर नवसाळकर यासारखे मातब्बर कलावंत आहेत. खॉसाहेबांवर बोलतांना त्यांच्या शिष्यांना अपुरा पडतो. लयीची

आत्मियता व तन्मयता आपल्या ठायी निर्माण होण्याची समर्थ परंपरा आणि यासाठी आवश्यक ती पार्श्वभूमी आणि मनाची जडणघडण खाँ साहेबांव्दारेच लाभल्याचे श्री.किशोर नवसाळकर सांगतात. खाँसाहेबांविषयी बोलताना ते म्हणाले, 'हलका हात, वादनांतील चपळाई आणि स्पष्ट बोलांची निकास व सहजता हे त्यांचे कलात्मक गुण होते. त्यांच्या प्रत्येक भेटीत शिष्यांच्या मनात जिद्द व ईर्षा निर्माण होत राही. त्यांची वादनशैली स्वतंत्र वादनाकडे थोडी झुकती असली तरी, त्या बोलांना साथ-संगतीच्या दृष्टीने पर्याप्त रुदीही होती. तिरकिट, धिरकिट वर विशेष प्रेम, तर चतुरस्त्र जातीकडे खास ओढा होता. ठुमरी वादनात दोल्यांचा वापर आणि तोही लयीला अनुरुप असण्यावर त्यांचा भर होता. दोन बोटांच्या तिरकिटची अदाकारी ही त्याची खासीयत होती. मात्र मुख्यत्वेकरुन केवळ रियाझाचे वेळी आणि तेही तबल्यावर जाड कपडा टाकूनच ते वाजवीत.''

सतत हसतमुख असणारे लड्डूखाँ साहेब अध्यापनात अत्यंत कठोर होते. अर्थसंपादनात मात्र, ते प्रचंड अरसिक होते. लड्डू मियाँचीही संगीत यात्रा पं. नवसाळकरांप्रमाणेच श्रीराम तुळणकर, मनोहर देऊळकर, मनोहरराव कवीश्वर, विनोद देऊळकर, रमेश बोडे, श्रीकृष्ण जीरापुरे, अशोक जडीये, मुकूंद सराफ, मिलिंद वैष्णव, मिलींद सभापतीकर, मानवेंद्र घैसास, निशिकांत पाठक, श्याम जोशी, कु.सुनिता कुळकर्णी, बाबुराव पाठक यासारख्या अनेक लहान-मोठ्या तबलावादकांनी जवळून अनुभवलेली आहे. शिष्य-परिवाराचे आणि संगीत-क्षेत्रातील लोकांचे खाँ साहेबांवर प्रेम असणे स्वाभाविकच होते. परंतु सांस्कृतिक अमरावतीचेही लड्डू मियाँवर अपार प्रेम होते.

मीर अहमद अली गुलाम अली उर्फ उस्ताद लड्डू खाँ साहेबांचा जन्म १९२२ साली झाला. त्यांचे वडील गुलाम अली हे देखिल सितार व तबला वादक होते. तत्कालीन प्रसिध्द तबलावादक महमद बुरहान खाँ साहेब उस्ताद नन्हे खाँ साहेब, उस्ताद थिरकवासाहेब या सारख्या समर्थ गुरुंची परंपरा लड्डू मियाँला लाभली होती. समर्थ गुरुपंरपरेत वाढलेल्या लड्डू मियाँच्या केवळ स्मरणाने मेंदूत नवीन बोलाची उपज

सुरु होते, असे खाँसाहेबांविषयी अमरावतीतील ख्यातनाम कलाकार श्री.श्रीराम तुळणकर यांनी म्हटले आहे. मुंबईत नावारुपास येत असलेला युवा कलावंत किशोर पांडे यांचे गुरु व खाँसाहेबांचे स्नेही श्री.बाबासाहेब नायब, प्रख्यात गायक मनोहरराव उपाख्य बाळासाहेब कासलीकर, संगीत समीक्षक श्री.अनिल महेंद्र कलोपासक सभेचे श्री.बाळासाहेब पांडे, सुरभीच्या डॉ.सौ.मोहना कुळकर्णी यानी खाँ साहेबांच्या निधनाचे वर्णन 'संगीत क्षेत्राचे' अतीव नुकसान असे केलेले आहे.

सांस्कृतिक अमरावतीच्या सन्मानात भर घालणाऱ्या खाँ साहेबांच्या रुपात असलेल्या अध्यायाची समाप्ती झाली आहे. खाँ साहेबांच्या तपश्चर्चेची फळे त्यांनी आपल्या शिष्य-परिवाराला दिलेली आहेत. त्यांनी दिलेल्या शिकवणुकीच्या आधारावर आणि त्यांच्या स्मृतींच्या आधारावर त्यांचा वारसा पुढे चालवल्या जाणार आहे.

देविदास पंत काळे

यांचा जन्म इ. १९२५ मध्ये झाला. वयाच्या १९ व्या वर्षी विषम ज्वरामुळे यांचे डोळे गेले. नागपूरच्या अंधविद्यालयात शिक्षण घेतले. संगीत शिकवत असत. त्यामुळे त्यांना संगीताची गोडी लागली. केवळ श्रवणभक्तीने त्यांनी गानविद्या आत्मसात केली. ही एकलव्याची साधना होती. डोळे बंद असले तरी कान तीक्ष्ण होते. इ. १९४५ मध्ये लखनौची संगीत विशारद व गांधर्व संगीत विद्यालयाची अलंकार पदवी प्राप्त केली. व अमरावतीस परत येऊन संगीताच्या शिकवण्या सुरु केल्या.

आवाज भसाडा व न वळणारा असल्यामुळे स्वत: चांगले गायक होऊ शकले नाहीत. पण श्री.चौबळ, श्री.बापूसाहेब डोळे यांनी सुरु केलेल्या संगीत विकास मंडळात नोकरी केली. नंतर स्वत:चे अभिनय संगीत विद्यालय सुरु केले. (१९५७). पण संगीत शिक्षण सुरुच ठेवले. यावेळी ते श्री.राजाभाऊ नवसाळकर यांच्याकडे शिक्षण घेत होते. राजाभाऊंच्या पश्चात त्यांनी त्यांचा मुलगा बंडू (किशोर. नवसाळकर याला शिकवून तयार केले. ते तबला देखील उत्कृष्ट वाजवतात. काळे गुरुजींनी कुमुद हिरुरकर, कमल भोंडे, पुष्पा सरवटे, मनोहर लव्हेकर, सुरेखा जोशी, सविता तांबे (महाराज),

अलकनंदा तुळजापुरकर अशा नामवंत विद्यार्थ्यांना शिक्षण दिले आहे. सौ.कमल भोंडे यांना ग्वाल्हेरचा सूरमणी किताब मिळाला आहे. अमरावती व विदर्भातील संगीत सृष्टि संपन्न करणाऱ्या कलावतांमध्ये राजाभाऊ नवसाळकर, मनोहर कासलीकर, विवेक गोखले, भैय्यासाहेब देशपांडे, मनोहर कवीश्वर यांच्या सोबत देविदास पंत काळे यांचेही नाव घ्यावे लागते. त्यांचे प्रसन्न हास्य, संवाद कौशल्या, संगीताची सुरांची सूक्ष्म जाण, प्रशंसनीय आहे.

परिशिष्ट ७ ब

अमरावतीची रंगभूमि

महाराष्ट्र नाटकवेडा आहे. तसाच विदर्भ देखील नाटक वेडा. नाट्यवेडा आहे. नाट्यरसिक आहे. नाटकाच्या लेखनाच्या दृष्टीने संपन्न आहे. अभिनय संपन्न आहे.

महाराष्ट्र रंगभूमीला वैभव प्राप्त करुन देणाऱ्या विदर्भाला अभिमान वाटावा अशी वैदर्भीय नाट्य परंपरा आहे. प्राचीनता आहे.

याचे उल्लेख अनेक ठिकाणी येऊन गेलेले आहेत.

पुनरावृत्ति टाळण्यासाठी ब्रिटीश अमदानीच्या काळापासून अमरावतीत घडलेल्या नाट्यविषयक चळवळीचा धावता आढावा घेण्याचा प्रयत्न.

ब्रिटीशांच्या पाशवी सत्तेला आव्हान देण्याचा प्रयत्न आपल्याकडे नाटकातून झाला. इ. १८८७ साली बजाबारामचंद्र प्रधान यांनी भ्रांतिकृत चमत्कार या नावाचे अनुवादित नाटक रंगभुमीवर आणले. इ. १८९० मध्ये अमरावतीचे कै.गंगाधर पंत (तात्या) सबनीस यांनी 'रत्नावली' हे नाटक लिहिले श्री.गोपाळराव बेडेकर यांनी 'तारा विलास' हे नाटक लिहिले. इ. १८९९ ला कै.भाऊसाहेब असनारे यांनी 'मुद्राराक्षस' हे नाटक भाषांतरित केले. ते कै.दादासाहेब खापर्डे यांनी रंगभूमी वर आणले. त्याचे दिग्दर्शन केले. ह्या नाटकात शंकुतलेचे काम एका मुसलमान व्यक्तीने केले होते. स्वत: दादासाहेबांनी कण्व मुनींची भुमिका केली होती. श्री.अप्पासाहेब (रा.मो.) खरे यांनी शिष्याची भूमिका केली होती. दादासाहेबांना नाटकाची फार आवड होती. त्यांचे

दिग्दर्शन इतके प्रसिध्द झाले की, मराठी नाटकात दिग्दर्शनाची खापर्डेशैली म्हणून नाव प्रचारात आले. त्यांनी अनेक नाट्य संस्थांना सरळ हाताने मदत केली. अनेक नाटक कंपन्यांना नाटके बसवून दिली. बालगंधर्व त्यांच्याकडे बालपणी रहायला होते. नारायणराव राजहंसाचे प्राथमिक संगीत शिक्षण व अभिनय शिक्षण येथे खापर्डे वाड्यात झाले. अनेक नामवंत नाट्य क्षेत्रातील मंडळींचा दादासाहेबांच्या कडे राबता होता. त्यांचे नाट्यप्रेम पाहून कै.काकासाहेब खाडिलकर यांनी त्यांचे 'कांचनगडची मोहना'' हे नाटक दादासाहेब खापर्डे यांना समर्पित केले आहे.

हिंदुस्थानातील पहिले नाट्यसंमेलन ८ ऑगस्ट १९०५ ला मुंबईत भरले. त्यांच्या अध्यक्षपदाचा बहुमान कै.दादासाहेब खापर्डे यांना लाभला होता. अनेक मोठमोठे कीर्तनकार, कलावंत त्यांच्या पुढे हजेरी लावण्यासाठी येत असत. हिराबाई बडोदेकर यांना 'गानकोकिळा' हा किताब दादासाहेबांनी दिला. तसेच रामभाऊ कुंड गोळकरांना 'सवाई गंधर्व' हा किताब दादासाहेबांनीच दिला. अमरावतीतील हौशी नाट्य कलावंत जमवून दादासाहेबांनी अमॅच्यूअर नाटक कंपनी ही संस्था स्थापन केली. अनेक संस्कृत इंग्रजी नाटकांची भाषांतरे करुन ती नाटके रंगभूमीवर आणली. व विदर्भभर दौरा करुन ही नाटके रसिकांसमोर प्रदर्शित केली. अमरावतीची रंगभूमि दादासाहेबांचे हे उपकार कधीहि विसरणार नाही.

कै.रा.दि.भवाळकर (नाना) यांचे राजा श्रीयाळ हे नाटक त्या काळीफार गाजले. कै.बाबासाहेब (बाळकृष्ण गणेश) खापर्डे मुंबईला महाविद्यालयात शिकत असताना त्यांना नाटकात काम करण्याची सुसंधि मिळाली. चांगल्या दिग्दर्शकांकडे जाऊन त्यांनी हॅम्लेट, ज्यूलियस सीझर, ऑथेल्ले, मॅकबेथ, शायलॉक, मार्क ॲटनी, वगैरे विख्यात भूमिका आत्मसात् केल्या. कै.दादासाहेब खापर्डे यांचे तिसरे चिरंजीव बळवंत गणेश (अण्णासाहेब) खापर्डे स्वत: नाट्यलेखक दिग्दर्शक व नट होते. समस्त अमरावतीच्या, भारताच्या, एवढेच नव्हे तर वैश्विक रंगभूमीला त्यांनी 'मुकाभिनय' ह्या नाट्यकलेची देणगी दिली. ही अमरावतीकरांना विशेष अभिमानाची गोष्ट वाटावी. शहाजहान, वेडा कवि, कवि व फुल, दुष्यंत, शकुनी, नल, इ. वीस भूमिका ते फक्त

अभिनयाव्दारे वढवून दाखवीत असत. काशी हिंदू विश्व विद्यालय, (बनारस) येथे मराठीचे प्राध्यापक म्हणून कार्य करताना मराठी नाटके बसविली, दिग्दर्शित केली, ह्यात नवल नाही. पण हिंदी, बंगाली, संस्कृत, इंग्रजी ह्या भाषांत त्यांनी अतिशय उत्तम नाटके बसवून दिली. पं. मदनमोहन मालवीय यांना त्यांची नाटके फार आवडत असत. विशेष महत्वाच्या अतिथिंच्या आगमनप्रसंगी त्यांच्या मूकभिनयाचा प्रयोग हमखास होत असे. डॉ.राधाकृष्णन् यांनीहि त्यांच्या प्रयोगाची प्रशंसा केली होती.

नाट्य क्षेत्रात अमरावतीचे नाव विशेषपुढे आले ते कै.वीर वामनराव जोशी यांच्यामुळे कर्णवध, (१९११), राक्षसी महत्वाकांक्षा (१९१४), रणदुंदुभी (१९२७), धर्म सिंहासन, शीलसन्यास, झोटिंग पाच्छाई, शंठ प्रतीशाटयम् देशाभिमान, सत्याग्रही इ. त्यांची नाटके गाजली. त्यापैकी रणदुंदुभी व राक्षसी महत्वाकांक्ष ही राजकीय स्वरुपाची नाटके होती. ह्या नाटकांतून त्यांनी तेजस्विता, स्वत्व, स्वाभिमान, देशभक्ति यांचा संदेश दिला. पराक्रमाची पूजा शिकविली. त्यांच्या शैलीदार वाक्यांच्यामुळे पदोपदी लो.टिळकांची आठवण येत असे. तर काही नाटकांतून त्यांनी म. गांधीच्या विचारप्रणालीचा संदेश प्रसृत केला. त्यांची नाट्यगीते रंगभूमीवर विशेष गाजली. व मा.दीनानाथ, आशा भोसले, यांच्यामुळे ती घरोघर पोहोचली.

कै.श्री.नानासाहेब बामणगावकर यांनीहि उत्कृष्ट देशभक्ति पर नाटके लिहिली. धनुर्भंग, आत्मतेज, नगरपालिका, 'मलामते द्या' ह्या नाटकांतून त्यांनी देशभक्ति, आदर्श नागरिकता यांचा संदेश दिला. शं.ना.(काकासाहेब) सहस्त्रबुध्दे यांनी आत्मविश्वास, राणी चंद्रावती, ही नाटके लिहिली. अनेक नाटकांचे दिग्दर्शन केले. सोन्याबापू सारखा नट व दिग्दर्शक पुत्र अमरावतीच्या रंगभूमीला दिला. रणदुंदुभी, राक्षसी महत्वाकांक्षा, उमाजी नाईक, एकच प्याला, संशय कल्लोळ, मानापमान, प्रेमसन्यास, महाराणी लक्ष्मीबाई, वगैरे नाटकांवर समीक्षणात्मक, मार्गदर्शिका लिहिल्या हे त्यांचे वैशिष्ट्य. डॉ.म्हैसाळकर यांनी 'प्रजेचा राजा,' गोविंदराव मुंगशीकर यांचे 'मराठ्यांचे सिंहासन' ही शिवाजी महाराजांच्या चरित्रावरील नाटके फार प्रसिध्दीस आली. मुंगशीकरांनी 'शेतीचे मोती', हे नाटक लिहून कृषि साधना हाहि नाट्यविषय होऊ शकतो हे दाखवून दिले होते.

विद्याधर गोखले मूळचे अमरावतीचे त्यांच्या विषयी स्वतंत्र लेख अन्यत्र आलेला आहे.

नानासाहेब (किशोर) दिघेकर हेहि नाव घेण्याजोगे नाट्यकलावंत भयान थुतरे, महाराणाप्रताप वगैरे नाटके फार गाजली. भयान थुतरे हे वऱ्हाडी बोलीतील नाटक आहे.

पुरुषोत्तम दारव्हेकर यांनी 'कट्यार काळजात घुसली', 'चंद्रनभीचा ढळला', 'अबोल झालीस का? ' 'वऱ्हाडी माणसं', 'हर हर गंगे', 'मदनाची मंजिरी', 'बावनखणी' ही अतिशय विख्यात नाटके लिहून अमरावती रंगभूमीची फार मोलाची सेवा केली.प्रा. मधुकर आष्टीकर नागपूरचे पण मूळ अमरावतीचे यांनी विनोदी प्रकरणे एकांकिका लिहिल्या. प्रत्येकाला जोडा चावतो, सकाळच्या वरणला संध्याकाळची फोडणी, अमृतधट तुझा घरी, सावळागोधंळ, तीन इसम तेरा आणे, माझा रघु बोलला, माझा ज्ञानीयांचा राजा, इ. प्रहसन वजा नाटके लिहिली. कै. प्रा. मा.ल. व्यवहारे यांनी फार दर्जेदार नाटकांची निर्मिती केली. वासुदेवराव दिक्षित, धैर्यशील वाघ, काका जोशी, प्रभाकर कुळकर्णी, जनार्दन दातार, प्रा. अरविंद देशपांडे, संजय कुलकर्णी राजाभाउ मोरे, मंगला बक्षी, पदमा देसाई, सुशीला भालेराव, दादासाहेब कोवळे, संजय कुलकर्णी, वगैरे कसलेले, दर्जेदार कलावंत अमरावतीत रंगभूमि गाजवून गेले.

अमरावतीत नाट्यमंडळ्या फारशा चालल्या नाहीत. शं.ना. सहस्त्रबुध्दे यांची 'विदर्भ नाट्य मंदीर ', जनार्दन दातार यांची एक नाट्यसंस्था, शाम देशपांडे यांची एक नाट्यसंस्था, शाम देशपांडे यांची 'चिंतामणि', नव नाट्य कलेला उत्तेजन देणारी 'रंगकर्मी', अशा तुरळक नाट्य संस्था अमरावतीत झाल्या. पण महाविद्यालये, शाळा यांच्या स्नेहसंमेलन प्रसंगी जी नाटके होत, त्यातून अमरावतीची नाटकांची हैस पूर्णपणे तृप्त होत असे. गणेशोत्सव प्रसंगी आझाद हिंद मंडळाने शेकडो नाटके प्रकाशात आणली. अनेक कलाकार व कलावंत पुढे आले. नीळकंठ मंडळ, राजापेठ मंडळ, खापर्डे बगीचा मंडळ, मुधोळकरपेठ महिला मंडळ या गणेशोत्सव मंडळांनी अनेक नाटके बसवून रंगभूमीवर आणली. त्यामुळे जाणकार, दर्दी, रसिक वर्ग तयार झाला.

पुण्या मुंबई, कोल्हापुर कडून व्यावयायिक कंपन्या नाटके इकडे आणतात. त्यांना येथील रसिक वर्ग उदार आश्रय देतो. बालगंधर्वांच्या कंपनीवर कर्ज झाले की ते अमरावती वऱ्हाड कडे दौरा काढीत. एकाच दौऱ्यात सारे कर्ज वगैरे फिटून पुढल्या दौऱ्याची बेगमी करुन घेत.

अमरावतीतील नाटकमंडळींमध्ये सहकार्य नांदावे, एकोपा व्हावा, व अडीअडचणीच्या प्रसंगी त्यांना साह्य करता यावे म्हणून श्री. वासुदेव खापर्डे, यशवंत बायस्कर, राजेन देशमुख वगैरे हौशी नाट्य प्रेमींनी अमरावती रंगभूमि समिती स्थापन केली. ५ नोव्हेंबर १८४३ ला पहिले मराठी नाटक रंगभूमीवर आले त्या दिवसाचे स्मरण म्हणून ही समिती प्रतिपर्षी ५ नोव्हेंबर हा दिवस रंगभूमी म्हणून साजरा करते. नाट्यशिबिरे आयोजित करते. जुन्या नाट्यकलावंतांचे स्मरण, गुणकौरव, सत्कार प्रतिवर्षी केले जातात.

विश्राम बेडेकर, गजानन जहागिरदार, विद्याधर गोखले, श्री राम शेवाळकर, सौ. मोटे, वगैरे अमरावतीची मंडळी कारणपरत्वे पुण्या मुंबई कडे गेली व तिकडे त्यांनी नावलौकिक मिळविला. मोठ मोठी पदे भूषविली. पण त्यांना अमरावती विसरली नाही. उत्सव प्रसंगी त्यांचे नांव निघायचेच.

शहराच्या मध्यवर्ती भागात निर्माणाधीन आणि पुर्णत्वास जात असलेल्या सांस्कृतिक संकुलामुळे शहरातील गेल्या चाळीस वर्षापासूनच्या मागणीची योग्य पूर्ती होत आहे. अमरावतीचे सांस्कृतिक क्षेत्र झपाट्याने विकसित होण्यासाठी हे सांस्कृतिक संकुल मैलाचा दगड ठरणार आहे.

विदर्भाची सांस्कृतिक राजधानी म्हणून आळखले जाणारे अमरावती हे शहर आहे. गायन,वादन,संगीत नाटक या सर्व क्षेत्रात गौरवाचे स्थान प्राप्त केलेले, गुणी कलावंत मोठ्या संख्येत घडवणारे आहे. कलावंतांना कला सादर करण्यासाठी आवश्यक असलेले रंगमंच आणि थिएटर अमरावतीत नसणे ही एक शोकांतिका होती. रंगभवनाशिवाय नाटके किंवा कार्यक्रम आयोजित करणाऱ्या आयोजकांचे कंबरडेच मोडले जायचे. खर्च पेलवला जात नाही म्हणून चांगल्या संस्था हळूहळू



श्री संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन, अमरावती.

लयास जायला, लागल्या अमरावतीत चांगले रंगमंदिर असावे किंवा सांस्कृतिक केंद्र असावे ही कायमची रड रड ठरली होती. ही मागणी कधीही पूर्ण होणार नाही, अशी जणू अमरावतीकरांची खात्रीच झाली होती.

पूर्वतिहास

अमरावती शहराच्या सांस्कृतिक क्षेत्राला एक समृध्द वारसा लाभलेला आहे. या शहरात १८९० साली ' इंद्रभुवन थिएटर ' बांधले गेले. परकोटाच्या आत सेठ पुरणमल यांच्या मायवाड्यात थिएटरची निर्मिती झाली. १८८९ पर्यंत या गायवाड्यामध्ये शहरातील वक्तृत्वोतेजक संस्थेचे कार्यक्रम होत असत. नंतर या जागेवर थिएटर उभारण्यात आले.

शहरातील छोट्यामोठ्या कार्यक्रमांना थिएटर अत्यंत अल्प दरात उपलब्ध करुन दिले जात होते. १ जानेवारी १८९८ रोजी मुंबईची किर्लोस्कर नाटक मंडळी अमरावतीला आली होती. याच काळात म्हणजे १८९७ च्या शेवटच्या काही दिवसात गणेश थिएटर बांधण्यात आले. गणेश थिएटर म्हणजे हल्ली अस्तित्वात असलेले प्रभात टॉकीज, इंद्रभुवन सांबतच गणेश थिएटरमध्ये नाटकांना स्थान मिळू लागले. १९९६ साली इंद्रभुवनचे पुन्हा नूतनीकरण करण्यात आले. नाटक मंडळीतील कलावंतांच्या सोयी होउ शकतील, अशी व्यवस्था देखील थिएटन लगतच करण्यात आली होती.

बालगंधर्व अमरावतीत

आपल्या गायनाने आणि नाट्यकलेने महाराष्ट्रातील नाट्य रसिकांना मंत्रमुग्ध करुन सोडणारे आणि या क्षेत्रात नाव अजरामर झालेले नटसम्राट श्री. नारायणराव राजहंस 'बालगंधर्व' हे बालपणी अमरावती येथे वास्तव्यास होते. त्यावेळी ते श्रीमंत दादासाहेब खापर्ड यांच्या घरी वास्तव्यास होते. याच काळात अमरावतीतील प्रख्यात गवई नामदेवबुवा यांच्याकडे बालगंधर्वानी गाण्याची तालीम घेतली होती. नामदेवबुवा हे प्रख्यात गवई मौलाबक्ष यांचे शिष्य होते. या काळी नारायणराव रुसून घर सोडून अमरावतीला आले होते असेही सांगितले जाते.

१९०५ साली बालगंधर्व किर्लोस्कर नाटक मंडळीत सहभागी झाले. पुढे गोविंदराव टेंबे आणि गणपतराव बोडस यांच्या भागीदारीत बाल गंधर्वानी, गंधर्व नाटक मंडळी सुरु केली. १८९८ सालीच लोकमान्य टिळकांनी त्यांना 'बालगंधर्व' ही उपाधी देउन सन्मानित केले होते. कालांतराने बालगंधर्वाना आर्थिक आपत्तीचा सामना करावा लागला. कर्जबाजारी असतानाच पुन्हा एकदा बालगंधर्व अमरावती मुक्कामी आले होते. या मुक्कामात अमरावतीकर रसिकांनी गंधर्वाना डोक्यावर उचलून धरले. याचा त्यांना किर्ती आणि पैसा असा दुहेरी लाभ झाला. मुंबईच्या सावकाराचे कर्ज फेडण्यासाठी हा दौरा बालगंधर्वासाठी फायदेशीर ठरला अशी ऐतिहासिक नोंद आहे.

समृध्द परंपरा

अशी समृध्द परंपरा अमरावतीला लाभलेली आहे. वीर वामनराव जोशी , विद्याधर गोखले अनेक नाटककार, कलावंत अमरावतीने दिले आहेत. विशेष म्हणजे कान तयार असणारा श्रोता देखील मोठ्या संख्येने अमरावतीत घडलेला आहे. इंद्रभुवन थिएटर नंतर पुढे राजकमल कला मंदिर नाटकांचे आश्रयस्थान व्हायला लागले. अलीकडच्या काळात गोपाल, अलंकार या चित्रपटगृहांवर देखील नाटकाचे प्रयांग होत.

पुणे-मुंबईकरांच्या नाटक मंडळींना चित्रपट गृहांचे हे दर परवडणारे होते. मात्र, हौशी कलावंताच्या संस्थाना हा खर्चाचा बोझा परवडणारा नव्हता. अनेक संस्था तयार झाल्या. कलावंत घडले मात्र एखादे सुसज्ज रंगभवन नाही ही कायम शोकांतिका होती.

सुरभि, संगीत कलोपासक सभा, नाट्यधर्मी, विदर्भ नाट्य मंदिर या सारख्या सर्व संस्था रंगमंदिराची मागणी लावून धरीत होत्या.

वचनपूर्ती

१९९० च्या विधानसभा निवडणूकीत आपलया वचननाम्यात जगदीश गुप्ता यांनी सांस्कृतिक केंद्र निर्मीतीचे वचन दिले होते. आमदार म्हणून निवडून आल्यावर लगेच या आमदाराने तात्कालीन सरकारकडे या दिशेने पाठपुरावा सुरु केला. १९९५

साली जगदीश गुप्ता यांच्याकडे पुन्हा एकदा अमरावती शहराचे प्रतिनिधीत्व आले. महाराष्ट्रातही सत्तांतर होउन 'शिवशाही' उदयास आली आणि सांस्कृतिक राजधानीत रंगमंदिर नसणे हे लांछनपुसून काढण्याच्या दिशेने ठोस प्रयत्न सुरु झाले.

'सुरभि' सारख्या संस्थेने मुख्यमंत्र्याकडे प्रश्न मांडला. सुरभिने मुंख्यमंत्र्याना भेटून आग्रहपूर्वक सांस्कृतिक संकुलाच्या निर्मितीची मागणी रेटली होती. महापौर सौ. विद्याताई देशपांडे यांनी महापालिकेची आघाडी यशस्वीपणे सांभाळली. तर , तत्कालीन पालक मंत्री जगदीश गुप्ता यांनी निधी प्राप्त करुन घेण्यासाठी शासन दरबारी सततचा तगादा लावण्याचे प्रमुख कार्य केले आणि पाहता पाहता सांस्कृतिक संकुल साकारायला सुरवात झाली.

संपूर्ण वातानुकूलीत, अद्ययावत आणि आधुनिक व्यवस्थांसह हे सभागृह पूर्ण होण्याचा मार्गावर आहे. मोर्शी मार्गावर शहराच्या भागात २.२१ हेक्टर आरक्षित जागेवर ३१०० चौ. मी. बांधकाम केले जाणार आहे. सांस्कृतिक संकुलावर सुमारे सहा कोटी चौसष्ट लक्ष रुपये खर्च केले जाणार असून, आज जवळजवळ काम पूर्णत्वास गेलेले आहे. अमरावती महापालिकेसह विदर्भ वैधानिक विकास मंडळाने देखील या कार्यात मोलाचा सहभाग दिलेला आहे. या संकुलात मुख्य सभागृहासह आर्ट गेलरी आणि अतिथी किंवा कलाकारांसाठी चार अद्ययावत खोल्या बांधण्यात आल्या आहेत. सभागृहात एकूण अकराशे श्रोते बसू शकतील, अशी व्यवस्था आहे. बाहेर लॉन, पार्कींग या देखील व्यवस्था आहेत. पूर्णत्वाकडे जाणाऱ्या या संकुलाला सुमारे अडीच कोटी रुपये खर्च करण्यात आल्याची माहिती महापालिका सूत्रांनी दिली. येत्या डिसेंबर पर्यंत हे सभागृह कार्यक्रकांसाठी उपलब्ध होउ शकेल, अशी शक्यता या संदर्भात संपर्क साधला असता महापालिका आयुक्त सौ. मनीषा म्हैसकर यांनी तरुण भारताला दिली.

या सांकृतिक संकुलाने अमरावती शहराच्या वैभवात नक्कीच भर पडलेली आहे.

परिशिष्ट ८

अमरावतीतील काही शिक्षणसंस्था

हिंदू हायस्कूल :-

हिंदू हायस्कूलची स्थापना इ.स. १८६६ च्या १२ नोव्हेंबरला झाली. या हायस्कूलचे पहिले हेडमास्टर एट्रकिन साहेब हे होते. त्यांचे नंतर मि. मॉकिटांश. श्री.जठार, श्री.महाजनी, श्री.तळवळकर वगैरे मुख्याध्यापकांच्या धुरिणत्वाखाली या संस्थेने शिक्षण कार्य केले आहे.

सर मोरोपंत जोशी, ना.तांबे, बाळकृष्ण गणेश खापर्डे, रा.ब.ब्रम्ह, रा.सा.गणेश नागेश सहस्त्रबुध्दे, मुंबईचे रा.ब.गणेश दामोदार पाध्ये, वऱ्हाडचे इतिहासकार श्री.यादव माधव काळे, ज्ञानकोशकार श्री.श्रीधर व्यंकटेश केतकर वगैरे अनेक प्रसिध्द मंडळी हिंदू हायस्कूलचेच विद्यार्थी होत.

"विद्यार्थ्याची वर्तणूक चांगली आहे असे समजून नेहमी "चांगली" लिहित जावे" १.

हे परिपत्रक तत्कालीन राजकीय परिस्थितीचे द्योतक होय. त्याकाळी दिवसेंदिवस राष्ट्रीय आंदोलन, स्वदेशी आंदोलन वाढत होते व विद्यार्थी त्यापासुन अलिप्त राहू शकत नव्हते. म्हणून इंग्रज सरकारला शाळा खात्यामार्फत वरील पत्रक काढावे लागले हे उघड आहे.

(१ : वऱ्हाड शाळा पत्रक - मार्च १९१०. पृ. २७६)

नूतन विदर्भ शिक्षण मंडळ

अध्यक्ष मा.श्री.अप्पासाहेब खरे यांनी लिहिलेल्या लेखाच्या आधारे :-

आजचे नूतन विदर्भ शिक्षण मंडळ म्हणजे इ. १९०२ साली कै.दादासाहेब खापर्डे यांनी स्थापन केलेली बेरार एज्यूकेशन सोसायटी व इ. १९२४ साली स्थापन झालेलीन्यू एज्यूकेशन सोसायटी ह्या दोन्ही संस्थाच्या इ. १९७२ साली झालेल्या विलीनीकरणातून निर्माण झालेली संस्था होय.

राष्ट्रीय विचाराने प्रेरित होऊन कै.दादासाहेब खापर्डे यांनी इ. १९०२ मध्ये बेरार एज्यू. सोसा. स्थापन केली. त्यांना या कार्यात रा.ब.मुधोळकर, कै.सर मोरांपत (अण्णासाहेब) जोशी यांचे सहकार्य प्राप्त झाले. केंद्रीय सरकारकडून कै.दादासाहेब यांनी बेरार एज्यूकेशन सोसायटीच्या नावाने जोग चौकातील सुमारे चार एकर जमीन मिळविली. शैक्षणिक व धर्मार्थ कार्य चालवाने हा त्यामागे उद्देश होता. या उद्देशाला धरुनच या जागेतील वायव्य कोपऱ्याचा भाग जोग धर्मार्थ ट्रस्टला धर्मार्थ दवाखाना चालविण्याकरता तसेच आग्नेय कोपऱ्यातील भाग थिऑसॉफिकल सोसायटीला दिली. उरलेली जागा बेरार एज्यू. सोसायटीच्या मालकीची राहिली.

या जागेवर एक राष्ट्रीय शाळा सुरु झाली. तिचेपहिले मुख्याध्यापक श्री.कढी हे होते. या शाळेत लोकनायक बापूजी अणे, संस्कृत पंडित श्रीनिवासशास्त्री, आदी ख्यातनाम देशभक्त व्यक्तींनी शिक्षक म्हणून काम केले. ही शाळा बेरार एज्यू. सोसा. ने बांधलेल्या काशीबाई काण्णव इमारतीत चालत होती. त्यावेळच्या सरकारचा विरोध झाल्यामुळे ही शाळा लवकरचबंद पडली. त्यानंतर कलकत्याच्या नॅशनल कौसिल ऑफ एज्यू. सोसा. स संलग्न असलेली राष्ट्रीय हायस्कूल नावाची शाळादादासाहेब खापर्डेयांनी सुरु केली. तिचे मुख्याध्यापक श्री.ल.रा.पांगारकर होते. वीर वामनराव जोशी याच शाळेत शिक्षक होते. ही शाळा सरकारी कारस्थानाला बळी पडून बंद पडली.

इ. १९०३ साली बेरार एज्यू. सोसायटीच्या इमारतीत एक औद्योगिक प्रदर्शन भरविण्यात आले होते. त्यावेळी कै.दादासा खापर्डे जिल्हा लोकल बोर्डाचे अध्यक्ष होते. प्रदर्शन आटोपल्यावर दादासाहेबांनी श्रीगणेश-मा पार्वती यांची मूर्ती ह्या शाळेला भेट दिली. ती अद्यापहि तेथे आहे.

इ. १९२४ साली संभाजीविनायक गोखले यांनी श्री.न.ल.इनामदार यांच्या सहकार्याने एक खाजगी शाळा सुरु करण्याच्या उद्देशाने एकसभा बोलवली. बाबासाहेब खापर्डे, दिवाण बहादूर ब्रह्म, न.ल.इनामदार, तात्यासाहेब तांबे, वाय.जी.देशपांडे, मी स्वत: (अप्पासाहेब खरे) इतके लोक उपस्थित होतो. या सभेत

न्यू एज्यू. सो. स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. जुलै १९२४ पासून न्यू हायस्कूलची सुरुवात झाली. शालेय शिक्षणाबरोबरच शारीरिक शिक्षणाची आवड विद्यार्थ्यांच्या मनात निर्माण व्हावी, ही त्या काळात संचालकांची इच्छा होती. कै.दादासाहेबांच्या मनात हा विचार फार पूर्वीपासून घोळत होता. या पार्श्वभूमीवर इ. १९२५ साली महाराष्ट्रव्यायाम शाळा बांधण्याचा निर्णय घेतला. ही व्यायाम शाळा इ. १९२६ पासूनच सुरु करण्यात आली. गावातील इतर व्यायामप्रेमी तरुण देखील या व्यायाम शाळेचा लाभ घेत असत. बेरार एज्यू. सोसा. ने लवकरच प्रगतीची वाटचाल सुरु केली. इ. १९३२ साली मुलींकरिता स्वतंत्र शाळा नूतन कन्या शाळा बांधण्यात आली. इ. १९३५ साली काशीबाई काण्णव इमारतीवर दुसरा मजला चढवण्यात आला. इ. १९५२ साली बेलपुरा विभागात आठ एकर जागा रु. ३२००० रु ना विकत घेऊन तेथे न्यू हायस्कूल बेलपुरा शाखा सुरु करण्यात आली. इ. १९६५ साली कै.बाबासाहेब खापर्डे यांच्या कारकीर्दीत मुलींसाठी महिला महाविद्यालय स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. बेरार एज्यू. सोसायटी, न्यू. एज्यू. सोसायटी यांचे विलीनीकरण व्हावे अशी बाबासाहेबांची इच्छा होती व दि. २७.१०.१९६८ त्यांच्या मृत्युनंतर इ. १९६८ साली हे विलीनीकरण पूर्ण झाले व नूतर विदर्भ शिक्षण मंडळ अस्तित्वात आले.

गेली पाच दशके : - *(कै.रा.ग.झाडगावकर यांच्या लेखाच्या आधारे पुढील माहिती मिळते.)*

इ. १९२४ साली अम. म्यु.क.ने शिक्षणाखात्याकडे अर्ज करुन शाळा उघडण्यास परवानगी मागितली होती. त्यावेळी शाळा चालवणे हे म्युनिसीपल कमेटीचे काम नव्हे असे उत्तर शिक्षणखात्याकडून आले. पण दि. १३.१२.१९१४ रोजी गव्हर्नर सर स्लाय यांचे भाषण झाले ते म्हणतात.

शिक्षणाची वाढ झपाट्याने होत असल्यामुळे अलीकडे अमरावती जिल्ह्यात हायस्कुलांची संख्या फार कमी वाटते आहे. माझ्या मते निमरकारी लोकांनीच पुढाकार घेतला पाहिजे. अशा प्रयत्नांना तुमच्या अमरावती शहरात न्यू एज्यू. सोसायटी च्या रुपाने सुरुवात झालेली आहे. जेवढे मिळेल तेवढ्या अपुऱ्या शिक्षणावर स्वस्थ न

बसता नमुनेदार संस्था काढून लोकांच्या शिक्षणविषयक आकांक्षा पुऱ्या करण्यासाठी शिक्षण विषयक कळकळ असणाऱ्या सद्गृहस्थांनी जरुर प्रयत्न करावा.''

संस्थेजवळ आर्थिक द्रव्यबळ नव्हते. तेव्हा नगरपालिकेने डेस्क, बेंच, देऊन साह्य केले. व शिवाय रु. १५००-०० अनुदान दिले. जि. कौंसिलनेहि रु. ५००-०० अनुदान दिले.

नूतन कन्या शाळेला लागून संस्थेसाठी विज्ञान प्रयोगशाळा इ. १९२६ साली बांधण्यात आली. तिचे उद्घाटन दि. ९.९.१९२६ रोजी गव्हर्नर सर बटलर ह्यांच्या हस्ते झाले.

ह्या संस्थेने अनेक चांगले उपक्रम सुरु केले. दि.ब. ब्रह्म व्याख्यानमाला,बाबासाहेब खापर्डे स्मृति व्याख्यानमाला दरवर्षी घेण्यात येतात. महाराष्ट्रातील नामवंत वक्त्यांच्या ज्ञानाचा लाभ विद्यार्थी-विद्यार्थीनी घेत असतात.

इ. १९७२ साली दिल्ली येथे राष्ट्रीय विज्ञान प्रदर्शनात न्यू हायस्कूल च्या विद्यार्थ्यांनी विज्ञानासंबंधी प्रयोग करणारी उपकरणे मांडली होती. व त्यांचे कौतुक करण्यात आले. नूतन कन्या शाळेच्या विद्यार्थिनीनीं नृत्य नाट्य सादर केले. त्यास महाराष्ट्र शासनाने चांदीची ढाल बक्षीस दिली आहे.

स्थापना आरंभा पासून ह्या संस्थेस अनेक मान्यवर देशभक्तांनी भेटी दिल्या आहेत.

त्यात कै.लोकमान्य टिळक, महर्षि अरविंद घोष, डॉ.एनी, बेझंट, भगिनी निवेदिता, बिपिनचंद्र पाल, डॉ.राजेंद्र प्रसाद, पंमहादेव शास्त्री दिवेकर, महामना पं.मदन मोहन मालवीय, डॉ.मुंजे, महामहोपाध्याय, डॉ.मिराशी, बॅ.मुकुंदराव जयकर, पं. हृदयनाथ कुंझरु, सर बिपिनकृष्णबोस, सर गंगाधरराव पटवर्धन, कुलगुरु श्री.वा.रा.पुराणिक, (नागपुर), राज्यपाल बटलर, राज्यपाल श्री.तांबे, कै.ज.स.करंदीकर, साहित्यसम्राट न.चि.केळकर, डॉ.पट्टाभी सीतारामय्या, आचार्य अत्रे, डॉ.पंजाबराव देशमुख, श्री.शंदा पेंडसे, ना.यशवंतराव चव्हाण, श्री.वसंतराव नाईक, पोलीस महासंचालक श्री.सूर्यकांत

जोग, श्री.ग.त्र्यं.माडखोलकर,श्री.मा.गो.वैद्य, वामनराव चोरघडे, कुलगुरु श्री.मेने (नागपुर), खासदार श्री.के.जी.देशमुख, खासदार सौ.प्रतिभा पाटील, खासदार सौ.उषा चौधरी, श्री.बाबासाहेब धनागरे, श्री.बाबासाहेब घटाटे, (विदर्भप्रांत संघचालक), इ. नामवंत व्यक्तींचा उल्लेख करावा लागेल.

संस्थेपुढे पुढील उद्दिष्ट विद्यार्थिनीसाठी स्वतंत्र वसतीगृह, मुलांसाठी कला व वाणिज्य महाविद्यालय, स्थापन करणे व चालवणे हे आहे.

महत्वाचा नोंदी

बेरार एज्यू. सोसायटीचे पदाधिकारी.

१) कै.गणेश श्रीकृष्ण उपाख्य दादासाहेब खापर्डे.

आद्यप्रवर्तक, संस्थापक, अमरावती जिल्ह्यातील पहिली राष्ट्रीय विचारसरणीची माध्यामिक शिक्षणाची खाजगी शिक्षणसंस्था त्यांच्या प्रेरणेने सुरु झाली. कै.लोकमान्य टिळकांचे निष्ठावंत सहाय्यक.

२) कै.सर मारोपंत जोशी

मध्य-वऱ्हाड चे शिक्षणमंत्री, गृहमंत्री, सामाजिक कार्यकर्ते, न्यू. हायस्कुलचे उद्घाटन यांच्या हस्ते झाले, ऑ.इं.कॉ.चे अध्यक्ष. आद्यप्रवर्तक.

३) कै. राव बहादुर रंगनाथ नरसिंह मुधोळकर,

सुविख्यात कायदे तज्ञ, ऑ.इं. काँग्रेसचे अध्यक्ष, सामाजिक कार्यकर्ते. आद्य प्रवर्तक.

४) कै.दिवाणी बहादुर केशव वामन ब्रम्ह :-

बेरार एज्यूकेशन सोसा. चे पहिले सरचिटणीस. न्यू एज्युकेशन सोसायटीचे प्रवर्तक. प्रथम अध्यक्ष. सतत पंचवीस वर्षे अध्यक्ष पद भूषविले. विख्यात कायदेतज्ञ ऑ.इं. कॉग्रेसचे अध्यक्ष.

५) **कै.बाळकृष्ण गणेश (बाबासाहेब) खापर्डे**

बेरार एज्यू. त्याचप्रमाणे न्यू.एज्यू. सोसा. चे सुरुवातीपासूनचे सभासद इ. १९३८ पासून इ. १९६८ पर्यत अध्यक्ष, मध्यप्रांत वऱ्हाडचे शिक्षणमंत्री, महसूल, पोस्टखाते मंत्री. कायदेतज्ञ. नागपूर विद्यापीठाचे सिनेट सदस्य हिंदू महासभेचे अ.भा. उपाध्यक्ष. ऑ.अ.काँ. चे सरचिटणीस,

६) **कै.संभाजी विनायक गोखले (नानासाहेब)**

मध्य-वऱ्हाड चे शिक्षणमंत्री, अर्थमंत्री, संस्थेचे इ. १९४९ पर्यत उपाध्यक्ष. कायदे तज्ञ स्वातंत्र्य संग्रामातील धडाडीचे कार्यकर्ते.

७) **कै.राव बहादुर रणदिवे.**

न्यू एज्यू. सोसायटीचे इ. १९४८ ने १९५१ पर्यत उपाध्यक्ष.

८) **कै.शंकरराव आवटे.**

न्यू एज्यू. सोसायटीचे उपाध्यक्ष. विविज्ञ.

९) **कै.डी.एल्. (दादासाहेब) लिमये.**

संस्थेचे उपाध्यक्ष विधिज्ञ.

१०) **कै.रावबहादुर रा.मो. (अण्णासाहेब) खरे.**

सामाजिक कार्यकर्ते, विधिज्ञ रा.स्व.संघाचे जिल्हा संघचालक, बेरार एज्यू. सोसायटीचे आघ सभासद, उपाध्यक्ष,

न्यू एज्यू. सोसायटीचे आद्य सभासद, उपाध्यक्ष.

नूतन विदर्भ शिक्षण मंडळाचे अध्यक्ष.

११) **श्री.एल्.एस्. (दादासाहेब) अळसपूरकर.**

नूतन विदर्भ शि. मंडळाचे विद्यमान उपाध्यक्ष विधिज्ञ.

नागपूर विद्या. कोर्टाचे सदस्य.

१२) कै.श्रीकृष्ण लड्ढा

नू. वि.शि.मंडळाचे उपाध्यक्ष.

१३) ॲड कै. रमेश पाध्ये

विख्यात विधिज्ञ, नाग. हायकोर्टचे न्यायमूर्ती संस्थेचे

सहसचिव.

१४) कै.वा.रा.(बापूसाहेब) भोंदू.

रा.स्व.संघाचे जिल्हाध्यक्ष सामाजिक कार्यकर्ते, नगरसेवक

नू.वि.शि. मंडळाचे सदस्य.

१५) कै.वि.रा. (दादासाहेब) राजवाडे,

शिक्षणतज्ञ, शिक्षणाधिकारी. नू.वि.शि. मंडळाचे सदस्य.

१६) कै.न.ल. (अण्णासाहेब) इनामदार.

न्यू.एज्यू. सोसायटीचे आद्य संस्थापक सदस्य. संस्थेचे आजिव सभासद, शिक्षण तज्ञ, न्यू. हायस्कूलचे मुख्याध्यापक यांच्या तळमळीमुळे न्यू हायस्कूलला इनामदाराची शाळा हे नाव पडले होते.

१७) कै.ब.र. (अण्णासाहेब) रानडे.

न्यू.एज्यू. सोसायटीचे आद्य संस्थापक सदस्य. आजीव सदस्य इ. १९२४ ते १९४६ पर्यंत संस्थेचे सचिव.

१८) कै.रा.ल. (भाऊसाहेब) खरे.

न्यू. एज्यू. सोसायटीचे संस्थापक सदस्य. आजीव सभासद न्यू. हायस्कूलचे मुख्याध्यापक.

१९) **कै.एस्. जी. (बाबासाहेब) खांडेकर,**

न्यू. एज्य. सोसा. चे संस्थापक बरीच वर्षे सचिव इ. १९३३ ते २६३६ पर्यत न्यू. हायस्कूलचे मुख्याध्यापक नूतन कन्या शाळेचे पहिले मुख्याध्यापक.

२०) **कै.एस्.एन्. (बाळासाहेब) देशपांडे.**

नामवंत शिक्षणतज्ञ. न्यू. एज्यू. सोसा. चे संस्थापक सदस्य. सचिव.

२१) **कै.बी.बी.(भाऊ) देव.**

न्यू. एज्यू. सोसा. चे आजीव सभासद नूतनकन्या शाळेचे मुख्याध्यापक.

२२) **कै.द.शं. (दादासाहेब) फडके.**

न्यू. एज्यू. सो. चे आजीव सभासद सचिव. न्यू. हायस्कूलचे व नूतन कन्या शाळेचे मुख्याध्यापक. साहित्यिक.

२३) **कै.ग.वि. (भाऊसाहेब) जोशी.**

न्यू. ए.सो.चे. कार्यवाह नू.क.शा. चे मुख्याध्यापक आजीव सभासद.

२४) **श्री.रा.ग.झाडगावकर.**

बेरार ए.सो.चे. कार्यवाह. न्यू. हायस्कूलचे दीर्घकाळ मुख्याध्यापक नू.वि.शि.मं. चे सेक्रेटरी.

२५) **कै.गो.मा.बंड**

न्यू. ए.सो. चे आजीव सेवक सभासद. न्यू. हायस्कूल (बेलापूरा) शाखेचे मूख्याध्यापक.

२६) **कै.व्ही.डी.कुळकर्णी.**

न्यू. ए.सो.चे. आजीव सेवक सभासद. न्यू. हायस्कूल (बेलापुरा) चे मुख्याध्यापक.

२७) कै.गो.गं. दवंडे.

न्यु. ए.सो.चे सद्सय नूतन कन्या विद्यालय व न्यू. हा. (बे) चे मुख्या.

२८) कै.प.म.निमदेव.

न्यू. एज्यू. सो. चे.आजीव सदस्य. साहित्यकार. निबंधकार बेलपुरा शाखेचे मुख्या.

२९) डॉ.प्रा.सौ.माणिक पाटील.

नू. वि.शि. मंडळच्या आजीव सदस्या एम्.ए. (मराठी) एम्.ए. (संस्कृत) पी.एच्.डी.(मराठी) महिला महाविद्यालयाच्या प्राचार्य. संस्कृतज्ञ, नाटककार.

३०) कै.प्र.ह.देवधर.

न्यू. ए.सो.चे आजीव सभासद. न्यू.हा.चे.नूतन क.शाळेचे मुख्याध्यापक. गणितज्ञ. विदर्भ माध्य. शिक्षक परिषदेचे संस्थापक. अध्यक्ष. राष्ट्रीय पुरस्कार.

नूतन विदर्भ शिक्षण मंडळाचे नामवंत माजी विद्यार्थी.

कै.वसंतराव नाईक, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री.

ना.पु.का. (अण्णासाहेब) देशमुख. शिक्षणमंत्री मध्य-वऱ्हाड, कै.उमरलाल केडिया. राजकीय कार्यकर्ते. आमदार. नगराध्यक्ष. अमरावती न.पा.

माजी आमदार कु. मालती जोशी.

वीर वामनराव दांदाची कन्या वीर वामनराव जोशी विद्यालयाची संस्थापिका व मुख्याध्यापिका.

श्री.कृष्णराव (काका) नवाथे.

माजी आमदार. खेळात प्रवीण. विदर्भ आयुर्वेद महाविद्यालयाचे अध्यक्ष.

कै.द.न. (तात्या) पितळे.

प्राथमिक शिक्षकांसाठी लढा दिला. नगर वाचनालयाचे तहह्यात आमरण सचिव. महा.राज्य.ग्रंथालय चळवळीतील कार्यकर्ते.

कै.द.ना.(बबनराव) मेटकर.

माजी आमदार, संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे झुंझार कार्यकर्ते, भारतीय विद्यामंदिराचे संस्थापक सदस्य. भारत सेवक समाजचे कार्यकर्ते.

कै.हरिदतात्रय कलोती.

१९४२ च्या स्वातंत्र्यलढ्यात सक्रिय सहभाग. आझाद हिंद मंडळाचे संस्थापक व अध्यक्ष. अमरावती म.न.पा. चे अध्यक्ष.

हनुमान व्या.प्र. मंडळाचे धडाडीचे कार्यकर्ते.

कै.विद्याधर संभाजीराव गोखले (माजी खासदार)

रा.स्व.संघाचे सक्रिय कार्यकर्ते. मराठी इंग्रजी, उर्दु, व संस्कृत भाषांचे दर्दी लेखक, पंडितराज जगन्नाथ, सुवर्णतुला, मंदारमाला, स्वरसम्राज्ञी, चमकला धृवाचा तारा, जयजयगौरी शंकर, इ. गाजलेल्या नाटकांचे लेखक, उत्कृष्ट वक्ता. व सांसद. खासदार. लोकसत्ता (मुंबई) चे संपादक, नाटक संमेलन व नाट्य परिषदेचे अध्यक्ष. संगीतमय नाटकांचे वैशिष्ट्यपूर्ण नाटककार.

श्री.सूर्यकांत जोग :-

पोलीस महासंचालक. महाराष्ट्र. राष्ट्रपतींचे पोलीस शौर्यपदक प्राप्त झालेले पहिलेचे अधिकारी हे पदक त्यांनादोन वेळा प्राप्त झाले. उत्तम क्रिकेटप्रेमी व खेळाडू.

श्री.दिनकरराव उर्फ भय्यासाहेब देशपांडे

पं. जगन्नाथबुबांचे शिष्य, उत्तम संगीतज्ञ व गायक, अनेक संगीत सभा. संमेलने,

आकाशवाणी, येथे त्यांनी उत्कृष्ट गायक म्हणून नावलौकिक मिळविला आहे. मुलायम व कोमल आवाज, भावमधूर व कल्पक गायकीची शैली हे त्यांचे वैशिष्ट्य.

प्रा. मधुकर आष्टीकर

एम्. ए. संस्कृत. संस्कृतचे प्राध्यापक, नागपूर महाविद्यालय नाटकांचे दिग्दर्शक. नाटककार व हल्ली महाराष्ट्र शासनाच्या साहित्य संस्कृति महा मंडळाचे अध्यक्ष. विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष. प्रत्येकाला जोडा चावतो, रिकामे घट तुझ्या घरी, सकाळच्या वरणाला संध्याकाळची फोडणी, माझा रघुबोलला इ. नाटके लिहिली.

कै.रामदयालजी गुप्ता.

माजी विधान परिषद सदस्य.

एन्.एस्. (भय्यासाहेब) देशमुख

अनेक संस्थाशी व सामाजिक संस्थाशी संबंध माजी आमदार.

विजय हरिहरराव देशपांडे.

वकीलीचा व्यवसाय करणारे, वैशिष्टयपूर्ण घराणे, ह्यांचे पणजोबा, आजोबा, वडील, स्वत: व चिरंजीव प्रशांत हे सर्व नावाजलेले व असलेले वकील गर्भ श्रीमंत. अमरावती नगरपालिकेचे कार्यकारी अध्यक्ष. ह्यांच्याच कारकीर्दीत अमरावतीचा इतिहास खंडा १ वर. अ.न.पा.ने राष्ट्रपति मा.डॉ.नीलमसंजीव रेड्डी यांच्या हस्ते प्रकाशित केला. हनुमान व्या.प्र. मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष, विदर्भ ॲमॅच्युअर रेसलिंग असो. चे अध्यक्ष, दि.बॅड. असो.चे अध्यक्ष, अम. जि.शूटिंग ॲंड आर्चरी असो्. चे अध्यक्ष, ह्यांच्या पत्नि सौ.विद्याताई अमरावतीच्या पहिल्या भा.ज.पक्षाच्या महापौर विश्व हिंदु परिषदेस सक्रिय सहकार्य.

अमरावती विद्यापीठ - एक दृष्टीक्षेप

प्रसंगी उघडे रहा व आपल्या मुला बाळांना शिकवा' हा संदेश आपल्या कीर्तनातून जनमानसाला देणाऱ्या श्री.संत गाडगेबाबांच्या जिल्ह्यात १ मे १९८३ रोजी

अमरावती विद्यापीठाची स्थापना झाली. अमरावती विद्यापीठाच्या स्थापनेनंतर पश्चिम विदर्भातील शैक्षणिक चळवळीला विशेष गती प्राप्त होऊ शकली. अमरावती, अकोला, यवतमाळ व बुलढाणा या चार जिल्ह्यातील शिक्षणाच्या सोयी व संधीत वाढ झाली. अमरावती विद्यापीठाची स्थापना झाली तेव्हा या विद्यापीठाला सलंग्न असणाऱ्या महाविद्यालयांची संख्या ६७ होती. म्हणजे पश्चिम विदर्भाच्या या चार जिल्ह्यात ६७ महाविद्यालये अस्तित्वात होती. यापैकी बहुतांश महाविद्यालये ही जिल्हा ठिकाणावर होती. विद्यापीठाला आज संलग्न असणाऱ्या महाविद्यालयांची संख्या १७७ पर्यत आहे. विद्यापीठ स्थापनेनंतर अस्तित्वात आलेली बहुतांश महाविद्यालये ही, ग्रामीण भागात, तालुका, गाव, पातळीवर आहेत. ज्या तालुक्यात उच्च शिक्षणाच्या सोयी नाहीत त्यातालुक्यात त्या उपलब्ध करुन देण्याचे महाराष्ट्र शासनाचे धोरण आहे. या धोरणाला अनुसरुन अमरावती विद्यापीठ परिक्षेत्रात तालुक्याच्या ठिकाणी उच्च शिक्षणाची सोय उपलब्ध होणे ही ह्या विद्यापीठासाठी व महाराष्ट्रासाठीही स्वागतार्ह गोष्ट आहे.

उपलब्धी

नवीन विद्यापीठाची स्थापना ही केवळ परीक्षा संचालन करणाऱ्या एका केंद्राची स्थापना नसते, तर अनेक अंगानी विद्यापीठ स्थापनेचे महत्व असते. शिक्षणाचा प्रसार व प्रचार होऊन एक शैक्षणिक वातावरण निर्माण होण्यास त्यामुळे बरीच मदत होते. अमरावती विद्यापीठाच्या स्थापनेमुळे महाविद्यालयीन शिक्षण ग्राम पातळीवर पोहोचल्याने महाविद्यालयीन शिक्षण घेण्यासाठी, गावातून शहरात येण्यासाठी विद्यार्थ्यांना जी पायपीट करावी लागत असे ती आता थांबली. त्याचप्रमाणे शहरात राहून शिक्षण घेण्याचा न परवडणारा खर्चही वाचला आणि सर्वात महत्वाची बाब म्हणजे गावालगत महाविद्यालय झाल्याने मुलींच्या शिक्षणाची फार मोठी सोय झाली व त्यामुळे मुलींच्या उच्च शिक्षणाचे प्रमाणही वाढले. पोटाला चिमटा देऊन मुलांना शिक्षणासाठी प्रसंगी शहरात पाठविले जात असे. परंतु मुलींच्या सुरक्षिततेचा प्रश्न म्हणून, स्त्रियांकडे पाहण्याची पारंपारिक दृष्टी म्हणून, कुवत आणि हुशारी असूनही महाविद्यालयीन शिक्षणापासून मुलींना वंचित रहावे लागत असे. गावात महाविद्यालय

उघडल्याने आपोआपच मुलींच्या शिक्षणाचे महाव्दार उघडल्या गेले. ही सावित्रीबाईंच्या महाराष्ट्रासाठी व त्यातही विदर्भासारख्या दुर्लक्षित भागासाठी फार मोठी उपलब्ध आहे.

अमरावती विद्यापीठाच्या स्थापनेनंतर ८४-८५ ह्या शैक्षणिक सत्रात कला, समाजविज्ञान, विज्ञान, गृहविज्ञान, वाणिज्य, विधि, अभियांत्रिकी व तांत्रिकी, आयुर्विज्ञान व आयुर्वेद या संपूर्ण विद्याशाखेतील महाविद्यालयात प्रवेशित विद्यार्थ्यांची संख्या १७,८८६, विद्यार्थिनींची संख्या ६८०१ इतकी होती. ९५-९६ या शैक्षणिक सत्रात महाविद्यालयात प्रवेशित विद्यार्थ्यांची एकूण संख्या ८१६४२ तर उन्हाळी ९६ च्या परिक्षेला बसलेल्या विद्यार्थ्यांची संख्या १,३७,३३५ इतकी आहे. उन्हाळी ९६ ला विद्यापीठाने २८४ परीक्षा घेतल्यात. कला शाखेत विद्यार्थिनींची संख्या सर्वाधिक असून त्या खालोखाल विज्ञान शाखेत आहे. या आकडेवारीवरुन असे निदर्शनास येते की, गावपातळीवर शिक्षणाची सोय झाल्यामुळे व विद्यापीठ स्थापनेमुळे शैक्षणिक वातावरण निर्माण झाल्यामुळे उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या तर वाढलीच, परंतु विद्यार्थिनींच्या संख्येत वाढ झाली आहे. तळागाळातील माणसांपर्यत शिक्षणाची उपलब्धी ही विद्यापीठ स्थापनेची जमेची बाजू आहे.

विद्यापीठातील पदव्युत्तर शिक्षण

अमरावती विद्यापीठाच्या स्थापनेमुळे पदव्युत्तर शिक्षणाच्या संधी मोठ्या प्रमाणात वाढल्या आहेत. विद्यापीठांतर्गत आज २१ पदव्युत्तर विभाग आहेत. यामध्ये व्यवसाय, प्रशासन व प्रबंधन, संगणकशास्त्र, विज्ञान, गृहविज्ञान, भूगर्भशास्त, शारीरिक शिक्षण, सूक्ष्मजीवशास्त्र, समाजशास्त्र, हिंदी, मराठी, शिक्षण, विधी, केमीकल टेक्नॉलॉजी व बायो टेक्नॉलॉजी या पदव्युत्तर शैक्षणिक विभागाचा समावेश आहे. या शिवाय वाङ्मय विद्याशाखेत इंग्रजी, मराठी, हिंदी समाजविज्ञान, इतिहास, अर्थशास्त्र, भूगोल, विज्ञान शाखेत भौतिकशास्त्र, रसायन शास्त्र, प्राणीशास्त्र, वनस्पतीशास्त्र, गणित, सांख्यिकी, गृहविज्ञान शाखेत गृहविज्ञान, शिक्षण विद्याशाखेत शारीरिक शिक्षण व शिक्षण असे अंशकालीन एम.फील. अभ्यासक्रम विद्यापीठाव्दारे



अमरावती विद्यापीठ - स्वागत कमान

चालविण्यात येतात. श्री.संत गाडगेबाबा यांचे नांवे गाडगेबाबा अध्यासन अमरावती विद्यापीठात सुरु करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे सेवांतर्गत शिक्षकांसाठी विद्यापीठाच्या वतीने उद्‌बोधन वर्गाचे आयोजन करण्यात येते.

नागपूर विद्यापीठातून अमरावती विद्यापीठ स्वतंत्र झाल्यानंतर पदव्युत्तर शिक्षणाच्या बाबतीत अमरावती, अकोला, यवतमाळ व बुलढाणा या चार जिल्ह्यातील विद्यार्थ्यांची फार कुचंबणा होत असे. अमरावती नजिक नांदगांव पेठ येथे शासनाचे रासायनिक संकुल प्रस्तावित आहे आणि रासायनिक संकुलाच्या पार्श्वभूमीवर केमिकल टेक्नॉलॉजी व बायो. टेक्नॉलॉजी या शाखांतर्गत विद्यापीठाने सुरु केलेल्या पदव्युत्तर अभयासक्रम विशेष महत्व ठेवून आहे. या ठिकाणाच्या औद्योगिक वसाहतीला लागणारे आधुनिक ज्ञान प्राप्त केलेले मनुष्यबळ अमरावती विद्यापीठ या अभ्यासक्रमांच्या माध्यमातून देऊ शकेल.

लोकाभिमुख उपक्रम

श्री.संत गाडगेबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, प्रज्ञाचक्षू श्री.गुलाबराव महाराज, चक्रधर स्वामी, शिक्षण महर्षि डॉ.पंजाबराव देशमुख, कुष्ठमहर्षि डॉ.शिवाजीराव पटवर्धन यासारख्या महापुरुषांचा वसा लाभलेल्या या विद्यापीठाने लोकाभिमुख दृष्टीकोन ठेवला आहे. अमरावती विद्यापीठांतर्गत येणारा भाग हा प्रामुख्याने ग्रामीण भाग आहे. शेतकरी, शेतमजूरांचा, कष्टकरींचा हा प्रदेश आहे. इथल्या मुलांना केवळ डीग्री देऊन भागणार नाही तर त्या डीग्रीसाठी लागणारी समज आणि उमज विद्यार्थ्यात निर्माण होणे आवश्यक आहे. विद्यार्थ्याचा सर्वांगीण विकास करावयाचा असेल तर त्यांच्यातील अंगभूत सुप्त गुणांना विकसित केले पाहिजे हा दृष्टीकोन अमरावती विद्यापीठाने ठेवला आहे.

" Education is not a product, Diploma / Degree, job money in that order. It is a process never ending one."

या उक्तिला अनुसरुन राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, विद्यापीठ विद्यार्थी संघ, शारिरिक शिक्षण व रंजन मंडळ या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या अंगभूत कला-गुणांना विशेष चालना विद्यापीठाने दिली आहे. या उपक्रमासाठी प्रोत्साहनपर १० गुण देण्याचा महत्वपूर्ण निर्णयही अमरावती विद्यापीठाचा आहे. या सर्व क्षेत्रात विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी मिळविलेले यश नेत्रदीपक आहे. या परिश्रमाची पावती म्हणून महाराष्ट्र शासनाने राष्ट्रीय सेवा योजनेसाठी सर्वोत्कृष्ट विद्यापीठ हा पुरस्कार अमरावती विद्यापीठाला दिला आहे.

ग्रामसफाई, स्वच्छता मोहिम, साक्षरता प्रसार, वृक्षारोपण व पाणी अडवा-पाणी जिरवा योजनेंतर्गत बंधाऱ्यांची निर्मिती, विविध सांस्कृतिक कार्यक्रमांच्या माध्यमातून 'लोकजागर' विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी जाणीवपूर्वक केली आहे. या माध्यमातून विद्यापीठ व समाज यात सुसंवाद निर्माण होण्यास व विद्यार्थ्यांच्या अंगात सामाजिक जाणीव निर्माण करण्यास फार मोठी मदत झाली आहे. विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्रसेना, सांस्कृतिक उपक्रम व आंतर विद्यापीठ क्रीडा स्पर्धा यात उल्लेखनीय यश संपादन केले आहे.

विद्यापीठ परिसर

सेवामहर्षि डॉ.शिवाजीराव पटवर्धन यांच्या तपोवन शेजारील निसर्गरम्य टेकड्यांच्या कुशीत विद्यापीठ परिसर स्थिरावला आहे. विद्यापीठ स्थापनेच्या एका तपाच्या कालखंडात भूसंपादनासारखी महत्वपूर्ण व तांत्रिक प्रक्रिया पार पाडून सुमारे ६०० एकराच्या विस्तीर्ण जागेत विद्यापीठाच्या रुपाने ज्ञानवन विकसित होत आहे. अनेक वृक्षवल्लींनी हा परिसर नटलेला आहे. अशोक, कांचन, बॉटलब्रश, ऑस्टेलियन, बाभूळ, पळासपिंपळ, गुलमोहोर, आबा बोगनवेल जांभूळ, कॅशिआ, करंज, चिच, सगर, सोनमोहोर, वड, पिंपळ, बोर, सीताफळ, सिसम, बांबू, साग, निलगिरी, संत्रा या सारख्या विविध वृक्षवल्लींनी या परिसराला समृध्द केले आहे. 'वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरी' या श्री.संत तुकारामांच्या उक्तीला विद्यापीठाच्या उद्यान विभागाने आपल्या कृतीने खरे ठरविले आहे.

वाटचाल अमरावती विद्यापीठाची

अमरावती विद्यापीठाचे कुलगुरु डॉ.एस.टी.देशमुख यांच्या कारकीर्दीला ११ सप्टेबर १९९९ ला दोन वर्षे पूर्ण झाली आहेत. (त्यानिमित्ताने विद्यापीठाचा शैक्षणिक विकास व भविष्यातील योजना यातून विद्यापीठाला कशी दिशा लाभली व लाभणार आहे.) हे पाहू. त्यांना शिक्षण क्षेत्राचा दांडगा अनुभव आहे. अमरावती विद्यापीठाच्या गुणवत्ता वाढीसाठी शिक्षणतज्ञ, कुलगुरु हे सदैव प्रयत्नशील आहेत. विशेषत: बायोटेक्नॉलॉजी, केमिकल टेक्नॉलॉजी पार्क करण्याचा कुलगुरुचा हा मानस पश्चिम विदर्भाचे भौगोलिक स्थान लक्षात घेता शेती व लहान उद्योगधंदे यांच्या विकासात भर घालणारा ठरणार आहे. विद्यापीठ व्यवस्थेतील तज्ञांचा उपयोग करुन घेवून ग्रंथालय व प्रयोगशाळा यांची अद्यावत सेवा उपलब्ध करुन देणे म्हणजे खऱ्या अर्थाने पश्चिम विदर्भाचा औद्योगिक विकासादृष्ट्या जो अनुशेष आहे, त्यासाठी सक्षम असा सुसंस्कृत पदवीधर, पदवीत्तर, युवक तयार होण्यासाठी उपयोगी पडणार आहे. विशेषत: कला, वाणिज्य, विज्ञान, शाखेकरिता अनुदान मंडळाने जे ४५ अभ्यासक्रम तयार केले आहेत, ते अमरावती विद्यापीठातील प्रत्येक महाविद्यालयात सुरु करण्याचा महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार कुलगुरुंचा प्रयत्न हा निश्चितच येथील युवकाला स्वयंरोजगार सुरु करण्यासाठी फायद्याचा ठरणार आहे. हे अभ्यासक्रम पश्चिम विदर्भाच्या भौगोलिक परिस्थितीचा विचार करुन सुरु झाल्यास नवीन पिढीचा स्वयंरोजगारासाठी साधन सामुग्रीचा वापर करुन स्वत:चे पायावर उभे राहण्याच्या दृष्टीने यशस्वी होतील. पश्चिम विदर्भातील विद्यार्थी हा स्पर्धात्मक परिक्षेमध्ये सहभागी होण्यासाठी सक्षम असावा म्हणून सुरु केलेले मार्गदर्शन केंद्र ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना फायदा मिळावा यासाठी अमरावती येथे निवासाची व्यवस्था व मार्गदर्शन पत्रिकेचा उपक्रम हे त्यात भर घालणारे आहे. यासर्व गुणवत्ता वाढीचा वातावरणासाठी विद्यापीठाशी संलग्नित १९० महाविद्यालयाची विकासात भर पडावी याकरिता संस्थाचालक व प्राचार्य यांचे दोन वर्षापासून चर्चासत्र आयोजित केल्या गेले. विद्यापीठाच्या कामाचा व्याप सांभाळून चारही जिल्ह्यातील लहानात लहान

महाविद्यालयाला स्वत: भेट देवून गुणवत्ता वाढीसाठी केलेले आवाहन यातून नवीन असे शैक्षणिक वातावरण निर्माण व्हावे व त्यातून बौध्दिक दृष्ट्या या ठिकाणचा विद्यार्थी, कमकुवत नसून इतर कारणांमुळेगुणवत्तेत व स्पर्धात्मक परिक्षेत मागे पडतो. त्याचा आत्मविश्वास उंचावण्यासाठी कुलगुरुंनी केलेला प्रयत्न हा जनमानसाच्या आशा उंचावणारा ठरला आहे.

शिक्षकाने विद्यापीठ व्यवस्थेतून स्वत:च्या गुणवत्तेचा विकास करावा म्हणून विद्यापीठाने विद्यापीठ स्तरावर उद्‌बोधन वर्गाचे आयोजन, परिसवांद, चर्चासत्र, व्याख्याने तसेच शिक्षकांना आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय परिषदेसाठी पाठविण्याचा प्रयत्न, हेही त्यांच्या कारकीर्दीतील महत्वाचे पाऊल होय. संत गाडगे महाराजांची पंरपरा या विद्यापीठाने जोपासली आहे. त्यांनी केलेल्या कार्याची जाणीव विद्यार्थ्यात निर्माण व्हावी म्हणूंन त्यांचे दशसूत्री कार्यक्रम विद्यार्थ्याचे मनात प्रतिबिंबीत करण्यासाठी केलेला प्रयत्न आहे.

ग्रंथालय हाच खरा गुणवत्तेच्या विकासाचा आधार आहे. इंन्टरनेट व निकनेट या माध्यमातून ग्रंथालयातून देशातील प्रमुख संशोधन, संस्थेशी विद्यापीठाचा संपर्क ही सुविधा उपलब्ध होणार आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या नेटवर्कवर विद्यापीठाच्या ग्रंथालयाचा समावेश असल्यामुळे राष्ट्रीय स्तरावरील गुणवत्ता स्वत:पुढे खेचून आणण्याची संधी या विद्यापीठातील विद्यार्थ्यांना लाभली आहे. भविष्यात क्रीडा संकुलाची निर्मिती, संत, साहित्याचे स्वतंत्र दालन, स्वयंरोजगार, संगणकीकरण, केंद्रीय मूल्यांकन भवन, कर्मचारी कल्याण योजना आहेत विद्यार्थ्यांची सामाजिक बांधीलकी म्हणून राष्ट्रीय सेवा योजनांतर्गत सहभागी असलेल्या योजनेला महाराष्ट्र शासनाचा उत्कृष्ट राष्ट्रीय सेवायोजना पथक पुरस्कार, उत्कृष्ट समन्वयक, स्वयंसेवक, पुरस्कार मिळून खऱ्या अर्थाने राष्ट्रसंत तुकडोजी महारांजाच्या कार्याची पावती शासनाने बहाल केलेली आहे. महाराष्ट्र शासनाकडून २१३५८७८२४ रुपयाचे निरनिराळ्या कामासाठी अनुदान मिळविण्यासाठी केलेला प्रयत्न, व त्यातून तीन कोटी ३७ लाख ४९ हजार २८५ रु. प्राप्त झालेले अनुदान यातून आहे. त्यापेक्षा अधिक चांगले सुंदर विद्यापीठ

बनविण्याचे स्वप्न साकार होणार आहे. बायोटेक्नॉलॉजी केमिकल टेक्नॉलॉजी या विभागातून नवीन सोयीने सुसज्ज अशा इमारती, विद्यापीठ परिसरात उभ्या झाल्या आहेत. वनस्पतीशास्त्र, प्राणीशास्त्र, शारीरिक शिक्षण, विद्यार्थी व विद्यार्थीनींसाठी जलतरण तलाव, प्रेक्षागृह, उपहारगृह, मुलींचे वसतिगृह ह्या इमारती उभ्या होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. कर्मचारी व शिक्षकांकरीता कर्मचारी भवन अशा इमारती विद्यापीठ परिसरामध्ये उभ्या होत आहेत. या सगळ्या विकासाला गती देण्यामध्ये विद्यापीठातील वेगवेगळी प्राधीकरणे व अधिकारी वर्ग हे कारणीभूत आहेत. विद्यापीठ व्यवस्थेचे प्रशासन, पारदर्शक असावे ही त्यांची प्रथमदर्शनी अपेक्षा. त्यासाठी जिद्द बाळगून सकाळी ८ ते सायंकाळी ८ पर्यंत प्रयत्नांची पराकाष्टा करुन आलेल्या प्रत्येक व्यक्तीला भेट देवून, त्यांचे प्रश्न जाणून घेण्याची शैली, नियमाला धरुन समस्या, सोडविण्यासाठी केलेला प्रयत्न अशा या माध्यमातून विकास घडवून आणत असतांना काही बाबतीत विद्यापीठाला टीकेला तोंड द्यावे लागत आहे. विशेषत: अभियांत्रिकी शाखेतील विद्यार्थ्यांचे गुणवाढीचे प्रकरण, नियमबाह्य नियुक्त्या हे व्यवस्थेतील सहभागी असलेल्या शिक्षकांच्या प्रतिष्ठेला धक्का देणारे आहे. यासाठी कुठेतरी परीक्षा संचालनाच्या सर्व पध्दतीचा भविष्यात पुनर्विचार होण्याची गरज आहे. विशेषत: यापूर्वी लोखंड खरेदीतील गैरव्यवहार, विद्यापीठ परीसरात फरशी बसविण्यात झालेला गैरव्यवहार ही जी प्रकरणे टीकेच्या स्वरुपात जनमानसासमोर आलीत तशी प्रकरणे या दोन वर्षाच्या आधी आली नाहीत. आज देऊळगाव राजा, वणी, धारणी, उमरखेड इत्यादी भागातून स्वत:चे कामाकरिता येणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यापीठाचे उंबरठे पूर्वी जसे झिजवावे लागत असे तसेच शिक्षक, प्राचार्य संस्थाचालक यांनाही झिजवावे लागत होते. 'संघटनेचा', 'नेत्याचा' अशी जी भावना व्यवस्थेत होती ती संपुष्टात आणण्यासाठी कुलगुरुंनी पाऊल उचलून अधिकारी हे सर्वाचे आहेत, त्यांनी सर्वांची कामे स्वत:हून केली पाहिजेत, ही घेतलेली भूमिका स्वागतार्ह ठरली आहे. त्यासाठी प्रशासनात घेतलेले कठोर निर्णय यालाही विद्यापीठात महत्व प्राप्त झालेले आहेत. त्यामुळे नेहमी कामासाठी जाण्याची गरज भासत नाही.

परीक्षेचे निकाल सत्र सुरु होण्यापूर्वीच विद्यापीठाने लावून खऱ्या शैक्षणिक कार्याला सुरुवात केलेली आहे. त्यात काही अवैध प्रकार जसे गुणवाढ व इतर परीक्षेतील गैरव्यवहार यामुळे विद्यापीठाचे विकासाला खीळ बसली आहे. याकरीता कुठेतरी या व्यवस्थेतील अधिकारी, शिक्षणतज्ञ, सेवाभावी शिक्षक, प्राचार्य यांचे विचार मंथन होणे गरजेचे आहे. त्यासाठी स्वातंत्र्याच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात विद्यापीठाने पुढाकार घेण्याची गरज आहे, हा पुढाकार घेतल्यास हे अमरावती विद्यापीठ राष्ट्रीय पातळीवर एक आदर्श विद्यापीठ म्हणून गणल्या जाण्यासाठी वेळ लागणार नाही.

पानांच्या सोबतीने विद्यापीठाने आपला विकास आराखडा आखलेला आहे. शैक्षणिक दृष्ट्या अतिमहत्वाच्या व दुर्मिळ वातावरणातील वृक्षवल्लींच्या जाती विद्यापीठ परिसरातच विकसित करण्याचा विद्यापीठाचा मानस असून त्यासाठी अद्यावत हरितोद्यान विद्यापीठ परिसरात विकसित करण्यात येत आहे. भाभा अणुसंशोधन केंद्र, मुंबई, येथील उद्यान तज्ञ श्री.रोडे यांचे मार्गदर्शनाखाली उद्यान आराखडा तयार कऱ्णयात आलेला आहे. विद्यापीठ परिसरातील विविध विस्तीर्ण इमारती व वास्तूकलेचा एक उत्तम नमुना आहेत. विद्यापीठाच्या प्रशासकीय इमारती, विद्यापीठाची ग्रंथालय इमारत, विविध विभागांच्या इमारती आपल्या वैशिष्ट्यांची साक्ष पटवितात. या परिसरातील उद्यान आणि रस्त्यांच्या दुतर्फा स्वागताला उभी असणारी झाडे विकसित झाल्यानंतर या परिसराच्या सौदंर्यात अधिक भर पडू शकेल.

विद्यापीठासारख्या संस्थेला आपल्या विकासाचा मानबिंदू गाठण्याकरीता १५ वर्षाच्या कालखंड पुरेसा नसला तरी विद्यापीठाच्या नेतृत्वाने या कालखंडात दिलेली दिशा अभिनंदनीय आहे. विद्यापीठाचे प्रथम कुलगुरु डॉ.का.गो.देशमुख, व्दितीय कुलगुरु डॉ.ग.व्या. पाटील व विद्यमान कुलगुरु डॉ.श्री.तु.देशमुख असे विकास कार्यात रस घेणारे व सर्वांना समजून घेणारे सजग नेतृत्व विद्यापीठाला लाभले. विविध प्राधिकारीणींच्या अनुभवी व विधायक दृष्टीकोन असणाऱ्या सन्माननीय सभासदांची साथ मिळाली. शिक्षक, अधिकारी व कर्मचारी

यांनी परिश्रम घेतलेत म्हणून हा परिसर अधिक समृध्द होऊ शकला, विद्यापीठाला या सर्व विकास योजना अल्प मनुष्यबळात राबवाव्या लागल्या. पुरेसा शिक्षक वर्ग व कर्मचारी वर्ग आजही विद्यापीठाला उपलब्ध नाही अशा परिस्थितीत वाढत्या विद्यार्थी संख्येला व विकास योजनाना सामोरे जाणे अवघड असते. याही परिस्थितीत विद्यापीठ समस्यांना हाताळीत आहे. प्रस्थापित विद्यापीठांच्या बरोबरीने अमरावती विद्यापीठाने कामाचा आदर्श ठेवला आहे. संगणकीकरण व केंद्रीय मूल्यांकन पध्दती या सारखे महत्वाकांक्षी उपक्रम विद्यापीठाने अतिशय अल्पकाळात राबविलेले आहेत. कुलगुरु डॉ.श्री.तु.देशमुख, कुलसचिव डॉ.वंदन मोहोड हे याच भागातील असल्याने विद्यापीठ विकासाबाबत त्यांना खूप तळमळ आहे. विद्यापीठाचा वाढलेला प्रचंड व्याप व त्यामानाने अपुरे मनुष्यबळ यामुळे विद्यापीठ कामकाजात काही त्रुटी राहणे स्वाभाविक आहे. तरी सुध्दा आपल्या पूर्णक्षमतेने उत्तम सेवा देण्याचा प्रयत्न विद्यापीठ कर्मचारी करीत आहेत. विदर्भातील व नवीन विद्यापीठाकडे शासनाने विशेष लक्ष पुरविल्यास आजच्या समस्यांनाही सामोरे जाता येईल व अधिकाधिक उपक्रम राबविता येईल यासाठी सामूहिक प्रयत्नांची आवश्यकता आहे.

(प्रा. एस.बी.ठाकरे, यांच्या लेखाधारे साभार.)

चिखलदरा येथील दीपशिखा गुरुकुल

अमरावतीतील ज्येष्ठ नागरिकांच्या व स्वातंत्र्य सैनिकांच्या प्रेरणेप्रमाणे विदर्भासाठी एका सैनिक शाळेची स्थापना श्री.सूर्यकांत जोग (निवृत्त) पोलीस महासंचालक, म.राज्य यांचे नेतृत्वाखाली नवजीवन सोसायटीने चिखलदरा येथे दीपशिखा गुरुकुल नावाने १५ जुलै १९९१ रोजी सुरु केली.

१९९१ ते १९९६ पर्यन्त शाळेमध्ये ८ वी ते १० वी पर्यन्तचेच वर्ग होते व या दरम्यान १० वी चे निकाल नेहमीचा ९० टक्क्यांपासून ते १०० टक्के पर्यन्त लागत आहे. ह्या वर्षाचाही निकाल १०० टक्के लागला. निवासी शाळा असल्यामुळे विद्यार्थी संख्या मर्यादित आहे व शिक्षकही शाळेतच राहत असल्यामुळे विद्यार्थ्यांकडे सर्वांगीण

विकासाकडे वैयक्तिक लक्ष दिले जाते. १९९६ साली महाराष्ट्र शासनाने घेतलेल्या निर्णयाप्रमाणे अमरावती विभागातील सैनिकी शाळा सुरु करण्यासाठी नवजीवन सोसायटी अमरावती या संस्थेस परवानगी दिली. त्याप्रमाणे दीपशिखा गुरुकुल सैनिक शाळा चिखलदरा येथे १ जुलै १९९६ रोजी ५ वी च्या वर्गापासूनच सुरु करण्यात आली. ह्या शाळेत अमरावती, अकोला, यवतमाळ व बुलढाणा जिल्ह्यातील ४ था वर्ग उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना निवड चाचणी घेऊन प्रवेश देण्यात आला. शासकीय आदेशाप्रमाणे एक.ले. कर्नल (निवृत्त) कमांडर या पदावर सेवा विभागातील दोन निवृत्त कनिष्ठ अधिकारी यांचे मार्गदर्शनाखाली शारीरिक व सैनिकी शिक्षण देण्यात येते. शालेय अभ्यासक्रमांसाठी मुख्याध्यापक व अनुभवी शिक्षकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

विद्यार्थ्यासाठी ८ खोल्यांचे वसतीगृह, भोजनगृह व भोजनकक्ष आवश्यक त्या स्वच्छ पाण्याच्या व्यवस्थेसह बांधून झाले आहे. ६ वर्ग खोल्यांचे बांधकाम सुरु झाले आहे. शाळेच्या स्थापनेपासूनच विद्यार्थ्यासाठी भव्य क्रीडांगणही उपलब्ध आहे. व चिखलदरा येथील निसर्गरम्य वातावरणाची विद्यार्थ्याची सर्वांगीण प्रगती होण्यास मदत होते.

१) शासनाच्या आदेशाप्रमाणे आर्थिक दृष्ट्या दारिद्रय रेषेखाली (बी.पी.एल.) असलेल्यांच्या ५ पाल्यांचा खर्च संस्थेतर्फे करण्यात येतो. निवड चाचणी नंतर निवड झालेल्या पाच विद्यार्थ्याचा निवास, भोजन इ. खर्च संस्थेतर्फे करण्यात येईल. या प्रमाणे अमरावतीच्या सामाजिक क्षेत्राचा विस्तार होऊन सैनिकी शाळा सुरु करण्यापर्यंतचा टप्पा गाठलेला आहे.

बाल शिक्षण मंडळ, खापर्डे बगिचा, अमरावती संस्थेचा अहवाल :-

आपले संपूर्ण जीवन समाज सेवेसाठी अर्पण करणाऱ्या कै.माई हर्षे यांच्या प्रेरणेने बाल शिक्षण मंडळाचा जन्म झाला. बालकांचा सर्वांगीण विकास हे ध्येय समोर ठेवून १९४७ साली बालक मंदिराची सुरवात झाली व १९५२ मध्ये ही संस्था

पंजीबध्द करण्यात आली. (रजिस्ट्रेशन नं. एफ-१०४) अमरावती आहे. प्रथम कै.माईंच्या घरात बालवर्ग भरविण्यात आला. दिवसामाजी गोंडस रुप धारण करण्याऱ्या बालकाप्रमाणे बाल शिक्षण मंडळाचे कार्यक्षेत्रही वाढू लागले. उद्याचा नागरिक तयार करण्यासाठी मातेच्या संस्काराची गरज महत्वाची आहे. हे लक्षात घेऊन बालकां बरोबर महिलांचाही विकास तितकाच आवश्यक वाटल्यावरुन शारीरीक , मानसिक, बौध्दिक, शैक्षणिक, कलात्मक व आर्थिक विकास ही उद्दिष्ट्ये नजरेसमोर ठेवून बाल शिक्षण मंडळाने महिला विकासासाठी प्रयत्न सुरु केले. कै.माई हर्षे या बालविधवा होत्या. त्यांची आर्थिक परिस्थिती साधारणच होती. समाज कार्याची त्यांना आवड होती. प्रथम माईंनी कै.दादासाहेब राजवाडे यांच्या मार्गदर्शनाने व श्रीमती कमलताई गोखले व श्रीमती लीलाताई बन्नोरे यांचे सहकार्याने मंडळाचे काम सुरु केले.

बाल शिक्षण मंडळाचे कार्य

बाल शिक्षण मंडळाच्या अंतर्गत चालणाऱ्या संस्था

१. भागीरथीबाई कलंत्री बालक मंदीर, खापर्डे बगिचा

१५ ऑ.१९४७ ४०० विद्यार्थी १० तुकड्या

२. आदर्श प्राथमिक शाळा

१९६८ ११०० विद्यार्थी १६ तुकड्या

३. लक्ष्मीनारायण बालक मंदीर भाजीबाजार (जुनीवस्ती)

१९६० १०० विद्यार्थी २ तुकड्या

४. पाळणाघर (मागास भागात)तारखेडा दररोज पोषक आहार

१९८७ ३० विद्यार्थी

५. शिवण वर्ग

१९६५ १० महिला

६. किशोरी मंडळ (स्त्रीजीवन जागृतीचे कार्य)

१९६५ ४० महिला

७. प्रौढ साक्षरता वर्ग (निरक्षर व प्रौढ)

१९९२ २० महिला

८. कै.सावित्रीबाई फुले, वाचनालय १९८७

९. कै.माई हर्षे कला, क्रीडा, व्यायाम केन्द्र

१९८१ १५० महिला

१०. महिला मंडळ, खापर्डे बगीचा १९८५

११. आदर्श प्राथमिक शाळा भाजीबाजार (नवीन शाळा)

१९९३ १०० विद्यार्थी ४ तुकड्या

१२. शिक्षक पालक संघ, अमरावती संस्थेचा सहभाग १९९५

राष्ट्रीय एकात्मता, अखंडता, टिकवण्यासाठी संस्था विविध राष्ट्रीय उपक्रम राबविते, राष्ट्रीय थोरपुरुषांच्या जयंत्या, पुण्यतिथी, साक्षरता प्रसार, वनमहोत्सव, कुटूंब नियोजन, महिला उद्योग, एकता शिबिराचे आयोजन, सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना, महिलांचे रक्तगट तपासणी शिबिर इत्यादी कार्यक्रमांचे आयोजन करणे. शैक्षणिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्थेत शिक्षण वर्ग प्रशिक्षित आहे. कै.माईच्या निधनानंतर संस्थेतील महिला कळकळीने व एक दिलाने काम करीत असतात.

बाल शिक्षण मंडळा समोरील जागा घेण्याचा विचार करीत आहे. त्या जागेत अमरावती शहरामध्ये चांगले बालभवन नसल्यामुळे चांगले बालभवन काढण्याचा विचार आहे. तसेच महिला उद्योग सुरु करण्याचा विचार आहे.

(स्मरणिकेच्या आधारे संकलित : साभार.)

विविध वैशिष्टयांनी नटलेले अमरावतीचे शिवाजी शिक्षण महाविद्यालय

शिक्षणाची गंगा बहुजन समाजाच्या झोपडीपर्यत पोहचविण्याचे असीधराव्रत घेतलेले महर्षी डॉ. पंजाबराव उर्फ भाउसाहेब देशमुख हे श्री. शिवाजी शिक्षण महाविद्यालयाचे जनक आहेत, या महाविद्यालयाची स्थापना १९६० मध्ये झाली. १९६० ते ९७ या प्रदीर्घ प्रवासात गुणवत्तेची सीमारेषा मात्र या महाविद्यालयाने बऱ्याच वर्षापूर्वी गाठलेली आहे.

या महाविद्यालयाचे महत्वाचे आणि वाखाणण्याजोगे वैशिष्टय म्हणजे शारीरिक शिक्षण महाविद्यालय हे शिक्षण महाविद्यालयाच्या अंतर्गत चालवल्या जाते आणि या दोन्ही महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी.एच. बंड हे ही धुरा यशस्वीपणे सांभाळत आहेत. दोन्ही महाविद्यालयात विविध नाविन्यपूर्ण उपक्रम राबवून त्यांनी एक नवा विक्र म स्थापन केला आहे. महाराष्ट्रात या महाविद्यालयाव्यतिरिक्त दुसरे एकही महाविद्यालय असे नाही की जेथे शिक्षण आणि शारीरिक शिक्षण महाविद्यालय एकाच प्राचार्याच्या अधिपत्याखाली चालविले जात असेल.

उपक्रमी कॉलेज

बी.एड., एम.एड. मुक्त विद्यापीठाचे सेवाअंतर्गत प्रशिक्षण व इतर अनेक उपक्रम राबविणारे हे महाविद्यालय सर्व भौतिक व शैक्षणिक सोयींनी समृध्द आहे. १९९० पासून महाविद्यालयाला यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठातर्फे बी.एड. अभ्यासक्रम सुरु करण्यात आला. १९९४-९५ पासून एम.एड. अभ्यासक्रम तसेच पदव्युत्तर व संशोधन अभ्यासक्रम (एम.ए., एम.एस.सी, एम.फील., पी.एच.डी.) महाविद्यालयात सुरु आहे. १९९४-९५ पासून मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक व पर्यवेक्षक यांच्यासाठी प्रायोगिक स्तरावर शालेय व्यवस्थापन सुरु आहेत. आतापर्यत राष्ट्रीय स्तराच्या चार शिक्षणशास्त्र परिषदाही येथे संपन्न झाल्या आहेत. शारीरिक शिक्षणाकरिता प्रशिक्षित शिक्षकांची वाढती मागणी लक्षात घेउन या महाविद्यालयात १९७५ पासून शारीरीक शिक्षण शाखा जोडण्यात आली व त्यात बी.पी.एड. (१ वर्षीय), बी.पी.ई. (१ वर्षीय) व डिप्लोमा इन योगा एज्युकेशन (१ वर्षीय) असे अभ्यासक्रम सुरु आहेत.

या महाविद्यालयाच्या शारिरीक शिक्षण विभागात अत्याधुनिक स्वरुपाचे हेल्थ सेंटर, जिम्नॅशियम हॉल, ज्युडो हॉल, ॲथलेटिक्स हॉल, त्याचप्रमाणे अद्यावत दृकश्राव्य साधने आहेत. सुसज्ज व भव्य क्रीडांगण आहे. मुलामुलींचे सर्व सोयींनी युक्त असे वसतीगृह आहे. येथील विद्यार्थ्यानी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर सुवर्णपदक प्राप्त केले आहे.

सर्व सोयींनी युक्त असे ग्रंथालय असून तेथे पी.एच.डी. पर्यंतचे १२ हजार संदर्भ आणि संशोधनाकरिता ग्रंथ उपलब्ध आहेत. याचा सर्व विद्यार्थी लाभ घेतात. याचाच परिपाक म्हणून गेल्या ३७ वर्षात या महाविद्यालयातून अनेक गुणवंत विद्यार्थी निर्माण झाले आहेत. ज्यांनी देश-विदेशात आपला नावलौकिक केला आहे.

परिशिष्ट ९

सेवातत्पर संस्था

विदर्भ महारोगी सेवा मंडळाची - श्री जगदंबा कुष्ट धाम "वसाहत, तपोवन.

अमरावती शहराच्या पूर्वेला, शहरापासून केवळ सहा किलो मिटर अंतरावर, मासोद गट ग्रामपंचायतीचे अंतर्गत येणारे म्हसला हे एक ओसाड गांव या गांवाचे पुनर्वसन होऊन तेथे एक मानवसेवेला वाहिलेली टुमदार वसाहत झाली आहे. हा चमत्कार घडविणारे मानवतेचे पुजारी, त्यांची संस्था, कार्य आणि वसाहत या सर्वांचा संक्षिप्त स्वरुपात हा परिचय.

१९४२ च्या आंदोलनातील स्वातंत्र्य संग्राम सैनिकांची सुटका १९४४-४५ मध्ये झाली. अमरावतीचे दे.भ.डॉ.शिवाजीराव पटवर्धन आणि दे.भ.डॉ.भोजराज हे डॉक्टरव्दय १९४५ साली कारागृहातून बाहेर आले. अमरावतीच्या जनतेने आपल्या ह्या लाडक्या नेत्यांचे देवदुर्लभ असे स्वागत केले. याच सुमारास भारत सरकारने विदर्भ विभागातील कुष्ट रोग्यांच्या पहाणीचा (सर्वेक्षणाचा) एक अहवाल प्रसिध्द केला होता. त्यांत विदर्भात आणि त्यांतही खुद्द अमरावती जिल्ह्यात कुष्ट रोगाचे प्रमाण फार मोठे आहे असे म्हटले होते. सार्वजनिक आरोग्याचे दृष्टीने ह्या अहवालाचा निष्कर्ष मोठा

चिंताजनक होता. आणि समाज सेवकांना ते एक आव्हानही होते. दे.भ.डॉ.शिवाजीराव पटवर्धन आणि दे.भ.डॉ.भोजराज व्दयांनी हे आव्हान स्वीकारण्याचे ठरविले. आणि कुष्ट रोग्यांची सेवा आणि विदर्भातून कुष्ठ रोगाचे निर्मूलन हे ध्येय ठरवून इ.स. १९४६ साली त्यांनी "विदर्भ महारोगी सेवा मंडळ" या संस्थेची स्थापना केली.

संस्था जन्माला आली. पण हे काम सोपे थोडेच होते ? त्यासाठी जागा, पैसे, कार्यकर्ते अशा अनेक अडचणी समोर होत्या. पण निर्धाराने या अडचणीवर मात करुन हा प्रकल्प आखला गेला.

वर उल्लेख केल्याप्रमाणे अमरावतीच्या पूर्वेला सहा कि.मी. अंतरावरील "म्हसला" या ओसाड गावची ८० एकर जमीन अमरावतीचे दानशूर नागरिक श्रीमंत लाला जुगलकिशोर जोधालाल यांनी या कार्यासाठी संस्थेला दान दिली. संस्थेने त्या गांवाचे तपोवन हे समर्पक नांव ठेवून तेथे संस्थेतर्फे "श्री जगदंबा कुष्टधाम" या टुमदार वसाहतीचे निर्मितीस आणि त्या सोबतच कुष्ट रोग्यांचे सेवेस १९५० साली सुरुवात केली.

गेली सुमारे ५० वर्षे येथे कुष्ट रोग्यांच्या सेवेचे महान कार्य चालू आहे. पद्मश्री डॉ.शिवाजीराव पटवर्धन, त्यांच्या पत्नी सौ.पार्वतीबाई पटवर्धन आणि त्यांच्या कन्या श्रीमती अनुताई भागवत या प्रमाणे या पटवर्धन घराण्याच्या दोन पिढ्या आपल्या अन्य सहकाऱ्यांसह या कुष्ट रोग्याचे सेवेसाठी खपल्या. एक उजाड गावाचे आज नंदनवन बनले आहे. जीवनातून हताश-निराश झालेले हजारो कुष्ट रोग्यांचे जीवनात या संस्थेने नवजीवनाचा संचार निर्माण केला आहे. शेकडो कुष्ठ रोगी या संस्थेच्या सेवेने रोग मुक्त होऊन नोकरीत लागले आहेत. समाजात मानाचे जीवन जगत आहेत. फार काय या रोगाने ग्रस्त झालेले पण जन्मठेपेची शिक्षा झालेले अनेक कैदी, या संस्थेच्या सेवेने माणसात आले आहेत.

प्रचार मोहीम -

या तपोवनाच निर्मितीचे आसमंतातील कुष्ठ रोग्यांच्या औषधोपचाराची सोय

झाली व तेथे सुरुवातीला रोज १२५ ते १५० रोगी, निदान व चिकित्सेसाठी येऊ लागले. रोग्यांच्या उपचारासाठी येणाऱ्या यासंख्येमुळे ह्या रोगाची भयानकता संस्थापकांच्या लक्षात आली. व याला आवर घालण्याचे दृष्टीने संस्थेने १९५१ साली ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांचे सहकार्य मिळविण्याचे दृष्टीने शिक्षक, पाटील, पटवारी, ग्रामीण समाज सेवक इत्यादी साठी तीन दिवसांचे एक शिबिर तपोवन येथे आयोजित केले. या शिबिरात कुष्ठरोगाबद्दलची सामान्य माहिती या कार्यकर्त्यांना देण्यात आली. त्यानंतर संस्थेतर्फे अशीच शिबिरे इतरत्रही भरविली. या शिवाय जनमानसातील या रोगा संबंधीची भीती व अज्ञान दूर करण्याचे दृष्टीने प्रचार पत्रके, भित्तीपत्रके, पुस्तिकावगैरे छापण्यात येऊन हे साहित्य विनामूल्य वाटण्यात आले.

कुष्ठ रोगाचे यथार्थ ज्ञान/माहिती देणारे पोस्टर्स, ग्राम पंचायती, शाळा व रुग्णालये यांतून लावण्यात आली. मोठ मोठी पत्रके तयार करुन ती आठवडी बाजार व इतर सार्वजनिक ठिकाणी लावण्यात आलीत. तसेच संस्थेतर्फे जीवन हे नियतकालिक यासाठी सुरु करण्यात आले ते गेली. ३८ वर्षे नियमित प्रसिध्द होत आहे. आकाशवाणी वरुनही मधून मधून व्याख्याने आयोजित करण्यात येवू लागली. त्याचप्रमाणे ''स्वप्न तेच लोचनी''. हा चित्रपट तयार करण्यात आला. या चित्रपटाच्या १६ मि.मि. निर्मिती व प्रचाराचे हक्क महाराष्ट्र शासनाने घेतले आहेत. अशा प्रकारे या संस्थेतर्फे या रोगाच्या उन्मूलनाचे दृष्टीने सर्व तऱ्हेने प्रचार तंत्रे अवलंबिण्यात आलीत. शिवाय संस्थेने आपले कार्यकर्ते पाठवून अमरावती व मोर्शी या दोन तालुक्यातून सर्वेक्षण करुन कुष्ठ रुग्ण हुडकून काढले, शाळातूनही रुग्णांची तपासणी केली.

प्रशिक्षण वर्ग -

संस्थेने वर उल्लेख केल्याप्रमाणे या कुष्ट रोगासंबंधी प्रचार मोहित सुरु केली. परंतु तेवढ्याने हे काम भागण्यासारखे नव्हते. कुष्ट रोगाची निश्चित संख्या किती ? हे कळावे म्हणून ग्रामीण भागातून सर्वेक्षणाची आवश्यकता होती. संस्थेने त्या दृष्टीने सरकारच्या सहकार्याने इ.स. १९५५ ते १९६३ या काळांत नऊ महिने मुदतीचे कुष्ट रोग प्रशिक्षण वर्ग चालविले. ह्या वर्गातून प्रशिक्षित झालेले ५५० तंत्रज्ञ आज महाराष्ट्र ,

गुजरात आणि मध्यप्रदेश या राज्यांतून काम करीत आहेत.

इ.स. १९६३ नंतर हा प्रशिक्षण वर्ग गोंदिया येथे हलविण्यात येऊन तो चालविण्याची संपूर्ण जबाबदारी राज्य शासनाने स्वीकारली.

धंदे शिक्षण -

कुष्ट रोग हा प्रामुख्याने मानसिक रोग आहे. याकरिता रुग्णांना कुठल्याना कुठल्या व्यवसायात गुंतवून ठेवणे आवश्यक असते. म्हणून शिवण काम, विणकाम, मुद्रण काम, सुतार काम, लोहारकाम, चर्मकला, कुक्कुट पालन, शेती, बगीचा वगैरे सारखे उद्योग सुरु करण्यात आलेत. यांतून रुग्णांना अर्थोत्पादन करण्याची संधी मिळू लागली आणि संस्थेचाही लाभ होवू लागला. या प्रयत्नातून अनेक कुशल कारागीर तयार झाले.

आज संस्थेतून तयार झालेले सुतार २६, विणकर १५० शि.पी. ३५, प्रिंटर्स १८, बागवान ३०, मोटार व टॅक्टर ड्रायव्हर्स १८, कंपोझीटर्स ७०, वेल्डर्स ४, आणि विजतंत्री १६, हे कुशल कारागीर बाहेर आपली उपजीविका करीत आहेत.

कुष्ट बंदी -

खुना सारख्या आरोपावरुन जन्मठेपेची शिक्षा झालेले कुष्टबंद्यांना, महाराष्ट्र शासनाच्या विनंतीनुसार औषधोपचार व पुनर्वसनासाठी या संस्थेच्या जगदंबा कुष्ट निवासात प्रवेश देण्यात येऊ लागला. इ.स. १९५८ ते १९७४ या काळात असे २५० लोक येथे दाखल करुन घेण्यात आलेत आणि संस्थेच्या सेवेने रोगमुक्त होऊन मुदतीपूर्वीच त्यांची सुटका झाली व आज हे लोक आपापल्या गांवी शेती किंवा इतर व्यवसाय करुन सामान्य जीवन जगत आहेत. पत्रव्यवहाराव्दारे या लोकांचा संस्थेशी संबंध टिकविला जातो.

रुग्णालय -

दोनशे खाटांचे सुसज्ज रुग्णालय हल्ली येथे चालविण्यात येते. येथे सर्व सामान्य

सर्व प्रकारची शल्यक्रिया केली जाते. तसेंच रुग्णांच्या हात, पाय, डोळे वगैरेच्या विकृती रिकन्स्ट्रक्टीव्ह सर्जरीने केल्या जातात. दोन डॉक्टर्स, अठरा परिचारिका, बारा पुरुष परिचारक, तीन मिक्षक, तीन जिओथेरॅपी व लेबॉरेटरी टेक्नीशियन्स, आठ वार्ड बॉईज वगैरेंचा ताफा या रुग्णालयाची जबाबदारी सांभाळीत आहे. हे सर्व कर्मचारी तपोवन, च्या परिसरातच राहातात. याशिवाय शहरातील चर्मरोग तंत्रज्ञ, बालरोग तंत्रज्ञ, नेत्ररोग तत्रज्ञ, स्त्री रोग तंत्रज्ञ, दंत रोग तंत्रज्ञ, नाक, कान, घरा तज्ञ वगैरे डॉक्टर आठवड्यांतून एक दिवस आपली बिना मूल्य सेवा येथे उपलब्ध करुन देतात. गरजू रुग्णासाठी कृत्रिम अवयव विभागात पायहि तयार करण्यात येतात.

शिक्षण विभाग -

जगदंबा कुष्टनिवासांत उपचारासाठी येणाऱ्या कुष्ट पिडीत विद्यार्थ्यांसाठी १९५४ साली येथे प्राथमिक शाळा सुरु करण्यात आली होती. परंतु आज या विभागाचा विकास होऊन येथे स्वतंत्र हायस्कूल चालविण्यात येते. बालवाडी पासून तो मॅट्रीक पर्यतच्या शिक्षणाची सोय येथे करण्यात आली आहे.

बौध्दिक शिक्षणाबरोबरच व्यावसायिक शिक्षणहि येथे दिले जाते आणि "कमवा व शिका" या तत्वाला प्रोत्साहन दिले जाते. विद्यार्थी फायदा घेतात इ.स. १९६६ पासून येथील विद्यार्थी, शालांन्त परिक्षेचा निकाल ८० ते १०० लावतात. याप्रमाणे कुष्ट पीडित विद्यार्थ्याच्या ज्ञानदानाचे कार्यहि येथे अविरत सुरु आहे.

वृध्द व मरणोन्मुख विभाग -

वृध्द, विकलांग, व मरणोन्मुख कुष्ट रुग्णांचे शेवटचे जीवन सुखाचे जावे म्हणून हा विभाग येथे उघडण्यात आला असून आज २३५ रुग्ण मानसिक समाधानात ईश्वरी आदेशाची वाट पाहात जीवन कंठीत आहेत. जीवनाचे अखेरचे दिवस तरी, शेवटचा क्षण तरी सुखा समाधानात जावा या आशेने गरजू रुग्ण प्रवेशासाठी येतात अथवा पाठविल्या जातात. अशा लोकांसाठीच संस्थेने या निवासात हा विभाग उघडला आहे.

कोर्ट कमिटेड मुले -

झोपडपट्ट्यांतून राहाणाऱ्या व भिक्षावृत्ती किंवा अवैध मार्गाने जीवन जगणाऱ्या कुष्ठरुग्णांना आपली मुले संस्कारीत व्हावीत व त्यांना आपल्याप्रमाणे हीन जीवन घालवावे लागू नये असे वाटते. म्हणून, मुंबई मुलांच्या कायद्याखाली कोर्टामार्फत ते आपल्या मुलांना या संस्थेत पाठवितात. अशा मुलांना औषधोपचारा बरोबरच शालेय व औद्योगिक शिक्षण दिले जाते. होतकरु मुलांना औद्योगिक प्रशिक्षण संस्था किंवा तत्सम इतर संस्थातून उच्च शिक्षणासाठी पाठविण्यात येते. सैन्यात व पोलीसमध्ये आज असे अकरा विद्यार्थी भरती झाले आहेत.

अनाथ बालके -

अनैतिक संबंधातून जन्मास आलेल्या बालकांचे मानवतेच्या दृष्टीने संगोपन करण्यासाठी खास संगोपन गृह निवासात काढण्यात आले आहे, अशा मुलांतून काही लोक स्वेच्छेने पालकत्व स्वीकारुन त्यांच्या पसंतीची मुले नेतात त्यांचे स्वत:चे मुलाप्रमाणे पालन पोषण करतात. पुनर्वसन - कुष्ट निर्मूलन कार्यात पुनर्वसनाला अतिशय महत्व आहे. किंबहूना पुनर्वसन हाच कुष्ट निर्मूलना वरील प्रभावी उपाय होय'' असा संस्थेच्या संस्थापकांचा विश्वास आहे. या दृष्टीने जीवनापयोगी धंदे शिक्षण देऊन रोग मुक्त व्यक्तींना समाजात परत पाठविण्याचा प्रयत्न होता. परंतु शारीरिक व्यंगत्वामुळे ज्यांना परत जाणे प्रशस्त वाटत नाही त्याच्यासाठी संस्थेतच व्यवसाय दिल्या जातो. अशा चारशे कुटुंबाना हातमाग, यंत्रमाग, शिवणकाम, सुतार काम, लोहार काम, मुद्रणालय व सतरंजी काम यांत सामावून घेतले आहे. या लोकांसाठी ''पांडूरंग वाडी'' ही वसाहत येथेच स्थापन केली असून, तेथे त्यांची नैतिक पातळी उंचावण्याचे दृष्टीने अनेक विव्दानांची प्रवचने व व्याख्याने इत्यादीव्दारे प्रयत्न केले जातात. सकाळ-संध्याकाळ प्रार्थना होते. तव्दतच धार्मिक व ऐतिहासिक उत्सवही साजरे केले जातात.

नैतिक शिक्षण -

चारित्र्य संपन्न नागरिक तयार करण्याच्या दृष्टीने शिक्षण दिल्या जाते. रोग मुक्त

स्त्री-पुरुषांना संतति प्रतिबंधक शस्त्रक्रिया करवून घेऊन वैवाहिक जीवन घालविण्यास परवानगी दिली जाते. अशा प्रकारचा पहिला विवाह १९५१ साली अमरावतीतील डॉ.जोशी सभागृहांत कै.कविभूषण ब.ग.(अण्णासाहेब खापर्डे यांच्या उपस्थितीत) समारंभ पूर्वक लावण्यात आला होता. तेव्हापासूनच कुष्ट रुग्णांच्या विवाहाची प्रथा सुरु झाली व शेकडो कुष्ट रुग्ण संयमित व जबाबदारीने जीवन घालवू लागले आहेत. सांस्कृतिक कार्यक्रमाव्दारे अशा लोकांना वैयक्तिक व आर्थिक विकासाची संधी दिली जाते.

कुष्ठ समस्येबाबत दूरगामी विचार करुन संस्थेने सुरुवातीपासूनच खालील पांच विभागानुसार कार्य करण्याचे धोरण स्वीकारले होते व आजही याच धोरणाने काम चालू आहे.

१. चिकित्सा विभाग, २. वृध्द व मरणोन्मुख विभाग, ३. प्रशिक्षण व उत्पादन विभाग,४. बौध्दिक शिक्षण विभाग व ५. पुनर्वसन विभाग.

संस्थेशी पुढील योजना म्हणजे पोहरा (ता.जि.अमरावती) येथे कुष्ट मुक्त दहा कुटूंबाचे पुनर्वसन करुन त्यांना तेथे हातमाग बसवून देणे ही आहे.

करणाव्रतीचा प्रचार -

संस्थेतर्फे आंखालेल्या या योजनेव्दारे व्रत धारकाने आपल्या वयाच्या दिवसा इतके पैसे (उदाहरणार्थ - ७० वर्षे X ३६५ दिवस = २५५.५०) देवून या योजनेचे सदस्यत्व स्वीकारावे. हे व्रत स्वीकारणाराने आवश्यक नियमांचे पालन करावे अशी अपेक्षा आहे.

सहकार्य -

संस्थेत तयार होणारे बँडेज व गॉजचे कापड, चादरी, लांकडी व लोखंडी फर्निचर खरेदी करुन, तसेच छपाईची कामे मधून मधून देऊन शासनातर्फे सहकार्य दिले जाते.

तसेच सहृदय हितचंतकाडूनहि धान्य अथवा वस्तू रुपाने सहाकार्य

मिळते. तसेच राज्य व केंन्द्र शासनाकडून अनुदान मिळते. कुष्ट निर्मुलन ही सर्वाची-जबाबदारी - कुष्ट निर्मुलन ही देशातील प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. ह्या गोष्टीची जाणीव समाजाला सतत होत राहावी या उद्देशाने ''मंगल कलश'' योजना संस्थेतर्फे प्रसारित करण्यात आली आहे.'' प्रत्येकाने दररोज एक पैसा किंवा जास्तीत जास्त पांच पैसे या कलशात टाकावेत आणि वर्ष प्रतिपदेला किंवा दीपावलीचे सुमुहुर्तावर कलशात जमा झालेला निधि संस्थेकडे आणून द्यावा'' असे संस्थेने आवाहन केले आहे. या योजनेस चांगला प्रतिसाद मिळतो.

श्री.जगदंबा कुष्ट निवासात खालील श्रेणीतील कुष्ट रुग्णांना प्रवेश दिल्या जातो.

१. सामान्य रुग्ण (स्वेच्छेने येणारे)

२. शासकीय रुग्ण (दंडाधिकाऱ्यामार्फत येणारे)

३. वृध्द व मरणोन्मुख रुग्ण.

४. कुष्ट बंद (कारागृहामार्फत येणारे)

५. रेडक्रॉस रुग्ण (रेडक्रॉस संस्थेमार्फत येणारे माजी सैनिक)

६. कोर्ट कमिटेड मुले/मुली (मुंबई मुलांच्या कायद्याखाली पाठविले जाणारे)

७. अनाथ व भटकी मुंले.

८. व्यावसायिक पुनर्वसनासाठी प्रशिक्षण घेऊ इच्छिणारे.

९. अनैतिक संबंधामुळे नको असलेली बालकें.

१०. निरनिराळ्या कृष्ट संस्थामार्फत, प्रत्यक्षनुभवाकरीता येणारे.

कुष्ट निर्मूलन हा समाजाच्या जिव्हाळ्याचा व हिताचा प्रश्न असल्याने प्रत्येकाने या कामी यथाशक्ति मदत देणे व रोगमुक्तांना समाजात प्रतिष्ठेचे व स्वाभिमानी जीवन जगण्यास संधी देणे, त्यासाठी हस्ते परहस्ते मदत करणे हे प्रत्येक नागरिकांचे परम कर्तव्यच आहे.

आणि हे तत्व पटवून देण्याचा प्रयत्न विदर्भ महारोगी सेवा मंडळ सतत करीत राहाणार आहे. तसा मंडळाचा संकल्प च आहे.

अमरावती शहराच्या पूर्वेकडे जाणारा मुख्य मार्ग म्हणजे जिल्हा सामान्य रुग्णालयाचे चौकातून हा मार्ग थेट कलेक्टर कचेरीवरुन सरळ मासोद या ग्रामीण भागाकडे जातो. याच मार्गावर केवळ सहा कि.मी. अंतरावर डाव्या हाताला ''तपोवन'' च्या जगदंबा कुष्ट निवास'' या वसाहतीत जाणारा, वृक्षराजींनी आच्छादिलेला मार्ग आहे. सुरुवातीलाच एक भव्य कमान उभी असून त्यावर.'' सत्यम् शिवम् सुंदरम्''.

ही अक्षरे आहेत या कमानीतून पुढे गेल्यावर कुष्ट निवास ''ही टुमदार बाग - बगिच्यानी सुशोभित अशी वसाहत लागते. स्वागत कमानीवर ''वसती ज्या ठायी दीन दु:खी आर्त। विराजती तेथ चरण तुझे॥''

हा अभंग लिहिला आहे. कै.गोपाल कृष्ण गोखले, कै.लोकमान्य टिळक, महात्मा पं. मदन मोहन मालवीय, स्वामी विवेकानंद, रवींद्रनाथ टागोर, म.गांधी, स्वा.सावरकर, नेताजी सुभाषचंद्र बोस, डॉ.शिवाजीराव पटवर्धन यांचे पुतळे आहेत. दवाखान्याला महर्षि शलय चिकित्सा भवन असे नाव आहे. तेथे अनेक निवास स्थाने, उद्योग धंद्याची केन्द्रे व प्रशिक्षण केंन्द्रे, शाळांच्या इमारती वगैरे आहेत. ''तपोवन'' च्या पार्श्वभागी असलेल्या एक उंच टेकडीवर ''तपोवन'' हा पांढरी अक्षरे दुरुनच दिसतात.

विदर्भ महारोगी सेवा मंडळ निर्मित संचालित ''श्री जगदंबा कुष्ट निवास'' या वसाहतीचा हा संक्षिप्त परिचय.

स्वातंत्र्यपूर्व काळात देश गुलामीतून मुक्त व्हावा म्हणून डॉ.शिवाजीराव पटवर्धन आणि त्यांच्या पत्नी सौ.पार्वतीबाई पटवर्धन यांनी अनेक कष्ट केले व कारावास भोगला. स्वातंत्र्योत्तर काळात त्यांनी या महारोग उन्मूलानाचे कार्यासाठी आपले जीवन वाहिले आहे. सत्तेऐवजी सेवा - मानवतेची सेवा - हे ध्येय त्यांनी आपल्या दृष्टीसमोर ठेवून विदर्भ महारोगी सेवा मंडळाचे नेतृत्व स्वीकारुन ही अखंड जबाबदारी पार पाडली आहे. त्यांच्या कन्या श्रीमती अनुताई भागवत ह्या या कार्यात मोलाचा वाटा उचलीत आहेत.

अमरावतीला भेट देणारे थोर पाहुणे या जगदंबा कुष्ट निवासाला भेट दिल्या शिवाय राहत नाहीत. अमरावती करांना ही संस्था म्हणजे या नगरीच्या सेवेचे परंपरेतील एक परमोच्च मानाचा तुरा वाटतो.

अमरावती शहरातील ज्या कांही मोजक्या संस्थाचे कार्य या शहरात येणाऱ्या पाहुण्यांना पहावेसे वाटते त्यांत "विदर्भ महारोगी सेवा मंडळाची जगदंबा कुष्ट धाम वासाहत प्रमुख आहे.

"विदर्भ महारोगी सेवा मंडळ" हे अहवालाचे आधारे.

दि. २६.७.१९८४ रोजी सौ.पार्वतीबाई पटवर्धन, व दि. ७ मे १९८६ रोजी श्री.शिवाजीराव पटवर्धन यांचा देहांत झाला.

परिशिष्ट ९ ब

श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, अमरावती ह्या संस्थेने राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या लढ्यांत केलेल्या कार्याचा संक्षिप्त परिचय . . .

श्री.अनंत कृष्ण व अंबादास कृष्ण ह्या वैद्य बंधूनही १९१४ साली हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाची मूळ स्थापना केली. ह्या बंधूनी लहानपणी अमरावतीत कीर्तनांत चापेकर बंधूंना पत्र दिलेले होते. पुण्यात चापेकर बंधूनही स्थापन केलेल्या क्लबच्या गोष्टी त्यांनी कर्णोपकर्णी ऐकल्या होत्या. त्यांचे मूळ स्फूर्तिस्थान विदर्भाचे सुविख्यात राष्ट्रभक्त कै.वीर वामनराव जोशी हे होते. कै.दादासाहेब खापर्डे, वीर वामनराव जोशी इ. राष्ट्रीय पुढाऱ्यांच्या मदतीने कै.दामोदर बळवंत भिडे उर्फ भिडे गुरुजी यांनी अमरावतीत जो आखाडा चालविला होता त्याचाही वैद्य बंधूंच्या मनावर चांगलाच परिणाम झालेला होता. विशेषत: भिडे गुरुजींच्या भूमिगत जीवनाच्या दंतकथांचा व त्यांच्या देशभक्तिपरायण वागणुकीचा त्यांच्यावर प्रभाव पडला. हे सर्व संस्कार परोक्षापरोक्ष होते व त्यामुळे त्यांची घडण बनत होती. ते आरंभी येथील कै.तुकाराम वस्ताद यांच्या आखाड्यांत जात होते. कै.तुकाराम वस्ताद यांचीही येथील क्रांतिकारी राष्ट्रीय व लोकमान्य टिळकांचे अनुयायी असलेल्या पुढारी मंडळीबरोबर बरीच घनिष्टता

होती. तुकारामजींचे व्यक्तित्व सुध्दा फार प्रभावी होते. त्यांचेही संस्कार वैद्य बंधूंच्या सुप्त मनावर बरेच झाले.

काही काळ तुकारामजीच्या आखाड्यांत घालविल्यावर वैद्य बंधूच्या मनांत सुशिक्षित तरुण मंडळीसाठी वेगळी संस्था स्थापन करण्याची कल्पना मूळ धरु लागली. लक्ष्मीनारायणाच्या मंदिराजवळ हैद्राबाचे राजा बिशनचंद यांच्या भव्य हवेलीत जी नंबर एकची म्यु.प्राथमिक शाळा असे तिच्यावर त्यांचे वडील कै.कृष्णराव वैद्य हेडमास्तर असत. ह्या शाळेतच वडिलांच्या चोरुन वैद्य बंधूंनी १९१४ साली आपल्या बारा सवंगड्यासह हनुमान क्लबची स्थापना केली. वस्तुत: ही चौदा तरुणमंडळी वर्षदीड वर्ष आधीपासूनच आपला अड्डाजमवून ह्या शाळेत कसरत करु लागली होती. त्यामुळे तसे पाहिले तर १९१२-१३ सालांतच त्यांनी आपल्या वेगळ्या संस्थेचे बीजारोपण केले होते. १९१४ साली हनुमान जयंतीच्या सुमुहूर्तावर हनुमान क्लबची स्थापना करुन तुकाराम वस्तादचा आखाडा त्यांनी सोडला.

आरंभी तीन वर्ष त्यांनी हनुमान क्लब फार गुप्त रीतीने चालविला. निवडक व अत्यंत विश्वासाच्या तरुण मंडळीस त्यांत प्रवेश मिळत असे. १९१७-१८ पर्यंत क्लबच्या सदस्यांची संख्या १५० च्यावर गेली होती. राष्ट्रीय वाङ्मयाचे वाचन, व वादविवाद, सभोवारच्या जंगलांत, पहाडात सहली करणे, गावांतील गुंडगिरीवर नजर ठेवणे, आणि कै.वीर वामनराव प्रभृतिराष्ट्रीय पुढाऱ्यांचा उपदेश श्रवण करणे, असा त्यांचा कार्यक्रम होता. दंडबैठकी, कुस्ती, गदगाफरी, लाठी, काठी, बोथाटी, इ. विषयांत ही मंडळी निपुण बनली होती. ही सर्व मध्यमवर्गीय सुशिक्षित मंडळी शरीर संपत्तीने भरदार होतांना पाहून पोलिसांची निगराणीही त्यांच्यावर सुरु झाली होती. १९१८ पर्यत राष्ट्रीय वातावरण बरेच निवळले होते. एवढ्या मोठ्या संख्येची संस्थाही गुप्त राहणे शक्य नव्हते. म्हणून १९१८ साली हनुमान क्लबचे हनुमान व्यायाम शाळा हे नामांतर हे करुन संस्था उघड करण्यात आली. त्याच वर्षी अमरावतीत झालेल्या इंन्फ्ल्यूझाच्या साथीत डॉ.पटवर्धन यांच्या बरोबर संस्थेने जनसेवेचे चांगलेच काम करुन दाखविले आणि त्याच वर्षी अमरावतीत सेवासमिती तर्फे भरलेल्या सामन्यांत ह्या संस्थेच्या

तरुणांनी चांगला लौकिक मिळविला. या दोन घटनांच्यामुळे तिच्याकडे सर्वांचेच लक्ष एकदम आकृष्ट झाले.

१९२० साली हनुमान व्यायाम शाळेत सुमारे २५० तरुण विद्यार्थी शिक्षण घेत होते. त्या सर्वांनी म.गांधीच्या नेतृत्वाखाली सुरु झालेल्या असहकारितेच्या चळवळीत सरकारी शिक्षणावर बहिष्कार घालून राष्ट्रीय शाळेत प्रवेश घेतला. श्री.अंबादासपंत वैद्य हे राष्ट्रीय शाळेत शिक्षक झाले. सुमारे चार वर्षे म्हणजे १९२४ पर्यत हनुमान व्यायाम शाळा व राष्ट्रीय शाळा ह्या प्राय: एकरुप होत्या. पुढे राष्ट्रीय शाळा बंद झाली. हनुमान व्यायाम शाळेचे हनुमान व्यायाम प्रसारक मंडळात नामांतर झाले व ते स्वतंत्रपणे विकास पावू लागले. १९२० ते १९२४ च्या दरम्यान ह्या संस्थेतून जी पिढीबाहेर पडली तिच्यातून राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळीला सर्वस्व अर्पण करणारे बरेच कार्यकर्ते निघाले व त्यामुळे तत्कालीन ब्रि. अधिकाऱ्यांचा दृष्टीकोन तिच्याविषयी बराच दूषित झाला.

ह्यानंतर अमरावतीत युवक कॉंग्रेसची स्थापना करुन विदर्भ युवक परिषदांची अधिवेशने भरविण्यांत पुढाकार घेणारे व कॉंग्रेसच्याहि कार्यात उत्तरोत्तर अधिकाधिक समरस होणारे कार्यकर्ते ह.व्या.प्र.मंडळातून एका बाजूने पुरविले जाऊ लागले. तसे दुसऱ्या बाजूने मंडळातील काही तरुण क्रांतीकारकांच्या मार्गाने जाऊ लागले. १९३० च्या कॉंग्रेसच्या कायदेभंगाच्या आंदोलनात मंडळातील कार्यकर्त्यांनी विदर्भात सत्याग्रह केला. व १९३२ च्या आंदोलनांत मंडळातील ५० हून अधिक पदाधिकाऱ्यांनी व सदस्यांनी तुरुगांच्या शिक्षा भोगल्या आहेत. क्रांतीकारी मार्गात गेलेल्या तरुणांपैकी काही बचावले. पण शिवराम राजगुरु यांचे मंडळातील शिक्षण आटोपल्यानंतर त्यांना बनारस येथे व्यायाम प्रसारार्थ पाठविले असतांना ते तिकडे भगतसिंगाच्या बरोबर लाहोर कटात सामील झाले व शेवटी फासावर चढून शहीद बनले.

मंडळाचे एक कार्यकर्ते नोव्हेंबर यांना जर्मनीत शा.शि.उच्च अध्ययनासाठी पाठविण्यात आले होते. ते १९२९ ते असहकारवादीच होते व पुढे

साबरमतीस गांधीजींच्या आश्रमांतही ते चार वर्षे राहिले होते. जर्मनीहून परत येतांना हिंदी क्रांतिकारकाचे कार्य करण्यासाठी त्यांनी काही रक्कम गुप्तपणे आणली. मार्गाहून ही गोष्टी सरकारी अधिकाऱ्यांस कळली. पण ते काही उपाय करु शकले नाहीत. मंडळाचे दुसरे सदस्य ज्ञानेश्वर देशपांडे यांना मंडळाने जपानात पाठविले होते. ते तिकडे रासबिहारी बोस यांच्या क्रांतिकारी पक्षात सामील झाले. १९४२ साली ते नेताजी सुभाषचंद्र बोस ह्यांना साह्य करु लागले. नेताजींनी पुकारलेल्या स्वातंत्र्ययुध्दांतच त्यांचा अंत झाला.

सन १९२८ ते ३४-३५ पर्यत मंडळातील कार्यकर्त्यांची ही सर्व कामगिरी ब्रिटीश अधिकाऱ्यांच्या डोळ्यांत चांगलीच सलू लागली व त्यामुळे त्यांनी ती संस्था काळ्या यादीत समाविष्ट केली. मंडळाचे आद्य संस्थापक वैद्य बंधू हे प्रथम पासूनच कट्टर राष्ट्रीय वृत्तीचे असल्याने बाह्यत: जरी मंडळाच्या चार भिंतीच्या आत शा.शि.शिवाय दुसरे कोणतेही कार्य ते होऊ देत नसत. तरी मंडळातील तरुण कार्यकर्त्यांना राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या आंदोलनाशी समरस होण्याची स्फूर्ती व उत्तेजनही वैद्य बंधू कडून सारखी मिळतच राहिली. शा.शि.ची चळवळ राष्ट्रीय पुनरुध्दाराच्या व स्वातंत्र्याच्या चळवळीचेच एक अंग होय असे त्यांचे म्हणणे असे. ह्या दृष्टीने शा.शि.राष्ट्रीय पुनरुध्दाराशी तादात्म्य प्रस्थापित करण्याचेही प्रयत्न ह.व्या.प्र.मंडळाने बुध्दिपूर्वक केलेले आहेत आणि ह्या कार्यात डॉ.शिवाजीराव पटवर्धनासारखे राष्ट्रीय वृत्तीचे अध्यक्ष मंडळाला लाभल्या मुळे अधिक चांगले यश मंडळाला मिळाले. त्यादृष्टीने म. गांधी यांनी १९२६ व १९३३ साली मंडळाला दोन वेळा दिलेली भेट व मंडळांत केलेली भाषणे फार महत्वाची असून त्यावरुन त्या संस्थेच्याकडे पाहण्यात गांधीजींचा दृष्टीकोन सहृदयत्वाचा होता याची स्पष्ट कल्पना येवू शकते. गांधीजी प्रमाणेच पं.मोतीलालजी नेहरु, लाला लजपतराय, तात्यासाहेब केळकर, व बॅ.जयकर, नेताजी सुभाषचंद्रबोस व डॉ.राजेंद्र प्रसाद यांनीही मंडळाला भेटी देऊन भाषणे केली व त्यांतून व्यायाम चळवळ ही राष्ट्रीय पुनरुध्दाराच्या आंदोलनाचाच एक भाग आहे ही गोष्ट प्रस्थापित झाली. ह्या शिवाय मंडळाच्या दोनदोनशे तरुणांनी देशाच्या निरनिराळ्या

भागांत सफरी करुन जी निदर्शने दिली. त्या प्रसंगी सरदार वल्लभभाई पटेल, देवि सरोजिनी नायडू, दादासाहेब मावळणकर इ. पुढाऱ्यांनी अध्यक्षपद स्वीकारुन व भाषणे करुन त्याच कल्पनेला पुष्टि प्राप्त करुन दिली.

डॉ.हर्डीकरांच्या हिंदुस्थानी सेनादलाशी मंडळांचे संबंध १९२७-२८ पासूनच फार निकटचे राहिले. हि.से.दलाचे तरुण कार्यकर्ते दरसाल मंडळाच्या उन्हाळ्याच्या वर्गात येऊन शिक्षण घेऊ लागले. १९३० साली मुंबईत बोरिवली येथे हि.से. दलाचे जे अखिल भारतीय शिबिर भरविण्यात आले होते त्याला संचालनात सह्योग देण्यासाठी डॉ.हर्डीकरांच्या मागणीवरुन मंडळाचे तीन कार्यकर्ते मुद्दाम बोरिवलीत एक महिन्यासाठी पाठविण्यांत आले होते. मुंबईत काँग्रेसचा सुवर्णमहोत्सव साजरा झाला त्याप्रसंगी मंडळाच्या २०० खेळाडूंची निदर्शने मुंबईत दोन दिवस संघटित करण्यात आली होती. कलकत्ता काँग्रेस १९२८, फैजपूर काँग्रेस १९३६, त्रिपुरी काँग्रेस १९३९, जयपुर काँग्रेस १९४६ इंदोर काँग्रेस १९५७ व नागपूर काँग्रेस १९५८ इतक्या प्रसंगी अधिकृत निमंत्रणावरुन मंडळाच्या तरुणांची निदर्शन संघटित करण्यांत आली. त्रिपुरी काँग्रेसच्या ३००० स्वयंसेवकांच्या संघटनेची शिक्षणाची व प्रंबधाची जबाबदारी सर्वेसर्वा मंडळाच्या कार्यकर्त्यावर सोपविण्यात आलेली होती. अशा रीतीने काँग्रेसच्या माध्यमांतून चालणारी राष्ट्रीय स्वातंत्र्याची चळवळ व मंडळाने चालविलेले व्यायाम कार्य यांना एकजीनसीपणा प्रस्थापित झालेला होता.

१९२१ पासून १९४२ पर्यत विदर्भातील अनेक राष्ट्रीय संस्थेत मंडळाच्या कार्यकर्त्यांनी पदाधिकारांची कामे केलेली आहेत. १९४२ च्या आंदोलनांत पुन: मंडळातील ६०/७० कार्यकर्त्यांनी निरनिराळ्या प्रकारे भाग घेतलेला आहे. त्या आंदोलनांतल्या कित्येक भूमिगत कार्यकर्त्यांचे मंडळ व वैद्य बंधू विशेषत: अंबादासपंत वैद्य हे आश्रय स्थान बनलेले होते. ह्याही खेपेस मंडळांतील अनेक कार्यकर्त्यांनी तुरुंगवास भोगला. भूमीगत कार्यकर्त्यांना संरक्षण करणे, कोर्टातील खटले चालविण्यांत मदत करणे व आंदोलनाचा प्रचार इ. अनेक कामांत मंडळाचे कार्यकर्ते समरस झालेले होते. १९२० पासून १९४६ पर्यत मंडळाच्या कार्यकर्त्यांनी राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या आंदोलनांत

केलेल्या कार्याचा व्यक्तीश: इतिहास देतो म्हटले तरी शेकडो पृष्ठांचा ग्रंथ होईल. तो या ठिकाणी स्थलाभावास्तव देणे अर्थातच शक्य नाही, तथापि मंडळाच्या ह्या कामगिरीची जाणीव असल्यामुळे माजी मध्यप्रदेश सरकारने प्रसिध्द केलेल्या मध्यप्रदेश च्या स्वातंत्र्य इतिहास ग्रंथात मंडळाच्या ह्या कार्याविषयी जे उदगार काढण्यात आले आहेत ते प्रस्तुत ठिकाणी उध्दत करणे आवश्यक आहे ह्या ग्रंथात म्हटले आहे की,

"Among other organisations that took part in the movement was the Hanuman Vyayam Mandal at Amravati. The training classes conducted by the Mandal were attended by young men from neighbouring provinces, and they were well trained in drill, rifle-practice & physical culture. During the 1942 movement several members of this organisation were arrested for sabotage in Bombay province ".

मंडळाच्या राष्ट्रीय कामगिरीचा हा वर दिलेला वृत्तात अत्यंत संक्षिप्त आहे. मंडळाची ही उपयुक्तता जाणूनच लोकनायक डॉ.माधव श्रीहरी अणे, व कै.वीर वामनराव जोशी यांच्या सारख्या विदर्भातील राष्ट्रीय पुढाऱ्यांनी संस्थेला प्रत्येक बाबतीत मन:पूर्वक सहाय्य केलेले आहे. वामनराव जोशी यांच्या पासून स्वत: राष्ट्रीयत्वाची स्फूर्ती घेवुन मंडळाचे आद्य संस्थापक वैद्य बंधू व आरंभीचे अध्यक्ष डॉ.पटवर्धन व इतर कार्यकर्ते यांनी गेल्या ४५ वर्षात ह.व्या.प्र. मंडळात शिक्षण घेतलेल्या सहस्त्रावधी तरुणांना राष्ट्रीयत्वाची स्फूर्ती देऊन विदर्भाचे राष्ट्रीय जीवन समृध्द केले आहे.

(प्रधान कार्यवाह, ह.व्या.प्र.मंडळ, अमरावती. ह्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे साभार.)

परिशिष्ट ९ क

श्री जुगलकिशोर व्यायाम शाळा

इ.स. १९३० चे सुमारास छत्रपुरी बालाजी मंदीराचे आवारात ही व्यायाम शाळा सुरु करण्यात आली होती. परंतु नंतर ती सन १९३२-३३ चे सुमारास, काळाराम मंदीरा (सक्करसाथ) जवळील श्रीनारायण रामबिलास गणेडीवाल यांची जागा भाड्याने घेऊन तेथे आणण्यात आली व पुढे ही जागा संस्थेने रु. ४०००/- ला विकतच घेतली व तेथे इमारत बांधली. या संस्थेचे सुरुवातीपासून अध्यक्ष- श्री. जगन्नाथजी मालपाणी हे होते आणि वस्ताद श्री.गोविंदराव फुले हे कुस्ती व काठी शिकवीत तसेच या आखाड्याचे वस्ताद होते म्हणून लोक या व्यायाम शाळेला फुल्यांचा आखाडा असेही म्हणत असत. श्री बंडाप्पा हेही या संस्थेची व्यवस्था पाहात असत.

या व्यायाम शाळेचे उत्तम कुस्तीगीर म्हणून श्री.जनार्दनपंत बिंड, श्री.कविमंडन, श्री.बळिरामभाऊ सोनार, श्री.बळीरामजी हांडे, श्री.सितलप्रसाद, श्री.उत्तमराव आणि तुळशीराम उर्फ इलायची हे होते. श्री.बापट या नांवाचे एक तरुण मसल्स व बॉडि बिल्डिंगमध्ये नांवाजले होते.

सुरीचे काम या व्यायाम शाळेतील श्री.नारायण स्वामी हे तरुण सुरा फेकीचे अचूक निशाणबाजीचे काम उत्कृष्टपणे करीत असत. एक लांकडी फलक भिंतीला टेकून उभा करीत. त्याच्या समोर, एक माणूस उभा राही. नंतर सुमारे ५०-६० फूट अंतर वरुन धारदार अशा एक फूट लांबीच्या लोखंडी सुऱ्या श्री.नारायण स्वामी अशा अचूक नेमाने फेकीत की, समोरच्या माणसाचे डोक्यापासूनच पार्यापर्यंत ह्या सुऱ्या फलकावर बरोबर ठोकल्या सारखा दिसत. माणूस आणि सुरी यांतील अंतर सुतभरही नसे. या कामी श्री लिमये टेलर हे विद्यार्थी त्यांना मदत करीत. श्री.लिमये स्वत: समोर उभे रहात असत. सुरीचा तसूभर नेम जरी चुकला तरी समोर उभे राहणाराचे शरीरात ही वेगाने फेकली जाणारी सूरी धुसल्याशिवाय राहात नसे, श्री.लिमये हे बेताचे मल्लखांबचे काम देखिल उत्तम करीत असत.

श्री.नारायण स्वामी हे डोळे बांधून देखिल हा प्रयोग करीत असत.

ह्या व्यायाम शाळेची कुस्ती आणि काठी या बाबतीत त्याकाळी अमरावतीत ख्याती होती. इ.स. १९४७ चे आसपासही व्यायाम शाळा बंद पडली.

नंतर ही व्यायाम शाळेची जागा "सावित्रीबाई बियाणी शिक्षण संस्थेला बाल मंदीरासाठी वार्षिक १/- रु. नाममात्र भाड्याने दिली व तेथे ह्या संस्थेने "कै.रघुनाथमलजी कोचर बोल मंदीर" सुरु केले आहे. या लगतच शाळेसाठीही एक खोली बांधून जागा करुन दिली आहे. परंतु हल्ली व्यायाम शाळेत फार से विद्यार्थी येत नाहीत. या व्यायाम शाळेचे केवळ नांव राहिले आहे. त्याकाळी (१९३०-१९४७) तरुणांत व्यायामाची आवड होता. मुलगा शाळेतून दुपारी ५ ला घरी आला कि तो लगेच व्यायाम शाळेत जात असे. हल्ली सारा जमानाच बदलून गेला आहे. निरनिराळ्यापध्दतीच्या कपड्यांनी व सौंदर्य प्रसाधनांनी शरीर सजवणे एवढीच आवड आज बहुंसंख्य तरुणांत दिसून येते. त्याकाळी शरीर संपत्ती सुदृढ ठेवण्याकडे मुख्य लक्ष होते.

(श्री.हरिभाऊ बापोरीकर वय ८०, यांची मुलाखत)

परिशिष्ट क्र. ९ ड

भारत हिंदी पुस्तकालय (स्थापना १९२९)

राष्ट्रीय आंदोलन के काल में स्थापित, यह संस्था अमरावती की एक मात्र प्राचीनतम हिंन्दी संस्था है। सन १९२९ में स्व.श्री.वल्लभदासजी खरैय्या, स्व.श्री.जगन्नाथ प्रसादजी पुरवार आदि के प्रयत्नों से इसकी स्थापना, श्री.छत्रपुरी जुगलकिशोर बालाजी संस्थान व्दारा प्रदत्त एक छोटे से कक्ष में हुई थी। कार्य बढने पर, संस्थान ने एक बडा कक्ष नि:शुल्क प्रदान किया। कुछ वर्षो पूर्व स्व. छक्कीलालजी खरय्याने इस कक्ष का विस्तार कराया। आज संस्था का पुस्तकालय इसी कक्ष में चल रहा है।

संस्था के प्रथम अध्यक्ष स्व.श्री.वल्लभदासजी खरैय्या एवं मंत्री स्व.जगन्नाथ प्रसादजी पुरवार थे। नगर के अनेक मान्य सज्जन इस संस्था के सदस्य एवं पदाधिकारी रह चुके है। जिनमें स्व. श्री.मोतीलालजी पुरवार, स्व.श्री.विष्णू रामचंद्र राजवाई, स्व.श्री.रघुनाथमलजी कोचर, स्व.दादा वीर वामनरावजी जोशी, श्री.राधावल्लभजी हेडा, श्री.उमरलालजी केडिया के नाम विशेष उल्लेखनीय है। संस्था के वर्तमान अध्यक्ष अधिवक्ता श्री.नारायणदासजी राठी, उपाध्यक्ष अधिवक्ता जयकान्तजी पुरवार तथा मंत्री श्रीलखामी चंदजी खंडेलवाल है।

पुस्तकालय जहाँ लग भग १०० पुस्तकों से आरंम्भ हुआ था। वहा आज १० हजार से अधिक पुस्तकें है तथा २५ से अधिक पत्र पत्रिका यें, नियमित से आते है। संस्था व्दारा आयोजित कार्यक्र में तुलसी जयंती महोत्सव उल्लेखनीय है। समय समय पर अनेक प्रसिध्द साहित्यिको एवं प्रतिष्ठित व्यक्तियों की भेट से संस्था लाभान्वित होती रही है।

संस्था बम्बई सार्वजनिक न्यास अधिनियम, १९५० तथा सोसायटीज रजिस्ट्रेशन एक्ट, १८६० के अंतर्गत पंजीबध्द है। महाराष्ट्र सरकार व्दारा यह ग्रंथालय अधिनियम के अन्तर्गत "ब" वर्ग प्रापत संस्था है। नगर पालिका अमरावती व्दारा यह अनुदानित है।

परिशिष्ट ९ ई

असनारे वाचनालय -

हे कै.जयराम केशव उर्फ भाऊसाहेब असनारे वकील अमरावती यांचे स्मरणार्थ १९२२ साली स्थापन करण्यांत आले होते कै.भाऊसाहेब असनारे हे कै.दादासाहेब खापर्डे यांचे काळातील विव्दान लेखक व होमरुल लीग चळवळीचे प्रमुख कार्यकर्ते होते. त्यांना लोक "छोटे खापर्डे" म्हणत असत त्यांचे स्मरणार्थ कै.भाऊसाहेबांचे मित्र व चहात्यांनी व मोहल्यातील सधन लोकांनी वर्गण्या देऊन कै.भाऊसाहेब असनारे वाचनालयाची इमारत श्री.दत्त मंदीर, कुभारवाडा येथे बांधली. ती अद्याप आहे.

हे वाचनालय दहा वर्षे उत्तम चालू होते. पण पुढे कार्यकर्त्यांचे अभावी आणि आपसातील भांडणामुळे या वाचनालयातील पुस्तकांची विल्हेवाट लागली आणि शेवटी ही वाचनालयाची इमारत ए.आर.पी.चे कंट्रोल दुकानासाठी भाड्याने देण्यात आली. नंतर येथे दवाखाना होता व शेवटी ही जागा किराणा दुकानासाठी भाड्याने दिली आहे.

हे वाचनालय पुन्हा उत्तम प्रकारे चालू रहावे म्हणून श्री.गंगाधरपंत अंबादासपंत हुशंगाबादकर (फोटोग्राफर) यांनी आटोकाट प्रयत्न केले होते. पण उपयोग झाला नाही. श्री.हुशंगाबादकर यांना १९५३ मध्येच वाचनालयाचे दुर्दशेसंबंधी एक लेख "उदय" मध्ये प्रसिध्द केला होता. नंतर न्यायालयातही गेले होते. धर्मादाय आयुक्ताकडेही या बाबत केस चालू होती. परंतु श्री.हुशंगाबादकर हे ह्यात असे पावेतो तरी हा प्रश्न मिटलेला नव्हता, असे दिसते. तूर्त वाचनालयाची इमारत आजही आहे, पण वाचनालय नाही.

परिशिष्ट ९ फ

अमरावती ग्रंथमाला

१) सुबोध ग्रंथमालेमधील प्रसिध्द झालेले ग्रंथ

- क्षत्रियांचा प्राचीन इतिहास.

  (लंडन लायब्ररीसाठी मंजुर केलेला)

- क्षत्रियांचा जातवार इतिहास (लायब्ररीसांठी मंजुर)
- क्षत्रियांचा कुलवंश प्रदीप.
- क्षत्रियांची छावणी.
- कीर्तन रत्नमालर.
- भोंदू भटाचे सोंग म्हणजेच हिंदू धर्माचे ढोंग
- नवे स्वयं पुरोहित

- कोदंडाचा टणत्कार
- सत्यशोधक संत तुकाराम
- आर्य समाजाचा संदेश
- स्वामी दयानंदाची व्याख्याने
- स्वामी दयानंद परिचय
- वेद ईश्वर प्रणीत आहे काय ?
- जलशाचे रंगात फार्स
- क्षत्रिय

२) **विदर्भज्ञान प्रसारक माला :-**

अमरावती येथे १९३२-३३ मध्ये ही माला स्थापन झाली होती. व या मालेमध्ये तर्फे पहिले पुरुष म्हणून "वैभवशाली भारत वर्ष व दरिद्री हिंन्दी जनता" हे श्री.पेठकर यांनी लिहिलेले पुस्तक प्रकाशित करण्यात आले होते.

३) **उदयमाला :-**

साप्ताहिक उदय कार्यालयातून ही माला प्रसिध्द होत असे १९२३ पावेतो या मालेची खालील पूष्पे प्रकाशित झाली होती.

१) हिंदुस्थानचा व्यापार ले. जयराम केशव असनारे, वकील.

२) पंजाबातील घोर अत्याचार ले.डॉ. धर्माधिकारी

३) लोकमान्यांच्या गोष्टी ले.कै.ब.ग. (कविभूषण) अण्णासाहेब खापर्डे.

४) वऱ्हाड प्रांताचा इतिहास (या.मा.काळे)

परिशिष्ट ९ ग

श्री.शारदा उद्योग मंदीर.

शारदा उद्योग संस्थेची स्थापना इ. १९५० मध्ये खापर्डे वाड्यात झाली. संस्थापिक ताराबाई पाध्ये या होत्या. गोर गरीब, अनाथ, स्त्रिया विधवा यांना स्वावलंबनाने उद्योग करुन चार पैसे मिळविता यावेत हा त्याचा उद्देश होता. त्याकरिता त्यांनी सूतकताई, पापड,चटण्या लोणची, पेपरमिंट, घरगुती बिस्किट बनवणे, झबले-टोपडे बनवणे, हातमोजे, पायमोजे, मफलर, गळपट्टे, स्वेटर इ. विणून देणे, असे छोटे छोटे उद्योग महिलांना शिकिवण्यास सुरुवात केली. संस्था लोकप्रिय होत गेली. संस्थेने अनेक परित्यक्तांना आधार दिला. ह्याची माहिती मिळाल्यावर मध्यप्रांताचे मुख्यमंत्रि पं. रविशंकर शुक्ल यांच्या सूचनेवरुन संस्थेसाठी जागा देण्यात आली. आणि उद्घाटनासाठी स्वत: शुक्लजी आले होते. ताराबाई पाध्ये हयात असेपर्यत त्याच संस्थेचया अध्यक्ष राहिल्या. त्यांचे पति श्री.एस्. के.(भय्यासाहेब) पुत्र श्री.रमेश पाध्ये, दोघेही फार नामवंत विधिज्ञ होते. ते सर्व भानगडी सांभाळत असत. ताराबाईच्या कुटुंबीय मंडळीनी घरच्या घरी कामे करुन देऊन संस्थेच्या आर्थिक विकासास हातभार लावला. व संस्था उर्जिता वस्थेस आणली. आज सिटी कोतवाली, जयस्तंभ जवळ संस्थेची भव्य इमारत उभी आहे. तेथे स्वस्वात जेवण मिळते. हळद, तिखट, शेवया, लोणची, चटण्या तयार कपडे सहज उपलब्ध होतात. मुलींसाठी वसतिगृह आहे. तेथे बाहेर गावच्या मुली बिनधास्तपणे राहू शकतात. तेथे नित्यश: सांस्कृतिक चळवळी घडत असतात. प्रवेशव्दारासमोर श्री.शारदा देवीची भव्य मूर्ति आहे. तेथे दररोज शारदेची आरती होते. समाजातील दु:खी कष्टी, अर्थ दुर्बल घटकांना रोजगार उपलब्ध कसा करुन द्यावा त्याचा आदर्श येथे पहावयास मिळेल. शिवाय संस्थेच्या इमारतीत संगीताचे वर्ग, वाचनालय, स्वानंद शिक्षण केन्द्र, शिवण काम विणकाम यांचे अभ्यास वर्ग व परीक्षा घेण्यास येतात. प्रशिक्षण व्यावसायिक दृष्टीने देण्यात येते.

परिशिष्ट ९ घ

अमरावती नगर वाचनालय

ह्या संस्थेची स्थापना नोव्हेंबर १८६७ साली झाली. प्रारंभी संस्थेचे नाव नेटिव्ह लायब्ररी असे होते. सक्करसाथमधील भुसारी गेट पूरणमलजी यांच्या वाड्यात ह्या वाचनालयाचा प्रारंभ झाला. ह्या वाचनालयाचे श्री.श्रीराम भिकाजी जठार, बापूजी रंगनाथ उडगीकर, आत्माराम भिकाजी प्रभु, श्री.चिमणाजी राजाराम पाठक, श्री.एकनाथ तात्या ओक (वकील) हे संस्थापक होते. हे लोक डे. इन्स्पेक्टर, इ.ए.सी., अशा अधिकारी पदावर होते गावातील सुशिक्षितांना मोकळेपणे बसून गप्पा गोष्टी मारण्याचे करमणुक करण्याचे साधन म्हणून वाचनालय सुरु करावे असे ह्या लोकांनी ठरवले हळूहळू गावातील कोणत्याहि चळवळीचे केंद्र म्हणजे हे वाचनालय बनले. सभासद इतके उत्साही असत की, गावातील प्राथमिक शाळेच्या शिक्षकापासून ते ए.इ.ए.सी. दर्जाच्या अधिकाऱ्यापर्यंत साऱ्या सुशिक्षितांना त्यांनी सभासद म्हणून नोंदवून घेतले. इ. १८८१ साली म्यु. कमिटिने वाचनालयासाठी जागा दिली. वर्गणी इ. गोळा करुन व थोडे कर्ज काढून इ. १८८७ च्या मे मध्ये पाया खणण्यात प्रारंभ झाला. इ. १८९७ मध्ये कुंपण बांधून झाले. नेटिव्ह लयब्ररी हे नाव बदलून सिटी लायब्ररी हे नाव प्रचारात आले. पण ह्या विषयाचा ठराव आढळत नाही. इ. १९३४ साली शहर वाचनालय हे नाव देण्यात आले तेच नाव सध्या प्रचलित आहे.

प्रांरभापासूनच येथे विविध चळवळी चालत. स्त्री शिक्षणाची चळवळ विविध कायद्यांवर व बिलांसंबधी चर्चा येथे होते. काँग्रेससाठी प्रतिनिधी कोण पाठवावेत हे ह्या ठिकाणी चर्चेवरुन ठरत असे. इ. १८७७ साली मासिक व्याख्यानमाला सुरु झाली. इ. १८७२ साली वऱ्हाड वक्तृत्वोत्तेजक सभा येथे एक उपशाखा म्हणून सुरु झाली. पुढे वऱ्हाड वृक्तृत्वोतेजक सभा नाव बदलून बाल वक्तृत्वोतेजक सभा असे नाव सुरु झाले. ठरावाच्या बाल वक्त्यास पारितोषिके देत असत. इ. १९४४ पासून नाट्यप्रवेश स्पर्धा सुरु करण्यात आली. इ.स. १९५१-५२ मध्ये निबंध स्पर्धा सुरु झाली. सुविख्यात राजकारणी, सामाजिक, धार्मिक क्षेत्रातील नामवंत, साहित्यिक कवि, अर्थशास्त्रज्ञ,

संशोधक, प्राध्यापक येथे भाषणे देऊन गेले आहेत. त्यामुळे अमरावतीत सुसंस्कृत श्रोतृवर्ग तयार झाला. चांगली भाषणे, त्यातील विचार, ऐकण्याची सवय श्रोत्यांना लागली. येथील विख्यात पत्रकार व साहित्यिक श्री.नानासाहेब बामणगावकर , लो.टिळक पुण्यतिथी साजरी करीत असत, त्यांच्या पश्चात हा उपक्रम इ. १९६१ पासून नगर वाचनालयाने हाती घेतला.

व्याख्यानमालेत अनेक नामवंत विचारवंत साहित्यिकांनी भाषणे झाली आहेत. नंतर नवरात्र व्याख्यानमाला सुरु करण्यात आली. केशव सुत जन्मशताब्दि उत्सव संपन्न करण्यात आला. वाचनालयासंबंधी लोकांची आस्था वाढावी म्हणून अनेक मान्यवरांचा सत्कार ह्या वाचनालयाने केला इ. १९४० पासून संदर्भ ग्रंथ विभाग स्वतंत्र करण्यात आला. इ. १९६४ पासून शास्त्रीय पध्दतीनुसार पुस्तकांचे वर्गीकरण करण्यात आले. इ. १९४२ पासून विनामूल्य वृत्तपत्र वाचण्याची व्यवस्था करण्यात आली. इ. १९४४ पासून कृषि व उद्यम विभाग सुरु करण्यात आला. त्यात कृषिविषयक पुस्तके, मासिके वाचावयास मिळतात. इ. १९६२ पासून मासिक विभाग उघडून मासिकांसाठी स्वतंत्र वर्गणीदार नोंदवण्याची पध्दत सुरु केली. कलेक्टर श्री.भ.गु.देशमुख यांच्या प्रेरणेने ग्रंथालय चळवळ सुरु झाली. इ. १९४७ - ४८ साली संस्थेचा हीरक महोत्सव फार थाटामाटात संपन्न झाला. इ. १९६३ साली नवीन सभागृह बांधण्यात आले. इ. १९५३ पासून जुनियर डिप्लोमा इन लायब्ररी सायन्स सुरु करण्यात आला.

इ.१९६९ साली फार मोठ्या प्रमाणावर शताब्दि महोत्सव संपन्न करण्यात आला. विशेषांक प्रकाशित करण्यात आला.

डॉ.बापट व्याख्यानमाला, स्व.अनगळ स्मृति व्याख्यानमाला, स्व.ब्रिजलाल बियाणी व्याख्यानमाला यांचे प्रतिवर्षी आयोजन करण्यात येते.

हल्ली संगणक बसवण्यात आले आहेत. व संगणक प्रशिक्षण देखील देण्यात येते.

वनिता समाज

वनिता समाजाची स्थापना इ. १८९३ साली सौ.यशोदाबाई जोशी यांनी श्री.म.खं. (दादासाहेब) चिटणीस यांच्या साह्याने केली. हे दोघे हि धार्मिक व अध्यात्मिक प्रवृत्तीचे, चारित्र्यसंपन्न होते. सुरुवातीला कालमान परिस्थितीनुसार बायामंडळी येत नसत. महिलांना आकर्षित करण्यासाठी कीर्तने करीत असत. बडनेरा येथील पेंडसे वकील, श्री.दादासाहेब चिटणीस, श्री.मोरुदादा आगाशे ह्या व्यक्तींनी कीर्तने केली. कीर्तनातून सध्याच्या परिस्थितीत स्त्रियांची कर्तव्ये हा विषय मांडला. शिवाय स्त्रिया स्वावलंबी व्हाव्यात, त्यांना स्वत:च्या कमाईचे चार पैसे मिळवता यावेत, हा हेतू होता. गोरगरीब महिलांच्या उन्नतीसाठी काही कार्य करत यावे हा हि एक हेतू होता. ह्या दृष्टीने पापड, लोणची बनवणे, कपडे बेतणे, वीणकाम, भरतकाम, कशीदा, कलाकुसार, शिवणे, लोकरीचे कपडे बनवणे इ. कामे शिकवण्यास सुरुवात केली. ह्या कामात सौ.यशोदा बाईच्या सोबत त्यांच्या मुलीही काम करीत असत शांताबाई, नागूताई, माणिकताई, कमळाबाई, या त्याच्या कन्यांनी त्यांना फार मोलाचे साह्य केले. ह्या मुलींनी पुढे मोठमोठ्या देणग्या दिल्या. उदार आश्रय दिला. त्यामुळे वनिता समाज ही संस्था खूप प्रगति करु शकली सौ.रणदिवे, सौ.सरंजामे, सौ.जठार, सौ.मुंडले, सौ.ताराबाई पाध्ये, सौ.कमल ठाकूर, सौ.गणोरकर, सौ.शेवडे, सौ.मनूताई, सौ.पटवर्धन, आदि महिलांनी स्वकर्तृत्वाने वनिता समाजचा वृक्ष फोफावण्यास मोलाचे साह्य केले. सध्या ही संस्था पंजी बध्द आहे. सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट व बॉम्बे पब्लिक ट्रस्ट ह्या कायद्यानव्ये पंजीकरण झालेले आहे. सौ.सिंधूताई देशपांडे, सौ.लीला भट, श्रीमती रतन बेन्द्रे, सौ.कमलाताई जोग, दुर्गाताई जोग, शामला जोग, श्रीमती प्रतिभाताई अभ्यंकर, श्रीमती मालती दलाल, श्रीमती रमा आसनारे, श्रीमती पुष्पाताई चौबळ, श्रीमती चित्रा देशपांडे, श्रीमती कमल राठी, श्रीमती आशा कोसे, श्रीमती इंदूताई कुथे, श्रीमती वासंती खापर्डे, श्रीमती मालती खांडवे, श्रीमती नलिनीताई लिमये, श्रीमती इंदूताई दामले, श्रीमती प्रभा भट, श्रीमती सुनीता काळे, श्रीमती कुसुम कसबेकर, श्रीमती वसुधा सावजी, श्रीमती उषा गणोरकर, सुशीला गणोरकर, श्रीमती

नलिनी ताई केतकर, श्रीमती रजनी पांगारकर,श्रीमती गिरिजाताई सोमण, आणि अन्य अगणित महिलांनी ह्या संस्थेच्या जगन्नाथाचा रथ पुढे रेटण्यात तनमनधन पूर्वक केले आहे. त्याच्या प्रयत्नातून संस्थेने पुढील प्रमाणे उपशाखा सुरु केल्या आहेत.

०१) **शिशुमंदीर पूर्व प्रार्थमिक शाळा** : ही शाखा इ. १९३७ साली स्थापन झाली व शाळेला इ. १९४२ मध्ये शासकीय मान्यता मिळाली.

०२) **बालोद्यान प्राथमिक शाळा** : ही शाखा इ. १९४३ पासून ह्या विभागास अनुदान देखील मिळत आहे. इ. १९८२ साली उत्कृष्ट शाळा म्हणून ह्या शाळेस फिरती ढाल मिळाली. उत्कृष्ट शिक्षिका म्हणून सौ.स्मिता पाटील यांना पुरस्कार मिळाला.

०३) **शिशुमंदीर प्राथमिक शाळा (सिटी क्लब)** :- ह्या संस्थेची स्थापना इ. १९५५ मध्ये झाली. सरकारी मान्यता अनुदान इ. १९६६ पासून सुरु झाले आहे. विजयाताई सगणे या शिक्षीका ! परिक्षामंडळाने उत्कृष्ट शिक्षिका म्हणून सत्कार केला.

०४) **नूतन प्राथमिक शाळा**, मांगीलाल प्लॉटस् कॅम्प.

ही शाखा इ. १९७० मध्ये स्थापन करण्यात आली. कँप विभागातील शिशूंच्या पालकांच्या मागणीवरुन ही शाळा सुरु झाली. येथे देखील शाळेची स्वत:च्या मालकीची इमारत आहे. या शाळेतील सौ.मीनल पांडे, श्री.वंदे गुरुजी, सौ.भुते, श्री.असनारे यांना उत्कृष्ट शिक्षक म्हणून पारितोषिके मिळाली आहेत.

ह्या शाळेला जोडूनच श्रीमती मालूताई कोल्हटकर नूतन बालक मंदिर चालवितात.

०५) **शिवण वर्ग** :- वनिता समाजाने दोन शिवण वर्ग चालविले आहेत. (एक) सरकारी डिप्लोमा शिवण वर्ग. (दोन) गृहिणी शिवण वर्ग. जिल्हा उद्योग ग्रामीण विकास केंद्रतर्फे सोळा होतकरु मुलींना रु. १२६५.०० मासिक मानधन मिळते.

०६) **कर्वे वाचनालय** :- महर्षि अण्णासाहेब कर्वे यांच्या नावाने हे वाचनालय सुरु

करण्यात आले आहे. आता वाचनालयाला "ब" श्रेणी प्राप्त झाली आहे. शासनाकडून प्रतिवर्षी अनुदान मिळते. प्रतिवर्षी दि. १८ एप्रिलला महर्षि कर्वे दिन संपन्न केल्या जातो. श्रीमती शमा बापट, श्रीमती प्रभा भोगावकर, सौ.कमल गोखले श्री.रणजीत देशमुख, श्री.विजयराव देशमुख, इ. अनेक वक्ते येथे हजेरी देऊन गेले आहेत.

०७) **वनिता टायपिंग स्कूल** :- या शाखेची सुरुवात इ. १९७६ साली झाली. कै.डॉ.शालिनीताई कोलवाडकर यांच्या प्रेरणेने व मार्गदर्शनाखाली ही शाखा सुरु झाली.

०८) **कुटुंब नियोजन केंन्द्र** :- हे केन्द्र इ. १९५२ पासून सुरु करण्यात आले आहे. केन्द्रासाठी शासकीय अनुदान मिळते येथे मुले व स्त्रिया यांची वैद्यकीय तपासणी विनामूल्य केली जाते. मुलांना ट्रिपल पोलिओ, टॉनिक, इंजेक्शन दिली जातात. अनेक आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आली आहे. श्रीमती ललिता राव, श्री.यशवंतराव शेरेकर, श्री.सुरेन्द्र भुयार, श्री.जगदीश गुप्ता, सौ.प्रमिला टोपले, सौ.प्रतिभा पाटील, सौ.वसुधा देशमुख, सौ.उषाताई चौधरी आदी अनेक मंत्रीगण येथे भेटी देऊन गेले आहेत.

०९) **बालसेविका प्रशिक्षण केन्द्र** :- महा.राज्य बालविकास समिती मुंबई यांच्या सहयोगाने हे केन्द्र इ. १९७८ पासून सुरु करण्यात आले. प्रशिक्षणाचा कार्यकाल १ वर्षाचा आहे. सरकारतर्फे पंचावन मुलींना विद्यावेतन देण्यात येते. सराव पाठासाठी बालवाड्या व अंगणवाड्या सहकार्य देतात. येथे बालविकासाशी संबंध असलेले उद्योग टाकावू वस्तूतून खेळणी बनवणे, अशा प्रकारचे ग्रामोद्योग शिक्षण ग्रामीण मुलींना देण्यात येते. दर वर्षी गुणवत्ता प्राप्त विद्यार्थिनीना पारितोषिके दिली जातात. खेड्यातील अंगण वाड्यांना भेट देऊन मुलांच्या सर्वांगीण विकासाची माहिती देण्यात येते.

१०) **बालवाडी सातुर्णा व पाळणाघर** :- कामगार वस्तीतील गरीब मुलांकरता दि. १५/८/१९८० रोजी सातुर्णा येथे बालवाडी सुरु करण्यात आली. सुरुवातीस श्रीमती शांताबाई भट यांच्या घरीच त्यांच्या स्वयं प्रेरणेने ही बालवाडी सुरु झाली.

सूतगिरणी कामगारांची मुले मुले या बालवाडीत येतात. सौ.भट यांनी संस्थेला एक भूखंड दान दिला. भूमीपूजन समारंभ गुढीपाडव्याच्या दिवशी झाला. दि. १ मार्च १९८२ पासून महाराष्ट्र शासनाच्या वतीने पाळणाघर सुरु करण्यात आले. तेथील मुलांना सकस आहार दिल्या जातो. मुलांची आरोग्य तपासणी होते. सुरुवातीस पद्माताई तांबट सचिव होत्या. नंतर पुष्पाबाई चौबळ सचिवपदी आल्या. देणग्या गोळा करुन स्वत:च्या मालकीची इमारत उभी करण्यात आली. व दि. २५/२/८४ रोजी उद्घाटन झाले. वनिता समाजाच्या मध्यवर्ति मुख्य इमारतीत बॅडमिंटन खेळण्याची व्यवस्था आहे. तेथे इतर कार्यक्रम होता. वीर वामनराव जोशी खुले रंगमंच उभारण्यात आले आहे. प्रतिवर्षी शारदोत्सव संपन्न करतात. व्याख्यान माला होतात.

परिशिष्ट ९ ज

आझाद हिंद मंडळ, बुधवारा

इ. १९३० मध्ये म.गांधीची चळवळ ऐन बहरात होती. देशात एक नवे चैतन्य सळसळत होते. याच संघर्ष काळात इ. १९३० मध्ये आझाद हिंद मंडळाची स्थापना झाली.

बुधवारा परिसरात वीर वामनरावदादा जोशी, श्री.वि.रा.हंबर्डे, श्री.ना.रा.बामणगावकर, डॉ.म्हैसाळकर, हरिभाऊ आसरकर, अंबादासपंत वैद्य, अण्णासाहेब कलोती, दुराणी वकील, घोडेगावकर सराफ, विश्राम बेडेकर, दादासाहेब शेवडे, कृष्णराव केवले, बन्डाप्पा गाढवे, शिवराव देवरणकर, वडनेरे इ. कर्तबगार लोकांची घरे व निवास होता. त्यामुळे समाजात चैतन्य होते. राष्ट्रीय धार्मिक, सामाजिक सास्कृतिक, अशा चळवळी तेथे चालत असत. गणेश वाचनालय होते. होमरुल लीगचे कार्यालय होते. आजूबाजूच्या तरुण पिढीत सामाजिक कार्याचे राष्ट्रीय विचारांचे प्रसारण व्हावे, सामाजिक ऐक्य घडावे, ह्या हेतूने आझाद हिंद मंडळाची स्थापना झाली. प्रथम तरुणांचा रॉयल क्लब होता. इ. १९२६ पासून या क्लबची मुले कबड्डी, आट्यापाट्या, खोखो खेळत असत. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर या क्लबला आझार हिंद मंडळ

हे नाव झेंडा वंदनाच्या दिवशी देण्यात आले. या मंडळाचा श्रीगणेशा श्रीगणेश उत्सवाने झाला होता. अमरावतीत दादासाहेब खापर्डे यांच्या प्रेरणेने शिवाजी उत्सव व गणेशोत्सव सुरु झाले. अशाच एका उत्सव प्रसंगी काही तरुणांनी प्रतिवर्षी गणेशोत्सव करण्याचे ठरविले. तेथे खेळ, सामने, शर्यती, गाणे, नकला, या सारखे कार्यक्रम होऊ लागले. माती घुमू लागली. कुस्त्या, दंड, बैठका, व्यायाम इ. सुरु झाले. काही मुले कबड्डी, खोखो, इ.खेळ खेळू लागले. बघता बघता रॉयल क्लब सुरु झाला. अन् बघता बघता रॉयल क्लबचे आझाद हिंद मंडळ बनले. अण्णासाहेब देशपांड्यांच्या कडे मोकळी जागा होती. म्हणून तेथे गणपती बसवत. तसे पाहिले तर उत्साही बाल गोपाल, मुले, युवक, हेच आझाद हिंद मंडळाचे संस्थापक. पण काही नावे तोंडी येतात, त्यात दादाराव देशपांडे, लाला देशपांडे, बाबूराव कोनलाडे, बाळासाहेब दिघेकर, उध्दव कद्रे, गोपाळराव जोशी, अंबादास ठाकरे, अण्णा कहाळे, भाऊ कोहळे, बाळूराव जाधव दिनकर कलोती, भास्कर कलोती, विश्वास हर्णे, नारायण पवार, नानासाहेब साठे, डौ.परिहार, सबनीस इ. युवकांचा त्यात समावेश होतो. काही नावे अनवधानाने सुटली असतील. स्वातंत्र्यानंतर एकदा कै.शहानवाझ अमरावतीस आले होते. त्यांच्या हस्ते ध्वजवंदन झाले. त्यांनी रॉयल क्लबचे नामकरण आझाद हिंद मंडळ असे केले कै.शहानवाझ सुभाषबांबूच्या सोबत होते. त्यामुळे त्यांच्या तोंडी आझाद हिंद सेना हे नाव सदैव होते. म्हणून आझाद हिंद मंडळ झाले.

हल्ली हे मंडळ फार मोठ्या प्रमाणावर गणेशोत्सव संपन्न करते. व्याख्यानमाला, नाटके, गणपतीची मिरवणूक, इ. ला देखील महत्व आहे. खापर्डे चौकातून जाताना ही मुले कै.दादासाहेबांच्या पुतळ्याला हार घातल्याखेरीज पुढे जात नाहीत. वेळोवेळी कबड्डी चे सामाने हॉकी, व्हॉली, फूटबॉल, टेबल टेनिस, क्रिकेट इ. खेळांना उत्तेजन हि मिळते.

त्यामुळे क्रीडा क्षेत्रात या मंडळाचे तरुण नाव राखून आहेत. १० व्या फेडरेशन कप कबड्डी स्पर्धेत या मंडळाचा तरुण विलास इंगोले याचा समावेश होता. दिल्लीच्या मॅरेथॉन धावस्पर्धेत गोपाल चिखलकर चमकला.

या मंडळाने श्री.हनुमान मंदिराचा जीर्णोध्दार घडवून आणला. वृक्षारोपण, रक्तदान शिबीर, गरिबांना चष्मे विनामूल्य देणे इ. कामे होतात. शहरात जातीय दंगल झाली, तेव्हा गरीब लोकांना एक ठिकाणी आश्रय देऊन त्यांच्या खाण्यापिण्याची व राहण्याची व्यवस्था केली.

आझाद हिंद महिला मंडळ हा कक्षहि नव्याने सुरु करण्यात आला असून त्याव्दारे शारदोत्सव, रंगोली स्पर्धा, हस्त कौशल्य प्रदर्शन, वादविवाद, नाटके, हळदी कुंकू, मेळावा, टिपऱ्या नृत्य, लोक नृत्य, मुलीचे खेळ, कबड्डी, खोखो इ. कार्यक्रम आयोजित केले जातात. भिन्न भिन्न जातीचे पंथांचे, लोक एकोऱ्याने कार्य करतात. या मंडळाच्या खंद्या कार्यक्रर्त्यांच्या जोरावर आजवर या विभागातून वीर वामनराव दादा जोशी, श्री.अण्णासाहेब कलोती, गोपाळराव कलोती, डॉ.ओंकार वाठोडकर, हरिभाऊ कलोती, विलास इंगोले इ.पदाधिकारी नगर पालिकेला लाभले आहेत.

परिशिष्ट क्र. ९ झ

राष्ट्रीय अपंग असोसिएशन :-

राष्ट्रीय अपंग असोसिएशन अमरावती या संस्थेची स्थापना डिसेंबर १९८० साली अपंगाचे सर्वांगीण पुर्नवसन करण्याकरिता करण्यात आली.

या संस्थेचे संस्थापक श्री.देविदास काळे हे असून ते स्वत: अपंग आहेत. त्यांचेसोबत संस्थेचे कार्याची धुरा संस्थेचे सचिव श्री.सुधाकर काळे व विश्वस्त श्रीमान चंद्रकांत मोदी हे सात्यत्याने वाहत आहेत.

संस्थेव्दारा अस्थिव्यंग अपंग, मतिमंद, मुकबधिर विद्यालय तसेच अस्थिव्यंग, मतिमंद, मुकबधीर - कर्मशाळा चालविल्या जाते. तेथे अपंगांना विनामूल्य औषध, कापडे, शिक्षण, जेवण, निवासाची सोय करण्यात आलेली आहे. हे सर्व संस्थेचे ठिकाणी कोन्डेश्वर रोड, सर्वे नं. २६, जुनीवस्ती, बडनेरा येथे चालविल्या जाते. आतापर्यंत २०० अपंगांना कर्मशाळेतून प्रशिक्षण देवून त्यांना उदरनिर्वाहाचा मार्ग संस्थेव्दारा तयार करुन देण्यात आला. संस्थेचे कार्य कोन्डेश्वर रोड येथे स्वत:च्या

तीन एकर जागेमध्ये प्रशस्त व चांगल्या इमारती मध्ये सुरु झाले.

आजपर्यत संस्थेव्दारा १५०० अपंगाना स्वंय रोजगाराकरीता पुरस्कृत करुन त्यांचे उदरनिर्वाहाचे साधन निर्माण करुन देण्यात आले आहे. संस्थेचे पुर्नवसन कार्य चुनाभट्टी रोड, एकविरा मंगलकार्यालयाजवळील कार्यालयामधून केल्या जाते.

संस्थेमध्ये अस्थिव्यंग, मतिमंद, मुकबधिर, अंध इ. प्रकारच्या अपंगांच्या प्रवेश दिला जातो. व त्यांचे पुर्नवसन करण्यात येते.

आजपर्यत २०० अपंगांना विनामूल्य कृत्रिम साधनांचे वाटप करण्यात आले आहे. संस्थेला मुख्यमंत्री, राज्यपाल, मंत्री, आमदार, खासदार, समाजसेवक इ. नी. भेटी दिल्या आहेत. व कार्याची प्रशंसा केलेली आहे.

संस्थेचा अपंग पुर्नवसनाकरीता भविष्यामध्ये २.५० करोड रु. खर्चाचा प्रकल्प आहे व त्याची अंमलबजावणी सुरु करण्यात आलेली आहे. त्यामध्ये अपंगाचे शिक्षण, प्रशिक्षण, कृत्रिम साधन, रोजगार व अपंगांच्या सर्वागीत विकास व पुर्नवसन इ. चा समावेश आहे.

परिशिष्टे - १०

(अ) राजकीय पक्ष (ब) संस्था

स्वातंत्र्यपूर्व काळातील अमरावती

अमरावतीतील राजकीय पक्ष :-

१.	काँग्रेस समाजवादी पक्ष	२.	रॅडिकल डेमोक्रेटिक पार्टी
३.	भारतीय कम्युनिस्ट पार्टी	४.	इंडियन नॅशनल काँग्रेस
५.	शेड्यूलकास्ट फेडरेशन	६.	फॉरवर्ड ब्लॉक
७.	हिन्दु महासभा	८.	मुस्लिम लिग

अमरावतीच्या युवक परिषद व इतर परिषदा.

इंडियन नॅशनल काँग्रेस (राष्ट्रीय महासभा)

''इंडीयन नॅशनल काँग्रेस'' ही स्थापना इ.स.१८८५ साली मुंबईत झाली. या सभेला आणि इ.स. १८८६ साली कलकत्ता येथे काँग्रेसचे दुसरे अधिवेशन भरले होते. त्याला वऱ्हाडातून (अमरावतीतूनही) कोणीही प्रतिनिधी हजर नव्हता.

परंतू इ.स. १८८७ साली मद्रास येथे काँग्रेसचे तिसरे अधिवेशन श्री.बद्रुद्दिन तैय्यबजी यांच्या अध्यक्षतेखाली भरले. त्यासाठी मात्र ''वऱ्हाड सार्वजनिक सभे'' तर्फे एकूण सात सभासदांचे एक प्रतिनिधी मंडळ वऱ्हाडातून पाठविण्यात आले होते. या प्रतिनिधी मंडळात अमरावतीचे श्री.रंगनाथ नरसिंह मुधोळकर वकील, श्री.मोरोपंत विश्वनाथ जोशी वकील, श्री.बळवंतराव खोत व देवराव विनायक दिगंबर हे प्रतिनिधी होते. वऱ्हाडातून काँग्रेसला जाणारे हे पहिलेच प्रतिनिधी होते.

त्यानंतर (मद्रास अधिवेशनानंतर) लगेच काँग्रेस जनक आणि जनरल सेक्रटरी श्री.ह्यम साहेब यांच वऱ्हाड प्रांतात दौरा झाला होता. या दौऱ्याचे वेळीच काँग्रेसची ''वऱ्हाड स्टॅन्डींग कमेटी'' निवडण्यात येऊन वऱ्हाडात काँग्रेसच्या कार्याला सुरुवात झाली. त्याकाळी वऱ्हाडाचे एकूणय सहा जिल्हे होते. ते असे वणी (नंतर यवतमाळ झाला), वाशिम, आकोला, बुलढाणा, अमरावती व अचलपूर. या प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा काँग्रेस कमेटीची स्थापना या नंतर झाली.

अमरावती जिल्हा काँग्रेसचे कार्य अमरावती शहरातून सुरु झाले. श्री.रं.न. मुधोळकर आणि श्री.मोरो विश्वनाथ जोशी हे वऱ्हाडातील (आणि जिल्ह्यातीलहि) काँग्रेसचे मुख्य होते.

याप्रमाणे अमरावतीत इंडीयन नॅशनल कॉग्रेसची शाखा इ. स. १८८८ चे सुरुवातीपासून आहे. अमरावतीतून सर्वप्रथम काँग्रेस अधिवेशनाला हजर राहणारे सर्वश्री. मुधोळकर आणि मोरोपंत जोशी हे नंतरच्या प्रत्येक काँग्रेस अधिवेशनाला न चुकता हजर राहत असत. इ.स. १८८८ साली अलाहाबाद येथे भरलेल्या काँग्रेसच्या चौथ्या अधिवेशनांत श्री.मुधोळकर यांचे ठरावावरील (पोलिस खात्याचा धिंगाणा)

भाषणाची डॉ ॲनी बेझंट बांईनी आपल्या एका काँग्रेसचा इतिहास या ग्रंथात फार प्रशंसा केलेली आहे. तसेच काँग्रेसच्या १९३५ साली प्रसिध्द झालेल्या इतिहासात श्री.आर.एन.मुधोळकरांचे नाव काँग्रेसच्या आद्य संस्थापकांच्या यादीत नमूद आहे. ''इतकेच नव्हे तर त्या काळच्या अत्यंत कष्टाळू काँग्रेस भक्तांत मुधोळकरांची कोणीही बरोबरी करु शकणार नाही.'' असा उल्लेख काँग्रेसच्या इतिहासात आलेला आहे.

वऱ्हाड प्रांताचे प्रतिनिधी म्हणून श्री.मुधोळकर हे अलाहाबाद अधिवेशनापासूनच काँग्रेसच्या व्यासपीठावर चमकले होते.

इ.स. १८८९ सालच्या काँग्रेसच्या मुंबई अधिवेशनात काँग्रेसचे एक प्रतिनिधी मंडळ इग्लंडला लोकमत जागृत करण्यासाठी पाठविण्याचे ठरले होते. त्या प्रमाणे १८९० साली हे प्रतिनिधी मंडळ (११ सभासद) इग्लंडला पाठविण्यात आले. त्यात रं.नं. मुधोळकर व मोरोपंत जोशी हे दोघे अमरावतीचे होते व ते स्वखर्चाने हे कार्य करण्यासाठी इंग्लंडला गेले होते.

इ.स. १८८९ साली श्री.दादासाहेब खापर्डे यांनी सरकारी नोकरीचा राजिनामा देऊन अमरावतीत वकीली सुरु केली व त्याबरोबरच ते सार्वजनिक कार्यातहि भाग घेऊ लागलेत. इ.स. १८९१ साली नागपुर येथे भरलेल्या सामाजिक परिषदेचे ते अध्यक्ष असतांना त्याचा लो.टिळकांशी घनिष्ट संबंध येऊन ला.टिळकांसोबत नंतर त्यांचा ही काँग्रेसशी संबंध आला व तेही काँग्रेसच्या कार्यात भाग घेऊ लागले.

पण काँग्रेस ही संस्था अमरावतीत आणि वऱ्हाडातही राजकीय जागृतीचा पाया घालणारी संस्था म्हणून सर्व सामान्यांत परीचित झाली ती, इ.स. १८९७ साली अमरावती येथे भरलेल्या काँग्रेसच्या तेराव्या अधिवेशनापासूनच.

काँग्रेसचे हे तेरावे अधिवेशन दि. २८, २९, ३०, डिसेंबर १८९७ रोजी अमरावतीच्या त्यावेळच्या काण्णवाचे जीनात (म्हणजे हल्लीचे श्रीकृष्ण पेठेत) सर श्री.शंकरन नायर यांच्या अध्यक्षतेखाली भरले होते व या अधिवेशनाचे स्वागताध्यक्ष श्री.दादासाहेब खापर्डे हे होते. या अधिवेशनाचे वैशिष्टे म्हणज, काँग्रेसच्या

स्थापनेपासून काँग्रेसची जी अधिवेशने भरली ती मुंबई, कलकत्ता अशा मोठ्या शहरात भरली होती. अमरावतीचे हे काँग्रेस अधिवेशन म्हणजे पहिल्या प्रथमच एका लहान शहरात (लोकसंख्या त्यावेळी सुमारे ३४ हजार) भरलेले अधिवेशन होते.

हे अधिवेशन अनेक अडचणीतूनही यशस्वीरीत्या पार पाडणारी अमरावतीची नेतेमंडळी होती. १.श्री.रं.न.मुधोळकर, २. श्री.मोरोपंत जोशी, ३. श्री.दादासाहेब खापर्डे व ४. श्री.दादासाहेब जोग वकील.

या अधिवेशनासाठी देशाच्या सर्व प्रांतातून पुढारी मंडळी अमरावतीस आली होती. काँग्रेसचे जनक ह्यूमसाहेब हेही अमरावतीला आले होते.

१. हाऊ इंडिया फॉट फॉर फ्रिडम बाय ॲनी बेझंट - १९१५

२. काँग्रेसचा इतिहास (मराठी अनुवाद) १९३५ : डॉ.पट्टाभिसितारामैय्या : पृ. ११८

या अधिवेशनातच लोकमान्य टिळकांच्या चित्राचे वादातून ''जहाल - मवाळ'' असे गट निर्माण झाल्याचे डॉ.ॲनी बेझंट बाईंनी आपल्या ग्रंथात म्हटले आहे. लोकमान्य टिळक हे त्यावेळी तुरुंगात असल्याने अधिवेशनाला हजर नव्हते, म्हणून त्यांचे चित्र व्यासपीठावर लावावे असा आग्रह दादासाहेब खापर्डे यांनी धरला होता.

या अधिवेशनाची फलश्रुती म्हणजे त्यामुळे राष्ट्रीय जागृतीचा पाया घातला गेला.

आणि त्या सोबतच अमरावतीतही जहाल - मवाळ असे गट निर्माण झालेत. जहाल गटाचे नेतृत्व श्री.दादासाहेब खापर्डे यांचे कडे होते आणि ते जनसामान्यात लोकप्रिय असल्यामुळे त्यांच्या गटाला अमरावतीत चांगला पाठिंबा होता. इतकेच नव्हे तर दादासाहेबांमुळे लोकमान्य टिळक समर्थकांची संख्या वऱ्हाडातून फार मोठी झाली होती.

श्री.मुधोळकर आणि श्री.मोरोपंत जोशी हे मवाळ गटाचे समजले जात.

वऱ्हाड प्रातिक काँग्रेस कमेटीवर दादासाहेब खापर्डेच्या गटाचे वर्चस्व १९१९ पावेतो होते. परंतु १९२० मध्ये लोकमान्यांचे निधन झाल्यानंतर व गांधी युगाला सुरुवात झाल्यानंतर दादासाहेब खापर्डे यांचा जहाल गट हा मवाळ ठरला आणि गांधीजींच्या चळवळीच्या राजकारणाचा पुरस्कार करणारे श्री.वामनराव जोशी हे जहाल ठरले व वऱ्हाड प्रातिक काँग्रेसवर श्री.वीर वामनराव दादांच्या गटाचा १९२९ पासून कब्जा झाला.

गांधीजींचे राजकारणात कारावास हा एक अपरिहार्य भाग होता. वीर वामनराव दादा व त्यांच्या अनुयायांनी या सर्व कष्टाला सामोरे जाऊन देशसेवा बजावली. त्यामुळे वऱ्हाडात सर्वत्र वीर वामनराव दांदाचे वर्चस्व होते. पुढे १९३५ साली वीर वामनराव दादांनीच अकोल्याचे श्री.ब्रिजलाल बियाणी यांना वऱ्हाड प्रांताचे अध्यक्षपद दिले व वऱ्हाड प्रांतिक काँग्रेसचे कार्यालय तेव्हापासून आकोल्यास गेले.

नंतरच्या काळात वीर वामनराव दादा यांचा गट व बियाणी गट असा वऱ्हाड प्रांतिक काँग्रेसमध्ये वाद दिसून येतो व तो १९४७ पर्यत (व पुढेही) कायम होता.

काँग्रेसने गांधीजींच्या नेतृत्वाखाली देशाच्या स्वातंत्र्यासाठी १९२१ चे असहकार आंदोलन, १९३० कायदेभंगाची चळवळ, १९४०-४१ वैयक्तिक सत्याग्रह आणि १९४२ भारत छोडो आंदोलन ही आंदोलने केलीत. त्यात अमरावती काँग्रेसने मोठी कामगिरी बजावली आहे. किंबहुना स्वातंत्र्य चळवळीचे वऱ्हाडातील मुख्य केंद्र अमरावती शहर हेच होते. (या चळवळींचा इतिहास या ग्रंथाच्या पहिल्या व दुसऱ्या भागात आणि भाग तीन मध्ये स्वतंत्र पणे दिलेला आहे.) तत्पूर्वी १९०३-०४ मध्ये लोकमान्य टिळकांच्या चतु:सूत्री कार्यक्रमापूर्वीच दादासाहेब खापर्डे यांनी अमरावतीत राष्ट्रीय शाळेची स्थापना केली होती व स्वदेशीचा प्रचार केला होता. अनेक आपत्तींच्या प्रसंगी दादासाहेबांनी लो. टिळकांना साथ दिली आहे. दादासाहेब हे राष्ट्रीय पक्षाचे म्हणून बराच काळ कौन्सिल ऑफ स्टेटचे सभासद होते. तत्पूर्वी ते अमरावती नगरपालिकेचे उपाध्यक्ष व लोकल बोर्डाचे अध्यक्षही होते. बिगार बलुत्यांचे आंदोलनही त्यांचे नेतृत्वाखाली वऱ्हाडात झाले होते.

१९२० नंतर त्यांचे पुत्र बाबासाहेब खापर्डे यांचे कडे वऱ्हाड प्रांतिक कॉंग्रेसचे नेतेपद आले होते.

त्याचप्रमाणे श्री.आर.एन.मुधोळकर हे कॉंग्रेसच्या औद्योगिक विभागाचे मुख्य होते. त्यांनी वऱ्हाडांत औद्योगिक चळवळीचा पाया घातला असून अमरावतीची बेरार व्हिक्टोरीया टेक्नीकल इन्स्ट्रीट्यूट (हल्ली कला निकेतन) ही त्यांच्या प्रयत्नानेच स्थापन झालेली आहे. शिवाय विदर्भ महाविद्यालय (पूर्वीचे किंग एडवर्ड कॉलेज) हे श्री.मुधोळकर व श्री.मोरोपंत जोशी यांच्या प्रयत्नांचे फळ होय.

श्री.मोरोपंत जोशी हे कट्टर सुधारक होते. त्यामुळे त्यांना अखेर पर्यन्त फार त्रास सहन करावा लागला. कॉंग्रेससाठी १८९० साली इंग्लडला गेल्यानंतर त्यांनी प्रायश्चित्त न घेतल्यामुळे ब्राम्हण समाजाने त्यांना वाळीत टाकले होते. परंतु मोरोपंतांनी आपली भूमिका अखेरपर्यत सोडली नाही व प्रायश्चित्त घेतले नाही. मध्यप्रांताचे होम मिनिस्टर, सांगली संस्थानचे काहीकाळ प्रशासक होते. अमरावती नगरपालिकेचे उपाध्यक्ष, कॉटन मार्केटचे अध्यक्ष ही पदेही त्यांनी भुषविली आहेत.

श्री.मुधोळकर हे १९१२ च्या बांकीपूर कॉंग्रेसचे अध्यक्ष होते. १९१४ साली मध्यप्रांतात असेम्ब्लींची स्थापना झाली तेव्हा त्यांची नियुक्ती अध्यक्ष म्हणून झाली होती. नंतर ते असि.ज्यु कमिश्नर म्हणूनही नियुक्त झाले होते. अमरावतीतील मुधोळकर पेठ हे त्यांचे स्मारक होय. अमरावती नगर पालिकेचे ते पहिले गैरसरकारी अध्यक्ष (१९११) होते. १९४७ साली देशाला स्वातंत्र्य मिळाले आणि भारत देश प्रजासत्ताक संघ राज्य म्हणून घटनेने ठरवल्यानंतर १९५० नंरत कॉंग्रेस हा एक पक्ष बनला. त्यापूर्वी इंडीयन नॅशनल कॉंग्रेस ही संस्था एक विविध विचारांच्या जाती धर्माच्या लोकांची संयुक्त आघाडी या स्वरुपात काम करीत होती.

या प्रमाणे ''इंडियन नॅशनल कॉंग्रेस '' ही संस्था इ.स. १८८७ पासून अमरावतीत आहे व त्या संस्थेचे कार्य सर्वविदित आहे.

दादासाहेब खापर्डे यांनी कॉंग्रेसचे फार भरीव कार्य केले. ते अनेक

अधिवेशनांना उपस्थित होते. लोकमान्य टिळकांसोबत होमरुल लीगच्या स्थापनेत व विकासात त्यांनी हातभार लावला. नंतर स्वराज्य पार्टीच्या स्थापनेत त्यांनी भरीव योगदान दिले. स्वराज्य पार्टीचा जाहीरनामा उर्फ स्वराज्याची घटना पं. मोतीलाल नेहरुसोबत दादा साहेबांनी तयार केली आहे.

अखिल भारतीय काँग्रेस समाजवादी पक्ष :-

काँग्रेस समाजवादी पक्ष १९३४ साली स्थापन झाला. यानिमित्ताने समाजवादी आंदोलनाच्या पन्नास वर्षाच्या कार्याचा आढावा घेण्यात येत आहे. ३४ सालापूर्वी आपल्या देशात समाजवादी विचारत नव्हता असे समजणे योग्य नव्हे. मार्क्सचे सम कालीन विष्णुबुवा ब्रम्हचारी यांनी "सुखदायक राज्य प्रकरणी निबंध" या नांवाची पुस्तिका लिहून साम्यवादी विचारांशी स्थूलमानाने जुळणारे विचार एकोणवीसाच्या शतकाच्या मध्यात मांडले तेव्हाच पहिल्याने या मातीवर एक बीज रोवले गेले. तेव्हा ते रुजले नाही हा भाग वेगळा पण ३४ साल कॉग्रेस समाजवादी पक्षाची स्थापना होण्याआधीच्या जवळपास भूमीत होऊ लागले होते हे मान्य करावे लागेल. लो. टिळकांनी स्थापन केलेली राष्ट्रीय मजूर संघटना, १९१७ साली लेनिनच्या नेतृत्वाखाली रशियात झालेली क्रांन्ती, १९२५ साली कॉ. डांगे प्रभृतीच्यां प्रेरणेने स्थापन झालेली वर्क्स ॲन्ड पीझन्टस पार्टी, १९२७ साली पं. जवाहर नेहरुंनी रशियात दिलेली भेट, १९२९ साली गाजलेला मीरत कटाचा खटला, १९३० च्या डिसेंबरमध्ये कॉ. एम.एन.रॉय यांचे आंतरराष्ट्रीय कम्युनिस्ट धोरणाशी बिनसून भारतात झालेले पुनरागमन, या सर्व घटना समाजवादी चळवळीचे या देशात बीजारोपण होऊ लागलेले आहे हेच दर्शवीत होत्या. हे बीजारोपण प्रथमत: कम्युनिस्टांनी केले याबद्दल शंकाच नाही. परंतु कम्युनिस्टांची चळवळ रशियन क्रांतीतून निर्माण झालेल्या सेकंड इंटरनॅशनलच्या तत्वावधानाखाली चालत होती. वसाहतींच्या देशातील स्वातंत्र्याच्या चळवळी या भांडवलशाहीने चालविलेल्या चळवळी आहेत असे कम्युनिसटांचि मूल्यमापन होते. कम्युनिस्टां मध्येही सूक्ष्म फरक होताच. थेट ग्रेट ब्रिटन मधील कम्युनिस्ट पार्टीकडून प्रेरणा घेऊन कम्युनिस्ट बनलेले आणि प्रथम राष्ट्रीय आंदोलनात

भाग घेऊन नंतर ग्रेट ब्रिटनच्या कम्युनिस्ट पाटीकडून प्रेरणा घेतलेले कॉम्रेड डांगे यांच्यासारखे कम्युनिस्ट यांच्या वर्तनाकडे पहिल्यास हा फरक ध्यानात येतो. कॉ. डांगे यांनी १९२० सालच्या राष्ट्रीय चळवळीत भाग घेतला होता. त्यामुळे पुढे ज्या ज्या वेळी काँग्रेसच्या विरोधी असे कम्युनिस्ट इंटरनॅशनलचे धोरण असे, त्या त्या वेळी कॉ. डांगे सामान्यत: काँग्रेसच्या बाजूने धोरणाची मांडणी करीत. त्यामुळे त्यांना पक्षात अल्पमतवाल्या गटात रहावे लागे. हा फरक ध्यानात घेऊनही कम्युनिस्ट पक्षाची निर्मिती स्वातंत्र्याच्या प्रेरणेतून झालेली नव्हती, ती जागतिक कम्युनिस्ट चळवळीतून झालेली होती असेच म्हटले पाहिजे.''

काँग्रेस समाजवादी पक्षाची निर्मिती त्यावेळच्या ''इथॉस'' मधून झाली होती. ''इथॉस'' म्हणजे समाज मानस या समाजमानसाची प्रेरणा, त्याची आकांक्षा त्यावेळी स्वातंत्र्याची होती. ३० सालच्या लढ्यात, मिठाच्या सत्याग्रहात सामान्य जनता स्वातंत्र्याच्या आकांक्षेनेच उतरली होती. या लढ्यात गांधी आयर्विन करार होऊन सर्व राजबंद्याची मुक्तता झाली तेव्हा तो आपल फार मोठा विजय झाला असे जनतेला वाटते पण तो भास होता. गांधीजी राऊंड टेबल कॉन्फरंस साठी लंडनला गेले आणि इकडे तीन वटहुकूम काढून सरकारने उग्र दडपडशाहीचे धोरण अवलंबिले. उत्तर प्रदेशात किसानांची चळवळ दडपण्यासाठी, बंगालमध्ये दहशतवादी क्रांतीकारकांची चळवळ ठेवण्यासाठी आणि वायव्य सरहद्द प्रांतात खुदा-इ-खिदमतगारांवर अंकुश चालविण्यासाठी हे वटहूकूम होते. या दडपशाहीच्या धोरणाविरुध्द पुन: सत्याग्रह आंदोलन सुरु झाले. ''१९३२ सालच्या या चळवळीत नासिकच्या तुरुंगात अत्युतराव पटवर्धन, नानासाहेब गोरे, मिनू शिनू मसानी, आचार्य जावडेकर, अशोक मेहता व जयप्रकाश नारायण ही मंडळी एकत्र आली व काँग्रेस अंतर्गत समजवादी पक्ष स्थापन करण्याचा विचार येथे झाला. मी त्यावेळी विसापूरच्या तुरुंगात होतो. तुरुंग वेगवेगळे असले तरी आम्हा सर्वांचा विचार एकच होता. हे कसे घडले ? आम्ही सर्व एकाच विचारावर येऊन कसे ठेपलो ? ३२ सालची चळवळ सुरुवातीला प्रचंड वाटली पण पुढे ओसरली. ती अधिक प्रभावी का होत नाही याचा जेव्हा आम्ही विचार करु लागलो

तेव्हा काँग्रेसच्या झेंड्याखाली श्रमजीवी जनता आणल्या वाचून आणि तिने वर्ण लढे व वर्ग लढे लढल्यावाचून स्वातंत्र्य लढ्यात यश मिळणार नाही हे आमच्या लक्षात आले.

३० साली ठाणे तुरुंगात गेल्यापासून समाजवादी वाङ्मय वाचावयास मला मिळत गेले. ३२ साली येरवाड्याच्या कँप जेलमध्ये कॉ.एम.एन.रॉय यांचे दोन अनुयायी चार्लस मस्कारेनास आणि डॉ.शेट्टी आमच्या बरोबर होते. त्यांनी कॉ.एम.एन.रॉय यांची "टास्कस् बिफोर अस" आमच्या पुढील कार्य ही पुस्तिका चोर मार्गानी आत आणली होती. ती वाचल्यानंतर विसापूरच्या तुरुंगात त्या पुस्तिकेच्या आधारावरच आम्ही तुरुंगातल्या तुरुंगात एक परिषद घेतली. गांधीजींच्या सत्याग्रहाच्या आणि रचनात्मक कार्यक्रमाला रॉय यांच्या कार्यक्रमाची जोड दिली पाहिजे व काँग्रेस अंतर्गत समाजवादी पक्ष स्थापन केला पाहिजे या विचारावर आम्ही आलो.

गांधीजींच्या कार्यक्रमास मार्क्सच्या समाजपरिवर्तनाच्या कार्यक्रमाची जोड दिली पाहिजे असे मी म्हटले खरे पण याचा अर्थ महात्माजींच्या कार्यक्रमात समाज परिवर्तनाचा विचारच नव्हता असा घ्यायचा काय ? मला वाटले गांधीजींच्या कार्यक्रमात समाजपरिवर्तनाचा विचार होता पण तो वर्गीय दृष्टीकोणातून नव्हता. वर्णीय दृष्टिकोणापुरताच होता. अस्पृश्यता नष्ट झाली पाहिजे असे ते सांगत. आर्थिक वर्गाच्या दृष्टीने गांधीजींनी झेंडा उभा केला होता असे नाही. गांधीजींचा रचनात्मक कार्यक्रम राष्ट्र उभे करण्याचा होता. त्याचा पाया राष्ट्रवादाचा होता असे म्हणता येईल. ही आर्थिक वर्गाची कल्पना काँग्रेसमध्ये आणावयास, समाजवादी विचाराचे लोकच कारणीभूत झाले. तेव्हा राष्ट्रीय चळवळी मध्ये समाजवादी विचारांचा जो काही उद्‌भव झाला तो करण्याचे काम काँग्रेस समाजवाद्यांनी केले असेच म्हटले पाहिजे.

काँग्रेस समाजवादी पक्षाची रीतसर स्थापना होण्याआधी एक वर्ष बिहारमध्ये बिहार समाजवादी पक्षाची स्थापना झाली होती. त्यानिमित्त झालेल्या अधिवेशनास शंकरराव देव हे देखील हजर होते. पक्ष स्थापनेच्या कार्यासाठी तेथेच एक पूर्वतयारी समिती नियुक्त करण्यात आली. यासमितीने देशाच्या निरनिराळ्या प्रांतांत दौरे करुन काँग्रेस अंतर्गत समाजवादी पक्ष स्थापन करणे का आवश्यक आहे हे समजावून दिले.

या पूर्वतयारी समितीची शेवटची बैठक बनारसला श्री.प्रकाश यांच्या निवासस्थानी झाली होती व तिला अच्युतराव पटवर्धन यांच्या बरोबर मी गेलो होतो. आस्थापना अधिवेशनापूर्वी जयप्रकाश नारायण यांनी "व्हाय सोशियॉलीझॅम?" (समाजवादच का?) नावाचे पुस्तक लिहून बरीच जागृती केली होती. सुभाषबाबू देखिल या विचाराने प्रभावित झाले होते. अच्युत पटवर्धन एका अगदी वेगळ्या पार्श्वभूमीतून राजकारणात आलेले होते." गांधीजींच्या दांडीमोर्चाने मला राजकारणात आणले. त्यापूर्वी माझ्या अंगावर खादीची चिंधोटी देखील नव्हती" असे अच्युतरावांनी एका मुलाखतीस सांगितले आहे. अच्युतरावांना समाजवादी पक्षात आणल्याबद्दल सुभाषबाबूंनी मला एका खास पत्रात धन्यवाद दिले होते. वारंवार बदलाच्या लागणाऱ्या खोल्या आणि बंदीवास यामुळे ते महत्वाचे पत्र गहाळ झाले."

"..... आमचे प्रमुख उद्दिष्ट स्वातंत्र्य मिळविणे हे होते. ते गाठण्यासाठी समाजवादाचा उपयोग होईल. म्हणून आम्ही समाजवादी झालो. आमच्या पूर्वीची काँग्रेस सामान्यत: सुशिक्षितांची होती. पुढारपण त्यांचे होते. जनतेत वर्गजागृती अथवा आर्थिक प्रश्नांचे भान होते असे म्हणता येणार नाही. हे विचार सामान्य जनतेत पसरवावयाचे व तिला काँग्रेसच्या झेंड्याखाली आणायचे, या हेतूने १९३४ च्या ऑक्टोबर मध्ये काँग्रेस समाजवादी पक्षाची स्थापना झाली. २१ व २२ ऑक्टोबर मध्ये डॉ.संपूर्णा नंदजींच्या अध्यक्षतेखाली भरलेल्या या परीषदेत कमलादेवी चटोपाध्याय, आचार्य नरेंद्रदेव, गंगाशरण सिन्हा, नभकृष्ण चौधरी, चंद्रभान गुप्त, नानासाहेब गोरे, अशोक मेहता, अच्युतराव पटवर्धन अशी नामवंत मंडळी उपस्थित होतीच. पण प्रामुख्याने लक्ष वेधून घेत होते युसुफ मेहरअली आणि मिनू मसांनी हे दोघे जणू त्यांनीच आस्थापना अधिवेशनाचा सारा भार आपल्या खाद्यांवर घेतला होता. पण स्थापना झाली आणि थोड्याच दिवसात चौपाटीवरील भाषणाबाबत मला अटक होऊन दोनवर्षे सक्तमजुरीची सजा झाली.

मी तुरुंगात असतानाच १९३५ साली सातव्या कम्युनिस्ट पार्टीचे आंतरराष्ट्रीय धोरण बदलले व भारतातील कम्युनिस्टांना काँग्रेसचे सभासद होण्यास

परवानगी मिळाली. वसाहतीच्या देशातील स्वातंत्र्याचा लढा हा पुरोगामी ठरला. काँग्रेसशी फटकून रहायचे नाही, गांधीजींना प्रतिगामी म्हणायचे नाही ही पथ्ये कम्युनिस्टांनी मान्य केली. स्वाभा विकपणेच समाजवाद्यांना वाटू लागले की, काँग्रेस अंतर्गत दोन दोन समाजवादी पक्ष हवेत कशाला ? दोघांचा मिळून एकच पक्ष का करु नये ३४ ते ४२ हा समाजवादी आंदोलनाच्या व संघटनेच्या इतिहासातील एक महत्वाचा टप्पा आहे.

अमरावतीतील समाजवादी पक्ष :-

स्वातंत्र्य पुर्वकाळापासूनच, काँग्रेस अंतर्गत, काँग्रेस सोशॅलिस्ट पार्टी या नांवाने एक गट कार्य करीत होता. त्यांत आचार्य नरेन्द्र देव, जयप्रकाश नारायण, डॉ.राम मनोहर लोहीया, अच्युतराव पटवर्धन, आदी आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय कार्तीचे देशभक्त कार्य करीत होते. १९४२ चे आंदोलनात या गटाने पार महत्वाचे कार्य केले आहे.

देशाला १९४७ मध्ये स्वातंत्र्य मिळाले आणि काँग्रेस पक्षने समाजवादी कार्यक्रम स्वीकारण्याचे सतत टाळले परिणामत: काँग्रेस समाजवादी गटाचे मंडळींनी काँग्रेसला रामराम ठोकून सोशॉलिस्ट पार्टी या नावाचा स्वतंत्र राजकीय पक्ष स्थापन केला आणि भारतीय घटना मंजूर होवून त्यानुसार सन १९५१ मध्ये ज्या सार्वत्रिक निवडणुका झाल्या त्यांत मोठ्या प्रमाणात भाग घेतला. परंतु सोशॉलिस्ट पार्टीला या निवडणुकीत यश मिळाले नाही.

सोशॅलिस्ट पार्टीची अमरावती जिल्ह्यात व शहरात स्वतंत्र शाखा काम करीत होती. व तीत श्री.बापूसाहेब भोदू, श्री.माधवराव देशमुख, वकील, श्री.अनगळ वकील, श्री.नारायणराव वाटाणे श्री.गंगाबिसनजी सिकची, श्री.पांडे वकील हे कार्यकर्ते काम करीत होते. १९५२ चे सार्वजनिक निवडणुकीत जिल्हा व शहर शाखेने भाग घेऊन संसद व विधान सभेच्या निवडणुकी लढविल्या. श्री.आर.एस.पांडे वकील विधानसभेसाठी व श्री.गंगाबिसनजी सिकची हे संसदेसाठी पक्षाने उभे केले

होते आणि विधान सभेच्या राखीव जागेसाठी शेड्युल कास्ट फेडरेशन उमेदवाराला पक्षाने पाठिंबा दिला होता.

या सार्वत्रिक निवडणूकीनंतर आचार्य कृपालानी ह्यांनी काँग्रेस पक्ष सोडला व कृषक पक्ष या नावाने एक पक्ष काढला व पुढे सोशॅलिस्ट पार्टी आणि कृषक प्रजा एकत्र होवून प्रजा समाजवादी पक्ष बनला. त्यानुसार अमरावतीच्या समाजवादी पक्षाचे नावही प्रजा समाजवादी पक्ष असे सुरु झाले. त्यावेळी अमरावतीचे प्रख्यात देशभक्त श्री.रघुनाथमलजी कोचर (नगर काँगसचे माजी अध्यक्ष) यांनी या पक्षात प्रवेश केला व शेवटपर्यत ते याच पक्षात होते. श्री.अनंतलालजी दम्माणी, श्री.वीरसेनजी मुणोत, श्री.त्रिंबकराव गुंबळे त्यांचे अनेक कार्यकर्ते या पक्षात काम करु लागले. श्री.त्रिंबकराव गुंबळे यांनी गोवा सत्याग्रहात भाग घेतला.

नंतर पक्षंतर्गत मतभेद होऊन भारतीय पातळीवर हा पक्ष विभाजित झाला. त्यानुसार प्रजा समाजवादी पक्ष व संयुक्त समाजवादी पक्ष असे दोन पक्ष निर्माण झाले. या मतभेदापासून अनेक कार्यकर्त्यांत शैथिल्य निर्माण झाले तर अनेक कार्यकर्ते काँग्रेसमध्ये परत गेले.

अमरावतीच्या प्रजा समाजवादी पक्षातील कार्यकत्यांनी वेगळा सं.सो.पा.काढला नाही तरी शैथिल्य आले व कित्येक प्रमुख कार्यकर्ते एकतर काँग्रेसमध्ये गेलेत किंवा निवृत्त झालेत.

नंतर १९६५ मध्ये संयुक्त समाजवादी पक्षाची स्थापना श्री.बाबाराव हाडवे, श्री.यशवंतराव शेरेकर, श्री.बापूसाहेब कारंजकर, श्री.माणिकराव माडीवाले इत्यादी मंडळींनी केली. त्यासाठी पुण्याहून पक्षाचे एक जेष्ठ नेते श्री.सदाशिवराम बाणाईतकर हे मुद्दाम आले होते. व संसोपाचे नांवाने पक्षाचे कार्य परत सुरु झाले.

सन १९६७ च्या सार्वत्रिक निवडणूकीत अमरावतीच्या विधान सभेची जागा पक्षातर्फे लढविण्यात आली. त्यावेळी रिपब्लीकन पक्ष, संसोपा, कम्यु. पक्ष श.का. पक्ष. यांची आघाडी अमरावती जिल्ह्यातील निवडणूक लढवीत होती. व

जागेचे वाटप पक्षाचे आधारावर झाले होते. अमरावतील संसोपाला त्यानुसार जागा मिळाली होती.

या निवडणुकीसाठी पक्षांचे श्री.बापूसाहेब कारंजकर यांना तिकीट दिले. काँग्रेस बरोबर टक्कर घेणे सोपे नव्हते. त्यात पक्षाचा उमेदवार फार थोड्या मतानी (९७२) पराभूत झाला. काँग्रेस विरोधात अमरावती विधानसभा मतदार क्षेत्रात सर्वात जास्त मते पक्षाचे उमेदवारांनी मिळविलीत.

पक्षाच्या कार्यकर्त्यांनी येथे झोपडपट्यांच्या संघटना, कामगार संघटना, प्रवासी संघटना, इत्यादी संघटनाचे कार्य चालविले आहे. त्याचप्रमाणे १९७६ च्या म्यु. निवडणुकीत समितीचे वतीने एकुण ७ उमेदवार विजयी झाले. त्यात पार्टी सदस्य ३ होते. व पार्टीचे पाठिंब्यावर १, अल्पसंख्यांक समितीचे व १ उमेद्वार यशस्वी झाले होते.

पक्षाचे जिल्हा चिटणीस श्री.माणिकराव माडीवाले हे महाराष्ट्र सुवर्णकार संघाचे अध्यक्षपद भूषवीत होते. तर शहर चिटणीस प्रा. मदन भट हे राज महाविद्यालयात विद्यादानाचे कार्य करीत होते. या शिवाय प्रो. हेडा, प्रो.काकाणी व प्रो.राठी इत्यादी मंडळी पक्ष कार्यात भाग घेतात.

श्री.दम्माणीजी, श्री.कारंजकर व श्री.हरीभाऊ ढोले हे पक्षाचे म्यु. सदस्य होते. श्री.कारंजकर हे गेली ४० वर्षे अव्याहत अमरावती नगर पालिकेचे लोकनियुक्त सभासद होते. त्यापैकी ३७ वर्षे ते सतत विरोधी पक्षाचे म्यु. सदस्य म्हणून काम करीत होते. इतका दीर्घकाळ सतत लोकनियुक्त म्यु. सदस्य होण्याचा मान.श्री.कारंजकर यांना मिळाला आहे. तसेच पक्षाचे पाठिब्यांने १९६७ मध्ये म्यु. सदस्य निवडून येणारे श्री.अ.सत्तार हे देखील ३० वर्षे अव्याहत म्यु. सदस्य होते त्यांनी समिती पक्षातून जनता पार्टीत पक्षांतर केले.

श्री.कारंजकर हे पार्टीच्या राज्य संसदीय मंडळाचे सदस्य होते. यापूर्वी ते राज्य संसदीय मंडळाचे सन ७१-७२ मध्ये अध्यक्ष होते.

सोशॉलिस्ट पक्षाने अमरावतीत अनेक राजकीय व सामाजिक आंदोलन केली. मात्र डाव्या पक्षात तरुण रक्त येत नाही ही सर्वच डाव्या पक्षांची व्यथा सोशॅलिस्ट पक्षाचीहि व्यथा आहे.

जिल्ह्यात पक्षाच्या तीन चार शाखा कार्य करतात त्या अशा :-

१. मंगरुळ दस्तगीर ता.चांदुर रेल्वे.

२. धामणगांव - काटपुर ता.मोर्शी.

३. हिवरखेड, ता.मोर्शी.

या शिवाय कार्यकर्ते थोडे असले तरी चिकाटीचे व जिद्दिने काम करणारे कार्येकर्ते आहेत. विरोधी पक्ष ठिकाणे व वाढणे हे लोकशाहीचे दृष्टीने अत्यावश्यक आहे असे पक्ष मानतो.

(समाजावादी पक्षाचा थोडक्यात हा परिचय येथे दिला आहे. हा अहवाल इ. स. १९८९ चा आहे. त्यानंतर त्या पक्षात आता बरीच स्थित्यंतरे झाली व खंड प्रकाशित झाले ला पाहण्यास दुर्देवाने श्री.बापूसाहेब कारंजकर हयात नाहीत. त्यांचा देहान्त दिनांक २१ जुलै इ.स. १९९० रोजी घडला.)

वासुदेव बळवंत खापर्डे

(संपादक खंड ३)

रॅडिकल डेमॉक्रेटिक पार्टी (जहाल लोकपक्ष अमरावती शाखा)

दुसऱ्या जागतिक महायुध्दाचे प्रश्नावर काँग्रेसशी मतभेद होऊन भाई मानवेंद्रनाथ रॉय हे काँग्रेस मधून बाहेर पडले व त्यांनी डिसेंबर १९४० मध्ये डेहरादून येथे रॅडिकल डेमॉक्रटिक पार्टी (जहाल लोकपक्ष) या अखिल भारतीय राजकीय पक्षाची स्थापना केली.

युध्दकाळात काँग्रेसने ब्रिटीश सरकार विरुध्द प्रचार केला तर रॉय यांनी फॅसिस्ट शक्ती विरुध्द मोहीम उभारली होती. त्यासाठी या पक्षाच्या शाखा

प्रांतातून जिल्ह्यातून व स्थानिक पातळीवर उभारण्याचे कार्य नंतर सुरु झाले.

अमरावती शहरात तिसरी मध्येप्रदेश युवक परिषद येथील प्रभात टॉकीज मध्ये दि. ८ डिसेंबर १९४० रोजी भरविण्यात आली होती. या परिषदेचे अध्यक्षस्थान भाई मानवेंद्रनाथ रॉय यांनी भूषविले होते. त्यासाठी भाई मानवेंद्रनाथ रॉय हे आपल्या पत्नी सौ.एलन रॉय यांच्यासह अमरावतीत प्रथमच आले होते.

या परिषदेचे उद्घाटक नागपूरचे डॉ.ना.भा.खरे हे होते आणि स्वागताध्यक्ष श्री.के.जी.जोध वकील होते. महाराष्ट्रातील रॉय वाद्यांपैकी श्री.वामनराव कुलकर्णी (मुंबई) हे या परिषदेला हजर होते.

अमरावती शहर हे राजकीय दृष्ट्या जागृत शहर आहे हे लक्षात ठेवून पुढे येथे रॅडिकल डेमॉक्रेटीक पार्टीची शाखा स्थापन करण्याचे उद्देशाने या पक्षाच्या महाराष्ट्र शाखाचे एक संघटक भाई ह.रा.महाजनी (पुढे मुंबईच्या दै.लोकसत्तेचे मुख्य संपादक) हे १९४३ साली अमरावतीस आले व त्यांनी म्यु. ए.व्हि. स्कूलचे सभागृहात सात दिवसांचा एक अभ्यास वर्गहि घेतला. या अभ्यास वर्गाचा परिणाम होऊन त्या विचारांशी सहमत असलेल्या तरुण बुध्दिवादी अशा लोकांची एक सभा दि. २१ मे १९४३ रोजी श्री.गोपाळ बाजीराव उर्फे बाबासाहेब वऱ्हाडे यांच्या जोशी चौकातील निवासस्थानी होऊन श्री.महाजनी यांचे भाषण झाले. या भाषणात त्यांनी भाई मानवेंद्रनाथ राय यांच्या संबंधीची माहिती सांगून नंतर जहाल लोकपक्षाची भूमिका समजावून सांगितली. त्याच सभेत "रेडिकल डेमॉक्रेटिक पार्टी" च्या अमरावती शहर शाखेची स्थापना करण्यात येऊन जोमाने कार्याला सुरुवात झाली.

या सभेला सर्वश्री सदुभाऊ सराफ, वसंतराव मोंड, वसंतराव गोडबोले, मनोहर कांत, काका पंडीत डॉ.विधाते, बाबासाहेब पळसोतकर, आनंदराव लढके, बाबासाहेब वऱ्हाडे, शंकरराव शेळके, (टेभूर्णी) तात्यासाहेब पितळे, श्रीमती रामाबाई साने वगैरे तरुण मंडळी उपस्थित होती.

यापक्षाचे कार्यासाठी भाई ह.रा.महाजनी हे १९४३ साली जवळ जवळ

वर्षभर अमरावतीत मुक्काम ठोकुन होते. पक्षाच्या कार्यालयासाठी स्टेशन रोडवरील श्री.मैराळ यांच्या वाड्यात भाड्याने जागा घेण्यात आली होती. तेथूनच पक्षाचे सर्व कार्य चालत असे.

पक्षाचे तत्वज्ञान समजावून सांगण्याचे दृष्टीने अमरावती शहरात सतत सात-सात दिवस या काळात पक्षाचे मुखपत्र ''इडिपेन्डेंट इंडिया'' हे इंग्रजी सामाहिक अमरावतीत मोठ्या संख्येने खपत असे.

दुसरे महायुध्द १९४५ साली संपले आणि १९४६ च्या सुरवातीला प्रांतिक कायदे मंडळाच्या निवडणुका लागल्या. या निवडणुकीत पक्षाच्या अमरावती शाखेने भाग घेण्याचे ठरवून ''मध्यप्रांत - वऱ्हाड असे च्या'' पूर्ववऱ्हाड सर्व साधारण शहर मतदार संघातून पक्षाचे भाई गोपाळ बाजीराव उर्फ बाबासाहेब वऱ्हाडे यांना उभे केले परंतु त्यात त्यांचा पराभव झाला. (एप्रिल १९४६)

पुढे वऱ्हाड-निजाम ''संबधावर पार्टीने दि. १० मे १९४७ रोजी जोशी हॉल मध्ये कॉ. शौकत जाफ्री नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा घेतली होती. सभेत कॉ.मो.म.राऊत, आकोट आणि पक्षाच्या मध्यवर्ती राजकीय कौन्सिलचे सदस्य कॉ.व्हि.जी.कर्णिक यांची भाषणे झाली होती आणि श्री.गोविंदराव पळसोतकर यांनी सभेचे संचलन केले होते.

त्या काळात वऱ्हाड निजाम संबंध हा विषय वऱ्हाडच्या जनतेच्या दृष्टीने ज्वलंत प्रश्न असल्याने सभेला गर्दी झाली होती.

दि. १५ ऑगस्ट १९४७ रोजी देशाला स्वातंत्र्य मिळाले आणि जहाल लोकपक्षाचे संस्थापक भाई मानवेंद्रनाथ रॉय यांनी १९४८ साली कलकत्ता येथील अधिवेशनात हा पक्ष विसर्जित करुन या पक्षाचे रुपांतर समाजवादी पक्षात केले होते. (त्यामुळे या पक्षाच्या अमरावती शाखेचे विसर्जनहि याचवेळी आपोआप झाले.)

टीप :- या समाजवादी विचाराचे ''रॅडिकल ह्युमॅनिस्ट'' हे इंग्रजी मासिक बॅरिस्टर तारकुंडे यांच्या संघटकत्वाखाली आजही दिल्ली हून प्रसिध्द होते. या शिवाय भाई

मानवेंद्रनाथ रॉय यांच्या विचारांची ''रॅडिकल ह्युमॅनिस्ट असोसिएशन'' (मुख्य कचेरी. अहमदाबाद) आजही अस्तित्वात आहे.

(भाई आनंदराव लढके, भाई गोविंदराव पळसोतकर आणि भाई सदुभाऊ सराफ यांनी दिलेल्या माहितीचे व १९४० व १९४७ या काळांतील उदय '' पत्राचे अंकाच्या आधारे साभार. संपादक.)

भारतीय कम्युनिस्ट पार्टी

कॉ.व्ही.आय.लेनीन यांनी १९१९ साली स्थापन केलेल्या ''कम्युनिस्ट (थर्ड) इंटर नॅशनल (कॉमिंटन) '' या जागतिक संस्थेची भारतीय कम्युनिस्ट पार्टी ही एक शाखा म्हणून भारतात काम करीत असे. त्यामुळे तत्कालीन ब्रिटीश सरकारने या पार्टीवर बंदी घातली होती. आणि या बंदी असलेल्या संस्थेचे सभासद म्हणून देशाच्या निरनिराळ्या भागात काही थोडे कार्यकर्ते कामगार आणि किसान वर्गात कामकरीत असत. या पक्षाचे सभासद हि अगदी मुठभर पण पक्षाला आपले सर्वस्व वाहिलेल्या कार्यकर्त्या पुरतेच मर्यादित होते.

इ.स. १९३७ पावेतो अमरावतीत (किंवा वऱ्हाडात) या पक्षाची कोठेही शाखा नव्हती. परंतु काही कम्युनिस्ट कार्यकर्ते बडनेरा व अचलपुर येथील गिरणी कामगारांच्या संघटणात भाग घेत असत. त्यांत नागपूरचे भाई एम.एल.जयवंत आणि अमरावती जिल्ह्यातील नेर पिंगळाईचे भाई शेषराव घाटगे हे होते. श्री.घाटगे हे कलकत्त्याहून कम्युनिस्ट विचारांची प्रेरणा घेऊन आले होते. ''अचलपूर गिरणी कामगार संघटनेच्या संदर्भात या दोघांना ही सहा सहा महिने शिक्षा झाली होती.''

अमरावती चे श्री.माधवराव देशपांडे हे १९३१ साली मुंबईत असतांना त्याचा संबंध तेथील कम्युनिस्ट पुढाऱ्यांशी आला नंतर ते लखनौ येथे शिकत असतांना त्यावेळच्या संयुक्त प्रांतातील प्रमुख कम्युनिस्ट नेत्यांशी त्यांचा संपर्क आला. त्यात क्रांतीकारी कॉ.पूर्णचंद्र जोशी, कॉ.अजय घोष कॉ.भारव्दाज आणि कॉ.शफी मकवी हे होते. पदवी परीक्षा उर्त्तीण झाल्या नंतर श्री.माधवरावांनी तेथील गिरणी कामगारांत

संप घडवून आणल्यामुळे संयुक्त प्रांत सरकारने त्यांना हद्दपार केले तेव्हा ते परत अमरावतीत आले (१९३७).

याच वेळी, युरोपातील फॅसिझमच्या उदयामुळे, आंतराष्ट्रीय कम्युनिस्टपार्टीचे धोरणात बदल झाला होता आणि या पक्षाने ''फॅसिझम आणि युध्द विरोधी'' आघाडी तयार करण्याची भूमिका स्वीकारली होती.

वसाहतवादातून मुक्त होऊन स्वातंत्र्यासाठी लढे देणाऱ्या संस्था व कामगार संघटना यांची एक आघाडी तयार करण्याचे धोरण या पक्षाने स्वीकारले होते.

या बदललेल्या धोरणानुसार अर्थातच भारताला ब्रिटिश गुलामगिरीतून मुक्त करुन देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्याचे कार्य करणाऱ्या भारतीय राष्ट्रीय सभेत (काँग्रेसमध्ये) कम्युनिस्टांनी प्रवेश केला व तीत राहून ते आपले कार्य करु लागले.

कॉ.माधवराव देशपांडे हे अमरावतीस येतांच त्यांनीही या धोरणानुसार काँग्रेसमध्ये प्रवेश केला व डॉ.पटवर्धन, डॉ.भोजराज आणि १९३० च्या चळवळीत इतर कार्यकर्त्यांसोबत कार्य करु लागले.

याच सुमारास राष्ट्रीय सभेने कौन्सिलवरील बहिष्कारमागे घेऊन, निवडणुकीत भाग घेण्याचे ठरविले होते. त्यानुसार अमरावती जिल्हा काँग्रेस कमेटीने ''निवडणूक समिती'' निवडली त्याचे चिटणीसपदी कॉ.माधवराव देशपांडे यांची निवड करण्यात आली होती.

१९३७ च्या निवडणुका आटोपल्या. मध्यप्रांतात काँग्रेस पक्षाचे सरकार सत्तारुढ झाले आणि अमरावती जिल्हा कॉ.कमेटीतर्फे श्री.माधवराव व त्यांच्या सहकाऱ्यांनी जिल्ह्यात ठिकठिकाणी किसान परिषदा'' घेऊन शेतकऱ्यांत जागृती निर्माण करण्याचे प्रयत्न सुरु केले. या काळात कॉ.दत्ता परांजपे हे माधवराव यांचे सहकारी म्हणून काम करीत असत. या दोघांनी मिळून अमरावतीतून ''आव्हान'' नावाचे साप्ताहिक सुरु केले होते. (ते सुमारे ११ महिने चालून बंद पडले.)

इ.स.१९३८ साली अमरावती जिल्ह्याच्या मोर्शी तहसीलमधील शेंदुरजना घाट या गावी प्रांतिक राजकीय परिषद दे.भ.शरदचंद्र बोस यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. त्याला जोडूनच त्या मंडपात ''विदर्भ किसान परिषद'' भरविण्यात आली होती. त्यासाठी स्वामी सहजानंद सरस्वती हे आले होते. श्री.दारोकार हे यापरिषदेचे स्वागताध्यक्ष होते. या परिषदेतच ''विदर्भ किसान सभेची'' रीतसर स्थापना करण्यात आली.

त्याच वर्षी अमरावती येथे कॉ.सोली बाटलीवाला यांच्या अध्यक्षतेखाली ''नागरिक स्वातंत्र्य परिषद घेण्यात आली त्याचे स्वागताध्यक्ष कॉ.दत्त परांजपे हे होते.

कम्युनिस्ट कार्यकर्त्यांनी १९३८-३९ मध्ये अमरावतीत ''तांगा युनियन'' आणि गिट्टी फोडणाऱ्या मजुरांची ''मेटल कामगार युनियन'' व बडनेरा आणि अचलपूर येथेही (१९४०) गिरणी कामगारांच्या युनियन्स स्थापन केल्या होत्या.

याच काळात दे.भ. इंदुलालजी याज्ञिक यांच्या प्रोत्साहनाने पहिला ''किसान मोर्चा '' जिल्हा कचेरीवर नेण्यात आला होता.

याच काळात काँग्रेसमधून बाहेर पडून श्री.रंगनाथपंत गिरगांवकर, श्री.हातोळीकर, श्री.माधवराव देशकर, डॉ.दिवाणजी, श्री. बळवंतराव देशपांडे आणि श्री.के.डी.देशपांडे, हे जहाल चळवळीत भाग घेऊ लागले.

संदर्भ :-

१. मानवेंद्रनाथ रॉय व्यक्ती व विचार दा.भा.कणिक पृ. ९४-९५.

२. मानवेंद्रनाथ रॉय पृ. १०१.

३. जिल्हा कम्यु. पार्टी व चळवळीचे सिंहावलोकन (पृ.२२) साभार. संपादक)

१९३८ साली खामगांवच्या मेहतरांचे संपानंतर कम्युनिस्ट पार्टीची ''बेरार कमेटी'' स्थापन करण्यात आली. कॉ.माधवराव देशपांडे, कॉ.दत्ता परांजपे

आणि कॉ.ओम प्रकाश मेहता हे याकमेटीचे सदस्य होते. या प्रमाणे १९३८ साली वऱ्हाडात (आणि अमरावतीत) कम्युनिस्टपक्षाची शाखा प्रथम सुरु झाली. या बेरार कमेटीची कचेरी अमरावतीत होती. नंतर अमरावती शहर हे वऱ्हाडातील मार्क्सवादी चळवळीचे केंद्रच बनले होते.

(खामगांवचे संपापूर्वी पहिले मार्क्स वादी स्टडी सर्कल आयोजित करण्यात आले होते. खामगांवचे संपात कॉ.ओमप्रकाश मेहता, कॉ.माधवराव देशपांडे, कॉ.दत्त परांजपे यांना व इतरांना पाच ते आठ वर्षाची शिक्षा झाली होती. या लढ्यातून कॉ.अच्युत देशपांडे व भाई बी.जी.मेश्राम हे दोन खंदे कार्यकर्ते कम्यु. पक्षाला मिळाले होते. नंतर पक्षाने ठिकठिकाणी मेहेतर युनियन्स स्थापन केल्या.)

याप्रमाणे पक्षाच्या जहाल चळवळची सुरुवात झाली व त्याचे केंद्र अमरावती येथे सुरु झाले. या केंद्रात (कार्यालयात) वृत्तपत्रे व पुस्तके ठेवण्यात येऊ लागली. कार्यकर्त्यांशी चर्चा सूरु झाल्या आणि कार्याची आखणी होऊ लागली.

''१९३९ मध्ये दुसरे जागतिक महायुध्द पेटले. त्यामुळे भारतात महागाई टंचाई वाढू लागली. ग्रामीण भागात टंचाई विशेष जाणवत असे. या पक्षाने त्यावेळी चांदुर तालुक्यात या टंचाई विरुध्द चळवळ सुरु केली होती. त्या भागातील लोकांचे पुढारी श्री.बळवंतराव देशपांडे, नी.शंकरराव दिघाडा, श्री.बाबा मुळे, श्री.दापुरीकर मास्तर, श्री.माणिकराव देशमुख ह्यांनी या चळवळीत हिरीरीने भाग घेतला होता. नंतर हे सर्व कार्यकर्ते कम्युनिस्ट पक्षाचे सदस्य झाले होते. कुऱ्हाचे राष्ट्रीय स्वयंमसेवक संघाचे खंदे कार्यकर्ते श्री.सुमेरसिंग नाहाटे, कॉ.कन्नू श्री.वास्तव आणि कॉ.समेरसींग हे माधवराव यांच्या संपर्कामुळे पक्षात आले होते.

अमरावती जिल्ह्यात कामगार व किसान आघाडीवर याप्रमाणे कार्याला सुरुवात झाली. बरेच कार्यकर्ते पक्षाला मिळू लागले आणि व वऱ्हाडच्या चारहि जिल्ह्यात कम्युनिस्ट विचार सरणीचे कामाला सुरुवात झाली. आकोला येथे श्री.कन्हैय्यालाल , श्री.वास्तव व कॉ.दत्ता परांजपे यांचे नेमणूक झाली. यवतमाळ व

बुलढाणा जिल्ह्यात कॉ.माधवराव देशपांडे यांनी पक्ष बांधणीचे कार्य सुरु केले आणि स्थानिक स्वरुपाच्या मागण्यांवर ह्यांनी चळवळी सुरु केल्या.

(अमरावती जिल्हा कम्यु. पक्ष चळवळीचे सिंहालोकन : पृ. ४ व ५ वरुन साभार.)

१९४० मध्ये बडनेरा येथे डॉ. दिवाणजी यांनी युध्दाला मदत करु नका या आशयाची पत्रके वाटल्यामुळे आणि पिकेटिंग आयोजित केल्या मुळे त्यांच्या घराची झडती घेण्यात आली. त्यामुळे वातावरण तापले. या घटनेचा परिणाम होऊन, बडनेरचे कॉ.सुदाम देशमुख, श्री.पांडुरंग सावरकर इत्यादी तरुण पक्षात सामील झाले.

विद्यार्थी वर्गात कार्याला सुरुवात :-

दि. ७ फेब्रुवारी १९४१ रोजी, अमरावती किंग एडवर्ड कॉलेज (हल्लीचे विदर्भ महाविद्यालय) मधील एक विद्यार्थी श्री.दिगंबर टाले याने अफू खाऊन आत्महत्या केली होती. ही बातमी दुसरे दिवशी शहरात पसरताच विद्यार्थी वर्गात भयंकर चळवळ निर्माण होऊन, त्यांनी तेथील प्राचार्यांच्या विरोधासाठी कॉलेज बंद पाडले. नंतर हे लोण इतर शाळांतून पोचल्याने, विद्यार्थी वर्गात चैतन्य निर्माण होऊन त्यांच्यात एकजूट झाली.

या प्रकरणात स्थानिक कम्युनिस्ट कार्यकर्त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. त्यामुळे अनेक विद्यार्थी नेते व कार्यकर्ते कम्यु. चे संपर्कात येऊन, पुढे त्यातील श्री.नाना मुळे श्री.वासुदेव देशपांडे, श्री.प्रभू खरे, श्री.आठवले, श्री.विजय पटवर्धन, श्री.राजाभाऊ सबनिस व श्री.राजदेकर हे कार्यकर्ते आणि कु.वत्सला केकरे ही विद्यार्थीनी पार्टीचे सभासद बनले होते.

फॅसिस्ट विरोधी मेळावा-कम्युनिस्ट प्रणीत विदर्भ किसान सभे तर्फे अमरावतीच्या नेहरु मैदानात दिनांक २० मे १९४२ रोजी विदर्भ किसान परिषदेचे दुसरे अधिवेशन आणि फॅसिस्ट विरोधी मेळावा गुजराथचे किसान नेते दे.भ.इंदूलालजी याज्ञीक यांच्या अध्यक्षतेखाली भरविण्यात आला.

या मेळाव्याला सुमारे १० हजार लोक उपस्थित होते. त्यापैकी ५ हजार शेतकरी आणि तितकेच कामगार व इतर लोक होते.

या मेळाव्यासाठी नेहरु मैदानात उभारलेले भव्य व कलात्मक व्यासपीठ तोफ बसविलेल्या चिलखती रणगाड्या सारखे, हुबेहुब केलेले होते व पार्श्वभागी पंधरा फुट उंचीची शेतकरी -कामकरी जोडप्याची भव्य प्रतिभा लावलेली होती. तसेच व्यासपीठावर आणि सर्वत्र विळाकोयत्याचे चिन्ह असलेले लालध्वज फडकत होते. मेळाव्याठी एकत्र आलेल्या कम्यु. कार्यकर्त्यांचे एक स्टडीसर्कल कॉ.बालाजी हुद्दार यांनी घेतले होते. त्याच प्रमाणे ए.व्हि.स्कूलच्या हॉलमध्ये इंडे सोवियत प्रदर्शनही भरविण्यात आले होते.

या मेळव्यासाठी पार्टीच्या व किसान सभेच्या कार्यकर्त्यानी, वऱ्हाडात सर्वत्र प्रचार दौरे आणि सभांचा धुमधडाका उडवून दिला होता.

पार्टीवर बंदी उठली :-

दुसऱ्या महायुध्दाचे काळात १९४२ साली हिटलरने सोवियत रशियावर हल्ला केल्याने, इंग्लंड, अमेरिका, फ्रांन्स व रशियत ही दोस्त राष्ट्रे बनली. परिणामत: कम्युनिस्टपार्टीने 'फॅसिझम विरुध्द लोकशाही च्या तत्वानुसार या युध्दाला मदत करण्याचे धोरण स्वीकारल्यामुळे ऑगस्ट १९४२ चे सुरुवातीलाच हिंदुस्थानातील कम्यु. पक्षावरील बंदी तत्कालीन इंग्रज सरकारने मागे घेतली आणि हा पक्ष कायदेशीर म्हणून वापरु लागला.

पक्ष कायदेशीर झाल्यानंतर कम्युनिस्ट पक्षातर्फे पहिली जाहीर सभा विदर्भ किसान सभेचे आचार्य त्र्यंबक गुरुजी यांच्या अध्यक्षतेखाली जोशी सभागृहात दिनांक ६ ऑगस्ट १९४२ रोजी घेण्यात आली होती. त्यांत कॉ.माधवराव देशपांडे यांचे प्रमुख भाषण झाले होते.

'कॉग्रेसने स्वीकारलेले धोरण हे हताश मनोवृत्तीचे प्रतीक आहे.' असा वक्त्यांचे भाषणाचा या सभेत सूर होता. कम्यु. पार्टीवर बंदी असतांना, इ.स १९३८ ते

१९४२ (ऑगस्ट) पर्यंत कम्युनिस्टांच्या विविध संघटनांत संपूर्ण वेळ देऊन कार्य करणारे अमरावती व आकोला विभागातील प्रमुख कार्यकर्त्यांची यादी -

अमरावती - आचार्य त्र्यं. गं. जोशी, रं.मा. गिरगांकर, माधवराव देशकर (कॉंग्रेस व किसान सभा), के.डी.देशपांडे, बाबूराव मुळे, नि.त्र्यं.राजदेरकर, नाना मुळे, राजाभाऊ सबनिस (विद्यार्थी संघटणा), भाई नथ्थुजी मंगळे.

बडनेरा - डॉ.दिवाणजी, श्री.पांडुरंगपंत सावरकर, कॉ.सुदाम देशमुख,

चांदूर रेल्वे - श्री.बळवंतराव देशपांडे, श्री.बाबा मुळे, शंकरराव दिघडे

मोर्शी - (नेरपिंगळाई) - भाई शेषराव घाटगे.

अचलपूर - भाई सुदाम देशमुख, श्री.देशपांडे, श्री.चिमणपुरे (कामगार संघटना)

आकोला - श्री.कन्हैय्यालाल, श्री.वास्तव, श्री.बी.जी.मेश्राम, (कामगार संघटना) श्री.अच्यूत देशपांडे.

श्री.माधवराव देशपांडे हे या काळात कॉंग्रेसमध्ये राहून किसन चळवळ आणि विद्यार्थी संघटनेचे काम पहात. तर भाई दत्ता परांजपे व भाई ओमप्रकाश मेहता हे कामगार संघटनेचे मार्गदर्शन होते, वरील कार्यकर्त्यांना, पक्षावरील बंद उठल्यानंतर १९४२ साली पक्षात समाविष्ट करुन घेण्यात आले.

याप्रमाणे १९३८ पासून अमरावती भारतीय कम्युनिस्ट पक्ष कार्य करु लागला होता. १९४२ नंतर म्हणजे पार्टीवरील बंदी उठल्या नंतर पक्षाच्या नांवाने कार्य सुरु झाले.

परंतु भारतीय जनता इंग्रज सरकारच्या विरुध्द होती आणि फॅसिझमचा विजय झाल्यास त्याचे काय परिणाम होतील याची जाणीव देशांतील फार थोड्या लोकांना होती. बहुसंख्य जनता कॉंग्रेसच्या मागे होती. आणि कॉंग्रेस नेते मोठ्या अडचणीत सापडले होते.

नंतर (१९४३-४४) साली देशाच्या बंगाल प्रांतात भयानक अन्न टंचाई

उपासमार सुरु होऊन लक्षावधी लोक बळी पडले. त्याकाळात अमरावतीत बंगाल दुष्काळ फंड, १९४४ साली 'भुका बंगाल' नांवाचे एक प्रदर्शन न्यू हायस्कूल इमारतीत भरविण्यात येऊन बंगाल मधील उपासमारीचे तांडव किती भयंकर आहे याची जाणीव लोकांना करुन दिली होती. या शिवाय वर्षी बंगालमध्ये एक सुश्रूषा पथकही आचार्य त्र्यंबक गुरुजी यांच्या नेतृत्वाखाली पक्षातर्फे पाठविण्यात आले होते. दिनांक ९ जुर्ले १९४४ रोजी हे पथक बंगालला रवाना झाले आणि या पथकाने बंगालमधील चोवीस परगणा, रंगपूर वगैरे भागात सहा महिने सुश्रूषा कार्य केले.

टिमटाला खटला :- अमरावती तालुक्यातील टिमटाला या गांवी डाका पडला होता. या प्रकरणी कम्युनिस्ट पक्षाचे कार्यकर्ते भाई विश्वासराव देशमुख इत्यादी कार्यकर्त्यांना पकडण्यात येऊन डाक्याचे आरोपाखाली त्यांचे विरुध्द खटला भरण्यात आला होता. पुढे हा खटला हायकोर्टात गेला व तेथे आगस्ट १९४४ मध्ये हायकोर्ट निकाल देऊन पांच आरोपींना निर्दोष ठरविले होते तर दोघांच्या शिक्षेत घट केली होती.

सर्वश्री सुदाम देशमुख, भाई डव्ल्यू. एन.देशपांडे, भाई सावरकर, श्री.कदम व श्री.देवराव हे निर्दोष ठरले व श्री.विश्वासराव देशमुख आणि श्री.लक्ष्मणसिंह परिहार यांच्या शिक्षेत घट करुन ती ३ वर्षे करण्यात आली होती.

१९४६ साली डॉ. दिवाणजी कॉ.मोटे, धानराज आचार्य आदि कार्यकर्त्यांना सुरक्षा कायद्याखाली तीन महिने बंद केले होते. या कायद्याने लोकशाही स्वातंत्र्याची गळचेपी होते म्हणून 'ये आजादी झूटी है' ची घोषणा पार्टीने केली. त्यामुळे पार्टीवरच बंदी घालण्यात आली होती.

या वेळे पावेतो कम्युनिस्ट पार्टीचा प्रभाव निरनिराळ्या कामगार संघटनांत, विद्यार्थी संघटनात, आणि किसान वर्गात वाढला होता. त्या सुमारासच मिल कामगार, शिक्षक, भंगी, शेतकरी आदी आंदोलन सुरु झाले. संप झाले. पक्षाचे अनेक कार्यकर्ते जेलमध्ये गेले, तर कॉ.माधवराव देशपांडे कॉ.सुदाम देशमुख व कॉ.शंकरराव दिघडे हे भूमिगत झाले होते. याच सार्वजनिक धरपकडीमुळे अचलपूर

गिरणी कामगारांनी सातत्याने तीन दिवस पर्यत मिलच्या आंतच ठाण देऊन पालिस जूलूमशाही विरुध्द लढा दिला. या लढ्यातून पक्षाला कॉ.धनाडे, कॉ.भिमराव देशमुख, कॉ.विठ्ठलपूरी, कॉ.दादा कथलकर, कॉ.मधुकर वैद्य, कॉ.सरनासिंग करारे इत्यादी कार्यकर्ते मिळाले.

या नंतर अचलपूर गिरणी कामगार संघटनेची जबाबदारी कॉ.सुदाम देशमुख यांचेवर आणि बडनेरा गिरणी कामगार संघटनेची जबाबदारी डॉ.दिवाणजी यांचेवर सोपविण्यात आली.

महागाई विरोधी चळवळीचे लोण कामगारांत पोचले कामगारांच्या मागण्या व चळवळी मोठ्या प्रमाणावर संघटित करण्यासाठी डॉ.दिवाणजी यांच्या सूचनेवरुन भाई रामभाऊ रुईकर (नागपूर) यांच्या अध्यक्षतेखाली राज्य व्यापी प्रमाणावर पहिले (देशातील एकमेव) गिरणी कामगार फेडरेशन स्थापन झाले होते.

पुढे डॉ.दिवाणजी यांच्या अटकेचे निषेधार्थ बडनेरा गिरणी कामगारांचा चार हजाराचा मोर्चा अमरावती येथे पायी आणण्यात आला होता. त्यापूर्वी तिवसा या गांवी किसान सभेचे अधिवेशन डॉ.दिवाणजी यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आले होते. त्यातून शेंदूरजना निंभारा कुऱ्हा, तिवसा ही गावें पक्ष कार्याची केंद्र बनली आणि चांदूर (रेल्वे) तालुका हा कम्युनिस्ट पक्षाचा बाले किल्ला बनू लागला होता.

त्यापूर्वी दिनांक २४ फेब्रुवारी १९४७ पासून अमरावतीत प्राथमिक शिक्षकांचा व पुढे दिनांक १५ मार्च पासून मेहेतरांचा संप सुरु झाला होता. या संप मुळे शहरातील प्राथमिक शाळा बंद पडल्या आणि शहराचे जीवन मेहेतर संपाने विस्कळीत करुन टाकले. यापैकी मेहेतर संपात आचार्य त्र्यंबक गुरुजी आणि कॉ.बाबूराव मुळे यांना १७ मार्च रोजी अटक झाली होती.

ह्या काळातच मध्यप्रांत वऱ्हाडातील १५ हजार प्रा. शिक्षक ३५ हजार गिरणी कामागर आणि १ हजार मेहेतर मिळून पन्नात हजार कामगार संपावर होते.

अमरावतीचा मेहेतर संप २४ मार्च ४७ रोजी आणि प्रशिक्षकांचा संप

२५ मार्च ४७ रोजी संपुष्टात आला होता.

या प्रमाणे कम्यूनिस्ट पक्षाने अमरावतीत व जिल्ह्याचे काही भागात आपले पाय भक्कम रोवले होते. या वेळेपर्यंत अनेक खंदे कार्यकर्ते या पक्षाला मिळाले. कामगार-शेतकरी-विद्यार्थी वर्गात पक्षाचे कार्य वाढू लागले होते.

स्वातंत्र्योत्तर काळात झालेल्या पहिल्या सार्वत्रिक निवडणूकीत १९५२ साली या पक्षाने अमरावतीतून डॉ.दिवाणजी, अचलपूरहून कॉ.सुदाम देशमुख आणि चांदूर (रेल्वे) हून कॉ.सुमेरसिंग नाहाटे यांना प्रांतिक विधान सभेसाठी उभे केले होते. परंतु त्यात ते पराभूत झाले. मात्र जनसंपर्क आणि आपल्या विचारांचा प्रचार या दृष्टीने ह्या निवडणुकी त्या पक्षाला उपयुक्त ठरल्या असे दिसून येते.

यापूर्वी १९५० साली बडनेरा नगरपालिकेच्या निवडणुकीत डॉ.दिवाणजी हे नगरध्यक्ष म्हणून प्रत्यक्ष मतदाराकडून निवडून आले होते.

त्यानंतरही या पक्षाचे कार्य शहरात आणि जिल्ह्याच्या विविध भागात अव्याहत चालू आहे. नवनवीन कार्यकर्ते पक्षात आलेले आहेत. या पक्षाच्या चळवळी आणि इतर कार्यासंबंधी कॉ.रंगनाथपंत गिरगांवकर यांनी भारतीय कम्युनिस्टपक्षाच्या ५० व्या वर्धापन दिनानिमित्त, जिल्हा पक्षाच्या कार्याचे सिंहावलोकन करणारी एक चाळीस पानी पुस्तिका प्रकाशित केलेली आहे. स्वातंत्र्यपूर्व काळातील कम्यु. पक्षाच्या कार्याचे संक्षिप्त विवेचन येथे केलेले आहे.'

'कॉ.माधवराव देशपांडे व कॉ.डी.जे.परांजपे या जोडीने या जिल्ह्यात मार्क्सवादी चळवळीचा पाया घातला व त्यांच्या प्रयत्नानेच या जिल्ह्यात कम्युनिस्ट पक्ष स्थापन झाला.' असा निर्वाळा जिल्हा कम्यु. पक्ष यांनी आपल्या सिंहावलोकनांत दिलेला आहे.

अखिल भारतीय कम्यु. पक्ष

कॉंग्रेसमधील श्री.सत्यभक्त या नांवाचे डाव्या विचार सरणीचे गृहस्थाने डिसेंबर १९२५ मध्ये कानपूर येथे एक अखिल भारतीय कम्युनिस्ट परिषद बोलावली होती.

श्री.सिंगार-वेळू हे परिषदेचे अध्यक्ष आणि श्री.हजरत मोहानी हे स्वागताध्यक्ष होते. या परिषदेला मुंबई, मद्रास, कलकत्ता व लाहोर येथील अनेक कम्युनिस्ट हजर होते. या परिषदेतच 'कम्युनिस्ट पार्टी ऑफ इंडिया' या नावाने पक्षाची स्थापना करण्यात आली. श्री.बागंरहट्ट हे काँग्रेसमधील डाव्या विचाराचे कार्यकर्ते आणि श्री.एस.व्हि.घाटे हे दोघे चिटणीस म्हणून निवडण्यात आले. पक्षाची कचेरी मुंबई येथे ठेवण्याचेहि याच वेळी ठरविण्यात आले होते. परिषदेने कम्युनिस्ट इंटरनॅशनलशी संबंध न ठेवता सर्वस्वी भारतीय पक्ष म्हणूनच राहील अशा घोषणा केली होती. या पक्षाचे नेतृत्व कॉ.मुजफ्फर अहमद, कॉ.घाटे व कॉ.जोगळेकर वगैरे मंडळीकडे होते. (कॉ.डांगे आणि कॉ.शौकत उस्मानी हे दोघे कानपूर खटल्यात शिक्षा झाल्याने तुरुंगात होते.

भारताच्या ब्रिटिश राज्यकर्त्यांची करडी नजर या कम्युनिस्टावर होती. म्हणून डिसेंबर १९२८ साली कलकत्ता येथे एका परिषदेत अखिल भारतीय कामगार शेतकरी पक्षाची स्थापना करण्यात आली आणि अखिल भारतीय स्वरुपाचे एक कायदेशीर कवच भारतीय कम्युनिस्ट पक्षाने निर्माण केले होते. ही संघटना कम्युनिस्ट पक्षाने निर्माण केली होती. ही संघटना कम्युनिस्टांची नाही हे दिसावे म्हणून या नव्या पक्षात काही डावे कॉग्रेस वाले आणि काही लढावू कामगार प्रतिनिधी घेण्यात आले होते.

१. मानवेंद्रनाथ रॉय : व्यक्ती व विचार : हा.भ. कर्णिक प ९४-९५

२. मानवेंद्रनाथ रॉय : व्यक्ती व विचार : व्दा.भ. कर्णिक पृ. १०१.

१. माधवराव देशपांडे यांनी दिलेली माहिती, कॉ.जिल्हा कम्यु. पक्षाची 'सिहांवलोकन' आणि १९४० ते १०४७ चे उदयाचे अंक याचे आधारे.

(साभार संपादक)

शेड्यूलकास्ट फेडरेशन.

इ.स. १९४२ मध्ये नागपूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी अखिल भारतीय शेड्यूल कास्ट फेडरेशनची स्थापना केली व त्यानंतर लगेच या फेडरेशनच्या

शहर व जिल्हा शाखा अमरावतीला स्थापन करण्यात आल्या. अध्यक्ष म्हणून श्री.के.एन.पाटील निवडले गेले होते. १९५७ पावेती शेड्युलकास्ट फेडरेशन अस्तित्वांत होते. त्यानंतर डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे आदेश नुसार फेडरेशन बरखास्त करण्यात आले व नंतर रिपब्लीकन पार्टी' या नांवाने हा पक्ष काम करुं लागला.

अमरावतीच्या 'युवक परिषदा'

इ.स. १९३१ मध्ये पहिली 'युवक परिषद' (युथ कान्फरंस) गणेश थिएटर (हल्लीचे प्रभात) मध्ये श्री.युसुफ मेहेरअल्ली (मुंबई) यांच्या अध्यक्षतेखाली झाली. काँग्रेसमधील युवकांनी या परिषदेचे आयोजन केले होते.

दुसरी युवक परिषद दिनांक ३१ डिसेंबर १९३८ मध्ये डॉ.ना.भा.खरे (नागपूर) यांचे अध्यक्षतेखाली चित्रा टॉकीजमध्ये भरली होती.

तिसरी म.प्र.युवक परिषद दिनांक ५ फेब्रुवारी १९४० रोजी प्रभात टॉकीजमध्ये वीर के. एफ.नरिमन (मुंबई) यांचे अध्यक्षतेखाली भरली होती.

चौथी मध्यप्रांत -वऱ्हाड युवक परिषद जागतिक कीर्तीचे क्रांतीकारक श्री.मानवेंद्रनाथ रॉय यांच्या अध्यक्षतेखाली प्रभात थिएटरमध्ये दिनांक ८ व ९ डिसेंबर १९४० रोजी भरली होती व मध्यप्रांत -वऱ्हाडचे माजी मुख्यमंत्री डॉ.खरे यांनी परिषदेचे उद्घाटन केले होते.

भाई मानवेंद्रनाथ रॉय यांचे सोबत सौ.एलन रॉय आणि मुंबईचे भाई कुळकर्णी हे या परिषदेसाठी आले होते.

सोमवारी रात्री जोग चौकात भाई एम.एन.रॉय यांचे जाहीर भाषाण झाले तेव्हा एक मेलेला मोठा साप श्रोत्यांवर फेकण्यात आला होता व गांधीजींचा जयजयकार करुन सभा उधाळण्याचा प्रयत्न केला गेला होता. भाई एम.एन.रॉय हे फॅसिस्ट जर्मनी विरुध्द दोस्त राष्ट्रांना मदत करावी असे म्हणणारांपैकी एक होते.

वरील दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या युवकपरिषदेचे संयोजक अमरावतीचे श्री.के. गो.जोध वकील हे होते.

बुवाबाजी विध्वंसक परिषद.

इ.स. १९४६ च्या आगस्ट महिन्याचे १८ तारखेला डॉ.जोशी हॉलमध्ये बुवाबाजी विध्वंसक परिषद पं. दिवेकर शास्त्री यांच्या अध्यक्षतेखाली भरली होती. या परिषदेत बरीच वादावादी झाली व प्रकरण हातघाईला आले होते. अशा प्रकारची अमरावतीत भरलेली ही पहिलीच परिषद असून तिचे संयोजक श्री.के.गो.जोध वकील हे होते. या परिषदेत श्री.अकर्ते वकील, श्री.नानासाहेब बामणगांवकर (संपादक उदय) आणि श्री.नानासाहेब नवाडे ह्यांनी भाग घेतला होता.

निजामाशाही विरोधी परिषद

वऱ्हाडवर निजामाचा सतत डोळा होताच इ.स. १९४८ मध्ये हैद्रबाद संस्थानांत रझाकारांनी धुमाकाळ सुरु केला. शेवटी भारत सरकारला पुढे यात हात घालावा लागला. तरी वऱ्हाडवरील आपले स्वामीत्वाची टिमकी निजामाकडून सुरुच होती. त्या संदर्भातच दि.२४ मे १९४८ रोजी अमरावती येथे सातारा जिल्ह्याचे नेते श्री.किसनवार यांच्या अध्यक्षतेखाली निजामशाही विरोधी परिषद भरुन निजामाच्या वऱ्हाडवरील स्वामीत्वाला त्यात सडेतोड उत्तरे देण्यात आलीत, श्री.के.गो.जोध वकील आणि श्री.किसनवीर यांच्या भाषणाने ही परिषद गाजली.

जेथे निजामाचे ध्वजाला दर वर्षी १ जानेवारीला तोफांची सलामी दिली जाई त्याच अमरावती शहरात ही परिषद भरविणे खरोखरच औचित्यपूर्ण होते. ब्रिटिश आमदनीत उतरावतीच्या कमिश्नर कचेरीत दरवर्षी निजामाचा वाढ दिवस मोठ्या थाटाने साजरा केला जाई व त्या निमित्त परेड आणि पानसुपारी होत असे स्वातंत्र्यनंतरही प्रथा बंद झाली.

राष्ट्रसेवादल

''स्वातंत्र्याच्या लढ्यामध्ये १९२३ साली नागपूरचा झेंडा सत्याग्रह झाला. राष्ट्रीय झेंड्याचा अपमान करुन तो शासनाकडून खाली खेचण्यात आला.

त्याविरुध्द हे आंदोलन होते. सर्व देशातून निरनिराळ्या प्रांतातील सत्याग्रही नागपूरला गेले. त्यांनी सत्याग्रह करुन कारावास पत्कारला. तुरुंगात असतांना सेवादल चळवळीचे पितामह डॉ.ना.सु.हर्डीकर यांना असे आढळून आले की, सत्याग्रह्यांची झेंड्याच्या अपमाना बद्दलची भावना तीव्र होती. परंतु सत्याग्रही तरुणांमध्ये शिस्त आणि पध्दत दिसून आली नाही. डॉ.हर्डीकर यांनी तुरुंगातील कार्यकर्त्याबरोबर यासंबधी विचारविनिमय करुन त्यातूनच अखिल भारतीय पातळीवर स्वयंसेवक संघटना निर्माण करण्याचा संकल्प जाहीर झाला.

''राष्ट्रीय चळवळीतील सर्व महान पुढाऱ्यांना तरुण पिढीच्या शिक्षणाबाबत आस्था असल्यामुळे राष्ट्रीय शिक्षणाचा कार्यक्रम घोषित करण्यात आला. परंतु त्या दृष्टीने सातत्याने प्रयत्न होऊ शकले नाहीत. लो. टिळकांनी राष्ट्रीय शिक्षणाचा प्रयोग केला. परकीयांनी सुरु केलेल्या शिक्षण प्रणालीत राष्ट्रीय भावना विद्यार्थ्यांना शिकवली जाईल हे शक्यच नव्हते. पुढे म. गांधीनीही असहकारितेच्या चळवळीत शाळा कॉलेजांवर बहिष्कार घालण्याचा कार्यक्रम दिला होता. त्यापूर्वीच ठिकठिकाणी राष्ट्रीय शाळाही पूर्वीच निघाल्या होत्या. परंतु त्यात सातत्य राहू शकले नाही. युवक चळवळीचा स्वतंत्रपणे विचार सुरु झाला. १९२३ साली कोकोनाडा येथे काँग्रेसचे अधिवेशन झाले. या अधिवेशनात प्रथमहिन्दुस्थानी सेवा दलाची स्थापना झाली. पं.जवाहरलाल नेहरु अध्यक्ष आणि डॉ.हार्डीकर चिटणीस बनले.

''.... १९३६ साली पं. जवाहरलाल नेहरु महाराष्ट्रात दौऱ्यांवर आले होते. त्यावेळी त्यांचे कार्यक्रम व्यवस्थितपणे पार पाडण्यास काँग्रेसपाशी स्वयंसेवक संघटना उरलीच नव्हती. त्यासाठी राष्ट्र सेवादल या नावाने एक तात्पुरते स्वयंसेवक पथक स्थापन करण्यात आले होते. परंतु ही घटना नैमित्तिक स्वरुपाची होती. पुढे फैजपुर काँग्रेसच्या वेळी म्हणजे १९३६ साली, रावसाहेब पटवर्धन यांच्या नेतृत्वाखाली अधिवेशनाचे कामकाज करण्यासाठी म्हणून जे स्वयंसेवक दल उभारण्यात आले, त्याचे नाव ''राष्ट्र सेवा दल'' असेच राहिले परंतु ते कामही सातत्याने झाले नाही.''

''. . . .अहमदनगर मध्ये आचार्य कृपालानी यांची एक सभा हिंदू राष्ट्रवादी तरुणांनी उधाळली. महायुध्दाबाबात काँग्रेसचा पवित्राही त्यांना मंजूर नव्हता. उलट तरुणांनी सैन्यात शिरावे या धोरणाचे ते पुरस्कर्ते होते. काँग्रेस मात्र साम्राज्य युध्दाच्या विरुध्द असल्यामुळे 'न एक पाई,न एक भाई' ही घोषणा घेऊन युध्द विरोधी प्रचार करीत होती. अशा परिस्थितीत तुरुंगाबाहेर असलेल्या शिरुभाऊ लिमये, नानासाहेब गोरे, वि.म.हर्डीकर इत्यादी राष्ट्रवादी मित्रांनी एक शिबिर १९४१ च्या मे च्या शेवटच्या आठवड्यात पुणे येथे घेतले होते.

सेवादल आणि संघ यामध्ये वितुष्ट आहे आणि एक निराळी शक्ती उभी राहात आहे हे त्यांना जाणवते होते. खेड्यातील ब्राम्हणेतर तरुण मंडळी आमच्याकडे आकृष्ट होत आहेत हे विशेष महत्वाचे होते. संघ आणि सेवा दल यांच्यामध्ये संघर्ष वाढू नये, वितुष्ट तर येऊच नये, असे त्यांचे म्हणणे होते. तेव्हा मी त्यांना म्हणाली 'आम्हा हिंदू, मुस्लीम, शीख, इसाई या सर्वाचे मिळून भारतीय राष्ट्र मानतो. आमचा राष्ट्रवाद अजातीय आहे, तुम्ही तर हिंदू राष्ट्रवादाचे पुरस्कर्ते आहात.

पंढरपूर येथील मंदिरात दलितांना प्रवेश नाही ही गोष्ट विशेष बोचणारी होती. म.गांधीशी एकरुप झालेले आणि राष्ट्रसेवा दलाला आपला श्वासोच्छ्वास समजणारे पूज्य साने गुरुजी यांनापंढरपूरच्या मंदिरात दलितांना प्रवेश नाही, ही गोष्ट असह्य झाली. त्यांनी त्यासाठी उपोषण करण्याचे घोषित केले. एकदम उपोषणकरणे योग्य नाही, प्रथम आपली भूमिका लोकांना समजवून दिली पाहिजे, ही गोष्ट सेनापती बापटांनी त्यांच्या गळी उतरविली. तेव्हा गुरुजींनी सहा महिनेपर्यत उपोषणाचा कार्यक्रम स्थगित केला. त्या काळात महाराष्ट्रभर दौरा करुन आपली भूमिका त्यांनी विशद करुन सांगितली. सेनापतीबापटही त्यांच्याबरोबर होते. सेवादलाला देखील त्यांच्या या कार्यक्रमामुळे एक नवा कार्यक्रम मिळाला. कला पथकाचा उदय या दौऱ्यातून झाला असे म्हणावयास हरकत नाही. माझे मित्र कवी वसंत बापट त्या दौऱ्यात त्यांच्याबरोबर होते. तसे पाहिले तर राष्ट्रसेवादलाला सुरुवातीपासून कविवर्य बापट नव्या युगाला अभिप्रेत अशा कल्पना देणाऱ्या आणि संस्कार करणाऱ्या कविता देत

राहिले आहेत. वसंत बापट नुसते कवी नाहीत, ते एक नटही आहेत. गुरुजींच्या या दौऱ्यात त्यांनी महाराष्ट्र शाहीर या नावाने कलापथम संघटित करुन लोक शिक्षणाचे कार्य प्रभावीपणाने केले. या कलापथकात वसंत बापट यांच्याबरोबर राजा मंगळवेढेकर, लीलाधार हेगडे, राघु अण्णा लिमये इ. मंडळीनी ही जीव ओतून काम केले. ही सारी मंडळी सेवादलातील. त्यामुळे त्यांनी सेवादलाच्या कार्याला लोकरंजनातून लोकशिक्षण हे नवे विस्तार क्षेत्र मिळवून दिले. या कलापथकाचा विकास पुढे आवाबेन देशपांडे, सुधा बर्वे इत्यादी भगिनींनीही केली. विलेपार्ल्यातील पु.ल.देशपांडे - उमाकांत देशपांडे यांचा तर कलापथक वाढविण्यात विशेष उपयोग झाला. पु.ल. चा 'पुढारी पाहिजे' हा तमाशा रंगला. आज महाराष्ट्रात आणि सबंध देशभर सेवादलाच्या स्मिता पाटील, निळू फुले, राम नगरकर, मधु कदम अशा निष्णात कलाकरांची नावे घेतली जातात.

राष्ट्रसेवादलाची स्थानिक शाखा खापर्डे बगीच्यात होती व इतर अनेक शाखा राजापेठ वगैरे मोहोल्ल्यांत होत्या. एकूण ७-८ शाखा होत्या. ८०० मुलेमुली त्यांत भाग घेत असत. प्रमुख म्हणून श्री.बबनराव सबनीस होते. ह्या सर्व शाखा बंद पडल्या.

अमरावतींत 'फॉरवर्ड ब्लॉक' ची स्थापना.

ज्यावेळी दुसऱ्या जागतिक महायुध्दाचे हालचालीस सुरुवात झाली, त्या सुमारास १९३९ मध्ये हिंदुस्थानात काँग्रेसचे वार्षिक अधिवेशन रामगड (बिहार) येथे मौ.अबुलकलाम आजाद यांच्या अध्यक्षतेखाली भरले होते.

आणि त्याचवेळी काँग्रेसमधून मतभेद होवून बाहेर पडलेले बाबू सुभाषचंद्र बोस यांच्या 'अखिल भारतीय असहकार परिषदे' चे अधिवेशन - हि, या काँग्रेस मंडपापासून काही अंतरावर भरले होते. दोन्ही अधिवेशनाला अफाट जनसमुदाय हजर होता. या असहकार परिषदेतच सुभाष बाबूंनी 'अखिल हिंद फारवर्ड ब्लॉक ' ची स्थापना केली व त्यामुळे देशांत जवळ जवळ प्रत्येक गांवी काँग्रेसमधील सुभाषबाबूंचे अनुयायांनी ''फॉरवर्ड ब्लॉक'' स्थापन केला.

अमरावतीतहि याचवेळी डॉ.शिवाजीरावपटवर्धन, डॉ.सोमण, डॉ.भोजराज, श्री.राजाभाऊ बारलिंग, श्री.बाळासाहेब मराठे इत्यादी मंडळीनी "फारवर्ड" ब्लॉकची स्थापना केली.

अमरावतीत पहिली मोटार कामगारांची संघटना डॉ.शिवाजीराव पटवर्धन यांनीच स्थापना केली होती.

" लोकपक्ष"

दि. १० मे १९४२ रोजी अमरावतीचे श्री.के.जी.जोध वकील यांनी या पक्षाची अमरावतीत स्थापना केली होती. या पक्षांतर्फे त्या काळात जाहिर सभा, महागाई विरुध्द मोर्चे, शेतकरी परिषदा इत्यादी कार्य केले आहे. भाषिक चळवळीची सुरुवात याच पक्षाने केली. १९४० मध्ये या पक्षातर्फे एक साहित्य संमेलनही अमरावतीत भरविले गेले होते. " बुवाबाजी विध्वंसक परिषद" "निजामशाही विरोधी परिषद" आणि संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीची अमरावतीत सुरुवात याच पक्षाने केली आहे.

या पक्षाचे नेते श्री.के.जी.जोध हे बुध्दिमान, राजकारण निष्णात आहेत. पण संघटना चातुर्याचे अभावी त्यांच्या पक्षाने मुळ धरले नाही. पुढे या पक्षाने आणखी अनेक चळवळी केल्या व परिषद भरविल्या आहेत.

हिंदू महासभा :-

हिंदू महासभेची शाखा स्थापना करण्यासाठी दिनांक ३ सप्टेंबर १९२३ रोजी अमरावती येथील इंद्रभुवन थिएटर मध्ये डॉ.पटवर्धन यांच्या अध्यक्षतेखाली जाहीर सभा भरुन एक पोट समिती नेमण्यात आली होती. या पक्षाचे मुख्य नेते बाबासाहेब खापर्डे अ.वा.नवाडे इ. मंडळी होती. कै.पं. मदनमोहन मालवीय हे ह्या संस्थेचे संस्थापक होत.

१८ सप्टें.१९२८ रोजी लाला लजपत राय यांचे निधनानिमित्त अमरावतीत जी सयुक्त दूखावट्याची सभा आयोजित केली होती तिच हिंदुसभा होती. सुविख्यात भागानगरचा सत्याग्रह हिंदुमहासभेने लढविला होता.

मुस्लिम लीग :- पहिले महायुध्द सुरु होण्यापुर्वी काही वर्षे काही अंशी सरकारच्याच खुशीने मुसलमानातील बुध्दिमान वर्गाने, ऑल इंडिया मुस्लीम लीग, नांवाची संस्था स्थापना केली होती. मुस्लिम लिगचे नेते श्री.हिदायत अली वकील व श्री.शराफुद्दीन वकील हे होते.

हिन्दू महासभा

हिंदूच्या हितरक्षणासाठी म्हणून पंजाबातील हिंदूनी हिंदूसभेची स्थापना इ. १९०७ साली केली. हा पक्ष प्रादेशिक स्तरावर होता. ढाक्यात मुस्लिम लीगची स्थापना झाल्यावर पंजाबात हिंदू सभेची स्थापना झाली. पंजाब हिंदू सभेचे पहिले अधिवेशन दि. १९-१०-१९०९ रोजी पंजाब हायकोर्टाचे निवृत्त न्यायाधीश अतुलचंद्र चटर्जी यांच्या अध्यक्षतेखाली झाले. दुसरे अधिवेशन शीख धर्मगुरु बाबा गुरुबक्षसिंग बेदी यांच्या अध्यक्षतेखाली झाले. (मुलतान) तिसरे अधिवेशन इ १९११ साली लाला रा.ब. लालचंद, चवथे अधिवेशन दिल्ली येथे, सर शारीलाल यांच्या अध्यक्षतेखाली झाले. दिल्ली त्यावेळी पंजाबात होती. या अधिवेशनात हिंदू महासभा अखिल भारतीय स्वरुपाची करावी, असा निर्णय झाला.

अ.भा.हिंदू महासभेचे पहिले अधिवेशन प्रयाग येथे कुंभ मेळा प्रसंगी भरविण्यात आले. या अधिवेशनाची जबाबदारी पं. मदन मोहन मालवीय यांनी स्वीकारली होती. म्हणून त्यांना संस्थापक मानतात हिंदू महासभेच्या पहिल्या अधिवेशनाचे वैशिष्ट्य हे की, श्री. मोहनदास करमचंद गांधी, लाला लजपतराय, लालामुनशी राम (स्वामी श्रध्दानंद), मोतीलाल घोष (अमृत बझार पत्रिका) लाला हंसराज, सर तेज बहादूर सप्रू, इ. नामवंत पुढारी उपस्थित होते.

विदर्भात हिंदू महासभा डॉ. बा.शि. मुंजे यांनी स्थापन केली. हिंदुसभेतर्फे डॉ. मुंजे आणि अ.भा. दलित वर्गातर्फे रा.ब. राजा यांनी लोकसंख्येच्या प्रमाणात जागा राखून ठेवण्याच्या अटीवर संयुक्त मतदार संघाला मान्यता देणाऱ्या करारावर मे १९३२ मध्ये सह्या केल्या. हाच प्रसिध्द मुंजे- राजा करार होय. दोन्ही वर्गाची मागणी उभय नेत्यांच्या सह्यानिशी इंग्लंडचे मुख्य प्रधान व भारताचे व्हाईसरॉय

यांच्याकडे पाठविण्यात आली. या करारामुळे डॉ. आंबेडकरांनी उभे केलेला अल्पसंख्यांकांचा प्रश्न निष्प्रभ झाला. (डॉ. मुंजे चरीत्र पान २३७)

हिंदू महासभेचे दहावे अधिवेशन इ. १९२७ च्या एप्रिल महिन्यात कर्मवीर डॉ. बा.शि. मुंजे यांच्या अध्यक्षतेखाली पाटणा येथे झाले. या अधिवेशनापासून हिंदूच्या राजकीय हक्काच्या रक्षणावर भर देण्याचे महासभेने ठरविले. याच काळात हिंदूसभा कॉंग्रेसची राजकीय प्रतिस्पर्धी बनली. आजवर स्थापनेपासून हिंदू महासभा सामाजिक स्वरुपाची संस्था होती. हिंदूसभेची अधिवेशने, साल, स्थळ व अध्यक्ष हे पुढील तक्त्यात दिल्याप्रमाणे झाली.

११ वे	इ. १९२५	जबलपूर	श्री. न.चि. केळकर (केसरी)
१२ वे	इ. १९२९	सूरत	पं. रामानंद चटर्जी (मॉडर्न रिव्हस)
१३ वे	इ. १९३१	आकोला	विजय राघवाचार्य
१४ वे	इ. १९३२	दिल्ली	न.चि. केळकर
१५ वे	इ. १९३३	अजमेर	भाई परमानंद
१६ वे	इ. १९३४	कानपूर	भिक्षु उत्तम
१७ वे	इ. १९३५	पुणे	पं. मदनमोहन मालवीय
१८ वे	इ. १९३६	लाहोर	श्री. जगतगुरु शंकराचार्य (डॉ. कुतत्रेट)
१९ वे	इ. १९३७	अहमदाबाद	स्वातंत्र्यवीर सावरकर
२० वे	इ. १९३८	नागपूर	स्वातंत्र्यवीर सावरकर
२१ वे	इ. १९४०	मदुराई	स्वातंत्र्यवीर सावरकर
२२ वे	इ. १९४१	भागलपूर (बंदी)	स्वातंत्र्यवीर सावरकर सत्याग्रह
२३ वे	इ. १९ ४२	कानपुर	स्वा. सावरकर
२४ वे	इ. १९४३	अमृतसर	डॉ. शामाप्रसाद मुखर्जी
२५ वे	इ. १९४५	बिलासपूर	डॉ. शामाप्रसाद मुखर्जी
२६ वे	इ. १९४६	गोरखपूर	अण्णासाहेब भोपरकर

स्वातंत्र्यानंतर हिंदूमहासभेचा जोर कमी झाला. विदर्भ प्रांतिक हिंदु महासभेचे अध्यक्ष श्री. बा.ग. (बाबासाहेब) खापर्डे, उपाध्यक्ष डॉ. सि.कृ. राणे, श्री. ना.त्र्यं. देशमुख, प्रमुख कार्यवाह श्री.ह.ब. दंडे वकील, कार्यवाह : श्री. अं.वा. नवादे, कोषमंत्री - श्री. नि.गो. शेणोलीकर.

हिंदू महासभा राजकीय क्षेत्रात काम करु लागल्यावर तीन प्रांतातून सत्ता प्राप्त करु शकली. डॉ. शामाप्रसाद कुखर्जी यांनी जनसंघाची स्थापना केली. हिंदू सभेचे खंदे कार्यकर्ते श्री. वि.घ. देशपांडे हे हि पुढे जनसंघात आले. त्यातुळे हिंदूसभेजवळ महत्वाचे कार्यकर्ते नव्हते.

त्या काळात हिंदूसभेचा नारा " हिंदू, हिंदु, हिंदुस्थान" हा होता. त्याचा अर्थ ह्या देशाची राष्ट्रभाषा हिंदी, ह्या देशाचा धर्म हिंदू व ह्या देशाचे नांव हिंदूस्थान हे राहील.

राजकीय धोरण - अखंड हिंदूस्थान, हिंदूंचे सौनिकीकरण राष्ट्राचे हिंदूकरण, समान कायदा, लष्करी शिक्षण, अस्पृश्यता निर्मूलन, सामाजिक सुधारणा, महिलांची प्रगति, शस्त्र निर्मिती. उद्योग धंध्यांचा विकास, उद्योग धंध्यांचे राष्ट्रीयीकरण लष्कराचे वैज्ञानिकीकरण.

स्वा. सावरकरांच्या क्रांतदर्शी बुध्दीने लष्कराच्या वैज्ञानिकीरणाचा मंत्र दिला. तो आज किती मोलाचा ठरला आहे, हे वेगळे सांगण्याची गरज नाही. राष्ट्रीय स्वाभिमान, राष्ट्रीय स्वत्व, राष्ट्रीय चारित्र्य ह्यांवरही हिंदू महासभेने भर दिला होता.

आर्यसमाज अमरावती

युग प्रवर्तक महर्षि दयानंद सरस्वतींचा प्रादुर्भाव भारतांत ज्या वेळी झाला त्या समयी येथील धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक, आर्थिक व राजनितिक अवस्था दुर्दशात्मक होती. भारतमाता विदेशींच्या बेडया मध्ये बंधक होती. तर दुसरीकडे बालविवाह, वृध्दविवाह, बहुविवाह अशा कुरीती ने लाखो बालविधावांचे, करुण रडणे सुरु होते. अन्याय, अत्याचार, पापाचार, भ्रष्टचाराने त्रस्त जनता आर्तनाद करत

होती. अनेक मत मन्तान्तरांनी धर्माचे विकृत रुप धारण केले होते. अवतारवाद बहु देवतावाद, जातिवाद, मूर्तिवाद, अस्पृश्यता. उच नीच जन्मजात वर्ण व्यवस्था, मृतक श्राध्द इ. अनेकविध क्रिया मान्यतने समाज ग्रासला होता.

अशा अवैदिक मान्यतेचे उच्चाटन करण्याकरिता म. दयानंद सरस्वतींनी आर्यसमाज ची स्थापना प्रथमत: मुंबई मध्ये १८७५ मध्ये इ.स. ला केली. स्वामी दयानन्दाच्या कार्यक्रमाचे बायोजन पुणे नागरीत करण्याम आले होते. अमरावती वरुन मान्यवर श्री दादासाहेब खापर्डे लोकहीतवादी गोपाळ हरि देशमुख व न्या.मूर्ति. श्री माधव गोविंद रानडे यांच्या निमंत्रणा वरुन पूणे येथे गेले. व १ आठवडा म. स्वामी दयानंदांच्या सान्निध्यात राहिले.

स्वामी दयानंदांचे प्रबोधन व व्यक्तित्वाने अमरावती नगर निवासी प्रबुध्द वर्ग सुध्दा प्रभावित होता त्या बर हुकुम अमरावती नगरी मध्ये आर्य समाज ची स्थापना १८८७ इ.स. मध्ये करण्यात आली. १८८९ मध्ये विधिवत कार्यवाही समात्र होऊन श्री देवजी दामोदरजी प्रधान व श्री पं बालमुकुन्द शर्मा यांची मंत्री म्हणून नियूक्ती झाली. यानंतर सामाजिक व धार्मिक दृष्टिकोनातून आर्यसमाज चे कार्य स्तुत्य राहीले आहे.

देशातील नेतेगण व महान पुरुषांचे आगमन व भेट आर्यसमाज अमरावती ला झालेले आहे. यांत

१) स्वामी श्रध्दानंदजी महाराज २) श्री केशवराव कोरटकर हायकोर्ट जज हैद्राबाद ३) पंजाब केसरी लालालजपतराय

नेताजी सुभाषचंद्र बोस, धर्मवीर वामनराव नायक, बै. वि.दा. सावरकर , श्री पं रामचंद्रजी देहलवी, पं बुध्ददेव विद्यालंकार इ. आहेत. स्थानीय समाज सेवी महानुभावां मध्ये ज्यांचे आर्यसमाज शी संबंध होते ते श्री दादासाहेब खापर्डे, श्री डॉ. वासुदेव रामचंद्र भट, श्री बाबासाहेब बी.जी. खापर्डे, श्री भैय्यालालजी गुहे, श्री डॉ. वाहाड पांडे कृष्णा गोविंद, श्री मोतीलाल गुप्ता, श्री बालगुरु कुन्द शर्मा इत्यादी. मान्यवरांनी सहकार्य करुन आर्यसमाजचे कार्य विस्तारपूर्ण करण्याचे मान्य कार्य केले. आर्य सामाज

अमरावती पदाधिकारी व कार्यकर्ते उत्कृष्ट उपलब्ध झाले आहेत. या मध्ये सर्वश्री जयकृष्ण कुऱ्हाडे, श्री मल्होत्रा, देवदत्त शर्मा, धामोरीकर, श्री सत्यवीर शास्त्री, श्री तपेश्वर मिश्र. ब्रम्हदत्त शर्मा, अविनाश श्रॉफ , श्रीमती राजश्री शर्मा इत्यादी मान्यवरांचा सहभाग आहे. इ. १८९० मध्ये अमरावती शाखेने वाचनालय सुरु केले. इ. १९०२ मध्ये ''सरस्वती प्रकाश'' नावाचे मासिक सुरु झाले. व इ. १९१८ मध्ये ते बंद पडले. संपादक श्री के.डी. चौव्हाण ी होते.

'पुराण किसने बनाये', 'वैदिक संध्या', अग्नि होता. इ. पुस्तके प्रकाशित केली. शास्त्रार्थ वादविाद इ. १९०८ मध्ये आला होता. इ. १९०९ मध्ये संस्कृतातून शास्त्रार्थ वादविवाद झाला होता. अध्यक्षस्थानी रा.ब. रंगनाथ नरसिंह मुधोळकर हे होते. इ. १९२८ साली प्रताप चौकात पं कालीचरण शर्मा, आलीम फाजल व बाबा खलीलदास यांच्यात पोलीस बंदोबस्तात वादविवाद झाला. रात्री ९ ते पहाटे चार पर्यंत वादविवाद रंगला. सभा शांततेने पार पडली. इ. १९३० मधे आर्य समाजाच्या पं. ठाकूर काहनचंद्र यांनी ख्रिश्चन लोकांशी वादविवाद केला होता.

बहिरम, कोंडेश्वर, ऋणमोचन, कौंडण्यपूर, अंबादेवी इ. यांत्रांच्या प्रसंगी प्रचार मंडप उभारुन आर्य समजाच्या विचार सरणीचा प्रचार केला जाई. वेद प्रचाराचे अनेक चेळा प्रभात फेऱ्या काढल्या जात. इ. १८९७ च्या काँग्रेसच्या अधिवेशनात प्रसंगी आर्य समाजाचा प्रचार मंडप लावण्यात आला होता. स्थापनेपासून दर रविवारी आजपर्यंत आर्य सामाजात सत्संग कार्यक्रम होत असतो. विव्दान अतिथींशी चर्चा, प्रवचन इ. कार्यक्रम संपन्न होत असतो. इ. १९२७ साली विदर्भ प्रांत आर्य धर्म परिषद भरविण्यात आली. या प्रसंगी स्वागताध्यक्ष श्री. बा.ग. (बाबासाहेब) खापर्डे हे होते. इ. १९३१ साली श्री जयकृष्णपंत कुऱ्हाडे यांनी जिन्हा अधिवेशन व वार्षिकोत्सव भरविला. सुविख्यात आर्य समाज कार्यकर्ते पं. देशबंधु विद्यालंकार हे या प्रसंगी उपस्थित होते. त्यांनी धनुर्विद्येचे अद्भूत चमत्कार श्रोत्यांना दाखविले. अमरावती शाखेच्या वतीने वेळोवेळी सहभोजन कार्यक्रम झाले. डॉ. कुऱ्हाडे व डॉ. वऱ्हांड पांडे हे या कार्यक्रमांचे प्रवर्तक होते. आर्य समाजाच्या वतीने अमरावतीत अनेक ख्रिश्चन बंधूचे

शुध्दिकरण करुन त्यांना वैदिक धर्माची दीक्षा देण्यात आली. विधवा स्त्रियांचे पुनर्विवाह करुन देण्यात आले. अनाथ बालकांना दत्तक घेण्यात आले. या प्रकारच्या कार्यक्रमात बाब तुळजागीर सक्रिय सहभागी होत असत. डॉ. वा.रा. भट यांच्या नेतृत्वाखाली निधि उभारुन आर्य समाज मंदीर उभारण्यात आले. वेळोवेळी जी व्याख्यानं होत असत त्यात डॉ. शिवाजी राव पटवर्धन डॉ. भोजराज, श्रीमान पन्नालालजी संघई, डॉ. भट, डॉ. वऱ्हाड पांडे, इ. सहभागी होत असत. शिवाय वीर वामनराव जोशी, बॅ. पंजाबराव देशमुख सेठ , राधाकिसनजी यांचेही सहकार्य मिळत असे.

इ. १९२९ साली शारदा बिल पास झाले. त्यानिमित्त श्री. हरबिलास शारदा यांच्या अभिनंदनार्थ अमरावतीस सभा झाली. अध्यक्षस्थानी सर मोरापंत जोशी होते. व सर्व धर्मांच्या वतीने वक्ते उपस्थित होते. त्यात मुसलमानां तर्फे शिक्षणाधिकारी श्री. महंमद सूफी हे ही होते.

देशगौरव सुभाषचंद्र बोस यांनी आर्यसमाजाची खालील उचित शब्दात प्रशंसा केली. ''आर्य समाज के सिध्दान्त संसार मे सबसे उच्च कोटी के है। स्वामी दयानंद भारत के सुधारकों मे इक बहुत उच्च स्थान रखते है ''।

परोपकारिणी सभा ही अमरावती शाखेची उपशाखा असून, अनेक सार्वजनिक कार्यामध्ये हया संस्थेचा सहभाग असतो.

समग्र मानव जातीच्या आत्मिक, सामाजिक, शारीरिक उन्नतीच्या विकासासाठी प्रशत्नशील राहणे हे आर्यसमाज संस्थेचे ध्येय आहे. उद्दिष्ट प्राप्तीसाठी संस्थेतर्फे दयानंद जयंति उत्सव, मकर संत्रनमणोत्सव, होळी, वसंतपंचमी, रामनवमी, जन्माष्टमी, विजयादशमी, दयानंद निर्वाण दिन, श्रध्दानंद दिन इ. उत्सव संपन्न होत असतात.

आर्य सामाजाचे सिध्दान्त

वेद ईश्वरीय ज्ञान आहे. ईश्वर नित्य, अनादी, अनंत आहे. ॐ हे ईश्वराचे मुख्य गुणवाचे आहे. ईश्वराला नामे अनेक आहे. व्यक्तीला कर्मा नुसार फळ मिळते. हा ईश्वरीय न्याय आहे. अहिंसा पाळावी. मांसभक्षण करु नये. प्रत्येकाने पांच

कर्मांचे पालन करावे. प्रत्येकास मातृ ऋण, पितृ ऋण, व देवऋण आहेत. त्यासाठी तीन धाग्यांचे यज्ञोपावीत प्रतिक म्हणून वापरावे. चातुवर्ण्य जन्मानुसार नसून कर्मानुसार आहे. गुण, कर्म व स्वभाव यानुसार वर्ण ठरतात. ब्रम्हचर्य, गृहस्थाश्रम, वानप्रस्थ, व संन्यासाश्रम हे इहलौकिक व पारलौकिक कल्याणासाठी आहेत. सर्वदा सत्याचे पालन करावे. जीवन कार्याची प्रेरणा धर्माधिष्ठित असावी. उन्नति व विकासासाठी कार्य करावे. प्रेम, प्रीती यांचे पालन करावे. सर्वांच्या विकासात आत्म विकासस समजावा. सर्व हितकारी नियमांचे पालन करावे. निस्वार्थपणे सेवा धर्माचे पालन करावे.

अखिल भारतीय विद्यार्थी परिषद. अमरावती.

अ.भा.वि.प. ची स्थापना दि. ९ जुलै १९४९ रोजी नवी दिल्ली येथे झाली. संस्थेचे संस्थापक श्री. बाबासाहेब आपटे हे होते. त्यावेळपासूनए ९ जुलै हा प्रतिवर्षी छात्रदिन म्हणून संपन्न केल्या जातो. दि. ५ सप्टेंबर हा माजी राष्ट्रपति डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिन भारतभर शिक्षकदिन म्हणून संपन्न केल्या जातो. त्या अनुषंगाने अ.भा.वि.प. ही संघटना देखील शिक्षक दिन संपन्न करीत असते.

देशभरातील चारशे पन्नास जिल्हयात व एकशे एक्कावन विद्यापीठात अ.भा.वि. ची दोन हजार एकेचाळीस केंद्रे आहेत. देशभरात अ.भा.वि.प. चे दहा लाखाहून अधिक सदस्य आहेत. विदर्भात अ.भा.वि.प. ची एकशे पन्नास केंद्रे आहेत. व तीस हजार सदस्य आहेत.

नियमित कार्यक्रम प्रतिवर्षी ९ जुलै ला छात्रदिन दि. ११ सप्टेंबरला स्वामी विवेकानंद दिग्विजय दिन, दि. ६ डिसेंबरला सामाजिक समरसता दिन, दि. १२ जानेवारी रोजी युवक दिन, दि. १४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर दिन संपन्न केल्या जातो.

याशिवाय नि:शुल्क शिकवणी वर्ग, रक्तदान कार्यक्रम, औषधी संकलन कार्य, वाचनालय, सामान्यज्ञान स्पर्धा, विव्दज्ञनांचा सत्कार, गुणवत्ता प्राप्त विद्यार्थ्यांचा सत्कार, व्यक्तिमत्व विकास शिबिर, संस्कार वर्ग इ. कार्यक्रम वेळोवेळी

घेण्यात येतात. हे कार्यक्रम सुरळीत व नियमित पार पडावेत यास्तव टी एस व्ही पी , के एस व्ही पी, ए एस व्ही पी. अशा शाखा निर्माण केल्या आहेत. हया शाखांच्या व्दारे अभियांत्रिकी कृषी, वैद्यकीय इ. ज्ञानशाखांच्या विद्यार्थ्यांमध्ये संघटन घडविल्या जाते.

उद्दिष्ट :- शारीरिक, मानसिक, बौद्धिक, नैतिक, क्रीडात्मक, कलात्मक, वाङ्मयीन, संघटनात्मक विकास, राष्ट्रीय दृष्टिकोनाचा विकास, विद्यार्थी सामाजाभिमुख व्हावा, स्वदेशी तत्वज्ञान व विचारसरणह अंगिकारावी, सामाजिक समरसता आत्मसात करावी, राष्ट्रीय अस्मितेची जागृति व्हावी, शिक्षण विषयक समस्या त्याने समजून घ्याव्यात, त्यांचे परिशीलन करावे, व त्यातून मूलभूत शैक्षणिक परिवर्तन व्हावे, हे उद्दिष्ट आहे.

विविध उपक्रम व चळवळी :-

इ. १९८३ साली आसाम प्रश्नातर राष्ट्रव्यापी जागरण करण्याच्या दृष्टीने दि. २ ऑक्टो. रोजी गोहाटी येथे देशभरातील कार्यकर्त्यांनी सत्याग्रह केला. त्यासाठी अमरावतीहून कार्यकर्ते गेले होते. ओतर राष्ट्रीय युक्त वर्षाच्या निमित्ताने देशभर जिल्हाश: युवाधिकार संमेलने झाली. विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय दृष्टीने जागरण अभियान सुरु करण्यात आले. इ. १९८६ साली पंजाब समस्येबाबत उद्‌बोधन व्हावे म्हणून 'पंजाब बचाव पंधरवडा' संपन्न करण्यात आला. बोफोर्स तोफ खरेदी प्रसंगी प्रचंड भ्रष्टाचार निर्मूलन चळवळ उभारण्यात आली. इ. १९८९ मध्ये राष्ट्रीय शिक्षण प्रसारासाठी व अन्य शैक्षणिक समस्यांसाठी देशभर जिल्हा युक्त संमेलने आयोजित करण्यात आली. याच वर्षी देशभर प्रत्येक जिल्हयात 'स्वदेशी' अभियान संपन्न करण्यात आले. स्वदेशात, स्वदेशी लोकांकडून, स्वदेशी भांडवलवर निर्माण होणाऱ्या वस्तूंच्या खरेदीसाठी प्रचारण्यात आला. इ. १९९० मध्ये काश्मीर समस्येचे सर्वांग परिपूर्ण ज्ञान विद्यार्थी विद्यार्थिनींना व्हावे यास्तव काश्मीरची सत्य परिस्थिती काश्मीरात जगणाऱ्या व राहणाऱ्या युवक यंवतींच्या मुखातून श्रवण करता यावी, या हेतूने तेथील युवतींच्या देशव्यापी दौऱ्यांचे आयोजन करण्यात आले. दि. ११ सप्टेंबर १९९० रोजी काश्मीरमधील श्रीनगरातील लाल चौकात राष्ट्रीय ध्वज फडकविण्याचा कार्यक्रम दहा हजार विद्यार्थ्यांनी यशस्वी

करुन दाखवला. काही दिवसांपूर्वी तेथे फडकत असलेला राष्ट्रध्वज देहद्रोही घटकांनी काढून पायदळी तुडविला होता. त्याचा बदला घेतल्या गेला. इ. १९९० साली सामाजिक समरसता अभियान सुरु झाले. संदेश यात्रा काढण्यात आली. अस्पृश्यतेचे उच्चाटन, अस्पृश्य भावनेचे उच्चाटन, दलित भावनेचे उच्चाटन हा हया कार्यक्रमाचा उद्देश होता. इ. १९९३ मध्ये राष्ट्रीय अस्मिता जागरण अभियान संपन्न करण्यात आले. हया सोबतच राजकारणातील गुन्हेगारी घटकाचा विरुध्द चळवळ सुरु करण्यात आली. शिक्षक दिनानिमित्त दि. ५ सप्टेंबर १९९३ रोजी मुंबई येथे अ.भा.वि.प. ने विराट संमेलनाचे आयोजन केले होते. त्यात एक लाख चौसष्ट हजार विद्यार्थी सहभागी झाले होते.

स्थानिक पातळीवर देखील काही उपक्रम नित्यश: चालविले जातात. त्यात दि. २ ऑगस्ट १९९९ रोजी फी वाढ विरोधी आंदोलन छेडण्यात आले. व ते यशस्वी करण्यात आले. एप्रिल १९९९ मध्ये विदर्भात एकोणतीस व्यक्तिमत्व विकास शिबिरे आयोजित करण्यात आली. अमरावतीत एक विद्यार्थिनींसाठी तर एक विद्यार्थ्यांसाठी व्यक्तिमत्व विकास शिबिर भरविले गेले. विदर्भात हया शिबिरात दीड हजार मुलामुलींनी भाग घेतला.

भारतीय नैतिक मूल्यांच्या जतन, संवर्धन व विकासासाठी हया शिबिरांतून उच्च संस्कार घडविले जातात.

भारतीय शास्त्रीय संगीत परंपरेचे जतन व्हावे व दत्तेजन मिळावे यास्तव विद्यार्थी विद्यार्थिनींसाठी अमरावती येथे प्रतिवर्षी कालीदास संगीत स्पर्धा आयोजित करण्यात येते. श्री. प्रभाकर मुंडले, श्री. नी.रा. चौधरी, श्रीकांत पांडे, महेश चौधरी, आनंद पाठक, विश्वासराव कुळकर्णी, प्रा. मधुकरराव देशपांडे, अस्लम खान बल्लू पाठक, जयंत शिंगोरे, अशोक दंडे, व अन्य अगणित विद्यार्थी नंत्यांनी परिषदेच्या कामी कष्ट उपसेले आहेत. त्या विद्यार्थ्यांतून काही राजकीय नेतृत्व उदयास आले. त्यापैकी दिनेश सूर्यवंशी, किरण पातुखर, किरण महल्ले,
प्रशांत महाजन, इ. नावे उल्लेखनीय आहेत.

प्रत्येक कार्यक्रम शिस्तबदध, नीटनेटका, आटोपशीर, वेळेवर, प्रसन्न वातावरणात, शांततेने पार पाडल्या जातो. हे हया संस्थेचे वैशिष्टय म्हणता येईल.

अचलपूरात ऐतिहासिक मुर्त्या सापडल्या

अचलपूर दि. २४ (अनंत भारतीय)

काल सकाळी जगदंबा महाविद्यालयाच्या पायथ्याशी बसलेल्या बोरीयापुरा येथील नझूलच्या जागेमध्ये अखंड दगडावर कारेलेली दोन फुट उंचीची नृसिंहाच्या मुर्तीसह चार नृत्यांगणांच्या ऐतिहासिक मुर्त्या सापडल्याने त्यांना पाहण्यासाठी हजारो लोकांची गर्दी उसळली आहे.

अचलपूर येथील सापन नदीच्या किनाऱ्याजवळील टेकडया वरील जगदंबा महाविद्यालयाच्या पायथ्याशी असलेल्या बोरीयापुरा येथील श्री बाबुजी धंडारे यांच्या घरा समोरील नझूलच्या जागेमध्ये काल सकाळी शेखर भिडे, बलजीत बडोदेकर सह काही मुले खेळत असतांना शेखर व बलजीत एक मोठा दगड आढळून आला. कुतूहल म्हणून त्यांनी तो हलविण्याचा प्रयत्न केला असता त्यांना त्यावर कोरीव काम असल्याचे आढळल्याने त्यांनी ही माहिती बोरीया पुऱ्यातील युवकांना सांगितली. त्यानंतर गुलाबराव हरणे, राम भिडे, अनिल भिडे, वैजाक बांसरे, गजानन वानखडे या युवकांनी ती जागा खोदण्यास सुरुवात केली. आणि जवळपास ५ फुट खोदकाम केल्यानंतर एका अखंड दगडावर अत्यंत सुरेख कोरीव काम असलेली दोन फुटाची नृसिंहाची मुर्ती त्याच्या मांडीवर हिरण्यकश्पचा वध, शस्त्र स्पष्टपणे आढळून येत आहे. तर दुसऱ्या एका खोदकामात एका चौकोनी दगडावर चार मूर्त्या त्यात एक पुरुष ज्याला दाढी, लंगोटी, आहे अशी मूर्ती तर तीन स्त्रियांच्या मूर्त्या ज्या सरोद वाजवितांना, नृत्य करतांना असलेल्या आढळून आल्या आहेत. नृसिंहाच्या मुर्तीसोबत दोन द्वारपाल जय विजय यांच्या अत्यंत स्पष्ट व सुरेख कोरीव काम केलेल्या मुर्त्या आढळल्या आहेत. मूर्त्या सापडल्याची बातमी वाऱ्यासारखखी शहरात पसरताच हजारोने लोकांची झुंबड मूर्त्या बघण्यासाठी गर्दी करुन आहे.

खोदकाम करुन मूर्त्यांचा शोध लावणाऱ्या राम भिडे, गुलाबराव हरणे, अनिल भिडे, वैजाक बांसरे, गजानन वानखडे यांनी त्या सर्व मूर्त्या सापन नदीच्या काठावर आठून त्या धुवून त्यांची प्रतिष्ठापना केली असून त्यांच्या संरक्षणासाठी त्या

ठिकाणी व्यवस्था करण्यात आली. अचलपूरचे ठाणेदार जिरापुरे यांनी या मूर्त्यांच्या संरक्षणाची जबाबदारी स्वीकारली असून तशी पोलीस यंत्रणा कामास जुंपली आहे. मूर्त्यांचा शोध लावणाऱ्या युवकांनी नृसिंहाचे मंदिर सापन नदीच्या किनाऱ्यावरच बांधण्याचा संकल्प केला असून त्यासाठी लोकांनी आर्थिक मदत करावी असे आवाहनही केले आहे.

मूर्त्यांच्या जगदंबा महाविद्यालयाच्या पायथ्याशी लागलेला शोध, अचलपूर शहराला असलेली प्राचीन ऐतिहासिक पार्श्वभूमी या आधारावर पुरातत्व विभागाची काय भूमिका राहते याकडे सर्वांचे लक्ष लागले असून 'मूर्त्यांच्या शोधाची' बातमी अद्यापपर्यंत जिल्हाधिकारी, विभागीय आयुक्त, किंवा पुरातत्व विभाग यांना माहित नसल्याचे सांगण्यात आले आहे. सापडलेल्या मूर्त्यांबाबत प्रशासकीय स्तरावर काय भूमिका घेण्यात येते याकडे अचलपूरच्या नागरिकांचे लक्ष लागले असून सध्या मात्र मध्यरात्रीपर्यन्त मूर्त्यांना बघण्याची गर्दी कायम आहे .

माहेश्वरी सामाजाचा उत्पत्ती दिवस महेश नवमी निमित्त माहेश्वरी समाजाचे प्रेरणास्थान अमरावती शहर

परिश्रमी असा मारवाडी समाज आपली मरुधर मायभूमि सोडून देशात जिथे जिथे गेला तिथे हतबल न होता सतत गतिशील राहिला, आपल्या निष्ठेने, शिस्तीने व ईमानदारीने त्यांनी उच्च नैतिक गुणांची परंपरा जोपासली. मारवाडी समाजाने स्वत:हून आपली मायभूमि सोडली नाही तर इंग्रजांनी त्यांचे व्यापार गूण हेरून आपल्या संस्थानात त्यांना महत्वाची पदे देवून स्थलांतरित केले. ३०० वर्षापूर्वी हस समाज फक्त कलकत्ता, मुंबई, मद्रास कडेच होता. पण पुढे राजस्थानात सतत होत असलेल्या अवर्षणामुळे व नवीन संपर्कामुळे देशाच्या कानाकोपऱ्यात स्थलांतरीत होण्यास प्रारंभ झाला. अमरावती शहरात माहेश्वरी समाज सुमारे १५० ते १७५ वर्षापूर्वी आला. आज शहरात त्यांची लोकसंख्या जवळपास १० हजार आहे.

मारवाडी समाजाची भाषा, पेहराव, वस्त्र, खानपान, रीतीरिवाज व इतर स्थानिक व्यवहाराशी आता इतका समरस झाला आहे की, त्याची वेगळी सहज

ओळख आता संपुष्टात येत आहे. तरीपण त्यांची कर्तबगारी, त्याची व्यावसायिक निपुणता, प्रशासन, क्षमता, दानशूरपणा, सेवा सहाय्यतेची भावना व सहिष्णू प्रवृत्तीमुळे त्यांची ओळख कायम राहणार असे वाटते.

देशात सामाजिक सुधारणा आंदोलनाचा प्रारंभ सुमारे १५० वर्षापूर्वी झाला. या आंदोलनाने प्रेरित होऊन देशातील माहेश्वरी समाजाने १८९० पासून संघटित होण्याचे प्रयत्न सुरु केले. मागील शतकाच्या शेवटी देशव्यापी संघटनेची स्थापना झाली. या अखिल भारत वर्षीय माहेश्वरी महासभेचे प्रथम अखिल भारत वर्षीय अधिवेशन १९०८ मध्ये अमरावती येथे संपन्न झाले. त्या काळात ३ दिवस ८ हजार समाज बंधू उपस्थित होते. चर्चेनंतर समाजोपयोगी अनेक निर्णय घेण्यात आले. पुढे ५० वर्षे असे अधिवेशन होवू शकले नाही. त्रयामुळे अमरावतीचे अधिवेशन म्हणजे एक ऐतिहासिक घटना झाली. या अधिवेशनाचे सूत्रधार अमरावतीचे सेठ गणेशदासजी राठी होते. १९२९ मधे धामणगांव येथे नववे अधिवेशन झाले. त्यात अमरावती चे श्री. राधावल्लभजी लड्ढा महासचिव होते. याच अधिवेशनात जननायक ब्रजलालजी बियाणी यांनी आपल्या पत्नीसोबत महिलांच्या पडदा प्रथेविरुध्द प्रत्यक्ष आंदोलनास प्रारंभ केला होता.

अमरावती शहर प्रथम पासूनच अनेक राष्ट्रीय, सामाजिक, व सांस्कृतिक गतिविधीचे केंद्र होते. भारत छोडो आंदोलनात श्री. जगन्नाथजी मालपाणी व त्यांच्या सुपुत्रांनी कारावार सहन करावा लागला. देशाच्या सर्वश्री लक्ष्मीनारायणजी माला‌णी, बालकृष्णाजी भंडारी, राधावल्लभजी लड्ढा, गंगाबिसनजी सिकची, रतनलाल गांधी, रामरतनजी सिकची इ. नी हीरीरीने भाग घेतला होता. ॲड. श्रीकृष्णदासजी लड्ढा, देवकिसनजी झंवर, अनंतलालजी दम्मानी सेठ, वल्लभदासजी राठी, शंकरलालजी राठी, नारायणदासजी लड्ढा, बस्तीराजी बागडी, ॲड. नारायणदासजी राठी यांनी दीर्घकालीन समाजसवेचा आदर्श प्रस्तुत केला आहे.

शिक्षणाच्या क्षेत्रात भाऊसाहेब डॉ. पंजाबराव देशमुखांमुळे अग्रेसर असलेल्या अमरावती शहरात माहेश्वरी समाजाची देखील महत्वाची भूमिका आहे.

स्व. ॲड. नारायणदासजी राठी यांनी विविध संस्था काढून शिक्षण क्षेत्रात एक नवीन उआदर्श कायम केला. श्री. वल्लभदासजी राठी, नारायणदासजी लद्दा, शंकरलालजी राठी यांच्या विशेष सहकार्याने श्री गणेशदास राठी छात्रालय समिती व श्री ब्रजलाल बियाणी शिक्षण संस्था आज महाराष्ट्रात ख्यातिप्राप्त आहे.

अमरावती माहेश्वरी पंचायत ही सुमारे ११० वर्षे जुनी संस्था आहे. राधाकृष्ण मंदीर व माहेश्वरी भवनाचे संचालन यांचे संस्थेव्दारे केले जाते. माहेश्वरी भवन समाजाच्या अध्यात्मिक, सांस्कृतिक व सामाजिक कार्यक्रमांचे प्रमुख केंद्र आहे. महामार्गावरील नवनिर्मित महेशभवन देशात प्रसिध्द झाले आहे. या संस्थेव्दारे जनतेच्या कल्याणाच्या लहान मोठया बऱ्याच योजना राबविल्या जात आहेत.

अमरावती माहेश्वरी समाजाचे सार्वजनिक कार्य विस्तृत आहेत. या समाजात अनेक प्रतिभावंत आहेत. त्या सगळयांची माहिती जागे अभावी येथे देणे शक्य नाही. अमरावती माहेश्वरी समाजाने देशातील समाजाला नेतृत्व दिले व त्यांचे पथप्रदर्शन केले आहे.

(श्याम टावरी

सचिव, अम. जिल्हा माहेश्वरी सभा यांच्या सौजन्याने)

वऱ्हाड, स्वंतत्र विदर्भ चळवळ. महाविदर्भ चळवळ आणि संयुक्त महाराष्ट्र चळवळ.

आधार :- मुलाखती १) बॅ. रामराव देशमुख २) श्री पी.के. (अण्णासाहेब) देशमुख ३) श्री. बबनराव मेटकर

४) श्री. यशवंतराव शेरेकर ५) श्री. यशवंतराव खापर्डे ६) श्री. अण्णा वैद्य

मुलाखत - श्री. वा.ब.खापर्डे

संयुक्त महाराष्ट्राची चळवळ

विदर्भासह संयुक्त महाराष्ट्र निर्माण व्हावा, यासाठी महाराष्ट्रात चळवळ सुरु झाली. महाराष्ट्र व गुजरात मिळून एक प्रांत होता. मुंबई ही राजधानी होती. श्री. मुररजी देसाई मुख्यमंत्री होते. मुंबई महाराष्ट्राची राजधानी व्हावी व महाराष्ट्र राज्य

निर्माण व्हावे,, विदर्भ त्यात सामील व्हावा हया गोष्टीस त्यांचा विरोध होता. विदर्भ मध्यप्रांत वऱ्हाडला जोडलेला होता. मोरारजी फार कणखर व्यक्तिमत्वाचे नेते होते. त्यामुळे सर्व मराठी भाषिक प्रदेश एकत्र होऊन महाराष्ट्र स्थापन व्हावा यासाठी फार उग्र चळवळ करावी लागली. पंतप्रधान नेहरुंचाही मोरारजींना पाठिंबाच हेता. अखेरच्या टप्पयात तर मुंबईला काँग्रेस अधिवेशन प्रसंगी हया आंदोलनात एकशे पाच जणांचे प्राण गोळीबारात गेले. तेव्हा आंदोलनाची उग्रता ध्यानात घेऊन महाराष्ट्र स्थापन झाला. (दि. १ मे १९६०)

संयुक्त महाराष्ट्राची चळवळ मुंबईहून आचार्य अत्रे, पुण्याहून श्री. एस.एम. जोशी, श्री. काकासाहेब गाडगीळ, श्री. ना.ग. गोरे,, विदर्भाहून बॅ. रामराव देशमुख व श्री. पु.का. देशमुख सांभाळीत होते. हया चळवळीच्या शेवटच्या टप्प्यात नागपूर करार झाला. त्यातील कलमे श्री. पु.का. देशामुख (अण्णासाहेब) यांनी लिहून दिली होती.

अमरावतीतील नामवंत व्यक्ति संयुक्त महाराष्ट्र वादी होत्या. त्यात श्री. बा.ग. खापर्डे, (बाबासाहेब), श्री. ब.ग.(अण्णासाहेब) खापर्डे,, श्री. पु.का. देशमुख,,(अण्णासाहेब), श्री. वीर वामनराव दादा जोशी, पद्मश्री डॉ. शिवाजीराव (दाजीसाहेब) पटवर्धन, श्री बॅ रामराव देशमुख, देशभक्त डॉ. सोमण, दे.भ. डॉभोजराज, दे.भ. डॉ बार्लिंगें,, दे.भ. संभाजीराव गाखले, हरिहरराव देशापांडे, श्री. दे.जी. देशमुख, (नंतर खासदार),, श्री. माधवराव देशपांडे वकील, ॲड. त्रि.मु. नाशिककर, देशभक्त बाळासाहेब मराठे (सं.हिंदुस्थान), श्री. बापूसाहेब भोंदू, श्री बापूसाहेब कारंजकर, श्री अनगळ वकील, श्री. राजाभाऊ गोखले वकील, श्री. चिपळूणकर, दादासाहेब खेडकर,, गजाननराव रहाटगावकर, डॉ. आळशी इ. नेत्यांचा समावेश होता. विद्यार्थ्यांनी या आंदोलनात फार महत्वाचा वाटा उचलला होता. विदर्भ महाविद्यालया पर्यंत रस्ता करुन द्यावा, नाल्यावर पूल बांधून द्यावा,, वि.म.वि. मध्ये पदव्युत्तर वर्ग सुरु करावेत, अमरावतीस मेडीकल कॉलेज द्यावे, मुलींसाठी वस्तिगृह निर्माण करावे, अशा मागण्यांसाठी विद्यार्थ्यांनी आंदोलन सुरु केले. श्री. यशवंत खापर्डे, श्री. अण्णा वैद्य,

बापू वैद्य, श्री. बबन मेटकर, श्री. बाबा सोमवंशी, श्री. जांबुवंत धोटे, श्री. रा. सु. गवई,, श्री. लाहुडकर, श्री. एन.एस.(भय्यासाहेब) देशमुख, नंदू राजवाडे,, मेडशीक, इ. विद्यार्थी नेत्यांनी संयुक्त महा. विद्यार्थी परिषद स्थापन केली. वरील मागण्यांसाठी होणाऱ्या चळवळीसोबतच सं महा. आंदोलनही त्यांनी सुरु केले. अध्यक्ष श्री. यशवंत शेरेकर होते. सचिव श्री. यशवंत खापर्डे होते. परिषदेची स्थापना व पहिली बैठक खापर्डे वाडयात (कै.) प्रा. ब.ग. (अण्णासाहेब) खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. वरील नामवंत व्यक्तीही मार्गदर्शनार्थ लाभल्या. त्यामुळे फार कमी अवधीत अमरावती हे सं.म. चळवळीचे केंद्र बनले. श्री. यशवंत शेरेकर व श्री. यशवंत खापर्डे हे सूत्र संचालक होते. शिवाय श्री. अण्णा वैद्य, श्री. बाबा सोमवंशी,, श्री. बबन मेटकर हे उत्साही तरुण कार्यकर्तेही सक्रिय होते.

उत्साही कार्यकर्त्यांचा संच लाभल्यामुळे सं.म. संमितीने अमरावतीस परिषद भरविली. त्यासाठी महाराष्ट्रातील नामवंत प्रख्यात नेते आले होते. शिवाय वेळोवेळी प्रचंड सभाही भरविल्या. आचार्य अत्रे, आचार्य शंकरराव देव, श्री. एस.एम. जोशी, कॉ. डांगे, सेनापति बापट, विष्णूपंत देशपांडे, शाहीर अमरशेख, भाई का.रा. पाटील, ना.ग. गोरे, इ. नामवंत पुढाऱ्यांच्या सभा यशस्वी रीतीनक पार पडल्या. सेनापति बापट यांच्या सभेच्या अध्यक्षस्थानी कवीभूषण अण्णासाहेब खापर्डे होते. या सभांच्या वेळी खूप गमतीच्या गोष्टी घडल्या. विस्तार भयास्तव त्या सर्व लिहिणे अशक्य आहे. त्या काळी लोकनायक बापूजी अत्रे, श्री. ब्रिजलाल बियाणी, श्री. मारोतराव कन्नमवार, यांच्या नेतृत्वाखाली महाविदर्भ चळवळ देखील सुरु होती. अमरावतीतील श्री. नानासाहेब बामणगावकर व श्री. उमरलाल केडिया,, श्री. अब्दुल सत्तार, हे महाविदर्भवादी होते.

अमरावतीतील 'उदय' हे वृत्तपत्र विदर्भवादी,, तर हिंदुस्थान हे पत्र सं.म. वादी होते. त्यांच्यातून प्रकाशित होणाऱ्या बातम्या, लेख इ. मुळे विद्यार्थ्यांच्या चळवळीला दिशा मिळत असे. सेनापति बापट, विष्णूपंत देशपांडे यांचा मुक्काम खापर्डे वाडयात होता. तेथे ते सभा, बैठकी घेत असत. कार्यकर्त्यांना प्रेरणा देत असत. डॉ. नरवण्यांची सभाही स्मरणात राहील.

अमरावतीतील आजच्या नेतृत्वाची पायाभरणी याप्रमाणे विदर्भ महाविद्यालय, खापर्डे वाडा या ठिकाणी झाली. हया चळवळीने अमरावतीत तरुण नंतृत्व उदयास आले. मुख्य म्हणजे यापैकी अनेक जण खासदार,, आमदार,, मंत्री झाले. दुसरे वैशिष्टय म्हणजे अमरावतीत आझाद हिंद मंडळ, नीळकंठ मंडळ, लक्ष्मीकांत मंडळ, राजापेठ मंडळ, छत्रपति मंडळ,, खापर्डे बगीचा मंडळ, इ. मंडळे आपापल्या क्षेत्रात हुकुमत गाजवीत होती. त्या त्या क्षेत्रातील नेते त्यात्या मंडळाच्या चालीने चालत असत. मंडळांची आपापसात भांडणे होती. हाणामाऱ्या चालत असत. परंतु विद्यार्थी नेते श्री. बबन मेटकर,, यशवंतराव खापर्डे, यशवंतराव शेरेकर, श्री. अण्णा वैद्य, श्री. बाबा सोमवंशी यांनी पुढाकर घेऊन या सर्व मंडळामध्ये एकोपा घडविला. खेळीमेळीचे वातावरण निर्माण झाले. विदर्भवादी श्री. ना.रा. (नानासाहेब) बामणगावकर सं.म. समितीच्या सभेत तर सं.म. वादी बॅ. रामराव महाविदर्भऐवादी लोकांच्या सभेत फड गाजवून होते. सुपरिणामी, मुंबई पुण्या खालोखाल महाराष्ट्रात अमरावती राजकारणाच्या क्षेत्रात चमकली. हिंदु महासभा, रा.स्व.संघ, जनसंघ,, कम्युनिस्ट पार्टी, सोशालिस्टर, पार्टी, काँग्रेस या पक्षांचे नेते एकत्र बैठकी भरवीत. हिंदुसभेचे श्री. नानासाहेब गवई उत्कृष्ट वक्ते होते. तेही बैठकांना उपस्थित असत. डॉ. ना.भा. खरे बैठकी घेत असत. या नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली सं.म. समितीने कॉग्रेसच्या आमदार कु. मालती जोशी (वीर वामनराव दादा जोशी यांची कन्या) यांन सं.म. समितीच्या प्रवेशपत्रावर संयुक्त महाराष्ट्र आंदोलन सुरु असता सत्याग्रह पुकारण्यात आला. त्यावेळी (इ.१९५४) नागपूरला सत्याग्रहींची जी चमू प्रतिनिधी म्हणून पाठविण्यात आली त्यात बब्बू (खिश्चन) श्री. अण्णा वैद्य, श्री. सुरेश भट,, श्री. बाबा सोमवंशी, श्री. बापूसाहेब भोंदू, श्री. लाहूडकर, श्री. बालिंगे, श्री. किशा गोडबोले इ. लोक सत्याग्रही म्हणून गेले होते. याचमुळे या सत्याग्रहातील वैशिष्टये असे की,, या चमूला महाराष्ट्रातील अन्य कोणत्याही चमूपेक्षा अधिक मोठी म्हणजे तीन महिन्यांच्या कारावासाची सजा देण्यात आली. मुंबईला एक दोन दिवस सजा देत असत. अमरावतीस सत्याग्रह झाला त्यात यशवंतराव खापर्डे, बबनराव मेटकर, श्री. बनगळ हे

सहभागी झाले होते. श्री, बा.वि. (बाळासाहेब) मराठे हे हया चमूचे नेते होते.

महिलांनीही हया आंदोलनात सक्रिय सहभाग घेतला होता. बापट भगिनी, नलीनीताई लिमये, मीना पांगारकर, सौ. शारदा अनगळ, कु. मृणालीनी अनगळ, दुर्गाताई जोग, सौ. खेडकर, इ. महिलांनी मोर्चे, मिरवणुकी, सभा, इ. मधे नेतृत्व केले. अनगळ बाईंनी सत्याग्रहात कारावासही भोगला.

एक रुपया फी वाढ झाली म्हणून आंदोलनास प्रारंभ झाला. आणि त्यातून विद्यार्थी चळवळ फोफावली. न तृत्व उदयास आले. आमदार,, मंत्री इ. त्यातूनच बनले. व परिणामी अमरावती विद्यापीठ, मेडीकल कॉलेज , भव्य क्रीडासंकुल, कृषि विद्यापीठ (आकोला) इ. महाभारत घडले. इति संयुक्त महाराष्ट्र विद्यार्थी परिषद आंदोलन फलश्रुति :

श्री. यशवंत खापर्डे श्री. यशवंत शेरेकर श्री. बबनराव मेटकर यांच्या मुलाखतीवर आधारीत

मुलाखत :- वा.ब. खापर्डे संपादक अम. इति.(३)

रा.स्व.सं.घ. राष्ट्र सेवा समिती क्रीडा निपुण, अमरावती.

परिशिष्ट ११

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची स्थापना इ.स. १९२५ साली विजयादशमी च्या सुमुहुर्तावर नागपूर येथे शालुबाई मोहिते यांच्या वाड्यात डॉ.केशव बळीराव हेडगेवार यांनी केली. मी ''अशा एका संघटनेच्या स्थापनेच्या विचारात आहे.'' हे त्यांनी कलकत्ता येथे वैद्यकीय शिक्षण घेतांना सहाध्यायी कै.प्रा.बळवंत गणेश उपाख्य अण्णासाहेब यांना सांगितले होते. याचमुळे संघाचा व खापर्डे घराण्याचा ऋणानुबंध स्थापनेपासूनचा होता.

अमरावती शाखा :-

इ.स. १९२९ साली श्री.रामभाऊ जामगडे व श्री.द.श उर्फ दादासाहेब

फडके यांनी अमरावती येथे संघशाखा सुरु केली. पण लवकरच काही कारणाने हे कार्य बंद पडले. पुन्हा श्री.रामभाऊ जामगडे, श्री.बापूसाहे बभेदी, श्री.नानासाहेब भिशीकर व श्री.अनंतराव साठे यांनी एकत्र येऊन शाखा सुरु केली. सुरुवातीस शाखा जोमाने भरत असे. सुरुवातीस ३० स्वयंसेवक होते.

नंतरचे पदाधिकारी :-

वरील मंडळीनी कै.श्री.बाबासाहेब (बा.ग.) खापर्डे यांना संघचालक पद स्वीकारण्याची विनंती केली. बाबासाहेबांच्या सांगण्यावरुन कै.ना.रा.उर्फ नानासाहेब बामणगावकर यांनी नगर संघचालकाचे पद स्वीकारले ते १९४० पर्यत नगरसंघचालक होते. त्यांच्यानंतर श्री.गणेश शेषराव जाधव, श्री.नानासाहेब भट, श्री.दादासाहेब गुप्ते, श्री.नानासाहेब हिरुळकर, श्री.नानासाहेब ठाकुर, श्री.काकासाहेब कागलकर यांनी हे काम सांभाळले. सुरुवातीला श्री.ल.रा.उर्फ बाळासाहेब मोटे जिल्हा कार्यवाह होते. नंतर श्री.आप्पासाहेब खरे हे जिल्हा संघचालक झाले व नगर विभाग संघचालक होते. ते इ.स. १९८७ पर्यत आमरण विभाग संघचालक राहिले.

श्री.तेलंग बंधु, श्री.विठ्ठल बंधुजी चौबळ, डॉ.भोजराज ही मंडळी सुरुवातीच्या काळात स्वयंसेवक होती. श्री.दादाराव वानखडे, श्री.दादा अडसड हे देखील प्रारंभापासुनच होते.

कार्य :- डॉ.हेडगेवार यांच्या आदेशावरुन श्री.नानासाहेब भिशीकर बिहार भूकंप ग्रस्तांना साह्य करण्याकरता धावून गेले होते. डॉ.राजेंद्रप्रसाद त्यांच्या कार्याची फार प्रशंसा करीत असत.

इ.स. १९४२ च्या दंग्याच्या वेळी अरावतीच्या संघशाखेने फार मोलाचे कार्य केले. दंगलग्रस्तांना अन्य धर्मीयांच्या वेढ्यातून जिवावर उदा होऊन बाहेर काढले व बच्छराज फॅक्टरीच्या मैदानात तंबू डेरे उभारले तेथे त्यांना आश्रय दिला व त्यांच्या अन्नपाण्याची व्यवस्था केली.

रा.स्व.संघ, अमरावती

अमरावती शाखेच्या वतीने मकर संक्रमणोत्सव दि. १४ जानेवारी १९३४ रोजी दे.भ. नानासाहेब गोखले यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला.

संघचालक नी.नानासाहेब बामणगावकर हे परगावी गेले होते. हा कार्यक्रम न्यू हायस्कूल च्या सभागृहात संपन्न झाला. सुरुवातीला संघाच्या कार्यकर्त्यांनी संघाची विचार सरणी व कार्यपध्दती स्पष्ट केल्यानंतर अध्यक्षांचे मननीय व विचार प्रवर्तक भाषण झाले.

शेवटी तिळगूळ वाटप होऊन कार्यक्रम संपला, ह्या समारोहाला निमंत्रित केलेल्या नागरिकात वीर वामनराव दादा जोशी, डॉ.शिवजीराव जोशी, डॉ.शिवाजीराव पटवर्धन डॉ.भोजराज, श्री.भट, डॉ.व्ही.व्ही.जोशी, श्री.आप्पाजीमुळे, श्री.पाठक वैद्य, आर्य समाजाचे नेते डॉ.वऱ्हाड पांडे व जगन्नाथजी तिवारी पं. प्यारेलाल सेवक इ. लोक हजर होते.

जाने. १९३४ च्या मध्यात उत्तर हिंदुस्थानात भूकंप झाला. वित्त व प्राणहानी झाली. तेथील जनतेस साह्य करण्याकरता रा.स्व.संघाच्या अमरावती शाखेने चमू पाठविली होती. व वैद्यकीय सामुग्रीहि सोबत दिली होती. पुढे पाठोपाठ बिहार मध्येही भूकंप झाला. तेव्हा ह्या चमूला बिहार कडे परस्परच धाडण्यात आले.

अमरावती जिल्ह्यातील अंजनशिंगी (ता.चांदुर,) येथे अजीज खॉ वल्लदीन महमद खॉ यांच्या शुध्दिकरणाचा कार्यक्रम आर्यसमाजातर्फे झाला. त्यासाठी येथुन कार्यकर्ते सहाय्यार्थ व सहभागी होण्यासाठी पाठविण्यात आले होते.

वर्धा येथे रा.स्व. संघाचे प्रांतिक शिबिर भरले, त्याला प्रमुख अतिथि म्हणून महात्मा गाधी येणार होते. त्यांनी उपस्थित राहून शुभाशीर्वाद दिले. व डॉ.हेडगेवार यांना धन्यवाद दिले ह्या शिबिरासाठी अमरावतीहून पन्नास स्वयंसेवक गेले होते.

डॉ. हेडगेवार यांचे दु:ख निधन.

रा.स्व. संघाचे संस्थापक डॉ.केशव बळीराम हेडगेवार यांचे नागपूर मुक्कामी दिनांक २४ जून १९४० रोजी दु:खद निधन झाले. त्याच्या मृत्यू बदल दुखवटा व्यक्त करण्याकरता अमरावतीला नगर वाचनालय सभागृहात बाबासाहेब खापर्डे यांच्या अध्यक्षतेखाली शोकसभा भरली. सभेत रा.स्व.संघाचे नगर संघचालक नानासाहेब बामणगावकर, डॉ.सोमण, डॉ.भोजराज, श्री.भट ओगले (एम.एल.ए), श्री.कु-हाडे यांची भाषणे झाली.

अमरावती येथे दिनांक १३ ते १७ ऑक्टोबर १९४६ पर्यत भरलेल्या अ.भा.शा.परिषदे च्या कार्य क्रमात रा.स्व.संघाच्या कार्यकर्त्यानी भाग घेतली होता.

सेनापती बापट यांची दिनांक २४ जानेवारी रोजी सुटका झाली व त्यांचा अमरावतीत फार विराट सत्कार झाला. त्यात स्व. संघाने पुढाकार घेतला होता.

मारोती मोहरील, खामगावचे गजाननराव साकळे, अमरावतीत दाखल झाले. १९३० च्या सुमारात शेंदूरजनाघाटवरुन रामभाऊ जामगडेंसारखा होतकरु विद्यार्थी येताच त्यांना बापूसाहेब भेदी, प.मो. भिसीकर सारख्या नागपूरच्या शिक्षणतज्ञांची सोबत मिळाली. बघता बघता संघविचारांचा १५-१६ विद्यार्थ्यांचा एक गटच तयार झाला. विद्यार्जन आटोपलं की सायंकाळी ही मंडळी सध्याच्या सिंधी बांधवांच्या रामपुरी वसाहतीत खो-खो, कबड्डीसाठी एकत्र येऊ लागले. तरुणांचं हे एकत्रीकरणच अमरावती जिल्ह्यातील पहिली संघशाखा ठरली.

बघता बघता मैदान फुल लागलं. अनंतराव मुख्यशिक्षक म्हणून काम बघायचे, तर बापूसाहेबांना नागपूरला प्रत्यक्ष डॉक्टरांचा सहवास लाभल्यामुळे त्यानी तरुणांना संघ समजावून सांगण्याची जबाबदारी घेतली. या मंडळीच्या 'हातात हात घालून' ईश्वरी कार्यात झोकून देणारा स्थानिक स्वंयसेवक म्हणजे लक्ष्मणराव भैयालालजी गुप्ता. दादा गुप्ता म्हणून परिचित असलेल्या या कार्यकर्त्यांन संघविस्तारासाठी संपूर्ण अमरावती ढवळून काढलं. गैरमहाराष्ट्रीय व्यापारी मित्र

तेवढ्याच तन्मयतेने संघासाठी तन-मन-धनाची सेवा देतात. हा दादांच्या त्यावेळच्या पायपिटीचा चमत्कार आहे. कुटूंबाची वाटच संघस्थानावर झाल्यामुळं चुनाभट्टीवरील गुप्तांचं निवासस्थान म्हणजे स्वयंसेवक मित्रांच विश्वासस्थान का ठरु नये ? आज वयाची ऐंशी ओलांडली तरी ताठमानेने दादा प्रभात शाखेच्या हिरवळीवर सूर्योदययापूर्वी उपस्थित होतात ही डॉक्टरांच्या सहवासाची किमया आहे.

संपादकाकडून संघचालकाकडे

समाजात संघकार्याची प्रतिष्ठा वाढावी म्हणून सुप्रसिध्द व्यक्तींना जबाबदारी सोपविण्याची डॉक्टरांची अभिनव शैली होती. १९३३ च्या सप्टेंबर महिन्यात डॉ.हेडगेवार, दादाराव परमार्थ, कै.आप्पाजी जोशी अमरावतीत आले असतांना 'संघचालक कोण' या प्रश्नावर निवडक प्रतिष्ठितांची एक बैठक झाली. बाबासाहेब खापर्डे यजमानांनी ती जबाबदारी स्वीकारावी, असा आधी एक विचार आला. पण त्यांनीच नम्रपणे नकार देत नारायणराव रामलिंग बामणगावकरांचे नाव सुचविले. नारायणराव त्यावेळी 'उदय सारख्या प्रतिष्ठित वृत्तपत्रांचे संपादक होते. निष्पक्षी संपादक पदावरुन थेट, जिल्हा संघचालक म्हणून संघप्रवाहात सक्रिय होणे हे डॉक्टराच्या संघटन कौशल्याचे फलित ठरले.

विद्याधर गोखले म्हणजे दे.भ. संभाजीराव गोखल्यांचे चिरंजीव. डॉक्टरांचा गोड स्वभाव त्यांना संघकार्यापासून दूर ठेवू शकला नाही. घरात कॉग्रेसच्या बैठकी चालत अनेक विचारवंत कार्यकर्त्यांचा सहवास लाभे. त्यामुळे देशभक्तीची प्रेरणा घेऊन विद्याधर संघकार्याकडे वळला. बाल स्वयंसेवक विद्याधर गोखले यांनी पुढे आपल्या अमोघ वक्तृत्वातून अमरावतीत संघकार्याचा पाया दृढमुल करण्यास उल्लेखनीय मदत केली. त्यांची कल्पना अशी की संघाच्या 'स्वयंमेवमृगेन्द्रता' बोधवाक्याप्रमाणे अमरावतीतील शाखांनाही त्यांनी वनराज, केसरी, शार्दूल, मृगेन्द्रसारखी सिहांची नावं दिली. १९३४ च्या सुमारात दादासाहेब अडसड, विठ्ठलराव वानखेडे, भाऊसाहेब लुले अमरावतीत आले आणि आप्पाजी जोशींच्या मार्गदर्शनाखाली संघकार्याच्या विस्ताराला अश्वशक्ती मिळाली. धामणगावचे

दिगंबरपंत तिजारे अमरावतीत आपला ठसा उमटवून तेवढ्याच झपाट्याने मध्यप्रदेशात संघाची बीजं लावतात. तिकडे शिक्षणासाठी अमरावतीत स्थायिक झालेले बापुजी जोशी अचानक उत्तर प्रदेशातील संघविस्तारात भाऊराव देवरसांच्या गळ्यातला ताईत बनतात. संघच्या वटवृक्षात अमरावती शहरांन घातलेले हे खतपाणीच म्हटलं पाहिजे.

विदर्भातील संघक्षेत्रात वसंतराव कसबेकरांना न ओळखणारा क्वचित कुणी सापडेल. त्यांच्या उल्लेखानिशवाय अमरावतीतल्या संघविस्ताराची मालिका अपूर्ण ठरेल. वडिलांच्या मृत्यूनंतर बहीण-भावासह ते अमरावतीत काकांकडे आले. पुढं खाजगी नोकरी दुय्यम ठरली. दादा गुप्ता आणि वसंतरावांची खांद्याला खांदा लावून काम करण्याची वृत्ती, त्याचं फलित म्हणजे अमरावतीचं संघवैभव आहे, असं म्हटल्यास वावगं ठरु नये !

महाल संघ कार्यालयात उतारवयातले श्री.कसबेकर एक आठवण सांगतात - १९३८ च्या सुमारास डॉ.हेडगेवार अमरावतीत आले. तत्कालिन कार्यवाह श्री.लिमयेंकडे डॉक्टरांना उतरवावे असं प्रारंभी ठरलं. मात्र ऐनवेळेवर दादासाहेब खापर्डे आपल्या बग्गीसह बसस्थानकावर पोहोचले आणि डॉक्टरांनातीत बसवून तिथल्या उपस्थितांना एवंढच बोलले, "भारताच्या या अनभिषिक्त सम्राटाला आज माझ्या बग्गीतून मी घरी नेणार !"

(महेश नंदनपवार (पुरक माहिती : डॉ.ग.तू. मैदमवार,अमरावती) उभयनांच्या सौजन्याने. त.भा. ३.८.९७. पासून साभार. संपादक)

राष्ट्रीय स्वयंसेवक संघ

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे आद्यसर संघचालक डॉ.के.ब.हेडगेवार. व्दितीय सरसंघ चालक श्री.मा.स. गोळवलकर उर्फ श्री.गुरुजी. तृतीय सरसंघचालक श्री.बाळासाहेब देवरस. व चवथे विद्यमान सरसंघचालक श्री.राजेंद्रसिंग उपाख्य रज्जुभैय्या.

अमरावती जिल्ह्याचे संघचालक मा.श्री बामणगांवकर नंतर

अप्पासाहेब खरे, नानासाहेब ठाकूर, नंतर डॉ.भागवत, त्यानंतर श्री.बापुसाहेब भोंदू, नंतर श्री.गणेश शेषराव जाधव नंतर श्री.बाळासाहेब भोंदू व नंतर विद्यमान श्री.भय्याजी गुप्ता, डॉ.आळशी यांच्यानंतर संघचालक श्री.भडके हे शहर संघचालक आहेत.

राष्ट्रीय स्वंयसेवक संघाचा अमरावती शहरात व जिल्ह्यात विस्तार, प्रसार होण्यास व पाया पक्का होण्यास काही निष्ठावंत स्वयंसेवक पदाधिकाऱ्यांचा महत्वाचा वाटा आहे. त्यात उपरोक्त जिल्हा संघचालक तर होतेच, शिवाय श्री.ना.रा.बामणगावकर, कविभूषण प्रा.ब.ग. (अण्णासाहेब) खापर्डे, श्री.हरिरामजी कलंत्री, श्री.मोतीरामजी ककरानीया, श्री.लक्ष्मण रावजी गुप्ता, श्री.भोजराज गुप्ता, श्री.उत्तमराव जगताप, श्री.दिनकरराव शेटे, श्री.गणपतराव पोळ, श्री.दादाराव अडसड, श्री.नि.मो. (राजाभाऊ) देशपांडे, श्री.वसंतराव कसबेकर, श्री.विद्याधर गोखले, श्री.विष्णूपंत कर्वे, श्री.रामाभाऊ भेदी, श्री.बापूसाहेब बल्लाळ श्री.रामभाऊ जामगाडे, श्री.सीतारामपंत वाठ, श्री.अनंतराव लिमये, श्री.दादा लिमये, श्री.सिध्दनाथ काणे, श्री.मारोतराव महाजन, श्री.केशरवाणी बैजनाथ, श्री.दादासाहेब (दे.वि.) खेडकर, श्री.देविदासपंत पांडे, श्री.हरिभाऊ तेलंग, बाळासाहेब हरकरे, श्री.बापूराव चितळे, भाऊराव काणे, पंडितराव कोडपे, डॉ.भोजराज, डॉ.शिवाजीराव पटवर्धन, वैद्यराज वा.कृ.दाणी, सोमप्पा कोल्हे, डॉ.श.ना. सहस्त्रबुध्दे, रावसाहेब मोटे, श्री.पन्नालाल जयस्वाल, श्री.ढगे मास्तर, श्री.दे.गो.देशपांडे, श्री.अण्णाजी वैद्य, श्री.वसंतराव घाडगे, श्री.श्रीकृष्ण आडकिने, इ. कार्यकर्त्यांचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागतो.

कविभूषण अण्णासाहेब खापर्डे कलकत्त्यास मेडिकल कॉलेजमध्ये शिकण्यासाठी गेले होते. त्यावेळी श्री.नारायण दामोदर सावरकर, व श्री.के.ब.हेडगेवार हेहि तेथेच शिक्षण घेण्यासाठी आले होते. तिघेहि महाराष्ट्रीय असल्यामुळे त्यांची चटकन मैत्री जमली. प्रत्येकाच्या नावामागे जादूचे वलय होते. नुसती नावेच नव्हती, तर व्यक्तीमत्वाचेही विलक्षण आकर्षक होते, व प्रभावी होता. तिघे एकत्र ज्या घरात रहात, त्याला त्यांनी शांतिनिकेतन, हे नाव दिले. कायं विलक्षण योगायोग ! डॉ.नारायणराव क्रांतीकारी संप्रदायाचे संप्रेरक, डॉ.हेडगेवार जवळ जवळ तसेच, पण

त्यांना प्रत्येक कार्यात नियोजन व शिस्त हवी होती. अण्णासाहेब खापर्डे कवि हृदयाचे, कोमल अंत: करणाचे पण वृत्तीने जहाल मत वादी. लो.टिकांचे अनुयायी पण राहत्या घराचे नाव तिघांनी मिळून ठेवले ते शांतिनिकेतन. रवींद्रनाथांना हे नाव खूप आवडले. आपल्या पर्णकुटीला त्यांनी नाव दिले ते हेच तिघांच्या मनोवृत्ति भिन्न असल्यातरी उद्दिष्ट व ध्येय समांतरच होते. देशभक्ति, स्वातंत्र्य, त्यामुळे ते ह्या विषयीचे विचार एकमेकांना सांगत असत-चर्चा होत असे. मी एक राष्ट्रीय संघ स्थापन करण्याचा विचारात आहे, असे डॉ.हेडगेवार यांनी आपणास दोनतीनदा सांगितले होते, अशी आठवण कै.ती अण्णसाहेबांनी सांगितली होती. म्हणजे संघ स्थापने पासून अथवा पूर्वी पासून त्यांचा संघाशी संबंध होता. संघ स्वयंसेवकांची व कार्यकर्त्यांची ते त्यामुळे आस्थेने विचारपूस करीत असत. संघाच्या कार्यक्रमांना उपस्थित रहात असत. आशीर्वाद देत असत. कौतुक करीत. त्यामुळे स्वयंसेवकांना हुरुप येई. व्दितीय सर संघचालक श्री.गुरुजी गोळवलकर संघात येण्यापूर्वी काशी हिंदू विश्व विद्यालयात विज्ञानाचे प्राध्यापक होते. व कविभूषण अण्णासाहेब हे हि तेथेच मराठी विषयाचे प्राध्यापक होते. त्यामुळे उभयनांचा घनदाट परिचय होत गेला. व वाढत गेला. संघाविषयीची आस्था असण्याचे हे हि कारण होते. व शिवाय अण्णासाहेब मनाने, पिंडाने आचाराने विचाराने हाडाचे हिंदू होते. हे एक महत्वाचे कारण होते. डॉ.हेडगेवार तर विजय दशमीला स्वयंसेवक घेऊन येत आणि दादासाहेबांना मानवंदना देत असत, अशी आठवण सांगतात.

अमरावतीची राजकीय हवा एके काळी अशी होती की, वैचारिक मतभेद काहीही असले तरी नेते एकोप्याने एकत्र येत, विचार करीत, परस्परांच्या कार्यक्रमाला उपस्थित राहात. त्यामुळे डॉ.पटवर्धन, वीर वामनराव दादा जोशी, ना.रा.(नानासाहेब) बामणगावकर, डॉ.भोजराज इ. मंडळी देखील, रा.स्व.संघाच्या कार्यक्रमांना येत असत. प्रमुख अतिथीपद ग्रहण करीत असत. भाषणे देत असत. मी भारत मातेचा पुत्र आहे, ही जाणीव बाळगण्यास सांगण्याची आवश्यकता त्या काळी नव्हती. कारण सर्वाचाच तो पिंड भूत विचार होता. सबकी माता भारत माता म्हणजे सर्वजण भारत मातेचे सुपुत्र, सारे भारतीय माझे बांधव आहेत. मी त्यांच्या सुखदु:खात

संघटित स्वरुपात साह्य करीन व तन मन धन पूर्वक झटेन ह्या भावनेने संघस्वयंसेवक राष्ट्रीय आपत्तीच्या प्रसंगी धावून जातात. आणि अमुक करा, अमुक करु नको असे सांगण्याचीपाळी दरवेळी येत नाही. स्वंयसेवक स्वयंप्रेरणेनेच सहाय्य कार्यार्थ धावून जातात. अशा आपत्ती काळी अमरावतीच्या शाखेनेहि भरीव चांगले कार्य केले. उदाहरणार्थ, जम्मुकाश्मीर हा भारताचा अविभाज्य घटक आहे, ह्या भूमिकेतून डॉ.शामाप्रसाद मुखर्जी यांनी काश्मीरात श्रीनगर येथे सत्याग्रह केला. तेव्हा ठिक ठिकाणाहून सत्याग्रही त्यांना जाऊन मिळाले. अमरावतीहून एक तुकडी सत्याग्रहसाठी गेली होती. गांधीजीच्या खुनाला जबाबदार धरुन रा.स्व.संघावर बंदी टाकण्यात आली होती. तेव्हा रा.स्व.संघाचे सरसंघ चालक बंदिवासात होते. स्वयंसेवकांचा विचार होत असेल तर स्वयंसेवक सत्याग्रह सुरु करतील हे वर वर साधे वाटणारे वाक्य आज्ञा समजून देश भरातून लाखो स्वयंसेवकांनी शांततामय शिस्तबध्द नियोजन पूर्वक सत्याग्रह केला. ह्या सत्याग्रहाच्या शिस्तबध्दतेची प्रशंसा तात्कालीन भारतीय पंतप्रधानानी भर लोकसभेत केली होती. अमरावतीहून देखील शेकडो स्वयंसेवक सत्याग्रह मार्गे कारावासात गेले होते. अमरावती तून ५५० स्वयंसेवक कारावासात गेले होते. संघावरील बंदी कायदेशीर मार्गाने उठविण्यासाठी अमरावतीहून श्री.बाबासाहेब खापर्डे व मद्रासहून श्री.शास्त्री वकील यांनी दिल्लीस अनेक खेपा घालून पंतप्रधानांची भेट घेतली. त्यांच्या आग्रहावरुन रा.स्व.संघाची लेखी स्वरुपात घटना तयार केली. व ती मान्य झाल्यावर संघावरील बंदी हटविण्यात आली. ह्याचे अर्धे श्रेय श्रीमान बाबाराव खापर्डे यांना जाते. कच्छ (गुजरात) हे रण पाकिस्तानला भूदानात जाणार अशी राजकीय हवा पैदा झाली होती. कच्छ भारताच्या अविभाज्य अंग आहे, ही रा.स्व. संघाची ठाम भूमिका होती. म्हणून रा.स्व.संघाने कच्छ बचाव सत्याग्रह सुरु केला, त्यात अमरावतीची पंधरा स्वयंसेवकांची तुकडी सामील झाली होती. गोवा मुक्ती संग्राम चळवळ संघस्वयंसेवक श्री.सुधीर फडके (गायक) यांच्या नेतृत्वाखाली सुरु झाली होती. श्री.महादेवशास्त्री जोशी, त्यांच्या पत्नी सौ.सुधाताई जोशी, फादर मस्कारेनहास्, मोहन रानडे यांनीही सत्याग्रह पुकारला होता. त्यापैकी

अमरावतीहून सत्तेचाळीस स्वयंसेवकांची तुकडी गोवा मुक्ती संग्रामात सहभागी होण्यासाठी गेली होती. बंगालमध्ये स्वातंत्र्यानंतर लगेचच भयानक दुष्काळ पडला होता. तेव्हा रा.स्व.संघाचे "वास्तुहारा सहायता समिती" स्थापन करुन मदत कार्य आरंभिले अमरावतीत देखील वास्तुहारा सहायता समिती स्थापन करुन संघ स्वयंसेवकांनी लक्षणीय स्वरुपात आर्थिक साह्य केले. कपडे, धान्य गोळा करुन दिले. आंध्रागत काही वर्षापूर्वी महा भयानक चक्री वादळ झाले. हजारो लोक तेथल्या तेथे गतप्राण झाले. अनेक लोक बेसहारा झाले. रा.स्व.संघाचे स्वंयसेवक त्वरित साह्यतार्थ धावून गेले. साह्यतार्थ आलेल्या सेनाधिकाऱ्यानी, पोलीसांनी व अखेर भारत शासनानेहि त्या रा.स्व.संघ स्वयंसेवकांचा गौरव पूर्ण शब्दात सन्मान केला होत अमरावतीचे वीस स्वयंसेवक वैद्यकीय सहायता घेऊन तेथे गेले होते. रायल सीमा सहायता कार्याची छायाचित्रे जगभरातील वृतपत्रांनी प्रसिध्द केली होती. कन्या कुमारी येथे श्री.एकनाथजी रानडे यांनी स्वामी विवेकानंदांचे स्मारक उभारण्याचा संकल्प सोडला. तेव्हा अमरावतीस ते सहाय्य याचनार्थ आले होते. अमरावतीतून त्यांना प्रचंड रक्कम संघस्वयंसेवकांनी गोळा करुन दिली. मराठवाड्यातील भुकंप, कोयना, भूकंप या प्रसंगी अमरावतीच्या संघ स्वयंसेवकांनी घरोघर जाऊन सहायता निधी गोळा करुन तेथे पाठविला घरे उभारण्यास साह्य केले. काश्मीरमध्ये लाल चौकात एका देशद्रोह्याने राष्ट्रध्वज पायदळी तुडविला. तेथे राष्ट्रध्वज पुन्हा सन्मानपूर्वक उभारला जाईल यासाठी आंदोलन झाले. भारतभरातून दहा हजार स्वयंसेवकांची तुकडी काश्मीरमध्ये येऊन पोहोचली होती. त्यात अमरावतीचे दोनशेहून अधिक स्वयंसेवक सामील झाले होते.

इ.स. १९७४-७५ च्या आणि बाणीच्या काळात रा.स्व.संघावर अकारण बंदी लादण्यात आली होती. रा.स्व.संघाचे हजारो कार्यकर्ते कारावासात डांबण्यात आले त्यात महिलाही होत्या.

यापुढे सरकार आणीबाणी लादणार नाही, असे आश्वासन जनतेला देऊन रा.स्व.संघावरील बंदी उठविण्यात आली. बंदी उठविण्याचे कारण न देता बंदी उठविली याचा अर्थ लादलेली बंदी गैरकायदेशीर व निष्कारण होती. कारावासात

डांबण्यात आलेल्या स्वयंसेवकांना नोकरीतून हाकलण्यात आहे होते. परंतू सर्वोच्य न्यायालयात प्रकरण दाखल करण्यात आले व अशा सर्व स्वयंसेवकाच्या नोकऱ्या जैसेथे अवस्थेपासून अविलंब सुरु ठेवण्यात आल्या. स्वयंसेवकांना झालेल्या हानीची भरपाई करुन मिळाली. शासनास करोडोरुपयांचा भूर्दंड सोसावा लागला. निष्ठावंत स्वयंसेवक तळमळीने व कळकळीने देशसेवा समाजसेवा, राष्ट्रसेवा करतात.

रा.स्व. संघाचे कार्यकर्ते आजही शांत व स्थिर चित्ताने अव्देष्टा सर्व भूतानां, मैत्र करुण एवच ! निर्ममो निरहंकार समुद:ख सुख-क्षमी, संतुष्ट:सततं योगी यताम्का दृढनिश्चय, महयार्पित: मनोर्बुध्दी र्यो मद्भक्त: समेप्रिय: -

ह्या निष्ठेने राष्ट्रकार्य व संघकार्य करीत आहेत. आपल्या मूलभूत विचार सरणीत कोणताही बदल न करता हिंदूत्व, राष्ट्रीयत्व यावरील निष्ठा अभंग ठेवून आपल्या व्यवस्था प्रणालीत व कार्यपध्दतीत सातत्याने विकास जिने घडवला अशी राष्ट्रीय स्वयंसेवक संघ ही एकमेव संस्था म्हणावी लागेल. उत्तम नागरिक घडवून तो देशाला समर्पित करण्यासाठी माणसातील दिव्य प्रकृतीस समर्पण सेवा, चिकाटी, दीर्घोद्योग, शिस्त संयम त्याग चारित्र्य शीलता यांना रा.स्व.संघ आवाहन करीत आला आहे. सध्याच्या कठिण परिस्थितीत, आपल्या देशात व समाज व्यवस्थेत ध्येयशून्यता, दिशाहीनता स्वैराचार, भ्रष्टाचार, हे दोष आढळतात. ते दोष दूर करण्याचा रा.स्व.संघाचा उपक्रम आहे. राष्ट्रामध्ये भारतीय संस्कृतिबद्दल आदर, उच्च जीवन मूल्यांची आवश्यकता सहिष्णुता, सामाजिक संघटन, समरसता, या सामाजिक गुणांची आवश्यकता असून, त्याशिवाय खरे राष्ट्रीय ऐक्य उत्पन्न होणे शक्य नाही, या भावनेने रा.स्व. संघ कार्य करीत आहे.

समिती कार्याची वाटचाल

समितीचे कार्य प्रारंभ झालेल्या या विजयादशमीला ६० वर्ष पूर्ण होत आहेत. व्यक्तीच्या जीवनात अशी घटना म्हणजे कौटुंबिक मेळाव्याची एक चांगली संधी साठी बुध्दी नाठी होऊ न देता, स्वत:साठीच न जगता आता समाजासाठीच

आपलं जीवन अधिकाधिक देण्याचा संकल्प करण्याचा हा प्रसंग ! आणि संस्था संघटनांच्या जीवनात पू.डॉक्टर हेडगेवार म्हणत असत की रजत स्वर्ण अमृत जयंती करुन उत्सव साजरे करणं हे योग्य नव्हे. परंतु आपण इतकी वर्ष समाजात काम केलं त्यांच आत्मचिंतन करण्यासाठी एकत्र येऊन कामासाठी नवी प्रेरणा नवी आकांक्षा घेऊन अधिक कार्यप्रवण होणं हेहि अपेक्षित असतं.

समितीचं कार्य ज्यावेळी सुरु झालं तो काळ पारतंत्र्याचा स्वातंत्र्याची उर्मि आबालवृध्दांच्या मनात उसळत होती.

त्याकाळी आर्थिक स्वातंत्र्य, समान अधिकार हे 'युगशब्द' बनू बघत होते. स्त्री स्वार्थी बनली की कुटुंबात म्हणजेच राष्ट्रात अनर्थ माजतो. स्त्री मधील कर्तृत्व नेतृत्व आणि विशाल मातृत्वाचे भाव अधिक प्रखर बनावेत, ते समाजाभिमुख व्हावेत असं त्यांना वाटलं. नियती जणू याच क्षणची वाट बघत होती, तो सुवर्णमंगल क्षण म्हणजे पू. डॉक्टर आणि वं. मावशी यांची भेट, एक युगप्रवर्तक घटना वं.मावशींनी धाडसाने आपले विचार पू.डॉक्टरांसमोर मांडले हिंदू समाजाचा परमोत्कर्ष हेच त्यांच स्वप्न त्यासाठी तर त्यांना हिंदू संघटनेची मुहूर्तमेढ रोवली होती. स्त्रियांच्या कार्यासंबंधी त्यानी विचार केला नसला तरी मातृशक्तीच्या सहभागाबद्दल त्यांना आदर होता. त्यामुळे स्त्री-संघटनेचा विचार त्यांच्यापुढे आल्याबरोबर त्यांनी अनुमती दिली. परंतु आपले विचारही अत्यंत स्पष्टपणे मांडले समिती संघाची स्त्री शाखा नाही. संघटनेचं शास्त्र, स्त्री आणि पुरुषांसाठी वेगळं नाही, पण त्या शास्त्राचा उपयोग करताना ह्या बाह्य चौकटीत तुम्ही आपल्या कल्पनेने स्त्रीजीवनाचा अभ्यास करुन रंग भरायचे हे पण त्यांनी मावशींना सांगितले. संघ आणि समिती एक दुसऱ्याचे स्पर्धक नाहीत, तर ते परस्पर पूरक आणि सहयोगी असावेत ही अपेक्षा पण त्यांनी स्पष्ट केली होती.

समितीच्या कार्याचा झगमगाट डोळ्यांना दीपवणांरा नसेल, पण शांत मंद पण स्थिर दीपज्योतीसारखा आश्वासक प्रकाश नक्कीचं तिनं दिला आहे. संस्कार आणि संघटन हेच प्रमुख कार्य करीत असतांना हिंदू समाजाचा समर्थ आधार असलेली कुटुंबसंस्थां मोडीत काढायची नव्हती. पण त्या उंबरठ्यावरच अडखळून समाज

जीवनाची उपेक्षा करुन पण चालणार नव्हतं.

संघ आणि समिती यांच्याप्रारंभ काळात त्या संघटना मजबूत करणं आवश्यक होतं. त्याकडेच सर्व लक्ष द्यावं लागलं. काही अंतर राखणं, पथ्य पाळणं आवश्यक होतं. प्रत्येक निर्णय घेतांना संघाची रीतसर परवानगी घेण्याची आवश्यकता नव्हती पण मोठे निर्णय घेतल्यावर ते प्रमुखाच्या कानावर घालणं हे आपलं कर्तव्य समितीने आजवर पाळलं आहे.

समितीचे शारीरिक, बौध्दिक कार्यक्रम, 'उत्सवाची पार्श्वभूमी, जन्मदिन, स्मृतिदिन मनवण्याची पध्दत, वंदे मातरम् पूर्ण गाण्याचा आग्रह, ध्वजाचे कापड स्वत:सूत कातून केलेल्या कापडाचाच ध्वज बनवण्याचा कटाक्ष, बालशिक्षण महिलांच्याच कक्षेत असावे - सामान्य जनापर्यंत पोचताना त्यांच्या धर्मप्रियतेची आठवण ठेवून श्रीरामायण भागवत, महाभारत सांगून त्याच्या श्रध्देचं अधिष्ठान ईश्वरापासून राष्ट्रदेवीकडे नेण्याची योजना, गीत, चित्र, नाट्य, यांचा भावना वातावरण निर्मितीसाठी उपयोगात आणण्याची प्रेरणा देणं-गोहत्या बंदी, धर्मांतर म्हणजेच राष्ट्रांतर हे ओळखून त्या संदर्भात कार्यक्रम घेणं, सेवाधर्माची महती सांगणं, तो अबोलपणे आचरणं, असे अनेक प्रयोग समितीच्या माध्यमातून झाले आहेत.

मातृत्वाला नेतृत्व, कर्तृत्वाची झालर आणि नेतृत्व कर्तृत्वाला मातृत्वाची झालर असायल हवी हा समितीचा आग्रह आहे आणि त्याच्याशी प्रामाणिक राहून समितीची वाटचाल सुरु आहे.

आज समन्वयाचे युग आहे. हिंदुधर्म-संस्कृती आपल्या अस्तित्वासाठी प्रचंड संघर्षाच्या काळातून जात आहे. या काळात हिंदुत्वाच्या विचाराने प्रेरित झालेल्या सर्व संस्था संघटनांनी व्यापक विचार करुन एकजुटीने उभे राहण्याची आवश्यकता आहे. त्यात समितीचा खारीचा वाटा असला तरी त्या खारीच्या वाट्याची उपेक्षापण करुन चालणार नाही.

आज समितीच्या देशभरात ४००० हून अधिक शाखा आहेत,

समितीच्या शाखा संपूर्ण देशात, प्रांताप्रांतातून अगदी आपद्ग्रस्त प्रांतातूनही काम करीत आहेत. समितीची कार्यालये अनेक ठिकाणी आहेत, स्वयंपूर्ण प्रकाशन विभाग आहे पण तेवढ्यावर आचं समाधान नाही.

ग्रामीण क्षेत्रांच महत्व लक्षात घेऊन, तेथे सतत संपर्क करुन, त्यांच्या ठिकाणी सामाजिकता, राष्ट्रीयता जागवणं, सुसंस्कारीत करणं आवश्यक आहे. त्या क्षेत्रातल्या महिलांचे आजही अनेक प्रकाराने शोषण होतं आहे. ते थांबविण्यासाठी काय करायला हवं हा चिंतनाचा विषय आहे. केवळ ३३% आरक्षण देऊन हे काम होणार नाही प्रांरभीची एक पायरी म्हणून त्याच्याकडे बघून सामान्यजनां मध्ये, जाणीवतेची, विवेकशक्तीची निर्मिती करणं. वैचारिक स्तर वाढवणं आवश्यक आहे. देशाच्याप्रगतीत आपला केवढा तरी सहभाग होऊ शकतो याच जाणीव पण निर्माण करायला हवी.

ग्रामीण क्षेत्राइतकेच संस्कार समाजाच्या अति उच्चभू वर्गावर होणं आवश्यक आहे. पाश्चात्यांच्या प्रभावाखाली बहुतांशाने असलेल्या या वर्गातील मुलांमध्ये साधनसंपत्तीच्या अतिरेकामुळे राष्ट्रीयतेचे संस्कार दुरावले आहेत. ते पुन्हा दृढमूल होणं आवश्यक तेवढंच ग्रामीण क्षेत्रातील बालकं, अभावग्रस्ततेमुळं यापासून वंचित राहतात. शिक्षण क्षेत्र आणि घर या दोन्ही ठिकाणाहून श्रेष्ठ संस्कार व्हावेत, त्यांचा एक विचार व्हावा यादृष्टीने समितीची आगामी काळातील योजना आहे.

आणखी एक संकट आहे आपली संस्कृती मुळापासून उखडवून टाकण्याचे महादुष्ट कारस्थान प्रचारसंस्था, स्वार्थी राजनीतिक संस्था एकजुटीने करीत आहेत. त्यासाठी सर्वक्षेत्रीय संघटित प्रयत्न होण्यासाठी समिती प्रयत्नशील आहे. आतापर्यंतची आक्रमण शौर्याने थोपवली तसेच हे आक्रमण बुध्दीचातुर्याने थोपवण्यासाठी सर्वांचे सहकार्य लाभावे यासाठी समितीची धडपड आहे.

भारताच नव्हे तर अनेक देशातून महिलांच्या कार्याचं महत्व पटल्यामुळ समितीच्या कार्याला भरपूर वाव आहे. त्याचा फायदा घेऊन विश्वहितासाठी आपली

ताकद वाढवणं हाच समितीचा उद्देश. ह्या ध्येयाला अनुसरुन अमरावतीत सौ.नलिनीताई लिमये, सौ.मालती बाई मोडक, सौ.तापस, सौ.माधुरी कुटुंबे, सौ.पिंपळे, सौ.चौधरी, कु.शैला भागवत, कु.मंगला जोशी, सौ.नूतन रानडे, सौ.सहस्त्रबुध्दे, सौ.धर्माधिकारी, सौ.प्रभावती जोशी, सौ.नंदिनी डोळे, सौ.राधा आष्टीकर, सौ.लीला महाजन, सौ.संध्या भागवत, सौ.वैशाली लिमये, सौ.वैदेही लिमये, इ. तळमळीच्या कार्यकर्त्यांनी महिलांमध्ये राष्ट्र जागृतीचे कार्य केले आहे.

प्रमिलाताई मेढे , अहिल्यामंदिर धंतोली, नागपूर. साभार)

''बलम् उपास्व''

खेळ खेळू या जगताच्या अंगणी.

व्यायामा सोबतच अमरावती नगरीत खेळ, क्रीडा यांना महत्व होते. अनेक वर्षांच्या मागणनीनंतर अमरावतीस इ. १९७०-साली जवाहर स्टेडियम बांधण्यात आला. व आता तेथे स्पर्धांची व शर्यतीची चांगली व्यवस्था लागली आहे. हे भव्य क्रीडासंकुल सध्या जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्या देखरेखीखाली आहे. व जवळच नाट्य गृह हि उभारण्यात येत आहे. परंतु ह.व्या.प्र. मंडळाने युवक युवतींच्या क्रीडात्मक विकासाची उत्कृष्ट देखभाल इ. १९२४-२५ पासूनच केलेली आहे. हल्ली या संस्थेला व्यायाम क्षेत्रात, शारीरिक प्रशिक्षण क्षेत्रात, क्रीडा क्षेत्रात जागतिक कीर्ती प्राप्त झाली. अमरावतीत एक बॅडमिंटन हॉल असून तेथे टेबल टेनिसहि खेळाना येते. हल्ली स्केटिंग, ट्रॅकिंग वगैरे ची ही आवड निर्माण झाली आहे. सिटी क्लब, रिफॉर्म कल्ब, मॅसॉनिक लौजचे प्रांगण, वनिता समाज, इ. संस्था क्रीडाविषयक उपक्रम चालवितात. अमरावती विद्यापीठ हि क्रिडा विषयक उपक्रमास उजळा देत आहे. क्रिकेट, फुटबॉल, व्हॉलीबॉल, कबड्डी खोखो, टेनिस, बॅडमिंटन, पोहणे, हे खेळ अमरावतीत गेल्यापन्नाससाठ वर्षापासून लोकप्रिय आहेत. तत्पूर्वी धावणे, बैल गाड्यांच्या शर्यती, बोकडांच्या टकरा, बैलांच्या

झुंजी, कोंबड्यांच्या लढाया घोडे स्वारी, रेड्यांच्या झुंजी हे खेळ लोकप्रिय होते. खंड एक मध्ये ह्याविषयी माहिती आलेली असल्यामुळे व मुख्यत: स्वातंत्र्योत्तर काळातील माहिती संकलित करावयाची असल्यामुळे हा विषय येथेच संपवितो.

जुन्या पिढीतील लोकांच्या तोंडी त्या वेळेच्या अनेक खेळांडूची नावे येतात. एखाद्या खेळाचे नाव निघाले की, त्यांची आठवण हमखास ठेवलेलीच. क्रिकेट म्हटलेकी नायडू साहेब, डॉ.पावणस्कर, डॉ.शहाणी, डॉ.भट, सूर्यकांत जोग, बाळासाहेब जोग यांची आठवण देतात. सुभाष गुप्ते पुढे फार विख्यात क्रिकेट खेळणारा म्हणून गाजला. अप्पासाहेब खरे यांना क्रिकेटची आवड असे. कबड्डी म्हटले म्हणजे माधवराव दंडवते, काका, जोशी, शिवाजीराव जोशी, काणे मास्तर, सगदेव गुरुजी, वडोदकर सर, वसंतराव गुल्हाने, संजय आलसेट आठवतात. पुढे नगराध्यक्ष झालेले हरिभाऊ कलोती फार उत्तम कबड्डी खेळायचे. बॅ.गणोरकर टेनिसवाले थोडे सुधारक असल्यामुळे सौभाग्यवतींनीहि अर्धी विजार चढवून त्यांच्या सोबत क्रीडांगणांवर टेनिस खेळण्यास त्यांची मनाई नसे: उलट उत्तेजन होते. त्यांची मुलेही उत्तम खेळाडू होते. अप्पासाहेब ब्रह्म, रामभाऊ गद्रे, बाळासाहेब गद्रे, बाळासाहेब चापोरकर, भीमराव देशपांडे वकील, रमेश पाध्ये वकील, पत्की वकील, कृष्णराव चिमोटे, यांचा एकगट क्रिकेट, टेनीसचा उत्तम शौक बाळगणारा होता. त्यात अधून मधून शंकरराव बोधनकर, डांगे येऊन जाऊन असत. हॉकी खेळणाऱ्यात मन्या कुबडे, अताऊर्रहमान, भय्या अंधारे, सूर्यकान्त जोग, वगैरे चमकून गेले. व्यंकटराव डुबे अष्ट पैलू माणूस, कोणत्याही खेळात त्यांचा हातखंडाच, कृष्णा कुळकर्णी कबड्डीत नाव मागे ठेवून गेला, तसाच बल्लू अवस्थी : रणजीत सिंग, गुल्हाने काका, बाबूराव पांडे, वगैरे कबड्डी मध्ये आपली आठवण ठेवून गेले. काका जोशी अन शिवाजी जोशी व्हॉलीबॉल खेळत. संघावर अठ्ठेचाळीस साली बंदी असताना स्वंयसेवकांनी 'गुप्त' मंडळ स्थापन केले. ते इतके चांगले खेळत की, अनेक स्पर्धांमध्ये गुप्त मंडळाचा पहिला क्रंमाक ठेवलेलाच. आझाद हिंद मंडळाने अमरावतीच्या सांस्कृतिक आणि क्रिडाविषयक वैभवात मोलाची भर घातली. पाठोपाठ निळंकठ मंडळ हि तेवढेच नाव कमावून आहे. या दोघांच्या मुकाबल्यात राजापेठ मंडळ

अल्पकाळ गाजलं. पण त्यात सातत्य राहिले नाही. मध्यंतरी खापर्डे बगीचा मंडळ, सुभाष मंडळ, चमकले. पण तेहि धूमकेतू प्रमाणे हळूहळू लुप्त झाले. फ्रेझरपूरा क्लब, हमालपुरा क्लब, अंबापेठ क्रीडा मंडळ, यांचे कबड्डी प्रेम आज सतत पन्नास वर्षे टिकून आहे. अमरावतीचा विजय क्लब आज ऐकू येत नाही. पण गत काही वर्षे पर्यत विजय क्लबचा दबदबा महाराष्ट्रभर होता. खो-खो अमरावतीचे नूतन कन्या शाळेच्या पोरींना बहाल केला होता. अपवाद फक्त विजय क्लबचा. विजय क्लबने खो खो तहि महाराष्ट्र व्यापी नाव कमावले. पुढे पुढे एकेक कल्ब अस्तगत होत गेला. पण खेळ आणि क्रीडाप्रेम मात्र अस्तगत झाले नाहीत. याचे सर्व श्रेय ह.व्या.प्र.मंडळाला जाते.

विदर्भ संयुक्त महाराष्ट्रात आल्यावर विदर्भाचा विविध दृष्टीनी लाभ झाला. त्यात क्रीडा विषयक लाभ महत्वाचा ठरला विविध स्पंर्धासाठी कोल्हापूर, सांगली, जळगाव, कडील स्पर्धक इकडे येत असत. त्यांच्या चमूकडे पाहिल्यावर ही कोल्हापूरची मंडळी हे सांगावे लागत नसे. दणकट, ऐटबाज रुबाबदार चपळ व्यक्तीमत्वाचे खेळाडू पाहिल्यावर छाती अभिमानाने भरुन येत असे. आपणही असे चांगले व्हावे हा ईर्ष्या इकडल्या तरुण तरुणींच्या मनात डोकावल्यास नवल नाही. वऱ्हाडातल्या मुली पोहण्यास लाजत असत. ह.व्या.प्र. मंडळाने मुलींच्या मनातला संकोच दूर केला. मुली स्पर्धे मध्ये उतरु लागल्या. बाहेर स्पर्धेसाठी जाऊ लागल्या. पारितोषिके आणू लागल्या. इकडची वर्तमानपत्रे म्हणजे उदय व हिंदुस्थान यांच्यातून अनेक कर्तबगार मुलींचे फोटो झळकत असत. पण उदय चे अंक नीट न ठेवल्यामुळे व साफ सफाई न केल्यामुळे उधळीने खाऊन टाकले. हिंदुस्थानच्या कार्यालयास आग लागली. सर्व जुने अंक जळून गेले. त्यामुळे आता केवळ स्मरण उरले आहे. ज्यांचे फूटबॉल च्या खेळात विशेष स्मरण ठेवावे असे कै.भीमराव बापू देशमूख, इ.१९४२ साली ते अ.भा.फूटबॉल स्पर्धेत शेष भारत संघातर्फे खेळले. इ. १९४७ साली त्यांनी मोहनबगान संघातर्फे राष्ट्रीय स्पर्धेत भाग घेतला. इ. १९४८ साली लंडनला भरलेल्या जागतिक ऑलिपिक फूटबॉल स्पर्धेत भारतातर्फे खेळले. इ. १९५१ मध्ये ते म.प्र. फूटबॉल असो. चे प्रशिक्षक होते.

पुण्या मुंबई कडे, कोल्हापुर, साताऱ्याकडे, मिरज सांगलीकडे, खेळांना विद्यापीठांतून उत्तेजन देण्याची प्रथा इकडे नागपूर विद्यापीठांत आली. व नंतर अमरावती विद्यापीठ स्थापन झाल्यानंतर येथेही आली. आणि त्यामुळे इ. १९८० नंतरच्या ह्या व्दिदशकात अमरावतीत क्रीडा क्षेत्रास चांगली उर्जितावस्था आली आहे.

अमरावती जिल्हा क्रीडा अधिकारी यांच्याकडून थोडी बहुत माहिती प्राप्त झाली. तदनूसार -

इ.१९९० मध्ये श्री.बाळभूषण कदम यांनी ज्यूदो खेळात सुवर्णपदक प्राप्त केले. त्याच वर्षी संजय नाईक यांनी व्हॉलीबॉल मध्ये उत्कृष्ट खेळाडू म्हणून सर्वोच्च पदक मिळवले. त्यांनी आंतरराष्ट्रीय स्पर्धेतहि भाग घेतलेला होता.

इ. ९३-९४ मध्ये कु. मनीषा सहस्त्रबुध्दे हिने व्हॉलीबॉलमध्ये सर्वोत्कृष्ट खेळाडू म्हणून नाव कमावले. तर १९९७ मध्ये कु. शालीनी बोडे हिने नाव कमावले. ती अंबापेठा क्रिडा मंडळाची सदस्य आहे. गेली काहीवर्षे श्री.विजयराव देशपांडे ॲड यांच्या प्रोत्साहनाने हे मंडळ क्रीडाक्षेत्रात सक्रिय आहे.

क्रीडाक्षेत्रात महाराष्ट्र शासन उत्तेजनार्थ अनेक पारितोषिके देऊन संघटकांचाहि बहुमान करते. अशा उत्तम संघटकांमध्ये श्री.प्रभाकरराव वैद्य, श्री.देविसिंह शेखावत (खासदार, माजी महापौर) डॉ.विजयराव वैद्य, श्री.एम.टी.वैद्य यांचा समावेश आहे. युवकांना उत्तेजनासाठी महाराष्ट्र शासन श्री.शिवछत्रपति युवा पुरस्कार देत असते. अमरावतीतून हा पुरस्कार श्री.विजय लुंगे, श्री.महेन्द्र भुतडा यांना प्राप्त झाला आहे.

अमरावतीच्या क्रीडाविश्वाने आंतराष्ट्रीय दर्जाचे पंच पुरविले आहेत. ही निश्चितच अभिमानाची गोष्ट होय. यामध्ये श्री.राजकुमार फुंडकर (ज्यूदो), श्री.सतीश पहाडे (ज्यूदो) श्री.सुधीर मांजरे (टे.टे) मुकुंदराव असनारे (जिम्नॅस्टिक्स) यांचा समावेश होतो. श्री.शैलेश नवलेहि (जिम्नॅस्टिक्स) या पैकीच. शिवाय ते सर्वोत्कृष्ट राष्ट्रीय क्रीडापटू या बहुमानासहि पात्र झाले होते. श्री.अनंत केळकर हि

सुविख्यात पंच होते.

कु.वैशाली तारेकर व कु.दीप्ती तारेकर या भगिनी उत्कृष्ट राष्ट्रीय हॉकी क्रीडा पटु या बहुमानास पात्र ठरल्या.

ज्यूदोचे शास्त्रीय सर्वांग परिपूर्ण प्रशिक्षण अमरावतीच्या ह.व्या.प्र. मंडळात मिळत असल्यामुळे अनेक ठिकाणी ज्युदो स्पर्धेत अमरावतीचे स्पर्धक हमखास सर्वोच्च ठरतात. उदा. १९९६ मध्ये आकोला येथे झालेल्या राज्यस्तरीय शालेय ज्युदो स्पर्धेत अमरावतीचे रुपेश, नीलेश येवतीकर, सचिन भाग्रडकर, सचिन शर्मा, यांना आपापल्या गटान प्रथम पारितोषिक प्राप्त झाले. दिनांक ३०.१०.९६ ला अमरावतीस भरलेल्या विभागीय शाळेय बॅडमिंटन स्पर्धेत अमरावती येथील गोल्डन किड्स चमूला व नेता तुषार कासट याला अजिंक्य पद प्राप्त झाले. ५९ व्या राज्यस्तरीय मुलींच्या जलतरण स्पर्धेत अमरावती चमूला व्दितीय पारितोषिक प्राप्त झाले.

अमरावती विद्यापीठ कुस्ती स्पर्धेत अमरावतीच्या वीरेंन्द्र कुमारने आजिंक्य पद प्राप्त केले.

चंद्रपुर येथे भरलेल्या शरीर सौष्ठव स्पर्धेत अमरावतीच्या विशाल शिंदेला रौप्य पदक प्राप्त झाले. अमरावतीच्या अनंत केळकर यांना आंतरराष्ट्रीय पंच होण्याचा बहुमान प्राप्त झाला आहे.

विद्यार्थी दशेतच क्रीडाविषयक चांगले मार्गदर्शन मिळाले, चांगला सराव केला तर त्यातून सर्वोच्च पारितोषिके प्राप्त होऊ शकतात, हे यावरुन लक्षात येईल. ह्याची चाचणी घेण्यासाठी राज्य स्तरीय शालेय स्पर्धांचे आयोजन केले जाते. इ. १९९६ मध्ये राज्यस्तरीय धर्नुविद्या शालेय स्पर्धेत अमरावती विभागाने अजिंक्य पद पटकावले. नागपूरच्या यशंवत स्टेडियमवर विदर्भ स्तरीय फ्री स्टाईल विभागातील झुंजीत अमरावतीच्या संजय तीरथकरने विदर्भ केसरी सन्मान पटकावला. ह्यावेळी अन्य स्पर्धा मध्ये अमरावतीच्या चमूला सर्वाधिक वीस गूण मिळाल्यामुळे सर्वसाधारण विजेते पदहि मिळाले. अमरावतीचे व्यायाम प्रेम पूर्वीपासूनच जगजाहीर आहे. परंतु

मुख्यत: अंबा दरवाजाच्या आतील विभागात जुनी अमरावती विभागात - व्यायामाची आवड तेथील युवकांनी सिध्द केली आहे. कारण अमरावतीचा पहिला आखाडा तुकाराम आखाडा, नंतर आलेले नीळकंठ व्यायाममंदीर इ. बहुतेक व्यायामशाळा परकोटाच्या आत आहेत. जोग चौकातहि शिवाजी आखाडा आहे. इ. १९९७ मध्ये नीळकंठ व्यायाम मंडळाने जिल्हास्तरीय शरीर सौष्ठव स्पर्धांचे आयोजन केले. तेव्हा अमरावती जिल्ह्यात अकरा व्यायामशाळा सक्रीय असल्याचे आढळले. तुलनात्मक दृष्टीने ही संस्था कमी ठरते खरी. अमरावतीत बालाजी व्यायाम शाळा, प्रताप आखाडा, तुकाराम आखाडा, महाराष्ट्र व्यायाम शाळा, नीळकंठ व्यायाम मंडळ, संपदा हेल्थ क्लब, तानाजी आखाडा, भगतसिंह आखाडा, जवाहर व्यायाम शाळा, आदर्श स्पोर्टींग क्लब, शिवाजी व्यायाम मंदीर आणि ह.व्या.प्र.मंडळ इ. संस्था व्यायामाची गोडी विकसित करण्यासाठी प्रयत्नशील आहेत. साताऱ्याचे सुविख्यात व्यायामाचार्य श्री.दामोदर बळवंत उर्फ भिडे गुरुजी यांनी अमरावतीतील तरुणांना पोहण्याच्या कलेची व व्यायामाची गोडी लावली. त्यांच्याच प्रेरणेने अमरावतीत तुकाराम आखाडा सुरु झाला. स्व.दादासाहेब खापर्डे यांना व्यायामाची आवड फार होती व विद्यार्थ्यांनी व्यायाम ध्यावा यास्तव प्रयत्नशील असत. स्व. भाऊसाहेब असनारे, स्व.अण्णासाहेब असनारे , स्व.अंबादास पंत वैद्य, श्री.व्यंकटराव दुबे, स्व.तुकाराम दादा, स्व.हरिहरराव देशपांडे यांनी मुलांना लाठीकाठी, बोथाटी, गदगाफरी, बरची, इ. शस्त्रांचे शिक्षण दिले. अप्पासाहेब खरे कुस्तीचे प्रेमी होते. या पूर्व सूरींच्या प्रेरणेने अमरावतीत सौष्ठव पूर्ण शरीर कमावलेले नामांकित पहेलवान उदयास आले. त्यात नारायणराव दातेराव पहेलवान, छोटू पहेलवान, प्यारेलाल पहेलवान, मामर्डे पहेलवान, वामनराव पहेलवान, शेख पहेलवान, वसंतराव गुल्हाने, बाकडे पहेलवान, श्री.भाऊ वानखडे, श्री.बाबूराव मोहोड, इ.होऊन गेले व त्यापैकी काही ह्यात आहेत. श्री.संजय तीरथकर यांनी विदर्भ केसरी हा बहुमान पाच वेळा पटकावला. श्री.अनंत केळकर (नाना) सध्या ह.व्या.प्र.मंडळात व श्री.देशमुख अमरावती विद्यापीठात मार्गदर्शक आहेत. व त्यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक व्यायाम पटू व क्रीडापटू आंतरराष्ट्रीय कीर्तीची पारितोषिके प्राप्त करीत आहेत. विशेष उल्लेखा करावा असे श्री.नरेश बुंदेले, गजानन साठे, विल्सन नायर, विशाल शिंदे

हे होत. श्री.सतीश यावले नीळकंठ व्यायाम मंदिरात उत्तम, सौष्ठव पूर्ण पहेलवान, क्रीडापटू तयार करीत आहेत. त्याचप्रमाणे ह.व्या.प्र.मंडळात श्री.लक्ष्मीकांत खंडागळे, टॉमीजोस हे नवीन नवीन क्षेत्रात आघाडीवर येणारे विद्यार्थी घडवीत आहेत. त्यात जलतरण विभाग हि आलाच. ह.व्या.प्र. मंडळाच्या टिपणात याविषयी विस्तृत आलेले. आहेत. ह.व्या.प्र. मंडळाच्या परसिरात आशियातील सर्वात मोठा जलतरण हौद बांधण्यात आला आहे. त्यात मुली देखील पोहतात. पोहण्याचा सराव करतात व जलतरण स्पर्धेत सहभागी होतात. अमरावतीच्या नारायणदास लड्ढा हायस्कूल मधील अवध्या तेरा वर्षाच्या बरखा किशोर केडिया ह्या विद्यार्थिनीने दीर्घ पल्याच्या सागर जलतरण स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. महाराष्ट्र राज्य ॲमॅच्युअर ॲक्वेटिक असोसिएशन (एम.एस.एएए) च्या वतीने ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. एकंदर तीनशे चौदा स्पर्धकांमध्ये बरखा केडिया हिने सोळावा क्रमांक पटकावला. अमरावतीच्या प्रचंड सरावानंर तिने प्रथम सँकॉकते गेट वे ऑफ इंडिया पर्यंत व नंतर धरमतर ते गेट वे ऑफ इंडिया हे अंतर पार केले. जिब्राल्टरची खाडी पार करण्याचाहि तिचा मनोदय आहे. तसेच सायकल स्पर्धेत आणि धावण्याच्या स्पर्धेतहि सहभागी होण्याची ती पूर्वतयारी करीत आहे.

महाराष्ट्रात नवे शासन स्थिर झाले आहे. मुख्यंमंत्री श्री.मनोहर जोशी यानी नुकतेच शिक्षण विषयक धोरण घोषित केले आहे. ते कार्यान्वित झाले तर महाराष्ट्र क्रीडा क्षेत्रात लवकरच जागतिक पातळीवर येईल. ह्याधोरणानुसार शालेय शिक्षणाचा क्रीडा अविभाज्य घटक होईल. तालुक्या-तालुक्यात प्रशिक्षण देण्याची व्यवस्था करण्यात येईल. प्रत्येक गावी व्यायामशाळा उघडण्यात येईल. खाशाबा जाधव राष्ट्रीय कुस्ती स्पर्धा, चषक कबड्डी स्पर्धा सुरु करण्यात येणार आहे. दर २५० विद्यार्थ्यां मागे एक क्रीडा शिक्षक नेमण्यात येईल. जिल्ह्यांना क्रीडासाहित्य खरेदीसाठी अनुदान देण्यात येईल. असे हे बहुआयामी धोरण आहे.

विश्व हिंदू परिषद , अमरावती शाखा.

विश्व हिंदू परिषदेची स्थापना त्रिवेणी संगम (प्रयाग) येथे कुंभ मेळा

भरला असता जन्माष्टमीच्या मुहूर्तावर इ. १९६४ साली झाली.

भारतातीलच नव्हे तर जगभर संचार करणारे सर्व हिंदू साधूसंत, महंत, सिध्द पुरुष, योगी, महात्मा, सर्व शंकराचार्य, सर्व संप्रदांयाचे आचार्य, कुलपति, मठाधिपति सर्व पंथांचे गुरु व सत्पुरुष असे सुमारे एक हजार महामहिम स्थापनेच्या वेळी उपस्थित होते. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, श्री.माधवसदाशिव गोळवलकर, श्री.चिन्मय महर्षि श्री.दादासाहेब आपटे, वकील, पुणे, मास्टर तारासिंह, मास्टर फतेसिंह, जैन महासुनि महामंडलेश्वर, महानुनिभंदत आनंद कौसल्यायन, महाराणा हरदतसिंह, या विख्यात व्यक्तींनी स्थापनेत पुढाकार घेतला होता.

राष्ट्रहित व हिंदूहिंत यास्तव हिंदू धर्मातील सर्व पंथोप पंथांचे, जातीजमातीचे, संप्रदाय, उषासनामार्ग व विविध संस्कृतींचे, परंपरांचे, संघटन करणे हे वि.हि. परिषदेचे उद्दिष्ट ठरविण्यात आले. अन्य धार्मियांवर अन्यायव अत्याचार न करता, त्यांच्या हितसंबंधांचे संरक्षण करुनच हे उदिष्ट साध्य करण्यावर भर देण्यात आला.

हिंदूत्व हाच राष्ट्रीयतेचा पर्याय आहे. राष्ट्राच्या उभारणीत हिंदू धर्म व तत्प्रणीत उच्च सांस्कृतिक मूल्ये यांचे योगदान महत्वाचे आहे, भारतीय संस्कृती व संस्कृत भाषा यांच्या जतनावर भर देणे आवश्यक आहे. व त्यासाठी उच्चजीवन मूल्यांना प्राधान्य देणारे शिक्षण द्यावयास हवे. आर्थिक नीती ही राष्ट्रीय स्वत्व व स्वाभिमान यांना पोषक असावी राष्ट्रीयत्व पोषक इतिहासाचे अध्ययन अनिवार्य असावे, तीर्थ क्षेत्रे, यात्रास्थले यांचे शुध्दिकरण व जीर्णोध्दार, भारतीयांच्या सांस्कृतिक व धार्मिक संबंधाचा विकास, पशुहत्याबंदी, परधर्मीयांना शुध्द करुन पुन:हिंदू धर्मात प्रवेश देणे, व त्यांना हिंदूधर्मात सामावून घेणे, सर्वधर्मीयांना राष्ट्रीय प्रवाहात आणण्यासाठी सांस्कृतिक आणि वैचारिक पार्श्वभूमीवर शांततामय आंदोलन करणे, मागासवर्गीय व दलितांना बंधुतुल्य व स्वकुटुंबीय मानणे व त्यांच्याशी तशी वर्तणूक ठेवणे, उच्चनीय भेदभाव समाप्त करणे, महिलांचे सर्व प्रकारे संरक्षण आंतकवादाविरुध्द संघटित प्रयत्नांना उत्तेजन देणे देशाची अखंडता कायम राखणे, सर्व प्रकारचे ऐक्य व करणे,

स्वदेशीचा प्रचार व प्रसार करणे, आदर्श धर्मराज्य व रामराज्य यांचा प्रचार व पुरस्कार करणे, स्वदेशीचा प्रचार व प्रसार करणे, आदर्श धर्मराज्य व रामराज्य यांचा प्रचार व पुरस्कार करणे, ह्या उद्दिष्टांनाहि प्राधान्य द्यावयाचे ठरविण्यात आले. ह्या अधिवेशन स्थली चौसष्ट हजार सभासदांची नोंदणी झाली.

अमरावतीत विश्वहिंदू परिषदेची स्थापना इ. १९६४ साली नोव्हेंबर मध्ये झाली. श्री.श्रीवल्लभजी राठी हे अध्यक्ष, श्री.राजाभाऊ शिंगोरे, जिल्हा सचिव, श्री.वासुदेव खापर्डे नगर सचिव, श्री.परमांनद हरवाणी नगर अध्यक्ष, श्री.महाजन कोषाध्यक्ष, श्री.चितळे नगर उपाध्यक्ष, श्री.कोसे सहसचिव याप्रमाणे नियुक्तिकरण्यात आली. श्री.राठी यांच्या मरणोपरान्त श्री.शिदोरे जिल्हाध्यक्ष झाले. श्री.सीतारामजी वाठ (बडनेरा) हे जिल्हा उपाध्यक्ष होते.

अश्विन शु. १ ते ९ पर्यंत म्हणजे देवी घटस्थापने पासून महानवमीपर्यंत अंबादेवी यात्रेत एक छोटा कक्ष उभारुन, तेथे वि.हि.प. च्या वाङ्मयाची विक्री करण्यात येते. प्रचार पत्रके, यात्रेकरु भाविकांना देण्यात येतात. सदस्य नोंदणी केली जाते. प्रतिवर्षी श्रीरामनवमीला शहरातून शोभायात्रा काढण्यात येते. जन्माष्टमी, गीताजयंति, गुरुपौर्णिमा, व्यास पौर्णिमा, इ.प्रसंगी उत्सव, कीर्तन, प्रवचन, भाषणे इ. कार्यक्रम होतात. अखिल भारताव्यापी एकता यात्रा. गंगाजल यात्रा, समता यात्रा इ. कार्यक्रम संपन्न झाले. तेव्हा अमरावती शाखेने आपले योगदान सादर केले. वर्धा व अमरावती जिल्ह्यांचे संयुक्त अधिवेशन मोझरी येथे संपन्न झाले. शिवाय अमरावती जिल्हा अधिवेशनहि भरविण्यात आले होते. पंढरपूर श्री.क्षेत्र येथे महाराष्ट्र स्तरीय अधिवेशन भरविण्यात आले होते. दर कुंभमेळा प्रसंगी विश्वहिंदू परिषदेच्या वतीने पोलीसांच्या मदतीसाठी हजारो सदस्यपण सहकार्य देतात. अमरावतीहून स्वयंसेवक रवाना होत असतात. अमरावतीस विविध प्रसंगी सुमारे शंभर ख्रिस्ती बांधवांचे शुध्दिकरण करण्यात येऊन त्यांना हिंदू धर्माची दीक्षा देण्यात आली. शुध्दिकरणाचा एक कार्यक्रम कविभूषण अण्णासाहेब खापर्डे यांच्या पौराहित्याखाली संपन्न झाला होता. एका कार्यक्रमासाठी श्री.जगदगुरु शंकराचार्य कल्याण सेवक परिव्राजकाचार्य हे लाभले

होते. वेळोवेळी युवक युवतींच्या भक्तिगीत स्पर्धा, राष्ट्रीय गान स्पर्धा, नृत्यस्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, वादविवाद, परिसंवाद, अभ्यासवर्ग, शिबिर, यात्रा, सहली, इ. कार्यक्रम आयोजित करण्यात आले व चालू असतात. त्यामुळे समाजात धार्मिक एकोपा, जातीय सलोखा प्रस्थापित होण्यास मदत होते. हल्ली श्री.किरण राजोपाध्ये, सुधांशु खरे, विकास चौधरी, विजयराव देशपांडे, वसंतराव काळे, पपू मिश्रा, इ. कार्यकर्ते वरील प्रकारच्या कार्यक्रमाची धुरा सांभाळतात. श्री.रामशिला पूजन, श्री राम पादुका पूजन, गंगायात्रा इ. प्रसंगी पन्नास हजार हून अधिक लोक कार्यक्रमास उपस्थित होते. शेख वजीर पटेल यांच्यासारखा राष्ट्रीय वृत्तीचा माणूस विश्वहिंद परिषदेचा सदस्य बनतो ह्यातच ह्या संस्थेच्या ध्येयधोरणाच्या विजयाचे गमक आहे. विश्वहिंदू परिषदेच्या कार्यक्रमांसाठी अमरावती महानगर पालिका व अनेक शिक्षण संस्था सहकार्य देत असतात. सुशिक्षित, गरीब श्रीमंत सर्व प्रकारचे लोक सहकार्य करीत असतात. बजरंग दलहि मोठ्या स्वरुपाच्या कार्यक्रमांच्या वेळी सहकार्यास तत्पर असते. दहीहंदीचा कार्यक्रम आता अमरावतीच्या युवकांचे आकर्षण केंद्र बनत आहे.

परीशिष्ट क्र. १२

अमरावतीची वृत्तपत्रसृष्टी

वऱ्हाड समाचार :- वऱ्हाडप्रांतातून प्रकाशित होणारे हे पहिले वृत्तपत्र आणि श्री.गणेश नारायण कोल्हटकर हे या पत्राचे संपादक वऱ्हाडातील पहिले पत्रकार होय.

हे सामाहिक वृत्तपत्र इ.स. १८६५ साली अमरावती येथून प्रकाशित होत असे.

श्री.गणेश नारायण कोल्हटकर हे सातारा येथे राहणारे गृहस्थ अमरावतीस आले आणि त्यांनी येथे स्वत:चा छापखाना सुरु केला व "वऱ्हाड समाचार" हे सामाहित इ.स. १८६५ साली सुरु केले.

सुमारे वर्षभर हे सामाहित अमरावतीतून प्रसिध्द होत असे. नंतर त्यांनी आकोल्याचे श्री.खांडेराव भालाजी फडके यांचे भागीदारीत हे पत्र व छापखाना आकोल्यास नेऊन तेथे सुरु केला होता.

१. बहुरुपी :- ब्रि.भ. कोल्हटकर : १९५७ : पा. ७

वऱ्हाड समाचार : हे वृत्तपत्र आकोल्यास त्याच नांवाचे छापखान्यात श्री.ग.ना.कोल्हटकर व श्री.खा.बा.फडके यांचे भागीदारीत सुमारे वर्ष दीड वर्ष सुरु होते. परंतु ऑक्टोबर १८६७ मध्येही भागीदारी तुटली व छापखाना व वृत्तपत्र यांची मालकी श्री.श.बा.फडके यांच्याकडे आली. त्यांनी हे वृत्तपत्र मालक व संपादक या नात्याने ऑक्टोबर १८६७ पासून चालविले ते इ.स. १९१९ साली सरकारने त्यांचे प्रकाशन बंद करी पावेतो अव्याहत चालू होते. नंतर "वऱ्हाड समाचार" हा छापखाना आकोल्याचे श्री.मामासाहेब जोगळेकर यांनी विकत घेऊन "प्रजापक्ष" या नावांचे सामाहिक सुरु केले व ते अंदाजे १९३५ पावेतो सुरु होते.

इ.स.१८६७ साली श्री.ग.ना.कोल्हटकर यांनी "वऱ्हाड समाचार" ची भागीदारी सोडल्यानंतर सुमारे वर्ष भर ते आकोला नगर पालिकेचे सेक्रेटरी होते. पुढे ती

नोकरी त्यांनी सोडली व परत साताऱ्यात जाऊन तेथून ''महाराष्ट्रमित्र'' यानावाचे साप्ताहिक सप्टेंबर १८६८ पासून सुरु केले होते.

''वऱ्हाड समाचार'' या साप्ताहिकाचे, सप्टेंबर १८६८ ते १९१९ पावेतोचे अंग आजही उपलब्ध असून ते आकोल्यास श्री.कमल किशोर बियाणी यांचेकडे आहेत. तसेच या वृत्तपत्राची मायक्रोफिल्म दिल्ली येथील ''नेहरु मेमोरियल म्युझियम ॲन्ड लायब्ररी'' तीन मूर्ती भवन येथे उपलब्ध आहे.

आधार :- वऱ्हाड समाचार २६ सप्टे. १८६८, ३ ऑक्टो. १८६८ व
''क्या आप जानते है ? क.कि.बियाणी १९०५ पा.५२

टिप :- ''वऱ्हाड-समाचार'' हे वृत्तपत्र १८७५-१८७९ या काळात मुंबई शहरातही वाचले जात असे. असे सौ.रेचल गडकर यांच्या इतिहास आणि संस्कृति या त्रैमासिकाचे एप्रिल-जून १९८१ चे अंकातील एका लेखावरुन (पान ५३-७७) दिसून येते.

वऱ्हाड सत्यप्रकाश :- हे अमरावतीतून प्रसिध्द होणारे दुसरे साप्ताहिक वृत्तपत्र होय. हे साप्ताहित इ.स. १८६७ मध्ये सुरु झाले होते. हे उमरावतीचे पहिले मासिक होय अशी नोंद ''गॅझेटियर फॉर हैद्राबाद असाईन डिस्ट्रिक्टस १८७०'' मध्ये आहे. परंतु ते चुकीचे आहे. या ''वऱ्हाड सत्यप्रकाश'' चा दि.१८ जून १८६८ चा एक अंक आजही उपलब्ध आहे. त्यावरुन सत्यप्रकाश या नांवाचे छापखान्यातून त्या वेळच्या भाषेत कारखान्यातून हे वृत्तपत्र शिळा प्रेसवर छापले जात असे. हा छापखाना सबजीमंडी (म्हणजे हल्लीचा भाजीबाबार १) येथे होता.

या पत्राच्या संपादकाचे नांव स्पष्टपणे आढळत नाही. मात्र वृत्तपत्राचे एका पानावर अगदी तळाला ''हे पत्र उ.येथे स.वि. यांनी आ.स.प्र.छा.छा. प्रसिध्द केले'' असे लिहीले आहे. यावरुन हे पत्र उमरावती येथे स.वि.) म्हणजे सदाशिव विनायक किंवा सदाशिव विष्णू यांनी आपल्या सत्यप्रकाश छापखान्यात छापून प्रसिध्द केले'' असा अर्थ निघतो. पण हा.स.वि. कोण हे स्पष्ट होत नाही.

प्रमोदसिंधू :- हे अमरावतीतून प्रकाशित होणारे तिसरे साप्ताहिक वृत्तपत्र होय. हे पत्र इ.स. १८७१ पासून येथे सुरु झाले होते. व या पत्राचे संपादक श्री.यशवंत गोविंद केसकर हे होते. त्यांचा प्रमोदसिंधू'' याच नांवाचा छापखानाहि होता.

श्री.यशवंत गोविंद केसकर हे वकील लाईन मध्ये नमुन्यात राहात असत व तेथेच त्यांचा छापखानाहि होता असे दिसते. हे पत्र सुमारे २५-३० वर्षे चालू होते. नंतर या पत्राचे संपादन त्यांचे पुत्र श्री.रामभाऊ केसकर यांचेकडे आले होते.

इ.स. १९११ च्या उमरावती जिल्हा गॅझेटीयर मध्ये या पत्राचा उल्लेख आहे. यावरुन हे पत्र १९११ पावेतो निश्चित चालू होते. यात संशय नाही.

श्री.यशवंत गोविंद केसकर व त्यांचे बंधू श्री.संताजी गोविंद केसकर हे दोघेही इ.स. १८७५ पासून अमरावती नगर पालिकेचेहि सभासद होते असे. म्यु. प्रोसिंडीग वरुन दिसते. राजकारणात श्री.केसकर बंधु व त्यांचे ''प्रमोदसिंधू'' हे साप्ताहिक.

श्री.दादासाहेब खापर्डे यांचे समर्थक होते. या पत्राचे शुक्रवार दिनांक १६ ऑगष्ट १८८९ (वर्ष १९ अंग ३१) व शुक्रवार दि. ३ जानेवारी १८९० (वर्ष १९ अंक १) हे दोन अंक आजही उपलब्ध आहेत.

''वऱ्हाड शाळा पत्रक'' या नावाची मासिक पत्रिका लहान पुस्तकांच्या आकाराची, सरकारच्या वऱ्हाड शाळा खात्यातर्फे आपल्या खात्याचे उपयोगासाठी इ.स. १८७६ चे जून महिन्यापासून आकोल्याहून सुरु केली होती. पुढे इ.स. १८९० नंतर ही पत्रिका ''वऱ्हाड जॉईट बोर्डा (लोकलबोर्डस्) चे वतीने प्रकाशित होऊ लागली. नंतर इ.स. १९२० चे आसपास या पत्रिकेचे प्रकाशन अमरावतीहून होऊ लागले होते. ही पत्रिका सुमारे १०० वर्ष चालू होती.

या पत्रिकेत मुख्यत: शाळा खात्याची आदेशपत्रे, सुचना, बदल्या, बढत्या, परिक्षेचे निकाल आणि वार्षिक अहवाल, (शैक्षणिक) वगैरे प्रसिध्द होत असत. शिवाय शिक्षण या विषयांशी संबंधित कांही लहान लहान लेखही दिले जात.

सुरुवातीला या पत्रिकेवर संपादकाचे नांव नसे. पुढे (संभवत: १९२० नंतर) संपादकाचे नांव पत्रिकेवर छापल्या जाऊ लागले. असे दिसते की, ही पत्रिका निघू लागली तेव्हा पासूनच या पत्रिकेच्या संपादकात्वाची जबाबदारी आकोल्याच्या ट्रेनिंग कॉलेजचे प्रिसिपॉल पदावर असलेल्या व्यक्तीस उचलावी लागत असे. अर्थातच या ट्रेनिंग कॉलेजचे प्रिंसिपॉल हेच या पत्रिकेचे संपादक असत.

१९२० नंतर या पत्रिकेचे संपादक, अमरावतीचे श्री.गोपाळ शिवराम जोगळेकर बी.ए.एल.बी. वकील हे होते. पुढे क्रमश: श्री अरविंद देशपांडे १९२८ नंतर श्री.द.भ.सुळे श्री.गोपाळ बाजीराव देशमुख (खेडकर) हे ही कांही काळ संपादक होते. (पण त्यांनी स्वत:चे ''ग्रामसेवक'' नांवाचे सामाहिक काढले तेव्हा या पदाचा त्यांनी राजीनामा दिला होता. त्या नंतर श्री.अ.तु. वाळके, श्री.आर.डी. देशपांडे, श्री.ना.कृ.दिवाणजी, श्री.वितु. चौधरी हे या पत्रिकेचे संपादक होते.

शेतकरी मासिक :- हे मासिक इ.स. १८८३ च्या जानेवारी महिन्यापासून अमरावतीतून प्रकाशित होऊ लागले. ''शेतीची सुधारणा करणारी मंडळी, या नांवाच्या संस्थेने हे मासिक सुरु केले होते. या मासिकाचा आकार ७ इंच रुंद व १२ इंच लांब असून, मुखपृष्ठासह एकूण २४ पेजेस असत. (पान नं. ४)

सदर मंडळीचे चिटणीस श्री.सखाराम चिमणाजी गोळे व श्री.गणेश नारायण घोटवडेकर यांनी हे मासिक चालविले होते व संभवत: हेच या मासिकाचे संपादक असावेत (कारण मासिकांवर संपादकाचे नांव नाही.)

हे मासिक सुरुवातीला अमरावतीला ''प्रमोद सिंधू'' ''छापखान्यात छापले जात असे. नंतर १८८० पासून ते पुण्याच्या पुणे वैभव'' या छापखान्यात, त्यानंतर १८८८ पासून आकोल्याच्या ''वऱ्हाड समाचार'' या छापखान्यात व त्यानंतर पुण्याच्याच '' श्री शेतकरी'' या नावांचे छापखान्यात छापले आई. मात्र मासिकाचे प्रकाशन अमरावतीतूनच होत असे. या मासीकाची टपाल खर्चासह वार्षिक वर्गणी दोन रुपये सहा आणे होती. या मासिकात शेती विषयक विविध प्रकारची अत्यंत उपयुक्त अशी

माहिती दिली जात असे. या मासिकाने आपल्या सुरुवातीच्या दहा अंकात शेती विषयी जी उपयुक्त माहिती प्रकाशित केली होती त्यामुळे अनेक थोर गृहस्थांनी या मासिकाबद्दल उत्तम अभिप्राय व्यक्त केले होते. दि.२८ ऑक्टोबर १८८३ चे अंकात मुंबईचे डॉ.विश्राम रामजी छोंले आणि न्यायमूर्ती महादेव गोविंद रानडे यांचे या मासिका संबंधीचे अभिप्राय दिले आहेत.

या काळी केवळ शेती या विषयाला वाहिलेले मराठीतील मासिक या "शेतकरी" खेरीज महाराष्ट्रात दुसरे नसावे असे वाटते.

पुढे या मासिकाची हिंदी आवृत्तीही काढली जात असे व त्याच्या आठशे प्रति मध्यप्रांत सरकार विकत येई. शिवाय गुजराती आवृत्ती काढण्याची योजना होती. या मासिकातील शेती विषयक उपयुक्त माहितमुळे वऱ्हाडातील शिक्षण खाते, निजाम, सरकार विविध देशी संस्थाने देखिल याच्या प्रती मोठ्या संख्येने विकत घेत असत.

इ.स. १८९१ पावेलोचे या मासिकाचे अंक उपलब्ध आहेत. पुढेही हे मासिक चालू असावे.

"ज्ञानसंग्रह" :- इ.स. १८९१ साली हे मासिक अमरावतीतून प्रसिध्द होऊ लागले. प्रमोदसिंधू छापखान्यात हे मॅगझिन छापले जात असे. या मासिकाचा सुधारणेवर भर होता. श्री.यशवंत गोविंद केसकर हेया या मॅगेझिनचे संपादक कर्ते होते.

असे दिसते की, "ज्ञानसंग्रह" मॅगेझिन साठी एक मंडळी स्थापन केली असावी. कारण मॅगेझिन च्या मुखपृष्ठावर " यशवंत गोविंद केसकर " ज्ञानसंग्रह व्यवस्थापक मंडळीचे सेक्रेटरी " असे नमूद आहे. हे मासिक अमरावतीत बराच काळ चालू होते.

कर्तव्य :- "कर्तव्य" इ.स. १९०५ चे सुमारास श्री.भांगले या नांवाचे गृहस्थानी हे साप्ताहिक अमरावतीतून सुरु केले होते.

श्री.भांगले हे पाटणकर संगीत नाटक मंडळीस स्त्री पात्राचे काम करीत असत. ही मंडळी अरावतीला आली तेव्हा येथील मुक्कामात श्री.भांगले यांनी नाटक मंडळी सोडली. येथेच विवाह केला. आणि छापखान्याचा धंदा सुरु केला होता. तेथेच ''कर्तव्य'' छापले जात असे. त्याचा हा भारत छापखाना'' प्रभात सिनेमा समोरच्या गल्लीत होता व तेथेच ते राहत असत. ''कर्तव्य'' चे संपादक श्री.नाना थत्ते हे होते. अशी आठवण श्री.खरे यांनी सांगितली आहे. कदाचित ''भारत'' पत्राचे हे संपादक असावेत.

श्री.भांगले हे नंतर सार्वजनिक कार्यातही भाग घेत असत. ते उत्कृष्ट वक्ते होते. भगवे कपडे परिधान करीत. लोकांत सच्छिलता, निर्माण करणे हा उद्देश नजरे समोर ठेवून त्यांनी ''कर्तव्य'' हे पत्र सुरु केले होते. हे पत्रही अमरावतीत बराच काळ सुरु होते. अमरावती जिल्हा गॅझेटियर १९११ मध्ये वा ''कर्तव्य'' पत्राचा उल्लेख आहे.

श्री.भांगले हे अकाली वारले . नंतर त्यांचा ''भारत छापखाना'' त्यांच्या पत्नी श्रीमती विमलाबाई यांनी चालविला व तेथेच ''भारत'' हे साप्ताहिक छापले जाई. मात्र त्याच्या संपादकाचे नांव उपलब्ध नाही.

त्यानंतरचे काळात ''भारत'' श्री.थत्ते, श्री.बामणगांवकर यांचा ''तरुण हिंदू'' आनंदस्वामी, आणि श्री.कुरकुरे यांचा ''वऱ्हाडचा शेतकरी'' ही वृत्तपत्रे या शहरातून निघत असत.

''महाराष्ट्र वाग्विलास'' या नांवाचे मासिक इ.स. १९०६ साली अमरावती येथून श्री.श्रीधर व्यंकटेश केतकर यांनी श्री.बाळकृष्ण संतुराम गडकरी यांच्या सहकार्याने सुरु केले होते व ते सुमारे अडीच वर्ष चालू होते. (सुरुवातीचे पाच अंक मुंबईतून प्रकाशित झाले होते.) श्री.श्रीधर व्यंकटेश केतकर (ज. १८८४ मृ. १९३७) ह्यांचे प्रवेश परिक्षे पावेतोचे शिक्षण अमरावती येथेच झाले होते. हल्ली शाम टॉकीज आहे तेथेच त्यांचे चुलते श्री.नारायणराव केतकर वकील राहात त्यांचेकडे श्री.श्रीधरराव

केतकर राहात असत. पुढे मुंबईच्या विल्सन कॉलेजातून शिक्षण घेऊन ते परदेशात अमेरिकेला गेले व तेथे कार्नेल युनिव्हर्सिटीत ते दाखल झाले. १९११ साली ते पी.एच.डी.होऊन १९१२ साली मायदेशी परतले.

१९१४ साली त्यांनी "हिंदूस्थानाची भाषावार प्रांत रचना व देशी भाषेव्दारे राज्यकारभार व शिक्षण " याचा त्यांनी प्रचार व प्रसार केला. डॉ.पट्टाभिसितारामैय्या हे त्या वेळी यांचे अनुयायी होते. १९१६ साली त्यांनी महाराष्ट्रीय ज्ञानकोबा मंडळ स्थापन करुन व बारा वर्षे खर्चून मराठीतील पहिलाच महाराष्ट्रीय ज्ञानकोश" हा अपूर्व ग्रंथराज लिहिला. हे काम १९२७ मध्ये पूर्ण झाले होते. त्यांच्या पत्नी जर्मन ज्यू होत. त्याचे भारतीय नांव शीलवतीबाई केतकर. त्यांची इतर ही ग्रंथ संपदा आहे.

"बहिष्कृत भारत" :- इ.स. १९१४ साली श्री.गणेश आकाजी उर्फ नानासाहेब गवई यांनी हे साप्ताहित अमरावतीतून सुरु केले होते. मात्र हे साप्ताहित नागपूरला छापले जाई असे दिसते. हे साप्ताहित बरीच वर्ष चालू होते.

"उदय" :- "उदय" लोकमान्य टिळकांच्या प्रेरणेने व त्यांच्या राजकारणाला सहाय्य करण्याचे हेतून श्री.बाळकृष्ण गणेश उर्फे बाबासाहेब खापर्डे यांनी दि. २७ जानेवारी १९२० पासून हे साप्ताहिक अमरावतीत सुरु केले होते. हे साप्ताहिक दर मंगळवारी प्रसिध्द होते असे. या साप्ताहिकाचे संपादक नंतर श्री.बळवंत गणेश उर्फ अण्णासाहेब खापर्डे हे झाले व दि. ८ नोव्हेंबर १९२७ पासून या पत्राच्या संपादनाची जबाबदारी श्री.नारायण रामलिंग उर्फ नानासाहेब बामणगांवकर यांनी साभाळली होती.

पुढे कायदेभंगाचे चळवळीत दि. ५ ऑगष्ट १९३० रोजी श्री.नानासाहेब बामणगांवकरांना अटक होऊन एक वर्षाची शिक्षा झाल्यामुळे पुन्हा श्री.बाबासाहेब खापर्डे यांनी या पत्राच्या संपादकत्वाची धुरा तात्पुरती सांभाळली होती.

१९३१ मध्ये कारावासातून परत आल्यानंतर पुन्हा श्री.बामणगांवकरांनी या पत्राच्या संपादकत्वाची सूत्रे हाती घेतली आणि १९३२ साली "उदय" साप्ताहिक व

''अरुण प्रेस'' श्री.बामणगांवकरांनी विकत घेतला. त्यानंतर जानेवारी १९३४ पासून त्यांनी उदय व्दिसामाहिक (मंगळवार - शुक्रवार) केला. तेव्हा पासून तो त्याचे मृत्युपर्यत श्री.बामणगांवकर हेच या पत्राचे मालक व संपादक होते.

श्री.नानासाहेब बामणगांवकरांचे मृत्यु नंतर या पत्राचे संपादन वैद्य बंधूकडे आले व त्यांनी तो दैनिक केला. दैनिक म्हणून चालू केला व पुढे बंद पडला (इ.१९६०)

''स्वतंत्र्य हिंदुस्थान'' :- १९२० नंतर गाधीयुग सुरु झाले आणि वऱ्हाडचे कॉग्रेसनेते वीर वामनराव दादा (वीर वामनराव जोशी) यांनी महात्मा गांधीचे राजकारणाचा प्रसार व प्रचार करण्यासाठी श्री.स.कृ. वऱ्हाडपांडे यांच्या संपादकात्वाखाली हे सामाहिक अमरावतीला १९२३ मध्ये सुरु केले होते.

सुमारे सात वर्ष हे सामाहिक अविरत चालू होते. इ.स. १९३० मध्ये ते बंद पडले. आणि पुन्हा स्वातंत्र्योत्तर काळात इ.स. १९४८ साली श्री.विनायक बंसीधर उर्फ बाबासाहेब वैद्य यांच्या संपादक त्वाखाली सुरु झाले होते. मार्गदर्शक श्री.वीर वामनराव दादा हेच होते. परंतु नंतर कांही काळ चालून हे पत्र पुन्हा पडले.

''रामदासी'' इ.स. १९२५ साली श्री.त्र्यंबक गोरे यांनी रामनवीमीचे मुहूर्तावर हे सामाहिक सुरु केले होते. केवळ धार्मिक विषयांची चर्चा करणारे हे सामाहिक अल्पायुषी ठरले.

संग्राम :- पुण्याचे श्री.ग.स.नलावडे यांनल दि.२४ डिसेंबर १९२५ पासून केवळ एका आठवड्यासाठी हे दैनिक अमरावतीत सुरु केले होते. अमरावतीला त्या काळात भरलेल्या अखिल भारतीय ब्राम्हणेत्तर कॉंग्रेसच्या अधिवेशनाविरुध्द प्रचार करण्याचे हेतूने त्यांनी मुद्दाम पुण्याहून येथे येऊन हा उपक्रम केला होता.

सहकारी विदर्भ :- विदर्भ सहकारी संघातर्फे जुलै १९२४ पासून हे मासिक श्री.गोपाल शिवराम जोगळेकर बी.ए.,एल.बी. यांच्या संपादकत्वाखाली सुरु झाले होते. सहकारी

संस्थांची / चळवळीची एकत्रित माहिती देणे व सहकारीतेचा प्रचार व प्रसार करणे हा या मासिकाचा उद्देश होता.

''महाराष्ट्र केसरी'' :- सत्यशोधक चळवळीचा प्रचार व प्रसार करण्याचे उद्देशाने इ.स. १९२७ मध्ये विजयादशमीचे मुहूर्तावर श्री.दलपतसिंग चव्हाण यांच्या संपादकत्वाखाली हे साप्ताहिक सुरु झाले होते.

''माहेश्वरी - जगत'' :- या नावाचे एक हिंदी साप्ताहिक दि.११ जुर्ले १९२९ पासून श्री.कन्हैय्यालालजी कलंत्री यांच्या संपादकत्वाखाली सुरु झाले होते.

माहेश्वरी समाजाची धार्मिक व सामाजिक सेवा हा या साप्ताहिकाचा उद्देश होता.

भोळा शेतकरी :- या नांवाचे एक मासिक दि. २८ जानेवारी १९३२ पासून श्री.महादेव हरबाजी पांडे यांच्या नेतृत्वाखाली सुरु झाले होते. डॉ.नायब हे या मासिकाचे संपादक होते. शेतकरी वर्गाची उन्नती हे या मासिकाचे ध्येय होते.

वज्रप्रहार :- या नांवाचे एक साप्ताहिक आगष्ट १९३२ पासून श्री.राजहंस रामचंद्र पाटील यांचे संपादकत्वाखाली सुरु करण्यात आले होते. ते एक वर्षातच बंद पडले.

''कॉंग्रेस'' :- या नांवाचे साप्ताहिक डॉ.एन.डी.सबनीस यांच्या संपादकत्वाखाली दि. २९ आगष्ट १९३२ पासून ही मराठी मासिक पत्रिका प्रसिध्द होऊ लागली होती.

शिक्षण पत्रिका सौराष्ट्रातील भावनगर येथे सात वर्षापूर्वी स्थान झालेल्या ''मॉंटेसारी संघ'' या संस्थेचे गुजराती भाषेतील मुखपत्र म्हणून ''शिक्षण-पत्रिका सुरु होती. त्याचीच ही मराठी आवृत्ति अमरावतीतून सुरु करण्यात आली होती. सौ.ताराबाई मोडक ह्या अमरावतीच्या ''मॉंटेसरी संघा'' च्या चिटणीस ही होत्या.

या पत्रिकेत शिक्षण विषयक व बालका संबंधीचे विषयांची चर्चा होत असे. वार्षिक वर्गणी १ रुपया होती. ताराबाई मोडक यांना पुढे भारत सरकारने पद्मश्री

पुरस्कारांनी सन्मानित केले होते.

गुरव शैव समाचार :- दि. १५ एप्रिल १९३३ पासून हे मासिक श्री.विनायकराव क्षीरसागर यांच्या संपादकत्वाखाली सुरु झाले होते. टिळक चौक, बुधवारा येथे या मासिकाचे कार्यालय होते. व गुरव समाजाची सर्वांगीण उन्नती घडवून आणणे हा मासिकाचा हेतू होता.

''कला विकास '' काल विकास मंडळातर्फे दि. १६ एप्रिल १९३४ पासून हे मासिक श्री.ल.वा.पडोळे यांच्या संपादकत्वाखाली सुरु करण्यात आले होते.

वीरशैव संजीवनी :- हे मासिक १९३६ साली श्री.नानासाहेब बामणगांवकर यांनी सुरु केले होते. पुढे त्यांचे संपादक श्री.वि.तु.चौधरी हे होते.

वीरशैव लिंगायत समाजाच्या कल्याणासाठी हे मासिक चालविल्या जात असे.

''वाग्वीणा'' :- हेच मासिक शारदा उद्योग मंदीराच्या वतीने काही काळपर्यत चालत होते. कै.सौ.शंकुतला दिवाणजी त्याच्या संपादिका होत्या.

''ज्योतिष प्रचारक'' :- नांवाप्रमाणे ज्योतिष या या विषयाला वाहिलेले हे सामाहिक आगस्ट १९३६ मध्ये श्री.जे.डी.राऊळकर यांच्या संपादकत्वाखाली सुरु झाले होते. व लगेच बंद पडले.

''आव्हान'' :- पुरोगामी विचाराचे हे सामाहिक इ.स. १९३७ मध्ये श्री.माधवराव देशपांडे यांच्या संपादकत्वाखाली सुरु करण्यात आले होते. व इ. १९४१ मध्ये बंद पडले.

''इंद्रधनुष्य'' :- इ.स. १९३७ च्या विजया दशमीचे मुहूर्तावर हे मासिक प्रो.कृष्णमूर्ती कविरत्न (कलकत्ता) यांच्या संपादकत्वाखाली सुरु झाले होते.

''ललीत'' :- हे मासिक ललित वाङमयात वाहिले होते. अमरावतीतील तरुण साहित्यिक मंडळी हे चालवीत असत. इ.१९५४ साली हे दोन वर्षानंतर बंद पडले.

''विदर्भ'' :- श्री.म.कृ. कुरकुरे यांच्या संपादकत्वाखाली हे साप्ताहिक १९३७ चे सुमारास सुरु झाले होते. परंतु कांही काळ चालून ते बंद पडले व दीड वर्षानंतर फ्रेबुवारी १९४० मध्ये पुन्हा सुरु झाले व त्याचवर्षी बंद पडले.

''समाजोन्नती'' :- अखिल सोमवंशीय क्षत्रिय कासार समाजाचे उन्नतीसाठी श्री.वि.तिवाटणे यांच्या संपादकत्वाखाली हे मासिक इ.स. १९३९ साली सुरु करण्यांत आले होते. व इ. १९४० साली बंद पडले.

''युध्दवार्ता'' :- व्दितीय महायुध्दाच्या सरकारी बातम्या वगैरे प्रसिध्द करण्याचे हेतूने रावबहादूर शिदोरे, वकील यांच्या संपादकत्वाखाली हे साप्ताहिक इ.स. १९४० मध्ये सुरु करण्यात आले होते. युध्द संपल्यावर त्याचे प्रयोजन संपल्यामुळे ते बंद करण्यात आले.

ज्योतिप्रकाश :- श्री.एस.एस.चुके यांनी इ.स. १९४० मध्ये हे मासिक सुरु केले होते. पुढे ते साप्ताहिक होऊन श्री.वसंतराव चुके यांच्या संपादकत्वाखाली आजपर्यत सुरु आहे.

श्री.गुरुदेव :- राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे हे मासिक दि. ५ एप्रिल १९४३ पासून अमरावतीतून सुरु झाले होते. या मासिकाचे संपादक श्री.अ.वा.नवाडे हे होते. नंतर श्री.सुदाम सावरकर संपादक होते.

इ.स. १९४५ च्या एप्रील महिन्यात हे मासिक बंद पडून वाद निर्माण झाला होता. परंतु मे.१९४५ मध्ये समेट होऊन संत तुकडोजी महाराज हेच या मासिकाचे चालक ठरले आता हे मासिक मोझरीहून निघते.

हिंदुस्तान :- काँग्रेसच्या धोरणानुसार व बहुजन समाजाचे मुखपत्र म्हणून हे साप्ताहिक दि. १७ नोव्हेंबर १९४७ पासून प्रकाशित होऊ लागले. त्यांचे संपादक श्री.गणेशपंत उर्फ बाळ गद्रे एम.ए.एल.एल.बी. हे होते.

अमरावतीचे वृत्तपत्रीय जगात श्री.बाबासाहेब खापर्डे (उदय चे प्रथम संपादक)

त्यांच्यानंतर पहिलाच वकील या धंदाला लाभला होता हे त्याचे वैशिष्ट्य.

पुढे इ.स. १९५० पासून श्री.बाळकृष्ण विष्णू उर्फ बाळासाहेब मराठे हे या पत्राचे संपादक झाले व त्यांनीच ह्या साप्ताहिकाचे दैनिकात रुपातंर करुन आजतागायत चालवीत आहेत. नंतर श्री.डॉ.अरुण मराठे व आता प्रमोद मराठे ही धुरा सांभाळीत आहेत.

स्वातंत्र्यपूर्व काळातील (१८६५ ते १९४७) अमरावतीची वृत्तपत्र सृष्टीची माहिती वर प्रमाणे आहे.

हस्तलिखिते :- अमरावती शहरातील युवकांकडून १९३२ ते १९४० या दरम्यान बरीच उत्तमोत्तम हस्तलिखिते (मासिके, त्रैमासिके, किंवा षण्मासिके) निघत असत. साहित्य, राजकारण व समाज कारण या सर्व विषयात तत्कालीन विद्यार्थी व युवकवर्गात किती अभिरुची होती याचा प्रत्यय या हस्तलिखितांवरुन येतो.

या हस्तालिखितात मासिकांच्या संपादकाचे एक संमेलन दि. ३ नोव्हेंबर १९३९ रोजी अमरावती येथे भरले होते. त्यावेळी अमरावतीत एकूण १५ हस्तलिखिते निघत असत.

प्रौढ विभाग :- दुंदभि, उषा, हिंदवीर, युवक, उष:काला, क्रांती सामर्थ्य, समर्थ व आदर्श.

बाल विभाग :- बालसुधा, प्रकाश, बालोत्तेजक, व बालोद्यान याशिवाय १९३३-३४ मध्ये भाजीबाजारातील समर्थ मंडळाचे हस्तलिखित मासिक, वीरेंद्र, न्यु हायस्कूल विद्यार्थी संघाचे त्रैमासिक विजय आणि भारत समाजाच्या बालिका विभागातर्फे काढले जाणारे त्रैमासिक, भारत कन्या,'' तसेच सरकारी मराठी हायस्कूलच्या विद्या मंदीर ही हस्तलिखित.

परिशिष्ट १३

पुरस्कार

(मा.शिक्षणाधिकारी अमरावती यांचा कडून

	वर्ष	नाव	पुरस्काराचे स्वरुप
१)	१९६६	श्री.दादा सीताराम सरकार	राज्य
२)	१९६८	श्रीमती अनुसयाबाई देशमुख	राष्ट्रीय
३)	१९७१	श्रीमती अनुसया रोडे	राष्ट्रीय
४)	१९७२	श्री.रा.ना.पांडे	राष्ट्रीय
५)	१९७३	शेख साबू शेख हसन	राज्य
६)	१९७६	श्री.बाळकृष्ण सीताराम रोटे	राज्य
७)	१९७७	श्री.शंकर अवधूत दवाले	राज्य
८)	१९७८	श्री.सु.गो.राऊत	राष्ट्रीय
९)	१९७९	श्रीमती उषा दिगंबर कंठे	राष्ट्रीय
१०)	१९७९	श्री.बोडे	राज्य
११)	१९८०	श्री.रामभाऊ पसारकर	राज्य
१२)	१९८१	श्री.महादेव रामजी दरवाडे	राज्य
१३)	१९८२	श्री.एन.बी.बोचरे	राज्य
१४)	१९८५	श्रीराम एन.पेठे	राज्य
१५)	१९८५-८६	अंबादास ना.पांडे	राष्ट्रीय
१६)	१९८६	श्री.सोमवंशी	राज्य

१७)	१९८६	श्री.हिवराळे	राज्य
१८)	१९८७	श्री.जारेकर	राज्य
१९)	१९८८	श्री.रा.का.वानखडे	राज्य
२०)	१९८८	आर.एन.कावदकर	राज्य
२१)	१९८८	दि.गं.निर्मळ	राष्ट्रीय
२२)	१९८८	श्री.रा.का. वानखडे	राज्य
२३)		श्रीमती कमल रामटेके	राष्ट्रीय
२४)	१९८८	श्री.हबीबखां मीरखां	राज्य
२५)	१९८९	श्री.मनोहर दत्तात्रय साठफडे	राज्य
२६)	१९९०	सौ.गोकुळा दि. निर्मळ	राज्य
२७)	१९९०	श्री.अबुदल मतीन	राष्ट्रीय
२८)	१९९०	श्री. कालू मन्नू सावठकर	राज्य
२९)	१९९१	श्री.राम देशमूख	राष्ट्रीय
३०)	१९९१	श्री.पी.जी.पातुर्डे	राष्ट्रीय
३१)	१९९१	श्री.व्ही.एस. आबंडकर	राज्य
३२)	१९९१	श्री.एच.एस.लांभे	राज्य
३३)	१९९२	श्री.पी.पी.सातंगे	राज्य
३४)		श्री.आर.एन. वाठ	राष्ट्रीय
३५)		श्री.एम.आर. मालवीय	राज्य
३६)	१९९३	श्री.डी.आर. तिवारी	राज्य

३७)	१९९३	शेख अहमद शेख मुस्तफा	राज्य
३८)	१९९४	सौ.पुष्पा	राज्य
३९)	९३-९४	श्री.एस.एम.मो	राज्य
४०)	९४-९५	श्री.एस.एन.पारधी	राज्य
४१)	९४-९५	श्री.नरशिंबे	राज्य

माध्यमिक शिक्षक

१)	६२-६३	श्री.सु.वा.सिंह	राज्य
२)	६३-६४	श्री.एन.टी.राजोरकर	राज्य
३)	६५-६६	श्री.एच.सी.इंदानी	राज्य
४)	६६-६७	श्री.रा.सु.कानफाडे	राज्य
५)	७१-७२	श्री.एन.डब्ल्यू. गोखले	राज्य
६)	७२-७३	श्री.ह.द.बढे	राज्य
७)	७३-७४	कृ.वा.तारे	राज्य
८)		श्रीमती नलीनीबाई लढके	राष्ट्रीय
९)	७८-७९	श्री.शंकर बेदरकर	राज्य
१०)	८०-८१	श्री.कोहळे	राज्य
११)		कु.दुर्गा कानगो	राष्ट्रीय
१२)		श्री.एस.बी.पसारकर	राज्य
१३)	८२-८३	श्री.गु.वा.लांडे	राज्य
१४)	८२-८३	श्री.जी.आर.जोशी	राज्य

१५)	८४-८५	श्री.प्र.ह.देवधर	राज्य
१६)	८४-८५	श्री.फादर डिहुव्हा	राज्य
१७)	८५-८६	श्री.जगन्नाथ माहेश्वरी	
१८)	८६-८७	श्री.केशवराव बोबडे	राज्य
१९)	८७-	श्री.मनोहर गव्हाणे	राज्य
२०)	८८-	श्री.व्ही.एन.बेंडे	राज्य
२१)	८९-	श्री.तु.वा.तायडे	राष्ट्रीय
२२)	९०-	श्री.एम.आर.संगई	राष्ट्रीय
२३)	९०-	श्री.एन.पी.टापरे	राज्य
२४)	९० -	श्री.जी.एच. झंवर	राष्ट्रीय
२५)	९१-	श्री.विजयराव गिललकर	राज्य
२६)	९१-९२	श्री.बी.के.देशमूख	राज्य
२७)	९१-९२	श्री.ए.के.टोपरे	
२८)	९२-९३	श्री.पी.बी.सोमवंशी	
२९)	९२-९३	सिस्टर अलेक्झीन	
३०)	१९९७	मुरलीधर भोंडे	राज्य
३१)	१९९९	संदीप रोंघे	राज्य
३२)	१९९९	विठ्ठल कंठाळे	राज्य

पोलीस पदाचे मानकरी

नाव	वर्ष	पदक	कामगिरी
पो.कॉ.भागीरथप्रसाद	१९३१	राजपदक	शौर्य
एम.एस.निबांळकर	१९४२	भा.पो.	शौर्य
ए.व्ही. प्रिस्टॉन	१९५४	पो.पदक	उत्कृष्ट
अ.रहेमान	१९६८	पो.पदक	उत्कृष्ट
सैय्यद करिमोद्दिन	१९७१	पो.पदक	उत्कृष्ट
के.जी. फायवरे	१९७४	पो.पदक	उत्कृष्ट
जे.एम. आसरे	१९७८	पो.पदक	उत्कृष्ट
ए.एम. आखरे	१९७९	पो.पदक	उत्कृष्ट
डी.आर फुंड	१९८०	पो.पदक	उत्कृष्ट
डी.एम.आखरे	१९८४	पो.पदक	उत्कृष्ट
आर.एस.शर्मा	१९८६	पो.पदक	उत्कृष्ट
डब्ल्यू. एन.भाकरे	१९८७	पो.पदक	उत्कृष्ट
एन.यू. कुरेशी	१९९५	पो.पदक	उत्कृष्ट
एन.एस.एम.कुरेशी	१९९७	पो.पदक	उत्कृष्ट
त्रिलोक सिंग		आय.पी.एस.	
पी.के. शर्मा	१९८९	सुवर्णपदक	
व्ही.एन्. देशमुख	१९९३	आय.पी.एस.	
व्ही.जे. वानखडे	१९९४	आर.डी.	
विजयकुमार मिश्रा	१९९४	आर.डी.	

Maharashtra GirPs Btn.

१)	वंदना एंवडवार	सुवर्णपदक	१९८४	दौड
२)	जयश्री गुल्हाने	सुवर्णपदक	१९८५	नेमबाजी
३)	चारुशीला पाटील	सुवर्णपदक	१९८६	
४)	नंदिनी आठवले	सुवर्णपदक	१९८६	नेमबाजी
५)	संध्या खांडेकर	रौप्यपदक	१९८७	जलतरण
६)	संध्या शनवारे	सुवर्णपदक	१९८८	नेमबाजी
७)	छाया भाटिया	सुवर्णपदक	१९८८	
८)	योगिता रोने	सुवर्णपदक	१९८८	दौड
९)	सुनीता धोटे	सुवर्णपदक	१९८८	उत्तम सौष्ठव
१०)	वंदना देऊळकर	कास्यपदक	१९८९	घोडेस्वारी.
११)	सुत्रीता बसवनाथे	रौप्यपदक	१९८९	दौड
१२)	संयोगिता ठाकूर	रौप्यपदक	१९८९	सौष्ठव
१३)	वृषाली मानकर	सुवर्णपदक	१९८९	दौड
१४)	सोनिया जेकब	रौप्यपदक	१९८९	दौड
१५)	मनीषा धोटे	कास्यपदक	१९८९	दौड
१६)	संयोगिता ठाकूर	सुवर्णपदक	१९८९	सर्वोत्कृष्ट छात्र
१७)	संयोगिता ठाकूर	सुवर्णपदक	१९८९	सर्वसामाईक
१८)	सामूहिक ज्यूनियर विंग	रौप्य	१९८९	कवायत.
१९)	चंदा भाटिया	सुवर्णपदक	१९८९	

२०)	कविता चौरासिया	आरडीसी	१९९१	
२१)	कोमलश्री जैन	आरडीसी	१९९१	
२२)	विनिता पुंड	आरडीसी	१९९१	
२३)	वृषाली मानकर	आरडीसी	१९९१	
२४)	वैशाली वैद्य	आरडीसी	१९९१	
२५)	सोनिया जोसेफ	सुवर्ण	१९९१	दौड
२६)	पंकजा इंगळे	रौप्य	१९९१	नृत्य
२७)	दीपाली देशमूख	रौप्य	१९९१	प्रथमोपचार
२८)	संयोगिता ठाकूर	सर्वोत्कृष्ट	१९९१	
२९)	अंजू बोपचे	रौप्य	१९९१	दौड
३०)	हरमीत कौर अनंद	बीएलसी.	१९९१	केनास्टिक ; ऑडरिर्ली
३१)	अर्चना तीरमारे	सुवर्णपदक	१९९१	सर्वोत्कृष्ट
३२)	ममता अग्रवाल	आर.डी.सी.	१९९२	दिल्ली
३३)	शिल्पा मानकर	रौप्य	१९९२	दौड
३४)	दीपाली रानडे	आरडीसी	१९९३	
३५)	भैरवी वुडके	आरडीसी	१९९३	
३६)	भावना बागडे	बी.एल.सी.	१९९३	दिल्ली
३७)	संगीता कालकोंडे	बी.एल.सी.	१९९३	दिल्ली
३८)	वैशाली रोडे	आरडीसी	१९९४	दिल्ली

३९)	वैशाली कुलकर्णी	आरडीसी	१९९५	दिल्ली
४०)	मोहना रोहणकर	आरडीसी	१९९५	दिल्ली
४१)	वैशाली नेरकर	आरडीसी	१९९६	दिल्ली
४२)	योगिता राजपूत	आरडीसी	१९९६	दिल्ली
४३)	संगीता बाघेले	आरडीसी	१९९६	दिल्ली
४४)	रेश्मा गुल्हाने	आरडीसी	१९९६	दिल्ली
४५)	हेमांगी गंधे	आरडीसी	१९९६	दिल्ली
४६)	प्रेरणा देशभ्रतार	आरडीसी	१९९६	दिल्ली
४७)	प्रियंका इंगळे	आरडीसी	१९९६	दिल्ली
४८)	दीपाली तारेकर	बीएलसी	१९९६	दिल्ली
४९)	दिपाली मामर्डे	बीएलसी	१९९६	दिल्ली

श्री.सुभाष शिरपुरे यांना १९९६ चा गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार प्राप्त.

अमरावती :- महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनिस्यारण मंडळ अमरावती येथील कर्मचारी श्री.सुभाष गंगाधर शिरपुरे यांना, सामाजिक, सास्कृतिक, शैक्षणिक, आरोग्यविषयक, साहित्य, खेळ व क्रिडाक्षेत्र, कामगार शिक्षण व कामगार कल्याण तसेच व्यवस्थापनाचे हिताचे संदर्भात, इ. क्षेत्रात त्यांनी केलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल महाराष्ट्र शासनाचे तर्फे महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे वतीने त्यांना मुंबई येथे दिनांक २६ मार्च १९९७ रोजी मा.राज्यपाल डॉ.पी.सी.अलेक्झांडर यांचे हस्ते १९९६ चा ''गुणवंत कामगार कल्याण पुरस्कार'' प्रदान करण्यात येऊन त्यांनी केलेल्या विविध प्रकारच्या समाजोपयोगी कार्याचा गौरव करण्यात आला.

या बहुमानाबद्दल महाराष्ट्र कामगार कल्याण ने अमरावती, महाराष्ट्र पाणी पुरवठा मंडळ महाराष्ट्र जलसेवा कर्मचारी महासंघ, नावाने अमरावती कासार पंच मंडळ तसेच विविध संस्था व मान्यवंरांनी त्यांचे सत्कार समारंभ आयोजित करुन त्यांचे अभिनंदन केले आहे.

पुरस्कार

डॉ. पुंशी यांना विजयश्री पुरस्कार

अमरावतीचे सुप्रसिध्द चर्मरोग तज्ञ डॉ. एम.के. पुंशी यांना दिल्लीच्या इंडिया इंटरनॅशनल फ्रेंडशिप सोसायटीचा महत्वपूर्ण असा विजयश्री पुरस्कार घोषित झाला आहे.

यापूर्वी ह्या पुरस्काराने मदर टेरेसा उपराष्ट्रपती बी.डी. जती, देव आनंद, उस्ताद अमजद अली खान, सुनिल गावस्कर, भुपैन हजारिका यांना सन्मानित करण्यात आले आहे.

डॉ. एस.के. पुंशी यांनी वैद्यकीय सामाजिक व साहित्यिक क्षेत्रामध्ये भरीव योगदान दिले आहे.

लॉयन्स क्लब अमरावती सेंट्रल व लॉयन्स क्लब ऑफ अमरावती इंद्रपुरी तर्फे त्यांचा सत्कार झाला आहे.

लॉयन्स क्लब ऑफ अमरावतीचे अध्यक्ष डॉ.आर.टी. गेमनानी, धीरुभाई वैद्य, डॉ. डी.के. रसिक भाई शाह, अनिल महेन्द्र व लॉयन मेहरे व अन्य लॉयन बंधूगण, सन्माननीय नागरिक, माजी प्रांतपाल डॉ. आर.जी. वाणी, आर.के. सिकची यांच्या उपस्थिती मध्ये उपप्रांतपाल श्री. विनोद जैन ह्यांनी डॉ. एस.के. पुंशी साहेबांना शाल व श्रीफळ देउन सत्कार केला.

श्रीमती ममता नेताम यांना डॉ. आंबेडकर फेलोशिप

येथील इंडियन ऑइलच्या एल.पी.जी. वितरक 'ममता गॅस एजंसीच्या संचालिका श्रीमती ममता नेताम यांना दलितोत्थानाच्या क्षेत्रातील साहित्यिक व सामाजिक योगदानासाठी भारतीय दलित साहित्य अकादमीतर्फे डॉ. आंबेडकर फेलोशिप १९९७ जाहीर झाली आहे.

भारतीय दलित साहित्य अकारमी, दिल्ली तर्फे सप्टेंबर महिन्यात दिल्ली येथे १३ व्या राष्ट्रीय दलित साहित्यकार संमेलनात त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येईल.

किरण पातुरकर मृगेन्द्र पारितोषिकासाठी निवड

नागपूर येथील मॅग्नम फाउंडेशन तर्फे संबंधित क्षेत्रात नेत्रदीपक कार्य केल्याबद्दल दिल्या जाणारे मृगेन्द्र पारितोषिकासाठी अमरावती एम.आय.डी.सी. **इंडस्ट्रियल असो.चे अध्यक्ष व एम.एस.एस.आय.**

अमरावती : दहीहांडी स्पर्धा नृसिंह मंडळाला प्रथम क्रमांक

गोकुळाष्टमी महोत्सव व विश्व हिंदू परिषद स्थापना दिनानिमित्त विहिंप अमरावती महानगर व बजरंग दलातर्फे आज सोगवार दि. २५ ऑगस्ट १९९७ ला स्थानिक शाम चौकात आयोजित 'दही हांडी' स्पर्धेत नृसिंह मंडळाने प्रथम क्रमांकाचे २००१ रु. चे पारितोषिक प्राप्त केले.

संजय तीरथकर : ''विदर्भ केसरी''

फ्री-स्टाईल विभागातील निर्णायक झुंजीत अकोल्याच्या प्रशांत खोरवर सडन डेथमध्ये तांत्रिक एक गुणाच्या आधारावर अमरावतीच्या संजय तिरथकर याने 'विदर्भ

केसरी' सन्मान पटकावला. तीन वेळा विदर्भ केसरी राहिलेला संजय तिरथकरला पालकमंत्री श्री. नितीन गडकरी यांच्या हस्ते चांदीची फिरतीगदा, सन्मानाचा पट्टा, तलवार, ५ हजार रुपये व प्रमाणपत्र देण्यात आले तेव्हा स्टेडियममध्ये उपस्थित कुस्तीप्रेमींनी ढोलताशाच्या निनादात टाळ्यांचा प्रचंड कडकडाट करुन अभिनंदन केले.

शिवछत्रपती क्रीडा राज्य पुरस्कार

(जि.क्रीडा अधिकारी, अमरावती यांच्याकडून प्राप्त माहितीवर आधारित)

१) कु.रागिनी बोके १९९७ व्हॉलीबॉल

२) संजय नाईक १९९० व्हॉलीबॉल

३) मनीषा सहस्त्रबुध्दे १९९३-९४ व्हॉलीबॉल

४) रवीभुषण कदम १९९० ज्युदो

श्री.शिवछत्रपती राज्य पुरस्कार

संघटक व कार्यकर्ते

१) श्री.प्रभाकरराव वैद्य

२) श्री.देवीसिंह शेखावत.

३) डॉ.विजयराव वैद्य

४) श्री.एम्.टी.देशमुख, १९९३-९४ विद्याभारती सौरभ कॉलनी, ७९९१६, ॲड.श्री.विजय देशपांडे

श्री.शिवछत्रपती युवा पुरस्कार

१) श्री.विजय लुंगे

२) श्री.महेंद्र भुतडा

जवाहर स्टेडियम १९७९-८०

संजय नाईक आंतरराष्ट्रीय खेळाडू

रविभुषण कदम -- "--

--"-- सुवर्णपदक मानकरी मद्रास

पंच आंतरराष्ट्रीय दर्जाचे पंच

१) श्री.राजकुमार फुंडकर, ज्युडो

२) सतीश पहाडे ज्युडो

३) श्री.सुधीर मांजरेटे.टे.

४) मुकुंदराव असनारे

५) शैलेश नवले जिन्मॅस्टिकस्,

राष्ट्रीय क्रिडापटू

वैशाली नारेकर हॉकी क्रिडापटू

डी.पी.तारेकर हॉकी क्रिडापटू

बरखा केडियाचे जलतरणातील दुहेरी यश

अमरावतीच्या नारायणदास लढ्ढा हायस्कूलमध्ये ८ व्या वर्गात शिकणारी १३ वर्षीय बरखा किशोर केडिया हिने दीर्घ पल्ल्याच्या सागरी पोहोण्यात घवघवीत यश संपादन केले आहे. तिने आधी सॅक्रॉक ते गेट वे ऑफ इंडिया व नंतर धरमतर ते गेट वे ऑफ इंडिया अंतर पार केले.

सॅक्रॉक ते गेट वे ऑफ इंडिया हे सागरी ५ कि.मी. अंतर ९ फेब्रुवारी ९७ रोजी तिने पार केले. महाराष्ट्र राज्य ॲमेच्युअर ॲक्वेटिक असोसिएशनव्दारा ही स्पर्धा आयोजिली होती. एकंदर ३१४ स्पर्धकात ५९ मिनिटे तिने घेऊन १६ वा क्रमांक पटकावला. अंधेरी स्पोर्टस् क्लब मुंबईकडून तिने या स्पर्धेत भाग घेतला.

धरमतर जेट्टी ते गेट वे ऑफ इंडिया हे सागरी ३५ कि.मी. अंतर २४ फेब्रुवारी ९७ रोजी ८ तास ७ मिनिटांत तिने पार केले. या पोहोण्यासाठी लागणारी परवानगी व सहकार्य, निरीक्षक, पंच इत्यादी महाराष्ट्र जलतरण संघटना मुंबईने उपलब्ध करुन दिले. २४ फेब्रुवारी रोजी पहाटे २ वाजून १८ मिनिटांनी बरखाने पोहोण्यास सुरुवात केली. तिच्यासोबत मार्ग दाखविण्यासाठी, मार्ग मोकळा करण्यासाठी व मासेमारी करणाऱ्या लोकांनी जाळे इत्यादी टाकले असल्यास दूर करण्यासाठी एक पायलट बोट होती व एक बोट सोबत होती. या बोटमधून लाईट दाखविण्यात येत असतो. निरीक्षक, पंच, दर्शक, टाईमकीपर, आई-वडील, नातेवाईक, क्लबचे काही लोक इत्यादी ४५

लोक दोन्ही बोटमध्ये होते. श्री. मधुकर कोळी बोटचालक गेली कित्येक वर्ष अशा स्पर्धकांसाठी बोट चालवत आलेले आहेत. अंधेरी स्पोर्टस् क्लबचे मुख्य प्रशिक्षक श्री.राजू पालकर व त्यांचे सहकारी सतीश, शाम व अतुल या मंडळींनी बरखाचा ५ आठवडे सराव करुन घेतला होता. रात्रीतूनच हा सराव घ्यावा लागतो. कारण त्यावेळी सागर शांत असतो.

बरखा अमरावतीच्या हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाच्या जलतरण तलावात गेली सहा वर्षे सराव करत आहे. मा.प्रभाकरराव वैद्य, टॉमी जोस व लक्ष्मीकांत खंडागळे यांचे सतत प्रोत्साहन व मार्गदर्शन मिळाले. याआधीही तिने सॅक्रॉट व शोलय स्पर्धेत भाग घेतला होता. फारशी वाखाणण्याजोगी कामगिरी जरी सुरुवातीला तिला करता आली नाही तरी आता मात्र तिने मोठी गरुडझेप घेतली आहे, असे म्हटल्यास वावगे होणार नाही.

रोटरी मिडआऊन सदस्य, रक्तदानात अग्रेसर, अग्रेसन नागरिक सहकारी पत संस्थेचे अध्यक्ष श्री.किशोर केडिया व सौ.उमादेवी केडिया या दांपत्याची ही मुलगी आहे. तिच्या जलतरणासाठी लागणारा वेळ, श्रम, पैसा इत्यादी खर्च करण्यात संपूर्ण केडिया कुटूंबीय नेहमीच तयार असतात. ट्रॅकवर धावण्याचाही ती सराव करते व सायकलींगही करते. त्यामुळे भविष्यात पोहोणे, धावणे व सायकलींग अशा तीन क्रीडा प्रकाराच्या संयुक्त होणाऱ्या स्पर्धेत ती एक चांगली स्पर्धक होऊ शकेल.

पुढे जून-जूलैमध्ये झिब्राल्टर ते स्वित्झरलॅंड सागरी अंतर पोहोण्याचा तिचा मानस आहे. संबंधितांकडून परवानगी मिळाल्यास ती निश्चितच याही स्पर्धेत यश पटकावू शकेल. हव्याग्र मंडळ अमरावती, रोटरी मिडटाऊन अमरावती, मुंबईची जलतरण संघटना व विशेषकरुन श्री.राजू पालकर व तिचे आई-वडील या सर्वांचे पाठबळ तिला आहेच.

(वरील माहिती डॉ.गोविंद कासट यांनी एका पत्रकाव्दारे कळविली आहे.)

५६ पोलीसांना राष्ट्रपती पुरस्कार

राज्यपाल डॉ.पी.सी.अलेक्झांडर यांच्या हस्ते सेवेत असतांना उत्कृष्ट कामगिरी केलेल्या पोलीस दलातील एकुण ५६ व्यक्तींना राजभवन येथे शानदार समारंभात राष्ट्रपती पदके बहाल करण्यात आली. (१९९७)

यावेळी मुख्यमंत्री श्री.मनोहर जोशी, उपमुख्यमंत्री श्री.गोपीनाथ मुंडे, वित्तमंत्री श्री.एकनाथ खडसे, गृहराज्यमंत्री श्री.गजानन कीर्तीकर व प्रभाकर मोरे उपस्थित होते.

राष्ट्रपती पुरस्कार दिलेल्या अमरावती विभागातील पोलीस अधिकाऱ्यांनी नांवे पुढीलप्रमाणे

श्री.ए.न.एम.एम.कुरेशी पोलीस निरिक्षक अमरावती, श्री.आर.यु.राजपुत पोलीस उप निरिक्षक बुलढाणा, श्री.एस.वाय.सैय्यद पोलीस उपनिरिक्षक बुलढाणा, श्री.एच. आय.खरोडे, पोलीस उपनिरिक्षक बुलढाणा, श्री.श्री.यु.के.गलधर, राखीव पोलीस निरिक्षक बुलढाणा.

अमरावतीतील व्यक्तींना मिळालेले पुरस्कार, सन्मान, गौरव, किताब, पदव्या इ.

श्री.रंगनाथ मुधोळकर	राव बहादुर
श्री.केशवराव ब्रह्म	दिवाण बहादूर
श्री.मोरोपंत जोशी	सर (के.सि.आय.इ)
श्री.अप्पसाहेब खरे	रावबहादूर
श्री.जठार	रावसाहेब
श्री.गोरे	रावसाहेब
श्री.अनगळ	रावबहादूर
श्री.नरसय्या	रावबहादूर
श्री.गझनफरखान	रायबहादुर
श्री.ग.श्री.(दादासाहेब) खापर्डे	भारत रत्न
श्री.ब.ग.खापर्डे(अण्णासाहेब)	कविभूषण

श्री.वामन गोपाळ जोशी	वीर
श्री.पंजाबराव देशमुख	कृषि महर्षी
श्री.भाऊसाहेब भोकरे	सहकार महर्षि
श्री.दादासाहेब खापर्डे	वऱ्हाडचे नबाब
श्री.पंजाबराव देशमुख	शिक्षण महर्षि
ॲड.सरंजामे	रायसाहेब
श्री.भय्यासाहेब देशपांडे	सुरमणि
सौ.कमल भोंडे	सुरमणि
सौ.कमल भोंडे	संगीत रत्न
सौ.माणिक पाटील (प्राचार्या)	पंडिता
सौ.नलिनी लढके	दलितमित्र
श्री.किशोर दिघेकर	दलितमित्र
डॉ.अरुण मराठे	उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार
स.दै.हिंदुस्थान	दर्पण पुरस्कार
श्री.ज्ञानेश्वर देशपांडे	हुतात्मा
श्री.संजय तिरथकर	विदर्भ केसरी
श्री.अरुण खोडस्कर	आदिवासी मित्र
श्री.बॅ.रामराव देशमुख	पद्मभूषण
श्री.अबुल हसन	शेरे बरार
श्री.प्रभाकरराव देवधर	उत्कृष्ट शिक्षण पुरस्कार (राष्ट्रीय)
श्री.स.दे.(छगन) पांडे	उत्कृष्ट शिक्षण पुरस्कार (राष्ट्रीय)
श्री.शामसुंदर दम्माणी	गुणवंत कामगार

कु.मीरा नवसाळकर ह्यांचा सत्कार

अ.भा.सवाई गंधर्व संगीत महोत्सव कुंदगोळ, कर्नाटक राज्य येथे अभूतपूर्व यश प्राप्त केल्याबद्दल महाराष्ट्र राज्य वीज मंडळ ग्रामीण लेखा विभागातील

सदस्यांतर्फे कु.मीरा नवसाळकर हिचा श्री.जोशी साहेब ह्यांचे हस्ते, पुष्पगुच्छ व भेटवस्तू देवून हार्दिक सत्कार करण्यात आला.

ह्याप्रसंगी तिने, आपल्या कलेचे, अल्प वेळ प्रदर्शन करुन समारंभाला योग्य असे उत्तर दिले. कर्नाटकातील सदर महोतत्सव हा संगीत क्षेत्रातील प्रतिष्ठा प्राप्त असा महोत्सव समजल्या जातो व संगीत क्षेत्रातील बडी कलावंत मंडळी ह्या कार्यक्रमास आवर्जून उपस्थित असते. ह्याच संगीत महोत्सवाचा भाग म्हणून उ.अब्दुल करिम खॉ. स्मृती संगीत समारोह, मुंबई येथे तिने नुकतीस आपली सेवा रुजू केली आहे. म्हैसूर येथे आयोजित होत असलेल्या संगीत महोत्सवात तिला, काही दिवसांपूर्वीच सेवा कार्यक्रमाचे निमंत्रण प्राप्त झाले आहे.

महाराष्ट्र राज्य विद्यूत मंडळातील कर्मचारी आणि सुविख्यात संगीत तज्ञ तथा तबला कलावंत पं.श्री.किशोर नवसाळकर ह्यांची ती कन्या असून वरील सर्व कार्यक्रमात तिला तबला संगीताची उत्कृष्ट सेवा, त्यांचा मुलगा राम नवसाळकर ह्यांने अत्यंत यशस्वीरीत्या व समर्पक प्रदान केली. सवाई गंधर्व संगीत महोत्सवातील सर्वात वयाने लहान असलेल्या ह्या कलावतांचे, यशस्वी असे सांगीतिक प्रदर्शन पाहून तिचे अभिनंदन होत आहे.

प्रा.किशोर रिठे यांना आंतरराष्ट्रीय ख्यातीचा 'बाघ सेवक' पुरस्कार

येथील निसर्ग संरक्षण संस्थेचे संस्थापक, विदर्भ पर्यावरण समन्वय समितीचे कार्यवाहक, प्रा.किशोर रिठे यांची त्यांनी व्याघ्र संरक्षणासाठी केलेल्या कार्याबद्दल १९९६-९७ या वर्षाचा आंतरराष्ट्रीय ख्यातीचा 'बाध सेवक' पुरस्कारासाठी निवड झाली आहे.

दलित मित्र श्री.खोडस्कर

सध्या श्री.ह.व्या.प्र.मंडळ, अमरावती येथे योग विभाग प्रमुख श्री.प्रा.डॉ.अरुण खोडसकर, यांचा संक्षिप्त परिचय.

यांचे प्राथमिक शिक्षण अमरावती जिल्ह्यातील ग्रामीण विभागात वसलेले शेषनखेडा, शेंदूरजनाघाट, वरुड व यवतमाळ येथे झाले. क्रमाक्रमाने त्यांनी

एम्.ए., एम्.पी.एड्., डी.वाय.एड्.(योग) पी.एच.डी. येथपर्यंत ते शिकले. योग ह्या विषयात रुचि असल्यामुळे त्यांनी बृहन् महाराष्ट्र योग्य परिषद स्थापन केली असून ते त्या संस्थेचे सचिव आहेत. शिवाय याच विषयात रस असणाऱ्या संस्थेत ते कार्य सांभाळतात. उदा. कलकत्याच्या इंडियन योग फेडरेशन चे सचिव आहेत, महाराष्ट्र आर्चरी असो. चे सहसचिव, अम. जि.योग असो. चे सदस्य ह.व्या.प्र.मंडळाचे कार्यकारी सदस्य आहेत. अमरावतीला भरलेल्या इ.१९८६ सालच्या योग संमेलनाचे संयोजक श्री.खोडस्कर हेच होते. इ. १९७८, १९८१, १९८३, १९८६, १९८९, १९९७ या वर्षी भरलेल्या राज्यस्तरीय योग परिषदांचे संयोजक होते. आदीवासींच्या सर्वांगीण कल्याणासाठी ते झटत असतात. हातरु, हरिसाल, धारणी ह्या आदिवासी क्षेत्रात योग संमेलन भरवून त्यांनी त्यात सात हजार आदिवासी युवक युवतींना सहभागी होण्याची प्रेरणा दिली. अ.भा.नव्हे तर अखिल जागतिक योग संमेलनाचे आयोजन त्यांनी केले. त्या परिषदेत त्यांनी शोधनिबंध वाचला. जापान, बँकॉक, सिंगापूर, येथील संमेलनांना तो उपस्थित होते. लोणावळा, रायपूर, संबलपूर, नागपूर, नाशिक, दिल्ली, ठाणे येथील अ.भा.संमेलनात त्यांनी सप्रयोग भाषणे दिली आहेत. अमरावती कारागृह, बालसुधार केंद्र, अंध विद्यालय, मूक बधिर विद्यालय, येथे जाऊन ते सप्रयोग भाषण देऊन विद्यार्थ्यांना योगा विषयी प्रेरणा देतात. कबड्डी खेळाडूंच्या क्षमतेवर योग प्रक्रियांचा होणारा परिणाम, स्त्रियांच्या आरोग्यावर योग प्रक्रियांचा होणारा परिणाम, दृष्टि सुधारण्यासंबंधी योग प्रक्रियांचे कार्य, कैद्यांच्या मनोवृत्तीवर होणारा योग प्रक्रियांचा परिणाम, रिमांड होम (बाल सुधारगृह) महील बालिकांवर होणारा योग प्रक्रियेचा परिणाम, इ. विषयात त्यांनी संशोधन केले आहे. व निबंधवाचन केले आहे. प्रतिवर्षी ते त्रिंबक गुरुजी जोशी स्मारक व्याख्यान मालेचे आयोजन करतात. नशाग्रस्त व व्यसनग्रस्त रुग्णांच्या मानसिकतेवर ते उपचार करतात व मार्गदर्शन देतात. कुटुंब कल्याण केंद्रांना भेटी देतात. वन्य प्राण्यांच्या संवर्धना सबंधी माहिती देत असतात. हातरु, हरिनाल, (अमरावती जिल्हा) येथे आश्रमशाळा सुरु करण्याच्या प्रयत्नात आहेत. ह्या आदीवासी क्षेत्रात बालकांच्या बौध्दिक व मानसिक विकासाकडे लक्ष देण्याचे

उद्दिष्ट आहे. त्यांना जे मानधन इ. मिळते त्याचा विनियोग ते आदीवासी बालकांना कपडे करुन देणे, गणवेष इ.साठी करतात. आदीवासींच्या विविध अडचणी संबंधी त्यांना मार्गदर्शन करतात. शासकीय योजना समजावून देतात. मतदानाचे महत्व पटवून देतात. आदीवासींसाठी धनुर्विद्या केंद्रहि चालवितात. ह.व्या.प्र.मंडळाच्या कार्यक्षेत्राचा ग्रामीण भागापर्यत विस्तार करण्याचे श्रेय श्री.अरुण खोडस्कर यांना आहे.

परिशिष्ट १४

महिलांचे मनोगत : महिला जगत

सौ.विद्याताई देशपांडे यांचा विशेष गौरव

अमरावती महानगर पालिकेच्या चवथ्या महापौर, तसेच विदर्भाच्या पहिल्या महिला महापौर होण्याचा बहुमान प्राप्त झालेल्या भारतीय जनता पक्षाच्या ज्येष्ठ नेत्या सौ.विद्याताई देशपांडे यांचे समस्त अमरावतीकरांनी अभिनंदन केले आहे. त्यांनी अमरावतीचा झेंडा अटकेपार लावला. अमरावतीचे नाव त्यांनी रोशन केले. इंटर नॅशनल बायोग्राफिकल रिसर्च फाऊंडेशनने त्यांचा सन्मान केला आहे. सौ.विद्याताई अमरावतीच्या महापौर असतांना त्यांनी ज्या जिद्दीने, जोमाने आणि उमेदीने अमरावतीच्या विकासाचे प्रश्न व ते सोडविण्यासाठी योजना सरकार सामाजिक संस्था व नागरिकांपुढे मांडल्या त्यांची दखल इंटरनॅशनल बायोग्राफिकल फाऊंडेशनने घेतली. आणि अमरावतीला विद्याताईंच्या परिचय पत्तासह आपल्या वार्षिक प्रकाशनात स्थान दिले. फाऊंडेशन कडून हा पुरस्कार व मजकूर कळविणारे पत्र सौ.विद्याताई देशपांडे यांना मिळाले आहे. फाऊंडेशनच्या आशिया आवृत्तीत व्हॉ. १- १९९७ मध्ये संपूर्ण तपशील प्रकाशनासाठी घेतला आहे. जगातील विविध देशात निष्ठापूर्वक काम करणाऱ्या व्यक्तींची फाऊंडेशन दखल घेत असते. महाराष्ट्रातील फारच थोड्या व्यक्तींना या प्रकाशनात स्थान मिळाले आहे. अमरावतीचे नाव जागतिक पातळीवर विद्याताईमुळे नोंदविले गेले ! अभिनंदन !

माझे महापौरपद, काहीसे कटु, खूपसे गोड

मानवी जीवन हे एक न उलगडणारे कोडे आहे. आपले जीवन अनेकविध घटनांनी व्यापलेले असते. अशा घटना आपल्या, कमीत कमी माझ्या जीवनात घडल्या. ज्यांचा मी स्वप्नात सुध्दा त्या तशा घडतील असा विचारही कधी केला नव्हता.

माझ्या जीवनातील 'पहिली महिला महापौर' ही एक अशीच ऐतिहासिक घटना म्हणावी लागेल. अमरावती शहरातील, विदर्भातील व महाराष्ट्रातील भा.ज.प ची 'पहिला महिला महापौर' म्हणून मी निर्वाचित झाले १९९२ साली 'नगरसेविका' म्हणून विक्रमी मताने निवडून येण्याचा मान मला मिळाला. १९९३ मध्ये सभागृहाचे नेतेपद मी भूषविले. आणि १९९५-९६ मध्ये भा.ज.पा. पक्षाने ''महापौरपदाची' जबाबदारी ! माझेवर सोपवून मी आजवर केलेल्या कामाचेच प्रशस्तीपत्र दिले. राजकारणाचा फारसा नव्हे. किंबहुना मुळीहि अनुभव नव्हता. मी एक संपूर्ण गृहिणी होते. त्याच काळात अमरावतीमध्ये भा.ज.प. चे आमदार, पालकमंत्री श्री.जगदीशजी गुप्ता प्रचंड बहुमताने निवडून आलेले महाराष्ट्रात भा.ज.पा. व शिवसेना युतीचे सरकार. मग काय सामान्य नागरिकांच्या 'महापौराकडून' फार मोठ्या अपेक्षा असणे अवास्तव नव्हते. राजकीय अनुभव नाही आणि नागपूर, मुंबई, मद्रास, बेळगाव, यारख्या अनेक शहरातील, गावातील, खेड्यातील भा.ज.प. च्या पदाधिकाऱ्याकडून, कार्यकर्त्याकडून अभिनंदनाचा नुसता वर्षाव होत होता. कारण भा.ज.प. ची पहिली महापौर ही एक अशक्य अशी घटना घडली होती. पंरतु या सर्व जल्लोषात गुंतून न पडता मी मला करावयाच्या कर्तव्याची सदैव जाणीव ठेवली.

१) सर्व प्रथम अमरावती महानगर पालिकेचा प्रशासनाच्या समस्या काय आहेत. त्याचप्रमाणे अमरावतीकर नारिकांच्या मागण्या काय काय आहेत हे समजावून घेतले व त्या दिशेने सुनियोजित असा कार्यक्रम आखला.

२) अमरावती महानगरपालिके जवळ नागरिकांच्या समस्या निवारणासाठीच नव्हे तर कर्मचाऱ्याच्या पगारासाठीची पुरेसा. फंड उपलब्ध नव्हाता. शासनाकडून नगण्य

असे सहकार्य. त्यामुळे २० मार्च १९९५ रोजी ''महापौर पदाची'' सूत्रे स्वीकारल्यानंतर शासनाकडून अनुदान प्राप्त करवून घेण्यास प्राधान्य दिले. त्यात मी यशस्वीही झाले. १९९५-९६ च्या चालू आर्थिक वर्षाचे अनुदान म्हणून ३१ मार्च ला रु. ४ कोटी शासनाकडून प्राप्त झाले. एवढेच नव्हे तर पुढील तीन वर्षासाठी प्रत्येक वर्षी ४ कोटी प्रमाणे अमरावती म.न.पा. साठी मंजूर केले गेले. या काळामध्ये मा.पालकमंत्री श्री.जगदीशजी गुप्ता यांचे सहकार्य फार मोलाचे आहे. शहरातील विकासाची सर्व कामे याच अनुदानातून झालेली आहेत आणि सध्या होत आहेत.

१) 'प्रथम महिला महापौर' म्हणून सर्वत्र अभिनंदन होत असतांना मी एक गोष्ट कटाक्षाने पाळली. ती म्हणजे वेळ आणि पैसा याची बचत करण्यासाठी म्हणून मी माझा स्वत:चा वैयक्तिक सत्कार समारंभ घेऊ दिला नाही. कारण महापौरपदाच्या एक वर्षाच्या अल्प काळामध्ये 'सत्कार समारंभापायी' वेळेचा अपव्यय करण्यापेक्षा तो वेळ जनतेसाठी देण्यात मला जास्त स्वारस्य होते. या कारणास्तव सामान्य नागरिक माझे घरी केव्हाही येण्यास मोकळा होता. तसेच. म.न.पा. च्या 'महापौर कक्षात' दररोज विशिष्ट कालावधीत मी न चुकता अगदी वेळेवर उपस्थित राहत असे. कारण 'वक्तशरिपणा' माझा स्वभाव धर्म आहे. त्यामुळे स्वत:च्या व इतरांच्याही वेळेची बचत होते. कुणालाही ताटकळत बसावे लागत नाही.

२) 'महापौरपद' म्हणजे जनतेने तुमच्यावर टाकलेला विश्वास आहे. महापौरपदाच्या माध्यमातून आपल्याला मिळालेली ही सत्ता म्हणजे माझे साध्य नव्हते तर ते समाजसेवा करण्याचे एक साधन होते. सुदैवाने एका उच्च खानदानीमध्ये जन्म झाल्याने मनावर सुसंस्कार झालेले. स्व.बाळासाहेब देवरस माझे आजोबा होते. त्यामुळे संघ परिचाराशी दुरान्वयाने सुध्दा ओढून ताणून नाते सांगण्याची वेळ माझे आली नाही. माझ्या बालमनावर 'दुसऱ्या महायुध्दात सैनिकांची' सेवा करण्याचा' 'फ्लॉरेन्स नाईटिंगेल' हिने फार मोठा ठसा उमटवला, होता. तिचा आदर्श माझे समोर होता. पुढील आयुष्यात स्वामी विवेकानंद, गौतमबुध्द यांच्या चरित्राने मन प्रभावित झाले. माझ्या कुटुंबातील सर्वच लोंक परोपकाराच्या बाबतीत अगदी 'कर्णाचे अवतार'' मीहि त्याला अपवाद

नव्हते. त्यामुळे आधीच समाजसेवेची हौस व त्यात राजकीय सत्ता. राजकारणात येण्यापूर्वी रक्तदाना सारख्या पुण्यकर्मातून गेली २५ वर्षे मी समाजसेवा करीत होते व आजही रक्तदान करणारी पहिली अमरावती शहरातील महिला' म्हणून सर्वाना मी परिचित आहे. अशा या वातावरणात वावरलेली. मी त्यामुळे 'महापौर' झाल्यानंतर जनतेचा पैसा सत्कारणी खर्च व्हावा याची सुध्दा स्वत: जाणीवपूर्वक दखल घेत असे.

१) ''महापौरपदाचा अल्प कार्यकाल'' म.न.पा. ची आर्थिक दुरावस्था,' भविष्यात पुढे ठाकलेली लोकसभेची निवडणूक या सर्व विरोधी वातावरणातून मार्ग काढून स्वत:ची, पक्षाची प्रतिमा उंचावणे व नागरिकांची अपेक्षापूर्ती करणे हे माझे उद्दिष्ट होते. जनमानसावर भा.ज.प. चा ठसा कायम उमटवण्यासाठी पक्षश्रेष्ठींच्याच सल्ल्याने काही कामे केलीत. उदा. तपोवन रोडवरील महापौरांचे निवासस्थानाचे बांधकामा व्यतिरीक्त उरलेले आतील काम. कारण महापौरासाठी निवासस्थान असावे हा प्रस्ताव १९९३-९४ साली मंजूर होऊन जमीन खरेदी व इमारत बांधणी याकरता मागील वर्षापर्यत २६ लाखापेक्षा जास्त रक्कम खर्च झाली होती. आणि इमारतीचा केवळ ढाचा उभा होता. उपयोग काहीच नाही. या इमारतीचे काम लवकरात लवकर पूर्ण करण्यासाठी तत्कालीन आयुक्त व स्थायी समिती सभापती यांनी संपूर्ण विचारांती या निधीला मंजुरी दिली. कारण महापौराला कुठलेही आर्थिक बाबतीत अधिकार नसतात. ज्या कामाला साधारणपणे ११ महिने लागले असते ते काम ६ महिन्यात पूर्ण करुन मी वेळेचा व पैशाचा अपव्यय थांबवला. माझ्या कार्यकालात आंतरिक सौदर्यीकरणासाठी ज्यात फर्निचर, एअरकुलींग, इलेक्ट्रीफिकेशन, कारंजे, बगीचा या कामासाठी २२ लाखाची तरतूद केली होती. इमारतीसाठी जमीन विकत घेणे व इमारत बांधणे या कामाशी माझा कवडीचाहि संबंध नसतांना मला बदनाम करण्यासाठी आपलेच काही लोक प्रयत्नशील आहेत ही फार दुर्देवाची बाब आहे. संपूर्ण महापौर निवास साधारणपणे ७० ते ७१ लाखाच असतांना त्याची किंमत १ कोटी १.१५ व आता १.५० कोटी सांगितली जात आहे.

महापौर बंगला हा जसा चर्चेचा विषय तसाच चतुर्थ महापौर चषक कबड्डी स्पर्धा सुध्दा. महानगर पालिकेत येणारा निधी हा माझ्या अमरावतीकर बांधवांच्या घामाचा पैसा घराच्या टॅक्सच्या रुपाने जमा झालेला आहे. त्याचा मी आवश्यक तेवढाच खर्च करीन हे माझे ब्रीद होते. परंतु माझ्या या स्वभावाचे कौतुक तर झाले नाहीच. उलट अनेकांची नाराजी मला सोसावी लागली. कला व क्रीडा यांना प्रोत्साहन देण्यासाठी महापौर चषक व कलामहोत्सवाचे आयोजन व्हावे याकरिता महापौर चषकाची स्मरणिका रंगीत न छापता श्वेतधवल छापली. बाहेरुन गाड्या भाड्याने मागवण्यापेक्षा ह.व्या.प्र. मंडळाला विनंती करुन त्यांच्या गाड्या खेळांडूसाठी वापरल्या. नगरसेवकांना देण्यात येणाऱ्या भेट वस्तूंना फाटा दिला. महापौर कला महोत्सव कार्यक्रम महापौर चषक कबड्डी स्पर्धेला लागून एकत्रितच घेतला. ज्यामुळे म.न.पा. चा स्टेज, लाईटिंग, ग्राऊंड, बिछायत, लाऊडस्पीकर यांच्या खर्चाची बचत झाली. या कामी सुध्दा माझी टीका करुन अफवा पसरविण्याचे प्रयत्न ! कुणाची मर्जी आमजनतेच्या पैशाचा उधळपट्टी करणे माझ्या पटत नव्हते. जनतेचा पैसा ही माझी खाजगी मालमत्ता नाही हे माझे प्रामाणिक मत होते व आजही आहे. त्याचमुळे म.न.पा. ची महापौराची गाडीसुध्दा मी फक्त म.न.पा. च्या कामा करताच वापरली. याही पलीकडे जाऊन म.न.पा. च्या कामासाठी मुंबईला गेल्यानंतर त्यासाठी येणारा तिकीटाचा खर्च सुध्दा मी स्वत: व्यक्तीगत केला आहे. आणि आजही त्याची पावती माझे जवळ आहे. त्यामुळे 'महापौर बंगला' असो चा महापौर चषक असा कुणाच्याही आरोपांमुळे मी विचलित झाले नाही. कारण मी माझ्या प्रामाणिक पणाशी प्रामाणिक होते. दु:खी जरुर झाले. महापौर बंगल्याच्या व्यतिरीक्त भाजीबाजार येथील महानगर पालिकेचा दवाखाना, भाजीबाजार म.न.पा शाळा यांचे बांधकाम पूर्ण केले व त्याचे उद्घाटन मा.उपमुख्यमंत्री श्री.गोपीनाथजी मुंडे यांचे हस्ते केले. गोपीनाथजी मुंडे यांनी आपल्या भाषणात एखाद्या गोष्टीचा पाठपुरावा कसा करावा हे जर कुणाला शिकावयाचे असेल तर ते त्यांनी विद्याताई देशपांडे यांचे कडून शिकावे असे सांगून माझ्या कार्याचा गौरवच केला. अमरावती शहरातील हॉलीवुड कॉलनी, हरिभाऊ कलोती नगर, भटवाडी, गोपालनगर,

डेंटल कॉलेज, महावीर नगर, गोपालकृष्ण मंदीर या ठिकाणचे रस्ते, नाल्या, पाण्याच्या समस्या मी, सोडवल्या. वरील कुठलेही काम हे इररेग्युलर जरुर असेल परंतु 'इल्लीगल' मात्र नाही हे मी आज साऱ्या जनतेला अभिमानाने सांगू इच्छिते.

२) वैधानिक विकास मंडळाचे अध्यक्ष श्री.अरुणभाई अडसड यांचा माझ्या 'महापौर पदाचा कार्यकाल' यशस्वी करण्यात सिहांचा वाटा आहे. श्री.अरुणभाऊंनी अमरावती शहर स्वच्छ व सुंदर करण्यासाठी वैधानिक विकास मंडळाच्या माध्यमातून १८ कोटी ५० लाख रुपयाचे अनुदान जाहीर केले. यालाच अनुषंगून स्वच्छता व पर्यावरण संतुलनाची सामाजिक जाणीव समाजात वृध्दिंगत होण्यासाठी मी चौकाचौकात स्वच्छ अमरावती सुंदर अमरावती असे बोर्ड लावलेत. छत्रीतलाव व वडाळी तलाव हे पर्यटन क्षेत्र म्हणून महा. सहाय्याने नौकानयन करुन उपलब्ध करुन दिलेत. सार्वजनिक बांधकाम मंत्री श्री.नितीनजी गडकरी यांनी सुध्दा राजकमल चौक सौंदर्यीकरणासाठी ३ कोटी रुपये मंजुर केलेत ज्याचे काम सध्या चालू आहे.

३) महापौरपदाच्या कार्यकालात केंद्र शासनाच्या पंचवार्षिक योजनेमधून अमरावती म.न.पा. करता ७ कोटी ९८ लाख रुपयाचे अनुदान मंजुर झाल्याचे समजले. त्यावेळेस मला झालेला आनंद अवर्णनीय होता कारण आय.डी.एस.एन.टी. या शीर्षाअंतर्गत अमरावती शहरातील सर्व प्रोजेक्ट तयार करुन २५ डिसेंबर ते ७ जानेवारी या सहा दिवसात तो सादर करणे हे माझेसमोर आव्हान होते. परंतु मला हे सांगण्यास अतिशय अभिमान वाटतो की ही योजना सफल करण्यासाठी तीन आर्कीटेक्टस्, स्ट्रक्चरल इंजिनिअर्स, म.न.पा. तील संपूर्ण स.स.न.र. डिपार्टमेंट कर्मचारी वर्ग यांनी रात्रदिवस मेहनत करुन केवळ सहा दिवसात हा प्रोजेक्ट पूर्ण करण्यास जे योगदान दिले. त्यामुळेच प्रथम पुण्याला नंतर दिल्लीला व शेवटी मुंबईला पाठविल्यानंतर हा प्रोजेक्ट मंजुर केला गेल्याचे समजले व आमच्या परिश्रमाचे चीज झाले. आजही केवळ ६ दिवसात हे काम पूर्ण केले म्हणून आमचे 'सर्वत्र कौतुक होत आहे.

१) वरील काम हे माझ्या महापौर पदाच्या काळातील माझी सर्वात मोठी उपलब्धी

तर सांस्कृतिक भवनाच्या मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झालेले भूमिपूजन ही सर्वात आनंददायी घटना होय. नाट्यगृहाच्या निर्मितीची अमरावतीकर रसिकांची फार दिवसांची मागणी होती. याबाबतचा प्रस्ताव नगरसेविका असतांना मीच मांडला होता. त्यांचे भूमिपूजनही माझ्या महापौरपदाच्या कार्यकाळात व्हावे हा एक दैवीसंकेत म्हणावा लागेल. या जागेच्या एन.ओ.सी. साठी कलेक्टर ऑफीस मध्ये मी स्वत: सकाळी ११ ते ५ पर्यंत बेंचवर बसून होते. एन.ओ.सी. मिळाले तेव्हाच घरी गेले. या भवनाच्या निर्मितीमध्ये अमरावतीचे आमचे स्नेही श्री.बाळासाहेब भोळे व तत्कालीन आयुक्त श्री.जोशी साहेब यांचे सहकार्य मिळाले. धूलीवंदनाच्या दिवशी म्हणजे ६ मार्च १९९६ ला वरील कार्यक्रम झाला. धूलिवंदनाच्या सारख्या त्या सणाच्या दिवशी कुणीही घराबाहेर पडत नाही परंतु नगरसचिव खाते व बांधकाम विभागातील कर्मचाऱ्यांनी जीवाचे रान करुन हा कार्यक्रम यशस्वी केला. त्याबद्दल मी स्वत: त्यांची शतश: ऋणी आहे. ह.व्या.प्रसारक मंडळाच्या कुटुंबाने व माझे पती विजयराव देशपांडे प्रभाकरराव वैद्य व त्यांच्या संपूर्ण सहकार्याने कार्यक्रम सफल करण्यासाठी फार कष्ट केलेत. या कार्यक्रमाच्या निमित्ताने उद्घाटनपर भाषणात मुख्यमंत्र्यांनी जेव्हा जाहीरपणे असे सांगितले की, या नाट्यगृहाचा पडदा ज्या ज्या वेळी वर जाईल त्या त्या वेळी महापौर विद्याताई देशपांडे या अमरावतीकर रसिकांना दिसतील.त्यावेळी मा.मुख्यमंत्र्याचे हे उद्गार म्हणजेच मी केलेल्या कार्याची पावती होय असे मला वाटते. मंजूर अनुदाना व्यतिरीक्त १ कोटी रुपयाचे ज्यादा अनुदान त्यांनी जाहीर केले यातच माझ्या यशाचे गमक आहे. आज अंबानाला चेंतलायझेशन व सांस्कृतिक सभागृहाचे काम सुरु आहे एक वर्षाच्या कार्यकालात ६० कोटी ८४ लाख रुपयाचे अनुदान मंजुर करवून घेतले.

१) याच काळात सामाजिक एकात्मता साधण्यासाठी अनेक समाज, उदा.सोनार, शिंपी, कुंभार, माळी, बारी, मातंग, मनेवार, मेहतर समाज, मुस्लीम यांच्या कार्यक्रमात सहभागी झाले. ऑल इंडिया लेव्हलची अनेक अधिवेशने माझ्या महापौर पदाच्या कार्यकाळात झालीत सिनेसर्कीट असो., अखिल भारतीय कला चित्रकला अधिवेशन, अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषद, अखिल भारतीय दंत चिकित्सक परिषद, पोस्ट

टेलिग्राफ कर्मचारी अधिवेशन, बी.ए.एम.एस. कर्मचारी अधिवेशन, पशुवैद्यकीय परिषद, नांदगाव पेठ येथील रासायनिक औद्योगिक वसाहत निर्मिती परिषद.

३) वरील कामा व्यतिरीक्त अमरावती भुयारी गटारी योजना आणि अमरावती शहर वाढीव पाणी पुरवठा योजना फारच सुरळीतपणे पार पडली असा जनतेचा समज होण्याची शक्यता आहे. परंतु कर्मचाऱ्याच्या पगारासाठी होणारा खर्च कसा करावा ह्या प्रश्नाला सामोरे जावे लागले. कर्मचाऱ्यांच्या संपाचा प्रसंग दोन वेळा अतिशय सामंजसपणाने सोडविला. कर्मचाऱ्यानीही त्याच्या वेतनातून २० रुपये महापौर निधी जमा करुन माझ्या आवाहनाला साथ दिली. या फंडाचा उपयोग मी गरजवंतासाठी केला.

४) या काळात अमरावती म.न.पा. तर्फे स्व.सुभाषचंद्र बोस यांचा पुतळा उभारण्याची पूर्ण तयारी करुन सुध्दा कोर्टाच्या स्टे मुळे ते काम अपूर्ण राहिल्याची खंत वाटते. दुसरे असे की अनाथ, अपंग, अंध या माझ्या बांधवांसाठी म.न.पा. मध्ये विशेष सवलत मिळवण्यासाठी मला काही करता आले नाही. वृध्द नागरिकांसाठी वृध्दाश्रम किंवा तत्सम संस्था उपलब्ध नाही याचे शल्य मनाला सतत बोचत आहे.

असो प्रथम महिला महापौर म्हणून इतिहासात नोंद करण्यापेक्षा व इतरांनी काय केले किंवा काय करीत आहेत याबाबत जास्त खोलांत न जाता माझी स्वत:ची, कुटुंबाची माझ्या पक्षाची प्रतिमा कुठेही मलीन होणार नाही, माझ्या व पक्षाच्या प्रतिष्ठेला कुठेही धक्का लागणार नाही. याचा कटाक्षाने विचार केला. याबाबतीत देवाने, त्याचबरोबर दैवाने साथ दिली. घरातील मंडळींकडून खास करुन माझ्या पतीकडून मिळणाऱ्या प्रोत्साहनामुळे माझे मानसिक संतुलन बिघडले नाही. निस्पृहपणे व प्रामाणिकपणे जनतेची सेवा करण्याचा अल्पसा प्रयत्न माझ्या 'महापौरपदाच्या कार्यकाळाचे यशापयश हे मोजमाप करण्यास जनता जनार्दन समर्थ आहे.

वर्ष १९९६ : 'चारित्र्यवान नवऱ्यासाठी'

वर्ष आले नि गेले अशीच वर्षे येतात नि जातात पण काही तरी आठवणी मागे ठेवूनच वर्ष १९९६ आज ह्या वर्षाचा शेवटचा दिवस

९६ ची आठवण केली. तर सहज एक प्रश्न मनांत येतो. या वर्षाने आम्हा महिलांना दिले तरी काय ? जाळपोळ, खून, आत्महत्या, विनयभंग, बलात्कार, फाशी, हुंडाबळी, पळून जाणे, फूस लावून पळवून नेणे, विष प्राशन हे, स्वतंत्र भारतात नि स्वातंत्र्यपूर्व भारतात एखाद्या परंपरेने चालत आले. आता तर मानवी मेंदू भ्रष्टाचार नि महागाईत गहाणच पडला आहे. तेव्हा या मुद्याकडे पुरेसे कोणी लक्षच देत नाही जेव्हा हाच प्रकार एखाद्याच्या मुलींवर ,पत्नीवर किंवा सुनेवर झाला तर थोडा वेळ मन सुन्न होत. पण पोखरुन निघत नाही. तेव्हा अशा गोष्टीचा उहापोह करणे अयोग्य जरी असले तरी स्त्री-पुरुष समान युगात एक नजर टाकायला काय हरकत आहे ?

जगणे हा माणसाचा साधा हक्क, स्त्री नि पुरुष दोन्ही मानवच. फरकत फक्त लिंग भेदाचा. जो निसर्ग निर्मित आहे. नि आपला लढा, चळवळी, क्रांती नि आपण गाजवित असलेली व्यासपीठे ही मानवनिर्मित दोष नष्ट करण्यासाठीच आहेत. तरी सुध्दा पुरुषांच्या मनाने स्त्रीचे जीणे दुय्यम, गौण. कारण ती स्त्री आहे. यात आमचा, दोष काय ? निसर्गनिर्मित दोषांचे भांडवल बनवून पुरुषांची मक्तेदारी आजही तशीच आहे. जगणं हा तुमच्या प्रमाणे आमचा सुध्दा साधा, नैसर्गिक, मुलभूत नि महत्वाचा हक्क. पण त्यालाच तुम्ही पायदळी तुडवितात. स्वातंत्र्याला आज पन्नास वर्षे पूर्ण होत आली. पण आज स्त्रीची दशा बघितली तर असे वाटते आपण आणखी शंभर वर्ष मागे जात आहोत. मानवी हक्क आयोग, ३०% आरक्षण, महिला हिताचे कायदे, चळवळी, संरक्षण, साक्षरता. आमच्या बाजूने आहे. हातात आमच्या पदव्या. पगार आहे, श्रृंगारात प्रतिष्ठा आहे. तरी सुध्दा आज महिला गुन्हेगारीचे प्रमाण एवढे वाढले आहे की, सरकारला आमच्यासाठी वेगळे महिला न्यायालये उघडावी लागली. पागलखान्यात बायकांची चिक्कार गर्दी नि कारागृहात सुध्दा महिला कैद्यांनी तीस टक्के आरक्षण पूर्ण केले ते सुध्दा लहान सहान गुन्ह्यात नव्हे. तर जन्मठेप म्हणूनच याला

आपण विकास म्हणणार आहोत काय ?

गाडगे महाराजांनी आदर्श स्त्रीची व्याख्या अशी केली. तुमच्या हातात पदव्या नि पगार आहे. पायात तुमच्या खेटर आहे जर तुमचा नवरा दारु पिऊन धुमाकूळ करीत असेल तर त्याला सुधारण्यासाठी हातात खेटर घ्या. जर सुधारला नि, तुमचा संसार चांगला चालू झाला तर तुमच्यासाठी तो देवच राहील. गाडगेबाबांना आमचे भाकित माहित होते. गाडगेबाबा आमच्या हाती खेटर देऊन गेले. पण आम्ही मात्र आमचे खेटर पायातच ठेवले. कारण अजूनही तशी संधीच उपलब्ध झाली नाही. कारण गाडगे बाबांनी जर खेटराची व्याख्या केली तरी त्या महामानवाला हे माहिती नसावे की, 'येथे, स्त्रीची पूजा, लाथा बुक्क्या, चप्पल जुते, काठी, कुऱ्हाडी, तलवारी, चाकूंनी सगळे हत्यारे कमी पडतात म्हणून शेवटी नवरा कंबरेचा पट्टा सुध्दा आमच्या पाठींवर तोडतो. या पट्ट्या पट्ट्याने, काही जुताने तो आम्हाला इतका मारतो की, प्रत्येक दिवशी वृत्तपत्र उघडले की, अती महत्वाचे या सदरात बातमी येते चारित्र्यावर संशय घेवून पत्नीस मारहाण, त्याच्या खाली पतीच्या जाचाला कंटाळून आत्महत्या.

अशा रोज पाच ते दहा बातम्या नियमित प्रकाशित होतात. ज्याची दखल पोलीस स्टेशन नि वृत्तपत्रे घेतात पण अशा किती तरी बातम्या सिमेंट काँक्रीटच्या आलिशान बंगल्यात दबल्या आहेत, चव्हाट्यावर येतात. त्या झोपडपट्टी नि मातीच्या घरातून बातम्या . . . एका महिन्याच्या तीस दिवसात ३००० महिला या जागीच अशा मारहाणीत प्राण सोडतात. नवरे मात्र मोकाट, कारण त्याच्याजवळ असतो अटकपूर्व जामीन.

तीस दिवसात तीन हजार नवरे आपल्या धर्मपत्नीवर संशय घेतात. कशासाठी ? तर चारित्र्यावानाकरीता खरच शिक्षणाचे, जातीचे नि आर्थिक दुर्बल घटकाचे, अनुसुचित जाती -जमातीचे जसे दाखले मिळतात तसे चारित्र्याचे दाखले तहसिलमधून आम्हा स्त्रियांना मिळाले असते तर फार बरे झाले असते. पण मनाला हे सांत्वन देत असतांना एक वेडा प्रश्न मनाला पडतो चारित्र्यावर संशय घेणाऱ्या नवऱ्याला खरच चारित्र्य तरी असते का? जर त्याला सत्यवानासारखे चारित्र्य असते तर झाकली

मूठ सव्वालाखाची म्हणून त्यांनी आपले चारित्र्य असे प्रकाशित होऊ दिले नसते. याचा अर्थ असा नाही महिलांना . . . चारित्र्यच नाही. त्या व्याभिचारी आहे. संशय घेणे आम्हाला सुध्दा येते. पण आम्ही भावना दाबतो कारण भारतीय संस्कृतीचा संसाराचा हाच आरसा आहे.

याच आरशात जेव्हा स्त्री स्वत:चे प्रतिबिंब बघते तर तिला तिचा स्वाभिमान पायदळी तुडवीत जाण्याचा आभास होतो. नि मग संपविते जीवनयात्रा छापून येते जाचाला कंटाळून आत्महत्या. उधम करण्याचा ठेका जणू नवऱ्यानेच घेतला.

सरकारने तर स्त्री-पुरुष समानता आता काढली, महिला चळवळी अलिकडे ओरडत आहे पण आमच्या पवित्र कुराणात तर हजारो लाखो वर्षापूर्वी पैगंबरांनी स्त्री हिताचे मुद्दे लिहून ठेवले आहे. मानवी हक्क आयोग आता स्थापन झाले. पण मानवी अधिकाराच्या पायावर आधारित पवित्र कुराण हजारो वर्षापूर्वीचे आहे. म्हणूनच आम्ही पुरुषांना म्हणतो 'कुराण बदलवू नका' फक्त त्या प्रमाणे चला. आपल्य स्वार्थासाठी त्याला उलटे सुलटे करु नका खेद तर याच गोष्टीचा आहे धर्मशास्त्र बंद पडले आहे नि जे वाचतात त्यांना पूजा अध्याय संपविण्याची नि पूण्य पदरात पाडून घेण्याची घाई असते. आजपर्यन्त अर्थ काढल्याचा कोणीच प्रयत्न केला नाही. जेव्हा माझ्या सारखी एक करते तेव्हा समाज वेगळा बनविण्याच्या धमक्या . . . .

पण धमनीत जोवर रक्त आहे. तोवर धमक्याला कोण भिणार ? म्हणूनच हा लेख प्रपंच.

अगदी पंधरा वर्षाची नवरी सोडून उदरनिर्वाहाच्या कामानिमित्ताने आमचे साजन दुबई, सोदी अरब, मुंबईला घरात आम्हाला ठेवतात सासू सासऱ्याची सेवा करायला सेवा करता करता एखाद्या गिधाडाची नजर जर आमच्यावर पडली तर लागलीच बोंबा मारण सुरु, चारित्र्यावर संशय घेवून मारहाण चालू, वरुन घटस्फोटाची टांगती तलवार उफ केले तर स्वयंपाक घरात केरोसीन नि गाड्यामधील डिझेल, पेट्रोल, आमच्या अंगावर मामंजीची सिगारेट पेटविणारी आगपेटी, कोर्टात गेले तर न्याय मिळतो.

तारुण्य नि नोकरीचे वय निघून गेल्यावर, सामाजिक कार्यकर्ता दोन्ही तबल्यावर हात ठेवतात. यालाच आपण जीवन समजतो.

जीवन संसार यापलिकडे सुध्दा आहे. जिथे संयुक्त कुटुंब आहे. तेथील परिस्थिती फारच भयानक आहे. आई वडीलाच्या धाकामुळे तो पत्नीला मारु शकत नाही. पत्नीचे काहीच चुकत नाही म्हणून तो बोलू सुध्दा शकत नाही. पण चार भिंतीच्या आड मागे बेडरुममध्ये त्या दोघांचा संसार कसा चालू असतो याची जाणीव कोणालाच नसते. त्याची कोणी पर्वा सुध्दा करीत नाही. लोकांच्या नजरेत फक्त ते पती पत्नी असतात पण एक शारीरिक नि मानसिक छळ करायचा म्हणून तो नवीनच फॉर्म्युला वापरतो म्हणजे वर्षानुवर्ष पत्नीला शारीरिक सुखापासून वंचीत ठेवणे. ह्याचे मग अवांतर लफडे चालूच. कारण त्याच्या लफड्यांचा हिशोब ठेवायला येथे कोणी कोषाध्यक्ष नाही.

नर मादीच्या या भांडणात वर्षाला १९९६ बाय बाय करायचे राहिलेच १९९६ चा समाचार घेत असतांना एवढे मात्र खरे भांडण करीत आपणास व्यासपीठावर एकत्र यायचे आहे कधी साजन कधी प्रियकर कधी भाऊ कधी पालक, कधी सखा, कधी शेजारी, कधी सेवक, कधी मित्र, कधी पती, म्हणून कारण लढाई नर मादीची नाही आहे ती आहे. पूज्य विचारात संसाराची व्याख्या करीत असता. सुंदरता, श्रीमंती नि शिक्षण यांचा नाही जमला तरी चालेल जुळले ते फक्त विचार. ज्या विचारांचा प्रभाव भावी पिढीवर पडणार आहे. पण परिस्थितीत आम्ही काहीच करु शकत नाही असा प्रश्न नकाबाआड नि असलेल्या असंख्य भगिनींना पण भगिंनीनो मरण जरी स्वस्त असेल तरी कृतीचा अभाव हा आपल्या हाती आहे. आशावादाचा झरा आपल्याजवळ आहे. ह्यानेच आपल्याला गड जिंकायचा आहे. म्हणूनच अर्धा रिकामाच आहे असं न म्हणता पेला तरी आज भरलेला आहे ना म्हणावं.

नुसत शंका कुशंकेने जीवन जगण्यापेक्षा विचाराने इवली इवली कृती करतच राहण्याची सगळीकडे अंधार झाला तरी काळानं बिजिंग परिषदेच्यानिमित्ताने ३० % आरक्षणाचा निमित्याने, आयोगाच्या निमित्ताने सूर्य उगवला आहे. या जाणीवेचा

झरा असाच वाहू द्या. आपल्या सर्वांच्या मनात एक मावळणारा विचारावरच्या बांधीलकीचा सूर्य असावयास हवा. हा सूर्य मन असेल उगवणाऱ्या सूर्याचा हाच आपल्याला आधार वाटू शकतो. एरव्ही त्याच्याआधाराने बाहेर सृष्टी जगत जागवता येते. आज शेवटच्या दिवशी किती नवऱ्यांनी आमच्या चारित्र्यावर संशय घेतला याची नोंद तुम्हीच घ्या एवढे मात्र खरे की, वर्ष १९९६ हे चारित्र्यवान नवऱ्यासाठीच !

(रझिया सुलताना, अमरावती.)

सुशिक्षित स्त्रियांनी सामाजिक ऋणाची जाणीव ठेवावी सौ.नलिनीताई लडके यांची मुलाखत

मुलाखत :- प्रभाकर दवंडे

(सामाजिक समता, स्त्री शिक्षण व कमकुवत घटकातील मुलामुलींचे शिक्षण अशा क्षेत्रामध्ये सेवावृत्तीने कार्य करणाऱ्या महाराष्ट्रातून तीन समाजसेविकांना सावित्रीबाई फुले यांच्या जन्मदिनी दिनांक ३ जानेवारी ८७ रोजी महाराष्ट्र शासनाकडून १९८६-८७ चा सावित्रीबाई फुले पुरस्कार जाहीर करण्यात आला. यापैकी अमरावतीच्या अेक थोर समाज सेविका, दलित पिडीत, आंदिवासी व बहुजन समाजातील अटलांवरील अन्यायाच्या विरोधात झगडणाऱ्या, त्यांच्यातील अज्ञान दूर करण्यासाठी गावोगांव फिरुन साक्षरतेचे कार्य करणाऱ्या निस्पृह कार्यकर्त्या सौ.नलिनीताई आनंदराव लढके यांना हा पुरस्कार प्राप्त झाला आहे.

आजपर्यन्त आपल्या प्रदीर्घ समाजसेवेच्या कालावधीत सौ.नलिनीताईनी कमकुवत व अपेक्षित समाजात जागृती आणण्यासाठी अथक प्रयत्न केले. प्रारंभी फक्त सातवा वर्ग शिकलेल्या नलिनीताईनी जिद्द व सतत परिश्रमाच्या बळावर बी.ए.बी.टी. पर्यन्तचे शिक्षण पूर्ण केले. अमरावतीच्या कस्तूरबा कन्या शाळेत एकूण २० वर्षे त्या शिक्षिका होत्या. सन् १९७७ साली भारत सरकारने राष्ट्रीय शिक्षण पुरस्काराने त्यांचा गौरव केला आहे. या कालावधीत शिक्षण विषयक विविध समित्या व संघटनांवर त्यांनी कार्य केले. आणि आज सुध्दा अनेक शिक्षण विषयक समित्या व

संघटनांशी त्यांचा संबंध आहे.

या शिक्षण विषयक कार्याबरोबरच सौ.नलिनीताईचा दलित पिडित, आदिवासी व बहुजन समाजातील महिलांना जागृत करण्याच्या कार्यात फार मोठा वाटा आहे. लोकशिक्षणाच्या कार्यात कमकुवत गटातील मुलामुलांच्या व महिलांच्या शिक्षणासाठी, त्यांना साक्षर करण्यासाठी सौ.नलिनीताईनी अथक प्रयत्न केले आहेत. त्या स्त्री अत्याचार निर्मूलन ; समितीच्या सक्रीय कार्यकर्त्या आहेत. तसेच अंधश्रध्दा निर्मूलन समितीच्या अमरावती जिल्हा शाखेच्या त्या उपाध्यक्षा आहेत.

त्यांना प्राप्त झालेल्या सावित्रीबाई फुले पुरस्काराच्या निमित्ताने या संदर्भात त्यांचे काही विचार जाणून घेण्यासाठी त्यांची भेट घेतली असता क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या विचारांचा आपणावर विशेष प्रभाव असल्याचे त्यांनी सांगितले. त्या म्हणाल्या की, म. ज्योतिबा फुले, क्रांती ज्योती सावित्रीबाई फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनीच मला समाजसेवेच्या कार्याकडे सतत प्रवृत्त केले. सावित्रीबाईच्या जीवनातला आदर्श, त्यांचे विचार आपणास नेहमी दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शक ठरले व ठरत आहेत.'' याप्रसंगी मुलाखतीत त्यांनी पुढीलप्रमाणे आपले विचार व्यक्त येते.

प्र. :- नलिनीताई आपण गेल्या अनेक वर्षापासून या समाजकार्यात आहात. या क्षेत्राकडे आपण कशा वळलात ? सुरुवातीला या मागची प्रेरणा कुणाची ?

उ. :- या कार्याची प्रेरणा मला प्रथम लग्नानंतर माझ्या घरुनच मिळाली. माझे पती श्री.आनंदराव लढके प्रथमपासून सामाजिक कार्यात होते. आणि या वयातही ते स्वस्थ बसत नाही, अनेक सामाजिक संघटनांशी त्यांचा संबंध आहे. सन १९४३ साली बेलोरा येथे आमचा आंतरजातीय विवाह झाला. घरचे वातावरण समाजसेवावृत्तीचे त्यामुळे साहजिकच ती पार्श्वभूमि मला लाभली पण त्याहीशिवाय डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्त्रीविषयक हिंदूकोडवीलाच्या चळवळीत आम्ही उभयतांनी भाग घेतला होता. तेव्हापासून मी विशेषत्वाने या कार्याकडे वळले.

त्याचबरोबर क्रांतीज्योती सावत्रिबाई फुले यांच्या जीवन कार्याचा माझ्यावर फार परिणाम झाला. शंभर वर्षापूर्वी एवढ्या प्रतिकूल परिस्थितीत, कोणत्याही संकटाची पर्वा न करता त्यानंतर एवढे कार्य केले तर आपणही अल्प का होईना पण स्त्री विकासासाठी तरी कार्य केले पाहिजे, असे प्रकर्षाने जाणवू लागते व या कार्याकडे वळले.

प्र. :- स्त्री जागृतीच्या व साक्षरतेच्या बाबतीत आपणाकडून कोणते प्रयत्न झाले ?

उ. :- शहरी भागापेक्षा ग्रामीण भागात मी या कार्याला अर्थिक वेग दिला. विशेषत: ग्रामीण भागातील कमकुवत घाटकातील, दलित पिडीत, आदिवासी व बहुजन समाजातील महिलांची समस्या अधिक तीव्र आहे. याकरीता मी त्याच्या ठिकाणी गेले जेथे-तेथे त्यांच्यामधूनच महिलामंडळे स्थापन केलीत. त्यांच्या घरी मुक्काम केला. त्यांच्या वस्तीत लहान मोठ्या सभा, मेळावे, सामुहिक कार्यक्रमाचे आयोजन करुन त्यांच्या समस्यांबाबत त्यांना जास्तीतजास्त जागृत करण्याचा प्रयत्न केला. भाषण व लेखनाव्दारे त्यांच्या समस्या मांडल्या. याव्दारे समाजातील अनिष्ट प्रथा, वेडगळ समजुती, अंधश्रध्दा, व्यसन यामुळे होणारे नुकसान तर अस्वच्छतेमुळे आरोग्यावर होणारे विपरीत परिणाम यावर जास्तीत जास्त प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला.

प्र. :- ग्रामीण भागात मजूरीच्या कामावरुन परत 'आल्यानंतर सायंकाळी सभेत उपस्थित राहण्याची प्रवृत्ती सहसा दिसत नाही. त्यामुळे आपल्या याकार्याला त्यांच्याकडून कसा काय प्रतिसाद मिळत गेला ?

उ. :- लगेच कोणत्याही कार्यात प्रतिसाद मिळेलच असे नसते. पण सतत प्रयत्नाने ते शक्य होते. आणि विशेष म्हणजे जे कार्य आपण करतो त्या कार्याची तळमळ आपणास असणे आवश्यक आहे. अडचणी शिवाय तर कोणताच मार्ग नाही. पण आपण समाजाचे काही तरी देणे लागतो, त्यामुळे त्यांच्या समस्या दूर करणे हे आपले कर्तव्य आहे ही भावना दृढ झाली पाहिजे. ही निष्ठा असली की सर्व अडथळे दूर होत जातात. पुष्कळ खेड्यात प्रवासाचे साधन नसल्यामुळे मला पायीच प्रयत्न करावा लागत असे. या खेड्यातून त्या खेड्यात असा प्रचार चालत असे. हा पायदळ प्रवास त्यांना दिसायचा.

त्यामुळे शहरातून आलेल्या महिलांबाबत ग्रामीण स्त्रीयात जो परकेपणा आढळतो तो माझ्या कार्याने नाहीसा होऊ लागला. रात्रं झाली तरी ते माझ्या सभेला थांबत. त्यांच्यात जास्तीत जास्त मिसळले. त्यांच्या सुखदु:खात सहभागी होत आपुलकी मला मिळत गेली. त्यामुळे माझे कार्य अधिक सुकर होत गेले.

प्र. :- समाजकार्यात पुरुषांच्या तुलनेत स्त्री कार्यकर्त्यांना जास्त अडचणी येतात, असे दिसते, आपणाला कोणत्या अडचणी आल्या ?

उ. :- अडचणी शिवाय तर कोणताच मार्ग नाही पण पुरुषांच्या तुलनेने पाहिले तर स्त्री म्हणून मला फारश्या अडचणी आल्या नाहीत. सर्वच समाजघटकातील लोकांकडून मला सहकार्य मिळकत गेले. शिवाय ध्येयाने प्रेरित होऊन केलेल्या कार्यात फारसा त्रास होत नाही.

प्र. :- पुष्कळ ठिकाणी असे दिसते की, स्वत: आंतरजातीय विवाह केल्यानंतर आपल्या अपत्त्यांचा मात्र कुणी आंतजातीय विवाह करतांना दिसत नाही. आपलाही आंतजातीय विवाह झाला आहे, आपली याबाबतचा अनुभव काय आहे. ?

उ. :- काही प्रमाणात ते खरेही असेल पण निश्चितपणे असे म्हणता येणार नाही. पुष्कळवेळा ध्येयाने प्रेरित होऊन आंतजातीय विवाह केलेल्या जोडप्यांना समाजाकडून सहकार्य मिळत नाही. समाजात ते संस्कार अत्यंत खोल आहेत. त्याला अजून कालावधी लागेल. त्यामुळे त्यांची कुचंबणा होते. ही कुचंबणा होऊ नये म्हणून त्यांना जास्तीत जास्त सहकार्य मिळाले पाहिजे. त्यामुळे त्यांचे धैर्य वाढण्यास मदत होईल. माझे दोन मुलं इंजिनिअर व दोन मुली डॉक्टर व मुलगी अध्यापिका आहे. त्या सर्वाचे आंतरजातीय विवाह झाले आहेत. लग्नाच्या बाबतीत कोणतीही अडचण आली नाही.

प्र. :- मुलामुलींच्या शिक्षणातील अडसर दूर करण्याच्या दृष्टीने राज्य आणि केन्द्र शासनाच्या अनेक योजना आहेत. शिवाय अतिशय गरीबी आणि आर्थिक अडचणीमुळे ज्या मुलींचे शिक्षण थांबले आहे. अशा मुलींच्या शिक्षणासाठी सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना कार्यान्वित करण्यात आलेली आहे. या योजनाबाबत आपले काय

मत आहे ?

उ. :- योजना निश्चितच चांगल्या आहेत व त्याचा परिणामही होत आहे, पण यात शासनाबरोबरच समाजानेही आपली जबाबदारी ऊचलणे आवश्यक आहे. पुष्कळ ठिकाणी विद्यार्थी जास्त आणि शिक्षक कमी अशी अवस्था आहे. मुलींचे प्राथमिक शिक्षण परिपूर्ण असायला पाहिजे. सावित्रीबाई फुले दत्तक योजनेचा हेतू फार चांगला आहे. पण यासाठी सामजिक जाणीव असलेल्यांनी पुढे आले पाहिजे. अशा कल्याणकारी योजना समाजाने योग्यप्रकारे राबवून घेतल्या पाहिजेत, त्याबाबत जागृत राहिले पाहिजे.

प्र. :- सुशिक्षित स्त्रियांकडून आपल्या काय अपेक्षा आहेत ?

उ. :- विशेषत: शहरी भागातील स्त्रियांच्या शिक्षणाची गती वाढत आहे. परंतु शिक्षण झालं, वेषभूषा बदलली पण त्याप्रमाणात जागरुकता आली नाही, असे अनुभवास येते. आपल्यावर होणाऱ्या अन्यायाचा प्रतिकार करण्याची शक्ति ते शौर्य अजूनही आले नाही. त्यापेक्षा अडाणी म्हणून जाणाऱ्या स्त्रिया तरी काही प्रमाणात का होईना, आपल्यावर होणाऱ्या अन्यायाचवा विरोध करतांना दिसतात. शिक्षणाने सामाजिक ऋणाची जाणीव सुशिक्षित स्त्रियांमध्ये किती प्रमाणात आली हाही एक प्रश्न आहे. शिक्षणाबरोबर जागरुक होणे आवश्यक आहे. आपल्यावर होणाऱ्या अन्यायाचा जरुर प्रतिकार करण्यात यावा. ही वृत्ती जास्तीत जास्त वाढत गेली पाहिजे. तसेच मिळालेल्या हक्कामुळे दुसऱ्यावर अन्याय होणार नाही याचीही जाणीव ठेवणे आवश्यक आहे.

प्र. :- हा पुरस्कार आपणास मिळेल असे आपणास वाटत होते काय ? याचे श्रेय द्यायचे झालेच तर आपण कुणाला द्याल ?

उ. :- मला एखादा पुरस्कार मिळावा किंवा मानसन्मान मिळावा म्हणून मी या सामाजिक कार्यात आले नाही. त्यामुळे पारितोषिकाची कल्पनाही मी कधी केली नाही. मी दोन जानेवारी पर्यन्त राष्ट्रभाषा प्रचार समितीच्या कार्यात चर्चेला गुंतले होते. आणि दोन तारखेस हा पुरस्कार जाहीर झाला. तरी ज्या अल्पशा कार्याबद्दल हा पुरस्कार

मिळाला ते कार्य करण्याची संधी समाजातील अनेक घटकांनी दिली म्हणून ते कार्य करण्याचे श्रेय मला मिळू शकले. शिक्षक व शिक्षण क्षेत्रात काम करतांना त्या क्षेत्राशी संबंधित असणारे शिक्षक व अधिकारी, सामाजिक कार्य करतांना संबंध आलेल्या महिला संघटना, दलित समाज बांधव, आदिवासी बांधव अशा सर्वांच्या सहकार्याचा त्यात वाटा आहे. कारण त्यांनी मला कार्य करण्याची संधी दिली. या कार्याची प्रेरणा देणारे महात्मा फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे क्षण आहेत. पती व गैरसोय करुन काम करु देणारे माझे कुटूंब यांनाही ते प्रिय आहे.

प्र. :- अजून काय करायचे राहिले, असे आपणास वाटते ?

उ. :- अजून पुष्कळ काही करायचे राहीले आहे. समाजात अजून पुष्कळ करण्याची गरज आहे, समाजाला ज्यांची गरज आहे, जे उपेक्षित आहेत तेथे जाणे हे आपले कर्तव्य आहे; त्यामुळे राजकारणाशिवाय सामाजिक, शैक्षणिक कार्य क्षेत्रात जेथे गरज आहे तेथे मी जाऊन समाजोपयोगी कामासाठी जाणीव निर्माण करुन लोकजागृतीयचे कार्य शक्तिनुसार करण्याचे कार्य सतत करीत राहावे, ही माझी प्रबळ इच्छा आहे.

एक हृद्य सोहळा

मुधोळकर पेठ महिला मंडळातर्फे आयोजित केलेला हा सत्कार सोहळाच होता, पण इतर ठिकाणी होणाऱ्या सत्कारापेक्ष फार फार निराळा ! कविवर्य भा.रा.तांबे यांच्या 'मावळत्या दिनकरा। अर्घ्य तुज जोडुनी दोन्ही करा।' या काव्यपंक्तींना वास्तव्याच्या मखरात बसविणारा होता.

वयाने सत्तरीच्या आसपास असणाऱ्या, वयोमानानुसार येणाऱ्या शारीरिक तक्रारी व त्यामुळे या संस्थेत इच्छा असूनही आता कार्य करु न शकणाऱ्या जेष्ठ भगिनी मुधोळकर पेठ महिला मंडळाच्या शारदानगर स्थित शाळेच्या भव्य हॉलमध्ये सन्मानाने सुशोभित आसनावर स्थानापन्न झालेल्या होत्या. तेथूनच त्या शाळेची भव्य इमारत, त्या इमारतीत सुरु असलेली व मान्यता पावलेली प्राथमिक शाळा, बालकमंदीर,

पाळणाघर, गृहोद्योगाचे कार्य उत्कृष्ट ग्रंथालय, इनडोअर गेम्ससाठी बांधलेला भव्य हॉल, उत्कृष्ट शिक्षिका आणि उत्तम कार्यकारी मंडळ, हे सर्व कौतुक मिश्रीत नजरेने न्याहाळीत होत्या.

पूर्वीच्या संस्थेच्या स्थापनेचा काळ, त्यावेळी ४ आणे, २ रुपये अशी तिकीटे विकून संस्थेसाठी उभारलेला निधी, संस्थेचे रुप व्यापक व्हावे म्हणून केलेली धडपड याची पण तुलना त्या मनात करीत असाव्यात.

कोणत्याही संस्थेच्या निर्मितीत समाजाची भौतिक साथ असते. ती साथ घेऊन कार्य करण्यात या जेष्ठ भगिनींचा सिंहाचा वाटा आहे. त्याचाच सत्कार करण्याची विद्यमान कार्यकारिणीची लगबग सुरु होती. मंचावर सत्कारमूर्ती म्हणून ज्या जेष्ठ भगिनी स्थानापन्न होत्या त्या डॉ.सौ.ईशादया गोगटे, सौ.कमलाताई नाशिककर, सौ.इंदुताई कुथे, सौ.सुशिलाताई कुऱ्हेकर, श्रीमती विद्याताई भोळे, सौ.सुधाताई गद्रे व सौ.शैलजाताई पारखी आदींचा समावेश होता कार्यक्रमाचे अध्यक्षपद सौ.सिंधूताई देशपांडे यांनी भूषविले होते.

नवीन पिढीला जुन्य पिढीची ओळख व्हावी, त्यांच्या पासून प्रेरणामिळावी आणि असे समाजकार्य करणाऱ्या भगिनींना संस्था विसरलेली नाही, असे कृतज्ञतापूर्वक नमूद करुन अध्यक्षांनी सर्व जेष्ठ भगिनींचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार केला.

सौ.प्रभा भट यांनी ज्येष्ठ भगिनींच्या अनमोल कार्याची तसेच त्यांनी त्यांच्या ठिकाणी असलेल्या जिद्द, तळमळ व प्रेमाच्या भावनेतून लावलेल्या लहानशा रोपट्याचा सेतू आग करुन चढला आहे, त्याची थोडक्यात ओळख करुन दिली.

या कौटुंबिक सोहळ्याने भारावलेल्या जेष्ठ भगिनींनी उत्तरादाखल केल्या भाषणात त्यांना कार्य करतांना आलेल्या कटू-गोड आठवणींचा खुमासदार परिचय घडवून सर्व कार्यकारिणी व समाजाचे कृतज्ञता पूर्वक आभार मानले. ज्या जेष्ठ भगिनी आजच्या सोहळ्याला उपस्थित राहू शकल्या नाहीत पण ज्यांच्या सन्मानपूर्वक

उल्लेखाशिवाय संस्थेच्या कार्याचे मूल्यमापन अपूर्ण राहील. त्या श्रीमती कमलाताई, ज्यांना संस्थेच्या आद्य संस्थापिका म्हणता येईल आणि सौ.लिलाताई भट, सौ.नाटेकर तसेच दिवंगत भगिनी सौ.नलिनीताई केतकर व सौ.वसुमती करमकर यांच्या कार्याचा पण गौरव करण्यात आला. विद्यमान कार्यकारिणी कृतज्ञतेच्या भावनेने भारावलेली होती तर ज्येष्ठ भगिनी कृतार्थतेच्या भावनेने वारंवार गहीवरत होत्या. उपस्थित सर्व बंधू-भगिनी हा भव्य सोहळा एकतानतेने अनुभवत होते. सौ.वसुधा गोगटे यांनी प्रासंगिक कविता सादर केली. कार्यक्रमाचे संचालन सौ.काळेले यांनी तर आभारप्रदर्शन सौ.अंजली गोखले यांनी केले.

परिशिष्ट - १५

विविध माहिती

अमरावतीचे नाणे संग्राहक

बुधवारा निळकंठ मंदिरा समोर, अमरावती येथे श्री.चंदुलाल पी.शाह राहतात, त्यांना जुने, प्राचिन नाणे, जुने हस्तलिखित व प्राचीन ऐतिहासिक वस्तु संग्रह करण्याचा नाद आहे. त्यांचे जवळ असलेले प्राचीन नाणे, वस्तू व हस्तलिखित खालील प्रमाणे आहे.

नाणे :-

१) पंचमार्क.

२) कास्ट कॉपर

पूर्वी ३ ऱ्या शतकाचे व मसाक नाणें इ. सन ७ व्या शतकाचे.

३) सातवाहन.

४) सात करणी.

५) क्षत्रय शक.

६) विजयानगर.

७) मुगल राजा

८) खिलजी घराणे.

९) मोहमद बीन घोरी

१०) मोहमद तुगलक

११) शिवाजी.

१२) पेशवा

१३) सिध्दि इब्राहिम खान (जंजीरा)

१४) बडोदाचे गायकवाड

१५) धारचे पवार.

१६) इंदौरचे होळकर

१७) नागपूर व अमरावतीचे भोसले.

१८) ग्वालियरचे शिंदे

१९) ब्रिटिश काळातले स्वतंत्र राज्य.

२०) ब्रिटिश इस्ट इंडिया कंपनी.

२१) बंगाल.

२२) प्रेसीडेंसी इस्ट इंडिया कंपनी.

२३) इन्डो डेमीश. (डॅनाश)

२४) महारथी (सातवाहनाचे मांडलिक)

२५) तक्षशीला २६) कुशान, २७) कल्चुरी नाणें,

२८) गदैया

२९) विष्णु कुंडीन ३०) राज राजा चव्हाण, ३१) सामन्त देव
३२) नहापान

३३) यजन सातकरणी ३४) कौडण्यपूर येथे मिळाले.

हस्तलिखित साहित्य :-

१) समसिध्दि, २) स्तोत्र, ३) महालक्ष्मी स्तोत्र., ४) यंत्र, ५) संवत्सर, वर्ष फल (३०० वर्ष जुने) ६) शिवलिलामृत १४ अध्य शके १७४६, ७) रामविजय उत्तरकांड तंवत १८४१/शके १७०५ सुंदर कांड, ८) पांडव प्रताप ३०० वर्षे जुने, ९) हरीविजय ग्रंथ, १०) भवानी सहस्त्रनाम स्तोत्र, १२) समपदी, १३) व्यंकटेश स्तोत्र, (संपुर्ण) १४) गुरुगीता, १५) प्राण प्रतिष्ठा मंत्र, १६) गणेश भुजंग स्त्रोत्र, १७) व्यकंटेश स्त्रोत्र, १८) भग्वद गीता, १९) रामरक्षा, २०) भग्वद्गीता (मराठी), २१) सुर्यनाराय स्तोत्र, २२) विष्णुसहस्त्रनाम स्तोत्र, २३) भगवद्गीता , २४)राम पंजरीका स्तोत्र शके १७३१, २५) व्यकंटेश स्तोत्र संस्कृत.

जुन्या वस्तूचे संग्रह :-

१) दुर्गायंत्र, २) सूर्ययंत्र, ३) श्वेतांम्बरी जैन यंत्र, ४) दिगम्बरी जैन यंत्र, ५) भोसले, निझाम, मुगल पेशवे, मराठा व राणी लक्ष्मीबाई यांचा काळातले अडकित्ते, चुन्याचे डब्या, पानपुडा, ६) गोंड लोकांचे काळातले तम्बाकु ओढण्यासाठी चिलम, ७) गोंड लोकांचे दागीने.

श्री.चंदुलाल पी.शाह व सौ.सुलोचनाबेन सी.शाह या दोघा उभयतांचे कौतुक करावेसे वाटते, तसेच त्यांनी भारतीय संस्कृती, भारतीय जुने नाणें व ऐतिहासिक वस्तूचा संग्रह करुन पुढच्या पिढीला इतिहास संशोधनचा मार्ग मोकळा केलेला आहे.

वैशिष्ट्यपूर्ण, नोटांचे संग्राहक - प्रशांत नक्षणे

अमरावतीच्या सेंट्रल बॅक ऑफ इंडियाच्या मुख्य शाखेत सहायक मुख्य रोखपाल या पदावर कार्यरत असलेले श्री.प्रशांत नक्षणे, यांच्या जवळच्या दुर्मिळ चलनी नोंटाबद्दल मी ऐकून होतो. त्यामुळे एका निवांत दिवशी त्यांची भेट झाल्यावर त्यांच्या छंदाविषयी जाणून घेण्याची शिवाय त्या नोटा पाहायची उत्सुकता मी त्यांचेजवळ व्यक्त केली. त्यांनी मला त्याच दिवशी संध्याकाळी घरी बोलाविले.

राठी नगर भागातील त्यांच्या घरच्या प्रशस्त सोफ्यावर विराजल्यानंतर संभाषण आपोआपच चलनी नोटांकडे वळले. प्रशांतला, या छंदाची सुरुवात कशी झाली असे विचारले तेव्हा तेा म्हणला की, ''१९९२ साली कॅश पेमेंट करताना मला एकाच क्रमांकाची पुनरावृत्ती असलेली १० रुपयांची ०५ ई सिरीज मधील ८८८८८८ क्रमांकाची नोट आढळली. तेवढी नोट म्हणून मी ती जपून ठेवली. त्यानंतर माझ्या मित्रमंडळीना पण ती नोट दाखविली. सर्वानी कौतुक केले. ''दहा रुपये'' सांभाळून ठेवायचे ठरविले. बस्स तिथूनच या छंदाची खरी सुरुवात झाली. बॅकेतल्या मित्रांनी पण अशा नोटा आढळल्या तर देण्याचे कबूल केले.''

''मग पुढे नोटा कशा येत गेल्या ? मी पृच्छ केली.

त्यावर प्रशांतने सांगितले की, ''माझ्या नादिष्ट छंदाची माहिती हळूहळू सर्वाना झाली. आज १० रुपयांच्या चलनात मजजवळ ६६६६६६, ०९९९९९, ०८८८८८, ०५५५५५, २२२३३३, २२२४४४, ३३३५५५ अशा नोटा तर आहेतच. शिवाय अंक अनुक्रमाची १२३४५६ अशी नोट पण आहे. या शिवाय प्रत्येक मालिकेमध्ये असणारी ०००००१ ची ५० रुपयाची एक दुर्मिळ नोट जशी आहे, तशीच दहा रुपयांच्या ६२ ई मालिकेमधील एक लाखांची म्हणजे. १००००० या क्रमांकाची नोट तर आहेच. पण अत्यंत दुर्मिळ अशी दुसऱ्या मालिकेतील दहा रुपयांची दहा लाखाची नोट पण आहे, तिचा क्रमांक व सिरीज जे ५१ मध्ये १०००००० असा आहे. ''ही नोट कशी मिळाली ?''

यावर प्रशांत उत्तरला, ''त्याची एक चित्तरकथाच आहे. बॅकेतील

माझे सहकारी श्री.दधिच यांना छंदाबाबत माहित होतेच, त्यांचेजवळ ही नोट आली. त्यांनी मला दाखविली, अर्थात मी तात्काळ मागितली. व त्यांनी मला ती दिली. यांनी तर उलट मला प्रोत्साहनच दिलेले आहे.''

''प्रशांत, अशा चलनी नोट गोळा करुन संग्रहासाठी अडकवून ठेवतांना अनेकदा आर्थिक अडचण भासत असेलच. तेव्हा संग्रहातील नोट मोडावी असे वाटले नाही काय ?''

यावर प्रशांतने तात्काळ उत्तर दिले. ''अडचणी तर नेहमी येत असतातच, पण आपल्या संग्रहातील नोट मोडावी असा विचार मात्र कधीही आला नाही आणि भविष्यातही मी असा अविचार करणार नाही.''

''प्रशांत, बॅकेत कॅशिअरची नोकरी करतांना अशी एखादी नोट जर तुझ्या हातून ग्राहकाला द्यायची वेळी आली तर तू केव्हा काय करतोस, '' यावर दोन्ही हात असमर्थपणे वर उघवून तो म्हणाला, ''काय करणार ? ग्राहक जर ओळखीचा असेल तर प्रश्न नसतो, पण अनोळखी ग्राहक सहजासहजी नोट देत नाही. मग तेव्हा वाईट वाटते. शिवाय ग्राहकालाही त्यावेळी त्या नोटेचा मोह असतोच. जसे दोन तीनदा घडलेही, मी त्या त्या वेळी निराश झालो पण कायमसाठी नाही,'' प्रशांत मला अभिमानाने सांगत होता.

''तुझी या छंदातील महत्वाकांक्षा कोणती ?''

तसं म्हटलं तर छंद जोपासावला सुरवात केली तेव्हा सुरुवातीस काही महत्वाकांक्षा नव्हती. केवळ एक गंमतीशीर छंद म्हणून मी विचार करीत होतो. पण जशजशा विविध चलनातल्या म्हणजे १,२, ५, १०, २० रुपयांच्या नोटाजवळ होऊ लागल्या तेव्हा मात्र नवीन मालिकेमधील विशिष्ट क्रमांकाच्या नोटा आपल्याजवळ असाव्यात असे प्रकर्षाने वाटायला लागले.''

''आपल्याजवळ एक विशिष्ट क्रमांकाच्या किमान एक हजार एक विविध चलनी नोटा असाव्यात तसेच ५०० रुपयांची अनोख्या क्रमांकाची किमान एक

चलनी नोट आपल्या संग्रहात असावी, अशी महत्वाकांक्ष वजा इच्छा निर्माण झालीय, हे मात्रा खरं, '' प्रशांत नक्षणे सांगत होता.

''प्रसिध्दीसाठी तर हा छंद जोपासला नाही ना ? किंवा लिम्का ईयर बुकात किंवा गिनीज बर्ल्ड बुकात नाव यावे यासाठी तून हा चलनी नोटांचा संग्रह वाढवित आहे काय ?'' असे विचारतातच प्रशांत उत्तरला - ''नाही, ''प्रसिध्दी' लिम्का बुक वगैरे कल्पना अजिबात डोक्यात नव्हत्या. कारण माझ्यासारखे असे आगळेवेगळे छंद जोपासणारे असतीलच, शिवाय त्यांचा चलनसंग्रह पण जास्त असू शकेल. माझ्या माहितीतच मध्य प्रदेशात एक अशी व्यक्ती आहे. वैशिष्टयपूर्ण अशा व्यवहारांतर्गत बहुतांशी नव्या कोऱ्या चलनी नोटा विदेशी बँकात किंवा रिझर्व्ह बॅकेत साठविल्या जातात. आपल्याकडे अशा नोटा फार कमी प्रमाणात येतात, म्हणून ही नोट दुर्मिळ.''

''सध्या अशा किती प्रकारच्या म्हणजे विशिष्ट क्रमांकाच्या नोटा तू जमविल्यास आणि कोणकोणत्या चलनातल्या त्या नोटा आहेत ?'' असे विचारले असता, ''तशा १,२,५,१०,२० व ५० रुपयांपासून १०० रुपयांपर्यतच्या प्रत्येक चलनातल्या मिळून जवळपास ६०-७० विशिष्ट क्रमांकाच्या चलनी नोटा माझ्या संग्रहात सध्या आहेत आणि. त्यांची एकूण रक्कम जवळपास १७०० ते १८०० रुपयांच्या घरात सहज होईल.'' असे प्रशांतने सांगितले. ''विशिष्ट अनुक्रमांकाची ५०० रुपयांची नोट आपल्या संग्रहात नाही, मात्र तशी नोट मिळाली तर निश्चितच मला आनंद होईल.'' असे त्याने सांगितले.

''१०० व ५० रुपयांमध्ये कोणकोणते क्रमांक तुझ्याजवळ आहेत ?'' यावर प्रशांतने लगेच सगळ्या नोटाच मला दाखविल्या. त्यात १०० रुपयांच्या नोटांमध्ये ७००००, ६६६६६६, ४४४४४४, अशा क्रमांकाच्या नोटा होत्या तर ५० रुपयांच्या नोटामध्ये ८८८८८८, ३३३३३३, ७७७७७७ आणि सिरीजच्या सुरुवातीची म्हणजे ९ एच आर सिरीजमधील ०००००१ क्रमांकाची पण दुर्मिळ नोट पाहून मलाही आश्चर्य वाटले.

''या छंदाची जोपासना करतांना घरच्यांना काही विरोध झाला काय

?'' या माझ्या पृच्छेवर प्रशांतने हसतच उत्तर दिले की, ''नाही. माझा छंद जोपासण्यासाठी मदत करणाऱ्या इतरांनी देखिल माझ्याकडून जास्त अपेक्षा केली नाही आणि घरच्यांचा काहीही विरोध नाही. उलट माझी पत्नी सौ.रेखा, माझे वडील श्री.शामरावजी नक्षणे ह्यांनी मला उत्तेजन दिले. सिरीजमधील व कोणत्याही चलनामधील का होईना पण ११११११११ क्रमांकाची नोट हवी. अशी इच्छा आहे. तसेच २ हा माझा लकी क्रमांक आहे. त्यासाठी २२२२२२ क्रमांकाची कोणत्याही किंमतीवर मिळावी, अशीही इच्छा आहे.''

''प्रशांत आता हा छंद जोपासतांना तू तूझ्या दैनंदिन व्यवहारात जागरुक राहत असशीलच.''

अर्थातच मी जागरुक असतोच पण माझ्याबरोबर माझ्या बँकेतील माझे सहकारी मित्र श्री.दधिच, श्री.आचार्य, कु.सुहासिनी पुरोहित हेही दैनंदिन व्यवहारा अशी नोट आढळली तर वेळप्रसंगी पदरमोड करुन अशी विशिष्ट नोट माझी भेट होईपर्यत सांभाळून ठेवतात. याशिवाय माझ्या कुटूंबातील शिरीन चौधरी, पप्पु चौधरी, नितीन खंडारकर व संबंधित अशा नोटांकडे लक्ष ठेवून असतात. त्यामुळे माझा हा चलनी नोटांचा संग्रह दिवसेंदिवस फुगतच आहे. शिवाय छंद म्हटला की, तो पूर्ण करण्यासाठी पुष्कळांचे सहकार्य लागेलच. हे मला पूर्णाशाने मिळत आहे. पुढे मागे जर कधी काळी माझे नाव झाले तर यांच्यामुळे व प्रेरणास्थानी असलेले माझे वडील व माझी पत्नी यांचा त्यात सिंहाचा वाटा राहील.''

''प्रशांत शेवटचा प्रश्न, हा छंद जोपासतांना कुठे टिंगल टवाळी झाली काय ?'' नाही, टिंगल टवाळी कोणी केली नाही किंवा वेडगळ छंद किंवा वेगळा छंद म्हणून संभावनाही केली नाही. मात्र, सध्या हाच संग्रह वैविध्यपूर्ण करण्याचा विचार आहे, प्रशांत उत्तरला. प्रशांतच्या विचारांना व प्रयत्नांना शुभेच्छा देऊन व त्यांचे परत कौतुक करुन मी त्याच्या निरोप घेतला. पण त्या नोटा मात्र नजरेसमोरच होत्या.

डॉ.संजय कुळकर्णी यांच्या प्रबंधाला सर्वोत्तमतेचा पुरस्कार

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाच्या अमरावती मंडळ कार्यालयातील अभियंता डॉ.संजय श्रीकृष्ण कुळकर्णी यांच्या एक्सपर्ट सिस्टीम, ॲन इमर्जिंग टेक्नॉलॉजी फॉर इंटिग्रेटेड पॉवर सीस्टिम कंट्रोल'' या विषयावरील प्रबंधास दिल्ली येथे आयोजित ''ट्रान्समिशन ॲण्ड डिस्ट्रीब्यूशन आशिया - २०००'' या दुसऱ्या वार्षिक परिषदेत सर्वोतम प्रबंध म्हणून गौरान्वित करण्यात आले. नवी दिल्ली येथे ही परिषद दि. १० व ११ जानेवारीला पार पडली. डॉ.कुळकर्णी यांचा प्रबंध तर सुंदर होताच, पण त्याचे सौदर्यीकरणही योग्य झाल्याने डॉ.कुळकर्णी यांना या परिषदेत रुपये ३ हजाराचा रोख पुरस्कार देण्यात येऊन सन्मानित करण्यात आले.

डॉ.कुळकर्णी यांच्या यासन्मानाबद्दल येथील मंडळ कार्यालयात नव्यानेच रुजू झालेले अधीक्षक अभियंता श्री.बोगीकर व इतर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी प्रशंसा केली.

अमरावतीतील छुपी माणके

विश्राम बेडेकर, श्री बाबासाहेब धनागरे, श्री. पां.चि.करकरे.

विदर्भ महाविद्यालय (त्या वेळचे किंग एडवर्ड कॉलेज) चे माजी विद्यार्थी बाबासाहेब धनागरे,, विश्राम बेडेकर व पां.चि. करकरे यांनी देशगौरव सुभाषचंद्र बोस यांचे भाषण ठरविण्याचा घाट घातला. पण प्रिन्सिपल टॉस्टविन त्यांना विरोध करत होते. म्हणून अखेर किंग एडवर्ड कॉलेजचे स्नेहसंमेलन गणेश थिएटर मधे भरविण्याचे ठरले. तेथे स्भाषचंद्रबाबूंचे विद्यार्थ्यांसमोर भाषण झाले. श्री. बाबासाहेब धनागरे यांनी one who knows हया सहीने ही सर्व हकीकत त्या काळी टाइम्स हया वृत्तपत्रात प्रकाशित केली.

एके दिवशी टॉस्टविन साहेबांनी श्री बाबासाहेब धनागरे यांना कार्यालयात बोलावले. आणि एक पत्र त्यांना दाखविले. one who knows हया शब्दांसाठी त्यांची सही होती. आणि नाव छापू नका म्हणून विनंती केली होती. संपादकांची पत्र तर बरोबर छापले. पण कर्तव्यदक्षता ती चिठ्ठी त्यांनी प्राचार्यांना

पाठवून दिली. ती चिट्ठी प्राचार्यांनी धनागरे यांना दाखवली आणि तुम्हाला कॉलेजमधून काढून टाकू नये असे विचारले. या संदर्भात प्राचार्यांनी एक बैठक बोलाविली. बैखडप्राधध्यापक थत्ते हजर होते. त्यांनी प्राचार्यांच्या सूचनेला कडाडून विरोध केला. त्यामुळे प्रा. धनगरे, श्री विश्राम बेडेकर यांनी नावे कॉलेजमधून वगळण्याचा प्राचार्य टॉस्टविन यांचा डाव फसला.

अचलपूर

हौज कटोरा, बेबहा बाग और अचलपूर के ईदगाह का दिलचस्प इतिहास, बेबहा बाग अचलपूर में सरमस्तपुरा की पुलीस चौकी के पास बेबहा बाग एक बडा लोकप्रिय व विख्यात ऐतिहासिक स्थान है. इस बाग (बगीचा) को नवाब सलाबत जंग ने बनाया था. इस बाग का प्रवेशव्दार बडा ही आलीशान है. इस बाग में दिन में ५ बार नौबत बजा करती थी. और सुबह शाम गरीबो को खाना बांटा जाता था. आज यहां बाग नही है. केवल कब्रस्तान है जहां बडेबडे मकबरे बने हुये है.

बेबहा बाग में प्रवेश करते ही पूर्व दिशा की ओर नवाबो बौर बेगमात के मकबरे बने है. केवल इन मकबरो को देखते ही उनमे दफन किये गये लोगों की शानोशौकत का पता चलता हैं. लेकिन आजकल इन मकबरों पर न तो सफेदी होती हैं और न उनकी देखभाल, उन पर फातेहा पढने वाला भी कोई नही हैं.

यहां सबसे बडी गुम्बद अचलपूर के पहले नवाब ईस्माईल खां की हैं. इस गुम्बद पर अरबी व फारशी भाषा में उनका नाम और देहांत की तारिख व सन लिखा हैं. कहा जाता है की इन नवाब साहाब का १० रबीउल अव्वल ११८९ हीजरी सन में देहांत हुआ था. दुसरा गुम्बद नवाब मुहम्मद सलाबत खां वल्द नवाब मुहम्मद ईस्माईल खां गनी का मकबरा हैं. इसके अंदर जो इबारत लिखी हैं उससे पता चलता हैं की बारामाहे रबीउल् अव्वल १२४० में उनका देहांत हुआ था.

इसके अलावा यहां नवाब मोहम्मद नामदार खां वल्द मोहम्मद सलाबत खां की मजार भी हैं. गुम्बदो के पास ही जालीदार दीवारों के बीच बेगमात के मजार हैं. जिनकी जालियां अब टूटने लगी हैं. ईदगाह

अचलपूर शहर का आलीशान ईदगाह अपने आप में एक अलग कहानी बयान करता है. शहर के सुलतानपुरा रोड के विशाल मैदानपर स्थित यह ईदगाह दिल्ली, हैद्राबाद और आग्रा के ईदगाहो से किसी मात्रा में कम नही आंका जा सकता है.

पत्थर से बनी ३ कमानी दिवारों, गुंबदीनुमा छत यहां के मुख्य आकर्षण हैं. कहा जाता है की १३४८ ई. सन मे इमादुल मुल्क ने इसकी तामीर कखाई थी. उस जमाने में ईमादशाही सल्तनत की राजधानी एलिचपूर (अचलपूर) ही थी. १५७४ ई. सन तक एलिचपूर ईमादशाही सल्तनत की राजधानी रही. उसके बाद इस ईदगाह की देखभाल आसिफजाही सूबेदारोंने की. मीर-उस्मान अली खां. बहादुर की ओर से खुताबा देने और इसका प्रबंधन करने के लिये यहां के खतीब साहब को कखलअत अता की गयी थी. जो आज भी हर ईद का खुतबा पढते समय उन्हे पहनायी जाती हैं. यहां से कोसो मील दूर स्थित चिखलदरा से इस ईदगाह के मीनार साफ दिखाई देते हैं. इस ईदगाह के बारे में एक बडी दिलचस्प कहानी जुडी है, कहा जाता है की एक अंग्रेज अफसर ने ब्रिटीश हुकूमत के दौर में चिखलदरा के किले से ईदगाह के उत्तरी मीनार को निशाना बनाकर तोप दागा था. जिसमें इस ईदगाह की उत्तरी मीनार पूरी तरह धराशाई हुई. बाद में मुस्लिीम समुदायों के लोग व्दारा तीव्र विरोध के फलस्वरुप उस अंग्रेज अफसर ने उस मीनार को दोबारा तामीर भी कखा दिया. प्रतीवर्ष करीब १० से १५ हजार लोग ईद के मौके पर यहां नमाज अदा करते है.

हौज कटोरा

अचलपूर के उत्तर-पश्चिम इलाके में शहर से करीब ४ मील के फासले पर एक इलाका है जिसे 'बरका' कहा जाता हैं. इसी इलाको में एक कुंआ (बावडी) खुदवाया गया था. इस बावडी के नीचे से पानी अपने आप उपर आकर एक पक्की नाली से होता हुआ जालाब में इकट्ठा होता है. यह तालाब अचलपूर के पश्चिमी दिशा की ओर नवबाग रेल्वे स्टेशन के करीब डेढ मील की दूरी पर हैं. इसी तालाब के बीच चार मंजिला एक मीनार के चौडे, हवादार कमरे और मेराब आज भी मौजूद हैं. किन्तु तालब पूरी तरी सूख कर जमीन का रूप ले चुका हैं.

कहते हैं की नवाब और उनकी बेगम गरमियों के मौसम में इसी तालाब के आसपास सैरसपाटे को जाया करती थी. इस मीनार के दो तल मजले अब मिट्टी में दब चुके हैं. इसके बावजूद इसकी सुंदरता में कोई कमी नही आयी हैं. किन्तु यह इमारत भी इन दिनों पुरातन विभाग की लापरवाही का शिकार बनी हैं. इसी मीनार का दुर्लभ चित्र हमें अचलपूर के जाफरी फोटो स्टूडियो से उपलब्ध हुआ हैं.

साद-बीन-सलीम, अचलपूर

सावित्रीबाई फुले स्मृतिशताब्दी सांगता सोहळाा संपन्न

अमरावती (प्रतिनिधी)

येथील नगर भवनात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्मगतीशताब्दी सांगता सोहळा संपन्न झाला. महाराष्ट्र राज्य माळी समाज कल्याण महासंघाअंतर्गत शिक्षण,, कल्याण व सांस्कृतिक कार्य समिती व महात्मा फुले बहुउद्देशीय शिक्षक संघटना यांच्य संयुक्त विद्यमाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन प्रसिध्द वक्त्या श्रीमती नलीनीताई लढके यांचे हस्ते झाले. अध्यक्षस्थानी अमरावती विद्यापीठ विकास विभागाचे संचालक प्राचार्य एस.एस.येनकर होते. तर प्रमुख वक्त्यांमध्ये प्रसिध्द सामजिक कार्यकर्त्या श्रीमती रझिया सुलताना,, म.रा.साहित्य आणि संस्कृति मंडळाचे सादस्य डॉ. सुभाष सावरकर, लातुरच्या राजर्षि शाहू महाविद्यालयचे प्राध्यापक डॉ. श्रीराम गुंदेकर व अमरावतीच्या शासकीय विदर्भ महाविद्यालयच्या प्राचार्य डॉ. विजया डबीर या होत्या. कार्यक्रमाला 'सामाहिक पददलीत जनमंच' चा स्मृतिशताब्दी विशेषांक (संपा, श्रीमती निर्मलावरकर) व 'सामाहिक जनप्रिय' चा प्रथम अंक (सपा गजानन खारकर) यांचे प्रकाशन विमोचन अध्यक्षांच्या हस्ते संपन्न झाले.

संस्था

श्री गोरक्षण संस्था अमरावती के संस्थापक

राष्ट्रनिती स्व.श्री गणेश श्रीकृष्ण उर्फ दादासाहेब खापर्डे जन्म २७ अगस्त १८५४ मृत्यु

१ जुलाई १९३८

स्व. दादासाहेब खापर्डे के प्रयत्नो से १८९१ में अमरावती में गोरक्षण संस्था की स्थापना हुई और १९१० तक उनके पथ प्रदर्शन में यह संस्था सुचारु रुप से चलती रही।

परिशिष्ट १६

आर्थिक, व्यावसायिक संस्था

अमरावती डिस्ट्रिक्ट सेंट्रल को-ऑ.बँकेची स्थापना :

इ.स. १९१२ साली अमरावती शहरातच अमरावती डिस्ट्रीक्ट सेंट्रल को-ऑ. बॅकेंची स्थापना सर मोरोपंत जोशी यांच्या अध्यक्षेतेखाली झाली.

त्याकाळी मध्यप्रांत - वऱ्हाडचे को - ऑपरेटीव्ह खात्याचे रजिस्ट्रार श्री.क्रास्थवेट या नांवाचे एक इंग्रज अधिकारी होते. इ.स. १९११ च्या डिसेंबर महिन्यात ते अमरावतीच्या दौऱ्यावर आले असता त्यांनी, अमरावती नगरपालिकेचे सभागृहात शहरातील काही निमंत्रित सदगृहस्थांची बैठक बोलावली होती. या बैठकीत मि. क्रास्थवेट यांचे 'सहकार' या विषयावर भाषण झाले. यांच्या भाषणाने प्रेरित होऊन इ.स. १९१२ मध्ये सर मोरोपंत जोशी दिवाण बहादूर नानासाहेब ब्रम्ह, श्री.जयवंत वकील, रावबहादूर रा.मो.उर्फ आप्पासाहेब खरे वकील, नारायणराव केतकर प्रभृती मंडळीनी एक सभा घेऊन 'अमरावती डिस्ट्रीक्ट सेंट्रल को-ऑ. बँकेची' स्थापना केली व त्याच वर्षी श्री.नारायणराव केतकर यांचे जागेत (म्हणजे हल्ली शाम टॉकीज आहे तेथे पूर्वी श्री.केतकरांचा बंगला होता तेथे) बँकेच्या कार्यास सुरुवात करण्यात आली.

या बँकेचे पहिले अध्यक्ष सर मोरोपंत जोशी व सेक्रेटरी श्री.जयवंत वकील हे होते. व डायरेक्टर रा.ब.श्री.आप्पासाहेब खरे वकील हे होते.

नंतर बँकेचा व्याप वाढला, जागा अपूरी पडू लागली म्हणून बँकेचे कार्यालय वकील लाईन मधील चॅरिटेबल डिस्पेन्सरीचे (म्हणजे हल्ली हंबडे हॉस्पिटल आहे ती जागा) जागेतील दोन खोल्यात नेण्यात आले होते. सुमारे तीन वर्ष ह्या बँकेचे कार्यालय या जागेत होते. नंतर हे कार्यालय या डिस्पेन्सरीचे समोरील दिवाण बहादूर ब्रम्ह यांच्या बंगल्यातील दुसऱ्या मजल्यावर नेण्यात आले. तेथे ही बँक सुमारे पाच वर्ष होती.

सन १९२३-२४ मध्ये बँकेने कचेरी रोड वरील श्री.कांगा वकील यांचा बंगला तेहेतीस हजार रुपयांना खरेदी केला व तेथे बँकेचे कार्यालय नेण्यात आले. ही बँक तेव्हा पासून याच जागेत आहे. (आता थोड्याच दिवसापूर्वी या बंगल्याचे स्वरुप बदलण्यात आले असून, समोरील खुल्या जागेत आधुनिक पध्दतीची इमारतही बँकेने बांधली आहे.)

इ.स. १९१६ मध्ये सर मोरोपंत जोशी हे नागपूरला रहायला गेल्याने, बँकेचे अध्यक्षपदी, श्री.जयवंत वकील व सेक्रेटरीचे जागी श्री.रा.मो. खरे वकील यांची निवड झाली. पण पुढे १९२० साली सर मोरोपंत जोशी हे होम मेम्बर झाल्यामुळे त्यांची वकीली सांभाळण्यासाठी श्री.जयवंत वकील हेही नागपूरास रहायला गेले. तेव्हा रा.ब.रा.मो. उर्फ आप्पासाहेब खरे वकील हे बँकेचे अध्यक्ष आणि डॉ.वाटवे हे सेक्रेटरी झाले. सन १९३२-३३ पावेतो श्री.खरे या बँकेचे सतत अध्यक्ष होते. नंतर श्री.वाय.जी.देशपांडे वकील हे १९३४-३५ मध्ये बँकेचे अध्यक्ष होते (श्री.आप्पासाहेब खरे यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे)

बँकेची चुरशीची निवडणूक

दिनांक १४ एप्रिल १९३५ रोजी बँकेची अत्यत चुरशीची अशी निवडणुक झाली व त्यात श्री.ठाकूर यांचा पराभव करुन डॉ.भाऊसाहेब पंजाबराव देशमुख हे प्रचंड मतांनी बँकेचे अध्यक्ष म्हणून निवडून आहे.

या सभेसाठी बँकेचे वैयक्तिक हिस्सेदार व संस्थांचे प्रतिनिधी मोठ्या संख्येने हजर होतेच परंतु सर्व गावभर आगाऊच या निवडणुकीची चुरस हा वार्तेचा विषय झाल्याने हजारो प्रेक्षकही गंमत पहाण्यासाठी. बँकेचे आवारात जमले होते. अशा तुफान गर्दीचे वातावरण ही निवडणूक झाली होती.

शेतकरी संघ व ब्राम्हणेतर पक्षाची या दोन्ही (पॅनेल) प्रचंड बहुमताने मंजूर झाली. (उदय दि. १६.४.१९३५) वरुन.

त्यानंतर पुन्हा १९३८ ते १९५२ या काळातही रा.ब.रा.मो.उर्फ

आप्पासाहेब खरे हेच या बँके अध्यक्ष होते.

बँकेने मि.कांगा वकील यांची जागा विकत घेतल्या नंतर तेथे कार्यालय नेण्यात आले तेव्हा दिनांक ९ जानेवारी १९२६ रोजी सकाळी १० वाजता मध्यप्रांत - वऱ्हाडचे तत्कालीन गव्हर्नर मि. बटलर यांच्या हस्ते बँकेच्या कार्यालयाचा उद्घाटन समारंभ थाटाने करण्यात आला होता. या समारंभाला ना.तांबे, सर शंकरराव चिटणीस, वगैरे बरीच मंडळी आली होती. याच वेळी अमरावती जिल्ह्यातील पतपेढ्यांच्या सभासदांनी ना.गव्हर्नरांना रौप्य करंडकातून मानपत्र दिले होते.

या समारंभाला जोडूनच दिनांक १० जानेवारी रोजी सकाळी या बँकेचे आवारातच उभारलेल्या खास मंडपात सर शंकरराव चिटणीस यांच्या अध्यक्षतेखाली वऱ्हाड सरकारी परिषदेचे व्दितीय अधिवेशनही भरले होते. (उदय दिनांक १२ जानेवारी १९२६ वरुन)

बेरार को-ऑपरेटिव्ह इन्स्टीट्यूट :-

इ.स. १९२६ साली अमरावती डिस्ट्रीक्ट सेन्ट्रल बँकेने या संस्थेच्या इमारती साठी १०० एकर एवढी जागा दिली. व रु. १० हजार इमारत बांधण्यासाठी देणगीही दिली होती. या शिवाय वऱ्हाडचे इतर जिल्हा को-ऑ. बँकेनी देणग्या दिल्या. त्यावेळी त्या इन्स्टीट्यूटचे श्री.नानासाहेब ब्रम्ह हे अध्यक्ष होते व उपाध्यक्ष रा.ब.खरे होते. ही इमारत आजही अस्तित्वात असून तीत संस्थेचे उदेशानुसार सहकारी प्रशिक्षणाचे कार्य चालते.

(रा.ब. आप्पासाहेब खरे यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे).

अमरावतीतील खाद्य -पेय- हॉटेल व्यवसाय एक टिपण :-

अमरावती शहर हे फार पूर्वीपासून वऱ्हाड प्रांतातील एक प्रख्यात व्यापारी पेठ होती. अठराव्या शतकाचे शेवटल्या दशकात येथील ठोक व्यापार मोठ्या प्रमाणात सुरु होता असा पुराव उपलब्ध आहे. पुढे इ.स. १८१३ पासून येथे कापसाचा

धंदा सुरु झाला तो १८६७ नंतर (येथे कॉटन यार्ड सुरु झाल्यानंतर) फार वाढला. आणि पुढे अमरावती शहर आशिया खंडातील कापसाची सर्वात मोठी पेठ बनले.

या व्यापारासाठी परगांवाहून येथे येणारे व्यापारी - अडते - खरेदीदार इत्यादींच्या उतरण्या - जेवणाची त्याकाळी काय व्यवस्था होती याचा उल्लेख कोठे मिळाला नाही. परंतु अनुमानत: हे बाहेरुन येणारे व्यापारी धर्मशाळेत अथवा येथील व्यापाऱ्यांच्या दुकानात उतरत असावेत. त्याकाळी सोवळे-ओवळे फार कडक पाळले जात असल्याने स्वत: हातानेच भोजन तयार करण्याची पध्दत असावी. अमरावतीला १८७० साली एक सराय (बाहेरुन येणारे लोकांना उतरण्यासाठी) बांधली होती. तेथे लोक उतरत असत. परंतु त्याकाळी भोजनालये होती का नव्हती याच उल्लेख मिळत नाही. जेथून माहिती मिळते ती खाली दिली आहे.

अमरावती पहिले भोजनालय :-

अमरावतीत भोजनलयाची (खानावळीची) सुरुवात अंदाजे सन १८९७ चे सुमारात झाली, असे उपलब्ध माहिती वरुन दिसून येते. हे पहिले भोजनालय श्री.माधवराव गोखले यांचे होते. वकील लाईन मधील श्री.शंकरराव बोधनकर वकील यांच्या इमारतीत हे लहानसे भोजनालय ते चालवीत असत.

त्यावेळी दोन्ही वेळच्या जेवणाचा दर रु. ६.०० रु (दरमहा) (सहा रुपये) असा होता. विद्यार्थ्यांसाठी हा दर रु. ५ दरमहा होता. आणि विशेष प्रकारचे जेवणाचे, म्हणजे ताटा खाली पाट, दही वगैरे हवे असेल तर दरमहा रु. ७ असा दर असे. भोजन उत्तम प्रकारचे असे.

अमरावतीच्या खाद्य - पेय व्यवसायातील श्री.गोखले यांचे हे भोजनालय म्हणजे या व्यवसायाची येथील सुरुवातच होय, असे म्हणावसाय हरकत नाही.

त्यानंतर इ.स. १८९९ चे सुमारात अंबागेट बाहेर श्री.बळवंतराव पेंढारकर (श्री.डब्ल्यू. जी.पेंढारकर, वकील यांचे वडील) यांनी भोजनालय सुरु केले होते.

इ.स. १८८१ ते १८८३ या काळात अमरावतीतील सरकारी हायस्कूलचे वसतिगृहात - १८८२ साली ७४ व १८८३ या साली ७७ मुले राहत होती. त्यांचा जेवणाचा खर्च सरासरी १८८१-८२ मध्ये दरमहा चार रुपयेदोन आणे तीन पैसे आणि १८८२-८३ मध्ये चार रुपये पांच पैसे प्रत्येकी इतका होता अशी माहिती वऱ्हाड - शाळा - पत्रका च्या जून १८८४ ते एप्रिल १८८५ या जोड अंकात पृष्ठ ६ वर दिलेली आहे. नंतर इ.स. १८९९ साली अमरावतीच्याच नॉर्मल स्कूलच्या वसतिगृहात राहणाऱ्या एका विद्यार्थ्याचा दोन्ही वेळच्या जेवणाचा रोजचा खर्च केवळ अडीच आणे, म्हणजे त्यावेळचे दहा पैसे एवढा होता. वरण, भात, पोळी, भाजी, कढी व तूप एवढे पदार्थ उत्तम रीतीने मिळत. वसतिगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्याना गडी माणसाच्या पगारासह दरमहा अडीच पावणे तीन अगर फारतर तीन रुपये खर्च येत असे.' अशी माहिती श्री.श्री.ना मुळे यांनी वऱ्हाड शाळा पत्रकाच्या मे जून १९२५ चे अंकात दिलेली आहे.

यावरुन असे दिसून येते की, १८८१ ते इ.स. १९४० या साठ वर्षाचे काळात, दोन्ही वेळचे एका माणसाचे जेवणाचा खर्च दरमहा रु. ४ पासून रु. १० एवढाच वाढला होता.

वरील दोन भोजनालयां खेरीज त्यावेळी या शहरात अन्य भोजनालये नव्हती असे दिसते. कारण तशी माहिती मिळत नाही. श्री.गोखले यांनी नंतर त्यांचे भोजनालय गणेश थिएटर (हल्लीचे प्रभात) जवळच्या जागेत आणले होते. त्यावेळी एका वेळच्या जेवणाचा दर प्रत्येकी फक्त दोन इतका होता. आणि इ.स. १९३९ पावेतो हा दर सहा आण्यापर्यंत व मासिक दर दहा रुपया पावेतो होता.

असे दिसते की, पुढे इ.स. १९३० नंतरच या शहरात खाणावळी आणि लॉजिंग या व्यवसायाला थोडी गती मिळाली. इ.स. १९३१ साली मोटार स्टॅन्डवर श्री.चनाप्पा गदगकर यांनी सिध्दाश्रम या नावाने लॉजिंग बोर्डींग (जेवणाची व रहाण्याची सोय असलेले) श्री.जोशी बंधू यांनी 'भारत लॉज' या नांवाने भुसारीगेट रोडवर (हल्लीचा जवाहर रोड) श्री.उदासी यांच्या इमारतीत सुरु केले.

त्या मागोमाग १९३३-३४ मध्ये श्री.चिखलीकर बंधू यांचे 'वसंत विलास', श्री.सावजी टेलर व श्री.शातारामपंत यांनी भागीदारीत सुरु केले. 'मानसरोवर लॉज रेस्ट्रॉरेंट व हॉटेल, (नंतर हे नाव 'राजहंस' करण्यात आले होते) आणि याच सुमारात (१९३४) श्री.रानडे यांचे नूतन आनंदाश्रम व जानेवारी १९३६ मध्ये त्यांनीच सुरु केलेले रानडे लॉज या प्रमाणे लॉजिंगव बोर्डींग सुरु झाली होती.

या शिवाय या काळात शहरात काही मारवाडी ढाबे (भोजनालय) सुरु होते असे दिसते.

स्वातंत्र्योत्तर काळात अमरावती शहरात अनेक खाणावळी आणि लॉजिंग-बोर्डींग सुरु झालीत त्यात सेन्ट्रल लॉज, किर्ती लॉज, राजेन्द्र लॉज, आराम लॉज, आर्यनिवास, गेस्ट हॉउस, राजधानी, महाराजा, निलम इत्यादींचा समावेश होतो. (ईस्लामी दरबार हॉटेल व नॅशनल लॉज ही १९४६ चे सुमाराला सुरु झालीत.)

उतारे :- अमरावती शहर हे फार पूर्वी पासूनच कापसाची मोठी पेठ असल्याने हंगामात येथील कापूस बाजारात लक्षावधी कापूस गाड्या येत असत आणि प्रत्येक गाडी मागे किमान दोन माणसे राहात. या शेतकऱ्यांसाठी अमरावतीत 'उतारे' असत. हा उताऱ्याचा व्यवसाय येथे पुष्कळ वर्ष चालू होता. आता काळाचे पोटात तो गडप झाडा आहे. पण त्या काळात हंगामात येथे येणाऱ्या हजारो शेतकऱ्यांच्या जेवणा उतरण्याची या उताऱ्यामुळे फार सोय झाली होती आणि या उताऱ्यांची संख्याही त्या काळात या शहरात फार मोठी होती. कॉटन मार्केटचे परिसरात प्रामुख्याने हे उतारे असत. या उताऱ्यात बाहेर गावाहून कापूस गाडी घेऊन येथे आलेल्या शेतकऱ्यांना त्याच्या बैलगाडीसह उतरण्याची सोय असे. उतारा चालविणारा इसम, या लोकांच्या स्वयंपाकपाण्यास लागणाऱ्या वस्तू (कणिक, पीठ, बेसन,वगैरे) त्यांना विकत देत असे. ह्या वस्तू घेऊन तेथेच दगडाची चूल मांडून शेतकरी स्वयंपाक करीत.

अमरावतीत हंगामात कापूस गाडी घेऊन येणाऱ्या शेतकऱ्यांची, त्यांच्या बैलगाडीसह तात्पुरती उतरण्याची सोय व्हावी या हेतून इ.स. १९२९ साली

येथील कापूस अडत्यांनी पुढाकार घेऊन 'धर्मादाय कॉटन फंडा' ची स्थापना केली होती. व या फंडासाठी आपसाच्या प्रत्येक गाडीमागे, अडत्यांचे उत्पन्नातूनच फक्त एक आणा घेतला जात असे. अशा रीतीने अडत्यांकडून मिळालेल्या या अशंदानातूनच पुढे, डिसेंबर १९३४ मध्ये, कॉटन मार्केटचे मागील एका जीनाची जागा १८,५०० रुपयांत खरेदी घेण्यात येऊन तेथे या शेतकऱ्यांच्या तात्पुरत्या उतरण्या रहाण्याची सोय करण्यात आली होती. ती अद्याप चालूच आहे. तेथे तात्पुरते उतरण्यासाठी तसेच बैलगाड्यासाठी भरपूर जागा, पाण्याची विहीर, मोठा हॉल, स्वयपांकासाठी जागा वगैरे व्यवस्था आहे. या फंडातूनच पुढे येथे मोठे हॉल वगैरे बांधण्यात आलेत. धर्मादाय कॉटन फंड कमेटी ने केलेल्या या सोईमुळे उताऱ्यांवरील गर्दी कमी होऊन, हळू हळू या व अन्य कारणामुळे हे उतारे काळाच्या उदरात नामशेष झालेत. श्री.धर्मदाय कॉटन फंड कमेटी ही संस्था १९६१ साली पंजिबध्द झाली असून संस्थेचा कारभार ११ लोकांच्या कार्यकारीणी मार्फत चालविला जातो. संस्थेची ही जागा लग्नकार्य आणि इतर मोठ्या कार्यक्रमांसाठी फार उपयुक्त अशी आहे. शिवाय ही संस्था अनेक प्रकारे दान वगैरे देते. या संस्थेमार्फत गरीबांना (तशी खात्री करुन दिल्यास) लग्नासाठी कक्ष व भांडे बिछायत मोफत देते.

रेवसा येथील पंचमुखी हनुमान व अमरावती येथे श्री.गडगडेश्वर महादेव संस्थानला ही संस्था देणग्या देते.

कापूस उत्पन्नतील १/८ भाग इतकी रक्कम ही संस्था येथील गौरक्षण संस्थेला दान देते.

तसेच आषाढी एकादशीच्या पंढरपूर यात्रेसाठी जाणाऱ्या ज्या पालख्या अमरावती मार्गाने जातात, त्या पालख्यां सोबतच्या सर्व लोकांच्या रहाण्या व उतरण्याची व फराळ किंवा भोजनाची सोयही ही संस्था करते. अमरावतीतील ही एक महत्वाची आणि शहराच्या गौरवात भर घालणारी अशी संस्था आहे.

हॉटेल (चहा -फराळाचे दुकान) ची सुरवात :-

अमरावती शहरातील पहिले हॉटेल, अंबागेटचे आंत कै.बापूराव जोशी

यांनी इ.स. १९०१-२ चे सुमारास सुरु केले होते. या काळात अमरावती शहराची लोकसंख्या चौतीस हजाराचे आस पास होती आणि बहुसंख्य लोक परकोटाचे आतच राहात असत. परकोटाचे आतच, अंबागेट पासून दहिसात पावेतो नायकणींची घरे होती व दररोज रात्री अकरा साडे अकरा वाजे पावेतो हा भाग माणसांनी गजबजलेला असे, अर्थातच हॉटेल साठी ही उपयुक्त जागा ठरवूनच श्री.जोशी यांनी या भागात हॉटेल चालू केले.

त्याकाळी हॉटेलात जाणे लोक निषिध्द समजत. त्यामुळे चोरुन लपून, म्हणजे शक्यतो कुणाला माहित होणार नाही अशा रीतीने हॉटेलात प्रवेश करीत, असा तो काळ होता व ही परिस्थिती त्या नंतरही पुष्कळ वर्ष अस्तित्वात होती.

श्री.बापूराव जोशी हॉटेल १९२३ पावेतो तरी अंबागेटचे आत अगदी लागून असलेल्या लहान जागेत होते. नंतर १९२३ साली श्री.चनाप्पा गदगकर यांनी भागीदारीत एक हॉटेल अंबागेटचे आतील पिंपळाच्या झाडा नजीकच्या देवीच्या मकानात सुरु केले होते. पण पुढे ही भागीदारी तुटली. नंतर श्री.चनाप्पा यांनी स्वत:चे हॉटेल अंबागेटचे आतच, एकमुखी दत्त मंदीरास लागून असलेल्या जागेत सुरु केले होते. ते पुष्कळ वर्ष सुरु होते. चनाप्पा नंतर हे हॉटेल श्री.आण्णा गदगकर व नंतर श्री.शंकरआप्पा गदगकर हे चालवीत असत.

रानडे क्षुधा शांती भवन :-

अमरावती खाद्य-पेय-हॉटेल व्यवसायला नवे वळण लावण्याचा प्रयत्न त्यानंतर इ.स. १९११ साली श्री.गंगाधरपंत रानडे यांनी केला. त्यांच्या रानडे क्षुधा शांती भुवन या हॉटेलची सुरुवात दिनांक ११ जानेवारी १९११ रोजी झाली असली तरी, श्री.गंगाधरपंत रानडे यांचे चहाचे दुकान (टी क्लब). दिवाणी कोर्टाचे आवारात, बार रुमजवळ, त्यापूर्वी पासूनच होते. कै.रा.ब.मुधोळकर आणि रा.ब.आप्पासाहेब खरे, वकील यांच्या प्रोत्साहनाने श्री.गंगाधरपंत रानडे यांनी, बार रुमच्या वकील मंडळींच्या सोईसाठी हे चहाचे दुकान तेथे सुरु केले होते. या धंद्यातील अनुभवातून पुढे, वर उल्लेख

केलेले हॉटेल त्यांनी गणेश थिएटर जवळ श्री.उदासी यांच्या इमारतीत सुरु केले होते. अमरावतीतील सुव्यवस्थित असे हे पहिलेच हॉटेल होय असे म्हणायला हरकत नाही. (श्री.रानडे यांचे हे हॉटेल याच जागेत सुमारे ५० वर्षे (१९६२ पावेतो) चालू होते.)

त्यानंतर १९३०-३१ पावेतो म्हणजे तब्बल १९-२० वर्षात शहरात हॉटेलची संख्या मर्यादित होती असे दिसून येते. त्यात हिंन्दू हॉटेले (ब्राह्मणांनी व गुजराती-मारवाड्यांनी चालविलेली) आणि एक दोन ईस्लामी हॉटेले होती. हॉटेलात जाणारांची संख्याही अर्थातच तत्कालीन समाजव्यवस्थेमुळे मर्यादित होती. इ.स. १९३०-३१ नंतर मोटार-स्टॅन्ड सुरु झाल्याने, स्टॅन्ड जवळ हॉटेलांची संख्या वाढली असेही दिसून येते. तत्कालीन समाजव्यवस्थेत सार्वजनिक नीतीमत्तेच्या काही विशिष्ट कल्पना होत्या व त्यामुळेच या चौकटी बाहेर जाण्याचे साहस त्याकाळी सहसा कोणी करीत नसे. आणि अशा रीतीने सारा समाज विशिष्ट मर्यादेत वागत होता. आता ती परिस्थिती राहिली नाही. केवळ पुरुष वर्गच नव्हे तर स्त्रियाही हॉटेलात जातात. त्यात आज कोणासहि वावगे वाटत नाही. कालानुरुप हे परिवर्तन अपरिहार्य होते व तसे ते घडलेहि आहे.

हल्ली शहरात अत्याधुनिक पध्दतीच्या लॉजिंग-बोर्डींग व हॉटेल्स, बार, मटन हॉटेल्स वगैरे मोठ्या संस्खेत दिसून येतात. आणि तेथील व्यवस्थापन देखील अत्याधुनिक पध्दतीने केले जाते. अर्थात हा व्यवसाय आता एक चांगल्या उत्पन्नाचा व्यवसाय समजला जातो आणि अशा हॉटेल खाणावळीत जाणे हा एक सामाजिक प्रतिष्ठेचा विषय मानल्या जाऊ लागला आहे.

गेल्या ८० वर्षात या शहरात हे परिवर्तन घडून आले आहे.

हलवाई दुकाने :-

अमरावतीच्या खाद्य पेय, हॉटेल व्यवसायाचा आढावा घेताना येथे शहरातील हलवाई दुकानांचा उल्लेख करणे अगत्याचे आहे.

इ.स. १९०० चे पूर्वीपासूनच हा व्यवसाय येथे सुरु असावा असे दिसते. त्याकाळी दहिसातीतील श्री.गदालालजी हलवाई व सक्करसाथीत श्री.मुकूंदीलाल हलवाई व नंतर भुसारी गेटचे बाहेर श्री.जगनमहाराज यांची हलवाई दुकाने हाती अशी माहिती मिळते. नंतर १९१३ चे सुमारास श्री.गेंदालाल यांच्या दुकानासमोर श्री.अंबादासजी हलवाई (पुढे यांचे बंधु भोला हलवाई हे दुकान चालवीत असत. ते आजही आहे.) आणि श्री.गेंदालाल यांचे कडील नोकरी श्री.धन्नुसा यांनी नोकरी सोडल्यावर नंतर दहीसातीतच हलवाई दुकान सुरु केले होते. ते पुढे अंबागेटेचे आत आणले . (श्री.गदालाल यांचे नंतर त्यांचे पुत्र पुन्नूलाल यांनी हे दुकान पुष्कळ वर्ष चालविले. पण त्यांचे मृत्यूनंतर ही दुकाने बंद पडली) नंतर देवी जवळ श्री.पप्पू हलवाई दुकानात प्रामुख्याने दुधाचे पदार्थ, पेढा, बर्फी, कलाकंद, जिलेबी व उपवासाचे पदार्थ मिळत. यापैकी बहुतेक दुकाने आजही चालू आहेत व त्यांनी आपल्या धंद्यात सुधारणा केल्या आहेत.

इ.स. १९२५ मध्ये गणेश थिएटर जवळ श्री.धोराजीवाला यांचे काठेवाडी पध्दतीच्या फरसाण मालाचे दुकान सुरु झाले. ते अद्यापी चालू आहे. याशिवाय खारा व काही मोठा माल ठोक दरांनी विकणारी दोन तीन गुजरात्यांची दुकाने अमरावतीत होती. गेल्या १०-२० वर्षात शहरात मिठाईची आणखी बरीच दुकाने सुरु झाली आहेत. एक दोन बंगाली मिठाईची दुकानेही चालू आहेत.

आज (१ जानेवारी १९८०) अमरावती शहरातील हॉटेलस, खाणावळी, विश्रामगृहे, लॉजिंग-बोर्डींग, रिफ्रेशमेन्टस्-रेस्टॉरंटस् यांची संख्या खालील प्रमाणे आहे.

१.	हॉटेल, हलवाई, रिफ्रेशमेन्टल रेस्टारंटस्	४६४
२.	राहण्याची व रहाणे आणि जेवणाची व्यवस्था असलेली विश्रामगृहे	३०
३.	खाणावळी (फक्त जेवणाची व्यवस्था)	७१

या धंद्यात काम करणाऱ्या एकुण कामगारांची संख्या २०३६ आहे. म्हणजेच या धंद्यावर सुमारे सहा ते आठ हजार लोकांची उपजीविका अवलंबून आहे. १. (हल्ली शहराची लोकसंख्या २,६१,००० पेक्षा जास्त आहे)

या प्रमाणे अमरावती शहरातील गेल्या ८०-८५ वर्षातील खाद्य - पेय - हॉटेल व्यवसायाची सुरुवात आणि या धंद्याची प्रगती ही संक्षिप्त माहिती येथे देण्याचा प्रयत्न केला आहे.

दिवसे दिवस वर उल्लेख केलेले व्यवसाय जरी सुधारत असले तरी ते चालविणे फार कठीण होत आहे असे या धंद्यातील अनुभवी लोकांचे म्हणणे आहे. त्याची मुख्य कारणे दोन. पहिले म्हणजे या व्यवसायाला लागणारा कच्चा-माल व कुशल नोकरांची उणीव आणि दुसरे, यावरील कायद्यांची बंधने, ही होत.

वरील लेखाचा उद्देश मुख्यत: अमरावती शहरातील या व्यवसायाची सुरुवात व प्रगती यांची संक्षिप्त माहिती देणे एवढाच आहे. शहरात गुजरात्यांची हॉटेले अंबागेट व भुसारीगेट याचे आस पास होती. सक्करसाथीत मारवाडी ढाबे, इतवार बाजार भागात ईस्लामी हॉटेले व खाणावळी होत्या. आणि कॉटन मार्केटचे परिसरात अनेक उतारे मुख्यत: हंगामात असत व ते खेडे विभागातील व्यक्तीकंडून आणि काही स्थानिक लोकांकडून चालविले जात असत. वसंत विलास राजकमल चौकातील खापर्डे यांचे जागेत सुरु होते.

१. कामगारांची ही संख्या अधिकृत नोंदलेल्या प्रमाणे आहे. या धंद्यात न नोंदलेल्या व हंगामी स्वरुपाने काम करणाऱ्या कामगारांची आणि त्यातही बाल कामगारांची संख्या फार आहे. रानडे क्षुधाशांती भुवन व रानडे लॉजचे मालक आणि अमरावती खाद्यपेय विक्रता संघाचे अध्यक्ष श्री.दत्तोपंत उर्फ दादासाहेब रानडे यांनी दिलेल्या माहितीचा, व्दिसाप्ताहिक 'उदय' चे त्याकाळातील अंकाचा आणि अमरावतीचे वयोवृध्द नागरिक रा.ब. आप्पासाहेब खरे (वय ९९) वकील यांच्या आठवणींचा तसेच या व्यवसायातील इतर सद्गृहस्थांच्या मुलाखतींचा या लेखासाठी उपयोग केला आहे. (संपादक)

अमरावतीतील सिनेमा आणि स्वातंत्र्यपूर्ण काळातील त्याच्या विकासाचे टप्पे

इ.स. १९२० चे आसपास अमरावतीत आणि नजीक पासच्या बाजाराच्या गावी मुंबईकडील लोक "टुरींग टॉकीज" व्दारे पहिल्या प्रथम या भागातील लोकांचे सिनेमा व्दारे मनोरंजन करीत असत असे विविध लोकांच्या आठवणीतून दिसून येते.

परंतु अमरावतीत "सिनेमा" हा मनोरंजाचा प्रकार स्थाई स्वरुपात सुरु करण्याचा मान कै.धर्माजी नरसु उर्फ अण्णा चक्कीवाले यांनाच आहे. त्यांनी इ.स. १९२१-२२ मध्ये, हल्ली राजलक्ष्मी (पूर्वीचे राजकमल) बोलपट गृह आहे. त्याच जागेवर (त्यावेळी ही खुली जागा होती.) टीनाचे थिएटर उभारुन त्यात "सिनेमा" ची सुरुवात केली होती. या सिनेमाचे नाव होते "श्री दत्तात्रय इलेक्ट्रीक ग्रॅड सिनेमा" त्या नावात "इलेक्ट्रीक" हा शब्द आहे. परंतु त्यावेळी अमरावतीत इलेक्ट्रीक आलेली नव्हती.

श्री.अण्णा चक्कीवाले यांची या थिएटर जवळ धान्य दळणाची चक्की होती. दिवसा ही चक्की ज्या ऑईल एंजिनवर चालवत त्याच ऑईल एंजिनवर रात्री सिनेमा चालविला जात असे. त्याकाळी मुख्यत: सिनेमातून मुक्या (सायलेंट) इंग्रजी फिल्म दाखविल्या जात असत. या सिनेमाचा तिकीट दर थर्डक्लास एक आणा होता. जमीनीवर बसून सिनेमा पहावा लागत असे. काही बाक व खुर्च्या असत. त्याचा दर थोडा जास्त असे हा दत्तात्रय इलेक्ट्रीक ग्रॅंड सिनेमा १९२५ पावेतो तेथे चालू होता. १.

(१. श्री.शंकरलालजी राठी, श्री.वि.ल. खरे व सुफशावली तकीयाचे इनामदार वहीवाटदार श्री.जुम्माशहा फकीर यांच्या आठवणी.)

श्री.अण्णा चक्कीवाले हे मूळचे खंडवा (जि.नेमाड) येथील रहिवासी होते. त्यांचे बंधु श्री.विठ्ठलराव हे फोटोग्राफर होते. दोघेही कल्पक त्यांनी नंतर टुरींग टॉकीज सुरु केली होती व ती घेऊन ते वर्धा शहरापर्यत ये जा करीत असत. १९२१ च सुमारात त्यानी वर म्हटल्याप्रमाणे अमरावतीत टीनाचे थिएटर बांधून सिनेमाचा धंदा सुरु केला होता.

त्यानंतर नागपूरचे श्री.नानकचंद यांनी इ.स. १९२३ मध्ये इंद्रभुवन थिएटर भाड्याने घेऊन तेथे ''भारत सिनेमा'' सुरु केला होता. पण तो जास्त काळ चालू शकला नाही. नंतर त्यांनीच हल्ली चित्रा टॉकीज आहे ती श्री.उदासीजींची जागा (त्यावेळी ती खुली जागा होती.) भाड्याने घेऊन तेथे टीनाचे थिएटर उभारले व तेथे हा ''भारत सिनेमा'' चालू केला. पण तो ही सिनेमा चालू शकला नाही.

नंतर १९२४ साली करजगावचे श्री.केशवराव कांडलकर यांनी गणेश थिएटर (हल्लीचे प्रभात) भाड्याने घेऊन तेथे ''श्री रामकृष्ण सिनेमा'' चालू केला होता. परंतु दुव्यवस्थेमुळे त्यांनी तो सिनेमा सेठ सदाराम मन्नालाल यांना विकला. सेठ सदाराम यांनीही काही दिवस हा सिनेमा चालवून तो सेठ कसरीमलजी धामकवाले यांना विकला. व शेवटी केसरीमलजींनाही हा सिनेमा न चालल्यामुळे बंद करावा लागला.

(इ.स. १९२३ साली भारत सिनेमाचे ''पिक्चर पॅलेस'' या नावाचे थिएटर अमरावतीत होते असे एका उल्लेखावरुन दिसते. पण तेथे त्यावेळी सिनेमा चालू नसावा.)

इ.स. १९२६ चे अखेरीस आकोल्याचे श्री.रामचंद्र विठ्ठल दांडेकर यांनी श्री.उदासीजींचे (त्यावेळी टीनाचे) थिएटर भाड्याने घेऊन तेथे ''श्री कृष्ण सिनेमा'' सुरु केला. तो १९३५ पावेतो तेथे होता. नंतर दांडेकरांनी आपला सिनेमा गणेश थिएटर भाड्याने घेऊन तेथे आणला. (१९३६ ते १९३७) (दांडेकरांचा एक सिनेमा अकोला येथे ही होता.)

इ.स. १९२९ मध्ये श्री.पंचमसींग बैस यांनी इंद्रभुवन थिएटर भाड्याने घेऊन तेथे ''प्रताप सिनेमा'' सुरु केला होता. तो तेथे १९३२ पावेतो चालू होता व या प्रताप सिनेमातच अमरावतीत प्रथमच १९३२ मध्ये ''आलम आरा'' व त्यानंतर ''अयोध्येचा राजा'' हे बोलपट दाखविण्यात आले होते. आलमआरा हा पहिला बोलपट असून त्याचे निर्माते श्री.अर्द्रेसर हे पारशी गृहस्थ होते.

वरील दोन बोलपट अमरावतीत प्रदर्शित झाले आणि एक प्रकारे मुक्या

(सायलेंट) फिल्मचा जमाना संपला. निदान त्याचे महत्व कमी झाले व बोलपटांचा जमाना सुरु झाला.

प्रताप सिनेमा बंद पडल्या नंतर श्री.पंचमसिंग यांनी मुंबईच्या ''फेमस पिक्चर्स'' चे मालक श्री.बाबूराव पै यांच्या सहकार्याने गणेश थिएटर भाड्याने घेऊन तेथे फेमस टॉकीज सुरु केली. (१९३४)

त्या काळात सिनेमा दाखविण्याची मशीन व थिएटर भाड्याने मिळण्याची सोय होती. व तशी याधंद्यातील प्रथा होती. त्यामुळे थोड्या भांडवलावर, ज्यांना या धंद्यातले तंत्र अवगत आहे. अशांना हा धंदा सुरु करता येत असे. फेमस टॉकीज याच पध्दतीने सुरु झाली होती.

इ.स. १९३५ साली श्री.उदासीजींनी त्यांच्या स्वत:च्या जागेतील टानाच्या थिएटरचे जागी, थिएटरची पक्की इमारत बांधली. ''सुर्दशन थिएटर'' हे थिएटर भाड्याने घेऊन तेथे श्री.पंचमसिंग बैंस श्री.सोमाण्पा बुनगे, श्री.रामकृष्ण सावजी आणि श्री.नारायणराव सायन्न यांनी भागीदारीत ''विजय टॉकीज सुरु केली. ती सन १९३८ पावेतो सुरळीत चालू होती. नंतर काही कारणामुळे ती बंद पडली.

दरम्यानचे काळात इ.स. १९३७ साली श्री.भिवापुरकर यांनी नगरपालिके समोरील ''लक्ष्मी थिएटर'' बांधले. ते पुण्याचे व्हि.काशीनाथ यांनी भाड्याने घेऊन आणि या धंद्यातील पुण्या-मुंबईकडील टापटीपींची पध्दत अमलात आणून तेथे ''राजकमल टॉकीज'' सुरु केली.

त्या सोबतच १९४० साली त्यांनी थिएटर भाड्याने घेऊन तेथे ''प्रभात टॉकीज'' सुरु केली. सुमारे १५ वर्षे व्हि.काशीनाथ यांनी हा व्यवसाय येथे केला होता.

श्री.पंचमसींग बैस हे अमरावतीतल सर्वात जुने या धंद्यातील जाणकार असून १९२२ साली श्री.दत्तात्रय इलेक्ट्रीक ग्रँड सिनेमाचे पेंटर श्री.संगण्पा मेंडसे यांच्या हाताखाली सहाय्यक म्हणून या धंद्यात प्रवेश केला होता व या सिनेमातच त्यांनी मशीन ऑपरेटींग चे ज्ञान प्राप्त केले नंतर ते अकोल्यास श्री.दांडेकर यांचे कडे नोकरीत होते.

दांडेकरांना अमरावतीत सिनेमा सुरु करण्याचा सल्ला त्यांनीच दिला होता. पुढे वर उल्लेख आल्याप्रमाणे त्यांनी स्वत:चा "प्रताम सिनेमा" सुरु केला. पहिला बोलपट अमरावतीकरांना दाखविण्याचे श्रेय त्यांना आहे.

बँक ऑफ बेरार लि. :

इ.स. १९१० मध्ये कंपनी कायद्यान्वये ही बँक अमरावतीत स्थापन करण्यात आली होती. या बँकचे सुरुवातीचे संचालक मंडळात श्री.पद्मनाभपंत दंडे, वकील, श्री.पांडुरंग गोविंद आळशी, वकील, श्री.गणेशदास साहू व रामधन साहू, थुगाववाले, श्री.अण्णासाहेब कलोती, वकील आणि श्री.वासुदेव गणोरकर (अण्णासाहेब), श्री.काका तांबे इत्यादी मंडळी होती.

या बँकेचे सकल्पित भांडवल १० लक्ष रुपये होते. तरी प्रत्यक्षात सुमारे ५७ हजार रुपयेच वसूल भांडवलावर या बँकेचे कारभाराला सुरुवात झाली होती. नंतर बँकने स्वत:च्या मालकीची एक मोठी इमारत मुख्य बाजार (जवाहर रोड) रस्त्यावर घेतली व तेथेच ही बँक अखेर पर्यत होती. बँकेचा मुख्य व्यवसाय गहाणावर (आणि थोड्या प्रमाणात प्रॉमिसरी नोटावर) कर्ज देणे हा होता.

सुरुवातीला बँकेचा व्यवहार उत्तम सुरु होता. परंतु पुढे डायरेक्टर बोर्ड बदलत गेले आणि प्रत्यक्ष व्यवहाराकडे दुर्लक्ष होत जाऊन अखेर इ.स. १९४४ चे सुमारास बँक लिक्विडेशन मध्ये काढावी लागली. त्यावेळी संस्थेची इमारत तसेच सुमारे ७५ लक्ष रुपयांच्या ठेवी बँकेकडे होत्या.

बँक लिक्विडेशन मध्ये निघाल्यानंतर बँकने खर्च वजा जाता ठेवीदारांना १४ आणे वापस दिले होते. शेअर होल्डर्सना मात्र त्यांच्या शेअर्सवर पूर्वी जो काय नफा दिला गेला तेवढाच. (या काळात प्रत्येक शेअर होल्डर्सना त्यांच्या शेअर इतकीच रक्कम नफ्याचे रुपात मिळाली होती असे सांगतात.)

बँक लिक्विडेशनमध्ये काढण्याचे सुमारास या बँकेचे विलीनीकरण दुसऱ्या बँकेत करण्याचे अयशस्वी प्रयत्नही झाले होते. त्याच प्रमाणे भागीदार आणि

ठेविदारांना वाचविण्यासाठी प्रयत्नही करण्यात आले होते.

पुढे बँकेची ही इमारत १९५५ च्या सुमारास विकण्यात आली. बँकेचे अधिकृत नांव "बँक ऑफ बेरार लि." असे होते, तरी लोक या बँकेला तांबेची बँक असे म्हणत असत.

स्थानिक लोकांनी एकत्र येऊन काढलेली अमरावतीतील ही पहीलीच बँक होय.

(श्री.आर.आर.पालेकर यांच्या मुलाखतीवर आधारित)

फर्म - धनराज - पोखरमल -

अमरावतीची धनराज पोखरमल फर्म इ.स. १८०० च्या आसपास अमरावतीत सुरु झाली. या फर्मचे मालक सेठ धनराज अग्रवाल परिवार मूळत: राजस्थानमधील रामगढ येथील असून त्यांना एकूण ७ बंधू होते. पैकी वडील बंधू महानंदराम हे हैद्राबादमध्ये निजामाचे खजिना विभागात पोतदाराच्या पदावर काम करीत होते व त्याबरोबरच त्यांनी फर्म महानंदराम पुरणमल या नावाची स्थापन करुन व्यवसाय ही सुरु केला होता. या फर्मकडे वऱ्हाडातील धान्य व रुईचा ठेका होता. त्यासाठी महानंदरामजींनी आपले बंधू धनराज यांस सन १८०० चे आसपास अमरावतीला पाठविले. त्यावेळी अमरावती नगर हे व्यापार व सावकारांचे बाबतीत फार समृध्द शहर होते. म्हणून धनराजजींनी अमरावतीत फर्म, धनराज पोखरमल या नावाने फर्म स्थापन करुन व्यवसाय सुरु केला. वडील बंधू महानंदरामजी हे हैद्राबादेत निजामांचे एक अधिकारी असल्याने त्यांचे पाठिंब्याने धनराज पोखरमल फर्मला बराच व्यवसाय मिळत असे. शिवाय सावकारी व्यवसाय हि ही फर्म करीत असे.

इ.स. १८०५ पावेतो धनराज सेठ हे अमरावतीतील व्यापार व सावकारीत फार उन्नतीला पोचले. त्यामुळे त्यांना आपोआप येथील व्यापारी व सावकाराचे पुढारीपण प्राप्त झाले व त्यांना "नगर सेठ" म्हणून गौरव प्राप्त झाला. धनराजजीला पुत्र संतान नव्हते. म्हणून त्यांनी आपले एक वडील बंधू वृंदावनलालजी

यांचा पुत्र पोखरमल यांस दत्तक घेतले. हा पोखरमल हैद्राबादला तेथील नबाबाच्या भावाकडे मुबारककडे खजीनदार पदावर काम करीत होता.

इ.स. १८०५ च्या नोव्हेंबर महिन्याचे १३ तारखेला अमरावती नगरीवर जेव्हा आपल्या पाच हजार पेंढ्याऱ्यांसह चित्तू पेढांऱ्याने हल्ला केला. तेव्हा तेथील व्यापारी व सावकारांचे प्रमुख सेठ धनराजजी यांनी पुढाकार घेऊन व अत्यंत नम्र आणि गोड गोड बोलून व पेढांऱ्यांना ४ लाख रुपये देवून परत पाठविले असे म्हटले जाते. त्यामुळे त्या काळी शहर नष्ट होण्यापासून तर वाचलेच; मनुष्य हानीही झाली नाही आणि स्त्रियांची विटंबना ही वाचली. अमरावतीची धनराज लेन ही याच सेठ धनराज यांचे नावावर आहे. व आजही ती याच नावाने ओळखल्या जाते.

सेठ धनराज यांनी १८३७ साली इंग्रज-अफगाण युध्दाचे वेळी सैन्यास धान्य पुरवठा करण्याचा ठेका घेतला होता. शिवाय या फर्मचा कपाशीचा मोठा व्यवसाय होता. मोठ्या व्यापार व सावकारीमुळे सेठ धनराज यांची प्रतिष्ठा शहरात तर होतीच शिवाय निजाम सरकार, इंग्रज आणि इंदूर दरबार मध्येही त्यांना प्रतिष्ठा लाभली होती. सन १८३५ चे सुमारास मोकलाल या नावाचा एक ठक इंग्रजांनी पकडला होता व त्याने दिलेल्या जबानीचा उपयोग करुन पुण्याच्या डेक्कन कॉलेजचे स्वर्गीय प्रोफेसर डॉ.सासवडकर यांनी ''भारतीय ठग'' या नावाचे पुस्तक लिहिले आहे. त्यात अमरावतीचे धनराज सेठजी निजाम, इंग्रज व इंदूर सरकारकडे कशी प्रतिष्ठा आहे. व त्यांच्या शब्दाला किती मान आहे हे दर्शविले आहे. शिवाय ह्या मोकलाल ठगाचे जबानीवरुन धनराज हे या ठंगाकडून मौल्यवान वस्तू विकत घेत असत असे दिसते. अर्थात त्याकाळी हा आम रिवाजच होता. ठगांकडून पेंढा - यांकडून त्यांनी लुटून आणलेल्या मुल्यवान वस्तू, सोने, अलंकार रत्ने किंवा भारी कापड वगैरे त्याकाळी व्यापारी, सावकार, सरकारी वरीष्ठ अधिकारी किंवा गाव पाटील वगैरे कमी किंमतीत विकत घेत असत. सेठ धनराज यांनी निजाम सरकारला अनेकदा कर्जही दिले होते.

सेठ धनराज यांचे वडील बंधू महानंदरामजींचे एक पुत्र पुरणमलजी

होते. या पुरणमलजीला वऱ्हाडच्या सभेदारीचा ठेका मिळावा म्हणून महानंदरामजींनी फार प्रयत्न केले होते. परंतु त्यांच्या ह्यातील त्यांना यश मिळाले नाही. पण पुढे इ.स. १९३७ मध्ये पुरणमलजींनी वऱ्हाडच्या सुभेदारीचा ठेका मिळविला होता. या पुरणमलजींना निजामाकडून वलगांव जहागीर होते. शिवाय अमरावतीत त्यांची बरीच स्थाई संपत्ती होती. अमरावतीचे इंद्र भुवन थिएटर ही जागा या पुरणमलजींचा गोखाना (म्हणजे गायवाडा) होता.

इ.स. १८४५ साली एका दुष्काळाचे काळात धनराज यांनी व्यापारासाठी पुष्कळ तांदूळ आणून भरुन ठेवला होता. हा तांदूळ त्यांनी लोकांना योग्य दराने विकावा म्हणून शहरातील लोक त्यांच्या हवेलीवर गेले, त्यावेळी जमावातील एकाने गोळी झाडून धनराजजींची हत्या केली असे गॅझेटियरने म्हटले आहे.

त्यानंतर अमरावतीच्या फर्मचा कारभार त्यांचा नातू पोखरमलचा मुलगा रामविकास यांचेकडे आला. १९११ च्या गॅझेटीयर मध्ये रामविलास याची फार प्रशंसा केलेली आहे. शिवाय त्यास रायसाहेब ही पदवी इंग्रज सरकारने दिली होती. रामविलासने या फर्मचा कारभार पुष्कळ वर्षे चांगला चालवून नाव कमावले होते. हल्ली या परिवारातील लोक अमरावतीतच राहातात.

श्री.धनराज पोखरमल यांचा व्यापारासोबत आणखी एक व्यापार होता तो म्हणजे लोकांकडून स्वस्त दरात माल घेणे.

दि. १३ नोव्हेंबर १८०५ रोजी अमरावती शहरावर चित्तू पेंढाऱ्याने आपल्या पाच हजार सहकाऱ्यांसह हल्ला केला, त्यावेळी येथील व्यापारी व सावकार यांच्या एका नेत्याने चतुराईने लक्षावधी रुपयांचा नजराणा देवून हे गाव लुटीपासून बचावले. हा नेता बहुतेक धनराज साहुकार हाच असावा असे अनुमान आहे. पुढे १८१३ साली धनराज सावकाराचा उल्लेख सावकारी सोबतच कपाशीचा धंदा करणारा अशा स्वरुपात येतो आणि तद्नंतर १८४५ साली हा सावकार धान्याचा व्यापारही करतो असे दिसते.

यावरुन अमरावतीचा धनराज पोखरमल गनेडीवाल हा साहुकार व्याजबट्टयाचे धंद्यासोबतच कापूस व धान्याचाही व्यापार करीत होता हे स्पष्ट होते.

परंतू खाली दिलेल्या दस्तऐवजात "ठगा जवळील माल स्वस्त दरात घेण्याचा धनराज सेठचा मोठा उद्योग होता" असे मोकलाल या ठगाने आपल्या जबानीत सांगितले आहे. तसेच "भारतातील कोणत्याही तुरुंगातून धनराज सेठ ठगांच्या टोळीला सोडवू शकत असे" असेही मोकलाल या ठगाने जबानीत म्हटले आहे. यावरुन धनराज साहुकाराच्या धंद्याच्या नव्या स्वरुपावर प्रकाश पडत आहे. तव्दवतच देशाच्या निरनिराळ्या प्रांतातील अधिकाऱ्यांवरही त्याचे वजन होते असे दिसून येते.

तो पुढे म्हणतो, "दुसऱ्या दिवशी सकाळी आम्ही निघालो व बऱ्हाणपुरा पासून १० कोसावर एदलाबादला मुक्काम केला. त्याच दिवशी आठ रोकुडिये (रोकड नेणारे खजिनावाले) व दोन सांडणीस्वार उंटावर टिपूशाही रुपयांच्या थैल्या लादून चाललेले आम्हाला दिसले. अमरावतीच्या धनराज सेठचे ते रुपये इंदूरास चालले होते. ठगांजवळील माल स्वस्त दरात घेण्याचा धनराज सेठचा मोठा उद्योग होता. भारतातील कोणत्याही तुरुंगातून धनराज सेठ ठगाच्या टोळीला सोडवू शकत असे. रोकडियापैकी ६ जण बंदुकधारी होते. बाजारातील एका दुकानात त्यांचा मुक्काम होता. आम्ही खुदाबक्ष व मल्ल जमादार यांची टेहळे म्हणून नेमणूक केली. त्यांनी जवळच्या एका दुकानात जावून मुक्काम केला दुसऱ्याच दिवशी रोकडियांचे सोबत आमचे टेहळे ही निघाले.

दुसरे दिवशी निघताना रोकडियांचे उंट आम्हाला दिसले. आम्ही तरीही पुढे गेलो व बांबूच्या जंगलात एका ओसाड खेड्याजवळील नाल्याजवळ आम्ही थांबलो. बांबूच्या काही लांब काठ्या.

आम्ही तोडून घेतल्या. ही जागा खुनास अगदी योग्य होती. जरा बसून हुक्का पिऊ लागतो न लागतो तोच रोकडियांचा एक स्वार व काही वेळाने रोकडिये येताना आम्हाला दिसले. ते येवून आमच्या जवळ बसले. बोलता बोलता सगळी कडून

आम्ही त्यांना वेढले व सहाही बंदुकधारी रोकुडियांना थोड्याच वेळात गळफास देवून आम्ही यमसदनास पाठविले. अखेर बांबूच्या सहाय्याने स्वारांना पाहून त्यांनाही गळाफास दिले. सर्व प्रेते नाल्यात टाकली व धुरीवाला स्वारास घोड्यावर बसवून, त्याला खजिन्याचे उंट घेवून इंदूरचा मुख्य रस्ता सोडून जंगलातील आडवाटेने पुढे जाण्यास सांगितले. खुनाच्या जागेपासून २ कोस आल्यावर सर्वजण थांबले व उंटाच्या पाठीवरील खजीना काढून आमच्या तट्ट्याच्या पाठीवर लादला. उंटांना जंगलात पिटाळून लावले व इंदूरचा रस्ता सोडून पूर्णपणे पूर्वेचा मार्ग धरला. ३ दिवसांनी आम्ही सादलापूरला आलो व एका तळ्याच्या काठी मुक्काम केला. तेथे आम्ही तलवारीने व जंबीयाने खुजे फोडले. खजिन्यात १९००० टिपूशाही रुपये (स्पॅनिश डॉलर्स) , १०० चांदीची नाणी व एक पितळी सील केलेली पेटी एवढे सामान होते. पेटी फोडल्यावर तिच्यात ४ रत्नजडीत अंगठ्या व ८ मोती व १ सोन्याचा गोठ जोड मिळाला. या सर्वाची किंमत १,००० टिपूशाही रुपये असावी त्यापैकी १ मूठभर रुपये विंध्याचलवासिनी देवीस ठेवण्याकरीता वेगळे काढले. पण देवीला जाण्याची संधी न मिळाल्यामुळे ते तसेच राहिले. प्रत्येकाला तरीसुध्दा १५० टिपूशाही रुपये मिळाले. मोती व हिरे किंमती नुसार विभागले. भोपाळला आम्हाला सोडून गेलेल्या ठगांचे हिस्से त्यांच्या मित्राजवळ दिले. हरिसिंगाने घोडा १० रुपयांना विकत घेतला. वाटणीनंतर रात्र आम्ही तेथेच घालविली.

धनराज सेठचा खजिना न पोचल्यामुळे त्याने आपला मुनीम बिहारीलाल याला इंदूरच्या रेसिडेंटाकडे तक्रार देऊन पाठविले. तेव्हा ठग पुढारी पकडले जाऊन त्यांना रेसिडेंटापुढे उभे करण्यात आले. या प्रकरणात ठगांच्या सहाय्यकर्त्यांचा, धनराज सेठचाच खजिना लुटल्या गेला. तेव्हा आपल्या सरकारदरबारी असलेल्या वजनाचा उपयोग करुन धनराज सेठने त्यांना नुकसान भरपाई करुन देण्यास भाग पाडले. संस्थानिकहि ठगांना आश्रय देत. पण इंग्रज सरकारने त्यांना फैलावर घेतल्यामुळे ठगांजवळ त्यांनी पैशाची मागणी केली. प्रसंगाचे गांभीय ओळखून ठगांनीही यथाशक्ति आपला वाटा उचलला''.

१९ व्या शतकाच्या सुरुवातीला काही विशिष्ट व्यापारी मार्गावरुन पैशाची ने आण करणे अपरिहार्य असे. अफूची वाढ व निर्यात यामुळे मध्यभारतात, सुरत व मुंबईहून पैसे व हिरे या रुपाने पैसे दिले जात. सूरतेहून दिले जाणारे पैसे काही वेळा स्पॅनिश डॉलर्स मध्ये असत. तेव्हा रस्ते सुरक्षित नव्हते. त्यामुळे मोठा खजिनाबरोबर घेऊन जाणाऱ्यावर केवढा दुर्धर प्रसंग येई, ह्याचे उदाहरण म्हणून ३१ जानेवारी १८२९ इ. रोजी इंदूरच्या रस्त्यावर घडलेले वरील "बर्वाहा घाट " प्रकरण निदेशिता येईल. या प्रकरणात अंग असलेल्या मोकलाल या ठगाने १८३५ साली (त्याला पकडल्यानंतर) सागर येथे दिलेल्या जबानीचा संबंधित अंश वर दिला आहे. तो वाचल्यावर आपणास तत्कालीन दळणवळणाची स्थिती, असुरक्षित प्रवास, ठगांचा क्रूर व्यवसाय याचे एक नवे स्वरुपही अनाहूतपणे कळून येते.

ह्या जबानीतील उल्लेखामुळे अमरावतीच्या धनराज साहुकाराच्या धंद्याच्या स्वरुपावर नवा प्रकाश पडतो. ज्या कागद पत्राचे आधारे वरील मजकूर दिला ते अस्सल कागद हल्ली पुण्याच्या डेक्कन कॉलेजच्या ऐतिहासिक संग्रहालयात आहेत.

(भारतीय ठग : डॉ.प्र.ल. सारवडकर : १९७१ : पृ. ७४-७७)

सहकारी सुत गिरणी

अमरावती येथील सहकारी सूत गिरणी विक्रीस काढण्याची किंवा भाडे पट्टयाने देण्याची एक नोटीस गिरणीच्या व्यावसायिकांनी काढली आहे. ६० एकर जमीन, गिरणीची ६ गोदामे, तेथील कर्मचारी गाळे, २३ हजारावर चात्या व इतर सर्व सामुग्रीची विक्री करण्यात येण्याची घोषणा करण्यात आली आहे.

पण या गिरणीची असली विक्री किंवा भाडेपट्टीचा व्यवहार हाच अमरावती व्यावसाययिकांसाठी एक नामुष्कीची गोष्ट आहे. सहकारी महर्षि स्व. भाऊसाहेब भोकरे यांनी अक्षरश: हाडाची काडे करुन घाम गाळून अमरावती शहरात सहकाराचा पाया घातला. तो मजबूतपणे स्थिर व्हावा, त्यावर सहकाराच्या संस्था उभाराव्या म्हणून जीवनभर प्रयत्न केले. अनेक संस्था स्थापनहि केल्या पण भाऊसाहेब

भोकरे यांच्या वार्धक्याच्या व असहायतेच्या काळातच या सहकारी रोपट्यांना वाळवी लागली. व त्या स्वबळावर उभारच धरु शकल्या नाहीत. एवढेच नव्हे तर प्रत्येक संस्थेला रिकेटस्ची बाधा झाली. त्यासाठी कोणा एकाला दोष देता येणार नाही. सहकाराचा हातात हात घालण्याचा खरा मंत्र आत्मसात करण्याऐवजी त्यात स्वाहाकारी प्रवृत्ती शिरल्या. भाऊसाहेब भोकरे यांचे जे काही बोटावर मोजता येण्यासारखे निष्ठावंत होते त्यांना पध्दतशीरपणे बाजूला सारण्यात आले. किंवा निष्प्रभ करण्यात आले. त्याचा परिणाम असा झाला की, एकही सहकारी संस्था नावारुपाला येवून शकली नाही.

अमरावती सहकारी सूत गिरणीची प्रारंभापासूनची वाटचाल अशीच फरफटत नेण्याची होती. कधी कामगार संस्थेचे किती शोषण करावयाचे याची वाटच पहात असायचे. त्यामुळे या संस्थेला कापूस देणाऱ्या शेतकऱ्यांना कापसाचा चुकाराहि देणे अशक्य होत गेले. वापरलेल्या वीजेची बिले थकित झाली. कर्मचाऱ्यांचे वेतन थकले पण हा रोग दुरुस्त करण्याचा प्रयत्न कोणी केला नाही. संस्था प्रशासकाच्या ताब्यात वांरवार पडत होती.

काही वर्षापूर्वी इचलकरंजीच्या सहकारी उद्योगाने या गिरणीच्या पुररुत्थानाची जबाबदारी स्वीकारली. आणि या गिरणीला सुस्थितीत आणण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली पण त्यांच्या या प्रयत्नात विघ्न संतोषी प्रवृत्तीचा अडसर सतत येतच राहिला. इचलकरंजीकरांनी आणलेल्या नव्या उपक्रमांना साथ देण्याऐवजी त्यात मोडतोडीच्या तंत्राचा वापर करण्यात आला. इचलकरंजी व्यवस्थापनाला सळो की पळो करुन सोडण्यात आले. तरीहि त्यांनी ही सुत गिरणी नफ्यात आणून चालवून दाखवलीच पण पुढे दहशतवादाचा अतिरेक झाला. शेवटी त्यांनी हात टेकले आणि आपला करार संपताच अमरावतीची दु:खद अंत:करणाने रजा घेतली. सर्व संबंधितांनी आपल्या पायावर स्वत:हून धोंडा पाडून घेतला. आता ही सूत गिरणी चालवावयाची कोणी हा प्रश्न समोर आला आहे. सरकार ही गिरणी चालविण्यास पूर्णतया असमर्थ आहे . हे स्पष्ट आहे. म्हणूनच सहकार खात्याने या सूत गिरणीच्या विक्रीची किंवा भाडे

पट्ट्याने देण्याची सूचना जारी केली आहे.

आता त्याबाबत कोण कसा समोर येतो ते दिसेलच. भांडवल दारांच्या समृध्द संघटनेला एकत्र येवून ही संपत्ती घशात घालता येणार नाही असे नाही.

पण कामगारांना स्वत:च्या रोजी रोटीचा प्रश्न खरोखरच भेडसावीत असेल, कामगार संघटनांना व या संघटनांच्या नेत्यांना आपल्या सदस्यांबद्दल प्रामाणिक कळवळा असेल तर त्यांनी स्वत:ची सहकारी संस्था स्थापून ही गिरणी चालविण्याचा प्रयत्न करावा. त्यामुळे कामगारांना व कामगार पुढाऱ्यांना व्यवस्थापनाच्या सुख दु:खाचा परिचय होवू शकेल. व्यवस्थापकाच्या गालफाडात मारल्याने त्याला किती वेदना होत असतील, अकारण शिव्या शापाच्यामुळे त्याला व त्याच्या कुटुबिंयाना कसे वाटत असेल हें तर त्याला समजेलच. शिवाय प्रामाणिक श्रम म्हणजे काय याची जाणीवहि होईल. कामगारांच्या एकात्मिक प्रयत्नातून ही गिरणी बाळसे धरु शकलीच तर तो केवळ अमरावतीकरांपुरताच नव्हे तर देशापुढील एक आदर्श ठरेल. कामगारांच्या स्वाभिमानात भर पडेल. पण योजकस्त्र दुर्लभ: असे म्हणतात. असा दुर्लभ योजक अमरावतीकरांना मिळावा, या गिरणीतील चात्या गरगरा फिराव्या अशी अपेक्षा धरणे चुकीचे होईल असे वाटत नाही.

समृध्द सूत गिरणी ही. स्व. भाऊसाहेब भोकरे यांच्या आत्म्याला दिलासा देणारी ठरेल.

आर्थिक जगताचा नफातोटा : मूल्यमापन

१९६९ साली १४ बँकांचे राष्ट्रीयकरण पंतप्रधार इंदिरा गांधी ह्यांनी केले. व तद्नंतर काही वर्षातच आणखी सहा बँकांचे राष्ट्रीयकरण केले. अशा रितीने २० राष्ट्रीयकृत बँका देशात शेतीला, उद्योधंद्यांना, व्यापारसंबधनाला आर्थिक साह्या करीत आहेत. बँकाचे राष्ट्रीयकरण होऊन (जुलै १९६९) आता २७ वर्षे पूर्ण झालेली आहेत. ह्या राष्ट्रीयकृत बँका पुढील प्रमाणे आहे.

१. कॅनारा बँक. २) पंजाब नॅशनल बँक ३) बँक ऑफ बडोदा. ४) ओरिएंट बँक ऑफ कॉमर्स. ५) युनियन बँक ऑफ इंडिया. ६) कॉपरेशन बँक. ७) बँक ऑफ इंडिया. ८) विजया बँक ९) देना बँक १०) बँक ऑफ महाराष्ट्र. ११) आंध्र बँक. १२)अलाहाबाद बँक १३) युको बँक १४) सेंट्रल बँक ऑफ इंडिया १५) सिंडिकेट बँक १६) युनायटेड बँक ऑफ इंडिया. १७) पंजाब ॲंड सिंध बँक १८) इंडियन बँक १९) इंडियन ओव्हरसीज बँक. २०) न्यु बँक ऑफ इंडिया.

ह्या २० बँकापैकी शेवटची न्यू बँक ऑफ इंडिया ९३-९४ सालात पंजाब नॅशनल बँकेत विलीन झाली (सातत्य युक्त तोट्यामुळे) त्यामुळे आता राष्ट्रीयकृत बँकांची संख्या १९ इतकीच आहे. वरील पैकी क्र. ४, ६, १७, २० ह्या बँकांच्या शाखा अमरावतीत सुरु नाहीत.

अमरावती डिस्ट्रीक सेंट्रल को-ऑप. बँक,लि., अमरावती, खामगाव अर्बन को-ऑप बँक, लि., अकोला, को-ऑप. बँक लि., दि.पिपल्स को-ऑपरेटिव्ह बँक, लि., अमरावती., दि.पंजाबराव देशमुख को-ऑप. बँक लि., अमरावती, हिंदफीन, ह्या पतपेढी स्वरुपाच्या बँका जम बसवून आहेत. शिक्षण संस्था विद्युत मंडळ, बांधकाम विभाग, शिक्षण मंडळ, यासारख्या संस्थांच्या कर्मचाऱ्यांनी आपापल्या संस्थेपुरत्या सहकारी पेढ्या चालविल्या आहेत. त्यापैकी नूतन विदर्भ शिक्षण मंडळ पगारदार कर्मचाऱ्यांची सहकारी संस्थेने स्वत:ची अतिशय भव्य व देखणी इमारत उभी करुन एक आदर्श निर्माण केला आहे.

परिशिष्ट - १७

आर्थिक जगत

स्वतंत्र्य भारताच्या आर्थिक इतिहासातील महत्वाच्या घटना यांचा प्रभाव अमरावतीच्या जीवनावरही पडला. चंद्रशेखर टिळक माजी सेवी विभाग प्रमुख, डोंबिवली, मुंबई यांच्या सौजन्याने.

सन	घटना
एप्रिल ४८	इंडस्ट्रीअल रिझोल्युशन १
१९४९	रिझर्व्ह बँकेची निर्मीती (१ जाने.४९) पौंडस्टर्लीगच्या तुलनेत रुपयाचे अवमुल्यन
१ मार्च ५०	नियोजन मंडळाची स्थापना
१९५१	पहिल्या पंचवार्षिक योजनेला सुरुवात औद्योगिक विकास नियंत्रण कायदा लागू. त्यामुळे लायसन्स मिळविणे सक्तीचे बनले.
१९५३	काँग्रेसचे आवडी अधिवेशन त्यात समाजवादी व्यवस्थेची संरचना स्वीकारणयाचा निर्णय.
१९५४	नॅशनल इनकम कमिटीचा अहवाल सादर महाल नोबेल धनंजय राव गाडगीळ. प्रा.व्ही.के. आर. व्ही रावव सभासद असणाऱ्या या समितीचे प्रथमच संपूर्ण देशाच्या उत्पन्नाचा विचार अधिकतपणे मानला.
१९५५	स्टेट बँकेची निर्मिती १ जुलै ५५ आय सी आय सी आय स्थापन गॅटला भारताची मान्यता.
१९५६	इंडस्ट्रीअल पॉलीसी रिझोल्युशन २ विमा क्षेत्राचे राष्ट्रीयीकरण करत आयुर्विमा महामंडळाची निर्मिती. अवजड व पायाभूत उद्योगांवर भर देणाऱ्या दुसऱ्या पंयवार्षिक

	योजनेला सुरुवात.
१९५७	कालडोर कमिशन करविषयक सुधारणा सुचवितांना खर्चावरील कराची (एक्सपेंडीचर टॅक्स. शिफारस. मुंधडा प्रकरण उघडकीस
१९६१	अवजड उद्योगांकडे दर्लक्ष न करता कृषी क्षेत्रावर भर देणाऱ्या आणि विकासातून स्वयंपूर्ण अर्थव्यवस्था हे उद्दिष्ट असणाऱ्या तिसऱ्या पंचवार्षिक योजनेला सुरुवात नंतरच्या काळातील युध्दामुळे योजनेचा रोखा विकासाऐवजी संरक्षणाकडे वळवावा लागेल.
१९६२	चीनशी युध्द त्यामुळे राष्ट्रीय उत्पन्नात ३१ टक्के घट
१९६४	युनिट ट्रस्टची स्थापना (१ जुलै ६४) आय डी बी आय ची स्थापना (३ जुलै ६४)
१९६५	पाकिस्तानचे युध्द
१९६६	रुपयाचे अवमूल्यन, पाकिस्तानशी युध्द उखरुन काढले असा अमेरीकेचा चुकीचा आरोप. जागतिक वित्तसंस्थावर दबाव. त्यामुळे पंचवार्षिक योजनेचा वित्तपुरवठा बंद. पुढे रशिया आणि इतर मित्र राष्ट्रांच्या मदतीने आर्थिक योजना सुरु ठेवण्यात यश.
१९६६-१९६७	दुष्काळ
१९६६-१९६९	पंचवार्षिक योजनेला विश्रांती देत तीन

	वार्षिक योजना
१९६७	हरितक्रांती योजना
१९६९	चौथ्या पंचवार्षिक योजनेला सुरवात, संस्थानिकांचे तनखे रद्द, जुलै ६९ मध्ये ५० कोटी रुपये किंवा त्यापेक्षा जास्त ठेवी असणाऱ्या १४ बँकांचे राष्ट्रीयीकरण.
१९७०	मक्तेदोरी नियंत्रण कायदा (एम आर टी पी)
१९७१	बांगला देशयुध्द. वित्त सहाय्य थांबविण्याची अमेरिकेची धमकी. गरिबी हटाव ही घोषणा. २१४ कोळसा खाणीचा कारभार सरकारने ताब्यात घेतला.
१९७३	खुल्या आर्थिक धोरणाची नांदी. औद्योगिक विकास कायद्यात सुधारणा. परिशिष्ट १ मध्ये समावेश असलेल्या उद्योगांसाठी सरकारी परवानगीची गरज नाही. त्यात विदेशी गुंतवणूकीला मुभा. विदेशी चलन नियंत्रण कायदा (फेटा)
१९७४	पाचवी पंचवार्षिक योजना सुरु, पोलाद उद्योगाचा विकास आणि कोकींग कोल व आयर्न ओरच्या निर्मितीसाठी ''सेल'' ची स्थापना.
१९७५	आणिबाणी सुरुवातीच्या काळात औद्योगिक उत्पादनात वाढ वीस कलमी कार्यक्रम, क्षेत्रीय ग्रामीण बँकाची (रिजनल रुरल बॅक्स) स्थापना

१९७७	७६-७७ व ७७-७८ या दोन वर्षी बॅलन्स ऑफ पेमेन्टस सकारात्मक, आय बी एम, कोका कोलची हकालपट्टी, बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या भागभांडवलात सामान्य भारतीय गुंतवणूक दाराला सहभागी करुन घेण्याची सक्ती. जनता राजवटीत दीर्घकालीन नियोजनाला सुट्टी देत रोलींग प्लॅनची संकल्पना. रोजगार निर्मितीवर भर.
१९७८	जनता सरकारने पाचव्या पंचवार्षिक योजनांची कार्यवाही थांबविली.
१९८०	सहा बॅकांचे राष्ट्रीयीकरण सहाव्या पंचवार्षिक योजनेला सुरुवात इंदिराजींचे पंतप्रधानपदी पुनरागमन झाल्यानंतर अमेरिकेशी संबंध सुधारण्यावर भर. संरक्षण, शिक्षण, कृषी, अवकाश तंत्रज्ञान, संगणकीय सेवा यावर विशेष लक्ष. सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांची कामे सुधारण्याचा हेतू ठेवणारे औद्योगिक धोरण
१९८२	नाबार्ड. एक्झिम बँक स्थापन, इलेक्ट्रानिक पॉलिसी घोषित
१९८४	अबिद हुसैन कमिटीची स्थापना. सी डॉट व डॅकची निर्मिती
१९८५	विश्वनाथ प्रतापसिंग हयांचा महत्वपूर्ण अर्थसंकल्प, कापड गिरण्या यंत्रमाग, हातमाग क्षेत्रातील फरक जवळजवळ

	नाहीसे करणारे वस्त्रोद्योग धोरण घोषित. एप्रिल ८५ मध्ये अन्नधान्याचे उत्पादन. रोजगार निर्मिती आणि उत्पादकता यात वाढ हि महत्वाची उद्दिष्टये असणाऱ्या सातव्या पंचवार्षिक योजनेला सुरुवात.
३० जाने. १९८६	मागासभागातील कारखान्यांना (२३ उद्योगांपैकी) फेरा व मक्तेदारी नियंत्रण कायद्यातून सुट.
१९८८	सेबी स्थापन. नॅशनल हायवे कमिशन स्थापन. देशाच्या गुंतवणूक क्षेत्रातील पहिली पतमापन संस्था क्रिसील सुरु.
१९९१	जून ९१ मध्ये नरसिंहराव सरकार सत्तारुढ झाल्यानंतर खुल्या अर्थनीतीचा स्विकार अर्थकारणाच्या विविध क्षेत्रांबाबत पुर्नविचार करण्यासाठी नरसिंहंम, चेल्लया, मलहोत्रा समित्या नियुक्त. ऑगस्ट ९१ मध्ये देशी, विदेशी उद्योगांना २४ टक्क्यापर्यंत भांडवली गुंतवणूकीस मुभा देणारे लघुउद्योग धोरण जाहीर.
१९९२	रुपयांचे अवमुल्यन, सेबी कायदा संमत, हर्षद मेहता प्रकरण उघडकीस, सार्वजनिक क्षेत्रातील स्वेच्छा निवृत्ती स्वीकारण्याच्या कर्मचाऱ्यांसाठी नॅशनल रिन्युअल ची घोषणा, प्राथमिक आरोग्य, साक्षरता, रोजगार निर्मिती, लोकसंख्या नियंत्रण. कृषी

	उत्पादनात वाढ आणि पायाभूत सेवा यावर भर देणाऱ्या आठव्या पंचवार्षिक योजनेला सुरुवात.
१९९३	विदेशी चलनाचे रुपयात परिवर्तनाबाबत दुहेरी दर
१९९४	१५ एप्रिल ९४ रोजी इतर ११७ देशासमवेत भारताची डंकेल ड्राफ्टवर स्वाक्षरी. चालू खात्यावर रुपया अंशत: परिवर्तनीय आंतरराष्ट्रीय नाणेनिधिच्या कर्जाचा हप्ता वेळे आधीच परत. पुढील मदतीचा हप्ता नाकारला. भाववाढीला आळा घालण्याच्या प्रयत्नात औद्योगिक वित्त पुरवठयावर विपरीत परिणाम. रोकड सुलभतेची अडचण (लिक्वीडीटी क्रंच)
१९९५	सेबीला जास्त अधिकार देणारा अध्यादेश रिलायन्स शेअर्स स्वीच, एम एस शुज ही प्रकरणे उघडकीस. त्यामुळे भांडववल बाजार गडगडला.
१९९७	सार्वजनिक क्षेत्रातील कंपन्यांच्या समभागाची विक्री करण्याचे धोरण ठरविण्यासाठी नेमलेल्या मंडळाचे अहवाल सादर. विमा क्षेत्राच्या खाजगीकरणाबाबतचे विधेयक सरकारने मागे घेतले. सी आर बी घोटाळा. वित्तीय तूट आवाक्यात ठेवण्यासाठी रिझर्व्ह बँकेने

केंद्रसरकारला करावयाच्या आर्थिक सहाय्यावर मर्यादा घालण्याऱ्या करारावर स्वाक्षऱ्या.

परिशिष्ट १८

अमरावती शहरातील पेन्शन धारक सैनिकांची यादी.

अ.क्र.	स्वातंत्र्य सैनिकाचे गांव व पत्ता	
१.	श्री.सुदर्शनचंद्र गुलाबचंद्र सिंघई ॲडव्होकेट.	रा.सर्किट हाऊस रोड, अमरावती.
२.	श्री.रामकृष्ण वासुदेव लाऊडकर	रा. सोमनवाडा, बडनेरा रोड, अमरावती.
३.	श्री.महादेव गणपतराव गुल्हाने	रा.गणेश कॉलनी, अमरावती.
४.	श्री.नारायण सुर्यभानजी राठोड	रा.अंबादेवी,मंदिराजवळ, अमरावती.
५.	श्री.शंकर किसन पांढरे,	रा.पटवीपुरा, अमरावती.
६.	श्री.मारुती सदुजी मारावत	रा. नवाथे बगीच्या, बडनेरा रोड,अमरावती.
७.	श्री. मोतीराम जयरामजी वडोने	रा.विजय कॉलनी, अमरावती.
८.	श्री.रंगराव बळीराम जाधव,	रा.प्रेरणा कॉलनी, अमरावती (राधाकृष्ण

		मंदिराजवळ,गाडगेनगर)
९.	श्री.एकनाथ माधवसा हिरुळकर	रा.व्दारा- श्री.डि.के.जावरकर, प्लॉट,राधानगर, अमरावती.
१०.	श्री.उत्तमराव पांडुरंगजी मोहिते	रा.गाडगेनगर, अमरावती.
११.	श्री.नामदेव दत्तात्रय मोहोड	रा.मुधोळकर पेठ, अमरावती.
१२.	श्री.अमृतराव शंकरराव खंगाळे	रा.राठी होस्टेल, खंगाळे प्लॉट,गाडगेनगर,अमरावती.
१३.	श्री.भाऊराव झिंगुजी मोरे	रा.भाजीबाजार, अमरावती.
१४.	श्री.विश्वनाथ नामदेवराव घोंगडे	रा.भैय्या इंडस्ट्रिज, देशपांडे प्लॉट, अमरावती.
१५.	श्री.हरीराम नानकराम फुसिया(अग्रवाल)	रा.मोफतलाल प्लॉट,सुंदर भवन,कॉटन मार्केट रोड,अमरावती.
१६.	श्री.महादेव विठोबा शेंडे	रा.परांजपे कॉलनी, अमरावती.
१७.	श्री.पंजाबराव बळवंतराव देशमुख	रा.राठीनगर, अमरावती.
१८.	श्री.मोतीराम मल्लुजी लांजेवार	रा.राजापेठ, अमरावती.
१९.	श्री.वल्लभ मुलचंद जोशी	रा.विलासनगर, अमरावती.
२०.	श्री.तुकाराम उदेभानजी कडू,	रा.शोभागनर,अमरावती. (व्हि.एम.व्ही.कॉलेजमागे)
२१.	श्री.माणिकराव पोटे	रा.

२४.	श्री.सुर्यभान बळीरामजी अढाऊ	रा.मोतीनगर, शिरभाते आरामशीनजवळ, अमरावती.
२५.	श्री.गंगाधर नारायण हाडे	रा.यशोदानगर, सिटीबस स्टॅपजवळ, अमरावती.
२६.	श्री.सदाशिव रघुनाथ भोजणे	रा.नवाथे प्लॉट, बडनेरा रोड.अमरावती.
२७.	श्री.बी.व्ही.मराठे	रा.खापर्डे बगीच्या हिंदुस्थान प्रेस, अमरावती.
२८.	श्री.जे.एस.अकर्ते	रा.शास्त्रीनिवास, टाऊन प्लॅनिंग, ऑफिसच्या मागे, अमरावती.
२९.	श्री.पी.के.देशमुख	रा.व्दारा स्टेट बँक ऑफ इंडिया, मेन ब्रँच अमरावती.
३०.	श्री.विठ्ठलराव वीरप्रकाश बनारसे	रा.अंबादेवी मंदिराजवळ, अमरावती.
३१.	श्री.रुपराव शामराव फाटे	रा.व्दारा डि.आर.फाटे, अंबागेटजवळ, पटवीपुरा, अमरावती.
३२.	श्री.दिनानाथ बळवंतराव तिडके	रा.प्रतिभा निवास,विवेकनंद कॉलनी, अमरावती.
३३.	श्री.जगदेवसिंगजी बेनिसिंग ठाकूर	रा.डफरीन दवाखान्याजवळ, अशोकनगर,अमरावती.
३४.	श्री.गुलाबराव परसरामजी काकडे	रा.व्दारा-उध्दवराव म्हाले,

		किरणनगर,अमरावती.
३५.	श्री.विष्णू महादेवराव विभुते	रा.युसुफ ताकिया, अंबागेट, अमरावती.
३६.	श्री.अण्णा विठ्ठलराव काळे,संपादक-दै.सुप्रभात.	रा.दहिसाथ,अमरावती.
३७.	श्री.पद्माकर रामजीपंत खटाळे,	रा.नमुना,अमरावती.
३८.	श्री.वामन हरिता राजकुंवर,	रा.शोभानगर,व्ही.एम.व्ही.च्या बाजूला,अमरावती.
३९.	श्री.त्रिंबक हरिसा गुंबळे	रा.तारखेडा,अमरावती.
४०.	श्री.गोविंद विठोबा वामनवार	रा.बानउेवाडी, गोरक्षण रोड, अमरावती.
४१.	श्री.गोपाळ शामरावजी ठाकरे	रा.विलासनगर,अमरावती.
४२.	श्री.मोतीराम मामाजी होले	रा.कॉग्रेसनगर,अमरावती.
४३.	श्री.दादाराव सोनाजी स्वर्गी	रा.रमाबाई आंबेडकर नगर, अमरावती.
४६.	श्री.अयोध्याप्रसाद भुरेलाल गंगेत	रा.रामप्यारी मंदीर, जवाहरगेट, अमरावती.
४७.	श्री.कृष्णराव प्रयागराव कारोळे	रा.अंबिकानगर, अमरावती.
४८.	श्री.सिताराम उर्फ शरदचंद्र जगन्नाथ मालपाणी	रा.सराफाबाजार, अमरावती.
४९.	श्री.मनोहर गोपाळ डोरले	रा.शामनगर, अमरावती.
५०.	श्री.रंगनाथ माधव गिरगांवकर	रा.माधवनगर,अमरावती.

५१.	श्री.आनंदराव यादवराव सालवे	रा.श्रीकृष्णपेठ, अमरावती.
५२.	श्री.अंबादास बाजीराव हिरुळकर	रा.नरहरी नगर,राजापेठ, अमरावती.
५३.	श्री.पांडुरंग गोविंद पांडे	रा.हमालपुरा, अमरावती.
५४.	श्री.आशा शिवराम कोल्टी	रा.गणेश कॉलनी, अमरावती.
५५.	श्री.केशव आत्माराम इगुलकर	रा.राधानगर, प्रायमरी शाळेजवळ, अमरावती.
५६.	श्री.गणपतराव सुर्यभान गावंडे	रा.विजय कॉलनी, रुख्मिनीनगर, अमरावती.
५७.	श्री.केशव संपत ढोले	रा.मालटेकडी रोड, पेन बोर्डींग, अमरावती.
५८.	श्री.मदनलाल शंकरलाल तिवारी	रा.विलासनगर,अमरावती.
५९.	श्री.सी.एस.नागपुरे	रा.गांधीनगर, अमरावती.
६०.	श्री.श्रीधर शामराव साऊरकर	रा.खोलापुरी गेट, अमरावती.
६१.	श्री.रामलाल बन्सीलाल श्रीवास्तव	रा.श्रीकृष्णपेठ, अमरावती.
६२.	श्री.शिवाप्पा मलिंगाप्पा हिंगमिरे	रा.साबनपुरा, अमरावती.
६३.	श्री.बाळकृष्ण मुलचंद भंडारी	रा.जवाहरगेट, अमरावती.
६४.	श्री.लक्ष्मण आत्मारामजी अंबाडकर	रा.खापर्डे बगीच्या, अमरावती.
६५.	श्री.लक्ष्मण गोविंद खोरटकर	रा.छांगाणीनगर, अमरावती
६६.	श्री.ओंकारदेनजी महाजन	रा.साईनगर, अमरावती.
६७.	श्री.नारायण गोविंदराव किरणापुरे	रा.मुदलियारनगर, अमरावती.
६८.	श्री.गोपाळ केशवराव काळे	रा.कस्तुरबा कन्या शाळेजवळ,

		बेलपुरा, अमरावती.
६९.	श्री.वामनराव गणपतराव आन्टुनकर	रा.भाजीबाजार, अमरावती.
७०.	श्री.रघुनाथ गोविंद नारायण खंडेलवाल	रा.जुने कॉटन मार्केटचे मागे, अमरावती.
७१.	श्री.भानुदास शंकरआप्पा दलाल	रा.पंचायत समिती, अमरावती.
७२.	श्री.तुकाराम परशुराम बनारसे	रा.नमुना गल्ली, नं. ४, अमरावती.
७३.	श्री.व्यंकट शिवप्रसाद दुबे	रा. सोमलवाडा, बडनेरा रोड, अमरावती.
७७.	श्री.शंकरआप्पा नारायणआप्पा गंडेश्वर	रा.वडाळी, अमरावती.
७८.	श्री.माणिकराव रामभाऊ खारकर	रा.भाजीबाजार, अमरावती.
७९.	श्री.मनोहर प्रेमसुखदास राठी	रा.मुधोळकर पेठ, अमरावती.
८०.	श्री.दत्तात्रय विनायक तिवाटणे	रा.जनार्दनपेठ, अमरावती.
८१.	श्री.शंकर बाळकृष्ण बोधनकर	रा.राजकमल चौक, अमरावती.
८२.	श्री.मदनलाल रामदेव चव्हाण	रा.मच्छीसाथ, अमरावती.
८३.	श्री.गोविंदराव बाळकृष्ण आसरे	रा.व्दारा-सामान्य प्रशासन विभाग, जिल्हापरिषद, अमरावती.
८४.	श्री.अजाबराव सिताराम तायवाडे	रा.खोलापुरी गेट, अमरावती.
८५.	श्री.नंदलाल मनसुखदास राठी	रा.बालाजी प्लॉट अमरावती.
८६.	श्री.शंकर वासुदेव भेंडकर	रा.भाजीबाजार, अमरावती.
८७.	श्री.रामकृष्ण रामजी बेरडे	रा.गणेश कॉलनी, अमरावती.
८८.	श्री.विठ्ठलराव तुकडोजी ठाकरे	रा.रुख्मिणीनगर, अमरावती.

८९.	श्री.पांडुरंग तुकारामजी बेलसरे	रा.काझी कंपौड, अमरावती.
९०.	श्री.महादेव हनुमंत भुजाडे	रा.सारखेडा,अमरावती.
९१.	श्री.रामदयाल पतंगीलाल गुप्ता	रा.नमुना, अमरावती.
९२.	श्री.डॉ.ओंकर राजाराम वाठोडकर	रा.अंबागेट, अमरावती.
९३.	श्री.गणेश उर्फ गणपत धोंडता लोहकर	रा.अमरावती.
९४.	श्री.शंकर मंगुसा बिजवे	रा.संताजीनगर, अमरावती.
९५.	श्री.पंजाब माणिकराव देशमुख	रा.राजेंद्र कॉलनी, अमरावती.
९६.	श्री.बाबुलाल काशीप्रसाद अहेरवार	रा.मसानगंज, अमरावती.
९७.	श्री.महादेवराव बळीराम तेली	रा.बुधवारा, अमरावती.
९८.	श्री.रामराव पुनाजी हंबर्डे	रा.गांधीनगर, बगीच्या हमालपुरा अमरावती.
९९.	श्री.शिवकुमार मोतीसा सहारकर	रा.दहिसाथ, अमरावती.
१००.	श्री.किसनसिंह उमरावसिंह बनवार	रा.साबनपुरा, अमरावती.
१०१.	श्री.मधुकर यशवंतराव राऊत	रा.गाडगेनगर, अमरावती.
१०२.	श्री.सुरेशचंद्र देविदास बोबडे	रा. बुधवारा, निळकंठ चौक, अमरावती.
१०३.	श्री.शंकरदास लालचंद आर्य	रा.कंवरनगर, अमरावती.
१०४.	श्री. कृष्णराव दाणी	रा.सुशिलनगर, अमरावती.
१०५.	श्री.अब्दुल हमीद वल्द करिम कुरेशी	रा.रतनगंज, अमरावती.
१०६.	श्री.माणिकराव झिंगूजी मोरे	

परिशिष्ट १९

(माहिती व प्रकाशन अधिकारी , अमरावती यांच्या सौजन्याने साभार)

दृष्टिक्षेत्रात अमरावती

१) क्षेत्रफळ

१२२१२ चौ.कि.मी.

२) भौगोलिक स्थान -

उत्तर अक्षांश २०३२ ते २१-४६

पुर्व रेखांश ७८-३७ ते ७८-२७

३) भौगोलिक क्षेत्र :-

एकुण १३६३ हजार हेक्टर

अ) जगंल व्याप ३७४५.१७ चौ.कि.मी.

ब) पिकाखाली क्षेत्र ७३५६९२ हे.

क) लागवडी नसलेली ३ %

ड) पडीत जमीन ४ %

ई) पेर जमीन ६.५९ %

४) पर्जन्यमान :-

९५०.७८ मि.मि.

५) लोकसंख्या :-

एकुण १८,६९,४९०

अ) शहरी ३० %

ब) ग्रामीण ७० %

क) साक्षर ५२ %

ड) स्त्रिया ९,६१,५६४

इ) पुरुष ८,९९,६४६

६) तालुके (१३)

अमरावती, नांदगाव (खं), भातकुली, अचलपुर, दर्यापुर, अंजनगांव, चिखलदरा, धारणी,

मोर्शी, वरुड, तिवसा, चांदूरबाजार, चांदूर रेल्वे.

७) एकुण गावे :- वस्ती असलेले (१६९८)

ओसाड - ३०१

महानगर पालीका - १

नगर पालीका - १०

ग्रामपंचायती - ८०३

८) महसुली विभाग :-

अ) अमरावती-अमरावती, नांदगांव, भातकुली.

ब) चांदुर रेल्वे - चांदुर रेल्वे, तिवसा.

क) धारणी - धारणी, चिखलदरा.

ड) दर्यापुर - दर्यापुर, अंजगांव.

इ) मोर्शी - वरुड, मोर्शी

ई) अचलपुर - अचलपूर, चांदूर बाजार.

९) पोलीस दल :-

पोलीस ठाणे - ३२

आऊट पोस्ट - १५

पोलीस चौकी - ४

१०) शिक्षण

अ) प्राथमिक शाळा - १६५४

ब) माध्यमिक शाळा - २७७

क) उच्चमाध्यमिक शाळा - ४६

ड) अध्यापक विद्यालये - ५

इ) सामान्य शिक्षण महाविद्यालये

ई) वैद्यकीय महाविद्याल - १

ए) एकुण विद्यार्थ्यांची संख्या ४४०७३२.

ऐ) प्राथ.शाळेतील विद्यार्थी ५४.

ओ) माध्य.शाळेतील विद्यार्थी ४० %

औ) औद्यो. प्रशिक्षण संस्था -२

अ) तंत्रनिकेतन - २

विधी महाविद्यालय - १

शिक्षण पदवी महाविद्यालय - १

आयुर्वेदिक महाविद्यालय - २

१२) प्रौढ शिक्षण :-

प्रौढ शिक्षण केंद्रे - ३३०

साक्षरतेचे प्रमाण - ५२४

१३) समाज कल्याण :-

अ) मागासवर्गीय लोकसंख्या (अनु.)

जाती /जमाती/न.बौध्द

१,१३,०००/२,४२,०००/निल

ब) शासकीय वसतीगृह - ८

क) प्रवेश क्षमता - ५२०

ड) सुधार प्रशासन संस्था :-

रिमांड होम २

डेस्टीट्यूट झोन १

१५) आरोग्य संस्था :-

१) जिल्हा सामान्य रुग्णालय - १

२) कुष्ठ रुग्णालय - १

३) रुग्णालये - २८

४) ग्रामीण दवाखाने - १६७

५) प्रा.आरोग्य केंद्र - ३१

६) जिल्हा क्षय रोग केंद्र - १

१६) सहकार :-

सहकारी संस्था - १८७८

१) मध्यवर्ती सहकारी बँक - १

२) पणन सहकारी संस्था ३५.२५ %

३) गृह बांधणी सहकारी संस्था ३५.६९ %

४) दुग्ध सहकारी संस्था १९.५७

५) कामगार कत्राट संस्था ६.१६ %

१७) उद्योग :-

उद्योग २७० कामगार ११०६१

औद्योगिक वसाहत - बडनेरा रोड,

हातुर्णा

१४७ भुखंड वितरीत.

१८) मत्सव्यवसाय :-

मत्स्योत्पादनासाठी अमृत क्षेत्र - २,८६०

फंडवा, ता.धारणी आणि वायलापूर

ता.चांदूर बाजार येथे मत्स्यबीज उत्पादन केंद्र आहेत.

१९) पशुसंवर्धन :-

पशुसंवर्धन संख्या - ९६००५७

वैद्यकीय दवाखाने २३ व ३ रुग्णालये

पशुवैद्यकीय केंद्रे - ६४

कृत्रीम रेंतन केंद्र - ६५

(शिवाय २ फिरते पथक अमरावती दुध योजने मार्फत २९६ लक्ष किंमतीचे ९७३३ हजार लिटर दुध खरेदी करण्यात येते.)

२०) पाटबंधारे -

मध्यम प्रकल्प :- ३

लघु पाटबंधारे - ४३

लघू प्रकल्प

जि.प.योजना :-

बंधारे - १४

कच्चे बधारे - २७४

पाझर तलाव - ३९ व १२ चे काम सुरु

सिंचन तलाव - ५५ व ५ चे काम सुरु.

२१) रस्ते विकास :-

रस्त्याची लांबी - ३५७३ कि.मी.

एकेरी लोह मार्ग - १० मि.मी.

दुहेरी लोह मार्ग - ८०.१९ किमी.

मिटर गेज - ४८.७८

ग्रामीण मार्ग - ८५० कि.मी.लांबी

नागरी भागात - १४७ कि.मी. लांबी

२२) एस.टी.वाहतूक

एस.टी.वाहतूक - ७

एकूण बस गाड्या - ४३२.

२३) एकात्मिक ग्रामीण विकास :-

ग्रामीण

दारिद्रय रेषेखाली कुटूंबे - १,३०,६४५

अनु.जाती. - १५९७८३

अनु.जमाती - ४६९७१

८ लाभार्थी कुटुंबे - २७००१

२४) रोजगार हमी योजना :-

मजुरांची नोंदणी २३६८३२

स्त्री १०२०१४ पुरुष १३४८१८

कामे - २५६

मजुरांची उपस्थिती

२५) करमणूक :-

कायमस्वरुपाची चित्रपट गृहे - २६

फिरती चित्रपट गृहे - २१

२६) विद्यूतीकरण :-

जिल्ह्यात एकूण गावे १,६९९

शहरे - १२

विद्युतीकरण ग्रामीण भागात - ९०४

शहरी भागात - १००४

महाराष्ट्र शासनाचे नवे कृषिधोरण

राज्याच्या आर्थिक व सामाजिक विकासात कृषिविकास व शेतकऱ्यांची उन्नती यांचे अनन्यसाधारण महत्व आहे हे लक्षात घेऊन राज्य शासनाने कृषी धोरणाचा मसुदा जाहीर करण्याचे ठरविले आहे. कृषी क्षेत्राशी संबंधित निरनिराळ्या प्रश्नांचा अभ्यास करुन त्याबाबत कार्यवाही करणे. यामुळे सुलभ होईल. हे धोरण सर्वमान्य असावे व सन्माननीय सदस्यांचे याबाबतचे अनुभव, भावना व सूचना त्यामध्ये प्रतिबिंबीत व्हाव्यात म्हणून कृषी धोरणाचा मसुदा या विधिमंडळात सादर करण्यात येत आहे. मागील विधिमंडळ अधिवेशन नियोजित वेळेपूर्वी संपल्यामुळे त्या अधिवेशनात मसुदा सादर करता आला नाही. नवव्या पंचवार्षिक योजनेची आखणी आता करण्यात येत असल्यामुळे नवव्या पंचवार्षिक योजनेचा आराखडा कृषिधोरणावर आधारित राहीले व त्याबाबतीत केंद्र शासनास तसेच राष्ट्रीय विकास परिषदेत सूचना करता येतील.

शेतकरी शेती विकास कार्यक्रमाचे केंद्रबिंदू :

शेतकऱ्यांची अधोगती होऊ नये याकरीता शेतकऱ्याला केंद्रबिंदू मानून शेतीविकास कार्यक्रम आखण्याचे ठरविले आहे. कृषिविकास कार्यक्रमात उत्पादन वाढविणे या पुरतेच लक्ष केंद्रीत न करता, शेतकऱ्यांना त्यांच्या उत्पादनातून जास्तीत जास्त नफा मिळेल व शेती किफायतशीर होईल यावर भर राहील. कृषिविकासाचे नियोजन कसे करावे, संशोधनाचे प्राधान्य व कृषिशिक्षणाचे अभ्यासक्रम काय असावे, सिंचनाचे नियंत्रण कसे व्हावे वे खरेदीची पध्दत काय असावी इत्यादी गोष्टी शेतकऱ्यांच्या अडचणी व गरजा पाहून कराव्या लागतील याकरिता त्यांचे नियोजन व अंमलबजावणी यामध्ये पध्दती हे सर्व महत्वाचे मुद्दे असून त्या विचारात घेऊन प्रकल्प स्वरुपात उद्योगधंद्यांच्या विकासाची आखणी होते. या सर्व बाबींचा विचार कृषिधोरणाला करण्यात येईल.

अद्ययावत कृषी तंत्रज्ञान :

अद्ययावत व सुसंगत तंत्रज्ञान हा जगाच्या औद्योगिक विकासाचा पाया आहे. त्यामुळे कृषिविकासाकरीता सर्व प्रकारंचे सर्वोत्तम तंत्रज्ञान या राज्यांच्या शेतकऱ्यांपर्यत पोहोचवावे असे शासनाचे प्रयत्न राहतील. निरनिराळ्या देशात, इतर राज्यात व आपल्या राज्यातच बऱ्याच शेतकऱ्यांनी उत्त तंत्र विकसित केले आहे. हे सर्व तंत्र शेतकऱ्यांपर्यत किमान कालावधीत जास्तीत जास्त प्रमाणात पोहोचवावयाचे आहे. याचाच एक भाग म्हणून ज्या इस्त्रायल देशाने अक्षरशःवाळवंटात हरितक्रांती केली. या देशाचे तंत्रज्ञान आपल्या राज्यातील सामान्य शेतकऱ्यांपर्यत पोहोचविण्याकरीता मी माझ्या ऑक्टोबर ९६ मधील भेटीत इस्त्रायलचे उप-पंतप्रधान (कृषिमंत्री) यांचेशी सामंजस्य करार केला. त्याचा एक भाग म्हणून प्रकल्प तयार करण्याकरीता इस्त्रायल या देशाच्या तंत्रज्ञाचा एक गट लवकरच राज्यात सर्वेक्षणाकरीता येत आहे. या केंद्रीय, प्रात्यक्षिक केंद्राकरीता डॉ.पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथील प्रक्षेत्र व राज्यातील इतर ठिकाणच्या जागांची निवड केली आहे. या प्रकारचे प्रयत्न इतर ठिकाणी उपलब्ध असलेल्या तंत्रज्ञानाचा फायदा शेतकऱ्यांपर्यत पोहोचविण्याकरीता देत जातील.

केंद्रेच शेतकऱ्यापर्यत नेण्यात येतील. याकरीता कृषी प्रक्षेत्रावर केंद्रीय प्रात्यक्षिक केंद्रे ही त्या-त्या भागाच्या अडचणी व गरजा लक्षात घेऊन एकात्मिक विकास केंद्रे म्हणून विकसित करण्यात येतील. विद्यापीठाची इतर प्रक्षेत्रे, कृषी खात्याची बीजगुणन केंद्रे व रोपवाटिका, महाराष्ट्र शेती मंहामंडळाचे मुळे सुध्दा त्याचप्रकारे विकसित करण्यात येतील. अशाप्रकारे प्रत्येक जिल्ह्यात एक कृषी पॉलिक्लिनिक व प्रत्येक तालुक्यात एक ॲग्रोक्लिनिक विकसित करण्यात येईल.

वसंतराव नाईक राज्य कृषी व्यवस्थापन संस्था ही राष्ट्रीय दर्जाची संस्था म्हणून विकसित करण्यात येईल. पुढील ३ वर्षात राज्यात १०० ठिकाणी कृषी सेवा व माहिती केंद्रे सुरु करण्यात येतील. संध्या दरवर्षी प्रमाणे ५,००० शेतकऱ्यांना कृषी विद्यापीठाव्दारे प्रशिक्षण देण्यात येते. यामुळे ५०,००० शेतकऱ्यांना दरवर्षी कृषि

विद्यापीठाव्दारे प्रशिक्षण देण्यात येईल. कृषी प्रदर्शने शेतकऱ्यांच्या दृष्टीने महत्वाची असल्याने अशी प्रदर्शने भरविण्याकरीता प्रोत्साहन देण्यात येईल.

कृषी शिक्षण :-

देशाच्या प्रगतीसाठी शिक्षण हे विकासाचे मुख्य अंग आहे. औद्योगिक विकासासाठी तांत्रिक, व्यवस्थापन व वित्त-शिक्षण इत्यादीकरीता निरनिराळ्या स्तरावर अभ्यासक्रम सध्या उपलब्ध आहेत. उदा. उच्च शिक्षण, तंत्रनिकेतन (पॉलिटेक्नीक), औद्योगिक प्रशिक्षण संस्था, (आय.टी.आय) इत्यादी कृषी क्षेत्राचा होणारा सिंचनाचा अपव्यय टाळण्याकरीता बंद पाईपलाईनव्दारे सिंचन करणारे पथदर्शक प्रकल्प राबविण्यात येतील. ठिंबक सिंचन राज्याला अतिशय उपयोगी पडले असून त्याखालील क्षेत्रात भरीव वाढ करण्यात येईल.

उपसा सिंचन :-

उपसा सिंचन योजनेला प्रोत्साहन देण्याकरीता सहकारी तत्वावर चालणाऱ्या उपसा सिचन योजनेच्या खर्चावरील अनुदान २५ टक्क्यावरुन ५० टक्क्यापर्यत वाढविण्यात येईल. शासनामार्फत निर्माण करण्यात आलेल्या व सध्या बंद असलेल्या उपसा सिचन योजना कार्यान्वित करण्याकरीता उपाययोजना आखण्यात येतील. उपसा सिंचन योजना राबविण्यामध्ये बऱ्याच अडचणी असून सदर योजना प्रभावीपणे राबविता यावी याकरिता प्रत्येक जिल्ह्यात 'उपसा सिंचन कक्ष' एक खिडकी पध्दतीच्या आधारावर निर्माण करण्यात येईल.

भूगर्भातील सिंचन :-

भुगर्भातील पाणी ही पृष्ठावरील पाण्याप्रमाणेच सार्वजनिक संपत्ती समजून त्यांच्या वापरावर नियंत्रण ठेवण्याबाबत उपाययोजना करण्याची गरज आहे. ज्या भागात भुगर्भात पाण्याचा पुरेसा साठा उपलब्ध आहे. अशा भागात सध्या व विंधन विहिरीचा मोठा कार्यक्रम राबविण्यात येईल.

कृषी उत्पादनाकरीता पतपुरवठा व गुंतवणुक :-

कृषी उत्पादनाकरीता होणारा अपुरा पतपुरवठा ही कृषिक्षेत्रातील महत्वाची अडचण आहे. सहकारी संस्थामार्फत सन १९९६-९७ या वर्षात प्रस्तावित रु. १,४०० कोटी पीक कर्जवाट्याचे प्रमाण वाढवून पुढील ३ वर्षात ते रु. २,३०० कोटीपर्यत आणणे, तसेच शतकऱ्यांना शासनाला आवश्यक माहिती देण्यात येत आहे.

बियाणे :-

शेतकऱ्यांना त्यांच्या विशिष्ट गरजा व मागणी यानुसार बियाणांचा पुरवठा व्हावा अशा प्रकारे बियाणे उत्पादनाचे कार्यक्रम हाती घेण्यात येतील. पुढील तीन वर्षात बियाणांचे उत्पादन ७,५ लाख क्विंटलपासून १०.०० लाख क्विंटलपर्यत वाढविण्यात येईल. भाजीपाला व उच्च मुल्यांकित पिकांच्या बियाणे उत्पादनावर विशेष लक्ष दिले जाईल. बियाणे उत्पादन कार्यक्रमात ग्रामीण भागात रोजगार निर्मितीची मोठी क्षमता असल्याने बियाणे उत्पादन कार्यक्रम राज्याच्या गरजेपुरता सीमित न ठेवता हे राज्य जागतिकदृष्ट्या मुख्य बियाणे केंद्र म्हणून विकसित होईल. याद्दष्टीने बियाणे उद्योगाला लक्षण करण्यात येईल.

गुणवत्ता नियंत्रण :-

खते, बियाणे व औषधे यांच्या गुणवत्तेबाबत शतकऱ्यांच्या बऱ्याच तक्रारी असून गुणवत्ता नियंत्रण व्यवस्था सुधारुन प्रभावी करण्यात येईल. शास्त्रशुध्द साठवणुक (स्टोअरेज) व्यवस्था निर्माण करण्यात येईल.

३) राज्याच्या शेतमाल उत्पादनाची विक्री वाढविण्याकरता महत्वाच्या बाजारपेठेत मध्यवर्ती शेतमाल विक्री केंद्र (महाकेंद्र) स्थापन करण्याकरीता उपाययोजना करण्यात येईल.

४) शेतकऱ्यांना स्पर्धात्मक दर मिळावेत. विक्रीकरीता पर्याय असावेत व विक्रीचा आनुषंगिक खर्च कमी व्हावा याकरीता कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संबंधित कायद्यात व कार्यपध्दतीत सुधारणा करण्यात येईल.

५) कृषी प्रक्रियेस प्रोत्साहन देण्याकरीता कृषी औद्योगिक वसाहती स्थापन करण्यात येतील.

६) शेतमालाच्या निर्यातीस चालना देण्याकरीता मुंबई व इतर ठिकाणच्या आंतरराष्ट्रीय विमानतळ व गोदी यासाठी मूलभूत सुविधा व जागतिक पातळीची लिलाव केंद्रे इत्यादी सुविधा निर्माण करण्याकरीता प्रोत्साहन देण्यात येईल.

७) शेतमालाचे पणन व निर्यातीस साहाय्य देण्यासाठी बाजारपेठ विकास निधी स्वतंत्रपणे निर्माण करण्यात येईल.

नैसर्गिक व सेंद्रीय शेती :-

रासायनिक खते व पीक संरक्षण औषधे यांच्या अनावश्यक वापरामुळे होणारे जमीन व पाण्याचे प्रदुषण तसेच. राज्यात बहुतेक शेती ही अवलंबून असल्यामुळे या शेतीचा प्रभावीपणे विकास करण्याकरीता एक तंत्र अभियान (टेक्नॉलॉजी मिशन फॉर रेनफेड फार्मिंग) राबविण्यात येईल.

आदिवासी क्षेत्राचा विकास :-

राज्यात इतर भागांच्या तुलनेत आदिवासी क्षेत्रात कृषी विकासाच्या सोयी सुविधा अतिशय अविकसित असून त्या बळकट करणे या भागातील शेतीच्या विकासाची मुलभूत गरज आहे. ही उणीव भरुन काढण्याकरीता दहा आदिवासी प्रकल्प क्षेत्रात कृषी संशोधन, शिक्षण व प्रशिक्षण याकरीता एकात्मिक विकास केंद्रे स्थापन करण्यात येतील, कृषी आश्रमशाळा ही संकल्पना विकास केंद्रे स्थापन करण्यात येतील. कृषी आश्रमशाळा ही संकल्पना प्रायोगिक तत्वावर राबविण्यात येईल. आदिवासी क्षेत्रात पडीत जमीन मोठ्या प्रमाणावर सुधारणा असून त्यावर फलोत्पादन विकास योजना प्रभावीपणे राबविण्याकरीता सुधारणा करण्यात येईल. आदिवासी कुटूंबासाठी पौष्टिक जागा (ब्युटिशन गार्डन) व परस बागा (किचन गार्डन) योजना विस्तृतपणे राबविण्यात येईल. आदिवासी भागात कृषी विकासाच्या विशिष्ट समस्या व झालेल्या प्रगतीचा नियमितपणे अभ्यास करण्याकरीता आदिवासी शिक्षण व संशोधन

केंद्र या संस्थेची प्रमुख भुमिका राहील.

कृषी क्षेत्रात महिलांचा सहभाग :-

कृषी क्षेत्रात महिलांना महत्वाचे स्थान असल्यामुळे कृषी प्रक्रियेत महिलांना योग्य स्थान मिळावे, त्यांची कार्यक्षमता व उत्पन्न वाढावे याकरीता एक व्यापक कार्यक्रम राबविण्यात येईल.

रोजगार निर्मिती :-

रोजगार व स्वयंरोजगार निर्मितीसाठी अभ्यास करुन शासनास शिफारस करण्याकरीता माझ्या अध्यक्षतेखाली एक उच्चधिकार समिती स्थापन करण्यात आली असून त्याचा अहवाल लवकर तयार होईल व सदर अहवालावर व्यापक चर्चा करुन शासनामार्फत पुढील कार्यवाही संधी असून पुढील तीन वर्षात ग्रामीण भागात ६०,००० बेरोजगारांना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करुन देण्याकरीता प्रशिक्षणाच्या कार्यक्रम राबविण्यात येईल. त्याशिवाय पुढील तीन वर्षात ९५,००० दारिद्रय रेषेखालील अल्पभूधारण बेरोजगारांकरीता स्वयंशेतीत रोजगार निर्मितीकरीता त्यांना साहाय्य देण्यात येईल.

शेतमजुरांची आर्थिक उन्नती :-

राज्यात जवळपास ८३ लाख शेतमजूर असून त्यांच्या समस्या व अडचणी अधिक बिकट आहेत. त्यांना रोजगार पुरविण्याकरीता शासनामार्फत विविध रोजगार निर्मितींच्या योजना राबविल्या जातात. शेतमजुरांचे कौशल्याचे स्तर वाढविण्याकरीता प्रशिक्षणाचा कार्यक्रम राबविण्यात येईल. यामुळे त्यांना त्यांच्या कामाचा जास्त मोबदला मिळेल.

भूमी अभिलेख अद्यावत करणे :-

शेतकऱ्यांना भूमी अभिलेख अद्ययावत करुन उतारे व मोजणी करुन जमिनीचा ताबा वेळेवर मिळण्यासाठी तसेच शेतजमिनीच्या विविध प्रकारच्या वादाची

प्रकरणे समयबध्द कार्यक्रमानुसार निकाली काढण्याकरीता विशेष कार्ययोजना आखण्यात येईल. वाटणी पत्रावर मुद्रांक शुल्क शेतकऱ्यांना परवडणारे राहील याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

पिढीजात व पारंपारिक ज्ञान :-

आंतरराष्ट्रीय तंत्रज्ञान विकसित करताना शेतकऱ्यांकडे बहुमोल असा पिढीजात व पारंपारिक शेती विषयक ज्ञानाचा साठा आहे याची शासनाला जाणीव आहे. या ज्ञानाचे संकलन, पुनरुज्जीवन व विकास करण्याकरीता उपाययोजना करण्यात येईल.

बौध्दिक संपत्ती हक्क व पेटंट प्रकिया :-

शेती क्षेत्राचे जागतिकीकरण होत असल्यामुळे बौध्दिक संपत्ती हक्क (आय.पी.आर एस्) पेटंट प्रक्रिया आणि वनस्पती

राज्याचे क्रीडा धोरण घोषित : क्रीडा साहित्यांवरील चुंगी कर :-

निवडक तालुक्यात २५० विद्यार्थ्यामागे एक शारीरिक शिक्षण शिक्षक :-

शालेय शिक्षणाचा क्रीडा अविभाज्य घटक, तालुकानिहाय प्रशिक्षण योजना, गाव तेथे व्यायाम शाळा, खेळाडूंना वाढीव सवलती अशा घोषणांचा समावेश असलेले राज्याचे सर्वकष क्रीडा धोरण मुख्यमंत्री मनोहर जोशी यांनी आज विधानसभेत घोषित केले.

हे धोरण १९९७ ते २००० या कालावधीत कार्यान्वित करण्यात येणार आहे. धोरणाच्या अंमलबजावणीसाठी प्रत्येक वर्षी ३० कोटी अनुदानाची तरतूद करण्यात येणार आहे. राष्ट्रीय स्तरावर खाशाबा जाधव शिवशाही कुस्ती स्पर्धा तसेच चषक कबड्डी स्पर्धा सुरु करण्यात येईल. राज्यात क्रीडा संस्कृतीची जोपासना करण्यासाठी तालुका हा घटक मानून प्रत्येक तालुक्यात क्रिडा प्रशिक्षण केंद्र उभारण्यात येईल. या केंद्रात २०० मीटर धावपट्टी, कबड्डी, तसेच पूर्वघोषित खेळाचे मैदान उभारण्यात येईल.

निवडक तालुक्यातील शाळांमध्ये २५० विद्यार्थ्यासाठी १ शारीरिक शिक्षण शिक्षक नेमण्यात येणार आहे. प्रत्येक तालुक्यातील प्रचलित खेळ लक्षात घेता स्थानिक माहीतगारांच्या साहाय्याने क्रीडाकृती आराखडाही तयार करण्यात येणार आहे. प्रत्येक जिल्ह्याचा क्रीडा निधी उभारण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा क्रीडा परिषदेची निर्मिती करण्यात येईल.

गाव तेथे क्रीडांगण :-

गाव तेथे क्रीडांगण ही पूर्वीची योजना आता नव्या सुधारणांसह प्राधान्य क्रमाने राबविण्यात येणार आहे. पूर्वीच्या धोरणानुसार १० हजारापेक्षा जास्त लोकसंख्येच्या गावी क्रिडांगण उभारण्यात येत असे, आता पाच हजार लोकसंख्येच्या प्रत्येक गावात क्रीडांगण उभारण्यात येईल. आदिवासी गांवासाठी ही मर्यादा दोन हजार असेल. या योजनेसाठी असलेले अनुदान ८० हजारांवरुन एक लाखापर्यन्त वाढविण्यात आले आहे. क्रीडा विषयक कार्यक्रमाना प्रोत्साहन देण्यासाठी क्रीडांगण विकासाला खर्चाच्या ५० टक्के परंतु एक लाखाच्या कमाल मर्यादेपर्यत अनुदान देण्यात येणार आहे. प्रत्येक गावात व्यायाम शाळाही बांधण्यात येईल.

खेळाडूंना वाढीव सवलती :-

राष्ट्रीय स्पर्धेत विजेता ठरलेल्या खेळाडूला २७०० रुपये, व्दितीय क्रमांक पटकावणाऱ्या २४०० रुपये तर तृतीय खेळाडूला एक हजार रुपयांची शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली आहे. यापूर्वी ही रक्कम केवळ चारशे रुपये होती. राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होणाऱ्याला प्रति दिवशी १०० रुपये तर राज्य स्पर्धेतील खेळाडूंना ४० रुपये भत्ता देण्यात येईल. आधी हे आकडे ४० आणि २० रुपये एवढे होते. राष्ट्रीय पदक विजेत्या खेळाडूंना विमा योजनेसाठी अर्थसाहाय्य देण्यात येईल. व्यावसायिक प्रशिक्षणाच्या पदवी आणि पदविका अभ्यासक्रमात राष्ट्रीय पदक विजेत्या खेळाडूंना थेट प्रवेश दिला जाईल. प्रशिक्षकांना अत्याधुनिक तंत्राची ओळख व्हावी यासाठी परदेशात पाठवून प्रशिक्षण दिले जाईल. तसेच विदेशी प्रशिक्षकांचे दौरे आयोजित

केले जातील. खेळाडूंना शयासकीय सेवामंध्ये आरक्षण देण्याचाही विचार आहे.

शालेय शिक्षणात अंतर्भाव

५ वी ते ८ वी या वर्गातील विद्यार्थ्यासाठी क्रीडा शिक्षकांची नेमणूक करण्यावर शासनाचा भर राहील. आठवड्यातील स्पर्धा अर्धा दिवस खेळांसाठी राखीव ठेवता जाईल तसेच २५० विद्यार्थ्यामागे एक शारीरिक शिक्षण शिक्षक हे तत्व टप्प्याटप्प्याने अंमलात आणले जाईल. ॲथलेटिक्स कबड्डी, कुस्ती या तीन जिल्ह्यास्तरीच स्पर्धात जास्तीत जास्त गुण मिळविण्याचा पाच शाळांना १५ हजार रुपयांचे अनुदान देण्यात येणार आहे. प्रत्येक जिल्ह्यात १२ ते १८ डिसेंबर क्रीडा समाह साजरा केला जाईल.

स्टेडियम उभारणी :-

स्टेडियमबांधणीसाठी प्रत्येक जिल्ह्याला देण्यात येणारे ५ लाखांचे अनुदान आता २० लाखापर्यंत वाढविण्यात आले आहे. जलतरणतलांवासाठी ५ लाख रुपयांचा निधी देण्यात येत असे तो आता २१ लाख करण्यात आला आहे. आदिवासी व डोंगराळ भागात १०.६३ लाख एवढे अनुदान दिले जाईल. क्रीडा साहित्यावरील ऑक्ट्रॉय संपूर्णपणे माफ करण्यात आला आहे. स्थानिक विकास कार्यक्रमाअंतर्गत आमदार निधीतून ५० हजार रुपयांपर्यतचे खेळ साहित्य विकत घेण्यास परवानगी देण्यात आली आहे.

ऑलिम्पिकमध्ये राज्य झळकावे :-

क्रीडा धोरणाचा मसुदा जाहीर केल्यानंतर मुख्यमंत्री मनोहर जोशी म्हणाले, ''दुर्देवाने आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धामध्ये देशाची सातत्याने पिछेहाट सुरु आहे. आगामी ऑलिम्पिक स्पर्धामध्ये महाराष्ट्राने लक्षणीय कामगिरी करुन देशाचे नाव उज्ज्वल करावे यासाठी आम्ही हे धोरण सादर करतो आहोत. सांगली कोल्हापूर येथे कुस्ती खेळाला चालना, मुंबईत क्रिकेट, हॉकी आणि फुटबॉल नागपुरात हॅण्डबॉल यासाठी विशेष योजना हाती घेण्यात येणार आहेत. आदिवासी बालकांसाठी विशेष प्रशिक्षण

योजना, तांत्रिकज्ञान मिळावे यासाठी व्हिडीओ कॅसेट्स याचा वापर शिवछत्रपती पुरस्काराबाबत, नवे विचार या सदस्यांनी केलेल्या सूचनाही मुख्यमंत्री जोशी यांनी मान्य केल्या.

ठळक वैशिष्ट्ये :-

१) क्रीडा हा शालेय अभ्यासक्रमाचा आवश्यक, अंगभूत व अविभाज्य भाग करण्यात येईल.

२) क्रीडा प्रशिक्षणासाठी सध्या जिल्हा हा घटक मानण्यात आला आहे, त्याऐवजी तालुका हा घटक निश्चित करण्यात येईल व त्यानुसार टप्प्या-टप्प्याने तालुका पातळीवर प्रशिक्षणासाठी प्रशिक्षकाची उपलब्धता व तालुका क्रीडा कार्यालयाची स्थापना करण्यात येईल.

३) तालुक्यात असलेली क्रीडेची परंपरा,उपलब्ध साधन सुविधा तसेच अंत:सामर्थ्याचा अभ्यास करुन जिल्हा क्रीडा समितीव्दारे तालुका क्रीडा कृती आराखडा तयार करण्यात येईल व तो टप्प्या-टप्प्याने अंमलात आणला जाईल.

४) सध्या अस्तित्वात असलेल्या विविध शासकीय योजनांचा सखोल अभ्यास करुन त्यामध्ये सुधारणा करणे व काही नवीन योजना अंमलात आणणे. याविषयी कार्यवाही करण्यात येईल.

५) राज्यातील खाजगी व सार्वजनिक उद्योग, महानगरपालिका, नगरपालिका तसेच जिल्हा परिषदा व सहकारी संस्था यांचेव्दारे खेळ किंवा संप दत्तक योजना राबविण्यात येईल.

६) राज्यातील क्रीडा संस्कृतीची जोपासना व वाढ करण्यासाठी उपाययोजना करण्यात येईल.

७) क्रीडागंणावर होणारे वाढते अतिक्रमण रोखण्यासाठी आवश्यक ते अधिनियम कार्यान्वित करण्यात येईल.

शहीर स्मारके

देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी ज्या देशभक्त विरांनी आपल्या प्राणांची आहूती दिली, अशा महाराष्ट्रातील हुतात्म्यांच्या स्मृती प्रित्यर्थ ६ ऑगष्ट १९८९ रोजी हुतात्मा स्मारक भवनाचे भूमिपूजन संपूर्ण महाराष्ट्रांत एकाचवेळी झाले. अमरावती जिल्ह्यात अमरावती, यावली, देवरा,चांदूर रेल्वे, सातेफळ, नानोरी, वरुड, बेनोडा, लोणी आणि इत्तमगांव ह्या ठिकाणी अशी दहा शहीद स्मारके उभारण्यात आली. ह्या स्मारकांना प्रत्येकी दीड लाख रुपये खर्च आलेला आहे.

जिल्ह्याची वैशिष्ट्ये :-

१) अमरावती जिल्ह्याचा बहुतेक भाग लाव्हा रसाचा बनलेला असून येथील जमीन काळी कसदार आहे. ही जमीन ब्लॅक कॉटन सॉईल' या नावाने ओळखली जाते. इकडे कापूस मोठ्या प्रमाणावर पिकतो, म्हणून पांढरे सोने पिकवणारी जमीन म्हटलं तरी वावगं होणार नाही.

२) चिखलदरा हे विदर्भाचे नंदनवन म्हणून ओळखल्या जाते. ते एक उत्तम थंड हवेचे ठिकाण आहे. समुद्र सपाटी पासून ३६०० फुट. उंचीवर सातपुड्याच्या कुशीत चिखलदरा बसले आहे. महाराष्ट्रात शासनाने इंथे पर्यटकांसाठी सुट्टीची निवासस्थाने बांधली आहेत. या थंड हवेच्या ठिकाणाचा शोध १८२३ साली हैद्राबाद कॉन्टीनंट कॅप्टन रॉबीनसन यांनी लावला. निसर्गाचे सहा देखावे, या भागात आहेत.

३) अमरावतीचे अंबादेवी मंदीर सर्वदूर प्रसिध्द आहे. नवरात्रीच्या वेळी येथे मोठी यात्रा भरते. शिवाय दर मंगळवारी भाविक स्त्री-पुरुष येथे देवीच्या दर्शनास येतात. श्री.अंबादेवी ही महाराष्ट्रातील अनेक कुटुंबांची कुलदेवता आहे. भगवान श्रीकृष्णांनी रुक्मीणी देवीला कौडण्यपुर येथून पळवून आणले व अमरावतीच्या अंबादेवी मंदीरात तिच्याशी लग्न केले अशी दंतकथा आहे.

४) अमरावती जिल्ह्यातील रिद्धपुर हे महानुभाव पंथांचे काशी क्षेत्र समजले आहे. चैत्र व आषाढी पौणिमेस येथे यात्रा भरते. हे विदर्भाचे "मांडलीक राज्य" अशा

प्राचीन गोंष्टी आहेत. आर्यवंशी विदर्भ राजाचा जनक अथवा रिद्धिपूर परिसर हा मांडलीक प्रदेश होता. महानुभाव पंथाचे संस्थापक चक्रधर स्वामीचे गुरु श्री.गोविंद प्रभु यांचा जन्म अमरावती जिल्ह्यातील काटसूर येथे झाला.

५) देश-विदेशात अमरावतीचे नांव हनुमान व्यायाम प्रसारक मंडळाने भूषणासह केले आहे. शारीरिक बलासाठी व्यायामाची आवश्यकता लोकांना पटवून देणे, तरुणांना शारीरिक शिक्षण देणे, व्यायाम प्रकाराचे संशोधन करुन, त्याला शास्त्रशुध्द स्वस्थ देण्याचे कार्य व्यायाम मंडळ करते. वारंवार देशी-विदेशी क्रीडा स्पर्धांची सार्थक भाग घेवुन पारितोषिके पटकावितात. निरनिराळी क्रिडा व मैदाने येथे उपलब्ध आहेत. एक आंतरराष्ट्रीय ख्यातीचा जलतरण तलाव येथे बांधण्यात आला आहे. १९१४ मध्ये ही संस्था स्थापन झाली. ह्या मंडळात संपूर्ण भारतातून विद्यार्थी व विद्यार्थीनी शारीरिक शिक्षण घेण्याकरीता दरवर्षी येथे येतात. मंडळातर्फे दरवर्षी साजरा होणारा दसरा उत्सव म्हणजे अमरावतीकरांचे एक आकर्षणच होय. देशाच्या विविध राज्यातून मुले-मुली येथे शिक्षणाकरीता येतात. सामुदायिक कवायतींच्या वेळी साऱ्या राष्ट्रीय एकात्मितेचे दर्शन येथे घडते.

६) **कुष्ठधाम तपोवन** :- स्वतंत्र भारतात एकही कुष्ठरोगी राहता कामा नये. या म.गांधीजींच्या आवाहनाला त्यांचे अमरावती चे अनुयायी पद्मश्री डॉ.शिवाजीराव पटवर्धन उर्फ दाजीबा तसेच डॉ.गणेश भोजराज यांनी प्रतिसाद देवून व जुर्ले १९५० रोजी तपोवन येथे श्री.जगदंबा कुष्ठ निवासाची स्थापना केली.

आज ही संस्था अत्यंत विकसीत झाली असून रुग्ण व्यवस्था, विकलांग वृध्द संगोपन, उत्पादन व प्रशिक्षण, शिक्षण आणि पुर्नवसन अशा विविध विभागातून संस्था कार्यरत आहे. रुग्ण विभागात २०० खाटांचे आंतर रुग्ण कक्ष आहेत. वृध्द संगोपनासाठी १२५ खाटांची सोय आहे. उत्पादन व प्रशिक्षण भागात सुतारकाम, लोहार काम, शिवण काम, विणकाम, मुद्रणालय इत्यादी इत्यादी प्रशिक्षण विभागाचा समावेश असून रुग्णाच्या हस्ते येथे सुंदर वस्तू तयार केल्या जातात.

बालवाडी पासून शालांत परिक्षेपर्यन्त येथे मुलांच्या शिक्षणाची सोय आहे. संपूर्ण महाराष्ट्रातील मुल-मुली यांचा फायदा घेतात. प्रशिक्षण घेवून तयार झालेल्या लोकांना शक्यतोवर बाहेर समाजात पुनर्वसित करण्यात येते. तथापि, शारीरिक विकृती किंवा अन्य कारणास्तव हे लोक समाजात जावू शकत नाहीत, त्यांना संस्थेतच पुनर्वसीत करण्यात येते.

थोर पुरुष :- विविध क्षेत्रात आपल्या अस्मिता राखणारे शिक्षण महर्षी डॉ.पंजाबराव देशमुख, तसेच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, रंजल्या गांजल्याची सेवा करणारे संत गाडगे महाराज आणि संत गुलाब महाराज, दादासाहेब खापर्डे, बाबासाहेब खापर्डे आण्णासाहेब खापर्डे, वीर वामनराव जोशी, नानासाहेब बामणगावकर, बँ.रामराव देशमुख, अच्युत महाराज,आंबाडेकर महाराज, इत्यादी थोर पुरुष अमरावती जिल्ह्याचे भूषण आहेत.

गाडगे महाराज विख्यात संत पुरुष होवून गेले. त्यांनी कीर्तन-प्रवचन या सारख्या पारंपारिक माध्यमाचा उपयोग करुन समाजाला कालोचित प्रबोधन करण्याचा आयुष्यभर प्रयत्न केला. मुलांना शाळा शिकवा, दारु पिवू नका, अंधश्रध्दा सोडा, भुकेलेल्यांना अन्न व तहानलेल्यांना पाणी द्या, अशा महत्वपूर्ण विषयांवर गावोगावी फिरुन बाबांनी समाज प्रबोधन केले. अमरावती जिल्ह्याच्या दर्यापुर तालुक्यातील कोतेगांव ही बाबांची जन्मभूमी. काही दिवसांनी ते येथे आले. अख्या महाराष्ट्रात बाबांच्या धर्मशाळा स्मृती स्मारक म्हणून कार्यरत आहेत. ''गोपाला गोपाला देवकीनंदन गोपाला'' या साधनाने बाबांचे खरे स्मारक लोकांच्या मनात अमर झाले.

संत गुलाब महाराज अचलपूर तालुक्यातील माधानचे रहिवासी ते दोन्हीही डोळ्यांनी अंध होते. तथापि, संस्कृतातील तत्वज्ञान व वाङ्मयाचा त्यांचा दांडगा अभ्यास होता. अमरावती त्यांचे ज्ञानेश्वर मंदीर अद्याप आहे. त्यांची ग्रंथ संपदाही तिथे शाबूत आहे.

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज :- मानवी वृत्तीचा विकास करुन सचोटीच्या व्यवहारास

मानवाला प्रवृत्त करणे, आपल्या धार्मिक अधिष्ठानावर पक्के राहून संकुचित वृत्तीचा मानवी मनात वावरणारा अविष्कार काढून टाकण्यासाठी तेथे खऱ्या मानवकार्याची आणि ग्राम विकासाची शिकवण देण्याच्या उद्देशाने राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी मोझरी येथे गुरुकुंज आश्रमाची आणि गुरुदेव सेवा मंडळाची २३ नोव्हेबंर १९४३ रोजी स्थापना केली. आता ह्या मंडळाला देशव्यापी स्वरुप प्राप्त झालं आहे. मुख्यमंदीराच्या अगदी समोर राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची समाधी बांधली आहे. आज ह्या आश्रमात गुरुदेव प्रकाशन संस्था विद्यामंदीर , महिला मंदीर, गोरक्षण विभाग, आयुर्वेदिक महाविद्यालय, इत्यादी संस्था कार्यरत आहेत. गुरुदेव आश्रमात भावी राष्ट्रपती डॉ.राजेंद्रप्रसाद माजी राष्ट्रपती डॉ.राधाकृष्णन्, चिंतामणराव देशमुख, राजकुमार अमृतकोर, कैलासनाथ आदि थोरमोठ्यांनी वेळोवेळी भेटी दिल्या आहेत.

डॉ.पंजाबराव देशमुख :- ग्रामीण भागातील गोरगरिबांच्या मुलामुलींना शिक्षण देता यावे म्हणून शिक्षण महर्षी डॉ.पंजाबराव उर्फ भाऊसाहेब देशमुख यांनी शिक्षणाची जणू गंगोत्रीच अमरावती जिल्ह्यात निर्माण केली. १९५५ साली भाऊसाहेबांनी भारतकृषक समाजची स्थापना करुन भारतीय शेतकऱ्यांना संघटित केले १९३१ साली मध्यप्रदेश वऱ्हाडचे शिक्षण, कृषी व सार्वजनिक बांधकाम मंत्री असतांना त्यांनी शेतकऱ्यांना न्याय देणारा क्रांतीकारी लवाद कायदा करुन घेवून त्यांनी शेतकऱ्यांची मुक्तता केली. वैदर्भीय क्रांतीचे उद्गाता डॉ.भाऊसाहेब देशमुख सर्वाना सदैव स्मृर्तीस्थानी राहतील.

अमरावतीच्या अंबादेवी मंदीरात नवरात्रीच्या वेळी नऊ दिवस येथे मोठी यात्रा भरते. या यात्रेत खेड्यापाड्यातील भाविक मोठ्या प्रमाणावर येवून देवीचे दर्शन घेतात.

बहिरम येथील यात्रा म्हणजे सर्वधर्म समभावाचा आदर राखणारी यात्रा म्हणावी लागेल. खेड्यापाड्यातील सर्वधर्माचे लोक येथील यात्रेत एकत्र येतात. शेतीला लागणारी सर्व अवजारे या यात्रेत मिळतात.

महाशिवरात्रीला दरवर्षी सालबर्डी येथे मोठी यात्रा भरते. येथं कोमट व थंड पाण्याचे दोन झरे आहेत. या झऱ्यात आंघोळ केल्यास त्वचेचे रोग बरे होतात म्हणतात. येथे भुयारात महादेवाची पिंड आहे. प्रभु रामचंद्रांनी सीतेचा त्याग केल्यावर तिने सालबर्डीच्या डोंगरात वास्तव्य केलं. शामकर्ण नावाचा घोडा लवकुशाने येथेच अडविला. त्यात राम लक्ष्मणाचा पराभव झाला, अशी दंतकथा आहे.

दरवर्षी कार्तिकी पौर्णिमेला कौडंण्यपूर येथे यात्रा भरते. विदर्भाची अत्यंत प्राचीन राजधानी कुंदिनपुर म्हणून पौराणिक काळापासून प्रसिध्द आहे. ऋणमोचन येथे पौष महिन्यातल्या दर रविवारी यात्रा भरते. तिथे स्नान केल्याने मनुष्याचे क्लेश दूर होतात. असा समज आहे.

रिद्धपुर हे महानुभाव पंथाचे तीर्थक्षेत्र आहे. चैत्र आषाढी पौर्णिमे ला येथे यात्रा भरते. याशिवाय अमरावती जिल्ह्यातील कोडेश्वर, खंडेश्वर, नेरपिंगळाई, मार्की, भिलटेके आदि ठिकाणी लहान मोठ्या यात्रा भरतात.

तालुक्यांची नावे व गावांची संख्या

प्रशासकीय दृष्टिकोनातून नव्याने पुनर्रचना झाल्यामुळे अमरावती जिल्ह्यात सहा ऐवजी आता तेरा तहसीली झाल्या आहेत. अमरावती, नांदगांव खंडेश्वर, भातकुली, अचलपुर, दर्यापुर, अंजनगाव सुर्जी, चिखलदरा, धारणी, मोर्शी, वरुड, तिवसा, चांदूर बाजार, आणि चांदूर रेल्वे ह्या तेरा तहसीलींमध्ये अमरावती जिल्ह्याची विभागणी झाली आहे. भातकुली वगळता सर्व तालुक्याची मुख्यालये तालुक्याचे नांव धारण करणाऱ्या खेड्यात शहरात आहेत. मात्र भातुकली तालुक्याचे मुख्यालय अमरावती येथे आहे.

सन १९८१ च्या जनगणनेप्रमाणे अमरावती जिल्ह्यात १३ शहरे, १६२८ वसती असलेले खेडे, आणि ३०१ ओसाड गावे आहेत. ग्रामीण विकासाकरीता १३ पंचायत समित्या तर शहरी विकासाकरीता एक महानगर पालिका आणि १० नगर पालिका कार्यरत आहेत.

लोक जीवन :- अमरावती जिल्ह्यात बहुतांशी लोक शेतकरी आहेत. शहरी आणि ग्रामीण भागातील पहेरावास बराच सारखेपणा आढळतो. सणसमारंभही शेतकरी पोळा सण विशेष आनंदाने साजरा करतात. बैलांना धावून शिंगाना रंग लावून अंगावर झूल घालतात आणि समवलेल्या बैलांची पूजा करतात. बैलांना पुरणपोळी खाऊ घालतात.

शहरातील राहणीमान थोड्या वेगळ्या पध्दतीचे असते घरेही सिमेंट कॉक्रींटची विशेष बांधणीची असतात. शहरी लोक व्यापार नौकरी करतात. धार्मिक व राष्ट्रीय सणात विशेष भाग घेतात.

अमरावती जिल्ह्यात आदिवासी लोकापैकी गोंड आणि कोरकू लोक राहतात. आदिवासींची बहुतांशी संख्या मेळघाट परिसरात धारणी आणि चिखलदरा तहसिलीमध्ये आहे. हा बहुतेक परिसर जंगल आणि डोगरांनी व्याप्त आहे. लोक कष्टाळू आणि धाडशी आहेत. त्यांची घरे गवताची व बाबूंची असतात. हे लोक गोंडी व कोकरू भाषा बोलतात. सणांच्यावेळी गावी जाऊन स्त्रीपुरुष मिळून नाच करतात.

लोकसंख्या (शहरी आणि ग्रामीण)

सन १९८१ च्या जनगणनेनुसार अमरावती जिल्ह्याची एकुण लोकसंख्या १८,६१,४१० असून त्यापैकी ९,६१,५६४ पुरुष व ८,९९,८४६ स्त्रिया आहेत. गेल्या दशकातील सरासरी दहा वार्षिक लोकसंख्या वाढीचे प्रमाण २०.% आहे. लोकसंख्येच्या घनतेचे प्रमाण दर चौ.कि.मी.ला १५२ आहे.

जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येपैकी ७० टक्के लोकसंख्या ही ग्रामीण क्षेत्रात तर उर्वरित ३० टक्के लोकसंख्या नागरी क्षेत्रात वास्तव्य करते. जिल्ह्यामध्ये दर हजार पुरुषांमागे स्त्रियांचे प्रमाण ९३५ आहे. महाराष्ट्र राज्याच्या ९३७ च्या तुलनेत हे प्रमाण जास्त असून ग्रामीण भागात हे प्रमाण ९४१ तर नागरी भागात ९२४ इतके आहे.

जिल्ह्यातील अनुसुचित जातीचें एकूण लोकसंख्येशी प्रमाण सहा टक्के तर अनुसुचित जमातीचे प्रमाण १३ टक्के आहे.

मनुष्यबळ - १९७१ च्या जनगणनेप्रमाणे अमरावती जिल्ह्यातील काम करणाऱ्यांची संख्या लोकसंख्येच्या ३९ टक्के होती तर १९८१ च्या जनगणनेप्रमाणे हे प्रमाण ४० टक्के आढळून आले आहे. १९७१ ते १९८१ या दशकामध्ये जिल्ह्यातील काम करणाऱ्या लोकसंख्येच्या प्रमाणात २७ टक्क्यांनी वाढ झालेली आहे. महाराष्ट्राकरीता हे प्रमाण ३८.७१ टक्के आहे. जिल्ह्यातील एकूण काम करणाऱ्यापैकी ३१ टक्के व्यक्ति प्रारंभिक क्षेत्रामध्ये म्हणजेच शेती व सलंग्न सेवा असलेल्या कामावर गुंतलेल्या आहेत.

एकुण लोकसंख्येपैकी ५२ टक्के लोकसंख्या साक्षर आहे. साक्षर लोकसंख्येपेक्षा ६० टक्के पुरुष व ४० टक्के स्त्रिया आहेत. जिल्ह्यामध्ये वापरातील निवासी घरांची संख्या १९८१ च्या जनगणनेप्रमाणे ३,४४,२३२ आहे. त्यावेळी ७३ टक्के ग्रामीण भागात तर २७ टक्के नागरी भागात आहेत. तसेच जिल्ह्यामध्ये एकूण ३,५०७१३ कुटूंबे आहेत. त्यापैकी ७३ टक्के कुटूंबे ग्रामीण भागात, तर २७ टक्के कुटूंबे हे नागरी भागातआहेत.

सहकार :-

अमरावती जिल्ह्यामध्ये विविध प्रकारच्या सहकारी संस्थाची जून १९८३, जून १९८४ व जून १९८५ अकोर अनुक्रमे १७१३, १८२४ व १८७८ आहे. सभासदांची संख्या ३९२ हजार, ३८८ हजार व ४०५ हजार होती. एकूण सहकारी संस्थापैकी सहकारी मतसंस्थांची संख्या १९८३ मध्ये ३७.४ टक्के. १९८४ मध्ये ३६.४५ टक्के व १९८५ मध्ये ३५.२५ % आहे. उरलेल्या बिगर पतसंस्था असुन त्यामध्ये (अ) दुग्ध व्यवसाय सहकारी संस्था २०.५८ % (१९८३) १९८४ मध्ये १९.८५ % व १९८५ मध्ये १९.५७%. (ब) १९८३ मध्ये सहकारी घर बांधणी संस्था ३४.८७%. १९८४ मध्ये ३५.८० % , १९८५ मध्ये ३५.६६ % . (क) कामगार कंत्राट संस्था १९८३ मध्ये ५.८५ % व १९८४ मध्ये ६.२१ % व १९८५ मध्ये ६.१७% मुख्य होत.

सर्व सहकारी संस्थांची सभासद संख्या जून १९८३ मध्ये ३,९२,०२४ जुन १९८४ मध्ये ३,८८,४२९ व जून १९८५ मध्ये ४,०५,५६२ होती. त्यापैकी सर्वात जास्त सभासदांशी संख्या ही प्राथमिक कृषी सहकारी संस्थांची आहे. प्राथमिक कृषी सहकारी

संस्थांची १९८३ मध्ये २,०४,२०४ लाख, ३६३२८ लाख व सन १९८४ मध्ये २,१५,२०७ व १९८५ मध्ये २,१९,२५६ सभासद संख्या होती.

प्राथमिक कृषी सहकारी संस्थेमार्फत सन १९८३, १९८४ व १९८५ मध्ये शेतकरी सभासदांना अनुक्रमे १०८०.२४ लाख, ३६३.२८ लाख व ७७४.५४ लाख रुपयांचे कर्ज वाटप करण्यात आले. त्या कर्जापैकी सन १९८३, १९८४ व १९८५ अखेर कर्जाची एकूण थकबाकी अनुक्रमे ११३३.४३ लाख, १०१५.२२ लाख व १९७०.६६ लाख रुपये आहे.

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेमार्फत जिल्ह्यामध्ये सन १९८३, १९८४ व १९८५ मध्ये अनुक्रमे ११९५.७९ लाख ११८०.५०(लाख व १३६२.९७ लाख रुपयांचे अल्पमुदती कर्ज वाटप करण्यात आले. त्यापैकी थकबाकी सन १९८३ अखेर ९३०.६६ लाख रुपये, सन १९८४ अखेर ८८४.३३ लाख रुपये व १९८५ अखेर ८७३.६४ लाख रुपये होतो.

अमरावती जिल्ह्यामध्ये वर्गीकृत अधिकोष शाखांची संस्था सन १९८३ अखेर एकुण ९६ होती. त्यापैकी ४१ टक्के नागरी भागात व ५९ टक्के शाखा ह्या ग्रामीण भागात होत्या. दर लाख लोकसंख्ये मागे १४ अधिकोष शाखा कार्यालये येतात.

शिक्षण (प्राथमिक ते महाविद्यालयीन, वैद्यकीय, तांत्रिक)

अमरावती म्हणजे शिक्षणाचे माहेर घर मानले जाते. जिल्ह्यामध्ये १९८४-८५ या वर्षात प्रार्थमिक शाळांची संख्या १६५४ माध्यमिक शाळांची संख्या २७७, उच्च माध्यमिक शाळांची संख्या ४६ व सामान्य शिक्षण महाविद्यालयाची संख्या २२ आहे. दर लाख लोकसंख्ये प्राथमिक व माध्यमिक शाळांचे प्रमाण १०३ आहे.

सन १९८४-८५ मध्ये विद्यार्थ्यांची संख्या ४,४०,७३३ त्यापैकी १ ते ४ प्राथमिक शाळांमध्ये ५४ टक्के, वर्ग ५ ते १० म्हणजे माध्यमिक इ. शाळमध्ये ४० टक्के. उच्च माध्यमिक म्हणजेच ११ ते १२ मध्ये ४ टक्के व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची संख्या २ टक्के आहे.

जिल्ह्यामध्ये तांत्रिक शिक्षणाच्या सोयी देखील उपलब्ध आहेत.

१.- वैद्यकीय महाविद्यालय, २-तंत्रनिकेतन विद्यालये, २- औद्योगिक प्रशिक्षण संस्था, ५-अध्यापक विद्यालये, १-शिक्षण विषयक पदवी महाविद्यालय, १-विधी महाविद्यालय, २- आयुर्वेदिक महाविद्यालये आणि २ - अभियांत्रिकी महाविद्यालये आहेत.

अमरावती जिल्ह्यामध्ये संपुर्णपणे साक्षरतेचा प्रसार व्हावा, याहष्टीने मध्ये विभागणी करण्यात आली आहे. १९८१ च्या जनमणननेनुसार या जिल्ह्यात १२ शहरे आहेत. शहरी विकासाकरीता १ महानगरपालिका आणि १० नगर पालिका कार्यरत आहेत. जिल्ह्यातील एकूण लोकसंख्येपैकी ७० टक्के लोकसंख्या ही ग्रामीण क्षेत्रात तर उर्वरित ३० टक्के लोकसंख्या नागरी क्षेत्रात वास्तव्य करते.

अमरावती महसूल विभाग

अमरावती जिल्ह्यात विभागीय पातळीवरील बरीच कार्यालये आता स्थापन झाली आहेत. सर्व सामान्य जनतेला प्रशासकीय सोईसवलती सहज उपलब्ध करुन त्यांच्या आशा आकांक्षांची पूर्ती करावी व प्रशासनाबद्दल जनतेच्या मनात जवलीक निर्माण व्हावी, या हेतूने ५ फेब्रुवारी १९८१ पासून अमरावती महसुल विभागाची निर्मिती झाली. प्रत्येक तहसिलींच्या ठिकाणी आता एकएक उप-कोषागार कार्यालये उघडण्यात आली आहेत.

अमरावती विद्यापीठ

अमरावती जिल्ह्यातील शिक्षणाच्या प्रसाराची वाढ लक्षात घेता १ मे १९८३ पासून अमरावती येथे "अमरावती विद्यापीठाची" स्थापना करण्यात आली. सध्या अमरावती विद्यापीठाच्या अधिनस्त ८६ विविध महाविद्यालये असून त्यातून सुमारे ३० हजार विद्यार्थी विविध विषयात शिक्षण घेत आहेत. यात अमरावती, अकोला, यवतमाळ व बुलढाणा जिल्ह्याचा समावेश आहे.

महानगर पालिका

अमरावती व बडनेरा नगरपालिका विसर्जीत करुन अन् त्यात १७ गावांचा समावेश करुन १५ ऑगष्ट १९८३ पासून अमरावती महानगरपालिका कार्यान्वित करण्यात आली आहे. महानगर पालिकेच्या अमरावती व बडनेरा मिळून ७१ प्राथमिक शाळा व चार माध्यमिक शाळातून शिक्षणाचे कार्य होत आहे. महानगर पालिकेतर्फे शहरात १५ दवाखाने चालविले जातात. अमरावती-बडनेरा -कोंडेश्वर उप महामार्गावर महागनर पालिकेचे एक कररहित क्षेत्र विकसित केले आहे.

माहिती व जनसंपर्क

शासनाच्या विविध विकास योजनांना उपलब्ध माध्यमाव्दारे लोकांना माहिती दिली आहे. शासकीय सभा बैठकांचे वृत्त, प्रस्तुत करणे, विकास विषयक कामांवर विशेष लेख लिहणे, योजनांच्या लाभार्थ्यांच्या मुलाखती प्रतृत करणे. वृत्तपत्रीय टिपाटिपण्यांचे संबंधिताकडे कात्रणे पाठवून वस्तुनिष्ठ खलासे प्रकाशित करणे. शासन आणि जगतायांच्यातील दुवा म्हणून कार्यरत राहणे तसेच जनतेशी व परस्परांशी उत्तम संपर्क ठेवणे. शहरी व ग्रामीण भागात चलचित्रपटांचे व्दारे जनजागृती करणे ईत्यादी महत्वाची कामे स्थानिक जिल्हा माहिती कार्यालया मार्फत केली जातात.

आदिवासी प्रसिध्दी कक्ष

अमरावती जिल्ह्याच्या उत्तेरेस सातपुडा पर्वत पुर्व-पश्चिम पसरलेला असून सातपुड्याच्या कुशीत धारणी आणि चिखलदरा हे दोन तालुके वसले आहेत. ह्याच दुर्गम अशा परिसरात गोंड आणि कोरकु आदिवासी राहतात.

अमरावती जिल्ह्याच्या एकुण लोकसंख्येपैकी जिल्ह्यात १३ टक्के आदिवासी लोक आहेत. आदिवासींच्या सर्वांगिण विकासासाठी जिल्ह्यात विविध विकास योजना कार्यान्वित होत आहेत.

गोंड-कोरकुंना शासकीय योजनांची त्यांच्या बोली भाषेत माहिती देणे.

दुर्गम अशा लहान-मोठ्या खेड्यातून चित्रपट आणि वृत्तचित्रे प्रदर्शित करणे. सचित्र प्रदर्शने भरविणे, चर्चासत्रे व संभाषणे आयोजित करणे. शासकीय प्रकाशनांचे वाटप करणे. ह्या कामासाठी धारणी येथें आदिवासी प्रसिध्दी कक्ष सुरु करण्यात आला आहे.

दूरदर्शन

दूरदर्शन हे जनसंपर्काचे महत्वाचे माध्यम आहे. दि. ८ सप्टेंबर १९८४ पासून अमरावतीला दूरदर्शन प्रक्षेपण केंद्राची सुरुवात झाली आहे. हे प्रक्षेपण केंद्र मालटेकडीवर कार्यरत आहे. त्यामुळे अमरावती जिल्हा देशाच्या थेट संपर्कात जुळला आहे.

जिल्हा परिषद

त्रिस्तरीय स्थानिक संस्थेनुसार अमरावती जिल्ह्यात १ मे १९६२ ला अमरावती जिल्हा परिषदेची निर्मिती झाली. सन १९६५-६६ मध्ये जिल्हा परिषदे अंतर्गत ७२५ ग्रामपंचायती होत्या. आता अमरावती जिल्हा परिषदे अंतर्गत ८०३ ग्रामपंचायती आहेत.

जिल्ह्यातील शिक्षणाची सोय, सार्वजनिक आरोग्य, घरकुल योजना, बायोगॅस, ग्रामीण विकास योजना, कुटूंब कल्याण ईत्यादी सर्वसामान्यांच्या कल्याणकारी योजना जिल्हा परिषदेमार्फत राबविल्या जातात.

अमरावती जिल्हा परिषदेचे स्वनिर्मिती उत्पन्नच्या बाबतीत घट झालेली आढळून येते. १९८२-८३ मध्ये २३२३ लाख रुपये उत्पन्न होते. १९८३-८४ मध्ये २२७२ लाख रुपये व १९८४-८५ च्या तुलनेत १९८३-८४ मध्ये ६.७६ टक्यांनी खर्च वाढ झाल्याचे आढळते.

आदिवासी विकास

अमरावती जिल्ह्याच्या एकूण लोकसंख्येपैकी, जिल्ह्यात १३ टक्के आदिवासी लोक आहे. जिल्ह्यातील चिखलदरा व धारणीच्या डोंगराळ व दुर्गम भागात हे लोक राहतात. आदिवासींचा सर्वांगीण विकास करण्याच्या दृष्टीने जिल्ह्यात विविध आदिवासी विकास योजना कार्यन्वित होत आहे.

आदिवासींच्या शैक्षणिक विकासावर व शेती विकासावर विशेष भर देण्यात

येत आहे. आश्रम शाळा योजने अंतर्गत जिल्ह्यात १४ शाळा व दोन अनुदानीत आश्रमशाळा घालविल्या जात आहेत. विविध शाळांमधून ४०७५ आदिवासी मुलं शिक्षण घेत आहेत. याशिवाय आदिवासी विकास कार्यालया अंतर्गत नागरवाडी इथे गाडगे महाराज आश्रम शाळा व सलोना इथे म. गांधी आश्रम शाळा अनुदानीत आहे.

आदिवासी शेतकऱ्यांना शंभर टक्के अनुदानावर विद्युत पंप व ऑईल पूरविल्या जातात. गेल्यावर्षा अखेर पावेतो ७५९ विद्युत पंप आणि ११९ ऑईल इंजिन आदिवासी शेतकऱ्यांना शंभर टक्के अनुदानावर पुरविण्यात आले आहे.

कृषी उद्योग

मुख्य पिके व लागवडी खालील क्षेत्र

या जिल्ह्यातील काळी, खरडी व बरडी, मुरमाळी व गाळाची जमीन आढळून येते. खरडी व बरडी जमीन चिखलदरा आणि धारणी या तालुक्यात तर काळी जमीन मोर्शी, वरुड, अचलपूर या तालुक्यात फार मोठ्या प्रमाणात आढळून येते. वर्धा व पूर्णा नदीच्या खोऱ्यात गाळाची जमीन आढळून येते.

जमीनीचा वापर :- जिल्ह्याचे एकूण भौगोलिक क्षेत्र १२६३ हजार हेक्टर त्यापैकी ६१.५९ टक्के क्षेत्र लागवडी लायक ती ४ टक्के क्षेत्रात --- गुरेचरण व इतर चराईची जमीन तसेच ३ टक्के क्षेत्रात शेती करीता उपयुक्त नसलेले क्षेत्र आहे. सन १९८३-८४ या वर्षामध्ये लागवडी लायक ७७८ हजार हेक्टर क्षेत्रापैकी ७०५ हजार हेक्टर क्षेत्र निव्वळ पिका खालील होते. त्याचे प्रमाण एकूण क्षेत्राच्या ५५.८२ टक्के एवढे आहे व ते लागवडीलायक क्षेत्राच्या ६ टक्के एवढे आहे. दुबार पिकाखालील क्षेत्र निव्वळ पिकाखालील क्षेत्राच्या ४.४० टक्के आहे.

पीक पध्दती :- जिल्ह्यामधील एकूण पिकाखालील ७३५६९२ हेक्टर क्षेत्रापैकी सर्वात जास्त क्षेत्र ज्वारी पिकाखालील म्हणजेच ५४.५१ टक्के एवढे आहे. डाळी वर्गीय पिकाखालील २५.९५ टक्के, गहू पिकाखालील १४.२६ टक्के इतर धान्याखालील १.५७ टक्के आहे. तसेच एकूण पिकाखालील क्षेत्रापैकी कापसाखालील क्षेत्र ६०.६४ टक्के व

गळीताच्या पिकाखालील क्षेत्र २.७५ टक्के आहे.

पिकाचे उत्पादन :- सन् १९८१-८२ यावर्षी तृण धान्याचे उत्पदन ३२०३०० टन इतके होते. त्यानंतर दरवर्षी उत्पदन सतत कमी होत गेले व १९८४-८५ यावर्षी २६५१०० टन इतके झाले म्हणजे सन् १९८१-८२ ते १९८४-८५ या काळात तृणधान्याच्या उत्पादनात २० टक्क्याने घट झाली आहे. तुरीच्या उत्पादनामध्ये सन् १९८१-८२ यावर्षीच्या तुलनेत १९८४-८५ मध्ये ४० टक्याने वाढ झालेली असून कापसाचे उत्पादनामध्ये २ टक्के वाढ झालेली आढळते. तेल बियाचे उत्पादनात १९८१-८२ च्या तुलनेत ८४-८५ या वर्षी किंचीत घट झाल्याचे दिसून येते.

मुख्य पिकांचे दर हेक्टरी उत्पादन :- या जिल्ह्यामध्ये ज्वारी, गहू, संत्री, हरबरा, तूर, मुंग, भुईमुंग, तीळ, जवस, ऊस, ही मुख्य पिके आहेत. सन् १९८४-८५ मध्ये ज्वारीचे दर हेक्टरी उत्पादन १८२५ किलाग्रम, गहू ४७६ किलोग्रॅम तूर ६२३ किलोग्रम, तूर ६२३, जवस ५५ किलोग्रॅम, ऊस ५ किलोग्रॅम अशा प्रमाणात होते. तसेच कापसाचे उत्पादन हेक्टरी ३७१० एवढे होते.

अधिक उत्पन्न देणाऱ्या पिकाचे क्षेत्र :- तृण धान्याखाली पिकाचे अधिक उत्पन्न देणाऱ्या पिकाचे क्षेत्र १९८३-८४ मध्ये ५५.९३ टक्के होते. तसेच कापसाखालील पिकाचे क्षेत्र १९८३-८४ मध्ये जास्त उत्पन्न देणाऱ्या कापसाचे क्षेत्र ४४.०७ टक्के होते.

फळे व भाजीपाला :- या जिल्ह्यामध्ये सन् १९८३-८४ मध्ये भाजीपाला एकून क्षेत्र एकूण पिकाखालील क्षेत्राच्या १.८६ टक्के होते. तसेच फळे या पिकाखालील क्षेत्रात एकुण पिकाखालील क्षेत्राच्या २.३६ टक्के आहे. १९८३-८४ मध्ये एकूण फळाच्या पिकाखालील क्षेत्र १३७१३ हेक्टर होते. त्यापैकी संत्री या पिकाखालील क्षेत्र ८९.६५ टक्के, केळी खालील ३.६९ टक्के, पपईखालील ०.९० टक्के लिंबू वर्गीय पिके ३.०४ टक्के आणि इतर २.२६ टक्के एवढे होते. सत्र्याचे पिक प्रामुख्याने वरुड आणि अचलपूर या तालुक्यात होत तर केळीचे पिक अंजनगांव सुर्जी या तालुक्यात होते.

रासायनिक खतांचे वाटप :- अमरावती जिल्ह्यात सन् १९८४-८५ मध्ये ४९८१६

मे.टन रासायनिक खताचे पाटप करण्यात आले. एकूण वाटप केलेल्या खतापैकी यूरिया ३५.५२ टक्के तर इतर व मिश्र खताचे प्रमाण ६४.४८ टक्के होते.

पीक संरक्षण :- पीक संरक्षण योजने अंतर्गत जिल्ह्यामध्ये किटकनाशके , मूषकनाशके इत्यादींकरिता अर्थ सहाय्य देण्यात येते. तसेच रोप संरक्षण साधन सामग्री साठी अल्पभुधार शेतकऱ्यांना अर्थ सहाय्य देण्यात येते. वरील दोन्ही योजनावर जिल्हा कृषी अधिकाऱ्यामार्फत १९८२-८३ मध्ये ३.९५ लाख व सन् १९८३-८४ मध्ये ९.७० लाख. १९८४-८५ मध्ये २२.३९ लाख रुपये खर्च करण्यात आले.

शेतमाल साठविणे व बाजार पेठ :- अमरावती जिल्ह्यात एकूण ११ कृषी उत्पन्न बाजार समित्या कार्यरत असून त्या सर्व ठिकाणी शेतकऱ्यांनी आणलेल्या विक्री योग्य मालाच्या साठवणुकीची सोय उपलब्ध आहे. तसेच इतरही सोयी उपलब्ध आहेत. सन् १९८४-८५ या वर्षी गहू १२७५ टन ज्वारी १५८० टन. कापूस २८५१९ टन. तुर २५३० टन. हरभरा ९७० टन. जवस १८० टन. कृषी उत्पन्नची विक्री कृषी उत्पन्न बाजार समितीद्वारे करण्यात आली. अमरावती जिल्ह्यामध्ये महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या ६ वखारी असून त्याची क्षमता २० हजार मे.टनाची आहे. त्याशिवाय सहकार क्षेत्रात ७७ वखारी आहेत.

जमीन सुधारणा :- मृद संधारण विभागामार्फत जमीनीच्या विकासाची कामे केली जातात. उदा. संधारण बांध घालणे व उतारावर समतल करणे इत्यादी उपायाद्वार जमीनीचा विकास करण्यात येतो. १९८३-८४ मध्ये या कामावर एकूण ८६०६६ लाख रुपये व १९८४-८५ मध्ये ९०.३६ लाख रुपये खर्च करण्यात आले. या व्यतिरिक्त विशेष घटक योजने अंतर्गत देखील अनुसूचित जातीच्या शेतकऱ्यांना जमीन सुधारणेकरिता अर्थ सहाय्य देण्यात येते. ओलीताच्या सोयीची उपलब्धता वाढविण्याकरिता अल्पभूधारक शेतकऱ्यांना जिल्ह्यातील भूविकास अधिकोषा मार्फत विहिर बांधणी करीता कर्जाचे वाटप करण्यात येते.

इतर कृषी विकास कार्यक्रम :- शेती विकासाचे दृष्टीने जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत

निरनिराळे कार्यक्रम राबविल्या जातात. उदा. (१) फलोत्पादन कार्यक्रमाअंतर्गत फलोत्पादन विभागा तर्फे फळबाग लागवडीसाठी उत्सुक असणाऱ्या शेतकऱ्याना अर्थ सहाय्य व अनुदानाची व्यवस्था करण्यात येते. (२) कोरडवाहू शेती विकासाच्या दृष्टीने शासनाने प्रत्येक जिल्हयामध्ये कृषी पंढरी योजना सुरु केलेली आहे. (३) एकात्मिक ग्रामीण विकास योजनेअंतर्गत अत्यल्प व अल्प भूधारक शेतकऱ्यांना नविन विहीरी बांधण्याकरिता व जुन्या विहीरीच्या दुरुस्तीसाठी, इलेक्ट्रीक मोटार पंप विकत घेण्याकरिता बैलजोडी व बैलगाडी विकत घेण्याकरिता राष्ट्रीयकृत व इतर बँकाकडून कर्ज स्थाने मदत मिळवून देऊन अशा प्रकारे मिळणाऱ्या कर्जावर योग्यतेनुसार कमीत कमी २५ टक्के ते ३३ टक्के सूट जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडून देण्यात येते. (४) अल्पभूधारकांना रासायनिक खात्याच्या वाढीव किंमतीवर सुट देण्यात येते. (५) किटक नाशके व मूषकनाशके यासाठी अर्थ सहाय्य देण्यात येते. (६) सधन तेलबिया विकास कार्यक्रमाखाली तेलबियाणाची लागवड व विकास. (७) कडधान्याच्या पिकाकरिता सधन उत्पादन कार्यक्रम याशिवाय जिल्हा परिषदेच्या वाढीव उपकरातील उत्पन्नावर देखील उन्हाळी --- अनुदान देणे वगैरे सारख्या कृषी विकास कार्यक्रमावर खर्च करण्यात येतो.

जलसिंचन

जलसिंचन साधने :- जिल्हयाचा कृषी विषयक उत्कर्ष साधण्यासाठी व सर्वसाधारण आर्थिक सुस्थितीसाठी जिल्हयामध्ये सिंचन क्षमता वाढविणे ही एक महत्वाची बाब होय. जिल्हयामध्ये विहीरी, लहान पाटबंधारे व माध्यम प्रकल्प उपसा सिंचन योजना तसेच नदीनाल्यावर पंप बसवून सिंचन केल्या जाते. जिल्हयामध्ये १९८३-८४ मध्ये एकूण ..... मध्ये वापरात असलेल्या विहीरीची संख्या ४१२६० होती त्यापैकी ९८.५८ टक्के विहरीवर पंप बसवून व उरलेल्या विहीरीवर इतर साधनांचा वापर करुन सिंचन करण्यात आले.

निरनिराळ्या पिकाखालील ओलीताचे क्षेत्र :- १९८३-८४ मध्ये एकूण ओलीतांचे क्षेत्रापैकी तृण धान्याखाली ७६.८८ टक्के कडधान्याखाली ६.१४ टक्के. ऊस ०.५२ टक्के.

मिरची व हळद व इतर मसाल्याचे पदार्थ ५.४८ टक्के. फळे व भाजीपाला ७.५७ टक्के. कापूस ०.९३ टक्के व गळीताचे पिकासाठी २.२५ टक्के क्षेत्र होते.

निरनिराळ्या पिकाखालील ओलीताचे क्षेत्र :- १९८३-८४ मध्ये एकूण ओलीतांचे क्षेत्रापैकी तृण धान्यासाठी ७६.८८ टक्के कडधान्याखाली ६.१४ टक्के, उस ०.५२ टक्के, हिरव्या मिरच्या व हळद व इतर मसाल्याचे पदार्थ ५.४८ टक्के, फळे व भाजीपाला ७.५७ टक्के कापूस ०.९३ टक्के व गळीताचे पिकासाठी २.२५ टक्के क्षेत्र होते.

सिंचन क्षमता :- जिल्ह्यामध्ये १९८३-८४ मध्ये मिळणारे निव्वळ क्षेत्र ३०६६९ हेक्टर एवढे होते. विहीरीव्दारे मिळणारे क्षेत्र २९४७ हेक्टर तर इतर साधनाव्दारे मिळणारे क्षेत्र ११९८ हेक्टर होते. म्हणजेच विहीरीव्दारे ९६ टक्के व भूपृष्ठ भागावरील साधनाव्दारे ४ टक्के सिंचन करण्यात आले.

सिंचन प्रकल्प :- जिल्ह्यामध्ये मालखेड या मध्यम प्रकल्पाची कामे पूर्ण झालेली असून त्याद्वारे सन् १९८४-८५ मध्ये १५८० हेक्टर जमीनीला सिंचनाची सोय उपलब्ध करुन देण्यात आली.

उद्योग (कृषी उद्योगासहीत) व्यवसाय

खनिज उत्पादन :- अमरावती जिल्ह्यामध्ये मूळ खनिजे आढळून येत नाही पण कवेलू व विटाकरिता गाळाची माती, मुरुम, गिट्टी ह्या उत्पादनापासून अल्पशाप्रमाणात महसूल प्राप्त होतो.

उद्योग आणि कामगार :- जिल्ह्यामध्ये नोंदणीकृत झालेल्या कारखान्यांची संख्या सन् १९८३ मध्ये २७३ होती. त्यापैकी २६६ कारखाने चालू स्थितीत आहे. ७ कारखाने बंद होते. या कारखाण्यात ११०६ कामगारांना रोजगार उपलब्ध करुन देण्यात आला.

औद्योगिक वसाहत :- जिल्ह्यामध्ये उद्योगाचे विकासाकरिता महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळामार्फत अमरावती पासून ५ किलोमीटर अंतरावर औद्योगिक वसाहत स्थापन करण्यात आलेली आहे. याशिवाय १०.५० हेक्टर जमीनीवर सातूर्णा येथे सहकारी

औद्योगिक वसाहत स्थापन करण्यात आली आहे. त्यातील १४७ भूखंड निरनिराळे उद्योग स्थापण्याकरिता देण्यात आले.

विद्युतीकरण

विद्युतीकरण :- जिल्हयामध्ये १,९९९ गावे व १२ शहरे आहेत. त्यापैकी २ मार्च १९८५ पर्यंत १७९७ गावाचे व १२ शहराचे विद्युतीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले आहे. हे प्रमाण ग्रामीण भागात ९०% असून शहरी विभागात ते १०० टक्के आहे.

वीज पुरवठा केलेले शेतीच पंप :- जिल्हयामध्ये ३ मार्च १९८५ पर्यंत महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळामार्फत ४२.८३६ शेतीचे वीज पंपाना वीज पुरवठा करण्यात आला.

विद्युत वापर :- सन १९८४-८५ मध्ये ११०२९ हजार कि.वॅट तास विद्युत वापर करण्यात आला त्यापैकी ३६ टक्के लघुशक्तीसाठी ५ टक्के औद्योगिक उत्पादनाकरिता व २० टक्के सार्वजनिक दिवाबत्तीकरिता व शेतीकरीता वापर करण्यात आला.

ग्रामीण विकास

एकात्मिक ग्रामीण विकास योजना :- जिल्हयातील दारिद्रय रेषेखालील जीवन जगणाऱ्या कुटूंबांना आर्थिक सहाय्य देऊन त्यांचे राहणीमान उंचविण्या करता एकात्मिक ग्रामीण विकास योजना राबविण्याचे केंद्र शासनाने धोरणानुसार २० कलमी कार्यक्रम तिसऱ्या कलमानूसार महाराष्ट्र शासनाने ठरविले आहे. अमरावती जिल्हयात दारिद्रय रेषेखाली जीवन जगणाऱ्या कुटुंबाची गणना मार्च १९८२ ते जून १९८३ या काळात घेण्यात आली. जिल्हयामध्ये एकूण १,३०,६४५ कुटूंबे दारिद्रय रेषेखालील कुटूंबांना राष्ट्रीयकृत व इतर बँकाकडून कर्जस्थाने मदत मिळवून देऊन त्यांची आर्थिक परिस्थिती सुधारण्यास हातभार लावणे हा या कार्यक्रमाचा मूळ उद्देश आहे. हा कार्यक्रम राबविण्यासाठी शासनाने जिल्हा पातळीवर जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा स्थापन केली आहे. या योजने अंतर्गत १९८२-८३ मध्ये ९९.५९ लाख रुपये सन् १९८३-८४ मध्ये १२.९९ साठा व १९८४-८५ मध्ये १३८.४७ लाख रुपये खर्च करण्यात आले.

संजय गांधी स्वावलंबन योजना :- जिल्हयातील बेकारांना त्यांचा स्वतंत्र व्यवसाय सुरु करण्याकरिता संजय गांधी स्वावलंबन योजनेअंतर्गत महसूल विभागामार्फत प्रत्येकी २,५०० रुपये पर्यंत कर्जाचे वाटप करण्यात येते. त्याकरिता प्रत्येक तालुक्या मध्ये स्वतंत्र समिती स्थापन करण्यात आलेली आहे.

कामगार व शेतमजूर

रोजगार :- जिल्हयामध्ये निरनिराळ्या उद्योगा मधील एकूण रोजगार मार्च १९८५ अखेर ५६,१३७ असून त्यात १३०२५ खाजगी २६,०६० निम शासकीय व १७,०५२ शासकीय आहे. म्हणजेच सार्वजनिक क्षेत्रामध्ये ७० टक्के व खाजगी क्षेत्रामध्ये ३० टक्के इतके आहे.

सेवा योजन केंद्र :- सेवा योजन केंद्रातील आकडेवारीवरुन स्पष्ट होते की , सन् १९८४-८५ मध्ये ६८.९९ कामगारांनी काम मिळविण्याकरिता नांवे नोंदली आहेत. त्यापैकी फक्त ८०२ व्यक्तींना काम मिळाल्याचे दिसून येते.

मजुरीचे दर :- सन् १९८२-८३ आणि १९८४ या वर्षामध्ये कुशल कारागीर उदा. सुतार, लोहार, चांभार, यांचे अनुक्रमे सरासरी मजुरीचे दर १५ रुपये १८ रु.आणि १९ रुपये ५० पैसे होते. तसेच अकुशल कामगार उदा. शेतमजुर इतर मजूर व गुराखी यांना सन् १९८२ , १९८३ व १९८४ मध्ये देण्यात आलेले मजुरीचे दर ५ रुपये २२ पैसे ६ रुपये ४२ पैसे व ७ रुपये ५८ पैसे होते.

पशुधन

पशुधन :- या जिल्हयामध्ये १९७८ च्या जनगणनेनूसार पशु धनाची संख्या ९६००५७ एवढी आहे. हीच पशू धनाची संख्या १९७२ मध्ये ७,८०,२२९ एवढी होती १९७८ च्या पशू गणनेप्रमाणे गायी व बैल ५९ टक्के म्हशी व रेडे ९ टक्के, मेंढ्या व बकऱ्या ३० टक्के व इतर पशूधन २ टक्के आढळून येते. १९७८ च्या पशुधनाचे प्रमाणे दर पीक कि.मी. मागे पशुधनाची संख्या ७८ आढळून येते. १९७२ ते ७८ या ६ वर्षाच्या काळात पशुधनाची संख्या २३ टक्क्यांनी वाढल्याचे आढळून येते. कुक्कुट संस्थेमध्ये १९७२ च्या तुलनेत १९७८ मध्ये ६२ टक्क्यांनी वाढ झाल्याचे आढळते. याचे प्रमुख कारण म्हणजे शेतीला

जोड धंदा म्हणून विस्तृत प्रमाणात ग्रामीण कुकुट पालनाचा व्यवसाय करण्यात येतो.

पशु उत्पादन व दुग्ध उत्पादन :- चिखलदरा व धारणी या तालुक्यात गौ पालन प्रामुख्याने केले जाते. म्हशीच्या बाबतीत सर्वात जास्त म्हशी ह्या स्थानिक जातीच्या असून त्या नागपूरी किंवा एलीचपूरी म्हणून ओळखल्या जातात. पुन्हा मध्ये अमरावती दुध योजनेमार्फत २९६ लक्ष किंमतीचे ९७३३ हजार लिटर दूध खरेदी करण्यात आले.

पशू वैद्यकीय सेवा :- १९८४-८५ यावर्षी जिल्हयामध्ये ३ पशू रुग्णालये २३ दवाखाने, ६४ मदत केंद्रे व ६५ कृत्रिम रंजन केन्द्र होती. या शिवाय या जिल्हयात विस्तार कार्य व प्रात्याक्षिकाकरिता २ फिरते पथक आहेत. १९८४-८५ यावर्षी इस्पीतळे व दवाखाने व मदत केन्द्रामध्ये उपचार केलेल्या पशूची संख्या ३२९११८ एवढी आहे. तसेच कृत्रिम रंजन केन्द्रामध्ये उपचार केलेल्या पशुची संख्या ३३९११८ एवढी आहे. तसेच कृत्रिम रंजन केन्द्रामध्ये एकूण ९७४९ जनावरावर कृत्रिम गर्भधारण करण्यात आली.

पशु धन विकासाचे कार्यक्रम :- पशुधन विकासाचे कार्यक्रमाअंतर्गत जिल्हा योजनेखाली अनेक कार्यक्रम राबविले जातात. त्यापैकी (अ) तोंड व वा-- रोगाचे नियंत्रण (ब) वेरण प्रात्याक्षिक आयोजित करणे (क) विशेष पशु सुधार प्रकल्प (ड) संकरीत कालवडी पोषाण्यासाठी अर्थ सहाय्य (इ) कोंबड्यांच्या पिल्लांचे वाटप करणे (ई) गोकूळ ग्राम योजना (फ) दुर्बल घटकांना व त्या जनावरांच्या पुरवठा इत्यादी योजना महत्वाच्या होत.

आरोग्याच्या सोई

जिल्हयामध्ये सार्वजनिक आरोग्याचे दृष्टीने वैद्यकीय सेवा ही शासनातर्फे, जिल्हा परिषदेतर्फे नगरपरिषदे तर्फे तसेच धर्मदास संस्थेतर्फे उपलब्ध करुन दिल्या जाते. अमरावती जिल्हामध्ये सन.१९८४-८५ मध्ये एकूण २८ रुग्णालये, १६७ ग्रामीण दवाखाने व सुतिका गृह ३१ व ३२ प्राथमिक आरोग्य केंन्द्र कार्यरत असलेली होती.

जन्म मृत्यूचे प्रमाण:- अमरावती जिल्हामध्ये ३१-३-८५ रोजी एकूण १६ कुटुंब नियोजन केंन्द्र कार्यान्वित होती.सन.१९८४-८५ मध्येक निर्बीजीकरण केलेल्यांची संख्या १४ व

१६ होती यात ७९१४ शल्क शस्त्रक्रिया व ६२२१ स्त्रियावरील समाविष्ट आहे.शिवाय २२,२४ स्त्रिया लुप पध्दतीचा वापर करीत असल्याचे आढळते. हा कार्यक्रम लोकसंख्येला आळा घालण्याचे दृष्टीने महत्वाचे आहे.

रस्ते वाहतूक व दळणवळण

लोहमार्ग:- अमरावती जिल्हात एकेरी लोहमार्ग १० कि.मी.व दुहेरी लांबी रुंद मार्ग ८०.१९ कि.मिटरचे लांबीचे लोहमार्ग ३८.७८ कि.मी.व अरुदं लोहमार्ग अमरावती शहर बडनेरा मार्ग व हावडा (कलकत्ता) या प्रमुख शहरांना रेल्वे मार्गाने जोडले आहे.

रस्त्याची लांबी:- अमरावती जिल्हामध्ये मार्च १९८५ पर्यन्त राज्य व जि.प.मालकीचा ३५७६ कि.मी.नगरपरिषद मालकीचे ६८३ कि.मी.व अरुंद लोहमार्ग ग्रामीण भागात ८५० कि.मी.व नागरी भागात १४७ कि.मी.लांबीचे रस्ते डांबरीकरण केलेले होते.

नोंदणी करण्यात आलेले वाहने:- जिल्हयामध्ये निरनिराळ्या प्रकारची नोंदणी झालेल्या मोटार वाहनांची संख्या १९८५ अखेर २५,३५७ एवढी आहे.त्यात मोटार सायकली व स्कुटर्स ६९ टक्के,मोटारी व जीपस ९ टक्के इतर वाहन आहेत.

फलोत्पादन व वनीकरण

या जिल्हामध्ये सन १९८३-८४ मध्ये भाजीपाल्याखाली एकूण क्षेत्र एकूण पिकाखाली क्षेत्राच्या १.८६ टक्के होते. तसेच फळे या पिकाखालील क्षेत्रात एकूण पिकाखालील क्षेत्राच्या ०.३६ टक्के होते.---१९८३-८४ मध्ये एकूण फळाच्या पिकाखालील क्षेत्र १३७१३ हेक्टर होते. त्यापैकी संत्री या पिकाखालील क्षेत्र ८९.६५ टक्के .केळी खालील ३.६९ टक्के. पपईखालील ०.९० टक्के.लिंबू वर्गीय पिके ३.०४ टक्के आणि इतर २.२६ टक्के एवढे होते. संत्र्याचे पीक प्रामुख्याने वरुड आणि अचलपूर या तालुक्यात होते. तर केळीचे पिक अंजनगाव सुर्जी या तालुक्यात होते.

व्याप्ती:- जिल्हया मध्ये एकूण ३,७४५.१७ चौ.कि.मी.जंगल व्याप्त क्षेत्र जिल्हयाच्या एकूण क्षेत्रपैकी हे क्षेत्र ३०.६६ टक्के आहे.या जिल्हयातील बहुतांश वन भाग हा जिल्हयाच्या मोर्शी, वरुड,धारणी व चिखलदरा या तहसिली मध्ये मोठ्या प्रमाणात

विखुरलेली आहे.

वनोत्पादन:- धारणी या तालुक्यात उत्तम प्रकारचे ईमारती सागवान तर चिखलदरा तालुक्यात बांबू आणि मोर्शी व वरुड तालुक्यात धावडा,सालई,तेंदु ईत्यादी जातीची झाडे आहेत.या जिल्हातील जंगलात येन,तेल,कडम,---,मोह,बेहडा,इत्यादी वनस्पतीचे उत्पान होते. तसेच जंगलामध्ये रोसा,गोहेल,कुंसल,प्रमुख जातीचे गवत उगवते. वनोत्पादनापासून १९८२-८३,८३-८४ मध्ये अनुक्रमे .

१८१२.७०,१८६३.८१ व १७५९.६० लाख रुपये उत्पन्न मिळते.

जंगल विकास कार्यक्रम :-उष्णता जोराच्या ----निचरा व पूर या पासून जंगले जमीनीचे संरक्षण करतात याशिवाय जमिनीचा क स टिकविण्याकरीता सहत्वाची कामगिरी बजावतात. जंगल विकास करिता जंगल खात्याव्दारे खालील प्रमाणे योजणा राबविल्या जातात.

अ)मध्यवर्ती रोप मळयाची स्थापना.

ब)निकृष्ट वनाचे पुर्नवनिकरण.

क)वनसमूह योजना व वन संरक्षण.

अमरावती जिल्हायातील विशेष योजना.

मेळघाट व्याघ्र प्रकल्प

अमरावती जिल्हयातील मेळगाट येथे वाघांच्या आरक्षणाची शास्त्रशुध्द धडण करता यावी, म्हणून महाराष्ट, राज्य वन विभागांनं वन्य प्राण्यांच्या व्यवस्थेसाठी एक योजमा स्थापन केली.व्याघ्र प्रकल्पात महाराष्ट्रातील मेळघाट अरण्याची निवड होणे ,ही अत्यंत अभिमानाची बाब होय. --वाघांच्या आदर्श वस्तीस्थानात वाघांची व त्यांचे भक्ष्य असणाऱ्या इतर वन्य पशुंची जोपासना करणं आणि जीवशास्त्रद्रृष्टया महत्वाची असलेली कामं जनतेच्या शिक्षणासाठी व मनोरंनासाठी राष्ट्रीय वारसा म्हणून सुरक्षित ठेवणं, ही प्रमुख उद्दिष्ट ह्या प्रकल्प योजनेची आहेत.

मेळघाट वन क्षेत्राची निवड व्याघ्र प्रकल्प राबविण्यासाठी इ.स.१९७९ मध्ये करण्यात आली. अमरावती वन मंडळाच्या पूर्व व पश्चिम मेळघाट वन विभागात हे '' आरक्षण क्षेत्र'' बसल आहे.अमरावती जिल्हाच्या मेळघाट तालुक्यातील हा डोंगराळ प्रदेश निसर्ग सौदर्य संपन्न अशा धनदाट जंगलाने व्याप्त असून सातपूडा पर्वताच्या दक्षिण शाखेत मोडतो. व्याभ प्रकल्पाच्या मध्य क्षेत्रात कोणत्याही प्रकारची वृक्षतोड,वनराई व मानवी रहदारी यास सक्त बंदी आहे.तसेच मध्यलगत क्षेत्रामध्ये मात्र वनविषयक काम हाती घेतली जातात.मेळघाट जंगलात सागवान जातीची झाडं विपूल प्रमाणात आहेत,तर त्यांच्या सोबतीला हलद,धावडा,साजड,लेंडया व कलम इत्यादी जातीची झाडही आढळतात. मेळघाटातील सर्वात उंच शिखर विराट असून समुद्र सपाठीपासून उंची ११७७.७५ मिटर इतकी आहे.

व्याघ्र प्रकल्पातील वाघांची संख्या मोजण्यासाठी १९७४ हे आधारभूत वर्ष धरण्यात आलं होतं. १९७४ मध्ये मेळघाट परिसरात ३२ वाघ होते. वाघांच्या संख्येत वर्षानुवर्ष वाढच होत गेली असून १९८५ मध्ये वाघांची संखया ८० झाली. म्हणजे या दहा बारा वर्षाच्या कालावधीत ४८ वाघांची वाढ झाली आहे. मंळघाट जंगल परिसरात पाळीव जनावरांची संख्या सुमारे १६ हजार ७४३ इतकी आहे. शिवाय मेळघाटात गवा, सांबर, निलगाय, चित्तल, चौसिंगा, भेडकी, जंगली डुक्कर वानर, जंगली कुत्ता आणि मोर हेही प्राणी आढळतात.

प्रकल्प क्षेत्रातील वन्य प्राण्यांना विपूल प्रमाणात चारा व पाणी उपलब्ध करुन देण्यात येता. प्रकल्प क्षेत्रात भव्य प्रमाणावर विविध वृक्षाचे बिजारोपण करण्यात येत आहे. वन्य प्राण्यांना सकस व पोषक प्रथिने उपलब्ध व्हावीत, म्हणून मोक्याच्या ठिकाणी कृत्रिम क्षार चाटणे ठेवण्यात येतात. जनावरांना पिण्याचे पाणी वहण उपलब्ध व्हावे म्हणून प्रकल्प परिसरातील नद्यावर पाणी अडविण्यासाठी मातीचे कच्चे बंधारे बांधण्यात येतात. वन्य प्राण्यांना निवारा व त्यांच्या प्राकृतिक गरजांसाठी आवश्यक तिथे आच्छादने तयार करण्यात येतात.

अप्पर वर्धा प्रकल्प

अमरावती जिल्हयात सिंचनाची सोय उपलब्ध करुन हरितक्रांतीचे स्वप्न साकार करण्याच्या दृष्टीने वर्धा नदीवर मोर्शी तालुक्यातील शिंभोरा गावाजवळ धरण बांधून उर्ध्व वर्धा प्रकल्पाचे काम हाती घेण्यात आलं आहे. प्रकल्पाच्या प्रत्यक्ष कामास १९७६ साली सुरुवात झाली आहे. आता पर्यंत माती धरणाचे काम ८० टक्के व दगडी धरणाचं काम २७ टक्के पूर्ण झालं आहे. उजव्या कालव्याची ४० किलो मीटर व डाव्या कालव्याची ४२ कि. मीटर पर्यंतची कामं चालू आहेत.

या प्रकल्पामुळं मोर्शी तालुक्यातील १३ गावात, २४२० हेक्टर, चांदूर रेल्वे तालुक्यातील ७२ गावात ३२३५० हेक्टर, तिवसा तालुक्यातील ९६ गावात २३७३० हेक्टर तसेच आर्वी व कारंजा तालुक्यातील ९२ गावातं १६५०० हेक्टर क्षेत्रातील शेतीला पाणी पुरवठा होवू शकले. तसेच मोर्शी, वरुड, नांदगावपेठ, अमरावती आणि बडनेरा या नावांना या धरणाच्या जनाशयातून पिण्याच्या पाण्याचा पुरवइा करण्यात येईल.

या प्रकल्पावर आता पर्यंत ७२ कोटी रुपये खर्च झाला आहे. धरणाचे बांधकाम १९८८ पर्यंत तसेच कालवे आणि वितरीकांची कामं १९९० पर्यंत पूर्ण होतील, अशी अपेक्षा आहे.

अमरावती पाणी पुरवठा योजना

सन् १९८३ सालापासून अमरावती शहराला अप्पर वर्धा योजनेतून पारणी पुरवठा उपलब्ध करुन देण्याची योजना व अमरावती शहरातील जल:निसारणाची योजना एकत्रीतरित्या तयार करुन, केंद्रसरकार व जागतिक बँक यांच्या अर्थसहाय ने अंमलात आणण्याचे दृष्टीने प्रयत्न चालू होते.

शहराची सध्याची पाणी पुरवठ्याची समस्या दिवसेंदविस उग्र स्वरुप धारण करीत आहे. वेळीच मंडळाने वेगवेगळ्या पातळयांवर शासनाच्या निदर्शनास ही परिस्थिती आणून दिली. स्थानिक प्रतिनिधींनी सुध्दा शासनाचे ह्या समस्येकडे लक्ष वेधले. शासनाने गेल्या चार वर्षात तातडीच्या पाणी पुरवठा योजनांकरिता --- कोटी रुपये

मंजूर केलेत. परंतु त्यातून ---- योजना केल्या. ह्या शहराची वाढती पाणी पुरवठ्याची गरज लक्षात घेता --- आहेत व अप्पर वर्धा धरणातून पाणी उपलब्ध होईपर्यंत भूगर्भातील पाण्याच्या साठ्यावरच अजूनही कमीतकमी पांच वर्षे काढावी लागणार आहेत. ह्या बाबी लक्षात घेवून मंडळाने फक्त पाणी पुरवठा योजनेवरील अत्यावश्यक खर्चाच्या प्रस्ताव शासनास सादर केला व राज्य शासनाने तो मंजून केला. अश्या ह्या योजनेचा शुभारंभ जलकुंभाचे भुमीपूजनाने महाराष्ट्राचे आदरणीय मुख्यमंत्र्याच्या हस्ते झाला आहे.

सुमारे ५५ कोटी रुपयांच्या ह्या पाणी योजनेत अप्पर वर्धावरुन पाईप लाईन टाकणे, नेरपिंगळाईच्या टेकडवर पाणी शुध्दीकरण करणं, अमरावती शहरात सुमारे १५ ते २५ लक्ष मिटर क्षमतेचे सात जलकुंभ बांधणे इत्यादी कामांचा समावेश आहे.

रोजगार हमी योजना :- राज्य शासनाद्वारे रोजगार हमी योजना ही अत्यंत महत्वाची अशी योजना राबविण्यात येत आहे. या योजनेनुसार दिनांक २० डिसेंबर १९७४ रोजी विधी मंडळाच्या दोन्ही सभा गृहांनी मंजूर केलेल्या प्रस्तावातील तरतूदींना अनुरुप असलेल्या अशा विशिष्ट अटीवर ग्रामीण अकुशल कामगारांना रोजगार हमीची तरतुद ज्यामध्ये आहे अशा कामगार हमी योजनेअंतर्गत अमरावती जिल्हयामध्ये १९८२-८३ साली २८६.१८ लाख रुपये १९८३-८४ --- लाख रुपये व १९८४-८५ साली ३२०.७६ लाख रुपये खर्च करण्यात आला.

दुर्बल घटकांचा विकास

कमजोर घटकाचे कल्याण

महाराष्ट्र शासनाकडून निरनिराळ्या उपक्रमाद्वारे कमजोर घटकांचे कल्याणकरिता निरनिराळ्या योजना जिल्हास्तरावर राबविल्यास जातात. उदा. ग्रामीण क्षेत्रातील भूमीहीन मजुरांना घरे बांधण्यासाठी जागा देणे व झोपड्या बांधणे, शेतीच्या विकासाकरिता विहीरी बांधण्याकरिता पंप बसविण्याकरिता कर्जास्थाने पैसा उपलब्ध करुन देणे व अनुदान देणे, तसेच मागासवर्गीयांचे कल्याण करिता मागासवर्गीय

विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्क व परिक्षा शुल्क देणे, माध्यमिक शाळेत शिकण्याऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्या देणे, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेतील मागासवर्गीय विद्यार्थ्यांना विद्यावेतन देणे, माध्यमिक शालांत परिक्षेत्तर शिष्यवृत्या देणे, आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शैक्षणिक सवलती, आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना माध्यमिक परिक्षेत्तर स्तरावर गुणवत्ता शिष्यवृत्ती देणे ईत्यादी महत्वाच्या होत. याशिवाय समाजकल्याण विभागामार्फत देखील बरेचसे इतर कार्यक्रम राबविले जातात. याकरिता अमरावती जिल्ह्यामध्ये सन् १९८२-८३ मध्ये ४२.८३ लाख रुपये सन् १९८३-८४ मध्ये ४९.१६ लाख रुपये व १९८४-८५ मध्ये ६८.५० लाख रुपये खर्च करण्यात आलेले आहेत.

विशेष घटक योजना :- माननीय पंतप्रधानाच्या २० सुत्री कार्यक्रमाअंतर्गत बाब ७ मध्ये विशेष घटक योजना समाविष्ट करण्यात आली असून महाराष्ट्र शासनाच्या दिनांक ---- च्या निर्णयान्वये ही योजना सुरु करण्यात आली आहे. ह्या योजनेअंतर्गत प्रत्येक समिती मधून ८२-८३ मध्ये ७०., ८३-८४ मध्ये १३, व १९८४-८५ मध्ये ३५ या प्रमाणे एकूण जिल्ह्यातून अनुक्रमे १९८२-८३ मध्ये ९१०, १९८३-८४ मध्ये १६९ व १९८४-८५ मध्ये ४५५ अनुसूचित जाती व नवबौध्द शेतकऱ्यांची निवड करण्यात आलेली आहे. ज्या अनुसूचित व नवबौध्द कुटुंबाजवळ ६ हेक्टर पर्यंत जमीन आणि ज्या कुटुंबाचे शेती व्यतिरिक्त इतर वार्षिक उत्पन्न ३,६०० रुपये पेक्षाकमी असेल अशाच कुटुंबाना ही योजना लागू आहे. प्रत्येक अशा कुटूंबाकरीता एकूण ९,६५० रुपयाचे अनुदान ३ ते ४ वर्षामध्ये जमीन सुधारणा, सुधारीत अवजारे, बैलजोडी व बैलगाडी, निविष्ठा संच पुरवठा व लघू सिचंन या बाबीवर खर्च करण्याकरिता देण्यात येते.

एकात्मिक ग्रामीण विकास योजना :- जिल्हयातील दारिद्रय रेषेखालील जगणाऱ्या कुटूंबाना आर्थिक सहाय्य देऊन त्यांचे राहणीमान उंचीवण्याकरिता एकात्मिक ग्रामीण योजना राबविण्याचे केंद्र शासनाचे धोरणानुसार २० कलमी कार्यक्रमातील ३ ऱ्या कलमानुसार महाराष्ट्र शासनाने ठरविले आहे. अमरावती जिल्ह्यात दारिद्रय रेषेखालील जीवन जगणाऱ्या कुटूंबाची गणना मार्च १९८२ ते जून १९८२ या काळात येण्यात आली. जिल्ह्यामध्ये एकूण १,३०,६४५ कुटूंबे दारिद्रय रेषेखाली जीवन जगतात असे निदर्शनास

आले. ह्या योजनेअंतगत दारिद्रय रेषेखालील कुटूंबांना राष्ट्रीयुयकृत व इतर बँक कडून कर्जस्थाने मदत मिळवून देऊन त्यांचे आर्थिक परिस्थिती सुधारण्यास हातभार लावणे हा या कार्यक्रमाचा मूळ उद्देश आहे. हा कार्यक्रम राबविण्यासाठी शासनाने जिल्हा पातळवर जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा स्थापन केली आहे. या योजनेअंतर्गत १९८२-८३ मध्ये ९९.५९ साख रुपये सन् १९८३-८४ मश्ये १३७.९९ लाख रुपये व १९८४-८५ मध्ये १३८.४७ लाख रुपये खर्च करण्यात आले.

संजय बांध स्वावलंबन योजना :- जिल्ह्यातील बेकारांना त्यांचा स्वतंत्र व्यवसाय सुरु करण्याकरिता संजय गांधी स्वावलंबन योजनेअंतर्गत महसून विभागामार्फत प्रत्येकी २,५०० रुपये पर्यंत कर्जाचे वाटप करण्यात येते. ह्याकरिता प्रत्येक तालुक्यात स्वतंत्र समिती स्थापन करण्यात आलेली आहे.

जिल्ह्यात प्रत्यक्ष जमा झालेला महसूल :- महसूल विभागामार्फत जमीन महसूल गोळा करण्यात येतो. १९८२-८३ मध्ये २५.३८ लाख रुपये . सन् १९८३-८४ मध्ये ११.६१ लाख रुपये व १९८४-८५ मध्ये परत ४.८१ लाख रुपये जमीन महसूलाची वसुली झालेली आहे. जमीन महसूलाची वसूली कमी झाल्याचे मुख्य कारण जिल्ह्यातील काही गांवे अवर्षणग्रस्त घोषीत करण्यात आलेली होती हे होते.

करमणूक (चित्रपट) करापासून अमरावती जिल्ह्याला १९८२-८३ मध्ये ९६.०६ लाख रुपये १९८३-८४ मध्ये १२६.२५ लाख रुपये व १९८४-८५ मध्ये १५१.८४ लाख रुपयांचे उत्पन्न मिळाले.

गृहनिर्माण योजना :- जिल्ह्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकासाठी ''गृहनिर्माण योजना'' -- गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळामार्फत राबविण्यात आली या योजनेवर १९८२-८३ मध्ये ४६.७२ लाख रुपये १९८३-८४ मध्ये ८.९३ लाख रुपये व १९८४-८५ मध्ये १५.३६ लाख रुपये खर्च करण्यात आले आहेत.

मत्स्य व्यवसाय

मत्स्योत्पादन :- अमरावती जिल्ह्यामध्ये एकूण २.८६० हेक्टर क्षेत्र हे मत्स्योत्पादनासाठी

अनुकूल आहे. या शिवाय ९२५ कि.मी. लांबीचे नदीचे पात्र देखील मत्स्य व्यवसायासाठी उपयुक्त आहे. १९८४-८५ मध्ये ७३६.५० लाख रुपये मुल्याचे ७३० मे.टन भूजल मत्स्योत्पादन करण्यात आले. तसेच पांडवा (तहसिल धारणी) व वासलापूर (तहसिल चांदूर रेल्वे) येथे मत्स्यबिज उत्पादन केंद्र स्थापन करण्यात आले असून त्यापासून तलावात साठविण्यासाठी मत्स्यबिज पुरविण्यात येते.

मत्स्योत्पादन विकासाचे कार्यक्रम :- जिल्ह्यामध्ये मत्स्य व्यवसायाचा विकास करण्यासाठी जिल्हा योजने अंतर्गत निरनिराळे कार्यक्रम राबविले जातात. उदा. मच्छीमार युवकांना प्रशिक्षण देणे. अवरुध्द पाण्यातील मत्स्य सर्वधन मच्छीमार साधनांच्या खरेदीवर अर्थ सहाय्य, मत्स्य व्यवसाय सहकारी संस्थांना भाग भांडवल मच्छीमारांना विमाा उतरविण्यासाठी अनुदान इत्यादी.

अधिकोष

अमरावती जिल्हयामध्ये वर्गीकृत अधिकोष शाखांची संख्या सन् १९८३ अखेर एकूण ९६ होती. त्यापैकी ४ टक्के नागरी भागात ५९ टक्के शाखा ह्यां ग्रामीण भागात होत्या. दर लाख लोकसख्ये मागे १४ अधिकोष शाखा कार्यालये येतात.

वाचनालये :- अमरावती जिल्ह्यामध्ये निरनिराळ्या संस्थेकडून वाचनालये चालविण्यात येतात. ह्यात नगर वाचनालय ह्या महत्वाच्या वाचनालयाचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल.

पोलिस गुन्हे :- अमरावती जिल्ह्यामध्ये अंतर्गत सुरक्षितेच्या दृष्टीने ३२ पोलिस ठाणी, १५ आऊट पोस्ट आहेत. १९८४ मध्ये एकूण ९२३४ गुन्ह नोंदविण्यात आले. त्यापैकी सर्वात जास्त मालमत्ता विषयक किरकोळ गुन्हे (३५२५) आहेत. या खालोखाल व्यक्ती विषयक गंभीर गुन्हे नोंदविण्यात आहे. त्यापैकी सर्वात जास्त मालमत्ता विषयक गंभीर गुन्हे (१५६५) आणि व्यक्ती व मालमत्ता विषयक किंवा फक्त मालमत्ता विषयक गंभीर गुन्हे (१२३९) आहेत.

करमणूक :- आढावा वर्षात अमरावती जिल्हयामध्ये एकूण २६ कायम --- चित्रपटगृहे

व --- चित्रपटे गृहे होती. दर लाख लोकसंख्ये मागे हे प्रमाण साधारणत: ४ पडते. अमरावती जिल्ह्यामध्ये चिखलदरा व कोलखास हे प्रेक्षणीय स्थळे असून ऋणमोचन, कौंडण्यपूर, रिध्दपूर, नांदगावं खंडेश्वर, कोंडेश्वर, मुक्तागिरी व सालबर्डी इत्यादी धार्मिक स्थळे आहेते.

(हिंदुस्थान रविवार दि.२६ जानेवारी १९९७)

झुणका भाकर योजना महत्वाकांक्षी ठरली

एका रुपयात मिळणारी झुणकाभाकर कष्टकरी समाजाची - गरज

- रिकाम्या हाताला काम मिळाले.

- गरिबाच्या पोटात समाधानाचे दोन घास पडले

- वाढत्या महागाईत सर्वसामान्य माणसाला दिलासा मिळाला

- महाराष्ट्रात राज्य देशातील एकमेव राज्य ठरले.

परतवाडा

रिकाम्या हाताला काम देत उपाशी पोटी झोपणाऱ्या गरीबाच्या पोटात दोन घास समाधानाचे टाकणारी एक रुपयातील 'झुणका भाकर' आता वाढत्या महागाईत सर्वसामान्य माणसाला दिलासा देणारी एक महत्वाकांक्षी योजना ठरली आहे.

एका रुपयात पोटाला आधार देणारी कुठलीही वस्तू बाजारात मिळत नाही. असे असतांना या 'झुणका भाकर' योजनेत एक रुपयात दोन भाकरी आणि पुरेसा झुणका मिळत असल्यामुळे गरजूंची एकवेळची गरज भागते. त्यामुळे ती झुणका भाकर साऱ्या कष्टकरी समाजाची गरज बनली असून देशातील ही एकमेव चळवळ झपाट्याने वाढत आहे. राज्यातील दोन हजारा पेक्षा जास्त केंद्रामधून सहा लाखाहून अधिक लोकांना त्यांचा प्रत्यक्ष लाभ मिळत आहे. तर एका झुणका भाकर केंद्रावर मालक व अन्य दोन राबणाऱ्या व्यक्ति गृहीत धरल्यास सहा हजार लोकांना-प्रत्यक्ष अप्रत्यक्ष रोजगार उपलब्ध झाला आहे. त्यांची आर्थिक समस्या सुटली आहे.

सुरवातीला एस .टी. बसस्थानकांवरील उपहारगृहांतून मिळणारी ही झुणका भाकर आता कृषी उत्पन्न बाजार समिती, जिल्हाधिकारी, तहसील व उपविभागीय अधिकाऱ्यांच्या कार्यालयीन परिसरात, न्यायालयीन परिसरात, बाजाराच्या ठिकाणी, गर्दीच्या ठिकाणी एवढेच नव्हे तर काही प्रमुख चौकावर उभारल्या गेलेल्या झुणका भाकर केंद्रावर उपलब्ध झाली आहे. कामानिमित्त बाहेर गवावरुन सकाळी उपाशी पोटी निघालेल्या पासून तर कष्टकरी, आणि शालेय विद्यार्थ्यांच्या पोटालाही ती झुणका भाकर आधार देत आहे.

शाळेच्या फाटका समोर उभ्या राहणाऱ्या हातगाड्यावरील तळले तुपकट आरोग्यास अपायकारक पदार्थ खाण्याऐवजी काही शाळकरी मुले जवळच असलेल्या झुणका भाकर केंद्रावर जावून मधल्या सुट्टीत लागलेली भूक शमवितात. त्या झुणका भाकरीचा मनमुराद आानंद लुटतात. एवढ्यावरच ही झुणका भाकर थांबली नाही. मोठमोठे अधिकारी पत्रकार मंडळीना सुध्दा या झुणका भाकरीचा मोह आवरता आलेला नाही.

अचलपूर येथे आयोजित पहिल्या भल्या मोठ्या लोकन्यायालया प्रसंगी जिल्ह्याचे जिल्हाधिकारी डॉ. विजय सतबीर सिंग यांनी एस.डी.ओ. ए.ए.खान व पत्रकार मंडळी समवेत झुणका भाकरीचे जेवण घेतले. अचलपूरचे तहसीलदार दिनकरराव काळे हे ही गरीब कष्टकरी मंडळीच्या समवेत कित्येकदा तहवील परिसरातील झूणका भाकर केंद्रावरील त्या झुणका भाकरीचा आस्वाद घेतांना दिसतात. तर मेळघाटातील कुपोषणा दरम्यान मा. मुख्यमंत्री मनोहरपंत जोशी कुपोषणा ग्रस्त बेलखेडा या आदिवासी गावात येणार म्हणून जमलेल्या जवळपास सर्वच पत्रकारांनी, पदाधिकाऱ्यांनी, अधिकाऱ्यांनी गावकऱ्यांत समवेत एकएक रुपया खर्च करुन भाकर केंद्रावरील झुणकाभाकर विकत घेतली. त्यामुळे सुरुवातील शहराच्या ठिकाणी आलेली ही केंद्रे आता ग्रामीण भागतही पोहचली आहेत. आदिवासी गावांमध्ये सुरु झाली आहेत.

अशी ही योजना

झुणका भाकर केंद्रावर विकल्या जाणाऱ्या प्रत्येक झुणकाभाकरी मागे एक रुपया

शासनाकडून दिल्या जातो. त्यामुळे प्रत्येक झुणका भाकरी मागे १ रुपया गरजूकडून तर १ रुपया शासनाकडून असे २ रुपये विक्रेत्याला मिळतात. तर केंद्र उभारतांना त्याला लागणारी मोक्यावरची जागा त्यांचे पसंतीनुसार शासनाने विनामुल्य उपलब्ध करुन दिली आहे, यातून अनेक महिला, मंडळ, समाजसेवी संस्था व व्यक्ती ही झुणकाभाकर केंद्र चालवित आहेत.

मुंबई वगळून उर्वरीत महानगर पालिका क्षेत्रातील प्रत्येक केंद्राला ५०० रुपये, जिल्हा मुख्यालयातील प्रत्येक केंद्राला ४०० रुपये तालुका स्तरावरील प्रत्येक केंद्राला ३०० रुपये व इतर मोठ्या गावातील केंद्राला २०० रुपये दररोज या प्रमाणात मंजूर केल्या जाते. एका भाकरी मागे एक रुपया अनुदान देतांना वरील मर्यादा घालून दिली आहे. घालून दिलेल्या मर्यादेपेक्षा अधिक होणाऱ्या झुणकाभाकरीची जबाबदारी त्या केंद्रचालकाकडे सोपविण्यात आली आहे.

या निर्धारीत अनुदाना सोबतच झुणका भाकर केंद्र सुरु करण्यासाठी विनामुल्य दिल्या गेलेल्या २०० चौरसफुटाच्या जागेवर केंद्र उभारण्यासाठी २५ हजार रुपयाचे अनुदान एक रक्कमी देण्यात आले आहे.

प्रत्येक जिल्ह्यात सरासरी ६० झुणका भाकर केंद्र विचारात घेतले तर अमरावती विभागात अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलढाणा मिळून जवळपास २५० केंद्र चाविल्या जात आहेत. तर एका जिल्ह्यात १७ ते १८ हजार गरजू गृहीत धरल्यास एकट्या अमरावती विभागात जवळपास ७५ हजार लाभार्थींना या योजनेचा प्रत्यक्ष लाभ पोहचत आहे.

राज्यभर यशस्वी ठरलेल्या आणि सर्वसामान्य कष्टकरी गरजूला प्रत्यक्ष लाभ पाहचविणाऱ्या या महत्वाकांक्षी योजनेवर अनुदानापोटी दर महिन्याला राज्यशासनाने दिड कोटी रुपये खर्च होत आहेत. एवढेच नव्हे तर अर्थसंकल्पात २२ कोटी रुपये जादा तरतूद झुणकाभाकर केंद्राकरीता राज्य शासनाने केली आहे.

राज्यातील गरीबाला उपाशी पोटी रहावे लागू नये हाच या मागील उद्देश असता

यातूनच भुकेलेल्या गरजूला अन्न पुरविण्यात ही शासकीय योजना परिणामकारक ठरली आहे. देशातील ही एकमेव योजना असून स्वबळावर राबविणारे महाराष्ट्र राज्य एकमेव राज्य ठरले आहे. देशातील अन्य राज्ये सुध्दा या योजनेची चौकशी करत आहेत. अनेकांनी माहितीही नेली आहे. यातूनच या योजनेचे नेत्रदिपक यश झळकत आहे. महाराष्ट्र राज्यात ठिकठिकाणी गावागावात शहरा शहरात एक रुपयात झुणकाभाकर देणारी स्थायी स्वरुपात झुणका भाकर केंद्र मोठ्या दिमाखात उभी आहेत.

जागतिक एड्स दिन

१ डिसेंबर, जागतिक एड्स दिनानिमित्त एड्स या महाभयानक व झपाट्याने पसरत असलेलया रोगाविषयी प्रस्तुत लेख सादर करीत आहोत.

एड्सचा ज्वालामुखी नियंत्रणात आणावयाचा असेल तर, सर्व विश्वातील नागरिकांनी बंधुत्वाची भावना, एकतेची भावना उराशी बाळगून, आपली मते, वैमनस्य बाजूला सारुन ''एकत्रितपणे'' संघटित होऊन एड्सच्याविरुध्द रचनात्मक कार्यक्रम हाती घेवून लक्ष देण्याची गरज आहे, असा संदेश जागतिक आरोग्य संघटनेने या वर्षीच्या जागतिक एड्स-दिनासंबंधी व्यक्त केला आहे. म्हणूनच या वर्षीच्या जागतिक एड्स-दिनाचे घोषवाक्य 'एक जग-एक आशा' असे आहे.

एड्सच्या या विळख्यातून संपूर्ण मानव मुक्त करण्यासाठी एड्स या भिषण आजारासंबंधी नेमकी माहिती पुरवावी व जनतेला एड्स बदल भीती न घालता सावध करावे ही या दिनाची किंवा सप्ताहाची खरी उपयुक्तता. जागतिक आरोग्य संघटनेच्या तज्ज्ञांच्या म्हणण्याप्रमाणे स्थूलमानाने वीस दशलक्ष लोकांना आज जगात एच.आय.व्ही. किंवा एड्सच्या विषाणूंनी ग्रासले असून दर मिनिटाला पाच नवीन व्यक्तींना एच.आय.व्ही. किंवा एड्सच्या विषाणूंनी ग्रासले असून दर मिनिटाला पाच नवीन व्यक्तींना एच.आय.व्ही. जीवाणूंचा संसर्ग होत असतो. ही आकडेवारी भीषण असली तरी विश्वातील सर्व जनतेने एकत्रित येऊन एकसंघपणे जर एड्सच्याविरुध्द लढा दिला, तर आपण निश्चितपणे एड्सचा जीवघेण्या आजाराला काबूत आणू शकतो.

अक्वायर्ड इम्यून डेफिशिअन्सी सिंड्रोम या चार शब्दांची आद्याक्षरे जोडून 'एड्स' हा शब्द तयार केला गेला आहो. लक्षण समुदायांना सिंड्रोम असे म्हणतात. या रोगात शरीरातील प्रतिकारशक्तीची यंत्रणा संपुर्णपणे कोलमडून पडते. एच.आय.व्ही. या नावाच्या विषाणूंमुळे या रोगाचा संसर्ग होतो. एड्सच्या रोगग्रस्त व्यक्तीशी संभोग किंवा समलिंगी मैथुन करणाऱ्या व्यक्तींना हा रोग होतो. रुग्णाच्या रक्तांत ह्या रोगाचे विषाणू असतात. लाळ, अश्रू, वीर्य, योनीस्त्राव या शरीरातील विविध स्त्रावातून बाहेर पडतात, हे विषाणू सुद्रढ व्यक्तीच्या त्वचेवर पडले तर संसर्ग होत नाही. परंतु सूक्ष्म जखमावर जडले तर त्याद्वारे हे विषाणू सुद्रढ माणसाच्या शरीरात प्रवेश करतात. संभोगात किंवा समलिंगी संभोगात सुक्ष्म जखमा होतात व त्यातून हे ------- दुसऱ्याने वापरली तर त्याद्वारे विषाणूंचा संसर्ग होऊ शकतो. एच.आय.व्ही. बाधित व्यक्तीने रक्तदान किंवा वीर्यदान केले असेल तर ते स्वीकारणाऱ्याला संसर्ग होऊ शकतो. मातेला एड्स असेल तर संसर्ग अर्भकात उतरतो. एड्स रोग्याचा टुथब्रश किंवा रेझर वापरला तर संसर्ग होऊ शकतो. कारण सुक्ष्म जखमांमधून विषाणू प्रवेश करु शकतात. पण रोग्यांनी हस्तांदोलन करणे, स्पर्श करणे, कपडे वापरणे, शेजारी बसणे यामुळे एड्स होत नाही. अन्न, पाणी, हवा, स्पर्श, खोकणे, डांस, ढेकूण यांच्या माध्यमातून 'एड्स' फैलावत नाही.

एड्स टाळण्यासाठी खालील खबरदारी घ्यावी

१) वेश्यागमन आवर्जून टाळावे.

२) अज्ञात व्यक्तीचे रक्त किंवा वीर्य स्वीकारणाचा प्रसंग आला तर दात्याची रक्त तपासणी इत्यादी टेस्ट केल्याशिवाय रक्त स्वीकारु नये.अर्थात शासनाने आता ब्लड-बँकेसाठी हा कायदाच केला आहे.

३) अज्ञात व्यक्तीशी शरीरसंबंध ठेवू नये, निरोध वापरला तर संसर्गाला आळा बसू शकतो. एड्सचा संसर्ग झालेली व्यक्ती ओळखता येत नाही. म्हणून इतरांचा रेझर, टुथब्रश वापरु नये.

४) इंजेक्शन घेताना नवीन सुई किंवा निर्जतुंक केलेली सुई वापरावी.

५) विवाहबाह्य शरीरसंबंध किंवा समलिंगी संबंध कटाक्षाने टाळावे.

६) एड्सबद्दलची माहिती सर्व शासकीय रुग्णालये, प्राथमिक आरोग्य केंद्रात, नगरपालिका व जिल्हा परिषदांच्या दवाखान्यात उपलब्ध आहेत. आजच्या या जागतिक एड्स दिवशी एवढी जरी माहिती सवृसामान्यांना झाली व त्या माहितीद्वारे आपण आपल्या दैनंदिन वागणुकीत त्यानुसार निरामय बदल केले तर एड्सच्या या विळख्यात आपण कधीही अडकणार नाही.

वन्यजीव निबंध व चित्रकला स्पर्धेचा निकाल जाहीर

अमरावती(प्रतिनिधी)

वन्यजीव समाह १९९६ निमित्त अमरावती वनवृत्ताने घेतलेल्या चित्रकला आणि निबंध स्पर्धांचे अमरावती वनवृत्त स्तरावरील निकाल घोषित करण्यात आले. महाविद्यालयीन गटातून निबंध स्पर्धेकरिता कु. वंदना वा. भोगे हिने प्रथम क्रमांक के.सोनाली जयंत सुळे, आदर्श महाविद्यालय धामणगांव रेल्वे हिने दुसरा आणि प्रफुल्ल नरहरी ठाकरे श्री. शिवाजी कनिष्ठ महाविद्यालय अकोट हे तृतीय क्रमांकाचे मानकरी ठरले. हा निकाल वनसंराक्षक श्री. सैय्यद वा. हुसेन नकवी यांनी घोषित केला.

वर्ग ८ ते १० या गाटामून निबंध स्पर्धेत नारायणदास लढ्ढा हायस्कूल मधील कु. तृप्ती महेंद्र वानखेडे हिने प्रथम क्रमांक, कृषी व तंत्र विद्यालय, अकोटचा अमोल विजयराव निचड यांनी दुसरा क्रमांक तर सिटी हायस्कूल, अचलपूर प्रसाद नरसिंह देवळीकर यांनी तृतीय क्रमांक मिळविलेला आहे.

वर्ग ५ वी ते ७ वी या गटातून निबंध स्पर्धेत कु. नेहा शाम देशपांडे गोल्डन किडस् इंग्लीश स्कुल, अमरावती प्रथम, स्वराज्य राजेंद्र श्रीराव जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळा मोर्शी द्वीतीय तर कु. रुपाली मधुकरराव बुटे चव्हाण कन्या शाळा अकोट यांचा तृतीय क्रमांक आलेला आहे.

चित्रकला स्पर्धा

चित्रकला स्पर्धेसाठी सर्वसाधारण महाविद्यालयीन गटातून नरसिंग कनिष्ट महाविद्यालय, अकोटचे प्रशांत मारोतराव ढवळे यांना प्रथम क्रमांक, विद्याभारती महाविद्यालय अमरावती मधील कु.अंजली र.वाट द्वितीय क्रमांक व आदर्श सायन्स जसरामदास भागचंद्र आर्टस् कामर्स महाविद्यालय मधून कु.सोनाली एन. हरिखेडे हिने तृतीय क्रमांक मिळविलेला आहे.

सर्ग ८ ते १०वी गटातून चित्रकला स्पर्धेत कु.अश्विनी वा. कोल्हे हिने प्रथम क्रमांक, विशाल रा. गुलाहे श्री.शिवाजी हायस्कूल अकोट यांनी द्वितीय क्रमांक व ज्ञानेश्वर म.खवले श्री.शिवाजी हायस्कुल अकोट यांनी तृतीय क्रमांक मिळविलेला आहे.

सर्ग ५ वी ते ७ वी गटतून चित्रकला स्पर्धेत कु.सोनाली वि.सातपुते मणीबाई गुजराती हायस्मूल अमरावती हिने प्रथम क्रमांक पि.एस.देशमुख नारायणदास लढ्ढा हायस्कूल अमरावती यांनी द्वितीय क्रमांक व अनिरुध्द पुंडकर शिवाजी हायस्मूल अकोट यांनी तृतीय क्रमांक मिळविलेला आहे.

वर्ग १ ते ४ प्राथमिक गटातून चित्रकला स्पर्धेत अमोला दि. पुंडकर महानगर पालिका प्रायमरी मराठी शाळा क(मांक १ अकोट यांनी प्रथम क्रमांक, अमरेश गजानन शेरेकर यांनी द्वितीय क्रमांक व विजय गजानन शेरेकर अस्मिता विद्यामंदीर अमरावती यांनी तृतीय क्रमांक मिळविला.

या दोन्ही स्पर्धेसाठी वनसंरक्षक श्री.सै.वा.हु.नकवी, अमरावती वृत्त, अमरावती, प्राचार्य चित्रकला महाविद्यालय श्री. साखरेकर, अमरावती जिल्हा माहिती कार्यालयाचे श्री. साहेबराव पुंड, अधिव्याख्याता, श्री.रमेश गणोरकर, उपसंचालक व्याध्र प्रकल्प मेळघाट ी.येवले, परतवाडा यांनी परिक्षक म्हणून काम पाहिले.

जागतिक एड्सदिन - रॅली संपन्न

अमरावती (प्रतिनिधी)

माणसाने आपला उध्दार करवा की आपणच आपला घात करावा हे ज्याचे त्याचे हाती आहे असे उद्‌गार महापौर सौ. किरणताई महल्ले यांनी 'जागतिक एड्स दिना निमित्त' काढण्यात आलेल्या रॅलीच्या समारोपीय कार्यक्रमात काढले.

अमरावती महानगरपालिका स्वास्थ अधिकारी, महानगरपालिका अमरावती, जिल्हा क्षयरोग अधिकारी, अमरावती राष्ट्रीय जिल्हा सेवा योजना, अमरावती विद्यापीठ, अमरावती, डॉ.पंजाबराव देशमुख मेडीकल कॉलेज, अमरावती, विदर्भ आयुर्वेउ महाविद्यालय व असासिएशन, अमरावती, होमिओपॅथीक महाविद्यालय व असोसिएशन अमरावती, दंत महाविद्यालय, अमरावती जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद,अमरावती, जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, अमरावती, निमा, अमरावती, श्रीमती कुसुमावती फॅमिली प्लॅनिंग ट्रस्ट अमरावती, मराठा सेवा संघ, अमरावती, हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ, अमरावती यांच्या संयुक्त सहकार्याने एड्स बाबत जन - जागृती करण्याचे दृष्टीने शहराच्या प्रमुख मार्गावरुन रॅली काढण्यात आली. रॅलीत अमरावती विद्यापीठाच्या विविध महाविद्यालयातील विद्यार्थी, विदर्भ आयुर्वेदिक संघटनेचे सभासद, होमीओपॅथीक वैद्यकिय अधिकारी, डॉ. पंजाबराव देशमुख मेडीकल कॉलेजचे विद्यार्थी व प्राध्याापक, लायन्स क्लबचे पदाधिकारी, महापालिकेतील सर्व वैद्यकीय अधिकारी विद्यार्थी होते. तसेच महापालिकेचे पक्षनेता श्री. दिनकरराव चौधरी, नगर सेवक श्री. विनय नगरकर सहभागी झाले होते.

समारोपीय कार्यक्रमाचे प्रस्ताविक जिल्हा क्षय रुग्णालयाचे अधिकारी डॉ.चंद्रशेखर राऊत यांनी केले. एड्स बाबत तांत्रिक माहिती अमरावती महापालिकेचे --- अधिकारी डॉ. डेहनकर यांनी दिली. प्रमुख अतिथी म्हणून भारतीय जनता पक्षाचे अध्यक्ष श्री. सुरेशराव कडू यांचे ही भाषण झाले. प्रमुख अतिथी म्हणून कृषि विभागाचे सह संचालक बली, अमरावती विद्यापिठाचे एन.एस.एस. चे अधिकारी, प्रा. दिलीप काळे जिल्हा

परिषदेचे डॉ. भिसे, डॉ.--- मोहाड, डॉ. ठाकरे, श्रीमान मदन तांबेकर, जनसंपर्क अधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.

संचालन जि. प. चे सांख्यिकी अधिकारी श्री. गायकवाड यांनी केले. आभारप्रदर्शन डॉ. भिसे यांनी केले. कार्यक्रमाअंती जि.प. आरोग्य विभाग द्वारा तयार केलेल 'एक जग एक आशा' अशोक मापने यांनी तयार केलेल्या चित्रफितीचे शुभारंभ पर प्रदर्शन सौ.महल्ले यांचे हस्ते झाले.

अमरावती येथे विशेष उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम

अमरावती (प्रतिनिधी)

आजच्या युवक युवतींना जर शास्त्रशुध्द पध्दतीने योग्य प्रशिक्षण देण्यात आले तर त्यांची स्वयंरोजगार करायची व यशस्वी उद्योजक होण्याची शक्यता दाट असते.

युवांनी स्वयंरोजगार निवडून यशस्वी व्यक्तीमत्व होण्यासाठी महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र (एम.सी.ई.डी.) व जिल्हा उद्योग केंद्र अमरावती द्वारा अमरावती येथे एक महिना कालावधीचा विशेष उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

विशेष उद्योजकात प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन १० डिसेंबर ९६ पासून करण्यात येत असून ७ आठवडे कालावधीच्या प्रशिणिाकरीता १) स्वत:चा उद्योग करण्याची इच्छा, २) किमान शालेय परिक्षा उत्तीर्ण, ३) वयोगट १८ ते ४० ही प्रवेश पात्रता ठेवण्यात आलेली आहे.

प्रशिक्षण कार्यक्रमाामध्ये लघू उद्योग मध्ये उपलब्ध व्यावसायीक संधी शोधन मार्गदर्शन, शासकीय योजनांची माहिती, प्रकल्प अहवाल बनविणे, बाजारपेठ पाहणी, तंत्र व मंत्र उद्योजकीय व्यक्तीमत्व विकास सिध्दी प्रेरणा आदी बाबींवर मार्गदर्शन करण्यात आले.

आपल्या भागामध्ये चालण्यासारखे छोटे उद्योग धंदे, उद्योगाच्या विभिन्न

क्षेत्रावर (शेतीवर आधारीत, प्लॅस्टीकवर आधारीत, रसायनावर आधारीत, अन्नावर आधारीत, औषधीवर आधारीत) आधारीत विभिन्न करता येण्यासारखे उद्योगांबाबत तज्ञांकडून मार्गदर्शन हे या प्रशिक्षण कार्यक्रमाचे वैशिष्ट आहे.

पांढऱ्या काठीस भक्कम आधार हवा!

आर्थिक ,शैक्षणिक,सामाजिक आणि सांस्कृतिक प्रगतीचे आधूनिक युग --- धरीत अन् वैभवाच्या स्मृतीला उजाळा देत अमरावती जिल्हा विकास कार्याक्रमाच्या प्रगतीपथावर आगेकूच करीत आहे. प्रगतीची पाउले झपाटयाने टाकीत आहे. २० कलमी कार्यक्रम आणि विकास कार्यक्रम ---राबविला जात आहे.

२० कलमी कार्यक्रमाचा मुख्य भार समाजातील आर्थिकदृष्या कमकुमत घटकांचे जीवनमान सुधारण्यावर असता तरी त्याबरोबर उत्पादनात घटकांचे प्रगती करणे हाही या कार्यक्रमाचा हेतु आहे. या कार्यक्रमात विशेषतःसमाजातील गरीब आणि उपेक्षित लोकांच्या आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीत सुधारणा करण्याच्या कार्यक्रमावर विशेष भर देण्यात आला.----ग्रामीण विकास आणि राष्ट्रीय ग्रामिण रोजगार कार्यक्रमांचा विस्तार करुन तो बळकट करणे,कमाल जमीनधारणा,अतिरिक्त जमीणीचे वाटप आदीची अमलबजावणी,हस्तव्यवसाय, हातमाग लघुउघोग वाढ होवून ग्रामीण भागातील गरीब लोकांच्या उत्पन्नाच्या साधनात वाढ होईल आणि त्याचे उत्पन्न वाढेल. दुर्बल धटकांचे जीवन सुखकर व्हावे व त्यांच्यामध्ये नवीन आशा आकांशा आणि विश्वास द्रृढ व्हावा यासाठी अमरावती जिल्हा नवीन २० कलमी कार्यक्रमाची यशस्वी अंमलबजावणी करण्यासाठी कटिबध्द आहे.

समाजातील दूर्बल घटकांच्या किमान सामाजिक आणि आर्थिक गरजा भागविणे हा मूलभूत केंद्रबिंदू कल्पून जिल्हयाच्या विकासाचा कार्यक्रम आखला जातो. या घटकांची उन्नती हा आमच्या विकास कार्यक्रमाचा मूळ गाभा आहे.क पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांनी १४ जानेवारी १९८२ रोजी एका आगळ्या वेगळ्या स्वरुपात नवीन वीस कलमी कार्यक्रमाची घोषणा केली.या नवीन कार्यक्रमानुसार अमरावती जिल्हयाने बरीच

प्रगती केली आहे.आणि अनेक बाबतीत आघाडी मारली आहे.

गेल्या दोन वर्षात अमरावती जिल्हात विभागीय पातळीवर बरीच कार्यालये स्थापन झालीत.विभागीय महसूल कार्यालय त्यातील महत्वाचे कार्यालय, सर्वसामान्य जनतेला प्रशासकीय सोयी सहज उपलब्ध करुन विकासाच्या विविध उपक्रमांना जास्तीत जास्त गतिमान लाभाची,जनतेच्या आशा आकांक्षाची पूर्ती करावी आणि जनसामान्यांच्या मनात प्रशासनाच्या ---अगळिक वृध्दिंगत व्हावी, या हेतून दिनांक ५ फेब्रुवारी १९८१ पासून नवीन अमरावती महसूल विभाग कार्यान्वीत झाला.महसूल विभागाच्या पुनरचनेनंतर अमरावती जिल्हात तहसिली होत्या. यामुळे या जिल्हयातील जनतेच्या बऱ्याच दिवसापासून अपूऱ्या राहिलेल्या गरजा पूर्ण होण्यात प्रारंभ झाला.

शैक्षणिक प्रसाराची वाढ लक्षात घेता दिनांक १ मे १९८३ पासून अमरावती तेथे अमरावती विधापीठाची स्थापना झाली.तसेच अमरावती नगरपालिका आणि बडनेरा नगरपालीका विसर्जित करुन आणि त्यात १७ गावांचा समावेस करुन दिनांक १५ ऑगस्ट १९८३ पासुन अमरावती महानगरपालीका कार्यान्वीत झाली.महानगरपाका स्थापनेमुळे शहराच्या विकासाठी विशेष चालना मिळाली.तसेच दुरदर्शन प्रक्षेपण केंद्राची सुरवात दृष्टीक्षेपात आहे.

हे सर्व कार्यक्रम यशस्वीपणे राबविण्यात अधिकाऱ्यांना पदधिकाऱ्यांचे रहकार्य आणि सहाय्य मिळत असते.एवढेच नव्हेतर हे कार्य करण्याकरीता महाराष्ट्राचे मुख्यमंत्री श्री.यशंवतदादा पाटील आणि त्यांचे सहकारी यांचे मार्गदर्शन वेळोवेळी लाभत आहे.

अमरावती जिल्हा विकास कार्यक्रतात आधाडीवर असून बऱ्याच राष्ट्रीय कार्यक्रमात जिल्हयाचे आधाडी धेतली आहे.त्यात प्रामुख्याने कुटुंब कल्याण कार्यक्रम, ---सुशिक्षित बेरोजगारांना सर्व वितरण वन विकास इत्यादी कार्यक्रमाचा उल्लेख करावा लागेल.बायोगॅस ,संयत्र उभारण्यात तर अमरावती जिल्हयाने महाराष्ट्रात उच्चांक प्रस्थापित केला आहे.

कृषी हा येथील प्रमुख व्यवसाय असून शेती विकासासाठी सिंचनाच्या सोयी

पुरविण्याच्या विविध कार्यक्रमांना गती देण्यांत आली आहे.विहीर,पाझर,तलाव आणि काम सुरु असलेले प्रकल्प लवकर पूर्ण व्हावे या गोष्ट्रीवर भर देण्यात आला.जिल्हयातील ----संपत्तीच्या आजवर केलेल्या अभ्यासावरुन असे दिसून येते की, १ तास ४३ हजार ४१७ हेक्टर जमिनीस ओलीताची सोय उपलब्ध होवू शकेल,ही सोय ३ मोठे प्रकल्प ,११ मध्यम प्रकल्प ४६७ लघू(राज्य व मध्यम) सिंचन योजने व्दारे व तीन --सिंचन योजनाव्दारे होऊ शकेल.

१९८३-८४ व८४-८५ या दोन आर्थिक कार्यात ४७६६ सेक्टर क्षेत्र ओलीताखाली आणण्याचे उधिष्ट दिले असतांना जून १९८४ अहोरपर्यत २३२२.३० हेक्टर क्षेत्र ओलिताखाली आणण्यात आले आहे.सिंचनक्षेत्र वाढविण्याचे काम जिल्हयात प्रगतीपथावर आहे.

जिल्हयातील कोरडवाहू शेतीला उत्तेमन देण्यासाठी उपयुक्त अशा यंत्राचा विकास करणे आणि आशयक त्या साधनांची तरतूद करणे याची बरज निर्माण झाली आहे. त्याद्रष्ट्रीने प्रशिक्षण व भेट योजने अतर्गत कोरडवाहू शेतीचे यंत्र आणि साधन सामुग्रीचा विकास व प्रसार करण्यासाची कार्यवाही केली जात आहे.

आपल्या रोजच्या आहारात डाळीच्या वापरास फार महत्व आहे.डाळीचे उत्पादन वाढविण्याच्या द्रष्ट्रीने ८४-८५ हजार या आर्थीक वर्षात डाळीचे ७० हजार टन आणि तेलबियांचे ४५.५ हजार टन उत्पादन वाढीने उधिष्ट देण्यांत आले आहे.गेल्या आर्थिक उधिष्ट वर्षात डाळीचे ५७.७५ हजार आणि ३८ हजार टनाचे उधिष्ट देण्यात आले होते.त्यापैकी जिल्हाने ५८.४० हजार टन आणि ४०.७० हजार टन विक्रमी उत्पादन करुन उधिष्ट पूर्ण केले आहे.

एकात्मिक ग्रामुण विकास योजना अमरावती जिल्हयात २ ऑक्टोबर १९८० पासून सुरु करण्यात आली. आर्थिक कमकुवत घटकातील कुटुबां जवळ दारिद्रय रेषेच्या वर आणमे हा योजनेचा मूळ गाभा आहे.अमरावती जिल्हातील १लाख २४ हजार ४८० कुटुंबे दारिद्रय रेषेखाली आहेत.

एकात्मिक ग्रामीण विकास योजनेतर्गत गेल्या आर्थिक वर्षात ८००४ कुटुंबांना या योजनेचा ११९६५ लाभार्थ्यांना लाभ झाला आहे.यात अनुसूचित समावेश आहे.चालू वर्षात या योजनेतर्गत ९१०० लाभात्यांना लाभ देण्याचे उदिष्ट असून जून अखोरपर्यत ६४० कुटुंबाना या योजनेचा लाभ मिळाला आहे.त्यात अनुसूचित जातीचे २७५ आणि अनुसूचित जमातीचे ९४ कुटुंब सामील आहेत.

राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमातग्रत अमरावती जिल्हयात ८३-८४ या वर्षात १२ काख १३ हजार मनुष्य रोजगार उपलब्ध करण्याचे उदिष्ट दिले असतांना प्रत्यक्षात २६.२३ लाख मनुष्य दिवस रोजगार उपलब्ध करुन हे उधिष्ट १३३ व टक्याने साध्य केले आहे.

अमरावती जिल्हयात रोख जमिनीच्या कमाल जमीनधारमा विषयक रायधाची अंमलबजावणी करण्यात येत असून कमाल जमीन धारणाविषयक कायदा सर्वप्रथम १९६१ मध्ये अंमलात आला.१९७५ साली राष्ट्रीय पातळीवर मार्गदर्शक प्रमातीनुसार --धारणेत फेरबदल करुन सुधारित कायदा २ ऑक्टोबर १९७५ पासून अंमलात आला.येत्या आर्थिक वर्षात ४५९.८० हेक्टर जमिन ३९१ व्यक्तीना वाटण्यात आली.या वर्षात ३०० हेक्टर जमीन उपलब्ध करुन देण्याचे उदिष्ट आहे.

असंधटित कामगारांची पिळवणूक होवू नये त्यांना आपल्या कष्टाचा किमान मोबदला मिळावा याकरिता त्यांचे वेतन किमान वेतन कायधाने ठरवून देणे हा या कायधाचा उद्देश आहे. १ नोव्हेंबर १९७८ पासून किमान वेतनाचे दर शासनाने वाढवून दिले आहे. गेल्या आर्थिक वर्षात वेतननिरीक्षकांनी सहा हजार शेतीमालकांना भेटी देण्याते लक्ष ठरविण्यांत आले होते. त्यापैकी ६७१८ शेतीमालकांना भेटी देवून दहा हजार ७५३ अनियमिततेची प्रकरणे हुडकून काढली असून १३ प्रकरणांत दावे दाखल केले आहेत.

अनुसूचित जाती व जमीतीच्या विकास कार्यक्रमाचा वेग वाढविणे या योजनेचे मुळ उद्दिष्ट अनुसूचित जाती व नवबौध्दांचा आर्थिक व सामाजिक दर्जा सुधारणे आणि पिळवणूकीसापून त्यांचे संरक्षण करणे हे आहे. समाज कल्याण खात्याच्या

बहुतांशी योजना ह्या अनुदान,आर्थिक सहाय्य शिष्यवृत्त्या विधावेतन या स्वरुपाच्या आहेत.मागिल आर्थिक वर्षात या योजनेचा ६५१० व्यक्तीना लाभ झाला आहे.मात्र पशुसंवर्धन ,दुग्धव्यवसाय भुमिसुधार ,सामाजिक वनीकरण,फलोधान,एकात्मिक ग्रामीण विकास योजना,उधाग,महात्मा फुले मागासवर्गीय विकास महामंडळ आणि खादी व ग्रामोधोग मंडळ इत्यादी मार्फत या योजनेचा फायदा मिळवून देण्यात आला.

सर्व गरजू खेड्यांना अनुक्रमाने पिण्याचे पाण्याचा पुरवठा करण्यासाठी जिल्हयात सातत्याने प्रयत्न होत आहे.गेल्या वर्षात ११३ पिण्याचे पाण्याच्या विविध योजना राबविण्याचे उद्दिष्ट असतांना १३८ योजना राबविण्यात आल्यात.चालू आर्थिक वर्षात आठ नळयोजना आणि दोन कूपनलिका कार्यन्वीत झाल्या आहेत.८५अखेरपर्यत ४ नळयोजना आणि दोन कूपनलिका कार्यान्वीत झाल्या आहेत.८५अखेरपयथत सर्व कठीण गावांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटू शकेल असा विश्वास आहे.

बेघर ग्रामीण कुटुंबाना घरासाठी बागा देणे आणि घरबांधणीसाठी सहाय्य देण्याचा कार्यक्रम या जिल्हात यशस्वीपणे राबविल्या जात आहे.ही योजना ग्रामीण भागातील दूबल घटकास सहाय्य म्हणून शेतमजुरातील दुबल घटकास घर बांधणीसाठी जागेची सोय उपलब्ध करुण देणे ही केंद्र सरकार पुरुस्कूत योजना १९७२-७३ साली विशेष कल्याणकारी योजना म्हणून सुरु करण्यात आली.

नंतर ही योजना राज्य सक्रकारच्या योजनामध्ये समाविष्ट करण्यात आली.ही योजना सर्व खेड्यांना व १५ हजार व ज्या नगरपरिषदेची लोकसंख्या १५ हजार किंवा त्यापेक्षा लोकसंख्या असलेल्या नागरपरिषदांना लागू करण्यात आली आहे.गेल्या वर्षातर अमरावती जिल्हयात या योजनेत ७४० कुटुंबांना घरासाठी जागा उपलब्ध करुन देण्याचे उदिष्टे होते , त्यापैकी ७५८ कुटुंबांना घरासाठी जागा देण्यात आली.तसेच १५९ घरकुले बांधून ८३-८४ चे उद्दिष्ट पूर्ण करण्यात आले आहे. चालू वर्षाकरिता सुमारे ६०० घरकुल बोधण्याचे उद्दिष्टे आहे.

मोठ्या शहरात गलिच्छ वस्त्यांतून राहणारे लोक अतिशय जिकरीचे जीने जगत

असतात. त्या वस्त्यात सामान्य सुखसोयीही उपलब्ध नसतात.गलिच्छ वस्त्यांना किमान सोयी उपलब्ध करुन देण्यासाठी तेथे पाण्याचे नळ जल निस्तारण,---हे पाऊल वाटा छोटे रस्ते आदि सोयी निर्माण करण्यासाठी शहरामधून गलिच्छ वस्त्या सुधारण्याचा कार्यक्रम राबविण्यात येत आहे. ८३.८४ या आर्थिक वर्षात गलिच्छ वस्तीतील ४५७० लोकांवा विकास सुखसोयी उपलब्ध करुन देण्यात आल्या आहेत.

ग्रामीण विकासात विजेला फारच महत्वाचे स्थान आहे. महाराष्ट्राने आधुनिक कृषी औधोगिक समाज निर्माण करण्याचे ध्येय डोळ्यासमोर ठेवले आहे. व त्यासाठी प्रामुख्याने उर्जेची आवश्यकता आहे.

अमरावती जिल्हयात लोकवस्ती अललेली एकूण १६३७ गावे आणि एकूण ओसाड ३४१ गावे आहेत.गेल्या आर्थिक वर्षात म्हटले ८३-८४ या वर्षात गेल्या ५७ खोड्यांचे आणि २२२० पंपांना ---पुरवठा करण्याचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. त्यापैकी ४६ गावांचे विघुतीकरण---२५२१ विघुत पंपाचे विघुतीकरण पूर्ण झाले आहे.चालू वर्षात जून अखेर पर्यत ७खेड्याचे विघुतीकरण आणि १६१ पंपाना विघुत पुरवठा करण्यात आला आहे.आतापर्यत अमरावती जिल्हयाचे संपूर्णपणे विघुतीकरण करण्याचे उद्दिष्टे आहे.

जमिनीची धूप ---,पाऊस कमी पडणे इत्यादीची भरपाई करण्याकरिता व त्याचबरोबर ---उत्पन्न म्हणजे इमारती लाकूड जळाऊ याची पूर्तता करण्याकरिता वन वाढविण्याची आवश्यकता आहे. वन संरक्षण ,वन विकास व वन्य प्राण्यांचे जतन यांना अंनुक्रम देउन महाराष्ट्र शासनाने नवीन वन विषयक धोरण ठरविले आहे. १९८१ पासून अमरावती येथे सामाजिक वनीकरण विभाग सुरु करण्यात आला आहे.

गेल्या आर्थिक वर्षात या योजनेतंर्गत ३५ लाख ७० हजार रोपे लावण्याचे उद्दिष्ट देण्यात आले होते. त्यापैकी प्रत्यक्षात ५१ लाख ६३ हजार रोपे लावण्यात आली. यात सामाजिक वनीकरण विभागाने ४२ लाख ९४ हजार रोपे लावलीत. सामाजिक वनीकरण विभागला २७ लाख ७० हजार रोपे लावण्याचे उद्दिष्ट देण्यात आले होते. ८४-८५ या

आर्थिक वर्षात वन विभागाला ८लाख २० हजार आणि सामाजिक वनीकरण विभागाला ३१ लाख ६५ हजार रोपे असे एकूण ३९ लाख ९५ हजार रोपे लावण्याचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. अमरावती जिल्हयात सामाजिक वनीकरण विभागानी उल्लेखणीय कामगिरी केली आहे.

सन.८२-८३ पासून राष्ट्रीय बायोगॅस योजना जिल्हा परिषदेमार्फत एजन्सी धर्तीवर राबविण्यात येत आहे.बायोगॅस पासून जळणाकरीता गॅस,शेती करिता--- मिळते आणि प्रदुर्षणाला आळा बकण्यास मदत होते. ८२-८३ या वर्षात २०१६ बायोगॅस सयंत्र बसवून महाराष्ट्रात सयंत्र उभारणीत उच्चांक प्रस्तापिक केला आहे.दिलेल्या उद्दिष्टापेक्षा ही कामगीरी पाचपटीने जास्त आहे. जिल्हयाला ४०० सयंत्र बसविण्याचे उद्दिष्टे दिले होते. चालू वर्षात ८४-८५ या वर्षात तीन हजार संयत्र बसविण्याचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. ही योजना या वर्षापासून महानगपपालिका क्षेत्रासाठी हे उद्दिष्ट एक हजार सयंत्र बसनिण्याचे ठरले आहे.

लोकसंख्या वाडीचा वेग मंदावला नाही तर ---विषयक योजनांचे सर्व फायदे शुन्यवत ठरु शकतील तेव्हा वाढत्या लोकसंख्येमुळे निर्माण झालेल्या समस्यावर यशस्वी मात करण्यासाठी लोकांचा एच्छिक सहभाग मिळून कुटुब कल्याण कार्यक्रम ही जनतेची चळवळ राबविण्याच्या द्रृष्टीने जिल्हयात सातत्याने प्रयत्न होत आहे. त्यासाठी कुटुंब कल्याण विषयक धोरणांचा अवलंब करण्यासाठी आरोग्य शिक्षणाव्दारे प्रचार करण्यात येत

आहे. अमरावती जिल्हाने कुटुंब कल्याण कार्यक्रमात भरीव कामगिरी केल्याबद्दल अमरावती विभागात व्दितीय क्रमांकाचे रोप्यपदक मिळविले आहे.१९८१-८२ मध्ये कुटुबकल्याण कार्यात उल्लेखणीय कामगिरी केल्याबद्दल प्रथमक्रमांक मिळाला आहे.

गेल्या ८३-८४ या आर्थिक वर्षात २१०६० शस्त्रक्रीया करण्याचे उद्दिष्ट दिले असतांना प्रत्यक्षात २३०७१ शस्त्रक्रीया करुन उद्दिष्ट ओलाडंण्यात आले आहे.तसेच तांबी बसविण्याते देखील जिल्हाने उद्दिष्ट ओलाडले आहे.गेल्या आर्थिकवर्षात जिल्हयाला

२०९७२ महिलांना तांबी बसविण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते. प्रत्यक्षात २२२७५ महिलांना तांबी बसवून १४७०७ टक्के उद्दिष्ट ओलांडले आहे.

जिल्हयातील शहरी व ग्रामीण भागात आरोग्य विषयक सवलती पुरेषा प्रमाणात व सर्वभागात उपलब्ध करुण देण्यात आल्या आहेत.८३-८४ या आर्तिक वर्षात अमरावती जिल्हयात नवीन पाच आरोग्य प्राथमिक केंन्द्र उघडण्याते उद्दिष्ट असतांना प्रत्यक्षात आठ आरोग्य केंन्द्र उघडण्यात आले आहे.याशिवाय बारा प्राथमिक उपचार केंन्द्र उघडण्यात आलीत तसेच या वर्षाकरिता २३ प्राथमिक आरोग्यकेंन्द्रे उघडण्याचे ठरविण्यात आले आहे.

याशिवाय बारा प्राथमिक उपचार उपकेंन्द्र स्थापन करुन उद्दिष्ट परिपूर्ती केली आहे.

समाजातील दुबर्ल घटकाच्या आहारातील कमतरता दूर करणे,------ मुलाचे,गर्भवती व अंगावर पाजणाऱ्या मातांचे आरोग्य सुधारणे ----संख्या व रोगटपणा नाहीसा करणे हे विशेष ---कार्यक्रमाचे उद्दिष्ट आहे. गेल्या--वर्षात सहा वर्षाखालील ८०१० बालकांना १९१५ गभवर्ती स्त्रीयांना आणि १७८९ अंगावर पाजणाऱ्या मातांचा योजनेचा लाभ मिळवून देण्याचे उद्दिष्ट होते. त्यापैकी सहा वर्षाखालील १७६३९बालंकानी २२९५ गर्भवती स्त्रीयांना आणि २२८२ अंगावर पाजणाऱ्या मातांना या योजनेचा लाभ मिळाला आहे.१९८४-८५या आर्थिक वर्षात सहा वर्षाखालील १७६५७ बालकांना पोषक आहार देण्याचे २२८९ गर्भवती स्त्रीयांना आणि २२८० अंगावर पाजणाऱ्या मातांना या योजनेचा लाभ मिळवून देण्याचे उद्दिष्ट ठरविणत आले आहे.

१९८१ च्या जनगणनेनूसार अमरावती जिल्हयाची लोकसंख्या १८७६१ लाख आहे.अमरावती जिल्हयातील एकूण लोकसंखेत साक्षरतेचे प्रमाण सेकडा५१.५३ आहे.यात पुरुष साक्षरतेचे प्रमाम ६०.३ टक्के आहे.आणि स्त्री साक्षरतेचे प्रमाण ४२.२ टक्के आहे.अनुसूचित जातीचे आणि अनुसूचित जनजातीचे साक्षरतेचे प्रमाण ४२.२ आहे. अनुसूचित जातीचे आणि अनुसूचित जातीचे जमातीचे साक्षरतेचे प्रमाण अनुक्रमे

४१.४आणि २५.७ टक्के आहे. शासनाच्या धोरणानुसार ६ ते १४ वयोगटातील सर्व विद्दार्थ्यांना शिक्षणाच्या सर्व सोयी उपलब्ध करुन देणे आवश्य आहे.

८२-८४ या आर्थिक वर्षात ३ लाख ४७ हजार विद्दार्थ्यानी नाव नोंदमी करण्याचे उधिष्ट असतांना प्रत्यक्षात ८ लाख ६४ हजार विधार्थ्यानी नांव नोंदणीकरण्यात आली आहे.तसेच चालू वर्षात ३ लाख ७३ हजार नाव नोंदणीचे उद्दिष्ट देण्यात आले आहे.

कोणत्याही मुली शिक्षणापासून वंचित राहू नये हा दृष्टीकोन समोर ठेवून शासनाने सावित्रीबाई फुले दत्तक पालक योजना राबवण्यात ---सुरु केली.

अमरावती जिल्हयात या योजनेला चांगला प्रतिसाद मिळाला आहे.तसेच यावर्षा पासून "महात्माफुले छात्र सेवा योजना" ही नवीन योजना शासनाने सुरु केली आहे.

प्रोढ शिक्षण हा किमान भरणा कार्यक्रमाचा एक भाग म्हणून ---त्याचा प्रामुख्याने समाजातील दुर्बल घटक, अल्पसंख्याक महिला मजूर या वर्गातील १५ ते २५ वयोगटासाठी साक्षरतेचे वर्ग चालविणे हा आहे,प्रोढ शिक्षण कार्यक्रमाची अमलबजावणी केंन्द्र सरकार मार्फत आणि राज्य ---होते.

८३-८४ या आर्थिक वर्षात ३६० केंन्द्रतून १०८०० प्रोढ साक्षर करण्याचे उद्दिष्ट असतांना अमरावती जिल्हयात ३९० केंन्द्र सुरु करुन १२८२७ प्रोढांना साक्षर केले आहे.त्यापैकी जून ८४ अखेर पर्यन्त ९० केंन्द्र सुरु करण्यात

आली असून यात २७००प्रौढांची नाव नोंदणी झाली आहे.

समाचीतील दुबल घटकांना -----पुरवठा करण्यासाठी ८२-८४ या आर्थिक वर्षात २० नवीन दुकाने काढण्यासाठी ८२-८४ या आर्थिक वर्षात २० नवीन दुकाने काढण्यासाठी उद्दिष्ट जिल्हयाला दिले होते.पण प्रत्यक्षात २५ अधिक दुकाने काढण्याचे उदिष्ट देण्यात आले आहे.जून ८४ अखेरपर्यन्त ६ ठिकाणी दुकाने सुरु करण्यात आली आहे.

अनुसुचित जाती,अनुसुचित जमाती,भटक्या व विमुक्त जमाती आणि इतर दुर्बल घटकातील विद्दार्थ्याकरिता सन १९७६-७७ पासून "---योजना सुरु करण्यात आली आहे.या योजनेखाली एकूण विद्दार्थ्यापैकी २५ टक्के विद्दार्थ्याना क्रमिक पुस्तके पुरविण्यात येतात.आणि वर्ष अखेरीत ती परत घेण्यात येतात.या योजने अन्वये ८३-८४ या वर्षात प्राथमिक शाळेतील एकूण १४०३४ विद्दार्थ्याना आणि माध्यमिक शाळेतील ५०३८ विद्दार्थ्याना पुस्तके पुरविण्यात आली.तसेच चालू वर्षी प्राथमिक शाळेतील २४७७२ विद्दार्थ्याना या योजनेअंतगर्त पुस्तके पुरविण्याचे उद्दिष्ट आहे आणि ते जून ८४ अखेरीत पूर्ण करण्यात आले आहे.

प्रगतीचा एक भाग टप्पा गाठीत अमरावती जिल्हा आघाडीवर राहण्याचा प्रयत्न करीत आहे.कुटुब कल्याण कार्यक्रम, बायोगॅस,---कर्जवाटप योजना इत्यादी योजना इत्यादी कार्यक्रमात जिल्हयाने आधाडी मारली आहे.

आथिक प्रगतीची वाढ हा जिल्हा पाळणार आहे.

:-महाराष्ट्र शासनः-

स्वातंत्र्य दिन विभागीय माहिती कार्यालय,

खास लेख क्रं.४ अमरावती ,दिनांक .८-ऑगस्ट-१९८७

अमरावती जिल्हयातील

प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन

-:साहेबराव पुंड,अमरावती.:-

मनुष्य म्हटले की,त्याला अन्न ,वस्त्र आणि निवारा या तीन गोष्टीची आवश्यकता भासतेच.परंतु निसर्गापुढे त्याला बरेचदा हार खावी लागेल.कधी पूर तर कधी दुष्काळ, कधी अकाळ तर कधी वादळ हे त्याच्या जीवनातील जणू महत्वाचे धटकच.या गोष्टीमुळे त्याच्या समोर अनेक प्रश्न निर्माण झाले आहेत.दिवसेदिवस कमी कमी होत जाणारा पावसाळा आणि पाण्याचे दुभिक्ष्य ही सतत जाणवत आहे.साहजितच पिण्याच्या

पाण्याचा प्रश्न, सिंचनाचे प्रश्न वा इतरही प्रश्न सारखे समोर येत आहेत.भूगातील पाणी खोल जात असले तरी कृत्रिम रीतीने पाणी अडवून पाण्याचा साठा करण्याची गरज भासत आहे.पाण्याचा साठा वाढावा म्हणून कुठे कोल्हारी बंधार पध्दत,कुठे पाझर तलाव कुठे गावतळी,निर्माण करावे लागतात. अशा वेळी जास्त प्रमाणात बांधात क्षेत्र होत नसले तरी जेव्हा मोठे प्रकल्प हाती ध्यावे लागते.पाणी अडवितांना किंवा प्रकल्प निर्मित्तीसाठी काही खेड्यांना प्रकल्प ग्रस्त म्हणून घोषित करावे लागेल.परिणांमी अशा खेड्यांचे पुनवर्सन करणे आवश्यत असते. अशा वेळी त्या भागातील या प्रकल्प क्षेत्रातील गावे उजाड होणार नाहीत याकडेही लक्ष असते.

जी गावे बाधीत क्षेत्र म्हणूम घोषित झाली आहेत.त्या गावांना नागरी युक्त परिपूर्ण सोयी कशा देता येतील याचा सारासार विचार करुन शासन प्रकल्प ग्रस्तांचे पुनर्वसन करण्याचा प्रंयत्न करते.परंतु भविष्याचा विचार करता असे प्रकल्प आवश्य असतात असतात.अमरावती जिल्हात सध्या चार प्रकल्पचे काम सुरु असून यामुळे बाधीत झालेल्या १५ गावांचे नवीन गावठाणात पुनवर्सन करण्यात आले आहे.(प्रकवल्पग्रस्तांचे पुनर्ससन करतांना नागरिकांच्या सर्व सुख सोयींचा विचार करुन अमरावती जिल्हा परिषदेच्या पुनर्वसन विभागाने रस्ते ,वीज,शाळा,दवाखाने,समाज मंदीरे,हनुमाव मंदिरे,बुध्द मंदिरे, पाणी पुरवठा आणि पाहोच व अंतर्गत रस्ते इत्यादी बाबीना प्राधान्य दिले आहे.

प्रकल्पग्रस्तांचे पुवर्वसनः-

अमरावती जिल्हयातील वर्धा प्रकल्प, दास्तापूर प्रकल्प, मालखोड प्रकल्प, शेकदरी प्रकल्प आणि लोअर वर्धा या पाच प्रकल्पांतर्गत येणाऱ्या १६गावांचे पुवर्वसन वेगवेगळ्या ठिकाणी करण्यात आले आहे.

अप्पर वर्धा प्रकल्प ग्रस्तांचे पुनर्वसनः-

अमरावती जिल्हयातील मोर्शी जवळील निंभोरा गावानजीक वर्ध नदीवर अप्पर वर्धा धरणाची निर्मिती होत आहे.या धरणातून उजवा व डावा असे दोन कालवे काढण्यात

आले आहे. या धरणामुळे जिल्हयातील ५८५०० हेक्टर क्षेत्र ओलूता खाली येणार असून अमरावती, मोर्शी वरुड आणि नांदगावपेठ या चार शहरांना या धरणाच्या जलाशयातून पाणी पुरवठा करण्यात येईल.पैकी अमरावती वाढीव पाणी पुरवठा योजणेचे नुकतेच भुमिपूजण झाले आहे. या प्रकल्पामुळे अमरावती जिल्हयातील १३---धपणी ग्रस्ताचे पूजवसन नवीन गावठ णात करण्यात आले आहे. तसेच वर्धा जिल्हयातील वडाळा,शिरी,व सावंगा येथील ४८कुटुबांचे पुनर्वसन मोर्शी तालुक्यातील येरला तेथे करण्यात येत आहे.११ गावठाणाची जमिन व ले आऊट मे-८६ मध्ये सुरुवात करण्यात आली आहे. नवीन गावठाणामध्ये राजुरवाडी,शिंगोरी, भापकी, हातूर्णा, इत्तमगाव, भाईपूर, चांदूर-टोपे, पळसवाडा, भारवाडी, जावरा, सुरवाडी, आणि येरला या खेड्यांचा समावेश आहे.

१२ नवीन गावठाणातील शाळेच्या ३२ खोल्या बांधावयाच्या होत्या त्यापैकी २८ शाळेच्या खोल्यांचे काम पूर्ण झाले आहे.येरला येथील दोन खोल्यांचे काम सुरु असून ते पूर्ण होताच उर्वरीत दोन खोल्याचे काम घेण्यात येणार आहे.

नवीन १२ गावठाणातील समाज ,मंदिराची (बारा)कामे पूर्ण झाली असून नळ योजनेची कामेही पूर्ण झाली आहेत.हनुमान मंदिर विधुतीकरण, बौध्द मंदिर इत्यादी कामे पूर्ण झाली आहेत.

या नविन गावठाणातील तयार करावयाच्या नवीन २५किलोमीटर अंतर्गत रस्त्यांचे काम पूर्ण झाले असून २४ किलो मीटरच्या पाहोच रस्त्यापैकी १६.५ किलोमीटरचे रस्ते पूर्ण झाले आहेत.धरणग्रस्तांच्या मागणीनुसार सार्वजनिक संडास, व्यक्तिगत संडास आणि मुत्रीघरे यांची कामे सुरु करण्यात येतील.

प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसनः-

या पक्पातर्गत येणाऱ्या एकूण १७८०कुटूबांना जून ८७ अखेरपर्यन्त १९.९ लाख रुपये कर्ज वितरीत केले असून ही रक्कम वेगवेगळ्या तीन हप्त्यात देण्यात आली आहे. तसेच अनुसूचि जाती, जमाती,आणि इदर जमातीमधीलक बेघर धरणग्रस्तांचे नवीन

गावठाणात पुनर्वसन करण्यात आले आहे.जून-८७ अखेरपर्यन्त एकूण ११५ बेघर घरणग्रस्तांचा घरे वितरीत करण्यात आली ६५ घरे महसूल विभागामार्फत (घरकूल योजना)बांधण्यात आली आहेत.पैकी१११ घरे बांधून पूर्ण झाली असून चार घरांचे काम सुरु आहे.

या प्रकल्पावर जून अखेरपर्यन्त पुनर्वसन कामासाठी गेल्या सात वर्षात(८१ते८७)एकूण २.१८ कोटी रुपयांचे अनुदान प्राप्त झाले. त्यापैकी जून-८७अखेर २.७९कोटी रुपये खर्च करण्यात आले आहे.चालू वर्षी जून-८७ पर्यन्त २६.३५ लाख रुपये अनुदान प्राप्त झाले आहे.

शेकदरी,दास्तापूर आणि मालखेड प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसनः-

शेकदरी प्रकल्पामुळे ---झालेल्या प्रकल्पग्रस्तांचे वरुड तहसिलातील गव्हाणकुंड आणि भेगडी येथे पुनर्वसन करण्यात आले आहे.भेवडी येथील शाळा समाजमंदिर,वीज पाणी पुरवठा इत्यादी कामे पुर्ण झाली आहेत.टेंबुरखेडा ते भेमडी या पाच किलो मीटर रस्त्याचे काम पूर्ण झाले आहे.या प्रकल्पांतर्गत येणाऱ्या पुनर्वसनाच्या कामासाठी गेल्या सात वर्षात १४.५२ रुपये अनुदान प्रप्त झाले असून जून-८७ अखेरपर्यन्त १३.९९ लाख रुपये खर्च करण्यात आले आहे.

दास्तापूर प्रकल्पांतर्गत येणारे दास्तापूर हे गाव ब्राम्हणवाडा(गोविंदपूर)येथे पुनवीसेत करण्यात आले आहे.सर्व नागरी युक्ती येथे करण्यात आल्या असून या नवीन गावटाणात विहीर शाळा,विघुतीकरण,पाणी पुरवठा,हनुमान मंदिर,सार्वजनिक संडास,अंतर्गत रस्ते यांची कामे पूर्ण झाली आहे.समाज मंदिर आणि पोहोच रस्त्याची आवश्यक्ता नसल्याने तेथे त्याचे काम हाती घेण्यात आले नाही.या कामाला ८१-८२ मध्ये सुरु झाली असून येत्या सात वर्षात ६.६६ लाख रुपये अनुदान प्राप्त झाले आहे. त्यापैकी जून८७ अखेर या कामावर ६.२६ लाख रुपये खर्च करण्यात आले आहे.

(टिपः-कृपया १५ ऑगस्ट वा त्यानंतर प्रसिध्द करण्यासाठी)

विविध चळवळीचा आढावाः-

चळवळी शांत,सहनशील व अल्पसंतोषी लोक करीत नसतात.तसेच दहशती शासनातही त्या होत नाहीत.इंग्रजपूर्व विदर्भात चळवळी झाल्या नाहीत.भक्तीपर थोडी हालचाल अधून-मधून झाली.चौदाव्या शतकात व्दैतवादी महानुभाव रिद्धपुरात आले. पण त्यांनी मुद्दाम पंथाचा प्रसार केला नाही.त्याचे भ्रमण होते. फक्त एकदाच शिष्यपरिवारासह रिद्धपुरचे गोविंदप्रभु अमरावती जिल्हा हिडले.मुसलमान शासकांच्या जुलूमजबर दस्तीला चळवळ म्हणता येणार नाही.ती धर्म प्रसाराकरिता केलेली दहशत होती.इंग्रजांच्या राजवटीत मात्र राजकीय चळवळीला प्रांरभ झाला.

नॅशनल कॉग्रेसची चळवळः-

१८५७ च्या स्वातंत्र्या चळवळीचे पडसाद देशभर उमटले.विदर्भात नोंद घेण्यासारखा पडसाड्द इतिहासाला माहीत नाही.१८८५ च्या नॅशनल कॉग्रेस या राजकीय चळवळीला विदर्भातल्या लोकांनी साथीदार दादासाहेब खापर्डे,ॲडव्होकेट मुधोळकर,मोरोपंत जोशी ह्यांच्या नावाचा उल्लेख करावा लागेल.२५ डिसेंबर १८९७ साली उमरावती शहरात नॅशनल कॉग्रेसचे तेरावे अधिवेशन झाले. अध्यक्षपदी शंकरन नायर होते.सामाजिक परिषदाही अमरावतीत भरल्या. अमरावती जिल्हयात वीर वामनराव जोशी ,शिवाजीराव पटवर्धन हे कॉग्रेसचे पुढारी होते.सकाळी' नही रखनी सरकार जालीम नही रखनी'हे गीत व अशाच आशयाची गीते गात प्रभात फेऱ्या काढून इंग्रज शासनाबद्दल जनमानसात असंतोषाची बीजे पेरीत .टकळी व चरखा ह्यावर सूतकताई करुन आत्मनिर्भरेचा मार्ग शिकवीत.विशेषत:स्त्रिया दारुबंदी पिकेटिंग करुन पुरुषांना दारुच्या व्यसनापासून मुक्त करण्याचा प्रयत्न करीत.स्वदेशीचा प्रचार होई व सत्याग्रहाचा आग्रही धरल्या जाई.राष्ट्रीय शिक्षण अर्थात बुनियादी तालमीकडे तरुणाचे लक्ष आर्कषित झाले होते. देशातील तरुण वर्ग काहीतरी करावयाचे आहे.या भावनेने प्रेरित झाला होता.शहीद भगतसिंग योच्या क्रांतिकारक जळवळीतला राजगूरु काही महिने हनुमान व्यायाम शाळेत भूमिगत होता.असे म्हणतात.बोलण्याचा व वर्तणुकीचा परिणाम झाला होता.व्यायाम शाळा राष्ट्रीय देशभक्तांची शाळा झाली होती.

स्त्रियांची चळवळ -

नॅशनल काँग्रेसच्या चळवळीत स्त्रियांनीही भाग घेतला. तथापि स्त्रियांची स्वतंत्र वेगळी चळवळ जरी झाली नाही, तरी काँग्रेसाअंतर्गत राहून स्त्री जागृतीची चळवळ २८ फरवरी १९२१ ला सुरु झाली, गणेश थिएटर मध्ये स्त्रियांची जाहीर सभा सौ. पार्वतीबाई पटवर्धन यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. या चळवळीला वेगळे स्वतंत्र स्वरुप नव्हते. १७ सप्टेंबर १९३२ साली गणेश थिएटर मध्ये पुन: महिला परिषद झाली. या परिषदेत लक्ष्मीबाई खापर्डे, पार्वतीबाई पटवर्धन, विमलाताई शेवडे, सिंधुताई गोळे, ताराबाई मोडक ह्या होत्या.

सत्यशोधकांची चळवळ -

पहिले महायुध्द १९२० ला संपल्यावर सामाजिक चळवळीकडे लोकांचे लक्ष गेले. समाजातील विकासाला अडथळा करणाऱ्या चालीरीती नष्ट करुन गतिशिलता आणण्यासाठी विविध चळवळीने अमरावती जिल्ह्यात मूळ धरले. त्यापैकी ब्राम्हण-ब्राम्हणेत्तर ही पहिली व प्रमुख होय. हिलाच सत्यशोधक चळवळही म्हणतात. १९२३ ते १९४० पर्यंत ही चळवळ अमरावती जिल्ह्यात कार्यरत होती. १९२४ साली वऱ्हाड मध्यप्रांतात वर्धेचे रावबहादूर के.एस.नायडू यांच्या अध्यक्षतेखाली ब्राह्मणेत्तर परिषद स्थापन झाली.डिसेंबर १९२५ साली मोर्शी येथे या चळवळीचे अधिवेशन झाले. त्याप्रसंगी अध्यक्ष भास्कर विठोबाजीराव जाधव या सेक्रेटरी मारोतराव देवराव कदम होते. जाधव हे त्यावेळच्या मुंबई इलाख्याचे मंत्री होते. १९२६ ला चिखली येथे पुन: अधिवेशन झाले. १९२७साली अचलपूर शहरी नाताळात ब्राम्हणेत्तर परिषद माणिकराव गोविंदराव चर्जन यांचे अध्यक्षतेखाली भरली. याच वर्षी अमरावती जिल्ह्यातील मार्की येथे चैत्राच्या यात्रेत पंढरीनाथ सीताराम पाटी यांच्या अध्यक्षतेखाली ब्राह्मणेतर जिल्हा परिषद झाली. या सर्व परिषदांचा परिणाम जनमानसावर फार झाला. लोक मुला-मुलींना शाळेत पाठवू लागले. शिक्षणाचे महत्व त्यांना कळले. जातीभेद कळून जातीजातीतील विषमता जाणवू लागली. ब्राम्हणांचे थोतांड समजले. घरात दडून बसलेली स्त्री दारातून बाहेर डोकावून पाहू लागली. १९२८ साली सालबर्डीच्या यात्रेत

रावबहादूर के.एस. नायडू यांचे अध्यक्षतेखाली ब्राम्हणेत्तर परिषदेचे अधिवेशन झाले. ही सत्यशोधकांची चहवळ १९२४ ते १९३९ पर्यंत जोरात होती. अमरावती जिल्हयातील या चळवळीत चांदूर तालुक्यातील नायगाव येथे राहणारे गुलाबराव खुशालराव शिसोदे पाटील यांनी आपल्या सत्यशोधक जलशाने प्राण फुंकला. त्यांनी महाराष्ट्रभर हिंडून जलशाद्वारे जागृती केली. लोकांना सुधारणेचा मार्ग दाखविला. या कार्यात अमरावती जिल्हयातील खालील लोकांचा प्रमुख सहभाग होता.

शामराव यादवराव गुड, मोर्शी

अमृतकर वकील ,,

व्यंकटराव राघोबा गोडे, वर्धा

काशीराव बापूजी देशमुख अमरावती

गणपतराव हिरामणजी भोंडे सिरसगांव कसबा

कविरत्न कृष्णमूर्ती वेणीकोठा

गोपाळराव नागोजी कोठेकर ,,

भगवंतराव शिवाजी पाटील अचलपूर

मोतीराम तुकारामजी वानखडे करजगांव

भटांचे थोतांड खंडन व स्वयंपुरोहीत कर्ते

आनंदस्वामी वडगांव

आनंदरावजी लडके बेलोरा

गावाच्या यादीवरुन ही सत्यशोधक चळवळ अमरावती जिह्यात पसरली होती याची कल्पना येते.

आर्यसमाज चळवळ -

स्वामी दयानंद सरस्वती या थोर पुरुषाने आर्यसमाज स्थापिला. त्यांचे पट्टशिष्य स्वामी श्रध्दानंद (पूर्वाश्रमीचे मुन्शीराम) यांनी जागोजाग गुरुकुले स्थून आर्यसमाजाचा प्रसार केला. सत्यार्थप्रकाश हा आर्यसमाजाचा धर्मग्रंथ आहे. आर्य समाजी लोक जातपात मानीत नाही. तसेच अवताराची कल्पना मान्य करीत नाही. अमरावती जिल्हयात दि.४,५,व ६ आक्टोबर १९२७ रोजी आर्यसमाजाची पहिली परिषद पंडित रामचंद्रजी देहलवी यांचे अध्यक्षखाली झाली.दुसऱ्या परिषदेचे अध्यक्ष स्वामी श्रद्धानंदाचे चिरंजीव प्रा.इंद्रजी होते.परंतु ते येऊ न शकल्यामुळे ठाकूर गोविंदसिंगजी याचे अध्यक्षतेखाली परिषद सुरु झाली.स्वागताध्यक्ष बाबासाहेब खापर्डे होते.आर्यसमाज चळवळीकडे हिरालाल जोशी,धामगावचे चंद्रभानजी मांडवगणे यांनी पुढाकार घेतला होता. यांच्या प्रयत्नाने अचलपूरचे देऊळ १९२५साली अस्पृश्याकरिता मोकळे केले होते.

थिऑसफिकल चळवळः-

ॲनीबेझंट या इंग्रज महिलाने ही चळवळ सुरु केली.तिची शाखा खापर्डे यांच्या प्रयत्नाने अमरावतीला सुरु झाली.परंतु तिचे कार्यक्षेत्र अमरावती शहराच्या पलिकडे गेले नाही.

अस्पृश्यता निवारण चळवळ :-१९२७ साली अस्पृश्यता निवारण चळवळीला जोर आला,या वर्षी अंबादेवी प्रवेश चळवळीसाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर आले होते.१९२८ साली अस्पृश्यता निवारण परिषद अमरावतीस खोलापूर गेटवर भरली.अध्यक्ष एकनाथराव नाईक होते.सेक्रटरी संपतराव गणपतराव नाईक होते.अस्पृश्यता पाळू नये,विहिरी व देवळे खुली करावी.सरकारने आरक्षण द्यावे इत्यादी ठराव परिषदेत पारित करण्यात आले. १९३० साली ऊर्दु हायस्कुलमध्ये अस्पृश्य निवारण विद्दार्थी परिषद भरली. अध्यक्ष नाशिकचे भाऊराव कृष्णराव गायकवाड होते. या परिषदांचा अमरावती जिल्हयात परिणाम झाला.कठीणे व सी.एच्.रामटेके यांनी बडनेरा, रामटेके यांनी चांदूर रेल्वे, सहारे यांनी धामनगाव रेल्वे येथे अस्पृश्यता निवारण चळवळीचे लोण नेले

.अचलपूर,अंजनगावसूर्जी ,दर्यापूर,चांदूरबाजार इत्यादी ठिकाणी चळवळीने जोर धरला.चांदूरबाजारला १९३२ साली विहिरी खुली करण्यासाठी सत्याग्रह झाला.

अजात चळवळः-

मंगरुळ दस्तगीर येथे गणपती हरि महाराज या संत पुरुषाने जाती निर्मूलनाची चळवळ उभारली.त्याच्या कित्येक अनुयायांनी खुलेआम अंतर्जातीय विवाह केले.त्यांनी जातीचा त्याग केला.अंजनवती,अंजनसिंगी ,अचलपुर,कुष्टा,कावली,मादनी,नागपूर इत्यादी गावात त्यांचा फार मोठा अनुयायी वर्ग होता. आजही वर्ग अस्तित्वात आहे.ही संस्था जाती निर्मूलनाचे कार्य अविरत करीत आहे.या चळवळीची निशाणी म्हणजे घरात उभी केलेली पंथाचा अनुयायी समजल्या जाते. गणपत हरी महाराजानंतर या चळवळीतला जोर कमी झाला.वाठोडा या ठिकाणी या अजात पंथाचे काही लोक आहेत.तसेच मंगरुळ दस्तगीरला महाराजाची समाधी असून दरवर्षीला यात्रा भरते.

विविध संस्थांचा अंश वृत्तांत हायस्कूल व कॉलेजः-

मध्यकाळात संस्कृत पाठशाला बंद पडल्या होत्या. इंग्रज राजवट सुरु झाली आणि शिक्षण देण्याचा निर्णय शासकानी घेतली. त्यानुसार अमरावती जिल्हयातील अमरावती तेथे इ.स.१८६६ साली सरकारी शाळा सुरु झाली. शाळेचे नांव हिंदू हायस्कूल असे होते.रावसाहेब गोरे,राजवाडे,जवादीकर,इत्यादी नामवंत अध्यापकांनी सेवा या संस्थेत दिली आहे. अमरावती प्रमाणेच स्थानिक लोकांनी शाळा उघडण्याचा प्रयत्न केला.अचलपूर,पथ्रोट,अंजनगावसूर्जी,धामनगाव,मोर्शी या ठिकाणच्या शाळा याच प्रयत्नातून सुरु झाल्या. हिंदू हायस्कूल प्रमाणेच मालटेकडी शाळा,.उघडण्यात आली.तिला ऊर्दु हायस्कूल म्हणत.१९३२ साली स्थानिक लोकांच्या प्रयत्नाने अमरावतीला महाविद्यालय उघडले. त्यास विदर्भ महाविद्यालय म्हणतात. त्यास किंग एडवर्ड कॉलेज नांव होते.सध्या त्यास विदर्भ महाविद्यालय म्हणतात. या कॉलेजचे पहिले प्रिन्सिपॉल टॉस्ट्वीन होते.

नगर वाचनालय अमरावतीः-

शिक्षणाची ओढ अमरावती जिल्ह्यातील कित्येक तरुणांना लागली.नवनवीन माहिती कळू लागल्यामुळे त्यांनी ज्ञानाची क्षुधा वाढली. ती शमविण्याकरिता अमरावती येथे सार्वजनिक नगर वाचनालय इ.स.१८७० साली सुरु करण्यात आले.विसाव्या शतकाच्या पूर्वार्धात अमरावती जिल्हयाच्या तालक्याच्या ठिकाणी वाचनालये उघडल्या गेली.

विदर्भ साहित्य संघः-

विदर्भसात्याची प्रगती व्हावी साहित्याची प्रगती व्हावी व साहित्यीकांना प्रोत्साहन मिळावे याकरिता १४ जानेवारी १९२० रोजी कविभूषण अण्णासाहेब खापर्डे यांनी विदर्भ साहित्य संघ स्थापिला . विदर्भ साहित्य संघाची पहिली परिषद अमरावती येथे १९२३ साली भरली .अध्यक्षपदी प्रा.बंळवत गणेश उपाख्य अण्णासाहेब खापर्डे होते.दिनांक १९ व २० एप्रिल १९२४ रोजी ब्रम्हविद्यामंदिरात दुसरी परिषद झाली.यावेळी बुलडाण्याचे यादव मुकुंद काळे अध्यक्ष होते. आज या संस्थेच्या विदर्भात एकूण ८५ च्या वर शाखा असून प्राचार्य राम उपाख्य नानासाहेब शेवाळकर हे अध्यक्ष आहेत. विदर्भ साहित्य संघाचे प्रमुख ऑफिस झाशी चौक नागपूर येथे आहे.

हनुमान व्यायाम शाळा -

जागतिक कीर्तीची हनुमान व्यायाम शाळा अमरावती येथे वैद्यबंधू यांनी इ.स.१९१४ ला सुरु केली. व्यायामप्रेमी थोर देशभक्त डॉक्टर पटवर्धनांनी या व्यायाम शाळेत अल्पकाळात नावलौकि कास आणले.या व्यायाम शाळेस गांधीची,शुभाषचंद्रबोस,पंडित मदनमोहन मालवीय,डॉ.राजेंद्रप्रसाद,ह्या राष्ट्रीय किर्तीच्या नेत्यानी भेट दिली.भगतसिंगाचा सोबती शिवराम हरि राजगुरु याचा या संस्थेशी निकटचा संबंध होता.

या व्यायाम शाळेने अंतराष्ट्रीय संमेलनास सांधिकरित्या प्रतिनिधीत्व केले आहे.

वर्ल्ड पेडाग्रोफिक कॉग्रेस,बर्लीन १९३६ शिक्षण समारोह लिंगियाड,स्वीडन १९४९ तृतीय जागतिक कॉग्रेस इस्तंबुल,टर्की १९५३,६ वी महिला शारिरिक परिषद टोकियो,जपान १९६९.ऑलीम्पिक खेल,म्युनिक जर्मनी १९७२ ,७ वी महिला शारिरिक परिषद तेहरान,इरान १९७३,९ वी महिला शारीरिक परिषद ब्युनोस आयर्स, अर्जेंटिना १९८१

सांघिक प्रतिनिधीत्वाप्रमाणेच अनेक देशातील क्रीडा संमेलनात या संस्थेने व्यक्तिगत प्रतिनिधित्व केले आहे.सध्या या व्यायाम शाळेचे एकूण स्वरुप एखाद्या अंतराष्ट्रीय छावणीप्रमाणे झाले आहे.

श्री शिवाजी एज्यूकेशन सोसायटी

बहुजन समाजातील शिक्षणापासून वंचित राहिलेल्या मुलांना शिक्षण घेण्याची संधी लाभावी या हेतूने श्री शिवाजी एज्यूकेशन सोसायटीची स्थापना झाली. सुरवातीला या सोसायटीचे अध्यक्ष बॅरिस्टर रामराव देशमुख हे होते. प्रतिकुल परिस्थितही शिक्षणाची प्रगती ही सोसायटी करू शकली नाही. बॅरिस्टर पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख या संस्थेच्या अध्यक्षपदी विराजमान झाले. आपल्या कर्तुत्वाने व अथक परिश्रमाने त्यांनी विदर्भात अनेक शाळा काढल्यात. पूर्वीच्या मोडकळीस आलेल्या शाळा घेऊन त्यांनी उर्जितावस्थेत आणल्या , शाळा काढून त्या चालविण्याचे भाऊसाहेब देशमुखांनी व्रत स्वीकारले. ते भाषणात म्हणत की, विद्यार्थ्यांनो तुम्ही शिका. आपल्याला प्रथम श्रेणी नको आहे. मिळाली तर पाहिजे पण मिळाली नाही तर हरकत नाही. परंतु शिका, संख्येने शिका. आज भाऊसाहेबांच्या श्री शिवाजी एज्यूकेशन सोसायटीने चालविलेल्या शाळा कॉलेजात असंख्य विद्यार्थी शिकून गेलेत आणि शिकत आहे , शिकत राहतील , ज्ञानक्षेत्रातील सर्वच शाखा सोसायटी चालवित असून त्यात महाविद्यालये असून शाळा आहेत. जनतेनी भाऊसाहेबांना दिलेली महर्षी ही पदवी सार्थ आहे. जनकल्याणार्थ सर्वस्वाचा होम करणाऱ्या श्रेष्टीत डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब हे अग्रणी आहेत. शिवाजी सोसायटीने मेडीकल कॉलेजही उघडले आहे.

तपोवन :

स्वातंत्र्योत्तर काळात शिवाजीराव पटवर्धनांनी समाजकार्याला वाहून घेतले. काळाची पाऊले त्यांना ओळखता येत होती. समाजातील अव्हेरलेला एक घटक म्हणजे महारोगी. त्यांची सेवा करण्याचे व्रत पटवर्धनांनी स्वीकारले. गांधी-सुभाषच्या संस्कारात त्यांचा अलौकिक पिंड आकारला होता. महारोग्यांची सेवा हे माझे अपुरे राहिलेले कार्य आहे. असे गांधी म्हणाले होते. ते कार्य पूर्ण करण्याचा निश्चय शिवाजीराव उपाख्य दाजीसाहेब पटवर्धनांनी केला. अल्पकाळात त्यांनी चालवलेल्या लहानश्या रोपट्याचे रूपांतर विशाल वटवृक्षात झाले . त्यांनी महारोग्यांना सांभाळले, शिकवले, स्वत:च्या पायावर स्वतंत्रपणे उभे राहण्याची त्यांच्यात हिंमत आणली. सुतारकाम, लोहारकाम, विणकाम, चांभारकाम, शेतीचे काम इत्यादी कामे त्यांनी महारोग्यांना शिकवून त्यांच्या उदरभरणाचा प्रश्न सोडविला. आपल्या आयुष्याच्या उत्तरकाळात नि:संगपणे तपोवनाचा विशाल कारभार महाराष्ट्र शासनाला देऊन दाजीसाहेब पटवर्धन स्थितप्रज्ञाप्रमाणे मोकळे झाले. ही तपोवन संस्था आज महाराष्ट्र सरकारच्या ताब्यात आहे.

संत गाडगेबाबांची समाधी

विदर्भाचे थोर कर्मवादी संत खरे समाजवादी गाडगेबाबा यांची समाधी अमरावती येथील गाडगे नगरात आहे. जिवंतपणी गाडगेबाबांनी स्वत:च्या पाया पडू दिले नाही. इतरांप्रमाणेच आपणही एक सामान्य पुरुष आहोत ही त्यांची समजूत होती. कुणी पाया पडण्यास धजला तर ते त्यास काठीने हाणीत. त्यांच्या मृत्यूनंतर लोक त्यांच्या समाधीवर मंदिर बांधून समाधीची तिन्ही त्रिकाळ पूजाअर्चा करतात. गाडगे बाबांच्या शिकवणीची ही घोर विटंबना आहे.

खापर्डे वाडा :

दादासाहेब खापर्डे यांना वऱ्हाडचा नवाब म्हणत असत. ते टिळकांचे उजवे हात होते. टिळक, ॲनी बेझंट, वगैरे मोठी माणसे त्यांच्या वाड्यात राहून गेली आहेत.त्या

काळातील कित्येक चळवळीचा जन्म त्यांच्या वाड्यात झाला.होमरुलची कल्पना त्यांच्या वाड्यात प्रथम चर्चिल्या गेली.नंतर पुणे येथे परिषद झाली.थिऑसपकिल सोसायटी २१ जानेवारी १९०० रोजी खापर्डे वाड्यातच स्थापण झाली.खापर्डे ,जोग,करंदिकर,काळे देसाई हे सभासद होते.१९०५ साली ब्रम्हविद्यामंदिर बांधण्यात आले. या मंदिराचा १९४१ साली डॉ.जोसी हॉल झाला.१३ जानेवारी १९२३ रोजी खापर्डे वाड्यात श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांच्या अध्यक्षतेखली विचारविनिमय होऊन १४ जानेवारी १९२३ रोजी संक्रातीच्या सुमुहूतावर विदर्भ साहित्य संघाची घोषणा करण्यात आली.

माधानचे कस्तुरबा मंगलधाम:-

१९४६ साली साधान येते कस्तरुबा निधीच्या विदर्भ शाखेच्या मुहूर्तमेढ रोवल्या गेली.या शाखेचे प्रतिनिधीपद श्रीमती काराबेन मशरुवालाकडे होते.माधानचा कस्तरुबा मंगलधाम अनेक निराधाराचा आधार झाला आहे.

अपंगाचे सुखनिधान:-

दोन वर्षापासून सुरु असलेले धामणगाव रेल्वे येथील अपंगाचे सुखनिधान हे अपंग व विकलांगांचा हरपलेला आंनद त्यांना परत मिळवून देण्याचा प्रयत्न करीत आहे.सध्या २१ मुले व ११ मुली या संस्थेत असून त्यांची उत्तम सोय नि:शुल्क केल्या जात आहे.अशा संस्था अमरावतीलाही आहेत.

देवगावचा (नागापूर)साखर कारखाना

अमरावती जिल्ह्यातला हा पहिला व एकमेव साखर कारखाना आहे.या कारखान्यामुळे उसाची शेते अमरावती जिल्ह्यात दिसू लागली.या कारखान्यासाठी स्व:अण्णासाहेब देशमुखाचे प्रयत्न कारणीभूत झाले.त्यांच्या अथक परिश्रमाचा त्यांच्या शरीरस्वस्थ्यावर परिणाम झाला. कारखान्यावर अमरावती जिल्ह्याची आर्थिक परिस्थिती सुधारेल.

शहानूर प्रकल्प:-

ओलीताची पिके काढता येण्यासाठी अमरावती जिल्हयात शहानूर नदीवर प्रकल्प व वर्धा नदीवर वर्धा प्रकल्प सरकारने हाती घेतला.

अंजनगाव सूर्जीपासून उत्तरेकडे मेळघाटात शहानूर नदीवर हा प्रकल्प उभारल्या जात आहे.बरेच काम अजून व्हावयाचे आहे.हा प्रकल्प पूर्ण झाल्यावर त्याचा फायदा अचलपूर व अंजनगाव या दोन तालक्याबरोबरच अमरावती व दर्यापूर तालुक्यालाही फार फायदा होणार आहे.

उर्ध्व वर्धा प्रकल्प :-

उर्ध्व वर्धा प्रकल्प अमरावती जिल्ह्यातील मोर्शी तालुक्यात सिंभोरा गावाजवळ वर्धा नदीवर साकार होत आहे.या प्रकल्पामुळे नदीच्या तीरावरील उजव्या कालव्यामुळे अमरावती जिल्ह्यातील ५८५०० हेक्टर व डाव्या कालव्यामुळे वर्धा जिल्ह्यातील १६५०० हेक्टर शेताला सिंचन होणार असून मोर्शी, वरूड नांदगावपेठ ,अमरावती या शहारला पाणी पुरवठार करण्याचे प्रायोजित आहे.

वरील दोन्ही प्रकल्पाच्या धरणापासुन अमरावती जिल्हा सुजलाम सफलाम होईल.तसेच सुतगिरणी,कापडमील ,यासारखे उद्योगधंदे जोमात सुरु झाले की आथिकदृष्ट्याही अमरावती जिल्हा सुधारेल यात शंका नाही.

परिशिष्ट - २०

अमरावती जिल्हा,सत्र न्यायालय शताब्दी महोत्सव :-

दि.१२ फ्रेबु.१९९४ रोजी अमरावती जिल्हा सत्र न्यायालयाचा शताब्दि महोत्सव संपन्न झाला.त्यावेळी मुंबई उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्ति सुजाता मनोहर,मुख्यमंत्री शरद पवार, यांचे शुभ संदेश आले होते.. सर्वोच्च न्यायलयाचे, ---महमदी हे प्रमुख अतिथी व ----म्हणून ---इ.स.१९३५ पर्यत --- हस्ताक्षरात मोडीत लिहिले होते. हाच दाखल झाल्या पासून सहा महिन्याच्या आत निकाल होत असे.हल्लीची वकिलांची

पिढी कोणत्याही प्रकारे निकाल कमी दर्जाची नाही.त्याकाळात केस लॉ कर भर दिल्या जात नव्हता हल्ली केस लॉ प्रथम पाहतात. इ.१८५३ पासून न्याय व्यवस्था आली.डे.कमिश्नर हाच दंडाधिकारी असे. फौजदारी व दिवाणी अशी वेगळी व्यवस्था नव्हती. बहुतेक डेप्युटी कमि.सैनिक अधिकारी होते.इ.स.१८९५ साली श्री.ल्सूइस हे आय.सी.एस. दर्जाचे अधिकारी न्यायाधीश नेमले गेले. व नवी प्रथा सुरु झाली. इ.१८७० पासून ह्या व्यवस्थेत विकास झाला. त्या काळात वकीलांचे कार्य इंग्रज न्यायाधीशांना हिंदू न्यायशास्त्र अथवा मुस्लिम कायदा समजावून देण्याचे होते. प्रारंभी विशिष्ट न्यायप्रक्रिया नव्हती. इ.१८७० पासून ह्या प्रक्रियेत विकास घडत गेला. पूर्व विदर्भाचे चार जिल्हे सोपीव जिल्हे होते. व इंग्रज शासनाने मेजर नेमवार्ड यांना पूर्व विदर्भाचे कमिश्नर नेमले होते. मॉंटेग्यु चेम्सफर्ड सुधारणांच्या नंतर मध्यप्रांत वऱ्हाड हा गव्हर्नर च्या राज्य प्रशासनाखाली आला. कदाचित इ.१८६२ सालापासून वकीलांना सनद देण्याची प्रथा सुरु झाली. न्यायालयासाठी स्वतंत्र इमारत बांधण्याची प्रथा इ.१८६० ते १८७० मध्ये सुरु झाली. जिल्हा न्यायालये इ.१८९४ पासून स्वातंत्र्योत्तर कालखंडात न्याय व्यवस्थेत न्याय प्रणालीचा आणि न्याय क्षेत्राचा विस्तार घडला आहे. त्यामुळे लेबर कोर्ट, औद्योगिक न्यायालय, सहकारी क्षेत्र न्यायालय, शिक्षक न्यायालय, बाल न्यायालय, ग्राहकासाठी न्यायालय, महिलांसाठी इ. न्यायालये झाली आहेत. हल्ली महाराष्ट्रात उच्च न्यायालयाची एक शाखा नागपूरला आहे ; आणि तशीच शाखा अमरावतीत उघडण्यात यावे अशी मागणी पुढे येत आहे.

अमरावतीच्या न्यायालयात वकील म्हणून ज्यांनी कार्य केले त्यापैकी अनेकांना राष्ट्रीय पुढारी म्हणून मान्यता मिळाली त्यात सर मोरोपंत जोशी, राव बहादूर रंगनाथ मुधोळकर, श्रीमंत गणेश श्रीकृष्ण (दादासाहेब) खापर्डे, दिवाण बहादूर ब्रह्म, व प्रल्हाद नारायण जोग, पांडुरंग गोविंद आळशी, श्री भाऊसाहेब असनारे (छोटे खापर्डे), श्री संभाजीराव गोखले, डॉ.पंजाबराव देशमुख, बाबासाहेब खापर्डे, विठ्ठल बंधूजी चौबळ , श्री.पी.के.देशमूख, बॅ.रामराव देशमूख, व्ही.डी. ब्रह्म, के.जी.देशमूख, यशवंत शेरेकर, ही उल्लेखनीय नाव आढळतात.

अमरावतीत गेल्या शंभर वर्षापासून एका घराण्यातील व्यक्ति सतत वकीलीचा व्यवसाय करतात, ते देशपांडे यांचे घराणे होय. गोपाळराव खुशालराव देशपांडे, हे आकोला व अमरावती येथे व्यवसाय करीत असत. अमरावतीला जिल्हा व सत्र न्यायालय सुरु झाले त्यावेळी असलेल्या वकीली मध्ये ते होते. त्यांचे चिरंजीव हरिहर कृष्णराव देशपांडे हे अमरावतीचे मानलेले वकील आणि सामाजिक कार्यकर्ते होते. त्यांचे चिरंजीव विजयराव देशपांडे हे अमरावतीचे कार्यकारी नगराध्यक्ष,ह.व्या.प्र.मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष, अनेक क्षेत्रात अग्रगण्य कार्यकर्ते व विख्यात वकील म्हणून प्रसिध्द आहेत. त्यांचे चिरंजीव प्रशांतराव हेहि सध्या चांगला वकील म्हणून नांव कमावीत आहेत.

अमरावतीत महिला वकीली करीत आहेत. सुरुवातीला त्यांच्याकडे विलक्षण कुतूहलाने पहात असत. सौ.कमल गोखले, लक्ष्मी पांगारकर, इ. महिलांनी उत्तम वकील म्हणून कीर्ती मिळवली. आता अनेक महिला वकील करीत आहेत. त्याचप्रमाणे मराठी,हिंदी, गुजराथी, सिंधी, उई भाषेतील वकीलांची संख्या जास्त आहे.

दि.१०.४.१९७६ रोजी सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती श्री.कृष्णा अय्यर अमरावतीस आले होते. अमरावती बारचा शताब्दि सोहळा होता. त्यापैकी पंतप्रधान इंदिरा गांधीचा शुभसंदेश प्राप्त झाला होता. त्यावेळच्या स्मरणिकेवरुन आढळते, की, अमरावतीतील वकील वर्गाने राष्ट्रीय चळवळीत भाग घेतला होता; होमरुल लीग चळवळीत ते होते ; काँग्रेसमधील मवाळ गटात बरेच वकील होते , व जहाल गटातहि बरेचसे होते. असहकार चळवळीत त्यांनी भाग घेतला होता ; मोर्ले मिंटो सुधारणांच्या कमिशन पुढे साक्षी दिल्या होत्या. माँटफर्ड सुधारणा समितीपूढे साक्ष दिली होती. आणि माँटेग्यू चेम्सफर्ड कमिशन पुढे वकीलांनी साक्षी नोंदविल्या होत्या. सायमन कमिशन विरुध्दच्या आंदोलनातहि अमरावतीचा वकील वर्ग सहभागी होता. --- पार्टी च्या स्थापनेपूर्वी स्वराज्याची घटना लिहिली गेली. श्री दादासाहेब खापर्डे यांनी ती घटना लिहून दिली होती. चलेजाव चळवळीतहि अमरावतीच्या वकील वर्गाने खूप मोठा त्याग सहन केला होता. ह्या बार चे सदस्य विविध राजकीय पक्षात पदाधिकारी आहेत. ह्या बारच्या सदस्यांपैकी अनेक व्यक्ती खासदार, आमदार, व मंत्री राहिले आहेत.

आता दंतकथेचे स्वरुप प्राप्त झालेल्या काही आश्चर्यकारक घडामोडी न्यायालय परिसरात घडून गेल्या. त्यापैकी कै.दादासाहेब खापर्डे यांनी फाशीची शिक्षा ज्याला फर्माविल्या गेली होती, त्या बाबूराव खलारकर ला फाशीच्या तक्तावरुन सोडवून आणले ; एका फाशीची सजा झालेल्या कैद्याला फाशी पूर्वी भरपूर दही खावयास सांगून, फाशीचा दोर आवळल्यावर एकमिनिट होऊन गेले तरी तो मेला नाही ; तथापि फाशीच्या शिक्षेचा कालावधी एक मिनिटे लिहिला होता, म्हणून सोडवून आणले ; एकदा फाशीची सजा फर्माविलल्या कैद्याच्या फाशीच्या वेळी ऐन आदल्या क्षणी दाराबाहेर बँड का वाजला म्हणून मागे पाहणाऱ्या काराध्यक्षालाच नियमभंग व कायदेभंगाचा धाक दाखवून त्या कैद्याला फासाच्या तक्तावरुन सोडवून आणले, अशा कथा प्रसिध्द आहेत. त्या कहाण्याच अमरावतीतील होत.

सायमन कमिशन मोर्ले माँटेग्यू कमिशन, चेम्सफर्ड कमिशन, राधाकृष्णन कमिशन, न्या.भवानीशंकर नियोगी कमिशन, फाझल अली कमिशन, इ.महत्वपूर्ण ऐतिहासिक महत्वाच्या कमिशन पुढे अमरावतीच्या वकील वर्गाने अभ्यास पूर्ण साक्षी दिल्या.

परिशिष्ट - २१

मेळघाटातील स्वर्ग-'कोलकाझ'

राखी बल्डयाच्या शिखरावर असलेल्या वन विश्रामगृहाच्या शिखर टोकावर एक चंदन वाढतो आहे. या चंदनाच्या जवळ उभे राहून समोर दृष्टी टाकली म्हणजे दूरवर पसरलेल्या हिरव्यागार टेकडयांची एक छोटी माळ दिसून येते. या उंच पहाडीच्या उताराशी पुन्हा एका छोटया टेकडयांची गर्दी आणि हिरवे जंगल, पाचूसारखे आणि पायथ्याशी नागमोडी आकारात खळाळत वाहणारी सिपना नदी. ही सिपना जाडीपाटी भागातून चंद्रकार वळण घेत, राखी बलडयाला खेटते आणि पुन्हा एकदा इंग्रजी "एस" या आकर घेऊन पुढे सरकते. राखी बल्डयाच्या उजव्याा हाताला सिपनेचा एक भला मोठा डोह राखी डोह. या डोहावरुनच या पर्वत टेकडीला राखी बल्डा म्हणून ओळखले जाते. दूरवर पसरलेल्या उंच झेंडा बल्डयापासून सुरु झालेली पर्वत रांगांची एक माळ राखी.

बल्डयापासून क्षितीजापर्यंत दूरवर पसरत असलेली असली तरी राखी बल्डा आपल्या भोवती असलेल्या हिरव्याकंच वनक्षेत्राची आणि लहान-मोठया टेकडयांची एक छोटी माळ प्रकट करतो.

सिपना जेथून चंद्राकार वळणे घेत एका जंगल तुकडयाला एका छोटयाशा बेटाचे स्वरुप देते ते कोरकूंच्या भाषेत रावंग आकीवर्डाचे जंगल. जाडापाटीपासून राखी डोहापर्यंत पसरलेल्या चुनाडीच्या जंगलाचा हा एक तुकडा. आकीवर्डाच्या जंगल तुकडयला लागून कास्मार बल्डा. या टेकाड पर्वतावर शिसन नावाच्या वृक्षाचे अस्तित्व आहे. शिसम म्हणजे कास्मार आणि म्हणून तो कास्मार बल्डा. या कास्मार बल्डयाच्याा कडेला एक छोटा डोह. त्याचेही नाव कास्मार डोह. कास्मार बल्डयाच्या पायथ्याशी सुमारे ६ फूट लांब आणि अडीच फूट खोल एक दगडी कपार ही कपार म्हणजे वाघ, बिबट आणि अस्वले यांची झोपण्याची जाागा. पुढे बरेचसे सपाट जंगल आणि नदीच्या पात्रात पुन्हा एक डोह, त्याचे नाव फंगरा डोह आणि सिपनेच्या राखी डोहापासून सुमारे दोन-अडीच कि.मि. अंतरावर भल्या मोठयाा दगडांनी सजविलेली दिया डोह. दिया डोहापासून सिपना पुढे केलीकडे सरकते. कास्मार डोह ते फंगरा डोह यांच्या दरम्यान केलीकडे जागारा एक जंगल रस्ता. सिपना पार करुन कोरकू आदिवासी याच रस्त्याने केलीकडे जातात.

कवी कुसूमाग्रजांनी चंद्रकोरी वळणाच्या ज्या सिपनेचे आपल्या एका लेखात मन भरुन वर्णन केले ती ही जागा म्हणजे कोलकाझ. मेळघाटातील स्वर्ग किंवा मेळघाटचे नर्गीस. इथल्या कोरकूच्या सांगण्याप्रमाणे वनदेवता या जंगलात दररोज रात्री हाती दिवा घेऊन राखी डोहापासून दिया डोहापर्यंत नृत्य करीत असते.

दिया डोह ते राखी डोह या प्रवासात सिपनेला चार डोह आहेत आणि ते बारमाही भरले असतात. राखी डोह खोल आणि रुंद आहे, तर दिया डोह खडकाळ आणि राखी डोहासारखा पसरट नसला तरी नदीच्या डाव्या काठाकडून या डोहाला उतरण्याची एक सुरक्षित वाट आहे. रुंद परंतु बांधेसूद पात्र आणि नागमोडी वळणे घेत सिपना या संपूर्ण प्रदेशात एक मुग्धा जाणवते. विशेषत: सप्टेंबर, आक्टोबरच्या पुढे

पावसाळयात अर्थातच तिचे रुप रौद्र तरीही अवखळ असते आणि तारुण्याचा एक खळाळ तिच्या पावसाळी रुपात जाणवत असतो. परंतु उन्हाळा सोडल्यास सिपनेचा एक मुग्ध खळाळ कोलकाझ परिसरात अविरत असतो. सिपनेचे हे मोहक रुप आणि भोवतालचा संपन्न निसर्ग म्हणजेच करेलकाझ. मेळघाटातील पिली ते केली या दोन गावांमधील पर्वत टेकडयातून सिपनेने केलेला संपन्न नागमोडी प्रवास आणि आपल्या दोन्ही तीरांवर उभारलेले सुमारे १० कि.मि. अंतराचे एक संपन्न जंगल ऐश्वर्य म्हणजे कोलकाझ आणि म्हणूनच निसर्गाची एक दुर्मिळ निर्मळता म्हणजे कोलकाझ.

चिखलदऱ्यातून थेट पिलीपर्यंत उतरलेल्या पर्वत टेकडया आणि पुढे केलीपर्यंत असणारी पर्वत राजी यामध्ये एक सुंदर आणि सपाट दरी कोलकाझला निसर्गाने तयार केली आहे आणि सोबत सिपना आहे. त्यामुळे या सपाट दरीला आणि खळाळत वाहणाऱ्या सिपनेला पहाडी क्षेत्राचे एक संरक्षण मिळाले आहे. त्यामुळे या साऱ्याच क्षेत्राला एक हिरवे छत्र मिळालेले आहे. नदीकाठच्या जंगलक्षेत्राचे या जंगल विस्तारात आश्रयस्थानांसोबत अन्न, निवारा आणि अधिवास यांची विपुलता आहे. म्हणूनच कोलकाझने वन्यप्राण्यांनाही एक अभय दिले आहे. मेळघाटात आढळणाऱ्या साऱ्याच वन्यजीवांचे आणि पक्ष्याचे कोलकाझ हे एक नैसर्गिक अभयारण्य आहे. एरवी मेळघाटातील वाघ दर्शनदुर्लभ असतात. परंतू सुदैवी असल्यात तर वन विश्रामगृहात बसून मेळघाटचा वाघ पाहणे कोलकाझला सहज शक्य आहे.

भौगोलिकदृष्ट्या सिपनेचा उमग घटांगजवळच्या सिरसबन पाणलोट क्षेत्रातून असला तरी तिचा नदी म्हणून विस्तार आणि विकास, चिखलदऱ्याहून येणारा आमाडोह नाला आणि माखल्यावरुन येणारा भूतखोरा नाला तिला सेमाडोह जवळ भेटतात तेथून येतो आणि सेमाडोहपासून खऱ्या अर्थाने नागमोडी वळणे घेत आणि मेळघाटातील पर्वतरांगांशी खेटत सिपना पुढे सरकते. सिपना म्हणजे साग आणि सागवानाच्या जंगलातून जाताना पिली ते केली या प्रवासात सिपनेला अनेक नागमोडी वळणे घ्यावी लागतात. पुढे कोलकाझजवळच तिला भोपळा आणि रबांगू नाले मिळतात, तर केलीला साकळी नदी येऊन मिळते. म्हणजे पर्वत राजीने वेढलेल्या सिपनेच्या

प्रवासात सिपनेने ज्या नदीकाठच्या सपाट जंगल क्षेत्राला नटविले, सजविले, श्रीमंत केले तो हिरवा पाचू म्हणजे कोलकाझ. म्हणूनच कोलकाझ ज्या दिवशी संपलेले असेल त्या दिवशी सारा मेळघाट नष्ट झाला असेल.

सिपनेच्या या नदीकाठच्या जंगल विस्ताराचे वैशिष्टय असे की कोलकाझ विश्रामगृहासमोर आंथरलेला हा जंगलविस्तार कुणी पायी तुडवला नाही, त्यातली वैशिष्टये जाणून घेतली नाहीत तरी केवळ दनविश्रामगृहाला भेट दिल्यानंतरही कोलकाझची हि हिरवी संपन्नता पाहणाऱ्याला चटकन आकर्षून घेते आणि येथल्या नैसर्गिक सौंदर्याने माणूस भारावून जातो. परंतु सिपना ओलांडून नुसता राखी डोह ते दिया डोह हा वनदेवतेच्या क्रीडा क्षेत्राचा प्रवास केला तर या संपन्न जंगलक्षेत्रातील कितीतरी आश्चर्य माणसाला थक्क करुन सोडतात. मेळघाटातल्या संपन्न आणि भक्कम सागवानासोबत सालई, मोईन, धावडा, हलदु, कुंकु, लेंडिया, उंबर, वड, मोह, फेफर, आंबा, वेल, कुंभी, अर्जुन आणि कितीतरी वृक्ष स्वर्गीचा परिजातक आणि माहुलवेल या सोबत अनेक वृक्षवेलींनी हा परिसर नटलेला दिसतो आणि जागोजागी वन्यप्राण्यांच्या अस्तित्व-खुणा उधळलेल्या असतात. दिया डोहचे एक आगळे आणि आश्चर्यकारक वैशिष्ट्य म्हणजे या डोहाच्या उजव्या काठावर एक उंच पिंपळ उभा आहे. या संपूर्ण जंगल क्षेत्रातला एकमेव पिंपळ दिया डोहाच्या डाव्या तीरावर एक गर्द आणि वृक्षवेलींनी वेढलेली आमराई आहे. ही वाघा-बिबटांची लपण्याची जागा, तर अस्वलांचे आश्रयस्थान कास्मार पहाडीलगतच्या जंगलात, सांबरे, रानगवे, भेडकी हरीणे आढळतात, तरा भोपळा नाल्यातून वाघ, बिबट प्राण्यावर उतरतात दिया डोहाच्यानजीक असलेल्या आमराई लगत एका सरळसोट आणि सुमारे ४० फुट उंच अर्जुनावर मधमाशांचे एक पोळे लटकत होते. मधमाशा घोंगावत होत्या. अचानक मधमाश्यांच्या पोळ्याचा एक चावलेला तुकडा खाली पडला. वर पाहिले तर ज्या आडव्या फांदीवर मधमाश्यांचे पोळे होते, त्या फांदीवर ओणवे लटकून एक अस्वल मध खाण्यात गुंतले होते. राबंग आकीदर्डाच्या गोलाकर जंगलतुकड्याच्या एका काठावर एका अर्जुन वृक्षाचे आपले स्वतंत्र व्यक्तिमत्व उभे ठेवले आहे. शरदातल्या दुपारी एक हनुमान माकड आणि एक

भेडकी हरिणी यांचा शिवाशिवीचा खेळ सुरु होता. भेडकी अर्जुन वृक्षाला गोलाकार फिरत होता, तर माकड तल पकडण्याचा प्रयत्न करीत होते. राखी बल्ड्यावरील वनविश्रामगृहाच्या अंगणातून हा खेळ सुमारे अर्धा तासपर्यत पाहता आला.

कोलकाझ हे अद्यापही एका अनाघ्रात निसर्गचित्र असले तरी मानवी उपद्रवांचा अनुभव आणि इतिहास कोलकाझलाही आहे. ब्रिटिश काळात कोलकाझ हा एक साधा पडाव होता आणि त्याच काळात केव्हातरी निदान सुमारे ८० वर्षापूर्वी कोलकाझला वन-विश्रामगृह बांधण्यात आले आणि कोलकाझातील वृक्षतोडीसोबत कोलकाझला शिकारीही सुरु झाल्या. परंतु तरीही या संपन्न वनक्षेत्राचे ऐश्वर्य कमी झाले नाही. पुढे १९३५ च्या सुमारात तर कोलकाझला ''ढाकणा कोलकाझ गेम सॅन्क्चुरी' चा दर्जा देण्यात येऊन कोलकाझ क्षेत्रात शिकारीचे कायदेशीर परवाने देण्याची पध्दत अवलंबिल्या गेली. त्यामुळे स्वातंत्र्योत्तर काळातही अनेक गाजलेल्या शिकारी कोलकाझ क्षेत्रात झाल्या. कोलकाझचे वैशिष्ट्य जाणून घेऊन सन १९६९ च्या सुमारास महाराष्ट्र सरकारने कोलकाझ परिसराला संरक्षण देऊन ढाकणा कोलकाझ अभयारण्याची निर्मीती केली आणि कोलकाझचे नैसर्गिक सौंदर्य अबाधित ठेवण्याचे प्रयत्न सुरु केले. पुढे कै.श्री.वसंतराव नाईक महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असताना कोलकाझच्या राखी बल्ड्याचे सपाटीकरण करुन या टेकाडावर एक सुंदरसे वन-विश्रामगृह बांधण्यात आले. सन १९७० साली बांधलेले हे विश्रामगृह कोलकाझच्या निसर्गचित्राची कल्पना विश्रामगृहात थांबणाऱ्या प्रत्येकाला देण्याच्या प्रमुख संकल्पनेचा विचार करुन बांधण्यात आलेले असून, मेळघाटातील एक आकर्षक विश्रामगृह आहे. या विश्रामगृहात थांबून कधी कधी मेळघाटच्या वन्यजीवांच्या दर्शनाचा आनंद घेता येतो.

मात्र कोलकाझचे जुने विश्रामगृह आणि नवे १९७० साली बांधलेले विश्रामगृह यातील कोलकाझची उपेक्षा पुष्कळ दिवस सुरु राहिली. कै.श्री.वसंतराव नाईक यांचे पुतणे आणि महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री श्री.सुधाकरराव नाईक यांच्या पुढाकाराने सन १९९३ साली कोलकाझच्या सौंदर्याकरणाला पुन्हा एकदा उजाळा मिळाला आणि कोलकाझच्या ब्रिटिशकालीन जुन्या विश्रामगृहाच्या नुतनीकरणासोबत

केलकाझच्या विश्रामगृहाच्या परिसराच्या सौंदर्यीकरणाचे काम करण्यात आले. या प्रयत्नात कोलकाझ येथे उद्यानांची निर्मिती, रोपवाटिका, पर्यटकांना राहण्याच्या (अर्थात सीमित) सोयी यांचा विकास करण्यात येऊन जुन्या आणि ब्रिटिशकालीन वनविश्रामगृहाचा परिसर ''वसंत संकुल'' म्हणून करण्यात आला. राखी डोहावरील वनविश्रामगृह १९७० पासून कोलकाझच्या नैसर्गिक सौंदर्याचा एका दृष्टीक्षेत्रात अंदाज देते, तर ब्रिटिशकालीन जुने वनविश्रामगृह व आजचे ''वसंत संकुल'' थेट सिपनेच्या पात्रात उतरविले ही या दोन वनविश्रामगृहांची वैशिष्ट्ये, म्हणूनच सिपनेचाडा तुकडा पर्यटकांना आवडतो. येथल्या निसर्गचित्रात सिपनेच्या एका अंगाला नैसर्गिक वनक्षेत्र आहे, तेथे वन्यप्राणीही दिसतात, तर दुसऱ्या अंगाला राखी बल्ड्यावरील वनविश्रामगृह ते वसंत संकुल य भागात वने चालविण्यासाठी सुरु असलेल्या मानवी प्रयत्नांची साक्ष आहे. तेथे उद्याने व रोपवाटिका विकसित होत आहेत. पर्यटकांना उपलब्ध करुन देण्यात आलेल्या. सुविधांमध्ये काही त्रुटी असल्या आणि त्यांचे स्वरुप मानवी चुकांचे असले तरी कोलकाझचे आकर्षण महाराष्ट्रातच नव्हे, तर भारतातील निसर्गप्रेमींना अद्यापही आहे. अर्थात, कुठेतरी मेळघाटातील स्वर्गाचे हे आकर्षण कायम ठेवले पाहिजे. हे निसर्गचित्र कायम ठेवावयाचे झाल्यास राजकीय अणि सामाजिक इच्छाशक्तींनी स्वत:वर बंधनेघालून घेतली पाहिजेत. त्यांनी कोलकाझच्या वनविश्रामगृहंचा उपभोग जरुर घ्यावा. परंतु कोलकाझला राजकीय किंवा सामाजिक मेळावे भरविणे हे कितपत योग्य ठरते.

१, सय, संकल्प कॉलनी, कॅम्प, अमरावती - ०२

पंचेविशीतला व्याघ्र प्रकल्प

सन १९८४ मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या दशकपुर्ती निमित्त एक सविस्तर लेख त्यावेळी दै.हिंदुस्थान व दै.तरुण भारतात प्रसिध्द झाला होता. २२ फेब्रुवारी १९७४ साली स्थापित झालेल्या मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या एकूण अस्तित्वाविषयी एक शंकास्पद आलेख त्यावेळी या लेखात उमटला होता. मेळघाट व्याघ्र प्रकल्पात त्यावेळी वाघांची संख्या केवळ २७ होती. आणि मेळघाट संरक्षित केला असता तरी

व्याघ्र प्रकल्पाकडे बघण्याचा महाराष्ट्र वनखात्याचा दृष्टीकोण महसूली उत्पन्नात निर्माण झालेला अडथळा असाच होता. मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचे गर्भगृह (कोअर) सोडल्यास उर्वरित व्याघ्र प्रकल्प क्षेत्र दुहेरी नियंत्रणाखाली होते. (अद्यापही हे दुहेरी नियंत्रण सुरु आहे) आणि वृक्षतोड, तेंदुपत्ता तोड, बांबू तोड इत्यादी महसूल कामे याही क्षेत्रात सुरु होती. कोलकाझ जवळ तुरळक दिसणारे चितळ (स्पॉटेड डिअर) सोंडल्यास अवघ्या मेळघाटात त्यावेळी फक्त शे- दीडशे चितळ होते. आणि एकू णच मेळघाटचे चित्र फारसे समाधानकारक नव्हते. व्याघ्र प्रकल्पाने त्यावेळी अपल्या आयुष्याची १० वर्षे पूर्ण केली होती.

१९७४ ते १९८४ चा मेळघाट व्याघ्र प्रकल्प आणि १९८४ ते १९९८ चा मेळघाट व्याघ्र प्रकल्प यात आज काही फरक दिसतो काय ? १९७४ ते १९८४ या दहा वर्षात मेळघाटात काही विशेष फरक पडला नव्हता. अस्तित्वात आलेल्या मेळघाट व्याघ्र प्रकल्पाची कोणतीही मुद्रा त्या १० वर्षात मेळघाटात उमटली नव्हती. नव्हे व्याघ्र गणतीचे अहवालही फरसे समाधानकारक नव्हते. परंतु १९९८ साली आपल्या रौप्य महोत्सवी वर्षात पदार्पण करणाऱ्या मेळघाट व्याघ्र प्रकल्पाने गेल्या १४ वर्षाच्या काळात मात्र अनेक उपलब्धी प्राप्त केल्या आहेत. आणि आपली एक निश्चित मुद्रा केवळ मेळघाटावरच नव्हे तर भारतातीला व्याघ्र प्रकल्पांच्या साखळीत निर्माण केली आहे. मेळघाटात पर्यटकांची संख्या वाढली आहे. आणि वाघांचीही. ७३ वाघांचे वैभव शिरोभागी मिरवित मेळघाट व्याघ्र प्रकल्प आज देशातला प्रमुख व्याघ्र प्रकल्प गणल्या जातो. आणि मेळघाटात वाघांचे दर्शन दुर्मिळ असले तरी वाघोबा अनेक पर्यटकांसमोर अधून मधून आपले अस्तित्व प्रकट करतात. वाघांच्या दर्शनाच्या (सायटिंग) नोंदी आजकाल ठेवल्या जात असतात आणि वाघ बघणाऱ्यांची संख्या गेल्या पाच वर्षात वाढली आहे.

अर्थात व्याघ्र प्रकल्पाच्या स्थापनेचे संकल्प आणि हेतू लक्षात घेतल्यास वाघांची संख्या वाढणे किंवा वाघांचे दिसणे यात व्याघ्र प्रकल्पाच्या यशस्वितेची बीजे रुजलेली नाहीत. सपाटीच्या जंगलप्रदेशातही वाघ दिसून जातात. परंतु जैविक

विविधतांचे संरक्षण आणि जतन करुन वाघांच्या नैसर्गिक पुर्नऊत्पत्तीचे प्रयत्न आणि त्यांचे संरक्षण हा जो व्याघ्र प्रकल्पाच्या संकल्पनेमागील मूळ हेतू तो मेळघाट व्याघ्र प्रकल्पात कितपत यशस्ती झाला आहे, याच मुल्यमापन झाल्या शिवाय या प्रकल्पाची यशस्विता किंवा अपयश यांचे योग्य मूल्यमापन शक्य नाही. व्याघ्र प्रकल्पाच्या स्थापनेला दोन दशके झाल्यानंतर या वीस वर्षाच्या कालखंडाचा एक आढावा मेळघाट व्याघ्र प्रकल्पाने पुस्तकरुपाने प्रसिध्द केला आहे. त्यात व्याघ्र प्रकल्पाच्या संस्थापनेच्या संदर्भातील उपलब्धी दिल्या आहेत. परंतु १९८८ पासून एक नवा आयाम घेवून समोर येत असलेल्या मेळघाट व्याघ्र प्रकल्पात वाघांसोबत कोलकाझ, धारगड, गुल्लरघाट, हातरु, रंगूबेली, तारुबांदा आणि पाटकोह भागात चितळ हरीणांचे ६०/७० प्राण्यांचे कळप दिसतात आणि या हरीण प्रकारातल्या तृणभक्षी प्राण्यांची संख्या आज सुमारे ६०० च्या घरात गेली आहे. मेळघाट व्याघ्र प्रकल्प आपल्या संकल्पना हेतूशी प्रामाणिकपणे वाटचाल करीत आहे. ही याची साक्ष ठरावी. चितळांचे मनोज्ञ दर्शन हा मेळघाटातील पर्यटकांना सुखावून जाणारा एक अनुभव असतो.

मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचा सरासरीने विचार केल्यास १९८८ हे वर्ष या व्याघ्र प्रकल्पाला गतीमान करणारे ठरले. प्रशासकीय दृष्टीने मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचे सेमाडोह येथील निसर्ग निर्वचन संकुल आणि मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या पर्यटन क्षेत्राचा विकास १९८८ साली सुरु झाला आणि १९८८ पासूनच मेळघाट व्याघ्र प्रकल्पाची विविध संशोध प्रकाशने प्रसिध्द व्हावयास सुरुवात झाली. मेळघाटातील संशोधनात्मक कामांना १९८८ पासून वेग घेतला आणि या संशोधनाचा परिपाक म्हणून आजवर मेळघाट व्याघ्र प्रकल्पाने विविध आंतराष्ट्रीय, राष्ट्रीय आणि राज्यस्तरावरील सुमारे ३० संशोधन प्रकल्प सादर करण्यात आले. मेळघाट व्याघ्र प्रकल्पाने या संशोधनात्मक कार्यात वनपाल श्री.गिरी यांनी केलेला वनौषधीचा अभ्यास तर वाघांच्या हाडाचा अभ्यास करणारे प्रकाशन आज विशेषत्वाने गौरविल्या जाते.

सन १९८४ साली व्याघ्र प्रकल्पाविषयी ज्या शंका उपस्थित करण्यात आल्या होत्या. त्यात प्रामुख्याने वाघ आणि बिबटे व त्यांना जगण्यासाठी आवश्यक

असलेली तृणभक्षी प्राण्यांची संख्या याबाबत आक्षेप घेण्यात आला होता. पाळीव गुरांनी भरलेल्या मेळघाटात वाघा बिबट्यांचे नैसर्गिक खाद्य त्यांना उपलब्ध आहे काय हा प्रश्न त्यावेळी चर्चिल्या जात होता. खरे म्हणजे हा प्रश्न तसा आजही कोडेच वाटतो. कारण मेळघाटात अद्यापही सुमारे ५०० ते ६०० पाळीव गुरे वाघा बिबटांकडून मारल्या जातात. वाघा बिबटांनी पाळीस गुरे मारल्यास त्यापोटी मिळणाऱ्या नुकसान भरपाईचे स्वरुप व पध्दती पुर्वी तोकड्या आणि क्लिष्ट असायच्या त्या सध्या सुदैवाने बऱ्याच सैल झाल्या आहेत. त्यामुळे वाघा बिबटांकडून मारल्या जाणाऱ्या गुरांच्या तक्रारी सध्या मोठ्या प्रमाणावर नाहीत परंतु वाघांची संख्या मात्र वाढली आहे. बिबटही वाढले आहेत आणि पाळीस गुरांवरील हल्याच्या तक्रारी कमी झाल्या आहेत. व्याघ्र प्रकल्पाकडून मिळालेल्या आकडेवारीनुसार वाघा बिबटांच्या अन्न प्रकारात मोडणाऱ्या प्राण्यांपैकी सुमारे १२० भेडकी हरीणे, २४०० रानगवे, २५०० सांबर, २३०० रानडुकरे, २२५ चौसिंगा, ६०० चितळ, १७५ निलगायी, ४४०० हनुमान माकडे (लंगुर) १४०० लालतोंडी माकडे आज मेळघाटात आढळतात. याशिवाय मेळघाटचा काही भाग अस्वलांसाठी प्रसिध्द होत असून सुमारे २५० अस्वले मेळघाटात आढळतात. सुमारे ७३ वाघांशिवाय १०० ते ९५ बिबट, ३०० रानकुत्री, ५० तडस, १०० कोल्हे ही मेळघाटात आढळून येतात. १९७४ च्या तुलनेत मेळघाटातील प्राणी संख्येची ही वाढ सुमारे ३० ते ३५ टक्के असल्याचे सांगण्यात येते.

दुर्देव किंवा कोणते दैव असो पण मेळघाटात वन्यप्राण्यांची वाढ ३० ते ३५ टक्के असतांना पाळीव गुरांच्या संख्येतही झपाट्याने वाढ होत असून मेळघाटातील पाळीव गुरांची संख्या आज सुमारे २५००० आहे. पुनर्वसनाच्या प्रश्नांचे, शासकीय निमशासकीय आणि स्वयंसेवी संस्थामार्फतचे घोळ १९७४ पासून अद्याप सुटलेले नसले तरी मेळाघाटातील पाळीव गुरांची वाढती संख्या मेळघाटाच्या तृणभक्षी वन्य प्राण्यांच्या संख्येत होवू शकणाऱ्या अपेक्षित वाढीला प्रतिबंध करते आहे ही गोष्ट त्यामुळे नाकारता येत नाही.

मात्र मेळघाटातील व्याघ्र प्रकल्प वन्याप्राण्यांच्या विविधतेबाबत

जागरूक आहे. याचीही येथे नोंद घ्यावयास हवी. मेळघाटात विपरीत परिस्थितीतही आपले अस्तित्व टिकवून ठेवणाऱ्या मार्जार प्रकारातील कॅरॅकल, हरिण प्रकारातील माऊस डियर किंवा खवल्या मांजरे यांची निरिक्षणे व नोंदी त्याद्दष्टीने बोलक्या आणि कौतुकास्पद आहेत. मेळघाटातील पाळीव तृणपक्षी प्राणी आणि तृणभक्षी वन्यप्राणी यांच्यातील स्पर्धा अद्याप संपली नसली तरी विपरित परिस्थितीत आपले अस्तित्व टिकवून ठेवणाऱ्या या वन्यप्राण्यांचा अभ्यास व संशोधन मेळघाट व्याघ्र प्रकल्पाने यापुढे करायला हवे.

वन्यप्राणी आणि वनक्षेत्रे यांच्या घनतेत होत असलेल्या वाढी सोबतच मेळघाटात पक्षी आणि वनस्पतींच्या जैविक विविधतांच्या अभ्यासाच्या कक्षा रुंदावल्या आहेत. सातपुडा जैविक विविधता संशोधन प्रकल्पाअंतर्गत भारतीय वन्यप्राणी संस्थेच्या कु.प्राची मेहता यांनी मेळघाटचा अभ्यास करुन काही नव्या पक्ष्यांच्या नोंदी मेळघाटाने केल्या आहेत तर वि.म.वि.च्या वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ.प्रा.सौ.प्रभा भोगावकर यांनी नुकत्याच मेळघाटात 'सेरोपेजिया आक्युलाटा' या दुर्मिळ वनस्पतीसोबत आणखीही काही दुर्मिळ वनस्पती प्रजाती मेळघाटात शोधून काढल्या आहेत. वनस्पती, पक्षी प्राणी, परिस्थितीकीचा अभ्यास (इको सिस्टिम) आज मेळघाटात होतो आहे ही निश्चितच संशोधक आणि निसर्गप्रेमींना मेळघाटकडे आकृष्ट करणारी बाब आहे.

मेळघाट व्याघ्र प्रकल्पाची स्थापना झाली तेव्हा मेळघाटचे एकूण क्षेत्रफळ १५९७ चौ.कि.मी. चे हाते. खासदार श्री.सुधाकरराव नाईक महाराष्ट्राचे मुख्यमंत्री असतांना फेब्रुवारी १९९४, मध्ये मेळघाट अभयारण्याची पुनर्रचना करण्यात येवून मेळघाटाचे गर्भगृह, सभागृह आणि मंडप असे त्रिस्तरीय स्वरुप निश्चित करण्यात आले. या त्रिस्तरीय रचनेनुसार मेळघाट व्याघ्र प्रकल्पात ३६१६.२८ चौ.कि. मी. चे अतिसंरक्षित क्षेत्र, ८७७.७५ चौ.कि. मी. चे अभयारण्य क्षेत्र आणि ५२६.९० चौ.कि.मी. ये बहूविध वापर क्षेत्र असा एकुण १६७६.९३ चौ.कि.मी. चा व्याघ्र प्रकल्प निर्माण झाला आहे. या पुनर्रचनेत मेळघाट व्याघ्र अभयारण्याचा आकार कमी करण्यात आला असून या संदर्भात काही निसर्गवाद्यांनी उच्च न्यायालयाची दारेही ठोठावली आहेत. मेळघाट व्याघ्र प्रकल्पाची १९९४ साली झालेली पुनर्रचना वादाच्या भोवऱ्यात असली

तरी मेळाघाटातील टी.पी.(टायगर प्रोजेक्ट) आणि टी.टी. (टेरीटारियल) हे प्रश्न अद्याप सुटले आहेत काय ? हा मात्र एक संशोधनाचा विषय ठरावा. दुर्देवाने या प्रश्नात वन्यप्राण्यांच्या संरक्षणाच्या आस्था आणि आवश्यकता यांचा विचार कुठेही दिसत नाही. उलटपक्षी अधिकाऱ्यांचा दर्जा आणि कर्मचाऱ्यांचे प्रश्न यातच हा वाद अधिक गुंतलेला दिसतो. उदाहरण म्हणजे १९९६ साली महाराष्ट्र शासनाने एक शासन निर्णय जारी करुन संपूर्ण व्याघ्र प्रकल्प व्याघ्र प्रकल्पाच्या क्षेत्र संचालकांच्या एकीकृत अंमलाखाली अणण्याचे निश्चित केले. व्याघ्र प्रकल्पांवरील दुहेरी नियंत्रण हटविण्यासाठी घेतलेला हा एक चांगला निर्णय आहे. परंतु महाराष्ट्राच्या वनखात्याने आणि पर्यायाने महाराष्ट्र शासनाने हा निर्णय अद्यापही अंमलात आणलेला नाही.

पर्यटकांचे वाढते आकर्षण आणि वन्यप्राण्यांच्या वाढलेल्या संख्येमुळे वाघा बिबटांचे नशीबवान दर्शन सोडल्यास इतरत्र दिसणारे विपुल वन्यप्राणी यामुळे मेळघाट व्याघ्र प्रकल्प आज महाराष्ट्रात आणि देशात एक महत्वाचा व्याघ्र प्रकल्प ठरू पाहत असला तरी मेळघाटचे प्रशासकीय पातळीवरील व धोरणात्मक पातळीवरील प्रश्न अद्याप सुटलेले नाहीत. मग तो प्रश्न एकीकृत अंमलाचा असो किंवा उपलब्ध होणाऱ्या निधीचा. अधिकाऱ्यांचे परस्पर हेवेदावेच काही प्रमाणात मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या प्रगतीतले अडसर आहेत. तर पुनर्वसनाच्या प्रश्नासोबतच इतर अनेक बाबतीतली मतभिन्नता आणि निर्णयहीन शासकीय धोरण वन्यजीव संरक्षणाच्या संदर्भात एकूणच प्रश्न निर्माण करीत आहेत. खरे म्हणजे नष्ट होणारी प्रजाती म्हणून आणि काळाची गरज म्हणून मेळघाट व्याघ्र प्रकल्पाकडे महाराष्ट्र शासनाने अत्यंत जाणीवपूर्वक लक्ष ठेवायला हवे. खंबीर आणि योग्य निर्णय हवेत. आज रौप्य महोत्सवी वर्षात पदार्पण करतांन अमरावती जिल्ह्यातील या प्रकल्पाकडे महाराष्ट्र शासन या नव्या जाणीवांनी पाहिल अशी अपेक्षा बाळगावी काय ? व्याघ्र प्रकल्पांबाबत शासकीय उपेक्षा थांबेल आणि योग्य निर्णयांची अंमलबजावणी सुरु होईल तो खऱ्या अर्थाने वनसंवर्धन व संरक्षण मोहिमेचा शुभारंभ असेल.

(श्याम देशपांडे, १, सय संकल्प कॉलनी, कॅम्प, अम.)

परिशिष्ट क्र. २२

अवर्गीकृत प्रकरणे

नागपूरच्या "झेंडा" सत्याग्रहात अमरावतीची पहिली तुकडी मुलांची।

दि. ६ एप्रील १९२३ पासून नागपूरला झेंडा सत्याग्रह ला सुरुवात झाली. या सत्याग्रहात भाग घेण्याचे इच्छेने अमरावतीचे श्री. रतनलाल बापुजी काळे, (वय-१६ वर्षे), श्री. रामभाऊआप्पा (वय-१६ वर्षे) आणि श्री. शंकर सिताराम पळसे (वय-१६ वर्षे) या तीन मुलांनी स्वयंस्फूर्तीचे तयारी केली होती. हे तिन्ही विद्यार्थी, त्यावेळच्या राष्ट्रीय शाळेचे विद्यार्थी होते व महात्मा भगवान दिन यांचे त्यापूर्वी अमरावतीस झालेल्या भाषणातून त्यांना देशसेवेची ही प्रेरणा मिळाली होती.

परंतु घरची वडीधारी मंडळी या लहान मुलांना परगांवी आणि तेही सत्याग्रहासाठी कसे जाऊ देणार? म्हणून या तिघांनीही सिनेमाला जाण्याचे निमित्त करुन दि. ३० एप्रील १९३० रोजी नागपूरला जाणाऱ्याा रात्रीच्या रेल्वेचे तिकीट काढले आणि सकाळी नागपूरला पोचले. (दि. १ मे पासून सत्याग्रहाची सुरुवात होणार होती.) जाण्यापूर्वी हे तिघेही प्रथम वीर वामनरावदादा यांना भेटले होते. परंतु तिघांचाही जाण्याचा पक्का निर्धार असल्याने, दादांनी त्यांना श्री. आप्पाजी मुळे वैद्य यांचेकडे पाठविले. तेथून रेल्वे तिकीटासाठी पैसे घेऊन तिघेही तडक स्टेशनकडे गेले.

दुसऱ्या दिवशी नागपूरला पोहचल्यानंतर विचारपूस करीत ते शुक्रवारी मधील सत्याग्रही शिबीरात पोचले. परंतु तेथे सत्याग्रहासाठी ठिक-ठिकाणाहून आलेल्या सत्याग्रहींची खूप गर्दी झालेली होती. सत्याग्रहासाठी तिघांची तुकडी पाठविली जात असे. दिवसभर असा सत्याग्रह चालू असे.

न विचारता घरुन निघून आल्यामुळे वडील मंडळी येऊन सत्याग्रहापूर्वीच परत नेतील ही भिती होती. म्हणून सत्याग्रह शिबिर प्रमुखांना आग्रह विनंती करुन दि. १ मे १९२३ रोजी सायंकाळी ६ वा. या तिघांनाही सत्याग्रहासाठी परवानगी मिळाली. नंतर तिघांचाही जाहीर सत्कार झाला व फोटा घेण्यात आला. या सभेनंतर सत्याग्रही

मिरवणुणीने सिव्हील लाईन्सचे हद्दीपर्यंत आलेत. तेथे मिरवणूक थांबली. श्रीमती सुभद्राकुमारी चौहाण यांनी या तिघांचे कपाळी तिळक लावला. नंतर पुढे तिघेच झेंडा घेऊन निघाले तोंच पालिसांनी अडवले. घोडेस्वारांनीही घेरा घातला. या तिघांनाही थोडी धक्काबुक्की पोलीसांनी केली. हेतू हा की, भिऊन त्यांनी परत फिरावे परंतु तिघेही तेथेच झेंडा घेऊन उभे राहिल्याने त्यांना अटक करुन पोलिस ठाण्यावर हवालातील बंद केले. सायंकाळी ७ वा. ही अटक झाली होती.

नंतर हवालातीतील राजबंदींना पुरीभाजी देण्यांत आली. अंदाजाप्रमाणे दुसरे दिवशी या तिघांचे वडील आणि इतर नातेवाईक ठाण्यावर आलेत. त्यांनी तिघांनाही समजावण्याचा प्रयत्न केला परंतु कोणीच घरी येण्यास तयार होईना.

त्याच दिवशी ११ वा. दुपारी या सर्व सत्याग्रहींना मॅजिस्ट्रेट समोर उभे करण्यात आले. त्याही वेळी ही वडील मंडळी कोर्टात उपस्थित झाली व त्यांनी मॅजिस्ट्रेटला अर्ज दिला की, मुले लहान आहेत, त्यांना सोडून देण्यांत यावे. मॅजिस्ट्रेटनी समरी ट्रायलचे वेळी या तिघांनाही विचारले तुम्ही घरी जाऊ इच्छिता काय? तुमच्या वडीलांनी दिलेली आज्ञा तुम्ही पाळा वगैरे प्रकारे समजावले, परंतु तिघांनीही घरी जाण्यास नकार दिल्यामुळे त्यांना प्रत्येकी ३ महीने सक्त मजुरी आणि ५० रुपये दंड अशी शिक्षा देण्यात येऊन नागपूर जेलमध्ये त्यांची रवानगी करण्यात आली.

पुढे तिघांचीही तीन महीने पूर्ण शिक्षा भोगुन सुटका झाली. ते परत नागपूरच्या सत्याग्रही शिबिरात त्या दिवशी राहून रात्रीच्या गाडीने परत अमरावतीस येण्यासाठी निघाले. अमरावती पर्यंतचा रेल्वे पास त्यांना जेलमधूनच मिळाला होता.

येतांना हे तिघेही एक दिवस चांदूर रेल्वे येथे राहिले. तेथेही लोकोनी त्यांचा सत्कार केला. नंतर अमरावतीस वापस आलेत. तेव्हा बडनेरा स्टेशनवर दे.भ. केशवराव शालीग्राम वगैरे मंडळी त्यांचे स्वागतासाठी आली होती.

अमरावती रेल्वे स्टेशनवरही बरीच मंडळी स्वागतासाठी हजर होती. त्यांत डॉ. पटवर्धन हेही होते.

रेल्वे स्टेशनपासुन या तिघांचीही मिरवणूक काढण्यात आली. ती मुख्य रस्त्याने फिरुन बुधवारात वीर वामनराव दादांच्या घराजवळ आली. दादांनी या तिघांचीही पाठ थोपटली. त्याच दिवशी रात्री गणेश थिएटरमध्ये जाहीर सभा होऊन तींत या तिघांचाही सत्कार करण्यात आला होता.

दे.भ.रतनलाल बापुजी काळे हे १९२३ पासुन म्हणजे वयाच्या १६ व्या वर्षापासून राष्ट्रीय आंदोलनात भाग घेत आहेत. १९२३, १९३०-३२, १९४२ वेळी त्यांनी कारावास भोगला आहे. स्वातंत्र्योत्तर काळात ते निसर्गोपचार पध्दतीचा प्रचार प्रसार करतात. वय-७६ वर्षे. त्यांचे शिक्षण अमरावती व बनारस येथे झाले आहे.

अमरावतीच्या १९२१ सालीच्या दारु दुकानावरील पिकेटिंगमध्ये बालवयातच त्यांना १५ दिवसासाठी पोलिसांनी बंद करुन ठेवले होते. नागपूर येथे १९२३ साली झालेल्या झेंडा सत्याग्रहात वयाच्या १६ व्या वर्षी आपल्या दोन सहकाऱ्यांसह भाग घेऊन सत्याग्रह केला. त्यांत त्यांना ३ महिने शिक्षा भोगावी लागली. सायमन कमिशन १९२८ साली भारतात आले. त्यावेळी ते बनारसला शिकत होते. या कमिशन १९२८ साली भारतात आले. त्यावेळी ते बनारसला शिकत होते. या कमिशनचे विरोधांतील निदर्शनात त्यांना १ महीना स्थानबध्द करण्यात आले होते. ते काशी विद्यापीठाचे "शास्त्री" असुन, जैन शाद्वाद संस्कृत महाविद्यालय बनारस येथेही त्यांनी शिक्षण घेतले आहे.

इ.स. १९३० च्या कायदेभंगाचे आंदोलनात त्यांना ११७ कलमाखाली १ वर्षाची शिक्षा झाली होती. नंतर १९३२ मध्ये पुन्हा आंदोनल झाले. त्यातही ६ महिने शिक्षा झाली होती. तसेच १९४०-४१ च्या वैयक्तिक सत्याग्रहात त्यांनी ६ महिने कारावास भोगला आहे. १९४२ च्या "छोडो भारत" आंदोलनांत ते अडिच वर्षे कारावासात स्थान बध्द होते. अमरावतीत, नगरपालिके च्या म्यु. हिंदी प्रायमरी शाळा, बेलपुरा येथे ते मुख्याध्यापक होते. १९४२ च्या आंदोलनात भाग घेतल्यामुळे त्यावेळचे नगरपालिकेचे ऑफीसर-इन-चार्ज श्री.बेंद्रे यांनी त्यांना नोकरीतून बर्खास्त केले होते.

१९४५ साली स्थानबध्दतेतून मुक्त झाल्यानंतर त्यांनी विदर्भ कॉमीकल्चरल सोसायटीची स्थापना केली. या संस्थेतर्फे बालक मंदीर चालविले जात असे. हरिजन व गरीब विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी शिष्यवृत्त्या दिल्या जात आसत. याच काळात ८ एकर जमीन खरेदी करुन तेथे गांधी आश्रम सुरु केला आणि स्वावलंबी विद्यार्थीगृह, स्त्रियांचे गृह, बालक मंदीर वगैरे संस्था सुरु केल्या.

नंतर राष्ट्रपिता म. गांधी यांची भेट घेऊन, काँग्रेसचा त्यांनी राजीनामा दिला व सोयाबीनचा प्रचार, प्राकृतिक जीवन आणि प्राकृतिक चिकित्सा मिशन सुरु केले. या कार्यानिमित्त त्यांनी १०२ शिबिरे, ९००० व्याख्याने व त्या निमित्त कश्मिर, नेपाळसह सर्व देशभर दौरा केला आहे (वय-७६) निसर्गोपचार पध्दतीचा प्रचारार्थ त्यांनी आपले नांव "निसर्गानंद" असे केले असून, आजही या वयात ते या कार्यानिमित्त दौरे, प्रवचने-व्याख्याने-देत असत.

१९४२ च्या आंदोलनात भाग घेऊन कारावास भोगणारे व हल्ली सर्वोदय वादी विद्यार्थी श्री. एकनाथ माधवसा हिरुरकर यांनी आपले अनुभव सांगितले ते येथे शब्दबध्द केले आहेत.

मी कसा पकडला गेलो. (लेखक एकनाथ हिरुरकर)

९ ऑगष्टला म. गांधीसह काँग्रेस कार्यकारीणी व इतर प्रमुख पुढाऱ्यांना पकडण्यात आले. आणि इंग्रज राज्यकत्यांनी या देशाहून निघून जा (क्वीट इंडीया) हे आंदोलन सुरु झाले. या आंदोलनात मी हि ऊडी घेतली ती ९ ऑगष्टलाच.

वर्धे ला उन्हाळ्याच्या सुटीत मे मध्ये राष्ट्रीय युवक संघाचे शिबीराला मी गेलो होतो. तेथे बौधिके ऐकून माझे मन राष्ट्रीय भावनेने व स्वातंत्र्याच्या प्रेरणेने भरुन आले होते. एके रात्री शिबीरात राष्ट्रीय संघाचे प्रमुख श्री.आनंदराव कळमकर यांनी आम्हा अमरावतीकर योग शिबीरार्थांची मिटींग घेतली. ही मिटींग रात्री बऱ्याच वेळेपर्यत चालली मला आठवते १२ ते १ वाजेपर्यत चालली असावी. त्यांनी आमच्या समोर प्रश्न टाकला त्याचे उत्तर ते आमच्याकडून मागत होते. प्रश्न होता "महात्मा गांधीनी राज्य

राज्यकर्त्यांनी चालते व्हा. ही घोषणा केली. आणि ते भयंकर अशा स्वरुपाचे आंदोलन सुरु करणार आहे. तेव्हा तुमच्यापैकी कोण कोण ह्या स्वातंत्र्याच्या आंदोलनात भाग घेणार आहात'' आंदोलनाची आम्हाला कल्पना नव्हती, आम्ही शिबीरात आलो तेव्हा काही गांधीजींनी क्वीट इंडीयाची घोषणा केली नव्हती.

अंधारतच मिटींग सुरु होती. टार्चच्या प्रकाशात प्रत्येकाचा चेहरा पाहून विचारण्यात येत होते कोणीच काही उत्तर देत नव्ते. आंदोलनाचे स्वरुप भयंकर राहणार होते. चौकीवरच्या पोलीसांना धक्के मारुन त्या जागेवर तुम्हाला रहदारीचे नियंत्रण करावे लागेले. अशा तऱ्हेच्या शिबीरात काही प्रमाणात शिक्षण सुरु होते आम्ही कोणीच उत्तर न दिल्यामुळे कोणताही निर्णय न घेताच ती मिटींग संपली आणि विचार करुन निर्णय घेतला.

नागपुरला श्री. आनंदराव कळमकर बाँब बनवित होते. बाँब बनवून दुसऱ्याकडे नेत असतांना स्फोट झाला बऱ्याच युवकांना पकडले. आनंदराव कळमकर यांच्यावर पुढे तेलंगखडी बाँब केस म्हणून खटलाही चालला. आम्हालाही ही गोष्ट कळली आम्ही बाँब बनविण्याकरीता काही वस्तू त्यांना दिल्यानंतर ते बाँब देणार होते. म्हणून आम्ही त्या दृष्टीने तयारी केली.

तो ग्रुप विद्यार्थ्यांचा होता त्या ग्रुपमध्ये एक सी.आय.डी. चे काम करणार विद्यार्थी होता तो सर्व बातम्या पुरवित होता. त्यामुळे बऱ्याच वेळा आम्हाला कामे घेण्यात अपयश येत होते.

बॉम्ब बनविण्याकरीता ॲसीड, गंधक मिळवायचे होते ते कोठे मिळेल, कोठून आणावे हा प्रश्न होता तेव्हा किंगवर्ड कॉलेजच्या लेबॉरेटरी मधून गंधकाचा व ॲसीडच्या भरण्या चोरुन आणावयाच्या व त्या नागपूरला पाठवायच्या ।अशी एक योजना आखली. त्यावेळी किंगएडवर्ड कॉलेजमध्ये गॅदरींग होते.ह्या गॅदरींगचा फायदा घ्यावयाच्या असे ठरले. गॅदरींग सुरु असतांना इलेक्ट्रीक आईन फ्युज करुन अंधारात त्या भरण्या चोरावया पोलिसांचे लक्ष दुसरीकडे वेघण्याकरता कॉलेज जवळ असलेल्या गवताच्या गंजीला

आग लावावी. ही आग पाहून पोलीस आले आणि मी त्या प्रकाशात गंजी जवळ दिसलो तर मलाच अटक होणार होती. आणि गवतांची गंजी असलल्यामुळे काही मोठी घटना घडणार नव्हती. पोलिस तिकडे काही घडले म्हणून लक्ष केंद्रीत करील तेवढ्या वेळात इकडे ह्या ग्रुपने भरण्या चोरुन श्री. रामभाऊ सोळंके ह्यांचे जवळ घ्यावा व त्यांनी त्या पुढे योजनेप्रमाणे नागपूरला पाठवाव्या.

अशा तऱ्हेने योजना आखल्यानंतर आम्ही सर्वजण वलगांव रोडने नॉर्मल स्कुलचे मागील एका रस्त्याने एका रात्री निघालो बरीच दक्षता घेतली होती. बरीच गुप्तातही राखली होती तरी पण पोलीसांना वार्ता कळलीच कारण आमचा एक सी.आय.डी. चे काम करणारा होता परंतु आम्हाला हे फार उशीरा आम्ही सुटून आल्यानंतर कळले. आम्ही रस्त्याने जात असतांना एक व्यक्ती एकाचे नांव आणि माहिती विचारत होते. वारंवार ते विचारीत होत व पुढे रस्ता चालत आमच्या बरोबर येत होते आम्हाला संशय येताच आम्ही सावध झालो परंतु थोडे पुढे जाताच आम्हाला पकडून झडती घेतली.

झडतीमध्ये माझ्या भावाच्या पेटीत एक बुलेटीन होते. आष्टी गोळीबाराचा वृतांत होता. त्यात गोळीबारात ठार झालेल्या व जखमी झालेल्यांची शेती . त्या यादीत माझ्या काकाचे नावही होते. आणि भावाने बुलेटीन त्यांच्या पेटीत ठेवले होते. झडतीत ते बुलेटीन मिळाले तेव्हा ती पेटी कोणाची आहे असे विचारलाच ती माझी आहे असे सांगितले तसे जर सांगीतले नसते तर आणि काकाची असे सांगीतले असते तर भावाला अटक झाली असती.

मला व सोळंकेला अटक करुन केस भरण्यांत आली. आणि बाकी सर्व विद्यार्थ्यांना सोडण्यांत आले.

आम्हाला तुरुंगात नेण्यात आले. त्यावेळी श्री. माधवराव हे जेलर होते व मासून अली हे सुपरीटेंडन होते. जेल नियमाप्रमाणे जेलरने दुसरे दिवशी सुपरीटेंड समोर उभे केले. आम्हाला जात विचारण्यात आली. आम्ही जातपात केव्हाच सोडली होती. आम्ही जात काही सांगत नव्हतो. बोलण्यात खूप वेळ गेला. आम्ही आमची जेव्हा

निर्धारानेच सांगितले की, सरकारच्या बापालाही आम्ही जात सांगणार नाही. आम्ही जात सोडली आमचा तो निर्धार पाहून त्यांनी जात विचारणे सोडून दिले. इतर प्रश्नांना योग्य उत्तरे दिली. आमची केस मला वाटते जेलमध्येच चालली. श्री. बंबवाले यांचे समोर केस होती त्यावेळी मॅजेस्ट्रेट श्री. बंबवाले होते. केस चालविण्याकरीता वकीलही होते. काही वकीलांनी स्वातंत्र्य सैनिकाच्या केसेस चालविण्याचे ठरवले होते मला वाटते श्री. राजाभाऊ (आर.एस.) गोखले यांनी माझी केस चालवली. मला बुलेटीन (आक्षेपार्ह) बाळगल्या बध्दल ४ महिन्याची शिक्षा झाली मात्र दोन महिनेच्यावर डिटेशनमध्ये रहावे लागले १९४३ साली माझी सुटका झाली.

एकनाथ माधवराव हिरुरकर (११-३-८६.)

"श्री. तखतमल" यांचे घराणे.

श्रीमान तखतमलजी चांडक सुमारे १२५ वर्षापूर्वी राजस्थानमधील "पिपाड" नामक ग्रामीण क्षेत्रातून विदर्भातील अमरावती शहरात आले. अमरावतीला आल्यानंतर त्यांनी कापसाचा व्यवसाय सूरु केला.

श्री. तखतमलजी अतिशय कुशाग्र बुध्दीचे, व्यवहारकुधल तसेच कर्तव्यदक्ष होते. स्वभावत:च ते शालीन, धर्मनिष्ठ व सत्याचरणी असल्यामुळे त्यांनी आपला व्यापारही सचोटीने करुनच स्वकष्टाने भरपूर कमाई केली.

श्री. तखतमलजींना संतती सौख्य नसल्यामुळे त्यांनी श्री. वल्लभजी यांना दत्तक घेतले. श्री. वल्लभजीही बुध्दिमान, व्यवहारकुशल आणि दिर्घोयोगी होते. त्यांनी तखतमल श्री. वल्लभ फर्म स्थापन करुन व्यवसायात अमाप संपत्ती मिळविली. त्यांच्या परोपकारी वृत्तीमुळे ते गोर गरीबांना तसेच दीन दु:खितांना सहाय्यक करण्यास सदैव तत्पर असत. त्यांच्या सुविध धर्मपत्नी श्रीमती धन्नीबाई चांडक ह्याही वृत्तीने फार सात्विक, धार्मिक आणि दयाळू होत्या इ.स. १९१८ ते इ.स. १९४६ पर्यंत "श्री. तखतमल श्री वल्लभ फर्मचा कारभार त्यांनी स्वत: उत्कृष्ट पणे सांभाळला. त्यांचे सुपुत्र श्री. रामरतनजी चांडक सज्ञान होईपर्यंत फर्मचा कारभार समर्थपणे सांभाळून फर्मला त्यांनी प्रगतीपथावर

आणले ह्यातच त्यांचे असाधारण प्रशासन कौशल्य दिसून येते दानधर्म करण्यातही त्यांचा नेहमीच पुढाकार असे.

श्री. रामरतनजी चांडक हे श्रीवल्लभजींचे एकुलते एक सुपुत्र होते. त्यांचा जन्म दि. २५ मार्च १९०५ मध्ये अमरावती येथे झाला. बालपणाापासूनच ते अतिशय जिज्ञासू व कुशाग्र बुध्दीचे होते. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यानंतर श्री. रामरतनजी चांडक यांनी वडीलोपार्जित कापसाचा व्यवसाय बरोबर श्रीराम मोटार्स ट्रक कार टॅक्टर्स च्या व्यवसाय सुरु केला शेतीमध्येही कर्ज काढून स्वत:च्या अथक परिश्रमाने भरपूर धन दौलत मिळविली. लहानपणापासूनच उत्तम संस्कार होत गेल्यामुळे त्यांनी आपल्या संपत्तीचा बराचसा भाग समाजोपयोगी कार्याला मन:पूर्वक वाहून तो सत्कारणी लावला. ते स्वत: दूरद्रष्टीने कल्पक विचारवंत असल्यामुळे रचनात्मक कार्याची आखणी करुन ते प्रत्यक्षात घडवून आणण्याकरिता त्यांनी अहोरात्र परिश्रम घेतले आणि विविध प्रकारचे उत्कृष्ट उपक्रम कार्यान्वित करुन ते सतत चालू राहतील अशी कायमस्वरुपाची व्यवस्था करुन ठेवली.

त्याच योजनापैकी एका योजनेनुसार त्यांनी आपल्या वयाच्या ४० व्या वर्षी १९४४ मध्ये ट्रस्ट योजना तयार केली.

व्यक्तीच्या सर्वांगीण विकासासाठी शारीरिक मानसिक तसेच अध्यात्मिक असा तीनही प्रकारांनी प्रयत्न होणे आवश्यक असते. केवळ मानसिक विकास. शारीरिक दुर्बलतेमुळे मानवाला पंगू बनवितो. केवळ आध्यात्मिक विकास मानवाला आत्मकेंद्रित बनवितो. म्हणून त्या तीनही अंगांचा सारखा विकास होऊनच जीवनात समतोल साधता येईल. हे मूलभूत तत्व हेरुन त्यांनी ट्रस्टद्वारा करावयाच्या कार्याची पुढील सहा शाखामधे विभागणी केली.

१) संस्कृत शिक्षण

२) संस्कृत व दर्शन शोध शिष्यवृत्ती

३) आत्म शिष्यवृत्ती

४) वस्त्र शिष्यवृत्ती

५) धंदेशिक्षण शिष्यवृत्ती

६) गीता वर्ग.

भारतीय संस्कृती, तत्वज्ञान व उज्वल जीवन पध्दती यांची आधारशीला म्हणजे संस्कृत भाषा व साहित्य त्या विषयीचे अज्ञान. आपल्याला सतत अंध:काराकडेच वेचत राहील, हे जाणून त्यांनी ''श्रीमान श्रीवल्लभ श्रीमती धन्नबाई चांडक ट्रस्टची स्थापना दि. ११ ऑगष्ट १९४४ साली केली. याप्रमाणे लोकोपयोगी कार्याची मुहूर्तमेढ रोवून १९४८-४९ साली ''संस्कृत पाठशाला'' सुरु करुन नि:शुल्क संस्कृत अध्ययन संस्कृत पुस्तके व संस्कृत परीक्षा शुल्क ह्यांची सोय उपलब्ध करुन दिली, आणि संस्कृ त भाषेच्या प्रसारासाठी शिष्यतृत्या देण्याची व्यवस्था करुन ठेवली.

श्री. रामरतनजी चांडक यांनी वयाच्या ५१ व्या वर्षी (१९५६ मध्ये) पुन्हा श्रीराम ट्रस्ट हा दुसऱ्या नवीन ट्रस्टची स्थापना करुन राजापेठ (अमरावती) येथे ''दीपार्चन'' नांवाची भव्य वास्तू उभारुन त्यांत व्याख्याने, प्रवचने, सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्याकरिता प्रशस्त सभागृह निर्माण केले. ह्या सभागृहात दरवर्षी नियमितपणे विज्ञान,कला,अध्यात्म अशा सारख्या विविध विषयावर तज्ञ ।अधिकारी व्यक्तीद्वारा समाज प्रबोधनाचे कार्य अव्याहतपणे सुरु असते. हे सर्व कार्यक्रम अराजनैतिक व अविवादास्पद स्वरुपाचे राखण्यावर कटाक्ष आसतो.

श्री. रामरातनजी चांडक ह्यांनी आपल्या क्रांतीकारी व समयानुकूल विचारधारेनुसार १९६६ साली जनकल्याण कार्याला अधिक चालना देण्याच्या उद्देशाने ''तखतमल श्रीवल्लभ चॅरिटेबल ट्रस्ट'' ह्या नांवाच्या तिसऱ्या ट्रस्टची स्थापना करण्यात येऊान त्या ट्रस्ट अंर्तगत असलेल्या पुढील संस्थांना आर्थिक सहाय्य देण्यात येऊन त्यांना स्थायी स्वरुप देण्यात आले.

१) आरोग्य साधना मंडळ - २)माहिती होमिओ चॅरिटेबल सोसा.

३) बाल शुश्रूषा केंद्र - ४) आयुर्वेद विकास मंडळ.

५) दिपा बालविहार व दीपा निकेतन - ६) तक्षतमल योग केंद्र.

७) रामनिकेतन (तखतमल हायस्कूल) - ८) रामरतन चांडक केमिकल सर्जिकल अँड रिसर्च सेंटर.

ग्रामीण भागातील रुग्णांना वैद्यकिय मदत मिळावी म्हणून श्री. रामरतनजी चांडक यांनी थूगांव (पूर्णानगर) येथे ॲलोपॅथीचा दवाखाना, गणोरी येथे आयुर्वेदिक दवाखाना आणि पुसदा येथे ओमिओपॅथीक दवाखाना - असे एकूण तीन दवाखाने उघडले.

भारतातील संत साहित्याचा परिचय करुन देण्याकरिता भारताच्या विविध शल्यातील संत साहित्याचे प्रकाशन ट्रस्टच्या खर्चाने करवून घेतले त्यापैकी काही प्रमुख प्रकाशने येणे प्रमाणे :-

१) पंजाब के संतो की, हिन्दी वाणी,

२) राजस्थान

३) महाराष्ट्र

४) गुजराथी

५) फारसी

दिपाबाई सहायता कोष :- स्वर्गीय रामरतनजी चांडक यांच्या सुविद्य पत्नींच्या नावे असलेल्या "श्रीमती दिपाबाई चांडक सहायता कोष मधून माहेश्वरी समाजातील आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या महिलांना व्यवसायाकरिता आर्थिक सहाय्य दिले जाते.

गौरवशाली परंपरा :- दानशूर स्व. श्री. रामरतनजी चांडक यांच्या स्वर्गवासानंतर त्यांचे दत्तक पुत्र श्री. श्रीरंगजी चांडक हेही त्यांच्या वडिलापासूनची ही गौरवशाली परंपरा अव्याहतपणे पुढे चालू ठेवण्यास अग्रेसर आहेत. ही बाब निश्चितच अभिनंदनीय आहे.

नेत्रहीनांना कार्जिग्राय बसवून देण्याची सोय उपलब्ध करुन देणाऱ्या "रामरतन चांडक कनिअल सर्जिकल अँड रिसर्च सेंटर" त्यांनी स्व.श्री.रामरतनजी चांडक यांच्या

स्मृतिप्रीत्यर्थ नेत्रहीनांच्या दवाखान्याकरिता ३ लाख रुपयाचे सभागृह अनुदानही दिले.

साने गुरुजी मानवसेवा संघ (अमरावती) द्वारा हृदयरुग्णांकरीता आयोजित केलेल्या शिबिरा करिता १० हजार रुपयाचे आर्थिक सहाय्य देण्यात आले इतकेच नव्हे तर श्री. श्रीरंगजी चांडक यांनी वर्षभर प्रत्येक हृदयरुग्णाकरिता रु. १०००/- याप्रमाणे आर्थिक सहाय्य देण्याचे अभिवचन देऊन ते पूर्ण केले आज पर्यंत ३५ हृदयरुग्णांनी आर्थिक सहाय्याचा लाभ मिळविला आहे. ही गौरवशाली परंपरा अखंडित चालू ठेवणारे श्री. श्रीरंगजी चांडक हे त्यांच्या लोक कल्याणकारी कार्याबद्दल निश्चितच अभिनंदनास पात्र आहेत.

श्री. जुगलकिशोर पटेरिया यांनी दिलेल्या माहितीचे आधारे

अमरावती का होलीकोत्सव

होली - (धुलिवंदन) भारत का प्रमुख हर्षोल्लास का पर्व है। भारत के सभी प्रान्तो में होली, अपने, अपने पारम्परिक ढंग से मनाई जाती है।

अमरावती में भी होली सभी वर्गो के लोग अपने-अपने ढंग मनाते है सुविज्ञ नागरिक धुलवंदन पर मात्र केसरी अथवा गुलाबी रंग को ही प्रधानता देते है। तथा सादगी के साथ हर्षोल्लास व्यक्त करते है।

अमरावती में सभी वर्गो, सम्प्रदायो, का समावेश है। वे भी अपनी पारम्परिक ढंग से होली मनाते है।

वैसे तो, राजस्थानी, गुजराती एवम बुंदेली तथा यु.पी. के रहिवासी इस पर्व को एक माह तर मनाते है। क्योंकी इस हर्षोउल्हास का पर्व का वसंत ऋतु के आगमन के साथ ही होता है।

अमरावती में १ माह पूर्व अंबादेवी पर होली का प्रतिकात्मक "वृक्ष" विधिवत रोपित किया जाता है, तथा होलीकोत्सव वह प्रज्वलित किया जाता है।

उसी प्रकार यु.पी. बुंदेलखंड, राजस्थान के लोग वसंत आगमन के साथ इस पर्व की शुरुवात से, रोज रात्री में गा-बजाकर करते है

अमरावती में, राजस्थानी समाज के लोग सक्करसाथ विभाग में सिकवाल लोग सिकवालपुरा (मच्छीसात मे) तथा बुंदेली समाज के लोग नगंडियॉ (छोटा नगाडा) ढोलक, बडे मंजीरे (झांझ) बांसुरी, का प्रयोग होली गीत पर करते है। तथा श्री गणेशजी के आव्हान के साथ, कृष्ण + राधा गोपीयो, ग्वालो के प्रासंगिक गीतो को गाते है जो श्रृंगार रस तथा हास्य से परिपूर्ण होते है। बुंदेली भी श्रृंगारित गीतो को, प्राकृतिक सौंदर्य को, गीतो मे बखानित कर वसंत के प्राकृतिक छटाओ - कृष्ण की विविध लिलाओ का वर्णन गीतो में करते है। तथा गीत की शुरुवात माथे पर गुलाल का टिका लगाकर करते है। इसमे रंगो का प्रयोग नही होता बल्कि रंग तो धुलिवंदन से तिथि पंचमीतक ''रंग गुलाल चलता है।

बुंदेली गीतो मे देवर भाभी के भी स्नेह से परिपूर्ण हास्य युक्त लेकिन बडे ही हास्य व्यंगात्मक होते है। जो मन तथा गुदगुदाते है।

पूर्णिमा पर '' होली कोत्सव पर '' रात्री में होली प्रज्ज्वलित कर (पूर्ण धार्मिकता से) रात्री से ही रंग गुलाल का प्रयोग शुरु करते है।

बुंदेली होली

बुंदेली लोग धुलिवंदन से लेकर पंचमीतक संभव हुआ ते एक समाह तक - विशेष होली नृत्य का आयोजन करते है जिसे ''राई'' नृत्य कहा जाता है जो काफी आकर्षक होता है।

सामान्य धुलिवंदन

सभी वर्गो के लोग बाग धुलिवंदन पर एक दुसरे पर रंगो की बौछार करते है। बालक व युवा पीढी के लोग अपने अलग ढंग मे होली मनाते है तथा मन चाहे रंगो का प्रयोग करते है तथा विभत्स प्रदर्शन कर अश्लिल शब्दो के प्रयोग से इसे हर्षोल्लास के पर्व को दुषित बनाते है।

''महामूर्ख सम्मेलन''

युवा पीढी के विभत्स प्रदर्शन तथा अशोभनीय कृत्यो, अश्लिल शब्दो के प्रयोगो तथा रंग के पूर्व को बदरंग करनेवाली कुरुतियो को रोकने के लिए तथा होली पर स्वस्थ मनोरंजन हो हास्य व्यंग से ओत प्रोत बंदियॉ सांस्कृती कार्यक्रम हो - समाजसेवी भी

जुगली किशोर पटेरिया ने " महामुर्ख सम्मेलन " एक नया परिवर्तन लाने की दृष्टी से आयोजित किया जिसमे सन्मानीया नागरिको को, कवियो साहित्यकारो, नेताओ, डॉ.वकीलो, समाजसेवियो को आमंत्रित कर "महामूर्ख सम्मेलन" जनता को स्वस्थ मनोरंजन दे सके" हास परिहास" एक सार्वजनिक कार्यक्रम प्रस्तुत किया।

इस सम्मेलन को हास्य प्रधान बनाने हेतु - अच्छे हास्य वक्ताओ, हास्य व्यंग के गीत कारो, हास्य प्रधान, चुटकुले सुनाने वाले, हास्यमय संचालन करनेवालो को आमंत्रित किया जाने लगा ताकिं दो तीन घंटे "इस हास परिहास" का पूर्ण लाभ जनता ले सके नई पीढी भी अपना - विकृतियो युक्त प्रदर्शनो व प्रयोगो से हटकर इस ओर मन मोडे तथा स्वस्थ मनोरंजन करे हर्षोल्लास के पर्व को "पूर्ण हास्यमय" बनाकर एक नया रुप देवे।

महामूर्ख सम्मेलन प्रगतिपथ पर

१९६७ में शुरु किय गया "महामूर्ख संम्मेलन का प्रयोग सफल होते देख, प्रति वर्ष इसे अधिकाधिक आकर्षक बनाने मे संयोजको ने कोई कसर नही छोडी।

१०१ गर्दभो के साथ "महा मुर्खाधिराज सहाय को की भव्य शोभा यात्रा सम्मेलन को हर वर्ष अच्छा प्रतिसाद मिलने लगा अत: इसे और भी रोचक व आकर्षक बनाने के लिए भव्य शोभा यात्रा निकालने का मानस बना।

अत: १०१ गर्दभो के साथ वाद्यवृन्दो के साथ, विशेष रुप से आकर्षक मुकुटो व विशेषरुप से तयार किये गये हारो से सुशोभित होकर , मुर्खाधिराज व सहायको की विशेष सुसज्जित गाडी पर शोभा यात्रा निकली. जो बडी ही आकर्षक रही।
इस प्रकार प्रतिवर्ष नये नये रंगो रुपो के साथ महामूर्ख सम्मेलन - सफलता की और बढता गया। लोगो को स्वस्थ मनोरंजन देता गया।

किन्तु पुन: नई पीढी ने अपनी दखलदांजी शुरु की कार्यक्रम स्थल पर मुर्दे लाने, नारे लगाने, तथा अवरोध उत्पन्न करने का कार्य शुरु किया, अत: आयोजको को सार्वजनिक स्थान पर कार्यक्रम से नाअसह्य होने लगा और धीरे धीरे यह बंद हो गया।

परिशिष्ट २३

लेखकाचे संक्षिप्त निवेदन.

अमरावती शहराचा इतिहास भाग पहिला व दुसरा यांत ११ व्या शतकापासून ते १९१९ पर्यंत व भाग दुसरामध्ये १९२० ते १९३२ पर्यंतचा इतिहास आलेला आहे व आता अमरावती शहराचा इतिहासाचा भाग तिसरा मध्ये १९३३ ते १५ ऑगस्ट १९४७ पर्यंत (स्वातंत्र्यपूर्वकाळातील) अमरावती शहराचा इतिहास आलेला आहे. या ग्रंथाने संपूर्ण ९०० वर्षाचा इतिहास पूर्ण होत आहे

हा ९०० वर्षाचा इतिहास अमरावतीकर जनतेच्या सेवेस सादर करीत आहे. तो गोड मानून घ्याल अशी अपेक्षा आहे. मागील भाग १ व २ हे दि. १९ नोव्हेंबर ७८ ला प्रसिध्द झाले. त्यानंतर सुमारे १० वर्षांनी हा तिसरा भाग प्रसिध्द होत आहे. या दहा वर्षातच मी इतिहास लिहीण्याचे काम केले. ह्याला प्रदीर्घ काळ लागला. हा इतिहास लिहितांना फार गडबडीत लिहिल्या गेला. काही चुकभूल आढळल्यास माझे निदर्शनास आणावी ही विनंती.

धन्यवाद.

दि.१६/५/१९८९ भि.दे.कारंजकर, ग्रंथकर्ता.

संपादकीय निवेदन (वा.ब. खापर्डे)

अखेरी अखेरीस बापूसाहेब कांरजकर यांची प्रकृति साथ देईना. डोळे बिघडून गेले. तेव्हा माझ्यावर विश्वास ठेवून हा ग्रंथ तयार करण्याकरता तीन मोठमोठे गठ्ठे आणून दिले. त्यांच्यासोबत काम करताना त्यांची शैली, हातोटी व कार्य पध्दति यांची मला माहिती झाली होती. त्यामुळे कागद व्यवस्थित लावून, पानांना अनुक्रमांक देऊन, आवश्यक तेथे संक्षेप करुन, अनुक्रमणिका व परिशिष्टे जोडून शेवटी अकारविल्हे नावे देऊन हा ग्रंथ मी तयार केला.अनेक ठिकाणे पुनरावृति झाली होती ती टाळली. बऱ्याच ठिकाणी पाल्हाळिक माहिती होती . ती संक्षेपाने लिहिली. व हे सर्व करण्याकरता काही वर्षे खर्च झाली. त्या दरम्यान बापूसाहेबांना दि. २०-७-१९९० रोजी देवाज्ञा झाली. हा ग्रंथ प्रकाशित झालेला पाहण्याचे सौभाग्य त्यांना लाभले नाही. पण मी चिकाटीने सारे करीत राहिलो. माझ्या दृष्टीने सर्व ग्रंथ पूर्ण झाल्यावर तात्कालीन महापौर सौ. विद्याताई देशपांडे यांना दाखविला. व दि. १८-१-१९९६ च्या आमसभेत श्री वसंतराव साऊरकर, नगरसेवक यांनी ठराव पारित करुन देऊन हया ग्रंथाच्या संपादकत्वाचे काम माझ्यावर रीतसर सोपविले. आणि ग्रंथ प्रकाशित करण्यास्तव अमरावती म.न.पा. ने अनुदान मंजूर केले. त्याबद्दल मी माजी महापौर सौ. विद्याताई देशपांडे यांचा आभारी आहे. तसेच माजी महापौर सौ.किरणताई महल्ले व माजी महापौर श्री. प्रकाश काशीकर यांनी तत्परतेने ग्रंथ प्रकाशन कार्यात लक्ष घातले ह्याबद्दल त्यांचाहि आभारी आहे.

कै .भी.दे. (बापूसाहेब) कारंजकर यांना मी आदरपूर्वक श्रध्दा सुमनांजलि समर्पित करतो. भारतीय इतिहास संकलन व पुनर्लेखन समिती, विदर्भ विभाग, नागपूर ह्या संस्थेचे पदाधिकारी श्री. कृष्णराव भागडीकर, श्री. श्रीपाद चितळे, प्रा. दिनकरराव कुबडे यांनी बहुमोल साह्य केले त्यांचाहि मी अतिशय आभारी आहे. अमरावती म.न.पा. चे आयुक्त श्री. बक्षी व उपायुक्त श्री. जिरापूरे यांचा मी विशेष आभारी आहे.

हा इतिहास तयार करताना अनेक शंका मनात होत्या त्या मी ह्या खंडाचे रसग्रहण (प्रस्तावना) लिहितांना व्यक्त केल्या आहेत. हा मजकूर मला त्यातच समाविष्ट करता

आला असता. पण त्या ग्रंथाचे मूळ स्वरुप शक्यतो जसेच्या तसे कायम ठेवायचे, हा पक्ष मी सुरुवातीपासून स्वीकारला होता. म्हणून संपादकीय निवेदन लिहावयास घेतले.

ह्याला कारण घडले. ते असे की, दि. २१-९-९७ च्या तरुण भारतात इतिहासा संबंधी दोन लेख आले आहेत. १)लालभाईचे इतिहास प्रेम २)इतिहास : एक बहुरुपी. पहिला लेख श्री. देवेंद्र स्वरुप यांच्या साऱ्या दिग्गज पत्र कर्त्याचा आहे. व दुसरा आशा राजवाडे यांचा आहे. 'लालभाईंचे इतिहास प्रेम' या लेखात कम्युनिस्ट पार्टीच विद्वान लोकांनी भारतीय ''कम्यूनिस्ट पक्षाची आंदोलने व स्वरुपा संबंधीची कागदपत्रे'' या विषयावर --- खंड प्रकाशित केले आहेत, त्यासंबंधी संक्षिप्त समीक्षण केले आहे. त्या लेावरुन एक निष्कर्ष असा काढता येतो की एकाच साम्यवादी चळवळीचे तीन विभिन्न साम्यवादी पक्षांनी आपापल्या विचारसरणीला अनुलक्षून विभिन्न प्रकारे मूल्यमापन केले आहे. आणि आपल्यापक्षाच्या इतिहासाच्या संबंधात यातीन गटात भरपूर मतभेद आढळतात. कम्युनिस्ट पक्षाची भारतात स्थापना केव्हा झाली, व खरे संस्थापक कोण, याबाबतहि मतभेद आढळतात. श्री. स्वरुप यांच्या संपूर्ण लेखाकडे वळायची आवश्यकता नाही. पण एक दोन वाक्यांचा आधार घेत घेत हे संपादकीय निवेदन पुर करावे असा मनोदय आहे. त्यापैकी एक वाक्य असे :- ''इतिहासाकडे मार्क्सच्याच दृष्टिकोणातून पाहिले पाहिजे व त्याच विशिष्ट साच्यात इतिहासाला घालून व विशिष्ट शब्दांचे आवरण चढवून इतिहास प्रस्तूत केला पाहिजे. परंतु इतिहासाच्या लेखनाचा मूळ उद्देश मात्र पक्षाच्या प्रचाराचाच असला पाहिजे.''

त्या दृष्टीने पाहता श्री. बापूसाहेब कारंजकरांनी लिहिलेला अमरावतीचा इतिहास, मी पूर्ण केलेला त्यातील इ.१९३० ते १९४७ हया कालखंडाचा इतिहास, व जोडलेली परिशिष्टे ही वरील वाक्यांशी ताळमेळ राखत नाही, हे मान्यच करावयास हवे. त्यांनी व मी कोणताही पक्षपात न करता, मनात आकस न ठेवता, जे प्रांजळ पणे पुढे आले ते लिहून काढले आहे. अनेक घडामोडींवर मला भाष्य लिहिता आले असते. मी लिहू शकलो असतो. पण मोह टाळला. भाष्य लिहिण्याचे काम पुढे कोणीतरी इतिहास प्रेमी करेलच. केरळ व बंगाल मध्ये विद्वानांकडून इतिहास लिहून घेऊन एका विशिष्ट

पक्षाला शिविगाळ करण्यात आली आहे, असेही श्री. देवेन्द्र स्वरुप यांच्या लेखावरुन दिसते. असली असहिष्णुता अथवा दूराग्रह ह्या पुस्तकात नाही, इकडे मी आवर्जून लक्ष वेधू इच्छितो. आशा राजवाडे यांच्या "इतिहास : एक बहुरुपी", ह्या लेखात इतिहासाचे व्यक्तित्व कसे बहुरंगी , बहुरुपी असते हे सांगितले आहे. कोणतेही आकलन हे प्रवाही असते. बदलता काळ, बदलते संदर्भ, बदलते दृष्टीकोण, हे इतिहासाचे रुप सतत बदलत असतात. माणसांगणिक अभ्यासकाच्या स्वत:च्या चष्म्याचा नंबराप्रमाणे इतिहास वेगवेगळे रुप धारण करीत जात असतो." असे ह्या लेखाच्या प्रांरभी वाक्य आले आहे. हे जर सत्य मानले, तर खरा इतिहास कोणाला कधीच ज्ञात होणार नाही. बदलणारी व्यक्ति इतिहास नव्हे ; इतिहास विषयीचा दृष्टिकोण बदलत असतो. बदल इतिहासात होत नाही.

विशिष्ट साच्यात इतिहासाची सम्यकता त्याच्या बहुरुपी पणात आहे. लोकसाहित्य पोवाडे, आख्यायिका रोमांचकारी घटनांचे तपशील, हा सारा इतिहासाचा लंवाजमा आहे. त्या विशिष्ट काळात लिहिलेल्या रोजनिशीतील नोंदी, पत्रव्यवहार, वर्तमानपत्रांतील तपशील, हा सारा तपशीलाचा पसारा सुध्दा इतिहासाचाच एक भाग आहे. नाही का ? एखादी घटना, एखादे लिखाण, आणि त्यांची लावलेली संगती, अर्थ , त्यांचे --- आज ही आणि उद्या यांच्या संदर्भात केलेले स्पष्टीकरण इतिहास काराकडून अपेक्षित असते. असाही एक वाक्य माझे मन आकर्षित करुन गेले. पुन्हा पुन्हा तेच ते सांगण्यात मतलब नाही. वाचकांनी ह्या दृष्टीने ह्या ग्रंथाकडे पाहिल्यास हा सारा लवाजमा इतिहासाच्या ह्या पुस्तकात आहे, असे वाचकाला आढळेल. आणि वाचकाचे ह्या दृष्टीने समाधान होणे, ह्यातच कै.श्री.कारंजकर व मी ह्यांच्या कष्टाचे चीज व पावती आहे.

आभार, ऋणनिर्देश, कृतज्ञता

सहकार्याबद्दल खालील पदाधिकारी, संस्था, संघटना, व्यक्ति यांचा आभारी आहे. वासुदेव बळवंत खापर्डे संपादक परिशिष्ट व पुरवणी विभाग, अमरावतीचा इतिहास (खंड ३)

१) महानगर पालिका अमरावती

२) आयुक्त, उपायुक्त, महापौर, म.न.पा. अमरावती

३) मा. कलेक्टर अमरावती,

४) मा. जिल्हा पोलीस अधीक्षक, अमरावती

५) मा. क्रीडाा संचालक, अमरावती

६) मा. शिक्षणाधिकारी अमरावती

७) मा. प्रकाशन जिल्हाधिकारी अमरावती

८) मा. एन.सी.सी. समादेशक, मुले विभाग

९) मा. एन.सी.सी. समादेशक मुली विभाग

१०) दै. तरुण भारत नागपूर

११) दै. हिंदुस्थान अमरावती

१२) सौ. विद्याताई देशपांडे, माजी महापौर अमरावती

१३) सौ. किरण महल्ले, माजी महापौर अमरावती

१४) श्री. प्रवीण काशीकर माजी महापौर अमरावती

१५) श्री. वसंतराव साऊरकर, नगरसेवक

१६) श्री. नितिन वानखडे, माजी महापौर

१७) श्री. विलास इंगोले, महापौर

१८) श्री. किशोर दिघेकर, दलितमित्र

१९) श्री. पी.के. (अण्णा साहेब) देशमुख, स्वातंत्र्य संग्राम सेनापति

२०) श्री. शशिकुमार देशमुख

२१) श्री. प्रभाकर दवंडे

२२) कु. रझिया सुलतान

२३) जिल्हा बार रुम, अमरावती

२४) श्री. दि.भा. घुमरे, नागपूर

२५) श्री. मुकुंद डोळे, अमरावती

२६) श्री. शिवचंद्रजी माजूरकर, अमरावती

२७) अमरावती विद्यापीठ अमरावती,

२८) श्री. किशोर फुले, अमरावती

२९) सर्व राजकीय पक्ष, अमरावती

३०) रा. स्व. संघ, अमरावती

३१) संगीत कालोपासक सभा अमरावती. '' सुरभि'' अमरावती

३२) श्री. वा.ल. (बापूसाहेब) डोळे, अमरावती

३३) प्राचार्य प.सी. काणे, अमरावती

३४) डॉ. प.ल. जोशी, नागपूर

३५) साप्ताहिक वऱ्हाड समाचार, आकोला

३६) लोकमान्य टायपिंग इंस्टि. राजकमल चौक अमरावती

३७) शुध्दलेखन तपासण्याच्या कार्यात सहकार्य केल्या बद्दल सौ. मंगला बक्षी, श्री. प्र.ना. बोरकर, श्री. विश्वास कुळकर्णी श्री. गजानन बालेकर यांचा आभारी आहे.

३८) श्री. शिवचंद्रजी नागर

३९) डॉ. अरुण खोडस्कर

४०) श्री. यशवंत शेरेकर

४१) श्री. अण्णा वैद्य

४२) श्री. संजय मराठे

४३) वैद्यराज श्री. पु. हिर्लेकर

४४) सर्व मठ, मंदिरे, देवस्थाने यांचे विश्वस्त

४५) श्री हनुमान प्रसारक व्यायाम मंडळ अमरावती (श्री. प्रभाकरराव वैद्य, प्राचार्य सुरेश देशपांडे)

४६) सर्व शिक्षण संस्थांचे संचालक

४७) श्री. शर्माजी, आर्य समाज अमरावती

४८) श्रीकृष्ण थिऑसॉफिकल लॉज अमरावती (ब्रह्मविद्या मंदिर अमरावती)

४९) श्री. बबनराव मेटकर , माजी आमदार

५०) श्री. अनंतराव गुढे, खासदार

५१) विदर्भ साहित्य संघ, अमरावती

५२) नगर वाचनालय अमरावती

५३) श्री. शाम देशपांडे अमरावती (जी.डी.)

५४) आर्य समाज अमरावती

५५) अ.भा.वि.प. अमरावती

५६) माहेश्वरी समाज अमरावती

५७) मा. जिल्हा अधीक्षक पोलीसदल अमरावती

५८) श्री. शाम देशपांडे अमरावती

५९) श्री. दत्तात्रय वासुदेवराव तारे, स्टेट बँक कॉलनी, राजापेठ, अमरावती.

६०) उदय दत्तात्रय तारे, स्टेट बँक कॉलनी, राजापेठ, अमरावती.

६१) जयकुमार नथ्थूजी कोरडे, केडीया नगर, अमरावती.

६२) सबनीस फोटो स्टुडीओ, अमरावती.

६३) सुरेश माथने, भाजीबाजार, अमरावती.

६४) शरद नांदूरकर, टापर होस्टेल, राजापेठ, अमरावती.

६५) महेंद्र भूतडा (रक्तदान समिती अध्यक्ष), अमरावती.

६६) अजय दातेराव, अमरावती.

६७) केशवराव पळसकर, अमरावती.

६८) सौ. नम्रता नितीन दिक्षित, प्रमोद कॉलनी, राजापेठ, अमरावती.



धन्यवाद

समाप्त